SERVANTS OF INDIA SOCIETY'S LIBRARY,
POONA 4.
FOR INTERNAL CIRCULATION
To be returned on or before the last date stamped below

# टिळक यांचे चरित्र

## उत्तरार्ध—खंड २

सन १८९९ पासून १९१४ पर्यंत ]

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

८४९ ] पुणे [ सन १९२८

# लो० टिळक यांचे चरित्र

## उत्तरार्ध—खंड २

[ सन १८९९ पासून १९१४ पर्यंत ]

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

शके १८४९ ] पुणे [ सन १९२८

प्रकाशक–न. चिं. केळकर,
५५४ सदाशिव पेठ, पुणे शहर.

[ या ग्रंथाच्या भाषांतराचे, प्रकाशनाचे, पुनर्मुद्रणाचे इत्यादि सर्व हक्क ग्रंथकाराने आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. ]

मुद्रक–वामन वासुदेव अतीतकर,
नवीन समर्थ विद्यालयाचा
समर्थ–भारत छापखाना,
३२५ सदाशिव पेठ, पुणे.

# प्रस्तावना

संकल्पाप्रमाणे टिळकचरित्राचा ग्रंथ आज संपूर्ण होऊन हातावेगळा करिता येत आहे याविषयी आनंद होतो.

या ग्रंथाचा पूर्वार्ध १९२३ च्या एप्रिलात लिहून झाला. त्यानंतर हा उत्तरार्ध लिहिण्याला हाती घेण्यास जवळ जवळ पाच वर्षे लागली. इतका विलंब लागण्याची कारणे वाचकाना सांगितल्याशिवायहि ध्यानात येण्यासारखीच आहेत. अर्थात् असली कारणें केव्हाहि संपत नसतात. तथापि हाती घेतलेले हे काम अर्धेच राहिले तर ते मुळी न केल्यासारखेच झाले असे नेहमी वाटे. ग्रंथ पुरा करण्या-करता जमवून ठेवलेली साधनसामुग्री रोज दृष्टीला पडून आपला परामर्ष न घेतल्याबद्दल निषेध करीत होती. वाचकवर्गहि दरवर्षी टिळकांच्या जन्मातिथीच्या किंवा मृत्युतिथीच्या सुमारास, ग्रंथाची आठवण ठेऊन, खासगी रीतीने व केव्हा वर्तमानपत्रातूनहि, उरलेला ग्रंथखंड वाचावयास लवकर मिळावा अशी अपेक्षा प्रकट करीत होता. आणि स्वतःच्या संकल्पाला हे उत्तेजन समजून ग्रंथ पुरा करून लवकरच हाती देईन अशी आश्वासने मीहि त्याना कृतज्ञताबुद्धीने देत होतो. वरील सर्व कारणांकरिता केव्हा तरी निश्चयाने बसून ग्रंथ पुरा करणे हे अनिवार्य झाले होते. छपाईचे काम सुरू करण्याचे मनात आणताच, येथील 'श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स' आणि 'श्रीसमर्थ भारत छापखाना' यानी तावडतोब छापण्यास प्रारंभ करण्याची तयारी दाखविली. आणि गेल्या दोन महिन्यात इतर कामे बाजूला ठेऊन मोठ्या तत्परतेने हे काम त्यानी करून दिले म्हणूनच हा ग्रंथ इतक्या लवकर प्रसिद्ध करता आला. चालू जानेवारी महिन्यात असेंब्लीच्या कामावर जाऊन रुजू होण्यापूर्वी, मी पुण्यास असता, हे काम समक्ष उरकले तरच ते पार पडते, एरवी पुढे उन्हाळ्यात छपाई वगैरे संपवून ता. १ ऑगस्टच्या पूर्वी कबूल केल्याप्रमाणे वाचकांच्या हाती पुस्तक देणे अशक्य होणार असे मला अनु-भवाने आढळून आले होते. कसेहि असो. घाईत घाई करून का होईना ग्रंथ पुरा करण्याचा संकल्प तडीस गेला, आणि टिळकांच्या येत्या पुण्यतिथीच्या आधीच पाच महिने तो वाचकांचे हाती देता आला याबद्दल वरील दोन्ही छापखान्यांच्या चालकांचे आम्ही अत्यंत आभारी आहो. तसेच कोकाटे बंधु यानी पुस्तके त्वरित बांधून देण्याची मदत केली. या ग्रंथाची साधनसामुग्री पुष्कळ दिवसापासून काळजी-पूर्वक व आस्थेवाईकपणे वेळोवेळी जमवून ठेवणे, ग्रंथ लिहून होत असता ती वेळच्यावेळी लागेल तशी पुरविणे, आणि संदर्भ उतारे अवतरणे वगैरे काढून देणे, इत्यादि गोष्टींचे सहाय्य चिरंजीव काशिनाथ नरसिंह ऊर्फ बापूराव केळकर याने केले. श्री. पां. वा. गाडगीळ 'वाङ्मय-विशारद' यानी विषयवार इंडेक्स कार्डे तयार केली. श्री. वि. पां. दांडेकर बी. ए. यानी स्वयंसेवक या

नात्याने मधुनमधून लेखकाचे काम केले. आणि वाईचे इनामदार श्री. बाळासाहेब साठे यानी आक्टोबर महिन्यात काही दिवस पाचगणी येथील आपले घर आम्हाला राहावयास दिल्यामुळे तेथे एकांतवासात बराच मजकूर लिहून झाला. या कारणांकरिता मी वरील सर्वांचा फार आभारी आहे.

या ग्रंथाचा पूर्वार्ध व हलीचा हा उत्तरार्ध यांच्या स्वरूपात मुख्य फरक काय आहे हे वाचकाना न सांगताहि लक्षात येण्यासारखे आहे. या उत्तरार्धात वर्णन केलेला टिळकांच्या कारकीर्दीचा दुसरा भाग तुलनात्मक दृष्टीने अर्थात् बराच अधिक महत्त्वाचा होय. चरित्रलेखकाच्या दृष्टीने सांगण्यासारखा फरक हा की या भागाच्या संबंधांत चरित्रलेखनाची साधने अधिक उपलब्ध झाली. विशेषतः या उत्तरार्धात सुमारे साडेचारशे पत्रे छापता आली. अस्सल पत्रांची मौज ही असते की ती अधिक विश्वसनीय तर असतातच, परंतु पत्र-लेखनाच्या काळच्या परिस्थितीवर अनेक बाजूनी प्रकाश पाडणारीहि असतात.

श्री. स. वि. बापट यांच्या ' आठवणी व आख्यायिका ' या पुस्तकाच्या दोन भागांचाहि उपयोग थोडथोडा झाला. या ग्रंथाचा तिसराहि भाग येत्या ऑगस्टमध्ये प्रसिद्ध होणार आहे. व या तीनहि भागांच्या सहाय्याने आणखी एका वेगळ्या रीतीने टिळक-चरित्र कोणास लिहिण्याची स्फूर्ति झाली तर त्याला ते साधन उपयोगी पडण्यासारखे आहे. थोर लोकांची चरित्रे अनेक प्रकारानी लिहिली जाऊ शकतात. मी लिहिले ते मुख्यतः घडलेला इतिहास संगतवार सांगण्याच्या दृष्टीनेच लिहिले आहे.

हलीच्या या ग्रंथात अनुच्चारित अनुस्वार न लिहिण्याची नवी पद्धति मी स्वीकारिली आहे. तसेच प्रत्येक भागाच्या शेवटी पृष्ठसंख्या पुरी करून पुनः नव्या भागाला नवा क्रमांक सुरू केला आहे. या दोन्ही सुधारणा सकारण आहेत याहून त्यांचे अधिक समर्थन येथे करीत नाही.

मकरसंक्रांत शके १८४९
पुणे १०-जानेवारी १९२८

न. चिं. केळकर

# ग्रंथरचनेची समजूत

या चरित्राचा पूर्वार्ध १९२३ साली प्रसिद्ध झाला. त्यात सन १८९९ सालापर्यंतची हकीकत दिलेली आहे. त्याला 'खंड पहिला' असे नाव दिलेले आहे. त्यात एकंदर २८ भाग असून पृष्ठसंख्या ६७२ आहे.

हल्लीचा ग्रंथ त्याच चरित्रग्रंथाचा पुढील व उरलेला संपूर्ण अंश असून त्याला उत्तरार्ध असे नाव दिलेले आहे. सोयीकरिता या उत्तरार्धाचेहि दोन विभाग करून पूर्वीचा क्रम पुढे चालू ठेवला आहे. पैकी पहिल्याला 'उत्तरार्ध खंड दोन' व दुसऱ्याला 'उत्तरार्ध खंड तीन' अशी नावे दिली आहेत. या 'उत्तरार्ध खंड दोन' मध्ये एक ते नऊ भाग असून त्यांची पृष्ठसंख्या ५५२ आहे. 'उत्तरार्ध खंड तीन' यामध्येहि एक ते नऊ इतके भाग असून त्याची पृष्ठसंख्या मात्र ७०४ आहे.

या उत्तरार्धातील खंड २ व खंड ३ यातील भागाना अनुक्रमांक त्या पुरतेच दिलेले असून शिवाय प्रत्येक भागापुरती पानांची संख्याहि स्वतंत्र देऊन पुरी केली आहे.

अशा रीतीने या समग्र चरित्र-ग्रंथाची एकंदर पाने १९४४ होतात ती अशी:—

पूर्वार्ध— खंड १ भाग २८ एकंदर पानांची संख्या ६८८
उत्तरार्ध— खंड २ भाग ९ एकंदर पानांची संख्या ५५२
उत्तरार्ध— खंड ३ भाग ९ एकंदर पानांची संख्या ७०४

पूर्वार्ध ५ वर्षापूर्वी प्रसिद्ध झाला व त्यानंतर उत्तरार्ध हल्ली प्रसिद्ध होत आहे, म्हणून संदर्भ देता घेता वाचकांचा घोटाळा होऊ नये म्हणून हा सर्व खुलासा करणे अवश्य आहे.

# उत्तरार्ध खंड २.ची अनुक्रमणिका

## खंड २ भाग १ [ सन १८९९ ते १९०० ]

[ १ ] पुनश्च हरिः ॐ पान १ [ २ ] टिळकांचा लॉक्लास पान ४ [ ३ ] टिळक व रँग्लर परांजपे पान ५ [ ४ ] राजद्रोहाचे व इतर खटले पान ७ [ ५ ] टिळक व काळ वर्तमानपत्र पान ९ [ ६ ] नातूबंधूंची सुटका पान १२ [ ७ ] लखनौ-कॉंग्रेस पान १४ [ ८ ] पंडिता रमाबाई पान १४ [ ९ ] नाना फडणीसांचा उत्सव पान १६ [ १० ] प्लेग व इनॉक्युलेशन पान १८ [ ११ ] कृष्णाजी आबाजी गुरुजी पान २७ [ १२ ] सातारची प्रांतिक परिषद पान २९ [ १३ ] पंचांगशोधन पान ३६ [ १४ ] ज्ञानेश्वराचा वाद पान ४० [ १५ ] शिवजन्मतिथीचा निर्णय पान ४३ [ १६ ] रायगडवरचा दुसरा उत्सव पान ४५ [ १७ ] टिळक व प्रो. मॅक्स मुल्लर पान ४७ [ १८ ] मोगलाईत सफर पान ४८ [ १९ ] लाहोरची राष्ट्रीय सभा पान ४९ [ २० ] टिळक व विद्याखाते पान ४९ [ २१ ] प्लेग व दुष्काळची व्यवस्था पान ५२ परिशिष्ट—[ १८९८ ते १९०० मधील निवडक पत्रे ] पान ५५.

## खंड २ भाग २ [ सन १९०१ ते १९०३ ]

[ १ ] कै. रानडे व कै. व्हिक्टोरिया राणी पान १ [ २ ] अज्ञेय मीमांसा व हर्बर्ट स्पेन्सर पान २ [ ३ ] विष्णुशास्त्री चिपळूणकर पान ६ [ ४ ] वेदोक्त-प्रकरण पान ७ [ ५ ] जमीनमहसुलाचा नवा कायदा पान १३ [ ६ ] स्वामी हंसस्वरूप पान १७ [ ७ ] पैसाफंडाचा उगम पान १९ [ ८ ] नवा केसरी पान २० [ ९ ] प्रचंड दिल्लीदरबार पान २५ [ १० ] प्रो० जिनसीवाले पान २८ [ ११ ] बंगाल्यातील आखाडे व शिवाजीउत्सव पान २९ [ १२ ] मलबारी शेट व कॉंग्रेस पान ३१ [ १३ ] १९०१ ते १९०३ मधील सभा व परिषदा पान ३२. परिशिष्ट [ १९०१ ते १९०३ मधील निवडक पत्रे ] पान ३७.

## खंड २ भाग ३ [ ताईमहाराज प्रकरण ]

[ १ ] कर्तव्याचा चरक पान. १ [ २ ] थोडा पूर्ववृत्तांत पान. ३ [ ३ ] दत्तविधान व प्रतिक्रिया पान ६ [४] ॲस्टनसाहेबांच्या कोर्टात पान १२ [ ५ ] क्लेमंटस यांच्या कोर्टात पान १५ [ ६ ] डिफेन्स व निकाल पान १६ [७] आक्षेप व कुतर्क पान १९ [ ८ ] सेशन कोर्टाचा निकाल पान २२ [ ९ ] हायकोर्टाचा निकाल पान २३ [१०] न्या. मू. चंदावरकर पान २९ [ ११ ] प्रीव्हि कौन्सिलचा निकाल पान ३० [ १२ ] मुंबई सरकारचा उपद्व्याप पान ३३ [ १३ ] कोल्हापूर सरकारची साथीदारी पान ३६ [ १४ ] साक्षीपुराव्यातील काही गोष्टी पान ३७ [ १५ ] सत्याची ओढाताण पान ४१ [ १६ ] हेतुचिकित्सा पान ४४ [ १७ ] ताईमहाराज प्रकरणातील काही गमती पान ४७ [ १८ ] टिळकांचे

स्वतःचे उद्गार पान ६१ [ १९ ] उपसंहार पान ७० परिशिष्ट [ ताईमहाराज प्रकरणातील निवडक पत्रे ] पान ७२.

## खंड २ भाग ४ [ सन १९०४ ते १९०६ ]

[ १ ] मुंबईची राष्ट्रीय सभा पान १ [ २ ] पंचांगशोधन पान ६ [ ३ ] सुधारणेच्या तत्वांचा वाद पान ११ [ ४ ] टिळक व काळपत्र पान १५ [५] भाला पत्रावरील खटला पान १६ [ ६ ] टिळक व अगम्य गुरू पान १७ [ ७ ] टिळक व ब्रुइनसाहेब पान १९ [ ८ ] संस्थानी स्वराज्य पान २१ [ ९ ] वेळास येथील उत्सव पान २३ [ १० ] शिवाजीउत्सवाचा प्रसार पान २४ [ ११ ] विलायतेतील चळवळ पान ३१ [ १२ ] कर्झनशाही—खरा कोण खोटा कोण ? पान ३९ [ १३ ] बनारस येथील राष्ट्रीय सभा पान ४२ [ १४ ] वंगभंगाची चळवळ पान ४६ [ १५ ] टिळक व स्वदेशी चळवळ पान ६३ [ १६ ] क्रांतिकारक चळवळीचा जन्म पान ६८ [ १७ ] टिळकांची बेळगावची व्याख्याने पान ७२ [ १८ ] कलकत्त्याची राष्ट्रीय सभा पान ७४ [ १९ ] महर्षि दादाभाई नौरोजी पान ७६ [ २० ] सभा व परिषदा पान ८० परिशिष्ट [ १९०४–५–६ सालातील निवडक पत्रे ] पान ८२.

## खंड २ भाग ५ [ सन १९०७ ]

[ १ ] हिंदुमुसलमानांचे ऐक्य पान १ [ २ ] स्वदेशी चळवळ व पैसाफंड पान २ [ ३ ] राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ पान ८ [ ४ ] राष्ट्रीय शिक्षणावरील व्याख्याने पान १७ [ ५ ] केरहार्डी यांचे पुण्यास आगमन पान २२ [ ६ ] बीरनवाली पान २४ [ ७ ] लाला लजपतरायांची हद्दपारी पान २६ [ ८ ] सुरतेची प्रां. परिषद पान २९ [ ९ ] टिळक व मोर्ले सुधारणा पान ३१ [ १० ] गोखले टिळकांचा वाद पान ३६ [ ११ ] राष्ट्रीय सभा सुरतेस कशी गेली पान ३९ परिशिष्ट १ [ नेव्हिन्सन यानी काढलेले टिळकांचे शब्दचित्र ] पान ४६ परिशिष्ट २ [ टिळकांचे शिवाजीउत्सवातील व्याख्यान ] पान ५१. परिशिष्ट ३ [ १९०७ मधील निवडक पत्रे ] पान ५८.

## खंड २ भाग ६ [ सुरतेची राष्ट्रीय सभा ]

[ १ ] युद्धाची पूर्वतयारी पान ६ [ २ ] मंडपातील हकीकत पान ९ [ ३ ] पक्षकारांच्या कैफियती पान १३ [ ४ ] नेव्हिन्सन यांची साक्ष पान १६ [ ५ ] नेमस्त पक्षाची कैफियत पान २३ [ ६ ] राष्ट्रीय पक्षाची कैफियत पान २७ [ ७ ] नेमस्तांची कन्व्हेन्शन पान २८ [ ८ ] नेमस्त पक्षाचा जाहीरनामा पान ३१ [ ९ ] नव्या पक्षाचा जाहीरनामा पान ३२.

## खंड २ भाग ७ [ सन १९०८ सालातील हकीकत ]

[ १ ] पुण्यात अरविंद घोस पान १ [ २ ] राष्ट्रमत काचशाळा समर्थ विद्यालय पान २ [ ३ ] जिल्हा सभा व म्युनिसिपल निवडणुक पान ३ [ ४ ] अधिकार विभागणी कमिशन पान ७ [ ५ ] मद्यपाननिषेधाची चळवळ पान ८ [ ६ ] धुळ्याची प्रांतिक परिषद पान १५ [ ७ ] दडपशाहीचा प्रारंभ पान १७ [ ८ व ९ आकडे मुळातच घालण्याचे चुकून राहिले आहेत म्हणून येथेहि नाहीत ] [ १० ] एकीबेकीची मीमांसा पान १९ [ ११ ] संयुक्त काँग्रेसची चळवळ पान २५ [ १२ ] स्वतंत्र राष्ट्रीय सभेसंबंधी पत्रे पान ३५ [ १३ ] नागपूर काँग्रेसला बंदी पान ३९ परिशिष्ट [ १९०८ सालातील निवडक पत्रे ] पान ४२.

## खंड २ भाग ८ [ राजद्रोहाचा दुसरा खटला ]

[ १ ] खटल्याचे निर्णायक कारण पान १ [ २ ] फिर्याद धरपकड झडत्या पान ५ [ ३ ] सेशनकोर्टातील चौकशीचा प्रारंभ पान १० [ ४ ] साक्षी पुरावा व जबाब पान १२ [ ५ ] टिळकांचे न्यायासनापुढील भाषण पान १४ [ ६ ] अॅडव्होकेट जनरलचे भाषण पान ३१ [ ७ ] न्या. दावर यांचा समारोप पान ३८ [ ८ ] निकाल व शिक्षा पान ४१ [ ९ ] लोकांची उत्सुकता व काळजी पान ४४ [ १० ] सहानुभूतिदर्शक दंगे पान ४६ [ ११ ] तुरुंगात रवानगी पान ४९ [ १२ ] मुंबईतले अपील पान ५१ [ १३ ] १८९७ व १९०८ साम्य व विरोध पान ५३ [ १४ ] टिळककेसचे पुस्तक पान ५७ [ १५ ] खटल्यातून निर्माण झालेला खटला पान ५८ [ १६ ] इतस्ततः पान ६३.


## खंड २ भाग ९ [ मंडाले येथील तुरुंगवास ]

[ १ ] मंडाले येथून आलेली टिळकांची निवडक पत्रे पान २ [ २ ] स्वतः टिळकानी सांगितलेली हकिकत पान ५१ [३] १९०८–१४ या सालातील इतर निवडक पत्रे पान ५९.

हल्ला करण्याचा मान सरकाराकडे असतो. परके इंग्रज लोक या देशात येऊन त्यानी जेव्हा इकडील लोकावर राज्य स्थापले तेव्हाच या युद्धाला त्यानी प्रारंभ केला. त्या युद्धाचा शेवट ही राजसत्ता संपून हिंदी जनतेला स्वातंत्र्य किंवा स्वराज्य मिळण्यानेच होणारा आहे. मग ईश्वराच्या मनात असेल त्याप्रमाणे त्याला कितीहि काळ लागो! तथापि एखाद्या युद्धात ज्याप्रमाणे हल्ल्यामागून हल्ले होत असतात व एक दुसऱ्यापेक्षा कदाचित् अधिक प्रबळ असतो, त्याप्रमाणे परकी राजसत्ता स्थापित झाल्यानंतरहि एखादा राजप्रतिनिधि दुसऱ्याहून अधिक जोरकस किंवा दुष्ट ठरू शकतो व त्यामुळे युद्धातल्या युद्धातहि अकल्पित प्रसंग उत्पन्न होतात. पूर्वी लार्ड रिपन हे इकडे राज प्रतिनिधि होऊन आले ते काही इंग्रजांची सत्ता नष्ट करण्यासाठी आले नव्हते खास. पण त्यानी प्रत्यक्ष स्वतःला व अप्रत्यक्ष रीतीने या परकी राज्याला एक प्रकारची लोकप्रियताच मिळवून दिली. याच्या अगदी उलट उदाहरण म्हणजे लार्ड लिटन यांचे. त्यानी स्वतःला अप्रियता तर मिळविलीच, पण जी राजसत्ता खंबीर करण्याकरिता त्यानी जुलूम केला ती त्यामुळे खरी खंबीर न होता प्रजेच्या असंतोषामुळे तिला थोडासा धक्काच बसला असे म्हटले तरी चालेल. सन १८९९ साली हिंदुस्थानावर जे नवे व्हाइसराय आले तेहि अशाच प्रकारचे होते व त्यानी आपल्या अरेरावीच्या कारभाराने असंतोषाची जी एक लाट उठविली ती अजूनहि पूर्ण ओसरलेली नाही. टिळकानी १८९९ साली केसरीत लेख लिहिण्याला प्रारंभ केला. त्याच सुमारास लॉर्ड कर्झन हे व्हाइसराय होऊन हिंदुस्थानात आले. तो काळ फारसा शांततेचा नव्हता. वायव्यसरहद्दीवर पठाण लोकाशी युद्ध सुरू होते आणि चित्रळ वजिरिस्थान वगैरे ठिकाणी गोरे व काळे सैन्य कट बांधून बसले होते. इकडे देशात दोन वर्षापूर्वीच्या भयंकर दुष्काळाचे परिणाम लोकाना अजून भोवतच होते. आणि त्या दुष्काळांच्या सालात जरी तेरावा महिना आला नव्हता तरी दुष्काळाइतकाच भयंकर प्लेगचा रोग सर्व हिंदुस्थानभर पसरून त्याने प्रजेच्या दुःखात भर घातली होती. अज्ञानी लोकांच्या तोंडी कित्येक वेळा अशी भाषा येते की सरकाराने दुष्काळ व प्लेग हे आणले. अर्थात् हे आक्षेप अज्ञानमूलकच होत. सुज्ञ मनुष्य असे कधीहि म्हणणार नाही. पण तो इतके खास म्हणेल की पर्जन्य न पाडण्याला सरकाराने इंद्राला आज्ञा केली नसली तरी त्याने घाडलेल्या अवर्षणाच्या संकटात प्रजारक्षक म्हणून सरकारने जे कर्तव्य करावयाला पाहिजे होते ते त्यानी नीट केले नाही. आणि प्लेग हाहि जरी ईश्वरनिर्मित्त असला तरी तो घालविण्याकरिता म्हणून सरकारने जे उपाय योजिले व बळजबरीने लोकावर लादले तेच इतके दुःसह झाले की रोग पुरवला पण तन्निवारक उपायांची ही पीडा नको असे उद्गार समंजस लोकांच्याहि तोंडून ऐकू येत होते.

लॉर्ड कर्झन हे इकडे व्हाइसराय नेमले गेले तेव्हा त्यांच्या कर्तेपणाची कीर्ति इतर रीतीने लोकानी पूर्वीच ऐकलेली असल्यामुळे ते प्रजेचे दुःख निवारण करण्यासारखा कारभार करतील अशी आशा त्याना वाटत होती. आणि त्यांच्या कारकीर्दीची

पहिली एकदोन वर्षे पाहिली तर त्यानी असंतोष वाढण्यासारखे कोणतेच कृत्य केले नाही. उलट इकडील गोरी नोकरशाही ही बटकीप्रमाणे आपल्या आज्ञेत वागविण्याच्या निश्चयाचा ठसा त्यानी लोकांच्या मनावर चांगलाच उमटवला. लार्ड कर्झन हे तरुण तरतरीत विद्वान बुद्धिवान असा त्यांचा लौकिक होता. पूर्वी अनेक वेळा त्यानी हिंदुस्थानात येऊन प्रवास केला होता. व्हाइसराय म्हणून नेमणूक होण्यापूर्वी ते पार्लमेंटचे सभासद व एका खात्याचे अंडर सेक्रेटरी होते. कसाहि कर्ता मनुष्य हिंदुस्थानात आला तरी तो प्रजेच्या अंतरंगात थोडाच एकदम शिरतो ? परंतु प्रजेविषयी गैरवाका समजावून देणाऱ्या नोकरशाहीच्या दुरुपदेशाना बळी न पडता आपलीच विवेकबुद्धि निश्चयाने चालवील तरी तेवढ्यानेहि एखादा राजप्रतिनिधि लोकप्रियता संपादन करील, अशी विपरीत स्थिति हिंदुस्थानची होऊन बसली होती. त्यामुळे लार्ड कर्झन हे पहिल्या एक दोन वर्षांत सहजच लोकप्रिय झाले. ग्रीक पुराणातील योद्धा हर्क्युलीस याच्या बारा पराक्रमांचे उदाहरण ग्रीक वाङ्मयात वाचल्याचे लक्षात असल्याने लॉर्ड कर्झन यानी आपणहि हिंदुस्थानात बारा मोठी कृत्ये करणार असे जाहीर करून मोठ्या खुबीने पण अहंकारबुद्धीने या ग्रीक विभूतीशी आपले नाते जोडून घेतले होते. आणि परतंत्र व दुःखपीडित प्रजा हिला आशेशिवाय जगण्याला दुसरे औषधच नसल्याने, 'बोलेल तो करील काय व गर्जेल ते पडेल काय' ही लौकिक शहाणपणाची म्हण लॉर्ड कर्झन यांच्या बाबतीत क्षणभर विसरून जाण्याला हिंदी प्रजेच्या मनाची तयारी झाली होती. लॉर्ड कर्झन यांच्या लौकिकाची छाप टिळकांच्याहि मनावर बसलेली असल्याने आणि त्यानी योजलेल्या महत्कृत्याना प्रथमदर्शनी नावे ठेवण्यास काही कारण नसल्याने टिळकानी कर्झनशहाविषयी गुणग्राहक बुद्धीनेच केसरीत लिहिले. पण लवकरच त्यांचाहि भ्रमनिरास झाला. १९०१ साली लॉर्ड कर्झन यानी बजेटावर भाषण केले त्याला अनुलक्षून टिळकानी केसरीत असे स्पष्ट लिहिले की 'लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचा सूर्य मध्यान्ही आलेला असून पुढच्या वर्षी या वेळेस तो उतरत्या बाजूला थोडासा तरी गेलेला दृष्टीस पडणार. त्यांची हल्लीची प्रवृत्ति जर अशीच कायम राहील तर त्यांच्या कारकीर्दीत रयतेचे प्रत्यक्ष हित होण्याची आशा बाळगावयास नको.' टिळकांचे हे भविष्य लवकरच खरे ठरले. पण त्यांचा अदमास या वेळी कर्झनशहाच्या हातून काय होणार नाही इतक्या पर्यंतच गेला. ते काय काय विपरीत गोष्टी करू शकतील याचा पक्का अंदाज टिळकाना किंवा इतर कोणाला या वेळी नव्हता. पण लौकरच कर्झनशहानी आपला एकतंत्रीपणा नोकरशाहीप्रमाणे प्रजेच्याहि अनुभवाला आणला राणीच्या जाहीरनाम्याचे वर्णन 'अशक्य सनद' अशा शब्दानी करून त्यानी प्रजेच्या संतोषाची मुळे उपटून टाकली. आणि पुढेपुढे तर बंगालची फाळणी करून आणि हिंदी राष्ट्राला 'खोटे बोलणारे राष्ट्र' असे ठरवून त्यानी लोकक्षोभाचा जो वणवा पेटविला तो अजून विझलेला नाही. टिळकानी ज्या द्विदशवार्षिक युद्धात प्रमुखपणे मरेपर्यंत भाग घेतला ते युद्ध लार्ड कर्झन यानी अनुयोगित्वाने सुरू केले व प्रजेनेहि प्रतियोगित्वाने ते



लो. बाळ गंगाधर टिळक.

L. A. P.

# लो० टिळक यांचे चरित्र

## उत्तरार्ध

### खंड २ भाग १ [ स० १८९९ ते १९०० ]

### (१) पुनश्च हरिः ॐ

या चरित्रग्रंथाच्या पूर्वार्धाच्या शेवटी वाचकानी वाचलेले त्यांच्या लक्षात असेलच की टिळकांच्या खऱ्या कारकीर्दीला सन १८९९ सालापासूनच प्रारंभ झाला. सरकाराने आपणाकडून टिळकाना गाडून टाकण्याचा प्रयत्न म्हणून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला केला. पण त्याचा परिणाम मात्र उलटा झाला. या खटल्याला उद्देशून दोघा ज्योतिष्यानी एकच ज्योतिषग्रंथ दोन प्रकारानी लावून दाखविलेला आम्ही पाहिला आहे. ज्यानी खटला व शिक्षा यांच्या अवधीत दुष्ट ग्रहांची पीडा वर्तविली ते म्हणाले ' पहा भविष्य खरे झाले. खटला म्हणजे कोण आपत्ति! तुरुंगात असताना सरकाराने वाईट रीतीने वागविल्यामुळे टिळकाना मृत्युयोगाने जवळजवळ गाठले होते पण तारकग्रह बलवान् म्हणून ते वाचले. ' दुसऱ्या एका ज्योतिषाने नक्की हाच काळ टिळकांच्या भाग्योदयाचा म्हणजे मित्रग्रहबलाचा म्हणून वर्तविला होता. तो म्हणाला ' माझेच भविष्य खरे झाले. कारण राजद्रोहाचा खटला झाल्याने टिळकाची त्रिखंड कीर्ती झाली. त्यांच्या कार्याच्या व लौकिकाच्या इमारतीला शोभेसे उच्च अधिष्ठान मिळाले. मित्रग्रह पुष्कळ वेळा इष्टफले अनिष्ट प्रसंगाच्या द्वारेच देतात. सुळी जाण्याची पाळी येते आणि शेवटी ईश्वरकृपेने सुळाचा गुलाबवृक्ष होऊन फुलांची माळच गळ्यात पडते. ' पण या वादात ज्योतिषविद्या न जाणणारेच खरे सुखी. कारण ही दोनहि भविष्ये खरी असा निकाल देऊन त्याना प्रामाणिकपणे वाद मिटविता येण्यासारखा होता. राजद्रोहाचा खटला ही गोष्ट टिळकाना शरीरकष्टाच्या बाजूने पाहता अनिष्ट होती. पण तिचा अखेर परिणाम टिळकाना लाभदायकच झाला. वाइटातून चांगले निघते असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा वाईट होणे व चांगले होणे या दोनहि गोष्टी खऱ्या असतात. आणि एकाच क्षणी त्या संपूर्ण न घडल्या तरी अगदी निकटवर्ती व कार्यकारणभावात्मक असतात. टिळकांच्या खटल्याचेहि असेच झाले.

मागील खण्डाच्या शेवटी आम्ही असेहि म्हटले होते की, टिळकानी सरकाराशी जे द्विदशवार्षिक युद्ध पुढे मेरपर्यंत चालू ठेवले त्याचा प्रारंभ १८९९ सालापासूनच झाला. पण राजकारणाच्या युद्धात प्रजेकडे व त्यांच्या पुढाऱ्याकडे केवळ प्रतियोगित्वाचा मान असतो. अनुयोगित्वाचा मान म्हणजे प्रारंभाची चढाई किंवा

हल्ला करण्याचा मान सरकाराकडे असतो. परके इंग्रज लोक या देशात येऊन त्यानी जेव्हा इकडील लोकावर राज्य स्थापले तेव्हाच या युद्धाला त्यानी प्रारंभ केला. त्या युद्धाचा शेवट ही राजसत्ता संपून हिंदी जनतेला स्वातंत्र्य किंवा स्वराज्य मिळण्यानेच होणारा आहे. मग ईश्वराच्या मनात असेल त्याप्रमाणे त्याला कितीहि काळ लागो! तथापि एखाद्या युद्धात ज्याप्रमाणे हल्ल्यामागून हल्ले होत असतात व एक दुसऱ्या-पेक्षा कदाचित् अधिक प्रबळ असतो, त्याप्रमाणे परकी राजसत्ता स्थापित झाल्यानंतर-हि एखादा राजप्रतिनिधि दुसऱ्याहून अधिक जोरकस किंवा दुष्ट ठरू शकतो व त्यामुळे युद्धातल्या युद्धातहि अकाल्पित प्रसंग उत्पन्न होतात. पूर्वी लार्ड रिपन हे इकडे राज प्रतिनिधि होऊन आले ते काही इंग्रजांची सत्ता नष्ट करण्यासाठी आले नव्हते खास. पण त्यानी प्रत्यक्ष स्वतःला व अप्रत्यक्ष रीतीने या परकी राज्याला एक प्रकारची लोक-प्रियताच मिळवून दिली. याच्या अगदी उलट उदाहरण म्हणजे लार्ड लिटन यांचे. त्यानी स्वतःला अप्रियता तर मिळविलीच, पण जी राजसत्ता खंबीर करण्याकरिता त्यानी जुलूम केला ती त्यामुळे खरी खंबीर न होता प्रजेच्या असंतोषामुळे तिला थोडासा धक्काच बसला असे म्हटले तरी चालेल. सन १८९९ साली हिंदुस्थानावर जे नवे व्हाइसराय आले तेहि अशाच प्रकारचे होते व त्यानी आपल्या अरेरावीच्या कार-भाराने असंतोषाची जी एक लाट उठविली ती अजूनहि पूर्ण ओसरलेली नाही. टिळ-कानी १८९९ साली केसरीत लेख लिहिण्याला प्रारंभ केला. त्याच सुमारास लॉर्ड कर्झन हे व्हाइसराय होऊन हिंदुस्थानात आले. तो काळ फारसा शांततेचा नव्हता. वायव्यसरहद्दीवर पठाण लोकाशी युद्ध सुरू होते आणि चित्रळ वजिरिस्थान वगैरे ठिकाणी गोरे व काळे सैन्य कट बांधून बसले होते. इकडे देशात दोन वर्षांपूर्वीच्या भयंकर दुष्काळाचे परिणाम लोकाना अजून भोवतच होते. आणि त्या दुष्काळाच्या सालात जरी तेरावा महिना आला नव्हता तरी दुष्काळाइतकाच भयंकर प्लेगचा रोग सर्व हिंदुस्थानभर पसरून त्याने प्रजेच्या दुःखात भर घातली होती. अज्ञानी लोकांच्या तोंडी कित्येक वेळा अशी भाषा येते की सरकाराने दुष्काळ व प्लेग हे आणले. अर्थात् हे आक्षेप अज्ञानमूलकच होत. सुज्ञ मनुष्य असे कधीहि म्हणणार नाही. पण तो इतके खास म्हणेल की पर्जन्य न पाडण्याला सरकाराने इंद्राला आज्ञा केली नसली तरी त्याने घाडलेल्या अवर्षणाच्या संकटात प्रजारक्षक म्हणून सरकारने जे कर्तव्य करावयाला पाहिजे होते ते त्यानी नीट केले नाही. आणि प्लेग हाहि जरी ईश्वरनिर्मित्त असला तरी तो घालविण्याकरिता म्हणून सरकारने जे उपाय योजिले व बळजबरीने लोकावर लादले तेच इतके दुःसह झाले की रोग पुरवला पण तन्निवारक उपायांची ही पीडा नको असे उद्गार समंजस लोकांच्याहि तोंडून ऐकू येत होते.

लॉर्ड कर्झन हे इकडे व्हाइसराय नेमले गेले तेव्हा त्यांच्या कर्तेपणाची कीर्ति इतर रीतीने लोकानी पूर्वीच ऐकलेली असल्यामुळे ते प्रजेचे दुःख निवारण करण्यासारखा कारभार करतील अशी आशा त्याना वाटत होती. आणि त्यांच्या कारकीर्दीची

पहिली एकदोन वर्षे पाहिली तर त्यानी असंतोष वाढण्यासारखे कोणतेच कृत्य केले नाही. उलट इकडील गोरी नोकरशाही ही बटकीप्रमाणे आपल्या आज्ञेत वागविण्याच्या निश्चयाचा ठसा त्यानी लोकांच्या मनावर चांगलाच उमटवला. लार्ड कर्झन हे तरुण तरतरीत विद्वान बुद्धिवान असा त्यांचा लौकिक होता. पूर्वी अनेक वेळा त्यानी हिंदुस्थानात येऊन प्रवास केला होता. व्हाइसराय म्हणून नेमणूक होण्यापूर्वी ते पार्लमेंटचे सभासद व एका खात्याचे अंडर सेक्रेटरी होते. कसाहि कर्ता मनुष्य हिंदुस्थानात आला तरी तो प्रजेच्या अंतरंगात थोडाच एकदम शिरतो? परंतु प्रजेविषयी गैरवाका समजावून देणाऱ्या नोकरशाहीच्या दुरुपदेशाना बळी न पडता आपलीच विवेकबुद्धि निश्चयाने चालवील तरी तेवढ्यानेहि एखादा राजप्रतिनिधि लोकप्रियता संपादन करील, अशी विपरीत स्थिति हिंदुस्थानची होऊन बसली होती. त्यामुळे लार्ड कर्झन हे पहिल्या एक दोन वर्षांत सहजच लोकप्रिय झाले. ग्रीक पुराणातील योद्धा हर्क्युलीस याच्या बारा पराक्रमांचे उदाहरण ग्रीक वाङ्मयात वाचल्याचे लक्षात असल्याने लॉर्ड कर्झन यानी आपणहि हिंदुस्थानात बारा मोठी कृत्ये करणार असे जाहीर करून मोठया खुबीने पण अहंकारबुद्धीने या ग्रीक विभूतीशी आपले नाते जोडून घेतले होते. आणि परतंत्र व दुःखपीडित प्रजा हिला आशेशिवाय जगण्याला दुसरे औषधच नसल्याने, 'बोलेल तो करील काय व गर्जेल ते पडेल काय' ही लौकिक शहाणपणाची म्हण लॉर्ड कर्झन यांच्या बाबतीत क्षणभर विसरून जाण्याला हिंदी प्रजेच्या मनाची तयारी झाली होती. लॉर्ड कर्झन यांच्या लौकिकाची छाप टिळकांच्याहि मनावर बसलेली असल्याने आणि त्यानी योजलेल्या महत्कृत्याना प्रथमदर्शनी नावे ठेवण्यास काही कारण नसल्याने टिळकानी कर्झनशहाविषयी गुणग्राहक बुद्धिनेच केसरीत लिहिले. पण लवकरच त्यांचाहि भ्रमनिरास झाला. १९०१ साली लॉर्ड कर्झन यानी बजेटावर भाषण केले त्याला अनुलक्षून टिळकानी केसरीत असे स्पष्ट लिहिले की 'लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचा सूर्य मध्यान्ही आलेला असून पुढच्या वर्षी या वेळेस तो उतरत्या बाजूला थोडासा तरी गेलेला दृष्टीस पडणार. त्यांची हल्लीची प्रवृत्ति जर अशीच कायम राहील तर त्यांच्या कारकीर्दीत रयतेचे प्रत्यक्ष हित होण्याची आशा बाळगावयास नको.' टिळकांचे हे भविष्य लवकरच खरे ठरले. पण त्यांचा अदमास या वेळी कर्झनशहाच्या हातून काय होणार नाही इतक्या पर्यंतच गेला. ते काय काय विपरीत गोष्टी करू शकतील याचा पक्का अंदाज टिळकाना किंवा इतर कोणाला या वेळी नव्हता. पण लौकरच कर्झनशहानी आपला एकतंत्रीपणा नोकरशाहीप्रमाणे प्रजेच्याहि अनुभवाला आणला. राणीच्या जाहीरनाम्याचे वर्णन 'अशक्य सनद' अशा शब्दानी करून त्यानी प्रजेच्या संतोषाची मुळे उपटून टाकली. आणि पुढेपुढे तर बंगालची फाळणी करून आणि हिंदी राष्ट्राला 'खोटे बोलणारे राष्ट्र' असे ठरवून त्यानी लोकक्षोभाचा जो वणवा पेटविला तो अजून विझलेला नाही. टिळकानी ज्या द्विदशवार्षिक युद्धात प्रमुखपणे मरेपर्यंत भाग घेतला ते युद्ध लार्ड कर्झन यानी अनुयोगित्वाने सुरू केले व प्रजेनेहि प्रतियोगित्वाने ते

चालू ठेविले. या युद्धातील प्रमुख गोष्टी पुढे घडून आलेल्या असल्याने त्यांचे वर्णन यथाक्रम दिले जाईलच. तूर्त स्थानिक सरकारशीहि टिळकांचे जे युद्ध या नव्या कारकीर्दीच्या प्रारंभी सुरू होते त्याविषयी काही माहिती सांगतो. ही माहिती प्रायः कालानुक्रमानेच सांगितलेली बरी म्हणून चरित्रग्रंथाच्या या उत्तरार्धाच्या पहिल्या भागात सन १८९९ व १९०० या दोन सालात टिळकानी सार्वजनिक स्वरूपाच्या ज्या गोष्टी केल्या त्या काय होत्या ते पाहू.

## (२) टिळकांचा लॉ क्लास

केसरीचे संपादकत्व फिरून आपले हाती घेतल्याबद्दल ता. ३ जुलै रोजी टिळकानी सिटी मॅजिस्ट्रेट पुढे जाऊन लिहून दिले. सुटकेनंतर स्वतः त्यांच्या नावाने निघालेला पहिला केसरी तारीख ४ जुलैचा होय. पण त्यापूर्वी एक आठवडा टिळकानीं एका वेगळ्या रीतीने 'पुनश्च हरिः ॐ' ह्या मंत्राचा उच्चार केला होता. तारीख २७ जूनच्या केसरीत टिळकानी आपल्या सहीने केसरीत लॉ क्लासची जाहिरात दिली. जाहिरात अगदी मामुली पद्धतीचीच होती. तथापि ती वाचून लॉ क्लासच्या विद्यार्थ्यांनाच काय पण महाराष्ट्रातील सर्व लोकाना टिळकांच्या पुनरवताराचा अरुणोदय झाला असे वाटले असावे. लॉ क्लासला काही केसरीसारखे सार्वजनिक स्वरूप नव्हते. तो मुख्यतः त्यांच्या चरितार्थाचा उद्योग होता. हे टिळक लॉ क्लास पुन्हा सुरू करणार यावरून या चरितार्थाच्या साधनाशिवाय टिळकांचे अजूनहि चालण्यासारखे नव्हते ही गोष्ट उघड दिसणारी होती. तथापि इतक्या सूक्ष्म दृष्टीने ही जाहिरात फार थोड्यानी वाचली असेल. सामान्य वाचकाला तिचा अर्थ हाच वाटला असेल की टिळकानी खटल्यापूर्वीची सर्व कामे आता पुन्हा हाती घेतली. आणि ४ जुलैच्या केसरीच्या अंकातील 'पुनश्च हरिः ॐ' ह्या मथळ्याखालचा अग्रलेख वाचून त्यांची ती समजूत अधिक दृढच झाली असेल. असो. लॉ क्लासमध्ये विद्यार्थ्यांची भरती पूर्वी इतकीच झाली. शिकविण्याच्या कामात मदतनीस पूर्वीचेच होते. तथापि पुण्यातील प्लेग दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर असल्यामुळे बाहेर गावाहून येणारे विद्यार्थी प्लेग सुरू झाल्याबरोबर पुण्यातून निघून जाणार आणि मग काहींचा अर्धा अभ्यास काहींचा पुरा अभ्यास अशा स्थितीत लॉ क्लास चालविणे फार अडचणीचे होणार, म्हणून १८ जुलैच्या केसरीत उलट जाहिरात देऊन लॉ क्लास तूर्त उघडत नाही असे टिळकाना जाहीर करावे लागले. प्लेग थांबल्यावर काही दिवसानी लॉ क्लास सुरू झाला. पण पुनः प्लेग लवकरच आला. एकेका वर्षात प्लेगचे दोन दोन हप्तेहि तेव्हा होत. आणि प्रत्येक खाजगी धंदाचसा काय पण सरकारी कामकाजहि अत्यंत विस्कळित झाले होते. शेवटी प्लेगच्या या अनिश्चिततेला कंटाळून टिळकानी लॉ क्लास कायमचा बंद करण्याचे ठरविले आणि तो जो 'तूर्त' म्हणून बंद केला तो पुनः उघडलाच नाही.

लॉ क्लास कायमचा बंद केल्यामुळे आता प्रत्यही दोन तीन तास इतकी अधिक फुरसत टिळकाना इतर कामाला मिळू लागली. पूर्वी लॉ क्लासमध्ये त्यांचा

सकाळचा बहुतेक वेळ फुकट जात असे. परंतु यापुढे हा सकाळचा वेळहि त्याना इतर कामाला मिळू लागला आणि त्यांचा उद्योग तितका वाढला. किंबहुना ही फुरसत मिळण्यापूर्वीच त्यांचे उद्योग इतके वाढले होते की या नवीन वाढत्या उद्योगा करिता वेळ मिळावा म्हणून यापुढे लॉ क्लास बंद करावा असेहि त्यांच्या मनात आले आणि प्लेगमुळे होणाऱ्या अडचणींची एक प्रकारे त्याना सबबच या कामी मिळाली असे म्हणण्यास हरकत नाही.

## (३) टिळक व रँगलर परांजपे

विद्वानाचे चीज विद्वानच करू जाणे. टिळकानी केसरी पुन्हा हाती घेण्याच्या पूर्वी सुमारे दोन आठवडे रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे केंब्रिज येथील गणिताची परीक्षा पास होऊन पहिले आले म्हणजे सीनीअर रँगलर झाले. तेव्हा परांजपे यांच्या अभिनंदनार्थ स्वतः टिळकानी अग्रलेख लिहिला. संपादक म्हणून नाव घातलेले नसता टिळकानी केसरीला अग्रलेखांची जी गुप्तदाने अनेक वेळा दिली त्यातीलच हे एक होय. खरोखर अतिशय आनंद झाला म्हणूनच त्यानी मुद्दाम लेखणी हाती घेतली. ह्या लेखात हिंदी विद्यार्थ्यासंबंधाने टिळकांचा अभिमान चांगलाच व्यक्त होतो. ते लिहितात ' तीव्र बुद्धि व सतत अभ्यास या गोष्टी हिंदुस्थानात नव्या नाहीत. कोणत्याहि जुन्या किंवा नव्या पिढीत त्या दृष्टीस पडत आल्या आहेत. पण खुद्द विलायतेतील विद्यार्थ्यांवर विजय संपादन करण्याची संधि परांजपे याना प्रथम लाभली म्हणूनच त्यांचे विशेष अभिनंदन करावयाचे. इकडे आलेले यूरोपियन प्रोफेसर बहुधा शिफारशीची तट्टे असतात. हाताखालच्या विद्यार्थ्यापेक्षा प्रोफेसरच अधिक हीन बुद्धि असल्याचे अनेक वेळा प्रगट झाले होते. अशा प्रोफेसरांच्या हातून इकडे नामांकित विद्यार्थी कसे तयार होणार आणि झाले तरी तुलनेला जागा नसल्यामुळे इकडे त्यांचे चीज होणे नाही. विलायतेत शिक्षणाची साधने अधिक चांगली आणि विजय संपादन करण्याला प्रतिपक्षीहि तसेच. अर्थात् अशा ठिकाणी आपल्या खर्चाने नेऊन हिंदी विद्यार्थ्यांचे तेज प्रगट करविणे हे वास्तविक सरकारचे काम होय. इतर राष्ट्रातील सरकार ह्या गोष्टी करतेहि. पण हिंदुस्थान सरकार मात्र काही करीत नाही. परांजपे यास आज जो मान मिळाला तो दरवर्षी नाही तरी निदान दोन तीन वर्षांनी तरी एखाद्या ब्राह्मणास मिळण्यास हरकत येईल असे आम्हास वाटत नाही ! ' ज्या कारणाकरिता परांजपे यांच्या विजयाबद्दल टिळकाना आनंद झाला त्याचकरिता कित्येक इंग्रजाना वैषम्य वाटले. मद्रास मेलच्या संपादकाने लिहिले की ' एक ब्राह्मण सीनिअर रँगलर झाला म्हणजे सगळी ब्राह्मण जात गणितात हुषार आहे असा अर्थ होत नाही. ' अर्थात् इकडे सरकाराने साधन-हीनतेने तरुण विद्यार्थ्यांचा तेजोभंग करावा आणि त्यातून एखादा असा विजय मिळाला तर त्यावरून मद्रास मेलने असे तर्कट लिहावे हे हिंदी राष्ट्राच्या दुःखावर डाग देण्यासारखे आहे असे टिळकानी लिहिले. पण त्यातल्या त्यात असाहि विवेक केला की ' विद्वानाचे चीज विद्वानच

करू जाणे. मद्रास मेलकर्त्याला परांजप्यांच्या विजयाचे कौतुक कसे वाटणार? 'न हि वंध्या विजानाति गुर्वी प्रसववेदनां!' फार काय? मुंबई इलाख्याच्या गव्हर्नरानी फर्ग्युसन कॉलेजला किंवा परांजप्यांच्या वडिलाना अभिनंदनाचा संदेश पाठविणे योग्य होते. परंतु लार्ड सँडहर्स्ट हे झाले तरी नुसते बडे लाट! त्यांची आणि विद्वत्तेची फारकत झालेली. उलट लॉर्ड कर्झन हे जे त्या वेळी व्हाइसरॉय होते ते स्वतः युनिव्हर्सिटीत उच्च पदवी मिळविलेले व विद्वान असल्यामुळे त्यानी मात्र खरी गुणग्राहकता दाखविली आणि परांजपे यांच्या वडिलाना स्वदस्तुरचे पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले.' स्वतः टिळक हे गणित विषयात निष्णात आणि गणित विषयाचे फर्ग्युसन कॉलेजातील पूर्वीचे प्रोफेसर होते. त्यानी जरी फर्ग्युसन कॉलेजशी आपला संबंध अलीकडे तोडून टाकला होता तरी त्या संस्थेशी त्यांचा जिव्हाळ्याचा ओलावा अगदीच आटला होता असे नाही. निदान परांजप्याविषयी अभिमानबुद्धि बाळगण्याइतका तरी तो शिल्लक होता खास. म्हणून कॉलेजात आजन्म प्रोफेसरी करून विद्यार्थी पढविण्याची टिळकांची जी जुनी आकांक्षा तिने परांजपे यांच्या क्षणिक अभिनंदनप्रसंगाने त्यांच्या अंगात संचरून फिरून एक वेळ दर्शन दिले असल्यास नवल नाही. म्हणूनच अभिनंदनाबरोबर उपदेश करिताना टिळकानी परांजपे याजविषयी अशी आशा प्रदर्शित केली की 'परांजपे यानी श्रेष्ठ विलायती पदवी मिळविली तर आता विलायती प्रोफेसरांच्या रीतीनेच पुढील आयुष्यक्रमहि इकडे घालवावा. ग्रंथवाचन अखंड चालू ठेवावे. शास्त्रपरिशीलन करीत रहावे. विलायतेत अधिक काळ घालवावयाला लागला तरी घालवावा. गणितशास्त्रातील नवीन प्रश्नांचा परामर्ष घ्यावा. फ्रेंच वगैरे इतर युरोपियन भाषा शिकून त्यातून गणिताचा अभ्यास करावा. आणि फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणितशास्त्राचा जिवंत झरा उत्पन्न करण्याचे श्रेय संपादन करून कृतकृत्य व्हावे.' परांजपे यानी आपल्या पुढील आयुष्यक्रमात टिळकानी उल्लेखलेल्यापैकी किती गोष्टी किती प्रमाणाने आचरणात आणल्या हे लोकास फारसे माहीत नाही. तथापि परांजपे यांचा विद्याव्यासंग पुढे कितीहि राहिला न राहिला तरी त्यांच्या विजयाने रुजलेल्या मुळीने जीव धरला आणि तिने रोपाच्या रूपाने लवकरच जमिनीतून डोके वर काढले यात शंका नाही. कारण त्यानंतर प्रिन्सिपाल शहा व प्रोफेसर महाजनी हे दोन रँगलर पुण्यातले झाले ते परांजपे यांचेच शिष्य होते. एका अर्थाने महाजनी यानी स्मिथ प्राइझ मिळवून परांजपे यांच्यावरहि ताण केली असे म्हणण्यास काही हरकत नाही. पुढे परांजपे हे पुण्यास आल्यावर त्यांच्याविषयी वाटणारी अभिमानबुद्धि टिळकानी त्याना स्वतः जाऊन भेटून व्यक्त केली. टिळक हे तुरुंगातून सुटून आलेले एक सामान्य नागरिक आणि फर्ग्युसन कॉलेजचेच एक जुने प्रोफेसर म्हणून परांजपे यानीच जाऊन टिळकाना भेटणे आणि विलायतेत किती कीर्ति संपादन करून एक हिंदी तरूण विद्यार्थी पुण्यास परत आला म्हणून त्याला भेटावयास जाऊन टिळकानी त्याचा सन्मान करणे यापैकी कोणती गोष्ट आधी व्हावयास पाहिजे होती ही विचाराची एक नाजूक

बाब होय. तथापि टिळकानी तरी इतकी सूक्ष्म दृष्टि न ठेवता स्वतः आधीच जाऊन परांजप्याना भेटून या प्रश्नाचा दिलदारीने निकाल लाविला. टिळक आणि परांजपे हे दोघेहि राजकारणात प्रतिपक्षी असेच आजन्म राहिले शेवटी तर त्यांच्या विरोधास फारच वाईट स्वरूप आले. तथापि टिळक व रँगलर परांजपे यांचा प्रथम परिचय ह्याच वेळी झाला म्हणून ह्या महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख ह्या ठिकाणी केला आहे. सन १९०१ च्या नोव्हेंबरात रँगलर परांजपे याना सेन्ट जॉन कॉलेजचे फेलो निवडण्यात आले. इंग्लंडमधील एखाद्या कॉलेजचा फेलो निवडून येण्याचा मान हिंदी मनुष्याला हा पहिलाच मिळाला होता. त्याबद्दल केसरीने त्यांचे अभिनंदन केले. परांजपे हे ता. ७ डिसेंबर १९०१ रोजी मुंबईस आले. मुंबईस त्यांचा फार चांगला सन्मान करण्यात आला. तेथील बहुतेक देशी संस्थानी त्याना पान-सुपाऱ्या केल्या आणि एकंदर पदवीधर मंडळातर्फे युनिव्हर्सिटी हॉलमध्ये त्याना मान-पत्र देण्यात आले. नंतर तारीख १ जानेवारी १९०२ रोजी परांजपे हे पुण्यास येऊन दाखल झाले.

## (४) राजद्रोहाचे व इतर खटले

टिळक तुरुंगात जाऊन परत आले तरी राजद्रोहाच्या खटल्याचे सत्र सुरूच होते. टिळकानी केसरी हाती घेतला त्याच आठवड्यात मुंबई येथील गुराखी पत्रावरील पहिल्या खटल्याचा निकाल झाला. पत्राचे दुय्यम संपादक जोशी यास ६ महिने साध्या कैदेची शिक्षा देण्यात आली. मुख्य संपादक व प्रकाशक भाटे यानी तो लेख लिहिला नव्हता. ते त्या वेळी परगावी होते असे सिद्धहि झाले होते. तरी पण सरकाराने त्याजवर खटला करावयास सोडले नाही आणि त्यास एक वर्षांची शिक्षा देण्यात आली. पण केसरी व गुराखी यांच्या खटल्यामधील फरक इतर एका विषादकारक रीतीने लोकांच्या नजरेस आला. केसरीवर फिर्याद झालेल्या लेखाची सर्व जबाबदारी टिळकानी स्वतः आपणावर घेतली होती. 'प्रकाशक मी व लेखक दुसरा' हा भेद त्यानी कोठे केव्हाहि यत्किंचित् देखील दर्शविला नाही. याच्या उलट प्रकार गुराखी वर्तमानपत्रावरील खटल्यात झाला. मुख्य संपादक भाटे व सहाय्यक संपादक जोशी यानी स्वतःवर जबाबदारी न घेता ती एकमेकावर लोटण्याचा प्रयत्न केला. जोशी म्हणाले ' मी लेख लिहिले खरे पण ते भाटे यानी सांगितल्यावरून व सांगितले त्याप्रमाणे लिहिले. किंबहुना पुढे पाच सहा दिवस पुरतील इतक्या लेखांचे विषय भाटे यानीच आगाऊ सांगून ठेविले होते आणि ते कसे लिहावयाचे हेहि पण आगाऊ सांगितले होते. आणि मग मी तसे लिहिले.' उलट भाटे यानी असे सांगितले की ' जोशी यानी लिहिलेले लेख आपले गैरहजेरीत लिहिले. आपण तसले लेख लिहा असे त्यास सांगितले नव्हते. किंबहुना कडक लेख लिहिल्याबद्दल परगावाहून येताच आपण त्याना कामावरून दूर केले. एवढेच नव्हे तर, त्यापूर्वी काही काही लेख जोशी यानी लिहिले ते कडक वाटल्यामुळे आपण छापू दिले

नाहीत.' केसरीचे संपादक आणि गुराखीचे संपादक यांच्या शीलातील हा फरक लोकांच्या ध्यानात तेव्हाच आला आणि गुराखी पत्राविषयी लोकांची सहानुभूति पुष्कळच कमी झाली. शिक्षा झालेले केसरीतले लेख आपण लिहिलेले नव्हते ही जाणीव टिळकानाहि होती. तथापि त्यानी ते यत्किंचितहि बाहेर दिसू दिले नाही. उलट त्यानी असे प्रतिपादिले की वर्तमानपत्राच्या धंद्यात एकाच्या लिहिण्याकरिता दुसऱ्यावर खटला व्हावा अशा गोष्टी घडतातच. परंतु खटला झाला असता दुसऱ्याचे नाव पुढे आणणे व आपण मुक्त होऊ पाहणे ही गोष्ट कोणाहि संपादकाच्या शीलाला शोभणारी नव्हे. गुराखीच्या खटल्यावर टीका करताना टिळकानी मुख्य दोष सरकारला दिला. नुसते नावावर वर्तमानपत्र नोंदले गेल्यामुळे प्रकाशकावर सर्व लेखाची जबाबदारी यावी हा फारच ढोबळ न्याय. पण गुराखी या पत्रावरील खटल्यातल्या प्रमाणे संपादक आणि उपसंपादक हे आपले शील सोडून लेख खरे लिहिले कोणी याविषयी गुप्त स्फोट करण्यास पुढे आले त्याअर्थी पुराव्याने जो गुन्हेगार ठरला त्यालाच शिक्षा होणे योग्य होईल. भाटे यानी ह्या खटल्यात जोशी यांचे नाव सांगितले होते आणि तसा थोडाबहुत पुरावाहि झाला होता. शिवाय स्वतःकरिता भाटे यानी माफी मागितली होती. असे असता एकमेकांच्या गळ्यात पडणारे जोशी व भाटे या दोघानाहि सरकाराने आकसाने तुरुंगात घातले ! आणि मुख्य लेखकापेक्षा प्रकाशकालाच अधिक शिक्षा देवविली ! झाला हा निकाल फाजील कडक व अन्यायाचा झाला असे सर्वांना वाटले. गुराखी पत्रासारखे क्षुद्र वर्तमानपत्र दैनिक असल्यामुळे मूळ लेखापेक्षा त्यातील बातम्यावरच लोकांचे लक्ष विशेष जावयाचे. अशा स्थितीत सरकारी दुभाषे यानी फक्त लेखातील एकादा भाग हेरून काढून त्याचे एकतर्फी भाषांतर सरकारकडे पाठवावे आणि तेवढेच घेऊन सरकाराने खटला करण्यास प्रवृत्त व्हावे ही गोष्ट अनुचित होय. अशा खटल्यानी सरकारचा पैसा व्यर्थ उधळला जातो हे तर झालेच पण सरकारच्या दृष्टीनेहि अप्रसिद्धाला प्रसिद्धी मिळणे हे अनिष्टच. इभ्रतीच्या खोट्या अभिमानाला बळी पडून सरकारला आपले प्रतिष्ठितपणाचे धोरण संभाळता आले नाही. सदर खटल्यात चीफ जस्टिस सर लॉरेन्स जेनकिन्स यानी मात्र एक गोष्ट बरी केली. ती अशी की न्या. स्ट्रॅचीसाहेबानी पूर्वी १२४ अ कलमाचा जो व्यापक अर्थ टिळकांच्या खटल्यात केला होता त्याला ह्या नव्या न्यायाधिशानी बरीच मुरड घातली. आणि निवळ अप्रीति नव्हे तर सरकारविरुद्ध प्रत्यक्ष द्वेष व वैर उत्पन्न करण्याचा आरोपीचा 'उद्देश' असेल तरच राजद्रोहाचा गुन्हा घडतो असा जेनकिन्ससाहेबानी अभिप्राय दिला. ते पाहून वाईटातून काही तरी चांगले निघाले असे टिळकाना वाटले आणि तसेच त्यानी केसरीत लिहिलेहि.

राजद्रोहाच्या खटल्याशिवाय इतरहि खटले सुरू होते. साताऱ्यास अनंत विनायक पुराणिक याजवर दरोडे घालण्यास उत्तेजन दिल्याबद्दल सप्टेंबर इसवी सन १८९९ मध्ये सरकारने खटला भरला. पुराणिक हा प्रतापगडच्या देवीचा पुजारी होता. त्याच्यावर विशेष आरोप असा की 'मांग रामोशी गोळा करावे. महाबळे-

शरावर स्वारी करावी. तेथे साहेब मारावे. पुण्यास जाऊन टिळकाना तुरुंगातून जबरीने सोडवून आणावे. असा त्याचा हेतु होता.' पण त्याच्याविरुद्ध प्रत्यक्ष पुरावा पहावा तर 'पुराणिक आमच्याजवळ असे असे बोलत होता' अशा काही साक्षीदारांच्या जबान्या! पुराणिकाच्या द्वारे पोलिसाला खरी शिकार दुसरीच साधावयाची होती. त्याने टिळक नातू किंवा असाच कोणी दुसरा एखादा भला गृहस्थ याचे नाव घेतले असते म्हणजे सरकारचे काम होत होते. पण स्वतःविरुद्ध वाटेल तसा कबुलीजबाब तो देत असला तरी दुसऱ्या कोणाहि मोठ्या माणसाचे नाव तो वेडा माणूस घेईना! असिस्टंट सेशन जज्ज यांच्यापुढे चौकशी झाली. त्यात असेसरानी आरोपीवर गुन्हा शाबीत होत नाही असा निकाल दिला. पण न्यायाधीशानी त्याला अठरा महिन्याची शिक्षा दिली! पुढे सेशनजज्जापुढे अपील निघाले तेव्हा वरिष्ठ न्याय-मूर्तींनी त्यास सोडून दिले. पुराणिकाविरुद्ध आणलेल्या पुराव्यात आणि त्यावर ठेवलेल्या आरोपात मुळीच मेळ नव्हता. पुरावा बंडखोरीचा व आरोप दरोडे घालण्याचा! पुराणिक हा कदाचित एखादा भंगड माथेफिरू असा सरकारास वाटला असता तर त्याजकडून फार तर एकादा जामीन घेतला असता म्हणजे काम झाले असते. पण 'बडा देखकर छोटा गमाया' या म्हणीप्रमाणे पुष्कळ वेळा मोठ्या शिकारीच्या नादात पोलिसांची लहान शिकारहि निसटून जाते. बंड-खोरीच्या पुराव्यात टिळक किंवा नातूबंधू यांचे नाव काढता आले असते तर काय बहार झाली असती! आरोपी सातारचा ब्राम्हण रहिवासी. धंदा प्रतापगडा-वरील पुराणिकाचा आणि आश्रय टिळक नातूंचा असे प्रकरण रंगले असते तर पुढे दहा वर्षांनी चिरोलसाहेबानी हिंदुस्थानच्या असंतोषावर भाष्य लिहिले ते त्याना आधीच लिहिता आले असते. पण जसा चापेकर बंधूनी तसाच सातारच्या या पुराणिकानेहि पोलिसाना दगा दिला. 'माथेफिरूला' देखील भलत्याचे नाव घेणे हा अन्याय होय इतके कळण्यापुरती तरी शुद्ध होती म्हणावयाची.

## (५) टिळक व काळ वर्तमानपत्र

टिळकावर राजद्रोहाचा खटला होऊन त्याना न्यायकोर्टाने शिक्षा दिली तरी लोकानी त्याना दोषी मानले नाही. ही गोष्ट टिळकांचे भक्त अनुयायी किंवा पक्ष-पाती यानीच केली असे नसून राजकारणातले त्यांचे जे प्रतिपक्षी त्यानीहि तेच केले. पण पुण्यास नवीन निघालेल्या काळ पत्राने पुण्यातील प्लेगचा जुलूम रँडशाही खून वगैरे संबंधाने जे कित्येक लेख लिहिले ते केवळ सरकारास झोंबले असे नाही तर लोकपक्षातील कित्येक गृहस्थानीहि ते फार कडक असे मत काही गुप्त तर काही प्रगट रीतीने व्यक्त केले. विशेषतः मुंबईच्या कित्येक देशी वर्तमान-पत्रकारानी आणि मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशन मधील मेथाप्रमुख गृहस्थानी बरेच काहूर उठविले. आणि त्यातहि विशेष मुद्दा हा होता की काळ पत्र पुण्यातले. टिळकांची केसरी व मराठा ही पत्रेहि पुण्यातली. आणि काळ

ा हे टिळकांचे उघड अनुयायी व शिष्य करावा असेहि ध्वनित केले. फार काय बंगाल्या-
ाकडून किंवा टिळकांच्या वर्तमानपत्राकपत्राला कॉंग्रेसच्या जातीतूनच बहिष्कृत करण्याचा
ामानपत्रात लिहिणारा ज्याचा तो स्वतंस चालू होती. पण टिळकानी ही बहिष्काराची
से दुसऱ्या एखाद्या पत्राने काही लिहिले. त्यांचे म्हणणे असे की कोणीही मनुष्य आपले
ादारी इतरावर हटकून पडते असे ठरेल किंबहुना त्याचे मत साफ चूक असेल. पण त्याचा
मुंबईच्या लोकानी हा विवेक लक्षात ठेवासिल तर त्याचा निषेध करून प्रतिपक्षाचे हात
' प्राप्तौनिषेधः ' या सूत्रावर रचलेली ! चुका दाखवून देणे आणि बहिष्कार घालणे
पुढे आलेल्या कोणत्याहि पुराव्यावरून त्या वेळचे तरुण बंगाली विद्यार्थी डॉ. शरश्चंद्र
सरकारासहि दाखविता आले नाही. अ अध्यक्षतेखाली सभा झाली तीत जवळ जवळ
पुरी झाली असे कोणीहि मानावयास जशहा मेथा यांच्या असोसिएशनमध्ये प्रश्न निघाला
तो अमूक तसे करतो असे सांगून त्यव रहितच झाला. बॅ. नॉर्टन यांची चूक प्रसिद्ध
आणि लोकाना नावे ठेवण्याने स्वतःथानी नीतितःवाकरिता म्हणून बहिष्कार घातला
मरवीत बसणे हे हिंदुस्तानच्या वर्तमान माफी त्यांच्या पक्षातल्याच कित्येकाना पसंत
ण बरोबर की चूक हे जाहीर रीतीने ! गोखल्यांचा उघड निषेध केला नाही. प्लेगच्या
र किंवा इतर कोणावर काय म्हणून ! सरकाने जी कडक भाषा वापरली ती अत्या-
र ' टिळकांचा जाहीर रीतीनें निषेध हि असे कोणीहि म्हणतील. सरकारने केसरीवर
: सर फेरोजशहा मेथा यांच्या मागे लाका नाही ही गोष्ट वेगळी. पण सुधारकानी काही
की ' ही गोष्ट मजकडून काललयी घडणी. पुण्यातला सुधारक असो दुर्धारक असो
र त्याकरिता काय प्रायश्चित भोगावयाचे उद्योगात खास नाही किंवा खुनासहि प्रत्यक्ष
परंतु मी त्यांचा जाहीर निषेध करावा की खातरी असल्यावर एकादा वक्ता घसरून काही
ण व ती मी का घ्यावी ' ! पण हा न्यायाचे मत दिसण्यात अत्याचाराला उत्तेजक असेहि
ना सुचला नाही. टिळक १८९८ त के निषेध करणे म्हणजे सरकारला खाजगी वर्दी
; ॲडव्होकेट सेटलूर यांच्या मार्फत केळकचोंबडेपणाचा प्रकार होय. वास्तविक गोष्ट अशी
गितले की ' तुम्ही केसरी आणि मराठा किंवा रास्त गोफतर याना रँड साहेबांचा खून
कराल तर तुमचे आमचे बनणार ल करावयाचे नव्हते. त्याला राजकारणाचा हेतू
मुंबईची अवकृपा होईल. ' I shall उलट दुसऱ्या टाकाच्या वर्तमानपत्राना पुण्या-
ame of Poona wherever it may एवढयाच गोष्टीवर एकतर्फी लिहून एक-
ाना शब्द होते. तेव्हा केळकरानीहि त्याणि खून झाला ही गोष्ट काही झाले तरी वाईट
जो तो मुखत्यार व जबाबदार असतो. अहि स्वरूपात निपत नव्हता. पण हे दोन पक्ष
वश्य सहानुभूति समजावी असा सिद्दा बरोबर असे तरी काय म्हणून कोणी मानावे !
था होईल. अर्थात् काळ पत्राचा नि झाले त्याला राजकारणापेक्षा प्लेगचा जुलूमच
आणि केसरी पुण्यातला म्हणून पुण्यातल्यांना व ते स्पष्ट शब्दानी तसेच लिहिणारा तिसराहि
करू लागाल तर ते कोण मानील ! " पुढे केसरी व मराठा यांचा हा तिसरा पक्ष होय.
हीच भुणभुण लागली. किंबहुना केळकर या दोन्ही पक्षांचा करणे प्राप्त. पण कोणाचा-
ह तीव्र टीका होऊ लागली. चँपियन राणगणे आपल्याच शद्वानी मांडून स्वस्थ बस-

तर काळ पत्रावर तावडतोब खटला करावा असेहि ध्वनित केले. फार काय बंगाल्यातील काँग्रेस कमिट्यानी काळ पत्राला काँग्रेसच्या जातीतूनच बहिष्कृत करण्याचा ठराव केला. ही धुसफूस बरेच दिवस चालू होती. पण टिळकानी ही बहिष्काराची नसती बाजू अंगावर घेतली नाही. त्यांचे म्हणणे असे की कोणीही मनुष्य आपले मत देताना एखादे वेळी घसरेल. किंबहुना त्याचे मत साफ चूक असेल. पण त्याचा व आपला प्रतिपक्षी जर एक असेल तर त्याचा निषेध करून प्रतिपक्षाचे हात आपण अधिक बळकट का करावे ? चुका दाखवून देणे आणि बहिष्कार घालणे यात फारसे अंतर नाही. विलायतेत त्या वेळचे तरुण बंगाली विद्यार्थी डॉ. शरश्चंद्र मलिक यानी एकदा दादाभाईच्या अध्यक्षतेखाली सभा झाली तीत जवळ जवळ बंडखोरीचे भाषण केले. पण फेरोजशहा मेथा यांच्या असोसिएशनमध्ये प्रश्न निघाला तेव्हा मलिक यांच्या निषेधाचा ठराव रहितच झाला. बॅ. नॉर्टन यांची चूक प्रसिद्ध आहे. त्यांच्यावर कोणा हिंदी गृहस्थानी नीतितत्वाकरिता म्हणून बहिष्कार घातला नाही. गोखले यानी मागितलेली माफी त्यांच्या पक्षातल्याच कित्येकाना पसंत नव्हती. पण त्याकरिता त्यानी काही गोखल्यांचा उघड निषेध केला नाही. प्लेगच्या अमदानीत जुलमाला कंटाळून सुधारकाने जी कडक भाषा वापरली ती अत्याचाराला चिथावणी देण्यासारखी आहे असे कोणीहि म्हणतील. सरकारने केसरीवर खटला केला व सुधारका वर केला नाही ही गोष्ट वेगळी. पण सुधारकानी काही सुधारक पत्राचा निषेध केला नाही. पुण्यातला सुधारक असो दुर्धारक असो कोणीहि प्रत्यक्ष बंड करण्याच्या उद्योगात खास नाही किंवा खुनासहि प्रत्यक्ष उत्तेजन देत नाही. अशी मनात पक्की खातरी असल्यावर एकादा वक्ता घसरून काही बोलला किंवा संपादकाने एकादे चुकीचे मत दिसण्यात अत्याचाराला उत्तेजक असेहि प्रतिपादिले तरी लगेच त्याचा जाहीर निषेध करणे म्हणजे सरकारला खाजगी वर्दी देण्याप्रमाणेच चाहाडखोरीचा किंवा चोंबडेपणाचा प्रकार होय. वास्तविक गोष्ट अशी होती की टाइम्स किंवा चँपिअन किंवा रास्त गोफतर याना रँड साहेबांचा खून प्लेगच्या जुलमामुळे झाला हे कबूल करावयाचे नव्हते. त्याला राजकारणाचा हेतू होता असे ध्वनित करावयाचे होते. उलट दुसऱ्या टोकाच्या वर्तमानपत्राना पुण्यातील खून प्लेगच्या जुलमामुळेच झाले एवढयाच गोष्टीवर एकतर्फी लिहून एककल्लीपणाने भर द्यावयाचा होता. आणि खून झाला ही गोष्ट काही झाले तरी वाईट झाली असा उद्गार त्याजकडून कोणत्याहि स्वरूपात निघत नव्हता. पण हे दोन पक्ष जितके ज्या शब्दानी बोलतात तीच मर्यादा बरोबर असे तरी काय म्हणून कोणी मानावे ? कारण खून झाले ही गोष्ट तर वाईट पण झाले त्याला राजकारणापेक्षा प्लेगचा जुलूमच अधिक कारणीभूत होता असे मानणारा व ते स्पष्ट शब्दानी तसेच लिहिणारा तिसराहि एक पक्ष असू शकतो. किंबहुना टिळक केसरी व मराठा यांचा हा तिसरा पक्ष होय. अर्थात् त्याला निषेधच करावयाचा तर या दोन्ही पक्षांचा करणे प्राप्त. पण कोणाचाहि निषेध न करिता आपलेच तेवढे म्हणणे आपल्याच शद्वानी मांडून स्वस्थ बस-

त्यास कर्तव्य तर केलेच पण उपद्व्याप टाळला अशी इष्ट मध्यम स्थिति साधली गेली असे का म्हणू नये? 'कोणाचे मत तुम्ही खोडले नाही म्हणून ते तुम्हाला मान्य आहे' असला पेच अन्यायाचा होय. पण उलट पेच घालून तो काढता येतो हे टिळकानी या वेळी खाजगी व जाहिर रीतीने प्रतिपादिले. समाजातील एका पक्षाकडून दुसऱ्याचा निषेध करविणे ही सरकारची नेहमीची कपटनीति प्रसिद्ध आहे. फोडा झोडा या धोरणाचे च ते एक अंग आहे. प्रथम प्रथम काही लोक या सकृद्दर्शनी गोड दिसणाऱ्या युक्तिवादास बळी पडले. पण पुढे पुढे राजकारणातील जहाल मतांचा इतका प्रादुर्भाव व फैलावा झाला की त्यातून कोणताच पक्ष सुटण्याची आशा राहिली नाही! आणि जेथे सगळा गावच बाटला तेथे कोण कोणावर बहिष्कार घालणार? सरकारने टिळकावर केलेल्या खटल्यात नेमस्त वगैरे लोकानीहि पुष्कळच सहानुभूति दाखविली होती आणि टिळकांचे अंतरंग अत्याचारी नाही अशी ग्वाहि त्यानी दिली होती. परंतु या भलावणीचा मोबदला म्हणून विवक्षित पत्रांचा मतांचा व लेखांचा जाहिर निषेध करण्याची गोष्ट निघाली तेव्हा टिळकाना आपल्या नेहमीच्या सावधगिरीने व विवेकाने कृतज्ञतेलाहि मर्यादा घालावी लागली.

## (६) नातू बंधूंची सुटका

टिळकांच्या बरोबरच नातू बंधूनाहि अटक झाली होती. टिळकावर पीनल कोडाप्रमाणे खटला भरून न्यायाधिशाच्या हाते त्याना सरकारने बंदिवासात घातले होते. नातू बंधूना बंदिवासात ठेवण्याला न्यायपीठाचे सहाय्य सरकाराला मिळण्यासारखे नव्हते. एकच संशय दोघा विरुद्ध. पण लेख छापून प्रसिद्ध केल्याने टिळकांविरुद्ध पुराव्याच्या काडीचा आधार तरी सरकारास मिळणारा होता. परंतु नातू बंधू हे दुर्दैवाने वर्तमानपत्रकार नव्हते किंवा ते कधी व्याख्यानहि देत नसत. तेव्हा त्यांच्या विरुध्द असला तरी पुरावा कोठून मिळणार? म्हणून सन १८१८ च्या रेग्युलेशनचा आधार घेऊन सरकारने नातूना कैदेत ठेवले आणि टिळक शिक्षा भोगून परत येऊन फिरून केसरी हाती घेऊन इतर कामेहि करू लागले तरी नातू बंधूची कैद चालूच होती. सरकारने टिळकानां प्रायश्चित्त देवविले पण कोणत्याहि प्रायश्चित्ताची मर्यादा म्हणजे त्याचा विधि किंवा अवधि निश्चित असतो. पण संशय आणि गुप्त रोष याना कालावधि कोठली? त्यातूनहि चाफेकर बंधूंच्या खटल्याने आणि पार्लमेंटमधील प्रश्नोत्तराने सरकार फजीत झाल्यामुळे केवळ आपली इभ्रत बचावण्याकरिताच नातूंची कैद सरकारला चालू ठेवावी लागली. या फाजितीने खजील झाल्यामुळे हटवाद व असत्याग्रह याशिवाय दुसऱ्या कशाचाहि आधार सरकारला उपयोगी पडण्यासारखा नव्हता. तथापि कोणत्याहि गोष्टीला अंत हा असलाच पाहिजे. त्याप्रमाणे तारीख २१ डिसेंबर १८९९ रोजी सरकारी हुकूम निघून तारीख २५ रोजी बेळगाव कलेक्टरच्या हस्ते दोघानाहि बंधमुक्त करण्यात आले. तारीख २२ जून १८९७ ते २२ डिसेंबर १८९९ इतके दिवस म्हणजे बरोबर अडीच वर्षे

नातू बंधूंची अटक टिकली. म्हणून नातू बंधूंचा शनि पालटला अशी टिळकानी ज्योतिषविषयक उपमा दिली. तारीख २६ डिसेंबरच्या केसरीतील अग्रलेखाला 'ग्रहण सुटलें' अशीहि दुसरी एक याच शास्त्रातील उपमा टिळकानी दिली. पण दोन्हीहि अपुऱ्याच ठरल्या. कदाचित् ग्रहणाची उपमा टिळकांच्या शिक्षेला उपयोगी पडण्यासारखी होती. कारण स्पर्श काल व मोक्ष काल हे निश्चित असतात. तरी पण टिळक सहा महिने आधीच सुटले. मॅक्समुल्लर प्रभृतींची प्रार्थना व जनतेचा जप हे टिळकांच्या मुक्ततेला उपयोगी पडले. पण 'दे दान सुटे गिराण' म्हटल्याने किंवा दान दिल्यानेहि ग्रहणभोगाचा एक क्षणहि कमी होऊ शकत नाही. नातूंच्या राशीला बसलेल्या शनिग्रहाने बरोबर अडीच वर्षांनी संक्रमण केले ही गोष्ट खरी. पण अशी मर्यादा प्रारंभी किंवा पुढे केव्हाहि कोणीच मनाने घालू शकला नव्हता. अर्थात् टिळकानी नातूंच्या सुटकेला दिलेल्या ग्रहणाच्या उपमेचे खरे स्वारस्य निराळेच आहे. जॉनसनच्या 'रासेलस' नामक कादंबरीत ग्रहणाचा भयंकर चमत्कार प्रथमच पाहिलेल्या लोकांच्या मनःस्थितीचे सुंदर वर्णन आले आहे. नातू बंधूंना सरकारने रेग्युलेशनचा आधार घेऊन अटक केली असे कळले तेव्हा महाराष्ट्रातील लोकांचीहि मनस्थिति अशीच झाली. भर दिवसा सूर्य तमोग्रस्त झालेला प्रथमच ज्यानी पाहिला त्याना फिरून सूर्यदर्शन होण्याची कल्पनाच आली नसेल. नातू बंधूसंबंधीहि लोकाना असेच वाटले. जुन्या इतिहासातील नजर कैदेच्या प्रकाराची लोकाना एकदम आठवण झाली. आणि नातूबंधूंचा सबंध जन्मच कैदेत जाणार की काय अशी त्याना सहजच भीति वाटली. पण सूर्यास ग्रहण लागलेले पाहून जग बुडण्याची भीति जशी निष्कारण वाटते तसेच ग्रहण सुटलेले पाहून आनंद किंवा प्रसन्नताहि निष्कारणच वाटते. टिळक आधीच सुटलेले आणि आता नातूबंधूहि सुटले तेव्हा पुणे प्रकरणाची इतिश्री झाली आणि पुण्याला चांगले दिवस येतील अशा भावनेने तारीख ३० रोजी पुणेकरानी नातूबंधूंचे स्वागत केले. दुसऱ्या दिवशी जाहीर सभा भरून सार्वजनिक सभेने प्रो. जिनसीवाले यांच्या हस्ते नातूंचे अभिनंदन केले. उत्तर देताना श्रीमंत बाळासाहेब नातू यानी असे उघड बोलून दाखविले की मला कैदेत का टाकले याचे कारण खरोखरच मला अजून उमजत नाही. बेळगावच्या कलेक्टरानी नातूना सोडताना तोंडाने सरकारतर्फे म्हणून असे म्हटले की, तुम्हाला सोडून दिले आहे पण पुन्हा असे करू नका. पण मुळात काहीच केले नव्हते तर 'असे करू नका' याचा अर्थ काही तरी करा असाच उलट होत नाही काय? पण खोटी इभ्रत संभाळण्याचा मार्गच खोटे आरोप करणे हा आहे. 'असे करू नका' यातील 'असे' याचा अर्थ तेव्हा कोणास लागला नव्हता व अजूनहि तो कोणास लागत नाही. असो. नातूंच्या सुटकेबरोबर त्यांच्या स्थावर इस्टेटीवरील जप्ती उठविण्यात आली आणि कैदेत असताना दरमहा पाचशे रुपये प्रमाणे त्यांच्यावर झालेला खर्चाहि सरकारनेच सोसला. पण एवढ्यानेहि ते प्रकरण निकालात निघाले नाही. कैदेच्या मुदतीत सरकारने आमच्या मिळकतीची व्यवस्था

आपल्या हाती ठेवून आमचे हजारो रुपयांचे नुकसान केले ते सरकारने भरून द्यावे असा उलटा ससेमिरा बाळासाहेब नातूनी सरकारला लावला. आणि कुस्तीत पाठीवर आलेल्या गड्याने जमीन धरून बसलेल्या गड्याची पाठ जमिनीला लावता न आली तरी त्याला तोंडभर माती चारून आपला सूड उगविता येतो त्याप्रमाणे बाळासाहेब नातूना सरकाराविरुद्ध प्रत्यक्ष काहीच करता आले नाही तथापि पदोपदी त्याना निरुत्तर करून त्यांची बेअब्रू चवाठ्यावर मांडता आली. ' एका निमगोऱ्या दाई सुइणीचा तोंडी अपमान केल्याच्या निराधार आरोपाकरिता सरकारनें दोघा प्रतिष्ठित सरदाराना अडीच वर्षे कारागृहवास घडविला ' असा आपला बेअब्रूचा डांगोरा पिटलेला ऐकून सरकारी अधिकाऱ्याना लाजेने मान खाली घालावी लागत असे. नातू बंधूंची कैद अडीच वर्षांनी तरी संपलीच. पण सरकारच्या जुलमाचे हे कवित्व मागे कायमच राहिले !

## (७) लखनौ–कॉंग्रेस

पंधरावी राष्ट्रीय सभा ता. २७ डिसेंबर १८९९ रोजी लखनौ येथे भरली. रमेशचंद्र दत्त हे तिचे अध्यक्ष होते. त्यांच्या भाषणामध्ये राजद्रोहाच्या कायद्यासंबंधी एक मुद्दा आला होता. त्यात टिळकावरील खटल्याचा स्पष्ट उल्लेख नव्हता, पण हिंदी वर्तमानपत्रांचे एकंदरीने समर्थन होते. ' इंग्रजी पत्रे व देशी पत्रे यामध्ये मतभेद असणे स्वाभाविक आहे. सरकारची बाजू संभाळणे हे जसे इंग्रजी पत्रे आपले कर्तव्य मानतात त्याप्रमाणे लोकांची बाजू संभाळणे हे देशी पत्रे आपले कर्तव्य मानतात. इंग्रजी पत्रे हिंदी लोकाविषयी लिहिताना आदरबुध्दि दाखवतील. तर देशी पत्रेहि इंग्रजी पत्राविषयी आदरबुध्दि दाखवितील. ' या सभेत राजकीय सुधारणासंबंधी असे मत प्रतिपादन करण्यात आले की स्थानिक कायदेकौन्सिलातून सभासदांची संख्या वाढवून प्रत्येक जिल्ह्याला एकेक लोकनियुक्त सभासद द्यावा. कौन्सिलच्या कामकाजाचे दिवस वाढवावे. ठराव पुढे मांडण्याचा अधिकार द्यावा आणि प्रत्येक प्रांताला एकेक एक्सिक्यूटिव्ह कौन्सिल असावे. किती अल्प मागणी पहा !

## (८) पंडिता रमाबाई

या चरित्रग्रंथाच्या पहिल्या खंडात पंडिता रमाबाईची हकीकत आम्ही दिलीच आहे. सन १९०० च्या फेब्रुवारी महिन्यात पंडिता रमाबाईचे प्रकरण थोडेसे पुन्हा उद्भवले. त्या व या काळच्या दरम्यान रमाबाईनी अमेरिकेला दुसरी सफर केली व धर्मांतराच्या आपल्या कार्याला नवीन वर्गणी मिळाविली. पण या कामी बाईला पूर्वीहून फार अडचण पडली. १८९६ साली अमेरिकेत भरलेल्या विश्वधर्मपरिषदेला इकडून स्वामी विवेकानंद हे गेले होते. तेथे त्यांच्या व्याख्यानांचा उत्कृष्ट परिणाम होऊन हिंदी लोकांची धर्ममते पुष्कळ अमेरिकन लोकाना वंदनीय

झाली होती. आपल्या मार्गात ही अडचण आलेली पाहताच बाईंनी वेदान्त मतावर कोरडा ओढण्यास प्रारंभ केला. या मताचे खंडण करण्याकरिता त्यांनी एक निबंधच लिहिला. त्यात बाईंनी असे लिहिले की 'वेदांतादि शास्त्रांची परीक्षा मी उत्तीर्ण झाले असल्यामुळे मला पंडिता ही पदवी मिळालेली आहे.' मात्र कोणत्या विद्यापीठाने बाईना ही पदवी दिली याचा त्यात उल्लेख नव्हता. पुष्कळ लोकांना इकडे असे वाटत होते की बाई विद्वान् म्हणून लोक तिला पंडिता म्हणत असतील किंवा सौभाग्यवती मिसेस असले काही म्हणता येत नाही म्हणून नुसत्या नावाने हाक मारण्याची अडचण टाळण्याकरिता लोकांनी त्यांना 'पंडिता' म्हणण्याचा प्रघात पाडला असेल. कसेहि असो. पदवीचा खुलासा निबंधात करण्याचे बाईचे मर्म निराळेच होते. यांना वेदांतावर हल्ला करावयाचा होता. त्या हल्ल्यात त्यांनी असे एक पोरकट विधान केले की 'वेदांतविवेचनात हिंदी शास्त्री पंडित लोक फार मोठमोठी अवजड वाक्ये घालतात. म्हणूनच केवळ ते तत्त्वज्ञान गहन आहे असे तुम्हाला वाटते!' ही टीका उघडच हास्यास्पद होय. तिचा परामर्ष केसरीत घेताना टिळक लिहितात 'लांब दाढीच्या सुरकुतलेल्या ऋषींनी हे वेदांतपर ग्रंथ लिहिलेले असल्यामुळे ललितकलासंपन्न नाजूक तरुण अमेरिकन स्त्रियांनी ते ग्रंथ वाचण्यालायक नाहीत अशी टीका या मायावी बाईने वेदांतग्रंथावर केली नाही हे आमचे भाग्यच समजावयाचे.' रमाबाईंनी वेदांताची आणखीहि थट्टा केली होती. ब्रह्म म्हणजे पोकळी पण ज्ञानाने व आनंदाने भरलेली पोकळी. अशा पोकळीची कल्पना तुम्हाला करता येते काय? असा प्रश्न बाईंनी अमेरिकन वाचकांना केला होता. त्यावर टिळक म्हणतात "पूर्वी अप्सरांनी विश्वामित्रादि ऋषि व शंकरादि देवता यांची फटफजिती उडविल्याचे आपण पुराणात वाचतो. पण पंडितेने केलेली ही ब्रह्माची फजिती त्या जुन्या स्त्री पराक्रमाचा हा नवा नमुनाच होय. बाईंनी समाजस्थितीविषयी असेहि विधान केले की उच्च हिंदु जातीत पुरुष शेदीडशे बायकांशी लग्ने लावतात आणि त्यांची स्मरणशक्ति या मानाने खंबीर नसल्याने आपणाला बायका मुले किती आहेत याची ते दप्तरात यादी करून ठेवतात! वरील प्रकार खरा असता तर बाईंना मुली पळवून नेण्याची मोठी सोयच झाली असती. पण महाराष्ट्रात तसा प्रकार नसल्याने त्यांना अनाथ झालेल्या रस्त्याने पडलेल्या दुष्काळाने गांजलेल्या अशा पोराबाळांवरच आपल्या सदनाची भूक भागवून घ्यावी लागली. कडेठाणच्या पाटलाची मुलगी बाईंनी पळवून नेली त्याबरोबर तो हातात काठी घेऊन शारदासदनाच्या पाठीला लागला. यावरून बायका मुली या खिल्लारातील गायी वासरा प्रमाणे हिंदु लोक समजत नाहीत व एखादे मूल चुकून गेले तर त्याचा शोध करीत नाहीत अशी स्थिती समाजात नसल्याचे बाईंना पूर्वी कळून आलेच होते. हाती मिळालेल्या तीनशे मुली व विधवा पैकी पावणेतीनशे मी ख्रिस्ती केल्या असे बाईनी या निबंधात लिहिले आहे. पण शारदासदनाच्या किल्ल्यात कोंडलेल्या तीनशे अनाथ स्त्रियांपैकी पंचवीस तरी स्वधर्मात राहल्या हेच आश्चर्य होय!"

पुढे सन १९०२ च्या जानेवारी महिन्यात रमाबाईंच्या शारदासदनाविरुद्ध अनेक तक्रारी बाहेर आल्या. दुष्काळ नुकताच होऊन गेल्यामुळे इतर खिस्ती मिशनऱ्याप्रमाणे बाईंनीहि पुष्कळ अनाथ मुले व स्त्रिया मिळविल्या व त्याना सदनात आणून ठेवले. या सुमारास सदनाच्या निरनिराळ्या शाखातून सुमारे पंचवीसशे मुली व स्त्रिया होत्या. बाईंनी सदनाचा तुरुंग बनवून दारावर रामोशांचा पाहरा ठेविला होता आणि परवानगीशिवाय आत जाणे येणे बंद केले होते. आत तुरुंगाप्रमाणेच या मुली व स्त्रिया याजकडून सक्तीने काम करून घेण्यात येत असे.

१९०३ साली रमाबाईंच्या शारदासदनासंबंधाने सरकाराने चौकशी केली. त्यात तेथे सतराशे मुली असून गुजराथ व मारवाड या प्रांतातील अधिक होत्या असे कळले. पुण्याचे तेव्हाचे कलेक्टर स्विफ्ट याजकडे तक्रारी गेल्यावरून ते चौकशी करिता सदनात गेले आणि त्यानी मुलींना प्रश्न केला की "कोणाला घरी जावयाचे आहे काय?' पुष्कळ मुलींना दुष्काळामुळे घरदारच उरले नव्हते. पण शंभर मुलींचे होय असे उत्तर मिळाल्यामुळे त्यांच्या घरचे पत्ते घेऊन चौकशी करण्याचे कलेक्टर यानी ठरविले. केवळ परोपकाराकरिता जी अनाथगृहे काढलेली असतात त्यांचे चालक आपण होऊन ही गोष्ट करितात. पण पंडिता रमाबाई यांच्या दयाबुद्धीला आतून खिस्तीधर्माभिमानाचे जाड अस्तर लावलेले असल्यामुळे तशी गोष्ट करण्याला त्या स्वेच्छेने का प्रवृत्त होतील? पण जुलूमजबरदस्तीने शिस्तीच्या नावाखाली मुलींना सदनात कोंडून ठेवणे आणि त्यांचे धर्मांतर करविणे व विधर्मी लोकाशी त्यांची लग्ने लावून देणे हे सर्व प्रकार एकाद्या गुलामखान्यासारखे असल्यामुळे अशा गोष्टी सरकाराला चालून देता येत नाहीत असे स्विफ्ट साहेबानी पंडिता रमाबाईंना स्पष्ट सांगितले.

## (९) नाना फडणीसांचा उत्सव

सोमवार तारीख १९ मार्च ( फाल्गुन वद्य ३ ) सन १९०० या दिवशी पेशवाईतील प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणीस यांची १०० वी श्राद्धतिथि होती. ही तिथि पुण्यास व पुण्याबाहेर यथासांग साजरी झाली. तारीख २० मार्चच्या केसरीत नाना फडणीसावर आठ साडेआठ कालमांचा लेख प्रसिद्ध करण्यात आला. तो पुष्कळसा कै. पारसनीस यानी टिळकांचे सांगण्यावरून लिहिला होता. स्वतः टिळकानी त्यातील फक्त एकच लहानसा भाग लिहिलेला असून पारसनीस यानी वेळेवर इतका मजकूर लिहून दिल्याबद्दल टिळकानी त्यांचे आभार मानले होते. पहिल्या खटल्यानंतर पारसनीस हे टिळकाकडे येत जात. पण पुढे १९०८ च्या खटल्या नंतर हा स्नेहसंबंध त्यानी जिवंत ठेवला नाही. मनातून प्रेम असे. पण जनात ते दाखविण्याला ते फार भीत. कारण १९०० ते १९०८ याचे दरम्यान पारसनीस यांची वळणे सरकार व संस्थानिक याजकडे बांधली गेली; आणि ती बिघडविण्याला ते

तयार नव्हते. पारसनीस यानी लिहिलेला लेख पुष्कळ माहिती देऊन व सजवून लिहिलेला होता. आणि योग्य प्रसंगी गुणवर्णनपर एवढा लेख आल्याने केसरीच्या वाचकाना फारच कौतुक वाटले. नानांची जी कुंडली या लेखात दिली आहे ती ग्रहकुंडली होती राशिकुंडली नव्हती. कुंडलीत एक ग्रह घालण्याचा चुकून राहिला होता. अर्थात् पुढील अंकात ह्या नजरचुकीची दुरुस्ती करण्यात आली. पण ही चूक एका वाचकाने नजरेला आणली म्हणून नाना फडणीसांच्या बारीक सारीक गोष्टींच्या माहितीकडेसुद्धा लोकांचे इतके लक्ष आहे याबद्दल टिळकानी अभिनंदन केले.

कर्मधर्मसंयोगाने पुढच्या आठवड्यात डेक्कन कॉलेजमध्ये कॉलेजच्या वाढदिवसाचा उत्सव झाला. या प्रसंगी डायरेक्टर जाईल्ससाहेब यांचे व्याख्यान झाले. त्या बिचाऱ्या जवळ विद्यार्थ्यांपुढे बोलण्याइतकेहि वक्तृत्व नव्हते. त्यानी लिहून आणलेला निबंध वाचला. पण सांगण्याची विशेष गोष्ट ही की त्यानी कॉलेजच्या वाढदिवसासंबंधाने सांगता सांगता जुन्या पेशव्यांच्या राज्याची खूप निंदा केली. आणि बरोबर १०० वर्षांपूर्वी पुण्यास काय काय गोष्टी घडल्या त्याची निवडक उदाहरणे म्हणून दिली ती अशाकरिता की इंग्रजी सुराज्य व मराठी स्वराज्य यांची तुलना व्हावी आणि एक कसे चांगले दुसरे कसे वाईट ही माहिती मिळावी. उदाहरणार्थ 'ह्याच पुणे शहरात १०० वर्षांमागे एका राजाला हत्तीच्या पायाशी बांधून फरपटत नेऊन ठार मारिले! पेशव्यांच्या राज्यात जुलूम अतिशय होता. तेव्हा हल्लीसारखे तुम्ही निरनिराळ्या भागातून विद्या शिकण्याकरिता पेशव्यांच्या पुण्यास आला नसता.' आगगाडी तारायंत्र यांचीहि महती साहेबानी गाइली. १०० वर्षांपूर्वीची उदाहरणे देण्याचे कारण प्रायः असे की एका आठवड्यापूर्वी नाना फडणीसांचा शतसावत्सरीक उत्सव सर्वत्र झाल्याची बातमी जाईल्स साहेबांच्या कानावर गेली असावी. आणि विद्यार्थ्यांनीहि असा एकादा उत्सव केल्याची बातमी त्याना लागली असावी. प्रोफेसर बेन हे त्या प्रसंगी हजर होते. त्यानी नेहमीच्या स्वभावाला अनुसरून थोडा विनोद केला. पण तो विनोद मार्मिक असून जाणत्याला बोचण्यासारखा होता. ते म्हणाले 'जाईल्स साहेबानी इंग्रजी राज्यातील सुखसोईची यादी वाचून दाखविली. त्यात बायसिकल क्रिकेट वगैरे गोष्टींचा उल्लेख चुकून राहिला असावा. शिवाजी हजर असता तर तो बायसिकलच्या शर्यतीत पहिला आला असता व तानाजी हा उत्तम क्रिकेट खेळला असता!' कारण साहेब होते इतिहासाचे प्रोफेसर. त्यानी शिवाजीचे चरित्र वाचलेले. तो घराबाहेर पडून मैदानी व मर्दानी खेळात सामील होत असे ही बातमी त्यांना प्रायः असावी. म्हणून इंग्रजी राज्यात शिवाजी असता तर त्याने काळास अनुसरून काय पराक्रम केले असते याचे वर्णन त्यानी केले. पण सर्वांत मौज ही की डॉक्टर भांडारकर हे त्या दिवशी अध्यक्ष होते. असे असता त्यानी जाइल्स साहेबांचा सौम्य निषेधहि केला नाही. उलट त्यानी त्यांच्या 'पोक्त' विचाराची वाखाणणीच केली. ते म्हणाले

'यशवंतराव होळकराच्या मृत्यूचा मुद्दा फारच छान होता. पूर्वीच्या रानटी स्थितीचा मला अनुभव आहे. मी मालवणाहून मुंबईस प्रथम परिक्षेस आलो तेव्हा मला पंधरा दिवस लागले. आता ती स्थिति नाही. मला एवढेच वाईट वाटते की मी जरा लवकर जन्माला आलो. थोड्याशा उशीराने जन्माला आलो असतो तर ह्या सुखसोयीचा उपभोग लहानपणीच मला घेता आला असता. मी आज तुमच्यापुढे बोलायला उभा आहे ही इंग्रजी राज्याची कृपा. नाहीं तर मी माझ्या खेडेगावात तीन तास संध्या आणि चार तास ब्रम्हयज्ञ करीत बसलो असतो!' भांडारकर अशा गोष्टी कोठेहि त्यांच्या नेहमीच्या पद्धतिप्रमाणे अगदी मनापासून सरळ सांगत. बिचाऱ्याला विनोद माहितीच नव्हता. पूर्वजांचा अभिमान त्याना असावा तसा नव्हता. त्यानी जुन्या दख्खनचा इतिहास लिहिला त्यावरून प्राचीन इतिहास त्याना अवगत होता. आणि जुन्या संस्कृतीबद्दल त्याना अभिमान नव्हता असे नाही पण पेशव्यांच्या निंदेबरोबर साहेबावरील टीकेचाहि एखादा तरी शद्ब बोलून राष्ट्रीय अभिमान प्रगट करावा आणि जाईल्स साहेबांची थोडी तरी हजेरी घ्यावी ह्याविषयींचे अज्ञान त्याना होते. म्हणून विद्यार्थ्यांपुढे वरीलप्रमाणे प्रदर्शन त्यानी केले. केसरीतील नाना फडणविसावरील लेख महाराष्ट्रात झालेले ठिकठिकाणचे उत्सव आणि डेक्कन कालेजात झालेली मराठेशाहीची ही निंदाप्रचुर भाषणे यांचा बरोबर विरोध पाहिला म्हणजे सरकारी कॉलेजाविषयी लोकांच्या मनात अप्रीति उत्पन्न व्हावी हे स्वाभाविकच नाही काय ! पुढच्या आठवड्यात प्रो. बेन याना रजेवर जाताना विद्यार्थ्यांनी मानपत्र दिले त्या वेळी विद्यार्थ्यांना उपदेश करताना बेन यानी जाइल्स साहेबांच्या वेळी केलेली चूक सुधारून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात ते म्हणतात की मी बिचारा भोळा म्हणून काही तरी बोलून जातो. त्याचा बाहेरील लोकाना उपयोग करण्याचा काय अधिकार ? १८९६ साली प्रो. भानूनी शिवाजीवर व्याख्यान दिले त्या वेळी मीहि थोडे बोललो. त्याचा भानूनी दुरुपयोग केला. मी आपला भोळा बोलून जातो ते लोकानी खरे का समजावे ?' याहि बोलण्यात खोच होती. शिवाजीची स्तुती करणारे त्यांचे भाषण टिळकानी खटल्यात पुराव्यात दिले होते आणि साहेब लोक देखील शिवाजीविषयी काय बोलतात हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. अर्थात् त्याचा गवगवा झाला आणि बेनसाहेबानी जाइल्स साहेबांची थट्टा केली असे बाहेर लोक बोलू लागले ते त्याना अडचणीचे वाटू लागले. एवढ्या करिताच त्यानी हा भाषणाचा प्रसंग साधला असावा..

## ( १० ) प्लेग व इनॉक्युलेशन

सनं १८९९ मध्ये पुण्यातील प्लेग हटला नव्हता इतकेच नव्हे तर जोराने सुरू होता. तथापि प्लेगप्रतिबंधक सरकारी उपाययोजनांचे स्वरूप पूर्वी दोन वर्षांत म्हणजे टिळक तुरुंगात जाण्यापूर्वी जे होते ते टिळक सुटून आल्यावर राहिलेले नव्हते. रँडशाहीत काय काय अनर्थ झाले आणि लोकानी प्लेगपेक्षा प्लेगप्रति-

बंधक उपायाचे दुःखच किती अधिक भोगले याचे वर्णन या चरित्राच्या पहिल्या भागात केलेलेच आहे. रँड साहेबांच्या खुनाने प्लेगच्या अधिकाऱ्यांच्या मनावर प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्ष रीतीने बराच परिणाम झाला. तो असा की प्लेग हटविताना लोकांचे काही एक न ऐकता केवळ आपल्या मर्जीप्रमाणे वागणे असे जे पूर्वीचे धोरण होते ते बदलून आता लोकांच्या साहाय्याने व सहविचाराने उपाययोजना करावी हेच अधिक श्रेयकर आणि फलप्रद आहे असे त्याना वाटू लागले होते. प्लेगासारखे रोग आले असताना कोणतेहि सुधारलेले सरकार हे झोपून स्वस्थ बसणार नाही ही गोष्ट खरी. तथापि पुष्कळशा युरोपिअन डॉक्टर लोकांचेहि मत असे झाले होते की एकाद्या दोषी ज्वराप्रमाणे प्लेग हा काही मुदतीनेच हतवीर्य होणारा आहे. ते घडेपर्यंत पावसाळ्यात गवत आपोआप उगवते त्याप्रमाणे ऋतुमानाची अनुकूल स्थिति लाभताच प्लेगचे जंतू जागृत व वृद्धिंगत होऊ लागतात. अर्थात् वैद्यक शास्त्रालाहि प्लेग फारशी भीक घालीत नाही. म्हणून कडक उपायाची योजना करण्यात फारसा अर्थ नाही. टिळकानी केसरी हाती घेण्यापूर्वी मुंबई सरकाराने प्लेगचे कमिशन नेमण्याचा विचार केला पण त्याचा रिपोर्ट निघून त्याची अंमलबजावणी होण्याला बराच काळ लागणार म्हणून डॉ. रीड वगैरे जे स्थानिक अधिकारी पुण्यास होते त्यांच्याकडे शिष्टमंडळे नेऊन टिळकांच्या पुढारीपणाचा फायदा घेऊन सरकारी उपायांचा कडकपणा कमी करण्याचा प्रयत्न पुणेकरानी सुरू केला. तारीख ९ जुलै रोजी पुण्यास जाहीर सभा भरून त्यात टिळकप्रमुख असे एक शिष्टमंडळ पाठविण्याचे ठरले. ते १६ जुलै रोजी जाऊन रीड साहेबास भेटले आणि ह्या भेटीत पुष्कळ गोष्टींचा निकाल लागला. रँडसाहेबाच्या खुनानंतर मुख्य प्लेग-अधिकारी म्हणून कर्नल क्रे नावाचे लष्करी अधिकारी पुण्यास नेमले गेले होते. त्यांचा स्वभाव रँड साहेबांच्या स्वभावाच्या अगदी उलट असल्या कारणाने कोणासहि काही सांगणे असल्यास सवड मिळू लागली. आणि स्थानिक पुढाऱ्यांची सल्लामसलत घेतल्याने उपाय-योजना सुलभ व अधिक यशस्वी होते असे क्रे साहेबानाहि कळू लागले. दुसरे पक्षी क्वारंटाईन सारखे प्रायः अशक्य उपाय चालू ठेवण्यात अर्थ नाही, त्यात विनाकारण लोकांची गैरसोय होते, आणि सरकारला फुकट खर्च येतो असा अनुभव अधिकाऱ्याना आला म्हणून क्वारंटाईन उठविण्यात आले. प्रेताची तपासणी ढिली करण्यात आली. मयताची फक्त वर्दी देणे आणि प्लेगदूषित घरे साफसूफ करवून घेणे हेच मुख्य उपाय म्हणून शिल्लक राहिले. ज्या पुण्यात रँडसाहेबांच्या जुलमामुळे खून झाले त्याच पुण्यात कर्नल क्रे व मेजर रीड या प्लेग-अधिकाऱ्याना पेठानिहाय पानसुपाऱ्या झाल्या. हा फरक कशाचे द्योतक होय हे सांगावयास नकोच! टिळकांच्या मते प्लेग-प्रतिबंधक असा खरा परिणामकारक उपाय म्हणजे स्थानत्याग हा एकच होता. इनॉक्युलेशन म्हणजे प्लेगची लस टोचणे हा एक उपाय हळुहळु पुढे येऊ लागला होता. पण टोचण्याची लस व ती टोचण्याची कृती या दोन्ही गोष्टी अद्याप अपूर्णावस्थेत होत्या व त्या विषयी प्रथम प्रथम लोकांच्या फारच

तक्रारी होत्या म्हणून तुरुंगातून सुटून आल्याबरोबर टिळकाना प्रथम ह्या वादात पडावे लागले.

कोणत्याहि बाबतीत सरकारला विरोध करावयाचा असता टिळक धर्माच्या आड लपतात असा एक त्यांच्यावर ठराविक आक्षेप असे. पण लस टोचण्याच्या वादात हा आक्षेप त्यानी प्रथमच निर्मूल केला. ‘ लसीबरोबर शिजलेला मांसरस पिचकारीने शरिरात थोडासा घालावा लागतो. एवढयाकरिता म्हणजे धर्मश्रद्धेने महाराष्ट्रातील लोक या उपायाच्या विरुद्ध जातील असे आम्हास वाटत नाही. मांसरसाऐवजी उद्या डाळीचे पीठ किंवा कणकीचे पीठ शिजवून त्याचा रस उपयोगात आणण्याचा प्रयोग पुढे मागे यशस्वी होईल. तसे झाले तर सोवळ्या आजीबाईची देखील काडी इतकीहि धर्मसंबंधी तक्रार लस टोचण्याविरुद्ध राहणार नाही. पण सध्याच्या स्थितीत देखील धर्मसंबंधी कोणाची खरोखरच तक्रार असेल असे आम्ही म्हणू शकत नाही. असल्यास ती खोटी आहे. औषध म्हणून थोडासा मांसरस आणि तोहि प्लेगच्या किड्यानी खाल्लेला पिचकारीने शरीरात घालण्यास धर्मप्रत्यवाय आहे असे आम्हास तरी आढळून आलेले नाही.’ तात्पर्य लसीविरुद्ध तक्रार धर्माची नव्हे तर व्यवहाराची. आणि या तक्रारीचा आधार लसीच्या उपयोगाविषयी अजून राहिलेला संशय. पण हा संशय अतज्ञ माणसानीच नव्हे तर तज्ञ माणसानीहि व्यक्त केला होता.

लस टोचण्याचा वाद सुरू झाला त्याला दोन बाजू होत्या. सरकारची बाजू अशी की तज्ञ डॉक्टर लोकानी लस तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. ती टोचण्याची व्यवस्था झाली आहे. तेव्हा लोकानी ती आपण होऊन टोचून घ्यावी. पण ते तसे न करतील तर त्यांच्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सक्तीहि करावी लागेल. कारण प्लेग पसरू न देणे हे देशाच्या हिताचेच आहे. ह्याच्याविरुद्ध लोकांची बाजू अशी की प्लेगची लस नव्यानेच निघाली आहे. अजून ती व्हावी तितकी निर्दोष नाही. टोचण्याची कृतिहि पुष्कळ वेळा अडाणीपणाची घडते. कोणाला ती टोचावी कोणाला टोचू नये ह्याविषयी जो विवेक केला पाहिजे तो राहात नाही. म्हणून तिचे दुष्परिणाम कोठे कोठे दिसून येतात. अर्थात लस टोचून घ्यावयाची तर ती ज्याची त्याने खुषीने टोचून घेतली पाहिजे. जुलमाने ती मुळीच टोचू नये. कितीहि केले तरी लस हे एक प्रकारचे विष आहे असेच लोक समजतात. म्हणून ती सक्तीने कोणाच्याहि अंगात टोचण्याचा सरकारास अधिकार नाही. टिळकानी ही लोकांची बाजू म्हणून उचलून धरली आणि ती केसरीतून जोराने मांडण्याचे काम केले.

सन १८९९ च्या जून जुलैमध्ये बेळगावकडे सक्तीने लस टोचण्याचा प्रचार सुरू झाल्याच्या बातम्या आणि तक्रारी येऊ लागल्या. म्हणून तारीख १ आगस्टच्या केसरीत टिळकानी या सक्तीविरुद्ध बंडाचे निशाण उभारले. पण त्यानी प्रथमच असे स्पष्ट म्हणून ठेवले की “प्लेगच्या या देवी टोचण्यापासून बिलकूल फायदा नाही असे आम्ही म्हणत नाही. पण लस टोचलेल्या मनुष्याच्या प्रकृतीवर काय

परिणाम होतात हे अजून स्पष्ट कळलेले नाही. एकदा लस टोचल्यावर पुढे किती महिनेपर्यंत प्लेग होण्याची धास्ती नसते याचाहि पक्का निर्णय अजून झालेला नाही. दरवर्षी प्लेग येणार तर दरवर्षी लस टोचून घ्यावी लागेल. पुष्कळाना ही स्थिति भयप्रद वाटते. म्हणून लस कितीहि फायदेशीर असली तरी कोणावरहि ती टोचण्याची सक्ति होता कामा नये." टिळकांच्या मते स्थानत्याग हा प्लेगवर सर्वात उत्कृष्ट उपाय. पण गाव सोडून बाहेर जाऊन राहावयाचे म्हणजे बाजार पाणी दिवाबत्ती रखवाली इत्यादि व्यवस्था हवी. ती सरकार करावी तितकी करीत नाही. यूरोपियन लोकाना प्लेग फारसा होत नाही. त्याचे कारण हेच की ते गावापासून दूर अंतरावर राहातात. म्हणून त्यांचे प्लेगपासून संरक्षण होते आणि लस टोचून घेण्याची त्यांच्यावरील सक्तिहि टळते. अर्थात ज्या सोई गोऱ्या लोकाना गावाबाहेर राहण्याला मिळतात त्या सर्व अगदी तशाच नसल्या तरी निदान थोड्याबहुत तरी येथील लोकाना करून दिल्या पाहिजेत. हे करण्याला खर्च येतो. म्हणून तो टाळून लस टोचण्याच्या सवंग उपायावर सरकार आपले कर्तव्य भागवून घेते. लसच टोचावयाची तर डॉ. विश्राम रामजी घोले यांच्या मताप्रमाणे गोस्तनाची लस टोचण्याचा प्रकार सुरू करावा. कारण गोस्तन देवी टोचून घेण्याची सवय लोकाना आहे. त्यापासून दुष्परिणाम होत नाहीत हे लोकाना अनुभवाने कळले आहे. प्लेग आला असता गाईची लस टोचण्याचा प्रघात पूर्वी तुर्कस्तानात होता याविषयी इंडियन मेडिकल जरनलमध्येच लेख आला होता. तात्पर्य केवळ लस टोचून घेणे याला टिळक प्रतिकूल नव्हते. तर जी लस निर्दोष असण्याची खात्री लोकाना अजून पटली नव्हती ती सक्तीने टोचण्याचा आग्रह सरकाराने धरू नये, प्रथम लोकांचे मन वळविण्याचा प्रयत्न होईल तेवढा करावा इतकेच टिळकांचे म्हणणे होते. तारीख १५ आगस्टच्या केसरीत या विषयावर टिळकानी एक सबंध अग्रलेखच लिहिला. ह्यात लसीची मूळ कल्पना ती तयार करण्याचे प्रयत्न इत्यादिकाविषयी सोपपत्तीक चर्चा केलेली असून प्लेगप्रतिबंधक उपाय म्हणून डॉ. यारसीन यांची लस निरोगी मनुष्याला टोचण्यापेक्षा प्लेग झालेल्या मनुष्याला टोचावी असे मत टिळकानी प्रतिपादिले.

केसरीच्या ह्या मतप्रतिपादनाने बरीच खळबळ उडाली. सरकारास वाटू लागले की आपल्या कामात हे एक विघ्न आले. म्हणून त्यांची प्रतिक्रिया सुरू झाली. मुंबईचे डॉक्टर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यानी या प्रतिक्रियेला दुजोरा दिला आणि टाइम्स पत्रातून लस टोचण्याच्या उपायाचे समर्थन जोराने सुरू झाले. डॉक्टरीच्या नात्याने डॉ. भालचंद्र यानी लसीविषयी दिलेला अभिप्राय तितक्या पुरता कोणीहि ग्राह्यच मानला असता. पण त्यांच्या अभिप्रायाचा आधार घेऊन सक्तीचे समर्थन सरकाराकडून होऊ लागले. आणि या सक्तीचा तर डॉक्टर निषेध करीनात. एवढ्यामुळे टिळक व डॉक्टर भालचंद्र यांजमध्ये वाद वाढला. डॉ. भालचंद्र हे अगदी दुसऱ्या टोकाला जाऊन बसल्यासारखे झाले होते. प्लेगची लस

तक्रारी होत्या म्हणून तुरुंगातून सुटून आल्याबरोबर टिळकाना प्रथम ह्या वादात पडावे लागले.

कोणत्याहि बाबतीत सरकारला विरोध करावयाचा असता टिळक धर्माच्या आड लपतात असा एक त्यांच्यावर ठराविक आक्षेप असे. पण लस टोचण्याच्या वादात हा आक्षेप त्यानी प्रथमच निर्मूल केला. 'लसीबरोबर शिजलेला मांसरस पिच कारीने शरिरात थोडासा घालावा लागतो. एवढयाकरिता म्हणजे धर्मश्रद्धेने महाराष्ट्रातील लोक या उपायाच्या विरुद्ध जातील असे आम्हास वाटत नाही. मांसरसाऐवजी उद्या डाळीचे पीठ किंवा कणकीचे पीठ शिजवून त्याचा रस उपयोगात आणण्याचा प्रयोग पुढे मागे यशस्वी होईल. तसे झाले तर सोवळ्या आजीबाईची देखील काडी इतकीहि धर्मसंबंधी तक्रार लस टोचण्याविरुद्ध राहणार नाही. पण सध्याच्या स्थितीत देखील धर्मसंबंधी कोणाची खरोखरच तक्रार असेल असे आम्ही म्हणू शकत नाही. असल्यास ती खोटी आहे. औषध म्हणून थोडासा मांसरस आणि तोहि प्लेगच्या किड्यानी खाल्लेला पिचकारीने शरीरात घालण्यास धर्मप्रत्यवाय आहे असे आम्हास तरी आढळून आलेले नाही.' तात्पर्य लसीविरुद्ध तक्रार धर्माची नव्हे तर व्यवहाराची. आणि या तक्रारीचा आधार लसीच्या उपयोगाविषयी अजून राहिलेला संशय. पण हा संशय अतज्ञ माणसानीच नव्हे तर तज्ञ माणसानीहि व्यक्त केला होता.

लस टोचण्याचा वाद सुरू झाला त्याला दोन बाजू होत्या. सरकारची बाजू अशी की तज्ञ डॉक्टर लोकानी लस तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. ती टोचण्याची व्यवस्था झाली आहे. तेव्हा लोकानी ती आपण होऊन टोचून घ्यावी. पण ते तसे न करतील तर त्यांच्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सक्तीहि करावी लागेल. कारण प्लेग पसरू न देणे हे देशाच्या हिताचेच आहे. ह्याच्याविरुद्ध लोकांची बाजू अशी की प्लेगची लस नव्यानेच निघाली आहे. अजून ती व्हावी तितकी निर्दोष नाही. टोचण्याची कृतिहि पुष्कळ वेळा अडाणीपणाची घडते. कोणाला ती टोचावी कोणाला टोचू नये ह्याविषयी जो विवेक केला पाहिजे तो राहात नाही. म्हणून तिचे दुष्परिणाम कोठे कोठे दिसून येतात. अर्थात लस टोचून घ्यावयाची तर ती ज्याची त्याने खुषीने टोचून घेतली पाहिजे. जुलमाने ती मुळीच टोचू नये. कितीहि केले तरी लस हे एक प्रकारचे विष आहे असेच लोक समजतात. म्हणून ती सक्तीने कोणाच्याहि अंगात टोचण्याचा सरकारास अधिकार नाही. टिळकानी ही लोकांची बाजू म्हणून उचलून धरली आणि ती केसरीतून जोराने मांडण्याचे काम केले.

सन १८९९ च्या जून जुलैमध्ये बेळगावकडे सक्तीने लस टोचण्याचा प्रचार सुरू झाल्याच्या बातम्या आणि तक्रारी येऊ लागल्या. म्हणून तारीख १ आगस्टच्या केसरीत टिळकानी या सक्तीविरुद्ध बंडाचे निशाण उभारले. पण त्यानी प्रथमच असे स्पष्ट म्हणून ठेवले की "प्लेगच्या या देवी टोचण्यापासून बिलकूल फायदा नाही असे आम्ही म्हणत नाही. पण लस टोचलेल्या मनुष्याच्या प्रकृतीवर काय

परिणाम होतात हे अजून स्पष्ट कळलेले नाही. एकदा लस टोचल्यावर पुढे किती महिनेपर्यंत प्लेग होण्याची धास्ती नसते याचाहि पक्का निर्णय अजून झालेला नाही. दरवर्षी प्लेग येणार तर दरवर्षी लस टोचून घ्यावी लागेल. पुष्कळाना ही स्थिति भयप्रद वाटते. म्हणून लस कितीहि फायदेशीर असली तरी कोणावरहि ती टोचण्याची सक्ति होता कामा नये." टिळकांच्या मते स्थानत्याग हा प्लेगवर सर्वांत उत्कृष्ट उपाय. पण गाव सोडून बाहेर जाऊन राहावयाचे म्हणजे बाजार पाणी दिवाबत्ती रखवाली इत्यादि व्यवस्था हवी. ती सरकार करावी तितकी करीत नाही. यूरोपियन लोकाना प्लेग फारसा होत नाही. त्याचे कारण हेच की ते गावापासून दूर अंतरावर राहातात. म्हणून त्यांचे प्लेगपासून संरक्षण होते आणि लस टोचून घेण्याची त्यांच्यावरील सक्तिहि टळते. अर्थात ज्या सोई गोऱ्या लोकाना गावाबाहेर राहण्याला मिळतात त्या सर्व अगदी तशाच नसल्या तरी निदान थोड्याबहुत तरी येथील लोकाना करून दिल्या पाहिजेत. हे करण्याला खर्च येतो. म्हणून तो टाळून लस टोचण्याच्या सवंग उपायावर सरकार आपले कर्तव्य भागवून घेते. लसच टोचावयाची तर डॉ. विश्राम रामजी घोले यांच्या मताप्रमाणे गोस्तनाची लस टोचण्याचा प्रकार सुरू करावा. कारण गोस्तन देवी टोचून घेण्याची सवय लोकाना आहे. त्यापासून दुष्परिणाम होत नाहीत हे लोकाना अनुभवाने कळले आहे. प्लेग आला असता गाईची लस टोचण्याचा प्रघात पूर्वी तुर्कस्तानात होता याविषयी इंडियन मेडिकल जरनलमध्येच लेख आला होता. तात्पर्य केवळ लस टोचून घेणे याला टिळक प्रतिकूल नव्हते. तर जी लस निर्दोष असण्याची खात्री लोकाना अजून पटली नव्हती ती सक्तीने टोचण्याचा आग्रह सरकारने धरू नये, प्रथम लोकांचे मन वळविण्याचा प्रयत्न होईल तेवढा करावा इतकेच टिळकांचे म्हणणे होते. तारीख १५ आगस्टच्या केसरीत या विषयावर टिळकानी एक सबंध अग्रलेखच लिहिला. त्यात लसीची मूळ कल्पना ती तयार करण्याचे प्रयत्न इत्यादिकाविषयी सोपपत्तीक चर्चा केलेली असून प्लेगप्रतिबंधक उपाय म्हणून डॉ. यारसीन यांची लस निरोगी मनुष्याला टोचण्यापेक्षा प्लेग झालेल्या मनुष्याला टोचावी असे मत टिळकानी प्रतिपादिले.

केसरीच्या ह्या मतप्रतिपादनाने बरीच खळबळ उडाली. सरकारास वाटू लागले की आपल्या कामात हे एक विघ्न आले. म्हणून त्यांची प्रतिक्रिया सुरू झाली. मुंबईचे डॉक्टर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यानी या प्रतिक्रियेला दुजोरा दिला आणि टाइम्स पत्रातून लस टोचण्याच्या उपायाचे समर्थन जोराने सुरू झाले. डॉक्टरांच्या नात्याने डॉ. भालचंद्र यानी लसीविषयी दिलेला अभिप्राय तितक्या पुरता कोणीहि ग्राह्यच मानला असता. पण त्यांच्या अभिप्रायाचा आधार घेऊन सक्तीचे समर्थन सरकाराकडून होऊ लागले. आणि या सक्तीचा तर डॉक्टर निषेध करीनात. एवढ्यामुळे टिळक व डॉक्टर भालचंद्र याजमध्ये वाद वाढला. डॉ. भालचंद्र हे अगदी दुसऱ्या टोकाला जाऊन बसल्यासारखे झाले होते. प्लेगची लस

प्रयोगावस्थेत आहे ह्मणून तिचे काही दुष्परिणाम होऊ शकतील ही गोष्ट ते प्रांजलपणे कबूल करीनात. दुष्परिणाम झाल्याची उदाहरणे वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होत होती. त्यांचा तपास करण्याची सूचना ते स्वीकारीनात ! आणि स्वतंत्र विचाराचे चार देशी डॉक्टर जमवून त्यांचा अभिप्राय प्रगट करण्याने जो फायदा काही मिळण्यासारखा होता तो सोडून देऊन केवळ टाइम्स पत्रात लसीला अनुकूल असे लेख लिहिण्याचे धोरण त्यानी स्वीकारले. यामुळे सरकारची बाजू सावरून धरण्याकरिता डॉक्टर भालचंद्र हे पुढे आले आहेत असा आक्षेप त्यांच्यावर लोक घेऊ लागले. इकडे बेळगाव इत्यादि ठिकाणी गाव सोडून देऊन बाहेर झोपड्यातून राहणाऱ्या लोकावरहि लस टोचण्याचा जुलूम सुरू झाला आणि ही तक्रार नामदार छत्रे यानी कौन्सिलापुढे मांडली. ‘ लस टोचून घ्या नाहीतर घरातून बाहेर जा ! कारण एरवी तुम्हाला प्लेग होईल ’ हे म्हणणे एक वेळ असो. पण बाहेर जाऊन प्रत्यक्ष झोपडीत राहणाऱ्या लोकाना ‘ तुम्ही टोचून घ्या नाही तर झोपडी सोडून जा ’ असे सांगणे हास्यास्पद होते. अशा रीतीने अविचारी अधिकाऱ्यांचा जुलूम ही लस टोचण्याच्या उपायाला एक नसती अडचण होऊन राहिली होती.

पुण्यात लष्करी लोकांच्या हाती प्लेगसंबंधी सर्व अधिकार असल्यामुळे त्यानी शिस्तीच्या नावाखाली अनेक हास्यास्पद प्रकार केले. पुण्यातील प्लेग संपला तेव्हा परगावचे लोक पुण्यास येऊन प्लेगचा फैलाव करितील या सबबीवर त्यानी काही दिवस पुण्याची नाकेबंदीच केली. रात्रीचे आठा नंतर गावातून बाहेर व बाहेरून गावात गाडी मुळीच सोडीनात. जणू काय दिवसा झालेल्या गाड्याच्या वाहतुकीने किंवा रात्रीच्या येणाऱ्या जाणाऱ्या पादचराच्या संसर्गाने प्लेग होण्याची भीति नव्हती आणि ती फक्त गाड्याना चिकटून राहिली होती ! विशेष मौज ही की पुण्यात बाहेरून प्लेग येण्याची भीति असता गावातील गाडी बाहेर जाऊ देण्यालाहि प्रतिबंध केला जाई ! उलट लष्करी अधिकाऱ्यासमक्ष नाक्यावर गाड्या सोडून लोक पायउतारा आतबाहेर जात येत ते चालत. चुकून एकादा प्लेगचा रोगी गाडीत घालून कोणी रात्री लपून छपून पुण्यास आणील एवढ्याकरिता ही सगळ्या लोकांची नाकेबंदी ! प्लेगच्या दिवसातील पुण्याचा हा वेढा पुष्कळ रहिवाशांच्या स्मरणात आहे. आणि तो आठवला म्हणजे त्याचे त्याना हसू येते. पुण्यास गावात जाण्यायेण्याचा प्रतिबंध लोकाना थोडासा नेहमीच्या परिचयाचा आहे. गव्हर्नरसाहेब कोठे जावयाचे असता काही वेळ रस्ते बंद होतात म्हणून त्याचे इतके कोणास वाटले नाही. पण ‘ लस टोचून न घ्याल तर झोपडी सोडून जावे लागेल ’ असे अधिकाऱ्यानी म्हटल्यास मग प्लेग पासून बचाव करून घेण्याला लोकानी जावे तरी कोठे ? या प्रश्नाचे उत्तर कोणासच सुचेना.

आक्टोबर महिन्यात डॉक्टर भालचंद्र व टिळक यांचा परस्पर पत्रव्यवहार झाला. डॉक्टर भालचंद्र याना लिहिलेल्या पत्रात टिळकानी दहा मुद्देसूद प्रश्न विचारले होते. त्यातील मुख्य मुद्दा लसीपासून हटकून बचाव किती होतो आणि लसी-

पासून काही दुष्परिणाम होतात की नाही असा रोख ठोक विचारण्याचा होता. टिळकांचे हे पत्र गेल्यावर डॉक्टर भालचंद्र यानी ग्रँट मेडिकल कॉलेज सोसायटीच्या विद्यमाने इतर डॉक्टर लोकाना विशेषतः गावोगावच्या सब असिस्टंट सर्जन लोकाना काही माहिती गोळा करून पाठविण्याबद्दल पत्रे लिहिली. यावर टिळकानी आधीच आक्षेप असा काढला होता की एकादे कमिशन नेमून स्वतंत्र चौकशी व्हावी किंवा डॉ. भालचंद्र यानी स्वतःचा अनुभव म्हणून वाटेल ते सांगावे पण डॉक्टर लोकाना काढलेल्या सरक्युलरानी विश्वसनीय माहिती मिळण्यासारखी नाही. धारवाड येथून कृष्णाजी आबाजी गुरुजी यानी लसीच्या दुष्परिणामाच्या उदाहरणाचे एक भले कोष्टकच्या कोष्टक पाठविले ते तारीख २४ आक्टोबरच्या केसरीत छापिले गेले. मुंबईच्या चॅम्पिअन पत्रात पारसी डॉक्टर सुखीया यानीहि लसीपासून होणाऱ्या दुष्परिणामासंबंधी आपले मत प्रगट करून टिळकाना एक प्रकारे पाठिंबा दिला.

गुरुजी याजकडून तक्रारीचे नवे हप्ते केसरीत येतच होते. तेव्हा पुण्यात लस टोचण्याला अनुकूल असा जो एक पक्ष होता त्याने पुण्याचे एक होमिओपाथीक डॉक्टर व गोपाळराव गोखल्यांचे स्नेही राजम् अयंगार यास धारवाडास पाठविले. आणि गुरुजींनी केसरीकडे पाठविलेल्या हकिकतीत कितपत तथ्य आहे ह्याचा तपास खाजगी रीतीने करविला. डॉक्टर अयंगार यानी मराठा वर्तमानपत्रात जे पत्र लिहिले त्यात जवळ जवळ गुरुजींचे समर्थनच केले होते. ते लिहितात की 'गुरुजींच्या यादीत काही असलेले व काही नसलेले लोक गुरुजीबरोबर व काही स्वतंत्रपणे मी तपासले. त्यावरून दिसून आले की वाजवीपेक्षा फाजील लस अंगात घातल्यामुळे लोकाना त्रास झाला आहे. एक वर्ष होऊन गेले तरी कित्येकावरील दुष्परिणाम कमी झाले नाहीत. लस टोचण्याची पिचकारी अजाणत्या लोकानी वापरण्यानेच कित्येकास इजा झाल्या. काही विलक्षण योगामुळे ज्याना लसीचे माप बरोबर दिले गेले त्यापैकी कित्येकांचा दम्याचा रोग कमी झाला. उलट पक्षी प्रमाण बरोबर न साधल्याने कित्येकांचे अंतर्गत रोग अंगावर उमटले. कित्येक डॉक्टरानी रोज तीन तीनशे लोकाना लस टोचल्याची डॉक्टर अयंगार यांचेपुढे प्रौढी गाईली! पण एका दिवसात तीनशे रोगी काळजीपूर्वक टोचले जाणे शक्य नाही असा डॉक्टर अयंगार यानी आपला अभिप्राय दिला. अर्थात लस टोचण्यापासून फायदा आहे म्हटले तरी प्रकृतीचे मान बरोबर ओळखणे व त्या प्रकृतीला जुळेल असे लसीचे प्रमाण ठरविणे ह्या गोष्टी अवघडच होत्या.

पुढे डॉक्टर भालचंद्र यानी टिळकांच्या पत्रास सविस्तर उत्तर पाठविले. आणि ते ज्यात छापिले त्याच म्हणजे २१ नोव्हेंबरच्या अंकात टिळकानी त्या पत्राला सविस्तर उत्तरहि दिले. या पत्रोपत्री वादाचा उपसंहार करिताना टिळक लिहितात "हल्ली लस तयार करण्याचा उद्योग चालला आहे. स्तुत्य आहे. केव्हाना केव्हा तरी त्यापासून जगाचे मोठे कल्याण होण्याची आशा आहे. पण या सर्व गोष्टी कबूल केल्या तरी

तो टोचून घेतो. पण आपल्या विश्वासाच्या अनुभवाच्या ऋणानुबंधाच्या डॉक्टराचा सल्ला आग्रह किंवा जुलूम हा वेगळा आणि सरकारी अधिकाऱ्याचा वेगळा.' त्या काळी डॉक्टर लोक जरी प्रथमपासूनच लस टोचण्याच्या कामी उडी घालते तरी ही बाब इतकी अप्रिय वाटली नसती किंवा तिचा इतका गवगवाहि झाला नसता. परंतु या कामी डॉक्टर लोकांची देखील तेव्हा इतकी खात्री नव्हती की त्यानी आपल्या स्नेह्याना लस टोचण्याचा आग्रह किंवा जुलूम करावा. शहरातून सक्तीचा गवगवा विशेष झाला नाही. पण खेडेगावातून प्लेगच्या व्यवस्थेकरिता लहान लहान डॉक्टर लोक व अधिकारी नेमले होते ते लोकाशी वागताना जितकी दक्षता ठेवावी तितकी ठेवीत नसत आणि जितके मन मिळून काम करावे तितके करीत नसत. अशा लोकांची रड कोणी पुरस्कर्ता मिळाल्याशिवाय सरकारपर्यंत कशी जाणार? रोगप्रतिबंधक उपायाविरुद्ध तंटे म्हणजे ते उपाय अमलात आणणाऱ्या जुलमी अधिकाऱ्याविरुद्ध तंटे इतकाच खरोखर त्याचा अर्थ होता. आणि ह्या तंट्यात लोकाना पुढाऱ्याची मदत अवश्य हवी होती. लस टोचण्याच्या बाबतीत डॉक्टर भालचंद्रासारखे लोक सरकारला अनुकूल म्हणून लोकांचे प्राण वाचविण्याची काळजी तेवढी त्यानाच आणि टिळक प्रतिकूल म्हणून लोक मेले तरी त्याना चालतील इतके ते बेफिकीर असा अर्थ नाही! तर कोणत्याहि निमित्ताने किंवा कारणाने अधिकाऱ्याकडून जुलुम होत असता त्याच्याकडे कानाडोळा करावा ही एक वृत्ति आणि त्याचा गवगवा करावा ही दुसरी वृत्ति. ह्या दोन वृत्तींचा नेहमी झगडा चाललेला असतो. आणि आपल्या नेहमीच्या धोरणाप्रमाणे टिळकानी कित्येक लोकांचे आक्षेप सोसूनहि लोकांची पडती बाजू उचलून धरली हे त्यांच्या असमंजसपणाचे लक्षण नसून लोकहितबुद्धीचे द्योतक होय हे कोणाहि समंजस व विचारी माणसास दिसून येईल.

कालांतराने प्लेग हळु हळु हतवीर्य झाला. लोकांचाहि त्याच्याशी परिचय वाढला. गावाबाहेर जाऊन राहणे हे लोकांच्या अंगवळणी पडले. लस अधिक अधिक निर्दोष होऊ लागली. यामुळे ज्याना गावाबाहेर जाता येई ते स्वेच्छेने जाऊ लागले. बाहेर जाता येईना ते स्वेच्छेने लस टोचून घेऊन गावात राहू लागले. प्लेग-व्यवस्थेतील अंग सरकारने हळु हळु बहुतेक सर्व काढून घेतले. शहरातून ती व्यवस्था त्यानी स्थानिक सरकारच्या ह्मणजे मुख्यतः म्युनिसिपालट्यांच्या स्वाधीन केली. आणि लोकल बोर्डाच्या क्षेत्रात जवळ जवळ काहीच व्यवस्था नाही अशी स्थिति आली तरी सरकारने त्याकडे लक्ष दिले नाही. तात्पर्य पुढे पुढे प्लेगच्या व्यवस्थेतील जुलूम ही केवळ स्मरणाची गोष्ट होऊन राहिली. ह्मणून लस टोचणे हा पूर्वी केव्हा एका मोठ्या हमरीतुमरीचा विषय होऊन बसला होता असे आज कोणी सांगितले तर नव्या पिढीच्या मनुष्याला ते फारसे खरेहि वाटणार नाही. पण टिळकानी केलेला विरोध योग्य होता की नाही याचे मर्म समजण्याला तत्कालीन सामान्य लोकांच्या परिस्थितीच्या अंतरंगात शिरले पाहिजे.

## (११) कृष्णाजी आबाजी गुरुजी

इनॉक्युलेशन प्रकरणी प्रसिद्धीस आलेले कृष्णाजी आबाजी गुरुजी हे जुन्या पद्धतीने राहणारे एक धर्मनिष्ठ गृहस्थ होते. पण धर्मभक्तिपेक्षाहि त्यांची देशभक्ति अधिक होती. वासुदेव बळवंताच्या बंडात ते सामील नसले तरी वासुदेव बळवंताबद्दल मनातून सहानुभूति असणाऱ्या व देशभक्त म्हणून समजणाऱ्या लोकांपैकी ते एक गृहस्थ होते. इंदापूरचे सुप्रसिद्ध वक्ते व प्रचारक देशपांडे व गुरुजी यांच्यामध्ये लोकाना फारच साम्य दिसे. दोघेहि शरीराने धिप्पाड. दोघेहि कट्टे देशभक्त. दोघानाहि गाई व शेतकरी यांचे अतिशय प्रेम. दोघानाहि तालमीचा शोक. दोघांचीहि तरुण पिढीला ब्रह्मचर्याविषयी उपदेश करण्याची कळकळ. आणि दोघानाहि मतप्रसाराची आवड. सर्वांत विशेष साम्य म्हटले म्हणजे दोघांचेहि वक्तृत्व अमोघ आणि दोघांचेहि ठिकाणी श्रद्धेच्या मानाने चिकित्सा फारच कमी असल्यामुळे वक्तृत्वाच्या भरात आले म्हणजे बोलू नये तेहि आपण कसे बोलतो आणि दहा हात झाडाची बारा हात ढलपी काढून श्रोता विश्वास न ठेवील अशाहि गोष्टी कशा सांगतो याचे दोघानाही भान नसे. पण या दोघात मुख्य फरक हा होता की गुरुजींच्या ठिकाणी वक्तृत्वाइतकेच ग्रंथप्रेमहि असे. त्यांचा पुस्तकसंग्रह मोठा मौल्यवान् असून दुर्मिळ गोष्टींचा ते हटकून संग्रह करीत. उपजीविकेचे साधन म्हणून प्रथम त्यानी जंगलखात्यात सरकारी नोकरी धरली. पण पुढे ती गेली. त्याला कारण त्यांची बाणेदार वृत्तीच होय. नोकरी सुटल्यावर ते प्रथम काही दिवस धारवाडकडे होते व पुढे तेथून ते काशीवास करण्याला गेले. पण त्यांच्यासारखा मनुष्य तेथे गप्प बसणे शक्य नव्हते. काशीस त्यानी कालिदास या नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. धारवाडास असता त्यानी प्लेगची लस टोचण्या संबंधाचा जुलूम प्रथम लोकनिदर्शनाला आणून केसरीपत्रद्वारे मोठी चळवळ केली. किंबहुना त्यांच्या या चळवळीमुळे इनॉक्युलेशन कमिशन नेमले गेले. आणि त्यानी दिलेल्या प्लेगटोचणीच्या दुष्परिणामाच्या पुराव्यात काही अतिशयोक्ति असल्याचे कमिशनने जरी शाबीत धरले तरी अखेर चळवळीचा परिणाम होऊन लस टोचण्यासंबंधी कोणावर सक्ति होऊ नये असे सरकारी धोरण प्रस्थापित झाले.

पण गुरुजीना आपल्या ह्या चळवळींचे प्रायश्चित्त लवकरच घ्यावे लागले. कारण ते इकडे धारवाडकडे आले असताना त्यांच्या कालिदास पत्रात त्यांचे मदतनीस कोणी लवाटे यानी 'काळा व गोरा' या विषयावर जून महिन्यात दोन लेख लिहिले. ते आक्षेपार्ह समजून काशी येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने गुरुजीकडून दहा दहा हजार रुपयाचे जामीन मागण्याच्या नोटिसा नवीन क्रि. प्रो. कोड कलम १०८ प्रमाणे काढल्या. परदेशात गुरुजी हे असे संकटात सापडलेले पाहून टिळकानी दादासाहेब करंदीकर याना विनंति केल्यावरून ते त्यांचा मुकदमा चालविण्याला तिकडे गेले. वास्तविक कालिदास हे पत्र मराठी भाषेत निघणारे. त्याला उत्तर हिंदुस्थानात वाचक कितीसे मिळणार ! पत्र निघून पुरे पाच सहा महिनेहि झाले नव्हते. अर्थात्

लागली ती हास्यास्पद ठरली. चंदावरकरानी जंगल खात्याविषयी सँढर्स्ट साहेबांच्या धोरणाची स्तुति केली. पण स्तुति करण्यासारखे खरोखर त्या धोरणात काही विशेष नव्हते. खातेवारीच्या कामात चढउतार थोडथोडा होतच असतो. पण धोरण वाईट म्हणून जाहीर सभा भरवून गव्हर्नराचो निंदा निषेध करण्याचे धैर्य ज्याना नसते असे लोक एखाद्या खात्याच्या कारभारात जरा किंचित सुधारणा झाल्याबरोबर त्या वेळच्या गव्हर्नराचे स्मारक करण्याला त्याचा आधार घेऊन पुढे येतात. 'या स्मारकाच्या चळवळीत आपण नाही रे बुवा' असे मुद्दाम उघड लिहून आपल्या-वरचा संशय दूर करणे कित्येकास अवश्य वाटले. एखाद्याचा या स्मारकाशी संबंध आहे असे म्हणणे म्हणजे त्याची टवाळी करणे होय असा ग्रह होऊन बसला.

स्मारकावर हत्यार उचलून केसरीच्या दर अंकात टिळक लिहीतच होते. पण ता. २३ जानेवारी सन १९०० च्या अंकापासून लॉर्ड सँढर्स्ट ह्यांचा कारकीर्दीचे समालोचन करण्याकरिता टिळकानी एक लेखमाला सुरू केली. लॉर्ड सँढर्स्ट प्रथम इकडे आले तेव्हां त्यांच्या विरुद्ध पुष्कळ दिवसपर्यंत निंदेचे कोणी एक अवाक्षरही उच्चारले नव्हते. त्यांचे पिढीजाद गुण व व्यक्तिगत सौम्य स्वभाव यामुळे आपले कल्याण होईल अशी प्रथम लोकाना आशा होती. पण दुष्काळी व्यवस्था प्लेगचा बंदोबस्त यःकश्चित कारणावरून केलेले वर्तमानपत्रावरील खटले केसरीवरील खटला नातू-बंधूची कैद पुण्यावरील जादा पोलीस इत्यादि गोष्टी अवघ्या पाच वर्षात घडलेल्या. स्वतः लॉर्ड सँढर्स्ट यानी "माझ्या कारकीर्दीत मुंबई इलाख्यावर जशी संकटे कोस-ळली तशी पूर्वी कधी कोणत्याहि गव्हर्नरच्या वाट्यास आली नसतील" असे जे उद्गार एक अर्थाने काढले ते दुसऱ्या एका अर्थाने खरेच होते. या संकटाबद्दल लॉर्ड सँढर्स्ट याना वाईट वाटणे स्वभाविक होते. पण त्यातली काही जरी परेच्छा प्रारब्धाची होती तरी काही त्यांच्या स्वतःच्या दोषामुळे उपस्थित झाली होती ही गोष्ट विसरता येत नाही. कसेहि असो युद्धात पडलेल्या लोकांच्या शौर्याबद्दल जसे स्मारक उभारतात त्याच रीतीने ही सर्व संकटे ज्या लोकानी सोसली त्यांच्या सोशिक-पणाचेच एखादे स्मारक खरोखर उभारावयास पाहिजे होते. पण ते सोडून गव्हर्नर साहेबांचे स्मारक उभारणे म्हणजे उलटा न्यायच नव्हे काय? टिळकानी या अग्र-लेखमालेत वर सांगितलेल्या सर्व मुद्यांचे विस्तृत परीक्षण केले व उपसंहारादाखल असे लिहिले की लॉर्ड साहेबांची कारकीर्द सर्वतोपरी लोकांच्या नुकसानीची आणि त्रासाची झाली. आणि त्यांचे अंगी व्यक्तिशः काही चांगले गुण असले तरी त्यांचा कारभाराला काही उपयोग झाला नाही. असो. स्मारकाचे सार्वजनिक स्वरूप नाही म्हटले तरी त्यांच्या मित्रानी व भक्तानी खासगी स्वरूपातच का होईना पण स्मारकाच्या चळवळीस रंगरूप यावे असा प्रयत्न चालविला. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात एक सुमारे चारशे लोकांची सभा भरवून चळवळीला सार्वजनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला. आणि अखेर मेथा वाछा सेटलवाड वगैरे लोकहि औपचारिक रीतीने सामील होऊ लागले. ह्याहि बाबतीत मेथा ते मेथा चंदावरकर ते चंदावरकर व

भालचंद्र ते भालचंद्र हा फरक दिसून आलाच. परंतु कॉंग्रेसमध्ये लॉर्ड सँढर्स्ट यांच्या अपकृत्यांचे दोषाविष्करण करणे आणि इकडे त्यांच्या स्मारकाविषयी उपेक्षा युक्त का होईना पण सहानुभूति दर्शविणे या परस्पर विरुद्ध गोष्टींमुळे कॉंग्रेसवर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही असे टिळकानी बजावले. केसरीवर खटला केला म्हणून टिळक हे स्मारकाच्या विरुद्ध अशी व्यक्तिविषयक हेतुमीमांसा काही लोकानी या वेळी केली. पण डॉ. भालचंद्र याना सर ही पदवी मिळाली व चंदावरकर याना हायकोर्टाच्या न्यायाधीशाची जागा मिळू घातली होती म्हणून ते स्मारकाला अनुकूल होते असे त्याला प्रत्युत्तर सहजच देता येण्यासारखे होते.

लॉर्ड सँढर्स्ट यांच्या स्मारकासंबंधीचा हा वाद आतापर्यंत पुण्यामुंबईत म्हणजे १२० मैलांचे अंतरावर चालू होता. पण पुढे लवकरच म्हणजे मे महिन्यात मुंबई प्रांतिक परिषद भरविली तेव्हा पुणेकर व मुंबईकर हे साताऱ्यास एकत्र आले. तेव्हा त्यांच्यामध्ये सहजच खटका उडाला. परिषदेचे अध्यक्षस्थान मुंबईचे सुप्रसिद्ध वकील गोकुळदास कहानदास पारख यास देण्याचे ठरले होते. ही परिषद कराची येथील परिषद नंतर आज चार वर्षांनी भरत होती. सातारकरांचे अत्यंत आस्थेवाईक निमंत्रण होते. आणि या चार वर्षांच्या अवधीत बऱ्याच उलाढालीच्या गोष्टी प्रांतातील जनतेने एकत्र येऊन मत व्यक्त करण्यासारख्या घडल्या होत्या. पण प्रतिपक्षीयांचे मर्म परस्परास माहीत! पुढे होणाऱ्या सामन्याचे स्वप्न टिळकाना आगाऊ पडले असल्यास नवल नाही. म्हणून त्यानी केसरीतून लोकपक्षीयाना आगाऊ सूचना दिली होती. तारीख १ मेच्या अग्रलेखात ते लिहितात " म्युनिसिपालिट्यांच्या नव्या कायद्याचा मसुदा, खोतांचे हक्क कमी करण्याची खटपट, खासगी शाळातील चालकांच्या स्वातंत्र्याला घातलेला आळा, वर्तमानपत्रावर देखरेख करण्याकरिता नेमलेल्या कमिट्या ही सर्व गेल्या तीन चार वर्षांत सरकारी राजकीय धोरणाचे जे उचीचे ग्रह होते त्यांची फले होत. आणि या प्रश्नांचा विचार न झाल्यास प्रांतिक सभेने आपले कर्तव्य बजाविलेसे होणार नाही. आकाशातील ग्रहाप्रमाणे राजकीय अंतरिक्षातील ग्रहांची उच्च नीच दशा होणे ही आमच्या ताब्यातील गोष्ट नव्हे हे आम्ही जाणून आहो. पण याकरिता ज्योतिष शास्त्रातील ग्रहस्थितीचा फलविचार करण्याचे काम ज्याप्रमाणे आम्ही सोडून देत नाही त्याचप्रमाणे या राजकीय ग्रहांचाहि विचार आम्हास केला पाहिजे. गेल्या चार वर्षांत जे ग्रह उच्चीचे होते त्यापैकी पापग्रह कोणते व चांगले कोणते याबद्दल इलाख्याचे मत स्पष्ट आणि निर्भिडपणाने सांगण्याची जर केव्हा वेळ असली तर ती आताच आहे. पापग्रहाना पापग्रह म्हटल्याने ते जास्त क्रुद्ध होतात ही समजूत वेडेपणाची आहे. निवळ राजकीय दृष्टया विचार केला तरी आम्हास ज्या गोष्टी बऱ्या वाईट वाटतात त्याबद्दल बरे वाईट म्हणण्याचा आमचा हक्क आम्ही न बजावला तर आमची राजकीय उन्नति होण्याची आशा कधीहि बाळगावयास नको."

परिषदेला ता. १२ रोजी सुरुवात झाली. प्रतिनिधींची संख्या भरपूर होती. मुंबईहून वाछा सेटलवाड कामा खरे गोखले समर्थ वगैरे मंडळी आली होती.

करण्याच्या हेतूने सरकारने केलेल्या होत्या याबद्दल प्रांतिक सभेस मोठी दिलगिरी वाटत आहे आणि सभेची अशी प्रार्थना आहे की ही राज्यपद्धति बदलून त्या ठिकाणी लोकावर विश्वास ठेवून त्यांच्या हिताकरिता झटण्याची इंग्रजी राज्याची जी उत्कृष्ट पद्धत आहे तिचा पुन्हा लवकरच स्वीकार करण्यात यावा."

या दोन अर्जावर १२४ प्रतिनिधींच्या सह्या होत्या आणि एकंदर प्रतिनिधींची संख्या १७५ ते १८० होती. हे लक्षात घेतले म्हणजे परिषदेतील केवढे प्रचंड बहुमत त्या ठरावाना अनुकूल होते हे दिसून येईल. पण टेबलावर अर्ज पडताच अध्यक्ष गोकुळदास पारेख हे कावरे बावरे होऊन आता अध्यक्षस्थान सोडून जातात की काय असा त्यानी बहाणा केला. सभागृहातील चारहि बाजूनी आरडा ओरड सुरू झाली. मुंबईची मंडळी व त्यांच्या मताचे पुण्यातील काही लोक यानी आपल्या संख्येचे वैगुण्य इतर रीतीनी भरून काढले. संकीर्ण युद्ध सुरू झाले. बसलेल्या दोन दोन चार चार लोकात बाचाबाच व आरडाओरडा सुरू होऊन सभागृहाला मंडईचे किंवा गुजरीचे स्वरूप प्राप्त झाले.

बिचारी सातारकर मंडळी मोठ्या संकटात पडली. कोणतीहि सभा आपल्या गावी बोलावणाऱ्यानी सभेतील कोणत्याही पक्षाला आपले पाठबळ देऊ नये तटस्थ रहावे असा शिष्टाचाराचा सामान्य नियम आहे. स्वागत मंडळापैकी काही दुय्यम प्रतीच्या गृहस्थांच्या सह्या ह्या ठरावाच्या अर्जावर होत्या. तथापि तटस्थपणाची जबाबदारी मुख्यतः साताऱ्च्या पुढाऱ्यावरच होती आणि ती त्यानी फार चांगल्या रीतीने संभाळली. वादग्रस्त प्रश्नासंबंधाने स्वतः त्याना काही मत नव्हते असे नाही. आणि उघड मत देण्याची वेळ येती तर त्यांच्यातहि दुमत झालेले आढळून आले असते. परंतु करंदीकर सहस्रबुद्धे फणसळकर वगैरे गृहस्थानी मनाशी असे ठरविले की कसेहि करून परिषदेचे काम तडीस न्यावे. ती उधळली जाऊ नये. आणि या दृष्टीने त्यानी दोन्ही पक्षाना सामोपचाराच्या गोष्टी सांगितल्या. विरुद्ध बाजूचे पक्षात अर्थात टिळक हेच प्रमुख होते. परंतु हा सर्व प्रकार स्वतः टिळकानी आणि त्यांच्या अनुयायानी खुनशीपणाने चालविला आहे अशी काही लोकानी समजूत करून घेतली असल्याने या चळवळीत स्वतः टिळकानी पुढारीपण घेणे योग्य नव्हते. आणि ते त्यानी घेतलेहि नाही. परंतु खरा प्रश्न तत्वाचा असतो. वरील प्रकारच्या आरोपाच्या झुकांडीने फसून जाण्यासारखे टिळकांचे अनुयायी नसल्यामुळे, त्यानी निरनिराळ्या कँपातून हिंडून वरील ठरावावर प्रतिनिधींच्या सह्या घेण्याचे काम मोठ्या मेहनतीने केले. या कामाला रात्रीचे काही तासच मिळणार होते. कित्येक लोकानी सह्या करण्यापूर्वी अनेक बाजूनी वाद करून बारीक मोठ्या गोष्टींचा अगदी कीस काढला. यामुळे सह्या मिळविणाराना अलोचन जागरण झाले. तरी पण इतक्या सह्या मिळाल्या. सकाळी सात वाजता अध्यक्षाच्या टेबलावर ठराव मांडण्याची जय्यत तयारी झाली. ज्या मंडळींनी अर्जावर सह्या दिल्या त्यातील बहुतेक परिषदेत हजर होते. मते घेण्याची वेळ आली असता काय होणार हे अध्यक्षाना दिसतच होते. म्हणून त्यानी प्रथमपासूनच असा

परिषदेचे अध्यक्ष हे मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या गटातील असल्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ व सहाय्यार्थ सदर असोसिएशनच्या गटातली ही वर नावे लिहिलेली मंडळी हजर असावी हे स्वाभाविकच होते. ना. मेथा यांच्याकरिता बंगला गाडी-घोडा इत्यादि व्यवस्था उत्कृष्ट केली होती. पण त्यांचे येणे झाले नाही. पहिल्या दिवशी स्वागताध्यक्ष विठ्ठलराव पाठक यानी भाषण केले. त्यात दुष्काळाची पीडा व ती निवारण्याचे उपाय या विषयावरच विशेष भर दिला होता. अध्यक्ष गोकुळदास पारेख यानीहि याच विषयावर विशेष भर दिला. कारण तो विषय त्यांचा आवडता होता व त्यासंबंधी त्यानी अलीकडे परिश्रम चालविले होते. या भाषणानंतर विषयनियामक कमिटीच्या नेमणुकीसंबंधी थोडासा लढा पडला. ती कशी तरी निवडल्यावर निर्विवाद अशा विषयावरील ठरावांचे मसुदे पार पडले. पण लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचा विषय निघाला तेव्हा एकदम रण माजले. मुख्य मुंबईकर मंडळींचे मत असे की या परिषदेत लॉर्ड सँढर्स्ट यांचे नावहि बिलकूल काढू नये. या विचारसरणीस शक्य तितका मान देऊन प्रतिपक्षाने एक ठराव सुचविला. त्यात लॉर्ड सँढर्स्ट यांचे नाव अजीबात गाळले होते. पण त्यांच्या कारकीर्दीत घडलेल्या अनेक अप्रिय गोष्टींचा उल्लेख केला होता. याहि ठरावास मुंबईकरानी हरकत घेतली. त्याचे कारण असे की अशा मुग्ध ठरावानेहि म्हणे लॉर्ड सँढर्स्ट यांच्या नावाच्या ध्वनी निघतो! यावर बराच वादविवाद झाला. शेवटी अध्यक्षानी असा धाक घातला की जर हा ठराव परिषदेपुढे आणण्याचे निश्चित झाले तर आपण राजीनामा देऊ. तेव्हा तो ठराव सुचविणाऱ्या गृहस्थाने ठरावापेक्षा अध्यक्षच आपणाला विशेष ग्राह्य असे सांगून ठराव मागे घेऊन वादविवाद संपविला. पण ठराव आणण्याचा अधिकार जो एकाला तोच इतराना. शिवाय अध्यक्षानी आपले अध्यक्षपद पणाला लावणे, हा अधिकाराचा अतिक्रम होय असे पुष्कळाना वाटले. निरनिराळ्या बंगल्यावर प्रतिनिधी उतरले होते तेथे या विषयावर जोराचा वादविवाद सुरू झाला. उलट सुलट प्रयत्न होऊ लागले. सगळ्या रात्रीत कोणालाहि झोप आली नाही. एका बंगल्यावरून दुसऱ्या बंगल्यावर दुसऱ्याहून तिसऱ्यावर अशा पुढारी मंडळींच्या येरझारा सुरू झाल्या.

दुसरे दिवशी सकाळी परिषदेच्या कामाला सुरुवात होताच अध्यक्षांच्या हाती दोन अर्ज देण्यात आले. आणि कामास सुरवात होण्यापूर्वी आधी त्यांचा निकाल करण्यात यावा अशी विनंति करण्यात आली. एक तक्रार अशी होती की विषय नियामक मंडळात अध्यक्षानी सभेला न विचारता आपल्या इच्छेने अनेक नवीन गृहस्थ घातले ती चूक दुरुस्त व्हावी. आणि दुसऱ्या अर्जात अशी विनंति होती की मुंबईसरकारच्या राज्यपद्धतीविषयीच्या काही सूचना करणारा ठराव विषय-नियामक मंडळात पसंत झाला नाही तरी तो स्वतंत्रपणे प्रांतिक परिषदेपुढे मांडण्याचा प्रतिनिधीना हक्क आहे म्हणून तो पुढे मांडण्यास अध्यक्षानी परवानगी द्यावी. या ठरावातील मुख्य भाग असा होता की " गेल्या काही वर्षांत मुंबईसरकारच्या हातून काही गोष्टी घडल्या त्या लोकावर त्यांचा विश्वास नसल्यामुळे त्यांचा पाडाव

करण्याच्या हेतूने सरकारने केलेल्या होत्या याबद्दल प्रांतिक सभेस मोठी दिलगिरी वाटत आहे आणि सभेची अशी प्रार्थना आहे की ही राज्यपद्धति बदलून त्या ठिकाणीं लोकावर विश्वास ठेवून त्यांच्या हिताकरिता झटण्याची इंग्रजी राज्याची जी उत्कृष्ट पद्धत आहे तिचा पुन्हा लवकरच स्वीकार करण्यात यावा. ”

या दोन अर्जावर १२४ प्रतिनिधींच्या सह्या होत्या आणि एकंदर प्रतिनिधींची संख्या १७५ ते १८० होती. हे लक्षात घेतले म्हणजे परिषदेतील केवढे प्रचंड बहुमत त्या ठरावाना अनुकूल होते हे दिसून येईल. पण टेबलावर अर्ज पडताच अध्यक्ष गोकुळदास पारेख हे कावरे बावरे होऊन आता अध्यक्षस्थान सोडून जातात की काय असा त्यानी बहाणा केला. सभागृहातील चारहि बाजूनी आरडा ओरड सुरू झाली. मुंबईची मंडळी व त्यांच्या मताचे पुण्यातील काही लोक यानी आपल्या संख्येचे वैगुण्य इतर रीतीनी भरून काढले. संकीर्ण युद्ध सुरू झाले. बसलेल्या दोन दोन चार चार लोकात बाचाबाच व आरडाओरडा सुरू होऊन सभागृहाला मंडईचे किंवा गुजरीचे स्वरूप प्राप्त झाले.

बिचारी सातारकर मंडळी मोठ्या संकटात पडली. कोणतीहि सभा आपल्या गावी बोलावणाऱ्यानी सभेतील कोणत्याही पक्षाला आपले पाठबळ देऊ नये तटस्थ रहावे असा शिष्टाचाराचा सामान्य नियम आहे. स्वागत मंडळापैकी काही दुय्यम प्रतीच्या गृहस्थांच्या सह्या ह्या ठरावाच्या अर्जावर होत्या. तथापि तटस्थपणाची जबाबदारी मुख्यतः साताऱ्च्या पुढाऱ्यावरच होती आणि ती त्यानी फार चांगल्या रीतीने संभाळली. वादग्रस्त प्रश्नासंबंधाने स्वतः त्याना काही मत नव्हते असे नाही. आणि उघड मत देण्याची वेळ येती तर त्यांच्यातहि दुमत झालेले आढळून आले असते. परंतु करंदीकर सहस्रबुद्धे फणसळकर वगैरे गृहस्थानी मनाशी असे ठरविले की कसेहि करून परिषदेचे काम तडीस न्यावे. ती उधळली जाऊ नये. आणि या दृष्टीने त्यानी दोन्ही पक्षाना सामोपचाराच्या गोष्टी सांगितल्या. विरुद्ध बाजूचे पक्षात अर्थात टिळक हेच प्रमुख होते. परंतु हा सर्व प्रकार स्वतः टिळकानी आणि त्यांच्या अनुयायानी खुनशीपणाने चालविला आहे अशी काही लोकानी समजूत करून घेतली असल्याने या चळवळीत स्वतः टिळकानी पुढारीपण घेणे योग्य नव्हते. आणि ते त्यानी घेतलेहि नाही. परंतु खरा प्रश्न तत्वाचा असतो. वरील प्रकारच्या आरोपाच्या झुकांडीने फसून जाण्यासारखे टिळकांचे अनुयायी नसल्यामुळे, त्यानी निरनिराळ्या कँपातून हिंडून वरील ठरावावर प्रतिनिधींच्या सह्या घेण्याचे काम मोठ्या मेहनतीने केले. या कामाला रात्रीचे काही तासच मिळणारे होते. कित्येक लोकानी सह्या करण्यापूर्वी अनेक बाजूनी वाद करून बारीक मोठ्या गोष्टींचा अगदी कीस काढला. यामुळे सह्या मिळविणाराना अलोचन जागरण झाले. तरी पण इतक्या सह्या मिळाल्या. सकाळी सात वाजता अध्यक्षाच्या टेबलावर ठराव मांडण्याची जय्यत तयारी झाली. ज्या मंडळीनी अर्जावर सह्या दिल्या त्यातील बहुतेक परिषदेत हजर होते. मते घेण्याची वेळ आली असता काय होणार हे अध्यक्षाना दिसतच होते. म्हणून त्यानी प्रथमपासूनच असा

परिषदेचे अध्यक्ष हे मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या गटातील असल्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ व सहाय्यार्थ सदर असोसिएशनच्या गटातली ही वर नावे लिहिलेली मंडळी हजर असावी हे स्वाभाविकच होते. ना. मेथा यांच्याकरिता बंगला गाडी-घोडा इत्यादि व्यवस्था उत्कृष्ट केली होती. पण त्यांचे येणे झाले नाही. पहिल्या दिवशी स्वागताध्यक्ष विठ्ठलराव पाठक यानी भाषण केले. त्यात दुष्काळाची पीडा व ती निवारण्याचे उपाय या विषयावरच विशेष भर दिला होता. अध्यक्ष गोकुळदास पारेख यानीहि याच विषयावर विशेष भर दिला. कारण तो विषय त्यांचा आवडता होता व त्यासंबंधी त्यानी अलीकडे परिश्रम चालविले होते. या भाषणानंतर विषयनियामक कमिटीच्या नेमणुकीसंबंधी थोडासा लढा पडला. ती कशी तरी निवडल्यावर निर्विवाद अशा विषयावरील ठरावांचे मसुदे पार पडले. पण लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकीर्दीचा विषय निघाला तेव्हा एकदम रण माजले. मुख्य मुंबईकर मंडळींचे मत असे की या परिषदेत लॉर्ड सँढर्स्ट यांचे नावहि बिलकूल काढू नये. या विचारसरणीस शक्य तितका मान देऊन प्रतिपक्षाने एक ठराव सुचविला. त्यात लॉर्ड सँढर्स्ट यांचे नाव अजीबात गाळले होते. पण त्यांच्या कारकीर्दीत घडलेल्या अनेक अप्रिय गोष्टींचा उल्लेख केला होता. याहि ठरावास मुंबईकरानी हरकत घेतली. त्याचे कारण असे की अशा मुग्ध ठरावानेहि म्हणे लॉर्ड सँढर्स्ट यांच्या नावाच्या ध्वनी निघतो! यावर बराच वादविवाद झाला. शेवटी अध्यक्षानी असा धाक घातला की जर हा ठराव परिषदेपुढे आणण्याचे निश्चित झाले तर आपण राजीनामा देऊ. तेव्हा तो ठराव सुचविणाऱ्या गृहस्थाने ठरावापेक्षा अध्यक्षच आपणाला विशेष ग्राह्य असे सांगून ठराव मागे घेऊन वादविवाद संपविला. पण ठराव आणण्याचा अधिकार जो एकाला तोच इतराना. शिवाय अध्यक्षानी आपले अध्यक्षपद पणाला लावणे हा अधिकाराचा अतिक्रम होय असे पुष्कळाना वाटले. निरनिराळ्या बंगल्यावर प्रतिनिधी उतरले होते तेथे या विषयावर जोराचा वादविवाद सुरू झाला. उलट सुलट प्रयत्न होऊ लागले. सगळ्या रात्रीत कोणालाहि झोप आली नाही. एका बंगल्यावरून दुसऱ्या बंगल्यावर दुसऱ्याहून तिसऱ्यावर अशा पुढारी मंडळींच्या येरझारा सुरू झाल्या.

दुसरे दिवशी सकाळी परिषदेच्या कामाला सुरुवात होताच अध्यक्षांच्या हाती दोन अर्ज देण्यात आले. आणि कामास सुरवात होण्यापूर्वी आधी त्यांचा निकाल करण्यात यावा अशी विनंति करण्यात आली. एक तक्रार अशी होती की विषय नियामक मंडळात अध्यक्षानी सभेला न विचारता आपल्या इच्छेने अनेक नवीन गृहस्थ घातले ती चूक दुरुस्त व्हावी. आणि दुसऱ्या अर्जात अशी विनंति होती की मुंबईसरकारच्या राज्यपद्धतीविषयीच्या काही सूचना करणारा ठराव विषय-नियामक मंडळात पसंत झाला नाही तरी तो स्वतंत्रपणे प्रांतिक परिषदेपुढे मांडण्याचा प्रतिनिधीना हक्क आहे म्हणून तो पुढे मांडण्यास अध्यक्षानी परवानगी द्यावी. या ठरावातील मुख्य भाग असा होता की "गेल्या काही वर्षात मुंबईसरकारच्या हातून काही गोष्टी घडल्या त्या लोकावर त्यांचा विश्वास नसल्यामुळे त्यांचा पाडाव

करण्याच्या हेतूने सरकारने केलेल्या होत्या याबद्दल प्रांतिक सभेस मोठी दिलगिरी वाटत आहे आणि सभेची अशी प्रार्थना आहे की ही राज्यपद्धति बदलून त्या ठिकाणीं लोकावर विश्वास ठेवून त्यांच्या हिताकरिता झटण्याची इंग्रजी राज्याची जी उत्कृष्ट पद्धत आहे तिचा पुन्हा लवकरच स्वीकार करण्यात यावा. ”

या दोन अर्जावर १२४ प्रतिनिधींच्या सह्या होत्या आणि एकंदर प्रतिनिधींची संख्या १७५ ते १८० होती. हे लक्षात घेतले म्हणजे परिषदेतील केवढे प्रचंड बहुमत त्या ठरावाना अनुकूल होते हे दिसून येईल. पण टेबलावर अर्ज पडताच अध्यक्ष गोकुळदास पारेख हे कावरे बावरे होऊन आता अध्यक्षस्थान सोडून जातात की काय असा त्यानी बहाणा केला. सभागृहातील चारहि बाजूनी आरडा ओरड सुरू झाली. मुंबईची मंडळी व त्यांच्या मताचे पुण्यातील काही लोक यानी आपल्या संख्येचे वैगुण्य इतर रीतीनी भरून काढले. संकीर्ण युद्ध सुरू झाले. बसलेल्या दोन दोन चार चार लोकात बाचाबाच व आरडाओरडा सुरू होऊन सभागृहाला मंडईचे किंवा गुजरीचे स्वरूप प्राप्त झाले.

बिचारी सातारकर मंडळी मोठ्या संकटात पडली. कोणतीहि सभा आपल्या गावी बोलावणाऱ्यानी सभेतील कोणत्याही पक्षाला आपले पाठबळ देऊ नये तटस्थ रहावे असा शिष्टाचाराचा सामान्य नियम आहे. स्वागत मंडळापैकी काही दुय्यम प्रतीच्या गृहस्थांच्या सह्या ह्या ठरावाच्या अर्जावर होत्या. तथापि तटस्थपणाची जबाबदारी मुख्यत: साताऱ्च्या पुढाऱ्यावरच होती आणि ती त्यानी फार चांगल्या रीतीने संभाळली. वादग्रस्त प्रश्नासंबंधाने स्वतः त्याना काही मत नव्हते असे नाही. आणि उघड मत देण्याची वेळ येती तर त्यांच्यातहि दुमत झालेले आढळून आले असते. परंतु करंदीकर सहस्रबुद्धे फणसळकर वगैरे गृहस्थानी मनाशी असे ठरविले की कसेहि करून परिषदेचे काम तडीस न्यावे. ती उधळली जाऊ नये. आणि या दृष्टीने त्यानी दोन्ही पक्षाना सामोपचाराच्या गोष्टी सांगितल्या. विरुद्ध बाजूचे पक्षात अर्थात टिळक हेच प्रमुख होते. परंतु हा सर्व प्रकार स्वतः टिळकानी आणि त्यांच्या अनुयायानी खुनशीपणाने चालविला आहे अशी काही लोकानी समजूत करून घेतली असल्याने या चळवळीत स्वतः टिळकानी पुढारीपण घेणे योग्य नव्हते. आणि ते त्यानी घेतलेहि नाही. परंतु खरा प्रश्न तत्वाचा असतो. वरील प्रकारच्या आरोपाच्या झुकांडीने फसून जाण्यासारखे टिळकांचे अनुयायी नसल्यामुळे, त्यानी निरनिराळ्या कँपातून हिंडून वरील ठरावावर प्रतिनिधींच्या सह्या घेण्याचे काम मोठ्या मेहनतीने केले. या कामाला रात्रीचे काही तासच मिळणार होते. कित्येक लोकानी सह्या करण्यापूर्वी अनेक बाजूनी वाद करून बारीक मोठ्या गोष्टींचा अगदी कीस काढला. यामुळे सह्या मिळविणाराना अलोचन जागरण झाले. तरी पण इतक्या सह्या मिळाल्या. सकाळी सात वाजता अध्यक्षाच्या टेबलावर ठराव मांडण्याची जय्यत तयारी झाली. ज्या मंडळींनी अर्जावर सह्या दिल्या त्यातील बहुतेक परिषदेत हजर होते. मते घेण्याची वेळ आली असता काय होणार हे अध्यक्षाना दिसतच होते. म्हणून त्यानी प्रथमपासूनच असा

आग्रह धरला की ' विषयनियामक मंडळीच्या बैठकीत ज्या ठरावांचा स्वीकार झाला नाही ते मर परिषदेत पुढे आणणे गैरशिस्त होय. म्हणून मी अर्जांना हातहि लावू इच्छित नाही '. पण मर परिषदेत असे ठराव मांडता येतात आणि अर्जांवरील प्रचंड बहुमत लक्षात घेऊन तरी अध्यक्षानी मलताच आग्रह धरू नये असे विरुद्ध पक्षाचे म्हणणे होते. याचा निकाल कसा लावावा ?

गोकुळदास काहनदास पारेख यांची पुणेकराना विशेषतः नव्या पिढीला प्रत्यक्ष माहिती नाही. ते एक जुने हायकोर्ट वकील असून त्यांची वकिली गुजराथे-तून येणाऱ्या कामावर बरीच चाले. त्यांच्या वकीलीचे ज्ञान बरेचसे अनुभवसिद्ध असले तरी त्यांच्या अंगी वक्तृत्व असे मुळींच नव्हते. किंबहुना सामान्य वक्त्या-इतके देखील त्याना बोलता येत नसे. र र ट ट करणे हे वर्णन आपण अति-शयोक्तीचे मानतो. पण गोकुळदास यांच्यामध्ये ही अतिशयोक्ति नव्हती. ते हळु हळु बोलत. फारसे ऐकू न जाईल असे बोलत. बोलताना अडखळत. आवाजहि हलका असे. आणि विशेष हा की बोलण्याला प्रारंभ करताना ते जे एकदा डोळे मिटीत किंवा अर्धे किलकिले करीत ते बोलणे संपेपर्यंत तसेच असत. तात्पर्य त्यांच्या भाषण-प्रसंगी वक्ता व श्रोता हे कधीच समरस होत नसत आणि गोकुळदास यांचे बोलणे ऐकून घ्यावयाचे म्हणजे वक्त्याचा अपमान करावयाचा नाही इतक्याच बुद्धीने ते ऐकून घेत. त्याना प्रांतिक परिषदेचे अध्यक्षस्थान दिले ते खरे वक्तृत्व पाहून दिले नव्हते हे खरे. कारण वक्तृत्वापेक्षा वय अनुभव विद्या कार्याची आवड यानाच अधिक मान कोठेहि दिला पाहिजे. ह्याच दृष्टीने गोकुळदास पारेख ह्यांचा अध्यक्षपणा लोकानी स्वीकारला होता. पण सांगावयाचे एवढेच की गोकुळदास यांचे अंगी काही वक्तृत्व, काही चलाखी, काही कौशल्याची चमक असती तर त्यानी हा वाद इतक्या थराला आणूच दिला नसता.

बरे, ठराव आयत्या वेळी आला असता आणि मुख्य वाद सुरू झाला असता तर गोष्ट वेगळी होती. पण साताऱ्यास पुढे आलेल्या ठरावाच्या हुबेहुब ठराव आधी सहा महिने लखनौ येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेत आला होता. व सर्वांत मौज ही की अध्यक्ष रमेशचंद्र दत्त यानीही जवळजवळ गोकुळदास पारेख यांच्यासारखाच लागा केला होता. दत्त यानी या ठरावास सबब सांगितली ती मात्र काहीशी सयुक्तिक होती. त्यांचे म्हणणे असे की एकादा वादग्रस्त असा बारीक प्रश्न राष्ट्रीय सभेपुढे आणणे बरोबर नव्हे. सँढर्स्ट यांची कारकीर्द एकंदरीने अप्रिय व त्रासदायक झाली असेल. पण सगळ्या हिंदुस्तानातले लोक जेथे येणार त्या ठिकाणी एका प्रांताचा असला प्रश्न काढून अल्पमत बहुमत असे होणे ठीक नाही. त्यामुळे तो ठराव लोकाकडून स्वीकारण्यांत आला नाही.

पण ज्या कारणाकरिता ठराव राष्ट्रीय सभेत येणे अयुक्त त्याच कारणा-करिता तो प्रांतिक परिषदेत येणे युक्त हे ओघानेच ठरते. प्रांताच्या गव्हर्नराची स्तुति करण्याचा अधिकार जसा प्रांताला तसाच त्याचा निषेध करण्याचाहि. तथापि

गैरसमज होऊ नये म्हणून वादग्रस्त असे शब्द मूळ ठराव पुढे आणणारानीच काढून टाकले होते. लॉर्ड सँढर्स्ट यांचेच नाव ठरावात येते तर काही लोकाना अडचण झाली असती म्हणून ते शब्द तर वगळलेच. परंतु वर्तमानपत्रावरील झालेल्या खटल्यांची बाब तशी नव्हती. निदान केसरीवरील झालेल्या खटल्यासंबंधी सर्व हिंदुस्थानात एकमत होते. सर्व हिंदुस्थानाने टिळकांच्या बचावाकरिता जाहीर रीतीने फंड उभारला होता. तरपिण न्यायपीठाने टिळकाना दोषी ठरविल्यावर टिळकाना निर्दोषी म्हणणे शोभत नव्हते असा युक्तिवाद काही लोकानी केल्यावरून सदर ठरावातून केसरीवरील खटल्याचा उल्लेख देखील गाळून टाकण्यांत आला होता. लोकावर विश्वास नसल्यासारखे मुंबई सरकारचे धोरण होते ते योग्य नव्हते व इंग्रजी राज्याची पद्धति सामान्य लोकावर विश्वास टाकून वागण्याची असते तिचाच स्वीकार मुंबई इलाख्यात करण्यात यावा असे म्हणण्यात वावगे काय होते? परंतु लखनौ पासून नेमस्त पक्षाने जी एक मनात अढी धरली होती तिचेच पर्यवसान साताऱ्यास गोकुळदास पारेख यानी केले. पण साताऱ्यास होणाऱ्या गोष्टी उलट सुलट लोकाना माहित होत्या. म्हणून वाद अधिकच रंगला. १८९१ सालच्या परिषदेत असलाच प्रश्न निघून असला अर्ज घेता येतो असा ठरावहि झाला होता. त्याचेच पाठबळ विरुद्ध पक्षाला होते. आणि प्रतिनिधीना सर्वात चीड ही आली की, अध्यक्ष झाले म्हणून त्यानी गैर कायदा वर्तन करावयाचे ते करून वरती परिषद बरखास्त करून राजीनामा देऊन निघून जाईन असा दपटशा का दाखवावा?

टिळकाकडे या सकाळच्या बैठकीत एक ठराव मांडण्याकरिता देण्यात आला होता. तो त्यानी मांडावा म्हणून अध्यक्षानी प्रथम टिळकाना आज्ञा केली. ती मान्य करून टिळक बोलावयास उभे राहिले. अध्यक्षाना अशी आशा होती की टिळकाना तरी बोलू देतील. दंडेली करणार नाहीत. पण टिळकानी बोलणे बहुमताला घातुक होते म्हणून त्यानाच कोणी पुढे बोलू देईनात. शेवटी सभेचे काम अर्धा पाऊण तास मुद्दाम थांबविण्यात आले. हेतु हा की मुद्दाम खाजगी रीतीने बसल्यावर कोणी काही तोड काढील. सभेला खाजगी स्वरूप आल्यावर थोडी शांतता आली. १८९१ सालचा दाखला अध्यक्ष आणि त्यांची स्नेही मंडळी याना प्रत्यक्ष कागदोपत्री दाखविण्यात आला. तथापि अध्यक्ष आपला हेका सोडीनात. शेवटी टिळकानी मध्ये पडून अशी तोड सुचविली की अध्यक्षानी ठराव आणण्यास परवानगी न दिली तरी चालेल. परंतु अर्ज सह्यानिशी समक्ष वाचून दाखवावा आणि तो दप्तरी ठेवण्याची संमति द्यावा. आणि तसे झाले म्हणजे खुद्द ठरावाचा आग्रह कोणी धरू नये व नंतर परिषदेचे काम पुढे चालावे. ही तोड सर्वसंमत ठरली. त्याबरोबर विषय नियामक मंडळाच्या घटनेसंबंधी जो गैरकायदा प्रकार झाला होता तोहि दुरुस्त करून घेण्यात आला. आणि अशा रीतीने हे वादळ जागच्या जागी जिरले.

नऊ वाजता फिरून परिषदेचे काम सुरू झाले. पहिलाच ठराव टिळक यानी मांडावयाचा होता तो त्यानी मांडला. आणि मग अखेरपर्यंत सर्व काम सुव्यवस्थित

व आनंदाने पार पडले. टिळकांच्या खटल्याबद्दल जरी सभेत ठराव नव्हता तरी नातूंच्या कैदेबदल ठराव होताच. आणि त्यावरील भाषणात मुंबई सरकारच्या धोरणाचा निषेध व्हावयाचा तो प्रत्यक्ष झालाच. अशा रीतीने मुंबईकर व पुणेकर यांच्यातील ही चकमक झडली. फेरोजशहा मेथा हे स्वतः हजर असते तर काय प्रकार घडला असता हे सांगता येत नाही. पण मेथा हे गोकुळदास पारेख यांच्या पेक्षा अधिक मानी व रागोट असले तरी त्यांच्यापेक्षा ते अधिक युक्तिवाद करते. ते समयज्ञहि होते. त्यांनी प्रथमच काही शक्कल लढविली असती. वक्तृत्व करून लोकांच्या मनावर परिणाम केला असता. थट्टा केली असती. मस्करी केली असती. डोळे मिचकावले असते. लडिवाळपणाने हट्टी मुलाला वागवितात तसे खुद्द टिळकांना आपल्याजवळ बोलावून घेऊन बसविले असते. आणि त्यांच्याकडूनच त्यांच्या अनुयायांना शांत करविले असते. पण गोकुळदास यांच्यामध्ये वर सांगितल्याप्रमाणे वृद्धपणाच्या गुणाहून दुसरा अधिक काही गुण नसल्याने बखेडा माजला. मेथा यांनी नेहमीप्रमाणे आपल्या प्रभावळीतील मनुष्य परिषदेचा अध्यक्ष होण्यास पाठविला. पण तोहि असा पाठविला की ज्याला लोकांचा अनुनय करण्याची हातोटी बिलकूल नव्हती. टिळक तापट आहेत हे मेथा यांना प्रथमपासूनच माहित होते. आणि या उभयतांच्या चकमकी पूर्वी घडल्याहि होत्या. पण तो प्रसंग व्यक्तिशः होता. साताऱ्यास उडलेल्या चकमकीत स्वतः मेथा हजर नव्हते. तथापि एका बाजूस त्यांचा बहुतेक कंपू व दुसऱ्या बाजूस टिळकांचा कंपू म्हणजे नव्या वाढत्या राष्ट्रीय पक्षाचा कंपू असा सामना होऊन पहिल्या कंपूचा मोड झाला. पण माझ्याकरिता एवढी गोष्ट मान्य करा असे गोकुळदास यांच्या तोंडून वदवून घेतल्यावर नव्याने जुन्याविषयी जी भावना ठेवणे योग्य तीच पुन्हा प्रस्थापित होऊन सभा पार पडली. मात्र साताऱ्याची परिषद हा पुढे येणाऱ्या अशा अनेक प्रसंगाचा केवळ प्रारंभ होता.

## (१२) पंचांगशोधन

ह्या चळवळीला प्रारंभ महाराष्ट्रात कै. केरूनाना छत्रे यांच्यापासून झाला असे म्हणण्यास हरकत नाही. केरूनाना हे गणिताचे प्रोफेसर होते. परंतु ज्योतिर्गणित हा त्यांचा आवडता विषय असून ते वेध घेण्याचे काम थोडथोडे करीत. ग्रहलाघवी पद्धतीने केलेल्या पंचांगाने तिथी वगैरे बरोबर जुळत नाहीत. दृक्प्रत्यय जेथे यण्यासारखे तेथे येत नाहीत. हा दोष काढून टाकण्याकरिता केरूनाना यानी पुण्यातील सरदार पटवर्धन यांच्या साहाय्याने नवीन पंचांग सुरू केले होते. त्याला केरोपंती किंवा पटवर्धनी पंचाग असे म्हणतात. परंतु सत्यापेक्षा परंपरेची आवड आपल्या समाजात अधिक असल्यामुळे ह्या नव्या पंचांगाप्रमाणे फारसे लोक वागत नसत. व जे थोडे वागत त्यांच्यावर विक्षिप्तपणाचा आरोप येई. हा आरोप सौम्य. तथापि अल्पमतवाल्यांना जी अडचण कोठेहि नेहमी भासते ती या पंचांगाच्या अनुयायांना नेहमी भासत असे. जुन्या शास्त्रीलोकांच्या पिढीत सत्याचे अभिमानी लोक थोडे

होते असे नाही. पण ज्योतिर्गणिताचा अभ्यास फार थोड्यांचा. स्वतंत्र वेध घेण्याची पात्रता यांच्यामध्ये नव्हती. आणि इंग्रज वगैरे लोकानी नव्या साधनानी घेतलेले वेध इंग्रजी भाषेत प्रसिद्ध होत असल्यामुळे त्यांचा परिचय याना नव्हता. यामुळे बुद्धिमत्तेचे बळ असताहि इंग्रजी भाषेचे अज्ञान व जुन्या परंपरेविषयी अभिमान या कारणानी पंचांगशोधनाचे काम जुन्या पिढीतील कोणाही शास्त्र्याकडून सुरू झाले नाही. जुन्या पंचांगातील दोष दिवसे दिवस अधिक ढळकपणे उघडकीस येऊ लागले होते. आणि ज्योतिषाचे किंचित् ज्ञान असणाऱ्याला इकडील ज्योतिर्गणितावर बसविलेले आपले तर्कमानहि असंबद्ध व हास्यास्पद वाटू लागले होते. संशोधनाची आवश्यकता दिसू लागली होती. परंतु धीट पुढारी नव्हते.

पंचांगाची सायनपद्धति मानावी किंवा निरयन पद्धति मानावी हा वाद पूर्वी बरेच वर्षे चालू होता. परंतु निरयन पद्धति म्हणजे जुनी ज्योतिर्गणितपरंपरा व फलज्योतिषपरंपरा ही संभाळून त्यातल्यात्यात होईल तितके शोधन करावे असे म्हणणारा एक पक्ष निघाल्याने निरयनवाद्यांतच दोन पक्ष झाले होते. केवळ सायन पद्धतीच पत्करावयाची असती तर वादच नव्हता. कारण या पद्धतीने काढलेल्या वेधावरून केलेले पंचांग कोणालाहि मिळण्यासारखे होते. पण जुनी परंपरा तर होईल तितकी संभाळावयाची आणि नव्या वेधादिकांचा तर फायदा घ्यावयाचा हे मिश्र कार्य थोडेसे भानगडीचे व अवघड होते यांत शंका नाही. ही अडचण देखील दुस्तर नव्हती. कारण जुन्या ग्रहलाघव पद्धतीचा आधार घ्यावा व नव्या वेधांच्या ज्ञानाने युक्त ठरणारा संस्कार देऊन पंचांग बनविण्याकरिता एकादा करणग्रन्थ तयार करावा म्हणजे जुनेहि साधते नवेहि साधते अशी स्थिति येणारी असल्यामुळे, ह्या दुरंगी पंचांगशोधनाचा प्रयत्न करावा असे कित्येकाना वाटत होते.

केरूनानानंतर या कार्यात लक्ष घालणारे जुन्या पद्धतीचे लोक म्हटले म्हणजे शंकर बाळकृष्ण दिक्षीत विनायकशास्त्री खानापूरकर व्यंकटेश बापूजी केतकर वगैरे होत. पैकी दिक्षीत यानी आपला शिक्षकाचा धंदा संभाळून उरलेला वेळ अनेक प्रकारच्या लेखनव्यवसायात व विशेषतः जोतिषाच्या इतिहासाचा ग्रंथ लिहिण्यात घातल्यामुळे त्याना पंचांगशोधनाच्या चळवळीला वेळ मिळाला नाही. केतकर यानी मात्र जन्मभर शिक्षकाचाच धंदा केला. परंतु फावलेला वेळ करणग्रंथ लिहिण्याकडे घालून त्याप्रमाणे पंचांग करण्याची सुरवातहि केली. खानापूरकर शास्त्री हे केरूनाना यांचे शिष्य व टिळकांचे स्नेही. त्यांनी जोतिषविषयक संस्कृत ग्रंथाची काही मराठी भाषांतरे केली होती आणि नव्या पद्धतीने ज्योतिष शिकल्यामुळे पंचांगशोधन हा त्यांच्या आवडीचा विषय होऊन राहिला होता. दिक्षीत खानापूरकर व केतकर हे तिघेहि जुन्या पद्धतीचे भक्त म्हणजे निरयनवादी. आणि नवीन वेधाप्रमाणे संस्कार देऊन पंचांग बनविणे हे तिघानाहि मान्य. परंतु निरयन पद्धति स्वीकारावयाची तर आरंभस्थान कोणते मानावयाचे अयनांश किती घ्यावयाचे याविषयी तिघामध्ये मतभेद होता. स्वतः टिळकांचे मत खानापूरकर शास्त्र्या-

प्रमाणेच केरूनाना यानी ठरविलेले आरंभस्थान व अयनांश घ्यावे असे होते. केतकर व दिक्षीत हे देखील टिळकांचे स्नेहीच होते आणि त्यांचे टिळकाकडे येणे जाणे व विचारविनिमयहि होत असे. यामुळे टिळकांची स्वाभाविक इच्छा अशी की या निरनिराळ्या मतांचा काही युक्तीने मेळ घालून एकमुखी निर्णय करिता आला तर करावा पण कसेहि करून शुद्ध पंचांग सुरू करावे.

सन १९०० साली एप्रील महिन्यात खानापूरकर शास्त्री यानी पंचांगशोधनावर एक निबंध लिहिला. त्याच्या चर्चेकरिता फडतरे यांचे वाड्यात सभा भरली. तीत टिळक व प्रोफेसर जिनसीवाले यांची भाषणे होऊन पंचांगाला चालन देण्याची गोष्ट शास्त्री मंडळीनी कबूल केली. आणि शास्त्रीय पद्धति स्वीकारून एखाद्या नवीन पंचांगाचें प्रवर्तन करावे असा ठरावहि झाला. सभेचा पुरस्कार सरदार तात्यासाहेब खाजगीवाले यानी केला. आणि अध्यक्षस्थानी कृष्णशास्त्री राजवाडे हे बसले होते. अर्थात् पंचांग सुधारण्याला जुन्या मताच्या लोकांचा पाठिंबा होता हे निर्विवाद ठरले. यानंतर ही चर्चा पुण्यास महिना दीड महिना सुरू होती. तारीख २९ मेच्या केसरीत टिळकानी पंचांगशोधन यावर अग्रलेखच लिहिला. यामुळे लोकांचे लक्ष या विषयाकडे आणखी वेधले. त्यात त्यानी या वादाचा जुना इतिहास थोडक्यात दिला. पूर्वी ग्रीक व अरबी ज्योतिषशास्त्राचे ग्रन्थ वराहमिहिरादि प्राचीन ज्योतिष्यांच्या नजरेस पडल्यामुळे त्यांच्या मनावर जो संस्कार झाला तोच गेल्या दोनशे वर्षात तयार झालेले इंग्रजी ज्योतिषग्रन्थ पाहून आमच्या इकडील इंग्रजी जाणणाऱ्या ज्योतिषांच्या मनावर झाला. जुने ज्योतिषी लोक जुन्या सिद्धान्त ग्रन्थांतील माने घेऊन गणिताने पंचांगे बनवीत. या त्यांच्या क्रमात चूक दुरुस्त होण्याला मार्ग नसतो. पण नवे सिद्धान्तज्योतिषी हे ग्रहलाघवादि जुन्या ग्रन्थ तील माने धरून गणिताने काढलेल्या स्थितीशी प्रत्यक्ष वेधाने येणारी ग्रहस्थिती जुळते की नाही आणि न जुळल्यास किती फेरफार करावा याचा विचार करवात. पूर्वी भास्कराचार्य वगैरे ज्योतिषी होऊन गेले. त्यानी देखील जुन्या ग्रन्थांतील ग्रहगतीची माने स्वतः घेतलेल्या वेधाशी जुळवून पाहिलेली होती. 'ब्रह्मदेवाने सांगितलेले ग्रहगणित महान् काळ गेल्यामुळे खिळखिळे झाले ते मी स्पष्ट करून सांगतो' असे ब्रह्मगुप्ताने म्हटले आहे. अशा रीतीने परंपरेचा अभिमान धरणाऱ्या ज्योतिषानाहि दृक्प्रत्ययाने निरुत्तर होऊन जुन्याचा अभिमान सोडावा लागे. भास्कराचार्यांच्या वेळी एक प्रकारचे यवनाचार्य पंचांगसंस्काराला कारणीभूत झाले तसेच हे आधुनिक यवनाचार्य म्हणजे युरोपिअन ज्योतिर्गणिती हे बापूदेवशास्त्री, चिंतामणी रघुनाथाचार्य, केरूनाना, लेले, दिक्षीत, मोडक, खानापूरकर वगैरे आधुनिक ज्योतिषाना पंचांगशोधनाच्या दुसऱ्या आवृत्तीला उपयोगी पडले. पाश्चात्य राष्ट्रातील पंचांग केवळ शुद्ध व्यवहाराकरिता असते. आणि आपल्या इकडील पंचांग धर्ममिश्रित व्यवहाराकरिता असते. यामुळे आमचे इकडे जुनी परंपरा ठेवण्याची विशेष आवश्यकता वाटते. तथापि यंत्रसाहाय्याने घेतलेले वेध कोणासहि अमान्य करून चालत नाही. म्हणून ते मान्य करून त्यांच्या अनुरोधाने संस्कार केलेली पंचांगे

सुरू करण्याच्या इच्छेने केरूनाना बापुदेवशास्त्री वगैरेनी कोष्टके किंवा सारण्या केल्या. पण त्या सोप्या नाहीत. सामान्य गणक किंवा जोशी त्यावरून पंचांग करू शकत नाही. हे पाहून व्यंकटेश बापुजी केतकर यानी ज्योतिर्गणित व केतकी हे दोन ग्रन्थ केले. तथापि हे ग्रन्थ सर्वमान्य होण्याला अयनांशाचा वाद ही एक अडचण आली. व ती काढून टाकण्याच्या हेतूने तारीख १७ जुलैच्या अंकात टिळकानी अशी सूचना केली की पुढील आगस्ट महिन्यात दिल्लीस भारतधर्म महामंडळाची बैठक व्हावयाची आहे तिजमध्ये या प्रश्नाची चर्चा व काही निर्णय झाल्यास सभेचे अध्यक्ष दरभंग्याचे महाराज यांच्या सहाय्याने संस्कारयुक्त नवीन पंचांगाचा प्रसार करणे सुलभ होईल. जुने ठेऊन नवे संपादावयाचे व दोहोचा मेळ घालून तिसरे बनवावयाचे हा जो टिळकांचा नेहमीचा बाणा तोच या पंचांगशोधनाच्या चळवळीत दिसून आला. महाराष्ट्रात लेले मोडक व दिक्षीत यांची सायनवादी पंचांगे काही छापूनहि निघू लागली. पण टिळकाना जुन्या ज्योतिषपरंपरेच्या अभिमानामुळे शुद्ध सायनवाद पटेना. आणि आधुनिक ज्योतिर्वेधाचे सत्य पटल्यामुळे ग्रहलाघवादिकांची जुनी गतिमानेहि पटे-नात. म्हणून सायनपक्ष मोडावा पण त्याबरोबरच अवश्य तितका सर्व संस्कार देऊन दृक् प्रत्ययाशी जुळणारे नवे पंचाग बनवावे ही तडजोड टिळकाना आवडली. व या तडजोडीला प्रथम महाराष्ट्रातील व नंतर निरनिराळ्या प्रांतातील ज्योतिषी येऊन कसे मिळतील याविषयी त्यांचा प्रयत्न सुरू झाला. अयनांशाचा वाद आहे पण तो बहुमताने निर्णयात काढावा आणि ह्याचा वाद झाल्यावर नवा करणग्रंथ बनवून नव्या पंचागाची सुरवात करावी असा टिळकांचा विचार होता.

खानापूरकर शास्त्री हे इंग्रजी शिकलेले नव्हते तरी त्यानाहि इंग्रजी ज्योतिष ग्रंथाचे ज्ञान परंपरेने काही थोडे झाले होते. यामुळे आपले ज्योतिषशास्त्र किती सदोष आहे हे त्याना पटले होते. त्यानी आपल्या निबंधात खालील कबुल्या स्पष्ट दिल्या होत्या. आर्य ज्योतिषामध्ये ग्रहकक्षा वर्तुळात्मक आहेत असे मानतात पण त्या दीर्घ वर्तुळात्मक आहेत असे युरोपिअन ज्योतिषानी सोपपत्तीक ठरविले आहे. त्याचप्रमाणे ग्रहकक्षांचा मध्य पृथ्वी नसून सूर्य आहे. ग्रहांच्या कक्षेचा क्रम पृथ्वी चंद्र बुध असा नसून सूर्य बुध शुक्र पृथ्वी असा आहे. पृथ्वी स्थिर नसून तिला गति आहे. पृथ्वीचा परिघ पाच हजार मैल नसून २४८०० मैल आहे. क्रांतिवृत्त व विषुववृत्त यांचा तिरकसपणा २४ अंश नसून २३½ अंश आहे. चंद्राचे परमलंबन ५२ कला नसून ५७ कला आहे. अयनांश २२ नसून १८ आहेत. संपाताची विलोमगति अनिश्चित नसून निश्चित आहे. स्वतः सूर्य हा निःशर नसून त्यालाहि लहान अल्पसा शर आहे. ग्रह फक्त सात नसून निदान नऊ दहा आहेत. या गोष्टी ज्या जुन्या शिक्षणाच्या खानापूरकर शास्त्र्यानाहि पटल्या त्या इंग्रजी भाषेचे पंडित व स्वतः ज्योतिर्गणिती असलेल्या टिळकाना कशा पटणार नाहीत ! खानापूरकर शास्त्र्यांच्या मते सूर्यगतीचे मान ३६५ दिवस १५ घटका २३ पळे इतके धरले पाहिजे. संक्रांति तीन चार दिवस पुढे आहेत त्या साडे तीन दिवस मागे

ओढल्या पाहिजेत आणि अयनांश १८॥ धरले पाहिजेत. टिळकांचे मत खानापूरकर शास्त्री यांच्या मताशी बहुतेक जुळत होते. पण इतराकडून हे मत कसे मान्य करावयाचे हा प्रश्न मोठा होता. एकांडे शिलेदार पद्धतीने आपल्या शास्त्रशुद्ध मताचा प्रचार टिळकाना वर्तमानपत्रातून करिता आला असता; तरी तो प्रत्यक्ष पंचागातून अवतरल्या शिवाय जनतेच्या गळी उतरणे शक्य नव्हते. आमचा धार्मिक मनुष्य म्हणणार टिळक मोठे असतील पण तिथी माझ्या पंचांगात सांगितली तीच मी पाळणार. हे मर्म लक्षात ठेऊन आपला मोठेपणा व शास्त्रशुद्ध ज्ञानाचा अहंकार क्षणभर बाजूला ठेऊन जुन्या ज्योतिष्याना पावला पावलाने आपणाकडे कसे ओढता येईल, त्याकरिता समेटाची बुद्धि का धरली पाहिजे, आणि सगळा शास्त्रशुद्ध संस्कार एकदम पदरी न पडला तरी तो प्रथम थोडा नंतर पुष्कळ असा पदरात पाडून घेण्याकरिता कोणत्या क्रमाने जावे हा विचार डोळ्यापुढे ठेऊन टिळकानी पंचागशोधनाची चळवळ आजन्म सुरू ठेवली.

## (१४) ज्ञानेश्वराचा वाद

टिळकांचे काही उद्योग केवळ स्नेह्याना साहाय्य करण्याच्या इच्छेने झाले. त्याचे एक उदाहरण म्हटले म्हणजे 'ज्ञानेश्वर एक की दोन' या संबंधी १९०० साली केसरीत प्रसिद्ध झालेली लेखमाला हे होय. ह्या लेखमालेला कै. श्रीपती रघुनाथबुवा भिंगारकर याजकडून तारीख २१ मेच्या अंकात सुरवात झाली व तीच पुढे ३० आक्टोबरच्या अंकापर्यंत सुरू होती. तथापि प्रारंभ भिंगारकरबुवानी केला असला तरी त्याची परिणती व समाप्ती स्वतः टिळकानीच केली. असे होण्याचे कारण भिंगारकरबुवा हे टिळकांचे स्नेही होते एवढेच नसून, स्वतः टिळकांची मते भिंगारकरासारखीच होती. याहिपेक्षा विशेष कारण म्हटले म्हणजे संशोधनाच्या नावाखाली जुन्याचा उच्छेद करण्याची एक वृत्ति काही लोकात दिसून येते तिचे टिळकाना मोठे वैषम्य वाटे. एकाद्या ग्रन्थातील श्लोक लागला नाही किंवा अप्रिय असला किंवा आपल्या एकाद्या अनुमानाला विघातक दिसला तर तो श्लोक प्रक्षिप्त किंवा घुसडून दिलेला म्हणून मोकळे व्हावयाचे असा त्याचा एक प्रकार आहे. तसेच अमुक एक नाव एकाच पुरुषाचे नसून त्या नावाचे दोन किंवा अनेक पुरुष होते असे म्हणावयाचे हा एक दुसरा प्रकार. पैकी भिंगारकरबुवांची लेखमाला या दुसऱ्या प्रकाराच्या एका उदाहरणावरून मूळ सुरू झाली. तिला स्नेहसंबंधामुळे व मतैक्यामुळे केसरीत स्थान मिळाले. पण ती सुरू झाल्यावर टिळकाना असे दिसून आले की भिंगारकरबुवा यांचा सिद्धान्त जरी बरोबर आहे तरी त्यांना लेख लिहिण्याचा अभ्यास नसल्यामुळे कोटिक्रम जितका समर्पक व्हावा तितका होत नाही व पुरावा ज्या वकिली थाटाने मांडला पाहिजे त्या वकिली थाटाने तो मांडला जात नाही यामुळे प्रथम लेख दुरुस्त करून देणे, नंतर त्याला टिपा जोडणे, नंतर अधिक मजकुराची पुरती जोडणे त्यानंतर एकादा भाग स्वतः संबंध निराळाच लिहून देणे, असे होता

होता शेवटी स्वतःच्या माहितीची भर घालून प्रकरणेच्या प्रकरणे टिळकांनी लिहिली. पण मूळ कल्पना व निबंधरचनेचा सांगाडा बुवांचा असल्यामुळे टिळकांचे लेखदान गुप्तच राहिले. शेवटपर्यंत लेख बुवांच्याच नावावर प्रसिद्ध झाले. पुस्तक निघाले तेहि बुवांच्याच नावाने निघाले. आणि असे होणेच योग्य होते. कारण बुवांच्या शिक्षणाच्या मानाने त्यानी बोजा मोठा उचलला होता.

श्रीपतीबुवा भिंगारकर हे वास्तविक मूळ महादेव गोविंद रानडे यांचे आश्रित व ऋणानुबंधी. बुवांचे रानडे यांचे घरी नित्य येणे जाणे व प्रसंगविशेषी जेवण खाण होत असे. भागवतधर्म शब्दाचा अर्थ कोणी कसाहि मानला तरी रानडे हे भक्ति सांप्रदायिक होते. आणि ते जरी स्वतः वाऱ्या करीत नसत तरी एकेश्वरी भजनमालेतलेच काय पण तुकाराम वगैरे मूर्तिपूजक साधूसंताचे प्रेमळ अभंग पहाटे उठून म्हणत व हाती चिपळ्या घेऊन भजनहि करीत असे सांगतात. इकडे भिंगारकरबुवा हेहि वारकरी सांप्रदायातले असून स्वतः मोठे प्रेमळ कीर्तनकार असत. त्यांच्या कीर्तनाला मनुष्य गेला आणि तो प्रसंगोपात नाकडोळे ओले केल्याशिवाय परत आला असे व्हावयाचेच नाही, ते श्रोत्याना करुणरस आळवून रडवावयाचेच असा इतराप्रमाणे प्रस्तुत लेखकाचाहि अनुभव आहे. यामुळे रिकाम्या घटकेला भागवत विषयक चर्चेची सात्विक करमणूक करण्याला रानडे याना पाठिशी पुष्कळ वेळ रिकाम्या असलेल्या भिंगारकरांचा सहजच उपयोग होई. रानडे हे प्रसिद्ध सुधारक असले तरी त्यांच्या घरच्या सुधारणेपेक्षा बाहेरची सुधारकपणाची कीर्तीच अधिक असे. घरी नैवेद्य वैश्वदेव पूजा पोथी व्रतवैकल्य ब्राह्मणभोजन वगैरे गोष्टी घरच्या बायकांच्या आग्रहाच्या सबबीवर चालूच होत्या. ओटीवरच्या झोपाळ्यावर माधवरावजीशी गप्पागोष्टी मारीत असता सुधारणेचा जितका संपर्क भिंगारकराना होईल तितकाच खरा. ओटी ओलांडून ते माजघरात गेले की आक्कांच्या कृपेने सगळे जुन्या परंपरेचे राज्य. असो. भिंगारकर यांचा रानड्यांच्या घरी जाण्यायेण्याचा परिपाठ पूर्वी होता तसाच तो राहून पुढे टिळकांचे घरी जाण्यायेण्याचा त्यांचा परिपाठ पडला. टिळक मनाने सुधारणाप्रिय असले तरी ते सुधारक नव्हते. किंबहुना सुधारणेवर टीका करणारे आणि जुन्या धर्माचे व परंपरेचे अभिमानी होते. शिवाय रानडे हे एक फार मोठे कामगार ही जशी त्यांच्या विद्वत्तेत भर तशीच लोकपक्षाचे पुढारी या कीर्तीची टिळकांच्या विद्वत्तेत भर. म्हणून भिंगारकराना दोघेहि निरनिराळ्या रीतीने आदरणीय वाटत. आणि रानड्यापेक्षा टिळकात बुवासारख्यांच्या दृष्टीने विशेष हा की रानड्याशी बोलताना खेळीमेळी असली तरी अदबीने व थोडेसे दुरून बोलावे लागे. कारण रानडे वयानेहि बुवापेक्षा वडील पण टिळक इतर सर्व बाजूनी समरस होण्यासारखे असून शिवाय एकदा स्नेह जडला म्हणजे टिळक कोणाला दूर ठेवीत नसत तर अगदी बरोबरीच्या नात्याने त्याच्याशी हास्य विनोद व गप्पागोष्टी करीत. रानडे पुण्याहून मुंबईस गेल्यावर भिंगारबुवांचा एक आधार गेला व एक बैठक मोडली. आणि तितक्या मानाने टिळकांच्या घरची त्यांची

बैठक दृढ झाली. टिळकांना थोडी फुरसत नसली तरी बुवांच्या आगमनाने थोडा बहुत अनध्याय व्हावयाचाच. पण फुरसत असल्यावर मग काही विचारावयासच नको. बुवानी आपली पडशीवजा चंची सोडली आणि टिळकानी हाती अडकित्ता घेतला म्हणजे संभाषण प्रकरणाच्या प्रारंभी तो एक नटिसूत्रधाराचा प्रवेशच वाटे. आणि मग गप्पा गोष्टी कोठून सुरू होतील व कोठे संपतील याचा नियम नसे. या संभाषणात टिळकांना बुवाकडून सांप्रदायिक वचने कोट्या खटके ह्यांचे ज्ञान होई. आणि उलट बुवाना टिळकापासून नव्या चिकित्सक बुद्धीची टीका कशी असते हे पहावयास मिळे.

असो. १८९८ च्या डिसेंबर महिन्यात पुण्याच्या सुधारक पत्रात नगर येथील भारदे यानी भारद्वाज या नावाने एक लेखमाला सुरू केली. पहिल्या लेखावर नामदेव व ज्ञानदेव हे समकालीन होते की काय? असे प्रश्नवाक्य असून बाकीच्या लेखावर ज्ञानेश्वरीचा कर्ता आळंदीचा ज्ञानदेव नव्हे असे सिद्धांतिक वचन लिहिले होते. हा सिद्धांत खरा ठरल्यास लोकांच्या फार दिवसाच्या श्रद्धेला विनाकारण धक्का बसणार होता व ही गोष्ट टिळकानाच नव्हे तर रानड्यानाहि अनिष्ट वाटली.

केसरीत भारद्वाजाला कित्येक गृहस्थानी उत्तरे म्हणून दिली. परंतु ज्ञानदेवाच्या कालनिर्णयाचा मुद्दा मुख्य होता. त्यावर कोणी उत्तर दिले नाही. पुढे न्या. रानडे सुटीत पुण्यास आल्या वेळी भिंगारकराच्या भेटीत हा विषय निघाला. व माधवरावजीनीच भिंगारकराना भारद्वाज यास उत्तर देण्याला उद्युक्त केले. त्यानंतर बुवानी पुष्कळ माहिती मिळवून काही प्रकरणे लिहून ती रानडे याजकडे पाहावयास पाठविली. त्यानी ती डॉ. भांडारकर याजकडे पाठविली. नंतर रानडे यांचे समक्ष भिंगारकर व भारद्वाज यांचा एक वेळ वाद झाला. आणि भारद्वाज यांच्या आक्षेपाना भिंगारकर यांचे उत्तर समर्पक असल्याबद्दल रानडे यांची खात्री झाली. भांडारकर यानीहि असाच निर्णय व लेखी अभिप्राय भिंगारकरबुवास दिला. त्यात असे एक वाक्य आहे की "उपपादनाची सरणी प्रायः निर्दोष आहे. परंतु कधी कधी आपल्या पक्षाचे समर्थन करण्याकरता वकिलाची वृत्ती धारण केली आहे." ऐतिहासिक बुद्धीचे रानडे व चिकित्सक बुद्धीचे डॉ. भांडारकर यांचे असे समाधान झाल्यावर केवळ वारकरी सांप्रदायातील पुढाऱ्याना भिंगारकरबुवांच्या कृतीचा मोठा हर्ष व्हावा हे स्वाभाविक आहे. व त्याप्रमाणे बाळकृष्णबुवा अमळनेरकर, भानुदासबुवा, कृष्णाबुवा श्रीगोंदेकर वगैरे लोकानी बुवाना मानपत्रहि दिले. ज्ञानेश्वराची शकले होणार होती ती वाचविली गेली व त्या संतकवीचे अद्वैत प्रस्थापित केले गेले हा योग केवळ प्रतिपक्षाच्या उपकारामुळे आला असला तरी भिंगारकरबुवा यांच्या चरित्रातील तो एक मोठा विजय होय आणि टिळक व बुवा यांच्या स्नेहसूत्राची ती रेशीमगाठच होय.

या विषयावरील लेखमालेचा सारांश द्यावयाचा तरी तो फार होईल. परंतु वादाचा निर्णय थोडक्यात असा आहे की ज्ञानेश्वरीचा ज्ञानदेव व आपेगावचा ज्ञानदेव हे एकच होत. आणि आळंदीत जी आज आहे तीच ज्ञानदेवाची

एकच समाधि होय. तसेच ज्या ज्ञानेश्वराने ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे ग्रन्थ लिहिले त्यानेच अभंग इत्यादि केले. वरील लेखमाला केसरीत छापून होत असता तिने टिळकांचा पुष्कळ वेळ अडविला इतकेच नव्हे तर केसरीची जागाहि कितीतरी अडविली. कित्येक अंकात पुरवण्या घातल्या गेल्या तर कित्येकात जाहिरातीची निम्मी जागाहि तिने अडविली. सदर लेखमालेचा एक स्वतंत्र ग्रन्थच पुढे छापला गेला व तेथपासून आजपर्यंत त्या वादाचा कोठे फारसा पुनरुच्चार झाला नाही. भारदे हे गृहस्थ देखील विद्वान् व अभ्यासी असून त्यांची भाषाविषयकचिकित्सा कित्येक ठिकाणी फार सूक्ष्म आढळते. परंतु ज्ञानेश्वराविषयी त्यानी काढलेला सिद्धान्त खरा आहे असे वाचकांच्या मनास पटत नाही. आळंदी येथे समाधि आहे ती ज्ञानेश्वरी लिहिणाऱ्या ज्ञानदेवाची नाही असे म्हणणे म्हणजे वारकरी पंथाच्या श्रद्धेची आतडी बाहेर काढण्यासारखे आहे. आळंदी क्षेत्राच्या भूमीवर उभे राहून तोंडाने ज्ञानेश्वरीचा पाठ किंवा प्रवचन सुरू असणाऱ्याची जी एकतानता उत्पन्न होते ती भारद्वाजाच्या सिद्धान्ताने एकदम नाहीशी होऊन, गाण्यातील विषम म्हणजे विवादी स्वरोच्चाराप्रमाणे किंवा दगडावर करवत फिरविल्याप्रमाणे त्या सिद्धान्ताचा बेसूर व कर्कश आवाज त्यांचे मनावर उमटणार यात शंका नाही. भारद्वाजाचा सिद्धान्त खरोखरच ऐतिहासिक दृष्ट्या सत्यपूर्ण असता तर वारकऱ्यावर अशी दया कोणी केली नसती. पण रानडे टिळक व भांडारकर या तिघांची एकवाक्यता झाल्यामुळे सत्य व दयाबुद्धि यांचा आपण मेळ घालू शकतो याचे वाचकास समाधानच वाटते. भिंगारकरांच्या लेखमालेतील नक्की कोणता किती भाग टिळकानी लिहिलेला हे आज काढून देणे कठीण आहे. परंतु टिळकाना यातील लेख लिहीत असताना प्रस्तुत चरित्रलेखकाने समक्ष पाहिलेले आहे. आणि निदान ज्ञानेश्वराच्या कालनिर्णयाचा तरी बराचसा भाग टिळकांच्या हातचा असावा असे त्याला स्मरते.

## (१५) शिवजन्मतिथीचा निर्णय

ऐतिहासिक कालनिर्णयाचा दुसरा एक महत्त्वाचा लेख टिळकानी याच साली एप्रिल महिन्यात लिहिला. तो श्रीशिवाजी महाराजांच्या जन्मतिथिसंबंधाचा होता. हा लेख २४ एप्रिल १९०० च्या केसरीत प्रसिद्ध झाला आहे. रायगड शिवस्मारक मंडळाने ठरविल्याप्रमाणे याच सालच्या ३० एप्रिल रोजी शिवाजी महाराजांचा उत्सव रायगडास व्हावयाचा होता. त्या निमित्ताने शिवजन्मतिथीचा वाद टिळकांच्या डोळ्यापुढे होता. शिवाय त्याच सुमारास वि. का. राजवाडे यानी आपल्या इतिहाससाधनाच्या ४ थ्या खंडात आपल्या मताप्रमाणे जन्मतिथीचा निर्णय केला होता. परंतु टिळकाना तो शंकास्पद वाटल्यामुळे अवश्य ती साधने मिळवून व स्वतंत्र संशोधक बुद्धि चालवून टिळकानी वेगळा व स्वतःचा म्हणून एक निर्णय करून या लेखात दिला आहे.

शिवाजीच्या जन्मतिथिसंबंधाने इतका घोटाळा असावा ह्याविषयीं आश्चर्य जमेला धरून त्याचा परिहार त्यानी असा केला की नेपोलिअनचा पराभव करणारा ड्यूक ऑफ वेलिंग्टन याच्याहि जन्मदिवसाचा असाच घोटाळा होता. पण कोणताहि मनुष्य जन्मलेल्या वेळी मोठा नसतो. तो पुढे मोठा होतो. आणि हे योग्यच आहे. पण टिळकानीं निर्णीत केलेली जन्मतिथिहि काही वर्षांनी वादग्रस्त होणार होती! आणि तीहि स्वतः त्यानी संशोधन करून लोकापुढे मांडलेल्या शकावलीमुळेच ! हा योग कौतुककारक आहे ! जेधे शकावली प्रसिद्धीस आणताना तिजमध्ये दिलेले शिवाजीचे जन्मवर्ष व आपण पूर्वी मानलेले जन्मवर्ष ह्यामध्ये तीन वर्षांचा फरक पडतो ही महत्त्वाची गोष्ट पुढे टिळकांच्या नजरेला आली होती. शकावलीचा विशेष अभ्यास करून त्यातील कलमांचा निर्णय करण्याइतकी फुरसत टिळकाना तेव्हा मिळाली नव्हती. तसेच अलीकडे प्रसिद्ध झालेला शिवभारत हा ग्रंथहि टिळकाना उपलब्ध नव्हता. यामुळे आपल्या वेळेपुरता आणि विद्यमान उपलब्ध साधनांच्या आधारे जो अधिकात अधिक निर्णय करता येईल तो करून टिळकाना स्वस्थ बसावे लागले. परंतु चौकस बुद्धिमत्तेच्या दृष्टीने त्यानी त्या वेळीं राजवाड्यावरहि ताण केली ही गोष्ट लोकांच्या नजरेला आल्याशिवाय राहिली नाही.

शिवाजीच्या जन्मतिथीवरील लेखात टिळकानी पूर्वी राजवाडे यानी लिहिलेल्या लेखाची चिकित्सा केली. राजवाड्यानीहि उपलब्ध पुराव्याची छाननी करून शिवाजीचा जन्म शक १५४९ वैशाख शु॥ पंचमी सोमवार रोहिणी नक्षत्र ठरविला होता. पण अनेक बाजूनी विचार करून टिळकानी असे ठरविले की ही तिथि शक १५४९ वैशाख शु॥ १ गुरवार उत्तररात्र अश्विनि नक्षत्र होय. हा निर्णय करताना टिळकानी शिवभूषणकार, निरनिराळ्या बखरी, काव्येतिहाससंग्रहातील जंत्री; शिवदिग्विजय, पुरुषोत्तमकविकृत शिवकाव्य, काव्येतिहाससंग्रह व भारतवर्ष हीं मासिक पुस्तके इत्यादिकामध्ये जन्मतिथिसंबंधाने जे उल्लेख आले होते त्यांची छाननी केली. आणि त्या सर्वांवरून निघणाऱ्या चार तिथीपैकी कोणती खरी हे गणिताने ठरविले. चौदा आधार मांडून त्यात बहुमताने जी तिथी आढळेल तीच खरी असे टिळकानी मानले नाही. ज्योतिर्गणिताच्या पद्धतीने पाहाता बखरीतून दिलेल्या तिथीबरोबर जो इतर तपशील दिला होता त्याचा व तिथीचा मेळ पडत नव्हता. म्हणून प्रथम जन्मवर्ष कायम धरून नंतर अनुक्रमाने वैशाख हा महिना सर्वमान्य म्हणून ग्राह्य धरला. नंतर शुद्ध द्वितीया व पंचमी याचा विचार करिता द्वितीयेला गुरवार येत नाही म्हणून आणि पंचमीला सुर्योदयी मंगळवार येत नाही म्हणून या दोहोपैकी कोणतीहि तिथि घेतली तर गणितदृष्ट्या याला बाध येतो, तिथि आहे तर वार नाही, वार आहे तर नक्षत्र नाही, आणि तिथिवार जुळला तर साल जुळत नाही अशी स्थिति. म्हणून टिळकानी चिटणीसाच्या बखरीपेक्षा शिवदिग्विजय हा अधिक विश्वसनीय ग्रंथ धरला. कारण गद्यात्मक लेख लिहिताना सहज फेरफार होऊ शकतात तसे पद्य लेख उतरताना करिता येत नाहीत. आणि या पद्यग्रंथातील तिन्ही

श्लोकात महिना पक्ष व वार येथपर्यंत एकवाक्यता आढळली ती टिळकानी ग्राह्य धरली. पण 'नक्षत्रेच तिथौ विधौ' या शब्दात विधौ ही विधि या शब्दाची सप्तमि न मानता विधु या शब्दाची सप्तमि मानली असता गणिताने वैशाख शुद्ध पंचमी गुरवार आश्विनी नक्षत्र अशी जन्मतिथी येते. पहिला अर्थ घेतल्याने गणित बरोबर येत नाही दुसरा अर्थ घेतल्याने गणित जुळते. अर्थात् शब्दार्थ व गणित यांचा मेळ ज्या तिथीवर पडतो तीच घेतली पाहिजे असा टिळकानी निर्णय केला.

टिळकानी जन्मतिथीचा निर्णय केला तो राजवाडयासुद्धा बहुतेकाना मान्य झाला. एकाने इंग्रजी तारीख एका दिवसाच्या फरकाने चुकली असा आक्षेप काढला. पण टिळकानी इंग्रजी तारखेचा निर्णय केला नव्हता हिंदु तिथीचा केला होता. शिवाय एक दिवसाचा फरक पडण्याचे कारण जन्मवर्ष सन १७५२ च्या पूर्वीचे म्हणजे इंग्लंडात कालगणनेची जुनी पद्धत बदलून नवी पद्धत सुरू होण्यापूर्वीचे. एका ज्योतिष्याने असा आक्षेप काढला की शिवाजीच्या चरित्रातील गोष्टीवरून पाहता टिळकानी निर्णित केलेली तिथि व जन्मवेळा यांचा मेळ बसत नाही. पण टिळकानी स्पष्टच लिहिले की शिवाजीच्या जन्मतिथीचा निर्णय करावयाचा तर तो फलज्योतिषावरून करणे योग्य नाही. "अमुक एक जन्म लग्न मानले तर फले जमतात म्हणून ते जन्मलग्न खरे या अनुमानाला आम्ही काही मान देत नाही. जन्मतिथीचा निर्णय करावयाचा तो जुन्या कागदपत्रातील माहितीवरूनच केला पाहिजे आणि निरनिराळ्या कागदपत्रातील माहिती जर परस्पर विरुद्ध असेल तर त्यातल्यात्यात सर्वांशी गणिताने खरी ठरेल तीच मानली पाहिजे."

टिळकानी शिवजन्मतिथीचा जो निर्णय केला त्या संबंधाने व्यंकटेश बापूजी केतकर यानी त्याना लिहून कळविले की तुमचा निर्णय बरोबर आहे अशी माझी खात्री झाली. कोणी केशव त्रिंबक पेंडसे यानी शिवाजीच्या पाच कुंडल्या तयार केल्या आणि त्यापैकी मेष लग्न धरून केलेल्या कुंडलीत ग्रहबल विशेष चांगले म्हणून ते लग्न धरावे असे लिहिले. विनायक शास्त्री खानापूरकर यानी जन्म लग्न कुंभ धरावे असे मत दिले. खानापूरकर यांचे म्हणणे की टिळकानी शिवाजीचा जो जन्मकाल ठरविला तो बरोबर होता, पण लग्न कोणते हे ठरविण्यात ऐतिहासिक साधन नाही म्हणून चरित्रातील अनुभवीक गोष्टीवरून कुंभलग्न चूक धरावे लागेल.

## ( १६ ) रायगडावरचा दुसरा उत्सव

टिळकावर खटला होण्याच्या आदल्या वर्षी रायगड येथे पहिला महोत्सव झाला होता. पुढे चार वर्षे हा उत्सव होऊ शकला नाही. दोन वर्षे टिळकांच्या खटल्याच्या भानगडीची गेली. १८९९ सालीच दुसरा मोठा उत्सव व्हावयाचा होता पण काही कारणामुळे तो त्या साली करता आला नाही. म्हणून १९०० साली टिळकानी दुसरा मोठा उत्सव करण्याचे योजिले. त्याप्रमाणे २३ एप्रिल सोमवार चैत्र वद्य ९ शके १८२२ ही तिथी शिवाजी-फंड-कमिटीकडून ठरविण्यात

आली व त्या दिवशी उत्सव झाला. ही तिथि शिवाजीच्या जन्माचीहि नव्हे किंवा राज्यारोहणाचीहि नव्हे. फक्त त्या वर्षापुरती उत्सवाच्या सोयीची म्हणूनच धरली होती. टिळक तुरुंगातून सुटून आलेले. यामुळे उत्सवास यंदा विशेष जोर व रंग आला होता. रायगडच्या आसपासच्या दहा कोसातील अनेक गावच्या मंडळींनी स्वयंसेवक या नात्याने उत्सवाला फारच मदत केली. गावोगावी निमंत्रणपत्रिका पाठविल्या होत्या. उत्सवाच्या आदल्या दिवसापासूनच गडावर लोक जमू लागले होते. खुद्द त्या दिवशी तर मुंग्यांच्या रांगेप्रमाणे माणसाला माणूस खेटून गडावर चढत होते. गड मोठा असला तरी तो गजबजून जाण्याइतकी गर्दी वर झाली होती. पांढरपेशे मंडळी पाचसहाशे पण इतर मंडळीच पुष्कळ होती. शेतकरी मावळे गडकरी हक्कदार यांचा भरणा विशेष होता. टिळक इतर मंडळीसह दोन दिवस आधीच महाडास गेले होते व येता जाता त्यांचा सत्कार महाडकर मंडळींनी चांगला केला. गडावर सकाळी राजवाड्यातील मंडपात विनायकशास्त्री अभ्यंकर यांचे कीर्तन झाले. नंतर आरती व महाड येथील मेळ्यांची पदे झाल्यावर विस्तीर्ण मैदानात भोजनाच्या पंक्ति एकामागून एक उठविण्यात आल्या. गड उंच व अवघड यामुळे वर जिन्नस पात्रस बेताचाच नेता येतो. अर्थात् सारभातातच प्रसाद लोकांना मिळाला. पण सर्व मंडळींनी एका पंक्तीला बसून तोच आनंदाने खाल्ला. महाडच्या स्वयंसेवकांबरोबर पुण्याहून गेलेली मंडळीहि कंबर कसून पंक्ती वाढीत होती व तलावातील पाणी वर चढवीत होती. रात्री पुन्हा राजवाड्यात सर्व मंडळी गोळा झाली. राजवाड्यापासून महादेवाच्या देवळापर्यंत पालखी काढण्यांत आली. बरोबर वाजंत्री भजनी मेळे नळे चंद्रज्योति मशाली यांची गर्दी होती. देवदर्शन घेऊन जवळच असलेल्या समाधीस प्रदक्षिणा करून पालखीची मिरवणूक परत वाड्यांत जाईपर्यंत एक प्रहर लागला. गोंधळ्यांनी तास दोन तास पोवाडे म्हटल्यावर टिळकांनी स्मारकफंडाच्या हिशेबाची सर्व हकीगत सांगितली आणि समाधीच्या दुरुस्तीबद्दल कायमची तजवीज लवकरच करण्यात येईल असे आश्वासन दिले. नंतर आरती प्रसाद होऊन पहाटे दोन अडीच वाजता उत्सव समाप्त झाला. टिळकांनी आपल्या भाषणात उत्सवाच्या हेतूबद्दल विशेष चर्चा केली नाही. ते इतकेच म्हणाले की खटले वगैरे झाल्यानंतरहि इतक्या थाटाने हा उत्सव झाला यावरून त्याविषयी लोकांची भावना काय ती दिसून आली. तसेच सरकाराने प्रतिबंध केला नाही यावरून उत्सवाच्या हेतूविषयी त्यांचाहि गैरसमज दूर झाला असे दिसते. उत्सव करणे हे केव्हाहि कायदेशीर होतेच पण ते आता शिक्क्याच्या मापाने कायदेशीर ठरले असे म्हणण्यास हरकत नाही. सरकारने बंदोबस्त ठेवला पण उत्सवात काय चालत होते हे बारकाईने पाहाण्याकरिता अधिकारी पाठविले होते. डेप्युटी कलेक्टर मामलेदार फौजदार पोलिस इन्स्पेक्टर हे तर हजर होतेच पण महाडचे मुन्सफ व महाडचे इतर काही लोकहि उत्सव पाहण्याला आले होते. कलेक्टर साहेबांनी वीस जवानांची एक हत्यारबंद पोलिस पार्टी गडावर पाठविली

होती. पण ती उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दोन प्रहरी म्हणजे जवळ जवळ गड ओसाड झाल्यावर येऊन पोहचली ! टिळक परत महाडला गेल्यावर जवळच बिरवाडी येथे रात्री त्याना मेजवानीला बोलाविले होते. पण महाडाहून निघण्यालाच मुळी रात्रीचे नऊ दहा वाजले. नंतर गावच्या शिवेपाशी मंडळी जमल्यावर तेथून नळे चंद्रज्योति आपटबार वगैरे लावून मिरवणूक निघाली तिने बराच वेळ घेतला. मंडपात जाऊन मंडळी बसल्यावरहि बराच वेळ इकडे तिकडे गेल्यावर पहाटे तीन वाजता पंगत मेजवानीला बसली. थाटात काहीच कमी नव्हते. रांगोळ्या उदबत्त्या समया वाद्ये ही होतीच. सोवळी पितांबर नेसून पाहुणे जेवीत होते व सोवळी पितांबर नेसून बायका वाढीत होत्या. रात्री आठ वाजता जेवण्याकरिता केलेला स्वयंपाक पहाटे तीन वाजता थंडगार झाला तर त्याला स्वयंपाकी काय करतील ? पण त्या आनंदोत्सवात सगळी रात्र दंगलीची गेली आणि कोणी घड्याळाकडे जसे पाहिले नाही तसेच स्वयंपाक ऊन की थंड याकडेहि कोणाचे लक्ष गेले नाही. पहाटे तीन वाजता साखळीची गंधे लावून पाहुणे मंडळी लाडू झोडीत होती. टिळकांच्या अनेक दौऱ्यामधून अवेळी भोजनप्रसंग बरेच घडले. पण या बिरवाडीच्या मेजवानी इतकी अवेळी घडलेली मेजवानी दुसरी आठवत नाही.

## ( १७ ) टिळक व प्रो. मॅक्समुल्लर

सन १९०० च्या नोहेंबर महिन्यात प्रो. मॅक्समुल्लर हे मृत्यु पावले. त्या प्रसंगाने टिळकानी केसरीत एक अग्रलेख लिहिला. त्यात विद्वान मनुष्य असला तर मग तो विदेशीय असला तरी त्याचे गुण अवश्य घ्यावेत हे टिळकांचे उदार धोरण स्पष्ट दिसून आले. प्रो. मॅक्समुल्लर यानी टिळकांच्या बंधमुक्ततेकरता विलायतेत खटपट केली यामुळे त्यांच्याविषयी टिळकाना कृतज्ञता वाटणे साहजिक होते. पण कृतज्ञतेपेक्षाहि अधिक उदात्त भावना त्यांच्या या लेखात दिसून येते. कारण मॅक्समुल्लर यांच्या बरोबर इतर फ्रेंच व जर्मन पंडितांचीहि त्यानी स्तुति केली आहे. "प्राच्य भाषांचा किंवा धर्मग्रंथाचा सूक्ष्म अभ्यास कोणाला करावयाचा झाल्यास पाश्चात्य विद्वानांचे ग्रंथ वाचल्याशिवाय त्यांच्या अध्ययनाची परिपूर्ती कधीहि व्हावयाची नाही" इतके व्यापक विधान त्यानी केले आहे. त्यातूनहि जर्मन फ्रेंच या भाषातील वाङ्मयाचे भांडार लुटून त्यातील गुप्त धन सुंदर रीतीने इंग्रजी भाषेतून पौर्वात्य देशातील लोकाना उपलब्ध करून दिले हा मॅक्समुल्लर यांचा विशेष उपकार. " आमच्या इकडील एखाद्या विद्वानाला मॅक्समुल्लर यांच्याइतकी सवलत मिळाली असती तरी त्यांच्याइतका एकनिष्ठ व्यासंग करणारा व विद्येची अभिरुचो बाळगणारा मनुष्य आपल्याकडे मिळणार नाही ही दुःखाची गोष्ट होय. सायनाचार्य वगैरेनी जी परंपरा पाडली ती अलीकडे हिंदुस्थानात लुप्त झाली पण युरोपात प्रकट झाली याचे कौतुक केले पाहिजे. परधर्माचा उत्कृष्ट अभ्यास केला तरी मॅक्समुल्लर यानी ख्रिस्ती धर्माचा अभिमान कधी सोडला नाही. तथापि पुराणमतवादी मिशनरी पंडिताची

वाद करून उच्च प्रकारच्या तात्विक टीकेची पद्धति त्यानी अंगिकारली व आपल्या इकडील नव्या विद्वानानीहि त्यांचे हे उदाहरण घेण्याजोगे आहे" इत्यादि विचार टिळकांनी अत्यंत मोकळ्या मनाने प्रगट केले. सरकाराने प्रो. मॅक्समुल्लर याना अनेक पदव्या बहाल केल्या होत्या. परंतु त्या सर्वांपेक्षा प्रोफेसर ही पदवी त्याना आवडत असे आणि आपणहि त्याच पदवीने त्याना संबोधण्यात आनंद मानतो असेहि एक विधान टिळकानी मुद्दाम केले यातील मर्म उघड होते. स्वतः जन्मभर विद्यार्जन करावे आणि आपल्या विद्येचा लाभ देऊन नव्या पिढीला विद्वान बनवावे ही टिळकांची आकांक्षा त्यांच्या कोणत्याहि परिस्थितीतून हळूच वर डोके काढून दर्शन देत असे. आणि स्वतः टिळकानाहि 'नामदार' 'लोकमान्य' अशा पदव्या लाभल्या तरी कोणी प्रोफेसर किंवा पंडित ही पदवी त्याना साभिप्राय किंवा सहेतुक लावली तर त्यांच्या डोळ्यात धन्यतेच्या भावनेचे एक प्रकारचे तेज चमकून जात असे.

## (१८) मोगलाईत सफर

स. १९०० च्या डिसेंबर महिन्यात टिळक लातूरास जाऊन कापूस दाबण्याचा आपला कारखाना पाहून आले. वाटेत बार्शी येथे त्यांचा मोठा सन्मान करण्यात आला. रात्री नाटकगृहात त्याना पानसुपारी झाली. त्या वेळी दारूकाम सोडण्यात आले व चौघडा लावला होता. फौजदार व पोलिसपार्टी हजर होती. रामभाऊ साने वकील हे मूळचे पुण्याचे असून वकिलीकरिता ते बार्शीस जाऊन राहिले आणि लवकरच तेथील पुढारी बनले. राजकारणात ते नेमस्त व जहाल दोघापासूनहि फुटून स्वतंत्रपणे वागत. तथापि टिळकांचा सत्कार करण्याचे काम साने यांच्याकडेच आले. त्यानी आपल्या भाषणात टिळकांच्या अंगचे उपजत गुण कोणते हे सांगून त्यांच्या पूर्वावताराच्या अध्ययनाची स्वतःची माहिती बार्शीकराना दिली. उत्तर देताना टिळकानी इतकेच सांगितले की "१८८० साली आम्ही जे काही केले ते काही अपूर्व असे नव्हते. फार तर मध्यंतरी काही मलीन झालेला मार्ग पुन्हा साफ केला. व्यापारी लोकानी मदत केल्याशिवाय राजकारणाचे पाऊल पुढे पडणार नाही." बार्शीकरानी दुष्काळात २०–२५ हजार रुपये खर्च करून कोष्टी वगैरे लोकांचे जीव बचावले याबद्दल त्याना टिळकानी शाबासकी दिली. बार्शीपासून चाळीस मैलावर लातूरची गिरणी टिळकानी उपजीविकेचे एक साधन म्हणून काढली होती. पण प्रारंभीच तिच्या डोक्यावर कर्जाचा बोजा चढला. यामुळे तिची व्यवस्था एकदा समक्ष जाऊन पाहावी या हेतूने टिळक या वेळी तिकडे गेले व तात्पुरती व्यवस्था करून परत आले. हे कर्ज फिटण्याला पुढे पुष्कळ दिवस लागले व कारखान्यापासून होणारा नफा असा फारच थोडी वर्षे त्यानी उपभोगला. टिळकांची लातूरला ही खेप झाली ती शेवटचीच होती. यापुढे ते तिकडे कधी गेले नाहीत. त्यांच्या मृत्यूनंतर मृत्युपत्राने ही गिरणी त्यांच्या मुलाकडे गेली. पुढे काही दिवसानी ती विकण्यात आली.

## (१९) लाहोरची राष्ट्रीय सभा

सन १९०० सालच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकी पूर्वी काही दिवस विलायतेतील 'इंडिया' नामक पत्रात ह्यूम दादाभाई व वेडर्बर्न या तिघांच्या सहीचा एक खलिता प्रसिद्ध झाला होता. त्यात राष्ट्रीय सभेसंबंधाने पूर्वापार हकीगत व विवेचन केले होते. आणि हा गाडा आजवर आम्ही ओढला आता यापुढे तो नवीन तरुण पिढीने आपल्या हाती घेऊन ओढावा असा प्रेमळ उपदेश केला होता. या खलित्याला 'मुनित्रयांचा खलिता' असे कौतुकाने टिळकानी विशेषण लावले. त्यात कोणत्याहि प्रकारचा कुत्सितपणा नव्हता. पूर्वीच्या पंधरा वर्षांत या तिघानी केलेल्या कामगिरी बद्दल टिळकानी त्याना धन्यवादच दिला. आणि विलायतेत हिंदुस्थानासंबंधाने होणाऱ्या खटपटीविषयी संमति व कृतज्ञताबुद्धि प्रगट केली. उलट आमच्याकडून त्याना जितके मनुष्यबल व द्रव्यबल मिळावयास पाहिजे तितके मिळत नाही अशा स्वकीयानाच टिळकानी दोष दिला आहे.

लाहोर येथील राष्ट्रीय सभेला टिळक हजर राहिले होते व ते सभापीठावर चढल्याबरोबर सर्व लोकानी त्यांचा मोठा सत्कार केला. टिळक हे शिक्षा भोगून आल्यामुळे त्यांच्या विषयीचा आदर कमी झाला नाही इतकेच नव्हे तर दुणावला. मुंबईच्या चँपियन पत्रात एका बातमीदाराने असे लिहिले की "टिळकांसारखी उदाहरणे युरोपातच पहावयास सापडतात. 'आयरिश नेशन' पत्राचे संपादक, डब्लिन शहरचे लॉर्ड मेयर सुलिव्हन, कॉर्क हेरल्ड पत्राचे संपादक एडवर्ड हॅरिंग्टन, एडवर्ड वॉल्श, ओब्रायन, डिलन, जॉन बर्न्स वगैरे लोकावरहि खटले झाले होते. पण त्यामुळे लोकाना ते अधिक प्रियच झाले. लाहोरच्या सभेत टिळकांचा जयजयकार लोकानी केला व त्यांच्या शीलासंबंधाने विशेष आदरबुद्धि दाखविली. लोक त्यांच्या अंगचे गुण चाहतात व त्यांचे हेतु निर्मळ आहेत ही गोष्ट मान्य करितात हे लाहोरच्या राष्ट्रीय सभेने दाखवून दिले. ते कर्तृत्वसंपन्न असून त्यांची इच्छाशक्ति फार जबर आहे. त्यानी आजपर्यंत पुष्कळ कष्ट सोसले आहेत व नुकसान करून घेतले आहे. यामुळे ते आमच्या सहानुभूतीला पात्र आहेत ही भावना लोकानी प्रगट केली."

## (२०) टिळक व विद्याखाते

टिळकांवरील पहिला खटला झाल्या दिवसापासून मुंबई इलाख्यातील सरकारी विद्याखात्याने दडपशाहीचा आपला यथोचित भाग भरपूर उचलला होता. जुने डायरेक्टर चॅटफिल्डसाहेब यांच्या कारकीर्दीत विद्याखात्यात एक प्रकारचे रामराज्य होते. आपली कचेरी बरी की आपली शिकार बरी अशा प्रकारच्या वृत्तीचे ते असून राजकारणात बिलकूल लक्ष घालीत नसत. पण त्यांच्यामागून आलेले डायरेक्टर मिस्टर जाइल्स हे अगदी वेगळ्या प्रकारचे अधिकारी होते. त्यांचा शिक्षणविषयाचा अभ्यास फारच थोडा होता. आणि केवळ क्रमाक्रमाने वरिष्ठ

हुद्यापर्यंत ते चढले होते. डेक्कन कॉलेजमध्ये त्यानी काय प्रकार केले हे पूर्वी सांगितलेच आहे. तसेच एतद्देशीय ग्रन्थावर साहेब मजकुरानी या साली जे समालोचनात्मक रिपोर्ट लिहिला तोहि एकाद्या माथेफिरूसारखा लिहिला. या रिपोर्टात अज्ञान बेपर्वाई उपहास व उपमर्द वगैरे सर्व दोष एकवटलेले आहेत. मुंबईचे मलबारी शेट म्हणजे इंग्रज तेवढा चांगला असे म्हणणारे. पण त्यानीहि या रिपोर्टाचा निषेध केला होता ! इतिहास या विषयाचे प्रोफेसर असता जी तत्त्वे विद्यार्थ्यांना त्यानी शिकविली त्याच्या अगदी उलट प्रकार डायरेक्टर होताच ते करू लागले. कोठल्याहि पुस्तकातून किंचित् स्वतंत्र राष्ट्रीय बुद्धीची टीका दिसताच त्यावर राजद्रोहाच्या कल्पनेने त्यांच्या पेन्सिलीची खूण पडू लागली. टिळकांच्या खटल्यानंतर त्यानी नगरच्या शाळेचे हेडमास्तर माधवराव मोडक आणि फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर भानू यांचेवर शस्त्र धरले. कारण यानी गणपती उत्सवात व शिवाजी उत्सवात व्याख्याने दिली ! हीच शिस्त शाळाखात्यातील सर्व नोकराना लावण्याकरिता त्यानी खात्याचा एक वट हुकूमहि काढला. पण्डिता रमाबाई या काही राजद्रोही खचित नव्हत. पण त्यानी आपल्या एका पुस्तकात अमेरिकन प्रजा व हिंदी प्रजा यांची तुलना केली म्हणून त्यांच्या पुस्तकावर साहेबानी काट मारला. शाळा तपासण्याला हे गेले की त्यांची पहिली चौकशी राजद्रोहासंबंधाने ! पोरकट प्रश्न पोराना विचारून ते अंवान्तर माहिती मिळवीत. त्यानी आपल्या पुस्तकात न्यायमूर्ती रानडे यांच्या पुस्तकावरहि टीका केली आणि 'राजकीय दुरभिमानाने यांची दृष्टि किंचित् मंदावलेली दिसते' असा शेरा मारला. देशाभिमानी लोकांना 'पैशा पासरीचे शिवाजी' किंवा 'पिढीजाद देशाभिमानी' अशी विशेषणे ते लावीत असत.

जाइल्स साहेबांचे राजकीय नाक फार तीक्ष्ण होते. नसेल तेथून त्याना राजद्रोहाचा वास येई. एकदा डोके गरम झाले म्हणजे ते अधिक गरमच होत जावे थंड होऊ नये अशी त्यांची प्रकृति होती. हिंदुस्थानातील राजद्रोहाचे बीज शिक्षणांत आहे आणि शिक्षणखात्याबद्दल तर मी जबाबदार ही गोष्ट लक्षात येताच ते भांबावून गेले. एकदा झोप मोडली की नसत्या पिसा व चिलटे चावतात असाच जाग्रण झालेल्या मनुष्याला भास होतो. किंवा शेपटीला लवंग्या फटाकड्यांची माळ बांधून ती पेटलेल्या श्वानाला काय करावे हे सुचत नाही. चिलटे निवारण्याला थप्पड मारावी ती आपल्याच तोंडात बसते. पिसू धरण्यास जावे तो आपल्याच अंगास चिमटा बसतो. आणि फटाकड्या उडल्याने 'नाश पावू लागलेले जग' कुत्रे धावू लागल्याने अधिकच पेट घेते. तशीच जाईलस साहेबांची स्थिती झाली. पण अरण्यातला दावाग्नी एकटा मनुष्य हातात झाडपाल्याचा खराटा घेऊन किती झोडपून विझविणार ? भरती भरू लागली असता टिटवी आपल्या चोचीने ती किती उपसून टाकणार ? जाईल्स साहेबांचा जळफळाट हसू येण्यासारखा होताच पण आपल्या कर्तृत्वाची त्यांची घमेंड अधिकच हास्यास्पद होती. त्याना वाटले की शाळाखात्याचा एकदा वट हुकूम

काढून शाळा व शिक्षक याना सभाना जाण्याची बंदी केली की हिंदुस्थानातला सगळा राजद्रोह हटला. आणि छापून निघणाऱ्या पुस्तकांवरील सरकारी रिपोर्टात कोणाबद्दल चार वेडीवाकडी वाक्ये लिहिली म्हणजे सगळा वाङ्मयसिंधु हवा तसा शुद्ध होईल. जाइलस साहेबानी काढलेले वट हुकूम हे रिस्ले सरक्युलराचे आद्य पूर्वज होत. आणि रौलट कमिटीने रिपोर्टात जो मान महाराष्ट्रातील लोकाना दिला त्याची पूर्वसूचना जाइलस साहेबानी केली होती. यापूर्वी असले वट हुकूम बहुधा इतर कोणत्याहि प्रांतात निघाले नसतील अशी आमची समजूत आहे. खुद्द पायोनिअर पत्राने जाइल्स साहेबाना आपल्या कामाला नालायख ठरविले. आणि मुंबई पुण्याच्या निरनिराळ्या वर्गाच्या पुढाऱ्यानी जाइलस साहेबाना सरकारने रजेवर पाठवावे म्हणजे त्यांची प्रकृति सुधारेल असे एकमताने सुचविले. जाइल्स साहेबांच्या वट हुकुमानी थोडा बखेडा केला व भित्र्या लोकांच्या मनात भीति उत्पन्न केली यात शंका नाही. निमसरकारी शाळेचे हेडमास्तर मोडक याना काढून टाकण्याला जर जाइल्स साहेबानी भाग पाडले आणि स्वतंत्र म्हणविणाऱ्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीसारख्या संस्थेकडून प्रो. भानूसारख्याना रजा घेण्यास लावविले तर खुद्द सरकारी खात्यातील शिक्षक व विद्यार्थी यांची वाट काय होणार हे दिसतच होते. पण आगीवर थोडीशी माती पडल्याने ती फार तर तितकीच दबते पण पुरी विझली जात नाही ही गोष्ट पुढे लवकरच स्वदेशी चळवळीत प्रत्ययास आली.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी जाइल्स साहेबाशी झगडावी तितकी झगडली नाही याबद्दल टिळकानी सोसायटीला दोष दिला. १८८०साली सोसायटीची स्थापना कोणत्या हेतूने झाली त्याचा उल्लेख त्यानी केसरीत केला. आणि वामन शिवराम आपटे यानी १८८२ साली एज्युकेशन कमिशनपुढे सोसायटीतर्फे साक्ष दिली तीत जे धोरण प्रकट केले व जे कमिशनलाहि मान्य झाले ते स्वतः सोसायटीने संभाळले नाही असा टिळकानी ठपका दिला. 'वादळात आपले शीड गुंडाळून डोलकाठी कापून टाकावी आणि गलबत खडकावर कोठे आदळते की काय या भीतीने शत्रूच्या बंदरात शिरून त्यास शरण जाऊन थारा घेऊन रहावे अशा प्रकारचे सोसायटीचे धोरण होते' आणि या बाबतीत तिने मद्रास वगैरे खासगी शिक्षणसंस्थाना वाईट उदाहरण घालून दिले. सरकारला सोसायटीने लिहून दिलेल्या शर्ती लाजीरवाण्या होत्या. त्यात मुख्य ही की संस्थेची कार्यकारी मंडळी जी चळवळ वाईट म्हणून ठरवील ( आणि सरकार जिला वाईट म्हणणार तिला कार्यकारी मंडळीहि वाईट म्हणणार) त्यात लाईफ मेंबरने देखील भाग घेऊ नये, आणि संस्थेबाहेरहि लाईफ मेंबर जे काय करील त्याबद्दल स्वतः लाईफ मेंबरच नव्हे तर एकंदर संस्थाहि शिक्षेला पात्र होईल या शर्ती फारच घातुक होत्या. आणि या अर्थाने सरकारी नोकराला जी स्वतंत्रता होती तीहि सोसायटीच्या लोकाना राहिली नाही. लाईफ मेंबरपैकी तीन व बाहेरील पाच मिळून आठ लोकांचे नियामकमंडळ होणार, आणि सोसायटीचे लोक या मंडळाचे दास व कबूल केलेल्या शर्तीप्रमाणे मंडळ हे सर-

कारचे दास या परंपरेने सोसायटीतील शिक्षक व विद्यार्थी हे सरकारचे दासानुदास ठरणार. तरुण मुलाना राजकीय चळवळीत गोवू नये हे तत्त्व एकपक्षी खरे आहे हे टिळकानीहि मान्य केले. पण खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनीच काय शिक्षकानी- हि राजकीय चळवळींची ओळख ठेवता कामा नये, आणि लाईफ मेंबरसारख्या प्रतिष्ठित शिक्षकानीहि राजकीय चळवळीकडे पाहू नये असे सरकारचे धोरण उघड होते. अर्थात् आपल्या सत्तेचा दुरुपयोग केला म्हणून सरकारच्या गुन्हेगारीची पहिली प्रत हे खरे. पण भलत्या शर्ती सोसायटीने मान्य केल्या ही दुसरी प्रत असली तरी गुन्हेगारीच होय असा दोष टिळकानी दिला.

## (२१) प्लेग व दुष्काळची व्यवस्था

स. १८९६ साली प्लेग व दुष्काळ यांची जोडी महाराष्ट्रात जी एकदा शिरली तिने पुढे पुष्कळ दिवस धुमाकूळ घातला. प्लेगने लोकाना किती छळले व या छळापेक्षाहि प्लेगच्या अधिकाऱ्यांचा छळच अधिक दुःसह कसा झाला याचे वर्णन या ग्रंथाच्या पूर्वार्धात आणि उत्तरार्धाच्या चालू भागात थोडेसे आले आहे. तसेच रँड साहेबाच्या खुनामुळे म्हणा, प्लेगच्या दुर्दमतेमुळे म्हणा, प्लेगव्यवस्थेच्या व्यापामुळे म्हणा, किंवा या व्यवस्थेच्या खर्चामुळे म्हणा, उद्योगवादी सरकारहि लवकरच जेरीस आले. आणि कालांतराने प्लेगव्यवस्था ढिली झाली इतकेच नव्हे तर जाम्या- वर काही शिल्लक उरली नाही याचेहि दिग्दर्शन पूर्वी केले आहे. सरकारच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ज्यांच्यावर जुलूम करावयाचा त्यांच्याच पासून त्या जुलुमाचा खर्चहि घ्यावयाचा असा दुहेरी अन्याय या प्रकरणी प्रथम घडला होता. प्लेगची व्यवस्था एकतंत्री करून सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती देण्यात आली व या व्यवस्थेचा खर्च स्वतः सरकारने निम्मा सोसला. तरी उरलेल्या निम्याचेहि ओझे स्थानिक स्वराज्य- संस्थाना इतके जड झाले की त्यासांली त्या नामशेष किंवा कायमच्या कर्जबाजारी होण्याची वेळ आली. गांवगन्ना कर वाढविण्याविषयी म्युनिसिपालिट्यांच्या मागे सरकारचा तगादा सुरू झाला. व पुण्यासारख्या म्युनिसिपालटीला तर सर- काराशी या बाबतीत पुढे अनेक वर्षे झगडत रहावे लागले. या कामी खरा वाद सुरू होता तो हिंदुस्थान सरकारशी मात्र होता व मुंबई सरकारची स्थानिक संस्थाना सहानुभूति होती. मुंबई सरकाराला ही गोष्ट पटण्याचे खरे कारण असे की मोठ्या खर्चाच्या या जुलमी प्लेगव्यवस्थेचे धोरण केवळ परराष्ट्रांच्या दपटशाहीमुळे विलायत सरकाराकडून हिंदुस्थान सरकारावर लादण्यात आले होते व त्याने तो पेंड प्रांतिक सरकाराच्या मार्फत खाली पोचविला होता. म्हणून या न्यायाची हाकाटी करीत करीत झगडत झगडत न्याय मिळविण्याला म्युनिसिपालिट्या वगैरेना पुढे पुष्कळच वर्षे लागली.

पण प्लेगच्या बाबतीत सरकारचे जे धोरण त्याच्या अगदी उलट धोरण त्याने दुष्काळच्या बाबतीत स्वीकारले होते. म्हणजे प्लेगच्या व्यवस्थेत जे करू नये ते करावे

असे धोरण तर दुष्काळव्यवस्थेत जे त्यानी करावे ते करू नये असे धोरण. दुष्काळ पडला की तो जाणवू लागतो. म्हणून लोक प्रथम हाकाटी करू लागतात. पण एकाद्या गावी प्लेग झालेला नसता प्लेग झाला म्हणून जाहीर करण्यात जशी अधिकारी तत्परता दाखवितात तर दुष्काळ पडला असे लोक ओरडत असता तो अजून पडला नाही असा सरकारचा बहाणा सुरू असतो आणि तो पडला असे त्याना जर जाहीर करावेच लागले तरी ती गोष्ट ते फार दिरंगाईने करतात. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर माणसे उपाशी मरतात की नाही याचा वाद सुरू होतो. लोकानी म्हणावे माणसे मरतात व सरकारने म्हणावे माणसे मरत नाहीत. आणि माणसे मेली असे कबूल करावे लागले तर ती दुष्काळाने मेली नाहीत अशी तक्रार सरकारची सुरू असावयाची. कारण दुष्काळ हे मूळ कारण असले तरी प्रत्यक्ष उपासमारीने मनुष्य मेला असे सिद्ध होणे कठीण असते. सहजच उपासमारी-मुळे मनुष्य काहीतरी कदान्न खातो आणि त्यामुळे त्याला महामारी वाखा असला काही रोग होतो. यामुळे मरणाची अंतिम जबाबदारी दुष्काळावरून काढून इतर साथीवर सरकाराला घालता येते. दुष्काळातील मृत्युसंख्येचा खुलासा करिता करिता अधिकाऱ्यानी सर्व रोगांची यादी पाठ केली, व शेवटी मनुष्य 'मृत्यु आल्यामुळे मेला' येवढेच कारण सरकारी कागदोपत्री लिहिण्याचे राहिले! दुष्काळाची पीडा न बाधण्याला दुष्काळी कामे काढणे हा एक मुख्य उपाय त्या काळी सरकारानेहि मान्य केला होता. पण कामे निघत ती फार दूरदूर ठिकाणी. संख्येने थोडी. शिवाय काम श्रमाचे आणि मजुरी अल्प असा प्रकार असे. तुरुंगातील गुन्हेगारांची व्यवस्था दुष्काळी रिलीफ कँपापेक्षा अधिक चांगली असते असे प्रत्ययास आले. आणि उपासमारीने मरण्यापेक्षाच काय पण दुष्काळी कामावर जाऊन श्रम करून मरण्यापेक्षा काही गुन्हा करून तुरुंगात गेलेले बरे असे लोकाना वाटू लागले. १८९७ साली दुष्काळ कमिशन सरकाराने नेमले. सर्व प्रांतात याविषयी चळवळ झाली होती. पण त्यातून महाराष्ट्रात ती टिळकानी किती कसून केली होती याचे वर्णन पूर्वीच्या खंडात आलेच आहे. इतर पुढाऱ्या-प्रमाणे टिळकांची ही चळवळ दुष्काळी कमिशन नेमण्याला उपयोगी पडली होती. या कमिशनाने १८९८ ज्या ऑक्टोबरमध्ये आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला व त्यात मुंबई इलाख्यांतील दुष्काळव्यवस्थेचे पूर्ण परीक्षण करून गुणदोष दाखविले होते. या रिपोर्टात सरकारपेक्षा लोकपक्षाचेच समर्थन अधिक झाले होते. पण हा रिपोर्ट हाती असताहि १८९९ व १९०० च्या दुष्काळात मुंबई सरकारने आपले कर्तव्य केले नाही. १८७६ चा दुष्काळ अधिक मोठा आणि सारातहकुबी व सूट यांची रकम अधिक असताहि सरकारने त्या वेळी ती दिली. पण पुढील प्रत्येक दुष्काळात त्यानी हात आखडता घेतला आणि दुष्काळी कामे काढण्यातहि अशीच कुचराई होऊ लागली. म्हणून टिळकानी केसरीतून अशी मागणी केली की १८९६ साली झालेली चूक तरी सरकारने या दुसऱ्या दुष्काळात सुधारावी. फॅमिन कोडात, म्हणजे सरकारने स्वतःला शिस्त लावून घेण्याकरिता केलेल्या नियमात, असा स्पष्ट नियम

होता की सान्याकरिता कर्ज काढण्याची पाळी दुष्काळात कोणावर येऊ नये. तसेच दुष्काळी कामावर मजुराने काम न केल्यासबद्दल त्याला दंड करावयाचा तोहि काहीं एका मर्यादेपलीकडे जाऊ नये. पण हे दोन्हीहि नियम सरकारने धाब्यावर बसविले. कोठे कोठे तर दुष्काळपीडानिवारणाची जबाबदारी स्वतःवरून काढून म्युनिसिपालिट्यादिकावरहि टाकण्याचा मुंबई सरकारचा घाट होता. आणि १९०१ साली उपस्थित केलेल्या म्युनिसिपल कायद्याच्या सुधारणेच्या बिलात तसे एक कलमहि हळूच घालून देण्यात आले होते. या सर्वांवर टिळकानी केसरीतून अनेक लेख लिहून टीका केली. १८९६ सालच्या दुष्काळात जितके लोक दुष्काळी कामावर गेले त्यांच्या तिप्पट लोक १८९९–१९०० च्या दुष्काळात कामावर गेले. याचा अर्थ सरकाराने कामे अधिक काढून अधिक उदारपणा दाखविला असा नसून, त्या सालापेक्षा या सालात दुष्काळच अधिक भयंकर पडला आणि तग धरून राहण्याची लोकांची पात्रता त्याप्रमाणाने कमी झाली असाच त्याचा अर्थ होता. आज महायुद्धाने जे अनेक चमत्कार केले त्यात एक असा केला की देशात कामगिऱ्या पुष्कळ वाढून गरीब लोकाना काम करून पोट भरण्याच्या सोई पुष्कळ अधिक वाढल्या. आणि वास्तविक दुष्काळच्या दिवसाइतके धान्याचे दर कायमचे महाग झाले असताहि दुष्काळ आहे असे ह्मणण्यांत स्वारस्यच उरले नाही. कारण नेहमी सुबत्ता असून एखादे वर्षी धान्य महाग झाले तर तो दुष्काळ हे, म्हणणे ठीक होते. पण नेहेमीच दुष्काळी दर कायम झाले तर दुष्काळ कशाला ह्मणावयाचा ? सदा मरे त्याला कोण रडे ? जेथे खरा भेद असेल तेथें निराळा शब्द घालावयाचा. पण गाढवाला गाढव ह्मणण्यात जशी शिवी नाही तसेच हल्ली दुष्काळाला दुष्काळ म्हणण्यात काही निंदा उरलेली नाही. मात्र मौज ही की असा कायमचा दुष्काळ पडल्याने खालच्या लोकांची स्थिती फारशी न सुधारता मध्यम वर्गाची जी सुस्थिती होती ती जाऊन तेहि मजुरांच्या जोडीला येऊन मिळाले. मात्र अनेक प्रकारच्या खासगी कामगिऱ्या निर्माण झाल्याने दुष्काळी कामे काढण्याची सरकारी जबाबदारी हल्ली आयतीच उडून गेलेली आहे. पण २५ वर्षांपूर्वी दुष्काळ नैमित्तिक होते. खासगी कामगिऱ्या इतक्या वाढल्या नव्हत्या. एकदम धारण महाग झाल्याने अंतर पडे ते लोकाना जाणवे. म्हणून सरकारच्या दुष्काळी व्यवस्थेकडे लोकांचे अधिक बारकाईने लक्ष जाई. याच कारणाकरिता टिळकानी त्या वेळी केसरीत या विषयावर विशेष भर दिला होता.

# परिशिष्ट

## [ १८९८ ते १९०० मधील निवडक पत्रे ]

### ( १ ) विजापूरकरांचे केळकराना पत्र

कोल्हापूर ७ सप्टेंबर १८९८

टिळक सुटल्याची बातमी येथे आली तेव्हा लोकाना किती आनंद झाला याची कल्पनाच तुम्हाला केली पाहिजे. प्रत्येकाच्या तोंडावर काय ती प्रफुल्लता! आमचे प्रि. कँडीसुद्धा खुष झाले व सर्व मंडळी त्यांच्या भोवती जमून मोठया आनंदाची संभाषणे झाली. तुमचे सावधगिरीचे पत्र पूर्वी आले होते. तरी चवकशी केल्यावाचून राहवेना. असो. आता टिळकाना ताबडतोब पुनः कायदेकौन्सिलात पाठविले पाहिजे. थोडासा तो मनचा मांडा असा वाटतो. पण फिरून युनिव्हरसिटीच्या सेनेटमध्ये तरी फेलो म्हणून आम्ही त्यांची निवडणूक का करू नये? अलबत करावी.

### ( २ ) विलगिरी अयंगार यांचे केळकराना पत्र

मद्रास १२ जानेवारी १८९९

तुमचे पत्र पावले. फार आभारी आहे. माझा अनुभव असा आहे की आपण नीट चोहीकडे पाहिले तर उदार मनाचे स्त्रीपुरुष आपल्या नजरेला येतात. फक्त आपण त्या दृष्टीने पाहिले पाहिजे. टिळक प्रभृती तुम्ही पुण्याचे लोक येथे आलात त्याना पाहून माझ्या मनावर त्यांच्या स्वार्थत्यागाचा फारच चांगला ठसा उमटला. त्यांचे उदाहरण जन्मभर डोळ्यापुढे ठेवीन म्हणतो.

### ( ३ ) दादासाहेब करंदीकर यांचे केळकराना पत्र

सातारा ८ आक्टोबर १८९९

तुमचे ता. ३ चे पत्र पावले. बाब जराशी नाजूक आहे. आणि स्पष्ट बोलल्याने गैरसमज व्हावयाचा. तथापि तसा तो तुम्ही करणार नाही असे समजून आमचे कर्तव्य करतो. कौन्सिल निवडणुकीला उभे राहण्याचे टिळकानी निश्चित ठरविले आहेच असे काही तुम्ही लिहिले नाही. त्यांच्या पुष्कळ स्नेही मंडळीच्या मनात असे असावेसे दिसते की, शिक्षेमुळे टिळकांचे लोकामधील वजन कमी झालेले नाही व राष्ट्रीय कार्याच्या दृष्टीने टिळकांची निवडणूक हे सरकारला एक प्रकारचे आव्हानच आहे. म्हणूनच ते टिळकाना उभे राहा म्हणत असतील. पण आम्हाला मात्र तसे

वाटत नाही. उलट टिळक उशिरा पुढे आल्याने,आणि ते उभे राहत नाहीत अशा समजूतीवर गोखल्याना ज्यानी पूर्वीच आश्वासने देऊन ठेविली त्यांची स्थिति अवघड केल्याने, टिळक निवडून न येता त्यांच्या यशाला व्यर्थ धक्का मात्र बसावयाचा. तरी इतक्या उशिरा तुम्ही उभे राहू नये असे टिळकाना आमच्या तर्फे तुम्ही कळवावे. राहतील तर निवडणुकीला एकटे टिळकच उभे राहावे म्हणजे निवडणूक नामंजूर करण्याला सरकारला जागाच राहू नये अशी आमची कल्पना. पण दोघे उभे राहिल्याने ती गोष्ट साधत नाही. सरकारी अधिकारी गोखल्यांच्या बाजूने खूप खटपट करणार. लोकानीहि टिळकाना तितकीच जोराची मदत दिली असती. पण ते उशीरा पुढे आले. येथे विठ्ठलराव पाठक हे गोखल्यांच्या करिता खटपट करीत आहेत. ते आम्हाला म्हणतात ‘ माफीशिवाय गोखल्यांच्या मार्गात दुसरी काही तरी अडचण होती काय ? ’ विठ्ठलरावानाहि आम्ही उलट शह दिला असता. पण टिळक उशीरा पुढे आल्याने आमच्यात दुमत झाले आहे. काहीना वाटते की लोकांचा आपणावर अशा रीतीने विश्वास आहे असे दाखविण्याची टिळकाना मुळीच जरूरी नाही. हे वाचून तुम्हाला कदाचित असे वाटेल की टिळकाना मागे घेण्याला सांगून गोखल्यांची निवडणूक बिनधोक करण्याचा आम्ही हा प्रयत्न करीत आहो. पण आम्हाला योग्य वाटते तेच लिहित आहो. त्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका.”

### (४) कॅ. बॅनरमन यांचे केळकराना पत्र

मुंबई ९ आगस्ट १८९९

तुम्ही मुंबईस आला आहात असे कळते. परेळ प्लेग लॅबोरेटरीचा समारंभ उद्या होणार आहे. तरी तुम्ही समारंभाला आल्यास मला फार बरे वाटेल.

### (५) टिळकांचे केळकराना पत्र

कलकत्ता १४ फेब्रुवारी १९००

परवा रंगूनहून येथे परत आलो. ब्रम्हदेशाची स्थिति मोठी बोधप्रद आहे. समक्ष भेटीत कशी ती सांगेन. मेथा व सर भालचंद्र यांच्या वरची तुमची टीका असावी तितकी समर्पक व कडक नाही. सर भालचंद्र हे अखिल ब्राह्मण वर्गाचे पुढारी म्हणून स्मारक चळवळीत समाविष्ट झालेले दिसतात. जोशी व रानडे हेहि कसे सामील झाले याचे आश्चर्य वाटते! तेन्हा या सर्वांचे हे वर्तन नीट चव्हाट्यावर आणलेच पाहिजे. मी आणखी पंधरा दिवस उत्तर हिंदुस्थानात हिंडणार आहे. प्रवासाने प्रकृतीला बरे वाटले. मी मार्चात परत येईन. प्रांतिक परिषद इतक्यांत भरत नाही हे आता ठरलेच म्हणावयाचे ना ?

( ६ ) पारसनीस यांचे केळकराना पत्र

सातारा २१ फेब्रुवारी १९००

टिळक हे सध्या कोठे आहेत हे मला माहीत नाही. ते पुण्यास असते व त्यांच्या पुढे नाना फडणवीसांच्या उत्सवाची योजना मी ठेविली असती तर ती त्याना पूर्ण पसंत होऊन तिला आपली मान्यता त्यानी दिली असती. तरी केसरीच्या चालकाकडे माझी योजना कळवावी.

( ७ ) हरी सिताराम दिक्षित यांचे विलायतच्या सॉलिसिटराना पत्र

मुंबई ९ मार्च १९००

तुम्ही 'टिळक विरुद्ध ग्लोब वर्तमानपत्र' या कज्ज्याचे काम केवळ धंद्याच्या रीतीने चालविणार नाही असे आश्वासन लिहिले ते वाचून बरे वाटले. मी देखील या प्रकरणी धंद्याच्या दृष्टीने पाहत नाही. ग्लोब पत्र माफी मागण्यास तयार नसून त्याने आपले सॉलिसिटर नेमले आहेत. टिळकांकरिता ॲस्किथ याना बॅरिस्टर देण्यात आले आहे असे समजले. इकडील खटल्याचे सर्व कागद पत्र मी तुम्हाला पुढच्या आठवड्यात धाडतो. व तेथील खर्चाचा जामीन देण्याकरिता १५० पौंड पाठवितो. खटला चालविण्याकरिता तो चालेल त्या वेळी स्वतः विलायतेला जाण्याचा टिळकांचा विचार आहे. नुकसानी मागावयाची ती अर्थात विशेष मागण्याचे कारण नाही. कारण टिळकांचे प्रत्यक्ष सांपत्तिक नुकसान असे फारसे झालेले नाही. तसेच टिळकांच्या या फिर्यादीकरिता खर्चाची तजवीज पूर्वीच्याच टिळक डिफेन्स फंडातून झाली आहे आणि त्या खटल्याचेच हे एक शेपूट असे मानण्यात आले आहे. त्याप्रमाणे डिफेन्स फंडाचे चिटणीस डॉ. नानासाहेब देशमुख यानी सर्क्युलर काढून खर्चाची मंजूरी मागितली व मुंबई व कलकत्ता येथील सभासदानी ती संमति दिली आहे.

( ८ ) टिळकांचे केळकराना पत्र

कलकत्ता १२ जुलै १९००

लखनौचे पत्र पोचलेच असेल. प्रो. छत्रे हे येथे नसल्याने मला राहावे लागले आहे. ते आल्यावर सोळा तारखेला रंगूनकडे निघू. फेब्रुवारीच्या प्रारंभी पुण्यास येईन. बंगाली वर्तमानपत्र १ फेब्रुवारीपासून दैनिक होणार. अमृतबझार पत्रिकेशी स्पर्धा करण्याचा बंगालीचा विचार आहे हे तुमच्या लक्षात येईलच. तरी पुण्याहून महत्वाची बातमी नियमाने पाठवावी असा तुम्हाला मोतीलाल घोस यांचा निरोप आहे. एखादे बातमीपत्रहि पाठवावे. बाहेर इतर जिल्ह्यातील काही मित्राना लिहा. फेरोजशाहा मेथा यांची माझी गाठ पडली. ते म्हणतात सँडर्स्ट साहेबांच्या स्मारकाच्या चळवळीत माझे नाव कॉटन साहेबानी माझे संमतिशिवाय चिटणीसात गोविले. मी म्हणालो 'तर मग

हा खुलासा जाहीर कां करीत नाही ?' ते म्हणाले, 'उगीच या गोष्टीला नसते महत्व कशाला देऊं.' यावरून माझा तर्क झाला की त्यानी बोटच्चेपी संमति दिली असावी. येत्या फेब्रुवारीत प्रांतिक सभा भरविता का असे मी त्याना विचारले. तेहि त्याना मान्य नाहीं. ते म्हणाले सँढर्स्ट साहेबांचा निषेध करण्याकरिता मुद्दाम परिषद भरविली असे दिसेल ते बरे नाही. एप्रिल किंवा ऑक्टोबर मध्ये सभा भरून त्यात निषेधपर एखादा ठराव झाला तर आपली हरकत नाही असेहि ते म्हणाले. जाहीर स्मारक होईल असे मेथा याना वाटत नाही. पण बोलणे गुळमुळीतच. मेथा हे स्वतंत्र बाण्याचे म्हणतात. पण तालमान पाहूनच ते स्वतंत्रपणा मिरविणार. आणि तेव्हा मात्र देशी पत्रानी त्यांचे मोठे कौतुक करावे असे त्याना वाटते. पण आम्ही असले कौतुक करणाऱ्यापैकी नाही. तरी तुम्ही मराठ्यात या विषयावर लिहा. मेथा यांच्या धोरणाचा निषेध करा.पण कदाचित् त्यांचे नाव न विचारता घातले असेल असे म्हणून सोडवणूक करून ठेवा. याच धोरणाने खाडिलकर यानाहि केसरीत लिहिण्याला सांगा.

### ( ९ ) र. पां. करंदीकर यांचे केळकराना पत्र

सातारा ३० नव्हेंबर १९००

कालिदास पत्राचे अपिल दाखल झाले हे ऐकून आनंद झाला. पंडित मदन मोहन यानी हे अपिल चालविण्याचे सर्वस्वी नाकारले याचे काय कारण ? कळत नाहीं. पं. नेहरू यानी मागितले ते रुपये द्यावे, हरकत नाही. ही धंद्याची गोष्ट आहे. मजजवळच्या रुपयापैकी काही रुपये गुरुजी यांच्या कुटुंबाच्या मदतीकरिता पाठवावे असे वाटते. त्या गरिबानी काय करावे ? तरी मला ताबडतोब कळवा.

# भाग २

## [स० १९०१ ते १९०३]

### (१) कै. रानडे व कै. व्हिक्टोरिया राणी

सन १९०१ च्या जानेवारीत न्यायमूर्ती रानडे व व्हिक्टोरिया महाराणी ही दोघे अवघ्या सहा दिवसांच्या अंतराने परलोकवासी झाली. सुधारक वर्गासंबंधाने टिळकांच्या मनात आदरबुद्धी नव्हती तरी रानडे यांच्याविषयी व्यक्तिशः ती होती इतकेच नव्हे तर कमालीची होती हे टिळकानी लिहिलेल्या मृत्युलेखावरून उघड दिसून येणार आहे. "रानडे यांची बुद्धि कर्तृत्व विद्वत्ता आणि त्यानी घेतलेला राष्ट्र-कार्यातील पुढाकार या गोष्टी मनात आल्या ह्मणजे त्यांच्या मृत्यूमुळे जग काही कालपर्यंत तरी आम्हाला शून्यवत् भासते. अलौकिक बुद्धीमत्ता दीर्घ व सतत व्यासंग देशहिताची खरी कळकळ विद्यार्जनाचे व्यसन अचूक कल्पकपणा हे रानड्यांचे मुख्य गुण होते. तरी पण हे गुण अंगी असलेल्या इतर लोकाहून रानड्यां-विषयी विशेष हळहळ वाटण्याचे कारण हे की त्यानीच महाराष्ट्रात राष्ट्रकार्यांचे वळण लावले आणि सर्व प्रकारच्या अडचणी सोसून देशोन्नतीच्या कार्याकरिता उत्साहाने हाती भगवा झेंडा घेऊन नेहमी आघाडी संभाळली. जनसमाजाला शहाणे करून सोडण्याचा क्रम अखंड चालू ठेवला. समाजाचे गुरुत्व स्वीकारले व पार पाडले. तात्पर्य रानड्यासारखा पुरुष इंग्रजी राज्य झाल्यापासून महाराष्ट्रात झाला नाही व त्याची जागा पुढेहि भरून येणार नाही. या राज्यात जुनी सर्व कर्तृत्वपरंपरा नष्ट होऊन लोक तेजोहीन बलहीन स्वहितपरायण असे झाले व महाराष्ट्र हा एक गंड गोळा होऊन पडला होता. त्या गोळयात प्रथम चैतन्य व उष्णता रानड्यानी उत्पन्न केली. रानड्यानी आखून दिलेला मार्ग पुढे कोणी विस्तृत किंवा अधिक साफसुफ करो. पण तो मार्ग प्रथम आखण्याचा मान रानड्यानाच दिला पाहिजे. नाना फडणविसाप्रमाणे रानड्यांचा सर्व काळ महाराष्ट्राविषयीच्या चिंतेतच गेला. आणि स्वतःचा शांत धीमा स्वभाव व पाहून पारखून घेतलेल्या अनुयायांचा केलेला मोठा संग्रह या सर्वांचा उपयोग केवळ राष्ट्रकार्याकडेच त्यानी केला. 'यततामपि सिद्धानाम् कश्चिन्मां वेत्ति तत्वतः' हे वचन रानड्यानाच लागते. हेमाद्रि किंवा माधवाचार्य यांच्या प्रमाणे 'सर्वशः सहि माधवः' हेहि वचन रानडे यानाच लागू शकेल." अशा अनेक रीतीने रानड्यांचे गुण घेऊन त्यांच्या मृत्यूविषयीचे दुःख टिळकानी आळविले आहे.

व्हिक्टोरिया राणी यांच्या संबंधाने लिहितानाहि ब्रिटिश राज्याविषयी नेहमी मनात असणारी आढी या क्षणापुरती टिळकानी बाहेर दिसू दिली नाही. कारण व्यक्तीचे गुण घेताना अवांतर गोष्टीचा विचार उचित नसतो व त्याने खऱ्या भाव-

नेची एकतानता बिघडते. व्हिक्टोरिया राणी मनाने कोमल सदाचरणी प्रजेविषयी सहानुभूति बाळगणारी राज्यातील कायद्याचे बंधन स्वतः मानणारी असल्यामुळे सहजच लोकप्रिय झाली. पण तिच्या कारकीर्दीत इंग्रजी साम्राज्याची अतिशय भरभराट झाली यामुळे या लोकप्रियतेत तिकडे भर पडली. इतक्या दूर देशचा बादशहा हिंदुस्थानला काय देणार? पण व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा ही हिंदुस्थानाला एक सनदच होऊन राहिली. यामुळे तिची कारकीर्द हिंदुस्थानालाहि चिरस्मरणीयच ठरली. राणीच्या मृत्यूनंतर लगेच सातवे एडवर्ड हे बादशहा झाले. त्यांचाहि जयजयकार रीतीप्रमाणे केसरीत आला. टिळक इंग्रजी राज्यावर मनातून कितीहि जळत असले तरी सामान्य शिष्टाचार हा त्यानी केव्हाहि सोडला नाही.

## (२) अज्ञेयमीमांसा व हर्बर्ट स्पेन्सर

१९०१ च्या एप्रिल महिन्यात नारायण लक्ष्मण फडके यानी अज्ञेयमीमांसा या नावाचा ग्रंथ स्पेन्सरच्या ग्रन्थावरून लिहून प्रसिद्ध केला. त्यावर टिळकानी दोन अग्रलेख लिहिले. त्यात त्यांचे तत्वज्ञानविषयक विचार पहावयास मिळतात. टिळकानी असे म्हटले आहे की अलिकडे भौतिक शास्त्राच्या अभ्यासामुळे पदार्थविज्ञानात फार प्रगति झाली आहे. दिक्कालादि पदार्थ अनादि असले तरी त्यांचा संबंध इतर पदार्थांशी कोणत्या प्रकारचा असतो ह्याचे विवेचन अर्वाचीन शास्त्रातून जितके चांगले आढळते तितके जुन्या ग्रन्थात आढळत नाही. या नवीन ज्ञानामुळे भौतिक शास्त्राला मोहकता प्राप्त झाली आहे. निरनिराळ्या शास्त्रातील सिद्धांताची तुलना करावी आणि त्यात सारखेपणा काय वेगळेपणा काय हे पहावे हे तत्त्वज्ञानाचे काम आहे. हर्बर्ट स्पेन्सर यानी हे काम केले. द्रव्य व गुण यांच्या सामान्य नियमांचे प्रकार त्यानी ठरविले. आणि अनेक भौतिक सिद्धांताचा पसारा अफाट दिसला तरी तो 'सर्वसामान्य मूलक' आहे असे ठरवून त्यांचे मूलतत्त्व त्यानी व्यवस्थितपणे मांडले. विस्कळित ज्ञानाचे संकलन करणे याचे नाव तत्त्वज्ञान आणि हे संकलन केले म्हणजे अगम्याचे अस्तित्व सिद्ध होऊ पहाते. स्पेन्सर साहेबांचा सिद्धांत आपल्या जुन्या तत्त्वज्ञानाशी पुष्कळ अंशी जुळता आहे. हिंदी तत्त्वज्ञानी जड सचेतन अचेतन ज्ञेय अज्ञेय यांची चर्चा हजारो वर्षे करीत आले आहेत. म्हणून फडके यानी जुन्या आर्य ग्रंथात या पुस्तकावर काय लिहिले आहे त्याचा थोडा बहुत उल्लेख तुलनात्मक रीतीने करावयास पाहिजे होता असा दोष टिळकानी दिला आणि ही तुलना कशी करता येते हे त्यानी स्वतः दाखविले. ज्ञेय व अज्ञेय या स्पेन्सरच्या दोन विभागाप्रमाणे आमच्याकडच्या तत्त्वज्ञानातहि सांख्य आणि वेदांत असे दोन विभाग आहेत. स्पेन्सरने उत्क्रांतिशक्तीचे समतोलत्व गतीचे सातत्य वगैरे सिद्धान्त काढले. त्याचप्रमाणे नैयायिकानी सृष्टीच्या अवलोकनाने सप्त पदार्थ वगैरे सिद्धान्त काढले. सांख्यानी प्रकृति आणि पुरुष ही दोनच तत्त्वे अनादि मानली. आणि इंग्रजी तत्त्ववेत्त्यानीहि मॅटर आणि स्पिरिट ही दोनच तत्त्वे मानली आहेत. पण नैयायिकापुढे सांख्यानी मजल मारली

असली तरी दोन्ही शास्त्रात जे एकीकरण पुरे झाले नव्हते ते एकीकरण पुढे वेदांताने केले. कारण सत पदार्थ किंवा प्रकृति पुरुष या तत्त्वांच्या बुडाशी जाऊन ज्या एका महाशक्तीचा हा विकार आहे तिचेहि ज्ञान करून घ्यावे हेच वेदांतशास्त्र सांगते. येथपर्यंत तिकडच्या इकडच्या तत्त्वज्ञानाचा समेट आहे. पण आपले तत्त्वज्ञान अज्ञेय तत्वासंबंधाने स्पेन्सरच्या पुढे गेले आहे. कित्येक शक्ती अज्ञेय असल्या तरी त्या विद्यमान आहेत एवढे निर्विवाद सिद्ध आहे ही गोष्ट स्पेन्सरप्रमाणे आमच्याहि तत्त्वज्ञान्यानी ठरविली आहे. आनंद या तत्त्वाचा स्पेन्सर यानी मुळीच विचार केलेला नाही. वेदामध्ये जीव परब्रह्म व जड वस्तू यांचा अन्योन्य संबंध काय आहे याचा विचार करून या दोघांचे एकीकरण परब्रह्म स्वरूपात होणे शक्य आहे की नाही आणि असल्यास ते कोणत्या स्वरूपात होते याचा सूक्ष्म विचार आमच्या इकडच्या प्रमाणे स्पेन्सरच्या पुस्तकात आढळत नाही. स्पेन्सरच्या पुस्तकाचे महत्त्व हेच की एका निराळ्या पद्धतीने आमच्या इकडील तत्वज्ञानातील सिद्धान्ताना पुष्टी मिळते. हजारो वर्षांच्या अंतराने जे सिद्धान्त दुतर्फी सिद्ध झाले त्यांचे महत्त्व विशेष होय.

या अज्ञेयवादाचा पुरस्कर्ता इंग्रज तत्त्ववेत्ता हर्बर्ट स्पेन्सर हा १९०३ च्या डिसेंबर महिन्यात वारला. त्या प्रसंगी टिळकानी केसरीत एक मोठा पांच कालमाचा अग्रलेख लिहिला. त्यांच्या अनेक उत्कृष्ट मृत्युलेखापैकी हा एक आहे. तत्त्वज्ञाचे चरित्र म्हणजे सतत अध्ययन विचार आणि ग्रंथलेखन याखेरीज दुसरे काही सहसा असू शकत नाही. शिवाय स्पेन्सरसाहेब आजन्म ब्रम्हचारी राहिले. कोणताहि मानसन्मान त्यानी स्वीकारला नाही. म्हणून त्यांच्या चरित्रात संसारिक लोकाना मनोरंजक अशी माहिती कोठून असणार ? अशी एका सफाईदार वाक्यात टिळकानी व्याजोक्ति केली. व बाकीचा बहुतेक लेख तत्त्वज्ञ आणि तत्त्वज्ञान यांची यथार्थ स्तुति करण्यात खर्चिला आहे. असे मोठे तत्त्वज्ञ व मोठे कवि हे कोणत्याहि देशात जन्मले तरी ती जगाचीच मालमत्ता होय म्हणून आम्हाला ते हिंदुस्थानातलेच वाटतात. शिवाय इकडील नव्या विद्यापीठातून बाहेर पडलेल्या एका सबंध पिढीच्या मनावर हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचाराचा जितका परिणाम झाला तितका इतर कोणाचाहि झाला नाही. म्हणून तर ते विशेषच आपलेसे वाटतात असे म्हणून टिळकानी तुलनात्मक तत्त्वज्ञानाची महती वर्णन करण्यास या लेखात प्रारंभ केला आहे.

तत्त्वज्ञान सर्व देशाहून आधी हिंदुस्थानात अवतरले. समाजव्यवस्था सुधारणा ही प्रथम इकडेच जन्मास आली. हिंदुस्थानात निसर्गसौंदर्य आणि विशालत्व फार त्यामुळे हिंदी लोकांच्या मनात तात्त्विक विचार येऊ लागले. गूढ तत्त्वांचे संशोधन करण्याची बुद्धि त्याना झाली. आणि आमच्या जुन्या आचार्यांनी निर्माण केलेले तात्त्विक विचार इतके प्रगल्भ ठरले की, विसाव्या शतकातील तर्कशास्त्राच्या कसोटीवरहि त्याची बावनकशी रेघ अद्याप जशीच्या तशीच उमटलेली आहे. पण इंग्रजी अमलापासून भौतिक सुधारणांचे ज्ञान होऊ लागून त्याच्या तेजाने सुशिक्षितांचे

डोळे दिपून गेले आणि आर्य तत्त्वज्ञानाचे अध्ययन हळुहळू लुप्त झाले. अशा स्थितीत प्रतिक्रिया होऊन मन केवळ आधिभौतिक वादापासून परावृत्त होण्याला स्पेन्सरसाहेब उपयोगी पडले. त्यानी कोणत्याहि एका विशिष्ट शास्त्रात नवीन शोध केले नाहीत. पण त्यांच्याभोवती वाढणाऱ्या अनेक शास्त्रांच्या मुळाशी समान अशी तत्त्वे कोणती आहेत त्या तत्त्वांचे मनावर विकार का व कसे होतात आणि त्या विकारांचे नियम कोणते याचे संशोधन स्पेन्सरसाहेबानी केले. भौतिक शास्त्राच्या तेजाने आपले डोळे दिपू न देता त्यानी जे मोहक व रमणीय तत्त्वज्ञान निर्माण केले त्याने जिंकलेली सुशिक्षितांची मने अध्यात्मविचाराकडे वळली आणि तसे होताच आमच्या जुन्या तत्त्वज्ञानात व स्पेन्सरसाहेबांच्या या नव्या तत्त्वज्ञानात एकवाक्यता आहे हे त्याना कळून आले. अर्थात् परक्याने आम्हाला आमचेच पण अधिक चांगले शिकविले हा स्पेन्सरसाहेबांचा आमच्यापुरता मुख्य उपकार होय. डार्विन याने उत्क्रांतिवादात जीवकोटीची जी मीमांसा केली ती सांख्य तत्त्वज्ञानाशी जुळणारी आहे. कारण प्रथम त्रिगुणाची साम्यावस्था असते. नंतर तिच्यात बिघाड होऊन महत्तत्त्व अहंकार पंचमहाभूतांची तन्मात्रे निर्माण होऊन पदार्थमय सृष्टीची रचना होते. पुढे इंद्रियांच्या द्वारे जीवाला संवेदनशक्ति येते आणि तिची क्रीडा व कार्य संपल्यावर प्रकृतीच्या विकारांचे परिणाम नाहीसे होऊन जीवाला मुक्ति मिळते. चित् व जड एवढ्यांचा सूक्ष्म विचार करण्यापुरती सामुग्री सांख्य व वेदांत शास्त्रात आहे. शास्त्रद्वारा आदितत्त्वाचे निदान करणे आणि विकृतिस्वरूप ओळखणे असे तत्त्वज्ञानाचे लक्षण स्पेन्सरनी केले आहे. आणि या लक्षणाप्रमाणे त्यानी द्रव्य आणि गति किंवा शक्ति ही दोन आदितत्त्वे मानिली आहेत. पण त्यातल्या त्यात शक्तितत्त्वालाच किंवा गतितत्त्वालाच ते द्रव्यापेक्षा प्राधान्य देतात. स्पेन्सरच्याहि मताप्रमाणे द्रव्य व गति यांची साम्यावस्था हेच जगताचे मूल स्वरूप आणि गतीचा समतोलपणा नाहीसा झाल्याबरोबर विषमता व त्यामुळे भेद उत्पन्न होतात. साम्यातून विषमता निघणे अभेदातून भेद निघणे हेच स्पेन्सरच्या उत्क्रांतिवादाचे बीजतत्त्व होय. कालांतराने उत्क्रांति संपून अपक्रांतीला सुरवात होते व पुन्हा द्रव्य व शक्ति ही साम्यावस्थेला जाऊन पोहोचतात. द्रव्य व गति यांचा जो हा खेळ तीच जगांतील प्रवृत्ति व निवृत्ति होय. शिवाय द्रव्य व गति ही ज्यामध्ये आविर्भूत होतात अशी काहीतरी वस्तु त्याच्या मुळाशी असली पाहिजे. पण आपण उपाधिग्रस्त असल्यामुळे हे आदितत्त्व अज्ञेय राहते. सांख्य असेच मानितो की जीव नित्य अविनाशी आहे. पण स्पेन्सरसाहेब असेच मानीत की गति ही नेहमी द्रव्याश्रित असते त्याप्रमाणे चैतन्य हेहि फक्त देहाश्रित असते. ह्या मुद्यापुरती स्पेन्सर व चार्वाक यांची एकवाक्यता होती. यामुळे पुनर्जन्म वगैरे मानण्याला स्पेन्सरसाहेब कचरत असत. तर मग धर्मकल्पना कोठून निघतात हा प्रश्न येतो. यावर स्पेन्सर यानी असे उत्तर दिले आहे की, स्वप्नातील देखावे आणि भूतपिशाच्च इत्यादिकांच्या गोष्टी यांच्यावरून जीव हा शरीराला सोडून

राहू शकतो अशी खोटी कल्पना प्रथम रानटी मनुष्याच्या मनात आली आणि तिचीच परिणति पुढे ईश्वराचे अस्तित्व मानण्यात झाली. पण हे मत टिळकाना ग्राह्य नसून मॅक्समुल्लर वगैरे इतर तत्त्ववेत्त्यानी हे मत खोडून काढले आहे. आणि या बाबतीत आर्यतत्त्ववेत्ते व मॅक्समुल्लर यांची एकवाक्यता आहे असे टिळकानी दाखविले आहे. पण टिळकानी असेहि म्हटले आहे की, जुन्या चार्वाकाप्रमाणे स्पेन्सरसाहेब हे केवळ–'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्" या मताचे नसून उत्क्रांतीचे तत्त्व समाजाला व नीतितत्त्वाला लावून मनुष्याच्या परोपकार बुद्धीच्या सीमा अधिकाधिक वाढत गेल्या पाहिजेत आणि त्यानी जास्तीत जास्त असे जगाचे हित साधले पाहिजे हे अत्यंत उदात्त तत्त्व स्पेन्सरने प्रतिपादिले आहे. दुसरे पक्षी टिळकानी असेहि दाखविले आहे की, स्पेन्सरचा नास्तिकपणा जुन्या चार्वाकाच्या नास्तिकपणापेक्षा फार वेगळ्या प्रकारचा आहे. कारण स्पेन्सरने ईश्वर नाहीच असे स्पष्ट न म्हणता आपण अज्ञेय तत्त्वाला शरण आहो अशी कबुली दिली आहे. पण टिळक म्हणतात 'सूक्ष्म विचारांती मति कुंठित होते असे म्हणणे तत्त्ववेत्त्याला दूषण नसून भूषण आहे.' आणि "दंतभंगोहि नागानां श्लाघ्यो गिरिविदारणे" या सुंदर सुभाषिताचा त्यानी आधार दिला आहे. टिळकाना स्पेन्सरबद्दल आणखी एक आदर वाटण्याचे कारण असे की आपल्या इकडील संन्यासमार्गीयाप्रमाणे ज्ञान हीच कर्माची परिसमाप्ति असे त्यानी न म्हणता केवळ शुद्धावस्था प्राप्त झाल्याने मुक्ति नाही आणि जीवाची कर्तव्याची सीमा परम परोपकारापलीकडेहि जाते असे त्यांचे मत होते. आणि समाजाची निरनिराळी अंगे घेऊन प्रत्येकात मनुष्यकर्तव्य कोणते याचे त्यानी सशास्त्र नियम बांधले आहेत. अर्थात् वेदांतातील किंवा सांख्यातील तत्त्वज्ञान व्यवहारोपयोगी करण्याचा जो प्रयत्न आमच्या इकडे भगवद्गीतेशिवाय इतर कोठे करण्यात आला नाही तो तिकडे हर्बर्ट स्पेन्सर यानी केला म्हणून ज्ञानी लोकानी ईश्वर अज्ञेय मानला तरी "प्रियोहि ज्ञानिनोऽत्यर्थमहम् स च मम प्रियः" या वचनाप्रमाणे ज्ञानी हा ईश्वराला प्रिय झाल्याशिवाय रहात नाही. स्पेन्सरने संसारात राहून लग्न केले नाही. संसार करूनहि द्रव्यतृष्णा धरली नाही. आणि मनुष्यहित मनात नित्य वसत असताहि पार्लमेंटसारख्या संस्थेत ते कधी शिरले नाहीत. या दृष्टीने आपल्या प्राचीन महर्षीप्रमाणे व आचार्याप्रमाणे त्यांची योग्यता मानली पाहिजे. शास्त्रांची एकवाक्यता करण्याचे स्पेन्सरसाहेबांचे काम बहुतेक पुरे झाले व त्यांच्या वयालाहि चौऱ्यायेंशी वर्षे झाली म्हणून त्यांच्या मृत्यूची हळहळ वाटण्याचे कारण नाही असे टिळकानी वेदांती पद्धतीने स्वतःच्या व वाचकांच्या मनाचे समाधान केले आहे खरे, तरी पण त्या वाक्यातूनच त्यांची मनातली हळहळ प्रगट होते. कारण असा तत्त्ववेत्ता अमर होऊन जगाला निरंतर लाभला असता तर तो नको असे कोणाला वाटेल? टिळकाना तत्त्वज्ञानाची गोडी मनातून फार होती. शुद्ध ज्ञानाचे ते फार भोक्ते होते. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' हेच खरे असे त्याना वाटत असे.

## (३) विष्णुशास्त्री चिपळूणकर

तारीख १९ मार्च रोजी सार्वजनिक सभेत विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या श्राद्धतिथिनिमित्त टिळकानी एक निबंध वाचला. त्यात पुण्यातील शिक्षण संस्थांचा पूर्व इतिहास दिल्यावर पुण्यातील जुन्या नव्या पुढारी परंपरेची थोडीशी चिकित्सा केली. इंग्रजी शिक्षणाने विद्वान् बनलेल्या पहिल्या पुढाऱ्यांची मनःस्थिति भयाण व शोचनीय झाली. स्वधर्माचे किंवा परधर्माचे शिक्षण त्याना राहिले नाही. म्हणून पहिल्या पिढीचे लोक अल्पज्ञानी संतुष्ट स्वयंमन्य आणि जुन्या लोकांचा उपहास करणारे बनले व यानाच सरकारी नोकरीचा मान मिळू लागल्यामुळे जुन्या लोकनायकांचे वंशज भिकेला लागले. पहिली पिढी गोपाळ हरी देशमुख यांची. नंतर कृष्णशास्त्री चिपळूणकर व केरूनाना छत्रे व त्यानंतर कुंटे व रानडे. पहिल्या पिढीतील लोकाना विद्येचा संस्कार फारच थोडा होता. गोपाळराव हरी देशमुख हेच त्यातले त्यात बहुश्रुत. अशा पुढाऱ्यांचा परिणाम समाजावर फारच वाईट झाला. पण पहिल्या पिढीतील लोकाना लहानपणी तरी जुन्या पद्धतीचे गृहशिक्षण मिळाले होते तेहि दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील लोकाना मिळाले नव्हते. यामुळे हेहि नाही तेहि नाही अशा स्थितीत बिघडलेल्या विद्वानात धर्मनिष्ठा नीतिधैर्य सदाचरण यांचा बहुतेक लोप झाला. याच्याबद्दल मुंबईच्या एका पुढाऱ्याने अशी टीका टिळकांजवळ केली की ' They have made vice fashionable in Poona. ' जुन्या समाजांतील केवळ उणेपणा पाहण्याकडे या लोकांची दृष्टी गेली. मिशनरी लोकांच्या कपटाला ते बळी पडले. ख्रिस्ती मिशनऱ्यांना प्रतिकार म्हणून त्यानी नवीन धर्मपंथ काढले. पण असे धर्मपंथ काढणाऱ्या पुढाऱ्यांच्या अंगी जे गुण असावे लागतात ते यांच्यामध्ये नव्हते. समाजाचा विश्वास प्रथम संपादन करावा लागतो. विद्वान् पुढारी व विश्वासू पुढारी यामध्ये अंतर आहे. पण ते मोठ्या पदावर असल्यामुळे सामान्य लोकाना गप्प बसून त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे लागले व चालू द्यावे लागले. विष्णुशास्त्र्यांच्या पूर्वी झालेल्या चळवळी इंग्रजी शिक्षणाने हुरळून गेलेल्या लोकानी केल्या होत्या. आणि शास्त्रीबुवांच्या लेखांचा जर काही परिणाम झाला असेल तर हा विषवृक्ष इतकी वर्षे वाढला होता तो तोडून टाकण्यात मुख्यतः झाला. शास्त्रीबुवाना ही गोष्ट त्या वेळच्या पुढाऱ्याना नावे ठेऊन करावी लागली. पण टिळक म्हणतात 'ज्या लोकानी मनु शंकराचार्य रामदास व तुकाराम अशाना मूर्ख ठरवून आचार विचार विहार आहार यांच्या स्वछंदावर नवीन धर्माचे निशाण उभे केले त्याना त्यांच्या पिढीने मूर्ख ठरविल्यास ती गोष्ट जगाच्या रहाटीच्या फारशी विरुद्ध नव्हती.' शास्त्रीबुवा न जन्मते तरीहि या जुन्या पुढाऱ्यांचा डोलारा पुढे मागे गडबडून पडलाच असता. कारण त्यांचे महत्व आगंतुक होते. हा डोलारा गडगडण्याला विष्णुशास्त्री हे निमित्त मात्र झाले. उनू गेलेले दूध केव्हा तरी अग्नीत पडून दग्ध व्हावयाचेच त्याप्रमाणे पहिल्या दुसऱ्या पिढीतील पुढाऱ्यांची चळवळ झाली. शास्त्रीबुवानी योग्य समय ओळखून योग्य साधनांचा उपयोग केला आणि लोकांचा मोर्चा तिकडे फिरविला

हे त्यांच्या मार्मिकपणाचे व प्रसंगावधनाचे फल होय. विष्णुशास्त्र्यांवर एक आक्षेप असा की सुधारकांची सर्व मते त्यांची नव्हत अशीच स्वतःची समजूत असताहि, त्यानी सुधारकावर हत्यार चालविले. पण टिळकांच्या मते हाहि आक्षेप खरा नाही. समाजाच्या रचनेत देशकालमानाने फेरफार झालेच पाहिजेत. पण हे फेरफार घडवून आणू म्हणणाऱ्या व्यक्ती तितक्या योग्यतेच्या नव्हत्या.जुन्या शास्त्र्यांची एकादी सभा भरविली तर त्यातहि समाजव्यवस्थेत फेरफार करा म्हणणारी काही मंडळी निघतील. पण अशानी सुधारणांचा पुरस्कार करणे वेगळे व चोरटेपणाच्या व अव्यवस्थितपणाच्या वावटळीत सापडलेल्या लोकानी सुधारणांचा पुरस्कार करणे वेगळे. बुद्धिवादाने सामाजिक सुधारणा होत नाही. त्याला इतर गोष्टी अनुकूल लागतात. शास्त्रीबुवांच्या कडक भाषेवरील आक्षेपासंबंधाने टिळकांचे म्हणणे असे की कोणीहि मर्दाने प्रतिपक्षाच्या शस्त्रांच्या प्रखरपणाविषयी तक्रार करण्यांत अर्थ नाही. विष्णुशास्त्र्यानी भाषा हे जे राष्ट्रोत्कर्षाचे साधन ते परिपूर्णतेला आणले. शास्त्रीबुवांचे अंतःकरण कळकळीने जळत होते म्हणूनच त्यांच्या हातून कडक भाषा लिहिली गेली. ज्याला आपल्या विचारांची लोकावर छाप बसवावयाची असेल किंवा वाग्देवीच्या प्रसादाने लोकांच्या मनोवृत्ति जागृत करावयाच्या असतील त्यानी "अमर्ष शून्येन जनस्य जन्तुना न जात हार्देन न विद्विषादरः" हाच न्याय स्वीकारला पाहिजे. जॉन्सन मेकॉले वगैरेंचे विचार तरी सर्वमान्य कोठे होते? पण भाषा हे त्यांचे हत्यार होते. म्हणून शास्त्रीबुवांची मते ज्याना मान्य नाहीत अशानीहि त्यांच्या भाषेच्या उत्कर्षाबदल त्यांचे आभार मानले पाहिजेत. शास्त्रीबुवांच्या स्वार्थत्यागासंबंधाने टिळकानी असे समर्थन केले की त्यानी सरकारी नोकरी सोडली ती पुढील अंदाज पाहून सोडली हा काही त्यांचा दोष नव्हे. पण पोट भरण्याची पंचाईत नाही इतके पाहून खाली झाल्यावर तरी त्यानी नोकरी सोडली हा त्यांचा गुण होय. असे तरी किती लोक करतात? अदमास पाहिला ही काही त्यांची चूक नव्हे. तर अदमास पुरा झाल्यावरहि द्रव्य किंवा अधिकार यांच्या लालुचीने नोकरी करीत राहतात त्यांच्या मानाने तरी शास्त्रीबुवांचा स्वार्थत्यागच होय. स्वार्थत्यागाची व्याख्या ठरविणे कठीण आहे. पण जेव्हा स्वार्थ देशकार्याच्या आड येईल तेव्हा जो मनुष्य तो बाजूला सारील तोच स्वार्थत्यागी.

## (४) वेदोक्त प्रकरण

ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद जोतिबा फुले यांच्याइतका किंवा त्यांच्याहून जुना असला तरी त्याला १९०१ सालापर्यंत प्रकट स्वरूप आले नव्हते. आणि ते प्रकट स्वरूप सरळ रीतीने न येता विकृत रीतीने येण्याचे कारण त्या वादाला राजाश्रय मिळाला हे होय. हा वाद प्रथम बडोदे येथे वेदोक्त कर्माच्या वादातून बाहेर पडला. सयाजीराव गायकवाड यानी आपल्या सुशिक्षित दृष्टीमुळे, ब्राह्मणेतरानी वेदोक्त संस्कार का करून घेऊ नये असा प्रश्न काढला होता. आणि त्यानंतर हा

वाद कोल्हापुरास जाऊन भिडला. प्रश्न असा उपस्थित झाला की मराठे हे क्षत्रिय होते ह्मणून त्यांच्याकडील कर्मे ब्राह्मणानी वेदोक्त केली पाहिजेत. वास्तविक पाहता मराठ्यानी स्वतःस क्षत्रिय ह्मणविणे व द्विजाप्रमाणेच आपली कर्मे वेदोक्त करविणे यात काहीच वावगे नव्हते. मराठ्यानी स्वतःस क्षत्रिय ह्मणविल्याने ब्राह्मणाना वाईट वाटण्याचा अगर राग येण्याचा काहीच संभव नव्हता. कारण 'आम्हाला वेदोक्ताचा अधिकार द्या' असे म्हणण्यात मराठ्यानाहि वेदप्रामाण्य आहे हे आपोआप गृहीतच धरले जात होते. वेदोक्त केल्याने क्षत्रिय व ब्राह्मण एकजाव होणार होते असेहि नाही पण हा वाद सरळ रीतीने न चालण्याला छत्रपति शाहुमहाराज व त्यांचे बंधु कागलकर हेच दुर्दैवाने कारणीभूत झाले व अधिकाराची अगर सत्तेची अरेरावी त्यानी थोडी कमी गाजविली असती तर वादाला इतके विकृत स्वरूप आलेहि नसते हे बडोद्याच्या सयाजीरावांच्या उदाहरणावरून दिसतच होते. शाहू महाराजानी राजोपाध्ये याना "तुम्ही राजवाड्यात येऊन वेदोक्त कृत्ये केलीच पाहिजेत" असा धाक घातला इतकेच नव्हे तर कोल्हापूर येथील श्रीअंबाबाईचे देवळात शिरून देवीस स्पर्श करू अशीहि काही अधिकाऱ्यानी धमकी घातली. मराठ्यांची ही मागणी न्याय्य अगर अन्याय्य कशीहि असली तरी आजपर्यंतच्या परंपरेच्या व वहिवाटीच्या सर्वस्वी विरुद्ध व निवळ दांडगाईची होती व वेदोक्ताच्या केवळ तात्विक वादापेक्षा या कृत्यानेच कोल्हापुरामध्ये जास्त खळबळ उडाली. काही शिष्ट लोकानी महाराजांकडे जाऊन या प्रसंगी योग्य धोरण ठेवण्याची विनवणी केली. पण छत्रपतीनी तर त्याना अगदीच धुडकावून दिले. शेवटचा मार्ग राहिला तो रेसिडेंटकडे अर्ज करण्याचा तोहि लोकानी करून पाहिला. पण परधर्मी साहेब या हिंदुधर्माच्या वादात काय निकाल देणार? त्याने 'या बाबतीत सरकार लक्ष घालीत नाही' म्हणून कानावर हात ठेविले.

स्वतः शाहूमहाराजाना व त्यांच्या हस्तक सत्यशोधकी अधिकाऱ्याना वर्णव्यवस्था मान्य नव्हती हे प्रसिद्ध आहे. पण सर्व जाति मोडून एकजात करावी असे तोंडाने म्हटले आणि इष्ट आहे असे प्रतिपादिले, तरी ते शक्य आहे की नाही हा प्रश्न उरतोच. व आपले सर्व आयुष्य व राजसत्तेचे बळ खर्च करून जातिभेद मोडण्याची सामाजिक सुधारणा करण्याचा 'प्रयोग' छत्रपतीनी हौसेसातर करून पाहिला पण त्याने विनाकारण जातीजातीतील तंटे मात्र वाढले. हे करणे शहाणपणाचे नाही असे टिळकांचे म्हणणे होते. श्रीअंबाबाईचे देऊळ व त्याचे इनाम व उत्पन्न या सार्वजनिक स्वरूपाच्या गोष्टी आहेत. अशा वेळी परंपरा व वहिवाट हीच मुख्यतः रक्षण करणे हेच राजा या नात्याने करवीर सरकारचे काम होते असा टिळकानी दोष दिला.

ता. २२ ऑक्टोबर १९०१ च्या केसरीत टिळकानी या विषयावर अग्रलेख लिहिला. त्यांत त्यानी लिहिले की "जातिभेद हा हिंदु लोकांच्या अंगी अगदी खिळलेला आहे. हिंदु लोकांची जातिधर्मावरील आसक्ति इतकी दृढ आहे की जातिभेदाचे संस्कार जळलेल्या दोरीत तिचा पीळ राहतो तद्वत् कायम राहतात. व सर्व

हिंदुस्थानातील जातींचा सवगोलंकार करणे हे इष्ट असले तरी शेकडो वर्षे पर्यंत ते शक्य नाही हे कबूल केले पाहिजे. शिवाजीमहाराजांच्या काळीच या प्रश्नाचा एकवार निकाल झाला आहे. शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकप्रसंगी तर सगळ्या महाराष्ट्रात त्यांचे बद्दल निरतिशय प्रेम व आदर असल्यामुळे या प्रश्नाचा जो निकाल झाला व जो शिवाजीने मान्य केला तो काकणभर मराठ्यांच्याच बाजूचा झाला असेल हे आम्ही सांगितले पाहिजे असे नाही. शिवाजीमहाराजांच्या वेळच्या मराठे लोकांच्या आजच्या वंशजानी अशी काय थोर कृत्ये अगर पुरावा मिळविला आहे की त्यापेक्षा अधिक अधिकार हल्लीच्या लोकास देण्यास महाराष्ट्रीयानी तयार व्हावे? सध्याच्या परतंत्र राज्यात एवढेच करावयाचे राहिले अशी त्यांची समजूत असल्यास गोष्ट निराळी! शिवाजीच्या वेळचा निर्णय आजच्या मराठ्यानी का मान्य करू नये? सातारचे घराणे हेहि शिवाजीमहाराजांचे वंशज. पण तेथे भोसले घराण्यात जी परंपरा लावून दिली व साताऱ्यास व कोल्हापुरास आजपर्यंत चालत आली ती अप्रमाण काय म्हणून मानावयाची? शिवाजीमहाराजास राज्याभिषेक वेदोक्त मंत्राने झाला. व तदंगभूत व्रतबंधहि तसाच करण्यात आला. पण त्यांच्या घरचे सर्व संस्कार 'वेदोक्त' होत असत असा ऐतिहासिक पुरावा अद्याप कोठेहि नाही. सातारचे घराण्यात जी परंपरा आहे तीवरून पाहता भोसले कुळातील गृह्यसंस्कार पुराणोक्तच होत असत असे दिसून येते. असे जर आहे तर श्रीशिवाजीमहाराजापेक्षा ज्यांची जातकुळी श्रेष्ठ नाही त्यानी वेदोक्ताचे खूळ माजवून राज्यातील लोकांच्या शांततेचा विनाकारण भंग करावा हे गैरशिस्त होय.

" वेदोक्त मंत्र संस्काराचे वेळी म्हटल्याने कोणत्याहि जातीस अधिक श्रेष्ठपणा येतो किंवा संस्कार अधिक शास्त्रोक्त होतो अशी जर कोणाची समजूत असेल तर ती अगदी चुकीची आहे. कारण ब्राह्मण जातीत देखील स्त्रियांचे संस्कार व्रते पूजा वगैरे पुराणोक्तच होतात. पण तेवढ्याकरिता ब्राम्हणांच्या सर्व स्त्रिया शूद्र जातीच्या आहेत असे कोणी समजत नाही. सोळा संस्कारात ज्या निरनिराळ्या क्रिया आहेत त्या चालविताना वेदोक्त मंत्र म्हणण्याची आवश्यकताच आहे असे नाही, व ब्राम्हण जातीतील संस्कार करते वेळी जे वेदोक्त मंत्र म्हणतात त्यांचाहि विनियोग अर्थावरून न करता पुष्कळ वेळा शब्दसादृश्यावरूनच केलेला असतो. अशा विनियोगास लैंगिक विनियोग असे म्हणतात व वैदिक मंत्राचे अशा तऱ्हेचे विनियोग केल्यामुळेच आज हजारो वर्षे वेदाचे रक्षण झाले असा आमच्याकडील व पश्चिमेकडील विद्वानांचा सिद्धांत झाला आहे. गर्भाधानापासून अंत्येष्टीपर्यंत शास्त्ररीत्या संस्कार होणे हे जितके अवश्य तितकेच ते वैदिक मंत्राने झाले पाहिजेत हे अवश्य नाही, आणि वैदिक मंत्रानी संस्कार झाले म्हणजे मराठे व ब्राम्हण एकजातीचे होतील अशी जर कोणाची कल्पना असेल तर तीहि निर्मूल आहे. ब्राह्मण जातीतील स्त्रियास वेदोक्त मंत्र म्हणण्याचा अधिकार नसताहि त्या जातीने ब्राह्मण आहेत आणि मराठे लोकानी वेदोक्त मंत्र म्हटले तरी ते मराठेच राहतील हे लक्षात ठेवले

पाहिजे. दुसरी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की मराठे लोकास आपण खरे क्षत्रिय असे जर वाटत असेल तर आपले क्षात्रतेज व्यक्त करण्यास वेदोक्त मंत्राने श्रावणी करणे हा काही खरा मार्ग नव्हे. ज्या लोकांच्या पूर्वजानी गेल्या शतकात मुसलमानी राज्याची लाट मागे हटवून हिंदुधर्माचे पुनरुज्जीवन केले ते जातीने अस्सल क्षत्रिय असोत वा नसोत त्यांची योग्यता स्नानसंध्या करून धर्म राखणाऱ्या ब्राह्मणापेक्षा कोणत्याहि रीतीने कमी आहे असे आह्मी मानीत नाही. हे मत आज आह्मी नव्याने सांगतो असे नाही. विश्वगुणादर्शात कृशानूने महाराष्ट्रातील ब्राह्मणास " उपनयनविवाहौ उत्सवैकप्रधानौ " ह्मणजे ते लग्नमुंजी 'उत्सव' म्हणून करतात शास्त्रोक्त ह्मणून करीत नाहीत असा दोष दिला असता " चमूनियमनेन वा जनपदाधिकारेण वा द्विजव्रज उपव्रजन् प्रभुपदं महाराष्ट्रजः ॥ न वृत्तिमिह पालयेद्यदि धरासुराणां ततो । भवेद्यवनवेष्टितं भुवनमेतदब्राह्मणम् ॥ " असा विश्वावसूने त्याचा परिहार केला आहे आणि हाच न्याय मराठे लोकांसहि पूर्णपणे लागू आहे. त्यांच्या घरच्या क्रिया वेदोक्त झाल्याने त्याना विशेष महती प्राप्त होईल असे मानणे अगदी चुकीचे आहे. ' क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः । क्षत्रस्य शब्दो भवनेषु रूढः ' अशी क्षत्रिय शब्दाची कालिदासाने व्याख्या केली आहे. परंतु हल्लीचा काल असा आला आहे की क्षत्रियाने देखील क्षतास मलमपट्टी लावूनच आपले कर्तव्य उरकले पाहिजे. अशा स्थितीत आपले संस्कार वेदोक्त करण्यास झटण्यापेक्षा खऱ्या क्षात्रधर्मास उचित वर्तन ठेवणे हे खऱ्या क्षत्रियाचे किंबहुना ब्राम्हणांचेहि कर्तव्य आहे हे आम्ही सांगावयास नको. देशाला अनेक प्रकारची जी अनेक क्षते पडली आहेत ती भरून काढण्याची महाराष्ट्रातील मराठे व ब्राम्हण यानी ईर्षा बाळगली पाहिजे. काही मराठे मंडळीनी हट्टाने जरी वेदोक्त क्रिया केली तरी सामाजिक किंवा राष्ट्रीयदृष्ट्या त्यापासून त्यास काही फायदा नाही. कारण हल्ली कित्येक युरोपिअन लोक जर वेदपठण करतात तर त्या प्रमाणेच वेदोक्त कर्म करणाऱ्या मराठ्यांची स्थिती होईल. यात काही भूषण नाही बहुमान नाही आणि देशकार्यहि नाही. महाराष्ट्रात मराठे लोकास जो मान आहे तो त्यांच्या वाडवडिलांच्या शौर्यामुळे त्यास प्राप्त झालेला आहे व तशा प्रकारचे शौर्य धाडस व देशाभिमान हे गुण जोपर्यंत त्यांच्यामध्ये जागृत राहतील तोपर्यंत त्यांचा मान कधीहि कमी व्हावयाचा नाही. वेदोक्त कर्म करणारे ब्राम्हण पाणी भरतात आणि पुराणोक्त कर्म करणारे मराठे राजपदाचा अनुभव घेतात हे जर आम्ही डोळ्याने पाहात आहो तर वेदोक्त मंत्रानीच आपले संस्कार झाले पाहिजेत असा मराठ्यानी आग्रह धरणे चुकीचे नव्हे काय ? संस्काराच्या वेळी वैदिक मंत्र म्हणणे हे आज हजारो वर्षे चालत आलेल्या वहिवाटीने एका विशिष्ट जातीतील पुरुषांचे ( स्त्रियांचे नव्हे ) 'लक्षण' झाले आहे. परंतु जाती जातीस जो काही मान आहे तो या लक्षणावर नसून त्या त्या ज्ञातीत कार्यकर्ते पुरुष ज्या प्रमाणावर निपजतात त्या प्रमाणावर आहे ही गोष्ट इतिहासावरून सिद्ध होत आहे. असे असता केवळ अज्ञानाने किंवा मत्सराने एका जातीने दुसऱ्या जातीच्या विशिष्ट

लक्षणाचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करावा व त्यास शहाण्या माणसानी उत्तेजन द्यावे हे बरोबर नाही.

हल्लीचा काळ व्यक्तिस्वातंत्र्याचा आहे. युरोपियन लोकहि वेद वाचतात तर आम्हालाहि वेदोक्ताचा अधिकार का नसावा हे म्हणणे सयुक्तिक दिसते. पण हल्लीचा प्रश्न वेदपठणाचा नाही. वेदोक्त संस्कार करण्याचा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. कोणाहि युरोपियनाचे ब्राह्मणानी वेदोक्त संस्कार केलेले नाहीत. व व्यक्तिस्वातंत्र्याचेच मत घेतले तर कोणाहि ब्राह्मणास मराठ्याचे वेदोक्त संस्कार करावयास लावणे व तो न करील तर त्याचे इनाम जहागीर जप्त हा अन्यायच नव्हे तर जुलूम होईल. पूर्वीच्या धार्मिक वहिवाटीत कोणीहि विनाकारण बळजवरी करून बिघाड करू नये. महाराष्ट्रात इंग्रज सरकारचे राज्य झाल्यावर गावोगाव देशपांडेपणाची अगर जोशीपणाची वतने होती ती सरकारास जरूर नसताहि त्यांच्याकडे चालविण्यात आली. धर्म संबंधी देणग्यास व वतनास हाच न्याय लागू आहे. मराठे संस्थानिकास पुराणोक्त कर्मे करणारे ब्राह्मण उपाध्ये नको असतील तर त्यानी बोलावू नये पण तेवढ्याकरिता सदर उपाध्ये जोपर्यंत ती वहिवाटी प्रमाणे करण्यास तयार आहेत तोपर्यंत त्यांचे वेतन बंद करिता यावयाचे नाही."

श्रीमंत राजोपाध्ये यानी वेदोक्त संस्कार करण्याचे नाकारल्यामुळे त्यांची इनाम गावे करवीर सरकारने जप्त केली. त्यावर राजोपाध्ये यानी मुंबई सरकारकडे अपील केले. पण सरकारने आम्ही या कामी हात घालू इच्छीत नाही असे उत्तर दिले. टिळकांनी लिहिले की "पूर्वजानी दिलेली दाने परत घेण्याची दुर्बुद्धि संस्थानिकाना व्हावी हे दुर्दैव होय. महाराजांच्या घरी दुसरा कोणीहि वेदोक्त कर्मे करू शकेल व ती त्यानी खुशाल करवावी. पण त्याकरिता दान दिलेले गाव जप्त करण्याचे कारण नाही. दाने जप्त करता येऊ लागली तर संस्थानिकाची राज्येहि इंग्रज सरकारला जप्त करण्याला काय हरकत! मुंबई सरकारचे काय गेले? ज्या कृत्यात हात घालीत नाही म्हणतात तेच बेकायदेशीर म्हणून उद्या वाटेल तेव्हा याचा आधार घेऊन सरकार संस्थानिकांच्या पंक्तीस बसेल! बडोदे सरकारने इनामदाराचे हक्क बुडविले ही गोष्ट सरकारला उपयोगी पडली तेव्हा ती त्यानी महाराजाविरुद्ध काढलीच की नाही!"

वेदोक्तासंबंधाने केसरीत लेख आले त्याने कित्येक मराठी संस्थानातून खळबळ झाली. प्रतिकूल टीका करणारी काही पत्रेहि टिळकांकडे आली. त्याना उत्तर देताना टिळकानी पुढे लिहिले की "प्रत्येक जातीने हिंदुधर्मशास्त्रातः आधार सापडतील त्या सर्वाबरहुकूम स्वतःला अधिकार मागावे व घ्यावे. कोणत्या जातीला किती धार्मिक हक्क असावेत हा प्रश्न वेदोक्ताच्या वादात नाही. तर एखाद्या विशिष्ट जातीचा राजा असता त्याने आपल्या जातभाईच्या अभिमानाला बळी पडून पूर्वापार चालत आलेल्या धार्मिक किंवा सामाजिक पद्धतीत किती हात घालावा एवढाच प्रश्न आहे. शिवाजीमहाराजांच्या वेळी झालेला निर्णय आजच्या राजानी

का मान्य करू नये ? याचे उत्तर कोणी देत नाही. कोणाला वेदोक्त संस्कार करावयाचा असेल तो त्यांनि खुशाल करावा. पण त्याकरिता खाजगी इनामे जप्त करू नयेत. किंवा देवस्थानच्या वहिवाटीत हात घालू नये. राजाच्या ताब्यात अनेक जातीची प्रजा असते. त्या सर्वांशी राजाने ममतेनें वागले पाहिजे. ब्रिटिश अमलात पुनर्विवाहाचा कायदा झाला, त्याचा उद्देश व्यक्तिमात्रापुरते स्वातंत्र्य देण्याचा होता. पण पुनर्विवाहित स्त्रियाना समाजाच्या इच्छेविरुद्ध सार्वजनिक देवळात किंवा उत्सवात घेण्याची सक्ती या कायद्याने किंवा सरकारने केलेली नाही. एखाद्या ज्ञातीला आपला धार्मिक व्यवहार बदलावयाचा झाल्यास तिने तो ज्ञातीच्या संमतीने खुशाल बदलावा. पण त्याकरिता दुसऱ्या ज्ञातीवर जुलूम करू नये किंवा शेकडो वर्षे चालत आलेल्या धार्मिक संस्थात केवळ राज्याधिकाराच्या जोरावर ढवळाढवळ करू नये."

कोल्हापूरकर छत्रपतीनी श्रीमंत राजोपाध्ये यांचे पंचवीस तीस हजारांचे इनामी उत्पन्न बुडविले. पण तेहि असे खंबीर निघाले की उत्पन्न गेले तरी चिंता नाही. पण परंपरा सोडून मी काही करणार नाही. अशा निश्चयाने ते निर्वाणपदावर बसले. इकडे सरकारकडे व विलायतेत या जुलमाविरुद्ध अपीलअर्ज झाले पण त्याचा काही उपयोग झाला नाही. पुढे १९०५ च्या सुमारास हे प्रकरण संकेश्वरच्या शंकराचार्यांकडे गेले तेव्हा स्वामीनी असा निकाल दिला की पूर्वीचे दाखले पाहाता फक्त छत्रपतींच्या घरी वेदोक्त कर्मे करण्यास धर्मदृष्ट्या अडचण नाही. या निकालाला टिळकानीहि आपली संमति दर्शविली. पण जगद्गुरूनी मन मोठे करून वादाचा निर्णय केला तसाच राजोपाध्ये यांची इनामे पूर्ववत् चालवून करवीर छत्रपतीनीहि करावा असे टिळकानी सुचविले.

वेदोक्त प्रकरणामध्ये वादाच्या पद्धतीने वाद होण्यापेक्षा बखेडाच जास्त झाला. व टिळकानी म्हटल्याप्रमाणे छत्रपतीनी तटस्थपणा स्वीकारून सत्तेचा उपयोग दांडगाईने केला नसता तर वादाला इतके विकृत स्वरूप आले नसते. निदान वादाचा सर्व जरी नाही तरी थोडाबहुत तरी निकाल उभयपक्षाच्या दाक्षिण्यबुद्धीने लागला असता. स्वतः छत्रपतीसरकारना क्षत्रिय म्हणावे की नाही हा प्रश्न नव्हता. ते कोणालाहि मान्य होते व संकेश्वरच्या शंकराचार्यांनी दिलेला निकाल बरोबर होता असे टिळकानीहि पूर्वी म्हटलेच होते. त्याचप्रमाणे "सर्व मराठे हे क्षत्रिय आहेत की नाहीत" इतक्या पुरता मुद्दा असता तरी तोहि ब्राह्मण वर्गाकडून मान्य होण्याला अडचण पडली नसती. कारण हिंदुधर्मपरिषदा भरविण्याला पुढे व्यवस्थित स्वरूप आल्यानंतर अलीकडे नागपुरला भरलेल्या परिषदेने तसा ठरावें आपण होऊन पास केलाच की नाही ? वादाला विकृत स्वरूप न येते तर हा निर्णय त्याहि वेळेला का न मिळता ? हिंदु समाजामध्ये फक्त ब्राम्हण व शूद्र हे दोनच वर्ण आहेत असा आग्रह कोणी का धरतील ? निदान चार वर्ण आजहि शिल्लक आहेत हे ब्राम्हणानी मान्य करण्यात चातुर्वर्ण्याची काहीच हानि नव्हती. पण हिंदु वर्णव्यवस्थेत असलेली जातीभेदाची

पद्धतीच महाराजाना नको होती ! व त्यानी असे वेळोवेळी जाहीर रीतीने प्रतिपादलेहि होते. चातुर्वर्ण्य मानणाऱ्या मराठ्याना तरी महाराजांची ही गोष्ट कोठे मान्य होती व आहे ? व ही गोष्ट इष्ट असली तरी हजारो वर्षे रूढीने चालत आलेली असल्याने ती एकदम मोडणे शक्य नाही इतकेच टिळक म्हणत. "राजकीय बाबतीत जशी आम्ही कॉन्स्टिटयूशनल अथवा सनदशीर चळवळ करतो तशीच सामाजिक अगर धार्मिक बाबतीत शास्त्रोक्त चळवळ केली पाहिजे. संस्था किंवा शास्त्र याविरुद्ध एकदम बंड केल्यापासून काही फायदा नाही. लूथरने युरोपात धर्मक्रांति केली म्हणून आपल्या तर्फेचे मोठे उदाहरण सुधारक देत असतात. पण लूथर हा बायबलवर विश्वास ठेवणारा श्रद्धावान् खिस्ती होता. आमच्या सुधारकांची तशी स्थिती नाही." भागवत धर्मातील चातुर्वर्ण्य मान्य असणारानी वेदोक्ताचा अधिकार मागावा यात अर्थ आहे. पण वेदोक्ताचे निमित्त करून सबगोलंकार करू इच्छिणाऱ्यांचे हातून बखेड्याशिवाय दुसरे काहीच होऊ नये हे सरळच झाले. छत्रपती सरकारने स्थापलेल्या सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष भास्करराव जाधव यानी तर चिरोल कमिशनपुढे साक्षीत सांगितले असे की वेदोक्तामध्ये मला काही विशेष अर्थ दिसत नाही. केवळ ब्राम्हण विरुद्ध जातात म्हणून हा हक्क आम्ही मागतो. हिंदुनाच काय पण परधर्मीय मुसलमान खिस्ती यानाहि हा अधिकार असावा असे माझे मत आहे !" यावर टिळकांचे वकील करंदीकर यानी त्याना प्रश्न विचारला "मग तुमच्या मागणीप्रमाणे मुसलमान व खिस्ती यानाहि ब्राम्हणाकडे वेदोक्ताचा अधिकार मागण्याची आवश्यकता वाटत असेल ?" जाधवानी उत्तर दिले "त्यांच्याकडून तशी मागणी अद्याप आली नाही!"

असो. सरतेशेवटी इतकेच सांगावयाचे की कोल्हापुरातील अधिकाऱ्यांच्या वर्तनामुळे या वादाचा सौजन्याने व पद्धतशीर रीतीने त्या वेळी निकाल न झाला तरी "स्वतः टिळकानी व्यक्तिविषयक रीतीने कोल्हापुर सरकारविरुद्ध या वादात काहीहि लिहिले नाही." अशी कबुली चिरोल साहेबांच्या पुस्तकाचे भाषांतरकार डोंगरे यानीच चिरोल कमिशनपुढे दिली आहे.

## (५) जमीन महसुलाचा नवा कायदा

दुष्काळव्यवस्थेत सरकाराने करनकऱ्याचा वसा स्वीकारला होता हे मागे सांगितलेच आहे. उपासमारीने हजारो लोक मेले. पण साऱ्याची सूट माफी तगाई मिळावी तितकी न मिळाल्याने, गुरे ढोरे मेल्याने, सावकारी कर्ज वाढल्याने, जित्याची स्थिती एका अर्थाने मेल्यापेक्षाहि वाईट ठरली. जो मेला तो सुटला. पण जगला त्याचे दुःख पुढे जन्मभर टिकले. दुष्काळ पडल्याबरोबर शेतकऱ्याची स्थिती विपन्न होते हा अनुभव १८८९ सालापासून आलेलाच होता. आणि त्या वेळच्या कर्जबाजारीपणात पुढील वीस सालात भरच पडली. शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणाचा हा प्रश्न सरकारच्या डोळ्यापुढे पूर्वीपासून होताच, आणि १८९६ ते १९००

या सालात दुष्काळामुळे शेतजमिनी शेतकऱ्यांच्या हातून भडाभडा गेल्या हेहि नजरेला आले. अर्थात् याला काही तरी उपाय केला पाहिजे. शेतकरी जगला तर सरकार जगणार. शेतकऱ्याच्या बाजूने या प्रश्नाचा विचार पूर्वीपासून सुरू असून शेतकरी पेढ्या सरकारने काढाव्या अशा सूचना वेडरबर्नसारखे इंग्रज व दिनशा वाच्छा सारखे हिंदी अर्थशास्त्रज्ञ यानी केल्या होत्या. पण सरकाराला त्या मान्य नव्हत्या. म्हणून आता सरकाराने स्वतःची म्हणून एक कल्पना अशी काढली की शेतकऱ्याच्या जमिनी सावकाराकडे जातात त्या मुळी जाऊच देऊ नयेत म्हणजे सर्व बंदोबस्त झाला. जमिनीच्या बळावरच झाले तरी शेतकरी कर्ज काढतो व सावकार ते त्याला देतो. तेव्हा हे त्याचे बळच काढून घेतले म्हणजे सगळी भानगड मिटली. पण हे बळ काढून घ्यावयाचे तर त्याला नवा कायदा करणे प्राप्त. कारण पूर्वीच्या कायद्याने त्याला जमीन विकण्याला प्रतिबंध होत नव्हता. पण जमीन विकण्याचा हक्क काढून घेणे हा कर्जबाजारीपणा थांबविण्याचा उपाय असलाच तर तो राक्षसी उपाय होय. पायाला गळू झाले तर गळवाला इलाज न करता पायच कापून टाकावा असे सुचविण्यासारखाच हा उपाय होता! गळू होत नाही पण पायच जातो, आणि हीच उपचारपद्धति योग्य म्हटली तर ज्या ज्या अवयवाना इजा होणार ते सर्वच एकामागून एक कापून टाकावे असे सहज सिद्ध करता येईल. आणि शरीरच नाहीसे झाले तर रोग कुणाला होणार?

सरंजामी वतनी उत्पन्नाच्या जमिनी विकता येत नाहीत ही गोष्ट लोकाना माहीत होती. पण खात्याची मालकी जमीन विकता येत नाही ही गोष्ट अपूर्वच होती. शेतकऱ्याला ऋणमुक्त करण्याकरिता जमीन विकण्याचा त्याचा हक्कच सरकार काढून घेणार व त्या अर्थाचे एक बिल कायदेकौन्सिलपुढे येणार हे ऐकताच शेतकरी वर्गाचे धाबे दणाणले. सरकारने झाले तरी त्यातल्या त्यात थोडा पर्याय केला होता, नाही असे नाही. कारण यच्चयावत् शेतकी जमीन विकण्याला अपात्र ठरविण्याचे बिल येणार नव्हते, तर जी जमीन सरकार कुळास नव्याने देईल ती देताना ती विकता येऊ नये अशी नवी एक अट घालता येण्याचा अधिकार सरकार या बिलाने आपणाकडे घेणार होते. जुन्या लँड रेव्हिन्यू कोडात शेतसाऱ्याची बाकी थकली असता जमीन खालसा करण्याचा अधिकार सरकारला होताच आणि दुष्काळात सारा न भरता आल्याने या संधीचा फायदा घेऊन सरकाराने जर जमिनी सरसकट खालसा केल्या तर सरकारचे काम सहजच झाले. कारण खालसा जमिनी सरकारच्या झाल्या त्या लोकाना नव्याने देताना नव्या कायद्याची शर्त घालून त्या देता येणार, आणि असे झाले म्हणजे ज्याना जमिनी विकता येतात अशा वर्गाबरोबरच ज्याना जमिनी विकता येत नाहीत अशांचाहि वर्ग निर्माण होणार. पण जमीन ज्याना विकता येणार नाही त्याना कर्ज लागले तर ते कसे मिळावे? याची योजना सरकारने काहीच केली नव्हती. कर्ज मुळीच न काढतां कोणाला शेतकी करून पोट भरता आले तर उत्त-

मच. पण कर्ज काढावे लागले तर त्याला सामान्य शेतकऱ्याजवळ दुसरे तारण काय असणार? जमीन विकावी अशी त्याचीहि इच्छा नसते. होता होई तो ती केवळ तारण म्हणून लावून देऊन गरज भागवावी व पुढे मागे कर्ज वारून ती सोडवावी असाच त्याचा इरादा असतो. मग कर्ज फिटण्याला दुसरा मार्गच नसेल तर जमीन विकली जाईल ही गोष्ट वेगळी. पण जमीन विकण्याला अपात्र ठरली तर ती सावकार तारण म्हणून का घेईल? 'विकता न येणारी जमीन' हे तारण होऊच शकत नाही. अर्थात् तारण नाही म्हणून कर्ज नाही. कर्ज मिळत नाही म्हणून आऊते बी बियाणे नाही. आणि ही नाहीत म्हणून शेतीचे उत्पन्न नाही, या क्रमाने शेतकरी फिरून बेकारच ठरतो. खाजगी लोकाना जमीन विकावयाची नाही तर निदान सरकारने आपल्या ती ताब्यात ठेवून शेतकऱ्याला कर्ज देण्याची काही तोड काढण्याची योजना केली तरच जमीन विकण्यासंबंधी प्रतिबंधाची खरी किंमत. पण ती योजना काहीच नव्हती. यामुळे शेतकऱ्याची कर्जमुक्तता होण्याचे राहून त्याच्या जमिनीची किंमत मात्र कमी होण्याची वेळ आली!

सरकारने पुढे आणलेल्या बिलावर सुदैवाने सर्व पक्षात एकमत होते. या वेळी मुंबई कौन्सिलात मेथा, भालचंद्र, पारेख, गोखले, वगैरे अनेक चांगले लोक होते. त्या सर्वांनी या नवीन बिलाला कसून विरोध केला. आणि या चळवळीला राष्ट्रीय पक्षाकडून जी मदत व्हावयाची ती टिळकानी केसरीच्या द्वारे फार वाखाणण्यासारखी केली. सुमारे सहा महिनेपर्यंत या विषयावर मधून मधून त्यांनी केसरीत अग्रलेख लिहिले. प्रत्येक अग्रलेखाचा मथळा वाचताच स्फूर्ती व आवेश उत्पन्न व्हावा अशी त्यांची शब्दरचना होती. 'शेतकऱ्यानो व सावकारानो सावध व्हा' 'जमिनीची मालकी बुडाली' 'सावकार मेला कुणबीहि मेला' 'बिलाचे तत्त्वच आम्हास मान्य नाही.' हे मथळेच एकत्र वाचले असता या विषयावर टिळकांचे म्हणणे काय होते हे सहज कळून येते. पण या लेखातून नुसता आवेश नसून सोपपत्तिक व समर्पक चर्चाहि आहे. ती थोडक्यात अशीः—

"जमिनीची मालकी किंवा मिरासदारी हा मराठी राज्यात व त्यापूर्वीहि शेतकऱ्याचा मोठा हक्क असे. मुख्य भेद मिरासदार कुळे आणि उपरी कुळे असा होता. उपरी कुळाना अर्थात काही कायम अधिष्ठान नव्हते. त्याना कोणीहि वाटेल तेव्हा घालवून द्यावे. पण मिराशी कुळाचे सरकार–देणे थकले तरी ते काही रीतीने वसूल होईपर्यंतच त्यांच्या हातून जमीन सरकाराकडे जाई पण ते देणे फिटल्यावर त्याजकडे परत येई व तोपर्यंतहि ती त्याचाच मालकीची गणली जाई. अशा रीतीने जमिनीचा मालक शेतकरी आणि फक्त साऱ्याच्या रकमेचे मालक सरकार अशी पूर्वपरंपरा हिंदुस्थानात होती. पण १८७९ च्या सुमारास सरकारने नवा कायदा करून असे ठरविले की शेतकऱ्यांचा हक्क फक्त जमिनीचा 'पृष्ठभाग' नांगरण्याचा आणि ठराविक सारा तो सरकारास देत राहील तोपर्यंतच जमीन नांगरण्या पिकविण्याचा हक्क त्यास उरेल. मात्र तो वंशपरंपराहि राहील. या कायद्यामुळे जमिनीची मालकी

सरकाराकडे गेली. पण अशाहि स्थितीत जमीन विकण्याचा हक्क कुळाकडे उरला होता. सरकारने जोपर्यंत आपल्या देण्याकरिता खात्याची जमीन खालसा केली नाही तोपर्यंत ती त्याला विकता येत असे. पण नव्या बिलाने हा मर्यादित हक्कहि सरकारने काढून घेण्याचे ठरविले होते. असा कायदा झाल्याने कुळाला आपण नेहमी उपरी कूळ आहो असेच वाटणार. आणि जेथे गुलामगिरीचा व्यापार चालू आहे अशा देशाखेरीज इतर कोठेहि असा प्रकार आढळणार नाही. मुसलमान राजेलोकानी देखील शेतकऱ्यांचा हा हक्क काढून घेतला नव्हता. आयर्लंडात चळवळ झाली ती कुळाना जमिनीचा मालकी हक्क राहावा व आपण स्थिरपद आहो असे वाटून शेतीची सुधारणा करण्याविषयी त्याना उत्तेजन मिळावे अशा विषयीच झाली आणि अखेर त्याप्रमाणे प्रधानमंडळाने कायदाहि करून दिला. पण इकडे सरकारने 'सावकार हाच काय तो शेतकऱ्याचा शत्रू' अशी आपली खोटी समजूत करून घेतली. आपला शेतसारा व तो वसूल करण्याची पद्धति ही दोन्ही शेतकऱ्याला जाचक होतात ही गोष्ट त्यानी लक्षात आणली नाही आणि आधीच निर्बल असलेल्या शेतकऱ्याला अधिक परतंत्र व असहाय करण्यासारखे हे बिल आणले. यात त्यानी काय मिळविले? शेतकऱ्याची सोय ती त्यानी काय पाहिली? शेतकऱ्याना नंगे फकीर बनवून सरकाराला तरी उद्या काय मिळणार? सावकार बळी गेले, सावकारीचा धंदा बुडाला आणि शेतकऱ्याला मात्र कर्जाची सोय काहीच नाही. शेतकऱ्याचे सावले वन गेले म्हणजे तो शुद्ध मजूर बनणार. ही स्थिती केवढी अनिष्ट व भयंकर होय!" अशा तऱ्हेचा युक्तिवाद करून टिळकानी प्रथम सरकारकडे धडाधड अर्ज पाठविण्याचा सल्ला शेतकऱ्याना दिला.

बिलाच्या पहिल्या व दुसऱ्या वाचनाचे वेळी खूपच खडाजंगी वाद झाला. गोखले यानी सरकारचे मन सामोपचाराच्या युक्तिवादाने वळविण्याची पराकाष्ठा केली आणि मेथा यानी तर उग्र स्वरूप आणून टीकेच्या हातोड्याचे घाव घातले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. सिलेक्ट कमिटीत लोकपक्षाविरुद्ध बहुमत झाले. पण गोखले छत्रे वगैरे सभासदांचे स्पष्ट मत दिल्याबद्दल टिळकानी मनःपूर्वक अभिनंदन केले. कायदेकौन्सिलात काही चालत नाही तर मग त्याचा फार्स तरी कशाला? असा प्रश्न सहजच उपस्थित झाला. मुंबईस मेथा यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून सर्व प्रांतातील लोकमताचे एकीकरण करण्यात आले. या सभेला ७०० प्रतिनिधी हजर होते. सरकाराकडे सुमारे ७०० अर्जहि पाठविण्यात आले होते. पण त्याचाहि उपयोग झाला नाही. अखेर बिलाच्या शेवटच्या वाचनाचे वेळी मेथा वगैरे काही लोक आणखी मुदत मागू लागले तीहि मिळाली नाही. तेव्हा मेथा पारेख गोखले खरे भालचंद्र वगैरे मंडळी निषेध म्हणून कौन्सिलातून उठून गेली. फक्त सरंजामदार पेन्शनर वगैरे काही ताटाखालची मांजरे उठून गेली नाहीत. तथापि इचलकरंजीकर यानी मेथा यांच्या बाजूला मत दिले. अशा रीतीने या बिलाची आरती कौन्सिलात झाली. पण जखमेत मीठ भरावे त्याप्रमाणे टाइम्स वगैरे पत्रानी

पळपुटे सभासद म्हणून मेथा प्रभृतींची चेष्टा केली. टिळकानी लिहिले की ही थट्टा मेथा गोखल्यांची नव्हे तर सत्याची, खऱ्या लोकमताची, राजनितीची व मुत्सद्देगिरीची होय. टिळकांचे या बाबतीतले लिहिणे किती सडेतोड व आवेशयुक्त असेल याची कल्पना वाचकाना होईलच. पण या विषयाच्या चर्चेत त्यानी मार्मिकपणाहि कसा दाखविला याविषयी एक शब्द लिहितो. प्रश्न असा होता की शेतकरी ऋणमुक्त व्हावा की नाही ? त्याला टिळकानी उत्तर दिलेच होते की त्याला ऋणमुक्त करण्याचा खरा उपाय या बिलातून मिळत नाही. पण याच्याहि पलीकडे जाऊन शेतकरी हा थोडाबहूत कर्जात असला तरी चालतो असेहि त्यानी प्रतिपादिले. ते लिहितात, "ऋणमुक्त असून गावोगाव भटकत हिंडणाऱ्या उपरी कुळापेक्षा गावातच मालकी हक्काने जमीन वाहणारे पण थोडेसे कर्ज असलेले शेतकरी बरे नव्हेत काय ? ऋणमुक्त असल्यातच काही सुख नाही. कारण तसे असते तर बैल घोडे गाढवे ही देखील दक्षिणेतील शेतकऱ्यापेक्षा अधिक सुखी असतात असे म्हणावे लागेल. किंबहुना 'यद्वक्त्रं मुहुरीक्षसे न धनिनां' म्हणजे सावकाराचे तोंडसुद्धा पाहण्याचा तुला प्रसंग येत नाही अशी वनातील हरिणाची स्तुती करून भर्तृहरीने अखेरीस 'तन्मे ब्रूहि कुरंग ! कुत्र भवता किं नाम तप्तं तपः' असा जो प्रश्न केला आहे त्याचीच सत्यता लॉर्ड नॉर्थकोट यांच्या कारकीर्दीत आज पर्यायाने येत आहे असे आम्हास वाटते."

## (६) स्वामी हंसस्वरूप

सन १९०२ च्या मे जून महिन्यात स्वामी हंसस्वरूप यांची व्याख्याने पुण्यास आप्पाबळवंताच्या वाड्याजवळील मैदानात झाली. स्वामीजींचे वक्तृत्व विशेष चांगले असल्यामुळे व्याख्यानास खूप गर्दी लोटत असे. रोज दीड दोन तास प्रमाणे त्यांच्या वाक्पांडित्याचा ओघ अस्खलित चाले. टिळकानी स्वामींचा पुरस्कार फार चांगल्या रीतीने केला. आणि शेवटी त्याना छाट्या व शालजोडी देऊन लोकानी त्यांचा जाहीर सत्कार केला. आनंदाश्रम व सोमेश्वराचे देवालय येथेहि स्वामीजींचा सन्मान करण्यात आला. शेवटी चार घोड्याचे गाडीत स्वामीजींना बसवून चिमणबागेपासून स्टेशनपर्यंत त्यांना पोचविण्यात आले. उत्तर हिंदुस्थातील एका हिंदी स्वामींचा हा संतोष सत्कार आणि उत्तर हिंदुस्थानातल्याच स्वामी दयानंद याच्या सत्काराचा पूर्वी उडालेला बोजवारा लक्षांत घेतला म्हणजे त्यामधील विरोध मोठा गमतीचा वाटतो. पण त्यातील मर्म हे की हे स्वामी दयानंद स्वामी सारखे हिंदुधर्मातील देवता मूर्तिपूजा तीर्थे वगैरेवर टीका करणारे नसून सनातनी पद्धतीचे होते. शेवटच्या व्याख्यानात त्यानी रामनामाचा महिमा गाइला. त्यांच्या व्याख्यानात ब्रह्म माया असले तात्त्विक वादविषय नसत. धर्माची मुख्य तत्वे व आचार याच्या संबंधीचा त्याचे विवेचन असे आणि नव्या पिढीच्या सुशिक्षित लोकांच्या मनावर परिणाम करण्याला त्याची व्याख्याने फार उपयोगी पडण्या-

सारखी होती. या त्यांच्या लोकसंग्राहक गुणामुळे टिळकानी स्वामीजींच्या सत्काराला उचलून धरले होते. आपणामध्ये योगी पुष्कळ आहेत, ज्ञानी आहेत, काशी सारख्या क्षेत्रातून शांकरभाष्याचा अभ्यास करणारे संन्यासी आहेत पण धर्म संस्थापनेचे कार्य अशा बैठ्या पुस्तकी लोकाकडून होत नाही. तर या कामाला मनुष्य वक्ता असून शिवाय तो हिंडणारा फिरणारा पाहिजे. सभाधीट पाहिजे अनुरूप दाखले व दृष्टांत देणारा पाहिजे आणि आक्षेप शंका कुशंका या सर्वांना समयोचित समर्पक उत्तर देणारा पाहिजे. अशांच्याच हातून विचारक्रांतीला मदत होते. या दृष्टीनेच टिळकानी स्वामीना महत्व दिले. या व्याख्यानमालेच्या प्रसंगी त्यांचा व प्रो. जिनशीवाले यांचा बराच तंटा झाला. जिनसीवाले हे विद्वान खरे पण मोठे तामसी असत. शिवाय पद्धतशीर वादविवाद करणे आणि तो न भांडता न रागावता करणे ही गोष्ट त्याना येत नव्हती. जिनसीवाले हे अत्यंत धर्माभिमानी असले तरी वेद हे ईश्वरप्रणीत नाहीत मनुष्यकृत होत असे मानणारे होते. वेदांच्या अपौरुषयेत्वावरचे आक्षेप सांगण्याकरिता त्यांचे एक स्वतंत्र व्याख्यान स्वामीना उत्तरा दाखल करण्यात आले. परंतु त्यांची प्रस्तावनाच लांबल्यामुळे त्याना आपला विषय संपविता आला नाही व त्यानंतर इतर व्याख्यानांचा योग आला नाही. या वादात टिळकानी स्वामींचा पक्ष उचलला होता व ते जिनसीवाल्यांचे प्रतिवादी बनले. प्रो. जिनसीवाले यांना पूर्वी मुंबईचे राजारामशास्त्री बोडस व काशीचे कृष्णानंद स्वामी यानी उत्तर दिले होते. तसेच फार जुन्या काळी जैमिनी पतंजलि कपील इत्यादिकानी पौरुषेय म्हणजे काय व अपौरुषेय म्हणजे काय यांची छाननी केलेलीच आहे. या ऋषींनी वेद अपौरुषेय याचा अर्थ इतकाच केला आहे की वेदातील अर्थ हा नित्य होय, शब्द नित्य नव्हेत. वेदाचा अर्थप्रवाह अविच्छिन्न परंपरेने चालत आलेला आहे. टिळकांचे म्हणणे अपौरुषेय याचा अर्थ वरीलप्रमाणे घेतल्यास जिनसीवाले यांचे आक्षेप त्याला लागू पडत नाहीत. वेदांतील आधार देऊनच जर वेद पौरुषेय ठरवावयाचे तर त्यातलेच आधार देऊन जर कोणी त्याना अपौरुषेय म्हटले तर त्यात चूक कोणती ? ज्या वेदात ही ऋचा आम्ही बनविली असे ऋषिवचन आहे त्याच वेदात वेद ईश्वरप्रणीत आहेत असेहि वचन आहे. पुराव्याला ह्या दोन्ही गोष्टी ग्राह्य तर सारख्याच ग्राह्य आणि अग्राह्य तर सारख्याच अग्राह्य मानल्या पाहिजेत. या दोहोंचा मेळ टिळकाच्या मते असा बसतो की वेद अर्थाच्या दृष्टीने नित्य मानले व अति प्राचीनत्वाच्या अर्थाने अनादि मानले तर ते पौरुषेय आहेत असे सिद्ध करिता येत नाही, आणि ज्याअर्थी ते पौरुषेय आहेत असे सिद्ध करता येत नाही त्या अर्थी त्याना पौरुषेय असे कोणी म्हणू नये. आणि 'अपौरुषेय' असा शब्द केवळ विशिष्ट अर्थाने घ्यावा. टिळकांची ही विचारसरणी त्यांच्या 'आर्यांचे वसतिस्थान' या ग्रंथात एका स्वतंत्र भागात विशद केलेली आहे. जिनसीवाले व टिळक या उभयतामध्ये झालेला हा मतभेद लोकाना आश्चर्यजनक असा झाला. कारण दोघेहि वेदाचे अभिमानी, दोघेही सनातन धर्म परंपरेचे पुर-

स्कर्ते असे असता त्याची मते का जुळू नयेत हे कित्येकाना उमगणे अशक्य झाले. धर्माचाराच्या दृष्टीने जिनसीवाले टिळकापेक्षा अधिक श्रद्धाळू व धार्मिक असे असता या क्षणी तरी असा देखावा दिसला. वेद विशिष्ट अर्थाने का होईना पण ते अपौरुषेय आहेत असे प्रतिपादन करण्याकडे टिळकांचा झोक, आणि त्याना स्पष्ट पौरुषेय असे म्हणून वेदांच्या विषयीची प्रामाण्य बुद्धि जिनसीवाले कमी करणार! एकाच भावनेने या दोघानाही पुराण मतवादी मानणारे भोळे भाबडे लोक ही तारेवरची कसरत पाहून भांबावून गेले असल्यास नवल नाही. विद्वान या नांवाने उल्लेखिण्याला टिळक व जिनसीवाले हे दोघेही योग्य, परंतु टिळकाइतकी कुशाग्र-बुद्धि व चिकित्सकपणा जिनसीवाले याजमध्ये नव्हता यामुळे तुल्यबल अशा दोन पेहेलवानात ज्याला पेचाची अधिक माहिती तो दुसऱ्याला हटकून पाडू शकतो, त्या प्रमाणे जिनसीवाले यांच्या ढोबळ विद्वत्तेला टिळकांच्या कोटिक्रमापुढे हार खाण्याशिवाय गत्यंतर नव्हते पण सुदैवाने या उभयतामध्ये जाहीर रीतीने असे मत-भेद व वाद होण्याचे प्रसंग क्वचित येत.

## (७) पैसाफंडाचा उगम

कोणत्याहि चळवळीचा उगम नदीच्या उगमासारखाच असतो. त्याचा शोध करीत मागे, त्याहून मागे जाऊ लागलो म्हणजे अशा दोनचार जागा दिसतात की तेथून मूळ प्रवाह निघाला असावा असे वाटते. ह्याचा अर्थ नदीचा उगम नक्की अमक्या पावलाच्या जागी हे म्हणणे खरे ठरत नाही. दुसरीहि एक गोष्ट ह्या संबंधात दिसून येते ती अशी की, खऱ्या उगमाची ही अनेक स्थळे सुटून जाऊन पुढे कोठेतरी, म्हणजे या अनेक उगमातील पाणी एकत्र मिळते त्या स्थानाला उगम हे नाव मिळून त्याचीच प्रतिष्ठा वाढते. या संबंधात तिसरी गोष्ट ही की खरा उगम येथे किंवा दुसरा कोठे असला तरी नदीला जे वाहते स्वरूप येत ते पुढे कोठे तरी पाण्याचा मोठा झरा मिळाल्यामुळे येते. या दृष्टीने नदीच्या पवित्रतेचे श्रेय या तिघात वाटून द्यावे लागते. पैसाफंडाच्या कल्पनेसंबंधीहि हीच गोष्ट खरी ठरते. १९०० साली केसरीत पैसाफंड या विषयावर प्रथम अग्रलेख आला. आणि त्या वेळी अंताजी दामोदर काळे हे स्वतःच्या स्फूर्तीने गावोगाव हिंडून पैसाफंड गोळा करण्याचे काम करीत होते. म्हणून टिळकानी त्याना पैसाफंडाचे उत्पादक असे नाव दिले व पुढेहि एके वेळी लिहिताना काळे यानी ही कल्पना काढली असे म्हटले गेले. या गोष्टीचा काळे याना सात्त्विक राग येऊन त्यानी ता. १२ ऑगस्ट सन १९०२ च्या केसरीत एक पत्र लिहून आपल्या अंगाला चिकट-णारे हे नसते श्रेय झाडून झटकून टाकले. टिळकानी चूक केली ती दुरुस्त करावी असा त्यांचा हेतु होता. या नंतरच्या काळात अलिकडे 'पैसाफंडाचे उत्पादक' हे शब्द त्याना कोठे न लावले तर काळे हे रागावू लागले होते. पण पूर्वी याच्या उलट प्रकार असे. ते या पत्रात लिहितात की सन १८७३ साली वसई येथील

गोविंद बाबाजी जोशी यानी " सार्वजनिक पै फंडाची पेटी " या विषयावर एक निबंध छापला. त्यावर कोणी रिसबूड पटवर्धन ओक इत्यादि गृहस्थानी या फंडाची उपयुक्तता ध्यानात आणून लहान लहान पुस्तके प्रसिद्ध केली. १८९४ साली गोपाळ अनंत भट महाड येथील मुनसफ यानी 'निरपेक्ष भांडवल' नावाचा एक निबंध प्रसिद्ध केला. व त्यासबंधी कोठे कोठे व्याख्यानेहि दिली. १८९४ साली गुर्जर आणि ठाकूर यानी या कल्पनेविषयी मुंबईत हजारो हस्तपत्रके वाटली. आणि १८९६ साली उंबरगाव येथील पिंपुटकर कारूळकर व परांजपे यानी आपल्या पेट्यातील लोकाना उद्देशून पैसाफंडाबद्दल एक लेख प्रसिद्ध केला. आणि त्याची एक प्रत काळे यांच्या नजरेस पडली. तेव्हापासून त्यांचे लक्ष या विषयाकडे लागले व त्यानीहि मग ' हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीचे चित्र ' या नावाचे एक पुस्तक लिहून त्यात पैसाफंडाची कल्पना गोवली. १८९८ साली न्यायमूर्ती रानडे यानी या कल्पनेला उत्तेजन दिले. १८९९ साली काळे यानी आपला इतर व्यवसाय सोडून पैसाफंडावर व्याख्याने देण्यास सुरवात केली आणि इंदूर उज्जयनी झाशी ग्वाल्हेर येथपर्यंत दौरा काढला. सन १९०० साली सातारा येथील प्रांतिक परिषदेपुढे एका ठरावावर भाषण करिताना काळे यानी ही कल्पना पुढे मांडली. नंतर त्यानी या कामी पुणे सार्वजनिक सभेशी पत्रव्यवहार केला आणि या कामी खपून श्रमून आपला सर्व वेळ घालविण्याला एक मनुष्य तयार झाला असे पाहिल्यावर टिळकानी पैसाफंडाची कमेटी बनविण्याला मान्यता दिली, स्वतः त्यावर राहण्याची कबूली दिली आणि केसरीत अग्रलेखहि लिहिला. यानंतर पैसाफंडाचे कल्पनेस तेज व स्वरूप येऊन त्याचा बराचसा निधि जमला. त्यातून काचकारखाना निघाला आणि त्या कारखान्यात मूळ शिकून बाहेर पडलेल्या उत्साही विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या ठिकाणी कारखाने काढून हा धंदा वाढविला हा वृत्तात आता लोकाना माहीतच आहे. वरील हकीगतीवरून पूर्वी दिलेली नदीची उपमा वाचकाना पटेल. कारण कल्पनेचा खरा उंगम काळयांच्या पूर्वी पुष्कळ दिवस झाला खरा, तरी कल्पनेचे पाणी एका वाहत्या प्रवाहांत न मिसळता जागच्या जागी जिरले. पण ती कल्पना हाती घेऊन हिंडून फिरून काळे हे तिचा प्रसार करू लागले तेव्हा त्या प्रवाहाचे पाणी बारीक स्वरूपात का होईना पण वाहू लागले. पण टिळकांचा आश्रय व आधार मिळेपर्यंत त्या नदीला पूर आला नाही व ती एक मोठी वाहती नदी आहे असेहि कोणास वाटले नाही. तात्पर्य पैसाफंडाच्या चळवळीचे श्रेय जर कोणास द्यावयाचे असेल तर ते अशा तीन कारणाकरिता तीन ठिकाणी वाटून दिले पाहिजे.

## ( ८ ) नवा केसरी

तारीख ७ जानेवारी १९०२ च्या केसरीत केसरीपत्राच्या स्वरूपात वडणाऱ्या क्रांतीची सूचना टिळकानी दिली होती. ही क्रांति म्हणजे केसरीचा आकार

तोच ठेवावयाचा पण पाने दुप्पट करावयाची ही होय. या सालच्या पहिल्या अंका-पासूनच केसरी नव्या स्वरूपात निघणार होता. परंतु छापखान्याच्या अडचणीमुळे ती गोष्ट घडू शकली नाही. नवा केसरी प्रथम ता. ४ फेब्रुवारी रोजी निघाला. आणि ११ फेब्रुवारीच्या अंकात या क्रांतीला उद्देशून टिळकानी एक मोठा अग्रलेख लिहिला. त्यात ते म्हणतात " एकवीस वर्षांपूर्वी आम्ही दहा पाच मंडळी मिळून केसरीपत्र काढण्याचे ठरविले. तेव्हाच्या व आताच्या स्थितीत पुष्कळ फरक पडला आहे. या एकविसाव्या वाढदिवसाच्या प्रसंगी आनंदापेक्षाहि जबाबदारीची जाणीवच अधिक होते. केसरी सुरू करण्याच्या वेळची सर्व सहकारी मंडळी नामशेष झाली. निवळ मराठी पत्र यशस्वी होईल की नाही याची १८८० च्या सुमारास लोकाना शंका वाटत असे. आणि दोन भाषेत काढलेल्या पत्रातील इंग्रजी मजकुराला लोक अधिक मान देत. वर्तमानपत्राची वर्गणीहि तेव्हा जास्त होती. केवळ मराठीतून पत्र चाल-विण्याचा प्रयत्नच तेव्हा व्हावा तितका झाला नव्हता. विष्णुशास्त्री यानी भाषेला विलक्षण तेज आणले होते परतु ते अद्याप मासिक पुस्तकातच होते. गेल्या वीस वर्षांत शिक्षण सर्वच बाजूनी वाढले आहे. केसरीला प्रारंभी ७०० पासून हजार वर्गणीदार होते. पुढच्या साली टपाल हशील कमी झाल्यामुळे ती संख्या एकदम दुप्पट झाली. व १८८४ साली ही संख्या बेचाळीसशेवर येऊन ठेपली. यापुढे झालेल्या चळवळीमुळे १९०२ साली वर्गणीदारांची संख्या तेरा हजार झाली व वाचकांची संख्या सुमारे पाऊण लाखापर्यंत गेली. या काळात केसरीबरोबर इतर काही वर्तमानपत्रेहि उदयाला आली. यावरून केसरीने स्वतःची अभिवृद्धि केली इतकेच नव्हे तर एकंदरीने मराठी वर्तमानपत्राच्या अभिवृद्धीला तो कारणीभूत झाला. वाचनाच्या अभिरुचीचा जो वृक्ष केसरीने लावला त्याला अनेक फळे यावी हे स्वाभाविक होते. एकाच बागेत निरनिराळी फळझाडे व फुलझाडे होतात त्याचप्रमाणे ही गोष्ट आहे.

" केसरीची भूक वाढली त्याप्रमाणे त्याचे भक्ष्य पदार्थहि वाढले. १८८१ साली केसरीत मजकूर येत होता तो हल्लीच्या केसरीच्या पाच कालमाइतका असे. १८८४ साली आकार वाढला तेव्हापासून त्यातील मजकूर दुप्पट झाला. १८९१ साली केसरीची वर्गणी वाढवून आकार आणखी वाढवावा किंवा कसे हा प्रश्न उपस्थित झाला. पण वर्गणी तीच ठेवून टाईप लहान घालावा म्हणजे मजकूर अधिक वाढेल असे ठरले. केसरीचे हे असे स्वरूप पुढे सुमारे अकरा वर्षे टिकले. केसरीच्या स्वरूपात क्रांति करण्याची जाहिरात दिली तेव्हा अनेकानी अनेक सूचना केल्या. त्यात केसरी दररोजचा काढावा अशाहि सूचना होत्या. पण तो तसा केला असता त्याची वर्गणी कमीत कमी बारा रुपयापासून पंधरा रुपयापर्यंत ठेवावी लागेल म्हणून ती सूचना केवळ अग्राह्य ठरली. किंमत वाढवून वर्गणीदार कमी झाले तरी नफा एकं-दरीने जास्ती होईल. पण खेडगावातल्या लोकानीहि केसरी घ्यावा व वाचावा अशी इच्छा व उद्देश असल्यामुळे वर्गणी वाढवून वाचकांची संख्या कमी करणे इष्ट नाही.

वाचक तर कमी न व्हावे आणि केसरीची उपयुक्तता तर वाढावी या हेतूनेच पूर्वीच्या सुधारणा झाल्या. केसरीची वर्गणी दीड रुपयाहि न ठेवता एक रुपया ठेवावी अशाहि लोकानी सूचना केल्या. पण केसरी दुप्पट केल्यास नुसत्या कागदाचाच खर्च नऊ आणे येतो. बाकीचा सर्व खर्च सात आण्यात झेपणे शक्य नाही. परदेशी गवताचा कागद केसरीला घालण्याचे कारण हेच की त्याची किंमत कमी ठेवता यावी. बारीक टाईप ही गैरसोय देखील त्यांतल्यात्यात वाचकाला अधिक मजकूर देण्याकरिता पतकरावी लागली. केसरीचा आकार मोठा करावा अशा काहीनी सूचना केल्या. पण तसे करण्यात छापण्याची फार गैरसोय म्हणून मध्यम आकारच पसंत केला. केसरी छापण्याला यंत्र आणले ते चार हजारावर वर्गणीदार झाले तेव्हा. पण वर्गणीदारांची संख्या हल्ली वाढल्यामुळे त्या यंत्राने भागत नाही. याकरिता एका दिवसात वीसपासून चाळीस हजारपर्यंत प्रति ज्यावर निघतील असे एक नवीन यंत्र सध्या आणविले आहे व ते चालविण्याला तेलाचे एंजिन घेतले आहे. याचे सहाय्याने केसरीची एक बाजू दर ताशी तीन हजारप्रमाणे छापता येते. ही व्यवस्था अपुरी पडेल तेव्हा आणखी नवे यंत्र आणू. आतील मजकुरासंबंधाने पाहता जागेच्या अभावामुळे बातमी वर्तमान वगैरेसंबंधाने केसरीचे दुर्लक्ष झाले. पण यापुढे आकार दुप्पट वाढविल्यामुळे संपादकीय लेख यत्किंचितहि कमी न करता अवांतर पुष्कळशी माहिती केसरीत देता येईल. लायब्ऱ्यातून वर्तमानपत्रे व मासिक पुस्तके वगैरे वाचून जी माहिती मिळते ती वाढलेल्या दहा कॉलमात देण्याचा विचार आहे. काही ठिकाणी बातमीदारहि ठेवण्याचा विचार आहे. केसरी हे काही एका जिल्ह्याचे वर्तमानपत्र नव्हे. तरी सर्वसाधारण कोठेहि गोष्टी घडतात त्या केसरीत देता याव्या अशी योजना आहे. केसरीत मुळीच जाहिराती घालू नयेत अशा काहींच्या सूचना होत्या. पण जाहिरात छापण्याचा खर्च भागून जी कसर उरते तिची मदत खर्चाला बरीच होते. जाहिरातीचे दर फार कमी नसले तरी जाहिरातवाल्याना खर्चाचा मोबदला भरपूर मिळतो. कारण केसरीच्या प्रति खपतात इतक्या जाहिराती दर आठवड्याला काढून त्याना इतक्या खर्चात वाटता येणार नाहीत. जाहिरातीच्या उत्पन्नाच्या मदतीशिवाय केसरीचा आकार वाढविणे शक्य नव्हते."

केसरीची पाने वाढविण्याची कल्पना लोकांपुढे मांडताना त्याला यापुढे "एका वस्त्राऐवजी दोन वस्त्रे द्यावयाची" असे टिळकानी म्हटले. या शब्दयोजनेतून एका वैदिक संस्काराचा ध्वनि निघतो. केसरी पुन्हा हाती घेताना त्यानी "पुनश्च हरिः ॐ" असे लिहिले. यातहि वैदिक भावनाच लेखकाच्या मनात होती असे उघड होते. दाखले व उपमा या मनुष्याला कशातून सुचतात हे त्याच्या मनःसंस्कृतीवर अवलंबून असते. ती संस्कृती ओळखण्याची ही एक अचुक खूण आहे.

"केसरीने मराठी वर्तमानपत्रांच्या व वाचकांच्या अभिरुचीला वेगळी दिशा लावली. ही दिशा कोणती याबद्दल थोडेसे स्पष्टीकरण करणे जरूर आहे. २० वर्षा-

पूर्वी इंग्रजी शिकलेल्या लोकास वर्तमानपत्रात एखादा लेख लिहिणे असल्यास तो इंग्रजीतच लिहावा असे वाटत असे. कोठेहि उत्कृष्ट इंग्रजी लेख आले म्हणजे त्याचे मराठीत भाषांतर करावे अशी त्या वेळची पद्धति होती. इंग्रजीतील लेख प्रधान व मराठीतील गौण अशी स्थिति असल्यावर सदर लेखांच्या वाचकवर्गाची व्याप्तिहि इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या पलीकडे फारशी गेली नाही यात काही नवल नाही. त्या वेळच्या व हल्लीच्या काळात मोठा फरक म्हटला म्हणजे हा की, वीस वर्षां-पूर्वी मराठी वर्तमानपत्रातून लेख लिहिणारे प्रसिद्ध गृहस्थ आपले लेख मुख्यत्वे-करून इंग्रजी शिकलेल्या लोकाकरिताच आहेत असे समजत. आणि त्या वर्गास ते पसंत पडले म्हणजे आपले काम झाले असे मानीत. पण याखेरीज या वर्गापलीकडे-हि निवळ मराठी लिहिता वाचता येणारांचा एक मोठा वर्ग आहे व त्यांच्या हिता-हिताची चर्चा आपणास कर्तव्य आहे असा अलीकडे लेखकांच्या समजुतीत स्पष्ट बदल होत चालला. नुसत्या इंग्रजी शिक्षणाने हरएक बाबतीत एक प्रकारचा पूर्वापार परिस्थितीशी विसंगत असा परकेपणा उत्पन्न होऊन इंग्रजी शिकलेल्या लोकास त्याबद्दल थोडा अभिमानहि वाटत असतो; व हा अभिमान पुष्कळ वेळा, इंग्रजी न शिकलेले पण समजूतदार असे जे लोक असतात त्यांच्यामध्ये आणि इंग्रजी शिकलेल्या लोकामध्ये पूर्ण ऐक्य होण्यास आड येतो. ह्या अडचणी काढून टाकून पूर्ण इंग्रजी शिकलेल्या लोकांखेरीज इतर वर्गांचे म्हणणे काय आहे, त्यांचे काही आक्षेप असल्यास ते सयुक्तिक आहेत की नाहीत, हे त्यांच्यापैकीच एक आपण आहोत व आपणास जो काही उद्योग करावयाचा आहे तो त्यांच्या हिताकरिताच आहे आणि तो त्यास बरोबर घेऊनच केला पाहिजे, अशा समजुतीने पाहण्याची किंवा त्याबद्दल चर्चा करण्याची केसरीने सुरवात केली. निदान तसाच सरोस प्रघात पाडला असे म्हणण्यास हरकत नाही.

"गेल्या २१ वर्षांत केसरीवर कित्येक बडया मंडळींची जो अवकृपा झाली, त्यानी पूर्वी सुरू केलेल्या कित्येक उद्योगास केसरीकार विरुद्ध आहेत असे भास-वण्याचा जो प्रयत्न झाला, अथवा केसरीच्या पहिल्या पुरस्कर्त्यांत सुधारकास वेगळे व्हावे लागले यातील बीज आता लोकास कळून येईल. परंतु नवे विचार आणि नव्या गोष्टी लोकास सांगताना त्याना केवळ मूर्ख न मानता युक्तिने व धोरणाने नव्या जुन्याचा मेळ घातला पाहिजे असेच केसरीकारांचे स्पष्ट मत आहे. केवळ इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या विचारावर भिस्त न ठेवता, समाजाचे हिताहित ठर-विताना मोठया वाचक वर्गाच्याहि समजुती जमेस धरल्या पाहिजेत. इतकेच नव्हे तर योग्य असतील त्यांचे समर्थन केले पाहिजे. अशा रीतीने वागण्याचा केसरी-कारांचा संकल्प आहे. मग कोणी निंदो की स्तुती करो"!

राजकीय बाबतीत केसरीच्या धोरणासंबंधाने लिहिताना टिळकानी असे स्पष्ट लिहिले आहे की, "आम्हास कोणाचे राज्य घ्यावयाचे नाही. तर आमच्या लोकांची स्थिति सुधारण्याकरिता हल्लीच्या राज्यछत्राखालीच त्याना तयार करावयाचे आहे व

हा जोपर्यंत आमचा हेतु आहे तोपर्यंत आम्हास कोणासहि भिण्याचे कारण नाही. केसरीचा जन्म झाला तो लिटन साहेबांच्या कारकीर्दीत मुद्रणस्वातंत्र्याचा कायदा झाला त्या वेळी. राज्यकर्त्यांस गोड गोड न वाटली तरी, कडू न वाटेल अशा तऱ्हेने लेख लिहिण्याची पूर्वी पद्धति होती. पण तिची वेळ आता गेली. लोकात जागृति कळकळ व संघशक्ति उत्पन्न करणे हेच वर्तमानपत्रकार या दृष्टीने आमचे मुख्य कर्तव्य आम्ही समजतो. आम्ही केसरीत जे लेख लिहितो ते केवळ राज्यकर्त्यांकरिता नसून आमच्या मनातले विचार, आमच्या मनातील तळमळ, किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनात उतरावी येवढ्याकरिताच आहे व आमच्या लेखांचा जर असा परिणाम होत नसला तर आमचे श्रम फुकट गेले असे आम्ही समजू. " किं कवेस्तेन काव्येन किं कांडेन धनुष्मतः। परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिरः। " अशी जी एक संस्कृत उक्ति आहे तीच वर्तमानपत्रासहि लागू आहे."

सरतेशेवटी उपसंहारादाखल टिळकानी लिहिले " न हि स्वदेहशैत्याय वर्धन्ते चंदनद्रुमाः" हे वाक्य केसरीने सतत डोळ्यापुढे ठेवले आहे. आजपर्यंत ज्या लोकानी केसरीस मदत केली व अनेक संकटाच्या प्रसंगी त्यास धीर देऊन सहाय्य केले त्या सर्वांचे उतराई होणे अशक्य आहे. ज्या गृहस्थानी केसरीचे पुरस्कर्तृत्व पत्करून त्यास जन्मास आणले त्यापैकी प्रस्तुत लेखकच कायतो आज जाग्यावर राहिला आहे! व त्या गृहस्थापैकी सल्ला मसलत देण्याला कोणीहि राहिला नाही हे मनात आले म्हणजे बाविसाव्या वाढदिवसाच्या दिवशीहि केसरीचे मन खिन्न झाल्याशिवाय राहात नाही. केसरी हे एका व्यक्तीच्या उदरनिर्वाहाकरिता काढलेले पत्र नाही. केसरी सर्व महाराष्ट्राचा आहे. म्हणून केवळ संकटसमयीच नव्हे तर इतर वेळीहि केसरीस सर्वांच्या मदतीची अपेक्षा आहे. मतभेदाच्या प्रसंगी स्वकर्तव्य स्मरून कित्येक वेळा केसरीस उग्र स्वरूप धारण करावे लागले, पण हा दोष असल्यास त्याने तो पत्करलेल्या व्यवसायामुळे प्राप्त झाला आहे नैसर्गिक नव्हे हे लक्षात ठेवावे. व केसरीने आज एकवीस वर्षे जशी निर्भिडपणाने लोकसेवा केली तशीच तो ती यापुढेहि करील असे आश्वासन देऊन टिळकानी हा लेख पुरा केला आहे."

केसरीच्या बाह्यांगाप्रमाणे अंतरंगाचीहि सुधारणा होत होती. सन १९०१ व १९०२ या साली केसरीमध्ये चीन देशातून काही बातमीपत्रे प्रसिद्ध झाली. त्यावर " पुणेकर प्रवासी " अशी सही असे. चीनात आपली माणसे क्वचितच जात असल्यामुळे तेथे प्रत्यक्ष जाऊन चहूकडे हिंडून एका महाराष्ट्रीयाने हकीगत लिहिली म्हणून ती लोकानी फार आवडीने वाचली. हा पुणेकर प्रवासी प्रो. छत्रे यांचे सर्कशीबरोबर चीनला गेला होता. सर्कसवाले म्हणून त्याना चहूकडे प्रवेश होता. "खुद्द पेकिंग शहरच्या राजवाड्यात वृद्ध राणीसमोर सर्कशीचे खेळ झाले. ही राणी वृद्ध असून ती राष्ट्रीय भावनेने प्रेरित होती. बॉक्सर बंडवाल्याशी तिचे सूत होते आणि चिनातून परकी लोक घालवून द्यावे आणि चीन स्वतंत्र करावा ही चळवळ तिला मान्य होती. चीनमध्ये टिंटसीन येथील हिंदु लोकानी छत्रे यांच्या सर्कशीवर खूष

होऊन त्यांचा सत्कार केला. हिंदूच काय पण जर्मन, रशियन, फ्रेंच, इंग्रज अमेरिकन वगैरे लोकाची गर्दी सर्कशीला होई. छत्रे यांच्या सर्कशीची कीर्ति चीनच्या महाराणीच्या कानावर गेली. तेव्हा तिने सर्कशीचा सर्व खर्च देऊन छत्रे याना स्पेशल ट्रेनने पेकिंग येथे नेले. "शहरापासून १५ मैलावर पहाडात सरोवराचे काठी राजमंदिरे आहेत तेथे सर्कशीचे खेळ चालू झाले. दोन लहान टेकड्यांच्या मध्ये सरोवराचे एका बाजूस मोठ्या मैदानावर तंबू राहुट्या शामियाने इत्यादि असून मध्यभागी सर्कशीचा तंबू लाविला होता. पहाडात खुद्द महाराणी रहात असल्यामुळे आणि विशेषतः या सर्कशीमुळे तो एकांतवासाचा भाग काही दिवस अगदी गजबजून गेला. राणी आपल्या एका मंदिरातून निघून नावेत बसून सरोवरातून खेळाचे जागी दाखल झाली. तिचेबरोबर राजकन्या व दासी होत्या. छत्रे यानी महाराणीला खडी ताजीम देऊन बहुमोल नजराणा दिला आणि हिऱ्याची आंगठी भरजरीच्या शाली फळफळावळ आणि एक होडी नजर केली. राणीसमोर एकंदर तीन खेळ झाले. उलट राणीने छत्रे याना २० हजार रुपयांची देणगी व सहा सुवर्ण पदके दिली" असे वर्णन केसरीच्या बातमीदाराने त्या वेळी तिकडून पाठविले होते.

## (९) प्रचंड दिल्लीदरबार

तारीख १ जानेवारी १९०३ रोजी दिल्ली येथे सुप्रसिद्ध राजदरबार भरला. अशा थाटाचा दरबार हिंदुस्थानात पूर्वी कधीच झाला नाही. मिरवणूक जाहीरनाम्याचे वाचन मेजवानी दारूकाम पदवीदान परेडी प्रार्थना वगैरे प्रकार इतक्या दिमाखाचे झाले की त्यात हिंदुस्थानातील तत्कालीन सर्व संपत्ति शोभा व ऐश्वर्य ही एकवटलेली पहावयास मिळाली. लॉर्ड कर्झन यानी बादशहाचे प्रतिनिधी म्हणून विलायतेहून बोलावून आणलेल्या राजपुत्राहून आपला मान सन्मान मोठा करून दाखविला. आणि ते स्वतः हिंदुस्थानचे बादशहा असते तरी त्यांचा बडेजाव याहून अधिक होणे शक्य नव्हते असे त्यानी सिद्ध केले. असल्या दिमाखाच्या प्रदर्शनाला प्रेक्षकगणहि तसाच लागतो. म्हणून लॉर्ड कर्झन यानी निमंत्रण करून हिंदुस्थानातील शेकडो प्रमुख राजेरजवाडे जहागीरदार व इतर सन्मान्य गृहस्थ दिल्लीला आणविले होते. पहाणारा नसेल तर नटणाराचे श्रम फुकट जातात. आणि स्वतः पाहाणारेच इतके नटून सजून आले होते की रंग जरतार रेशीम जवाहीर कलाकुसर वेषभूषा यांचा एकहि प्रकार दिल्लीस त्या प्रसंगी न गेलेला असा हिंदुस्थानात शिल्लक नव्हता. पण लॉर्ड कर्झन यानी अशा प्रेक्षकगणालाहि कौतुक वाटेल असा दरबारचा थाट केला असून त्या वेळी ज्या शेकडो तोफा कडाडल्या व शेकडो तुताऱ्या व बिगुले वाजविली गेली त्यानी हिंदुस्थानात इंग्रजांच्या साम्राज्यगर्वाचा कळस झाला असे वर आकाशापर्यंत जाहीर केले. अशा या समारंभासंबंधाने केसरीत लिहिताना टिळकासारख्यांच्या अंतरंगातील विचार काय असतील याची कल्पना कोणासहि येईल. नुसते बादशहा सातवे एडवर्ड हे आपल्या परलोकवासी आईच्या सिंहासनावर

बसले व त्यानी राज्यारोहण केले इतकीच गोष्ट हिंदुस्थानाला कळवावयाची असती तर त्याला इतका थाट नको होता. ती गोष्ट सरकारी गॅझेटातील चार ओळींनी सिद्ध झाली असती आणि त्याला शाईकागदाचा दमडीइतकाहि खर्च पडला नसता. पण या प्रसंगी कर्झन साहेबानी इतकी नीरस व्यावहारिक दृष्टि ठेवली नव्हती. "पृथ्वीवर स्वर्ग असेल तर तो हाच होय" ही सुवर्ण अक्षरे संगमरवरी दगडावर विजेच्या दिव्याचा प्रकाश पाडून राजेरजवाड्यांच्या डोळ्याना दाखविली. यात कोणताहि औपचारिक असा राजधर्मविधि करण्यापेक्षा अखिल हिंदुस्थानाला ब्रिटिश साम्राज्याची सत्ता सामर्थ्य व श्रीमंती ही दाखवून साम्राज्यसत्तेला मनाने वश करून घेण्याचाच मुख्य उद्देश होता. पण दिल्लीस गेलेल्या सर्व लोकांचे चर्मचक्षू ती अपूर्व शोभा पाहून दिपले असले तरी सर्वांचेच अंतश्चक्षू त्यामुळे काही अंध होऊ शकले नाहीत. उदेपूरचा महाराणा दिल्लीकडे जावयाला जुलमाने निघाला, पण दिल्लीस पोचण्यापूर्वीच त्याच्या स्वाभिमानाने या जुलमावरहि जुलूम केल्यामुळे तो वाटेतूनच परत फिरला असे म्हणतात. दिल्ली पुन्हा स्वतःची होईपर्यंत दिल्लीला न जाण्याची त्याची शपथ केवळ मुसलमानापुरतीच नव्हती. आणि दिल्लीहून स्थानभ्रष्ट झाल्याने उदेपूरच्या राजघराण्याच्या काळजाला जी जखम झाली होती ती भरून येण्यासारखेहि कोणते मलम इंग्रजसरकारने त्याला लाविले नव्हते. आता दिल्लीला निघालेल्याची व अखेर न गेलेल्याची ही एक गोष्ट झाली. पण दिल्लीस दरबारला निमंत्रण तर नाहीच उलट दिल्लीच्या दरबाराची कल्पना येताच मनाने आपल्या राहत्या जागापासून चार पावले दूर जाऊ इच्छिणारे किती तरी जाणते लोक हिंदुस्थानात त्या वेळी होते. आणि टिळक हे त्यापैकी एक प्रमुख होत. बादशहांच्या निरोपात ज्याप्रमाणे प्रजेला उद्देशून भलेपणाचे दोन शब्द होते त्याप्रमाणे टिळकांनीहि केसरीत राजाराणी लॉर्ड कर्झन ड्यूक ऑफ कॅनॉट वगैरेंची चित्रे सजविलेल्या चौकटीत घालून दिली होती. पण त्या निरोपात हिंदी प्रजेची पूज्य बुद्धि व प्रेम संपादन करण्याचे आपल्या मातोश्रीचे धोरण पुढे चालू ठेवण्याचे एडवर्ड बादशहांचे आश्वासन ज्या प्रकारचे होते त्याच प्रकारचे केसरीने या दरबाराचे केलेले अभिनंदनहि होते. दरबारावर कोट्यावधि रुपये खर्च झाले पण प्रजेला काडीचाहि प्रत्यक्ष लाभ झाला नाही. आणि हा बडा दरबार म्हणजे स्वतः लॉर्ड कर्झन यांच्या अहंकराचा एक मोठा खर्चिक खेळ झाला. हेच रहस्य केसरीने आपल्या वाचकाना सांगितले. एवढेच नव्हे तर 'दिवाण ई खास' च्या संगमरवरी दिवाणखान्यात विजेची रोषनाई करून मेजवानी खाणाऱ्या व उंची दारू पिणाऱ्या राजप्रतिनिधीनी कुतुबमिनारावर चढून चहूकडे एकदा पहावे म्हणजे दिल्लीच्या जुन्या सात राजधान्यांची काय वाट लागली हे त्याना दिसून येईल असेहि बजाविले! नवरेपणा गाजवून जगास दाखविल्याने लग्नाच्या स्त्रीचेहि प्रेम वाढत नाही. मग अशा दरबाराने पूर्वी स्वराज्याचा अनुभव घेतलेल्या प्रजेचे प्रेम वाढेल ही आशा व्यर्थ होय. न्याय दया सद्वर्तन विनयशीलता प्रजादाक्षिण्य असल्या गोष्टीनीच झाली. तर प्रजा राजाला वश होते.

इकडे बादशहा जाहीर करतो की व्हिक्टोरिया राणीचे धोरण मी पुढे चालवीन आणि त्यांचे प्रतिनिधि राणीच्या जाहीरनाम्याला 'अशक्य सनद' असे नांव देऊन त्या साखरेच्या गोड खड्याचे पाणी करून टाकतात! शुष्क मानाला भुकेलेले राजेरजवाडे कदाचित अशा दरबारास हजर राहिलेले स्वतःला धन्य मानतील. पण दिवसानुदिवस आपली सत्ता मर्यादीत होत चालली आहे, आपले बरोबरीचे नाते जाऊन अंकिताचे नाते आपणाला जोडले जात आहे, ही गोष्ट स्वाभिमानी संस्थानिकांच्या नजरेला आल्याशिवाय राहिली नसेल. प्रजेचा उत्कर्ष कसा होईल आणि राजेरजवाड्यांची जुनी मान्यता राहून नव्या परिस्थितीप्रमाणे त्यांचे कार्यक्षेत्र कसे वाढेल या गोष्टीचा विचार बादशहा किंवा त्यांचे प्रतिनिधि यानी अशा वेळेला करावयाला पाहिजे होता. पण तो मुळीच झाला नाही. या दरबाराकडे टिळकानी सामान्य प्रजेपेक्षाहि हिंदी राजेरजवाड्यांच्या दृष्टीनेच अधिक पाहिले. कारण दरबार मुख्यतः त्यांच्याकरिताच होता. पण एखाद्या लग्नकार्यात वऱ्हाडी लोकांच्या पोराबाळांची जी अनास्था होते तीच त्या दरबारात या राजेरजवाड्यांची झाली. आणि त्याना काही न देता सरकाराने मात्र त्यांजकडून आपण साम्राज्याचे दास आहो अशी एक प्रकारे कबुली घेतली याचाच विषाद त्यानी प्रगट केला. कित्येक विलायती पत्रातूनहि असलेच विचार प्रगट झाले. रिव्ह्यू ऑफ रेव्ह्यूचे संपादक स्टेड यानी लिहिले की हिऱ्यांच्या दागिन्यानी मढविलेल्या महाराजांच्या मागे अर्धपोटी राहणारे कोट्यावधि शेतकरी दरबारात अदृश्य रूपाने उभे होते. साम्राज्यासाठी घातलेला हा धिंगाणा उद्या इतिहासात चांगला दिसणार नाही. दारूकामाचे तेज अप्रतिम होते पण ते क्षणभर टिकले. 'सत्यवादी' पत्र स्पष्टोक्तिबद्दल प्रसिद्धच आहे. त्याने खालीलप्रमाणे विनोदी टीका केली. "एका शेतात कोंबडी बदके वगैरेंचे मोठे खुराडे होते. त्यात एक मोठा तुर्की कोंबडा असून तो त्या खुराड्याचा राजा होता. एक दिवस मोराची पिसे लावून आपल्या प्रजेपुढून ऐटीने ठुमकत जाण्याचा त्याने बेत केला. कोंबड्यासाठी ठेवलेल्या दाण्याचे पोत्यातील काही दाणे मोराला देऊन त्याची पिसे या तुर्की कोंबड्याने मिळविली व ती आपल्या शेपटाला लावून मोठा थाट केला. तेव्हा 'अहाहा! तुम्ही आम्हाला किती मोठी गम्मत दाखविली' असे म्हणून इतर कोंबड्यानी आपल्या डोक्यावरील तुरे मातीत लोळविले आणि त्याची स्तुति करण्याकरिता एकदा सर्व मोठ्याने आरवले."

एवढा दरबार एवढ्या मोठ्या प्रयासाने भरविला त्याचा खलिता विलायत सरकाराकडे जाणे योग्यच होते. त्यात खालील माहिती दिली होती. कलाप्रदर्शन पाहण्याला अठ्ठेचाळीस हजार लोक पैसे भरून गेले. प्रदर्शनात तीन लक्ष बासष्ट हजार रुपयांची विक्री झाली. दरबार पाहण्याला एकशे तीन संस्थानीक व एक लक्ष ब्याहात्तर हजार लोक जमले होते. संस्थानिकाना हा दरबार मोठा गंभीर किंबहुना धर्मासारखा पवित्र वाटला. त्यांचे अंतःकरणात भीतियुक्त पूज्यभाव उत्पन्न झाला. अफगाण वकील तर असे बोलला की परमेश्वर सर्वांच्या पापपुण्याचा निवाडा

करण्यास शेवटी जे मोठे कोर्ट भरविणार आहे त्या वेळी जसे सर्व जीवाचे आत्मे आपआपल्या थडग्यातून उठून प्रभूपुढे आपोआप जाऊन उभे राहतील त्यासारखा हा दरबार आहे. कोर्टापुढे इनसाफाकरिता पकडवारंटाने धरून आणलेल्या गुन्हेगाराची उपमा संस्थानिकाना चांगली शोभेल. पण संस्थानिक हे निमंत्रित तरी होते म्हणून अफगाण वकिलाची ही उपमा न्यायकोर्टावर तरी थांबली. पण निमंत्रण नसलेल्या हजारो प्रेक्षकाना तुम्ही कसली उपमा देणार असे या अफगाण वकिलाला कोणी विचारले असते तर तो कदाचित् म्हणाला असता, 'चकचकीत दिवा पाहून त्यावर येऊन हौसेने पडणाऱ्या कृमिकीटकाच्या धाडीप्रमाणे हा समाज दिसला. किंवा तो असेहि म्हणता की नरकात लोक आपण होऊन आपल्या पायानेच जातात. त्याना तेथे कोणी बोलावणे करीत नाही. ही उपमा कानाला वाईट लागण्या सारखी खरी. परंतु ईश्वराच्या अखेरच्या न्यायदरबाराची उपमा दिल्लीदरबाराला देणे हे जितके अप्रयोजक तितकीच फार तर ही दुसरीहि होईल.

## (१०) प्रो. जिनसीवाले

ता. १८ ऑगष्ट १९०३ या तारखेस प्रो. श्रीधर गणेश जिनसीवाले हे मुंबई येथे मरण पावले. जिनसीवाले यांचे वास्तव्य वुइल्सन् कॉलेजचे प्रोफेसर या नात्याने प्रथम मुंबईस अनेक वर्षे होते आणि तेथील ब्राह्मण सभेचे ते एक मोठे पुढारी होते. यामुळे त्यांच्या मृत्यूची हळहळ मुंबईकराना फार वाटली आणि त्यांची प्रेतयात्रा लोकानी फारच थाटाची काढली. जिनसीवाले आजारी पडले असे ऐकून टिळक पुण्याहून मुद्दाम त्याना भेटण्याला गेले. पण जिनसीवाले गैरसावध असल्यामुळे त्यांचे बोलणे चालणे काही झाले नाही. या विद्वान गृहस्थाविषयी टिळकांचे मनात फार आदर असे. एक तर त्यांची बहुश्रुतता व दुसरे म्हणजे त्यांची उज्वल देशभक्ति. प्रोफेसर जिनसीवाले हे ग्वाल्हेर येथे त्या नावाने प्रसिद्ध असलेल्या घराण्यापैकी होते. वडिलार्जित मिळकतीची वाटणी होताना ती यथान्याय झाली असती तर तीत प्रोफेसर साहेबाना ५—४ लाखांची इस्टेट मिळाली असती. पण वाटणीत अन्याय झाला आणि जिनसीवाल्यांचे वडील चिरंजीवासारखेच तापट व करारी असल्यामुळे, घेईन तर यथान्याय हिश्शाची मिळकत भरपूर घेईन नाही तर भिक्षा मागेन अशा निश्चयाने ते आपल्या अल्पवयी मुलासह बाहेर पडले. पण इस्टेट काहीच मिळाली नाही, आणि करारीपणा तेवढाच शिल्लक उरला. यामुळे जिनसीवाले याना मधुकरी मागून आपला निर्वाह करावा लागला. मधुकरी मागताना पाय भाजत म्हणून पायाना पाने बांधून ते हिंडत असे म्हणतात. त्यानी आपला सर्व अभ्यास शिष्यवृत्त्या मिळवून केला. १८७६ साली एम्. ए. ची परीक्षा पास होऊन ते बाहेर पडले. पुढे येथील पूना हायस्कूलात काही दिवस नोकरी केल्यावर त्यांना मुंबईस वुइल्सन कॉलेजात संस्कृतचे प्रोफेसर नेमण्यात आले. जिनसीवाले कट्टे धर्माभिमानी यामुळे कॉलेज मिशनऱ्यांचे व त्यांचे यथातथाच पटत असे आणि शेवटी

भांडणामुळेच त्यांची नोकरी गेली. नंतर ते पुण्यास येऊन राहिले. आणि केवळ संचित द्रव्यावर त्यानी आपला चरितार्थ चालविला. त्याना एकच मुलगा होता. पत्नी निवर्तल्यामुळे पुढे ते अगदी एकाकी रहात असत. पण आपला सर्व वेळ विद्याव्यासंग वाचनव्यवसाय यात घालवीत. जिनसीवाल्यांच्या अंगी लिहिण्याची कला नव्हती. बोलण्यात दूरान्वय पुष्कळ घडे. तथापि त्यांचे भाषण ऐकून त्यातील बहु-श्रुततेने मोहित होऊन मान डोलवली नाही असा मनुष्य विरळा. पुस्तकांचा उपभोक्ता त्यांचे इतका दुसरा मिळणे कठीण. आणि विकत घेतलेल्या खाजगी पुस्तकांची त्यांची जेवढी लायब्ररी होती तेवढी त्यांच्या स्थितीतील इतर कोणत्याहि मोठ्या विद्वानाची या इलाख्यात तरी कोठे नव्हती. कोणीहि एखादा साहेब येऊन सभेत काय वाटेल ते बोलेल व जिनसीवाले सभेत हजर असता खडखडीत सडेतोड भाषण ऐकल्याशिवाय निघून जाईल असे कधीहि शक्य नव्हते. टिळकावरहि त्यांची फार भक्ति होती. तरी वेळ पडल्यास त्यांच्याशी खडाजंगी करण्यासहि त्यानी कधी मागे पुढे पाहिले नाही.

## (११) बंगाल्यातील आखाडे व शिवाजीउत्सव

१९०३ साली कलकत्ता येथे शिवाजीउत्सव करण्यात आला. श्रोतृसमुदाय सात आठ हजारपर्यंत जमला होता. थिएटरमध्ये व बाहेरच्या पटांगणांत जागा न मिळाल्यामुळे दीड दोन हजार लोक रस्त्यातून उभे राहिले होते त्यामुळे गाड्याहि बंद झाल्या. शिवाजी उत्सवासंबंधाने बंगाली लोकानी विशेष अगत्य दाखविले. महा-राष्ट्रातील या उत्सवाच्या स्फूर्तीनेच महाराज प्रतापादित्य यांचा उत्सव बंगाल्यात सुरू झाला. या उत्सवापूर्वी सखारामपंत गणेश देऊसकर यानी ‘ शिवाजीचा थोरपणा ’ या नावाचा एक सुरस लेख बंगालीत लिहिला. त्यांचे पुस्तक उत्सव कमिटीने छापिले आणि पाच हजार प्रती लोकाना फुकट वाटल्या. कित्येक मुसलमानानी उत्सवाच्या वेळेस शिवाजीची चित्रे व ही पुस्तके आनंदाने प्रेक्षकास वाटण्याचे काम केले. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी डॉ. मलीक वगैरे वक्त्यांची भाषणे फारच उत्साहजनक झाली.

इंग्लीशमन पत्राने पूर्वी या उत्सवाविरुद्ध बरेच लिहिले होते. पण आता धोरण बदलून त्यानेहि असे लिहिले की महाराष्ट्रातील या महापुरुषाचा उत्सव करण्यात बंगाली लोकानी दाखविलेले औदार्य व विचारप्रागल्भ्य प्रशंसनीय आहे. पायोनिअर पत्राने मात्र कुचेष्टा केली. त्याने लिहिले की २०० वर्षांपूर्वी मराठ्यांचे अंतःकरण होते तसेच आज आहे. अर्थात् महाराष्ट्र व बंगाल यांच्या मैत्रीची वल्गना व्यर्थ होय. इंग्रज नसतील तर अजून मराठे बंगाल लुटतील. या उत्सवात दिसतो त्यापेक्षा काही तरी अंतस्थ हेतू असावा. बंगाली व मराठे लोक इंग्रज नसतील तर एक-मेकाचे काय करतील ह्या प्रश्नाचे उत्तर काहीहि असो. परंतु दोघानाहि इंग्रजांचा जुलूम सारखाच भासत असल्यामुळे दोघानी एकमेकाविषयी सहानुभूती बाळगावी

व या जुलमाचा प्रतिकार कसा करिता येईल याविषयी एकमेकांचा विचार घ्यावा ही गोष्ट स्वाभाविक होती.

बंगाली लोक दुबळे आहेत तेजोहीन आहेत असे आरोप लॉर्ड मेकॉले साहेबांच्या वेळेपासून चालत आलेले आहेत. आणि त्याचे शल्य बंगाली लोकांच्या मनात सारखे डाचत होते. ते निघून जावे असे त्यांचे प्रयन्त सुरू होते. आणि पुढें बंगाल्यात जी अत्याचाराची चळवळ सुरू झाली तिचे समर्थन नव्हे तर तिचा खुलासा म्हणून कित्येक इंग्रजानी कारण मीमांसा अशी केली की बंगाली लोकाना आपणावरील शेळपटपणाचा आरोप काढून टाकावयाचा आहे. आणि तो दोष निघून गेल्याचा पुरावा अशा कृतीनी ते हल्ली जगाला देत आहेत! पण बंगाली लोकांच्या कृतीत ही मोठी क्रांति होण्यापूर्वी दुसरी एक धाकटी क्रांति झाली होती. ती अशी की बंगाली लोकात मर्दानी खेळाचा परिपाठ पूर्वी नव्हता. त्यानी असे ऐकले होते की महाराष्ट्रात आखाडयांची परंपरा फार जुनी असून त्या संस्था मोठ्या यशस्वी झालेल्या आहेत. म्हणून बंगाल्यातील पुढाऱ्यानी या गोष्टींची खाजगी माहिती मिळविली आणि तो प्रघात आपल्याइकडेहि पडावा अशी खटपट सुरू केली. आणि विशेष सांगण्याची गोष्ट ही की ह्या बाबतीत पुरुषाप्रमाणे स्त्रीयानीहि हौस प्रगट केली.

अशा हौशी स्त्री-पुढाऱ्यापैकी सरलादेवी ह्या एक होत्या १९०३साली त्या अविवाहित असून सरलादेवी या चौधराणी झाल्या नव्हत्या. त्या पदवीधर असून काही दिवस म्हैसूर येथील कॉलेजात प्रोफेसरी करीत होत्या. ती नोकरी सोडून पुढे त्या बंगाल्यांत गेल्या. त्यांचे मामा सत्येंद्रनाथ टागोर हे पहिले सिव्हिलीअन होते. त्यांची पुष्कळशी नोकरी मुंबई इलाख्यातील न्यायखात्यात झालीं. सातारा सोलापूर वगैरे ठिकाणी तें डिस्ट्रिक्ट व सेशन जज्ज होते. पुढे सरलादेवी यांचे बंधू मि. गोहल हे सिव्हिलीअन झाले त्यानीहि मुंबई इलाख्यासच जागा मागून घेतली. सत्येंद्रनाथ टागोर व त्यांच्या घरची सर्व स्त्रीपुरुष मंडळी याना महाराष्ट्रीय लोक, त्यांच्या चालीरीति व त्यांची राष्ट्रीय वृत्ति याचे मोठे कौतुक वाटले. आणि ह्या आपल्या मामाच्या घरी मधून मधून येऊन जाऊन असल्यामुळे सरलादेवी यानी महाराष्ट्रीय समाजाचा चांगला परिचय करून घेतला होता. बंगाल्यात शिवाजी व प्रतापादित्य यांचे उत्सव सुरू करणारामध्ये या बाईंची गणना होते. १९०३ साली मर्दानी खेळाचा प्रवेश बंगाल्यात करण्याच्या हेतूने तद्विषयक संस्थांची माहिती मिळविण्याकरिता त्या पुण्यास येऊन गेल्या. त्या वेळी टिळकांची गाठ त्यानी एक दोन वेळा घेतली; आणि स्नेही म्हणून प्रोफेसर करकरे यांचे घरी जरी त्या उतरत तरी पुण्यास येण्याचे जे त्यांचे हेतु त्यात प्रोफेसर करकरे यांचा पाहुणचार घेणे हा हेतू मुळी नव्हताच म्हटले तरी चालेल. परत गेल्यावर त्यानी आपल्या बंगाली तरुण मंडळीकडून मर्दानी खेळाना सुरवात केली आणि ही परंपरा पुढे बरीच यशस्वी झाली. ह्या चळवळीचे पुढारी हेच जरी पुढच्या अत्याचा-

राच्या चळवळीचे पुढारी नव्हते तरी आपणाला शेळपट म्हणणाऱ्या इंग्रजाना आपले तेज व सामर्थ्य दाखवावे ही भावना ह्या दोन्ही चळवळीतील लोकाना समान होती. त्यांचे मार्ग मात्र भिन्न होते.

## (१२) मलबारी शेट व कॉंग्रेस

मुंबईचे प्रख्यात समाजसुधारक मलबारी शेट यानी ईस्ट अँड वेस्ट नावाचे एक नवे मासिक पुस्तक काढले. त्यात त्यानी आपण राष्ट्रीय सभेला जाऊन का मिळालो नाही याची कारणे देऊन आपल्या तटस्थ वृत्तीचे समर्थन केले. काही वर्षांपूर्वी बालविवाह-निषेधासारख्या समाजसुधारणेच्या वादग्रस्त विषयात मलबारी यानी पुढाकार घेतला होता. तेव्हा रानडे तेलंग प्रभृतींचे व यांचे रहस्य होते. पण या दोघाना सामाजिक सुधारणेप्रमाणे राजकीय सुधारणाहि हव्या होत्या म्हणून त्यानी राष्ट्रीय सभेचा पुरस्कार केला. आणि मलबारी शेट पडले केवळ समाजसुधारणावादी. यामुळे पुढे यांचे त्यांचे रहस्य बिघडले. मलबारी शेट यांचा एकांगीपणा रानडे याना सदोष वाटला. तेव्हा फिटास फिट म्हणून रानडे आणि तेलंग यानी स्वतः समर्थन केलेल्या सामाजिक सुधारणांची तत्त्वे प्रसंग आला असता आचारात उतरविली नाहीत, हे त्यांचे व्यंग मलबारी शेट यानी बाहेर काढले. या प्रसंगाने टिळकानी केसरीत ( २४ नोव्हें. १९०३ ) एक मार्मिक लेख लिहिला. मलबारी शेट यानी पुढे कॉंग्रेसचे नाव टाकले तरी तिचे प्रसिद्धीपत्रक प्रथम आपल्या घरातून बाहेर पडले या गोष्टीचा डौल मात्र जो त्यानी या लेखात मिरविला त्याला उद्देशून टिळक लिहितात ' शकुंतला कण्वाश्रमातून बाहेर पडल्यानंतर जशी ती पुन्हा कधी आश्रमात परत गेली नाही तशीच मलबारी शेटजींच्या कन्येचीही दशा झाली. कॉंग्रेस पुढे एवढी नावारूपाला आली असता मी तिचे वैर केले नाही असे म्हटल्याने मलबारी शेटजींच्या वृत्तीचे समर्थन कसे होणार ? रानडे तेलंग बोलून चालून सरकारी नोकर. याना लोकानी कॉंग्रेसचे मित्र म्हणावे आणि मलबारी शेटजीना शत्रू म्हणावे यावरूनच राष्ट्रीय सभेविषयी कोणाला कितपत जिव्हाळा होता हे उघडच दिसून येते. शेटजींचा सभेवरील मुख्य आक्षेप असा की मांजरी आपली पिले आपणच खाऊन टाकते त्याप्रमाणे ठिकठिकाणच्या लहानसहान संस्था राष्ट्रीय सभेने बुडविल्या. पण ही उघड अतिशयोक्ति होय. त्यांचा दुसरा आक्षेप हा की कॉंग्रेसचे पुढाऱ्यानी जितक्या नेटाने काम केले पाहिजे तितके ते करीत नाहीत. आणि याला पुरावा काय तर लोकात आस्था दिसून येत नाही. आणि ती कशावरून ? तर शेटजींचे इतके उत्कृष्ट मासिक पुस्तक लोक घेत नाहीत परत करतात म्हणून! ह्यूम किंवा दादाभाई यांच्यासारखे चिकाटीचे प्रयत्न करणारी माणसे राष्ट्रीय सभेत थोडी आहेत ही गोष्ट टिळकानी मान्य केली. पण स्वतःच्या मासिक पुस्तकाची भरभराट व्हावी म्हणून शेटजी तरी मासिक पुस्तक काढण्यापलीकडे काय अधिक खटपट करितात? कॉंग्रेसच्या बाहेर राहून सरकारप्रमाणेच तिला नावे ठेवणारे

आणि राजकारणापासून अलिप्त राहिल्यामुळे निर्मळ राहिलेल्या आपल्या कपड्याकडे बोट दाखविणारे असे बरेच प्रतिष्ठित स्वयंमन्य पुढारी मुंबईस होते. त्यांचे मुख म्हणूनच मलबारीशेटनी तो लेख लिहिला व शेटजींच्या द्वारे या सर्व वर्गाला उत्तर मिळावे म्हणून टिळकानी हा लेख लिहिला. विशेष अंग मोडून काम करीत नसले तरी राष्ट्रीय सभा ही आपली म्हणणारे लोक राष्ट्रीय पक्षाला अधिक जवळ ही भावना प्रकट करण्याचाच या लेखात टिळकांचा हेतु होता.

## (१३) १९०१ ते १९०३ मधील सभा व परिषदा

तारीख १४ सप्टेंबर १९०१ रोजी मुंबई प्रांताची ११ वी प्रांतिक परिषद मुंबई येथे सिंधचे पुढारी तेहेलराम खेमचंद यांचे अध्यक्षतेखाली भरली. या परिषदेत मुख्यतः नव्या लँड रेव्हेन्यु बिलाची चर्चा झाली. परिषदेतील तिसरा ठराव दुष्काळ-कोडासंबंधीचा होता. तो गोकुळदास पारेख यानी मांडला. टिळकानी त्याला अनुमोदन दिले. दोन वर्षापूर्वी सातार्‍यास या दोघांचा जो खटका उडाला होता तो आता दोघेहि विसरून गेले होते. बाहेरचे संकट आले म्हणजे घरातील भांडण मिटते या सिद्धांताप्रमाणे हेहि झाले.

सन १९०१ च्या डिसेंबरात सतरावी राष्ट्रीय सभा कलकत्ता येथे दिनशा वाछा यांच्या अध्यक्षतेखाली भरली. या सभेत एज्युकेशन कमिशन संबंधाचा ठराव पंडित मालवीय यानी मांडला. त्यात कमिशनवर हिंदी गृहस्थ नेमावे अशी सूचना होती. या ठरावाला टिळकानी अनुमोदन दिले. त्यात जपानची शिक्षणपद्धति व हिंदुस्थानातील शिक्षणपद्धति यांची त्यानी सप्रमाण तुलना केली. कलकत्याहून परत येताना टिळक नागपुरास उतरले. त्यांचा मुक्काम एकदोन दिवस झाला. पाहुणचार नागपूरचे प्रसिद्ध सावकार गोपाळराव बुटी यांच्याकडे होता. मॉरिस कॉलेजच्या विद्यार्थ्यानी त्याना राजाराम थिएटरमध्ये मानपत्र दिले. प्रिन्सिपॉल ताम्हन हे अध्यक्ष होते. या प्रसंगी टिळकानी भगवद्गीतेवर व्याख्यान दिले. त्यात त्यानी गीतेच्या उद्दिष्टाविषयी आपले मत सांगितले. अर्वाचीन अध्ययनपद्धतीला अनुसरून गीता वाचल्यास असे दिसते की धर्मबुद्धि जागृत ठेवून मनुष्याला कर्तव्याची योग्य दिशा दाखविणारा असाच हा ग्रंथ आहे. ही पद्धति आमच्या जुन्या आचार्यानाहि माहिती होती. मीमांसा शास्त्रामधून हीच पद्धति निघते. परस्परविरुद्ध कर्तव्ये उपस्थित झाली असता मनुष्याने काय करावे हे त्यात सांगितले आहे. व्याख्यानानंतर प्रिन्सिपॉल ताम्हन व भाऊशास्त्री लेले यानी टिळकांचे आभार मानले. अशा थाटाचा स्वागतसमारंभ पूर्वी नागपुरास झाला नव्हता. नेमस्त पुढारी या समारंभात फारसे सामील नव्हते. पण नागपूर शहरातील सामान्य जनता या सुमारास हळुहळु जागृत होऊ लागली होती व या जागृतीचे खरे स्वरूप पुढे पाचसहा वर्षांनी दिसून आले.

ता. २५ आक्टोबर १९०२ रोजी बारावी प्रांतिक सभा सोलापूर येथे भरली. अध्यक्षस्थानी चिमणलाल सेटलवाड हे होते. सोलापुरास ही सभा अगदी आयत्या

वेळी भरली. त्यामुळे तिचे स्वरूप बेतावाताचेच होते. या सभेला टिळक हजर राहू शकले नाहीत. कारण याच वेळी ताईमहाराज प्रकरणात टिळकावर झालेला फौजदारी खटला पुण्यास सुरू होता. सोलापूरची प्रांतिक सभा घाईने वेठीप्रमाणे उकरण्यात आली याविषयी केसरीने वेळीच निषेध प्रकट केला होता.

१९०२ ची राष्ट्रीय सभा अहमदाबाद येथे भरली. या सभेस टिळक हजर राहू शकले नाहीत. अहमदाबाद पुण्यापेक्षा श्रीमंत, तथापि नुकताच दुष्काळ होऊन गेल्यामुळे सभा कशी पार पडते याविषयी चिंताच होती. पण मध्यम वर्गातील तरुण मंडळींच्या प्रयत्नाने सभा चांगली पार पडली. डेलिगेटची नेहमीची १० रुपयांची फी वीस रुपये करण्यात आली होती. आणि दिल्लीदरबाराकडे अनेक लोक गेल्यामुळे प्रतिनिधींची संख्या बेताचीच होती. तथापि अध्यक्षस्थानी बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी असल्यामुळे त्यानी ती वाण भरून काढली. सभेच्या बैठकीत महत्वाचे असे काहीच झाले नाही. काँग्रेसचे काम सर्व वर्षभर चालावे अशी इच्छा एका पुढाऱ्याने व्यासपीठावरून प्रदर्शित केली. तेव्हा खाली बसलेल्या एका गृहस्थाने म्हटले की, "तुमचा नुसता उपदेश नको, तुम्ही वर्षात बाहेर पडून राष्ट्रीय सभेवर जितकी व्याख्याने द्याल त्याच्या सहापट व्याख्याने आम्ही व्यासपीठाखाली बसलेले गरीब लोक देऊ." यावरून राष्ट्रीयसभेचे काम देशात परिणामकारक होत नाही अशी जी तक्रार तिची अहमदाबादेस प्रस्तावनाच झाली. अहमदाबादेस राष्ट्रीय सभेला जोडून औद्योगिक प्रदर्शन भरविण्यात आले होते. हा नवा उपक्रम मात्र लोकाना फार पसंत पडला.

१३ वी मुंबई प्रांतिक परिषद तारीख २६ मार्च १९०३ रोजी धारवाड येथे भरली. पांडुरंगराव आठवले वकील हे स्वागताध्यक्ष असून अध्यक्षस्थान दाजीसाहेब खर याना देण्यात आले होते. या परिषदेला टिळक हजर होते याचे कारण तेथे जमिनबाबीच्या विषयाची चर्चा विशेष व्हावयाची होती. अध्यक्ष दाजी-साहेब खरे यांच्या भाषणातील महत्वाचा बहुतेक भाग या विषयाकडेच दिला गेला होता. आणि टिळक व खरे या दोघानी बसून अनेक जुने रिपोर्ट व सरकारी ठराव वाचून हल्लीची जमीन महसूलपद्धति जुन्या पद्धतीपेक्षा जाचक का व कशी आहे याचे सप्रमाण विवेचन लिहून काढले होते. काही दिवसापूर्वी बाबू रमेश चंद्र दत्त यानी या विषयावर एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध केले होते. आणि त्यात सरकारावर इतका हल्ला चढविला होता की लॉर्ड कर्झन याना त्यास उत्तर देणे भाग पडले. रमेश चंद्र दत्त हे स्वतः प्रत्यक्ष रेव्हिन्यु कमिशनर असल्या कारणाने जमीन महसुलाच्या विषयासंबंधाने त्यांची काही माहिती अस्सल सरकारी कागद पत्रावरून मिळविलेली होती. आणि रेव्हिन्यू खात्यातील एवढा बडा विद्वान पेन्श-नर हाच जर सरकारची पद्धति वाईट म्हणून ठरवितो तर ती वाईट असलीच पाहिजे हे अनुमान उघड निघणारे होते. पण एका दत्ताना उत्तर देण्याला अनेक दत्त उभे करण्यासारखे लोक इंग्रज सरकारजवळ असल्याकारणाने त्यानी प्रांतानिहाय लिहून दत्त यांच्या बुकाला उत्तरे मागविली आणि ती सर्व संकलित करून हिंदुस्थान

सरकारचा म्हणून एक ठराव काढला. प्रांतिक सरकाराकडून गेलेल्या उत्तरात मुंबई सरकारचे उत्तर म्यूर मॅकेन्झीसाहेब यानी लिहिले होते. त्याचे खंडण टिळक व खरे यानी मिळून या परिषदेच्या अध्यक्षाच्या भाषणात केले. विवेचनातील मुख्य मुद्दा असा होता की पेशवाईत कित्येक ठिकाणी जमिनीवरील कमाल आकार दिसण्यात हल्लीपेक्षाहि जबर वाटतो पण तो अगदी पूर्णपणे वसुल केला जात नसे. किंवा अगदी क्षुल्लक कारणाकरिताहि तोटा खाती खर्च घालून पूर्वी कुळास सूट मिळत असे. शिवाय मिरासदाराचा हक्क सारा न भरला तरी नष्ट होत नसे. दक्षिण प्रांताचे पहिले कमिशनर एल्फिस्टन यानी आपल्या रिपोर्टात ही गोष्ट दाखल केली होती. मिरासदाराची जी प्रतिष्ठा पूर्वी गावात होती ती आता इनामदाराची सुद्धा राहिली नव्हती. पहिल्या पाहाणीपूर्वी पेशवाईतील १८ जिल्ह्याचा वसूल १ कोटी ४० लक्ष रुपये होता तोच १९०१–१९०२ सालापर्यंत ३ कोटी १० लक्ष रुपये झाला. म्हणजे शेकडा १२० या प्रमाणाने वाढला. तेव्हापासून आतापर्यंत ६० वर्षांत काही ठिकाणी तीन फेर पाहण्या किंवा रिव्हिझन सर्व्हे झाल्या आणि दर पाहणीस सरासरी शेकडा ३० या मानाने सारा वाढत गेला होता. याशिवाय लोकलफंडाचे उत्पन्न, जंगलाचे उत्पन्न, गुरे चराईचे उत्पन्न ही शेतकऱ्याकडून वेगळी वसुल केली जातात. पूर्वी जमीन मेहनतीस कमी निघे आणि हल्ली ती जास्त निघते म्हणूनच हा वाढावा झाला, हा युक्तिवादहि खरे यांच्या भाषणात खोडून काढलेला होता आणि असे दाखविले होते की लागवडीच्या वाढीचे प्रमाण शेकडा २४ पेक्षा जास्त निघत नव्हते. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणावरूनहि तेच अनुमान निघते. गेल्या ६० वर्षांत लागवडीची वाढ शेकडा १०, लोकसंख्येची वाढ १० पण साऱ्याच्या वाढीचे प्रमाण शेकडा १२० असे पडते. धान्याची किंमत व जमिनीची किंमत वाढली आहे. याहि कोटिक्रमाला खरे यानी उत्तर दिले होते आणि ते असे की जमिनीच्या किंमती कमी असण्याचे कारण लोक मिरास जमीन अगदी क्वचित संकटकाली व तीहि मोठ्या नाखुषीने विकीत. अलीकडे दुष्काळामुळे जमिनी विकावयास निघतात व लोकाना इतर धंदा नसल्यामुळे ते त्या उड्या टाकून घेतात. अवल इंग्रजीत व्याजाचा दर हल्लीहून अधिक होता आणि हल्ली बँकेतील ठेवीच्या व्याजाचे दर कमी असल्यामुळे पैसे बँकेतून ठेवण्यापेक्षा जमिनीतच घातलेले बरे असे लोकाना वाटते. किंमतीच्या वाढीचा मुख्य मुद्दा असा की आगगाड्या रस्ते झाल्यामुळे धान्ये परदेशी जातात आणि यामुळे किंमती वाढतात. पण धान्याची वाढलेली किंमत जमेला धरल्यानंतर फिरून नवे रस्ते व आगगाड्या याहि जमेला धरून सारा वाढविणे हे सयुक्तिक नाही. लोक सारा किती कष्टाने भरतात हे गोकुळदास पारेख यांच्या प्रयत्नाने गुजराथेत सारावसुलीवर जे कमिशन बसले त्यात दिसून आलेच होते. हा विषय परिषदेच्या आठव्या नंबरच्या ठरावाने मांडण्यांत आला. तो दादासाहेब करंदीकर वकील यानी मांडला. आणि त्यावर टिळकानी विस्तृत भाषण केले. परिषदेला मुंबईची मंडळी आली नव्हती. पण फेरोजशहा मेथा यांच्या

प्रभावळीतील दाजीसाहेब खरे हे असल्याने मुंबईकर मंडळी हजर नव्हती असे भासले नाही. टिळक यंदाहि वास्तविक आपल्या खटल्याच्या कामात पुष्कळसे गुंतले होते. तथापि दाजीसाहेब खरे यांच्या स्नेहाखातर आणि त्यांच्या व धारवाडकरांच्या आग्रहावरून टिळकानी सवडीत सवड काढली व ते परिषदेला हजर राहिले इतकेच नव्हे तर वर सांगितलेले खरे याचे भाषण तयार करण्यातहि त्यानी बरीच मदत केली. जमीन महसुलाच्या या विषयाला यापूर्वी दोन वर्षे एकसारखे महत्व आलेले असून मुंबई कायदेकौन्सिलच्या जुन्या इतिहासात ज्या चळवळी झाल्या त्यात जमीन महसुलाची चळवळ ही अत्यंत स्मरणीय अशी झाली.

धारवाडच्या प्रांतिक परिषदेबरोबर प्रांतिक सामाजिक परिषदहि भरली होती. अध्यक्षस्थानी विष्णू मोरेश्वर महाजनी हे होते. महाजनी हे सुधारणावादी असले तरी त्यांच्यात व इतर सुधारकांच्या वृत्तीमध्ये फरक होता. अर्थात त्यांचे भाषण अशा परिषदेच्या अध्यक्षांच्या नेहेमीच्या भाषणाहून थोडे वेगळे झाले. "जी काही सुधारणा करणे असेल ती विचाराने धिम्मेपणाने व कळकळीने केली पाहिजे. स्वतःचे आचरण व हेतू शुद्ध असल्यास आपल्या खऱ्या स्वभावाने कोणाहि मनुष्यास आपल्या घरची माणसे वश करून घेता येतात. सुधारक म्हणविणारांपैकी कित्येक लोक मद्याच्या व्यसनापासून अलिप्त नसल्याने त्यांच्या आचरणाचे शिंतोडे सुधारणेच्या कार्यावरहि पडले होते." सार्वजनिक शिक्षणात धर्मशिक्षण असले पाहिजे असेहि त्यानी मत दिले.

१९०३ ची राष्ट्रीय सभा मद्रास येथे भरली. या सभेला टिळकाना हजर राहता आले नाही. कारण यापूर्वी ताईमहाराजांच्या खटल्यात मॅजिस्ट्रेट क्लेमंट्स यानी त्याना दीड वर्षाची शिक्षा दिली होती, आणि या शिक्षेवरच्या अपीलाची सुनावणी सेशनजज्ज मि. ल्यूकस यांचेपुढे डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात होऊन फक्त निकाल सांगण्याचे काम तहकूब ठेविले होते. पण बसल्या जागी टिळकांचे लक्ष मद्रासच्या सभेकडे होतेच. व ते कसे काय होते हे ता. २९ डिसेंबरच्या केसरीतील अग्रलेखावरून वाचकाना दिसून आले. या अग्रलेखावर टिळकानी ऋग्वेदातील मंडूक सूक्तापैकी एका रिचेचे अवतरण घेतले आहे. तिचा अर्थ असा "एक जण बैलासारखा तर एकजण बोकडासारखा ओरडतो. एक जण पिंळवट तर एक ठिपकेदार! हे बेटे बेडूक देवाने नेमिलेल्या बाराव्या महिन्याची वेळ कशी अगदी जपून पाळतात. कधीच चुकवीत नाहीत." हे अवतरण उपहाससूचक आहे यात शंका नाही. पण ही उपहासबुद्धि सुचण्याचे कारण टिळकानी पुढे लेखात स्पष्ट केले आहे. ते म्हणतात 'राष्ट्रीय सभेने अठरा वर्षे खटपट करून सर्व न्यायाच्या मागण्या जोराने सरकारापुढे ठेवल्या पण पूर्वी एक वेळ स्वतः सरकारला या सभेचे जे भय वाटत होते तेहि त्याना हल्ली वाटत नाही. हे पाहून राष्ट्रीय सभावाल्यानाहि आपले काही तरी चुकते आहे अशी शंका सहजच सुचते. सनदशीर चळवळ हाच राष्ट्रोन्नतीचा खरा मार्ग असेल तर तो आम्हाला फलद्रूप का न

व्हावा ? आणि तो मार्ग खरा नसेल तर तो सोडून देऊन दुसरा एकादा अधिक श्रेयस्कर मार्ग का न स्वीकारावा ?'

वरील प्रकारच्या विचारसरणीला काही अंशी ह्यूम साहेबानी मद्रासला पाठविलेला संदेशच कारणीभूत झाला होता. त्यांचा हा शेवटचाच निरोप होता. त्यात ते म्हणतात तुमची चळवळ योग्य दिशेने आणि कळकळीने चालली आहे एवढे माझ्या नजरेला पडले तर मी सुखाने मरेन. टिळकांचे म्हणणे असे की हे कळकळीचे शब्द दाक्षिण्ययुक्त असले तरी त्यातून हिंदी पुढाऱ्यांचा निषेधच निघतो. बिन सनदशीर चळवळ राहिली. पण सनदशीर तीच व्हावी तितक्या नेटाने होत नाही. बारा महिन्यानी एकदा एकत्र जमून ओरडून काय होणार ? कॉंग्रेस हे निव्वळ नित्याचे एक वार्षिक श्राद्ध बनले आहे. आणि ह्यूमसाहेब तर म्हणतात की तुमचे भाग्य तुमच्या हातात आहे. या सभेत होणाऱ्या जोरदार भाषणाच्या आठवणीनेच टिळकाना वरील अवतरण सुचले होते. ह्यूमसाहेबांच्या मते राष्ट्रीय सभेची चळवळ हिंदुस्थानात व इंग्लंडात बाराहि महिने चालविली पाहिजे. राजकीय चळवळ ही काही पुष्पशय्या नव्हे. पैसा व आयुष्य सर्व यात खर्ची पडले पाहिजे. पण मेथा बानर्जी आनंदाचार्लू याना हा ह्यूमसाहेबांचाहि उपदेश पटत नाही ही टिळकांची तक्रार.

मद्रासच्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष लाल मोहन घोस हे होते. घोसबाबू हे मोठे नामांकित वक्ते. किंबहुना त्यांच्या वक्तृत्वापुढे सुरेंद्रबाबूंचेहि वक्तृत्व फिके पडे. याचे कारण त्यांचा आवाज गोड व मोहक असून भाषा सुरेंद्रबाबूंच्या भाषेहून अधिक सुटसुटीत व सुश्लिष्ट अशी असे. खुद्द विलायतेत देखील त्यांच्याइतके इतर कोणाहि हिंदी वक्त्याचे वक्तृत्व लोकाना पसंत पडत नसे. पार्लमेंटमध्ये शिरण्यास ते सर्वस्वी लायक असल्याने व त्याना ती महत्त्वाकांक्षाहि असल्याने त्यानी उमेदवारीची खटपट एक वेळ करून पाहिली होती पण ती फसली. मद्रास कांग्रेसच्या सुमारास घोसबाबू हे सर्व व्यवहार टाकून देऊन एकांतवास पतकरण्याच्या बेतात होते. पण मेथा वगैरे स्नेही मंडळीच्या आग्रहाने मद्रासचे अध्यक्षपद त्यानी स्वीकारले. तथापि एक मुख्य भाषण करण्याखेरीज त्यांच्या हातून या सभेत दुसरे काहीच झाले नाही. व ते त्यांचे भाषणहि त्यांच्यावरील गुंगीमुळे मधून मधून खंडीत असेच झाले. राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाचे काम करीत असताहि ज्याना मदिरामोह आवरला नाही त्यांच्याकडून मार्गदर्शकाचे काम कितपत होणार ? ही त्यांची उणीव त्यांच्याबरोबर परिचारक म्हणून आलेले त्यांचे जावई डॉक्टर शरद् मलिक यानी आपल्या तरतरीनें थोडीबहुत भरून काढली. इतर रीतीने ही राष्ट्रीय सभा बेताचीच झाली. कारण यासाठी २ डिसेंबरच्या अखेरीच्या सुमारास पाऊस पडतो तो यंदा फार पडला. प्रतिनिधींची गैरसोय झाली. सभेच्या मंडपात व कँपातून लहान लहान तळी साचली. एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणी जाणे अतिशय कठीण झाले. आणि जेवणाच्या पंक्ति वाढाव्या तो पाणी शिरून पत्रावळी तरंगू लागाव्या असेहि केव्हा केव्हा

घडले. सभेचें काम पावसामुळे एक अर्धा दिवस बंद पडले. पण ते कसे तरी संपविलेच पाहिजे म्हणून सभा अखेर एका इमारतीच्या मुख्य दालनात भरविण्यात आली. सभेत झालेल्या बहुतेक ठरावांचा कटाक्ष कर्झनशाहीतील अनेक दुष्कृत्या-वर होता. खुद्द मद्रासचे एक गाऱ्हाणे प्रमुखपणे मांडण्यात आले ते मद्रास इलाख्याचा उत्तर भाग तोडून ओरिसा प्रांताला चिकटविण्यासंबंधाचे होते. ही एक प्रकारची फाळणीच होती आणि या गाऱ्हाण्याला बंगाली पुढाऱ्यानीहि आपला पाठिंबा दिला. याचे कारण बंगाल प्रांताचीहि फाळणी पुढे लवकरच होणार असे दुःस्वप्न त्याना पडू लागले होते. या बडया व क्षोभकारक फाळणीची तयारी गुप्तपणे कर्झनशहाच्या दरबारच्या अंतरंगात सुरू होती. आणि या कारस्थानाचे शिरपे थोडथोडे बाहेर येऊ लागले होते. तथापि या विषयावर स्वतंत्र ठराव करण्याइतके परिणत स्वरूप या विषयाला अद्यापि आले नव्हते इतकेच काय ते.

---

# परिशिष्ट

## [ १९०१ ते १९०३ मधील निवडक पत्रे ]

### ( १ ) शेषाद्रिशास्त्री यांचे टिळकाना पत्र

विजयनगरम् १८ डिसेंबर १९०१

इकडे यंदाच्या अधिक मासाबद्दल मोठा वाद पडला आहे. कोणी आषाढ म्हणतात कोणी श्रावण म्हणतात. राजमहेंद्री येथे मोठी सभा भरून पंच नेमून ज्योतिषाना आपापली बाजू त्यांच्या पुढे मांडण्यास आव्हान केले होते. त्यापैकी राम नरसिंह सिद्धान्ती यानी ग्रहसाधनाचे कोष्टक या नावाचे मराठी पुस्तक आधार म्हणून पुढे आणले. सभेतच लोकानी ते प्रथम पाहिले. ते प्रोफेसर केरो लक्ष्मण छत्रे यानी लिहिले होते असे आढळले. ग्रहणाचे गणित करण्याला ते फारच चांगले आहे असे समजते. मद्रासेस आपली कॉंग्रेसच्या वेळी ओळख झाली तिचा फायदा घेऊन मी आपणाला तसदी देत आहे. तरी कृपा करून ते पुस्तक मजकरिता मिळ-वावे व पाठवावे. पडेल ती किंमत देण्यास मी तयार आहे. त्याचे इंग्रजी किंवा संस्कृत भाषांतर झाले असले तर त्याचीहि एक प्रत पाठवावी कारण इकडील लोकाना मराठी कळत नाही.

(२) मर्कन्टाईल बँकेचे टिळकाना पत्र

पुणे २२ डिसेंबर १९०१

आपण व गावातील इतर प्रमुख मंडळी यानी करार लिहून दिला आहे की, पूना मेटल मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने बँकेशी व्यवहार करून लोखंडी पत्रा तारण ठेवून रक्कम घेतली व सदर कंपनीस तोटा झाल्यास रक्कम रुपये दोन हजार पर्यंत आपण देऊ. आपण त्यात दोनशे रुपये पर्यंत देण्याचे कबूल केले आहे. तरी ५७४ रुपये तोटा झाला त्यातील आपल्या हिश्याची रक्कम ५७ रुपये देण्याची आहे तरी ती मेहेरबानीने पाठवून देण्याची तजवीज व्हावी.

(३) नारायणराव अळेकर यांचे टिळकाना पत्र

नागपूर ५ जानेवारी १९०२

ब्रम्हेंद्रस्वामींच्या चरित्रावर केसरीत लेख आला. त्यावर राजवाडे यानी ग्रंथमालेच्या ८८ व्या अंकात अगदी प्रतिकूल मजकूर लिहून केसरीकार व पारसनीस यांची यथेच्छ संभावना केली आहे. त्यांचे काही आधार संशयात्मक व काही ठिकाणी निवळ विपर्यास केला असे वाटते. मी त्याना उत्तर देण्याचे योजिले आहे. तरी या विषयी आपले मत कळवावे. कलकत्त्याचे देऊस्करहि या वादात पडणार आहेत. त्यांचे मत केसरीला अनुकूल आहे. येथील सदाशिवराव भावे हे केसरीकरिता नागपुरच्या बातमीदाराचे काम करण्यास तयार आहेत व ते ते चांगले करतील असे मला वाटते.

(४) भाऊसाहेब भाटे यांचे टिळकाना पत्र

सांगली ११ जानेवारी १९०२

राजाराम हायस्कूल कोल्हापूर यांतील दोन मॅट्रिक पास झालेले विद्यार्थी जपानला जाऊन त्यांच्या लागी असेल ती विद्या शिकू इच्छितात. दत्तोपंत शाळिग्राम हे तिकडून परत आले आहेत. त्या दोन मुलांच्या पालकांची इच्छा या मुलाना मदत करण्याची आहे. तरी टोकिओ युनिव्हर्सिटीचे कॅलेंडर किंवा त्या सारखी इतर पुस्तके मला पाठवाल काय?

(५) नरहर बाळकृष्ण जोशी यांचे टिळकाना पत्र

राजकोट १३ जानेवारी १९०२

माझा विवाह पुणे येथे १८९३ साली हिंदुधर्मोपदेशक नारायणराव बाम यांचे कन्येशी झाला. तो आपणास किती प्रशंसनीय व अनुकरणीय वाटला हे त्या वेळचे केसरीपत्रात आपण स्वतः अनुकूल व अभिनंदनपर लेख लिहिला होता त्यावरून व्यक्त झाले होते. बाम यांच्या धाकट्या मुलीचाहि विवाह झाला तो अधिकच

प्रशंसनीय असलेमुळे त्याची हकीगत प्रसिद्ध करण्याकरिता कर्वे यांचे मार्फत आपणाकडे पाठविली. सुधारक पत्राकडे हकीगत पाठविली परंतु त्यात आली नाही. तरी ती हकीगत आपण आनंदाने छापाल असे मला वाटते. आमचे विद्वान् मित्र डॉ. नानासाहेब देशमुख व चिंतामणराव वैद्य यानी व्याख्यानात व लेखमालेत प्रतिपादिल्याप्रमाणे आजकाल मुली १८ वर्षेपर्यंत अविवाहित ठेविल्या तरी आमचे समाजाकडून यत्किंचितहि छळ कसा होत नाही हे मी पाठविलेल्या हकीगतीवरून दिसण्यासारखे आहे.

### (६) भाऊ बाबाजी लठ्ठे यांचे टिळकाना पत्र

कुरुंदवाड १५ जानेवारी १९०२

महाराष्ट्र जैन समाजाची स्थिती सुधारण्याच्या हेतूने दक्षिणी महाराष्ट्र जैन सभा निपाणी जवळ एका देवस्थानाचे ठिकाणी भरत असते. तीत अनेक सामाजिक प्रश्नांची चर्चा गेल्या चार वर्षे चालू आहे. एक हजाराहून अधिक लोक सभेत येतात व यात्राहि मोठी असते. जैन लोकात हल्ली बरेच प्रौढ विवाह होऊ लागले आहेत. इतिहासात जैन लोक श्रीमंत होते असा लेख आढळतो. कांहीं जैन श्रीमंत असतील पण दक्षिणेतील जैन फार गरीब आहेत. या सभेच्या मॅनेजिंग बोर्डाने यंदा आपणास सभेचे अध्यक्षस्थान देण्याचे योजिले आहे. आपणाला राष्ट्रातील प्रत्येक मनुष्य ओळखतो व प्रमुख पुढारी मानतात. या भरवशावर आपणास ही विनंति केली आहे. तरी सभेस महत्त्व आणण्याकारिता ता. ९ फेब्रुवारी १९०२ रोजी आपण सभेस येण्याचे करावे ही विनंति.

### (७) के. गंगाराम यांचे टिळकाना पत्र

मद्रास २९ जानेवारी १९०२

कलकत्ता येथे आपले गेल्या महिन्यात हिंदुधर्म या विषयावर विद्वत्तापूर्ण असे व्याख्यान झाले ते मी वाचले. त्यात हिंदु व हिंदुत्वास प्रतिकूल असणारे या दोषासहि फार चांगला बोध केला आहे. आपल्यासारख्यानी प्रयत्न केल्यास जुन्या शुद्ध व पवित्र हिंदुधर्माचे रूप लोकाना प्रगट होऊन त्याचा पुनरुद्धार होईल. तरी हिंदुधर्म ह्मणजे काय ? व तो वेद गीता उपनिषदे पुराणे व आजचे लोकमत या प्रमाणे कसकसा बदलत गेला ? हिंदुधर्म हा सर्वोत्तम मानण्याची कारणे काय ? त्याने ऐहिक प्रगतीला अडथळा होतो किंवा काय ? व हिंदुस्थानाला कर्मभूमि का मानतात ? याविषयी आपण काही विचार व आधार कळविले तर आपले फार उपकार होतील.

### (८) लजपतराय यांचे टिळकाना पत्र

लाहोर १० फेब्रुवारी १९०२

आपण मला कबूल केले होते की राष्ट्रीय विषयावर इकडील देशभाषेत भाषांतर करण्याकरिता उपयोगी पडण्यासारख्या मराठी पुस्तकांची यादी पाठवितो.

तरी ती पाठवावी. तसेच सामाजिक परिषदेने अनाथ मुलांचे वसतिगृह काढण्या-विषयी ठराव केला आहे. तरी अशा गृहात ठेवण्यासारख्या मुलांची यादी सरकाराने किंवा इतर कोणी केली असल्यास ती पाठवावी व या विषयावर एखादे स्फुट लिहिण्याला मराठ्याच्या संपादकाना सांगावे.

### (९) भाजेकर यांचे टिळकाना पत्र

मुंबई २२ जुलै १९०३

पुनर्विवाहाच्या बाबतीत काही तडजोड करण्यास तुम्ही कबूल आहात हे वाचून आनंद झाला. तथापि तुमच्या खटल्याचा निकाल लागेपर्यंत तुम्हाला या बाबतीत काही करता येणार नाही हे मी जाणतो. मी केळकर बोडस वगैरे मंडळी काल रात्री या गोष्टीची वाटाघाट करीत होतो. ही वाटाघाट वर्तमान पत्रातून न व्हावी हे तुमचे म्हणणे सर्वथा योग्य आहे. पुनर्विवाहाच्या चळवळींचे पुढारी सयुक्तिक तडजोडीला कबूल होतील अशी मला आशा आहे. मी स्वतः पुढारी नसलो तरी ही गोष्ट मान्य करण्याला तयार होईन. या पुढाऱ्यांची व तुमची प्रत्यक्ष गाठ पडून बोलणे होईपर्यंत तडजोड कशी व्हावी हे लिहिणे व्यर्थ आहे. पण मी येवढ्या-करिताच पत्र लिहीत आहे की तुम्ही तडजोडीस तयार आहा ही बातमी ऐकून ज्याला समाधान वाटले व जो त्याविषयी खटपट करण्याला तयार आहे असा मज-सारखा निदान एकतरी मनुष्य आहे हे तुम्हाला कळावे.

### (१०) नानासाहेब गोखले यांचे केळकराना पत्र

मुंबई २० सप्टेंबर १९०३

केसरीत माझ्या मताचा विपर्यास झाला आहे. म्हणून माझे हे पत्र छापा. कोणत्याहि हिंदी मनुष्याप्रमाणे मीहि स्वदेशीचाच भोक्ता आहे. गुजराथी पत्रातून मी स्वदेशीचा पुरस्कार करीत असतो. बोडस यांच्या बरोबर मीच मुंबईच्या सभेचे ठराव तयार केले. एका देशाशीहि टक्कर मारणे कठीण मग तीन किंवा चार देशाशी एकदम झुंजून हिंदुस्थानचा निभाव कसा लागेल ? येवढ्याकरिताच मी बहिष्काराच्या विरुद्ध आहे. किमती बेसुमार चढून आपले लोक त्याखाली अगदी चिरडून जातील आणि इतकेहि करून स्वदेशी धंद्याना दृढ असे अधिष्ठान मिळेल की नाही याची शंकाच वाटते. आज ९९ टक्के कापड विलायतेहून येते व एक टक्का इतर देशाहून येते अशी स्थिति आहे. अजून इतर देशाना विलायती कापडाशी टक्कर देता येत नाही म्हणून अमेरिका व युरोपखंड येथून पुष्कळसा माल येत नाही. त्या लोकाना आपले हित कळते आणि कोणाशी स्पर्धा करताना आपणाला किती यश येईल हेहि त्याना चांगले कळते. म्हणून बहिष्काराची चळवळ ही व्यवहाराच्या दृष्टीने अशक्य आणि राजकारणाच्या दृष्टीने अयुक्तिक असे माझे

मत आहे. मग ते बरोबर म्हणा अगर चूक म्हणा. पण मी स्वदेशीच्या विरुद्ध आहे असे जे भासविण्यात येते ते बरोबर नाही. गेल्या वर्षांचे ताजे आकडे वाटेल तर मी पाठवितो.

### ( ११ ) बाबू रमेशचंद्र दत्त यांचे टिळकांना पत्र

वैदिक सुधारणेच्या प्राचीनतेविषयी तुह्मी जे लिहिले ते मी लक्षपूर्वक वाचले. खिस्तापूर्वी चार हजार वर्षे तरी सिंधू नदीकडील आर्य लोक सुधारलेले होते व कित्येक लोक मानतात त्यापेक्षा सुधारणा अधिक जुनी असल्याचे आता कबूल होऊं लागले आहे. मी महाभारताचे संक्षिप्त कविताबद्ध इंग्रजी भाषांतर केले आहे त्याची एक प्रत तुम्हाला पाठवीन. ती वाचून अभिप्राय कळवा. मुंबईस आल्यावर तुमची गाठ घेईन अशी आशा आहे. एशिॲटिक क्कार्टर्ली रिव्ह्यूचा अंक या सोबत पाठवीत आहे. त्यात कार्यकारी कौन्सिलात हिंदी लोक असावे याचे मी समर्थन केले आहे ते वाचा.

### ( १२ ) स्विनीसाहेबांचे सरदार नातूंना पत्र

लंडन ९ ऑक्टोबर १९०३

टिळकांची गाठ पडली तर त्याना आदरपूर्वक माझे प्रणाम कळवा. त्यांच्या विषयी फार सहानुभूति वाटते. त्यांचा ग्रंथ मी हल्ली वाचीत आहे. त्याचे मला फार कौतुक वाटते. अशा ग्रंथाबद्दल कोणतेहि राष्ट्र अभिमानच बाळगील. त्यांच्या खटल्या संबंधाने खासगी अशी काही माहिती मिळाल्यास कळवा. अपिलात त्याना यश यावे असे मी इच्छितो. दक्षिण आफ्रिकेतील सैन्याचा खर्च हिंदुस्थानाने द्यावा अशी सूचना येथे आली पण ती आम्ही हाणून पाडली. या यशाने आम्हाला मोठी हुरूप आली आहे. ही सूचना इतक्या अन्यायाची होती की त्यामुळे इकडचे काही लोक प्रथमच हिंदुस्थानच्या राज्यकारभारात लक्ष घालू लागले. कॉंग्रेस कमिटीने त्यासंबंधाने येथे सभा भरविली ती फार चांगली झाली. किती तरी वर्षांत अशी सभा झाली नव्हती. तुमची मिळकत जप्तीत ठेवली याबद्दल मी येथे वकीलाकडे चौकशी केली. पण त्यांचे ह्मणणे की येथे त्याविरुद्ध काही कायदेशीर इलाज करतां येत नाही.

# भाग ३ रा

## ताईमहाराज प्रकरण

टिळकांचा संबंध आल्याने ज्या कित्येक नावाना विनाकारण प्रसिद्धी मिळाली त्यातलेच ताई महाराज हे एक नाव होय! टिळकांशी आणि तोहि विरोधी नात्याने संबंध न येता तर ताई महाराज हे नाव पुण्यातील दहा पाच व पुण्याबाहेरील दहा पाच घरापलीकडे ऐकू गेले नसते. पण वर सांगितल्या कारणामुळे त्या नावाने हिंदुस्थानातील सर्व वर्तमानपत्रातून प्रसिद्धी मिळविली. इतकेच नव्हे तर मुंबई गव्हर्नराच्या खासगी व जाहीर दरबारातून अनेक सरकारी कचेऱ्यातून मुंबई हायकोर्टातून व साता समुद्रापलीकडील प्रिव्हि कौन्सिलातून ते स्त्रीनाम गाजून गेले! या प्रकरणातील दत्तविधानाच्या कज्जासारखे कज्जे पुष्कळ होतात. दत्तक आईच्या मांडीवर बसून होताच पायाने आईला लाथाडणारे उसने मुलगे जसे जगात अनेक, तसेच दत्तक घेतलेला मुलगा मांडीवरून खाली ठेवताच त्याला लाथाडणाऱ्या आयाहि जगात अनेक होऊन गेल्या. गढूळ पाणी पाहताच धीवराने जाळी टाकून मासे धरावे व भाजून खावे त्याप्रमाणे कलुषित मनाच्या विधवाना भलत्या गोष्टी सांगून दत्तकाचे कज्जे उभे करून त्यात आपला हात साधून घेणारे धूर्त लोक जगात अनेक होऊन गेले. पण अशा धूर्त मनुष्यानी टिळकांएवढ्या योग्यतेच्या महापुरुषावर उलटविलेली अशी एकच दत्तक आई ताईमहाराज होय! ताईमहाराजांशी विरोध केल्याने टिळकाना कसली कीर्ति लाभणार होती? पण टिळकांशी विरोध केल्याने ताईमहाराजांचे नाव जवळ जवळ टिळकांइतकेच चिरस्थायी झाले यात मात्र शंका नाही. प्रतियोगी कीर्ति म्हणतात ती ही अशी!

### (१) कर्तव्याचा चरक

'ताईमहाराज प्रकरणाने टिळकांचे रक्त खाल्ले' असे म्हणणे नुसते लक्षणेनेच नव्हे तर शब्दार्थानेहि खरे मानावे लागते. हे खाल्लेले रक्त बाहेर कोणाला दिसले नसेल. तरी या प्रकरणाने टिळकांच्या आयुष्यातील किती वर्षे खाल्ली हे तरी अगदी उघड्या हिशेबाने सिद्ध करता येण्यासारखे आहे. १९०१ साली १६ नोव्हेंबर रोजी पुण्याचे डि. जज मि. ॲस्टन यांच्या कोर्टात साक्षीकरिता पाऊल ठेवल्यापासून तो तहत १९२० साली जुलै महिन्याच्या तारखेस म्हणजे या दत्तकप्रकरणीच उपांगभूत झालेल्या अशा एका मुकदम्याचा निकाल आपल्या सारखा झाल्याचे शुभवर्तमान त्यांच्या कानी पडेपर्यंत, टिळकाचे असे एकहि वर्ष किंवा त्यातील एकहि महिना गेला नसेल की त्याना या दत्तकप्रकरणी काहीना काहीतरी काम करावे लागले नाही. मग ते काम कोणास खासगी पत्रे लिहिण्याचे असो, कोणाशी चर्चा करण्याचे असो, कोणाला खर्चाला पैसे देण्याचे असो, अर्जे किंवा टिपणे

लिहिण्याचे असो, कायद्याची पुस्तके पाहण्याचे असो, कोर्टात हेलपाटे घालण्याचे असो, वकीलबॅरिस्टरांची खुशामत करण्याचे असो, शाबित झालेल्या दत्तक मुलाची काळजीपूर्वक पूस तपास करण्याचे असो, किंवा त्याच्याकरिता तुरुंगात जाण्याचे असो. आणि इतके सर्व कशाकरिता ? तर दत्तकप्रकरणी जे पाऊल एकदा पुढे टाकले ते कायम करण्याकरिता.

पुढे टाकलेले पाऊल कायम करण्याला टिळकाना किती यातायात पडली हे पाहिल्यावर वास्तविक त्यांच्या करारीपणाचे कौतुक करण्याऐवजी, स्वतःच्या कमकुवतपणाच्या अंदाजावरून पुष्कळ लोक असे ह्मणणारे निघाले की "टिळकानी पुढे पाऊल टाकले ही पहिली चूक व ते कायम करण्याच्या वीरश्रीत आपल्या सर्वस्वाची आहुती देण्यापर्यंत मजल नेली ही दुसरी चूक!" पैकी पाऊल पुढे टाकले ही मुळात चूकच नव्हे हे पुढील काही हकीगतीवरून वाचकाना दिसून येईल. आणि एकदा पाऊल पुढे टाकले ते कायम करण्यात 'प्रारब्धस्यांतगमनम्' हे जे बुद्धिलक्षण ह्मणून नीतिशास्त्रकारानी सांगितले ते प्रगट करून, टिळकानी आपल्या अंगचा करारीपणाचा मोठाच गुण प्रगट केला हे कोणासहि कबूल करावे लागेल. आता ही गोष्ट खरी की हे सर्वच प्रकरण एका अर्थाने टिळकांवर अनिच्छेने कोसळले. पण अनिच्छेचा पहिला क्षण उलटून जाताच, म्हणजे टिळक ते नको नको म्हणत असता ताईमहाराजांच्या पतीनी आपल्या मृत्युपत्रात ट्रस्टी म्हणून टिळकांचे नाव लिहून सही करिताच, अनिच्छा संपून टिळकांच्या करारी इच्छेला कार्यारंभ करावा लागला. अनिच्छेच्या या एका क्षणाच्या कमकुवतपणामुळे, करारी इच्छेने जाणून बुजून टिळकाना पुढील वीस वर्षांचा काळ कर्तव्याचा आनंद पण परिस्थितीचे दुःख भोगण्यात घालवावा लागला.

शेपटीचा एक केस चरकात सापडला की त्या मागून सगळे जनावरच्या जनावर चरकात जाते ह्मणतात. त्याप्रमाणे एका स्नेह्याच्या इस्टेटीचे हित साधण्याच्या ह्मणजे एक मित्रकार्य करण्याच्या इच्छेची अनिवार प्रवृत्ति टिळकाना क्षणभर झाली त्या बरोबर त्या मित्राचे मृत्युपत्र त्याना करवावे लागले. मृत्युपत्राप्रमाणे व्यवस्था नीट पार पडावयाची तर त्याला ट्रस्टी किंवा एक्झिक्यूटर भरवशाचे पाहिजेत. असे चार भरवशाचे ट्रस्टी मिळाले तरी त्याना एखादा जबाबदार पुढारी पाहिजे. पुढारी असेल तरी तो प्रतिष्ठित पाहिजे, कारण घराणे सरदाराचे पडले. प्रतिष्ठित असून तो वाकबगार कायदेपंडित असेल तर फारच चांगले. कारण भानगडी हटकून उत्पन्न व्हावयाच्या! व इतके सर्व असूनहि तो शक्य तर पुण्यास राहणारा बरा. कारण कारभार सर्व पुण्यातच होणार! कॉलऱ्याच्या व्यथेने टिळकांचे स्नेही बाबामहाराज हे अखेरच्या वेदना सोशीत बिछान्यावर पडले असता त्याना स्वतःच्या मरणाहून आपल्या पश्चात् उरणाऱ्या गरोदर तरुण विधवेचीच चिंता अधिक वाटली असल्यास नवल नाही. आणि वरील कार्यकारणपरंपरा लांबलचक असली तरी टिळक ट्रस्टी लाभले तर ही सर्व व्यवस्था कायमची दूर होईल हा विचार महाराजांच्या

मनात विजेप्रमाणे एका क्षणात स्फुरण पावून गेला असल्यास त्यातहि नवल नाही. बाबामहाराजांच्या आजारात असता टिळक हे पहिल्या खटल्यात जामिनावर सुटून पुण्यास आले नसते तर बाबामहाराजांचे मृत्युपत्रच कदाचित् पार पडले नसते. पण सुटून आल्यावर व मरू घातलेल्या मित्राच्या संनिध असल्यावर टिळकानीं मृत्युपत्र न करवावे तर काय करवावे? महाराजानी तरी टिळकांसारखा पुढारी ट्रस्टी न नेमावा तर कोण नेमावा? आणि मृत्युशय्येवर पडलेल्या मित्राने माझे हे शेवटचे काम करा असे म्हटल्यावर टिळकानी तरी ते कसे अमान्य करावे? पण भलेपणाचा व कर्तव्यबुद्धीचा जो चरक म्हणून असतो तो असाच. कारण एक गोष्ट मूळ घडली की तिच्यामागून इतर गोष्टी अनिवार्य म्हणून पुढे उभ्या राहतात व त्याहि मग पार पाडाव्या लागतात. मृत्युपत्राची कल्पना सुचविल्यावर ट्रस्टी होत नाही कसे म्हणता येते? ट्रस्टी झाल्यावर दत्तविधानाची खटपट केल्याशिवाय कसे भागते? एक दत्तविधान झाल्यावर आणखी दुसरे होऊन बखेडा होणार असे दिसल्यावर ते दुसरे थांबविण्याचा प्रयत्न न करून कसे चालेल? आणि या सर्व भानगडीमुळे दिवाणी फिर्यादी कराव्या लागल्या व फौजदारी फिर्यादी करून घ्याव्या लागल्या तर त्यानाहि तोंड दिलेच पाहिजे व त्याकरिता पडेल तो खर्च जातीनेहि केलाच पाहिजे.

## (२) थोडा पूर्ववृत्तांत

ताईमहाराज हे बाबामहाराजांचे दुसरे कुटुंब. ही पुण्यांतील एका सामान्य गृहस्थाची मुलगी होती. आणि बिजवराला ती देण्याला बाप तयार झाला म्हणून या मोठ्या घरी पडली. बाबामहाराजाना पूर्वीच्या कुटुंबाच्या दोन मुली होत्या. त्या लग्ने होऊन आपापल्या घरी गेल्या होत्या. पण पोटी मुलगा नाही हे आणखी एक विवाह करण्याला नेहमीचे कारण होतेच. आणि दरिद्री लोभी आईबाप हे जसे बिजवराच्याहि गळ्यात मुलगी बांधण्याला तत्पर असतात त्याप्रमाणे बिजवर नवराहि मिळेल ती मोठी नवरी करून घेण्याला उतावीळ असतो. एका विनोदी गृहस्थाने बिजवर नवऱ्याला वादळात सांपडलेल्या जहाजाची उपमा दिलेली आहे व ती यथार्थ होय. वादळात सांपडलेले जहाज अवजारे पाडून मिळेल त्या पहिल्या बंदराच्या आश्रयाला जाते त्याप्रमाणे बिजवर नवरा मिळेल ती प्रौढ नवरी करण्याला आतुर असतो. मग त्या वेळी तो कुलशील किंवा सामाजिक योग्यता काही पाहात नाही. शिवाय असेहि सांगतात की बाबामहाराजांचा देवभोळेपणा पाहून मुलीच्या लोभी आईबापानी व स्वार्थसाधु मध्यस्थानी मोठ्या शिताफीने ती बाबामहाराजांच्या गळ्यात बांधली. मुलगी सामान्यतः सुरूप होती. परंतु सामान्य कुळातली गरीबाची म्हणून कदाचित् हरकत येणार. पण यांना महाराजांचा स्वभाव माहीत एवढेच नव्हे तर त्यांच्या धर्मभोळ्या समजुतीहि माहीत. आठवड्यातील अमुक एका दिवशी नवरी सांगून मुलगी घरी आली तर ती परत करणे पाप आहे अशा कल्पनेवर महाराजांचा विश्वास. असे जाणून पूर्वीच्या कुटुंबाचे सुतक फिटून क्रियाकर्मांतर

होण्याच्याहि आधी इष्ट वार साधून यानी मुलगी महाराजांच्या घरी नेली. अर्थात् साखरपुडा होऊन मुलगी घरात शिरली ती पट्टराणी होऊन बसली.

या कुटुंबाला प्रथम मुलगी झाली तिचे नाव शांताआक्का. पुढे लवकरच महाराजांचे हे नवे कुटुंब गरोदर राहिले तेव्हां मुलगा होण्याची आशा-,उत्पन्न झाली. पण अशा स्थितीत महाराजाना महामारीचा वाखा झाला. ताईमहाराज गरोदर नसत्या तरी मिळकत परघराण्यात जाऊ नये म्हणून दत्तक घेण्याची परवानगी महाराजानी दिलीच असती. पण बाई गरोदर असल्याने मुलगा होईल या आशेला जागा होती. आणि मुलगा झाला तर तो सज्ञान होईपर्यंत त्याची व त्याच्या इस्टेटीची काळजी घेण्याकरिता विश्वासू ट्रस्टी पाहिजे होते. या विशेष विचारानेच महाराजाना टिळक हे ट्रस्टी हवे होते व त्याप्रमाणे ते नेमले गेले. पुढे योग्य काली ताईमहाराज प्रसूत होऊन मुलगा झाला पण तो अवघ्या दोन महिन्यातच वारला. यामुळे दत्तक देऊन वंश चालविण्याची आपत्ति उरलीच. महाराजांच्या मृत्यूनंतर तीन चार वर्षे या बाबतीत काहीच करता आले नाही. बाबामहाराज ता. ७ ऑगस्ट १८९७ रोजी वारले व त्यानंतर १४ सप्टेंबर रोजी शिक्षा होऊन टिळक तुरुंगात गेले. १८९८ त टिळक सुटून आल्यावर प्रकृति सुधारण्यात त्याना बरेच दिवस घालवावे लागले. शिवाय दत्तकाचे काम हाती घेण्यापूर्वी अधिक जरूरीचे असे एक काम होते ते इस्टेटीच्या सावकारांचे तगादे भागविणे ! आणि या विषयीची व्यवस्था टिळकाना ट्रस्टीचा अधिकार स्वीकारल्यापासून म्हणजे तुरुंगात असल्यापासूनच करावी लागली. बाहेर आल्यावर त्यानी नवे सावकार उभे करून जुनी कर्जे काही वारली व हे करताना कित्येक लोकाना स्वतः ते व त्यांच्या बरोबरीचे इतर ट्रस्टी म्हणजे खापर्डे कुंभोजकर नागपुरकर याना आपल्या व्यक्तिशः जबाबदारीवर कर्जरोखे लिहून द्यावे लागले. इस्टेट बोलून चालून कर्जबाजारी. सावकारांचे हुकुमनाम्यावर हुकुमनामे होत असत. आणि बाबामहाराजानी कोणाला किती प्रॉमिसरी नोटा लिहून देऊन कोणाला न कळत कर्जबाजारी किती पेरून ठेवली असेल याचा अंदाज नाही. अशा स्थितीत इस्टेटीच्या तारणाबरोबर ट्रस्टीच्या ऐपतीचे तारणहि सावकार मागणारच. असो. अशा रीतीने सावकारांचे तगादे स्थिर केल्यावर टिळकानी दत्तकाचे काम हाती घेतले. पण ते लवकर हाती घेण्याचे आणखी एक कारण असे की ताईमहाराजांची प्रकृति बिघडू लागून कदाचित् त्याना क्षयाची भावना होईल अशी चिन्हे ट्रस्टीना दिसू लागली होती.

दत्तक घ्यावयाचा तो अर्थात् गोत्रजच घ्यावयाचा. परंतु त्यातल्यात्यात घराण्याच्या कोणत्या शाखेचा घ्यावयाचा हा एक मोठा नाजुक प्रश्न होता. घराण्याच्या एक दोन शाखा कोल्हापुरास होत्या व त्यात दत्तक घेता येतील अशी काही मुलेहि होती. पण या मुद्द्यावर ट्रस्टीत मतभेद होता. नागपुरकर वगैरेंचा ऋणानुबंध कोल्हापुरास पुष्कळ व तिकडील शाखातील कर्त्या पुरुषांचा त्यांच्याशी

बराच परिचय. यामुळे कोल्हापूरपैकी एखादा मुलगा दत्तक घ्यावा अशी त्यांची स्वाभाविक इच्छा. निदान त्याना या कामी फार गळ पडलेली होती. काही लाचलुचपतीचे प्रयत्नहि सुरू होते. खापर्डे यांचे या कामी निश्चित असे मत नव्हते. टिळकांचा आग्रह नसता तर कदाचित् त्यानी नागपुरकर यांच्या म्हणण्याला सहजासहजी रुकार दिला असता. पण टिळकांचा जणू काय प्रथमपासून असा निश्चय होता की होता होईल तो कोल्हापूरकडील मुलगा घ्यावयाचा नाही. त्याचे खरे कारण असे की संस्थानातील वातावरण सामान्यतः दूषित असते. त्यातूनहि कोल्हापुरात ती आपत्ति विशेष. कोल्हापूर शाखेपैकी एकदोघा प्रौढ मुलानी आधीच अपकीर्ती करून ठेवलेली. आणि अशा गोतावळ्यातला व गुंतागुंतीतला मुलगा दत्तक घेतला तर तो, पुढेमागे वाईट सल्लागारांच्या हाती पडून इस्टेटीचे वाटोळें करील. आणि आपल्या मित्राचे घर निष्कर्जी करून सुशिक्षित लौकिकवान् अशा मुलाच्या आधारावर उभे करून त्याला शक्य तितके देशसेवेला लावू ही तर टिळकांची इच्छा! अर्थात् ती निष्फळ होईल या भीतीने त्यानी दूर निजामशाहीतला मुलगा दत्तक घ्यावा असा मनाशी विचार केला होता.

या योजनेने टिळक इस्टेटीचे कल्याण करणार होते व औरंगाबादेकडील एखाद्या शाखेचे भाग्य अकल्पितपणे उदयाला येणार होते. पण त्याजबरोबर कोल्हापूरच्या शाखा त्यांची बाजू उचलून धरणारे ट्रस्टी आणि कोल्हापूरच्या महाराजांसुद्धा त्यांचे प्रबळ हितचिंतक हे सर्व आपले वैरी होणार ही गोष्ट टिळकांच्या लक्षात आली नाही किंवा आली असली तरी ती त्यानी विशेष जुमानली नाही. चारी ट्रस्टींनी मिळून आपले मुखत्यारपत्र नागपूरकर याना दिले होते व ते बाबामहाराजांच्या वाड्यात राहून कारभार करीत होते. म्हणून या कारभाराला त्याना बाईचे मन वळवून घेता आले. पण टिळकांची विचारसरणी इस्टेटीच्या हिताच्या दृष्टीने निर्दोष, ते स्वतः या कामी सर्वस्वी निर्लोभ, आणि ट्रस्टीतील खरे पुढारीपण त्यांच्याकडे, यामुळे त्यांच्या आग्रहांपुढे सर्वांनाच नमते घ्यावे लागले. पैकी टिळकांचे ऐकण्यात खापर्डे याना मनापासून आनंद; कारण टिळकांवर त्यांचा विश्वासच तसा होता. कुंभोजकर याना कोल्हापूरच्या मंडळीना नाराज करण्याचे कठिण वाटले नाही. म्हणून टिळकांचा विचार हाच एकंदरीने योग्य असे ठरवून त्यानीहि पण टिळकांची योजना उघडपणे उचलली. पण नागपूरकर हेच सर्वात अधिक ढिले असल्यामुळे कोल्हापूरकर मंडळीचा दाब त्यांच्यावरून निघेना आणि इकडे टिळकांच्या विरुद्ध जाण्याचे धैर्यहि त्याना होईना. अशा स्थितीत त्यानी वर दाखवावे एक मनात राखावे दुसरे असे दुरंगी वर्तन ठेविले.

ताईमहाराज बोलून चालून पुत्रहानीमुळे दुःखीकष्टी. त्याना कोल्हापूरचा मुलगा काय व औरंगाबादेकडील काय दोन्ही वास्तविक सारखेच. पण घरी नागपूरकर यांची कुचकुच व कानगोष्ट रात्रंदिवस चाललेली. त्यानी बाईच्या मनास

असे भरवून दिले की ' टिळकांच्या विचाराप्रमाणे दत्तक झाला तर तुम्हाला हिंदु विधवेप्रमाणे जन्मभर परतंत्र व मिळेल तो घास खाऊनच राहिले पाहिजे. टिळकांच्या दत्तकाच्या कारभारात कोणाचाच हात भिजण्याला सवड नाही. उलट कोल्हापुराकडील मुलगा घेतला तर तो अंतस्थ रीतीनें तुमच्याशी करारमदार करून मिळकतीचा काही भाग तरी तुम्हाला कायमचा तोडून देईल. शिवाय एखादी रक्कमहि देणगीदाखल देईल.' हा विचार कोणालाहि भुरळ घालण्यासारखाच होता. कारण वर सांगितल्याप्रमाणे घडले तर स्वतः यजमानीण बाईसाहेब व त्यांचे कारभारी याना सरदारघराण्याशी संबंध आल्याप्रमाणे थोडे तरी चैनीने व मिजाशीने राहता आले असते. बाई अल्पवयी असल्या तरी दत्तकाच्या दोन योजनेतील तारतम्य कळण्यापुरत्या प्रौढ होत्या. पण जसा नागपूरकराना तसाच त्यानाहि टिळकांचा मोठा वचक. मायाळूपणाने बोलून खापर्डे यांचे मन वळविण्याचा एक वेळ संभव तरी. पण इतर बाबतीत रीतीच्या कामी टिळक त्याना काही एक कमी करणारे नव्हते तरी मुद्याची गोष्ट आली असता त्यांचे धोरण तरवारीच्या धारेसारखे तीक्ष्ण आणि खंबीर. त्यात ढिलेपणा म्हणून नाही. यामुळे बाईनाहि नागपुरकराप्रमाणेच टिळकाशी उघड हुजत न घालता काहीसे नमूनच वागावे लागे. शेवटी सन १९०१ च्या जून महिन्यात दत्तकप्रकरण निकालाच्या हातघाईवर आले. त्याकरिता वडगावांस व पुण्यास ट्रस्टींच्या सभा मुद्दाम भरविण्यात आल्या. व अखेर ता. १८ जून रोजी ट्रस्टींच्या तर्फे टिळक खापर्डे आणि स्वतः ताईमहाराज यानी औरंगाबादेकडे जाऊन दत्तकप्रकरणाचा कायमचा निकाल करून परत यावे असा ठराव झाला. कारभारी म्हणून नागपूरकरानीच औरंगाबादेकडे जाऊन तिकडील मुलांची चौकशी वगैरे करावी असे पूर्वी ठरले होते. परंतु ते काम त्यानी अंगाबाहेर टाकले. तेव्हा वाड्यात शिजत असलेल्या कारस्थानाची कल्पना येऊन आता यापुढे विलंब करू नये व एकदा दत्तविधान झाले म्हणजे पुढील सर्व खटाटोप आपोआप संपेल, असे वाटून औरंगाबादेकडे ताईमहाराजाना घेऊन जाण्याचा व दत्तकप्रकरण हातावेगळे करण्याचा ठराव टिळकानी ट्रस्टीकडून करून घेतला.

## (३) दत्तविधान व प्रतिक्रिया

नागपूरकर औरंगाबादेकडे जात नाहीत असे पाहिल्यावर तिकडील चवकशीचे काम टिळकानी आपल्याच हाती घेतले. त्यानी विश्वासू माणसे गुप्त रूपाने पाठवून कोणास काही सुगावा लागू न देता मुले आहेत नाहीत कशी काय आहेत अशा विषयी निरपेक्ष माहिती आणविली. नंतर औरंगाबादेसच दत्तविधान करणे सर्वांस सोईचे असे त्यानी मनाशी ठरविले. कोठेहि गेले तरी टिळकाना अगत्यवादी किंबहुना अकारणमित्र लाभण्यासारखेच होते. कारण त्यांची काही सेवा घडावी अशीच ज्याला त्याला इच्छा. आणि औरंगाबादेसच अनायासे दोघे गृहस्थ असे होते की एक टिळकांचे चहाते व प्रतिष्ठित विद्याधिकारी रावसाहेब काळे आणि दुसरे

खुद्द त्यांचे एक शिष्य प्रोफेसर श्रीधरपंत जोगळेकर. औरंगाबादेस दक्षिणी लोकांची वस्तीहि थोडी बहुत होती. तेव्हा दत्तक मुलाच्या खुद्द गावी ते खेडेगाव म्हणून दत्तविधान करू नये आणि पुण्यासहि करू नये कारण विलंब होतो व इकडे विघ्ने फार, म्हणून त्यातल्यात्यात दूर प्रांती पण मोठ्या प्रसिद्ध शहरी दत्तविधान उरकून घेऊन पुण्यास यावे अशी टिळक–खापर्डे यांची योजना होती. नागपूरकर हे टिळक व ताईमहाराज यांच्या बरोबर मुद्दाम गेले नाहीत किंवा ते बखेडा करतील म्हणून टिळकानीच त्याना मुद्दाम पुण्यास मागे ठेवले हे माहित नाही. पण हे दोघे दोन ठिकाणी झाल्याने दोघांचीहि कार्ये साधली येवढी मात्र गोष्ट खरी. औरंगाबादेस नागपूरकर नसल्याने बाईला बुद्धिभेद करण्याला जवळ कोणी नव्हता. आणि पुण्यास टिळक नसल्याने औरंगाबादेकडील दत्तविधानाला बसल्या बसल्या विघ्ने आणण्याचे काम नागपूरकराना सुलभ झाले! कोल्हापुराकडील सर्वांची निराशा झाल्यामुळे दत्त-विधानाला कोल्हापूर दरबारची परवानगी मिळू नये इतकी कारवाई त्यानी सिद्धीला नेलीच. पण इकडे टिळक दत्तविधान उरकून परत आले असता पुढे काय करावयाचे ते खलबतहि नागपूरकर व कोल्हापूरची मंडळी यानी चालविले.

टिळक व खापर्डे औरंगाबादेस गेले ते कोणाच्या खासगी घरी उतरले नाहीत. तेथील एका शीख मंदिरात त्यांची व ताईमहाराजांची उतरण्याची व्यवस्था करण्यात आली होती. आणि औरंगाबादेहून मुले येण्याच्या अवधीत नागरिकाकडून त्यांचे अनेक सत्कारसमारंभ सुरू होते. मुलें औरंगाबादेस आणविल्यावर सर्वांनी त्यांची दोन दिवस आपापल्या मनाने परीक्षा केली. मुलगा वयाने लहान असावा व हुषार असावा हे टिळकांचे पहाणे. ज्योतिषशास्त्रदृष्ट्या मुलगा भाग्यवान असावा असा खापर्डे यांचा कटाक्ष व त्याकरिता त्यानी आपणाबरोबर आपले आवडते ज्योतिषी दुर्गेशास्त्री औरंगाबादेस नेले होते. दत्तक मुलगा घेणाऱ्या आईलाहि तिची म्हणून एक दृष्टी असतेच. या सर्व बाजूंनी परीक्षा होऊन शेवटी हल्ली दत्तक ठरलेले श्री. जगन्नाथमहाराज यानाच सर्वांत अधिक पसंती मिळाली. तेव्हा त्यांच्या वडिलाशी बोलणे चालणे करून दत्तक घेण्याचा दस्तैवज व दत्तक देण्याचा करार इत्यादिकांचे मसुदे तेथील वकील मंडळीच्या साहाय्याने टिळकानी करविले. ता. २७ व २८ जुलै रोजी भिक्षुक शास्त्री गृहस्थ अशा लोकाना आमंत्रणे देऊन सभा भरविण्यात आल्या. कागदपत्रावर सह्या झाल्या आणि दत्तविधान होऊन टिळक व ताईमहाराज वगैरे मंडळी लगेच पुण्याकडे परत फिरली. खापर्डे औरंगाबादेस गेले होते पण उमरावतीस जरूरीचे काम निघाल्यामुळे टिळकांवर सर्व गोष्टी सोपवून ते ता. २४ रोजी आगाऊच परत गेले होते.

पुण्यास परत आल्यावर दक्षिणेतील सरदारांचे एजंट मि. ॲस्टन याजकडे रीतीप्रमाणे यादी पाठवून दत्तकाची हकीकत कळविणे योग्य म्हणून त्याना कळविण्यात आली. पण ताईमहाराजाना वाड्यात पोचवून टिळक आपल्या घरी गेल्यापासून कारभारी नागपूरकर व कोल्हापूरची मंडळी यांच्या जाळ्यात ताईमहाराज

एकट्या सापडल्या व त्यांच्या बुद्धीला फाटे फुटू लागले. टिळक औरंगाबादेकडे गेल्यावर ट्रस्टींचे दप्तर नागपूरकरांच्या स्वाधीन होते. त्याचा फायदा घेऊन ता. १८ जून रोजी झालेल्या दत्तक प्रकरणाच्या ठरावावर त्यानी तो आपणास अमान्य असल्याचा शेरा मागाहून लिहून ठेवला होता व अशा रीतीने पुढील वादाला लागणाऱ्या पुराव्याचा पाया घातला होता. नंतर या पुढची पायरी म्हणून सरदारांचे एजंट व डिस्ट्रिक्ट जज्ज मि. ॲस्टन यांच्याकडे बाईना नेऊन खाजगी रीतीने भेटविण्यात आले. टिळकांविरुद्ध आणि दत्तविधानाविरुद्ध जो पाढा बाईना पढवून ठेवण्यात आला होता तो त्यांच्याकडून साहेबापुढे वदविला. साहेबांची मनोभूमिका टिळकांसंबंधाने कशी असणार याची कल्पना कोणासहि करता येण्याजोगीच आहे. ॲस्टनसाहेब हे कट्टे ॲंग्लो-इंडियन. ब्राह्मणवर्गासंबंधाने त्यांच्या मनात अतिशय राग. राजद्रोहाकरिता टिळकाना शिक्षा झाल्याची गोष्ट आणि त्यांच्याविषयी सरकारचे मत हे जगप्रसिद्ध. टिळक तर राहोतच पण सातारा जिल्ह्यात राजद्रोहाच्या आरोपावरून सेशन जज्ज या नात्याने एका सामान्य वर्तमानपत्रकारास जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा त्यानी दिली होती. अशा मनोभूमिकेवर टिळकनिंदेचा रंग खूप चढावा ह्यात काहीच आश्चर्य नाही. टिळकांच्या द्वेषाने तापलेल्या ॲस्टन साहेबांच्या मनाच्या तव्यावर ताईमहाराजाना आपल्या प्रत्येक नाजूक शब्दाची लाही भाजून फुलवून घेता आली तर काय नवल! अशा रीतीने बाई व ॲस्टन साहेब यांची गाठ पडल्यापासून या दत्तक प्रकरणाला राजकारणी स्वरूप येऊ लागले.

औरंगाबादेस दत्तविधान झाल्याने टिळकानी योजिलेले मुख्य कार्य तडीला गेले. तेव्हा ते उलथून टाकण्याचा निष्फळ करण्याचा सर्व बोजा ताईमहाराज व नागपूरकर यांच्यावर येऊन पडला तेव्हा हे काम दोन तीन प्रकारानी करण्याचे त्यानी योजिले. (१) दत्तविधान नाकबूल करीत सुटणे हा पहिला प्रकार. त्या कामी एजंट साहेबांची भेट घेण्यात आलीच होती. (२) दुसरा प्रकार म्हटला म्हणजे औरंगाबादेस दत्तविधान झालेच नाही हे ठरविण्याकरिता प्रत्यक्ष एखादे नवीन दत्तविधानच करविणे. (३) तिसरा प्रकार ट्रस्टींचे अधिकार काढून घेऊन बाईना स्वतंत्र मुखत्यार बनविणे हा व याला मार्ग म्हटला म्हणजे ट्रस्टींनी १८९७ साली डिसेंबरात बाबामहाराजांच्या मृत्यूपत्राचे प्रोबेट आणि त्याप्रमाणे व्यवस्था करण्याचे अधिकारपत्र टिळक वगैरे ट्रस्टीनी मिळविले होते ते रद्द करविणे. म्हणून या दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारासंबंधी काय करण्यात आले ते थोडक्यात पाहू. ता. ६ जुलै रोजी ॲस्टन साहेबांची गाठ घेऊन आल्यावर बाईनी सर्व ट्रस्टीना अशी नोटीस दिली की मला मुलगा होऊन तो वारला यामुळे यापुढे बाबामहाराजांच्या सर्व इस्टेटीची मालकीण मुलाची आई व वारसदार या नात्याने मी आता झाले आहे. यामुळे बाबामहाराजांचे मृत्युपत्र यापुढे रद्द ठरते. मुलगा जिवंत राहता तर तो मालक असता व तो वयात येईपर्यंत बापाने मृत्युपत्राप्रमाणे नेमलेले पालनकर्ते म्हणून त्याच्यातर्फे वहिवाट करण्याचा अधिकार ट्रस्टीना राहिला असता. पण तो मेला. कदाचित् दत्तविधान

होऊन दुसरा मुलगा त्याचे जागी आला नसता तरी मी कुलमुखत्यारीण होते. वयाने सज्ञानच आहे. अर्थात् मी किंवा माझी मिळकत यासंबंधाने तुम्हा ट्रस्टींना काही अधिकार नाही. म्हणून तुम्ही यापुढे व्यवस्थेत काही एक हात घालू नये. या नोटिसीप्रमाणे प्रोबेट रद्द करण्याचा अर्ज बाईंनी डिस्ट्रिक्ट जज्ज मि. ॲस्टन याजकडे पुढे लवकरच गुदरला. ता. १० जुलै रोजी कोल्हापूर येथील बाळामहाराज याना दत्तक घेण्याचा निश्चय ठरून त्याकरिता कोल्हापूर दरबारची परवानगी मिळविण्यासाठी बाईंनी यादी लिहिली व त्याप्रमाणे तातडीने परवानगी मिळाली हे सांगावयास नकोच! दत्तकप्रकरणी कोल्हापूरच्या संसर्गाची जी भीति टिळकाना प्रथमपासून वाटत होती ती किती खरी होती हे पूर्वी टिळकाना परवानगी न मिळणे व बाईंना ती मिळणे यावरून सहजच उघड होते. प्रोबेट रद्द होण्याचे काम एकदम होण्यासारखे नव्हते. त्यात साक्षीपुरावे जाबजबान्या खालच्या कोर्टात निकाल झाला तरी वर अपील इत्यादि गोष्टीमुळे या कारवाईतले फळ बाईंना हातोहात मिळाल्यासारखे नव्हते. पण दुसरे दत्तविधान करणे ही गोष्ट त्यांच्या अगदी हातची होती म्हणून ती तावडतोब उरकून घेण्याचा नागपूरकर व बाई यानी घाट घातला.

हे दुसरे दत्तविधान पुण्यास किंवा कोल्हापुरास यापैकी कोठेतरी व्हावयाचे हे उघडच होते. तिसरी जागा नाही. ते कोल्हापुरास व्हावयाचे असल्यास बाईला उठून पुण्याहून जावे लागले असते व टिळकाना ते समजले असते हा तोटा, पण एकदा कोल्हापुरास गेल्यावर महाराजांच्या मदतीने दत्तविधान निर्वेध पार पडले असते हा फायदा. दुसरे पक्षी पुण्यात दत्तविधान केले तर टिळकांकडून प्रतिबंध होण्याची भीति हा तोटा, पण ॲस्टनसाहेब हे बाईच्या बाजूचे झाल्यामुळे आणि सरकारहि टिळकाविरुद्ध असल्यामुळे त्यांचे काही एक न चालता खुद्द वाड्यातच जगजाहीर रीतीने दत्तविधान करून टिळकावर जय मिळविता येणार हा फायदा. परंतु यापैकी दुसरा मार्ग अधिक श्रेयस्कर असे ठरवून नागपुरकर यानी बाळामहाराज यांच्या मातुश्री व त्याचे बंधु पंडितमहाराज याना कोल्हापुराहून पुण्यास आणविले. ही मंडळी येऊन जवळच रामेश्वरानजीक साठे यांचे वाड्यात उतरली. पण प्रसिद्धपणे दत्तविधान करण्याचा बेत न करिता त्यानी ते गुप्त रीतीने उरकण्याचा घाट घातला. ता. १० जुलै रोजी ताईमहाराजानी बाळामहाराजाना दत्तक घेण्याची परवानगी मिळण्याबद्दल कोल्हापूरदरबाराकडे यादी लिहिल्याचे कळताच दुसरेच दिवशी टिळकानी कोल्हापूरदरबारकडे उलट तारा पाठविल्या. आणि औरंगाबादेस झालेल्या हकीगतीची यादी ॲस्टनसाहेबाकडे ट्रस्टी या नात्याने पुनः पाठविली.

ता. १२–१३ जुलै रोजी कोल्हापूरच्या मंडळीचा मुक्काम वाड्यात पडल्यावर टिळकांच्या गुप्त दूताने दत्तविधान होणार अशी बातमी टिळकाना कळविली. त्याबरोबर रातोरात ते वाड्यात गेले आणि खापर्डे-कुंभोजकरासुद्धा सर्व ट्रस्टी एकत्र जमू देत आणि मग तरी दत्तविधान करणे तर करा असे सांगून त्यानी बाईचे मन

वळविले. म्हणून त्या दिवशी दत्तविधान तहकूब झाले. टिळकांचा युक्तिवाद अशा वेळी बाईला कसा पटला देव जाणे! पण टिळकांचा तो प्रयत्न त्या वेळी साधला खरा. ता. १५ रोजी खापर्डे आले तेव्हा प्रकरण नेटाला लागले. त्या रात्री भाऊमहाराजांच्या वाड्यात मोठीच दंगल झाली. पंडितमहाराज हे तामसी आणि बरोबर हत्यारे व पेहेलवान घेऊन आलेले असल्यामुळे काही अनर्थहि व्हावयाचा. पण निभावले. याचे कारण स्वतः टिळक खापर्डे हे वाड्यात असून त्यांच्या पक्षाची पुष्कळ मंडळीहि बोलावण्यावरून वाड्यात जमली होती. टिळक व खापर्डे यानी प्रथम बाईशी बोलून त्याना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण त्या वळत नाहीत असे पाहून अखेरचा उपाय म्हणून बाळामहाराज व त्यांची मंडळी याना वाड्यांतून घालवून देण्याच्या उद्योगाला ते लागले.

वाड्याच्या एका भागात कोल्हापूरची मंडळी दुसऱ्या एका भागात ट्रस्टी व त्यांची मंडळी व तिसऱ्या एका भागात ताईमहाराज व त्यांची नोकर मंडळी असे तळ पडले होते. कायदेशीर मार्ग म्हणून प्रथम टिळक व खापर्डे यानी पंडित महाराज वगैरेना लेखी नोटीस देऊन सांगितले की ' ट्रस्टी या नात्याने वाडा आमच्या ताब्यात आहे. तुम्हाला आमच्या परवानगी शिवाय वाड्यात येऊन राहण्याचा हक्क नाही. तरी तुम्ही पहाटेच्या पूर्वी येथून निघून जावे. न जाल तर आम्हाला सुचतील ते इलाज करू '. या नोटिशीप्रमाणे वाड्यातून जाणेच त्याना प्राप्त होते. पण त्यानी ताईमहाराजांचा आश्रय करून पाहिला व बाईनीहि " ते माझे पाहुणे आहेत आप्त आहेत मला भेटावयाला आले आहेत त्याना जा म्हणणार तुम्ही कोण ? " वगैरे म्हणून पाहिले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. " एरव्हीची भेट वेगळी ही भेट वेगळी. एरव्हीचे पाहुणे वेगळे हे वेगळे. वाड्यात दुसरे दत्तविधान करून आमचे नाक कापण्याचा तुमचा उघड विचार सुरू आहे त्या अर्थी याना आम्हाला बाहेर घालविलेच पाहिजे व ते न जातील तर आम्ही त्याना हाताला धरून जबरदस्तीने बाहेर घालवू. सोडणार नाही " असे टिळक व खापर्डे यानी निक्षून सांगितल्यामुळे बाईचा नाइलाज झाला. उभय पक्षाच्या लोकात खटका उडतो की काय अशी पदोपदी भीति वाटत होती. पण सुदैवाने तसे काही घडले नाही. ठरावाप्रमाणे पहाटे पाचाच्या सुमारास ही पाहुणे मंडळी बाईचा निरोप घेण्याकरिता त्यांच्याकडे गेली. तेव्हा तेथेच कदाचित् घाईने दत्तविधान होईल की काय या भीतीने टिळक खापर्डे व त्यांची मंडळी यानीहि बाईच्या राहत्या जागेभोवती गराडा दिला. अखेर नाइलाजाने ही सर्व मंडळी आपले सामानसुमान घेऊन बाहेर पडल्यावर टिळकांची स्नेही मंडळी घरोघर गेली. पण टिळकानी खापर्डे यांच्याबरोबर तेथेच मुक्काम केला आणि फिरून कोल्हापूरच्या मंडळींचा उपसर्ग लागू नये म्हणून वाड्याचा दरवाजा लावून घेऊन त्यावर कडक पाहारा ठेविला. याचा अर्थ इतकाच की दिंडी उघडी ठेवून येजाला मर्यादा घातली होती.

कोल्हापूरची मंडळी वाड्यातून बाहेर पडली परंतु पुण्यातच मुक्काम करून होती. पैकी पंडितमहाराजानी दुसऱ्या दिवशी पोलिसाकडे टिळकांवर फिर्याद गुदरली. पण पोलिसानी ती काढून टाकली. पोलिस तरी काय करणार ? अद्यापि ट्रस्टी या नात्याने टिळक खापर्डे याना मिळालेले प्रोबेट कायम होते व बाई वाड्यात रहात असल्या तरी अमक्याने वाड्यात यावे अमक्याने येऊ नये हे म्हणण्याचा ट्रस्टीना अधिकार होता. ताईमहाराजाना कोणतीहि अडचण करण्यात आलेली नव्हती, आणि स्वतः त्याना उठून वाड्याबाहेर जाण्याची इच्छा असती तर त्याना कोणीच प्रतिबंध करू शकला नसता. पण बाई वाड्यातच राहिल्या यामुळे कोल्हापूर मंडळीची व त्याची ताटातूट झाली. ता. १८ रोजी पंडितमहाराज हे ॲस्टन साहेबाना भेटायला गेले व ताईमहाराजाना टिळकानी वाड्यात बंदिवान करून ठेवले आहे अशी त्यानी कागाळी केली. साहेबानी शहरच्या पोलिस अधिकाऱ्याना चवकशी करण्यास सांगितले. त्यानी जाऊन पाहिले तो स्वतः बाईना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नव्हता पण वाड्याचे दार व रखवाली मात्र ट्रस्टींनी आपल्या स्वाधीन ठेविली होती. पोलिस इन्स्पेक्टर तपासाला आले त्याना अर्थात् वाड्यात घेण्यात आले. पण असा दरवाजा लावून का ठेवता असे त्यानी विचारले तेव्हा टिळकानी सांगितले की हा वाडा हा आमचा किल्ला आहे. बाई खेरीज इतराना आत यायला किंवा जायला आमची परवानगी घेतली पाहिजे. पोलिस रिपोर्टानंतर स्वतः ॲस्टनसाहेब ताईमहाराजाना भेटण्याला वाड्यात आले. आपला दिखाऊ बंदिवास पाहण्याकरिताच बाईनी त्याना बोलाविले असावे. पण जोपर्यंत प्रोबेट अमलात आहे तोपर्यंत वाड्याचा कबजा ट्रस्टीचाच राहणार ही गोष्ट ॲस्टनसाहेब झाले तरी कसे नाकबूल करणार ? तिसरे दिवशी बाई वाड्यातून बाहेर पडून ॲस्टन साहेबांच्या भेटीला गेल्या व या सर्व भेटी-परतभेटींचा निष्कर्ष असा निघाला की ट्रस्टींना दिलेले प्रोबेट रद्द करावे म्हणून बाईने डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे अर्ज करावा व त्याप्रमाणे तो अर्ज ता. २९ जुलै रोजी गुदरला गेला.

ता. ३ ऑगस्टपासून बाईनी प्रतिकाराचे हत्यार उपसून ट्रस्टींचे कारकून वगैरेना वाड्यातून घालवून दिले आणि दरवाजाला आतून कडी लावून घेतली. बाई कोल्हापुरास जाऊन तेथे दुसरे दत्तविधान करणार हे आता उघड झाले होते. म्हणून पहिल्याला कोल्हापूर दरबारने परवानगी दिली नाही तरी तशीच दुसऱ्यालाहि देऊ नये अशा उद्योगाकरिता टिळक स्वतः कोल्हापुरास गेले. व त्यानी दुसरे दिवशी कोल्हापूरच्या महाराजांची गाठ घेतली. त्याच दिवशी ताईमहाराज वगैरे मंडळी रात्रीच्या गाडीने कोल्हापुरास जावयाला निघाली. टिळक व छत्रपती यांची भेट झाल्यानंतर पुण्याला तार येऊन ताईमहाराज व नागपूरकर यांचा तावडतोब निघण्याचा बेत ठरला असावा. महाराजांची भेट घेऊन टिळक मिरजेला ता. १७ रोजी आले. तेथे पुण्याहून गेलेल्या तारेवरून पुण्याची मंडळी कोल्हापुरास निघाल्याची बातमी त्याना कळली. त्याप्रमाणे टिळकहि लगेच

कोल्हापुरास परत गेले व त्यानी आपण आल्याचे महाराजाना पत्र लिहिले. ता. १८ ऑगस्ट रोजी दोन प्रहरी महाराजांकडून टिळकाना बोलावणे आल्याप्रमाणे ते त्याना नव्या राजवाड्यात भेटण्यास गेले व तेथे दत्तक प्रकरणाची चर्चा झाली. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही.

सदाशिवराव अळतेकर आपल्या आठवणीत लिहितात "१९०१ सालच्या श्रावण महिन्यात टिळक कोल्हापुरास आले होते. ते दत्तक प्रकरणी आले होते. त्यानी छत्रपति शाहूमहाराजांची गाठ घेतली व नंतर एका बड्या गृहस्थाच्या भेटीला ते गेले. तों ते बडे गृहस्थ बाहेर जाण्याच्या तयारीत दिसले. टिळक म्हणाले कोठे निघाला ? तों ते गृहस्थ म्हणाले "ताई महाराज बाळामहाराजांस दत्तक घेणार आहेत तेव्हा तिकडे निघालो." त्यावर आश्चर्यचकित झाल्यासारखे दाखवून टिळक म्हणाले "मी महाराजांची नुकतीच गाठ घेऊन आलो पण मला ते दत्तका-संबंधाने एक चकार शब्दहि बोलले नाहीत." त्यावर सदर गृहस्थ म्हणाले की "आमचे महाराज शिवाजीमहाराजांप्रमाणे मुत्सद्दी आहेत." त्यावर टिळकानी हसून असे उत्तर दिले की "शिवाजीमहाराजांचा स्वाभिमान सत्याभिमान देशा-भिमान प्रजावात्सल्य वगैरे इतर गुण अंशतः तरी तुमच्या महाराजांमध्ये असते तर किती बहार झाली असती !" याच दिवशी छत्रपतींच्या समक्ष ताईमहाराजानी बाळामहाराजाना दत्तक घेतले. तेव्हा पहिले दत्तविधान सशास्त्र आणि कायदे-शीर ठरवावे म्हणून आणि दुसरे रद्द करावे म्हणून दिवाणी फिर्याद करण्याशिवाय टिळकाना मार्ग उरला नाही. कारण दोन दत्तकांच्या भांडणात इस्टेटीला कुलूप लागून तिची वाताहत होण्याचाच प्रसंग होता. म्हणून त्यानी ता. २३ सप्टेंबर रोजी पुणे येथील फर्स्ट क्लास कोर्टात फिर्याद गुदरली. पण तिच्या कामाला पुढे तीन वर्षे हात लागला नाही ते का हे पुढील हकीगतीवरून कळून येईल.

## (४) ॲस्टन साहेबांच्या कोर्टात

प्रोबेट रद्द करण्याचा ताईमहाराजांचा अर्ज ॲस्टन साहेबाकडून तातडतोबीने चौकशीकरिता घेण्यात आला. कोर्टातला टिळकांचा अव्वल दावा थांबवावा या किरकोळ प्रकरणातच औरंगाबादचे दत्तविधान नाशाबित करून घ्यावे, आणि जमल्यास खोटी साक्ष देणे बनावट कागद करणे खोटे हिशेब लिहिणे ताईमहाराजाना अटकेत ठेवणे नागपुरकरावर खोट्या तोहमती आणणे वगैरे आरोप ठेवून फौजदारी खटल्यात टिळकाना शिक्षा करवावी म्हणजे दिवाणी दाव्याचे काम आयतेच थांबले असा विचार ॲस्टन साहेबानी केला. वास्तविक ताईमहाराजांचा अर्ज व त्याला ट्रस्टींनी दिलेला जबाब यावरून मुद्दे इतकेच निघत होते की ताईमहाराजाना मुलगा होऊन तो वारल्यामुळे बाई वारस म्हणून प्रोबेट त्यापुढे रद्द ठरते की काय ? तसेच ट्रस्टी हे ट्रस्टचे काम करण्याला नालायक ठरले आहेत की काय ? व ते तसे ठरले आणि ट्रस्ट मात्र शिल्लक उरला तर या चवकशीतच कोर्टाला नवे ट्रस्टी

नेमता येतील की कसे ? पैकी पहिला एकच मुद्दा प्रथम विचाराला घेतला असता तर त्यावरच सर्व निकाल होऊ शकला असता. बाई व ट्रस्टी यांचे संबंध व भांडणे याच्याबद्दल पुरावा घेण्याचेच कारण उरले नसते. आणि टिळकांचे वकील वाकनीस यानी अशी तक्रार मांडलीहि. परंतु या किरकोळ चवकशीत औरंगाबादचे दत्तविधानच खोटे ठरविण्याचा ॲस्टन साहेबांचा बेत असल्यामुळे त्यानी ती तक्रार मानली नाही व सर्व मुद्यांच्या चवकशीचे काम सुरू झाले. टिळकांची उलट तपासणी १६ दिवस म्हणजे ता. १६ नोव्हेंबर १९०१ पासून पुढे एप्रिल १९०२ पर्यंत मधून मधून चालू होती. दरम्यान ॲस्टन साहेबापुढील अर्जाच्या चवकशीचे काम दुसऱ्या एकाद्या कोर्टापुढे बदलून द्यावे असा टिळकानी हायकोर्टाकडे अर्ज केला. पण तो नामंजूर झाला. ता. ३ एप्रिल रोजी मृत्युपत्राचे प्रोबेट व ट्रस्टींचे अधिकारपत्र रद्द केले असा निकाल ॲस्टन साहेबानी सांगितला.

टिळकांची जबानी सुरू झाली तेव्हा प्रथम ती मामुली म्हणजे पक्षकाराच्या कबूलीनाकबूलीच्या जबाबासारखी असेल, आणि फार तर ॲस्टन साहेबाना प्रोबेट रद्द करावयाचे असेल असे टिळकाना वाटले. पण जबानीच्या दुसऱ्या तिसऱ्या दिवसापासूनच खरा रंग कळून आला. औरंगाबादेचा दत्तक झाला की नाही याचा पुरावा येथे घेण्यात येऊ नये ही टिळकांची तक्रार अमान्य करण्यात आली. आणि ज्यावरून फौजदारी गुन्हेगारी अंगी लावता येईल असे प्रश्न टिळकाना विचारण्यात येऊ लागले. तेव्हा ॲस्टन साहेबांच्या मनातले खरे मर्म सर्वांनाच कळून येऊ लागले. बाई मुलाच्या मृत्यूमुळे मालक झाल्या हे त्यांचे म्हणणे आता उरले नव्हते. कारण औरंगाबादेचा दत्तक त्यानी नाकबूल केला तरी कोल्हापूरचे दत्तविधान झाले हे तरी त्यानी कबूल केले होते. अर्थात् इस्टेटीची मालकी त्यांच्याकडे राहिली नव्हती. म्हणून प्रोबेट रद्द करण्याचा अर्ज चालविण्याचा अधिकार त्याना उरला नाही या लहानशा मुद्यावरच निकाल लागावयाला पाहिजे होता. परंतु टिळकांच्या उलट तपासणीतून औरंगाबाद येथील दत्तविधानासंबंधी व इतर अनेक प्रकारचे कागद दाखल करवून घेऊन ॲस्टन साहेबानी छापील ३९–४० पाना एवढा मोठा ठराव लिहिला. त्यात प्रत्येक मुद्यावर उलट निकाल दिला इतकेच नव्हे तर टिळकांची पूर्वी सांगितलेल्या अनेक आरोपाबद्दल चौकशी व्हावी असे लिहून त्यांची सर्व कागदपत्र पुणे शहर सिटी मॅजिस्ट्रेट याजकडे पाठविले !

ता. ३ एप्रिल रोजी टिळकाना निकाल ऐकण्याला समक्ष हजर राहण्याविषयी हुकूम झाला तेव्हाच ॲस्टन साहेब काय करणार हे सर्वांना कळून चुकले. टिळकाना कोर्टात वागविण्याची ॲस्टन साहेबांची रीत तर इतकी अपमानास्पद व एकतर्फी असे की, साक्ष संपल्यावर तक्रारीचे वेळी स्वतः कोर्टात हजर न राहता वकिलाकडूनच तक्रार सांगण्याचे त्यानी ठरविले. आणि याहि बाबतीत एक वाईट अनुभव आला तो असा की वाकनीस व केळकर याना टिळकानी वकीलपत्र दिले असून दोघांनीहि प्रथम काम चालविले असे असता ॲस्टनसाहेबांचा रागरंग पाह-

ताच वाकनीस हे गडबडले व त्यानी वकिलीतून आपले अंग काढून घेतले. वास्तविक आपल्या अशिलावर काही संकट येत आहे असे दिसल्यास डगमगून न जाता वकिलानेच अशिलाला धीर द्यावा. पण अॅस्टनसाहेब पुढे निकाल देणार त्याच्या आधीच पुढे टिळकावर ठेवणार ते आरोप जणू काय खरेच आहेत अशी स्वतःची भावना करून घेऊन ' मरणा आधी सरणात ' घालावे त्याप्रमाणे चौकशी आधीच मनाने निकाल देऊन वाकनीस यानी टिळकाना मध्येच सोडले. शेवटी टिळकानी घरी मुद्दे टिपून दिले त्याप्रमाणे केळकर यानीच शेवटल्या दिवशी ट्रस्टीतर्फे तक्रार सांगितली. टिळकानी एखादा हायकोर्टाचा वकील आणलाहि असता. पण या कामी अॅस्टनसाहेब काय निकाल देणार ही गोष्ट इतकी ढळढळीत दिसत होती की कोणीहि वकील हायकोर्टाचा काय पण विलायतचा आणून उभा केला तरी काळ्या दगडावरची रेघ जशी पुसून निघत नाही त्याप्रमाणे अॅस्टनसाहेबांचा ग्रह काही केल्या बदलावयाचा नाही असे पक्के माहीत. म्हणून टिळकानी हायकोर्टाचा वकील तर आणलाच नाही पण स्वतःहि तक्रारीच्या वेळी ते कोर्टात हजर राहिले नाहीत. अॅस्टनसाहेबांचे मुखावलोकनहि करू नये इतकी त्यांची चीड टिळकाना आली होती. आणि तक्रारीचे वेळी हजर न राहण्याचा त्यांचा गर्भितार्थ असा होता की " तुम्ही काय द्यायचा तो निकाल द्या त्याची मला बिलकुल भीति नाही. तुमच्याहि वर हायकोर्ट बसले आहे तेथे मीहि तुम्हाला पाहून घेईन. " पण वर सांगितल्याप्रमाणे अॅस्टनसाहेबाना दिवाणीतून फौजदारी निर्माण करावयाची होती. म्हणून त्यानी टिळकाना निकालाच्या दिवशी हजर राहण्याचा हुकूम देऊन आपले तोंड टिळकाना पाहावयाला लावलेच.

अॅस्टनसाहेबांच्या निकालावर हायकोर्टाकडे टिळकानी ता० १७ एप्रिल रोजी अपील केले. ता० १९ ऑगस्ट रोजी न्यायमूर्ति क्रो व बॅटी यानी अॅस्टन साहेबांचा निकाल फिरविला. आणि कायद्याच्या मुद्यासंबंधी टिळकांचा आत्मविश्वास यथार्थ ठरला. अशा रीतीने अॅस्टनसाहेबाना वरून चपराक बसली तरी पण त्यानी पोखरून ठेवलेला सुरुंग अद्यापि उडावयाचाच होता. त्यानी पेटविलेली डांबरबत्ती जळतच होती. मध्यंतरी एप्रिल व मे महिन्यात सरकारने पोलीसमार्फत टिळकावरील आरोपाची गुप्त चौकशी केली. त्यात त्यांच्याकडे असा रिपोर्ट गेला म्हणतात की टिळकावर हे खटले सरकारने करण्यात अर्थ नाही. ते टिकावयाचे नाहीत. व हे खटले करण्याबद्दल लोक सरकारला नावे ठेवतील व खुनशी म्हणतील. पण सरकारने ते न जुमानता खटले पुढे चालू दिले. आणि खटल्याचे काम पुष्कळ दिवस चालणार म्हणून मि. क्लेमन्ट्स् याना स्पेशल मॅजिस्ट्रेट नेमले. ता. ९ सप्टेंबर रोजी सिटी मॅजिस्ट्रेट यांजकडून खटल्याचे कागदपत्र क्लेमन्ट्स् यांजकडे गेले व ता. १५ सप्टेंबरपासून क्लेमन्ट्स यानी कामास सुरवात केली. येथपासून एक नवेच प्रकरण सुरू झाले. प्रोबेट शिल्लक राहिले होते आणि फर्स्ट क्लास कोर्टाकडून टिळकांच्या दिवाणी फिर्यादीच्या कामाला हातहि लागला नव्हता मग दत्त-

विधान खरे खोटे ठरणे तर दूरच. पण फौजदारी खटल्याच्या वाममार्गानें साधेल ते साधून घ्यावे असा वरपासून खालपर्यंत सर्वांचा कट झाल्यामुळे या प्रकरणाला भलतेच व भयंकर स्वरूप आले. क्लेमन्ट्स् साहेब हे नवे तरणेबांड मॅजिस्ट्रेट. आणि त्यांचा दुर्मुखलेला चेहरा हे त्यांच्या मनोवृत्तीचे हुबेहूब चित्र होते, हे पाहून खटल्याचा शेवट कसा होणार याचा अंदाज कोर्टात हजर राहून पाहणाऱ्या कोणालाहि करिता आला असता.

## (५) क्लेमन्ट्स् यांच्या कोर्टात

क्लेमन्टस् साहेबांपुढील काम २ आक्टोबर १९०२ रोजी प्रत्यक्ष सुरू झाले ते २४ ऑगस्ट १९०३पर्यंत चालू होते. व या अवधीत खटल्याच्या सुनावणीचे काम मधून मधून ५८ दिवस चालले. दरम्यान् हा फौजदारी खटला या नाही तर त्या कारणाकरिता क्लेमन्टस् साहेबांच्या हातून दुसऱ्या कोणाकडे जावा अशाकरिता हायकोर्टाकडे अर्जहि करण्यात आले पण ते फुकट गेले. हा खटला चालविण्याकरिता प्रथम सरकारी वकील व्यंकटराव रामचंद्र हे उमे राहिले. लगेच पुढे बॅ. गाडगीळ याना सरकारतर्फे नेमण्यात आले. पण त्यानेहि काम मागत नाही असे पाहून नवीन तरतरीत बॅरिस्टर मि. स्ट्रँगमन यांची नेमणूक करण्यात आली. त्याना सरकारने रोजी तीनशे रुपये फी ठरविली होती असे म्हणतात. स्ट्रँगमन यांच्या मदतीला इतरहि काही वकील ताईमहाराजातर्फे हजर असत. टिळक यांच्यातर्फे मुख्यतः करंदीकर वकील यानी काम चालविले. मध्यंतरी ताईमहाराजांच्या जबानीच्या वेळी ब्रॅन्सन साहेबाना बॅरिस्टर म्हणून टिळकानी थोडे दिवस आणले होते. पण त्यांची फी देण्याचे काम टिळकाना झेपेना. सरकारला स्ट्रँगमनसाहेबांचा रोजचा तीनशे रुपयांचा खर्च म्हणजे काहीच नव्हते. पण ब्रॅन्सनसाहेबांची रोजची चारशे रुपये फी. त्यांचा जाण्यायेण्याचा खर्च शिवाय रोजचा हॉटेलचा खर्च ही टिळकाना फारच जड गेली. खटला केवळ खाजगी स्वरूपाचा असल्यामुळे लोकांकडून मदत न घेता पदरचे पैसे भरून व कर्ज काढून टिळकाना ब्रॅन्सनसाहेबाना आणावे लागले. आणि साहेबांची पद्धतहि अशी की आताचे पैसे एक तासाने देतो म्हटले तर चालावयाचे नाही. आधी पैसे हाती येऊन कुटुंबाकडे ते मुंबईस रवाना झाले म्हणजे साहेब गाडीत पाऊल ठेवीत. शेवटी खर्चाला तर टिळक कंटाळलेच पण आयते वेळी आणलेल्या उपटसुंभ बॅरिस्टरला खटल्याची हकीकत समजावून देण्याला आणि मराठी कागदपत्रांची इंग्रजी भाषांतरे करून देण्याला टिळक अधिकच कंटाळले. सॉलिसिटरच्या पूर्ण तयारीशिवाय आयत्या वेळी बॅरिस्टर आणून उभा करणे शहाणपणाचे नव्हे ही गोष्ट टिळकाना अनुभवाने पूर्णपणे माहीत होती. पण ताईमहाराजांच्या जबानीसारखा नाजूक विषय आणि क्लेमन्ट्स् साहेबांसारखे मॅजिस्ट्रेट म्हणून खर्च झाला त्रास झाला तरी पुरवला, पण युरोपियनला युरोपियनाची गाठ घालू म्हणजे ते बरे, असे टिळकानी मनात योजिले होते. पण प्रतिपक्षाला हे मर्म

कळल्यामुळे त्यानी टिळकाना जिकिरीला आणण्याचा निश्चय केला व तो त्यांचा सहजच साधला. कारण ताईमहाराज साक्षीला यावयाच्या त्या स्वतःच्या स्त्रीप्रकृतीच्या व सल्लागारांच्या स्वाधीन. यामुळे कोर्टाचा हुकूम जरी अमान्य म्हणून करावयाचा नाही तरी आज प्रकृति बरी नाही, उद्या हजर राहण्याला इतर काही अडचण आली, परवा तास अर्धातास साक्ष होताच घेऱ्या येऊ लागल्या, अशा थाटाने व सवलतीने बाईंची साक्ष चालणार. हे पाहिल्यावर बॅरिस्टर आपल्याला झेपत नाही असे टिळकाना कळून चुकले व तेथून पुढील सर्व काम एकट्या दादासाहेब करंदीकरांवरच त्यानी निभावून घेतले.

पुण्यातील साक्षीपुरावा संपल्यावर औरंगाबाद व उमरावती येथील साक्षीदारांच्या साक्षीकरिता कमिशन काढण्यात आले. उमरावतीस दादासाहेब खापर्डे व दुर्गे जोशी या दोघांच्याच साक्षी घ्यावयाच्या होत्या. ते काम २२ जून ते १ जुलै या दिवसात संपले. औरंगाबाद येथील काम काही मे व जून या महिन्यात व काही जुलैत झाले व तेथे सोळा साक्षीदारांचा पुरावा घेतला. या फौजदारी खटल्यात सरकारतर्फे कोणतेहि साक्षीदार औरंगाबाद येथे देण्यात आले नाहीत. कारण ताईमहाराजांच्या जबानीवरून खोटी साक्ष दिल्याचा आरोप टिळकांवर रीतसर ठेवण्यात आला व तो उलटविण्याकरिता साक्षीदार देण्याचा बोजा, म्हणजे दत्तविधान शाबित करण्याचा बोजा टिळकांवर पडल्यामुळे त्यानाच कमिशन मागून घ्यावे लागले.

## ( ६ ) डिफेन्स व निकाल

टिळकांचे वकील दादासाहेब करंदीकर यानी ता. २० जुलैपासून ता. १ आगस्टपर्यंत ६ दिवस भाषण करून टिळकांचा डिफेन्स दिला. त्यात प्रथम बऱ्याचशा प्रास्तविक स्वरूपाच्या तक्रारी होत्या. ॲस्टन साहेबानी निरनिराळे आरोप ठेऊन खटला भरला. त्यापैकी खोट्या साक्षीऐवजी बनावट दस्तऐवजाचा खटला आधी घ्यावा असा टिळकांचा अर्ज असता खोट्या प्रतिज्ञेचाच खटला आधी घेतला ही एक होती. यातील मुद्दा इतकाच की प्रत्यक्ष दत्तकाचा प्रश्न फौजदारी खटल्याच्या स्वरूपाने निघू नये. तथापि टिळक खरे किंवा खोटे याचा निकाल करण्याला सरकारासहि साधन उरावे. सरकारच्या दृष्टीने टिळक मिथ्याप्रतिज्ञ ठरले काय किंवा बनावट दस्तऐवज करणारे ठरले काय दोन्ही सारखीच. पण अशीहि सवलत मॅजिस्ट्रेटने दिली नाही. यानंतर बाबामहाराजांचे घराण्याची पूर्वपिठिका त्यांचे मृत्युपत्र त्याप्रमाणे घेतलेले प्रोबेट इत्यादि हकीगत सांगून करंदीकरानी असे दाखविले की ताईमहाराजांचा मुलगा वारल्यावर देखील बरेच दिवस पर्यंत ताईमहाराज किंवा बळवंतराव नागपूरकर यांची समजूत ट्रस्ट शिल्लक उरला अशीच होती व आपण पूर्ण वारस व ट्रस्टींच्या बंधनापासून मुक्त झालो असे ताईमहाराजांस वाटत नव्हते. मुलगा मेल्यानंतर दुसरेच दिवसापासून पंडितमहाराज यानी कोल्हापूरचे त्या वेळचे दिवाण मेहेरजीभाई यांच्यामार्फत खटपट सुरू केली

होती. पण कुंभोजकरानी ती बंद पाडली. पुढे ताईमहाराजांचा भाऊ दत्तक घ्यावा असा त्यांच्या आईचा प्रयत्न चालला होता तोहि नागपूरकरानी हाणून पाडला. १८९९ साली दत्तकाचा प्रथम विचार सुरू झाला व १९०१ साली औरंगाबादेस दत्तविधान झाले. आणि तेथून आल्यावर मग ताईमहाराजांचे मन बदलून उलट खटपटीला सुरवात झाली. या सर्व प्रकरणाची चौकशी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या हुकुमावरून पोलिसानी केली होती म्हणून तो रिपोर्ट कोर्टापुढे यावयास पाहिजे होता. इन्स्पेक्टर पागे हे औरंगाबादेस जाऊनहि आले होते व खटल्यातील साक्षीदारानी पागे यांजपुढे आपण हल्ली सारख्याच साक्षी दिल्या असे प्रतिज्ञेवर सांगितले. असे असता रिपोर्ट पुढे काढलाच नाही व सरकारतर्फे एकहि साक्षीदार औरंगाबादचा पुढे आणला गेला नाही. औरंगाबादेस ताईमहाराजांबरोबर गेलेल्या सहा नोकरापैकी चौघांच्या साक्षी फिर्यादीने घेतल्या नाहीत. उलट हे साक्षीदार टिळकांच्या बाजूचे आहेत म्हणजे फिर्यादीला प्रतिकूल आहेत असे नागपूरकर यानीच कबूल केले! अर्थात् टिळकांचीच बाजू खरी असे सरकारास आधी कळून आले असता केवळ त्यांचा छळ करण्याकरिता हा खटला चालविण्यात आला. औरंगाबादेस प्रकार झाला तो सर्व जाहीर रीतीने झाला. अनेक दर्जाचे १७ साक्षीदार पुढे येऊन त्यानी दत्तविधान शाबीत केले. पैकी आठानी तर मुलगा प्रत्यक्ष मांडीवर बसविल्याचे सांगितले. टिळकांतर्फे साक्षीदाराना लाचलुचपत झाल्याचा पुरावा नाही. टिळकांविषयी आदर असला म्हणून इतके प्रतिष्ठित लोक खोट्या प्रतिज्ञेला कसे तयार होतील? ताईमहाराजांची पत्रे पुण्यास आल्यावर बनावट केली. खरी पत्रे पुढे आली नाहीत आणि बनावट पत्राप्रमाणे टिळकानी ताईमहाराजांवर करडा अंमल चालविला होता हे खरे म्हटले तरी मांडीजवळ बसविलेला मुलगा मांडीवर उचलून ठेवण्याला काय हरकत होती? नागपूरकराची पत्रे त्याच्याच गळ्यात आली व आता आपल्या बचावासाठी मी ती कपटाने लिहिली असे तो सांगत आहे. तेव्हा खोटे सिद्ध करण्याला कपटाची मदत मिळू नये. नुसती मुलेच पसंत करावयाची तर ती पुण्यासहि आणता आली असती. त्याकरिता ताईमहाराजाना औरंगाबादेस येण्याचे कारण नव्हते. टिळकाना उठून जाण्याचे कारण नव्हते. एवढी इस्टेट मिळावयाची तर मुलाचे बाप त्याना पुण्यास का न आणते? पुण्यास परत आल्याबरोबर लिहिलेल्या काही पत्रात हकीगत मोघम लिहिलेली असली तरी काहीमध्ये मांडीवर मुलगा देऊन आलो मुलगा पसंत केला. दत्तक दिला आणि घेतला असे स्पष्ट शब्दानी लिहिले आहे. टिळकांचे हेतू निस्वार्थी होते व इतराचे स्वार्थी होते या गोष्टीवरूनच सत्य कोणाच्या बाजूला असेल हे अनुमान करिता येते.

नंबर २ चा आरोप ताईमहाराजाना अटक केल्या संबंधाचा होता. त्याहि बाबतीत करंदीकरानी असाच समर्पक डिफेन्स दिला. पंडितमहाराजाना बाहेर घालविल्यावर वाड्याचा दरवाजा बंद केला होता तरी तो दोन तीन तास उघडा असे. या स्थितीला कैद अगर कोंडून ठेवणे असे म्हणता येत नाही. ट्रस्टीच्या आपल्या

अधिकाराच्या समजुतीप्रमाणे आपल्या ताब्यातील दरवाजा लावून ठेवणे हे प्रामाणिकपणाचे होते. बाई बाहेर जाण्यास निघाल्या असता त्याना कोणीच जाण्यास प्रतिबंध केला नाही. खिडकीतून त्या ओरडल्या व मला सोडवा म्हणाल्या ही गोष्ट खोटी ठरली आहे. पंडितमहाराज वाड्यात घुसण्याचा संभव म्हणून दरवाजा बंद करण्यात आला होता. परंतु आत बाहेर जाण्यायेण्याचा व्यवहार सुरू होता व मुले शाळेत येत जात नोकर कुणबिणी येत जात असत असा पुरावा झाला होता."

सरकारतर्फे बॅरिस्टर स्ट्रँगमन यानी डिफेन्सला उत्तर दिले. ते म्हणाले, "बाईला अटक केली असे ठरले तर पहिले दत्तविधान खोटे होते झाले नव्हते असेच अनुमान निघेल. ताईमहाराज या मोठ्या करारी आहेत. नागपूरकर हाच चंचल व ढिला आहे. आपली बाजू ताईमहाराजानीच करारीपणाने उभी केली. नागपूरकराकडे त्यातले श्रेय काही नाही. १८ जूनच्या ठरावात दत्तविधान करून घ्यावे असा मजकूर नाही. व परत आल्यावर टिळकानी लिहिलेल्या काही पत्रात दत्तविधानाचे शब्द नाहीत. ताईमहाराजांची साक्ष खरी मानली म्हणजे टिळक खोटे पडलेच पाहिजेत. औरंगाबादचे साक्षीदार खोटे. ते टिळकांच्या कीर्तीला भुलून त्यांच्या बाजूला खोटी साक्ष देतात. टिळकांच्या व्याख्यानाला तीनशे माणसे पण दत्तविधानाला तीस माणसे हजर! अर्थात् हा व्यवहार चोरटा घाईचा व अपुरा झाला असला पाहिजे. टिळकांच्या एका पत्रात मुलगा मांडीवर दिला असे शब्द असले तरी ते लाक्षणिक अर्थानेच घेतले पाहिजेत. करारी ताईमहाराजानी सुटका होण्याकरिता कागदावर सह्या केल्या पण त्यानी दत्तविधान होऊ दिले नाही. टिळकांचा हेतू निःस्वार्थी मानिला तरी अहंकाराचा हेतु त्यात होताच."

ता० २४ रोजी मॅ. क्लेमंट्स् यानी निकाल सांगितला. त्याची लेखी स्वदस्तुरची १८४ पाने होती. त्यात त्यानी लिहिले की टिळकाना त्रास देण्याकरिता हा खटला भरण्यात आलेला नाही. कारण स्वतः सरकारलाहि बॅरिस्टर देऊन खर्चात पडावे लागलेच की नाही! खटला मॅजिस्ट्रेटकडे दिल्यावर पोलिसचौकशी करण्याचे कारण नव्हते. अर्थात् चौकशीचा रिपोर्ट दाखल केला नाही ते योग्यच झाले. ताईमहाराज जितके आडवेतिडवे किंवा वस्तुस्थितीला सोडून बोलल्या तितके इतर अनेक साक्षीदार बोलतच असतात. आपल्या हातचे एक पत्र त्यानी नाकबूल केले ते केवळ त्रासाने केले असेल. करंदीकर व ब्रॅन्सन यानी त्याना फार त्रास दिला तरी त्यांच्या साक्षीत चलबिचल झाली नाही. औरंगाबादेस बाईला फसवून नेले व तेथील साक्षीदार ब्राह्मण व टिळकांचे पक्षपाती म्हणूनच खोटे बोलतात. साक्षी कमिशनपुढे झाल्या म्हणून खोट्या प्रतिज्ञेच्या खटल्याची भीति त्याना राहिली नाही. आपण दत्तविधानात मुलगा मांडीवर घ्यावा लागतो ही गोष्ट ॲस्टनसाहेबापुढे जबानी देताना टिळकांच्या प्रथम लक्षात आली. तोपर्यंत ती त्याना माहीत नव्हती. म्हणून या जबानीपासून पुढे त्यानी प्रत्यक्ष मुलगा मांडीवर बसविण्याचा बाहणा त्यानी चालविला. या जबानीच्या पूर्वीच्या एका पत्रात मांडी-

वर मुलगा दिला असे शब्द आहेत खरे. पण ते लाक्षणिक अर्थाने घ्यावयाचे आहेत. टिळकांचा हेतु निस्वार्थी आहे म्हणूनच १८ महिन्याची शिक्षा देतो, तो स्वार्थी असता तर किती तरी अधिक द्यावी लागली असती ! शिक्षेच्या कामात पूर्वी स्ट्रॅचीसाहेबानी प्रमाण घालून दिलेच होते. त्याप्रमाणे दीड वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा एक हजार दंड दंड न दिल्यास फिरून दोन महिने कैद असा निकाल क्लेमन्ट्स् यानी दिला !

## (७) आक्षेप व कुतर्क

दरम्यान आणखी एका खटल्याची तयारी करून ठेवण्यात आलीच होती. ती अशी की नागपूरकर यानी वाड्यातील दागिन्यांची व इस्टेटीची अफरातफर केल्याची फिर्याद टिळकानी सिटी मॅजिस्ट्रेटपुढे केली होती पण तिचे काम चालले नाही. सबब ही खोटी फिर्याद केल्याबद्दल टिळकावर रुकार मिळावा म्हणून नागपूरकरानी अर्ज केला. व तो मंजूर करून सिटी मॅजिस्ट्रेट यानी रुकार दिला. पण तो पुढे टिकला नाही. नाहीतर त्याचीहि यातच भर पडणार होती. तथापि झाले एवढे काही थोडे नव्हते. कारण या खाजगी स्वरूपाच्या खटल्यात खोट्या प्रतिज्ञे-करिता टिळकाना शिक्षा व्हावयाची म्हणजे त्यांच्या एकंदर चारित्र्यावर अप-कीर्तीचा बोळा फिरण्यासारखे होते ! आणि सरकारालाहि त्याच कारणाकरिता ती गोष्ट करावयाची होती. १८९७ च्या खटल्याने टिळकाना तुरुंगवास घडविला खरा. परंतु त्यामुळे त्यांची अब्रू कमी न होता उलट वाढलीच. म्हणून या सर्वांचे उट्टे या खाजगी स्वरूपाच्या खटल्यात काढून घ्यावे असे सरकारने ठरविले. व तो त्यांचा हेतू सहज साधण्यासारखा होता. कारण एक यःकश्चित दुबळी स्त्री टिळकां-विरुद्ध हत्यार घेऊन उठली तेव्हा तिची बाजूच बहुधा खरी असेल एरवी तिची मजल येथवर जाणार नाही असे तिऱ्हाइताना सहजच वाटण्यासारखे होते. ट्रस्टीनी केल्या त्या सर्व गोष्टी कायदेशीर की बेकायदेशीर हे कोण पाहातो ! आणि काय-द्याचा वाद निघाला म्हणजे त्यात दोन मते ही ठरलेलीच असावयाची.

दुसरेहि कित्येक विचार यात होतेच. आणि ते विचार बोलून दाखविणारी माणसेहि आढळत म्हणून ते येथे देतो. ते म्हणत—" ताईमहाराज ही सरदाराची स्त्री. तिला ना कायद्याचे ज्ञान ना कोणाचा आधार. प्रत्यक्ष तिच्या नवऱ्याने मृत्युपत्र करून तिचे हातपाय बांधून तिला परतंत्र केले व केवळ अन्नवस्त्राची धनीण बनविले. तरी टिळकानी हे मृत्युपत्र परमार्थाने घेऊन तिला वागविणे योग्य काय ? कुठला तरी परका मुलगा आणून दत्तक द्यावयाचा आणि तो सज्ञान होईपर्यंत ट्रस्टीनी मिळकतीची वहिवाट करावयाची. आणि मुलगा सज्ञान झाला म्हणजे फिरून तोहि स्वतंत्रच. येऊन जाऊन पारतंत्र्य काय ते या हिंदु विधवेच्या नशिबी ! इस्टेटीला पुष्कळसे कर्ज आहे व त्याचे व्याज भागविता भागविता पुरेवाट होते. पण हे कोणाला सांगता ? कर्ज असताहि नवरा जर चैन भोगीत होता तर त्याच्या बायकोलाच

तेवढा कर्जाचा जाच का व्हावा ? आईबापानी श्रीमंत पाहून बिजवराला दिली पण तो नवरा गेला, तो मुलगा गेला आणि श्रीमंतीची चैनहि नाही. हा काय ईश्वराच्या घरी न्याय झाला ? ट्रस्टी हे नवऱ्याचे हितकर्ते म्हणून मिरवितात पण त्यांचा हितकर्तेपणा त्यांच्या बायको भोवतीच का ? तिने इस्टेटीला कर्ज केले तर ट्रस्टीना काही ते जातीने फेडावे लागणार नाही. दत्तविधान जर तिच्याशिवाय होत नाही तर दत्तविधान मी करीन वा न करीन असे म्हणण्याचा अधिकार तिला आपोआप प्राप्तच होतो. म्हणून दत्तविधानाला संमति देण्याच्या मोबदल्यादाखल जर बाईने आपलेहि स्वास्थ्य त्यातल्या त्यात काही कराराने साधून घेतले तर त्यात तिचा काय दोष ? दत्तक मुलगा कोणता घ्यावा कोणता घेऊ नये हे ठरविण्याचा अधिकार तिलाच पाहिजे. उद्या दत्तविधान झाल्यावर ती आई आणि तो मुलगा. त्यांचीच ममता परस्पर राहावयाला हवी. हे परके उपरी ट्रस्टी काय घरी नांदावयाला येणार होते ? मुलगा पसंत करण्याचा अधिकार ट्रस्टीना पण त्याला वागविण्याची जबाबदारी आईवर. त्याचे तिचे न जमले तर उद्या अपकीर्ती होणार ती तिचीच. अधिकार खरा पण तो चालविण्याला काही मर्यादा असते. ट्रस्टी झाले तरी त्यानी निराश्रित विधवेशी वागताना अगदीच काही कायद्याच्या सुरी–तरवारीची धार काढावयाला नको होती. मांजर सुद्धा कोंडले म्हणजे अंगावर येते. त्याप्रमाणे एवढ्या टिळकांविरुद्ध अर्ज करण्याला खटले भरण्याला बाई उभी राहिली याचा अर्थ तिच्याने टिळकांचा जुलूम अधिक सोसवेना असा नाही काय ? कोल्हापूरचा एखादा मुलगा घेतला असता तर जवळच्या जवळ, फार तर वाटीतले ताटात सांडले असते. पण ते टाकून इतक्या लांब निजामशाहीत मुलगे हुडकावयाला जाण्याचे काय नडले होते ? बोलून चालून मुलगा अल्पवयीच घेतला. पण तो तरी उद्या चांगला निघेल याची हमी टिळकानी काय घेतली होती व त्याना ती हमी कोण देणार होते ? अहो, घरचा मुलगाहि वेळी बापाचे ऐकत नाही. मग हा तरी उद्या सज्ञान झाल्यावर ट्रस्टींचे ऐकणार वाटते ! बरे, औरंगाबादेस दत्तविधान करून बाई परत आल्यावर समजा तिचे मन बदलले व तिने दुसराहि एक दत्तक घेतला तर घेतला. पहिल्या दत्तविधानाचे नाणे खरे होते तर दुसऱ्या दत्तविधानाची कसली भीति ? आणखी दहा केली तरी काय झाले असते ? आता दुसरे दत्तविधान वाड्यात होणार म्हणून एक वेळ टिळकाना थांबविता आले असते. पण बाईला घरातून बाहेर उठून जाण्याला प्रतिबंध थोडाच होता ! आणि दत्तविधान दत्तविधान ते काय पाच मिनिटाचे काम. कागदपत्र करारमदार वगैरेंची भानगड न ठेविली तर एकाने मुलगा दिला म्हटले, दुसऱ्याने तो घेतला म्हटले, एकाने चटकन मुलगा उचलून मांडीवर दिला तो दुसऱ्याने घेतला, तोंडात साखर घातली व जवळच्यानी टाळी पिटली की झाले दत्तविधान ! तात्पर्य, हट्टाने दुसरे दत्तविधान करावयाचेच झाले तर आपण बाईला सर्व काळ सर्व दिवस प्रतिबंध करू शकत नाही ही गोष्ट टिळकाना कळावयास पाहिजे

वर मुलगा दिला असे शब्द आहेत खरे. पण ते लाक्षणिक अर्थाने घ्यावयाचे आहेत. टिळकांचा हेतु निस्वार्थी आहे म्हणूनच १८ महिन्याची शिक्षा देतो, तो स्वार्थी असता तर किती तरी अधिक द्यावी लागली असती ! शिक्षेच्या कामात पूर्वी स्ट्रॅचीसाहेबानी प्रमाण घालून दिलेच होते. त्याप्रमाणे दीड वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा एक हजार दंड दंड न दिल्यास फिरून दोन महिने कैद असा निकाल क्लेमन्ट्स् यानी दिला !

## (७) आक्षेप व कुतर्क

दरम्यान आणखी एका खटल्याची तयारी करून ठेवण्यात आलीच होती. ती अशी की नागपूरकर यानी वाड्यातील दागिन्यांची व इस्टेटीची अफरातफर केल्याची फिर्याद टिळकानी सिटी मॅजिस्ट्रेटपुढे केली होती पण तिचे काम चालले नाही. सबब ही खोटी फिर्याद केल्याबद्दल टिळकावर रुकार मिळावा म्हणून नागपूरकरानी अर्ज केला. व तो मंजूर करून सिटी मॅजिस्ट्रेट यानी रुकार दिला. पण तो पुढे टिकला नाही. नाहीतर त्याचीहि यातच भर पडणार होती. तथापि झाले एवढे काही थोडे नव्हते. कारण या खाजगी स्वरूपाच्या खटल्यात खोट्या प्रतिज्ञे-करिता टिळकाना शिक्षा व्हावयाची म्हणजे त्यांच्या एकंदर चारित्र्यावर अप-कीर्तीचा बोळा फिरण्यासारखे होते ! आणि सरकारालाहि त्याच कारणाकरिता ती गोष्ट करावयाची होती. १८९७ च्या खटल्याने टिळकाना तुरुंगवास घडविला खरा. परंतु त्यामुळे त्यांची अब्रू कमी न होता उलट वाढलीच. म्हणून या सर्वांचे उट्टे या खाजगी स्वरूपाच्या खटल्यात काढून घ्यावे असे सरकारने ठरविले. व तो त्यांचा हेतू सहज साधण्यासारखा होता. कारण एक यःकश्चित दुबळी स्त्री टिळकां-विरुद्ध हत्यार घेऊन उठली तेव्हा तिची बाजूच बहुधा खरी असेल एरवी तिची मजल येथवर जाणार नाही असे तिऱ्हाइताना सहजच वाटण्यासारखे होते. ट्रस्टीनी केल्या त्या सर्व गोष्टी कायदेशीर की बेकायदेशीर हे कोण पाहातो ! आणि काय-द्याचा वाद निघाला म्हणजे त्यात दोन मते ही ठरलेलीच असावयाची.

दुसरेहि कित्येक विचार यात होतेच. आणि ते विचार बोलून दाखविणारी माणसेहि आढळत म्हणून ते येथे देतो. ते म्हणत—" ताईमहाराज ही सरदाराची स्त्री. तिला ना कायद्याचे ज्ञान ना कोणाचा आधार. प्रत्यक्ष तिच्या नवऱ्याने मृत्युपत्र करून तिचे हातपाय बांधून तिला परतंत्र केले व केवळ अन्नवस्त्राची धनीण बनविले. तरी टिळकानी हे मृत्युपत्र परमार्थाने घेऊन तिला वागविणे योग्य काय ! कुठला तरी परका मुलगा आणून दत्तक द्यावयाचा आणि तो सज्ञान होईपर्यंत ट्रस्टीनी मिळकतीची वहिवाट करावयाची. आणि मुलगा सज्ञान झाला म्हणजे फिरून तोहि स्वतंत्रच. येऊन जाऊन पारतंत्र्य काय ते या हिंदु विधवेच्या नशिबी ! इस्टेटीला पुष्कळसे कर्ज आहे व त्याचे व्याज भागविता भागविता पुरेवाट होते. पण हे कोणाला सांगता ! कर्ज असताहि नवरा जर चैन भोगीत होता तर त्याच्या बायकोलाच

तेवढा कर्जाचा जाच का व्हावा ? आईबापानी श्रीमंत पाहून बिजवराला दिली पण तो नवरा गेला, तो मुलगा गेला आणि श्रीमंतीची चैनहि नाही. हा काय ईश्वराच्या घरी न्याय झाला ? ट्रस्टी हे नवऱ्याचे हितकर्ते म्हणून मिरवितात पण त्यांचा हितकर्तेपणा त्यांच्या बायको भोवतीच का ? तिने इस्टेटीला कर्ज केले तर ट्रस्टीना काही ते जातीने फेडावे लागणार नाही. दत्तविधान जर तिच्याशिवाय होत नाही तर दत्तविधान मी करीन वा न करीन असे म्हणण्याचा अधिकार तिला आपोआप प्राप्तच होतो. म्हणून दत्तविधानाला संमति देण्याच्या मोबदल्यादाखल जर बाईने आपलेहि स्वास्थ्य त्यातल्या त्यात काही कराराने साधून घेतले तर त्यात तिचा काय दोष ? दत्तक मुलगा कोणता घ्यावा कोणता घेऊ नये हे ठरविण्याचा अधिकार तिलाच पाहिजे. उद्या दत्तविधान झाल्यावर ती आई आणि तो मुलगा. त्यांचीच ममता परस्पर राहावयाला हवी. हे परके उपरी ट्रस्टी काय घरी नांदावयाला येणार होते ? मुलगा पसंत करण्याचा अधिकार ट्रस्टीना पण त्याला वागविण्याची जबाबदारी आईवर. त्याचे तिचे न जमले तर उद्या अपकीर्ती होणार ती तिचीच. अधिकार खरा पण तो चालविण्याला काही मर्यादा असते. ट्रस्टी झाले तरी त्यानी निराश्रित विधवेशी वागताना अगदीच काही कायद्याच्या सुरी-तरवारीची धार काढावयाला नको होती. मांजर सुद्धा कोंडले म्हणजे अंगावर येते. त्याप्रमाणे एवढ्या टिळकांविरुद्ध अर्ज करण्याला खटले भरण्याला बाई उभी राहिली याचा अर्थ तिच्याने टिळकांचा जुलूम अधिक सोसवेना असा नाही काय ? कोल्हापूरचा एखादा मुलगा घेतला असता तर जवळच्या जवळ, फार तर वाटीतले ताटात सांडले असते. पण ते टाकून इतक्या लांब निजामशाहीत मुलगे हुडकावयाला जाण्याचे काय नडले होते ? बोलून चालून मुलगा अल्पवयीच घेतला. पण तो तरी उद्या चांगला निघेल याची हमी टिळकानी काय घेतली होती व त्याना ती हमी कोण देणार होते ? अहो, घरचा मुलगाहि वेळी बापाचे ऐकत नाही. मग हा तरी उद्या सज्ञान झाल्यावर ट्रस्टींचे ऐकणार वाटते ! बरे, औरंगाबादेस दत्तविधान करून बाई परत आल्यावर समजा तिचे मन बदलले व तिने दुसराहि एक दत्तक घेतला तर घेतला. पहिल्या दत्तविधानाचे नाणे खरे होते तर दुसऱ्या दत्तविधानाची कसली भीति ? आणखी दहा केली तरी काय झाले असते ? आता दुसरे दत्तविधान वाड्यात होणार म्हणून एक वेळ टिळकाना थांबविता आले असते. पण बाईला घरातून बाहेर उठून जाण्याला प्रतिबंध थोडाच होता ! आणि दत्तविधान दत्तविधान ते काय पाच मिनिटाचे काम. कागदपत्र करारमदार वगैरेंची भानगड न ठेविली तर एकाने मुलगा दिला म्हटले, दुसऱ्याने तो घेतला म्हटले, एकाने चटकन मुलगा उचलून मांडीवर दिला तो दुसऱ्याने घेतला, तोंडात साखर घातली व जवळच्यानी टाळी पिटली की झाले दत्तविधान ! तात्पर्य, इष्टाने दुसरे दत्तविधान करावयाचेच झाले तर आपण बाईला सर्व काळ सर्व दिवस प्रतिबंध करू शकत नाही ही गोष्ट टिळकाना कळावयास पाहिजे

होती. ट्रस्टी झाले म्हणून त्यानी वाड्याला कुलुपे का घालावी ? स्वतः बाईला प्रतिबंध नसेल. पण हा सगळा धुमाकूळ तिच्या राहत्या घरातच ना ? आणि तिच्याकडे कोणी यावे कोणी येऊ नये हे ठरविणार ट्रस्टी कोण ? त्या पुरती तिला स्वतंत्रता अवश्य हवीच. " इत्यादि इत्यादि.

तात्पर्य वरच्यापैकी कोणताना कोणता आक्षेप घेणारे पुष्कळ लोक या प्रकरणात टिळकांवर नाखूष होते. कोणी हिंदुधर्मशास्त्रावर नाराज. कोणी दत्तकाच्या चालीवर नाराज. कोणी बाबामहाराजांच्या मृत्युपत्रावर नाराज. या सर्व प्रकाराची व्यक्तिनिरपेक्ष नाराजीहि टिळकांवरच येऊन आदळली. हिंदुधर्मशास्त्र मूर्ख असेल पण टिळकानी स्वतः तसेच का व्हावे ? स्मृतिकाराना हिंदु विधवांची दया नाही आली म्हणून विसाव्या शतकातील सुशिक्षित टिळकानाहि ती येऊ नये काय ? मृत मित्राच्या इस्टेटीचे कल्याण साधण्यापेक्षा आपला हट्ट चालविण्याची बुद्धी टिळकांच्या सर्व वागणुकीच्या मुळाशी होती म्हणूनच त्यानी या अनन्वित गोष्टि केल्या. आणि या हटवादीपणाचा कळस झाल्यामुळे आपण खोटी साक्ष देतो किंवा कागद बनावट करतो किंवा हिशेबात फिरवाफिरवी करतो किंवा कायदेशीर अधिकाराची ओढाताण करतो किंवा निरपराधी लोकावर खटले भरतो या गोष्टीचे भान टिळकाना राहिले नाही. अशा विचारसरणीमुळे सुधारक नेमस्त व टिळकांचा डौल सहन न होणारे सर्व लोक त्याना काही मनातून तर काही उघड नावे ठेवू लागले. व त्यातच टिळकानी वर्णन केलेल्या स्वार्थपरायण 'पाजी पंचका'ची आणि राजदरबाराच्या अंगणात आश्रय घेणाऱ्या खलांची भर पडली. अॅस्टन साहेबानी बनावट कागद व खोटी साक्ष याचा नुसता ध्वनी काढल्याबरोबर वकिलासारखे वकील वाकनीस हे जर टिळकांचे वकीलपत्र टाकून देण्याला तयार झाले तर टिळकांबद्दल आधीच मन कलुषित असलेल्या लोकाना काय दोष द्यावयाचा ? आणि समाजातील लोकांची जर ही स्थिति तर यूरोपियन अधिकाऱ्यांचे मन किती कलुषित झाले असेल याची सहजच कल्पना होते. टिळकांची प्रतिपक्षी स्त्री विधवा तरुण अशिक्षित कायद्याच्या संकटात सांपडलेली आणि तिच्या मानेवर टिळकांच्या करारीपणाची सुरी असे हे वरवरचे दृश्य पाहून यूरोपियन लोकांच्या मताचे पारडे आधीच टिळकांच्या विरुद्ध खाली गेलेले. व त्यात काही स्त्रीदाक्षिण्याची व काही खुनशीपणाची भर पडून ते आणखी खाली गेले असल्यास नवल नाही. क्लेमन्ट्स् साहेबांचा निकाल हा टिळकांच्या तोंडावर अपयशाच्या वज्रलेपासारखा राहणार. या नैतिक गुन्हेगारीतून त्याना वर डोके केव्हाच काढता येणार नाही, त्यांचे यापुढील सार्वजनिक चरित्र संपले व त्याबरोबर पूर्वी मिळविलेला लौकिकहि गेला अशीच पुष्कळानी मनाशी गाठ घातली. आणि म्हणूनच टिळकांच्या आयुष्यातील अधिकात अधिक संकटाचा काळ जर कोणता असेल तर तो या खटल्याच्या वेळचा होय असे आम्ही तरी म्हणतो. पण हा संकटकाळ आणखी वर्ष सहा महिने टिकावा असे घटितच होते. त्याचा प्रकार असा.

## ( ८ ) सेशन कोर्टाचा निकाल

ता. २४ आगष्ट रोजी मि. क्लेमन्ट्स् यानी टिळकाना शिक्षा दिली व लगेच त्याना येरवडा येथील तुरुंगात नेले. पण निकाल काय होणार याचा अदमास असल्यामुळे टिळकांच्या वकिलानी सेशन कोर्टाकडे करण्याच्या अपिलाची यादी आधीच लिहून तयार ठेविली होती, व शिक्षा सांगताच टिळकांची त्यावर सही घेऊन ती गुदरण्यात आली. सुदैवाने सेशन कोर्ट व क्लेमन्ट्स्साहेबांचे कोर्ट ही एकाच इमारतीत दहावीस पावलांच्या अंतरावरच होती. यामुळे अपील ताबडतोब दाखल करता आले. पण सेशन जज्ज ल्यूकस यांचेपुढे आधी चालत असलेले काम संपून, अपिलाची जुजबी सुनावणी होऊन, जामिनावर टिळकाना खुले करण्याचा हुकूम हाती पडून तो येरवड्यास नेऊन तुरुंगाच्या अधिकाऱ्यावर बजावीपर्यंत सहजच चार दोन तास लागले. पण सुदैवाने सदर अधिकाऱ्याने आधीच सबूरी केली असल्याकारणाने टिळकांचे कपडे बदललेले नव्हते. यामुळे त्याच दिवशी त्याना सोडवून घरी परत आणता आले. मि. ल्यूकस यांचे पुढे अपिलाचे काम आक्टोबरात व डिसेंबरात मिळून संपले. अपिलाचे काम टिळकांतर्फे हायकोर्ट वकील दाजीसाहेब खरे यानी चालविले. आणि सुनावणीच्या वेळची प्रश्नोत्तरे व एकंदर रागरंग पहाता टिळक बहुधा सुटणार असाच सर्वांचा अंदाज झाला. तो इतका की तारीख ४ जानेवारी १९०४ रोजी कोर्टात टिळकांबरोबर गेलेली त्यांची मित्रमंडळी व निकाल ऐकण्यास आलेली इतर मंडळी मनात आनंदित होती. आणि कोणी निकालाच्या तारा कशा व कोणा कोणास लिहाव्या तर कोणी पेढे व फुलांचे हार केव्हा आणावे या विचारात मनातून गर्क होते. ल्यूकससाहेबानी बरोबर ११॥ वाजता आपला निकाल वाचण्यास सुरवात केली. निकाल म्हटला म्हणजे काही विधाने उलट सुलट दोन्ही पक्षाविषयी व्हावयाचीच व त्याप्रमाणे ऐकणाराचे जीव खालवर होत होते. पण शेवटी शेवटी न्यायाधीश एकदम जे घसरले ते सावरले नाहीत. आणि "टिळकानी खोटी साक्ष दिली असा माझा निष्कर्ष आहे" असे त्यानी म्हणताच टिळकाना व त्यांच्या मित्रमंडळीना एकदम कोणी धक्का देऊन पाताळात लोटल्यासारखे झाले !

पण सेशन जज्जाना दोन तीन गोष्टीनी दुःखाचे ओझे किंचित् कमी केले. ते असे की दीड वर्षाच्या शिक्षेऐवजी सहा महिन्याची सजा केली व हे करण्याला कारण म्हणून असे दिले की " जगन्नाथ महाराजांचे दत्तविधान प्रत्यक्ष झाले असे सांगण्यात टिळकांचा हेतू सर्वस्वी शुद्ध व इस्टेटीचे हित सांभाळण्याचाच होता. नागपूरकरासारख्या अप्रामाणिक मनुष्याच्या आणि सर्वस्वी त्याच्या तंत्राने वागणाऱ्या ताईमहाराजांच्या हाती इस्टेट गेली तर ती खास बुडणार असे टिळकाना वाटत होते व कोणाहि सूज्ञ मनुष्याला या कामी तसेच वाटणार. नागपूरकर व ताईमहाराज यानी क्लेमन्ट्स्पुढे स्वतः खोट्या साक्षी दिल्या. पण टिळ-

कानी खोटे सांगितले ते खोटे सांगावे या इच्छेने सांगितले असे नाही, तर ॲस्टनसाहेबांच्या कोर्टात फार दिवस चाललेल्या त्रासदायक उलटतपासणीत प्रतिकार करता करता खोटी साक्ष देण्याची पाळी टिळकावर आली असावी." तसेच "ताईमहाराजांना वाड्यात प्रतिबंध केला नव्हता" हे टिळकांचे वाक्य खोटे ठरवून क्लेमन्ट्स् यानी खोट्या प्रतिज्ञेच्या दुसऱ्या आरोपावर त्याना गुन्हेगार ठरविले होते. पण ताईमहाराजाना स्वतः वाड्यात केव्हाहि प्रतिबंध झाला नव्हता असे शाबित धरून या दुसऱ्या आरोपातून टिळकाना त्यानी दोषमुक्त केले. अशा रीतीने बाकीचे अनेक आरोप कमी होत होत औरंगाबादेस प्रत्यक्ष दत्तविधान झाल्याचे वाक्य तेवढे खोटे इतकाच टिळकांवर आरोप शिल्लक राहिला. तरी पण अजून बनावट कागद केल्याचे वगैरे आरोप शिल्लकच होते. पण ते प्रत्यक्ष चार्ज ठेवण्याच्या मजलीला जाऊन भिडले नव्हते. ल्यूकसाहेबांच्या निकालासंबंधाने कित्येकांचा तर्क असा आहे की ते पहिला बराच भाग लिहीपर्यंत टिळकाना सर्वस्वी दोषमुक्त करण्याच्या विचारात असावेत पण शेवटी तो त्यांचा विचार बदलला असावा. मग ते कोणत्याहि कारणाने असो.

## (९) हायकोर्टाचा निकाल

ल्यूकससाहेबानी निकाल दिला त्या दिवशी फिरून टिळकाना येरवड्याच्या तुरुंगात नेण्यात आले. पण या वेळी पूर्वीप्रमाणे त्याना तावडतोब जामिनावर सोडवून घेण्याची सोय नसल्याने तारीख ४ ते ७ जानेवारी १९०४ पर्यंत चार दिवस टिळकाना इतर कैद्याप्रमाणेच राहावे लागले. ता. ८ रोजी हायकोर्टाच्या हुकुमावरून त्यांची जामिनावर सुटका झाली. हायकोर्टात टिळकातर्फे दाजीसाहेब खरे यानीच काम चालविले. अपिलाची सुनावणी ता. २४, २५ व २९ फेब्रुवारी अशी तीन दिवस चालली. आणि ता. ३ मार्च रोजी न्या. जेन्किन्स व बॅटी यानी टिळकाना दोषमुक्त करून सोडून दिले. इतकेच नव्हे तर हे करण्यापूर्वी त्यानी सरकारी बॅरिस्टराकडून टिळकांवर शिल्लक असलेले इतर सर्व आरोप सरकारने परत घेतल्याची कबुली तोंडाने वदवून आपल्या कागदावर नोंदवून घेतली. आणि अशा रीतीने तीन वर्षे चाललेला टिळकांचा न्यायकोर्टातील छळ संपला ! ४ एप्रिल १९०२ रोजी ॲस्टनसाहेबानी टिळकांविरुद्ध मुख्य व गौण मिळून दहा बारा आरोपांचे काहुर आणले. आणि ४ मार्च १९०४ पर्यंत हे सर्व आरोप एकामागून एक वितळत जाऊन टिळकांच्या डोक्यावरचे लौकिकाचे आभाळ सर्वस्वी निरभ्र झाले. पण ते होण्यापूर्वी टिळकाना प्रत्यक्ष कोर्टात आरोपी म्हणून सुमारे १६० दिवस हजर राहावे लागले. आणि त्या मानाने इतर श्रम व खर्च किती पडला असेल याची कल्पना कोणासहि येईल. मात्र समाधान इतकेच की या सर्वांची किंमत देऊन का होईना पण टिळकांचे म्हणणे अखेर खरे ठरले आणि त्यांच्या प्रतिपक्षीयांचा पुरा मोड झाला. हायकोर्टाने टिळकांचीच जबानी खरी मानली. त्यांच्या

तर्फेचा तोंडी पुरावा खरा मानून जमेस धरला. ताईमहाराज व नागपूरकर यानी खोट्या साक्षी दिल्या हे ल्यूकससाहेबांचे विधान जमेस धरून तेच कायम केले. टिळकांचा हेतू शुद्ध असल्याबद्दल तर खालपासून वरपर्यंत एकवाक्यताच होती. ॲस्टन साहेबानी टिळकाना शुद्ध सैतान ठरविले होते. क्लेमन्टस् साहेबानी अप्रामाणिकपणाचा आरोप काढून टाकून हट्टीपणामुळे हा गृहस्थ वेडा झाला व वाटेल ते करीत सुटला असे त्यांच्या दोषाचे किंचित सौम्य वर्णन केले होते. त्याच्यापुढे जाऊन टिळकांचे हेतू अगदी निर्मळ होते असे ल्यूकससाहेबानी लिहून ठेवले होते. आणि शेवटी हायकोर्टाने केवळ त्यांचे हेतूच नव्हे तर कृत्ये आणि विधाने ही उमद्या भावनेची व सत्याला धरून होती असा निर्णय दिला. अशा रीतीने टिळकांच्या मागचे हे फौजदारी कर्मकांड या प्रकरणापुरते पुरे झाले!

असो. हायकोर्टाच्या निकालात सर्व गोष्टी खुलासेवार दिल्या असल्यामुळे त्यातील मुख्य भाग खाली दिला आहे:—

" ताईमहाराजानी स्वतःचा हेतु साधण्याकरिता जी साक्ष दिली त्याच्याविरुद्ध पुष्कळ संभावित गृहस्थांच्या जबान्या झाल्या आहेत. पण 'नेटिव लोकांची साक्ष विश्वसनीय नसते अशी' काही तरी निरर्थक सबब लावून हा सर्व पुरावा कोर्टाने एके बाजूस ठेवला आहे. तपासणी अर्जात दस्तऐवजी पुराव्याचा मुख्य मुद्दा आहे त्याअर्थी त्याच्याच मुख्यत्त्वेकरून विचार करू. ताईमहाराजांचे म्हणणे दस्तऐवजी पुराव्यावरून किती टिकते हे आता पाहणे आहे. दस्तऐवज दोन प्रकारचे आहेत. एक औरंगाबादेस जाण्यापूर्वीचे आणि दुसरे औरंगाबादचे व त्यानंतरचे. पैकी फिर्यादीतर्फे असे म्हणणे आहे की, " पहिल्या वर्गातील दस्तऐवजावरून औरंगाबादेस दत्तक घेण्याचा विचार कायम नव्हता. पहिल्यापासून बाळामहाराजांच्या मनात होते असे दिसून येते ! आणि दुसऱ्या वर्गाच्या दस्तऐवजात शारीरिक दानप्रतिग्रहाचा उल्लेख नाही यावरून सदर प्रकारचा दानप्रतिग्रह औरंगाबादेस झाला नाही असे सिद्ध होते." यापैकी पहिल्या वर्गातील दस्तऐवज महत्त्वाचे नाहीत. कारण त्यावरून फार झाले तर एखादी गोष्ट संभवनीय आहे किंवा नाही एवढेच सिद्ध होईल. याकरिता त्या वर्गातील दस्तऐवज सोडून देऊन दुसऱ्या वर्गातील दस्तऐवजाकडे वळू. या वर्गातील दस्तऐवज दोन प्रकारचे आहेत. एक औरंगाबादेस झालेले व दुसरे औरंगाबादेहून परत आल्यावर झालेले. शास्त्री याचे सर्टिफिकीट दत्तकपत्राचा मसुदा दत्तकपत्र आणि भाऊसाहेबास ताईमहाराजानी दिलेले पत्र हे पहिल्या प्रकारचे दस्त ऐवज होत. आणि टिळक यानी एजंटसाहेबांस पाठविलेली यादी नागपुरकराचे कुंभोजकर यास पाठविलेले पत्र टिळकानी ट्रस्टीकडे केलेला रिपोर्ट कोर्टास केलेला मनाईचा अर्ज आणि कोल्हापुरास पाठविलेल्या तारा व यादी दुसऱ्या प्रकारात मोडतात. यापैकी टिळकानी एजंटसाहेबांकडे पाठविलेली यादी ही सकृद्दर्शनी त्यातील मराठी शब्दावरून आरोपीच्या विरुद्ध आहे असे वाटते. हे शब्द 'दत्तविधानाचा समारंभ' हे होत. दत्तविधानाचा समारंभ होईल तेव्हा दरबारास

मेहरबानास आमंत्रण होईल असे यात लिहिले आहे. यावरून फिर्यादीतर्फे असे म्हणणे आहे की ही यादी पाठविली तेव्हा दत्तविधान किंवा शारीरिक दानप्रतिग्रह झालेले नव्हते. परंतु टिळक यानी आपल्या जबानीत या शब्दाचा खुलासा केलेला आहे; व तो खुलासा फिर्यादीतर्फेचे वकील यांस कळला नाही किंवा तो समजून घेण्याची त्यांची इच्छा नव्हती असे दिसते. तो खुलासा असा आहे की, "दत्तविधानाचा समारंभ" म्हणजे दत्तविधान झाल्यानंतर त्यासंबंधी जो समारंभ किवा जेवणावळी देणग्या वगैरे उत्सव करतात तो त्यावरून दत्तविधान झाले नाही असे होत नाही.

"हा खुलासा बरोबर नाही असा फिर्यादीतर्फे काही पुरावा आलेला नाही. आणि ॲडव्होकेट जनरल यानी माहिती घेऊन या कोर्टात असे कबूल केले आहे की टिळक यांस उद्दिष्ट असलेला अर्थ व्यक्त करण्यास या दस्तऐवजात आहेत त्यापेक्षा निराळ्या प्रकारचे शब्द घालता आले नसते. इंग्रजी भाषेत देखील Wedding breakfast ( लग्नाची जेवणावळ ) किंवा Christening party [ नामकरणाचा समारंभ ] असे शब्द वापरतात पण त्यावरून लग्नाचा किवा नामकरणाचा विधि त्याच वेळी व्हावयाचा असा बोध होत नाही. याखेरीज टिळकानी ट्रस्टीकडे जो रिपोर्ट केला आहे त्यात 'आपण औरंगाबादेस ताईमहाराजांच्या मांडीवर मुलगा दत्तक देऊन आलो' असे स्पष्ट लिहिले आहे. हा रिपोर्ट नागपूरकराच्या दृष्टीस पडला होता असे दिसून येते. तथापि त्यास मांडीवर मुलगा दिल्याचा प्रत्यक्ष केलेला उल्लेख खोटा आहे असे त्या वेळी नागपूरकर याने म्हटल्याचे दिसत नाही आणि नागपूरकर तेव्हाहि बाळामहाराजाच्या तर्फे खटपट करीत होता हे लक्षात आणले म्हणजे या मुद्याचे महत्त्व समजते. रा. टिळक यानी याप्रमाणे आपल्या रिपोर्टात मांडीवर मुलगा दिल्याचा प्रत्यक्ष उल्लेख केला असताहि हे शब्द लाक्षणिक आहेत असे धरून टिळक यानी आपल्या पत्रात कोठेहि शारीरिक दानप्रतिग्रहाचा उल्लेख केलेला नाही असे से. जज्ज यानी कसे ठरविले हेच आम्हास समजत नाही. शारीरिक दानप्रतिग्रह दाखविण्यास यापेक्षा दुसरे चांगले शब्द सांगता येत नाहीत ही गोष्ट फिर्यादीतर्फे कबूल करण्यात आली आहे. आणि हे जर कबूल आहे तर अशा प्रकारच्या शब्दाचा स्पष्ट अर्थ सोडून आरोपीच्या विरुद्ध त्याचा लाक्षणिक अर्थ करणे हे फौजदारी न्यायाची जी मूलतत्त्वे आहेत त्यास अत्यंत विरुद्ध आहे. हा रिपोर्ट बनावट असावा असे ध्वनित करून हा आरोपीतर्फेचा पुरावा विश्वसनीय नाही असे दाखविण्याचा फिर्यादीतर्फे आमच्यापुढे प्रयत्न केला होता. पण यास काही आधार दाखविण्यात आला नाही किंवा म्याजिस्ट्रेटपुढेहि तक्रार केलेली नाही व से. जज्ज यानीहि ती घेतली नाही आणि ती खरीहि नाही असे दिसून येते. सरते शेवटी नागपूरकर याने 'मी औरंगाबादचा दत्तक रद्द होण्याबद्दल खटपट करणार नाही' असे जे लिहून दिले आहे त्यावरूनहि औरंगाबादेस मुलगा मांडीवर देऊन आपण परत आलो असे जे महत्त्वाचे विधान टिळकानी आपल्या रिपोर्टात केले आहे त्यासच बळकटी येते. हा रिपोर्ट ५ जुलै

१९०१ रोजी झाला. दुसऱ्या दिवशी म्हणजे ता. ६ जुलै रोजी ताईमहाराज यानी एजंटाकडे जाऊन जी लेखी तक्रार दिली तो दस्तऐवज आमचेपुढे आहे. त्यात 'टिळकानी केलेला मुलगा मला पसंत नाही' असे शब्द आहेत. या शब्दांचा अर्थ आमचे मते औरंगाबादेस पुरे दत्तविधान झाले असा होतो. पण सेशन जज्ज यानी तिकडे दुर्लक्ष केले आहे. ॲडव्होकेट जनरल यांचे असे म्हणणे आहे की या वाक्याचा अर्थ वाग्दानापुरता धरावा पण त्यात काही अर्थ नाही. दुसरा दत्तक होण्याचे वेळी मनाई मागण्याकरिता टिळक यानी १२ जुलै रोजी जी दिवाणी कोर्टात फिर्याद केली त्यात औरंगाबादेस दत्तक घेतल्याचा उल्लेख नाही एवढ्या-वरून औरंगाबादेस दत्तक झाला नाही असे आम्ही अनुमान काढावे असे फिर्या-दीचे म्हणणे आहे आणि से. जज्ज यानीहि तसेच अनुमान केले आहे. परंतु हा मुद्दा इतका निराधार आहे की तो फिर्यादीतर्फे पुढे कसा आणू दिला व त्यास क्षणभर तरी खालील कोर्टाने कसा थारा दिला हे आम्हास समजत नाही.

"खोट्या प्रतिज्ञेच्या खटल्यात पुराव्याचा विचार करताना किती सावधगिरी ठेविली पाहिजे याबद्दल थोडासा विचार येथे केला पाहिजे. इंग्लंडातील कायद्या-प्रमाणे पाहिले तर (आणि हिंदुस्थानातील कायदा इंग्लंडातील कायद्याच्या पाया-वरच रचलेला आहे) खोट्या प्रतिज्ञेचा गुन्हा शाबित करण्यास दोन साक्षीदारांची जरूर आहे किंवा एक साक्षीदार असून त्याच्या प्रत्यंतरास दुसऱ्या काही महत्त्वा-च्या गोष्टी शाबीत केल्या पाहिजेत. हा नियम काही उगीच घातलेला नाही. तो न्यायाच्या मूलतत्त्वावर अवलंबून आहे आणि हिंदुस्थानच्या कायद्यात जरी असा स्पष्ट नियम नसला तरी न्याय करताना न्यायाधीशाने हा विचार मनात ठेवला पाहिजे. अशा दृष्टीने पाहिले तर या खटल्यात दिलेली शिक्षा बिलकूल टिकत नाही. परंतु यदाकदाचित् हा नियम बाजूला ठेवला तरीहि से. जज्जाच्या निकाला-वरून पाहता आरोप शाबीत धरण्यास पुरेसा आधार नाही. सारांश आरोपीविरुद्ध ताईमहाराज ही एकच साक्षीदार आहे आणि तिने आरोपीविरुद्ध खोटी साक्ष दिली असे ज्या अर्थी से. जज्जाचे म्हणणे आहे त्या अर्थी तिचे म्हणण्यास से. जज्जानी सांगितलेल्या तीन प्रकारापैकी कोणत्या तरी प्रकारचा प्रत्यंतर पुरावा असल्याखेरीज तिचे म्हणण्यावर विश्वास ठेवता येत नाही.

"से. जज्ज यानी या खटल्यातील पुरावा विश्वसनीय मानण्याचे जे तीन नियम दिले आहेत त्यापैकी तोंडी साक्षीस कागदपत्राचा दुजोरा असल्याखेरीज तोंडी साक्ष भरंवशाची नाही असा पहिला नियम दिला आहे त्याखेरीज दुसरा नियम या खटल्यात लागू पडत नाही असे ॲडव्होकेट जनरल यानी कबूल केले आहे. व त्यांचे असे म्हणणे आहे की ताईमहाराजांच्या साक्षीस दस्तऐवजी पुराव्याने बिलकुल दुजोरा मिळत नाही. हाच खटला जज्ज आणि ज्यूरी यांच्या-पुढे असता तर ज्यूरीचा अभिप्राय विचारण्याचीच जरूर नव्हती अशा प्रकारचा हा दस्तऐवजी पुरावा आहे तथापि मॅजिस्ट्रेट यानी आपल्या निवाड्यात असे

लिहिले आहे की " ताईमहाराजांची साक्ष जरी झाली नसती किंवा घेता आली नसती तरीहि आरोपीविरुद्ध पहिल्या म्हणजे दत्तविधानाच्या आरोपासंबंधाने जो पुरावा आहे त्यात यत्किंचितहि कमी पडले नसते. " परंतु या दस्तऐवजी पुराव्या-संबंधाने आमचे असे मत आहे की से. जज्जानी म्हटल्याप्रमाणे जरी त्याचा अर्थ केला तरी फार झाले तर थोडासा संशय उत्पन्न करण्यापलीकडे त्याची जास्त किंमत नाही. त्यावरून कोणतीहि गोष्ट कायदेशीर रीतीने शाबीत होत नाही किंवा प्रत्यंतर पुराव्यासहि त्याचा उपयोग नाही. अमुक एक ठिकाणी अमुक एक गोष्ट सांगितली नाही असे गृहीत धरून त्यावरून से. जज्जानी आपली अनुमाने काढली आहेत. पण वर सांगितलेच आहे की अमुक एक दस्तऐवजात अमुक एक प्रकारचा उल्लेख नाही असे मानण्यासच काही कारण नाही. शब्दांची ओढाताण करूनच असा अर्थ काढावा लागतो आणि यदाकदाचित् सरळ अर्थ निघतो असे मानले तरीहि से. जज्ज यानी काढल्याप्रमाणे अनुमान काढून शिक्षा देणे कायद्याप्रमाणे प्रशस्त नाही.

"याप्रमाणे दस्तऐवजी पुराव्याचा विचार केला असता असे दिसते की रा. टिळक यानी औरंगाबादेस मुलगा मांडीवर दिला असे विधान केले असताहि त्याच्याविरुद्ध ताईमहाराज आणि नागपूरकर यानी कोर्टात येईपर्यंत काही म्हटले नाही. अशा स्थितीत पुराव्याचा बोजा आरोपीवर टाकला हीच चूक होय. आमचे दस्तऐवजी पुराव्याबद्दलचे जे मत झाले आहे त्याप्रमाणे पाहता बाकीच्या दस्तऐवजांचा विचार करण्याची फारशी जरूरी नाही. कारण जी गोष्ट मुळीच शाबीत होत नाही त्याचा प्रत्यंतर पुरावा पाहण्याची तरी जरूर काय ? ता० १८ जूनच्या ट्रस्टीच्या ठरावासंबंधानेही आमचे हेच म्हणणे आहे. तथापि ज्याअर्थी या कागदांचा आमच्यापुढे बराच उहापोह झाला आहे त्याअर्थी त्यातील गोष्टी संबंधाने थोडासा येथे विचार करतो. या कागदापैकी मुख्य कागद म्हणजे दत्तकपत्र होय. यात शारीरिक दानप्रतिग्रह नाही असे फिर्यादीचे म्हणणे आहे. परंतु शिल्लक काय गोष्टी राहिल्या त्या " दत्तहोम वगैरे विधी आपल्या सवडीप्रमाणे आपण करावे " या वाक्याने जर स्पष्ट सांगितल्या आहेत तर दत्तविधानास अवश्य लागणाऱ्या त्यापूर्वीच्या सर्व गोष्टी औरंगाबादेस झाल्या व दत्तहोम मात्र दुसरे ठिकाणी सवडीप्रमाणे व्हावयाचा होता असे याच कागदावरून स्पष्ट होते. शास्त्री यांच्या सर्टिफिकिटासंबंधाने हीच गोष्ट लागू आहे. ताईमहाराजानी भाऊसाहेब देव यास जे पत्र लिहून दिले आहे त्यात ' दुसरा दत्तक घेणार नाही ' असे वाक्य आहे. पण या वाक्याचा अर्थ आरोपीविरुद्ध करता येत नाही. कारण त्याच्याबरोबरच ' जगन्नाथ यास औरस पुत्राचे सर्व हक्क प्राप्त झाले आहेत ' असे म्हटले आहे. शारीरिक दानप्रतिग्रह २७ किंवा २८ तारखेस झाले यासंबंधाने से. जज्जानी जी शंका घेतली आहे तिचाही येथे उल्लेख केला पाहिजे. आरोपी गुन्हेगार आहे असं प्रथमतः गृहित धरून ही शंका काढलेली आहे. पण अशा तऱ्हेने आरोपीचा गुन्हा

गृहीत धरून अनुमाने काढणे अगदी चुकीचे आहे आणि से. जज्ज हे अशा प्रकारच्या चुकीस पात्र झाले आहेत हे अगदी उघड आहे.

"आम्ही या खटल्याचा विचार तपासणीच्या रुपाने करीत असल्यामुळे तोंडी पुराव्याबद्दल से. जज्ज यांचे जे काही म्हणणे आहे त्याचा येथे जास्त विचार केला नाही. औरंगाबादेस मुलगा मांडीवर देणे से. जज्जास असंभवनीय कसे दिसले हे आम्हास समजत नाही. आरोपीच्या वजनामुळे ताईमहाराज यानी जर खुषीने दत्तकपत्रावर सही केली तर ताईमहाराजांच्या मांडीवर त्या म्हणतात त्याप्रमाणे त्यांचे इच्छेविरुद्ध मुलगा देण्यास तरी काय हरकत होती ? तपासणीच्या कामात पुराव्याचा विचार करण्याचाही विचार हायकोर्टास अधिकार आहे. पण या कामी से. जज्जानी ज्या गोष्टी पुराव्यावरून शाबीत धरल्या आहेत अथवा अमुक एक तोंडी पुरावा भरवशाचा व अमुक गैरभरवशाचा असा जो निकाल दिला आहे त्यात आम्ही हात घालीत नाही. तथापि आमचे असे मत आहे की आरोपीतर्फे ज्या साक्षी झाल्या त्याचा से. जज्जानी काहीच विचार केला नाही अशी तक्रार आरोपीने केल्यास ती गैरवाजवी होणार नाही. दस्तऐवजी पुराव्याचा नीट विचार किंवा अर्थ केलेला नाही व एकंदर खटला चालविण्याच्या कामी अथवा त्याचा निकाल करण्याच्या कामी जी तत्त्वे लाविली आहेत ती चुकीची आहेत एवढ्याच मुद्यावर या तपासणीच्या कामात आम्ही हात घातला आहे. आणि वर दिलेल्या कारणाकरिता या कामात आरोपीस निर्दोषी ठरवून त्यास झालेली शिक्षा आम्ही रद्द करतो व दंड वसूल केला असल्यास तो परत करावा असे फर्मावितो."

हायकोर्टाचा निकाल ताबडतोब तारेने सर्व हिंदुस्थानाला समजला. आणि मुंबई इलाख्यातूनच काय पण इतर प्रांतातूनहि टिळकाना अभिनंदनपर तारा व पत्रे शेकडो आली. पुण्यास ता. २२ मार्च १९०४ रोजी रे मार्केटच्या पटांगणात मोठी सभा भरविण्यात आली. सभेला सुमारे आठदहा हजार लोक आले होते. बाहेरगावाहूनहि अनेक अभिनंदनपर संदेश आले होते. सभेची जागा निशाणे पताका लावून शृंगारली होती. अध्यक्षस्थानी अण्णासाहेब पटवर्धन यांची निवडणूक करण्यात आल्यावर बार्शीचे वकील रामभाऊ साने यानी हायकोर्टाचे आभार मानण्याचा ठराव मांडला. त्यात टिळकांचे साह्यकर्ते दाजीसाहेब खरे व दादासाहेब करंदीकर वकील यांचेहि आभार मानण्यात आले होते. दाजीसाहेब खरे हे उत्तरादाखल म्हणाले 'टिळकांचा माझा लहानपणापासून परिचय असून त्यांची सत्यप्रियता मला प्रथमपासून माहित आहे.' करंदीकर म्हणाले की 'सत्याचा जय झाला म्हणण्यापेक्षा असत्याचा पराजय झाला इतकेच म्हणणे योग्य होईल.' टिळकानीहि उत्तरादाखल भाषण केले. त्यात ते म्हणाले 'मी विशेष धैर्य दाखविले असे म्हणण्यात अर्थ नाही. असा प्रसंग आला असता ज्याने असे धैर्य दाखविले नसते तो मनुष्य या संज्ञेला पात्र ठरला नसता. समाजात कोणाला अन्याय झाला असता सरकारची किंवा न्यायकोर्टाची वाट न पाहता लोकानी

आप्रण होऊन आपले खरे मत प्रगट करणे हेच त्याचे कर्तव्य होते. लोकमत माझ्या बाजूला आहे ही जाणीव मला होती म्हणूनच मी या संकटात टिकून राहिलो.

## (१०) न्यायमूर्ति चंदावरकर

पण दिवाणी प्रकरण अद्यापि चालावयाचेच होते. ता. २३ सप्टेंबर सन १९०१ रोजी टिळक व इतर ट्रस्टी यानी औरंगाबादचे दत्तविधान शाबीद करून घेण्याकरिता अव्वल दावा आणल्याचे पूर्वी सांगितलेच आहे. पण या मुकदम्यातील सर्व कागद प्रथम ॲस्टन साहेबांकडे मग मॅजिस्ट्रेट कोर्टात मग सेशन्स कोर्टात व मग हायकोर्टात गेल्यामुळे दिवाणी कोर्टाला काहीच करता आले नाही. हायकोर्टात टिळक सर्व फौजदारी आरोपातून ता. ३ मार्च १९०४ रोजी मुक्त झाल्यावर हे कागदपत्र खाली आले. दरम्यान ताईमहाराज निवर्तल्यामुळे त्यांच्या जागी त्यांची अविवाहित कन्या शांताबाई यांचे नाव दाखल करण्याचा अर्ज होऊन तो मंजूर झाला. जुलै महिन्यामध्ये कैफयिती पडून व मुद्दे निघून साक्षिदारांच्या यादी दाखल झाल्या. १९०५ सालच्या जून महिन्यात वादी या नात्याने टिळकांची साक्ष झाली. ती मधून मधून सुमारे चार महिने चालू होती. याहि वेळी टिळकांची उलट तपासणी कसून झाली. पण सर्व प्रतिकूल आक्षेप व कोट्या यापूर्वीच फौजदारी कज्ज्यात पुढे येऊन खर्ची पडून प्रतिपक्षाचे बुद्धिभांडवल संपले होते. त्यानंतर उभयपक्षी कमिशने निघून औरंगाबाद व उमरावती येथील साक्षी पुराव्यात दाखल करून घेण्यात आल्या. हे कमिशनांचे काम १९०४-०५ साली सुरू होते व शेवटी १९०६ साली जुलै महिन्याच्या ३१ व्या तारखेस पुणे फर्स्टक्लास कोर्टाने टिळकाना प्रत्येक मुद्यावर अनुकूल असाच निकाल दिला.

त्या सालच्या आक्टोबर महिन्यात या निकालावर प्रतिपक्षाकडून अपील दाखल झाले. पण त्याचा निकाल लागण्याला आणखी चार वर्षे लागली. हायकोर्टात या वेळी काम फार रेंगाळत चालू होते. पण याशिवाय आणखी एक कारण असे की सगळी कागदपत्रे छापविण्याला बराच वेळ लागला. शिवाय दरम्यान फिरून एकदा राजकारणाचे मांजर टिळकांच्या या दिवाणी मुकदम्याला आडवे गेले. कारण सन १९०८ साली टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला होऊन सहा वर्षे काळे-पाण्याची शिक्षा झाली. त्याना मंडाले येथे नेल्यावर सुमारे दीड दोन वर्षानंतर हाय-कोर्टात न्या. चंदावरकर व न्या. हीटन यांच्यापुढे बाळमहाराजांचे अपील सुनावणीला निघून उभयता न्यायमूर्तींनी टिळकांच्या विरुद्ध निकाल दिला. अपीलाच्या सुनावणी-च्या वेळी टिळकांतर्फे दाजीसाहेब खरे व दादासाहेब करंदीकर हे काम चालवीत होते. आणि काम चालविण्यास त्यांजकडून काहीच कसूर झाली नाही. तथापि न्यायमूर्तींनी वेगळी दृष्टि चालवून औरंगाबादचे दत्तविधान नाशाबित ठरविले. पूर्वी टिळकांवरील फौजदारी खटल्याच्या आधी चार वर्षे टिळकाना राजद्रोहाची शिक्षा झाली होती, तशीच हायकोर्टाच्या या निकालाआधी दोन वर्षे फिरून त्याना राजद्रो-

ह्याची शिक्षा झाली होती हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. उभयता न्यायमूर्तींनी फिरून टिळकांचा पुरावा अविश्वसनीय ठरविला. स्वतः त्यांची साक्ष खरी मानली नाही आणि दस्तऐवजाचा अर्थ विपरीत केला. पण मन प्रतिकूल असले ह्मणजे सर्वच गोष्टी प्रतिकूल दिसू लागतात त्यातलाच हा प्रकार होय. टिळक व चंदावरकर यांचे पूर्वी केव्हाहि बनले नाही. उभयतांच्या मनात एकमेकाविषयी अत्यंत अनादर. आपल्या वर्तमानपत्रातून टिळकानी त्यांच्यावर सडकून टीका केलेली. तेव्हा सर चंदावरकरानी देखील कलुषित दृष्टीनेच या अपीलात टिळकांकडे व त्यांच्या कृत्याकडे पाहिले असल्यास काय नवल ? चंदावरकरानी खालील कोर्टाचा निकाल तर फिरविलाच पण तसे करण्याला समर्थनपर कारण ह्मणून देताना टिळकांवर अप्रामाणिकपणाचा आरोप लादला ! या आरोपात द्रव्यलोभाचा संबंध येण्याला वावच नव्हता ह्मणून त्यानी असे लिहिले की, 'अप्रामाणिकपणा हा अनेक प्रकारचा असू शकतो त्यात पैशाचा संबंध असलाच पाहिजे असे नाही. द्रव्यलोभाप्रमाणे अधिकारलोभानेहि मनुष्य अप्रामाणिक वर्तन करू शकेल. पण अधिकाराच्या जागी मनुष्य असला म्हणजे अर्थात् तो बोलेल तेच खरे'. फरक इतकाच की टिळकांच्या हेतूबद्दल असा संशय चंदावरकरानी घेतला त्याबद्दल त्याना उघडपणे नावे ठेवण्याची कोणाला सोय नव्हती. आणि एखाद्याने जर असे ह्मटले असते की अधिकारलोभाने जसे टिळकानी हे दत्तविधानाचे खोटे काम केले त्याचप्रमाणे मुख्य न्यायाधीशाची जागा मिळण्याविषयीच्या अधिकारलोभाने सरकारचे वैरी जे टिळक त्यांच्या विरुद्ध चंदावरकरानी हा खोटा निकाल दिला तर ते म्हणणाऱ्याला कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल शिक्षा झाली असती. पण जगात उलटेपालटे थोडेना थोडे आणि कोठेना कोठे तरी होतच असते ह्मणून काही बरे. हायकोर्टात असा निकाल लागला आणि टिळक तर तुरुंगात. असे पाहून प्रतिपक्षाला आपण आता जिंकले असे सहजच वाटले असावे. पण ' अरक्षितं दैवबलेनं रक्षति ' या वचनाप्रमाणे टिळकांचे अपील प्रिव्हि कौन्सिलपुढे वेळेवर गुदरले गेले, इतकेच नव्हे तर त्यांच्या पश्चात् तेथील खर्चाची वगैरे सर्व तजवीज होऊन अखेर टिळकांसारखाच निकाल प्रिव्ही कौन्सिलने दिला.

## ( ११ ) प्रिव्ही कौन्सिलचा निकाल

तुरुंगात असताहि टिळकानी अपिलाची सुनावणी आपल्या तर्फे योग्य व्हावी म्हणून काय काय प्रयत्न केले हे मंडाले येथील त्यांच्या तुरुंगवासासंबंधी जी हकिकत पुढे आम्ही देणार आहोत त्यावरून दिसून येईलच. पण या प्रकरणाची पुढची थोडी हकिकतहि याच ठिकाणी दिली असता हे प्रकरण वाचकाना संगतवार समजेल म्हणून तीहि येथे आगाऊच देतो. टिळकातर्फेचे अपील मि. गार्थ यानी दाखल केले. त्यांत खालील निकालाविरुद्ध मुख्य कारणे दाखविली होती ती अशी. स्वतः ताईमहाराजांच्या कैफियतीत जुलमाचा जो मुख्य मुद्दा ज्या रीतीने

मांडला नव्हता तो निराळ्या एका रीतीने मांडण्याला हायकोर्टात परवानगी देण्यात आली हे गैरवाजवी होय. होमहवन झाले नसले तरी प्रत्यक्ष झालेले दत्तविधान फिरू शकत नाही ही गोष्ट विचारात घेतली नाही. तसेच बाबामहाराजांच्या मृत्यु-पत्राचा अर्थ चुकीचा केला. टिळक वगैरे ट्रस्टींनी ताईमहाराजाना त्यांच्या हक्काची योग्य समजूत दिली नाही असा जो आरोप ट्रस्टीवर केला तो निराधार आहे.

हायकोर्टाच्या निकालाची प्रत टिळकांकडे मंडाले येथे पाठविण्यात आली तेव्हा त्यानी त्या निकालावर सुमारे पंचवीस बंद भरतील एवढी सविस्तर टीका लिहून आपल्या सॉलिसिटर लोकाकडे जेलर मार्फत पाठविली. ती वाचली आणि अखेर प्रिव्ही कौन्सिलचा निकाल वाचला म्हणजे उभयतातील विचारसाम्य पाहून कौतुक वाटते. प्रिव्ही कौन्सिलच्या निकालात प्रथम कज्ज्याची हकिकत दिली आहे. नंतर प्रिव्ही कौन्सिलचे न्यायमूर्ति म्हणतात “ पुराव्यांचा विचार करता पुणे कोर्टाने काढलेल्या खेरीज दुसरे कोणतेहि अनुमान त्यावरून निघणे शक्य नाही. प्रत्यक्ष दत्तविधा-नाचा भरपूर पुरावा झाला आहे. दत्तविधान म्हणजे मुलगा मांडीवर देणे ही गोष्ट सर्व हिंदु लोकाना माहीत असते. टिळकानी पत्रिका पाहणे सभा भरविणे दस्तऐवज करणे या सर्व गोष्टी करून फक्त मुलगा तेवढा मांडीवर देण्याचे शिल्लक ठेवले या-गोष्टीवर विश्वास ठेवणे शक्य नाही. टिळकानी पुण्यास येताच ट्रस्टींना हकिकत कळविली त्यात दत्तविधान पुरे करून आलो असे म्हटले आहे. क्वचित कोठे एखादा शब्द संदिग्ध पडला असेल. पण तोंडी पुराव्याने त्याचा उलगडा होतो. दत्तविधान करण्यापलीकडे दत्तविधानात ट्रस्टींचा दुसरा काही एक हेतू नव्हता. तोंडी पुरावा बेभरंवशीक आहे असा चंदावरकरानी निकाल दिला ती चूक आहे. टिळकांवर व त्यांच्या साक्षीदारांवर कट करण्याच्या गुन्ह्याचा आरोप पर्यायाने चंदावरकरानी आणला आहे पण तो भयंकर असून खोटा आहे. हायकोर्टाच्या अनुमानास काही इतकाहि आधार नाही. फौजदारी खटल्यातील जबान्या हाय-कोर्टाने या दिवाणी खटल्यात ग्राह्य धरल्या ही गोष्ट फार वाईट केली. एकंदर दस्तऐवज पाहता त्यांचा व तोंडी पुराव्याचा पूर्ण मेळ आहे. खुलासा न करून घेतलेल्या कागदपत्रांचा उपयोग हायकोर्टाने केला ही चूक होय. पुराव्याच्या काय-द्यातील कलम १४५ हे हायकोर्टाने पाळले नाही हे पाहून आह्माला खेद होतो. दत्तक घेतलेला मुलगा सगोत्र असल्यामुळे दत्तकहोमाची अवश्यकता नव्हती. टिळकानी लबाडी केली जबरी केली व आपल्या वजनाचा दुरुपयोग केला असे हायकोर्टाने म्हटले आहे पण कसे ते सिद्ध केले नाही. मृत्युपत्रात लिहिल्याप्रमाणेच सर्व व्यवस्था टिळकानी केली. जबरी केल्याचा पुरावा नाही. न्या. चंदावरकर विद्वान असतील पण त्यानी ट्रस्टीवर जो आरोप केला तो सर्वस्वी अयोग्य आहे. बाई अल्पवयी होती व ट्रस्टी वजनदार होते येवढ्याच गोष्टीने ट्रस्टीने वजनाचा दुरुपयोग केला हे ठरत नाही. मनुष्याचा लौकिक आणि उच्च दर्जा हेच त्याच्या विरुद्ध संशय घेण्याला कारण मानावे हे योग्य नाही. तसे झाले तर लौकिकवान

होणे हा दुर्गुण मानावा लागेल! लौकिक लाभणे ही आपत्ति समजावी लागेल! बाईला ट्रस्टींनी तिचे हक्क समजावून सांगितले नाहीत या म्हणण्यात काही अर्थ नाही. ते हक्क समजावून सांगणे म्हणजे असे का की 'बाई तुमचा मुलगा मेल्याने तुम्ही अनायासे इस्टेटीच्या वारसदार व मालकीण झाला आहात. तरी आता दत्तविधानाच्या भानगडीत न पडणे हे तुमच्या हिताचे आहे. तुम्ही दत्तक न घेतल्याने तुमच्या नवऱ्याच्या श्राद्धादिक क्रिया होणार नाहीत. तरी काय हरकत? तुम्हाला तर जन्मभर इस्टेटींचा उपभोग स्वतंत्रपणे घेता येईल ना!' असा सल्ला जर बाईला कोणी दिला असता तर हिंदु समाजाच्या दृष्टीने तो निव्वळ पाजीपणाचा ठरला असता. बाईने पूर्वी ट्रस्टीविरुद्ध कधीहि तक्रार केली नव्हती व दत्तक घ्यावा हे तिच्याहि मनात होते हे उघड दिसते. मग तिचे हक्क तिला समजावून सांगितले नाहीत या म्हणण्यात काय अर्थ?"

प्रिव्ही कौन्सिलची टीका इतकी समर्पक आहे की तिने खोडण्याचा असा एकहि मुद्दा शिल्लक ठेवला नाही. फौजदारी खटल्यातील जेन्किन्स व बॅटी यानी दिलेला अखेरचा निर्णय आणि प्रिव्ही कौन्सिलने दिलेला दिवाणी कज्जातील हा अखेरचा निर्णय हे एकत्र घेऊन वाचले म्हणजे या दत्तक प्रकरणात टिळकांची खरी बाजू काय होती हे कोणासहि कळून येईल. आणि वर एके ठिकाणी त्या वेळच्या लोकांच्या ज्या अनेक शंकाकुशंका टिळकांविरुद्ध असलेल्या मांडून दाखविल्या आहेत त्यांतील प्रत्येकीला या निकालात एकवट उत्तर मिळेल.

टिळकांच्या सुटकेनंतर सरकारने त्यांच्यावर जे काहूर माजविले होते त्याला या निकालाने उधळून लावले. हा निकाल उलट झाला असता तर टिळकांवरील नैतिक अपराधाचे आरोप सिद्ध व दृढ झाले असते. आणि १९०३ ची स्थिति उलट दुप्पट जोराने फिरून प्राप्त झाली असती. राजद्रोहाच्या दोन खटल्यात शिक्षा भोगल्यामुळे टिळकाना लोकांची जी सहानुभूति लाभली होती ती दत्तक-प्रकरणातील अखेरच्या प्रतिकूल निकालाने सर्वस्वी नष्ट झाली असती. टिळकाना सहानुभूति होती ती राजद्रोहाचे खटले होण्यासारखे लेख त्यानी लिहिले येवढ्याकरिता नव्हती. त्यांची विद्वत्ता त्यांचा सच्चेपणा त्यांचा स्वार्थत्याग व इतर अनेक नैतिक गुण यांच्यामुळेच होती. अमुक लेख लिहिल्याबद्दल टिळकांवर राजद्रोहाचे खटले झाले अशा अर्थाची लोकांची हळहळ नव्हती. पण येवढ्या मोठ्या माणसाला राजकीय गुन्ह्याबद्दल अशी शिक्षा सोसावी लागावी ना! त्यांचा असा छळ व्हावा ना! त्याना बंदिवासाचे असे दुःख भोगावे लागावे ना! अशा अर्थाचीच ती हळहळ होती. पण टिळकानी खोटी साक्ष दिली हिशेब व कागदपत्र बनावट केले व एका अज्ञान विधवेवर दत्तविधानाचा जुलूम केला या गोष्टी जर वरिष्ठ कोर्टात सिद्ध मानल्या गेल्या असत्या तर टिळकांचा मोठेपणा तो काय शिल्लक राहिला असता! आणि त्यांच्याकरिता सहानुभूतीने कोण हळहळणार होते! केसरीने म्हटल्याप्रमाणे "कायदा न्याय व नीति या तिहींच्या विरुद्ध वर्तन केल्याच्या दोषारोपांच्या धुळीची जी वावटळ टिळकां-

च्या प्रतिपक्षानी त्याजवर उठविली तिजपैकी एकहि कण त्यांच्या अंगाला अखेर चिकटला नाही. किंबहुना ' प्रतिपक्षाच्या अंगावर पुष्कळसा चिखल फेकावा म्हणजे त्यातला एखादा कण तरी अंगावर राहतोच ' या इंग्रजी भाषेतील दुर्जननीति-वचनाला टिळकानी मूर्तिमंत अपवादच उत्पन्न केला असे म्हणण्यास हरकत नाही. हे सर्व होण्याला टिळकाना १४ वर्षे रात्रंदिवस काळजीत काढावी लागली व व ४०–५० हजार रुपये पदरचे खर्चावे लागले. याचा जाब या लोकी व परलोकी कोण देईल तो देवो ! पण तूर्त तरी शत्रूचे शासन कसे होईल या विचारापेक्षा आपला शब्द अखेर खरा ठरला व यश मलीन होणार होते ते वाचले येवढाच विचार त्यांचे सर्व श्रम परिहार करण्यास पुरेसा आहे. म्हणून हा दिवस आणून दिल्याबद्दल अमूर्त ब्रिटिश न्यायनीति व तिला स्फूर्ति करणारा अमूर्त परमेश्वर यांचे कृतज्ञता-बुद्धीने आभार मानण्याच्या कामी टिळकाना त्यांच्या हजारो हितचिंतकांचीहि जोड मिळणार होती. " तात्पर्य १९०३ साली क्लेमंट्स् साहेबांच्या निकालाच्या वेळी टिळकाना सर्व आयुष्यातील कठिणातील कठिण काळ गेला असे म्हटले तर १९१५ साली प्रिव्ही कौन्सिलच्या या निकालाने त्याना आयुष्यातील सर्वांत अधिक आनंदाचा काळ दाखविला असेच म्हणावे लागेल. इतर आनंद व इतर दुःखे त्यांच्या खिसगणतीत नव्हती. स्वत:चा मुलगा किंवा कुटुंब मेल्यामुळे त्यांच्या डोळ्याला पाणी आले नाही किंवा राजद्रोहाच्या खटल्यात शिक्षा सांगितल्या वेळी त्यांचा चेहेरा उतरला नाही. याच्या उलट स्वतःला राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडल्याचे ऐकून त्यांच्या तोंडाची कळी विशेष उमलली असेहि झाले नाही. पण आपली खरी अब्रू किंवा बेअब्रू काय ती या ताईमहाराज प्रकरणातील निकालावर अवलंबून आहे असे त्यांच्या मनाने सहजच घेतले होते. घाटात जशी आगगाडी मोठ्या कष्टाने चढ उतार करीत असते तसा सुखदुःखाचा व अब्रूबेअब्रूचा चढउतार त्यानी बारा वर्षे सोसला होता. आणि शेवटी शेवटी तर तुरुंगवास आणि त्यातच त्यांच्या कानी पडलेला दत्तकप्रकरणातील हीटन–चंदावरकर यांचा निकाल हे लक्षात घेतले असता ह्या शेवटच्या चढाचा टप्पा त्याना फारच कष्टप्रद झाला असला पाहिजे. पण घाट चढताना शेवटच्या बोगद्यातून गाडी बाहेर पडली हे ज्ञान प्रवाशाला झाले असता जो विरामाचा आनंद त्याला होतो, आणि आता यापुढे सरळ मार्ग लागला आता गाडी भरधाव चालेल या आश्वासनाने त्याचे मन जसे सुप्रसन्न होते, तसेच टिळकांचेहि मन प्रिव्ही कौन्सिलच्या या निकालाने झाले असले पाहिजे. आणि यानंतरच्या पाच वर्षांतील ज्या हकीकती आम्ही पुढे यथाक्रम देणार आहोत त्या वाचल्या असता आम्ही जे वरील विधान केले त्याची सत्यता वाचकाना सहजच पटेल.

## (१२) मुंबई सरकारचा उपद्व्याप

प्रिव्ही कौन्सिलने औरंगाबादचे दत्तविधान खरे ठरविले यामुळे बाळामहाराजांच्या दत्तविधानाचा आपोआपच निकाल लागला. तरी पण मुंबई सरकारने

या निकालाविषयी जितक्या प्रकारानी नाराजी व अमान्यता दाखविता येईल तितक्या प्रकारानी ती दाखविण्यास कमी केले नाही. प्रिव्ही कौन्सिलचा निकाल लागला होता, जगन्नाथमहाराज हे सज्ञान झाले होते, ताईमहाराज निवर्तल्या होत्या, शांताक्काचा इस्टेटीवर काही हक्क उरला नव्हता, अशा स्थितीत ट्रस्टींची इस्टेट कोर्ट ऑफ वार्डच्या ताब्यात होती ती त्यानी ताबडतोब निर्वेध परत द्यावी. पण त्यानी तसे केले नाही. आपला हात काढून घेण्यात फार खळखळ केली. शेवटी इलाज नाही, आणखी त्रास दिला तर कोर्ट ऑफ वार्डसवर दावा लावण्याला टिळक कमी करणार नाहीत, असे सरकारने पाहिले तेव्हाच त्यानी इस्टेटीवरील आपले पाश काढून घेतले व जगन्नाथमहाराज यांचे नाव चोहीकडे दाखल केले. बाबामहाराजांचे उत्पन्न बहुतेक खाजगी इनामी होते. त्यात वतन सरंजाम असला काही एक संबंध नव्हता. तसे असते तर प्रिव्ही कौन्सिलचा निकाल धाब्यावर बसवून मुंबई सरकारने ते उत्पन्न बाळामहाराजाना दिले असते किंवा खालसा केले असते आणि आपल्या फजितीचा सूड घेण्याकरिता ते जगन्नाथमहाराजाना लाभू दिले नसते. पण वतनासरंजामाचा काही संबंध नसल्यामुळे त्यांचा काही इलाज चालेना. पण इतर कामात म्हणजे जेथे करणे न करणे त्यांच्या इच्छेवर अवलंबून होते तेथे त्यानी करिता येईल तितकी कुचराई केलीच. उदाहरणार्थ बाबामहाराज हे जसे मोठे इनामदार होते तसेच त्यांचे नाव पहिल्या प्रतीचे सरदार म्हणून नोंदलेले होते. अर्थात् प्रिव्ही कौन्सिलच्या निकालामुळे जगन्नाथमहाराजाना जसे सर्व इनामी उत्पन्न परत मिळाले त्याप्रमाणे त्यांची वडिलार्जित सरदारीहि त्याना ताबडतोब मिळावयास पाहिजे होती. पण सरकारने या कामी बारा वर्षे घोळ घातला. आणि हल्ली त्याना सरदारी मिळाली आहे तरी ती वडिलार्जित न म्हणता स्वार्जित असे म्हणता येण्याइतका मोठा खंड मध्ये पडला होता. १९१५ पासून १९२० पर्यंत टिळक जिवंत असल्यामुळे प्रत्यक्ष त्यांच्याशी जगन्नाथमहाराजांचा निकट संबंध, यामुळे जगन्नाथमहाराजाना सरदारी मिळाली नाही. टिळकांचा मानसपुत्र त्यांच्या कृपेचा आश्रित त्यांच्या सल्लामसलतीने चालणारा मुलगा त्याला सरदार करून सरदारांच्या पटाला राजद्रोहाचा संपर्क कसा घडवावा! पुढे १९२० साली टिळक निवर्तले. मग तर टिळकांचा व जगन्नाथमहाराजांचा संबंध नव्हता ना ? पण पुढे सरकार त्याना म्हणू लागले की टिळकांचा तुमचा संबंध तुटला तरी टिळकांचे अनुयायी व ऋणानुबंधी लोक यांच्याशी तुमचा संबंध आहेच. सबंध सात वर्षांच्या अनुभवाने सरकारने पाहिले की जगन्नाथमहाराज हे केवळ सरदारी मिळण्याकरिता आपल्या कृतज्ञतेला हरताळ फासण्याला तयार नाहीत. आणि सरकाराला खुष करण्याकरिता म्हणून स्नेहार्जित ऋणानुबंध तोडण्याला ते तयार नाहीत. पण दुसरे पक्षी त्यांचे वर्तन साधे सरळ आहे ते सामान्यतः लोकोपयोगी अशाच कामात पडणारे गृहस्थ आहेत इतर उपद्व्याप करीत नाहीत असे सरकारने पाहिले तेव्हाच गेल्या वर्षी त्यांचे नाव सरकारने त्यांच्या वडिलांच्या जागी घातले.

सन १९०३ च्या सप्टेंबरांत ताईमहाराज वारल्या तेव्हा ट्रस्टीनी डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे अर्ज केला की हल्ली दत्तकाचा वाद चालू आहे तरी या वादग्रस्त स्थितीत इस्टेटीची धूळधाण न व्हावी म्हणून ती सरकारने कोर्ट ऑफ वार्डस्च्या ताब्यात द्यावी. डिस्ट्रिक्ट जज मि. ल्यूकस यानी हे म्हणणे मान्य करून १८२७ च्या ८ व्या रेग्युलेशनप्रमाणे इस्टेट कोर्टाकडे घेऊन कोर्टाचे नाझर याना वहिवाटदार नेमले. ताईमहाराज यानी बाळामहाराज हाच आपला खरा दत्तक मुलगा असे म्हणून त्याजकडे पुण्यातील राहण्याचा वाडा व अंगावर घालण्याचे काही दागिने दिले होते. ही दोन प्रकारची मिळकत माल बाळामहाराजांकडे राहिली; पण त्यातील काही दागिन्यापुरता त्यांजकडून जामीन घेण्यात आला होता. पुढे १९०८ साली नवीन कोर्ट आफ वार्ड्स् अॅक्टाप्रमाणे पुणे कलेक्टर यानी दाव्यातील इस्टेट डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून आपल्याकडे वहिवाटिला घेतली. वास्तविक कोर्ट ऑफ वार्ड्स् हे मिळकतीचे राखणदार व निःपक्षपाती असावयास पाहिजे. पण या कामात टिळकांचा संबंध पोचतो म्हणून कलेक्टरने नागमोडी धोरण स्वीकारले. इस्टेट मूळ बाळामहाराजांची व दत्तकाचा निकाल लागलेला नव्हता. अर्थात् मूळ बाळामहाराजांची इस्टेट असे नाव दाखल करूनच ती ताब्यात घ्यावयास पाहिजे होती. पण प्रथम ताईमहाराजांचे नाव कागदोपत्री लाविले व त्याला टिळकांच्या वकिलाने हरकत घेतल्यावर ताईमहाराजांच्या नावाचे ठिकाणी बाळामहाराजांचे नाव दाखल करून जावईशोध घातला! या वेळी मुंबई हायकोर्टाचा निकाल टिळकांविरुद्ध झाला होता हे खरे पण त्यावर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील झाले होते हेहि तितकेच खरे होते. फर्स्ट क्लास कोर्टाचा निकाल टिळकांतर्फे झाला तरी जगन्नाथमहाराजांचे नाव दाखल केले गेले नाही, आणि हायकोर्टाचा निकाल टिळकांविरुद्ध झाला तेव्हा मात्र बाळामहाराजांचे नाव दाखल केले! वास्तविक सरकारला यात एक पैचाहि फायदा नव्हता. पण सरकारने श्रीमंताच्या घरच्या कोठवळ्याप्रमाणे किंवा गंजीवरील कुत्र्याप्रमाणे जगन्नाथमहाराजाशी वर्तन केले. बरे प्रिव्ही कौन्सिलचा निकाल लागल्यावर तरी तावडतोब उत्पन्नाला जगन्नाथमहाराजांचे नाव लावून त्यांच्या ताब्यात इस्टेट करावी. पण तेहि घडेना. शेवटी वकिलामार्फत सरकारला नोटीस देऊन टिळकाना दिवाणी दाव्याची धमकी घालावी लागली. तेव्हा कोठे सरकार जागे झाले. कोर्ट ऑफ वार्ड्स्चे खरे काम म्हणजे कर्जाचा पुसतपास करून ते फेडण्याची व्यवस्था लावावयाची. पण १९०७ सालापासून सावकारांचे हुकुमनामे कोर्ट ऑफ वार्डवर बजावले गेले तरी इस्टेटीच्या शिलकेतून त्यानी कर्जे फेडले नाही. भारी व्याजाची सावकारी कर्जे शिलक राहिली आणि इकडे इस्टेटीची रोकड मात्र कमी व्याजाच्या सरकारी कर्जरोख्यात गुंतून राहिली. या शिलकेतून प्रिव्ही कौन्सिलचे अपील चालविण्याकरिता कोर्ट ऑफ वार्ड्स्ने बाळामहाराजाना पंधरा हजार रुपये दिले आणि टिळक तुरुंगात असता प्रिव्ही कौन्सिलातील अपीलाचा सर्व खर्च त्याना पदरचा करावा लागला!

येवढेच नव्हे तर काही हुकुमनामे ट्रस्टीवर जातीने बजावण्याकरिता सरकारने काढले. तेव्हा वाडा जप्तीत जाऊ नये म्हणून पदरच्या पैशाने केसरीच्या व्यवस्थापकाना काही हुकुमनामे भागवावे लागले. यापैकी एक हुकुमनामा ठाणे येथील एका सावकाराला बेचन देऊन त्याजकडून दरखास्त देऊन गायकवाडवाडा व केसरी कचेरी यांच्यावर जप्ती आणण्याचा प्रयत्न एका दुष्ट संस्थानिकाने चालविला होता. टिळक मंडाले येथे तुरुंगात. अशा स्थितीत त्यांचा वाडा जप्तीत निघालेला पाहण्याची अनिवार इच्छा त्याला झाली होती! पण केसरीच्या व्यवस्थापकानी देणे भागविल्यामुळे ती आपत्ति टळली. या एका गोष्टीवरून राजकीय बाबतीत टिळकाविरुद्ध असलेला द्वेष खाजगी न्याय मनसुब्याच्या कामातहि कसा घुसडला गेला हे उघड दिसून येईल.

## (१३) कोल्हापूर सरकारची साथीदारी

पण सरकारच्या सुडाचे सल अजूनहि थोडे शिल्लक आहे. कारण बाबामहाराज यांचे उत्पन्न दोन हिस्से खालसा मुलखात व एक हिस्सा कोल्हापूर मुलखात आहे. पैकी दत्तकाचे दावे चालू असताच ट्रस्टींच्या हरकतीला न जुमानता खालसातील उत्पन्नाला सरकाराने वारस म्हणून ताईमहाराजांचे नाव लावले. त्याचप्रमाणे कोल्हापूरच्या मुलखातील उत्पन्नाला प्रत्यक्ष बाळामहाराजांचे नाव जरी लावले नाही तरी उत्पन्न जप्तीत ठेवून त्यातील पैसे बाळामहाराजाना खर्चाला देण्यात येत होते. प्रिव्ही कौन्सिलचा निकाल झाल्यावर जगन्नाथमहाराजांचे नाव इकडे दाखल झाले. तरी कोल्हापूर दरबाराने प्रिव्ही कौन्सिलचा निकाल मुळीच मान्य केला नाही. कोल्हापूर दरबारचा बहाणा असा की जगन्नाथमहाराजांच्या दत्तविधानाला दरबाराने परवानगी दिली नव्हती. उलट बाळामहाराजांच्या दत्तविधानाला ती देण्यात आली होती. आणि दरबारची ही परवानगी उत्पन्न चालविण्याला अवश्य असल्यामुळे जगन्नाथमहाराज दत्तक ठरले तरी ते खालसा मुलखापुरतेच होत. कोल्हापूरच्या राज्यात बाळामहाराज हेच खरे दत्तक आहेत. पण कोल्हापूर दरबार येवढ्यावरच थांबले नाही. आपल्या राज्यातील उत्पन्न तर त्यानी सोडलेच नाही पण खालसातील उत्पन्नालाहि बाध आणण्याचा प्रयत्न केला. तो असा. १८७६ चा एक कायदा बॉंबे रेव्हेन्यू ज्यूरिस्डिक्शन ॲक्ट नावाचा आहे. त्या कायद्यान्वये कोणासहि हायकोर्टाकडे असा अर्ज करता येतो की, इनामी म्हणून एखादे उत्पन्न सरकारदप्तरी दाखल झाले असले तरी जर त्याची मूळ सनद सदोष व निराधार असेल तर ते इनाम रद्द करावे व ते उत्पन्न ज्याने मूळ आपल्यातून तोडून दिले असेल त्याला ते परत मिळावे. या कायद्याचा आधार घेऊन कोल्हापूरचे महाराज व बाळामहाराज यानी स्टेट सेक्रेटरीकडे अर्ज करून असे मागणे केले की खालसा मुलुखात महाराज घराण्याचे जे उत्पन्न आहे ती मूळ कोल्हापूर दरबारची देणगी होय. ही देणगी दरबाराला यापुढे चालू ठेवावयाची नाही. तर ते उत्पन्न

आपल्याकडे घेऊन ते वाटेल तसे इतर भाऊबंदाना वाटून देण्याचा अधिकार दरबाराला आहे. पण खालसातील इनामी उत्पन्नाला खुद्द ब्रिटिश सरकारानेच पूर्ण चौकशीअंती स्वतःच्या नव्या सनदा दिल्या होत्या त्याची वाट काय ? त्यावर दरबारचे म्हणणे असे की या सनदा विनअधिकाराने दिल्या गेल्या. सबब याची पूर्ण चौकशी होऊन खालसातील उत्पन्न आमच्याकडे परत यावे. त्याची व्यवस्था किंवा वाटणी दरबार वाटेल तशी करील. पण याच्या उलट अशी गोष्ट होती की खालसा हद्दीतील उत्पन्न सनदेने दिलेले महाराजघराण्याकडे चालविले जाईल. आणि कोल्हापूर दरबार जर या उत्पन्नाच्या भोगवट्याला हरकत करील तर ती हरकत दूर करण्याची जबाबदारी इंग्रज सरकारावर आहे, अशी गॅरंटी किंवा जामिनकी १९ व्या शतकाच्या प्रारंभी इकडे अंमल झाला तेव्हा महाराजघराण्यातील तेव्हाचे कर्ते पुरुष व इंग्रज सरकारचे दोस्त श्री. भाऊमहाराज याना दिली होती ! कोल्हापूर दरबारच्या झालेल्या तहात ती गॅरंटी नमूद आहे. अर्थात् स्टेट सेक्रेटरीना आपल्यावरची ही जबाबदारी ओळखून दरबारचा वरील अर्ज हातात धरणेहि अयोग्य होते. व त्यानी नकार दिला असता तर मुंबई हायकोर्टाकडे तपासणी अर्ज करण्याला कोल्हापूर दरबाराला काहीच आधार राहिला नसता. पण टिळकांसंबंधाने सरकारच्या मनात असलेली पोटदुखी अजून महाराजघराण्याला बाधत होती. टिळक हे जसे सरकारचे वैरी तसे कोल्हापूरचे महाराज हे सरकारचे अत्यंत मोठे स्नेही व ऋणानुबंधी. म्हणून कोल्हापूरदरबारला तर मदत करावी पण जगात आपले मात्र हसे न व्हावे असला एक मधला मार्ग स्टेट सेक्रेटरीनी उचलला. तो असा की मुंबई हायकोर्टाने या कामी तपासणी करावी असा नुसता अर्ज करण्यापुरते स्टेट सेक्रेटरी दाव्यात सामील झाले. आपण कोणत्याच पक्षाचे समर्थन करीत नाही किंवा कोणत्याच पक्षाला विरोध करीत नाही. फक्त दरबाराला योग्य तो न्याय मिळावा येवढ्याकरिताच आम्ही समाईक पक्षकार होत आहोत अशी कैफियत सरकाराने हायकोर्टापुढे मांडली. स्वतःचा अभिनिवेश व पक्षपात दाखवावा तर आपल्याच प्रिव्ही कौन्सिलच्या निकालाला आपण अमान्यता दर्शवितो असा आरोप सरळ येण्यासारखा होता. व यात प्रिव्ही कौन्सिलची व मुंबई सरकारचीहि बेअब्रू होती म्हणून सरकाराने वरकरणी ही तटस्थ वृत्ति ठेवली. पण आतून इच्छा कोल्हापूरदरबारचा पाठपुरावा करण्याचीच असल्यामुळे हा इनामी खटला सजविण्याला जितकी काही अंतस्थ मदत करता येईल तितकी सरकाराने कोल्हापूरदरबाराला केली. परंतु येथेहि त्याना व मुंबई सरकाराला अपयश आले.

## (१४) साक्षीपुराव्यातील काही गोष्टी

नागपूरकर यांच्या उलटतपासणीत त्यानी फार महत्त्वाच्या गोष्टी कबूल केल्या. त्यातील काही खाली दिल्या आहेत. १८९८ साली मी खापर्डे याना पत्र लिहिले त्यात हेच सुचविले होते की मुलगा पसंत करून लागलाच दत्तक

घ्यावा व काही दिवसांनी बातमी बाहेर फोडावी. त्या वेळी टिळक म्हणत होते मुलगा पसंत करून जवळ ठेवावा व नंतर काही दिवसानी त्याला दत्तक घ्यावा. ही दोन्ही धोरणे पुढे बरोबर उलट झाली. १९०१ साली टिळकाना कळून आले की नागपूरकराचा १८९८ सालचा सल्ला शहाणपणाचा होता. कारण मुलगा पसंत करून ताबडतोब दत्तक घेतला म्हणजे कारस्थानाला व बुद्धिभेदाला जागा उरत नाही. अशा रीतीने गुरुची विद्या गुरुला फळली. कारण औरंगाबादेस जाण्यापूर्वी जे ठराव ट्रस्टींनी केले त्यात या गुरुपदेशाला उद्देशूनच दत्तकाचे सर्व काम उरकून घेणे असे मोघम शब्द घातले होते. कारण मुलगा मांडीवर देऊन दत्तविधान करून घ्यावे असे उघड शब्द घातले असते म्हणजे कारस्थानाना तेथेच प्रारंभ झाला असता. नागपूरकरानी पुढे आणखी कबूल केले की १८९८ साली मी जे कुंभोजकराना पत्र लिहिले होते त्यात असे लिहिले होते की दत्तक मुलगा घ्यावयाचा तो मुंजीपासून पुढे सर्व सोहाळे ज्याचे होतील असा लहान असावा असा स्वतः ताईमहाराजांचा अभिप्राय होता. औरंगाबाद येथील ६ वर्षांचा मुलगा पसंत करण्यात टिळकानी ताईमहाराजांचीच इच्छा सफल केली नाही काय ? नागपूरकरानी पुढे आणखी अशी कबूली दिली की त्याच पत्रात मी कुंभोजकराना लिहिले की श्रींचा म्हणजे कोल्हापूरचे घराण्यातील मुलगा दत्तक घेण्याचा श्रींचा मुळी बिलकूल इष्ट नाही. आणि टिळक तरी दुसरे काय म्हणत होते ! टिळक व ताईमहाराज या दोघांचे एकच विचार या बाबतीत होते. नंतर बाई बदलल्या ही गोष्ट वेगळी ! पण ज्या कारणाकरिता बाई देखील त्या वेळी कोल्हापूरचा मुलगा दत्तक घेऊ नये असे म्हणत होत्या ती कारणे मात्र काही बदलली नव्हती. कोल्हापूरच्या घराण्यात भाग्यवान् मुलगा नाही असे नागपूरकरानी १८९८–९९ साली निश्चित झाल्याचे कबूल केले. पण मग जे भाग्य तेव्हा नव्हते ते आता कोठून उमटले ? अर्थात् ते भाग्य कोल्हापूरच्या मुलाचे नसून नागपूरकराचे खरे ! पण प्रिव्ही कौन्सिलच्या निकालाने निदान बाबामहाराजांच्या इस्टेटीपुरते तरी अखेर हेच ठरले की कोल्हापूरच्या मुलाला हे दत्तविधान लाभत नाही ! नागपूरकरानी आणखी असे कबूल केले की कोल्हापुरास दत्तक घेण्याचे लहान मुलगे दोनच होते. पण ते नाना महाराजांच्या घराण्यात. पण या नानामहाराजांचा बाबामहाराजांच्या दत्तकाविषयी वाद होऊन उभयपक्षी लाख ५० हजार रुपये खर्च होऊन कायमचे वितुष्ट आले होते. अर्थात वैरी घराण्यांतील मुले दत्तक घ्यावयाची नाहीत हीच ताईमहाराजांची पहिली भावना होती. अशा रीतीने कोणत्याना कोणत्या कारणाने कोल्हापूरच्या मुलांपैकी दत्तक घेऊ नये हेच ठरले होते. मग टिळकानी औरंगाबादेकडे धाव घेतली यात वावगे ते काय केले ? नागपूरकरानी आणखी अशीहि कबूली दिली की खापर्डे हे ताईमहाराजाना आपल्या मुलीप्रमाणे वागवीत. आणि ताईमहाराजहि खापर्डे याना वडिलाप्रमाणे मान देत. अर्थात खापर्डे जे करतील ते ताईमहाराजांच्या हिताचे असे मानणे प्राप्तच होते. टिळक हट्टी रागीट त्रासीक म्हणून

ताईमहाराजांना त्यांच्याविषयी ममत्व वाटत नसेल. पण खापर्डे हे तर प्रत्यक्ष न्याही आणि मोठ्या सौम्यपणाने बोलून प्रत्यक्ष मुलीसारखे वागविणारे. त्यांनाहि बाईंनी दुष्टाच्या व खलाच्या वर्गात ढकलावे हा कोठला न्याय ? पण मुद्याची गोष्ट अशी की ताईमहाराज प्रथम टिळकांप्रमाणेच या दत्तक प्रकरणाकडे निःस्वार्थीपणाने व सात्विक हिंदु विधवेच्या भावनेने पाहात होत्या. पण ती त्यांची वृत्ति पुढे नागपूरकरांच्या सहवासाने बदलली. न जाणो कोल्हापुराहूनहि कोणकोणत्या दर्जाच्या लोकाकडून प्रेष आले असतील कोणी सांगावे ! कसेहि असले तरी स्वार्थाच्या दृष्टीने ताईमहाराज दत्तविधानाकडे पाहू लागल्या हे शेवटी कोल्हापुरास बाळामहाराज दत्तक घेताना त्यांच्याशी जो करार केला त्यावरून अगदी उघड दिसून येते. त्या करारात असे होते की बाबामहाराजांच्या पॉलिसीचे वीस हजार रुपये व दागिने ताईमहाराजांना मिळावे व बाकीची जंगम मिळकत वाटेल तितकी ताईमहाराजांनी उचलून घ्यावी. याचा अर्थ बाळामहाराजांना दत्तक होण्याकरिता सुमारे ५७ हजार रुपयांची किंमत द्यावी लागली. इतकेच नव्हे तर या करारात आणखी अशी शर्त होती की स्थावर मिळकतीची वहिवाट देखील तहाहयात बाईकडे राहावी व बाळामहाराजांना बाईच्या मृत्यूपर्यंत फक्त २०० रुपये देण्यात यावे. असला करार मान्य करणारे बाळामहाराज एक मूर्ख तरी म्हटले पाहिजेत. कारण उष्टे खाणार पण तूपहि मिळणार नाही अशी त्यांच्या दत्तविधानाची स्थिति होणार होती. आई व मुलगा जवळ जवळ सारख्याच वयाची ! तेव्हा ताईमहाराज मरणार केव्हा व बाळामहाराजांना इस्टेटीची वहिवाट मिळणार केव्हा ! पण कदाचित बाळामहाराजांच्या मूर्खपणापेक्षा धूर्तपणाच त्यात अधिक असावा ! बिचाऱ्या जगन्नाथाने ताईमहाराजांना आई म्हणण्या पलीकडे दुसरे काहीच देण्याचे वचन दिले नाही. दान व प्रतिग्रह झाला तो केवळ पुत्रत्वाच्या भावनेने झाला हे औरंगाबादेस झालेले कागद सिद्ध करितात. म्हणून आपला स्वभाव हट्टी याकरिता आपण टिळकांना विरोध केला हे जे ताईमहाराजांचे म्हणणे ते वरील कराराने लटके पडते. हट्ट झाला पण त्याला अधिष्ठान स्वार्थाचे होते. टिळकांचाहि हट्टच असेल पण त्याला अधिष्ठान निःस्वार्थाचे होते एवढाच फरक.

ताईमहाराजांबरोबर पार्वतीबाई नावाची एक कुणबीण औरंगाबादेस गेली होती. बाळामहाराजांतर्फे तिची साक्ष घेण्यात आली. पण तिने साक्ष दिली ती ताईमहाराजांच्याच गळ्यात आली. ती म्हणाली " जगन्नाथ यजमान झाला म्हणून औरंगाबादेस पेढे वाटले. बाई तिकडे गेल्या त्या खुषीने गेल्या. त्या तेथे हिंडत फिरत असत. लेणीहि पाहून आल्या. त्यांना कोणाचा अटकाव नव्हता. टिळकांचे साक्षीदार भिडे यांचे घरी ताईमहाराज जात असत." या बाईला साक्षीनंतर ताईमहाराजांनी नोकरीतून काढले !

स्वतः ताईमहाराजांची साक्ष झाली त्यात दत्तविधान झाले नव्हते वगैरे गोष्टी त्यांनी सांगितल्या आहेत. पण उलट तपासणीत खालीलप्रमाणे कबूली दिल्या.

" १९०१ मध्ये बजेटात आपला खर्च फार म्हणून टिळकानी कमी केला याबद्दल मी तक्रार केली होती. टिळकाना आपल्या मनातील गोष्ट कळू नये त्यांची फसगत व्हावी म्हणून मी टिळकाना असे लिहिले होते की बाळामहाराज दत्तक घेण्याचा नाद मी सोडलेला नाही. आणि हे मी कोल्हापूरला जाण्याची परवानगी मिळविण्याकरिता बनावट रचून लिहिले."

टिळकानी किंवा टिळकातर्फे लिहिल्या गेलेल्या काही पत्रात मुलगा औरंगाबाद येथे उचलून 'मांडीवर बसविला' असे शब्द स्पष्ट नसल्यावरून संशयाची इतकी इमारत उठविली गेली की शत्रूप्रमाणे काही मित्रहि विचारू लागले की औरंगाबाद येथे खरेच दत्तविधान झाले काय ? आणि झाले असते तर मुलगा मांडीवर बसविला असे शब्द कागदोपत्री का नसते आले ?" त्या बिचाऱ्याना "मुलगा पसंत करून मुलगा दत्तक घेऊन मगच बाहेर गोष्ट फोडावी" हे ठरल्याचे माहीत नाही. म्हणूनच त्याना कागदोपत्री हे स्पष्ट शब्द नसल्याचे आश्चर्य वाटले. ते धोरण त्याना या दत्तकप्रकरणी ठरले असल्याचे कळते तर त्याना आश्चर्य वाटले नसते. पण याहि पेक्षा आणखी मौज झाली ती अशी. बाळामहाराजांचे दत्तकपत्र बाईना उलट तपासणीत दाखवून करंदीकर यानी विचारले की हे कागद कशाचे आहेत ? त्याचे बाई उत्तर देईनात. करंदीकरानी पुन्हा विचारले "बाळामहाराजाना तुम्ही दत्तक घेतलेना ?" ह्याचे उत्तर "होय" असे आले. मग करंदीकरानी विचारले "बाळामहाराजाना प्रत्यक्ष तुमच्या मांडीवर बसविले होते काय ?" अर्थात बाईना खरे तेच सांगावे लागले. कारण बाळामहाराज ताईमहाराजांच्या मांडीवर बसते तर मांडी कदाचित मोडावयाची ! ताईमहारानी सांगितले "त्याना मांडीवर घेतले नाही. दत्तविधानाचे वेळी फक्त ते व मी एका पाटावर बसलो होतो." मग औरंगाबादेस देखील जगन्नाथ हा कोठे दूर बसला होता ? आणि दान प्रतिग्रह या जवळ बसलेल्या मुलालाच उद्देशून झाले. मग दत्तविधान व्हावयाचे ते काय राहिले ? पण बाईची मनःस्थिति बदलली असल्यामुळे त्यानी एक वेळ मांडीहि मोडून घेतली असती. कारण मुलगा सज्ञान असल्यामुळे त्याजकडून वाटेल तसा आपल्या हिताचा करार लिहून घेता आला. जगन्नाथ पडला अज्ञान. त्याकरिता तो करार लिहून देणार कसा ? आणि त्याच्याकरिता कोणी करार लिहून दिला तर तो कोर्टात टिकणार कसा ? दत्तक आयांची नेहमी तक्रार अशी असते की दत्तविधान झाल्याबरोबर आपण सांधी कोपऱ्यात जाऊन पडतो. पण बाळामहाराजाना दत्तक घेऊन हा जुना शिरस्ता मोडून टाकून दत्तक मुलाला पेन्शनवर बसवून जन्मभर स्वतः मालकीण म्हणून मिरविण्याचा त्यांचा घाट होता.

ताईमहाराजांची साक्ष संपेपर्यंत त्यांची बडदास्त कोर्टाने उत्तम प्रकारची ठेविली होती. प्रथम साक्ष झाली ती डिस्ट्रिक्ट जज्ज याचे बंगल्यात. तेथे पडदे बिडदे लावून फक्त पक्षकार वकील व कारकून इतक्याच लोकाना येण्याला परवानगी ठेऊन पडदपोशी राखिली होती. बाईना मधून मधून तासभर विश्रांति देण्यात येत असे. पण बीमनसाहेबानी मॅजिस्ट्रेटला कळविले की माझ्या बंगल्यात ही साक्ष पुष्कळ दिवस

चालल्याने माझी गैरसोय होते. तेव्हा ती जागा सोडून जवळच्या एका बंगल्यात कोर्टाचे काम चालू झाले. सर्व उलटतपासणी करंदीकर यानी फार चांगली केली. करंदीकर यांची सौम्य व दरबारी भाषणपद्धति व साक्षीदार स्वतः स्त्री दरबारी बायकोच. अशा रीतीने कोर्टाला दरबाराचा रंग आला होता. एक गोष्ट विषद्ध पद्धत होती ती मॅजिस्ट्रेटने सुधारून घेतली. ताईमहाराजांची उलटतपासणी करिताना करंदीकर 'आपण' हा शब्द द्व्यर्थी म्हणून टाकून देऊन 'तुम्ही' हा सरळ शब्द वापरू लागले ते मॅजिस्ट्रेट याना खपले नाही. आणि करंदीकर याना त्यानी बजाविले की बाईना 'आपण' असे न म्हणता 'तुम्ही' असे म्हणता त्याने बाईचा उपमर्द होतो. तरी तसे शब्द वापरू नका संभाळा. क्लेमंट्स्साहेबाना मराठीचे ज्ञान कमी असो अथवा मुळीच नसो. पण स्त्रीदाक्षिण्यबुद्धीने आपण व तुम्ही या मराठी शब्दातील सूक्ष्म अंतर त्याना शिकविले ही गोष्ट मात्र खरी !

हा खटला सुरू होण्यापूर्वी सरकारने गुप्त खात्याचे अधिकारी मि. ब्रुइन व पागे यांचेकडून खाजगी चौकशी केली होती. त्यात त्याना जी हकीकत कळली होती त्यावरून खरोखरीच खटला पुढे चालवयास नको होता. पण पोलिटिकल खाते हे धनी व पोलिसखाते हे त्याचे नोकर हा न्याय प्रसिद्धच आहे. पुढे प्रश्न असा निघाला की चौकशी केली तर रिपोर्ट पुढे का येऊ नये ? पण तो येणार कसा ? कारण तो अनुकूल नाही. ब्रुइन किंवा पागे यांना साक्षीला बोलावले असते तर कदाचित तो पुढे आला असता. इन्व्हेस्टिगेटिंग ऑफिसराची साक्ष घेणे हा नेहमीचा शिरस्ता आहे. पण या खटल्यात तो शिरस्ता सुटला. अखेर टिळकानीच ब्रुइन साहेबाना साक्षीला बोलाविले. पण त्यानी पहिल्यापासून आठवत नाही या शब्दाचा मंत्र जपण्यास सुरवात केली होती. उत्तर देत नाही म्हणणे हा न्याय कोर्टाचा गुन्हा होतो. पण आठवत नाही असे म्हटले म्हणजे उत्तर दिल्यासारखे झाले व काही न सांगितल्यासारखेहि झाले. येऊन जाऊन मॅजिस्ट्रेट विश्वास ठेवणार नाही तर न ठेवो. पोलिस अधिकाऱ्याला टिळकानी साक्षीला बोलवावे व चौकशीत काय निष्पन्न झाले हे विचारावे यातच ब्रुइन व पागे यांचा रिपोर्ट सूज्ञ जगाला कळून चुकला.

## (१५) सत्याची ओढाताण

खरा प्रकार असा की औरंगाबाद येथें पुण्याची सर्व मंडळी शीख मंदिरात उतरली होती. तेथें ताईमहाराज या नेहमीसारख्याच वृत्तीत होत्या. त्याना तेथे अनेक ठिकाणे दाखविण्यात आली. अनेक प्रकारचे लोक येऊन त्याना भेटले व त्यांचा सर्व दिवस नित्य व्यवसायात व नैमित्तिक करमणुकीत जाई. त्याना औरंगाबादेस ठेवून खापर्डे टिळक व दुर्गे जोशी हे निघोने येथे मुले पाहून आणण्यास गेले. यादरम्यान बाईहि वेरुळची लेणी पाहण्यास गेल्या. दोन दिवसानंतर इकडून टिळक व तिकडून बाई परत औरंगाबादेस आल्या. नंतर एक दीड दिवस मुलांच्या

पत्रिका व चालचलणुकी पाहण्यात गेला. व शेवटी जगन्नाथ यास दत्तक घेण्याचे ठरवून खापर्डे निघून गेले. पाच मुले पाच दिवस मंदिरात होती. काही मुलांचे वडिल आले नव्हते त्यानाहि आणविले. त्यातच जगन्नाथाचे वडिल होते. ते आल्यावर शास्त्री व वैदिक भिक्षुक यांच्या सभेत वाग्दान प्रतिग्रह झाले व दुसरे दिवशी सकाळी दत्तविधान व कागदपत्रावर सह्या होऊन द्वादशी सोडून मंडळी सकाळीच निघाली. पुणे येथील वाड्यातल्याप्रमाणे औरंगाबाद येथेहि आपणाला टिळकानी पाहऱ्यात ठेविले होते अशा साफ खोट्या गोष्टी बाईनी आपल्या जबानीत सांगितल्या! पण मऊ लागले म्हणून कोपराने खणावे असे बाईनी केले ते त्यांच्या अंगावर आले. ॲस्टनसाहेब व सरकार अनुकूल आहेत असे दिसताच जी जी बतावणी दत्तविधान खोटे ठरविण्याला करावी लागली ती ती बाईनी खुशाल केली. टिळकांविरुद्ध वाईट ग्रह व्हावा म्हणून नजरकैदेची खोटी गोष्ट सांगितली इतकेच नव्हे तर शीख मंदिरात असता आपल्या व टिळकाच्या दालनामधील दरवाजा रात्रीहि उघडा ठेवला जाई असे बाईनी सांगितले. पण सामान्य इंग्रजाचा टिळकावर राजद्रोही म्हणून राग असला तरी या बाबतीत बाईपेक्षा टिळकावरच त्यांचा अधिक विश्वास होता. व्यवहार सरळ असताहि उलट्या डोळ्यानी मनुष्य पाहू लागले म्हणजे ज्यात बोट शिरकावण्याला जागा नाही असा कोणताच व्यवहार उरत नाही. कोणतीहि गोष्ट अमुक एका रीतीने केली असे म्हटले तर ती दुसऱ्या रीतीने का केली नाही असा प्रश्न कोणासहि विचारता येतो व ती त्या रीतीने न केली येवढ्यावरूनच तर्कट रचता येते. दत्तविधानासंबंधी जे कागद झाले व ज्या हकिकती पत्रद्वारे लिहिल्या गेल्या त्यात अशी काही शब्दयोजना कोठे कोठे सहज पडली होती की त्यावरून बाकी सर्व झाले पण मुलगा प्रत्यक्ष मांडीवर दिला गेला नाही असा आक्षेप टीकाकारास घेता यावा. याच्या उलट दुसरी गोष्ट अशी होती की ताईमहाराजानी टिळकांच्या जुलमाच्या म्हणून ज्या गोष्टी सांगितल्या त्या खऱ्या मानल्या तर ताईमहाराजांच्या मांडीला मांडी लावून बसलेला मुलगा हवातर प्रत्यक्ष मांडीवर देणे ही गोष्ट काय अशक्य होती? पण ताईमहाराजाना प्रथम दत्तविधान कबूल असता पुण्यात पाजीपंचकाच्या तावडीत सापडल्यावर त्यांचे मन बदलले अशी उपपत्ति टिळकांच्या बाजूने मांडण्यात आली. म्हणून उलट बाजूनेहि अशी उपपत्ति लढविण्यात आली की प्रत्यक्ष मांडीवर मुलगा दिला म्हणजे दत्तविधान पूर्ण झाले ही कल्पना टिळकानी मागाहून उचलली म्हणूनच कित्येक कागदपत्रात मुलगा मांडीवर दिला हे स्पष्ट शब्द नाहीत. पण उलट पाहिले असता ताईमहाराजाना बंदिवासात ठेवल्याचा सर्व पुरावा खोटा ठरला. पण दत्तविधान प्रत्यक्ष झाल्याचे शब्द जरी काही कागदोपत्रात लिहिण्याचे ओघात चुकून राहिले असले तरी त्याविषयी तोंडी पुरावा भरपूर झाला. हा सर्व पुरावा खोटा असे क्लेमंट्स व ल्यूकस यानी ठरविले. फर्स्ट क्लास कोर्टाने हा पुरावा खरा मानला. हायकोर्टाने दिवाणी कज्ज्यात तो पुरावा खोटा मानला व फौजदारी कज्ज्यात खरा मानला.

पण अखेर प्रिव्ही कौन्सिलने दिवाणी अपीलात तो खरा मानला. अशा रीतीने सत्याची बेसुमार ओढाताण या प्रकरणात झाली. सत्यासंबंधाने टिळक एक कोटी करीत असत. साक्षीतून निघणारे सत्य हे कसे आहे? तर वैश्वदेवातील मंत्राप्रमाणे "त्रिधाबद्धो वृषभो रोर वीति' याप्रमाणे आहे असे ते म्हणत. कोर्टातील साक्षीदार व त्याचे सत्य हे या वृषभागाप्रमाणे तीन पाशानी जखडलेले असते. एक सरतपासणी दुसरा उलटतपासणी व तिसरा फेरतपासणी. पण याशिवाय न्यायाधिशाचे मत हा चौथा पाश असून लोकमत हा वेगळाच पाचवा पाश आहे. हे पाच पाश सत्यरूपी वृषभाला निरनिराळ्या दिशेने ओढीत असतात. तेव्हा त्याने नाल मारण्याकरिता ज़मिनीवर पाडलेल्या बैलाप्रमाणे ओरडावे यात काय आश्चर्य? रोमन न्यायाधिशाने खिस्ताला चेष्टेने विचारले की 'तू सत्य सत्य म्हणतोस ते आहे तरी काय?' पण खिस्ताने प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वीच हा अश्रद्धालु न्यायाधीश त्याकडे पाठ फिरवून निघून गेला. कारण तो असे मानणारा होता की जगात सत्य ही एक नुसती मानीव गोष्ट आहे. सत्याला खुद्द सत्याचेच निश्चित अधिष्ठान नाही. हे सर्व लिहिण्याचे कारण इतकेच की बारा वर्षे रामायण ऐकून सीता ही रामाची कोण असे विचारणारे श्रोते संभवतात त्याप्रमाणे हा खटला १९०१ पासून १९१५ पर्यंत चालला व इतक्यात कोर्टातून जाऊन आला तरी शेवटी केवळ आपल्या पूर्वग्रहाप्रमाणे कोणी असे तर कोणी तसे म्हणणारे भेटतातच. अजूनहि एखादा भोळा मनुष्य केवळ स्त्रीदाक्षिण्याच्या भ्रामक कल्पनेमुळे आणि टिळकाच्या हट्टी स्वभावाच्या ज्ञानामुळे असे म्हणणारा निघतो की टिळकानी ताईमहाराजाना खरोखरीच अटकेत ठेविले होते आणि औरंगाबादेस बाकी सर्व काही झाले पण फक्त दत्तविधान न करता टिळक परत आले! टिळकांच्या हेतूसंबंधाने पैशाच्या दृष्टीने ते सर्वस्वी प्रामाणिक असे कबूल करावे लागले असता अधिकारलालसेमुळे ते अप्रामाणिक असा श्लेष न्या. चंदावरकरादिकानी काढलेला आपण वर पाहिलाच आहे. पण द्रव्य-लोभ नाही व अधिकारलालसाहि नाही असे मान्य करणारे लोक देखील टिळकानी केला हा अतिप्रसंग होय, बाई उलटली असे पाहताच अंग झाडून मोकळे व्हावयाचे होते व न झाले ही त्यांनी चूक केली असा आक्षेप घेणारे लोक असतात हेहि आम्ही वर दर्शविलेच आहे. तात्पर्य कर्तव्यबुद्धि ही अहंकारदूषित होऊ शकते, व तशी टिळकांची या कामी झाली इतकेच कोणालाहि ज्यास्तीत ज्यास्ती म्हणता आले असते. पण टिळकानी केवळ बाईची बुद्धि फिरली म्हणून हे प्रकरण तसेच हातचे सोडून दिले असते तर त्यांच्यावर दुसऱ्या एका प्रकारचे आक्षेप आले असते हे ते लोक विसरतात. करारीपणा दाखविला तर तो दुराग्रह. कर्तव्य-निष्ठा दाखविली तर तो अहंकार. आणि निवृत्ति स्वीकारली तर तो कमकुवतपणा. असले उलट सुलट आक्षेप यात येण्यासारखे आहेत. त्यातला कोणता तरी एक काही केले तरी टिळकाना सोसावाच लागणार. म्हातारा व त्याचे लेक ही गोष्ट इसापमुनीने लिहून ठेवली तिचा बोध फुकट कसा जाईल?

## ( १६ ) हेतुचिकित्सा

प्रिव्ही कौन्सिलचा निकाल लागल्यानंतर बाळामहाराज यानी आपली बाजू लोकापुढे मांडण्याकरिता 'खरा प्रकार' म्हणून एक हस्तपत्रक काढले. त्यात त्यानी असे म्हटले आहे की "न्याय हाच अखेर विजयी होतो असे नाही." खरे आहे! आणि कोल्हापूर इलाख्यातील उत्पन्नासंबंधाने हे त्यांचे म्हणणे आतापर्यंत खरेच ठरले आहे! कारण प्रिव्ही कौन्सिलमध्ये जगन्नाथमहाराजांचे दत्तविधान शाबीत ठरले असता कोल्हापूरची मिळकत अजून जप्तीतच आहे व तिचा सर्व फायदा बाळामहाराज यानाच आजवर सर्व मिळाला आहे. पण कोल्हापूर उत्पन्नाच्या दुप्पट उत्पन्न ब्रिटिश मुलुखात आहे अशा स्थितीत विजय कोणाचा झाला म्हणावा? एकपटीचा की दुप्पटीचा? अर्थात् न्याय या शब्दाचा अर्थ जसा करावा तसा होईल. तसाच विजय शब्दाचाहि. म्हणून शेवटी हीच गोष्ट खरी की न्याय व विजय हे ज्याने जसे मानावे तसे ते आहेत. हे पत्रक काढताना रेव्हेन्यू ज्युरिसडिक्शन ॲक्टाखालच्या अर्जाचा निकाल अजून व्हावयाचा होता. म्हणून दत्तकाच्या वादात आपण हरलो तर जहागिरीच्या वादात आपण जिंकू अशी आशा तेव्हा त्याना वाटत असावी. पण आता तोहि निकाल झाला आहे. शेवटी आता विजयाचा एकच मार्ग दिसतो तो असा की ब्रिटिश सरकाराने जगन्नाथमहाराज यांचे उत्पन्न 'ॲक्ट ऑफ स्टेट' (सुलतानी) करून खालसा करावयाचे व ते बाळामहाराज याना द्यावयाचे! पण जगन्नाथमहाराज याना सरकारने सरदार केल्यामुळे तोहि संभव दिसत नाही. येऊन जाऊन ब्रिटिश सरकार अधिकात अधिक बाळामहाराजांचा फायदा करून देणार म्हणजे त्याना विजय संपादून देणार तो इतकाच दिसतो की भाऊमहाराजाना दिलेली जामिनकी बजावण्याला ते तयार होणार नाही. पण असे झाले तरी तो न्याय तर नाहीच पण वर सांगितल्याप्रमाणे विजयहि तेहतीस टक्केच आहे. पण इतक्यावरच मजल आली तर जगन्नाथमहाराजानीहि त्या उत्पन्नाचा नाद सोडावा व मनात म्हणावे की 'बाबामहाराजांचे नाव पितृस्थानी लावणारा आणखी एक आपला भाउबंद आहे. आणि त्याचेहि दत्तविधान झाले आहे. म्हणून तो आपल्या घराण्यातील मिळकतीला मुकला असेल. आणि कदाचित् जनाकरिता व मनाकरिता बाबामहाराजांचे श्राद्धहि करीत असेल. तेव्हा त्या श्राद्धपक्षाकरिता घरचा काही खर्च हवा की नको? ताईमहाराजांच्या कृपेमुळे एका पिंडदानाऐवजी दान पिंडदाने होणार! हा कैलासवासी बाबामहाराज यांचा त्यातल्यात्यात फायदाच झाला. पण ते स्वाभिमानी असल्यामुळे लोकांच्या घरचे का खातील! तेव्हा कोल्हापूरचे उत्पन्न आपणाला न मिळाले तरी हरकत नाही."

पण बाळामहाराज यानी प्रसिद्ध केलेल्या "खऱ्या प्रकारात" जी एक गोष्ट प्रसिद्ध केली आहे ती फार महत्त्वाची आहे. या खटल्याच्या पुराव्यात ती कोठे पुढे आली होती असे वाटत नाही. पण ती अशी की कोल्हापूर येथील नानामहाराज

याना चार मुलगे होते. स्वतः त्यानी बाबामहाराज यांचे दत्तविधान नाशाबीत ठरवून त्यांचे सर्व उत्पन्न आपल्या घराण्याकडे यावे असा प्रयत्न केला होता व त्याकरिता पुष्कळ पैसाहि खर्च केला होता. शेवटी न्यायकोर्टातून बाबामहाराज दत्तक ठरले व नानामहाराज याना तीस हजार रुपये उत्पन्न मिळण्याची आशा होती ती नष्ट झाली. पण ते स्वतःला मिळणे काय आणि आपल्या एखाद्या मुलाला मिळणे काय हे त्याना सारखेच वाटले असावे. बाबामहाराज निपुत्रिक निवर्तल्यामुळे दत्तक घ्यावा लागणार आणि तो आपल्या मुलापैकी एखादा घेतला तर वंशवृक्षावर घरच्या घरीच कलम बांधल्यासारखे होईल. पण दत्तकप्रकरणी तिऱ्हाइत लोक मदत करतात ते काही परमार्थ बुद्धीने नव्हे. हे जाणून त्यानी आपल्या मृत्युपत्रात असे लिहून ठेवले की ताईमहाराजाना आपला मुलगा दत्तक देण्याच्या खटपटीकरिता रोख दहा हजाररुपयापर्यंत खर्च करावा किंवा सालीना सहाशे रुपयांचे उत्पन्न तोडून द्यावे ! अर्थात् हे एक मोठे आमिष होते. आणि ज्या कोणी नानामहाराजांचा मुलगा दत्तक देण्याची खटपट केली असेल त्यांच्या पुढे हे आमिष असल्यास नवल नाही. पण तीस हजारांचे उत्पन्न मिळणार तर ते मिळणारा दुसरा कोणीहि असेच दहाहजार रुपये बक्षिस देऊ शकेल. अर्थात् बाळामहाराजाकडूनाहि ते मिळविणे शक्य होते. 'खऱ्या प्रकारात' बाळामहाराज यानी असे दर्शविले आहे की कुंभोजकर याना नानामहाराजाच्या दहा हजाराची आशा होती म्हणून त्यानी तिकडून खटपट केली ! पण नानामहाराज व बाबामहाराज यांचे वाकडे असल्याचे नागपूरकर याना माहित होते म्हणून त्यानी मात्र त्या लोभावर लाथ मारून बाळा-महाराजाचा पक्ष स्वीकारला. पण त्यावरून त्या दहाहजाराऐवजी इकडून दहाहजार शेवटी मिळाले नसते हे कशावरून ? बदल्यास बदला उभाच राहिला असता. पण कुंभोजकरानी टिळकांचेच म्हणणे ऐकले नानामहाराजांच्या मुलाकरिता खटपट केली नाही हे आता सिद्ध झाले आहे. तशीच त्यानी बाळामहाराजाकरिताहि खटपट केली नाही. टिळकांचा पक्ष म्हणजे कोणतेहि पैशाचे बक्षिस न मिळणारा जो पक्ष तो त्यानी स्वीकारला हे आता सिद्ध आहे. आणि टिळकाना तर या प्रकरणी कोणाच्या बक्षिसाचा लोभ तर नव्हताच पण उलट पदरचे पैसे खर्चून योग्य तेच करण्याला ते पुढे आले आणि अखेर या कामात त्याना चार दिवसाचा तुरुंगवासहि सोसावा लागला. ही हकिकत आम्ही पुढे आणण्याचे कारण इतकेच की या दत्तका-च्या प्रकरणी निरनिराळ्या व्यक्तींचा पैशाचा लोभ खेळ करीत होता म्हणून ते टिळकाना विरोध करीत होते आणि टिळक मात्र निस्वार्थी बुद्धीने वागून इतरांचा विरोध व द्वेष सहन करीत होते. येरव्ही लोकात मान्यता पुष्कळ असली तरी व्यक्तिगत स्वार्थाचा विरोध आला म्हणजे त्या मान्यतेला कोण विचारतो ? टिळकाविरुद्ध जे पाजीपंचक निर्माण झाले होते (पाजीपंचक हे स्वतः टिळकांचेच शब्द आहेत). ते बहुतेक स्वार्थामुळेच. टिळकाना या प्रकरणात एक पैचाहि द्रव्यलोभ नव्हता हे या लोकानीच कोठेहि कबूल केले असते. पण त्यानी टिळकाना विरोध

का केला? असे समजावयाचे काय की चंदावरकरानी सुचविल्याप्रमाणे टिळक हे कर्तव्यबुद्धीची मानीव भूल सेवन करता करता राजस अहंकाराने उन्मत्त दैत्य बनले होते ? आणि त्यांचा संहार करण्याकरिताच या सात्त्विक देवांशभूत पंचायतनाचा अवतार? हेतुसंशोधन हेच काय ते खरे मर्माचे स्थान येवढ्याचकरिता या मुद्याचे विशेष विवेचन आम्ही केले आहे. येरव्ही प्रकरण पुढे कोर्टात गेल्यावर सत्यनिर्णयाकरिता (आपण वाटेल तर एवढा मोठा शब्दहि टाकून देऊ आणि असे ह्मणू की आत्मसंरक्षणाकरिता) इतर चार लोक लढतात त्याप्रमाणे टिळकहि लढले. पण इतर चार चौघापेक्षा लोकोत्तर अशा गोष्टी या झगड्यातहि त्यानी प्रगट केल्या. खर्चाविषयी बेफिकीरी तीक्ष्ण बुद्धिमत्ता श्रम करण्याची पराकाष्ठा आणि त्याहूनहि म्हटले म्हणजे धैर्य. टिळकाना या प्रकरणी नावे पुष्कळानी ठेवली. पण अशी नावे ठेवण्याला जीभ हलविण्यापेक्षा अधिक सायास पडत नसतात !

ताईमहाराज प्रकरणात कोणाकडे दोष किती होता याची वाटणी अर्थात् जो तो आपल्या पूर्वग्रहाप्रमाणेच करणार हे उघड आहे. हट्टी हे टिळकांचे विशेषण प्रसिद्धच आहे. ते काही नवीन नाही. पण ताईमहाराज या टिळकाइतक्या योग्यतेच्या किंवा प्रसिद्ध नसल्या तरी त्याहि काही कमी हट्टी होत्या असे नाही. निदान पुण्यातील एक नागरिक नाना नागपूरकर एम. एजी. यानी आपल्या एका आठवणीत या मुद्यावर थोडासा प्रकाश पाडला आहे. ते लिहितात "कोल्हापुरास नागपुरकर यांचे घरी ताईमहाराज येत व नागपूरकर माझे चुलते म्हणून मीहि त्यांच्याकडे जात असे. आम्हा लहान मुलाबरोबर त्या मोकळ्या मनाने खेळत व बोलत. याच सुमारास दत्तकप्रकरण सुरू असल्यामुळे मी एक दिवस त्याना धिटाईने प्रश्न केला की, महाराज आपण आमच्या टिळकाशी का हो भांडता? त्यानी तुमचे असें काय वाकडे केले आहे?" प्रश्न विचारताच ताईमहाराजांच्या डोळ्यात अश्रू आले व त्या गहिवरून म्हणाल्या "बाळ टिळकानी माझे वाकडे तर केले नाहीच पण वाड्यातील सुतळीचा तोडा सुद्धा नेला नाही. पण एक गोष्ट मात्र आड आली आहे. टिळक अत्यंत हट्टी आहेत व मी तर पडले अभिमानी बाई ! माझे पुढे येऊन जर ते एकदा उभे राहतील व मला म्हणतील की काय महाराज काय चालविले आहे हे? तर मी एकदम जाऊन त्यांचे पाय धरीन व ते सांगतील त्याला रुकार देईन. परंतु मी होऊन काही प्राण गेला तरी माघार घेणार नाही. या कामी तुझे काकांचा हट्ट मुळीच नाही माझाच सर्व हट्ट आहे व टिळकांचा हट्ट मी जिरविणारच!" टिळकानी इष्टेटीच्या सुतळीच्या तोडयाला हात लावला नाही ही गोष्ट कबूल करण्याशिवाय ताईमहाराजानाहि गत्यंतरच नव्हते. उलट त्याना ही गोष्ट पक्की माहित होती की इष्टेटीला कर्ज फार. ते हटविण्याचा टिळकांचा प्रयत्न चालू आहे व या प्रयत्नात खर्च होईल तितका कमी करण्याबद्दल आपल्यालाहि टिळकांचा जाच आहे. या जाचाबद्दल बाईनी लेखी तोंडी तक्रारीहि केल्या होत्या. पण इष्टेटीच्या एकंदर हिताचेच धोरण टिळकांचे आहे हे उघड दिसत असल्यामुळे

त्याना टिळकाना दोष देता आला नाही. शिवाय टिळक निःस्पृह निस्वार्थीपणाने काम करीत आहेत असे जर बाईना वाटले नसते तर काटकसरीचा जाच त्यानी सोसलाहि नसता. या विषयी य. ग. कुळकर्णी यानी एका आठवणीत असे लिहिले आहे की बाबामहाराजांच्या बागेतून माळ्याने पाठविलेली भाजी टिळकांकडे सहज पाठविली तरी ती ते घेत नसत आणि म्हणत की "तुमच्या बागेत भाज्या कितिशा असणार? आमच्या बागेत भाज्या कितीतरी अधिक व किती प्रकारच्या तरी आहेत." ही त्यांची बाग म्हणजे मंडई! टिळकांचा हा निस्वार्थीपणा ताईमहाराजानी आपल्या जबानीत कोर्टापुढेहि कबूल केला होता. सूचक प्रश्न विचारून मॅजिस्ट्रेट यानी त्याना तीनतीन वेळ संधि दिली. पण त्यानी एकच उत्तर दिले की टिळकानी केले ते सर्व इष्टेटीच्या फायद्यासाठीच केले.

## (१७) ताईमहाराज प्रकरणातील काही गमती

या ठिकाणी दिलेल्या गमतीच्या गोष्टी विश्वसनीय म्हणून आम्ही देत आहो. त्यांच्या योगाने या खटल्यातील रुक्ष हकीकती वाचणारांच्या मनाला कदाचित् थोडीशी तरी करमणूक होईल.

### (१)

या दत्तकप्रकरणी लोकांची सहानुभूति बहुतेक सर्व बाबतीत टिळकांकडे होती. याचे कारण त्यांची खटपट निःस्वार्थी आणि इस्टेटीच्या हिताची आहे अशी त्यांची खात्री होती. ताईमहाराज व नागपूरकर यांच्या बाजूला काही थोडे लोक होते. त्यात काही उगीच शेजारी म्हणून काही टिळकांच्या हट्टी स्वभावावर रागावलेले म्हणून पण इतर बहुतेक स्वार्थसाधु. दत्तकप्रकरण म्हणजे ती अनेकाना लाभाची बाजू म्हणून. एकादा ज्योतिषी एकादा भटजी एकादा वैद्य एकादा कारकून एकादा आश्रित एवढीच. क्षिरकोळ मंडळी ताईमहाराजांच्या बाजूला असत. आपल्या घरचा दत्तक घेतला तर मदतगाराला रु. ६०० सालीना उत्पन्न देण्याचे उदक तिकडे नानामहाराज यानी सोडले होते तसेच इतर कित्येकानीहि सोडले होते. पण ही सगळ्यांची बक्षिसे बुडाली. टिळकाना मात्र हजारो रुपयांचा भुर्दंड पडला. पण 'न देवाय न धर्माय' असे कोणी म्हटलेले टिळकाना खपत नसे. ते म्हणत देवाय व धर्माय असाच हा भुर्दंड आहे.

### (२)

टिळक तुरुंगातून सुटून येण्यापूर्वीच दत्तकाची खलबते वाड्यात सुरू झाली होती. पण त्यात बाळामहाराज यांचे नांव प्रथम नव्हते. पहिली बोलवा स्वतः नागपूरकर यांचा मुलगा दत्तक देण्याचीच होती. पण नागपूरकराचा तेव्हाचा विद्यमान मुलगा एका बोटाने व्यंग म्हणून तो दौलतीला लाभणार नाही अशा समजुतीने तो पुढे करण्यात आला नाही. ताईमहाराजांच्या मनातून नागपूरकराचा मुलगा घ्यावा असे फारसे नव्हते पण नागपूरकराना नाखुष करू नये म्हणून त्याना त्यानी आशेवर

-तरंगत ठेवले होते. आपणाला पुढे मुलगा झाल्यास तो दत्तक जाण्याची आशा नागपूरकराना होती. याविषयी नागपूरकर याना कोणी असा शास्त्रार्थ सांगितला होता की मुलगा उपजताच नाळ कापण्याचे आधी तो दत्तक आईच्या ओटीत घातला म्हणजे दत्तकाचा विधी होम वगैरे काही लागत नाही.

गंगे गोदे यमुने माझा नोहे तुझाच हा बाळ
जतन करी तूं याते 'स्वाधिन केला न कापिता नाळ' ॥

असा मोरोपंती भारतधर्मसिंधूत आधारच आहे! नागपूरकर यांचे कुटुंब पुढे लवकरच प्रसूत झाले व मुलगा झाला. तेव्हा ताईमहाराज प्लेगकरिता वडगावास रहात होत्या. म्हणून नागपूरकरानी ही ताजी खुषखबर कळविण्यासाठी घाईने त्यांच्याकडे मनुष्य पाठविला आणि आपली आज्ञा होईल तर नाळ न कापता मुलगा तसाच पाठवून देऊं का? असे विचारले. या कामी इतकी लगट केलेली पाहून ताईमहाराजाना राग आला व निरोप आणणाऱ्या मनुष्याला त्या म्हणाल्या "होय मुलगा आण आणि जवळच्या त्या ओढयात फेकून दे!" तात्पर्य या वेळचा बार असा फुकट गेला.

(३)

हा बार फसल्यावर नागपूरकर यानी तोच बार पुन्हा पण आता एका निराळया रीतीने भरला. या वेळी ताईमहाराजांचे मन त्यानी अधिक हस्तगत केले होते. पूर्वी वडगावचा प्रवास वाचलेल्या मुलालाच दत्तक द्यावा घ्यावा असे ठरले. पण दत्तक कोणता घ्यावा याविषयी बोलण्याचा ट्रस्टीना अधिकार आहे ही अडचण उभयतांच्या मनात डोकावतच होती. पण अशा अडचणीना परिहारहि सुचतच असतात. त्याप्रमाणे एक परिहार कोणी असा सुचविला की "समजा बाई एकदम आजारी पडल्या मरणोन्मुख झाल्या तर दत्तविधान तावडतोब उरकून घेणेच प्राप्त. अशा वेळी ट्रस्टींच्या संमतीची कसली वाट पहावयाची? कारण बाई मरण पावल्यावर ट्रस्टी झाले तरी कोणाच्या मांडीवर दत्तक देणार? ट्रस्टीना अधिकार जवळ जवळ मालकाचे असले तरी त्यानी स्वतः मालकाकरिता मुलगा मांडीवर घ्यावा असा कायदा अद्यापि झालेला नाही. येऊन जाऊन ताईमहाराज अत्यवस्थ झाल्या घटका अर्ध घटकेने मरणार असे तज्ञांचे सर्टिफिकीट मिळवून टिळकाना दाखविता आले म्हणजे तेच उलट शाबासकी देतील व म्हणतील की "तुम्ही बाजू चांगली राखली. मुलगा कोणाचा का असेना! पण दत्तविधान वेळीच झाल्याने बाबामहाराजांचे नाव तरी राहिले. नाही तर ज्या कोल्हापूरच्या महाराज घराण्यावर माझा राग त्याच्याचकडे सगळी इष्टेट गेली असती!" ही युक्ति फार नामी दिसली पण ती सिद्ध होण्याला अर्थातच डॉक्टर वैद्य सामील हवे. तेव्हा असे ठरले की नेहमीचे कुटुंब वैद्य शेजवलकर होते त्याना व तुळशीबागेजवळील एका इंग्रजी पद्धतीच्या डॉक्टराना पैसे देऊन वश करून घ्यावे व त्यांच्या मार्फत सिव्हिल सर्जनचे सर्टिफिकीट घ्यावे आणि नाटकी गोंधळात दत्तविधान उरकावे. बरे हिंदुधर्म शास्त्रा-

प्रमाणे जसा विवाह तसेच दत्तविधान. एकदा प्रत्यक्ष झाले की मग वज्रलेप. उद्या टिळकाना कपट उघडकीला आले तरी दत्तविधान उलथून पडत नाही खास. असो. ठरलेल्या कटाप्रमाणे वाड्यात वैद्यबुवानी येरझारा घालण्यास प्रारंभ केला. ही आगंतुक गडबड पाहून टिळकांच्या चाणाक्ष व विश्वासू कारकुनाने जरा खोलात जाऊन चौकशी केली. वैद्यबुवा भोळे व घरोब्याचे होते. त्यानी सहज सुगावा लागू दिला. कारकुनानेहि कारकुनी लढविली. तो म्हणाला "वैद्यबुवा युक्ति फार चांगली निघाली पण तुम्हाला लाभ काय ?" वैद्यबुवा म्हणाले "पाचशे रुपये." कारकून म्हणाले "आनंद ! पण नीट जपा बरे. तुमच्याकडून काम करून घेतील पण नंतर एक तांब्याचा पैसाहि दिसणार नाही. तुमच्या लाभाला मी मदत करतो. मी वाड्यात आहेच. तुम्ही मात्र बिन्धाडीच रहा. हलू नका. आधी पाचशे रुपये मोजून घ्या व मग डोक्याला पागोटे घाला. कारकुनाला वाड्यातली द्रव्यनाडी चांगली माहित होती. वेळी हुकुमी पाच रुपयेही निघावयाचे नाहीत. वैद्यबुवाच पाचशे मागणार मग डॉक्टर व सिव्हिल सर्जन किती घेईल ! एकंदर हजारा दोन हजाराची व्यवस्था करावी लागणार. ती एका दिवसात होणे नाही. आणि टिळक गावी नाहीत. त्याना कटाची बातमी कळविण्याला तितका अवधी सहज मिळेल असा कारकुनाचा मनातला कपटी बेत. या अद्भुत खोट्या नाटकी जिवावरच्या दुखण्याला मध्यरात्रीचा काळ इष्ट म्हणून कपट-नीतीत सांगितलेला आहे. मध्यरात्रीपर्यंत पैशाची जुळवाजुळव नागपूरकरानी करावी व ती सोय होताच ताईमहाराजानी विव्हळण्या ओरडण्याला आरंभ करावा असे ठरले होते. नागपूरकर अजून बाहेर हिंडत आहेत तेव्हा ते पैशाची सोय लावून येणार अशी खात्री वाटल्याने ताईमहाराजानी कपटनाटकाची नांदी म्हणण्याला म्हणजे विव्हळ-ण्याला प्रारंभ केला. गडी माणसे कोणी कटात नव्हती. त्यानी बाईचे विलाप ऐकून कारकुनाना वर्दी दिली. पण कारकुनाला आधीच अंतस्थ माहिती होती. तो कशाला घाबरतो ! तेव्हा तो बाईकडे गेला व दाराआड उभा राहून कोणी नाहीसे पाहून मोठ्याने म्हणाला "पैशाची अजून सोय लागत नाही उगीच का विव्हळता ?" तेव्हा बाई चपापल्या व त्याना वाटले की आपल्या कटाला वाचा फुटली आहे. वैद्यबुवाना घरीच डांबून बसविले होते. म्हणून निरोपाची वाट पाहून पाहून ते झोपी गेले. नागपूरकर पैसे जुळविण्याविषयी निराश होऊन रात्री दोन वाजता परत आले व हताश होऊन घरी गेले. अशा रीतीने अवचित योगाने हे दत्तविधान थांबले आणि बाईच्या जिवावरचे दुखणे औषधाविण गेले !

(४)

आपल्या मुलाला दत्तविधान लाभत नाही असे दोनतीन वेळच्या अनु-भवाने ठरल्यावर नागपूरकरानी बाळामहाराजांची बाजू उचलली. त्यांचे लग्न ठरले ते खेड तालुक्यातील एका मुलीशी. म्हणून लग्नसमारंभ पुण्यास करावा व अर्थात् तो ताईमहाराजांचे वाड्यात करावा असा एक नवा योग उपस्थित झाला. बाळामहाराजांच्या दत्तविधानाविषयी काही बोलवा टिळकांच्या कानावर आधीच

आली होती. म्हणून हे लग्न वाड्यात न होईल तर बरे असे टिळकाना वाटे. पण आताना लग्नसमारंभाकरिताहि वाडा देत नाही म्हणणे अर्थातच वाईट दिसते म्हणून टिळकांचा नाइलाज झाला. बाई व नागपूरकर यांचा असा बेत होता की लग्नासाठी आलेल्या बाळामहाराजांचे दत्तविधान आधी करावे व मग लग्न व्हावे. पण इतक्या सर्व गोष्टीना टिळकांची परवानगी घेणे अवश्य आणि समक्ष तर बोलण्याची सोय नाही. म्हणून टिळकांचे स्नेही भिंगारकरबुवा याना मध्यस्त घालण्यात आले. भिंगारकर या कामाकरिता आपल्याकडे येणार व त्यांच्याहातून हे मोठे काम झाले तर त्याना पाचशे रुपयांचे उत्पन्न देण्याचे आमिष दाखविण्यात आले होते ही गोष्ट टिळकाना आगाऊ कळली. बुवा कधी न यावयाचे ते आज सकाळीच आलेले पाहून टिळकानी त्यांची कुचेष्टा करीत करीत पाचशे रुपये उत्पन्नाचे कसे काय जमते असे विचारले. तेव्हा इकडून तिकडून बोलून मग मुद्द्याची गोष्ट काढण्याचा आव बोवानी फुगविला होता त्या फुग्याला टिळकांच्या या काटेरी प्रश्नाने भोक पाडून त्यातला सगळा वारा निघून गेला. मग टिळकानी बुवाना स्पष्टच सागितले की "तुम्ही या कामात पडूच नका. कारण बाळामहाराजांच्या दत्तविधानाला मी कधीहि परवानगी देणार नाही. त्यात तुमचे उत्पन्न बुडाले तरी खुशाल बुडो." अशा रीतीने दत्तविधानाचा हाहि डाव फसला. लग्न वाड्यातच झाले. पण खेडच्या एका मुलीचे नाव बदलून ठेवण्यापूर्वी आधी स्वतःचे नाव बदलण्याचा प्रसंग बाळामहाराजावर आला होता तो टळला!

(५)

यानंतर बाळामहाराज यांचा सख्खा धाकटा भाऊ तात्यामहाराज यांचे लग्न कोल्हापुरात उपस्थित झाले त्या वेळी या निमित्ताने ताईमहाराजाना कोल्हापुरास न्यावे व बाळामहाराज नाहीतर तात्यामहाराज याना दत्तक द्यावे अशी कल्पना निघाली. पण लग्नाला हजर राहण्याचे अगत्य ताईमहाराजाना का उत्पन्न झाले ही गोष्ट टिळकाना माहित असल्यामुळे त्यानी परवानगी देण्याचे नाकारले व उगाच खर्च होतो अशी सबब सांगितली. ही १९०१ च्या मे महिन्यातील गोष्ट. तेव्हा शेवटी आता गोष्ट निकरावर येत चालली असे पाहून पुढील जून महिन्यात टिळकानी दत्तकाचा प्रश्न निकालात काढण्याचे ठरविले.

(६)

औरंगाबादेस ताईमहाराज दत्तविधानाकरिता गेल्या ही महत्त्वाची खबर त्याच दिवशी कोल्हापुरास तारेने कळली. दुसरे दिवशी करवीरकर छत्रपति पंडितमहाराज वगैरे मंडळी पुण्यास आली व त्यानी ऑस्टन साहेबांचीहि गाठ घेतली म्हणतात. पण ज्याना दत्तक द्यावयाचा त्या बाई व ट्रस्टी ही मंडळी औरंगाबादेस गेलेली. यानी इकडे पुष्कळ चुळबुळ केली पण इकडून तार किंवा पत्र पाठवून ताईमहाराजाना सल्लामसलत देणे कठीण होते. म्हणून त्यानी नरहर भट श्रीगोंदेकर नावाचा विश्वासू मनुष्य औरंगाबादेस पाठविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे भटजी औरंगाबादेस

गेले. पण दैवयोग हा की तेथे प्लेगच्या अधिकाऱ्यानी त्याना क्वारंटाईनमध्ये ठेऊन दिले. टिळकांना कोणी अडविले नव्हते आणि मी टिळकांचा मनुष्य असे नरहरभट सांगता तर त्याचीहि कदाचित् सुटका होती. पण तसे सांगण्याचे त्याचे धैर्य होईना. पण इकडे दुसरी मौज अशी झाली की कोल्हापूरकर मंडळी येऊन खलबत होऊन नरहरभट रवाना झाल्यापर्यंतची इत्थंभूत हकीगत धोंडोपंत विध्वंस यानी मोडीत लिहून टिळकांच्या नावे औरंगाबादेस पत्र पाठविले. त्यावर पत्ता गोविंदराव काळे यांच्या घरचा लिहिला. ते घेऊन काळे यानी एका माणसाबरोबर शीखमंदिरात पाठविले. पण टिळक त्या वेळीं बाहेर गेले असल्यामुळे ते पत्र ताईमहाराजांच्या हाती देण्यात आले. पुण्याचे पत्र पाहून ते फोडण्याचा मोह त्याना झाला व कारकुनाने ते सर्व वाचून दाखविले तों त्यात कोल्हापूर मंडळीच्या कारस्थानाची सर्व हकीगत व नरहर भट पाठविल्याची बातमीहि त्यातच! अशा रीतीने जी बातमी टिळकानाच कळावयास पाहिजे होती ती ताईमहाराजाना कळली. तसेच नागपूरकराकडून गुप्त दूत निघाला ही बातमीहि त्याना कळली. पण क्वारंटाईनमध्ये पडल्यामुळे तो नापत्ता झाला. पुढे नरहरभट क्वारंटाईनमध्ये असल्याची बातमी टिळकाना कळली पण बाईना गुप्त दूताची भेट होऊ नये म्हणून टिळक त्याला क्वारंटाईनमधून सोडवून घेईनात. व बाईना तो आल्याची बातमी आपण होऊन लागू दिली नाही. अशा रीतीने टिळकानी बाईचे एक गुपीत आपल्या हाती ठेवले पण टिळकांचेहि एक गुपित बाईनी आपल्या हाती ठेवले होते हे त्याना काय माहित? कळून सवरून फिटासफीट नेहमीच होते. पण जगात न कळताहि फिटासफीट होत असते ती ही अशी. औरंगाबादेहून टिळक पुण्यास परत आले तेव्हा धोंडोपंतानी त्याना पहिला प्रश्न हा केला की "माझे सविस्तर हकिगतीचे पत्र तुम्हाला पोंचले का?" टिळक म्हणाले "कसली हकीगत व कसले पत्र?" तेव्हा धोंडोपंत म्हणाले "तर मग घात झाला." पण उभयपक्षी खुलासा झाल्यावर टिळक म्हणाले "घाबरू नको. घात झाला नाही. औरंगाबादेस दत्तविधान पुरे करूनच नरहरभटाला क्वारंटाईनमधून सोडवून बरोबर आणला आहे. त्याला मी विचारले 'भटजी तुम्ही इकडे कुणीकडे'? त्याने मला सांगितले 'सहज इकडे जालन्याला जात होतो.' पण हे खोटे होते हे काय मला माहीत नाही? काही असो. बाईना म्हणावे माझे पत्र खुशाल जवळ ठेवा. कोल्हापूरची मंडळी आता काय वाटेल ते करोत. फार काय पण त्या रात्री टळलेले जिवावरचे दुखणे बाईना येऊन त्या जरी आता निवर्तल्या तरी बाबामहाराजांच्या इस्टेटीला औरंगाबादेस वारस उभा करून आलो आहे. आता मी कोणास भीत नाही."

(७)

तारीख १२ जुलै रोजी रात्री वाड्यात बाळामहाराज याना अवचित दत्तक घ्यावयाचे असे नागपुरकर व पंडितमहाराज यानी ठरविले. व रात्रीच्या रात्री धार्मिक विधिहि उरकावा आणि टिळकाना नकळत चार प्रतिष्ठित मंडळी हजर ठेऊन

पानसुपारीचा समारंभ करावा असेहि ठरले. आवशी ११ वाजेपर्यंत ही बातमी कोणास कळू दिली नाही. पण घरच्या उपाध्याला थोडी गुणगुण होती. कारकूनहि टेहळणीवर होता. अकरा वाजता वाड्याला आतून कडी लागली तेव्हा कर्मधर्म-संयोगाने कारकून बाहेर उच्छ्वासाजवळ यावयाला व उपाध्या माडीवरील खिडकीत येण्याला गाठ पडली. उपाध्याने हळूच वरून सांगितले की "घरी जाऊन जागत बसा. वाड्यात गडबड आहे. पण नक्की काही कळताच तुम्हाला कळवीन." अकरा वाजल्यावर काही वेळाने दत्तविधानाचा बेत नक्की ठरून उपाध्याला तयारी करण्याची आज्ञा झाली. तो खाली येऊन पहातो तो नाकेबंदी. त्याला शिपाई बाहेर जाऊ देईना. पण तो मोठा प्रसंगावधानी. तो नागपुरकराना म्हणाला "सर्व तयारी आधीचीच आहे. पण दत्तक प्रयोगाची पोथी घरी राहिली आहे तेवढी घेऊन येतो." मग परवानगी मिळण्याला काय उशीर? उपाध्या कारकुनाकडे जाऊन म्हणाला "बसला काय उठा. एक तासात दत्तविधान होते"! कारकून तडक टिळकांच्या घरी गेला. पहातो तो ते उठून सांगलीकरांच्या वाड्यात काही कामाकरिता गेले होते. तेथे वर्दी पोहोचताच ते बाळासाहेब नातू यांच्या घरी गेले व उभयतांचा विचार ठरला की वाड्यात जावे व दत्तविधानाला होईल तितका प्रतिबंध करावा. टिळक व कारकून पुढे निघाले पण ते आल्याचे कळले तर त्यानाहि या वेळी मज्जाव होणार. तेव्हा टिळक उच्छ्वासापाशी उभे राहिले. कारकून दिंडीशी गेला व हलक्या आवाजाने म्हणाला 'लवकर कडी काढ. दत्तविधानाचे काही सामान घेऊन आलो आहे.' कडी निघताच कारकून एक पाय बाहेर व एक पाय आत ठेवून दिंडीतच उभा राहिला व टाळी ऐकताच टिळक आले ते एकदम आत शिरले. स्वतः टिळक आत येऊन उभे राहिल्यावर शिपाई काय करणार? टिळकानी कारकुनाला बाहेर पडून आपल्या स्नेही मंडळीना घेऊन येण्यास सांगितले व फिरून दिंडीला कडी लावून घेतली. आत दत्तविधानाची मांडामांड होत होती. पण स्वतः बाळमहाराज व समारंभाचे प्रेक्षक याना बारा वाजण्याची आमंत्रणे होतीं म्हणून वाड्यात सामसूम होते. टिळक तडक चौकात गेले व नागपुरकराना त्यानी 'नागपुरकर' म्हणून हाक मारली. येऊन पहातात तो समोर टिळक उभे. त्याना पाहताच नागपुरकरांचे हातातील तांब्या भांडे वगैरे जे काय होते ते गळूनच खाली पडले. ताईमहाराजांचा राग मात्र अनावर झाला. त्यानी टिळक वाड्यात कसे आले? हा कसला तुमचा ढिला कारभार? असे म्हणून तर नागपुरकराना शिव्या हासडल्याच पण टिळकानाहि तोंडावर अद्वातद्वा बोलण्यास कमी केले नाही. इतक्यात टिळकांची मंडळी हळूहळू वाड्यात येऊ लागली. अशा रीतीने गाडे उलटल्यामुळे सामोपचाराचे बोलणे ऐकण्यास बाई तयार झाल्या व टिळकानीहि फक्त इतकेच आश्वासन मिळविले की 'खापर्डे कुंभोजकराना मी तारा करून बोलावतो तोपर्यंत थांबा. मग काय व्हायचे असेल ते होईल.' १२ वाजता निमंत्रित प्रेक्षक एक एक वाड्याच्या तोंडाशी येऊ लागले. तो टिळकांची मंडळी एक एक

बाहेर पडलेली भेटू लागली. त्यानी विचारले 'काय दत्तविधान इतक्यात झाले?' यानी सांगितले 'तुमच्या साक्षीशिवाय ते कसे होईल? पण चार दिवस अवकाश आहे. आला तसे हात हालवीत परत जा.' बिचाऱ्याना मध्यरात्रीची उगीच खेप पडली. दत्तविधान मोडले झोपहि मोडली!

(८)

ताईमहाराजानी औरंगाबादेहून १।२ पत्रे पुण्यास नागपुरकराना लिहिली. त्यात काय मजकूर होता हे कळण्याला मार्ग नाही. पण पोस्टांचे शिक्के पडलेल्या पाकिटांचा फायदा घेऊन खटला चालू झाला तेव्हा दुसरी बनावट पत्रे करून ती पुराव्यात दाखल करण्यात आली. ती पत्रे आह्मी या पुढील परिशिष्टात दिली आहेत. त्यातील मजकूर वाचताच ती बनावट दिसतात. कारण टिळक बाईवर नागव्या तरवारीचा पहारा ठेवणार ही अतिशयोक्तीची भाषा कोण खरी मानील? पण बनावट पत्रातील मजकूरच मारक झाला. ता. २१ च्या पाकिटातील पत्रात सर्व मुले निघोन्याहून आणली पाहिली नापसंत झाली वगैरे मजकूर होता. पण पुढे पुराव्यातच असे निष्पन्न झाले की ता. २४पर्यंत औरंगाबादेस मुले मुळी कोणी आणलीच नव्हती. बनावट पत्रे लिहिणारा चित्रगुप्त इतिहासज्ञ होता ह्मणून २१ तारखेपर्यंतचेच भूतवृत्त म्हणून लिहून त्यात त्यासंबंधी बनावट मजकूर घालता तर तो खपला असता. पण २४ तारखेच्या पुढचा वृत्तांत २१ तारखेच्या पत्रात लिहिताना जे उसने भविष्यवादित्व त्याने आंगी आणले तेच बाधले. भविष्यवादित्व हे मानवी शरीराला दुष्ट रसायनासारखे आहे. ते पचनी न पडता असे अंगावर उमटते. ह्या पत्रासंबंधी सेशन्स जज्ज ल्यूकस यानी खालीलप्रमाणे टीका केली. "२४ तारखेचा छाप या पत्रावर आहे त्या अर्थी ते सकाळी सात आठपर्यंत नागपुरकराना मिळाले असले पाहिजे, पण त्याच दिवशी सकाळी ९। वाजता त्यानी ताईमहाराजाना तार केली की तुमच्याकडून पत्र नाही. तुह्मी अधिक दिवस राहणार असाल तर मला नाशिककडे जाण्याची परवानगी मिळवा. म्हणूनच हे पत्र बनावट दिसते. ते एक दोघा साक्षीदाराना दाखविल्याचा तोंडी पुरावा आणला आहे पण त्यात काही अर्थ नाही."

(९)

फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात औरंगाबाद कमिशनपुढे फक्त टिळकानीच आपल्या तर्फे साक्षीदार दिले होते. सरकारतर्फेचे कोणी साक्षीदार नव्हते. पुढे दिवाणीत दाव्यात टिळकांतर्फे त्याच साक्षी घेण्यात आल्या. पण या वेळी प्रतिवादीतर्फेहि साक्षी देण्यात आल्या. मात्र त्या बहुतेकांची दुर्दशा झाली. दत्तविधान झाले असे सांगणाऱ्या साक्षीदाराविरुद्ध ते झाले नाही असे सांगणारे साक्षीदार दत्तविधानाच्या दिवशी औरंगाबादेस हजर असणारे तरी पाहिजे होते. पण इतकीहि खबरदारी प्रतिवादी बाळामहाराजांचे पक्षाने घेतली नाही. बरेच पैसे पेरले गेले पण खुद्द गावचा साक्षीदार मिळेना. भलतीच माणसे पढवून आणून उभी केली. अशी माणसे ठराविक मजकूर सांगू लागली तर उलट तपासणी करणारा वकील कितीहि कुशल असला

तरी काय करणार ? अगदी अपरिचित नावांची साक्षीदाराची याद हातात पडलेली पाहून एक विनोदी गृहस्थ म्हणाले " वकीलसाहेब तुम्ही याना उलट तपासणीत कसे पाडणार ? साक्षीदारांचा पायच ओढून पाडाल तर न कळे. " पण पाय न ओढताहि साक्षीदाराना कसे पाडता आले याची एक दोन उदाहरणे देतो. बळवंत मानाजी हा साक्षीदार देऊळगाव राजाचा मुखत्यार म्हणून पुढे आला. त्याने ठासून सांगितले की मी दत्तविधान झाले म्हणतात त्या दिवशी औरंगाबादेस होतो व शीख मंदिरातहि सकाळी होतो. तेथे कोणी लोक जमले नव्हते गर्दी नव्हती काही नव्हते. पण वास्तविक हा इसम त्या दिवशी हैदराबादेस होता आणि कचेऱ्यातून त्या दिवशी त्याची हजेरी नमूद होती. तसेच एका मारवाड्याकडे याच तारखेस हैद-राबाद येथे कर्जमोबदल्याच्या बाबतीत त्याने खाते रुजू केल्याचा पुरावा होता. व टिळकानी यासंबंधी लेखी सहीशिक्क्याचे उतारेच्या उतारेच दाखल केले. यामुळे तो भांबावून गेला. त्याने टिळकांविरुद्ध कोर्टाकडे अमुक एक अर्ज केला होता व तो अमुक एका वकीलाला दाखविला असे सांगितले होते.पण योग असा की तो वकील त्यापूर्वीच मेला होता. तेव्हा टिळकानी त्याचे मृत्यूचे सर्टिफिकीट दाखल केले व बळवंतराव मानाजीला विचारले की "हा वकील तू त्याला भेटण्यापूर्वी मेला की नंतर मेला ? " तेव्हा त्याने उत्तर दिले की " मी भेटण्यापूर्वीहि मेला असेल किंवा नंतर मेला असेल ! " मॅजिस्ट्रेटनी तो प्रश्न फिरून विचारला तरी त्याने तेच उत्तर दिले. कागदी पुराव्यानें खोटा पडल्यामुळे या साक्षीदारावर रुकार मागण्यात आला. पण पुढे आठ दिवसानी बिचारा मृत्यू पावल्यामुळे त्याचा तुरुंग टळला.

( १० )

साक्षीदार केशव सोनाजी याला पंडितमहाराजानी पैसे देऊन साक्षीदार तयार करण्याचे काम सांगितले होते व या बाबतीत त्याच्या व पंडितमहाराजांच्या तारा पकडण्यात आल्या होत्या. एका तारेत असा मजकूर होता " काम केले आहे एक हजार रुपये तारेने पाठवा. " ही तार ८ आगष्ट १९०४ रोजी औरंगाबादेहून झाली व पंडितमहाराजांकडून तारेने त्याच दिवशी जबाब गेला त्यात मजकूर असा होता " औरंगाबाद येथे हत्यारे तयार ठेवा मी लायसेन्स पास व हत्यारांची किंमत घेऊन समक्ष येतो. " केशव सोनाजी साक्षीला आला तेव्हा त्याला विचारले की 'हजार रुपये कशाबद्दल व हत्यारे कसली ?' तेव्हा त्याने असा खुलासा केला की 'कोल्हापूर महाराजांकरिता सहा भाले पाहिजेत म्हणून ते तयार करण्यासाठी पंडित-महाराजानी माझ्या दुकानाला ऑर्डर दिली होती.' ही हत्यारे म्हणजे अर्थात् दत्तविधाना-चे साक्षीदार होत हे उघड होते. कारण कोल्हापूरकर महाराजाना हत्यारांची वाण नव्हती व ती असती तरी औरंगाबादेहून मागविण्याचे कारण नव्हते. शिवाय औरं-गाबादेस भाले चांगले तयार होतात असे म्हटले तरी सहा भाल्याना हजार रुपये किंमत कशी पडणार ? पण साक्षीदाराने तारेत तो आकडाच घातला असल्याने त्यास नाकबूल करता येईना. शिवाय तारेचा जबाब पंडितमहाराजानी पाठविला

त्यात हजार रुपये भलते कसले मागता असे न म्हणता हत्यारे तयार ठेवा किंमतीचे रुपये घेऊन स्वतः येतो असा पाठविला तो कसा ? अर्थात् हत्यारांची ही कल्पित गोष्ट अंगावर आली. तसेच रुपये पटवून अखेर जी खरी हत्यारे कोर्टापुढे आणली गेली ती सर्व खोटी बोथटलेली निरुपयोगी ठरली.

(११)

वरील हकिगतीतील तारांचा सुगावा लावून त्या पुराव्यात दाखल करण्याला टिळकाना फार त्रास पडला. कारण काही ठराविक मुदतीपर्यंत अस्सल तारा कलकत्त्यास तारखात्याच्या कचेरीत ठेऊन नंतर त्यांचा नाश करण्यात येतो म्हणून त्या मुदतीच्या आत हे काम व्हावयास पाहिजे होते. शिवाय त्यांचा शोध लागल्यावर त्या पुराव्यात हजर व्हाव्या म्हणून कलकत्ता येथील एका कोर्टाकडे याकरिता मुद्दाम कमिशन पाठवावे लागले. तसेच बाळामहाराजांतर्फे दिलेले बहुतेक साक्षीदार निजामशाहीतले. तेव्हा त्याना खोटे पाडण्याकरिता जो लेखी व तोंडी पुरावा मिळवावा लागला त्याला किती श्रम पडले असतील त्याचीहि कल्पना वाचकाना सहजच होईल. पण मोंगलाईतहि टिळकांच्याबद्दल सहानुभूति असल्यामुळे सही शिक्याच्या नकला घेणे वगैरे कामे जी त्या इलाख्यात सहा सहा महिने एरवी व्हावयाची नाहीत ती एकेका दिवसात करून मिळाली. काही कागद खाजगी लोकांच्या ताब्यात होते त्यांच्या सरकारी नकला मिळण्याकरिता अशीहि युक्ति करावी लागती की अमे बवर काही दावा उगाच करावा आणि त्यात पुराव्याला पाहिजेत म्हणून कागदाच्या मालकाला समन्स करून कोर्टात कागद आणवावे. मग तेथे सहीशिक्याच्या नकला घ्याव्या आणि या नकला मिळाल्या म्हणजे वादीने दावा काढून घ्यावा !

(१२)

पंडितमहाराज यानी खोटा पुरावा गोळा करण्याचे काम सरास सुरू केले असे पाहिल्यावर तो खेळ त्यांच्यावरच उलटवावा अशाविषयी टिळकांकडून सहजच प्रयत्न झाले. त्यातील एक गम्मत देण्यासारखी आहे. दत्तविधानाविरुद्ध पुरावा जितका अस्सलात अस्सल मिळेल तितका इष्ट होता. त्याचे दोन प्रकार. एक औरंगाबाद येथील कोणी साक्षीदार मिळाले तर ते व दुसरा प्रकार खुद्द निघोने येथून जी मंडळी आली त्यापैकी कोणी मिळतील ते. औरंगाबाद येथील बहुतेक लोक आधीच टिळकांच्या बाजूचे म्हणून तेथे पंडितमहाराजाना फारसा वाव मिळाला नाही. अगदी हलक्या प्रतीचे अविश्वसनीय असे चार दोन मिळाले. पण त्यांच्याकडे स्वतः पुरावा देण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे काम होते ते म्हणजे निघोने येथील टिळकांचे साक्षीदार फोडणे व नवीन बनविणे हे होय. निघोने येथील साक्षीदाराना महत्त्व असे की त्यात दत्तकाच्या पसंतीसाठी औरंगाबादेस आणलेल्या अनेक मुलांचे पालक व आप्त होते. आणि एक मुलगा पसंत करून घेतल्याने बाकीच्या मुलांच्या हितचिंतकांची मोठी निराशा झालेली. त्यांच्या मनात मत्सर सहजच असावयाचा.

आपला मुलगा दत्तक न घेतल्यामुळे झालेले नुकसान पंडितमहाराज खोटया साक्षीकरिता लाच देतील त्याने रुपयात आणा पै काही भरून निघण्याची त्याना आशा सुटली होती. आणि औरंगाबाद येथील मंडळीपेक्षाहि दत्तविधानाच्या वेळी हजर असण्याचा यांचाच संभव अधिक म्हणून "आम्ही हजर होतो पण दत्तविधान मुळीच झाले नाही" असे त्यानी सांगितल्यास पुष्कळ उपयोग होण्यासारखा होता. पण याहि पेक्षा टिळकांवर खरी मात व्हावयाची तर दत्तक मुलगा जगन्नाथ याचे वडिल भाऊसाहेब निघोनेकर यानीच जर झटले की कागदपत्र व वाग्दानप्रतिग्रह झाले पण प्रत्यक्ष दत्तविधान असे झाले नाही तर तो रामबाणच होय. पण भाऊसाहेब फुटतील काय? या प्रश्नाचे होय असे धाडशी उत्तर औरंगाबाद येथील केशव सोनाजी याने पंडितमहाराजाना दिले व त्यानीहि त्यावर विश्वास ठेविला. कारण पंडितमहाराजहि धाडशीच होते. दाम करी काम या ह्मणीवर त्यांचा विश्वास होता. पैशाने राजाची राणी मिळते तर दत्तक मुलाचा बाप वश का होऊ नये? कोणी आपला मुलगा दत्तक देतो तो केवळ पुण्य जोडण्याकरता नव्हे तर आपले व मुलाचे हित साधण्याकरता. आणि तेच हित जर दत्तक न देता किंवा दिलेला नाकबूल करून साधत असेल तर कोणी का न साधील? या सरळ युक्तिवादावर विश्वास ठेऊन पंडितमहाराजानी आपला उद्योग चालविला होता. जगन्नाथाचा बाप भाऊसाहेब फुटला तर केवढी मोठी अजब शिकार साधली? पण या शिकारीचा बेत पंडितमहाराज व केशव सोनाजी यांच्या मनात येण्याला झाले तरी टिळक पक्षाच्या काही करामती लोकांचे चातुर्य व धाडसच कारणीभूत झाले. निघोनचे साक्षीदार मिळविण्याच्या नादी केशव सोनाजी लागलेला पाहून एक पक्के कारकून व निघोनचे आप्पाराव कुळकर्णी यानी गमतीचा कट केला. कारकुनाने बहाणा केला की आपण पंडितमहाराजांचे नोकर आहो आणि आप्पाराव यानी असा बाहाणा केला की आपण भाऊसाहेब निघोनेकर यानाच फोडतो व निघोनेचे इतर साक्षीदार टिळकावर उलटवितो. या पराक्रमाची किंमत पाचहजार रुपये ठरली. कारकून पाळतीवर राहिले व पंडित महाराज केशव सोनाजीशी पहिले बोलणे करून औरंगाबादेहून कोल्हापुरास गेले. असे कळल्यावर एक दिवस कारकून दत्त म्हणून केशव सोनाजी पुढे जाऊन उभे राहिले व म्हणाले पंडितमहाराज व त्यांची मंडळी कोठे आहेत? केशव सोनाजी म्हणाला ते कोल्हापुरला केव्हाच गेले. त्यावर हेलपाटा पडल्याचे दुःख दाखवून कारकून म्हणाले मग मला कशाला त्यानी उगाच येथे बोलावले? तेव्हा केशव सोनाजीने विचारले तुम्ही त्यांचे कोण? कारकून म्हणाले मी त्यांचा कारभारी. तेव्हा केशव सोनाजी पुढे ह्मणाले हे खरे कशावरून? तेव्हा कारकुनानी खुणेचे ह्मणून असे शब्द सांगितले की "खर्चाकरिता पाचशे रुपये तुमच्या जवळ ठेवले आहेत त्यातला खर्च करा व कामास लागा." ही गोष्ट खरीच होती. तेव्हा केशव सोनाजीला विश्वास पटला. मग कारकून म्हणाले "सगळे मनासारखे घडून येत आहे तर विलंब का करता? पंडितमहाराजाना तार करून पैसे घेऊनच

बोलवाना. " केशव सोनाजीला ही गोष्ट पटली व त्याने तार केली की 'काम झाले किंमत घेऊन या.' अजूनहि केशव सोनाजीला थोडा अंदेशा होता. पण तारेचे उत्तर जेव्हा पंडितमहाराजांकडून खूण पटण्यासारखे आले तेव्हा कारकुनाच्या सच्चेपणाविषयी केशव सोनाजीला शंकाच उरली नाही. पण नंतर पंडितमहाराज स्वतः येऊन औरंगाबादेस दाखल झाल्यावर कारकुनाच्या सोंगाला पडद्यात जावे लागले. कारण केशव सोनाजी फसला पण पंडितमहाराजांची व या कारकुनाची जन्माची ओळख! मात्र आप्पाराव कुळकर्ण्यांची व पंडितमहाराजांची ओळख नव्हती. फार काय केशव सोनाजीचीहि नव्हती. तथापि परस्पर चौकशी करून आप्पाराव हा निघोनेचा कुळकर्णी खरा इतकी माहिती त्याना मिळाली होती. म्हणून पुढे त्याची गाठ घालून देऊन कारकून मागे सरले. कुळकर्ण्यांच्या सल्ल्याप्रमाणे केशव सोनाजी याने कोल्हापुरास तारा केल्या व पंडितमहाराजानीहि त्यांची उत्तरे तारेने दिली. याच तारा नंतर टिळकानी हस्तगत केल्या त्या पुढे परिशिष्टात दिल्या आहेत. ठरल्याप्रमाणे पंडितमहाराज रक्कम घेऊन केशव सोनाजीकडे आले. आप्पाराव कुळकर्णीहि जातच होता. शेवटी असे ठरले की सर्व रक्कम मोजून पंडित महाराजानी आप्पारावाच्या पदरात टाकावी आणि मग आप्पारावानी भाऊसाहेब याना पंडितमहाराजाना नेऊन भेटवावे. आप्पाराव केशव सोनाजीच्या घरी गेला तो पंडित महाराज रुपये मांडून बसलेच होते. ते म्हणाले ही आपली रक्कम मोजून घ्या. आप्पारावाने कपट केले खरे. पण ते पुरे पाडण्याइतके धाडस त्याच्या अंगी नव्हते. अधिक धाडसी मनुष्य ती रक्कम घेऊन पावती देऊन निघून येता. पण ती रक्कम पाहूनच आप्पाराव भ्याला. केवळ आपल्या धाडसाचे योग्य मोजमाप म्हणून त्याने शंभर रुपये उचलून खिशात घातले आणि म्हणाला 'रक्कम तुम्हीच ठेवा ती पळून थोडीच जाते? वाणगी म्हणून हे शंभर रुपये घेऊन जातो.' हा निस्वार्थीपणा व विश्वास पाहून भाऊसाहेब हे आपणाला आता लाभले आणि टिळक फजित झाले असे वाटून पंडितमहाराजानी टाळी वाजविली. आप्पारावाने एका मुठीत रुपये घेतले पण दुसऱ्या मुठीत त्याने आपला जीव घेतला होता! कारण कपटाचा यत्किंचित सुगावा लागला तर काय होईल याची त्याला कल्पना होती. केशव सोनाजीचे दुकान हत्याराचे पंडित महाराज धाडसी आणि औरंगाबाद ही मोगलाई! म्हणून श्वापदाच्या गुहेतून बाहेर पडावे त्याप्रमाणे आप्पारावाला केशव सोनाजीच्या अंधाऱ्या घरातून बाहेर पडल्यावर वाटले. रस्त्याला लागल्यावर त्याच्या तोंडाची कळी उमलली. तो प्रथम हलवायाकडे गेला. चार रुपयाचे पेढे पदरात बांधून घेतले आणि आपला विजय कारकुनाच्या तोंडावर मिरविण्याकरता धड नीट न बोलता येईल इतके पेढे एकदम तोंडात कोंबून कारकुनाची त्याने गाठ घेतली व त्याच्या हातावर चार पेढे ठेवले. कारकुनाला पेढे कसले याची कल्पना होती. पण रुपये कोठे आहेत असे विचारता त्याने खिशातले शंभर रुपये काढून पुढे ठेवले. तेव्हा कारकून म्हणाला 'काय शंभरच?' कुळकर्णी म्हणाला

' चार हजार रुपये पुढे मोजून ठेवले पण माझी छाती होईना. ' तेव्हा कारकून म्हणाला ' हा दळभद्या. समुद्रात राहून शंख कोरडा तो हा असाच ! पंडित-महाराजाना जगन्नाथाचा बाप हवा होता. तो बापापरी बाप गेला आणि चार हजार रुपये गेले म्हणून बोंबलताना ओठ गेला अशी व्हायची वेळ आली होती ती व्यर्थ घालविलीस ! "

( १३ )

खोटी साक्ष देणे व ताईमहाराजाना अटकेत ठेवणे या दोन आरोपाबरोबर तिसरा एक आरोप जमला तर टिळकांच्या अंगी लावण्याचा क्लेमंट्स् साहेबांचा विचार होता. तो आरोप म्हणजे पंडितमहाराजाना हाताला धरून वाड्याबाहेर काढणे हा. पैकी त्याना वाड्याबाहेर घालविले ही गोष्ट स्वतः टिळकानीच कबूल केली. प्रश्न हाताला धरून बळजबरीने बाहेर घालविले की नाही इतकाच होता. या संबंधाने ताईमहाराज यानी आपल्या पुरता खोटा जबाब देऊन सूतोवाच करून ठेवले होते. त्या आपल्या जबानीत म्हणाल्या " टिळकानी बाळामहाराजांचा एक हात धरला. मी बाळामहाराजांचा दुसरा हात धरला होता. मी धरलेला हात धरण्यास खापर्डे आले. मी आपला हात काढून घेतल्यावर टिळक व खापर्डे हे बाळामहाराजांचा हात धरून घेऊन गेले." पंडितमहाराज यानीही यासंबंधाने आपल्या जबानीत सांगितले की, " खापर्डे व टिळक आत घुसले व त्यानी बाळा-महाराजाना धरले." परंतु पंडितमहाराजांचे स्वतःचे कारकून शिवराम नरहर यानी आपल्या यजमानाना दगा दिला. टिळक व खापर्डे यानी बाळामहाराजाना हाताला धरून काढले असे सांगितले तेव्हा कोर्टाने त्याना मुद्दाम सूचक प्रश्न विचारला तो असा "बाळामहाराजाना घरातून बाहेर काढताना त्यांच्या अंगाला टिळक व खापर्डे यानी स्पर्श केला की नाही ? " तथापि कारकुनाने सांगितले की " त्यांच्या अंगास स्पर्श केल्याचे मी पाहिले नाही. " यामुळे यजमानाच्या साक्षीपेक्षा त्यांच्या कारकुनाच्या साक्षीला अधिक महत्त्व द्यावे लागले व त्यामुळे बाळामहाराजाना हात धरून बळजबरीने बाहेर काढले हा आरोप ठेवता आला नाही.

( १४ )

पंडितमहाराजांची साक्ष चालू असता त्यानी आपणाला वाड्यातून हाकलून कसे दिले याचे मोठे रसभरित वर्णन केले. त्यात टिळक खापर्डे व ते स्वतः यांचे काय बोलणे झाले ते दिले आहे. ते असेः—" टिळक व खापर्डे यानी मला सांगितले की तुम्ही दत्तविधान करू नका. आम्ही तुम्हाला करू देणार नाही. याच प्रकारची आणखी भाषा झाली. पुढे मी करणार म्हणून जेव्हा सांगितले तेव्हा खापर्डे मला म्हणाले की ' वाचन्ते शुंधामि प्राणन्ते शुंधामि ' असे तुमचे होईल. याचा अर्थ यज्ञपशूची जी स्थिति होते तशी आपली स्थिति करू असा मी समजलो.'' खोट्या साक्षीला पूर्वमीमांसेचा मोठाच उपयोग झाला म्हणावयाचा ! दादासाहेब सहजा-सहजी भलताच दाखला देणारे नव्हत.

( १५ )

ताईमहाराजांची साक्ष प्रथम त्यांच्या वाड्यात व्हावी असे ठरले. कारण सरदार घराण्याची बाई घरातून उठून कशी जाणार ? हा आग्रह क्लेमंट्स् साहेबानी मान्य केला. त्याप्रमाणे वाड्यात कोर्ट भरणार म्हणून खूप दंगल माजली. छते वगैरे लावण्यास सुरवात झाली. परंतु आम्ही साक्ष वाड्यात घेऊ देणार नाही हायकोर्टाकडे अपील करू अशी टिळकांच्या वकीलानी तक्रार केल्यावरून डिस्ट्रिक्ट जज्जांच्या बंगल्यात साक्ष घेण्याचे ठरले. पहिले दिवशी बाईच्या मनात साक्ष देण्याचे नव्हते. म्हणून त्या आजारी असल्याचा बहाणा सुरू झाला. बाकीच्या पडदपोशीबरोबर व नोकरचाकराबरोबर लष्करातील एक डॉक्टरीणबाई हजर ठेवली होती. त्यानी आज नको बाईना ताप आला आहे असे सांगण्यात आले. पण ताप खरा की खोटा हे पाहणार कोण ? अर्थात् लष्करातील डॉक्टरीण ! पण सरकारी बॅरिस्टर मि. स्ट्रँगमन यानाहि त्या दिवसाचे काम विनाकारण थांबवावे हे बरे वाटेना. म्हणून ते म्हणाले 'ताप खरोखर किती आहे हे पाहून सांगा.' तेव्हा थर्मामिटर लावून काही वेळाने बाहेर काढून डाक्टरीणबाईने सांगितले की 'ताप १०४ आहे.' स्वतः स्ट्रँगमन याना बाईच्या तोंडावर ताप दिसेना. तेव्हा गोऱ्या डॉक्टरीण बाईवर अविश्वास ठेवण्याचे पातक पत्करून ते म्हणाले "द्या तुमचा थर्मामिटर माझ्या हाती पाहू व तो हातात घेऊन पाहतात तो ताप नार्मल! तेव्हा चिडून जाऊन स्ट्रँगमन यानी ही गोष्ट कोर्टाच्या नजरेला आणली ! तथापि त्या दिवशी साक्ष न घेण्याचे कोर्टाने मनातून ठरविले होते. त्याप्रमाणे अधिक वाच्यता न करिता त्यानी साक्षीचे काम दुसऱ्या दिवसावर टाकले.

( १६ )

निघोन्याहून साक्षीदार आले त्यात नारायण पांडुरंग नांवाचा एक साक्षीदार होता. त्याने असा आव आणला की आपण मोठे शास्त्री पंडित आहो. सर तपासणीत त्याने असे सांगितले की 'मला पोटापुरते ब्रह्मकर्म येते.' तेव्हा त्याचे पांडित्य बाहेर काढण्याकरिता टिळकानी उलट तपासणीत त्याला विचारले की 'ब्रह्मकर्म म्हणजे काय ?' तेव्हा त्याने उत्तर दिले की 'जो ब्रह्म करील ते ब्रह्म !' यानंतर त्याची अधिक परीक्षा घेण्याकरिता टिळकानी विचारले 'तुझे पूर्व पुरुष तुला माहीत आहेत ?' तेव्हा तो म्हणाला 'पितृ पितामह प्रपितामह हे माहीत आहेत.' टिळकानी विचारले 'त्यांची नावे सांगा.' तेव्हा त्याने नारायण पांडुरंग रामचंद्र अशी नावे सांगितली ! स्वतःला बाप बनविला बापाला आजा बनविला आजाला पणजा बनविला ! अशी फजीति झाल्यावर त्याने पुढे तर्पणासुद्धां प्रत्येक गोष्ट विचारावी ती येत नाही असे सांगण्याचा परिपाठ ठेऊन आपला बचाव करून घेतला. निघोने हा गाव मागसलेला होता. तेथे साधा भिक्षुकहि मिळणे फार कठीण होते. मग टिळकांच्या प्रश्नापुढे टिकाव धरणारा विद्वान कोठून मिळणार ?

(१७)

मऊ लागले म्हणजे कोपराने खणावे त्याप्रमाणे टिळकांविषयी मनात द्वेष असणारा न्यायाधीश मिळाला तेव्हा त्याच्यापुढे टिळकासंबंधाने काय वाटेल त्या गोष्टी सांगाव्या असा मोह फिर्यादी पक्षाला सहजच पडला. पण हा मोह कोठवर गेला व मऊ म्हणून खणणारे स्वतःच जमिनीत कसे गाडले गेले याची लोकाना नीट कल्पना होणार नाही. तो प्रकार असा की टिळकाना वाईट ठरविताना ताई-महाराजांची मजल आपली स्वतःची बेअब्रू आपल्या हाताने करून घेण्यापर्यंत गेली. जगाने ती गोष्ट ताईमहाराजानी किंवा इतर कोणी शपथेवर सांगितली तरी खोटी मानली नाही ही गोष्ट वेगळी. पण या मोहात ताईमहाराजानी स्वतःचा अधःपात करण्यापर्यंत उडी कशी घेतली हे पाहिले म्हणजे त्यांच्या साहसाचे आश्चर्य वाटते. टिळकांवर बाईला वाड्यात अटक केल्याचा तर एक आरोप होता. पण त्यात काहीच नव्हते. औरंगाबादेहून लिहिलेल्या बनावट पत्रात या पुढची पायरी अशी आढळेल की, 'टिळकानी मुसलमान शिपाई त्यांच्या खोलीच्या दरवाजावर पाहऱ्याला ठेवला.' जणुकाय मराठ्या शिपायाच्या हातून या मूठभर बाईवर पाहरा गाजविताच आला नसता! पण आणखी थोडे पुढे जाऊन या बनावट पत्रात असे लिहिले आहे की 'टिळक माझेवर नागव्या तरवारीचा पाहरा ठेवणार आहेत व तसे करण्याला ते चुकणार नाहीत.' पण या पुढे आणखी एक पायरी आहे ती ही की, 'औरंगाबाद येथील मुक्कामात टिळकानी ताईमहाराजावर बलात्कार केला!' पण ही गोष्ट प्रत्यक्ष ताईमहाराजानी कशी सांगावी? म्हणून एकाच गोष्टीचे दोन वेगवेगळे भाग करून दोन वेगवेगळ्या तोंडून ते वदविले. हेतु हा की जाणत्या माणसाने त्या दोन्ही साक्षी वाचल्या म्हणजे काय घडले असेल याची कल्पना बरोबर पटावी. हे दोन साक्षीदार म्हणजे ताईमहाराज व त्यांच्याबरोबरची ब्राह्मण बाई गोदु या होत. पैकी ताईमहाराजांच्या जबानीतील यासंबंधाची काही वाक्ये खाली दिली आहेत. "त्या दिवशी टिळक मला पुन्हा रात्री भेटले होते. त्यानी शिपाई बोलविण्यास पाठविला. त्यानी खालचे हॉलात मला निजण्यास बोलाविले. मी खोलीत जाऊन निजले. खोलीचे दार उघडे होते. दार लावू नका असे टिळक म्हणाले होते. खोलीच्या दरवाजापुढे हॉलात टिळक होते. खोलीत माझे सोबतीस गोदु व पार्वती नव्हत्या." यानंतर याचसंबंधाने गोदुबाईच्या साक्षीत वाक्ये आली आहेत ती जशीच्या तशी खाली दिली आहेत. "मी रात्री वरती निजले होते. दुसरे दिवशी ताई-महाराज त्यांच्या माडीतून स्वयंपाकघरातून सकाळी आठ वाजता खाली परसाकडेला गेल्या. स्वयंपाक घर खाली होते. माझे त्यांचे कांही बोलणे झाले नाही. परसाकडून त्या घर आल्या व आमच्या माडीत जरा वेळ निजल्या. मग मी वर गेले. त्याना झोप लागली नव्हती. तेव्हा मी त्याना विचारले "तुम्ही रात्री इकडे निजायला आला नव्हता." त्या म्हणाल्या "तुला सांगता येत नाही." मीहि त्यास सांगण्याचा आग्रह केला नाही." या जबान्या झाल्या त्या दिवशी कोर्टातून घरी आल्यावर

टिळक रागाने इतके लाल झाले होते की तसे लाल झालेले एरवी कोणी केव्हा पाहिले नव्हते. ते इतकेच म्हणाले की 'एखादी बाजारबसवी स्त्री देखील आपली बेअब्रू आपल्या तोंडाने कबूल करीत नाही झाकून ठेवते. पण एवढ्या मोठ्या सरदार घराण्यातील ही स्त्री निष्कारण आपली बेअब्रू आपल्या तोंडाने खोटे बोलून दाखविते तेव्हा तिला धिःकार असो!' वास्तविक टिळकांवर असले आरोप न करिताहि दत्तक प्रकरणाचे काय व्हावयाचे ते झाले असते. पण हातात साहेब सापडला तेव्हा काय वाटेल ते सांगितले तरी तो खरे मानणार अशा बुद्धीने बाईंनी शेणखळ्याच्या खाचीत उडी घेऊन त्याच्या चुळा टिळकांच्या अंगावर थुंकल्या. यात बाईंनी काय मिळविले हे वाचकच आपल्या मनाशी ठरवतील.

## (१८) टिळकांचे स्वतःचे उद्गार

ताईमहाराज प्रकरणाचा अखेर निकाल लागल्यावर टिळकाना सहजच हायसे वाटले असेल. त्यांच्या अंतरंगातील खरे उद्गार निघण्याची तीच वेळ होती. आणि त्या वेळी त्यानी जे उद्गार काढले ते मननीय आहेत. ते म्हणाले "या खटल्याने गेली १४ वर्षे माझी बुद्धि व शक्ति बरीच खाऊन टाकली. अखेर बरी झाली म्हणून ठीक. तरी पण आनंद झाला असता हसणें व दुःख झाले असता रडणे या निवळ माकडचेष्टा आहेत असे समजून आपण आपले काम मात्र अखंड करीत राहिले पाहिजे." या एकंदर प्रकरणासंबंधाने हायकोर्टापुढील फौजदारी खटल्यातील निकालानंतर स्वतः टिळकानी केसरीत ता. ८ मार्च रोजी अग्रलेख लिहिला तो याखाली दिला आहे. तीन वर्षे तोंड दाबून घेऊन बुक्यांचा मार टिळकांनी सोसला होता. ज्वाला बाहेर पडण्याला वाव नसल्याने आग आतल्या आत धुमसत होती. अर्थात् हायकोर्टाच्या निकालामुळे फौजदारी सर्व छपन्न आरोप कायमचे निकालात निघाल्याने टिळकांच्या अंतरंगातली आग ज्वालामुखीच्या उच्छ्वासाप्रमाणे बाहेर पडली असल्यास नवल नाही. टिळक लिहितातः—

### अखेर खरे तेच टिकले!

अदण्ड्यान् दण्डयन् राजा दण्ड्यांश्चैवाप्यदण्डयन्
अयशो महदाप्नोति नरकं चैव गच्छति ॥ मनु. ८; १२८.

आज दोन अडीच वर्षे रा. टिळक यांच्यावर केसरीकार म्हणून नव्हे तर आपल्या एका स्नेह्याचे ट्रस्टी या नात्याने जे संकट आले होते ते परमेश्वरकृपेने मुंबई हायकोर्टाचे चीफ जस्टिस सर लॉरेन्स जेन्किन्स आणि मि. ज. बॅटी यांच्या हस्ते गेल्या गुरुवारी निवारण झाले आणि वरील श्लोकात मनूने म्हटल्याप्रमाणे आमच्या सरकारास दुर्यशाच्या व नरकाच्या प्राप्तीचे जे साधन होणार होते ते नाहीसे होऊन अखेरीस सत्याचा जय झाला याबद्दल प्रथम परमेश्वराचे आणि नंतर वर सांगितलेल्या दोघा न्यायमूर्तींचे मनःपूर्वक आभार मानणे जरूर आहे. या खट-

त्याचा अव्वलपासून अखेरपर्यंत जर इतिहास पाहिला तर सडकेने चालणाऱ्यास देखील प्रसंगविशेषी ठेच लागून पूर्वकर्माची झडती कशी करावी लागते हे स्पष्ट दिसून येते. मनुष्य आपल्याकडून निरपेक्षबुद्धीने स्नेह्याचे काम करीत असताहि त्याच्यावर अकस्मात् काही कज्याळ उपस्थित व्हावे आणि देवतांस होम करीत असता हात जळण्याचा प्रसंग यावा हा एक कर्मगतीचा विचित्रच भाग समजला पाहिजे आणि अशा प्रसंगी ईश्वरावर भरंवसा ठेवून व सुखदुःख समान मानून आलेल्या अरिष्टाच्या निवारणार्थ जे उपाय करणे शक्य असेल तेवढे करण्यापलीकडे मनुष्याच्या हातात काही एक राहात नाही. असले प्रसंग कोणावरहि वारंवार येतात असे नाही. पण ते जेव्हा येतात तेव्हा 'कर्मणो गहना गतिः' या वाक्याची लोकास आठवण दिल्यावाचून सोडीत नाहीत. जगात सुखदुःख नेहमी सारखेच असते असे नाही. आणि ती सुखदुःखेहि या जन्मातील आपल्या कृतीमुळे उत्पन्न होतात असेहि नाही. अशा प्रकारच्या सुखामध्ये आसक्ति आणि दुःखामध्ये उद्विग्नता न बाळगून परमेश्वराला शरण जाणे हेच आपले कर्तव्य होय आणि त्यास स्मरूनच या लेखाच्या आरंभी ज्याच्या इच्छेने हे संकट उत्पन्न झाले व ज्याच्याच प्रेरणेने त्याचा लय झाला त्याचे आभार आम्ही मानले आहेत. परंतु एवढ्याने आभार मानण्याचे काम संपले असे नाही. स्नेह्याकरिता निरपेक्षबुद्धीने काम करीत असता केसरीकारावर जे संकट ओढवले ते आपल्यावरच संकट आले आहे असे समजून महाराष्ट्रातीलच नव्हे तर हिंदुस्थानातील ठिकठिकाणच्या लोकानी जी सहानुभूति व्यक्त केली आणि हायकोर्टाचा अखेर निकाल झाल्यावर गेल्या दोन चार दिवसात धार्मिक सामाजिक किंवा राजकीय बाबतीत ज्यांची मते आमच्याहून भिन्न आहेत अशा बऱ्याच गृहस्थांकडूनहि आमची या संकटातून सुटका झाल्याबद्दल ज्या अभिनंदनपर तारा किंवा पत्रे आली त्या सर्वांचे आम्ही–केसरीकार व रा. टिळक या दोन्ही नात्याने–अत्यंत आभारी आहो. रा. टिळक यांजवर आलेले संकट त्यांच्या समजुतीप्रमाणे खासगी व्यवहारातील असल्यामुळे त्यांच्या मित्रानी त्यास जे द्रव्याचे साहाय्य करण्याचे योजिले होते त्याचा त्यास स्वीकार करता आला नाही. तथापि तेवढ्यामुळे ज्यानी हे साहाय्य करण्याचे मनात आणले होते त्यांच्या सहानुभूतीची किंमत कमी होत नाही. इतकेच नव्हे तर अशा प्रकारची सहानुभूति ज्यानी व्यक्त केली त्यांचे उपकार त्यांची मदत स्वीकारल्याने जास्त झाले असते असे नाही अशी आमची समजूत आहे. टिळक यांजवर ओढवलेल्या संकटात हिंदुस्थानातील पुष्कळ लोकांची सहानुभूति एकत्र झाली. हा सार्वजनिक दृष्टया बराच महत्त्वाचा फायदा झाला असे म्हणण्यास हरकत नाही. खासगी गोष्टीपासूनहि कित्येक वेळा सार्वजनिक लाभ होत असतो तो याच रीतीचा होत असतो. शेवटी हा सर्व योगायोग जुळवून आणण्याकरिता ज्या गृहस्थानी विकारवशतेने म्हणा किंवा स्वार्थपरायणबुद्धीने म्हणा सुरवात केली त्यासहि दोन्ही हात जोडून नमन करणे जरूर आहे. दुर्जनाना अशा रीतीने वंदन करून या खासगी खटल्याच्या महत्त्वासंबंधाने टिळक म्हणतातः—

सरकारी कोळसा

"असो; आजपर्यंत खोट्या प्रतिज्ञेचे खोट्या दस्तऐवजाचे किंवा खोटा पुरावा केल्याचे आरोप अनेक लोकांवर आलेले आहेत व त्यातून कित्येकास शिक्षा झाल्या आहेत व कित्येक सुटलेहि आहेत. असे असता हल्लीच्या खटल्यासच विशेष महत्त्व का आले याचा थोडा विचार केला पाहिजे. कित्येकांचे असे म्हणणे पडले की टिळक या खटल्यात सापडल्यामुळे या खटल्यास महत्त्व आले. ही गोष्ट काही अंशी खरी असेल पण तेवढ्याने वरील प्रश्नाचा उलगडा होत नाही. आमचे असे मत आहे की या खटल्यास महत्त्व येण्यास आमचे सरकार हेच कारण होय. ताईमहाराज ही फर्स्टक्लास सरदाराची बायको होती. पण तिच्या भ्रतारानेच ज्या अर्थी आपल्या पश्चात् ट्रस्टींची नेमणूक केली होती त्या अर्थी तिचे कल्याण तिच्यापेक्षा ट्रस्टीसच जास्त कळण्याचा संभव होता आणि एवढ्याकरता ट्रस्टीच्या आणि ताईमहाराजांच्या दरम्यान तंट्यात ताईमहाराजांसारख्या तरुण विधवेस कोणीच महत्त्व दिले नसते. नागपूरकर तर बोलून चालून बारा रुपयांचा कारकून ! त्याचे नाव जरी ट्रस्टीत होते तरी एकंदर इस्टेटीची व्यवस्था कोणत्या तंत्राने चालवावी हे ठरविण्याचे काम त्याहून निराळ्या ट्रस्टीकडे असावे या हेतूनेच इतर ट्रस्टी नेमले होते हे उघड आहे. सारांश, बाबामहाराजांच्या इच्छेप्रमाणेच जर त्यांच्या इस्टेटीची व्यवस्था मागाहून चालली असती तर ताईमहाराज व नागपूरकर यांचे महत्त्व कोणत्याहि प्रकारे राहिले नसते व यदाकदाचित् कोर्टात जाण्याचा प्रसंग आला असता तर कोर्टानेहि या प्रश्नाचा असाच निकाल लावला असता. परंतु ताईमहाराज व नागपूरकर या सोन्यागंधकात सरकारी कोळशाची भर पडल्यामुळे या मिश्रणाचा परिणाम ज्वालाग्राही होऊन त्यामध्ये इतर ट्रस्टींची होळी पडते की काय अशी भीति वाटत होती. पण सर लॉरेन्स जेंकिन्स व मि. ज. बॅटी यांनी आपल्या धीरोदात्तवृत्तीने न्यायदेवता जागृत करून तिच्या कृपादृष्टीच्या वर्षावाने तो योग टाळून सर्वांस शांत केले आहे. अशा वेळी या खटल्यासंबंधाने जे दोन तीन सार्वजनिक प्रश्न उपस्थित होतात त्यांचा येथे विचार करणे गैरवाजवी होणार नाही असे समजून आज त्या संबंधाने आम्ही दोन शब्द लिहीत आहो.

कुटाळ–ऊर्फ पा–जी मंडळ

'गांव आहे तेथें म्हारवडा आहेच.' या म्हणीप्रमाणे आमच्या पुणे शहरातहि बाण कवीने म्हटल्याप्रमाणे काही ' अकारणाविष्कृत-वैर-दारुणाः' असे उपद्व्यापी लोक आहेत. ही मंडळी असुकच एका मताची किंवा पक्षाची आहे असे नाही. म्हणजे ते सर्व सुधारकहि नाहीत आणि धर्माभिमानीहि नाहीत, अथवा सर्व सुशिक्षितहि नाहीत आशिक्षितहि नाहीत. यांच्या मैत्रीचे तत्व निराळेच आहे. ते कोणते म्हणाल तर स्वार्थपरायणता, आणि एखाद्या चांगल्या कृत्यास विघ्न आणण्याची हौस किंवा पुरुषाचा द्वेष करण्याची बुद्धि हे होय. या तत्त्वावर एकत्र आलेली एक लिमिटेड मंडळी आमच्या शहरात आहे; आणि तिचे भागीदार

वकील, व्यापारी, बँकर, काही सुखवस्तु कायदेपंडित तर काही सुशिक्षित व अशिक्षित गृहस्थ आहेत. हे सर्व तरुणच आहेत असे नाही तर ज्यांच्या गोमयपुतळ्या ओंकारेश्वरावर गेल्या आहेत असे आबा दादा किंवा भाऊसाहेबहि यात आहेत. या मंडळीचा उद्योग म्हटला म्हणजे श्रीमत्व्यासानी भारतांत सांगितल्याप्रमाणे " अन्ये मृतस्य क्रीडन्ति दारैरपि धनैरपि " हा होय. नागपूरकर जेव्हा शुद्धीवर होते तेव्हा खापर्डे यास लिहिलेल्या पत्रात अशा मंडळीस त्यानी ' कुटाळ ' ही संज्ञा दिलेली आहे आणि या मंडळीपासून ताईमहाराजास अलिप्त राखण्याबद्दल ते प्रयत्न करीत असत. पण पुढे जेव्हा ट्रस्टींची जबाबदारी न ओळखता ते बिथरून गेले तेव्हा याच मंडळीच्या कटात सामील होऊन ज्या बाबामहाराजानी त्यास वाढविले त्यांच्याशी कृतघ्नपणा करण्यास त्यानी सुरवात केली. नागपूरकर यांनी ही पत्रे कज्जात दाखल झाली आहेत. करिता वरील विधानाच्या सत्यतेबद्दल आता काही शंका नाही. मि. ल्यूकस यानी आपल्या निवाड्यात टिळक यास शत्रू आहेत असे जे म्हटले आहे ते शत्रू हेच होत. यास खऱ्या खोट्याचा फारसा विधिनिषेध नाही. उलट खऱ्यापेक्षा खोट्यासच ते जास्त महत्त्व देतात, व आपला नित्यक्रमहि याच तत्त्वावर चालवितात. आज दोन अडीच वर्षे चालत आलेल्या खटल्याची उभारणी याच मंडळीने केलेली आहे. व त्यांच्याच तत्त्वाने वागणाऱ्या काही बड्या मंडळींचेहि त्यास सहाय्य आहे. ताईमहारांच्या मांडीवर कोणी तरी लवकरच दत्तक देऊन ट्रस्टींनी मोकळे व्हावे, असे सुचविणारे गृहस्थहि हेच; आणि औरंगाबादेस त्यांच्या मांडीवर मुलास दत्तक देऊन येथे आल्यावर त्या कामात काही प्राप्ती झाली नाही असे पाहून नागपूरकर व ताईमहाराज याना उलट भर देण्यासाहि हेच " पा-जी " पंचक किंवा ल्यूकससाहेबानी आपल्या निवाड्यात म्हटल्याप्रमाणे (unscrupulous) लोकांचे मंडळ होय. परंतु या उपद्व्यापी लोकास एवढे पक्के माहीत होते की, केवळ आपल्या प्रयत्नाने टिळक आणि खापर्डे यांच्याशी आपणास सामना देता यावयाचा नाही. याकरिता त्यानी एक अजब युक्ति काढली आणि त्या युक्तीमुळे खटल्याचे स्वरूप अगदी पालटून जाऊन त्यास इतके महत्त्व आले.

**बैलास तांबडी चिंधी**

" ही युक्ति किंवा साधन कोणते म्हणाल तर रा. रा. टिळक यांच्याबद्दल सरकारच्या मनात या कुटाळ मंडळींच्या बुद्धीने वागत असलेला द्वेष हे होय. औरंगाबादेस जे दत्तविधान झाले ते करण्यात टिळकाकडे काही प्रमुखपणा आलेला असला तर तो आगंतुक होता. चारी ट्रस्टींपैकी इस्टेटीशी जर कोणाचा कमी संबंध असेल तर तो टिळक यांचाच होता. फार लांब कशाला? बाबामहाराज वारल्या दिवसापासून तो ता. १५ जुलै १९०१ पर्यंत टिळक हे महाराजांच्या वाड्यात कधी जेवणास देखील गेलेले नाहीत. असे असता या खटल्यात टिळक यांचेच नाव पुढे येऊन त्यांच्यावर सर्व संकट ओढवावे यातील बीज काय

असा प्रश्न आमचे वाचक सहज करतील. दत्तविधानाच्या कामीहि ट्रस्टींच्या सभेत जाण्यापलीकडे प्रथमतः टिळक यानी काही केलेले नाही. व औरंगाबादेस ते गेले तेहि खापर्डे यांच्या आग्रहामुळेच गेले ही गोष्ट नागपूरकर यानी आपल्या साक्षीत कबूल केली आहे. तर मग टिळकांचे नाव पुढे का ? याचे उत्तर आमच्या वाचकाना लवकर समजण्याचा काही मार्ग नव्हता व आम्हासहि ते आजपर्यंत स्पष्ट सांगता आले नाही. पण याचे उत्तर थोडक्यात आहे ते असे की वर सांगितलेल्या " पाजी " पंचकास आपला व्यूह सिद्धीस नेण्यास कोणा तरी समर्थाची जरूर होती. आणि ते सामर्थ्य सरकारच्या अंगी आहे हे त्यास माहीत होते. परंतु सरकार आपल्या बाजूस कसे वळणार ? बाजू काही न्यायाची नव्हती. तेव्हा या मंडळाने अशी युक्ति केली की, सरकारास जो मनुष्य अत्यंत अप्रिय आहे असे त्यास वाटत होते त्यांचे म्हणजे टिळकांचे नाव पुढे केले. आणि ताईमहाराजांस ॲस्टनसाहेबांच्या बंगल्यावर पाठवून त्यांच्यापुढे दीनवाणीने " टिळकानी केलेला मुलगा मला पसंत नाही. टिळक आग्रही आहेत. करिता मला साहेबांखेरीज कोणी आता त्राता राहिला नाही " अशी रड गायली ! पंडितमहाराज व येथील कुटाळ मंडळी यांच्या कपटनाटकाची ही पहिली प्रस्तावना होय. ॲस्टन साहेबांपेक्षा कमी दुराग्रही किंवा विकारवश अंमलदार जर एजंटच्या जागेवर त्या वेळी असता तर ही युक्ति या मंडळीच्या गळ्यातच आली असती. पण ज्या साहेबाने वर्तमानपत्रात एका एडिटराने सरकाराविरुद्ध लेख लिहिला म्हणून त्यास काळेपाण्याची शिक्षा देण्याचे सोडले नाही, तो पुणे मुक्कामी ही मोठी शिकार सरकारच्या घरात घालण्याची आलेली संधी फुकट कशी दवडणार ! इंग्रजीत म्हण आहे त्याप्रमाणे " बैलास जशी तांबडी चिंधी " त्याप्रमाणे या साहेबास टिळकांचे नाव वाटत होते. व त्यामुळे टिळकांवर केलेला हा आरोप खरा किंवा खोटा हे ऐकून घेण्याचीहि त्यास शुद्ध राहिली नाही. त्यातून वर सांगितलेल्या उपद्व्यापी मंडळीपैकी दिसण्यात संभावित अशा काही वयोवृद्ध लोकांची ताईमहाराजाना मदत आहे असे कळल्याबरोबर तर साहेबांचे पित्त अधिकच भडकले व त्यानी असा निश्चय केला की अनायासे हातात आलेली ही बडी शिकार साधून सरकारच्या ऋणातून सुटून आपण कृतकृत्य व्हावे. ताईमहाराजांसारख्या तरुण विधवेने अनाथ होऊन केलेली विनंति, त्यास अनुकूल असलेल्या संभावित दिसणाऱ्या लोकांची इच्छा व सरकारास अप्रिय झालेल्या टिळकांचा उच्छेद करण्याची संधि, इतक्या गोष्टी एकाच सपाट्याने करण्याची आल्यावर ॲस्टनसारख्या दुराग्रही साहेबाची मती गुंग होऊन गावातील उपद्व्यापी गृहस्थांस त्याचे पुरे पाठबळ मिळाले. व ताईमहाराजांस त्यानी आपल्या पंखाखाली घेऊन त्यांच्या संरक्षणार्थ सरदारांचे एजंट व डिस्ट्रिक्ट जज्ज या दोन्ही नात्याने ते तयार झाले यात नवल ते कोणते ? मुंबई-सरकारास टिळक हे कधीच प्रिय नव्हते. तेव्हा ॲस्टनसारख्या अनुभविक व हुषार जज्जाने पकडलेली शिकार योग्यच असेल असे त्यास वाटणे अगदी साहजिकच आहे.

### कोल्हापूर दरबार

"असो. आमची उपद्यापी मंडळी ॲस्टन साहेबांचे अशा रीतीने सहाय्य संपादूनच गप्प बसली नाही. बाबामहाराजांच्या इस्टेटीचा काही भाग कोल्हापूर संस्थानात आहे. करिता कोल्हापूर दरबाराची अनुकूलता संपादन करणेहि जरूर होते. हे काम पंडितमहाराजानी पतकरिले. ज्या कुलात हे उत्पन्न झालेले आहेत त्या कुलाच्या मानाने पाहिले तर पंडितमहाराजांच्या व्यासंगात आणि कोल्हापूर महाराजांचे धर्मगुरू या नात्याने त्यांच्या अंगात जे गुण असावयास पाहिजेत त्यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. कोल्हापूरच्या महाराजांस ही गोष्ट विदित नाही असे नाही. बाळामहाराज दत्तक होण्यापूर्वी औरंगाबादेस ताईमहाराजांच्या मांडीवर दत्तक दिल्याची सर्व हकीकत कोल्हापूरचे सरकार व त्यांचे कौन्सिल यांच्यापुढे स्पष्टपणे मांडलेली होती आणि अशा स्थितीत बाळामहाराजाने दत्तक होऊ नये असेहि तेव्हा त्यांचे मत होते. पण नेटिव संस्थानचे अधिपती हे प्रायः इंग्रज सरकारच्या धोरणाने चालणारे असल्यामुळे ॲस्टनसाहेबांचे जेव्हा पूर्ण आनुकूल्य पंडितमहाराजांच्या पक्षास मिळाले तेव्हा कोल्हापूर दरबारहि तिकडेच वळले. अशा रीतीने एकदम उलट खाण्यात आपण काही गैर करतो असे आमच्या संस्थानिकांस वाटत नाही ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. अर्थात् कोल्हापूर दरबारहि पूर्वापार विरोध मनात न आणता या उपद्यापी मंडळीस अनुकूल झाले." ही पूर्वतयारी वर्णन करून टिळक पुढे लिहितात

### पहिली झडप

"ही पूर्वीची तयारी लक्षात आणली म्हणजे या कज्जास पुढे जे स्वरूप आले ते कां व कसे आले याचे कारण वाचकांचे लक्षात येईल. ॲस्टनसाहेब यानी स्वीकृत कार्यास चांगल्या रीतीने आरंभ केला. द्रौपदीस ज्याप्रमाणे श्रीकृष्ण हा एकच त्राता दिसत होता तद्वत् ताईमहाराजाना ॲस्टनसाहेबांचा आधार मिळून कधीविधी सल्लाहि मिळत होती ही गोष्ट पुराव्यात आली आहे. पण केवळ ताईमहाराजांचेच काम करावयाचे असते तर ॲस्टनसाहेबांना एवढी खटाटोप करावयास नको होती. प्रोबेटच्या कामात दत्तकासंबंधी गैरलागू प्रश्न पंधरा दिवसपर्यंत टिळक याना विचारू देऊन व बरेच स्वतः विचारून अखेरीस हास्यमुद्रेने तारीख ४ एप्रिल १९०२ रोजी साहेबानी टिळकाना खोट्या प्रतिज्ञेच्या आरोपाच्या चौकशीकरिता कार्व्हालोसाहेब याजकडे पाठविले. आणि इकडे दुसरीकडे कार्व्हालोपेक्षा अधिक शहाणा मॅजिस्ट्रेट या खटल्याची चौकशी करण्याकरता नेमावा अशी ॲस्टनसाहेब यानी सरकारास जी शिफारस केली ती केवळ सरदारकुलातील एका तरुण विधवेचे कल्याण करण्याकरताच केली असे कोण म्हणेल ? पहिली तयारी पाहिली तर ताबडतोब मॅजिस्ट्रेटची नेमणूक होऊन त्याच्याकडून हा खटला ॲस्टनसाहेबापुढे सेशनात जाण्याचा योग होता. पण मध्यंतरी प्रोबेटच्या खटल्यात हायकोर्टाकडे अपील झाल्यामुळे ही गोष्ट टळून खटला लांबणीवर

V2wM56
F3.2
79305

पडला; आणि सरकारास ही शिकार साधून देणारे ॲस्टनसाहेब हायकोर्टातील न्यायाधीशाच्या खुर्चीवर विराजमान झाले !

### पोलिस रिपोर्ट व साठ हजारांचा चुराडा

" ॲस्टनसाहेबानी केलेली कामगिरी किती कायदेशीर होती याबद्दल चीफ जस्टिस यानी आपल्या ठरावात जो उल्लेख केला आहे त्यापेक्षा येथे जास्त टीका करण्याची जरूर नाही. हायकोर्टाच्या निकालाचा सारांश दुसरीकडे दिला आहे तो पहावा म्हणजे झाले. ॲस्टनसाहेब हे आपल्या विकारवशतेमुळे कुटाळ मंडळाच्या व्यूहास कसे बळी पडले हे वर सांगितलेच आहे. पुढील हकीकत याहून चमत्कारिक आहे. ॲस्टनसाहेबानी केलेल्या प्रोबेटच्या निकालावर हायकोर्टात जे अपील झाले त्यामुळे सरकारास या बाबतीत आणखी चौकशी करण्यास काही मदत मिळाली. आणि ॲस्टनसाहेबानी केलेले आरोप कितपत टिकण्यासारखे आहेत याची चौकशी करण्याचे काम या मुदतीतहि मॅजिस्ट्रेटमार्फत पोलिसकडे देण्यात आले. पोलिस चौकशीच्या खात्यात मि. ब्रुइन हे त्या वेळी अंमलदार होते. व त्यानी गुप्त रीतीने पुष्कळ लोकांच्या साक्षी घेऊन या प्रकरणाचा अखेर रिपोर्ट सरकाराकडे पाठविला. हा रिपोर्ट ॲस्टनसाहेबांच्या म्हणण्यास प्रतिकूल व टिळक यांच्या म्हणण्यास अनुकूल आहे. असे रिपोर्ट देण्यास सरकारतर्फे जी टाळाटाळी झाली त्यावरून सहज सबळ अनुमान होते. ब्रुइनसाहेबांचा हा रिपोर्ट आणि ॲस्टनसाहेबानी टिळकावर ठेवलेले आरोप मिळून दोन्ही प्रकारचे कागद व अभिप्राय मुंबईसरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढे या वेळी होते; आणि सरकारास नेहमी कायदेकानूची सल्ला देणारे अंमलदार जर अधिक हुषार किंवा कमी कलुषित मनाचे असते तर हा खटला गर्भातच मेला असता. सरकार जाणून बुजून खोटा खटला उपस्थित करणार नाही अशी आमची खात्री आहे, पण विकारवशता किंवा खालील अधिकाऱ्यांचे अज्ञान अथवा दुराग्रह सरकारचें बाहुले वाटेल तसे नाचवू शकतो याचा बऱ्याच ठिकाणी लोकास अनुभव आलेला आहे. हल्लीचा खटला हे तर त्याचेच एक उत्कृष्ट उदाहरण होय. ब्रुइनसाहेब व ॲस्टनसाहेब या दोघांच्या अभिप्रायापैकी ॲस्टनसाहेब कसलेले न्यायाधीश असल्यामुळे त्यांचाच अभिप्राय वरिष्ठ अधिकाऱ्यांस अधिक मान्य झाला असावा. शिवाय खटला कोणावर तर टिळकांवर. आणि तोहि त्यांची खाजगी वर्तणूक अनीतिची आहे असे ज्यात सिद्ध होणार अशा प्रकारचा ! मग त्यास सरकारकडून मंजुरी मिळण्यास अवकाश तो कोणता ! पहिल्याने एकदम ३० हजारांची मंजुरी मिळाली असे समजते. आणि शेवटपर्यंत हिशेब पाहिला तर एकंदर खर्च ६०।७० हजार रुपयांवर झाला असावा असा अदमास आहे. कारण एकट्या स्ट्रँगमन साहेबानीच जवळ जवळ २५ हजार रुपये लंबे केले आहेत. आणि क्लेमंट्स्साहेब एक वर्षभर याच कामाकरिता नेमले होते त्यांच्या पगाराची एकंदर रकम १० हजारांवर होत आहे ! खेरीज किरकोळ मदतीस सरकारी वकील किंवा त्यांचे पित्ये यांची फी

लागली ती, आणि हायकोर्टात दोनचारदा अर्ज झाले त्यांच्या सुनावणीचे वेळी ॲडव्होकेट जनरल यास द्यावी लागली फी निराळीच. एवढा खर्च करून महाराजांच्या इस्टेटीची निरपेक्ष तऱ्हेने व्यवस्था पाहणाऱ्या टिळकाना तुरुंगात टाकावे असा ताईमहाराज किंवा नागपूरकर यांचा प्रथमतः हेतु नसावा असे मानण्यास कारण आहे. पण ताईमहाराज ॲस्टनच्या व ॲस्टनसाहेब सरकारच्या हातात पडल्यावर मग सर्वच गोष्टी ताईमहाराजांच्या किंवा नागपूरकरांच्या हातात राहिल्या नाहीत. केले एक व झाले एक अशी त्यांची स्थिती झाली. आणि टिळकांवर भडिमार करण्याकरिता खोटा दारूगोळा भरून ज्या तोफा सरकारने तयार केल्या होत्या त्याना बत्ती देण्याचे काम ताईमहाराजाना व नागपूरकराना करावे लागले.

**खटला सरकारी झाला**

"सरकार या कामात काही मुद्दाम पडलेले नाही. इतर फौजदारी खटले ज्याप्रमाणे सरकार चालविते त्याप्रमाणे हाहि आहे असे स्ट्रँगमन साहेबानी एकदा बोलून दाखविले होते. पण हे म्हणणे अगदी चुकीचे आहे. सर्व फौजदारी खटले सरकारच चालविते हे खरे पण फौजदारी कायद्यात सांगिल्याप्रमाणे पोलिसचे वकील किंवा सरकारी वकील यांच्याकडून ते खटले चालविण्यात येतात. हल्लीच्या खटल्यातील प्रकार तसा नाही. पोलिसचा रिपोर्ट टिळक याना अनुकूल पडल्यामुळे म्हणा किंवा अन्य कारणामुळे म्हणा पोलिसांच्या हातून हा खटला काढून त्याकरिता स्वतंत्र बॅरिस्टर नेमून त्याने लीगल रिमेंब्रन्सर याच्या सल्ल्याने काम चालवावे असे ठरले आणि या कामाकरिता मुद्दाम निवडून काढलेले मॅजिस्टेट मि. क्लेमंट्स् यांच्या पुढे आक्टोबर १९०२ महिन्यात या खटल्यास सुरुवात झाली. तेव्हापासून गेल्या आठवड्यापर्यंत म्हणजे १॥ वर्षात सुमारे १२५ दिवस कोर्टाचे काम पुणे मुंबई उमरावती आणि औरंगाबाद इतक्या ठिकाणी चालू होते. या कामात सरकारचे डावपेच टाळण्याकरिता व सरकारतर्फे मुख्य साक्षीदार ताईमहाराज व नागपूरकर यांचा खोटेपणा आणि त्यानी आणलेले दस्तऐवज बनावट आहेत असे स्वभावतःच प्रतिकूल असलेल्या मॅजिस्ट्रेटापुढे शाबीत करण्याकरिता टिळक याना कोणते उपाय करावे लागले आणि काय त्रास सोसावा लागला याचे वर्णन करणे केवळ अशक्य आहे. मि. क्लेमंट्स् साहेबांचा निवाडा म्हणजे मूर्तिमंत

**दुराग्रही तर्कटपणा**

होय. हा तर्कटपणा न समजण्याइतके क्लेमंट्स्साहेब काही मूर्ख नाहीत. तेव्हा हा तर्कटपणा त्यांच्या बुद्धीत विकारवशतेनेच उत्पन्न झालेला असावा असे मानणे भाग येते. यास प्रत्यंतर मि. ल्यूकस यांच्या निवाड्यावरून मिळण्यासारखे आहे. मि. ल्यूकस यानी अखेर टिळकांचे विरुद्धच निकाल दिलेला आहे. पण सदर निकलांत सभ्यतेस सोडून एकहि अक्षर लिहिलेले नाही. उलट ताईमहाराज आणि नागपूरकर खोटे बोलतात त्यानी कोर्टात दाखल केलेले कागद बेभरंवशाचे आहेत व ताईस औरंगाबादेस कोणीहि कोंडून ठेवले नव्हते असा

त्यांनी आपला अभिप्राय स्पष्टपणे नमूद केला आहे. पण क्लेमंट्स्साहेबांकडे पाहावे तर नागपूरकर खोटें बोलला असे जरी त्याना दिसले तरी तो खोटें बोलला ते टिळकांना लाभ व्हावा म्हणून बोलला असें बेशरमपणाचे तर्कट या साहेबानी चालविले आहे! मि. ल्यूकस यानी क्लेमंट्स्साहेबानी केलेली ही घाण नारा आणे काढून टाकल्यामुळे हायकोर्टापुढे अपीलाचे काम चालविणे बरेच सुकर झाले याजबद्दल मि. ल्यूकस साहेबांचेंहि आभार मानले पाहिजेत. पण सरकारने उभारलेला हा राईचा पर्वत हाणून पाडण्यास हायकोर्टांतील न्यायदेवतेच्या तीक्ष्ण शस्त्राचीच अद्याप जरूर होती. आणि ते शस्त्र हा कज्जा सरकारतर्फे चालविला हे लक्षात न आणता किंवा टिळक हे सरकारास प्रिय आहेत किंवा अप्रिय आहेत याचा विचार न करता सरळ आणि निःपक्षपातबुद्धीने चीफ जस्टिस व जस्टिस मि. बॅटी यानी चालविले हे त्यांचे लोकावरच नव्हे तर सरकारावरहि उपकार आहेत. इंग्रजी राज्यातील न्यायाची वरिष्ठ कोर्टे देखील जेव्हा सर्वस्वी सरकारच्या कह्यात जातील तेव्हा हे राज्य जाण्यास विलंब लागणार नाही. अशी आमचीच नव्हे तर इंग्रजी मुत्सद्यांचीहि समजूत आहे. तरवारीपेक्षा सत्याचा पाया अधिक मजबूत असतो. आणि ते सत्य काय आहे हे निवडण्याचे काम सर्वस्वी हायकोर्टाचे आहे. हे काम या वेळी हायकोर्टानें उत्कृष्ट रीतीने बजावले याबद्दल त्याची स्तुति करावी तेवढी थोडीच आहे. ईश्वर करो आणि अशाच प्रकारचें सुप्रसंग सदैव येवोत अशी आमची प्रार्थना आहे.

### याबद्दल जबाबदार कोण?

"असो. ॲस्टनसाहेबांच्या पिशाच्च दृष्टीने उपस्थित होऊन दोन वर्षेपर्यंत चालत आलेल्या खटल्याचा निकाल लागून सरकाराने टिळक यांजवर जे काहूर उसळले होते ते नाहीसे झाले व सत्याचा जय होऊन सरकारची बाजू खोट्या कागदावर व खोट्या साक्षीवर उभारण्यात आली होती हे आता शिक्क्याच्या मापाने सिद्ध झाले आहे. 'एकाच दगडाने दोन पक्षी मारावयाचे' अशी जी म्हण आहे त्याप्रमाणे ताईमहाराजाना बाळामहाराज दत्तक करून देऊन आणि इकडे टिळकांसहि शिक्षा ठोठावून सरकारच्या डोळ्यात सलत असलेला काटा काढावा अशा प्रकारची जी योजना चालली होती ती सर्वांशी पडली गेली. पण एवढ्यानेच या एकंदर प्रकरणाचा निकाल झाला असे आम्ही समजत नाही. न्यायाच्या मिषाने आणि लुच्चे लोकांच्या सहाय्याने एखाद्या गृहस्थाची दाद लागण्यापूर्वी दोन वर्षांपर्यंत एकसारखा छळ व्हावा हे कोणत्याहि राज्यव्यवस्थेस श्रेयस्कर नव्हे व इंग्रजी राज्यव्यवस्थेस तर नाहीच नाही असे आम्ही निर्भयपणे सांगू शकतो. मग ते कोणास कडू लागो वा कोणास गोड लागो. अशा तऱ्हेचे खटले करण्यात रयतेचे ६०।७० हजार रुपये सरकाराने बिनदिक्कत उधळावे आणि त्यास कोणी विचारता असू नये ही दुसरी महत्त्वाची गोष्ट होय. तिसरी मुद्याची गोष्ट अशी की सरकाराने याप्रमाणे आपले वजन आपले सामर्थ्य व आपला पैसा खर्च करून रयतेपैकी एखाद्या गृह-

स्थास सर्वस्वी नागवावे व भंडावून सोडावे आणि सरकारची बाजू खोटी आहे असे राजरोस सिद्ध झाल्यावरहि सदर गृहस्थास आपले नुकसान भरून मागण्याचा काही मार्ग राहू नये! सार्वजनिक कामात पुढारीपणा घेणाऱ्या गृहस्थाची नीतिमत्ता वाईट असते असे सिद्ध करण्याचा सरकारचा जो प्रयत्न होता तो फसला व उलट सरकारच कधी कधी लुच्चे लोकासच हाताशी घेऊन लोकांच्या पुढाऱ्याचा विनाकारण छळ करते हे या कज्जावरून पूर्णपणे सिद्ध झाले आहे. सार्वजनिक दृष्ट्या हा एक फायदाच होय."

## (१९) उपसंहार

टिळकानी अशा प्रकारचे उद्गार काढले तरी ताईमहाराज प्रकरण चालू असता किंवा अखेरचा निकाल लागल्यावर टिळकांचे वर्तन कसे झाले हे पाहणे थोडेसे बोधप्रद आहे. त्यांच्यावर नसते आरोप व भयंकर संकटे प्रतिपक्षाने आणली होती. पण सत्य प्रस्थापित होऊन स्थिरस्थावर झाल्यावर अपकार करणाऱ्या लोकासंबंधाने क्षमेची वृत्तीच त्यांच्या मनात उद्भवली. ताईमहाराजांविषयी टिळकांची काय भावना होती हे पुण्याचे कॉन्ट्रॅक्टर विनायकराव रानडे यानी एका आठवणीत सांगितले ते नमूद करण्यासारखे आहे. ते लिहितात 'खटला चालू असता ताईमहाराजांविषयी ज्या ज्या वेळी उद्गार त्याना काढण्याचा अगर लोकानी काढलेले ऐकण्याची त्याना पाळी येत असे त्या वेळी त्यानी अनुदारपणा दाखविला नाही. इतरानी मर्यादा सोडून त्यांच्याविषयी बोललेले टिळकाना कधी खपले नाही हे मी स्वानुभवाने येथे नमूद करतो. ताईमहाराज ह्या एका उच्च घराण्यातील आपल्या एका मित्राची विधवा आहेत हे लक्षात ठेऊन त्यांचेविषयी बोलण्यास ते सर्वांना सांगत असत.' ताईमहाराज जिवंत असत्या तर टिळकानी त्याना सर्वस्वी क्षमा केली असती की नाही सांगवत नाही. पण त्या येऊन टिळकांचे पाय धरत्या तर घरच्या एखाद्या मुलीप्रमाणे त्याना रागाने चार शब्द बोलून त्यापुढे झाल्या गेल्याची आठवण त्यानी दिली नसती असा संभव आहे. व याला प्रत्यंतर खुद्द नागपुरकराशी झालेले त्यांचे वर्तन. स्वतः नागपूरकरानीच एका आठवणीत असे लिहिले आहे की "प्रतिकूल निकाल लागल्यावर बेळगावाहून पुण्यास येत असता टिळकाना मिरज स्टेशनवर पानसुपारी झाली. त्या वेळी त्यांची माझी सहज भेट झाली. तेव्हा त्यानी माझे हात धरून मला गाडीत घेतले व मला सांगितले की तुम्ही पुण्यास या व पूर्ववत् आपल्या कामास लागा. नुकसान करून घेऊ नका. जरूर या. झाले ते सर्व होऊन गेले! आता नवी विटी नवे राज्य." दसकापूर्वी त्यांचा वाद सुरू असता नागपुरकरांविषयी वाईट मत झाल्याने टिळकानी त्यांच्यावर बरीच बाकी फाजील खर्च केल्याची म्हणून काढली. पण नागपुरकर लिहितात "मी सर्व खुलासा नीट केल्यावर त्या निःपक्षपात बुद्धीच्या सत्यनिष्ठ पुरुषाने माझे सर्व हिशेब पाहून झालेला खर्च मंजूर करून जमाखर्च करून घेतला."

वादाआधी व वाद संपल्यानंतर नागपूरकराशी झालेले टिळकांचे हे वर्तन टिळकांच्या खऱ्या स्वभावाचे एक दर्शक होय.

स्वतः जगन्नाथ महाराजासंबंधाने त्यांचे वर्तन कसे होते हेहि पाहण्यासारखे होते. दत्तविधानानंतर अखेर निकाल लागण्याला पुरी १४ वर्षे लोटली. त्या दरम्यान टिळकानी जगन्नाथ महाराज यांच्या शिक्षणाची आपल्या मुलाप्रमाणे व्यवस्था ठेविली होती. व इस्टेटीतून खर्च मिळत नव्हता तेव्हा पदरचा खर्च त्यानी या कामी केला. या बाबतीत स्वतः जगन्नाथमहाराजानी आम्हाला सांगितले ते असे. "दत्तविधानानंतर एक वर्षाने टिळकानी प्रल्हाद मुरलीधर पानसरे नावाचे एक शिक्षक मला शिकविण्यास ठेविले. त्यांच्या हाताखाली मी पाच सहा वर्षे अभ्यास केला. आणि माझ्या मराठी सात इयत्ता पुऱ्या झाल्या. औरंगाबाद कमिशनला ते पुढे आले तेव्हा मला त्यानी समक्ष बोलावून घेतले विचारपूस केली व चार मंडळीत कसे वागावे हे शिकविले. एका प्रसंगी समारंभात अत्तर कसे लावावे हे माझा हात धरून त्यानी मला शिकविले. टिळक मंडाले येथे गेल्यानंतर माझ्या शिक्षणाची थोडी हयगय झाली. शिक्षणाचा काही काळ माझा खेड्यात गेला. आणि घरी शिकविण्यापेक्षा मला शाळेत घातले असते तर बरे झाले असते असे वाटू लागले. पण लौकरच धुळ्याचे शंकरराव देव हे जांब येथे आले तेव्हा माझ्या शिक्षणाची व्यवस्था धुळ्यास करवा अशी विनंती मी त्याना केली. टिळक मजविषयी मंडाले येथील पत्रांतून मधूनमधून विचारपूस करीत. पण शिक्षणाचा खर्च देण्यापलीकडे त्यांच्या हातून अगर पुण्याच्या मंडळीच्या हातून काही व्यवस्था होण्यासारखी नव्हती. माझ्या शिक्षणाची सोय धुळ्यास झाली हे पाहून टिळकानाहि फार आनंद झाला. धुळ्याच्या वसतिगृहात राहण्याची परवानगी मला मोठ्या कष्टाने मिळाली! मी इंग्रजी शिकू लागल्यावर टिळकांच्या इच्छेप्रमाणे त्याना दोनतीन इंग्रजी पत्रे मी पाठविली. माझे हस्ताक्षर पाहून त्यानी बाबांच्या पत्रात समाधान व्यक्त केले. टिळक मंडालेहून परत आल्यावर त्यानी मला विद्याभ्यासाकरिता स्वतःच्या घरी ठेविले व त्यांच्या दोन मुलाप्रमाणे मला तिसरा मुलगा असे मानून माझी सर्व व्यवस्था त्यांच्या बरोबरीने व स्वतंत्र केली. प्रथम काही दिवस पी. एम. बापट हे मला शिक्षक होते. ओकशास्त्री संस्कृत शिकवीत. पुढे जनार्दन विनायक ओक यानी दीड वर्षपर्यंत घरीच सर्व विषय शिकविले. माझी सातवी इयत्ता झाल्यावर टिळकानी मला मुंबई येथे एज्युकेशन सोसायटीच्या युरोपियन शाळेत ठेविले. हेतु हा की मला विलायतेस जावेसे वाटल्यास या शाळेतील शिक्षकांच्या द्वारे माझी रवानगी व्हावी व तिकडचे शिक्षण व्हावे. आपला उपसर्ग मला लागू नये व माझे नुकसान होऊ नये म्हणून टिळक फार जपत असत. सोसायटीच्या शाळेत मी इतर विषय शिकत असता गावात एन. पॉवेल यांच्या रसायनशाळेत टिळकांचे जावई डॉ. साने हे होते. ते मला टिळकांच्या सूचनेप्रमाणे केमिस्ट्री शिकवीत. टिळक विलायतेहून परत आल्यावर मला त्यानी आश्वासनपूर्वक सांगितले

की ' तुम्हाला काही दिवस आपल्याजवळ ठेऊन खाजगी व सार्वजनिक पत्र-व्यवहार लेखन-वाचन वगैरे विषय थोडेथोडे मी शिकवीन.' पण पुढे ते लौकरच वारल्यामुळे हे सर्व बेत फुकट गेले. " ताईमहाराजप्रकरणी एकंदर ५०।६० हजार रुपये खर्च झाला होता. हा सर्व खर्च जगन्नाथमहाराजांच्या इस्टेटीकरिता झाला असल्यामुळे तो टिळकाना मिळणे न्यायाचेच होते. तथापि इस्टेटीला कर्ज होते सावकार होते हे माहित असल्यामुळे १९१८ साली टिळक विलायतेस जावयास निघे-पर्यंत त्यानी आपली रक्कम वसुल करण्याचा विचार मनात आणिला नव्हता. पण विलायतेस जाताना आपण परत येणार की नाही याची शंका सर्वांप्रमाणेच त्यानाहि होती. यामुळे निघण्यापूर्वी त्यानी ते कलम निकालात काढिले. कारण जगन्नाथमहाराज झणाले 'तुम्ही केलेल्या खर्चाची रकम मजकडून घेण्याची व्यवस्था का कराना?' असे मी म्हणताच ते मला थट्टेने म्हणाले ' एकूण तुमची इस्टेट वेगळी व आमची इस्टेट वेगळी असेच समजता तर मग! मी तुह्माला माझा तिसरा मुलगा म्हटले ते काय?' त्यावर हा व्यवहार आहे असे मी त्याना म्हटले. ते म्हणाले ' ठीक आहे. तर मग असे करा. तुमच्या बंगलाबागेतील जमीन मला लाऊन द्या. मी ती न्यू पूना कॉलेजच्या मंडळीना देण्याचे योजिले आहे. तिची आजची किंमत जर बाजार-भावाप्रमाणे तीस हजार मानिली तर तितकीच मला पुरे. बाकीचे तीस हजार मी तुह्माला माझ्या मुलाप्रमाणे देणगी म्हणून सोडून देतो.'

---

# परिशिष्ट

## ताईमहाराज प्रकरणातील निवडक पत्रे

### (१) श्री. बाबामहाराजांचे मृत्युपत्रातील उतारा

ता. ६ जुलै १८९७

××× तब्यत पटकीचे आजाराने कालपासून नादुरुस्त असून पुढे प्रकृतीचा नेम लागत नाही. करिता दुर्दैवाने प्रसंग आल्यास आमचे पश्चात् आमचे इस्टेटीची सर्व प्रकारे व्यवस्था मी करीत होतो त्याप्रमाणे पाहण्यासाठी आह्मी या लेखाने खालील गृहस्थाना ट्रस्टी किंवा पंच नेमिले आहे. ×××

आमचे कुटुंब सौ. सकवारबाई हल्ली गरोदर आहे. तीस पुत्र न झाल्यास किंवा होऊन तो अल्पायुषी झाल्यास आमचे घराण्याचे नाव चालविण्याकरिता यथाशास्त्र जरूर लागेल तितक्या वेळेस आमचे कुटुंबाचे मांडीवर दत्तक वर लिहिलेल्या गृहस्थांचे ( ट्रस्टी यांचे ) विचारे देऊन त्या मुलाचे वतीने तो वयात येईपर्यंत सदर पंचानी स्थावर जंगम इस्टेटीची व्यवस्था करावी.

### ( २ ) टिळकांचे सबनीस दिवाणाना पत्र

( केवळ खाजगी ) पुणे १८ जून १९०१

कुंभोजकर हे ताईमहाराजाना दत्तकाची परवानगी देण्याबद्दल आपणास अर्ज करतील. दत्तकाची परवानगी केवळ मामुली आहे ( इकडे ब्रिटिश मुलखात ती लागतहि नाही ) फक्त त्याकरिता नजराणा द्यावा लागतो. स्टेट नजराण्याची जी रक्कम ठरवील ती आम्ही देऊ अडचण नाही. तरी ताबडतोब परवानगी देण्याची तजवीज करावी. परवानगी मिळविली असली म्हणजे योग्य मुलगा मिळताच विलंब न लावता दत्तविधान उरकून घेता येते म्हणून विनंति केली आहे. नजराण्याची रक्कम आपण मागाहून देखील ठरवावी. कारण इस्टेट आपल्याच हद्दीत असल्याने रक्कम आपणास वाटेल तेव्हा वसूल करिता येईल. म्हणून ही विनंति आपण महाराजांचे कानावर घालून ताबडतोब दत्तकास परवानगी मिळवून देण्याची व्यवस्था कराल अशी आशा आहे.

### ( ३ ) ताईमहाराज यांचे बनावट पत्र

औरंगाबाद ता. २१ जून १९०१

( या व याखालील पत्राला कोर्टाने बनावट ठरविले. )

आम्ही काल सकाळी येथे येऊन पोहोचलो. जागा चांगली आहे. उदासीनपणाचे कारण समजले. तुमचे नोकरीबद्दल काळजी करू नये असे सांगितले होते. दादासाहेब व टिळक यांस सवडीने सांगेन. तुम्ही कोल्हापुरास जाऊ नये. तुम्ही आपले काम करावे. तुमचेसंबंधाने दोघांचे मत फार वाईट आहे. तुम्ही बाळामहाराज यास पुण्यास आणणार पंडितमहाराजास इकडे पाठविणार असे ते म्हणत होते. तसे तुम्ही करणार नाही असे त्याना सांगितले आहे. काल दोनप्रहरपासून रात्रीपर्यंत दत्तकाची वाटाघाट चाललेली होती. मी बाळामहाराज मुलगा घेत असेन तर आम्ही दत्तकाबद्दल तुम्ही म्हणेपर्यंत प्रश्न काढणार नाही असे संकट पडले. अति त्रास झाला. विचार घेण्यास जवळ कोणी नाही. प्रसंग त्यांच्याशी म्हणून त्यांचे म्हणणे कबूल करावे लागले. मुले पाहण्यास आजच दुपारी गेले. माझे नशिबात काय आहे हे काही सांगता येत नाही. यामुळे रात्रंदिवस झोप नाही. या संकटातून सुटेन तेव्हा खरे.

## (४) टिळकांची नागपूरकराना तार

औरंगाबाद २४ जून १९०१

(ताई) महाराजांची प्रकृति ठीक आहे. खापर्डे आजच औरंगाबादहून निघाले. आम्ही गुरुवारी निघतो तुम्ही आम्ही तिकडे येईपर्यंत तेथेच रहावे जाऊ नये.

## (५) ताईमहाराजांचे बनावट पत्र २

आम्ही खुशाल आहो. टिळकासारखा माणूस इतका कठीण मनाचा असेल असे मला वाटत नव्हते. येथे आल्याने फशी पडल्यासारखे झाले आहे. काय करावे मोठे संकटात पडले आहे. टिळक जे कठीण शब्द बोलत आहेत ते काळजाला घरे पाडीत आहेत. ते पत्री लिहिता येत नाही. भेटीअंती कळेल. मुले पाच आणली आहेत. मला पसंत नाहीत. काळसर वेडगळ आहेत. यातील पास करण्याबद्दल आग्रह सुरू आहे. ते असे ह्मणतात की आम्ही येथे आलो हा आमचा लौकिक चोहीकडे झाला आहे. तो लौकिक तुम्ही पास न केल्याने जात आहे. तेव्हा तुम्ही सहा वर्षाचा मुलगा पास केलाच पाहिजे. व आम्ही सांगू त्या कागदावर सह्या केल्या पाहिजेत. नाही तर तुह्मास पुण्यास जाऊ देणार नाही व आम्हीहि जाणार नाही. माझा हेतु मुळीच नाही. सह्या केल्यावाचून सुटका नाही. असा त्रास चालू आहे. खापर्डे असे ह्मणतात की टिळकांचे मताबाहेर जाणे योग्य नाही तर त्यानाच मत दिले पाहिजे. मी तिकडे येणे संबंधाने पुष्कळ आग्रह केला. परंतु त्यानी दोघानी ऐकिले नाही. काय करावे मोठे संकट पडले आहे. आणि माझ्यावर नागव्या तरवारीचा पाहारा ठेवणार आहेत व ठेवतील यात काही संशय नाही. तुमची पत्रे मला मिळू नयेत आमची तुम्हास मिळू नयेत असा बंदोबस्त केला आहे.

## (६) भाऊसाहेब यानी ताईमहाराज याना दत्तकपत्र लिहून दिले त्यातील उतारा

ता. २७ जून १९०१

××××× पांच मुलात आमचा मधला मुलगा चि० जगन्नाथ हा आपणास पसंत पडून त्यास दत्तक घेण्याचे ठरवून सदर मुलगा आपणास दत्तक देण्याबद्दल आपण आम्हास विचारले तरी आम्हो संतोषाने त्यास श्रीबाबामहाराज यांच्या इहलौकिक व पारलौकिक कल्याणाकरिता व नाव गादी व घराणे चालविण्याकरिता आपणास दत्तक दिला आहे व आपण त्याचा पितृत्वाने स्वीकार केला आहे. तो इतउत्तर आपला आणि कै० बाबामहाराज यांचा पुत्र झाला. दत्तहोमविधी वगैरे आपल्या सवडीप्रमाणे आपणास वाटतील तेथे करून घ्यावे. आपणास स्वसंतोषाने दत्तक दिला आहे. यास आमची मान्यता आहे.

### ( ७ ) टिळकांचे नागपूरकर याना पत्र

पुणे ३ जुलै १९०१

मी आता घरी मुद्दाम बसलो आहे. आपणास येणे असल्यास आता यावे. दोनप्रहरी मला दुसरे काम आहे. सकाळ गेली. दोन प्रहरी आणखी या कामास मोडण्यास मला वेळ नाही. आपण आता न आल्यास प्रकरण मी खापर्डे यांच्याकडे माझ्या शेऱ्यासह पाठवून देईन. कळावे.

### ( ८ ) नागपूरकर यांचे टिळकाना उत्तर

पुणे ४ जुलै १९०१

सायंकाळी चार वाजता येऊन भेटेन. राग नसावा.

### ( ९ ) टिळकांचे नागपूरकर याना पत्र

काल आपण आला नाही. आज सकाळपर्यंत न आला तर प्रकरण ट्रस्टीकडे पाठविण्यांत येईल. आजारी असला तर टांग्यातून यावे. जाग्यावरून न हालण्यासारखा आजार नाही. मला या प्रकरणाचा वीट आला आहे व ज्यास्त वाट पाहण्यास मला सवड नाही व इच्छाहि नाही.

### ( १० ) टिळकांचे इतर ट्रस्टीना पत्र

पुणे ५ जुलै १९०१

ट्रस्टी यांचा ठराव नागपूरकर यांचा शेरा व त्यावरील माझा शेरा मिळून सर्व प्रकरण ट्रस्टींकडे अवलोकनार्थ पाठवीत आहे. पहिले ठराव ता. १८ जून रोजी वाड्यात सर्व ट्रस्टी यांचे बैठकीत ताईमहाराज यांचे समक्ष सर्वानुमते पास झालेले आहेत. या बैठकीचे वेळी आपले मत विरुद्ध असल्याबद्दल नागपूरकर यानी एक चकार शब्दहि काढला नाही. उलट हे ठराव आपणास पसंत आहेत असे दाखविले. या बैठकीनंतर दुसरे दिवशी आपण हा शेरा लिहिला असे त्यांचे म्हणणे आहे. पण असा शेरा लिहिल्याबद्दल तेव्हा त्यानी कोणाहि ट्रस्टीस कळविले नव्हते. मी खापर्डे व ताईमहाराज ता. १९ जून रोजी सायंकाळी येथून औरंगाबादेस जाण्यास निघालो. त्याची सर्व तयारी नागपूरकर यानीच केली. तत्पूर्वी माझी व नागपूरकर यांची आणि नागपूरकर व खापर्डे यांची ३।४ वेळ भेट झाली. पण या भेटीच्या वेळी त्यानी हा मजकूर आम्हास कळविला नाही. मध्यंतरी त्यानी मला व खापर्डे याना १-२ पत्रे लिहून बाळामहाराज याना दत्तक घेण्याबद्दल रदबदली केली होती. पण ठरावाखाली शेरा लिहिल्याचा त्यात कोठे उल्लेख नाही. उलट आपण ट्रस्टींचे मर्जीबाहेर नाही असे स्पष्ट लिहिले आहे व त्याच

समजुतीने आम्ही औरंगाबादेस जाऊन श्री. ताईमहाराज यांचे मांडीवर दत्तक देऊन ठरल्याप्रमाणे या प्रकरणाचा कायम निकाल करून परत आलो. परत आल्यावर शेरा पहिल्याने ता. २९ रोजी माझे नजरेस आला. त्याबरोबर मी त्याचे खोडसाळपणाबद्दल खाली शेरा मारलेला आहे. माझ्या मते नागपूरकर यानी या कामात जाणून बुजून कारकुनी केली आहे व ठराव झाल्या दिवसापासून ते पंडितमहाराज यास आमचे विरुद्ध जाण्यास उत्तेजन देत आहेत व मदत करीत आहेत. औरंगाबादेहून आल्यावर मला जी बातमी समजली त्यावरून ट्रस्टींचा ठराव हाणून पाडण्याबद्दल नागपूरकर यांचे प्रयत्न जारीने सुरू आहेत व ते पंडितमहाराजाना मिळाफी आहेत अशी माझी खात्री झालेली आहे. पंडितमहाराजांकडून त्याना दोन पत्रे आली असे त्यानीच कबूल केले. पण फाडून टाकली असे ते म्हणाले. परंतु पंडितमहाराजांबरोबर लग्नाचे वेळी येथे आलेले मुखत्यार वकील विष्णुपंत फडके यांनी साबाजीराव तिरोडकर (येथील कमिशनर मध्यभागचे कचेरी-एक अधिकारी) यास आलेली तार त्यानी नागपूरकर यांचेकडे पाठविली ती नागपूरकर यानीच मला दाखविली. तीत मजकूर असा होता की, " नागपूरकर याना २७ कलकत्ता पा. ९९६ हा ठराव पाहण्यास सांगावे." हा ठराव इंडियन लॉ रिपोर्टांतील असून तो पंडितमहाराजाना अनुकूल आहे व त्याकरिता नागपूरकर यास पाहण्यास सांगितला असे स्पष्ट होते. पण खरोखर तो ठराव पंडितमहाराज यास अनुकूल नाही हे फडके यास कळले नाही असे दिसते. कसेहि असो. हा ठराव साबाजीराव यांचे मार्फत नागपूरकर याना कळविण्याचा काय हेतू असावा हे कोणाच्याहि लक्षात येणार आहे. नागपूरकर याना अशा रीतीचे वर्तन न ठेवण्याबद्दल मी एक दोनदा सामोपचाराने व एक दोन वेळा निक्षून सांगितले व असेहि कळविले की संस्थानचा पगार खाऊन ट्रस्टीचे विरुद्ध काम करणे गैरइमानीपणाचे आहे. तुम्हांस पंडितमहाराजांस मदत करणे असल्यास इकडची नोकरी सोडा. आणि संस्थानची नोकरी पाहिजे असल्यास पंडितमहारांचा नाद सोडून द्या. पण माझे सांगण्याचा त्यांच्यावर काही परिणाम झाला असे दिसत नाही. येथील डि० कोर्टातील कारकून नारायणराव आठवले याचे मार्फत पोलिटिकल खात्यात काम चालविण्याचा पंडितमहाराज याचा विचार आहे असे समजते. पंडितमहाराज आठवले यांचे येथेच उतरले होते. आठवले त्यांस बरोबर घेऊन वकिलाकडे हिंडत होते. शिवाय येथे पंडितमहाराजांकडून ५० तोळे सोने घेऊन एक मनुष्य आला होता अशी बातमी लागते. या सर्व मसलतीत व कारस्थानात नागपूरकर यांचे पूर्ण अंग व मदत आहे. वे. शा. भिकुशास्त्री यांचे जावई आहेत ते पंडितमहाराज व नागपूरकर यांचेमध्ये मध्यस्थ आहेत, व तेच पंडितमहाराजांची पत्रे नागपूरकर यास पोचती करीत असतात. त्यानी पत्रे पोचविण्याची गोष्ट नागपूरकर यानी मजजवळ कबूल केली आहे. पत्रे मात्र फाडून टाकिली असे सांगितले. त्याचप्रमाणे औरंगाबादेहून आल्यानंतर

श्री. ताईमहाराज यांचे मन वळविण्याची नागपूरकर यांची खटपट चालू असून एकांतात त्यांचे दोन दोन चार चार तास संवाद चालू असतात. आणि ताई-महाराजांकडून पंडितमहाराजाना काही अनुकूल लेख किंवा जाब मिळाल्यास पहावा अशी खटपट चालू आहे. या खटपटीपासून संस्थानचे काही वाकडे होईल असे नाही. पण संस्थानाविरुद्ध संस्थानचे नोकराने खटपट करणे माझे मते गैर-शिस्त व बेइमानीपणाचे आहे. नागपूरकर यांच्या शेऱ्यात पहिली खोटी गोष्ट अशी की कै. श्री. बाबामहाराज यानी अंतकालचे वेळी श्री. घराण्यापैकी मुलगा दत्तक घ्यावा व बाहेरचा घेऊ नये असे सांगितले व मी ते कबूल केले हे म्हणणे सर्वस्वी खोटे आहे. खरी गोष्ट अशी की मृत्युपत्राचा मसुदा बाबामहाराजाना वाचून दाखविल्यावर घराण्यापैकी दत्तक घ्यावा अशा अर्थाचे शब्द आत घालण्यास त्यानी सांगितले. पण मी त्यांस सांगितले की अशा प्रकारचे शब्द मृत्युपत्रात असणे बरोबर नाही. एखादे वेळी आपणास हवा तसा मुलगा मिळणार नाही. व मिळाल्यास तो नाही त्या अटी कबूल करण्यास सांगेल. करिता ट्रस्टी यांचे हात बांधणे बरोबर नाही. त्याना योग्य दिसेल त्याप्रमाणे तो घरचा किंवा बाहेरचा दत्तक घेतील. अशा रीतीने बाबामहाराज व माझे बोलणे जाहल्यावर त्यानी ती गोष्ट कबूल केली आणि मृत्यु-पत्रात हे शब्द नसावेत हे माझे म्हणणे मान्य केले. नागपूरकर यास ही गोष्ट माहीत आहे. पण मुद्दाम त्यानी खोटा मजकूर शेऱ्यात घातला आहे. दुसरी खोटी गोष्ट अशी की श्री. ताईमहाराज यानी बाळामहाराज मला पसंत आहे तो घ्यावा असे मत दिले असून ते ट्रस्टीनी नाकबूल केले. ट्रस्टींच्या सभेत अशा प्रकारचे मत श्री. ताईमहाराज यानी दिलेले नव्हते. इस्टेटीच्या हिताकरिता दहा बारा वर्षा-पुढील वयाचा मुलगा दत्तक घेण्याची आपण सल्ला देणार नाही असे ट्रस्टी यानी महाराज यास पुष्कळ दिवसा पूर्वी स्पष्ट सांगितले होते व त्यामुळे कोल्हापूर घराण्यापैकी दत्तक घेण्याचा विचार श्री० ताईमहाराज यानी पुष्कळ दिवस सोडून दिला होता. ता. १८ जूनचे सभेत त्याजबद्दल एक अवाक्षरहि निघाले नाही. उलट श्री० ताईमहाराज आपण होऊनच बाबरे येथे येण्यास तयार झाल्या. नागपूरकर याची तिसरी खोटी गोष्ट अशी की बाबरे येथील घराणे श्री० घराण्यापैकी नाही असे त्यानी ट्रस्टी यास कळविले. परंतु खरा प्रकार असा आहे की या प्रकारे ट्रस्टींच्या सभेत काही एक कळविले नाही. उलट सर्व ठराव त्याचे हातचा आहे व त्यात ५ वे कलमात बाबरे येथे दत्तक घेण्यासारखा मुलगा असल्यास तो घ्यावा इतर घराण्यापैकी घेऊ नये असे सर्वांचे मत आहे असे शब्द आहेत व ते लिहिताना त्यानी कोणतीहि तक्रार केली नाही अगर विरुद्ध मत दिले नाही. उलट औरंगाबादेस जाण्यास आम्ही निघालो तेव्हा बाबरे येथील घराण्याची हकीगत समजावी म्हणून महाराजांचे दप्तरातील जुनी बखर नागपूरकर यानीच मजकडे पाठवून दिली होती. सारांश हे ठराव ज्या सभेत पास झाले त्या सभेत नागपूरकर यानी आपले मत विरुद्ध असल्याबद्दल एकहि शब्द तोंडाबाहेर काढला नाही. वेळ

फार झाल्यामुळे ठरावावर मी व दादासाहेब खापर्डे यानी सह्या करून कागद नागपूरकर यांचे हवाली केले व आम्ही घरी आलो. त्यामुळे मागून शेरा लिहिण्याची नागपूरकर यांस संधी मिळाली. करिता माझी अशी सूचना आहे की नागपूरकर यांस ह्या शेरा परत घेण्याची एकवार संधी देऊन ते तसे न करतील तर त्यांस कारभाऱ्याचे जागेवरून दूर करावे. हे जुने नोकर आहेत करता त्यांचे सर्वस्वी नुकसान करणे बरोबर नाही असे इतर ट्रस्टीना वाटत असल्यास त्याना एखाद्या वहिवाटीचे काम सांगावे. माझी दुसरी सूचना आहे की त्यांस इतर ट्रस्टीनी दिलेले मुखत्यारपत्र रद्द करावे. हल्लीच्या स्थितीत या मुखत्यारपत्राचा दुरुपयोग होण्याचा संभव आहे.

( ११ ) टिळकांची कोल्हापूरचे दिवाण सबनीस याना तार

पुणे ११ जुलै १९०१

माझे पत्र आपणास मिळेपर्यंत ताईमहाराज प्रकरणी दत्तकाची परवानगी देण्याचे तहकूब करावे. ट्रस्टींच्या संमतीने दानप्रतिग्रह होऊन कागद रजिष्टरहि झाला आहे. मृत्युपत्राप्रमाणे एकट्या ताईमहाराजाना दत्तक घेता येत नाही. येणेप्रमाणे विनंति श्रीछत्रपति महाराजाना कळविणे. सविस्तर हकीगत मागाहून पत्राने पाठवीत आहे.

( १२ ) टिळकांची सबनीस दिवाणाना तार

पुणे ११ जुलै १९०१

चिटणीसांची तार मिळाली. बाळामहाराजांच्या दत्तविधानाला ट्रस्टीना परवानगी देता येत नाही. यापूर्वीच दत्तविधान झाले आहे व हे दुसरे दत्तविधान बेकायदेशीर होईल. तरी हुकमाचा फेर विचार व्हावा. दरबारने आमच्या मार्गात विनाकारण अडचणी उत्पन्न करू नयेत.

(१३) टिळकांची सबनीस दिवाणाना तार

पुणे ११ जुलै १९०१

दरबारने दुसऱ्या दत्तविधानाला परवानगी दिली तरी बाबामहाराजांच्या मृत्युपत्राप्रमाणे ते ट्रस्टींच्या संमतीनेच व्हावयास पाहिजे त्याशिवाय ते कायदेशीरच होत नाही. म्हणून दुसऱ्या दत्तविधानाविरुद्ध आम्हास कसून भांडावे लागेल. पंडितमहाराजाना तारेने नोटिसा दिल्या आहेत.

( १४ ) ताईमहाराजांचे भाऊसाहेब निघोनेकर यांस पत्र

औरंगाबाद ता. २८ जून १९०१

आपण आमच्या विनंतीस मान देऊन आपला मधला मुलगा बाबामहाराज यांचा वारस म्हणून आम्हास दत्तक दिला त्याचे आम्ही सर्व प्रकारे पुत्राप्रमाणे परिपालन

करू. मग तो पुढे विद्वान निघो, अगर अविद्वान निघो. तोच खरा अधिकारी आहे. आम्हास औरस पुत्र असता तर त्याचा जो अधिकार असता तोच याचाहि आहे. याचे शिवाय दुसरा दत्तक आम्ही घेणार नाही व त्याचे योग्य परिपालन करू.

(१५) टिळकांचे सबनीस दिवाणाना पत्र

पुणे ११ जुलै १९०१

औरंगाबादला जाण्यापूर्वी जे "खाजगी" पत्र तुम्हास पाठविले ते आपण छत्रपतीस दाखविल्याबद्दल आपला आभारी आहे. सरकारनी जे आश्वासन दिले त्याबद्दल त्यांचेहि फार आभारी आहोत असे त्यांस कळवावे. औरंगाबादेहून येथे आल्यानंतर असे कळले की या दत्तविधानामुळे कोल्हापूरची मंडळी व विशेषतः पंडितमहाराज यांची मोठी निराशा झाली. आपला भाऊ दत्तक घ्यावा अशी पंडित महाराजांची खटपट होती. उलट ट्रस्टींना बारा वर्षांपेक्षा मुलगा मोठा नको होता. त्याचे कारण असे की इस्टेटीला कर्जाचा बोजा फार व ती कर्जे निवारण करून इस्टेटीचे हित करावयाचे तर लहान मुलगाच पतकरणे श्रेयस्कर होते. पंडितमहाराज आता आकाश पाताळ एक करून वाटेल ते गैरसमज पसरवीत आहेत. आपणाकडे दुसऱ्या दत्तकाबद्दल आलेली याद यापैकीच होय. ट्रस्टींच्या परवानगीवाचून झालेले दत्तविधान कायदेशीरच होत नाही. म्हणून ट्रस्टींचें म्हणणे ऐकून घेतल्याखेरीज दुसऱ्या दत्तविधानाला परवानगी देऊ नये. या निराश झालेल्या स्वार्थी मंडळींनी आता ज्या क्लृप्त्या चालविल्या आहेत त्या सर्वस्वी अयोग्य व बेकायदेशीर आहेत. त्या जर चालू दिल्या तर इस्टेटीचा सर्वस्वी घात होईल म्हणून इस्टेटीच्या संरक्षणाकरिता कायदेशीर रीतीने नेमलेल्या आम्हा ट्रस्टींनाच मदत करून इस्टेटीचे रक्षण करण्याकरिता छत्रपती सरकारनी मदत केली पाहिजे. ही सर्व स्वार्थी लोकांची कारस्थाने चालू आहेत. अशाबद्दल प्रत्येक गोष्ट सिद्ध करून दरबारची खातरजमा करण्यास ट्रस्टी तयार आहेत.

(१६) हुजूर चिटणीस कोल्हापूर यांची टिळकाना तार

११ जुलै १९०१

गुरुमहाराज यांचे बंधु बाळामहाराज यांच्या दत्तविधानास छत्रपती सरकारने परवानगी दिली असून एकंदर पत्रव्यवहार पुण्याचे जज्ज ॲस्टन यांजकडे पाठविला आहे. सविस्तर पत्र येईलच.

(१७) टिळकांची बाळामहाराज व पंडितमहाराज यांस तार

पुणे ११ जुलै १९०१

दरबारने परवानगी दिली तरी ट्रस्टींच्या संमतीवाचून मृत्यूपत्रान्वये दत्तक घेता येत नाही. व अशा बेकायदेशीर दत्तविधानाचा कसून प्रतिकार केला जाईल. कळावे येणेप्रमाणे नोटीस दिली आहे.

## ( १८ ) टिळकांचे सबनीस दिवाणाना पत्र

पुणे १२ जुलै १९०१

चिटणिसांची तार मिळाली. त्यावरून सरकारनी अखेर ताईमहाराजाना दत्तक घेण्याची परवानगी दिली असे कळले. त्याबद्दल काल दोन तारा केल्याच आहेत. व आज हे पत्र पाठवीत आहे..................ट्रस्टी हे अतिशय निस्वार्थीपणाने व प्रामाणिकपणाने आपले कर्तव्य करीत आहेत. तरी एकवार आमची बाजू ऐकिल्याशिवाय सरकारने कोणचेहि हुकूम करू नयेत. असे न झाल्यास विनाकारण फिर्यादी अर्यादी होऊन त्या भांडणापायीच सर्व इस्टेटीचा नाश होईल. ताईमहाराज किंवा ट्रस्टी या दोघांच्या विरुद्ध जाण्याचा विचार दरबारने ठरविला तर ते दत्तकाला अहितकारक होईल. तथापि ट्रस्टींनी परवानगी न दिली तरी दरबारने ती दिली तरी चालेल असे मात्र नव्हे. ट्रस्टींच्या परवानगीची कायदेशीर वाण दरबार भरू शकत नाही. तरी हुकुमाचा फेर विचार व्हावा.

## ( १९ ) पोलिस इन्स्पेक्टर कामटे यांचा सिटी मॅजिस्ट्रेट पुणे यांजकडे रिपोर्ट

पुणे १६ जुलै १९०१

पंडितमहाराज यानी अशी फिर्याद दिली की आज ता. १६ रोजी सकाळी ते स्वतः त्यांचा भाऊ बाळामहाराज व त्यांची आई याना टिळक वगैरे ट्रस्टींनी बाहेर घालविले व स्वतः श्री. ताईमहाराज त्यांच्या बरोबर बाहेर पडणार होत्या त्याना त्यानी प्रतिबंध केला. ही फिर्याद आल्यावर मी व इन्स्पेक्टर साहेब वाड्यात गेलो व चौकशी केली. टिळक वगैरे ट्रस्टींचे म्हणणे की आम्ही ट्रस्टी, वाडा आमचे ताब्यात, बाई अज्ञान, पूर्वी एक दत्तविधान झाले असून दुसरा करण्याचा विचार आहे. म्हणून आम्ही इतर लोकांचा उपद्रव होऊ नये म्हणून वाड्याचा दरवाजा आतून बंद केला आहे. आमच्या मते ट्रस्टींना असे करण्याचा हक्क आहे म्हणून हा गुन्हा होत नाही व या प्रकरणी अधिक चौकशी करण्याचे कारण नाही.

## ( २० ) टिळकांची खापर्डे याना तार

पुणे ता. १२ जुलै १९०१

बाळामहाराज, त्यांच्या मातोश्री व पंडित महराज येथे आले आहेत. दुसरे दत्तविधान आज व्हावयाचे होते. ते तुमच्याकरिता एक आठवडा पुढे ढकलले आहे. ताबडतोब निघून या.

## ( २१ ) टिळकांचे सबनीस दिवाणाना पत्र

तारीख १३ ऑगस्ट १९०१

औरंगाबादला ट्रस्टींच्या विचारे जे दत्तविधान झाले त्याच्या छापील हकीकतीची प्रत सोबत पाठविली आहे. ती हकीकत व इतर कागदपत्र सरकारपुढे

ठेवण्याची कृपा करावी. व दत्तविधानाच्या कोणत्याहि गोष्टीसंबंधी पुरावा पाहिजे असल्यास ट्रस्टी तो सरकारपुढे ठेवण्यास तयार आहेत.

(२२) बिननांवी बिनतारखेचे पत्र

कोल्हापूरचे उत्पन्न सर्व अनामत जमा सरकारात करण्यास हुकूम झाला ते येशवंतराव यास लिहिलेल्या पत्रावरून कळले असेलच. आता, कोल्हापुरचा वसूल आम्हास येणार नाही. हल्ली अजमासे १५०० रुपये वसूल आला तो ज्या लोकानी आम्हास दिला त्यांचेवर कामे चालविण्याचा विरुद्ध बाजूचा विचार दिसतो. बडबड चालू आहे. हायकोर्टातील कज्जा आपल्यासारखा होणार ॲस्टन साहेबाकडोन वर्ग होणार नाही असे नागपूरकर यानी महाराज सरकारांस सांगितलेचे समजते.

(२३) ना. गोखले यांचे केळकराना पत्र

कलकत्ता ६ जान्युआरी १९०३

तुम्ही व विजापुरकर यानी मिळून मला अभिनंदनाची तार पाठविली ती पोचली. त्याबद्दल आभारी आहे. काल वर्तमानपत्रांत अशी बातमी वाचली की, दोहोपैकी एका आरोपावर सेशन्सजजानी टिळकाना दोषी ठरवून शिक्षा दिली. प्रस्तुतचे संकट हे टिळकांच्या आयुष्यातील फार मोठे संकट आहे. व ईश्वर त्याना या कामी साहाय्य देवो अशी माझी प्रार्थना आहे.

(२४) डिग्बी यांचे टिळकाना पत्र

लंडन सपटेंबर १९०३

तुमचे ता. २८ ऑगस्टचे पत्र वाचून फार वाईट वाटले. तुमचा खटला लक्षात घेता शिक्षा होणार नाही व झाली तर थोडयाशा दंडाची होईल असे वाटले होते. पण सर्व प्रकार उलट दिसतो. ब्रिटिश न्यायाचा हा मासला पाहून लोकाना काय वाटेल ? पण परराज्याखाली कोठेहि असेच व्हावयाचे.

(२५) निळकंठराव रानडे यांचे केळकराना पत्र

बनारस ६ डिसेंबर १९०३

मी येथे भाषा परिषदेला आलो आहे. ती नागरी प्रचारिणी सभेने भरविली आहे. टिळकांच्या खटाल्यातील ल्यूकस साहेबांचा निकाल वाचून फार वाईट वाटले. शेवटीं इंग्रज तो इंग्रज ठरला. इकडील लोक सरसकट असे म्हणतात की, टिळकांच्या हातून अशा खोट्या प्रतिज्ञेचा गुन्हा होणारच नाही. सरकार त्याना

त्यांच्या देशभक्तीकरिता छळत आहे. टिळकांच्यासंबंधाने लालमोहन घोस यानी नुकतेच काढलेले उद्‌गार तुम्ही वाचले असतीलच.

( २६ ) मल्हारराव चिटणीस यांचे केळकराना पत्र

उमरावती ६ मार्च १९०४

टिळकांची सन्मानपूर्वक सुटका झाली याबद्दल ईश्वराचे आभार मानले पाहिजेत. हा सत्याचा विजय होय. व टिळकांच्या छळाचा असा गोड शेवट झाला हे पाहून महाराष्ट्रातील प्रत्येक मनुष्याला आनंदच वाटेल. असल्या देशभक्तावर अशी संकटे पुनः न यावी अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. आपला समाज लहान त्यात माणसे किती थोडी आणि त्यांच्यावर अशी संकटे येण्याने फार नुकसान होते. एक खटला म्हणजे त्यातून बाहेर पडण्याला किती श्रम पडतात त्रास सोसावा लागतो हे पाहिले म्हणजे मन दडपून जाते.

( २७ ) वाच्छा यांचे केळकराना पत्र

मुंबई ८ मार्च १९०४

गेल्या मराठ्यात तुम्ही टिळकांच्या खटल्यासंबंधाने जो लेख लिहिला तो वाचून कौतुक वाटले. तुम्ही टिळकांच्या छळाचे वर्णन दिले ते चित्राप्रमाणे हुबेहुब असून शिवाय मोठे भारदस्त आणि न्यायतत्त्वांच्या दृष्टीने मार्मिकपणाचे वठले आहे. मला वाटते त्याच्या पन्नास प्रती तुम्ही ब्रिटिश काँग्रेस कमिटीकडे पाठवाव्यात. सर विलियम वेडरबर्न यांजकडेहि काही प्रती वेगळ्या पाठवा. टिळकांची वर्तणूक या कामी किती सरळ व सत्यनिष्ठ होती व तिचे चीज कसे झाले हे जाहीर झालेच पाहिजे. वेडरबर्न साहेबाना मीहि स्वतः या बाबतीत लिहित आहे.

( २८ ) खापर्डे यांचे केळकराना पत्र

उमरावती १४ मार्च १९०४

टिळकांची सुटका झाल्याचे वाचून अतिशय आनंद झाला. सर्वांच्या प्रयत्नाला यश आले. गेल्या मराठ्यातील तुमचा लेख सर्व लेखावर ताण करणारा आहे. मी तो फार आनंदाने वाचला. आणि जो प्रत्येकजण मला भेटतो तो ह्मणतो की तुमच्या या लेखाची कल्पना व लिखाण ही फारच वर्णनीय आहेत. इंग्लंडातील काही स्नेह्याना मी त्याच्या प्रती पाठविणार आहे. बळवंतराव नागपूरकर यांच्यासंबंधाने पुढे काय करावयाचे ठरविले आहे ते कळवा. जोशीबुवांच्या नातीच्या लग्नाकरिता तुम्ही तर याच. पण टिळकाना आमंत्रण दिले आहे त्याचा स्वीकार करून त्यानीहि यावे अशी खटपट करा.

### (२९) रामभाऊ साने यांचे केळकराना पत्र

वार्शी १७ मार्च १९०४

टिळकांची दोषमुक्तता हायकोर्टाकडून झाली. परंतु त्याना झालेला खर्च सरकारने भरून देणे वाजवी आहे. याविषयी आमचे खाजगी प्रयत्न संपले म्हणजे मग वर्तमानपत्रातून याविषयाची चर्चा करावी. टिळकाना अभिनंदनपूर्वक माझे नमस्कार कळवा व अधिकारीवर्गात माझे जे कुणी स्नेही आहेत त्यांच्याशी मी पत्रव्यवहार करीत आहे असे त्याना सांगा.

### (३०) डिग्बी यांचे टिळकाना पत्र

लंडन २३ मे १९०४

स्टेट सेक्रेटरी यांच्या उत्तराचा तुम्ही अर्थ केला तो बरोबर आहे. तुम्ही म्हणता त्याप्रमाणेच तुमच्या नुकसानभरपाईच्या अपीलाला सरकार हरकत घेईल. पण ते मुंबई-सरकारलाहि फारसे चांगले नाही. कारण आज प्रगट नसलेल्या अनेक गोष्टी मग पुढे येतील. तुमच्यावर फौजदारी खटला करताना सरकारने नेहमीहून काहीतरी वेगळा मार्ग अनुसरला होता असे तुम्ही लिहिता.तरी त्याचा खुलासा पाठवा.म्हणजे मि. शिवान् यांजकडे त्यासंबंधाने पार्लमेन्टमध्ये विचारण्याकरिता प्रश्न पाठवितो. तुमच्या खटल्याचे छोटे पुस्तक येथे प्रसिद्ध केले त्याला प्रस्तावनेदाखल दोन शब्द लिहिले ते तुम्हाला पसंत पडल्याचे ऐकून बरे वाटले.

# भाग ४

[ सन १९०४ ते १९०६ ]

प्रस्तुत भागात ज्या तीन वर्षांचे इतिवृत्त टिळकांच्या संबंधापुरते आम्ही देणार आहो त्यात अनेक चळवळी झाल्या. त्यात काही लहान व काही मोठ्या स्वरूपाच्या आहेत. शिवाय काही गोष्टी एकाच वेळी घडून गेल्या तर काहींचा धागा तीन वर्षभर सारखा चालू राहिलेला आढळतो. याकरिता प्रथम तीनहि वर्षांतील लहानसहान गोष्टी व चळवळी यांची हकीकत देऊन नंतर मोठ्या चळवळींची हकीकत देणार आहो. ही सूचना देण्याचा हेतु इतकाच की यांत दिलेल्या सर्व हकिकती केवळ कालानुक्रमानेच दिलेल्या नाहीत ही गोष्ट वाचकांच्या नजरेला आगाऊच यावी.

## ( १ ) मुंबईची राष्ट्रीय सभा

१९०३ च्या राष्ट्रीय सभेच्यापूर्वी ए. ओ. ह्यूम व वेडरबर्न वगैरेनी हिंदुस्थानात जागृति उत्पन्न होण्याकरता एक पत्र इकडील पुढाऱ्यांना पाठविल्याचे मागे सांगितलेच आहे. त्याचा उपयोग विशेष झाला नाही. १९०४ साली मुंबईस राष्ट्रीय सभा भरण्याचे ठरले तेव्हा तिची वर्गणी जमविण्याच्या उद्देशाने मुंबईचे हायकोर्ट वकील व फेरोजशहा मेथा यांचे सहाय्यकारी नारायण विष्णु गोखले यानी रुपयाफंडाची कल्पना काढली. ती पैसाफंडाच्या कल्पनेवरून निघाली. एक रुपयाफंड काढून मुंबईच्या बैठकीला मदत होईल किंवा एकादा लहनसा कायम निधीहि जमेल पण सभेचे काम वर्षभर करण्यास कोणी तयार असल्याशिवाय फंडाची तरी काय उपयोग ? अशी टीका त्यावर सहजच झाली. वुइल्यम डिगबी यानी राष्ट्रीय सभेचे काम अखंड चालण्याकरिता एक योजना केली. फिलीपाईन बेटाप्रमाणे हिंदुस्थानने जर प्रयत्न केला आणि आशियाखंडातील जागृतीचा फायदा घेतला तर फिलीपाईन बेटाइतके स्वातंत्र्य हिंदुस्थानाला मिळेल असे मत मि. डिगबी यानी व्यक्त केले. त्या बेटातील लोक हिंदी लोकाप्रमाणेच परतंत्र होते ! पूर्वी ब्रॅडला साहेब इकडे आल्यापासून विलायतेत हिंदी वकिलात स्थापण्याची कल्पना निघाली होती. पण ते खर्चाचे काम हे एक. शिवाय आपला वेळ मोडून काम करण्यास कोणी तयार नव्हता. अलाहाबादच्या इंडियन ओपिनियन पत्रानेहि असेच लिहिले. हिंदुस्थानात राजकीय चळवळीला यश न येण्याचे कारण हेच की पुढारी अंग मोडून मेहनत करीत नाहीत. उलट तेलंग चंदावरकर तयबजी सुब्रह्मण्य अय्यर शंकरन् नायर या कॉंग्रेस पुढाऱ्यानी पुढे सरकारी नोकरी पत्करली. हा वाद मुंबईच्या कॉंग्रेसपर्यंत मधून मधून असाच चालला होता. आणि त्याचा उच्चार ह्या सभेत झालाहि. अद्यापि नेमस्त व जहाल यातील भेद मात्र स्पष्टपणे व्यक्त झाला नव्हता. यामुळे कॉंग्रेस-

मध्ये राहून कॉंग्रेसला नावे ठेवणारे म्हणून जहाल पक्षाला कोणास नावे ठेवता येत नव्हती. उलट कॉंग्रेसच्या त्या वेळच्या पुढाऱ्याना नावे ठेवणारे गुरु उपगुरु ह्यूम वेरडबर्न हे होते हे लक्षात घेतले म्हणजे भांडणाचे मूळ कशात होते हे कळून येईल.

१९०४ च्या सप्टेंबरात ॲमस्टर्डाम येथे सोशिॲलिस्ट लोकांची मोठी सभा भरली. तीत हिंदुस्थानच्या वतीने दादाभाई नौरोजी हजर होते. सभेत हिंदुस्थानच्या संबंधाने एक ठराव पास झाला. त्यात हिंदुस्थानच्या स्थितीची खरी कारणे काय आहेत व ती नाहीशी करण्याला काय उपाय करावे हे सांगण्यात आले. सभेत दादाभाई नौरोजी यांचे भाषण फारच कडक झाले. सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी उठून उभे राहून टोप्या काढून दादाभाईंच्या नावाचा जयघोष केला. इंग्रजाना नावे ठेवताना दादाभाईंनी कोणताहि शब्द शिल्लक ठेविला नाही. अर्थात् काही इंग्रज लोक जे पूर्वी दादाभाईंना चाहात असत ते दादाभाई हे ह्या परिषदेला गेल्याबद्दल त्याना नावे ठेऊ लागले. सोशिॲलिस्ट पंथाची नवी चळवळ सर्व जगभर सुरू झाली होती. साम्राज्याविरुद्ध तिचा प्रथमपासूनच कटाक्ष होता. तथापि दादाभाई या सभेला गेले व त्यानी सोशिॲलिस्ट पक्षाशी सहकार्य केले यात काहीच वावगे नव्हते. पण ह्यूम वेरडबर्न यांचा उपदेश जसा मेथादिकाना दुःसह वाटू लागला होता त्याचप्रमाणे दादाभाई हे इतके कडक बोलू लागले याबद्दलहि मुंबईच्या काही पुढाऱ्यानी अर्धवट नापसंती दाखविण्यास सुरवात केली.

यंदाहि मुंबईच्या सभेला उद्देशून सर वुइल्यम वेडरबर्न यानी एक पत्र इंडिया पत्रात प्रसिद्ध केले. त्यात त्यानी लिहिले की "राष्ट्रीय सभेने कामाची काही तरी नवी दिशा शोधून काढण्याशिवाय तरणोपाय नाही. विलायतेस एक राजकारणी मिशन कायम ठेवले पाहिजे. राष्ट्रीय सभेने नुसते ठराव करणे म्हणजे सॉलिसिटरने पूर्व तयारीचे कागद तयार करण्यासारखे आहे. पण त्या कागदांवरून सुनावणी करणारा वकील चांगला खंबीर मिळाल्याशिवाय काय उपयोग. ?" सभेचे ठराव म्हणजे फक्त रोगनिदान होय. पण औषध हे काही वेगळेच असते. विलायतेतील लोकांच्या मनाला धक्का बसण्यासारखी गोष्ट घडल्याशिवाय सर्व फुकट आहे. हा धक्का बसविण्याच्या पायऱ्या एकावर एक कशा रचल्या गेलेल्या असतात याचे विनोदी वर्णन केसरीच्या एका अग्रलेखात केले होते ते असेः—

"हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल व विलायतेतील न्यायप्रिय लोक यामध्ये अनेक अभेद्य असे कोट आहेत. व हे कोट एका मागून एक सर केल्याशिवाय हिंदुस्थानातील दुःख विलायतेतील लोकांच्या कानी जाणे बहुधा अशक्य झालेले आहे. या दरम्यानच्या कोटातून धक्के खात खात जेव्हा वर पोचावे व सर्वात वरिष्ठ पायरीच्या अधिकाऱ्याचा हुकूम मिळवावा तेव्हा तो धक्के खात खात कालांतराने खाली येऊन पोचणार. एखाद्या स्थानिक सरकारने एखादे अन्यायाचे कृत्य केले असे आपण समजू, या कृत्याची दाद लावावयाची असल्यास प्रथम हिंदुस्थान सरकाराकडे अर्ज करावे.

तेथेहि काम न झाले तर कोणा अनाथांच्या वालीच्या कच्छपी लागून पार्लमेन्टमध्ये रडगाणे गावे. व अधिकारारूढ असणाऱ्या पक्षानेहि वाटाण्याच्या अक्षता लाविल्या म्हणजे मग 'गौरिहराचे पूजन करीत बसणाऱ्या वधूप्रमाणे' त्याचा प्रतिपक्षी अधिकारारूढ होऊन येईल काय अशी आशा मनात बाळगून आपल्या कर्माला दोष लावीत किंवा ईश्वराची प्रार्थना करीत बसावे! ही हल्लीची आपल्या चळवळीची सोपानपरंपरा आहे! याचे वर्णन वेडरबर्न साहेबानी विलायतेतील मुलांच्या एका 'कावळा चिमणी'च्या गोष्टीच्या रूपाने विनोदात्मक रीतीने केले आहे. या गोष्टीशी सदृश अशी गोष्ट आपल्या इकडील भातुकली खेळणारी मुलेहि सांगत असतात. तिचीच आठवण आम्ही आमच्या प्रौढ वाचकाना करून देतो. चिमणीचे मोती कावळ्याने उपटले तेव्हा चिमाणाबाईने कावळ्याला उडवून देण्यास झाडाला विनंति केली. झाड कबूल होईना तेव्हा ते तोडण्यास सुताराला सांगितले. सुतार नाकबूल झाला म्हणून अशा अनुपकारी इसमास शासन करण्यास तिने राजास विनंति केली. राजास चिमणीचे सुखदुःख काय कळणार? तेव्हा त्याने नाही म्हटल्यावर त्याची गुरुकिल्ली हाती असणाऱ्या राणीस राजावर रुसून हा महत्त्वाचा व्यवहारनिर्णय करण्यास सांगितले. परंतु स्त्रियांसहि स्त्रियांची सहानुभूति नेहमीच वाटते असे नाही. तेव्हा सरळ उपाय थकल्यामुळे चिमणीने उंदरास राणीची भरजरी वस्त्रे फाडण्यास सांगितले. व तिने तेथून आपला अर्ज मांजर कुत्रे येथपर्यंत नेऊन कुत्राहि ऐकेना तेव्हा एक लहसा सोटा गाठून त्यास कुत्र्याचे पाठीत बसण्याची विनंति केली! तेव्हा सोटा कबूल झाला व तो कुत्र्याचे पाठीत बसताच कुत्र्याने मांजरास मांजराने उंदरास अशी दहशत घालण्याचे काम सुरू होऊन पेंड पोचत पोचत झाडापर्यंत आला व झाडाने जेव्हा कावळ्यास हुसकून लावण्याचे कबूल केले तेव्हा कावळ्याचा निरुपाय होऊन अर्जदार चिमणीस न्याय मिळून तिचा मोती तिला परत मिळाला! याच गोष्टीच्या एका आवृत्तीत सोट्यानेहि नाकबूल केल्यामुळे चिमणीस तो जाळून टाकण्यास अग्नीकडे, अग्नि विझवण्यास समुद्राकडे, समुद्र पिऊन टाकण्यास हत्तीकडे व हत्तीचे कानात शिरण्यास मुंगीकडे दाद मागावी लागली. परंतु मुंगीहि नाकबूल झाली तेव्हा चिमणीने आपले छोटेखानी विश्वरूप दाखवून 'तर मग तुला खाऊन टाकते' म्हणून आपली प्रचंड चोच उघडली! तेव्हा मुंगी कबूल होऊन उलट पेंड पोचत पोचत चिमणीस न्याय मिळाला! या व अशा प्रकारच्या मुलांच्या गोष्टीत नेहमी बरेच सत्य साठविलेले असते. विनोदशील मार्मिक अशा मनुष्यास अशा गोष्टींचा उपयोग मोठमोठे राजकीय प्रश्न सोडविण्यासहि होण्यासारखा आहे. विलायती गोष्टीत जेव्हा एका परोपकारी चांडाळाने एका अनुपकारी मनुष्यास फासावर चढविण्याचे कबूल केले तेव्हा गोष्टीतील म्हाताऱ्या बाईचे कार्य झाले. इकडल्या गोष्टीत अखेर न्याय एका परोपकारी सोट्याने देवविला व त्याच गोष्टीच्या दुसऱ्या आवृत्तीप्रमाणे स्वतः चिमणीने जेव्हा आपली चोंच मुंगीला खाण्याकरिता पाजळली तेव्हा तिला न्याय मिळाला. तात्पर्य उद्योग

करिता करिता कोणा तरी समर्थ व परोपकारी विभूतीची गांठ पडते, किंवा आपल्या अंगी जे काय सामर्थ्य असते त्याचाच स्वावलंबनाचे तत्त्वावर उपयोग करण्यास मनुष्य जेव्हा प्रवृत्त होतो तेव्हाच त्याची कार्यसिद्धी होते."

ता. २० डिसेंबरच्या अंकांत टिळकानी 'वेळ तर हीच आहे' असा स्फूर्तिदायक मथळा घालून कॉंग्रेसने आपले धोरण यापुढे कसे ठेवावे हे दर्शविले. टिळकांचे म्हणणे असे की "सनदशीर चळवळ हवी तर तीच का होईना पण ती तरी कसून करा. विलायतेत चळवळ झाली पाहिजे व तीच खरी चळवळ असे तुमचे मत असेल तरीहि ठीक आहे. पण ती करण्यास तरी तुम्ही योग्य पुढारी हुडकून काढा आणि त्याना विलायतेला पाठवा. विलायतेतील लिबरल पक्षाची कास धरावी असे तुम्हाला वाटत असेल तरी हरकत नाही. जा आणि पार्लमेंटच्या निवडणुकीत स्वतः भाग घेऊन त्या पक्षाच्या तत्त्वाबरोबर हिंदुस्थानचे घोडेहि दामटण्याचा प्रयत्न करा." या वेळी सनदशीर चळवळीशिवाय इतर कोणत्याहि चळवळीची सूचना जहाल पक्षदेखील करीत नव्हता. तक्रार इतकीच होती की राष्ट्रीय सभेचे पुढारी म्हणवितात व तिची सूत्रे हातीं ठेवतात ते लोकहि अंग मोडून काम करण्यास तयार होत नाहीत. वर्षातून केवळ एक वेळ जमून ठराव पास करणे हे जे फेरोजशहा मेथा यांचे धोरण ते टिळकाना नापसंत होते व त्यावर त्यांचा सगळा हल्ला होता.

२० वी राष्ट्रीय सभा मुंबईस ता. २४ डिसेंबर रोजी भरली. स्वागताध्यक्ष सर फेरोजशहा मेथा व अध्यक्ष सर हेन्री कॉटन हे होते. कॉटनसाहेब हे नुकतेच सरकारी नोकरीतून सुटले असल्यामुळे आणि राष्ट्रीय सभेला त्यांची प्रथमपासून सहानुभूति असल्यामुळे त्याना सहजच अध्यक्ष निवडण्यात आले. पूर्वीचा मुनित्रयांचा खलिता लिहिणाऱ्यापैकी हे एक होत. बरोबर सर वुइल्यम वेडरबर्न हेहि आले होते. या दोघांची मिरवणूक मुंबईत मोठ्या थाटाची निघाली. मद्रास राष्ट्रीय सभेच्या पूर्वी टिळकानी दर्शविल्याप्रमाणे हिंदुस्थानात व विलायतेत राजकीय स्वरूपाचे सभेचे काम सतत जोराने कसे चालावे हा मुख्य प्रश्न याहि सभेपुढे होता. त्याविषयी टिळकानी या दोघाकडेहि जाऊन खासगी रीतीने त्याची चर्चा केली. मतभेद किंवा भांडणे उघडपणाने झाली नाहीत. मात्र सर फेरोजशहा मेथा यांच्यावर लाला लजपतराय यानी काही आरोप केले होते. म्हणून त्या दोघांची थोडीशी खडाजंगी विषय-मंडळात झाली. नेमस्त व जहाल असे स्पष्ट पक्षभेद अद्यापि व्हावयाचे होते याविषयी कॉटनसाहेब आपल्या आठवणीच्या ग्रंथात लिहितात "बाळ गंगाधर टिळक हेहि आपल्या अनुयायांसह तेथे आले होते. पण या वेळी जहाल मवाळ हा भेद नव्हता. कारण सगळेच या वेळी नेमस्त किंवा मवाळ होते !" टिळक यांचे स्वागत मंडपात मोठ्या थाटाने झाले. मुसलमान कॉंग्रेस-भक्त अल्ली महमद भिमजी यानी टिळकांचा जयजयकार करण्यात पुढाकार घेतला. ज्यांना व्यक्तिशः टिळकांविषयी स्नेहभाव वाटत नव्हता असेहि

लोक या जयजयकारात सामील झाले. कारण त्या साली मुंबई हायकोर्टाने त्याना फौजदारी खटल्यातून दोषमुक्त करून सोडून दिले होते.

कॉटनसाहेबानी काँग्रेसचे अध्यक्षस्थान स्वीकारले याबद्दल अँग्लोइंडियन वर्तमानपत्रानी काहूर उठविले. त्यांचे पेन्शन बंद करावे अशीहि कित्येकानीं सूचना केली. सरकारी नोकरीत असताच ते हिंदी जनतेशी सहानुभूति दाखवीत याबद्दल त्याना वेळोवेळी त्रास सोसावा लागलाच होता. यथाक्रम ते लेफ्टनंट गव्हर्नर झाले असते. पण त्यांच्यावर सरकारचा राग म्हणून ते कमिशनरीच्यावर चढले नाहीत. आणि आता तर ते उघडपणे राष्ट्रीय सभेला येऊन मिळाले. लॉर्ड कर्झन यानी हा रोष मनात धरला व कांग्रेसचे ठराव घेऊन अध्यक्षानी लॉर्ड कर्झन याना भेटावे असे सभेने ठरविल्याप्रमाणे ते भेटावयास गेले असतां त्यानी त्यांची भेट घेतली नाही. त्यानी कारण मात्र असे दिले की आज एकोणीस वर्षांत जी गोष्ट झाली नाही ती मी कशी करू? मी आज हा नवा प्रघात पाडला तर तो माझ्या मागून येणाऱ्या व्हाइसरायसाहेबाना त्रासदायक होईल. पण या सबबीचा अर्थ लोक जाणतच होते. वाटतील ते जुने दाखले मोडावे आणि वाटतील ते नवे निर्माण करावे हा हिंदुस्थानात ज्यांचा नित्य व्यवसाय होऊन राहिला यांचे हे उत्तर अर्थात् मानभाविपणाचे होते. पण आश्चर्य इतकेच की याहून निराळ्या रीतीचे खडखडीत व गुर्मीचे उत्तर त्यानी द्यावयास पाहिजे होते ते कसे दिले नाही? मानभावीपणा हा कर्झनसाहेबांचा बाणा नव्हे. उद्दाम वृत्ति हाच त्यांचा खरा बाणा.

राष्ट्रीयसभेला घटना असावी असे पहिल्या पाचचार वर्षांतच लोकाना वाटू लागले होते व तोहि एक विषय वादाचा होता. राष्ट्रीय सभेच्या दहाव्या वर्षी म्हणजे १८९५ साली पुण्यास ही सभा भरली तेव्हा या प्रश्नाला बराच रंग आला होता. काही घटना कोणी कोणी तयार केल्या होत्या व त्यांचा विचार करण्याकरिता कमिटीहि नेमण्यात आली होती. परंतु काँग्रेसचे पुढारी पुष्कळसे सर फेरोजशहा मेथा यांच्या मताचे होते त्याना राष्ट्रीय सभेला घटना अशी नको होती. वर्षातून चार दिवस जमावे. कोणी ती धामधूम म्हणावी. वाटेल तर कोणी शांतपणे चर्चा करण्याची परिषद म्हणावी. पण त्या चर्चेत जे काय निघेल तितकाच, जमलेल्या लोकाना किंवा राष्ट्राला फायदा. आपापल्या प्रांतात जे कोणी लोकमत प्रकट करतील त्यांचे एकीकरण करणारी सभा ही राष्ट्रीयसभा मानावी हे सर फेरोजशहा यांचे मत १९०२ साली सोलापूर प्रांतिक परिषदेचे वेळी चिमणलाल सेटलवाड यानी मुंबईचे मत म्हणून प्रकट केल्याचे पूर्वी सांगितलेच आहे. पण लाला लजपतराय वगैरे मंडळीना ही गोष्ट मान्य नव्हती. पंजाबातील मुखत्यार १९०२ साली अहमदाबादेस आले नव्हतेच पण विनवणी केल्यामुळे १९०३ साली काही मद्रासेस गेले होते. तेहि निराश होऊन परत गेले व राष्ट्रीय सभेला घटना असावी की नसावी यावरून मेथा व लजपतराय यांचे मुंबईस भांडण झाले.

## (२) पंचांगशोधन

मुंबई राष्ट्रीय सभेच्या आगेमागे आठदहा दिवस टिळकांचे मोठे गडबडीचे गेले. खुद्द राष्ट्रीय सभा औद्योगिक प्रदर्शन वगैरे गोष्टी तर होत्याच पण अवांतर कामेहि बरीच होती. या मुक्कामात पैसाफंडासंबंधाने एक जाहीर सभा मुंबईस भरविण्यात आली. टिळकानी पैसाफंडावर व्याख्यान दिले व एकादा जिल्हा घेऊन पैसा जमविण्याची काळे यांची कल्पना कशी कार्य फलद्रूप होते हे पारखून पहावे असे सुचविले. मग मध्यवर्ती कमिटीची रचना झाली. डॉ. नानासाहेब देशमुख टिळक व डॉ. खरे या तिघाना पैसाफंडाचे ट्रस्टी नेमण्यात आले. ता. ८ रोजी टिळक वसईकरांच्या निमंत्रणावरून वसईला गेले. मंडळीनी निमित्त पैसाफंडाचे केले होते. पण टिळक खटल्यातून सुटून आल्याबद्दल त्याना त्यांचे अभिनंदन करावयाचे होते. असो. या आठवड्यातील टिळकांचे अवांतर खरे मोठे कार्य म्हटले म्हणजे पंचांग-संशोधनाकरता बोलावलेली सभा होय.

पण या सभेची हकीकत देण्याच्या आधी यापूर्वी चार वर्षांत पंचांगशोधनाची चळवळ कशी सुरू होती हे थोडेसे पाहू. व्यंकटेश बापूजी केतकर हे आपल्या करण ग्रंथाप्रमाणे केतकी नावाचे पंचांग काढू लागले होते. या गोष्टीचा उल्लेख मागे या प्रकरणात केलाच आहे. त्यांच्या नूतन ग्रहलाघवपद्धतीने तीन प्रकारची केतकी पंचांगे तीन ठिकाणी प्रसिद्ध झाली. एक वाईस दुसरे मुंबईस तिसरे बेलवंडीस. पण या पंचांगातील गणितात फरक होता. यासंबंधी मुंबईच्या एका ज्योतिष्याने असे दाखविले की एकाच दिवसाच्या गणितात रविमध्ये ५९ कलांचे अंतर व इतर ग्रहातून असेच अंतर असून त्यांच्या गतीतहि अंतर पडत होते. चैत्र शुद्ध पौर्णिमेचे चंद्रग्रहणाची वेळ मात्र नॉटिकल आल्मनॅकप्रमाणे दिली होती. गणितात फरक पडतो आणि ग्रहणवेळा मात्र नॉटिकलप्रमाणे बरोबर येते असा उघड विरोध दिसून आला. एकाच ठिकाणचे अक्षांश रेखांश घेऊन ही पंचांगे तयार झाली असताहि त्यात मेळ नव्हता. अर्थात् लोकाना ज्योतिषशास्त्रावरील अश्रद्धेचे ते एक कारणच होणार होते. पुढे १९०३ साली निरयन पंचांगासंबंधाने लोकानी तक्रार केली. ग्रहलाघवी पद्धतीने केलेले पंचांग आणि केतकी पंचांग यामध्ये भेद पडल्याने लोकांचा घोटाळा होतो पण त्यातल्या त्यात ग्रहलाघवी पंचांगापेक्षा केतकी पंचांग अधिक विश्वसनीय ठरते अशी पत्रे केसरीकडे आली. आणि पत्रे लिहिणारानी जुने पंचांग संस्कार देऊन नव्या पद्धतीने करावे असे सुचविले.

कोल्हापूरचे वाघोलीकर व केतकर यांच्यामध्ये वाद सुरू झाला तो निष्कारण म्हणून टिळकानी प्रथम आवरून धरला व असा शेरा मारला की जुन्या सर्व सिद्धांत-ग्रंथांची अयनांशाबद्दल एकवाक्यता होणे शक्य नाही. केव्हाहि झाले तरी त्याचा स्थूल दृष्टीने विचार केला पाहिजे. केतकर यानी आपल्या दृष्टीने तो तसा केला आहे असे मानले तर काही वादच नाही. तथापि वाघोलीकरानी केतकीतील अयनांशा-चा मुद्दा लोकापुढे मांडला ही गोष्टहि फार चांगली झाली.

वाघोलीकर यानी केसरीला पत्र लिहून केतकर यांच्या पंचांगातील चूक दाखविली होती. त्यांच्या विचारसरणीला कोल्हापुरचे गणिताचे प्रोफेसर रघुनाथराव आपटे यांची संमति आहे असे प्रसिद्ध झाले. वाघोलीकर यांचे म्हणणे असे की केतकर यानी चित्रा तारेच्या हल्लीच्या भोगात सूर्यसिद्धांतातील चित्रा तारेचा भोग वजा करून बाकी उरला तो अयनांश असे म्हटले आहे. पण केतकरानी चूक केली ती ही की सूर्यसिद्धांतात चित्रा तारेचा भोग १८० अंश धरला आहे असे म्हटले आणि शके १८०० मधील चित्रा तारेचा सायन भोग २०२ अंश आहे असे गणिताने काढून त्यात १८० वजा करून बाकी २२ उरले ते अयनांश धरावे असे ठरविले. पण सूर्यसिद्धांतात कोणत्याही तारेचा वास्तविक भोग दिलेला नाही. या चुकीमुळे आता नक्षत्रात चार पाच घटका व योगात सात किंवा आठ घटका चूक पडेल. अयन संक्रांतीच्या वेळा सुमारे ५० घटका चुकतील आणि गुरु व शनी यांच्या राश्यन्तरात दोन किंवा चार आठवड्यांची चूक पडेल. संक्रांतीचे पर्वकाळ चुकतील व नक्षत्रावर अवलंबून राहिलेली धर्मकृत्ये बिघडतील. ग्रहलाघवीचे गणित आजच्या मानाला जितके चूक त्यापेक्षा केतकरांचे गणित कमी चूक हे खरे. तथापि त्यांचेहि गणित ५० कला चुकणार. तेव्हा याहिपेक्षा शुद्ध असे पंचांग पाहिजे. टिळकाना ही विचारसरणी मान्य असल्यामुळे त्यानी या पत्राला केसरीत योग्य स्थान दिले. वाघोलीकरांच्या या पत्राला केतकर यानी उलट उत्तर दिले. त्यात त्यानी असे दाखविले की वाघोलीकरानी आरंभस्थान चल धरले आहे. स्थिर धरले नाही. पण निरयन पद्धतीने आरंभस्थान स्थिर असले पाहिजे. आणि सूर्यसिद्धांतात स्थिर चित्रा तारेचा भोग बरोबर सहा राशी दिला आहे. यावरून असे दिसते की रेवती तारा क्षितिजाखाली असते ते वेळी चित्रा तारेचा स्फुट भोग नेहमी १८० अंश मानून तिजपासून इतर तारांचे भोग ठरवित असतात. तो १८० अंश मानला तरच त्याची वेधनिर्णायक योग्यता कायम राहते. चित्रेचा भोग ४८ कलानी मानला तर अडचण ही येते की तिच्या-मागे ६ राशीवर कोणताही ठळक तारा नाही. म्हणून पूर्वोक्त दोन भागांचे मध्य समान म्हणून १८० अंश चित्रेचा भोग मानणे शहाणपणाचे होते. हे पत्रहि टिळकानी छापले. त्यांचा हेतू असा की या वादामुळे उभय पक्षी काही काही कबुल्या दिल्या जातील त्या घ्याव्या आणि नंतर उभयतांचा मेळ घालण्यासारखी काही तडजोड सुचवावी.

१९०४ च्या ऑगस्ट महिन्यात श्रीजगद्गुरु शंकराचार्य मठ द्वारका यानी पंचांगशोधनाविषयी एक आज्ञापत्र प्रसिद्ध केले. माधव बागेत मुंबई येथे सभा भरून ३०० गृहस्थांची एक कमिटी नेमण्यात आली. आणि ज्योतिषी राजेरजवाडे वगैरे सर्व प्रकारच्या लोकाना विनंतिपत्र पाठविण्याचे ठरले. प्रश्नावली तयार करण्यात आली. एका नव्या वेधशाळेची रूपरेखा मांडण्यांत आली. या प्रास्ताविक उद्योगाला वर्षा अखेर फळ आले. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचेकडे डेप्युटेशन गेले त्यावरून ते स्वतः पंचांगसभेचे आश्रयदाते झाले. त्यानी १००० रुपयांची

देणगी दिली व आपल्या राज्यांतील सर्व ज्योतिषानी या कार्याला मदत करावी असे आज्ञापत्रहि त्यानी काढले.

ता. २४ डिसेंबर रोजी मुंबईस पंचांगशोधनाची मोठी सभा भरण्याचे निश्चित झाले होते. माधवराव ब्रोडस यानी उत्तर हिंदुस्थानात या कार्याकरिता प्रवास करून ग्वाल्हेर जयपूर कलकत्ता वगैरे ठिकाणी पंचांगशोधनविचाराला चालना दिली. काशीस असताहि त्यानी काही खटपट केली. काशी येथील श्रीमान् नागरिक मुनशी माधवलाल यांच्या निमंत्रणावरून विद्वान् पंडित शास्त्री ज्योतिषी यांची सभा ऑक्टोबर ता. ३० रोजी भरली होती. प्रसिद्ध ज्योतिषी सुधाकर द्विवेदी यानी पंचांगशोधनाची अवश्यकता समजून सांगितल्यावर तेथेहि एक स्थानिक कमिटी नेमण्यात येऊन दररोज सभा भरून चर्चा होऊ लागली. केतकी पंचांगावर हल्ले सुरूच होते. मुंबईचे कटककर यानी असे लिहिले की ग्रहलाघवावरून केलेली पंचांगे चुकतात हे केतकरानी दाखविण्यात आता काही पुरुषार्थ उरला नाही. पण स्वतः केतकरांच्या पंचांगातहि ज्या चुका अजून निघतात त्या का हे त्यानीच पहावे. याला केतकरानी उत्तर दिले की मी वेध घेऊन गणित करीत असतो. पण सूर्य-ग्रहणाचे गणित कठीण व त्रासाचे. एका गावचे गणित करीपर्यंत गणक थकून जातात आणि पाच पंचवीस निरनिराळ्या ठिकाणचे स्पर्श मोक्ष काल ठरविताना पाचचार मिनिटांची चूक पडल्यास नवल नाही. पण हा सर्व वाद लवकरच रीतसर पुढे येणार होता. पंचांगशोधनाची मुख्य सभा प्रथम ता. २४ डिसेंबर रोजी भरली. तिने ठरविले की सर्व ज्योतिषानी मिळून अकरा पंचांच्या देखरेखीखाली वादग्रस्त विषयाचा निर्णय करून सात दिवसांचे आत आपला निर्णय शंकराचार्यांकडे पाठवावा. कमिटीतील वाद शंकराचार्यासमक्ष सुरू होता. ज्योतिष मंडळीत चार पक्ष होते. कोणी बापुदेवशास्त्री यांचे अनुयायी कोणी उज्जनीच्या परंपरेचे अभिमानी काही निवळ सूर्यसिद्धांत पक्षाचे कोणी केतकर पक्षाचे व कोणी केरो-पंत पक्षाचे होते. कोणी नवीन वेध घेण्याचे कारण नाही असे म्हणत. कोणी म्हणत वेध घ्या पण नव्या यंत्राने नको. कोणी शुद्ध सायनवादी कोणी शुद्ध निरयन-वादी अशा बऱ्याच भानगडी होत्या. टिळकानी या प्रत्येक पक्षाशी वेगवेगळे बोलणे करून आपले म्हणणे त्याना पटवून दिले. पण सर्वस्वी आपल्या मनाप्रमाणे होईल असा रंग त्याना दिसेना. पण त्यातल्या त्यात संमतीने जो निर्णय होईल तो करून त्यानी शंकराचार्यांकडे नेला. त्यावर सायनवादी दोन व केरोपंती पक्षाचे सहा अशा खेरीज इतर ज्योतिषी आणि शास्त्री यानी आपली संमति लिहिली. केरोपंती पक्षाच्या ज्योतिषाना अयनांशाखेरीज बाकी सर्व काही मान्य होते. एकंदर संम-तीच्या सह्या १२० झाल्या. त्यात लाहोर ग्वालेर जयपुर उज्जनी काशी कलकत्ता मुर्शिदाबाद अलवार औरंगाबाद पुणे कोल्हापूर तिरुपत्ति म्हैसूर वगैरे ठिकठिका-णचे ज्योतिषि आणि धर्मशास्त्री होते. इतके तरी एकमत झाले हा सर्वांनी चम-त्कारच मानला. अकरा पंचानी या निर्णयाप्रमाणे पंचांगशोधन व नवीन करण-

ग्रंथ तयार करावा असा आपला अभिप्राय दिला. या अकरा पंचात बाळाजी शास्त्री घाटे अमृतरामशास्त्री हातीभाई गणेश कृष्ण आपटे सुरेंद्रनाथ बंदोपाध्याय पं. चंद्रदेवजी पं. गोकुळदास पं. नारायणशास्त्री गणेश त्रिंबक देवज्ञ गोपाळाचार्य रघुनाथ नारायण आपटे हे होते. रात्री श्रीव्यंकटेश प्रेसचे मालक खेमराज श्रीकृष्ण-राज यांचे घरी पानसुपारी झाली. तेथे सर भालचंद्र यानी या निर्णयाचे श्रेय टिळकांचेकडेच आहे असे सांगितले. ता. २ रोजी बाबुलनाथाचे देवळात शंकराचार्यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली. तेथे सर्वानुमते असा ठराव झाला की झालेली हकीकत निवेदन केल्यावर ती प्रसिद्ध करावी. निर्णयाप्रमाणे करणग्रंथ तयार करावा. आणि तो तज्ञाना पसंत झाल्यावर प्रचालित करावा.

मुंबईस झालेल्या या निर्णयाचे महत्त्व फार होते. त्यात मुख्य मुद्दे खालीलप्रमाणे होते. निर्णय झाला तो कोणाला किती अनुकूल कोणाला किती प्रतिकूल हे पाहण्यात अर्थ नाही. सर्व पक्षांचा सारासार विचार करून मुख्यतः दृक्प्रत्यय चुकणार नाहीत अशा धोरणावर करणग्रंथ तयार करण्याचे तत्त्व या निर्णयात दाखल केले होते. सर्व देशातील पंचांगे सूर्य चंद्र व ग्रह यांच्या गतिमानावरच बनविलेली असतात. पण कोणत्या ग्रहाची नाक्षत्रिक स्थिति ही काल मोजण्याचे साधन म्हणून घ्यावी हे पंचांगकर्त्यांच्या इच्छेवर अवलंबून असते. कोणी सौरवर्ष मानतो. कोणी चांद्रवर्ष मानतो. कोणी चांद्र आणि नाक्षत्र सौर यांचा मेळ घालतो. यामुळे ग्रहांची गति तीच असता निरनिराळे कालमापन दृष्टीस पडते. पण या भेदाशिवाय दुसराहि एक भेद सकारण. सूर्याचे गतिमान आणि पृथ्वीचे गतिमान यांचा भागाकार बरोबर तुटत नाही. वर्षमानाची गति इतकी सूक्ष्म आहे की निरनिराळ्या लोकानी वेध घेऊनहि ती निरनिराळी आली आहे. या वर्षमानात अंतर जर थोडथोडे पडेल तर हजार पाचशे वर्षांनी ते अंतर फारच मोठे होते. ३६० दिवसाऐवजी ३६५ व तीनशेपासष्टाऐवजी $३६५\frac{१}{४}$ इतके वर्षमान सूक्ष्म निघाले तरी पुरी सुधारणा होत नाही. पूर्वी रोमन लोकानी व खिस्ती लोकानी पंचांगसंशोधन करून वर्षमानाचे पडलेले अंतर भरून काढले होते. इकडील परंपराहि अशीच होती. कोणी ही सुधारणा स्वतंत्रपणे करतो कोणी बीजसंस्काररूपाने करतो. जुन्याविषयी आस्था न बाळगणारा स्वतंत्रपणे वागतो. आणि ती आस्था असणारा एखाद्या मूर्धाभिषिक्त जुन्या ग्रंथातील वर्षमान घेऊन मग त्यावर संस्कार करावा म्हणतो. पण पूर्वाचार्यांच्या व आताच्या काळाच्या दरम्यान वर्षमानात काही फरक पडलेच आहेत. पंचांगशोधनाला पुराणमतवादी विरुद्ध असतात. का की जुनी गतिमाने चुकली म्हटली म्हणजे जुने लोक चुकले आणि आपण बरोबर असे होते. पण साध्या डोळ्यालाहि दिसेल इतका फरक ग्रहादिकांमध्ये पडला म्हणजे मग मनाला प्रश्न पडतो की जुने म्हणजे सर्व चांगले किंवा बिनचूक असे शास्त्र समजणाऱ्या माणसानी म्हणू नये. भलते वेळी भलते धर्मकार्य केले व मला कर्मफल मिळाले अशी भावना कोणी धरली तरी फारसे बिघडत नाही. कारण फळ अदृश्य

असते. पण ग्रहण अमुक वेळी लागले पाहिजे असे जुन्या आधाराने म्हटले आणि ते त्या वेळी लागले नाही तर चंद्रसूर्यांनी वेधाविरुद्ध बंड केले असे म्हणून चालावयाचे नाही.

ज्योतिर्गणित हे दृश्यफल आहे. धर्मकृत्ये व दृक्तुल्य पंचांग यांची सांगड घालावी असे जो तो म्हणतो हे खरे. पण फिरवाफिरव करण्याची वेळ आली की त्याला विरोध उत्पन्न होतो. पूर्वी ख्रिस्ती धर्म पाळणाऱ्या मंडळींनी युरोपात पंचांग-शोधनाच्या सभा भरविल्या तेव्हा तिकडेहि इकडच्यासारखाच प्रकार झाला. सुमारे सात आठशे वर्षेपर्यंत धर्मशास्त्र व ज्योतिष यांचा विरोध व वाद सुरू होता. पण तिकडे कालांतराने हा वाद मिटला. इकडे हिंदुस्थानात निरनिराळ्या प्रांतातील ज्योतिषांनी वेध घेऊन चुका काढल्या. पण त्या कल्पनेचा अंमल त्या प्रांतापुरताच झाला. मारवाडात ब्रह्मपक्ष मद्रासेकडे आर्यपक्ष काश्मीरात मूल सूर्यसिद्धांत असे निरनिराळे पक्ष ज्योतिषात होते. आर्यभट्टापासून गणेश दैवज्ञापर्यंत सर्वांनी पंचांग-शोधन केले. पण कोणताहि एक ग्रंथ सर्व हिंदुस्थानभर मान्य करण्यात आला नव्हता. ही पंचाईत टाळण्याकरिता युरोपियन लोकांनी काढलेले वेध स्वीकारून इंग्रजी शिकलेल्या ज्योतिषांनी आपापले पंचांग बनविले. पण इतके करूनहि भेदाचा मुद्दा हा राहिला की जुने ग्रंथ मूळ आधाराला घेऊन दृक्प्रत्ययहि साधेल असा संस्कार कोणत्या रीतीने करावा? महाराष्ट्रात केरोपंतांनी जुन्या ग्रहलाघवीय गणिताची चूक सर्वांना पटवून दिली होती. त्यानंतर केतकरांनी करणग्रंथहि केला. पण सर्व हिंदुस्थानाला तो किंवा दुसरा करणग्रंथ करावा ही महत्त्वाकांक्षा मुंबईच्या सभेच्या मुळाशी होती. सरकारी अंमलदाराचा जर हा विषय असता तर सर्व हिंदुस्थानांत जसा एकदम नवा कायदा होतो त्याप्रमाणे एखादे नवे पंचांग चालू झाले असते. पण इंग्रजांनी हिंदुस्थानात इंग्रजी पंचांग सुरू केले. त्यांना जुन्या ज्योतिषशास्त्राची काय परवा? पण एका अर्थाने इंग्रज हिंदुस्थानात आपलेच पंचांग घेऊन बसले ही गोष्ट बरीच झाली. टिळकांच्या मते पंचांगशोधनात खरा पुढाकार हिंदी संस्थानिकांनी घेतला पाहिजे.

परिषदेत मुख्य ठराव झाला तो असा की प्राचीन सूर्यसिद्धांतातील माने घेऊन त्यांस न्न वेध्याप्रमाणे लागेल तो बीजसंस्कार द्यावा. म्हणजे सूर्य चंद्र व इतर ग्रह किंवा अयनगति यांची माने सांप्रतच्या सूक्ष्म वेधांनी जेव्हा जेव्हा जसजशी उपलब्ध होतील तसतशी घेत जावी. केतकर यांनी या ठरावावर सही केली नाही. याचे कारण नवीन ग्रंथ करावा असा ठराव झालेला होता. आणि केतकर यांचा करण ग्रंथ आधीच होऊन राहिला होता. पण केतकरांनी शोधनाची स्थिती सोपी आहे की अवघड आहे इकडे लक्ष दिले नाही. दुसरा वाद अयनांशाचा. फक्त केरोपंतांनी हा अंश १८ धरला होता. इतर पंचांगात तो २२ ते २३ यांचे जवळजवळ होता. पण अयनांश वेगळा म्हटल्याने बापुदेवशास्त्री व केरोपंत हे दोघेहि सूक्ष्म गणिती होते तरी त्यांचे पंचांगात अधिकमास वेगवेगळा येतो. म्हणून शक्य तर सर्व हिंदुस्थानभर एकच अयनांश मानला जावा असा सभेचा प्रयत्न चालू होता.

अयनांश हा केवळ युक्तिवादाचा प्रश्न नसून तडजोडीचा प्रश्न होता. आरंभस्थान निश्चल असावे एवढेच काय ते अवश्य. मग ते धरताना तडजोडीकरिता चार दोन अंश मागे किंवा पुढे धरले तरी चालेल. पण केरोपंतानी १८ अयनांश म्हटले यात आरंभस्थान निश्चल मानण्यावरहि त्यांचा कटाक्ष होता. पण त्यांचा युक्तिवाद सभेतील लोकाना पटला नाही.

सर्व हिंदुस्थानभर लोकाना २२-२३ हे अयनांश संमत आहेत तेच तुम्ही घेऊन चाला असे त्याना सर्वांनी म्हटले असते तर त्यानी तह केला असता. कारण अधिक मास कोणता का होईना पण तो सर्व हिंदुस्थानभर एकच मानावा ह्या म्हणण्यात स्वारस्य होते. नवीन पंचांग निरयन पद्धतीने करावे असे सभेत ठरले. परंतु या पंचांगात सायन संक्रांती लिहाव्या असेहि ठरले. तसेच उत्तरायन व दाक्षिणायन यांचा आरंभ प्रत्यक्ष पाहून घ्यावा असे ठरले. यामुळे जुन्या पद्धतीच्या ऋतुगणनेत ७२ वर्षांनी एक दिवसाचा फरक पडेल. पण स्थिर नक्षत्रे सोडून देण्यापेक्षा ही पद्धति परंपरागत झाल्यामुळे शास्त्रीय दृष्ट्याहि अधिक ग्राह्य असे सभेने ठरविले. अशा रितीने परिषदेने केलेला निर्णय पुष्कळ अंशी केतकरांच्या चित्रापक्षाला व शंकर बाळकृष्ण दिक्षीत यांच्या नवीन पक्षाला धरून होता. बापुदेवशास्त्री यानी सौरवर्ष मानाची रीति घेतली पण केरोपंताची ग्रहगतिमाने घेतली. सुर्यसिद्धांतातील माने मूळभूत धरली पण बीजसंस्कार करावे असे ठरविले. आणि अयनांश मात्र पूर्वीच्या सूर्यसिद्धांतातीलच ठेवले. अशा रीतीने या सभेचे काम तडजोडीच्या स्वरूपाचे झाले.

टिळकांचा अभिप्राय असा की कोणीकडून तरी एकदा सर्व हिंदुस्थानभर एकच आणि नवे पंचांग सुरू होऊ द्या. आणि ही गोष्ट एकदा पदरात पडल्यावर मग इतर गोष्टीबद्दल खुशाल भांडावे.

## ( ३ ) सुधारणेच्या तत्वांचा वाद

१९०१ साली माधवराव रानडे वारले तेव्हापासून अखिल भारतीय सामाजिक परिषदेचे महत्त्व पुष्कळच कमी झाले. नारायणराव चंदावरकर यांच्यामध्ये माधवराव रानडे यांचे पुढारीपणाचे गुण मुळीच नव्हते. परिषदेत भाग घेणारे लोक नाराज झाले. पहिली फूट १९०३ च्या डिसेंबर महिन्यात मद्रासेत भरलेल्या सामाजिक परिषदेनंतर पडली. परिषदेच्या दुसरे दिवशी सर सुब्रह्मण्य अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली मोठी सभा भरून प्रोफेसर रंगाचार्य यांच्या पुढारीपणाने हिंदु ॲसोसिएशन नावाची सभा स्थापण्यात आली. ज्या कारणाने मुंबईकडे सुधारक व पुराणमतवादी असे भेद पडले त्याच कारणाने तेच भेद मद्रासेकडेहि पडले होते. या भेदाचे मर्म हे की समाजात सुधारणा होणे अपरिहार्य व इष्टहि आहे, पण सुधारणेला मूळ काय घ्यावयाचे व कोणत्या हेतूने सुधारणा करावयाची याविषयी सुधारक व इतर यांचे मत जमत नाही. मुसलमानी राज्यातहि आमच्या समाजात सुधारणा

झाल्या. बौद्ध राजांच्या अमलात त्या झाल्या. इंग्रजी राज्यातहि त्या होत आहेत. पण हिंदुसमाजच जाग्यावर राहणार नाही अशा सुधारणा होऊ लागल्यास त्या लोकाना कशा रुचणार ? आपला धर्म न सोडता एखादा युरोपिअन आमचा पोषाख स्वीकारून विलायतेला परत गेला व त्याने शेंडी ठेवली धोतर नेसू लागला तर तो खिस्त–धर्मीय असताहि त्याच्या समाजाचे लोक त्याला जवळ घेणार नाहीत. म्हणून तो एक बहिष्कारच झाला. पण आमचे लोक मात्र समाजाविषयी इतका अभिमान बाळगीत नाहीत. एखादा मनुष्य विलायतेस गेला तेथे त्याने हवे ते खाल्ले हवे ते तो प्याला व पोषाखाने पक्का साहेब बनून गोऱ्या लोकांचे आचारविचार अमलात आणू लागला तर त्याला इतर समाजाने बहिष्कृत केल्यास काय नवल ? आणि त्यात काय वावगे ? पण सामाजिक परिषद अशा लोकांची कड घेऊन भांडणार हे पुष्कळ सुशिक्षितानाहि आवडत नाही. मग जुन्या मताच्या लोकांना न आवडेल तर काय नवल ? सुधारणा करावयाची पण ती हिंदू समाजाचे हिंदुत्व म्हणजे त्याचे वैशिष्ट्य कायम ठेऊन करावयाची की ते समूळ उपटून काढून करावयाची ?

तारीख १२ जून १९०४ च्या केसरीत टिळकानी या प्रश्नाची अधिक चर्चा केली. ते म्हणतात "समाजसुधारणा नको असे म्हणणारे आम्ही नाही ही गोष्ट आम्ही अनेक प्रसंगी कंठरवाने सांगितली आहे. पण सुधारकांचे व आमचे मार्ग खचित एक नाहीत. उदाहरणार्थ मूर्तिपूजा नको असे सुधारकहि म्हणतात आर्य समाजहि म्हणतो व खिस्तीहि पण म्हणतात. पण आर्यसमाजी लोक हिंदू असे का वाटावे ? बौद्ध लोकानी हिंसेविरुद्ध उपदेश केला तथापि उपनिषदे ही हिंदुधर्मरक्षक वाटतात. वेदनिंदक बौद्ध हे मात्र हिंदू वाटत नाहीत. वेदान्ती यज्ञ हिंसा निंद्य मानतो पण तो बौद्धाप्रमाणे जातिभेद नको म्हणत नाही. भागवद्धर्महि तत्वतः जातिभेदाविरुद्ध आहे पण भागवद्धर्मी हा हिंदु वाटतो. तात्पर्य निवळ सुधारणेचे अमुक एक कृत्य करावे असे म्हटल्याने तो सुधारक बनतो असे नाही. कारण पुराणमतवादिहि अशा कृत्याला संमति देईल. पण हिंदुसमाजाच्या मनोवृत्ती व सुधारणा घडवून आणण्याचे मार्ग वेगळे असतात. ल्यूथर हा खिस्ती धर्माचा सुधारक होता. पण बायबलावर विश्वास ठेऊन त्याने सुधारणेचे मंडण केले. आमचे इकडील सुधारक मात्र जुन्या संस्कृतीवर विश्वास न ठेवता किंबहुना तिची हेटाळणी करून तिची सुधारणा करूं पाहतात. एकदेशीपणा हा जर दोष तर जुन्या शास्त्राप्रमाणे एककल्ली सुधारणा ही दोषी का मानूं नये ?"

सन १९०४ च्या मे महिन्यात 'ईस्ट अँड वेस्ट' नामक मासिक पुस्तकात रँगलर पराजपे यांचा 'धर्मशिक्षण' या विषयावर एक लेख प्रसिद्ध झाला. त्यावर १७ मे च्या केसरीच्या अंकात अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्याला टिळकानी 'प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते' असा मथळा दिला. तो परांजपे याना पुष्कळच झोंबला. एका सद्गृहस्थाने केसरीला असे लिहून कळविले की

परांजपे बुद्धिमान् निगर्वी सज्जन असले तरी आपल्या धर्माविषयी त्यांचा अतिशय वाईट ग्रह आहे. एकदा डिबेटिंग सोसायटीत परांजपे जोरात असे बोलले "I challange Mr. God if there be any to appear before me." त्यावर एक कर्मठ विद्यार्थी उठून म्हणाला की 'परांजपे तुम्ही जर कमी जास्त बोलला तर मी तुमचे पाय धरून प्लॅटफार्मवरून खाली ओढीन!' ते एकदा खेळण्याच्या मैदानावर जाऊन असे म्हणाले की 'हे पहा मी काही आज श्रावणी केली नाही माझे जानवे जुनेच आहे'. पण जुने तरी गळ्यात ठेवले होते! टिळकांचे म्हणणे असे की "शाळेत धर्म हा विषय शिकवूं नये असे परांजपे यांचे म्हणणे. पण खुद्द प्रिन्सिपाल सेल्बी यानी असे मत दिले की रानडे व भांडारकर यांच्याप्रमाणे शुद्ध धर्मतत्वे शाळेत शिकविण्याला हरकत नाही. धर्म हा राष्ट्रीयत्वाला विघातक होतो ही गोष्ट खरी नाही. ख्रिस्ति धर्माने इंग्लंडच्या राष्ट्रीयत्वाला धक्का आला नाही. आणि ख्रिस्ती धर्मात तर शेकडो शाखा आहेत. बरे शाळेत धर्मशिक्षण न दिले म्हणून घरी धर्म राहणारच. अर्थात हिंदू मुसलमान ख्रिस्ती पारशी हे भेद नाहीसे होणार नाहीत. परांजपे हे जवळजवळ नास्तिक असल्यासारखे लिहितात व बोलतात आणि आचरटपणाचे धैर्य या नावाने समर्थन करू पाहातात इतकेच वाईट. लोकांच्या आश्रयाने वाढलेल्या शिक्षणसंस्थाच्या अध्यक्षानी असे एककल्ली विचार प्रगट करणे योग्य नाही."

१९०४ साली पंडिता रमाबाई यानी दक्षिण हिंदुस्थानात दौरा केला. व अमेरिकेतल्या प्रमाणे इकडेहि हिंदुधर्माची नालस्ती केली. हिंदु पुराणातील सात समुद्र तीन खंडे सात स्वर्ग व सात पाताळे गजमुखी अश्वमुखी देवता राहुकेतूचे बंड शाळिग्रामपूजा ही सर्व त्यानी हिंदुधर्माच्या मूर्खपणाची म्हणून उदाहरणे दिली. तसेच स्त्रियांच्या परवशतेबद्दल करुण कहाणी सांगितली. यांतील बऱ्याच गोष्टी श्रोत्याना पटण्यासारख्या नव्हत्या. पण पंडिताबाईनी असे सांगितले की मी बायबलचा जेव्हा आश्रय केला तेव्हा मला सत्य ते काय हे कळले आणि मी ख्रिस्ती बनले. तेव्हा एका श्रोत्याने त्याना असे विचारले की जनाबाईना श्री पांडुरंग जितका जवळ दिसतो तितका जवळ ख्रिस्त तुम्हाला दिसतो काय? तर मग तुमच्याप्रमाणे सर्व हिंदूना ख्रिस्त एका रात्रीत आपले अनुयायी का करून टाकीत नाही? बाईनी सांगितले ख्रिस्ताला हे करणे शक्य आहे. पण तो का करीत नाही काय सांगू! शेवटी सर कृष्णमूर्ति यानी पंडिता रमाबाईविरुद्ध भाषण केले. आणि सभेने त्यांची हुर्यो केली. कोणी म्हणाले 'पंचगव्य हे तुम्हाला थोतांड वाटते आणि बॅप्तिस्माचे पाणी हे तेवढे कसे पवित्र?' तात्पर्य पंडिता हे नाव टाकून बाई रेव्हरंडा म्हणू लागतील तर ते अधिक शोभेल.' आणि हिंदु विधवांची करुणा दाखवून त्याना ख्रिस्ताच्या कळपात ओढण्याचा बाईचा विचार आहे. म्हणून लोकानी सावध रहावे असे श्रोतृमंडळाचे मत झाले. स्वतः टिळकाना पुनर्विवाह पसंत असो वा नसो. हिंदु विधवा रमाबाईच्या तावडीत सापडण्यापेक्षा

त्या कर्व्यांच्या संस्थेत गेलेल्या बऱ्या हे मत टिळकानी या वेळी प्रगट केले! इतका तरी रमाबाईचा उपयोग झाला म्हणावयाचा! ता. १९ व २६ जानेवारी १९०४ च्या केसरीच्या अंकात कर्वे यांच्या वार्षिक रिपोर्टाचा सारांश त्यांच्या सहीने चार कॉलम घालण्यात आला होता. तसेच तारिख ९ फेब्रुवारीच्या अंकात कर्वे यांचे एक दीड कॉलम पत्र छापले होते. त्यात असे एक वाक्य आहे की "संस्थेला थोडेसे स्थैर्य येऊन आणखी जोम दिसू लागला आहे. आणि तिच्याकडून अल्पस्वल्प तरी लोकहिताचे काम होईल अशी आशा उत्पन्न झाल्यामुळे तिची कहाणी घेऊन मी आपणाकडे आलो. पण तिचा आदर करून आपल्या पत्रात स्थळ दिले याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. आश्रयाची हकिकत आपले पत्रात प्रसिद्ध झाल्यापासून कित्येकाकडून पत्रे येऊन त्यानी काही प्रश्नहि विचारले आहेत."

ह्या सुमारास बनारस येथील मिसेस बेझंट यांच्या सेंट्रल हिंदु कॉलेजासंबंधी वाद लोकापुढे आला. कॉलेजावरील आरोप असे होते की कॉलेजचे वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था जातिनियमाप्रमाणे होत नाही आणि बाईचा एकंदर कटाक्ष जातिविध्वंसाकडे आहे. या वादात टिळकानी बेझंटबाईचा पक्ष उचलून धरला. केसरीत त्यानी असे प्रतिपादन केले की बोर्डिंगासारख्या संस्थेत आठ पुरभय्ये व दहा चौके असे होणे शक्य नाही. पंक्तिनिर्बंधात किंचित ढिलाई होत असली तरी पण कॉलेजात हिंदु धर्माचे शिक्षण दिले जाते व देशातील कित्येक सरकारी निमसरकारी कॉलेजाच्या बोर्डिंगापेक्षा बनारसच्या ह्या बोर्डिंगात हिंदुधर्म पाळण्याची खचित अधिक व्यवस्था केली आहे. बेझंटबाई केवळ सुधारक म्हणून नावे ठेवण्यात काही अर्थ नाही. कारण कित्येक वार असे खप्पी होते की मुलगा कॉलेजात दारू पितो असे प्रिन्सिपालने बापाला कळविले असता तोच उलट प्रिन्सिपालला कळवितो की 'माझ्या मुलाला मी त्याच्या मनाप्रमाणे वागण्याला मुभा दिली आहे.' टिळक लिहितात:—"आमच्या धर्माचे पुनर्जीवन बाईसारख्या विदेशिणीच्या हातून कधी व्हावयाचे नाही. परंतु तेवढ्याकरिता जे परकी लोक आमच्या हिताचे प्रयत्न करतील त्यानाहि नाके मुरडणे हा कृतघ्नपणाच होय. आपण काही सुधारावयाचे नाही व दुसऱ्याला काही करू द्यावयाचे नाही ही प्रवृत्ति ज्या समाजात जागृत आहे त्याचे पाऊल कधीहि पुढे पडावयाचे नाही. कोणी असा आक्षेप घेतील की कॉलेजात विद्यार्थ्यांकडून म्हणविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय गीतात 'नच वैदिकोऽहं' असे शब्द आहेत. यावरून कॉलेजचे चालक हिंदुधर्मद्वेष्टे आहेत. पण टिळकानी हा आक्षेप खोडून काढून उलट असे जाणविले की हिंदुधर्मांतर्गत भिन्न मताच्या व पंथाच्या लोकात तंटे चालत तेव्हा प्रत्येकाने मी दुसरा नाही असेच म्हटले आहे. आणि व्यापक हिंदुधर्माचे किंवा भारतधर्माचे लक्षण वेदातील ब्रह्म लक्षणाप्रमाणे 'नेति नेति' असे करणे अयुक्त नाही. बनारस कॉलेजचा हेतुहि हिंदु मिशनरी त्यातून निघावे असाच आहे. बनारस कॉलेजवर आक्षेप घेणाऱ्यात शंकरशास्त्री पदे व पानवलकर वगैरे मंडळी होती. पण थिऑसफिस्ट पंथात हिंदु धर्माविरुद्ध उद्गार

काय आहेत हे त्यानी प्रत्यक्ष दाखवावे असे टिळकानी त्यानाच आव्हान केले. थिऑसफीच्या गुह्य तत्वाबद्दल, टिळक म्हणतात, मलाहि शंका आहे तथापि त्या योगाने बनारस कॉलेज हे हिंदु धर्माविरुद्ध आहे असे ठरत नाही.

## (४) टिळक व काळपत्र

पूर्वी एकदा अँग्लो इंडियन पत्राचा हल्ला पुण्याच्या 'काळ' पत्रावर झाला असता केसरी मराठा पत्रानी व टिळकानी त्याची तरफदारी कशी केली हे मागे दिलेच आहे. १९०४ साली पुन्हा तसाच एक प्रसंग उद्भवला. रशियन प्रधान एम. डी. प्लेव्हे यांचा खून क्रांतिकारकानी केला. त्यावर लिहित असता काळकर्त्यानी कर्झन यांच्या दुष्कृत्यांचे वर्णन केले व असे विचारले की, "असले व्हाइसरॉय पुन्हा एक वेळ हिंदुस्तानात येणार ही गोष्ट सहन करण्याला हिंदुस्थानच्या लोकानी कसे तयार व्हावे ?" मुंबईच्या टाइम्स पत्राने या लेखाचे भाषांतर देऊन असे लिहिले की काळ पत्र कर्झनसाहेबांचा खून करण्याला उघड चिथावणी देत आहे म्हणून त्यावर सरकारने खटला करावा. त्याला उत्तर म्हणून टिळकानी जवळ जवळ एक सबंध केसरी खर्च घातला. या सुमारास लंडनच्या जस्टिस पत्रात मि. हाइंडमन यानी लिहिलेला सणसणीत लेख व त्याच्या जोडीला काळातील सर्व स्फुटाचा उतारा देऊन टिळकानी असे दाखविले की कर्झनसंबंधाने कोणी किती कडक लिहिले तरी ते पुरे होऊच शकत नाही. अर्थात् काळ पत्राने लिहिले ते कडक असले तरी त्यावरून कर्झनसाहेबांच्या खुनाची चिथावणी निष्पन्न होते असे नाही. टाइम्ससारखे पत्रकर्ते हे 'नृपांगणगत खल' होत. त्याना सरकारच्या कानाशी लागून गरिबांचा नाश करावयाचा असतो. म्हणून आंगणातल्या खड्याप्रमाणे त्याना न्यायाच्या केरसुणीने झटकून टाकले पाहिजे. पूर्वी टिळकावर असला आरोप आणला तेव्हा ग्लोब व टाइम्स याना नाक घासून माफी मागावी लागली ही टाइम्सची आठवण बुजाली ! अशा प्रकारचे चिमटे घेऊन टिळकानी सरकारला बजावले की '१८९७ साली माझ्यावर खटला करून जी चूक केली ती फिरून तरी करू नका.' सोशिआलिस्ट लोक खून करतात आणि काळकर्त्यांची काही मते सोशियालिस्टा-सारखी दिसतात. पण दादाभाई नौरोजी यानी सोशियालिस्ट पक्ष सोडला नाही. उलट त्यात जाऊन ते मिसळले आहेत. अर्थात् टीकाकार वेगळे आणि खुनी लोक वेगळे. टॉल्स्टॉयसारखे लोक खुद्द रशियात काय वाटेल ते लिहीत असता त्याजवर खटला होऊ शकत नाही आणि इकडे मात्र देशी पत्रकारावर खटले करण्याला अँग्लो इंडियन पत्रे चिथावणी देतात. काळ पत्रातील लेखाचा अर्थ करण्याला केवळ सान्निध्य हे एकच साधन न घेतां योग्यता व आकांक्षा ही साधनेहि घेतली पाहि-जेत. रशियात एखादा मनुष्य राक्षसावतारी निघतो व खून केल्याने सरकारी अत्याचार थांबतात. पण इंग्रजांची राज्यपद्धति एका व्यक्तीवर कधीहि अवलंबून असत नाही. म्हणून एका अधिकाऱ्याचा खून करून स्वराज्य मिळते असेहि नाही

आणि ते मिळाले तरी खून हा केवळ निंद्यच होय. कोणीहि तो करण्याला दुसऱ्याला चिथावणी देणे हे नामर्दपणाचे लक्षण होय. असे म्हणून टिळकानी हेहि म्हटले की, " आम्ही कडक टीका करणारच. कारण आमचे अंतःकरणच जळत आहे. आणि आमच्यावर खटले झाले तरी आम्ही त्याला भिणार नाही. पण न्यायाची गोष्ट म्हटली म्हणजे सरकारने आमच्या हेतूविषयी गैरसमजूत करून घेऊन दडपशाही चालवू नये. " सुदैवाने लॉर्ड लॅमिंग्टन यानी काळ पत्रावर या वेळी खटला केला नाही. पण पुढे तो चार वर्षांनी झालाच.

## ( ५ ) भाला पत्रावरील खटला

१९०५ च्या अखेरीस भालाकार भास्कर बळवंत भोपटकर यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. ता. १२ फेब्रुवारी रोजी खटला मुंबई हायकोर्टात सुनावणीला निघाला. सरकारतर्फे बॅ. रेक्स हे होते. भाल्यामध्ये कोणा एका गृहस्थाने नरकलोकचे काल्पनिक वर्णन करून इंग्रज लोक हे नरकात राज्य करण्यालाच योग्य आहेत असे दर्शविले होते. ओरिएंटल ट्रान्सलेटर मिर्झा अबास अली बेग व रावबहादुर गोपाळराव साठे यांच्या जबान्या झाल्यावर आरोपी भोपटकर यानी आपली कैफियत दिली. तीत त्यानी असे सांगितले की "लेख कोणी अवांतर गृहस्थाने लिहून पाठविलेला आहे. जुन्या इंग्रजी वाङ्मयात रूपकात्मक गोष्टी लिहीत असत. तशाच प्रकारचा हा लेख आहे. त्याचा सरकारावर कटाक्ष नाही. इंग्रजांचे गुण मी वेळोवेळी घेतलेले आहेत. यावरून माझी राजनिष्ठा दिसून येईल. " नंतर भालाकारांचे बॅरिस्टर-दावर यानी सांगितले की लेख सुशिक्षितांच्या करमणुकीकरता लिहिलेला आहे. रामदास आपले राज्य घ्यावे असे ज्या ओवीत सांगतो ती भाला-पत्रावर अवतरणादाखल घेतलेली असते. पण रामदासाचे राज्य म्हणजे पारमार्थिक राज्य. देशातील स्थानिक सत्ता नागरिकांच्या हाती यावी इतकेच लेखकाला म्हणायाचे आहे. भाल्यातील लेख अँग्लो इंडियन पत्रातील कित्येक लेखापेक्षा खचित सौम्य आहेत. यावर रेक्स साहेबानी उत्तर दिले व लेखातील मुद्दानमुद्दा इंग्रजी राज्यकारभारासंबंधाने आहे म्हणून लेख केवळ रूपकात्मक मानून चालणार नाही असे सांगितले. शेवटी न्यायाधिशानी भोपटकराना सहा महिन्याची शिक्षा दिली. ह्या खटल्यासंबंधाने लिहिताना भाल्यातील लेखाचे समर्थन टिळकाना फारसे करिता आले नाही. पण टिळकांचे म्हणणे इतकेच होते की " ह्या लेखावरून राजद्रोहाची बुद्धि दिसून येत नाही. आणि असले खटले करण्यात सरकारास मोठे भूषण किंवा पुरुषार्थ वाटण्यासारखा नाही. सरकार आपल्या जिवाला जपत असल्यामुळे त्याना लोकांचा नेहमी वहीम येतो. बरे आपल्यावर लोकांची प्रीति जडावी असे वर्तन तरी त्यानी ठेवावे तेहि ते ठेवीत नाहीत. अशा स्थितीत लोकांचे विकार व विचार सहजच तोंडातून बाहेर पडणार. आणि त्याकरिता राजद्रोहाचा खटला करणे म्हणजे रक्त शुद्ध करण्याकरिता औषध न घेता दस्त्यावर मलमपट्टया लावीत बसण्यासारखे आहे.

प्रजेच्या मनात सरकाराबद्दल पूज्य भाव राहिला नाही तर सुरक्षितपणाला धक्का येतो असे थोडेच आहे. पण १९८७ नंतर राजद्रोहाचा नवा कायदा केला त्याप्रमाणे नाणे खणखणीत वाजते की नाही हे पाहण्याकरिता हा खटला करण्याचा मोह सरकारला झाला असावा. माल्यातील लेखात बीभत्स रस वाजवीहून अधिक होता. पण ज्या कारणाने असले विचार विकृत रूपाने बाहेर पडतात ते शिक्षा केल्याने मनात येण्याचे थांबले असे मात्र नाही. असले खटले म्हणजे अतिप्रसंग होय." आणि ग्राम्य अपरिचित दाखल्याबद्दल भालाकाराना जर सहा महिन्याचा तुरुंगवास तर हा खटला करण्याचा सल्ला ज्यानी दिला त्यालाहि टिळकांच्या मते सहा महिने कामावरून दूर करणे योग्य होईल.

## ( ६ ) टिळक व अगम्यगुरु

१९०६ च्या फेब्रुवारी महिन्यात महात्मा अगम्यगुरु ह्या नावाचे एक संन्यासी पुण्यास आले. स्वामी विवेकानंद यानी अमेरिकेत जाऊन वेदान्ताचा उपदेश करून आर्यसंस्कृतीची छाप तिकडील लोकांचे मनावर पाडली या गोष्टीने इंग्रजी बोलणारा संन्यासी ही एक कौतुकाची गोष्ट होऊन गेली होती. तोंडात इंग्रजी भाषा आणि वेष हिंदु संन्याशाचा या दोन गोष्टींची जोड परकीय लोकांच्या मनावर छाप पडण्याला चांगली यात शंका नाही. अगम्यगुरु यानी ब्रह्मधारा नावाचे वेदान्तपर पुस्तक इंग्रजीत लिहिले असून त्यानी इंग्लंड युरोप अमेरिका जपान वगैरे देशात प्रवासहि केला होता. स्वामी विवेकानंद यानी जे कार्य अमेरिकेत केले ते खुद्द इंग्लंडात करण्याचा उद्योग अगम्य गुरु यानी केला. हे मूळ एका पंजाबी घराण्यातील असून मुनसफीचे कामहि त्यानी केले होते, पण ते सोडून देऊन पुढे त्यानी वेदान्त हाती घेतला आणि संन्याशाच्या वेशाने त्याचा प्रसार इंग्रजी लोकात सुरू केला. प्रोफेसर मॅक्समुल्लर यांच्यावर ह्या स्वामीनी फार छाप पाडली होती असे त्यांच्यासंबंधी प्रोफेसरसाहेबानी जो एक लेख लिहिला आहे त्यावरून दिसून येते. मॅक्समुल्लर यांच्याबरोबर स्वामीनी वेदान्ताची तर चर्चा केलीच. पण नाडी एकदम बंद पाडणे ध्यानस्थ होऊन बातमी सांगणे असे योगविद्येचे चमत्कारहि त्यानी करून दाखविले. "तुम्ही युरोपिअन लोक रानटी आहा, वेदान्तविद्या शिकल्याने तो रानटीपणा कमी होईल म्हणून ती विद्या शिकविण्याला मी तुमच्याकडे आलो आहे" असे ते इंग्रज लोकाना सांगत. वेदान्तविद्येचा प्रभाव युरोपिअन व अमेरिकन पुरुषापेक्षा स्त्रियांच्या मनावर अधिक होतो हे विवेकानंदांप्रमाणे अगम्यगुरु यानी अनुभवले होते. आणि विजयी योद्धा आपण पाडाव केलेले वीर जसे आपल्यामागून चालवितो त्याप्रमाणे अगम्यगुरु यानी मिसेस स्टॅनर्ड या नावाची एक बाई आपली शिष्यीण करून हिंदुस्थानात आणली होती! या बाई लिबरल पक्षातील असून व्याख्याने देत. स्वामींचे व्याख्यान व्हावे अशी इकडील लोकांची पुष्कळ इच्छा. पण ती पुण्यास

कांही सफल झाली नाही. ते खाजगी बैठकीत गप्पा मारीत. पण व्याख्यान असे त्यानी दिलेच नाही. सार्वजनिक सभेत या बाईचें व्याख्यान झाले. गर्दी अर्थात फार झाली होती. बाईनी व्याख्यानात सांगितले की युरोपियन लोकांचे लक्ष हळूहळू वेदान्ताकडे झुकत आहे आणि हिंदुस्थानातील लोकानी ह्या वेळी स्वदेशीसारखी स्वावलंबनाची चळवळ केल्यास लिबरल पक्षावर त्याची छाप पडेल. त्यांचे दुसरे व्याख्यान विजयानंद थिएटरात झाले. दोन्हीहि दिवशी आपल्या शिष्यिणीबरोबर स्वामीजी आले होते. पण ते साक्षीभूत बसत. पुष्कळ संन्याशांच्या रीतीप्रमाणे अगम्य गुरु हे तामसी होते. आणि तोंडातून जरी ते वेदान्त बोलत तरी त्यांच्या हातचे सगळे खेळ काठीचे चालत. किंबहुना वेदान्त कितीहि सांगितला तरी काठीशिवाय हिंदुस्थानचा तरणोपाय नाही हें रहस्य म्हणून ते सांगत! इतकेच नव्हे तर प्रवासात त्यांचा कोणी युरोपिअनने अपमान केला तर लगेच हातात काठी सरसावीत असे सांगतात. एकंदरीने त्यांची व्याघ्रवृत्ति होती ही गोष्ट काही खोटी नाही. आणि ह्या व्याघ्रवृत्तीने त्यानी युरोपिअन स्त्रीपुरुषावर छाप पाडली होती. पुण्यांतून स्वामी गेल्यावर मागें त्यांचे नांव 'लाठस्वामी' असे पडले. टिळकांच्या हयातीत स्वामींचे पुनर्दर्शन पुण्याला झाले नाही. टिळक वारल्यावर एक दोन वर्षांनी एडनहून केळकराना एक निरोप व एक पत्र आले होते की लाठस्वामी मुंबई पुण्याकडे पुन्हा येणार आहेत तरी त्यांची व्यवस्था ठेवा. पण या निरोपाप्रमाणे स्वामी पुढे आले नाहीत. आणि हल्ली ते आहेत की नाहीत याचीहि कोणास वार्ता नाही. व्याघ्रवृत्ति व वेदान्त यांची जोड घालून युरोपिअन लोकाना नादी लावणारा संन्यासी टिळकाना मनातून फार पसंत पडावा यात आश्चर्य नाही. लंडन व बर्मिंगहॅम येथे स्वामीनी वेदान्तचर्चेकरिता समित्या स्थापिल्या होत्या. आणि वेदान्ताविषयी आदरबुद्धि वाटणे म्हणजे हिंदुस्थानाविषयी सहानुभूति अर्थातच आली हे कोणीहि कबूल करील. स्वामी विवेकानंद यानी हिंदुस्थानात परत येण्यापूर्वी ब्रुकलीन वगैरे ठिकाणीं वेदान्तसंस्था स्थापून अभेदानंदप्रभृति शिष्य तेथे मागे ठेविले. हा संन्यासपंथ थिऑसफीला विरोधी होता. कारण थिऑसफीतील सगळे धर्मगुरु परदेशी. व संन्यासपंथी लोकांचे म्हणणे असे की भौतिकशास्त्राच्या बाबतीत आम्ही पाश्चात्यांचे गुरुत्व पत्करले तेवढे पुरे झाले. धर्म ही एकतरी बाब सहज आहे ती तशीच असावी की त्यात धर्म आमचेकडे राहील. बेझंटबाई पुण्यास थिऑसफीचा उपदेश करण्याला आल्या म्हणजे वरील कारणामुळे जे लोक जात नसत ते स्टॅनर्डबाईंची वेदान्तावरील व्याख्याने ऐकण्यास गेले. कारण त्या बेझंटबाईप्रमाणे गुरुचे नाते आमच्याशी लावू पहात नव्हत्या. तर एका हिंदी संन्याशाचे शिष्यत्व उघडपणे त्यानी पत्करले होते. ज्ञान हे परम पवित्र असे मानलेले आहे म्हणून ते कोणाच्याहि तोंडून आले तरी तितकेच ग्राह्य असावे. पण मद्याच्या सुरईला गायमुख बसविणे किंवा गंगोदकाच्या गिंडीला वराहमुख बसविणे ही दोन्ही सारखीच अप्रयोजक मानली जातात. गुरुमुखाविषयी विद्यार्थ्यांची दृष्टी तरवारीच्या धारेप्रमाणे तीक्ष्ण असते.

## (७) टिळक व ब्रुइनसाहेब

केसरीचे मत पोलिसखात्याविषयी काय होते व आहे हे सांगण्याचे कारणच नाही. तथापि एकंदर खात्यासंबंधाने टिळकांचा जो अभिप्राय तो त्यातील प्रत्येक व्यक्तीसंबंधी होता असे मात्र नाही. या खात्यातील सामान्य मनुष्याबद्दल म्हणजे जो आपले काम केवळ कर्तव्यबुद्धीने सरळपणाने करतो त्याच्याविषयी टिळकांचा अनादर नसे. " पोलिस खाते हे ठेविले पाहिजे संभाळले पाहिजे व उद्या मी गव्हर्नर झालो तरी मला गुप्त पोलिस ठेवणे अवश्य होईल. कारण असे लोक कोणत्याहि राज्यात हवेच असतात. जुने स्वदेशी राजे गुप्त हेर ठेवीत आणि उद्या हिंदीप्रजासत्ताक राज्य इकडे झाले तरी गुप्त पोलिसाचे खाते-कदाचित् लहान प्रमाणावर-राहीलच " असे ते म्हणत. पोलिसखात्यात अनेक लोकाशी अनेक अधिकाऱ्याशी त्यांचा स्नेहसंबंध असे. आणि विसूभाऊ राजवाडे हे सरकारी नोकर म्हटले म्हणजे त्याचा जसा अपमान करीत तसा टिळक कोणाहि सरकारी नोकराचा कधी करीत नसत. उलट सरकार आहे तोपर्यंत सरकारी नोकर हे असणारच म्हणून त्यांचा होईल तितका उपयोग आपल्या कार्याला करून घ्यावा आणि या कार्याला अवश्य तितका स्नेहसंबंधहि त्यांच्याशी ठेवावा असे टिळकांचे धोरण असे. सरकारी नोकरीत आपल्यातील बुद्धिमान लोकानी शिरू नये असे जरी त्यांचे म्हणणे होते तरी अधिकाराच्या जागा हिंदी लोकाना मिळाव्या अशी त्यांची मागणी कायम असल्यामुळे काही बुद्धिवान हिंदी लोकानी नोकरीत शिरणे अपरिहार्य म्हणून त्यानी शिरावे असेहि टिळकांचे मत होते. केवळ सार्वजनिक कार्यात पडून देशकार्य करणे आणि सरकारी नोकरीत शिरून स्वार्थ साधणे आणि मग पर्यायाने काय लोकहित करता येईल ते करणे अशा या सरस नीरस पुरुषभाग्याच्या दोन वाटण्या होत. आणि प्राक्तनाप्रमाणे अभिरुचीप्रमाणे किंवा जरूरीप्रमाणे किंवा परिस्थितीप्रमाणे ज्याला जी वाटणी उचलावयाची ती त्याने उचलावी व तिच्यातून निघणारे सर्व प्रकारचे फायदे व तोटे त्याचे त्याने आनंदाने स्वीकारावे इतकेच त्यांचे म्हणणे असे. यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात असेहि घडे की बाबासाहेब पेंडसे या सारख्या एकाद्या इमानी सरकारी नोकराबद्दल टिळकांची आदरबुद्धि व स्नेह असे. उलट सार्वजनिक कामात पडलेल्याहि एखाद्या स्वार्थी बेइमान मनुष्याबद्दल तिटकारा वाटून ते त्याचा सहवास टाळीत. टिळकांच्या या उलट सुलट वर्तनाची पुष्कळशी उदाहरणे देता येतील पण नावे घेऊन ती देणे योग्य होणार नाही.

ता. १ ऑगष्ट १९०५ च्या केसरीत पोलिस सुपरिंटेंडंट हेन्री ब्रुइन यांच्या मृत्युनंतर टिळकानी जेव्हा केसरीत अग्रलेख लिहिला तेव्हा 'गोष्ट लोकांच्या अदमासाबाहेर गेली' असे उद्गार ज्याने त्याने काढले. केसरीत ब्रुइनसारख्या गोऱ्या पोलिसावर स्तुतिपर अग्रलेख यावा ही गोष्ट पुष्कळाना नापसंत पडली व ही नापसंती निरनिराळ्या लोकानी निरनिराळ्या प्रकारानी दर्शविलीहि. पण हा अग्रलेख

लिहिण्याची बुद्धि टिळकाना का झाली याची एक दोन कारणे सांगण्यासारखी आहेत म्हणून ती सांगतो. पहिले कारण ब्रुइनसाहेबानी रँड साहेबांच्या खुनानंतर झालेल्या चौकशीत स्वीकारलेले धोरण आणि दुसरे कारण ताईमहाराज प्रकरणात त्यानी टिळकांसंबंधाने सरकारांत केलेला रिपोर्ट. या दोन्ही कारणात थोडासा व्यक्तिहितसंबंध व थोडासा लोकहितसंबंध असा मिसळला गेला होता. दुसऱ्या कारणात व्यक्तिहितसंबंध पहिल्याहून अधिक होता असे कोणासहि म्हणता येईल, तरी ब्रुइनसाहेबांचा मृत्युलेख लिहिणे हे फार तर अंतरंगातील उत्कट कृतज्ञतेचे फळ इतकेच कोणी म्हटले असते. शिवाय ही कृतज्ञता ज्या उपकाराकरिता आणि तो उपकार ज्या कामांत ते काम म्हणजे ताईमहाराजांचा खटला हे टिळकांचे स्वार्थाचे काम नव्हते हे कोणीहि कबूल करील. खोटया प्रतिज्ञेच्या खटल्यातून मुक्त होणे ही बाब टिळकांच्या स्वार्थाची होती. कारण खोटया प्रतिज्ञेचा शेरा अखेरच्या न्यायकोर्टाकडून त्यांच्या कपाळावर कायमचा मारला गेला असता तर त्यांची अब्रु जगात खचित कमी झाली असती. पण ती कमी व्हावी म्हणूनच सरकारने खटला केला होता. आणि टिळकांची खोटी प्रतिज्ञा ठरती तरी ती केवळ ट्रस्टी या नात्याने केलेल्या कामात घडलेल्या एका गोष्टीवरून. पहिल्या कारणातहि थोडा स्वार्थ होता. कारण रँड साहेबांच्या खुनात टिळकांचे अंग होते असे शाबीत करविण्याची सरकारची इच्छा असता त्या इच्छेला ब्रुइनसाहेबानी विघात केला. तरी पण व्यक्तिशः टिळकाना वाचविण्यापेक्षा एका राजकीय पक्षालाच ब्रुइनसाहेबानी वांचविले हीच गोष्ट अधिक खरी.

तात्पर्य ब्रुइनसाहेबांचा मृत्युलेख लिहिताना टिळकांच्या मनात पोलिस खात्याविषयींच्या त्यांच्या नेहमीच्या भावनेवर, विशेषतः गोऱ्या पोलिस अधिकाऱ्याविषयीच्या भावनेवर, या वेळी व्यक्तिगत किंवा सार्वजनिक कृतज्ञतेचा पगडा बसला हा आक्षेप थोड्या अधिक प्रमाणावर कोणासहि आणता येण्यासारखा होता व तो आणला गेलाहि. तथापि टिळकाना आपले करणे योग्य का वाटत होते याचे समर्थन त्यांच्या लेखातील शब्दातूनच जे निघते ते देणे अधिक बरे. लोकाना हा लेख वाचून काय वाटेल याचा प्रथमच त्यानी उल्लेख केला. पण आपण केवळ "उडदातलाच गोरा उडीद निवडून वेगळा करीत आहो" असेहि त्यानी प्रथमच सांगून टाकले. "ब्रुइनसाहेबांच्या अंगी कर्तबगारी हुशारी व नोकरपेशातील नेकी होती. गुन्हे शोधून गुन्ह्यांचा तपास लावण्याचे विलक्षण चातुर्य त्यांच्या अंगी होते. आणि अनेक गुन्ह्यांचा तपास लावून त्यानी खात्याची अब्रू जशी संभाळली तसा खाजगी लोकावरहि उपकार केला. चोराचा किंवा खुनी मनुष्याचा तपास लावणे हा फिर्यादीवर उपकारच होय. असे असता ब्रुइनसाहेबाना सरकारने कोणत्याहि वरिष्ठ जागेवर अखेरपर्यंत नेमले नाही. ब्रुइन हे गोरे पण निमगोरे म्हणजे अँग्लो इंडियन असल्यामुळे सरकार अस्सल गोऱ्याना जात्यभिमानामुळे वरच्या जागा देई. ब्रुइनसाहेबाविषयी सहानुभूति वाटण्याला हे एक कारण होते. पोलिस कमि-

फ्रानरने नुकताच यापूर्वी आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्यात पोलिस अधिकाऱ्यांचे जे दोष वर्णिले त्यातले काही काही ब्रुइनसाहेबांच्या अंगी नव्हते. म्हणजे ते लोकात मिळून मिसळून वागत चौकशीचे काम स्वतः करीत आणि खरा प्रकार पुढे मांडण्याला सरकारची भीड धरीत नसत. ही गोष्ट रँडसाहेबांच्या खुनाच्या प्रकरणात प्रगट झाली. या खुनाकरिता नातू व टिळक याखेरीज आणखी अनेक सद्गृहस्थाना कटवाले ठरवून तुरुंगात घाडता आले असते तर त्या वेळी सरकारास हवे होते. व ही गोष्ट ब्रुइनसाहेब करते तर त्यांची वाहवा झाली असती. पण ब्रुइनसाहेबानी त्या वेळी डोके फिरून गेलेल्या गोऱ्या अधिकाऱ्यांच्या धोरणाविरुद्ध वर्तन केले. त्यानी आपले डोके शांत ठेवले. खरा प्रकार तेव्हाच ताडला. धूर्तपणाने चौकशी केली. मारहाण कोणालाहि केली नाही. आणि पुण्यावरील हे संकट टाळले. किंबहुना या वेळी साहेबलोकाकडे जाऊन खोट्या चहाड्या सांगणारे बडे लोक आपल्यातच निघाले. पण ब्रुइनसाहेबांचे वर्तन त्याच्या अगदी उलट ठरले. वर्तमानपत्रवाले कडक भाषा वापरीत असले तरी त्या भाषेचा खरा अर्थ काय व प्रत्यक्ष गुन्ह्याशी त्याचा संबंध किती थोडा असतो हे ब्रुइनसाहेब जाणत होते." ताईमहाराज प्रकरणातील रिपोर्टासंबंधाने टिळकानी उघड काही लिहिले नाही. पण 'गावात संभावित कोण लुच्चे कोण याची माहिती ब्रुइनसाहेबाना चांगली होती' एवढे मोघम सांगूनच त्यानी भागविले.

## (८) संस्थानी स्वराज्य

१९०४ साली त्रावणकोरचे दिवाण व्ही. पी. माधवराव यानी 'श्रीमूलं लोकसभा' या नावाची लोकमतदर्शक सभा स्थापन केली. या सभेचा हेतु 'पुणे सार्वजनिक सभेसारखा'च म्हणजे रयतेचे म्हणणे सरकारला व सरकारचे म्हणणे रयतेला कळावे हा होता. दिव्याखाली अंधेर असावा त्याचप्रमाणे एकाच देशातील या दोघांचे म्हणणे परस्पराना कळू नये आणि दिव्याचा प्रकाश दूर पडतो त्याप्रमाणे संस्थानिकावर बाहेरून टीका व्हावी ही गोष्ट बरी कोण म्हणेल ? म्हैसुरातहि अशा प्रकारची सभा पूर्वीच स्थापन करण्यात आली होती. या गोष्टींना उद्देशून टिळक लिहितात "भर्तृहरीने म्हटल्याप्रमाणे पर्वताच्या आश्रयाला असलेले वृक्ष तसेच राहिले आणि मेरु पर्वताचा माथा सोन्याने किंवा रुप्याने मढविला गेला तरी उपयोग काय ? इंग्रजांचे साम्राज्यवैभव दुरून नुसते डोळे दिपविणारे आहे. पण आमचे संस्थानिक हे मेरु पर्वताप्रमाणे होत. कारण त्यांच्या आश्रयाची सगळीच झाडे चंदनमय बनून जातात." टिळकांच्या लिहिण्यात देशी संस्थानांचा नेहमीच गौरव आढळतो. ते संस्थानिकांचे व त्यांच्या हक्कांचे कायमचे बिनपगारी वकील होते. आणि संस्थानात कोणतीहि एखादी चांगली गोष्ट झाली तर ते ती चांगली सजवून खुलवून मांडीत असत. पण राजे लोक प्रजेला हक्क देत नाहीत म्हणून त्यांच्यावर टीकाहि करीत. १९०५ च्या ऑगस्ट महिन्यात ताईमहाराज खटल्या-

तील दिवाणी दाव्यांत पुरावा घेण्याचें काम अमरावती येथे चालू होतें. तेथें टिळकांचा मुक्काम कांहीं दिवस पडला होता. त्या वेळी गणेश थिएटरांत त्यांचें व्याख्यान झालें. खापर्डे हे अध्यक्षस्थानी होते. पहिल्या व्याख्यानांत ' हिंदी साम्राज्यें ' या विषयावर टिळकांनी तुलनात्मक माहिती सांगितली. " साम्राज्याची जुनी कल्पना आपण विसरलों. पण आपणांकडेहि या कल्पनेची पूर्वपरंपरा आहे. अधिराजे व मांडलीक हा संबंधहि आपणाकडे चांगला होता. साम्राज्य म्हणजे अधिसत्ता एक पण राज्यें भिन्न. राज्य म्हणजे एकाच लोकांचें एकच राज्य. पूर्वी हूण वगैरे फिरते लोक परदेशांत जाऊन तेथें राहून राजसत्ता स्थापित असत. हिंदुस्थानांत पूर्वी ५६ म्हणजे अनेक देशचे राजे होते. यांपैकी एखादा बलाढ्य असला तर तो फार तर दुसऱ्याकडून करभार घेई. याहून अधिक कायमची सत्ता इतरावर तो गाजवीत नसे. खंडणी घेतली तरी मांडलीक राज्येंहि कायम टिकून राहात असत. अश्वमेध यज्ञ करणें ही साम्राज्यसत्ता प्रस्थापित करून जाहीर करण्याची एक रीत असे. रोमन लोकांनी जुनी पद्धत मोडून नवी सुरू केली. आपलें नागरिकत्वाचें हक्क त्यांनी जिंकलेल्या लोकांना दिले नाहीत. तथापि स्थानिक कारभार स्थानिक लोकांच्या हातींच रोमन लोक ठेवीत असत. ख्रिस्ताला फाशी द्यावा की न द्यावा या गोष्टीचा निर्णय रोमन गव्हर्नरानें स्थानिक ज्यू समाजाकडेच सोपविला. अलीकडील साम्राज्यें रोमन साम्राज्याच्या नमुन्यावरच बनलेली आहेत. इंग्लंडचें साम्राज्य सजातीय तसेंच विजातीय लोकांचें आहे. पण या दोघांशी हे साम्राज्य दोन तऱ्हेनी वागते. विजातीय लोकांवरील साम्राज्यातून द्रव्यशोषण करण्याचे बाबतींत इंग्लंडनें रोमच्या पुढें मजल मारली आहे. पण हेंहि साम्राज्य केव्हां तरी नष्ट होणारच ! आपणापुढें प्रश्न हा की हे घडून येईल तेव्हां आपली स्थिति काय होणार ? अशी वेळ आली आणि आपण निर्जीव असलों तर पुन्हा दुसऱ्याचे हातीं जाऊं. याकरितां स्वराज्य मिळविण्याची खटपट केली पाहिजे आणि या कामीं संस्थानांचाहि उपयोग होण्यासारखा आहे " असें त्यांनी ध्वनित केलें.

कोल्हापुरांत वेदोक्त प्रकरण व विजापूरकर प्रकरण ही पूर्वी झाली. त्यांतच १९०६ सालीं आणखी एक भर पडली. म्हैसूर व त्रावणकोर येथें प्रातिनिधिक सभा स्थापन झाल्याचें पूर्वी दर्शविलेंच आहे. त्याप्रमाणें इकडील संस्थानांतूनहि अशा सभा असाव्या असें संस्थानी प्रजेला वाटणें स्वाभाविक होतें. कोल्हापुरास या कल्पनेला आक्टोबर महिन्यांत मूर्त स्वरूप आलें. ता. २ रोजी कोल्हापूर येथील पहिल्या लोकप्रतिनिधी सभेची परिषद भरली. परिषदेला उघडपणें प्रतिबंध करण्यांत आला नव्हता. पण अधिकारी व पोलीस यांनी धाकदपटशा सुरू केला होता. त्याला न जुमानतां नवीन शाहुपुरींत दिगवडेकर वकील यांच्या वखारींत सभा भरली. संस्थानच्या सर्व तालुक्यांतून मिळून शहाण्णव प्रतिनिधी आले होते. प्रेक्षक समुदाय सुमारें पांचशें होता. खरे चालक सदाशिवराव आळतेकर वकील हे होते. परंतु स्वागताध्यक्षाचा मान पुढारी वकील रार्शिंगकर यांना देण्यांत आला होता.

पूर्वी विशेष निमित्ताने अशा एक दोन सभा १८८५ व १८९४ साली या संस्थानात भरल्या होत्या. पहिली एका तलावासंबंधाने होती व दुसरी शाहू छत्रपतीना मुखत्यारी मिळाली तेव्हा त्यांच्या अभिनंदनाकरिता भरविण्यात आली होती. पण प्रतिनिधी रीतसर निवडून प्रजेची गाऱ्हाणी राजाच्या कानावर घालण्याच्या उद्देशाने भरलेली अशी हीच पहिली सभा होय. सभेचे अध्यक्षस्थान डॉ. वामन बाजी कुळकर्णी रुईकर (जे पुढे स्वामी लवणानंद या नावाने प्रसिद्धीस आले) याना दिले होते. त्यानी आपल्या भाषणात राजनिष्ठा व्यक्त करून केवळ गाऱ्हाणी सांगण्याकरिताच ही सभा आहे इत्यादि खुलासा उदाहरणे देऊन केला. नंतर अनेक ठराव मंजूर झाले. त्यावर सर्व जातींच्या लोकानी भाषणे करून रयतेच्या तक्रारी मांडल्या. अभ्यंकर वकील परांडेकर इस्माइलभाई विजापूरकर आप्पा कुळकर्णी फणसळकर आदिराज देवेंद्र उपाध्ये पंगु वकील तळाशीकर आपटे वकील गोखले पटवर्धन कृष्णाजी दादाजी कुळकर्णी आळतेकर इत्यादि गृहस्थांची भाषणे मुद्देसूद झाली. कृष्णाजी दादाजी कुळकर्णी यानी खऱ्या राजनिष्ठेचे स्वरूप कसे असते हे सांगितले. आणि आळतेकर यानी असे प्रतिपादिले की 'आमच्या रक्ताचे कोणी पृथक्करण करून पाहील तर त्यात छत्रपतीविषयी राजनिष्ठा असल्याचेच आढळून येईल.' पूर्वी शिवाजी महाराजानी अष्टप्रधान नेमून जी अधिकारविभागणी केली तिच्या पुढचीच ही पायरी आहे असेहि सांगण्यात आले. अशा रीतीने ही सभा तर पार पडली. पण तेथपासून छत्रपतीनी या सर्व चळवळ्या लोकांविषयी मनात दंश धरला. आणि विजापूरकरांप्रमाणे आळतेकरानाहि प्रायश्चित्त घ्यावे लागले. दोघानीहि नंतर कोल्हापूर सोडले. व खालसा मुलखात आल्यावर त्यानी पुढे लोकहितदृष्टीने आपला जीवनक्रम कसा चालविला हे प्रसिद्धच आहे. असो. प्रतिनिधी सभेच्या अध्यक्षानी ठराव दरबाराकडे पाठविले. त्याना उद्दामपणाचे उत्तर गेले. अँग्लो-इंडियन पत्रानी या प्रातिनिधिक सभेचा अर्थातच गवगवा केला. आणि चळवळ्या लोकांवर छत्रपतीनी उघड शस्त्र धरल्यामुळे ही जी पहिली प्रतिनिधी सभा झाली तीच शेवटची ठरली. एकंदर प्रजेशी दरबाराचे धोरण पुढे कसे राहिले ते प्रसिद्ध आहेच. या प्रतिनिधी सभेला टिळकांचे उत्तेजन आहे असा आरोप होता पण तो खोटा नव्हता.

## (९) वेळास येथील उत्सव

पुण्यास व इतर काही ठिकाणी १९०० साली नाना फडणीसांचा उत्सव झाल्यापासून वेळास येथील मंडळींच्या मनात तेथेहि हा उत्सव सालीना करण्याचे आले. आणि टिळकांची संमति घेऊन त्यानी तो पाच वर्षे चालविला होता. वेळास हा गाव मूळ नाना फडणीसांचा. तेव्हा गावकऱ्यांचा अभिमान यथार्थच होता. १९०५ साली उत्सव मंडळाच्या निमंत्रणावरून टिळक इतर काही मंडळींसह उत्सवास गेले होते. पुराण कीर्तन गायन वगैरे सर्व कार्यक्रम यथासांग झाला. पाच

वर्षाच्या उत्सवाची हकीकत व हिशेब सभेपुढे मांडण्यात आले. टिळकानी आपल्या भाषणात सांगितले " की उत्सव म्हणजे एक प्रकारचे ऋषितर्पण होय. नानांचे पितृतर्पण इतर करीत असतात. आणि वेळासकरानी आरंभिलेले हे ऋषितर्पण होय." साडेतीन शहाण्यात नानांची गणना अर्धा शहाणा अशी असता त्यांचा उत्सव का करावा ह्याचे टिळकानी फार मार्मिक उत्तर दिले ते असे की "विठ्ठल सुंदर सवंध शहाणा पण निझामशाहीच्या सेवेत निमग्न. सखारामबापू सवंध शहाणा पण स्वार्थ-परायणतेमुळे त्यानी राघोबाचा पक्ष घेतला व इंग्रजांची धन केली. नानांच्या अंगी मुत्सद्देगिरी होती. नानाहि स्वार्थपरायण होता पण त्याची दृष्टि एकंदरीने मराठी राज्य चिरस्थायी करण्याकडेच होती. त्यांच्यापुढे फिरंग्यानीहि हात टेकले. नारायण-रावांचा खून होणार ही बातमी नानाना कळली नाही म्हणून त्याना दोष द्यावयाचा तर रँडसाहेबांचा खून होणार ही बातमी सरकारला किंवा लोकाना कळली नाही म्हणून त्यानाहि दोष का देऊ नये ? सवाईमाधवरावाशी नाना कठोरपणाने वागत होते याचे कारण माधवराव बाजीरावाशी मिळून वागत होते हे होय. राघोबाच्या वंशाला नमस्कार करावयाचा नाही असे नानांचे शब्द असता बाजीरावाची पेशवाई त्यानी मान्य केली याचे कारण इतर सरदारापुढे त्यांचे काही चालेना. तेव्हा निसंतानापेक्षा कुसंतान बरे या न्यायाचा त्यानी आश्रय केला. मुत्सद्दी वचनभंग करो तरी तो त्याने स्वार्थपरायणतेकरिता करू नये. नानांच्या नीतिबाह्य वर्तनासंबंधाने ऐतिहासिक पुरावा असा नाही. १०० वर्षापूर्वी इंग्रजी राज्याच्या धोरणाचा नकाशा नानानी आपल्या बुद्धीने रेखाटला होता. आणि इंग्रजांची मदत त्यानी काळजीपूर्वक दूर ठेवली. आमचे शिक्षण आमच्या हाती नाही म्हणून आमच्यातील थोर लोकां-च्या संबंधाने वाटेल त्याने वाटेल ते शिकवावे असे होत आहे. कर्झनसाहेबानी सत्य-वक्तेपणाचा टेंभा मिरविला. पण नाना फडणीसानी एका पत्रात इंग्रजाविषयी असे लिहिले आहे की ' यांच्याशी तहनामा करणे तो फार जपून करावा लागतो. त्यांचे बोलण्यात लिहिण्यात एकेका अक्षरात फार पेच असतात ! ' यापुढे वेळासचा उत्सव काही वर्षे चालू होता. पण पुढे तो स्थानिक कलहामुळे बंद पडला. हा उत्सव चालू होता तेव्हा टिळकाखेरीज अनेक पुढारी व इतिहासज्ञ या उत्सवास जात असत. आणि या उत्सवप्रसंगी बाहेरून जाणारे लोक जवळच्या श्रीवर्धन गावी जाऊन पेशव्यांचे घरठाण व पहिल्या बाजीरावाची जन्मभूमि यांचे दर्शन घेत. या वास्तूंचा पुनरुद्धार करावा अशीहि चळवळ सुरू झाली होती. पण पुढे नानांचा उत्सव व पेशव्यांच्या वास्तूंचा उद्धार दोन्ही सत्कृत्ये मागे पडली.

## (१०) शिवाजी उत्सवाचा प्रसार

या सालचा पुण्याचा शिवाजीउत्सव नेहमीप्रमाणे झाला. परंतु त्यात टिळ-कानी केलेले भाषण बरेच महत्त्वाचे होते. व्याख्यानातून वाद असा निघाला होता की राष्ट्रभक्ति हे तत्त्व नवे की जुने ? एकाचे म्हणणे शिवाजी केवळ साधु

वृत्तीने आणि गोब्राह्मणप्रतिपालनाच्या इच्छेने प्रेरित झाला होता. आणि दुसऱ्याचे म्हणणे शिवाजी खऱ्या राष्ट्राभिमानाने प्रेरित झाला होता. महाराष्ट्र हेंहि त्या वेळी राष्ट्रच होते. यावर पहिल्याचे उत्तर असे की राष्ट्रभक्तीची कल्पनाच मुळी नवी आहे. शिवाजी राष्ट्रभक्त होता असे म्हणणे हे नळराजाने रथ चालविला तो वाफेच्या यंत्रावर चालविला असे म्हणण्यासारखे होय. टिळकानी या दोन मतांची तोंड-मिळवणी अशी केली की " राष्ट्रभक्तीची कल्पना जुनीच आहे. पण नाव नवे आहे. निळकंठराव कीर्तने माधवराव रानडे वगैरे इतिहासचिकित्सकानी शिवाजी-च्या राष्ट्रभक्तीचीच कल्पना मान्य केली आहे. शिवाजीने गोशाळा स्थापल्या नाहीत किंवा ब्राह्मणभोजने घातली नाहीत. गोब्राह्मणप्रतिपालक हे विरुदावलीतील एक ब्रीदवाक्य आहे. आणि शिवाजीने स्वराज्य स्थापल्याचा एक अनुषंगीक परिणाम गोब्राह्मणप्रतिपालन हा झाला. पण तोच काही मूळचा प्रेरक हेतू नव्हता. शिवाजी हा जसा केवळ धार्मिक स्फूर्तिचा मनुष्य नव्हता तसा तो दैववादीहि नव्हता. आपले जुने राजे उद्योगवादी होते. व त्यानी पराक्रमानेच राज्ये मिळविली. आगगाडीचा सांधेवाला जसा आपल्या हाताने गाडी एका रुळावरून दुसऱ्या रुळा-वर नेतो त्याचप्रमाणे राजा हा पराक्रमाने कालचक्र फिरवितो. म्हणूनच ' राजा कालस्य कारणम् ' असे म्हटले आहे. स्वराज्यप्राप्तीच्या वाटा ईश्वराने आधीच निर्माण करून ठेवलेल्या असतात. ज्याची वाट त्याने हुडकून घेऊन तिने मार्ग-क्रमण केले पाहिजे.

१९०५ च्या मे महिन्यात जपानातील हिंदी विद्यार्थ्यांनी शिवाजीउत्सव मोठ्या प्रमाणावर केला. पूर्वीचे दोन उत्सव लहान प्रमाणावर झाले होते. टोकियोतील प्रमुख जपानी गृहस्थ सयाम कोरिया चीन फिलिपाइन देशचे काही विद्यार्थी काही चिनी जपानी स्त्रिया वगैरे मंडळी आली होती. बॅरन कांदा इंदो-जपानी असोसिएशनचे व्हाइस प्रेसिडेंट याना सभापति निवडण्यात आले. बाबू शाळिग्राम सिंह बाबू जगन्नाथ सहाय बाबू सत्यसुंदर देव नरेंद्र मोहन गुप्त गोविंद-राव पोतदार वगैरे विद्यार्थ्यांनी भाषणे केली. बॅरन कांदा म्हणाले की " शिवाजी सारखे सत्पुरुष आपल्या उदाहरणाने आपल्या देशाचेच नव्हे तर अखिल मानव जातीचे हित करितात. " रूसो–जपानी युद्धात नुकताच जपानचा पूर्ण विजय झाला असल्यामुळे आशियाविरुद्ध युरोप या भावनेचा ध्वनि प्रत्येकाच्या मनात घुमत होता. एका जपानी स्त्रीने पोर्ट आर्थर जिंकल्याचे पद गाऊन दाखविले. नंतर हिंदी विद्यार्थ्यांनी ' अइ भुवन मनमोहिनी, . अइ निर्मल सूर्य करोज्वल धरणि जनक जननि मा–मा–मा–' हे बंगाली राष्ट्रगीत गाऊन दाखविले. 'वंदे मातरम्' हे बंगाली राष्ट्रगीत अजून मूर्धाभिषिक्त व्हावयाचे होते. १९०६ सालीहि गतवर्षाप्रमणे जपानात टोकिओ येथे शिवाजीउत्सव करण्यात आला. साइक्योजी या नावाचे बौद्ध मंदिर भिक्षू लोकानी उत्सवाला दिले होते. जपानी चिनी सयामी व जर्मन विद्यार्थी आले होते. फिलिपायनी गृहस्थ

मिस्टर रामोस यानी आशा उत्सवाची महती सांगितली. बॅरिस्टर इवाना यानीहि उत्सवात भाग घेतला.

१९०६ साली एप्रिल महिन्याचे अखेर रायगडावर तिसरा मोठा उत्सव-समारंभ करण्यात आला. एकंदर समाज १९०० सालापेक्षा थोडा कमी होता. तथापि मामलेदार फौजदार डेप्युटी कलेक्टर पोलिसपार्टी वगैरे हजर होती. यंदाच्या उत्सवाचे अध्यक्षस्थान नामदार दाजीसाहेब खरे यांजकडे देण्यात आले होते. कार्यक्रम नेहमीप्रमाणे झाला. टिळकांच्या बरोबर शिवरामपंत परांजपे दत्तोपंत लिमये चौकर वकील बोडस वगैरे मंडळी गेली होती. नामदार खरे याना अध्यक्षस्थान देण्यात टिळकांचा हेतु असा होता की ते कायदेकौन्सिलचे सभासद असल्यामुळे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंगटन याना भेटून सवरून समाधीच्या कार्याला ते वर्गणी व इतर मदत मिळवितील. या कामी अर्ज रीतीप्रमाणे गेला. आणि लॉर्ड लॅमिंग्टन हे रायगड स्वतः पाहून काही मदत देतील अशी आशा वाटत होती. टिळकांप्रमाणे शिवाजी-फंड तुरुंगात गेला की काय अशी पृच्छा. एका कुत्सिताने करण्यापर्यंत निंदकांची मजल गेली होती! पण १८९९ प्रमाणे या सालीहि रायगडफंडाचा हिशेब पैन् पै प्रसिद्ध करण्यात आला. सर्वांनाच वारा थोडा अनुकूल वाहतो असे वाटू लागले होते. लॉर्ड कर्झन यानी ऐतिहासिक वस्तुसंरक्षणाचा कायदा केल्यापासून समाधी-च्या कार्यासंबंधाने नवी आशा उत्पन्न झाली. कलकत्त्यास व्हिक्टोरिया मेमोरिअल इन्स्टिटयूटमध्ये शिवाजीच्या तजबिरा व हत्यारांचा संग्रह ठेवण्याचे ठरले. जुन्नर-जवळ शिवनेरी किल्ल्यात शिवाजीमहाराजांचे स्मारक म्हणून त्यांच्या नावाची खोदलेली पितळेची पाटी लावण्यात आली. तात्पर्य अशा या वेळी सरकारकडे काही प्रयत्न केल्यास तो साधेल असे वाटले म्हणून नामदार खरे याना पुढे कर-ण्यात आले व त्यांचा थोडा उपयोग झालाहि.

दाजीसाहेब यांच्या अर्जावरून लॉर्ड लॅमिंग्टन याना रायगड पाहण्याची हौस उत्पन्न झाली. आणि विशेष हा की ता. १२ जून रोजी म्हणजे जवळ जवळ पाऊसकाळात ते गडावर चढले. ता. १० रोजी महाबळेश्वराहून पायगार्डीने ते महाडास गेले. तेथे म्युनिसिपालिटीने त्याना मानपत्र दिले. महाडाहून रायगडास जाऊन परत येईतो सारखा पाऊस लागला होता आणि गव्हर्नरसाहेब भिजून गेले होते. ते पावसातच गडावर चढले आणि सर्व स्थळे त्यानी पायानी हिंडूनच पाहिली. निम्म्या वाटेवर विश्रांतीकरिता बसले असताना त्यानी टिळक खरे वगैरे मंडळी गडावर एकदम चढून गेली काय असे विचारले. तेव्हा बरोबरची मंडळी म्हणाली पुरुष मंडळीच काय दाजीसाहेब खरे त्यांचे कुटुंब सौ. उमाबाई याहि एका मजलीत गड चढून गेल्या! लॉर्ड लॅमिंगटन गड चढत असता पावसामुळें काही दगडहि पडले. तथापि या सर्वांचा खेद न मानता व पश्चात्ताप न वाटता त्यानी रायगडाचे कौतुकच केले. आणि पुढे समाधीच्या दुरुस्तीला ५००० रुपये आणि इतर सामानसुमान देण्याविषयी त्यानी सरकारी ठराव काढला.

सन १९०६ च्या जून महिन्यात टिळक कलकत्ता येथील निमंत्रणावरून शिवाजी उत्सव साजरा करण्याकरिता गेले होते. हा उत्सव तेथे यापूर्वी दोनतीन वर्षे होत होता. कलकत्ता येथील विद्वान गृहस्थ व वर्तमानपत्रकार सखाराम गणेश देऊसकर यानी या कामी प्रथमपासून पुढाकार घेतला होता. देऊसकर हे मूळ महाराष्ट्रीय सातारा प्रांताचे. सुमारे दोनशे वर्षांपूर्वी त्यांचे पूर्वज बंगालप्रांती गेले ते त्यापुढे तेथेच राहिले. कोणीहि मनुष्य एखाद्या प्रांतात पुष्कळ वर्षे जाऊन राहिला म्हणजे स्वतः तो विशेषतः त्याच्या पुढच्या पिढीचे लोक भाषा पोषाख रीत रिवाज फार काय पण चेहऱ्यावरील लक्षणे व देखावा या सर्व दृष्टीनी त्या नव्या प्रांताचेच बनतात. कर्नाटकात फार वर्षे राहिलेले कोकणस्थ लोक अंतर्बाह्य इतके कर्नाटकी बनतात की ते मूळ कर्नाटकी नव्हते अशी शंकाहि कोणास येत नाही. तोच न्याय उलट महाराष्ट्रात येऊन फार वर्षे राहिलेल्या कर्नाटकी लोकाना लागू पडतो. देऊसकर यांचीहि गोष्ट अशीच झाली. त्याना कोणी पाहिले असता या बंगाली गृहस्थाचे नाव देऊसकर कसे याचे लोकाना आश्चर्य वाटे. त्यानी बंगाली भाषेत इतके प्राविण्य मिळविले होते की बंगाली वर्तमानपत्रकार म्हणून त्यांची फार कीर्ति झाली होती आणि "देशेरकथा" या नावाच्या त्यांच्या पुस्तकाची बंगालीत व इतर भाषेत भाषांतरे होऊन त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या होत्या. हा ग्रन्थ राष्ट्रीय दृष्टया इतका सणसणीत होता की पुढे तो सरकारजमा झाला! देऊसकर हे अंतर्बाह्य बंगाली बाबू बनले होते तरी महाराष्ट्राला विसरले नव्हते. त्यानी मराठी भाषा घरी कायम ठेविली होती. व त्या भाषेत ते चांगले लेख लिहित असत. अशा महाराष्ट्रीयाला बंगाल प्रांतात शिवाजी उत्सव सुरू व्हावा अशी इच्छा होणे स्वाभाविक होय.

शिवाजी हा मराठा वीर. बंगालचा त्याचा काही संबंध नाही. अठराव्या शतकात मराठ्यांचा संबंध बंगाल्याशी आला तो त्या प्रांतावर त्यानी स्वारी केल्यामुळे. स्वारी करणाऱ्या लोकात अर्थात् काही 'लुटारू' व जुलमी लोक असावयाचेच. विशेषतः मराठ्यानी बंगाल्यात इतकी कदर बसविली होती की मराठ्यांपासून आपले संरक्षण करण्याकरिता कलकत्त्यास बंगाली लोकानी खंदक खणला होता. त्याचे नाव अजून तिकडील लोकांच्या तोंडी असून त्या खंदकाची जागाहि दाखवितात. इतकेच नव्हे तर मराठे लोकाना 'बोरगी' म्हणजे 'लुटारू' असे पडनाव बंगाल्यात मिळाले. पाळण्यातील लहान मुलाना भीति दाखवून निजवावयाचे असता आपण जसे 'बागुलबुवा आला' म्हणतो तसे बंगाली स्त्रिया 'बोरगी आयो बोरगी आयो' असे शब्द घातलेली गाणी म्हणून पाळणा हलवीत असत असे अजून सांगतात. अशा वाईट मराठे लोकांचा राजा शिवाजी! त्याचा उत्सव बंगाली लोकानी का करावा? निदान इंग्रज लोकाना तरी हे कोडेच पडले. पण एकतर या सर्व झाल्या गेल्या गोष्टी जुन्या काळच्या. आणि आता केवळ जुना इतिहास म्हणून कौतुकाने स्मरणात ठेवण्याच्या. आज मराठ्यांचा बंगाल्याला काहीच उपद्रव नाही. म्हणून जी काय उरली ती केवळ शिवाजीची विभूति या नात्याने कीर्तिच उरलेली. शिवाजीने

महाराष्ट्रात जे केले तेच बंगाल्यातील वीरानीहि पूर्वी केले. म्हणजे मुसलमानाशी युद्धे करून आपले राष्ट्रीयत्व राखण्याचा प्रयत्न केला. यामुळे बंधुप्रेम व सहानुभूति ही परस्पराना सहजच वाटणार. शिवाय या कार्यात बंगाली राष्ट्रभक्ताना पूर्वी जे यश मिळाले नाही ते शिवाजीला मिळाले. यामुळे त्याच्याविषयी साहजिक आदरबुद्धि. आणि हल्लीच्या चळवळीत नवीन राष्ट्रीय बुद्धि प्रगट झालेली. तिला शिवाजीसारख्या वीराचा उत्सव करणे हे सर्वस्वी उत्तेजनपर. या सर्व गोष्टींमुळे शिवाजीउत्सवाची कल्पना कलकत्त्यास कोणी काढली तर तिला बंगाली पुढाऱ्यांची संमति मिळणे ही गोष्ट सहज होणारी होती. आणि वर सांगितल्याप्रमाणे ही कल्पना सुचविणारे देऊसकर हेहि स्वतः बंगाली लोकाना आपलेसे वाटणारे.

१९०६ साली वंगभंगाच्या चळवळीला खूप जोर येऊन टिळकांच्या प्रयत्नाने महाराष्ट्राचे भरपूर पाठबळ मिळाले होते. अशा वेळी देऊसकरानी शिवाजी उत्सव कलकत्ता शहरी मोठ्या थाटाने साजरा करण्याची कल्पना काढली ती मान्य होऊन स्वतः टिळकानाच या उत्सवाला बोलवावयाचे ठरले व ते आमंत्रण टिळकानी आनंदाने स्वीकारले. त्यांचेबरोबर दादासाहेब खापर्डे डॉ. मुंजे व वामनशास्त्री इस्लामपूरकर अशी मंडळी होती. सोलापूरचे गायनपटु काटगावकर हे तेथे पूर्वीच गेले होते. नागपुराहून पुढे डोंगरगड विलासपूर रायपूर वगैरे ठिकाणी या मंडळींचा सत्कार करण्यात आला. ता. ४ जून रोजी ही मंडळी कलकत्ता स्टेशनवर पोचली. तेव्हा फार मोठा समुदाय जमला होता. बाली चंद्रनगर उत्तरपारा हुगळी वगैरे अनेक ठिकाणचे लोक मुद्दाम स्वागताला आले होते. चालू चळवळीत जे अनेक संप्रदाय व मेळे बनले होते त्यातील लोक आपले नवे पोषाख घालून दुतर्फा निशाणे घेऊन उभे राहिले होते. लोकानी गाडीचे घोडे सोडून हॅरिसन रोडमधून टिळकांची गाडी ओढीत नेली. तेव्हा काही वेळ इतर रहदारी बंद पडली होती. जयघोष व पुष्पवृष्टि ही वाटभर चालू होती. विश्रांतिनंतर उत्सवाच्या जागेत स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरले होते. त्याचा समारंभ टिळकांच्या हस्ते करण्यात आला व प्रत्यक्ष शिवाजी उत्सव पुढे चार दिवस चालू होता. बाबू मोतीलाल घोस हे उत्सवाध्यक्ष असून बिपीनचंद्र पाल हे चिटणीस होते.

मंगळवार तारीख ५ रोजी बाबू अश्विनीकुमार दत्त यांच्या अध्यक्षतेखाली पहिली जाहिरसभा झाली. रवींद्रनाथ टागोर यांच्या शिवाजीवरील कविता श्यामसुंदर चक्रवर्ति यानी, इतर बंगाली पदे राजकुमार यानी, आणि मराठी पदे कांडगांवकर यानी म्हटल्यावर मोतीलाल घोस यांचे भाषण बॅरिस्टर चौधरी यानी वाचून दाखविले. टिळकांचे भाषण अर्थात् इंग्रजीतच झाले. त्यात त्यानी शिवाजीमहाराजांची योग्यता त्यांचे कार्य परधर्मीयांविषयी त्यानी दाखविलेले दाक्षिण्य त्यांचा रजपूत घराण्यातील जन्म व त्यांच्या राष्ट्रीय पराक्रमाचे मर्म ही समजावून सांगितली. ज्या भवानीची पूजा बंगाली लोक करतात त्याच भवानीने तरवारीच्या रूपाने शिवाजीच्या हातून राष्ट्रकार्य करविले ही गोष्ट टिळकानी सांगितली ती

श्रोतृसमुदायाला फारच पटली. खापर्डे म्हणाले की 'पूर्वी मराठयानी बंगाल्यावर स्वारी केली असेल पण आज बंगाल शिवाजीने केवळ आपल्या स्मरणाने काबीज केला आहे.' ता. ६ रोजी उत्सवाच्या जागेत निरनिराळ्या समित्यातील लोकानी आपले रंगीबेरंगी पोषाख घालून निरनिराळे खेळ करून दाखविले. नंतर खापर्डे मुंजे वगैरेंची स्वदेशी या विषयावर भाषणे होऊन स्वदेशी बहिष्काराच्या शपथा घेण्यात आल्या व त्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

दुसरे दिवशी टिळकांचा जाहीर रीतीने सत्कार करण्याकरिता मोठी सभा भरविण्यात आली. प्रथम सुरेंद्रनाथ बानर्जी यानी टिळक खापर्डे वगैरे मंडळींचे स्वागत करण्याचा ठराव मांडला. त्याला सत्येंद्रनाथ टागोर जे पूर्वी महाराष्ट्रात सेशन जज्ज होते त्यानी अनुमोदन दिले. नंतर लहानसे स्वागत-मंडळ टिळकाना आणण्याकरिता गेले. त्यांचेबरोबर पाहुणेमंडळी सभेत आली. तेव्हा बाबू सुरेंद्रनाथ यानी त्यांचे गळ्यात हार घालून त्याना आलिंगन दिले. उत्तरादाखल टिळकांनी भाषण केले त्यात मुख्यतः राजकीय विषयाचीच चर्चा करून सांगितले की दिवसेदिवस इंग्रजांचा राज्यकारभार अनुदार व जुलमी होत चालला आहे. याकरिता आपणहि सहानुभूतीच्या पोकळ वचनाना भुलून न जाता स्वावलंबनपूर्वक आपणामध्ये असेल ती शक्ति प्रकट केली पाहिजे. औरंगजेबाचा जुलूम झाला तेव्हा त्याची सेवा पत्करलेल्या रजपूत सरदारानीहि त्याला विरोध केला हे उदाहरण आपल्या लोकानी डोळ्यापुढे ठेविले पाहिजे. शिवाजी आज कोठे प्रत्यक्ष अवतीर्ण न झाला तर परिस्थितीप्रमाणे तो निराळ्या रूपाने अवतरून कदाचित् कार्य सिद्धीस नेईल. मुंजे यानीहि चालू चळवळीवर जोरदार भाषण केले. खापर्डे यानी आपल्या विनोदी पद्धतीने असे सांगितले की 'आम्ही भारतवासी लोक इंग्रजी साम्राज्यात भागीदार आहो असे आम्हाला सांगण्यात येते. पण ही भागीदारी कशी ? तर मांसभक्षकांच्या मेजवानीसारखी. मेजवानीत जेवणारा यजमान वाढणारा नोकर व खाद्यभूत मांस हे तिघेहि आपापल्या परीने भागीदार असतात. यापैकी शेवटच्या दोन भागीदारासारखी आमची साम्राज्यात भागीदारी आहे. हिंदुस्थानाने आपले वित्त शक्ति यांचे मांस आपल्या हाताने कापून साम्राज्यरूपी यजमानाला वाढावयाचे व त्याला पुष्ट करावयाचे हा मेजवानीतील भाग आपणाकडे आहे.' अशा रीतीने अनेक भाषणे होऊन ही सभा समाप्त झाली.

मंगळवार ता. १२ रोजी टिळक खरगपूर येथे जाऊन आले. तेथील महाराष्ट्रीयानी त्यांचा मोठा सत्कार केला. ता. ८ रोजी अँटीसरक्युलर सोसायटीमार्फत कॉलेज स्क्वेअरमध्ये विद्यार्थ्यांची मोठी सभा झाली. या प्रसंगी बंगाली लोकाप्रमाणे खिस्ती व मुसलमान वक्त्यांचीहि भाषणे झाली. टिळकानी उत्तरादाखल असे सांगितले की "वंगभंग सरकारने केला तरी बंगाली राष्ट्राने मनात आणले तर ते अभंगच राहू शकेल. शरीरभंग फार तर होऊ शकतो पण आत्मा हा अभंग आहे असाच आमच्या हिंदी तत्वज्ञानाचा सिद्धांत आहे. खापर्डे यानी पुन्हा विनोदी भाषण केले. ते म्हणाले "पूर्वी ग्रीस देशात रोमन लोकांचे राज्य असता एका विद्वानाने आपला

अर्ज मॅजिस्ट्रेटच्या कानावर न घालता तो पायावर ठेवला. कोणी विचारले अर्ज पायावर का ठेवला ? तेव्हा ग्रीक म्हणाला अधिकाऱ्याचे कान जाग्यावर असतील म्हणून प्रथम तोंडी विनंति करून पाहिली. पण त्याचे कान लांब होऊन पायापर्यंत आले असे कळले. तेव्हा अर्ज पायावर ठेवला. हल्ली इंग्रजांचे कान जाग्यावर नसून ते त्यांच्या पोटात आहेत. म्हणून बहिष्काराचा चिमटा पोटाला बसेल तेव्हा आमची विनंति सरकार ऐकेल." शनिवारी पाहुण्याना ब्राह्मण सभेकडून पान सुपारी झाली. पंडित शिवचंद्र समभूषण हे अध्यक्षस्थानी होते. महाराणी तपस्विनी माताजी याहि सभेला आल्या होत्या. प्रथम पाठशाळेतील मुलींनी संस्कृत पद्ये म्हटल्यावर अध्यक्षानी संस्कृतात स्वागतपर भाषण केले. टिळक व खापर्डे यानी चातुर्वर्ण्यधर्म या विषयावर भाषण करून हल्लीच्या काळी सर्व वर्गांची सहकारिता झाली पाहिजे तरच कार्य होईल असे सांगितले. शेवटी गंधाक्षता होऊन सभा समाप्त झाली. नंतर काली घाटावर उघड्या मैदानात सभा झाली ती फारच मोठी होती. टिळकानी यज्ञ व स्वार्थत्याग यांची महति आणि खापर्डे यानी कृष्णशिष्टाई या विषयावर भाषणे केली.

रविवारी सकाळी म्हणजे कलकत्ता येथील टिळकांच्या वाढत्या मुक्कामाच्या सातव्या दिवशी गंगास्नानाच्या मिरवणुकीचा मोठा समारंभ झाला. तोंडाला संकीर्तन व मेळेवाल्यांचे भजन सुरू होते. मागून कापडावर काढलेल्या पाहुण्यांच्या तसबिरी उभ्या धरून स्वयंसेवक चालू होते. ही मिरवणूक अर्धा मैल लांब होती. सर्वांच्या मागून शिवाजीची मूर्ती चतुर्दोला नामक वाहनात घालून चालविली होती. मृदंग टाळ शंख सुरूच होते. स्नानानंतर भाषणे फोटोग्राफ वगैरे झाल्यावर दोनप्रहरी मेजवानी व रात्री व्यापारी वैश्यसभेमार्फत पानसुपारी झाली. तेव्हा "मारवाडी व व्यापारी लोकाना विलायतेला जाऊन धर्म राखून व्यापार करणे शक्य आहे व तेथे आपल्या व्यापारी संस्था निघाल्या तर मोठे कार्य होणार आहे" असे टिळकानी सांगितले. सोमवारी टिळकानी कन्या पाठशाळा कापड–बझार वगैरे संस्थाना भेटी दिल्यावर रात्री बाबू सुबोधचंद्र मलीक यांच्या घरी बागेतील फराळाचा समारंभ झाला. या मुक्कामात राणा प्रतापादित्य व सुराजउद्दौला वगैरे नाटकांचे प्रयोग पाहुणे मंडळीना मुद्दाम दाखविण्यात आले. अशा रीतीने एक आठवडाभर कलकत्त्यास राहून व अनेक प्रकारचे कार्यक्रम साजरे करून पाहुणे मंडळी मंगळवारी सकाळी कलकत्त्याहून निघून वाटेत खरगपूर येथे पुन्हा उतरली व बुधवारी नागपुरास पोचली. या वेळी टिळकांचा मुक्काम अॅडव्होकेट बळवंतराव महाजन यांचे घरी होता. येथेहि एक दिवसभर भरपूर कार्यक्रम झाला. संध्याकाळी व्यंकटेश थिएटरात व्याख्यान देताना टिळकानी स्वदेशी बहिष्कार हाच विषय सांगितला. त्यांचे म्हणणे स्वदेशी माल वापरा असे सांगितले म्हणजे परदेशी माल वापरू नका असे सांगावे लागतच नाही. कारण 'स्वयोषिति रतिः' ह्या वचनाचा आधार घेतल्यास स्वदेशीच्या उपदेशापासून बहिष्काराचा उपदेश आपो-

आप अभिन्न ठरतो. तसेच रात्री व्यापारी मंडळींना व दुसरे दिवशी सकाळी विद्यार्थ्यांना व्याख्यान देऊन ते मुंबईस आले.

## (११) विलायतेतील चळवळ

सन १९०४ च्या मुंबईच्या राष्ट्रीय सभेत हिंदुस्थानात व विलायतेत राष्ट्रीय सभेचे काम करावे असे ठरले. त्याची अंमलबजावणी १९०५ च्या मे महिन्यात काही थोडी झाली. तारीख ३ मे रोजी फेरोजशहा मेथा यांच्या अध्यक्षतेखाली जाहीरसभा भरून त्यात इंग्लंडला शिष्ट मंडळ पाठविण्याचे ठरले. सर डब्ल्यु वेडर-बर्न व टिळक यानी कॉंग्रेसमध्ये मांडलेल्या ठरावाअन्वये हे डेप्युटेशन जावयाचे होते. पूर्वी १८८५ साली असेच एक शिष्टमंडळ पाठविण्यासंबंधाने सर दिनशा पेटिट यांच्या अध्यक्षतेखाली अशीच सभा भरली होती. दादाभाईंचे त्यात भाषण झाले. त्याच प्रसंगाची आज आठवण होते अशा अर्थाचे फेरोजशहा मेथा यानी भाषण केले. सभेने प्रोफेसर गोखले व बॅरिस्टर महमद अली जिना या दोघाना शिष्टमंडळाचे घटक म्हणून पाठवावे असा ठराव केला. शिष्टमंडळ पाठ-विण्याचा हेतु विलायतेतील राजकारणात हिंदुस्थानचे हित पाहणारा असा एखादा वेगळा पक्ष निर्माण करावा असा होता. हा पक्ष लिबरल पक्षाच्या अंतर्गत असला तरी तसा असण्यास हरकत नाही असेहि मत प्रगट करण्यात आले. गोखले यांच्या अंगची हुशारी वक्तृत्व सभ्यपणा शील त्यांचा कामकाजाचा अनु-भव व कर्तृत्वशक्ति यांची स्तुति मुंबईकरानी केली तिचा उल्लेख करून टिळकानी जिना यांच्या निवडणुकीबद्दल मात्र नापसंती दर्शविली. कारण ते अजून अगदी तरुण असून त्याना कामकाजाचा अनुभव नव्हता. आणि त्यांचे नावहि बाहेर विशेष कोणी ऐकले नव्हते. "हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून विलायतेस जाणाऱ्या गृहस्थाचे काम इतके जोखमीचे आहे की नामदार गोखले यांच्या सारखे इकडच्या भट्टीतून तावून सुलाखून निघालेले गृहस्थहि प्रसंगविशेषी चुकून घसरतात." टिळकांचे हे लिहिणे लेकी बोले सुने लागे ह्या पद्धतीचे होते. गोखल्यासारखे लोक घसरतात हे जे टिळकानी म्हटले त्यात प्रत्यक्ष गोखले याना नाव ठेवावयाचे नव्हते तर जिना याना पाठवू नये असे म्हणण्याचा होता. गोखले यांची वकील म्हणून विलायतेला जाण्याची ही पहिली खेप होती. तथापि मुंबई कायदेकौन्सिलात दोन तीन वर्षे व वरिष्ठ कायदेकौन्सिलात तीन वर्षे त्यानी काम केलेले असल्यामुळे त्यांच्या योग्यतेविषयी मुंबईकराना दृढ विश्वास वाटत होता.

शिष्टमंडळ म्हणून गोखले व बॅरिस्टर जिना याना विलायतेस पाठवावे असे ठरल्याप्रमाणे गोखले हे गेले. जिना हे जाऊ शकले नाहीत. लाला लजपतराय हेहि विलायतेस याच वेळी गेले होते. त्यांची जोड गोखल्याना चांगली मिळाली. लजपतराय हे स्पष्ट बोलणारे होते. गोखले हे स्पष्ट बोलतील व अप्रीति सोस-ण्याला तयार होतील याविषयी टिळकानाच काय पण इतरानाहि बरीच शंका होती.

पण या खेपेस गोखल्यानी टिळकांच्या अपेक्षेपलीकडे काम केले. गोखले यानी कोणताहि पडदा किंवा भीड मनात न ठेवता स्पष्टपणे आणि जोराने हिंदुस्थानची सद्यःस्थिति आणि कर्झनसाहेबांची कुटिल राजनीति यांचे चित्र आपल्या श्रोत्यांपुढे मांडले. त्यांच्या भाषणाचे त्रोटक सारांश तारेने इकडे आले. तेव्हा त्यांच्या भाषणात कोठे काही तरी मख्खी असेल कोठे काही हातचे राखून ठेवले असतील असे प्रथम वाटले. पण पुढे प्रत्यक्ष साग्र रिपोर्ट आले ते वाचून गोखले यानी लोकांची बाजू फार चांगली मांडली असे दिसून आले. त्यानी बंगाली बहिष्काराची मीमांसा व समर्थनहि केले आणि आपल्या इंग्रज श्रोत्याना असे सांगितले की "तुम्ही कदाचित् रागावाल पण तुम्हाला राग आला तर तोच मला इष्ट आहे." या गोष्टीबद्दल टिळकानी केसरीतून गोखल्यांचे उघड अभिनंदन केले. गोखले यानी स्वराज्याची किंवा होमरूलची मागणी केली. ते स्वदेशी पोषाखाने सभेला जात असत. "हिंदी लोक राष्ट्रीय बुद्धीने एक होणार आहेत व सरकारचा समाचार घेण्याला सिद्धता करीत आहेत. न्यायाने स्वराज्य न दिले तर हिंदी लोक जुलमाला त्रासून आपल्या बलाने राज्य घेऊ पाहातील तर त्याला प्रतिकार करण्यासाठी विलायती सैन्य पाठविण्यात येऊ नये इतकी खबरदारी मात्र तुम्ही घ्या म्हणजे झाले!" या गोखल्यांच्या उद्गारानी तर टिळक फारच खुष झाले. 'केसरीकार हे मताचे अभिमानी आहेत माणसाचे अभिमानी नाहीत किंवा व्यक्तिशः कोणाचाहि द्वेष करणारे नाहीत' हे टिळकांचे स्वतःविषयीचे म्हणणे यावरून उघड दिसून आले.

१९०५ च्या नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात नामदार गोखले विलायतेहून परत फिरले. त्यांची कामागिरी एकंदरीने चांगली झाली असे तिकडील हकीकतीवरून दिसून आल्याने टिळकानी केसरीत तसे लिहून त्यांचे स्पष्ट अभिनंदन केले. त्याच्या पूर्वी थोडे दिवस लाला लजपतराय हेहि परत आले. केसरीच्या प्रतिनिधीने त्यांची मुद्दाम मुलाखत घेतली: त्यात त्यानी असे सांगितले की "विलायतच्या लोकानी आमची भाषणे लक्ष लावून ऐकली. आम्हीहि इकडे चाललेली दांडगाई भीडभाड न ठेवता त्यांच्यापुढे ठेवली. तेव्हा लोक आम्हाला म्हणाले "तुम्ही सांगता हे खरेच वाटत नाही. तुम्ही तीस कोटी लोक असला जुलूम चालवू देता कसे!" ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी आपले काम ठीक करीत आहे. पण इंडिया पत्र चालवण्याला कोणी हिंदी गृहस्थच यापुढे नेमावा असे मत बनत चालले आहे. वास्तविक कोणताहि पक्ष विलायतेत अधिकारारूढ झाला तरी आम्हाला विशेष फायदा होणार नाही. तथापि विलायतेस चळवळ केली पाहिजे आणि त्या बरोबर स्वावलंबनाच्या तत्त्वावरहि इकडे जोराची चळवळ केली पाहिजे. बहिष्काराची चळवळ मान्य आहे. आणि उद्या वंगभंग रद्द झाला तरी इतर राजकीय हेतु साधण्याकरिता आम्ही ती पुढेहि चालविली पाहिजे. विद्यार्थ्यानी चळवळीत पडले पाहिजे. तिकडील विद्यार्थी असेच करतात. चळवळीत पडल्याबद्दल त्याना शाळातून काढून

लावले तर त्यांच्याकरिता स्वतंत्र राष्ट्रीय विद्यापीठ स्थापले पाहिजे. यंदाच्या राष्ट्रीय सभेने स्वदेशीचा विषय मुख्यतः हाती घ्यावा."

गोखले हेहि डिसेंबरच्या प्रारंभी मुंबईस येऊन दाखल झाले. तेथून ता. १० रोजी सकाळी पुण्यास आले. त्यांचे स्वागत स्टेशनावर करण्याचे पुणे काँग्रेस कमिटीने ठरविले. त्याप्रमाणे समारंभ मोठ्या थाटाचा झाला. डॉ. देशमुख वगैरे मंडळी स्टेशनावर त्याना सामोरी गेली होती. ते गावात येण्याच्या वाटेवर तीनचार ठिकाणी कमानी उभ्या करून शृंगारलेल्या होत्या. आणि ठिकठिकाणी पानसुपाऱ्याहि करण्यात आल्या. स्टेशनावरून गोखले परत आपल्या घरी जाण्याचे सुमारास गायकवाड वाड्यात प्रसिद्ध शरसंधानपटु राणा सरतानसिंह यांचे तिरंदाजीचे खेळ चालले होते व ते पाहण्याला शेकडो मंडळी जमली होती. तेव्हा घरी जाताना वाटेवर गायकवाड वाड्यात गेले असता खेळ पाहिल्यासारखेहि होईल व टिळकांच्या वाड्यात गेले असेहि होईल अशा दुहेरी हेतूने गाडी नारायण पेठेतून घेण्याविषयी त्यांच्या मंडळीकडून सुचविण्यात आले. ते मान्य करून पण प्रथम घरी जाऊन व पोशाख वगैरे उतरून गोखले नंतर मुद्दाम वाड्यात आले. तेथे टिळकांची व त्यांची गाठ झाली. त्याच दिवशी सायंकाळी गोखल्यांचा सत्कार करण्याकरिता रे मार्केटचे मैदानात सभा भरविण्यात आली. सभेला चार पाच हजार लोक होते. अध्यक्षाचे जागी डॉ. नानासाहेब देशमुख यांची योजना झाली. आणि गोखल्यांचे आभार मानून त्यांचा सन्मान करण्याचा मुख्य ठराव स्वतः टिळक यानीच मांडला. प्रथम विनोदबुद्धीने टिळकानी असे सांगितले की "गोखल्यांच्या हालचालीत काही विशेष गुण असा आहे की त्या क्रांतिसूचक असतात. १८९७ साली ते विलायतेस गेले त्या वेळी मागे मुंबई इलाख्यात गडबड उडाली. यंदा ते विलायतेस गेले तर इकडे स्वदेशी चळवळ होऊन बंगाल्यात धामधूम झाली. आणि ते हिंदुस्थानात परत आले तो तिकडे विलायतेत प्रधान मंडळाची उलथापालथ झाली. टिळकांचा आशय असा की या देशाच्या दैवयोगाने जो जो फेरबदल होईल त्याचा फायदा आपल्या देशभक्तीने विशेषतः आपल्या नीटस पद्धतीने आणि गोड वाणीने करून देण्याला गोखले हे योग्य आहेत व तो उपयोग त्यानी करून घ्यावा अशी लोकांची त्यांचे विषयी अपेक्षा असते." स्वदेशाच्या दैवयोगाशी व्यक्तिशः ज्याचे महत्त्व असे जोडले गेले तो मनुष्य मोठा असे सहजच ठरते. इकडील अधिकाऱ्यांचे समर्थन करणारे प्रतिष्ठित वाक्पंडित विलायतेस असता त्यांचे म्हणणे मोडून काढून विलायती लोकांच्या मनावर चांगला परिणाम होईल अशा रीतीने गोखल्यानी इकडील राज्यपद्धतीचे दोषाविष्करण उत्तम रीतीने केले. आणि हे काम अवघड व जबाबदारीचे असताहि त्यानी ते फार चांगल्या रीतीने पार पाडले असे सांगून टिळकानी अभिनंदनाचा ठराव सभेपुढे मांडला. त्याला शेट रामनारायण व दादासाहेब करंदीकर यानी अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमते मंजूर झाला.

गोखले आणि टिळक हे दोन राजकारणी मोठे पुरुष एकाच शहरात राहून एकाच क्षेत्रात सुमारे पंचवीस वर्षे देशकार्य करीत होते. या पंचवीस वर्षात त्याचे संबंध बहुधा प्रतिपक्षाचे असे राहिले. दोघांचे स्वभाव दोघांची काम करण्याची पद्धति वेगवेगळी. शिवाय व्यक्तिशः स्पर्धेचे प्रसंग पावलोपावली ठेवलेले. दोघानी आपल्या डोळ्यापुढे ठेवलेले पुढारी जसे वेगळे तसेच दोघाचे अनुयायीमंडळहि वेगळे. प्रत्येक आपआपल्या परीने प्रबळ व प्रसिद्ध. यामुळे या दोघामधील धावते युद्ध जवळ जवळ वीस वर्षे एकसारखे सुरू होते. यांचे हे विरोधी संबंध कळसाला जाऊन पोचल्याची उदाहरणे पूर्वी काही घडली होतीच. पण याहिपेक्षा पुढे ती आणखी पुष्कळच घडून यावयाची होती. दोघेहि एकाच वेळी राजकारणाच्या आकाशात तळपत रहात असून त्यातील प्रत्येकाचे गुणदोष दुसऱ्याच्या तुलनेनेच घेतले जात व केवळ विरोधामुळे ते आहेत त्याहून अधिक भासत. प्रत्येकाने दुसऱ्याला हतप्रभ करण्याचे पुष्कळ प्रसंग आणले व वेगवेगळ्या प्रसंगी प्रत्येकाने त्यात यशहि मिळविले. पण या पंचवीस वर्षात यांची युति एकदाच घडून आली ती वर दर्शविलेल्या प्रसंगी. या युतीत सूर्याने आपला प्रखरपणा व तेज आकृष्ट व अंतर्हित करून चंद्राचेच तेज अधिक उज्वल करून लोकाना दाखविले. यांची युति खरोखर जर अशीच नित्य राहील तर काय बहार होईल असे पुष्कळ लोकाना व विशेषतः उभयतांचे स्नेही असणाऱ्या डॉ. देशमुखासारख्या लोकाना फार वाटे. पण ते वाटून काय उपयोग ! ग्रहांची गोष्टच अशी असते की ते एकाच कक्षेत परिभ्रमण करीत असले तरी त्यांची मूलस्थाने वेगळी गति वेगळी निकट सान्निध्याने आश्रय घेण्याची राशिनक्षत्रे वेगळी आणि त्या योगाने लोकाना त्यांच्यावरून मिळणारी फलेहि वेगळी. अगदी क्वचित् प्रसंगी त्यांची अशी युति व्हावयाची आणि तेवढ्यापुरते लोकानी त्यांजकडे पाहून कौतुक करावयाचे. पण हा योग किंचित काल टिकणारा असल्यामुळे त्याच्यातले अंतर पुन्हा वाढावयास लागावयाचे. म्हणून लौकरच राशीचक्राच्या दोन टोकाना ते दोघे असल्याचे दिसून आले.

असो. ता. १२ डिसेंबरच्या केसरीत टिळकानी गोखले यांचे चित्र तयार करवून ते नक्षीदार चौकटीत बसवून प्रसिद्ध केले. त्याच अंकात मुंबईच्या केसरीच्या बातमीदाराने गोखल्यांची घेतलेली मुलाखात प्रसिद्ध झाली. त्यात गोखले यानी असे सांगितले की, "विलायत व हिंदुस्थान दोन्ही ठिकाणी काम केले पाहिजे. विलायतेतले काम केव्हाहि टाकून देता येणार नाही. मात्र इकडे हिंदुस्थानात पुढाऱ्यांत दुही माजली ती मोडली पाहिजे. इकडील चार दोन चांगली माणसे विलायतेत काही वर्षे जाऊन राहिली पाहिजेत व नवीन माणसेहि मधून मधून पाठवली पाहिजेत. बंगाली लोकाना आपण मदत केली पाहिजे. पण इतरहि काम पुष्कळच आहे. स्वदेशी बहिष्कार यासंबंधी मी आपले म्हणजे राष्ट्रीय सभेपुढे मांडणार आहे. आयरिश लोकानी चळवळ करून अजून होमरूल नाही तरी इतर बऱ्याच गोष्टी मिळ-

विल्या. पण त्या चळवळीच्या जोरावर फुरसतीच्या वेळी देशहिताचे काम करण्याची पद्धत आपण आता टाकून दिली पाहिजे. ”

गोखले व लजपतराय हे दोघेहि एकच काम करून आले असता त्यांच्या मतात व विचारसरणीत थोडासा फरक दिसलाच. पण तो रुचिभेदाचा व संस्कार-भेदाचा परिणाम आहे असे म्हणून केसरीने एकवाक्यता केली. सूक्ष्म पहावयाचे तर गोखले यांची भिस्त शिष्टाई व वाकीली यावर अधिक तर लजपतराय यांची भिस्त स्वाधीनतेचे उद्योग करण्यावर अधिक. पण तूर्त तरी बंगालप्रकरणात दोघांची एकवाक्यता आहे असे केसरीने दर्शविले. लजपतराय व गोखले यांच्या धोरणातील भेद पुढे लवकरच दिसून येणार होता व त्याची तयारी डिसेंबर महिन्यात बनारस येथे होणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या तयारीबरोबरच चालू होती.

या वेळच्या विलायतेतील चळवळीचा उल्लेख करिताना एका विक्षिप्त पण देशभक्त व्यक्तीचा उल्लेख करणे अवश्य आहे. ती व्यक्ति पंडित श्यामजी कृष्णवर्मा ही होय. हिंदी राजकारणात ही अपूर्व चीज होऊन गेली. हे गृहस्थ प्रथम अगदी सामान्य स्थितीत असून गोपाळराव हरि देशमुख यांच्या शिफारशीने स्वामी दयानंद यांच्या सहवासाने व प्रो. मॉनियर वुइल्यम यांच्या आश्रयाने विलायतेत गेले. तेथे संस्कृत शिष्यवृत्ति मिळवून बी. ए. बॅरिस्टर झाले. तिकडून शिफारसपत्रे आणून कित्येक देशी संस्थानातून दिवाण कौन्सिलर वगैरे पैशाच्या व अधिकाराच्या जागांचा उपभोग त्यांनी घेतला. आणि द्रव्यार्जन भरपूर झाल्यावर पोटी मूलबाळ नाही म्हणून पत्नीसह विलायतेस जाऊन कायमचे राहिले. विलायतेतील राहणीचा खर्च चांगला भागवून शिवाय त्यांच्या गाठी दरवर्षी काही शिल्लक राही. तिचा उपयोग त्यांनी हिंदुस्थानच्या हिताकरिता करण्याचे ठरविले. ‘ इंडियन-सोशिऑलाजिस्ट ’ नावाचे एक लहानसे व स्वस्त वर्तमानपत्र त्यांनी काढले. आणि हिंदी तरुण विद्यार्थ्यांकरिता काही शिष्यवृत्त्या निर्माण केल्या. इकडे देशी संस्थानातून अधिकाराच्या जागावर असता त्यांची मते कशी होती माहित नाही. पण विलायतेत या पत्राच्या द्वारे त्यांनी होमरूलची म्हणजे हिंदी लोकाना स्वराज्याचे पूर्ण अधिकार देण्याची कल्पना फैलावण्यास सुरवात केली. निर्भेळ स्वावलंबनाचाहि पुरस्कार ते करू लागले. ‘ इंडियन होमरूल सोसायटी ’ या नावाची एक सभा त्यांनी तेथे काढली. सालीना दोन हजार रुपयांच्या अशा एकंदर सहा शिष्यवृत्त्या त्यांनी ठेवल्या. त्या मुख्यतः पदवीधराकरिता होत्या. त्या प्रांतवार वाटून दिल्या होत्या. पण शिष्यवृत्तीची मुख्य अट अशी होती की ती स्वीकारणाराने पुढे सरकारी नोकरी करणार नाही अशी प्रतिज्ञा लिहून द्यावी. इंडियन होमरूल सोसायटीच्या जोडीला ‘इंडिया हाऊस’ या नावाचे एक भोजनवसतिगृह त्यांनी काढले व तेथे फार थोड्या खर्चात विद्यार्थ्यांची जेवणाखाण्याची व राहण्याची सोय केली. या एकंदर योग्य योजनेचा उपयोग चांगला होतो असे दिसून आले तर पुढे दोन अडीच लाख रुपयांची रकम कायमचीच बाजूला काढून ठेवून

शिष्यवृत्त्यांची परंपरा अखंड चालण्यासारखी व्यवस्था करण्याचा त्यांचा विचार होता. आजपर्यंत विलायतेत जाणारे विद्यार्थी पुढे सरकारी नोकरी मिळविण्याकरिता जात. पण पुढे सरकारी नोकरी करणार नाही अशी प्रतिज्ञा विद्यार्थ्यांपासून मागणाऱ्या या अगदी नव्या प्रकारच्या शिष्यवृत्तीचे कौतुक लोकाना वाटल्यास आश्चर्य नाही.

इंडिया हाऊस ही संस्था लंडन येथे ता. १ जुलई १९०५ रोजी सुप्रसिद्ध सोशियालिस्ट हाइंडमन यांच्या हस्ते उघडण्यात आली. त्या वेळी कित्येक यूरोपियन गृहस्थ तसेच दादाभाई नौरोजी वगैरे हिंदी गृहस्थ हजर होते. दादाभाई नौरोजी याना पंडित शामजी यांची मते प्रथमपासूनच मान्य नव्हती असे दिसते. कारण संपूर्ण स्वराज्य मागण्याची कल्पना बोलून दाखविणे हे आज अकाली घडत आहे असे दादाभाईंचे मत होते. उलट हाइंडमन हे इंग्रजी साम्राज्याचे कट्टे शत्रू असून त्या काळात हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याला इतका शिव्या देणारा दुसरा कोणीहि नव्हता. वास्तविक दादाभाई नौरोजी यानी काढलेला सिद्धांत म्हणजे हिंदुस्थानच्या शरीरातून इंग्रजी अमलाने रक्तशोषण फार केले आहे हा सिद्धांत आणि हाइंडमन यांचा सिद्धांत एकच होता. पण दोघांची बोलण्याची भाषा थोडी वेगळी होती. शिवाय हिंदी स्वातंत्र्याची कल्पना हाइंडमन हे प्रतिपादीत ती दादाभाई याना मान्य नव्हती. यामुळे पंडित शामजी यांचे आणि हाइंडमन यांचे जसे जुळे तसे त्यांचे व दादाभाईंचे जुळत नसे. याच सुमारास नामदार गोखले हे विलायतेत जाऊन शिष्टमंडळाचे काम करू लागले होते. आणि तेथे असा एक वाद आपापसात उत्पन्न झाला की हिंदी मुत्सद्यानी विलायतेतील कोणत्याहि एका विशिष्ट पक्षाला चिकटवून घेऊन चळवळ करावी की या कामी त्यानी सर्व पक्षाला आपले म्हणावे? लॉर्ड ॲव्हबरी यांचे मत असे की एका पक्षाला सामील होऊन चळवळ करणे चुकीचे होईल. मिस्टर थॉर्बर्न यानीहि तेच मत प्रगट केले. त्यांचे म्हणणे असे की लिबरलपक्ष हिंदुस्थानाला सहानुभूति दाखवितो खरा पण तिच्या मुळाशी खरी इच्छा हिंदुस्थानचे कल्याण करण्याची नसून कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा पाडाव करण्याची असते. लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला तरी तो हिंदुस्थानातील गोऱ्या लोकांचा पाठपुरावा केल्याशिवाय राहणार नाहीच. हिंदुस्थानच्या व्यापाराच्या रक्षणाकरिता विलायती मालावर जकात बसविण्याचा शब्द काढा की लिबरल लोक तुमच्याकडे पाठ फिरविल्याशिवाय राहणार नाहीत. सॅम्युअल स्मिथ हे मुंबईच्या राष्ट्रीय सभेत हजर होते. यांचे मत असे की लिबरलपक्ष हिंदुस्थानला त्यातल्यात्यात अधिक मदत करील. पण दोन्ही पक्षाशी हिंदी पुढाऱ्यानी सलोखा ठेवावा. मात्र विलायतेतील जहाल पक्षाशी त्यानी संबंध ठेवू नये. आयरिश पुढारी जस्टिन मॅकर्थी यांच्या मते कोणाहि एकास चिकटून राहू नये. पेनिंग्टन यांचे म्हणणे असे की दोन्ही पक्ष मला सारखेच वाटतात. उद्या सर वुइल्यम वेडरबर्न हे लिबरल पक्षातर्फे विलायत सरकारचे खजिनदार झाले तर

हिंदुस्थानाकडून विलायतेला मिळणाऱ्या लष्करी खर्चापैकी एक पै देखील कमी करण्यास तयार होणार नाहीत. तथापि दगडापेक्षा वीट मऊ या नात्याने कॉन्झर-व्हेटिव्हपेक्षा लिबरल बरा. विलायतेस शिष्टमंडळ पाठविण्याची कल्पना नवीनच असल्यामुळे कामाला प्रारंभ कसा करावा हा एक विचाराचा प्रश्न होता. पायंडा घालावयाचा तो बरोबर घालावा त्यात चूक होऊ नये अशी इच्छा सहजच असणार. पण याचा निर्णय लौकरच असा ठरला की हिंदी शिष्टमंडळाने लिबरलपक्षाच्या पंखाखाली राहून काम करावे आणि विलायतेतल्याहि जहाल पक्षाशी अगदी फटकून वागावे.

विलायतेतहि हिंदुस्थानप्रमाणे पक्षभेद असत. आणि क्षेत्रात एका उपाध्याच्या घरी यजमान शिरला म्हणजे दुसऱ्या उपाध्याला जसा मत्सर वाटतो तसा हिंदुस्थानच्या पुढाऱ्यानी एका पक्षाचा आश्रय केला म्हणजे दुसऱ्यास त्याचे वैषम्य वाटे. वास्तविक गरीब बिचारे हिंदुस्थान. इंग्रजमुत्सद्यांवर त्याच्या हातून प्रत्युपकार कसला होणार ! प्रधान मंडळात जागा राहोच पण मतदार संघाकडून निवडणूक होण्यापुरताहि हिंदुस्थानच्या सहानुभूतीचा किंवा मदतीचा उपयोग इंग्रज मुत्सद्याला होणे शक्य नव्हते. उलट जो उमेदवार निवडणुकीच्या जाहीरनाम्यात किंवा भाषणात हिंदुस्थानचा उल्लेख प्रामुख्याने किंवा कळकळीने आणील त्याला विक्षिप्त म्हणून गणले जाण्याचा संभव. तथापि रोमन साम्राज्यात वकिलाची प्रतिष्ठा त्याच्या मिळकतीवरून न होता त्याच्याभोवती फुकट्या गरीब कुळांचा गराडा केवढा मोठा असेल त्यावरून मोजीत. त्याप्रमाणे हिंदी मुत्सद्यांकडून होतकरू किंवा कर्त्या इंग्रज मुत्सद्याला लभ्यांश नसला तरी त्याच्या आश्रितगणात मोठी भर पडे.

१९०३, १९०४, १९०५ या सालात विलायतेत हिंदुस्थानासंबंधाने चळवळ करण्याचे प्रयत्न ह्यूम वेडरबर्न लाला लजपतराय गोखले वगैरेनी केले. पुढे कर्झनशाही संपून कॉंझरव्हेटिव्ह पक्षाचा मोड होऊन लिबरलपक्ष अधिकारारूढ झाला. आणि पंडित मोर्लेसारखे गृहस्थ हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी झाले तेव्हा आता काहीतरी विलक्षण क्रांति विलायतेच्या धोरणात होणार असे नेमस्त लोकाना वाटू लागले होते. पण त्यानी जे पहिले भाषण पार्लमेंटमध्ये केले त्यातच त्यानी भ्रमाचा भोपळा फोडला ! कर्झनसाहेबांचा व कॉंझरव्हेटिव्ह पक्षाचा पाडाव झाला. पण एका पक्षाने जे केले ते दुसरा सहसा बदलत नसतो यामुळे बंगालच्या फाळणीचा प्रश्न पार्लमेंटात निघताच मार्लेसाहेबानी सांगून टाकले की ती फाळणी राजकीय हेतूने कोणी केली नव्हती आणि ती लोकांच्या इच्छेविरुद्ध असली तरी ती होऊन गेली असल्यामुळे लोकाना तिचे वाईटहि वाटत नाहीसे झाले आहे म्हणून ती आता फिरविण्याचे कारण नाही. तसेच हिंदुस्थानातील लोकाना अधिक राज्याधिकार देण्यासंबंधाने ते म्हणाले की ह्या लोकांची लायकी मला कबूल आहे पण लिबरल पक्षाकडून एकदम पुष्कळसे अधिकार मिळतील असे मानणे मूर्खपणा होय. बंगाली लोकांची निराशा मोर्ले यांच्या भाषणाने इतकी झाली की ती तार

वाचणारानी जागच्याजागी विलायती कापडाची होळी केली आणि त्यांची राख अंगाला फासून ते चालते झाले. राजनीति ही प्रथम स्वार्थाला ओळखते आणि मागून तर्कशास्त्र तदनुकूल असले तर त्याकडे वळते. तात्पर्य मनाने कोणी कितीहि उदार असला तरी राज्यकारभारात तडाखा बसल्याशिवाय अभिमानाचे पटल डोळ्यावरून दूर होत नाही. फाळणी होऊन गेली म्हणून वज्रलेप व्हावयाचीच तर पार्लमेंटचा वरिष्ठ अधिकार तो काय ? पण जसे मोर्ले तसेच त्यांचे पार्लमेंट ! म्हणून शेवटी ' आत्मैव ह्यात्मनो बंधुः ' हेच वचन खरे ठरते असे टिळकानी केसरीत यावर लिहिले.

तथापि पार्लमेंटामध्ये प्रधान मंडळात क्रांति होऊन लिबरल पक्षाने प्रधानमंडळ बनविले ही गोष्ट हिंदुस्थानच्या फायद्याची झाली असे पुष्कळाना वाटले. इंडियन पार्लमेंटरी कमिटी पूर्वीच बनविण्यात आली होती. तिच्या विनंतीवरून गोपाळराव गोखले पुन्हा विलायतेत गेले. कमिटीत १६० सभासद सामील झाले असून गोखल्यांच्या चळवळीकडे इंग्लंडातील लोकांचे बरेच लक्ष यंदा लागले. मोर्ले आणि गोखले यांच्या गाठीभेटी होऊ लागल्या. आणि आपल्या अडचणी काय त्या मोर्ले यानी गोखले यांस सांगितल्या. त्यामुळे गोखले यांच्या भाषणात त्या अडचणींचा उल्लेख येऊ लागला. टिळकाना ही गोष्ट पसंत पडेना. ते म्हणत " नवीन प्रधान जाग्यावर आला असता त्याला कोणतीहि नवीन गोष्ट समजून घ्यायला बराच वेळ लागतो ही गोष्ट खरी. तथापि हिंदुस्थानच्या वकिलाने असल्या गोष्टींना आपल्या भाषणात प्रसिद्धपणे महत्त्व देऊ नये. हिंदुस्थानाला स्वराज्याचे अधिकार देण्याला काही अडचणी खऱ्या होत्या व काही अडचणी न करत्याचा वार शनिवार या न्यायाने अधिकारी शोधून काढीतच असतात. पण प्रतिनिधि म्हणून गेलेल्या मुत्सद्याने ह्या सबबीने कुंठित होणे बरे नाही. अडचणी जशा अधिकाऱ्याना तशाच लोकानाहि होत्या. मोठे अधिकार एकदम देण्याला अडचणी असतील. पण जर एखादा अधिकारी व्यक्तिशः वाईट आहे असे बहुमताने ठरले तर त्याला काढून टाकण्याला तरी स्टेट सेक्रेटरीला अधिकार असतो का नाही ? आणि कोणतीहि नवी गोष्ट करण्याने अधिकाऱ्याच्या इभ्रतीला धक्का पोचतो असे म्हटल्याने सुधारणा होणेच शक्य नाही. इकडे मोर्लेसाहेब सहानुभूतीच्या अघळपघळ गप्पा सांगत आहेत. त्यांचा वस्त्रगाळ रस दहा पदरातून लोकांच्या तोंडी जेव्हा पोचेल तो पोहचो ! पण बंगाल्यातील पोलिस अधिकारी आणि फुल्लर साहेबांसारखे प्रतिगव्हर्नर हे रोज लोकांच्या तोंडात जुलुमाचे नवे जळजळीत निखारे ओतीत होते. त्याची आग कशाने विझावी ? दुर्योधन जन्माला आला तेव्हा अपशकून फार आले. तेव्हा धर्मशील तत्ववेत्त्यानी धृतराष्ट्राला सांगितले की " बाबा हा मुलगा पांढऱ्या पायाचा आहे. त्याला तूं टाकून दे. " पण लोक सांगतात हे खरे असे माहीत असताहि मुलाला टाकून देण्याचे धारिष्ट धृतराष्ट्राच्या अंगी नव्हते. " मोर्ले साहेबांची स्थिति अशीच झाली.

कर्मधर्मसंयोगाने आयर्लंडमध्ये 'सिनफेन'ची चळवळ याच सुमारास सुरू झाली. या चळवळीचे पर्यवसान पुढे कसे झाले हे आता सर्वांना माहितच आहे. आयर्लंडात राष्ट्रीय चळवळ फार जुनी होती. तथापि ग्लॅडस्टन आणि त्यांच्या मागून ॲस्क्विथ यांची होमरूल बिले नामंजूर झाल्यानंतर विलायतेत चळवळ करण्याच्या कल्पनेला पुष्कळच कमीपणा आला आणि जे काय व्हावयाचे ते अखेर केवळ स्वावलंबनानेच होईल असे पुढाऱ्याना वाटू लागले. ता. २८ नोव्हेंबर रोजी आयरिश नॅशनल कौन्सिलपुढे आर्थर ग्रिफिथ याने या नव्या चळवळीचा प्रारंभ केला. या चळवळीचे नाव सिनफेन म्हणजे 'आमचे आम्हीच' असे होते. नाव लहान पण त्यात अर्थ बराच असल्याने ते हातोहात फार लवकर पसरले. आयर्लंडची व हिंदुस्थानची स्थिति अगदी सारखी नव्हे. पण स्वदेशी चळवळ हे सिनफीनचेच एक प्रकारे प्रतिबिंब होय. ग्रिफीथ याने असे दाखविले की आयरिश लोकानी स्वावलंबी जर्मन लोकांचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवावे. राजकीय राष्ट्रीयत्व जर्मनीमध्ये पूर्वीच आले होते. पण खुल्या व्यापाराचे खूळ टाकून देऊन राष्ट्रीय अर्थशास्त्राची तत्त्वे अनुसरणे अधिक श्रेयस्कर होय हे अर्थशास्त्रवेत्ता लिस्ट याने जर्मनीला शिकविले. या तत्त्वाच्या मागे जर्मनीची राजसत्ता होती तशी आयर्लंदात किंवा हिंदुस्थानात नव्हती. पण जनतेने मनात आणल्यास ती उणीव तिला भरून काढता येते असा आर्थर ग्रिफिथ याला विश्वास होता. आणि हिंदुस्थानानेहि असाच विश्वास धरावा असे टिळकांचे म्हणणे होते.

## (१२) कर्झनशाही—खरा कोण खोटा कोण

१९०५ च्या फेब्रुआरी महिन्यात लॉर्ड कर्झन यानी आपल्या उद्दामपणाच्या मनोधैर्यावर शिखर चढविले. कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदानाचा समारंभ झाला त्या वेळी त्यानी विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण केले त्यात समोरच्या विद्यार्थ्यांना व पर्यायाने हिंदी जनतेला खरे बोलण्याला शिकण्याचा उपदेश केला! सगळ्या राष्ट्राला प्रसिद्धपणे खोटे बोलणारे म्हणण्याचे धाडस एकटे लॉर्ड कर्झन हेच करू जाणोत! कर्झनसाहेबांचे ९९ अपराध आधीच जवळ जवळ भरले होते. त्यात ह्या अपराधाची भर पडल्यामुळे सगळा हिंदुस्थान त्यांच्यावर चवताळून उठला. आणि कर्झनसाहेब बोलताना त्यांच्या समोर प्रत्यक्ष जरी बंगाली विद्यार्थी होते तरी त्यांचे मर्म लक्षात घेऊन सर्व बंगाल त्यांच्यावर किंचाळत व शिव्या देत उठला. असला राष्ट्राच्या अपमानाचा प्रसंग टिळकानी दवडू देणे शक्य नव्हते. तारीख २० फेब्रुआरी १९०५ च्या केसरीत त्यानी खऱ्या खोट्याची मीमांसा फारच खुसखुशीत केली. त्यानी प्रथमच बायबलची आठवण देऊन दोन हजार वर्षांपूर्वी युरोपिअन लोकाना सत्य हा काय पदार्थ असतो हे माहित नव्हते असे दर्शविले. "पदव्या देण्याचे वेळी कुलपति व कुलगुरु 'सत्यं वद' 'धर्मं चर' असा औपचारिक उपदेश करीत असतात. पण त्यांच्या मनात त्या वेळी कोणाविषयीहि कुत्सित भाव नसतो. कर्झनसाहेबानी

केलेला उपदेश हिंदी जनतेला उद्देशून केलेला होता. यामुळे 'सत्यं वद' असले साधे शब्द त्यांनी न उच्चारता आपल्या भाषणात सत्यवक्तेपणावर एक व्याख्यान झोडले. आणि हिंदुस्थानातील असत्य भाषणाच्या प्रकाराचे साभिप्राय वर्णन केले. पण अंतःकरणातील क्रोध ओकून टाकून त्यानी सरस्वतीचे पवित्र मंदीर घाण केले व विटाळले. हिंदुस्थानातील लोकाना सत्याचे असत्याचे ज्ञान किती सूक्ष्म आहे हे कोणीहि महाभारत वाचले असता कळून येईल. किंवा मॅक्समुल्लर सारख्यांच्या ग्रंथात ते आढळेल. संस्कृत ग्रंथाप्रमाणे १००-२०० वर्षांतील इंग्रजी ग्रंथकारांच्या वचनानीहि ते सिद्ध करिता येईल. असे असता कर्झनसाहेबानी सत्याचा महिमा आम्हाला सांगावा हे पाहून इसाबनीतीतील वैद्य होऊ पाहणाऱ्या बेडकाची कोणासहि आठवण होईल!"

बंगाल्यात लॉर्ड कर्झनवर याविषयी अनेक टीका झाल्या. त्यात दोन फारच मार्मिक होत्या. एक डॉ. राश बिहारी घोष यांचे भाषण. ते इतके उत्कृष्ट झाले की ते वाचून प्रोफेसर गोखले आनंदाने उड्या मारू लागले ह्मणतात. दुसरी टीका अमृतबझार पत्रिकेतील मोतीलाल घोष यांची. स्वतः लार्ड कर्झन यांच्याच प्रवासविषयक एका ग्रंथातील उतारा देऊन, लॉर्ड कर्झन हे स्वतः जाणून बुजून खोटे बोलणारे कसे आहेत आणि आपण कोरिया देशांत गेले असता एके प्रसंगी सफाईदार खोटे बोलल्याची नोंद स्वतः कर्झनसाहेबानीच आपल्या डायरीत कशी केली होती हे दाखवून मोतीबाबूनी सर्व वाचकाना हसता हसता पुरेवाट करून सोडले होते. त्याचा प्रकार असा.

हिंदुस्थानात व्हाइसरॉय होण्यापूर्वी लार्ड कर्झन हे एशियाखंडातून प्रवास करून गेले. या प्रवासात कोरिया द्वीपकल्पाच्या राज्यातील फॉरिन ऑफिसचे प्रेसिडेंट यांस भेटण्याकरिता लॉर्ड (त्या वेळी नुसते मिस्टर) कर्झन यांची स्वारी गेली होती. भेटीस जाण्यापूर्वी मि. कर्झन यांस असे समजले होते की, कोरिया देशात तरुण मनुष्यास फारसा मान देत नाहीत; तेव्हा भेटीच्या वेळी कर्झनसाहेबानी कोरियाच्या प्रधानास जी उत्तरे दिली ती खाली लिहिल्याप्रमाणेः—

कोरियाचे प्रधानः—तुमचे वय काय?

कर्झनः—(विनदिक्कत) चाळीस.

को. प्रधानः—वयाच्या मानाने आपण फारच तरुण दिसता, याचे कारण काय असावे?

कर्झनः—कारण मी आपल्या राज्याच्या सुंदर हवेच्या मुलखात आज महिनाभर प्रवास करीत आहे.

लॉर्ड कर्झन यांचे वय या वेळी फक्त ३३ वर्षांचे होते. असे असून केवळ कोरियाच्या प्रधानास खुष करण्याकरिता व त्याचे आपल्याबद्दल चांगले मत व्हावे म्हणून आपले वय ४० वर्षांचे आहे असे त्यानी सांगितले आणि तेहि विनदिक्कत (unhesitatingly) सांगितले असे मोठ्या फुशारकीने त्यानी आपल्या ग्रंथात

लिहिले आहे! खरे हे जे चाळीस वर्षांच्या वयात दिसणारे अपूर्व तारुण्य याचे कारण काय? असा जेव्हा कोरियाच्या प्रधानाने प्रश्न केला तेव्हा लॉर्ड कर्झन यानी मोठया शिताफीने कोरियाच्या राज्याच्या सुंदर हवेची स्तुति करून वेळ मारून नेली आहे. परंतु एवढयानेच संपले असे नाही. कोरियाच्या प्रधानाने पुढे आणखी असे विचारले कीः—

को. प्रधानः——आपण इंग्लंडच्या राणीसाहेबांचे जवळचे आप्त आहा?

कर्झनः—नाही. ( हे उत्तर कोरियाच्या प्रधानास आवडले नाही असे पाहून ) परंतु माझे लग्न अद्याप व्हावयाचे आहे.

लॉर्ड कर्झनसाहेबांचे हे उत्तर त्यांसच लबाडीचे वाटले, (unscrupulous) असे त्यानी आपल्या ग्रंथातच म्हटले आहे. परंतु अशा लबाडीच्या उत्तराने कोरियाच्या वृद्ध प्रधानाची मर्जी संपादन केली असे लिहिले आहे. मि. कर्झन हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन झाल्यानंतर काढलेल्या नव्या आवृत्तीत हे संभाषण गाळले आहे, ही छपवाछपवीहि लक्षात ठेवण्यासारखी आहे.

लॉर्ड कर्झन हे इकडे हिंदी राष्ट्राचे अपराधावर अपराध करीत असता इकडे साम्राज्याचे वैभव मिरविण्याचे प्रसंगावर प्रसंग आणण्याचे त्यांचे काम सुरू होते. दिल्ली दरबाराला राज्यारोहणाचे निमित्त तरी होते. त्याला डयूक ऑफ् कॅनाट याना त्यानी हिंदुस्थानात आणविले. पुढे १९०५ साली प्रिन्स ऑफ् वेल्स याना इकडे आणविण्याचे काही कारण नव्हते. पण त्याना आणण्याची कल्पना निघाली. आणखी एक बडा दरबार करण्याची योजना होती की काय कोण जाणे! पण जेथे राजपुत्र जातील तेथे लहान लहान स्थानिक दरबार तरी भरविण्याचे निश्चित झाले होते. राजपुत्र येणार ही बातमी कळल्याबरोबर मानपत्र देणाऱ्या इकडील मंडळीनी कंबरा बांधल्या. सर्व देशात वंगभंगाच्या चळवळीची एवढी लाट उठली असता मुंबईचे पुढारी युवराजाचे स्वागत किती कशा थाटाने करावे याच्या विचारात दंग होते. डॉ॰ भालचंद्र हे या खटपटीत पुढारी असल्याबद्दल त्यांच्यावर टीका झाली. राजपुत्र येणार त्या दिवशी लोकानी दिवाळीप्रमाणे आपली घरे शृंगारावी चिराकदाने लावावी असे सांगण्याकरिता उत्सवमंडळातले लोक घरोघर फिरू लागले. "श्रीमंतांनी आपल्या खर्चाने दिवे लावले तर खुशाल लावोत पण चाळीच्या मालकानी रंगसफेती दिवाबत्ती राजपुत्राकरिता केली तरी ते खर्च भाडेकऱ्याकडून घेणार हा मुंबईतील गरीब लोकावर जुलूम होय. आज रंगसफेतीवर भागले. उद्या राष्ट्र सुतकात आहे असे लोक मानीत असता त्याना हे सांगणार की राजपुत्र कधी नव्हे तो इकडे येणार तर ठेवणीतली वस्त्रे वापरा आणि घरात गुळाची पोळी करून खा." अखेर राजपुत्र व त्यांचे कुटुंब यांच्या स्वाऱ्या ता. १४ नोव्हेंबर रोजी मुंबईस येऊन दाखल झाल्या व तेथील सत्कार घेऊन इंदुराकडे निघून गेल्या. या सत्कारसमारंभाचे वेळी त्यातील अनेकापैकी एका प्रसंगी सर भालचंद्र यानी राजपुत्रावर छत्री धरून ऊन निवारले याबद्दल लोकात थट्टा सुरू झाली. कोणी म्हणत मुंबईतील मुख्य पुढारी

म्हणून सर भालचंद्र याना हे छत्रधराचे काम सरकारने करावयास सांगितले तर कोणी म्हणत सरकार असे काय म्हणून सांगेल? सर भालचंद्र यानीच जुनागडच्या नबाबाचे भरजरी तांबडे छत्र मागून घेऊन आपल्या गाडीतून समारंभाला नेले होते!

## (१३) बनारस येथील राष्ट्रीय सभा

१९०५ च्या डिसेंबरात बनारस येथे राष्ट्रीय सभा भरली. तिचे अध्यक्षस्थान गोपाळ कृष्ण गोखले याना देण्यात आले होते. त्यानी शिष्टमंडळातर्फे विलायतेत जाऊन जी कामगिरी केली ती टिळकादारख्यानाहि पटली म्हणून टिळकानीहि त्यांचे गुणगौरव व जाहीर सत्कार कसा केला हे पूर्वी सांगितलेच आहे. गोखले याना अध्यक्ष नेमण्याची योजना ते विलायतेत असतानाच झाली होती. इकडे आल्यावर त्याना उत्तेजनपर अशाच गोष्टी घडल्या. सर्व हिंदुस्थानातील वर्तमानपत्रे त्यांची प्रशंसा करीत होती. बंगाल्यातील चळवळ जोरात आली होती आणि कर्झनशाहीचा खरा तिटकारा गोखले याना आलेला असल्यामुळे कायदेकौन्सिलात व्हाइसरॉय समोर व बाहेर ते कडक भाषणे करीत असत. अशी कडक भाषणे त्यानी पूर्वी केली नव्हती. तात्पर्य जहालपणाची झुळुक गोखल्यानाहि लागावी अशी एकंदर परिस्थिति होती. त्यानी आपल्या भाषणात वंगभंगाच्या चळवळीचे समर्थन केले. म्हणजे "ही चळवळ राष्ट्राच्या इतिहासाला वेगळेच स्वरूप देणारी अशी एक गोष्ट होय. या चळवळीने देशातील वाद हटून पूर्वी कधी झाली नव्हती इतकी एकी पुढाऱ्यात झाली आहे. पूर आला असता पाणी वेडे वाकडे रीतीने कोठेहि शिरते त्याप्रमाणे अशा प्रचंड चळवळीत योग्य मर्यादेचे उल्लंघन क्वचित् होणारच. बंगाली लोकांची बेअब्रु झाली तर ती आमचीच होय या भावनेने आपण सर्व मदत करू. एका विवक्षित हेतूने म्हणजे इंग्लंडच्या लोकांचे लक्ष वेधण्यासाठी बहिष्काराच्या शस्त्राचा उपयोग करण्यात आला आहे तो या प्रसंगी योग्य असून विलायतेत त्याचा परिणाम चांगला झाला आहे. स्वदेशी करिता झीज सोसली पाहिजे. हिंदुस्थानाला वसाहतींचे स्वराज्य मिळाले पाहिजे" इत्यादि गोष्टी त्यांच्या भाषणात प्रमुख होत्या. हे भाषण इतके सणसणीत झाले की टाइम्स पत्राने म्हटले "गोखले यानी नेमस्तपणा सोडला ही चूक झाली." पण नेमस्त व जहाल यांच्यातील फरक हा केव्हाहि राहणारच. तो पुढे विषयनियामक सभेत दिसून आला. या सभेत विषय असा निघाला की राजपुत्र विलायतेहून हिंदुस्थानात आले आहेत तरी त्याना राष्ट्रीय सभेच्या नावाने स्वागतपर संदेश पाठवावा की नाही? नेमस्त पक्षाचे म्हणणे असा संदेश पाठवावा. परंतु लाला लजपतराय व टिळक यानी या सूचनेला विरोध केला. टिळकांचे म्हणणे असे की युवराजाचे स्वागत करण्याची वेळ निघून गेली आहे. ते यापूर्वीच मुंबईस येऊन संस्थानातून वगैरे फिरूहि लागले आहेत. त्यांचे करावयाचे ते स्वागत म्युनिसिपालिटया संस्थाने यानी केलेच आहे. पण संदेशच पाठवावयाचा तर असा पाठवावा की 'युवराजानी आमची राष्ट्रीय सभा येऊन पाहावी अशी

आमची इच्छा आहे पण ते घडत नाही याचा खेद वाटतो.' लजपतराय यांचे विरोधी भाषण टिळकाहून वेगळ्या मुद्यावर आणि अतिशय कडक झाले. ते इतके की मुनशी माधवलाल ते ऐकून भिऊन गेले व गोखल्यानाहि कसेसेच झाले. राजपुत्राला राष्ट्रीय सभेचे आमंत्रण पूर्वी करण्यात आले होते त्यात स्वागतपर शब्द घातले गेले होतेच. पण पुन्हा त्याला स्वागतपर संदेश पाठविण्याचा ठराव पुढे आला व तो मंजूर होणार असे पाहून विरोधी पक्षाने अशी युक्ति केली की "हिंदुस्थानातील राज्यपद्धति राणीच्या जाहीरनाम्याप्रमाणे चालत नाही असा निरोप आपल्या तीर्थरूपाना कळवा" असे शब्द संदेशात घालावे अशी सूचना केली व बहुमताने ती मंजूरहि झाली !

काशीच्या राष्ट्रीय सभेत एकंदरीने काय झाले या प्रश्नाचे उत्तर असे होते की राष्ट्रीय सभा अजून जिवंत आहे व बदललेल्या परिस्थित्यनुरूप ही सभा आपली विचारपद्धति व कार्यपद्धति ठेवण्याला तयार आहे. या सभेत एक पाऊल पूर्वीपेक्षा खचित पुढे पडले. कर्झनसाहेबाना उघडपणे औरंगजेब म्हणण्यात आले. स्वदेशीची चळवळ व बहिष्कार या दोहोंचाहि संमतिदर्शक उच्चार झाला. बहिष्काराची चळवळ इतर सर्व प्रांतातले लोक आपलीशी करण्यास तयार नाहीत असे कांही दिसले. पण बंगाली लोकाना तरी निदान कोणी काही दोष दिला नाही. सर्व हिंदुस्थानने बहिष्काराचा मार्ग स्वीकारावा असा ठराव झाला नाही तरी बंगालने केले ते योग्य केले इतके तरी सर्टिफिकेट नेमस्ताकडून मिळाले. टिळकांच्या मते "हे नवे खाद्य ज्याच्या कोठयाला पचेल तो ते खाईल. ज्याला पचणार नाही तो ते खाणार नाही. पण रोगाला औषध योग्य असा तरी निर्णय राष्ट्राने दिला ही काही लहान गोष्ट नाही."

काशी येथील राष्ट्रीय सभेचा प्रसंग इतर कित्येक दृष्टीनेहि फार चांगला झाला. राष्ट्रीय शिक्षण व हिंदू विद्यापीठ यांचे कार्य तेथे जोराला लागले. ता. ३१ डिसेंबर १९०५ रोजी बनारस टाउन हॉलमध्ये निरनिराळ्या प्रांतातील प्रमुख प्रतिनिधी जमले होते. अध्यक्षस्थानी श्री. विष्णू मोरेश्वर महाजनी हे होते. पंडित मालवीय यानी आपली हिंदू विद्यापीठाची कल्पना लोकांपुढे मांडली. सुरेंद्रनाथ बानर्जी यानी ती कल्पना पसंत करून कलकत्ता येथील राष्ट्रीय विद्यापीठ यालाच जोडावे असेहि सुचविले. टिळकानी सांगितले की "काम करणारे लोक पुढे आले तर पैसा वाटेल तितका मिळेल. इतर प्रांत माणसे नेमून देत असतील तर महाराष्ट्रातर्फे एक मनुष्याची हमी मी घेतो." प्रो० विजापूरकर प्रो० भानू यानी युनिव्हर्सिटीच्या कामाला स्वतःस वाहून घेण्याला आपण तयार आहो असे सांगितले. पं. मदनमोहन यानी आपण यापुढे वकिली सोडून दिली असे जाहीर केले. सुरेंद्रनाथ बानर्जी टिळक सर सुब्रह्मण्य अय्यर यानीहि मदत करण्याचे कबूल केले. टिळकानी तीन वर्षे पत्करली. दादासाहेब करंदीकर यानी विजापूरकरांच्या तीन वर्षांची हमी घेतली. माधवराव बोडस यानी अशीच मदत करण्याचे वचन दिले. मुनशी माधवलाल यानी तीन लाख रुपये देणगीचा आकडा सांगितला. इतर सहा

लाख मिळून नऊ लाखांची भरती झाली. राष्ट्रीय सभेच्या मंडपात जाहीर सभा भरून काँग्रेसचा फायदा घेऊन नागरी प्रचारिणी सभेने आपले कार्यक्रम याच आठवड्यात ठेवले होते. एका प्रसंगी नागरी प्रचारिणी सभेच्या विद्यमाने टिळकांचे व्याख्यान झाले. त्यात हिंदुस्थानातील सर्व लोकानी आपापली भाषा देवनागरी लिपीतून लिहावी अशी शिफारस केली. नागरी लिपी हीच अधिक सोपी व इष्ट असल्यामुळे युरोपात जशी रोमन लिपी तशीच भरतखंडातहि देवनागरी लिपीच प्रचलित व्हावी, आणि दक्षिण हिंदुस्थानातील काही लोकाना ही सुधारणा एकदम करता न आली तरी प्राथमिक शाळातील पुस्तके तरी देवनागरीतून छापण्यास सुरवात करावी असे टिळकानी सुचविले.

स्वदेशीचे कार्यहि असेच जोराला लागले. बनारसच्या महाराजांच्या हस्ते स्वदेशीचे प्रदर्शन राष्ट्रीय सभेला जोडून उघडण्यात आले होते. त्यात मुंबईपेक्षा भपका कमी असला तरी नव्या स्वदेशी वस्तू अधिक होत्या. ता० ३१ डिसेंबर रोजी विश्वेश्वर थिएटरमध्ये टिळकांच्या अध्यक्षतेखाली स्वदेशीची सभा झाली. त्याचप्रमाणे मुसलमानानीहि वेगळी सभा केली. त्यात अलीमहमद भीमजी यांचे स्फूर्तिदायक भाषण झाले. औद्योगिक परिषदेच्या कार्यालाहि येथे पुष्कळ चालन मिळाले. बाबू रमेशचंद्र दत्त मि. हॅमिल्टन मि. हॅवेल दाजी आबाजी खरे इत्यादींची काही भाषणे झाली. काही निबंध वाचण्यात आले.

नागरी प्रचारिणी सभेने हिंदी भाषा व देवनागरी लिपी ह्यांच्या संबंधाने हिंदुस्थानभर एकवटून प्रयत्न करण्याकरिता एक शिष्टमंडळ बाहेर पाठविले होते. त्याचे चिटणीस बाबू शामसुंदर दास हे असून शिष्टमंडळ महाराष्ट्रात येणार म्हणून त्यांचे बरोबर काशी येथील सुप्रसिद्ध नागरीक करमरकर हेहि इकडे आले होते. ही सभा सुमारे पूर्वी दहा वर्षे अस्तित्वात होती आणि नागरी लिपीच्या प्रचाराचे काम तिने थोडथोडे केले होते. सभेचे हेतू असे होते की हिंदी भाषा फारशी लिपीत लिहिली जाते ती देवनागरीत लिहिली जावी. हिंदी भाषेतील ग्रंथसंग्रह वाढवावा. हस्तलिखित ग्रंथ मिळवावे. हिंदी भाषेचा एक मोठा कोश करून पदार्थविज्ञानशास्त्रात येणाऱ्या पारिभाषिक शब्दाना समानार्थक शब्द योजून त्यात घालावे. सभेचा असाहि हेतू होता की संस्कृतोत्पन्न सर्व देशी भाषा देवनागरी लिपीने सर्व हिंदुस्थानभर लिहिल्या जाव्या. एक भाषा हे एकराष्ट्रीयत्वाचे साधन खरे. तथापि निदान बोलण्याच्या भाषेच्या आधी लिपी तरी एक होण्यास हरकत नसावी. टिळकानी या कल्पनेला चांगले उत्तेजन दिले आणि शिष्टमंडळाला इकडे मदत केली. कुळकर्णी यांच्या पुस्तकात यासंबंधाने एक संवाद दिला आहे तो येथे देतो. त्यावरून या विषयावरील टिळकांचे विचार कळून येतील.

नागरी प्रचारिणी सभेचे सेक्रेटरी मि. श्यामसुंदर दास बी. ए. हे सभेस मदत मागण्याच्या हेतूने टिळक यांचेकडे आले असता ता. १३-५-१९०५ रोजी न चिं. केळकर यांचे घरी इंग्रजीत संवाद झाला. त्या वेळी टिळक म्हणाले:—

" देवनागरी लिपीने जर मराठीप्रमाणेच गुजराथी बंगाली वगैरे भाषा लिहिता येतील तर देशासंबंधाने पुष्कळ कार्य होईल. एक भाषा नाही तर एक लिपी होण्यापासून काही कमी फायदे नाहीत. एक भाषा असणे हे राष्ट्रीयत्वाचे एक दर्शक ( National significance ) आहे. या कामी तुम्ही म्हणता त्याप्रमाणे लोकानी प्रयत्न करून फारसा उपयोग होणार नाही. सरकारचे सहाय्य पाहिजे. क्रमिक पुस्तकात त्यानी ही लिपी वापरली म्हणजे आपोआपच लहानपणापासून मुलाना गुजराथी बंगाली हिंदी वगैरे भाषांचे ज्ञान होईल व पुढे त्या त्या भाषा शिकण्याकडे त्यांची प्रवृत्ति होईल.

श्यामसुंदरः—मराठी गुजराथी हिंदी बंगाली वगैरे भाषात एकादे मासिक पुस्तक किंवा वर्तमानपत्र काढले तरी पुष्कळ उपयोग होईल.

केळकरः—उपयोग होईल. पण याहीपेक्षा एकच लेख या सर्व भाषात देवनागरी लिपीने दिला तर जास्त उपयोग होईल. आता पहा की मला बंगाली भाषा थोडीबहुत येते पण येते तीहि विसरत चालली आहे. हीच जर देवनागरी लिपीत ती भाषा असती तर ती वाचण्याकडे विशेष प्रवृत्ति झाली असती.

टिळकः—ते काही खोटे नाही. सरकार काही एक प्रयत्न करीत नाही पण लोकानी तरी तो केला पाहिजे. परंतु लोकांचा तरी भरंवसा आणि एकी आहे कोठे ! बंगाली लोक तर आम्ही मराठीची जी देवनागरी लिपी लिहितो तीच अपभ्रष्ट आहे असे म्हणतात आणि आपली लिपी हीच खरी देवनागरी लिपी असे सांगतात. त्यांचे हे म्हणणे अगदी गैर आहे असे नाही. कारण अलीकडे जे जुने शिलालेख सापडतात त्यापैकी पुष्कळांची लिपी जवळ जवळ बंगाली लिपीसारखीच आहे. कसे का असेना. देवनागरी लिपीचा हल्ली सर्वत्र प्रसार होणे इष्ट आहे. सार्वभौम सरकार करीत नाही तर नाही पण जेथे मराठी गुजराथी अशा दोन तीन भाषा चालतात अशा बडोद्यासारख्या राज्यात संस्थानिकानी या बाबतीत प्रयत्न केला तरी चांगले होईल. "

नागरी प्रचारिणी सभेने याच आठवडयात बनारसला जमणाऱ्या मंडळीचा फायदा घेऊन आपलाहि कार्यक्रम मधून मधून चालू ठेवला होता. त्यात एके प्रसंगी सुप्रसिद्ध सिव्हिलियन ग्रंथकार व वाङ्मयचिकित्सक सर रोमेशचंद्र दत्त हे अध्यक्ष असता टिळकानी नागरी लिपीच्या प्रचाराला उत्तेजनकारक असे भाषण केले. त्यानी आपल्या भाषणात जुने ताम्रपट व हस्तलिखित ग्रंथांचे आधाराने भाषाशास्त्रदृष्टया नागरी लिपी सर्व हिंदुस्थानात प्रचारात आणणे कसे इष्ट व सोपे आहे ते सांगितले. सर्व हिंदुस्थानात एकच वेळामापनाची व वजनांची समान पद्धत प्रचारात आणण्यापेक्षाहि हिंदुस्थानात सर्वत्र एक लिपी प्रचारात आणणे जास्त महत्त्वाचे आहे असेहि त्यानी सांगितले. "या कामी सरकारची फारशी मदत मिळण्याचा संभव नसल्यामुळे निरनिराळ्या प्रांतातील सुशिक्षितानीच ही गोष्ट मनावर घेतली पाहिजे. युरोपखंडात अठरा देश व तितक्या निरनिराळ्या

भाषा आहेत तरी त्या सर्वांची एकच ' रोमन ' लिपी असल्यामुळे सर्व देशातील सुशिक्षितांचे विचार एकमेकास कळविण्याचे व भाषाज्ञानाचे काम जास्त सुलभ झाले आहे. हिंदुस्थानात एक लिपी झाल्यास पुढे मागे त्यापासून एक राष्ट्रीय भाषा उत्पन्न होवो वा न होवो निदान हिंदी लोकामध्ये राष्ट्रैक्य व विचारैक्य उत्पन्न होण्यास त्याची बरीच मदत होईल यात शंका नाही. लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केला असता हिंदी व मराठी प्रांतात देवनागरी लिपीचाच प्रसार असून गुजराथी लिपीहि तिचेच जवळ जवळ आहे. बंगाली तामीळ तेलगू कानडी उर्दू या लिपींचा उपयोग करणारे लोकच कदाचित एक लिपीविस्तारास आड येण्याचा संभव आहे. तथापि निदान तूर्त तरी त्या प्रांतातील प्राथमिक शाळांमध्ये स्थानिक लिपीबरोबरच देवनागरी शिकण्यास प्रारंभ झाला तरी पुष्कळ कार्यभाग होण्यासारखे आहे. "

## ( १४ ) वंगभंगाची चळवळ

हिंदुस्थान देश इंग्रजांच्या अंमलाखाली गेल्यापासून अनेक चळवळी इकडे झाल्या. पण ज्याला बंगालच्या फाळणीची चळवळ म्हणतात तशी चळवळ आजवर केव्हाहि झाली नाही. १८५७ साली बंड झाले ते उत्तर हिंदुस्थानातच झाले व ते मुख्यतः शिपायानीच केले होते. दुसऱ्या टोकाला असहकारितेची निःशस्त्र चळवळ १९२१ साली झाली ती सर्व हिंदुस्थान देशभर झाली परंतु काही वर्ग त्यातून अलिप्त होता. बंगालची फाळणी ही एकच चळवळ अशी झाली की जिच्यातून हिंदुस्थानचा एकहि प्रांत सुटला नाही. बंगाल्यातच का होईना पण विद्यार्थ्यांपासून राजा महाराजापर्यंतचे लोक या चळवळीत सामील होते.

मुळात पाहिले तर बंगालची फाळणी हा एखाद्या चळवळीचा विषय तरी कसा होऊ शकला याचे पुष्कळ लोकांना मोठे गूढच वाटते. बंगालची फाळणी म्हणजे बंगाली भाषा बोलणारांची फाळणी व फाळणी म्हणजे निरनिराळ्या अमलाखाली प्रांत तोडून देणे असा अर्थ घेतला तर फाळणी ही गोष्ट सोयीची म्हणून अगदी स्वाभाविक वाटते. आता एक भाषा बोलणारे सर्व लोक एका प्रांतात एका अमलाखाली असण्यापासून फायदा पुष्कळ आहे. मुख्य फायदा म्हटला म्हणजे राष्ट्रीय भावना संघटित होण्याला भाषावार प्रांतरचनेची फार मदत होते. आणि या दृष्टीने पूर्वीपासून अनेक लोक ही सूचना सुचवित आले. अखेर राष्ट्रीय सभेने स्वतःची प्रांतरचना केली तेव्हा हे तत्व प्रत्यक्ष अमलातहि आणले. पण एक भाषा बोलणारे लोक निरनिराळ्या प्रांतात वाटून जाणे ही गोष्ट सरकारी कारभारात एकट्या बंगालच्या वाट्याला येणारी होती असे नाही. हिंदी मराठी कानडी या भाषा बोलणाऱ्या लोकांची आज तीच स्थिति आहे. हिंदी भाषा बोलणारे लोक ८।९ कोटी असून त्यांची आज तीन चार प्रांतात वाटणी झाली आहे. कानडी बोलणारे लोक व मराठी बोलणारे लोक असेच निरनिराळ्या प्रांतात, इतकेच नव्हे तर काही ब्रिटिश अमलाखाली व काही देशी संस्थानिकांच्या अमलाखाली असेहि

वाटून गेले आहेत. पण मराठी व कानडी भाषा बोलणाऱ्यानी अजून हा प्रश्न राजकीय गाऱ्हाण्याच्या स्वरूपाने पुढे मांडलेला नाही. फक्त काही पुढाऱ्यांच्या मनात तो मधून मधून डोकावत असतो. हिंदी भाषा बोलणाऱ्या समाजाच्या तोंडून तर हे गाऱ्हाणे अद्याप प्रगटहि झालेले नाही. अशी स्थिति असता बंगाली लोकांची दोन प्रांतात वाटणी व्हावी यात कसले मोठे गाऱ्हाणे असा प्रश्न पुष्कळाना सुचतो. व खरे बोलावयाचे तर त्याचे समर्पक उत्तर कोणीहि आजवर देऊ शकला नाही. इंग्रजांचे राज्य उत्तर हिंदुस्थानात झाले त्याच्यापूर्वी मुसलमानांचे राज्य तेथे होते. मुसलमानांच्या ताब्यातून इंग्रजानी बंगालची दिवाणी व सुभेदारी घेतली तेव्हा बंगाल प्रांतात हिंदी ओरिया ब्रह्मी बंगाली वगैरे अनेक भाषा बोलणारे लोक होते. पण राजधानीचे ठिकाण कलकत्ता हे असल्यामुळे राज्यकारभारात बंगाली लोकांचे वर्चस्व सहजच प्रस्थापित झाले. आणि याचे प्रत्यंतर परवापरवापर्यंत असे मिळत होते की इकडे आसामपासून तिकडे सिमल्यापर्यंत प्रत्येक महत्वाच्या ठिकाणी बंगाली लोक हे सरकारी नोकरीत असलेले हटकून आढळावयाचेच. पण इतर समाजाना शिक्षण मिळू लागले तसतसी त्यांच्या मनात मत्सरबुद्धि उत्पन्न झाली. प्रथम लखनौ अलाहाबाद प्रांतातून बंगाली लोकांची पिछेहाट झाली व तो प्रांत वेगळा झाला. त्यानंतर आसामचा काही भाग त्यानंतर बहार ओरिसा या क्रमाने मूळच्या बंगाल प्रांतातील तुकडे काढून टाकण्यात आले. पण ही गोष्ट केवळ इतर भाषा बोलणारांच्या हिताकरिता केली होती असे मात्र नव्हे. तर कोणताहि प्रांत फार मोठा व अवजड असला तर राज्यकारभार एका गव्हर्नराला मोठा कष्टाचा होतो. १८७४ साली आसाम प्रांत बंगालपासून वेगळा करण्यात आला. तेव्हा सिलहत काचार व गोलपारा हे बंगाली भाषा बोलणाऱ्या लोकांचे जिल्हे काढले गेले. पण त्या वेळी लोकमत व राष्ट्रीय भावना प्रबळ नसल्यामुळे या प्रास्ताविक विभागणीची कोणी तक्रार केली नाही. वरील तीन जिल्ह्याना कदाचित तो अन्याय म्हटला तरी बाकीच्या आसाम प्रांतातील लोकाना तो न्यायच होता.

पण आसाम प्रांत वेगळा केल्याने त्यातील लोकांची गाऱ्हाणी दूर झाली तरी सिव्हिल सर्व्हंटांची गाऱ्हाणी चालूच होती. कारण त्या प्रांताकरिता अशी वेगळी सिव्हिल सर्व्हिस नव्हती. व तशी वेगळी सर्व्हिस करावी तर जागा फार थोड्या. यामुळे संयुक्त प्रांत व बंगाल यातील सिव्हिलियन लोकहि आसामात पाठवीत. यामुळे अशी कल्पना निघाली की आसाम प्रांत जो मुळात लहान होता तो बंगालपातील आणखी काही भाग जोडून मोठा करावा म्हणजे त्याकरिता वेगळी सिव्हिल सर्व्हिस करिता येईल. याकरिता चितगाँग नवखाली टिपरा हे जिल्हे बंगाल्यातून काढून आसामला जोडावे असा बूट निघाला. त्याला दुतर्फी हरकत घेण्यात आली आणि कौन्सिलातून लोकमत प्रगट होऊ लागल्याने ही कल्पना सरकारने काही दिवस तशीच दाबून ठेवली. पण लॉर्ड कर्झन हे व्हाइसरॉय झाल्यावर या कल्पनेत आणखी अशी सुधारणा करण्यात आली की सगळा चितगाँगचा सुभा व त्या-

बरोबर डाका व मैमनसिंग हे बंगाल्यातील नवीन दोन जिल्हेहि मरतीला घालून आसाम प्रांत स्वतंत्र होण्याइतका सुबगुवित करावा. या योजनेत बंगालचा आणखी बराच मोठा तुकडा निघणार होता. व बंगाली भाषा बोलणारांची चांगलीच विभागणी होणार होती. या कल्पनेला अर्थातच पूर्वीपेक्षा आधिक प्रबल विरोध झाला.

पण दुसऱ्या बाजूलाहि तशीच प्रबल व्यक्ति असल्यामुळे या खेपेला या कल्पनेने पाऊल मागे घेतले नाही. प्रथम सर अँड्रयूज फ्रेझर यांच्या मार्फत जमीनदार व इतर पुढारी याना खाजगी रीतीने बोलावून त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. नंतर स्वतः लॉर्ड कर्झन यानी पूर्व बंगाल प्रांतात दौरा काढून ही कल्पना खाजगी रीतीने लोकाना पटविण्याचा प्रयत्न केला. त्याना अशी आशा होती की आपल्या दुर्दम वृत्तीची छाप लोकावर पडेल. पण मैमनसिंगचे महाराज सूर्यकान्त आचार्य यानी लॉर्ड कर्झन हे घरी पाहुणे असताच त्यांच्या या सुधारणेचा निषेध केला. या विरोधाने लॉर्ड कर्झन यानी माघार घेतली नाही. उलट उत्तर म्हणून पश्चिम बंगाल पैकी फरिदपूर व पूर्व बंगालपैकी बारिसाल हे जिल्हे या नवीन प्रांताला आणखी जोडण्याची सूचना पुढे आली. लोकमताला कोणत्याहि प्रकारे न विचारता लॉर्ड कर्झन यानी एक गुप्त खलिता लॉर्ड मोर्ले यांच्याकडे पाठवून पूर्व बंगाल या नावाचा असा एक नवा प्रांत निर्माण करण्याची परवानगी मागितली. आणि मोर्ले यानीहि या बाबतीत लोकमत अनुकूल होते की नाही याची मुळीच चौकशी न करिता त्यानी नव्या योजनेला मंजुरी दिली. तारीख २० जुलै १९०५ रोजी बंगालची फाळणी प्रथम जाहीर करण्यात आली व कोणाच्याहि अदमासाबाहेर झालेली बंगाल प्रांताची ही छिन्नविच्छिन्नता पाहून कपाळावर हातोडा मारावा त्याप्रमाणे बंगालचे लोक चकित व स्तंभित झाले. काही काळपर्यंत काय करावे हे कोणासहि सुचेना. पण लोक देहभानावर येताच त्यानी ही फाळणी रद्द करण्याचा निश्चय केला. राज्यकारभाराच्या सोईकरिताच ही विभागणी केली नसून बंगाली राष्ट्राची मानखंडना करण्याचा व त्याला दुर्बळ करण्याचा तिच्या मुळाशी हेतू होता अशी लोकांची भावना झाली. हिंदु मुसलमानात फूट पाडण्याचीहि कपट नीति त्यात दिसू लागली. व सर्वांवर कुटिल राजनीतीचा लेप लावल्यासारखा या योजनेला विद्वेषकारक रंग चढला. अँग्लो इंडियन पत्राचे संपादक रॅटक्लिफ व ब्लेअर यानीहि या विभागणीची निंदा केली.

महाराजा ज्योतिंद्रमोहन टागोर यांच्या घरी पहिली सभा होऊन महाराजांच्याच सहीने सरकारला निषेधपर तार पाठविण्यात आली. तीत असे सुचविण्यात आले की राज्यकारभाराच्या दृष्टीने बंगालप्रांत अवजड होत असला तर त्याची विभागणी करण्याचे इतरहि काही मार्ग आहेत ते आम्हाला विचारा म्हणजे आम्ही सांगतो. बंगाली भाषा बोलणारे लोक न विभागता इतर रीतीने ही विभागणी हवी तशी होऊ शकते पण सरकारने या सूचनेला दाद दिली नाही. तारीख ७ ऑगष्ट रोजी कलकत्ता येथील टाऊन हॉलमध्ये जंगी जाहीर सभा भरविण्यात आली व

तो दिवस बंगालच्या फाळणीचा ह्मणजे बंगालच्या सुतकाचा ह्मणून पाळण्यात यावा असे ठरले. पण सभा झाली ठराव झाले ' पुढे काय ' हा प्रश्न सहजच उपस्थित झाला. व पूर्वीच्या कोणत्याहि चळवळीपेक्षा या चळवळीला विशेष महत्त्व व मान याचकरिता की हिंदी जनतेला कृतीने प्रतिकार करण्याची कल्पना या चळवळीतच प्रथम सुचली. अर्ज विनंती सभा भाषणे ठराव येथपर्यंत पूर्वी मजल गेली होती व लोकमत जागृत करण्याची अर्थातच ही मुख्य साधने होती. तथापि वाटेल तितका कापूस पिंजला पण त्यातून एकहि सूत निघाले नाही तर त्या पिंजलेल्या कापसचा काय उपयोग ?

बंगालच्या फाळणीचा सरकारी ठराव प्रसिद्ध झाला तो दिवस शुभ मानावा की अशुभ मानावा हे सांगता येणे कठीण आहे. कारण ह्या दिवसाची दोन प्रकारची फले पुष्कळ दिवस येत राहिली. दर्शनी तो अशुभ वाटेल यात शंका नाही. कारण 'बंगाली' व 'अमृतबझार पत्रिका' यानी फाळणीच्या ठरावाची वार्ता छापताना भोवताली मृत्यूदर्शक काळ्या रेघा घातल्या होत्या. हा मृत्यु म्हणजे बंगाल प्रांताच्या अद्वैताचा मृत्यु होय. यापूर्वी एकदोन वर्षे लॉर्ड कर्झन यानी बंगाली लोकाना चिडविण्याचे काम सुरू केले होते. पण फाळणीच्या ठरावाने ही चिडवणूक कळसाला जाऊन पोहोचली. बंगालची फाळणी झाली ती वज्रलेप म्हणून सांगण्यात आले. पुढे ती रद्द होऊन बंगाल प्रांताच्या प्राणावर बेतले होते ते शेपटावर निभावले. आणि आता बंगालच्या फाळणीची म्हणजे त्या वेळी होऊ घातलेल्या व हल्ली जी प्रत्यक्ष करण्यात आली तिची आठवण बंगाली लोकाना क्वचितच होते. पण ह्या फाळणीच्या प्रसंगाने राष्ट्रीय भावनेची जी एक भरती २२ वर्षांपूर्वी भरू लागली ती तेव्हापासून सारखी भरतच राहिली असे म्हणण्यास हरकत नाही. गळू पिकले म्हणजे त्याला कोठे तरी तोंड फुटते. पण ते अमुकच ठिकाणी फुटेल असा नियम नाही. तसेच कर्झनशाहीच्या पूर्वी झालेले जुलूम आणि स्वतः लॉर्ड कर्झन यानी त्यात घातलेली भर यानी असंतोषाचे गळू हिंदुस्थानच्या अंतरंगात पिकले होते. त्याला त्या फाळणीच्या प्रसंगाने बंगाल्यात प्रथम तोंड फुटले. आणि मग ते चोहोकडे वाहू लागले. हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतात असंतोष पूर्वीचाच होता. शिवाय प्लेगच्या अधिकाऱ्यानी बहुतेक प्रांतात लोकाना सारखेच गांजले होते. आणि त्याचा परिणाम महाराष्ट्रात झालेला दिसून आलाहि होता. महाराष्ट्रात जे प्रकार घडून आले ते प्रांतिक किंबहुना स्थानिक स्वरूपाचे होते. पण चोहोकडे तयारी होऊन राहिलेली असल्यामुळे नव्या राष्ट्रीय भावनेचा आद्यप्रवर्तक होण्याचा मान या फाळणमिुळे बंगालला मिळाला. आणि तो एका दृष्टीने योग्यच होता. कारण या फाळणीविरुद्ध बंगाल्यात जितके दिवस सतत निरनिराळ्या प्रकारानी मोठी निकराची चळवळ झाली तितकी कोणत्याहि कारणाने दुसऱ्या कोणत्याहि प्रांतात पूर्वी झाली नव्हती.

सोमवार तारीख ७ आगष्ट १९०५ रोजी बंगालच्या लोकानी फाळणी विरुद्ध चळवळीला खरा प्रारंभ केला. या दिवशी कलकत्ता शहरात सकाळपासून

एकसारखी विलक्षण गडबड उडून राहिली होती. सर्व गावभर दोनप्रहरी दोन वाजता हरताळ पडला. राजेमहाराजे जमीनदार व्यापारी मारवाडी वगैरे राजकीय चळवळीत कधी न पडणारी सर्व मंडळी या चळवळीत शामील झालेली त्या दिवशी दिसली. मग विद्यार्थ्यांविषयी तर बोलावयासच नको. निरनिराळ्या रंगाचे पोषाख घातलेली तरुण मंडळी हातात निशाणे घेऊन चालली होती. या दिवशी निषेधप्रदर्शक पहिली सभा टाऊन हॉलमध्ये करण्याचे ठरले होते. पण गर्दी इतकी झाली की टाऊन हालात वर एक खाली एक व बाहेरच्या मैदानात दोन अशा चार सभा कराव्या लागल्या. कासीमबझारचे महाराज भुपेंद्रनाथ बोस अंबिकाचरण मुजुमदार सुरेंद्रनाथ बानर्जी हे चार ठिकाणी अध्यक्ष होते. सभेत झालेल्या ठरावात सरकारने फाळणीचे हे कृत्य जाणूनबुजून अन्यायाने व दांडगाईने केलेले आहे असा निषेध असून प्रतिकारार्थ ब्रिटिश माल न वापरण्याचा निश्चयहि त्यात जाहीर करण्यात आला होता. फाळणी रद्द करण्याकरिता दोन सवादोनशे लोकांची एक कमिटी नेमण्यात आली होती. त्यात १३ राजे महाराजे होते. अशा रीतीने ह्या चळवळीचे निशाण रोवले गेले.

टिळकानी वेळोवेळी कर्झनशाहीवर कडक टीका केलीच होती. तथापि फाळणीच्या योगाने बंगाल्यात राष्ट्रीय भावनेची एक नवी ज्योत पेटू लागली आहे हे पाहून त्याना मनातून अतिशय आनंद झाला. आणि ते समवृत्तीच्या परप्रांतांतील लोकाशी थोड्या वेळात समरस कसे होत हे तारिख १५ ऑगस्टच्या केसरीतील अग्रलेखावरून दिसून आले. चळवळीचे जुने मार्ग सोडून काही तरी नवा मार्ग काढला पाहिजे असे त्यांचे मत अलीकडे दोन तीन वर्षे पक्के बनले होते. विलायतेला डेप्युटेशन पाठविले जाणे हा या नव्यां उद्योगाचा एक भाग होता.. पण खुद्द हिंदुस्थानातच काय करावे या प्रश्नाला बंगल्यातील पुढाऱ्यानी कलकत्त्याच्या सभेने आयतेच उत्तर दिले. खरे म्हटले तर कायदेशीर काय व बेकायदेशीर काय कोणतीहि चळवळ पुरू शकली नाही व तडीला जाऊ शकली नाही. तथापि प्रसंगोपात्त साधनपरत्वे दोन्ही प्रकारच्या चळवळी सुरू राहाव्या म्हणजे त्यांचा जोर एकमेकाना पोहोचतो असे टिळकांचे मत होते. "धनुष्याला एकच दोरी असावी दुसरीचे कारण नाही सनदशीर चळवळच चांगली झाली तर तेवढ्यानेच कार्य होईल" असे नेमस्त पक्षाचे म्हणणे. पण धनुष्याला एकाच्या जोडीला दुसरीहि दोरी असावी ही म्हण काही वेड्या लोकानी बनविलेली नाही. चांगली अनुभवसिद्ध आहे. याकरिता सनदशीर चळवळ ही नित्य स्वरूपाची म्हणून चालली असली तरी तिच्या जोडीला आणि मदतीला दुसऱ्या प्रकारचीहि चळवळ सुरू झाली पाहिजे चालू राहिली पाहिजे अशी टिळकांची विचारसरणी. विलायतेत प्रधानमंडळात फेरबदल होतो. इकडे ती स्थिती नाही. यामुळे सनदशीर चळवळच करू व आपण अधिकारारूढ झालो म्हणजे हात उगवून घेऊ आणि हव्या त्या सुधारणा घडवून आणू अशी आशा आम्हाला करिता येत नाही.

लोकमत किती सुजले रुसले फुगले खुलून दिसले तरी त्याचे फळ तितकेच. आणि कशानेहि का होईना थोडी बहुत मनाला दहशत असल्या खेरीज मनुष्य वठणीला येत नाही हे मनुष्य स्वभावाचे आद्य तत्व असल्यामुळे सरकारला वचक बसेल सरकारला चिंता वाटेल असे काही साधन आपल्या हाती ठेवले पाहिजे असा टिळकांचा युक्तिवाद असे. आणि एकच गोष्ट दोन ठिकाणी दोन माणसाना एकाच वेळी सुचावी त्याप्रमाणे प्रतिकाराची काही नवी योजना करावी या कल्पनेचा उदय कलकत्यास झालेला पाहून आपल्या अग्रलेखाला दोन उद्गारचिन्हानी युक्त असा "आणीबाणीची वेळ आली" हा मथळा देऊन टिळकानी बंगाल्यातील भावनेची आणि आपल्या सहानुभूतीची कल्पना वाचकाना ढळढळीतपणे आणून दिली. टिळकांच्या मते समुद्रकाठच्या डोंगरावर समुद्राच्या लाटा आपटून ज्याप्रमाणे परावृत्त होतात त्याप्रमाणे आपल्या इकडील लोकमताची स्थिती झालेली आहे. पण समुद्राच्या लाटा तरी बऱ्या. कारण त्यांच्या अंगी थोडाबहूत तरी खारटपणा असतो. आणि डोंगराच्या पायथ्यावर आदळून आदळून त्या खोल विवरे किंवा कपारी निर्माण करतात. हिंदी लोकात इतकाहि खारटपणा आलेला नाही. आणि विलायती वस्तूवरील बहिष्कार हा आजवरचा अळणीपणा घालविणाऱ्या खारटपणाचा पहिला तडाका होय. बंगालचे बडे जमीनदार आणि सरदार, भूपेंद्र बाबूसारखे नेमस्त लोक बहिष्कार घालण्याला प्रवृत्त झाले त्याअर्थी चळवळीत काही ताठरपणा येण्याचा संभव दिसतो असे टिळकाना वाटू लागले. आता वरील कडक उपायानी वाटेल तितके लोकमत कमावले गेले व प्रबल केले पण सरकारने ते जुमानले नाही तर 'ततः किम्' हा प्रश्न उरतोच. मामुली साधनांच्या पलीकडे जाऊनहि काही कृति केल्याने तो अडचणीचा व कधी अंत न होणारा प्रश्न कायमचा निर्वाहित होतो असा अर्थ नाही. तथापि ठराव भाषणे यांच्यापुढे जाऊन कृति केली म्हणजे मनाच्या समाधानाच्या दृष्टीने प्रयत्नवादी मनुष्याला सहजच अधिक बरे वाटते.

कृतीच्या दृष्टीने विचार करिता प्रथम साधी सोपी प्रतिकाराची गोष्ट म्हणून अशी सुचविण्यात आली की सरकारी मानसन्मानाच्या सर्व जागा व बिनपगारी अधिकाराच्या जागा लोकानी निषेधप्रदर्शनार्थ सोडून द्यावा. पण या जागावर असलेले सर्व लोक या कल्पनेप्रमाणे वागण्याला अनुकूल होतील की नाही अशी शंका आल्यामुळे ती कल्पना टाकून देण्यात आली. यानंतर सुचलेली बहिष्काराचीहि कल्पना वरील दोषाला पात्र नव्हती असे नाही. तरी पण तिजमध्ये फायदा असा होता की जनतेतील सामान्य मनुष्यालाहि ती थोडीबहुत आचरता येण्यासारखी होती. ऑनररी मॅजिस्ट्रेट किंवा लोकलबोर्ड मेंबर हे एकंदर संख्येने किती असणार? फारच थोडे. पण 'स्वदेशी व्रत व बहिष्कार' ही गोष्ट अशी होती की त्यात हजारो मनुष्याना सहजच भाग घेता येईल. ही बहिष्काराची कल्पना नक्की अमुक मनुष्याने काढली अमुक ठिकाणी ती निघाली किंवा अमुक तारखेला ती निघाली हे निश्चित-पणे सांगता येण्यासारखे नाही. पण ती निघाली त्या वेळी कोणाला अगदी नवी

अशी न वाटण्याइतकी अनेक लोकांच्या डोक्यात ती एकसमयावच्छेदे करून वावरत होती यात शंका नाही. पण त्यातल्या त्यात पबना जिल्ह्यातील एका सभेत तिचा प्रथम उच्चार झाला असावा असे सुरेंद्रनाथ बानर्जी यानी आपल्या पुस्तकात लिहिले आहे. कोणतीहि कल्पना निघाली म्हणजे तिला दाखल्याना मात्र काही कमी पडत नाही. बहिष्काराची ही कल्पना निघताच अमेरिकेत इंग्रजी मालावर घातलेला बहिष्कार व चिनात अमेरिकन मालावर घातलेला बहिष्कार यशस्वी कसा झाला याचा वृत्तांत इतिहासज्ञ लोकानी वर्तमानपत्रातून छापण्याला सुरवात केली. शिवाय बहिष्काराला देहभूत अशी स्वदेशीची चळवळ खुद्द बंगाल प्रांतात यापूर्वी नसली तरी महाराष्ट्रात व इतर प्रांतात होतीच. तीहि या बहिष्काराच्या मदतीला धावून आली. आणि बहिष्कार हे विध्वंसक व स्वदेशी हे विधायक रूप मिळून ही चळवळ एखाद्या द्विमुखी पौराणिक देवतेप्रमाणे लोकाना अद्भुत व चित्ताकर्षक अशी वाटू लागली. पण स्वदेशी बहिष्काराची चळवळ यशस्वी झाली तर ब्रिटिश कारखानदार व मजूर याना तिची बाधा होणार व फाळणी विलायतेतील अधिकाऱ्यांकडून रद्द करवून घ्यावयाची तर तेथील लोकमत आपणास अनुकूल कसे राहणार ही अडचण पुढे आली. तेव्हा पुढारी लोकानी असे ठरविले की ही चळवळ तर करावयाचीच पण "तिचा हेतु मर्यादित आहे म्हणजे विलायतेतील लोकांचे लक्ष फाळणीमुळे उत्पन्न झालेल्या बंगाली लोकांच्या गाऱ्हाण्याकडे वेधण्यापुरताच आहे तो ब्रिटिश जनते-विरुद्ध द्वेष उत्पन्न करण्याचा नाही" असे स्पष्ट शब्दानी जाहीर करावे म्हणजे झाले. 'फाळणी रद्द झाली की बहिष्कार संपला' असे म्हटल्याने ब्रिटिश जनतेचा गैरसमज होणार नाही अशी हिंदी पुढाऱ्यानी एकमेकांच्या मनाची समजूत केली व कल-कत्त्यातील इंग्रजी मित्रानाहि ही गोष्ट समजावून देण्याचे प्रयत्न झाले!

विचाराच्या बीजाला कृतीचा अंकुर फुटला अशी हीच पहिली चळवळ म्हणून ती महत्वाची असे वर सांगितलेच आहे. पण त्याबरोबर दुसरीहि एक महत्त्वाची बाब म्हणून सांगितली पाहिजे ती ही की ही कृति उपदेशण्याला जितकी मातबर माणसे पुढे आली तितकी पूर्वीच्या कोणत्याहि चळवळीत आली नाहीत. उंच डोंगर माथ्यावर पाऊस पुष्कळ पडला म्हणजे तो सगळाच्या सगळा एकदम वाहून जात नाही. त्यातील बराचसा दऱ्यातून लवणातून डोंगरकपारीतून साचून राहतो. व त्यातील जे पाणी वाफ होऊन वर जात नाही ते बारीकसारीक सांधी कोपरे फटी यातून खाली येते व मग झरे फुटतात. राष्ट्रीय भावनेची गोष्ट अशीच आहे. फाळणीच्या विरुद्ध चळवळ सुरू झाली व तिने राष्ट्रीय भावनेचा जो पर्जन्य पाडला त्याला देखील असेच झरे फुटले व झऱ्यांच्या रीतीप्रमाणे ते अनेक दिशानी व अनपेक्षित रीतीने फुटले. वर्तमानपत्रकर्ते धीट साहसी व चमत्कृतिपूर्ण लेख लिहिण्याला शिकले. मूक नसत्याना वाचा फुटली. आळशी बुद्धिवानाना सर-स्वतीने आपल्या मयूर पिसाच्या स्पर्शाने गुदगुल्या करून लेखनकलेचा अभ्यास करण्यास शिकविले. कवीची दिव्य प्रतिभा स्फुरू लागली. भाषा अलंकारांचा सुंदर

बाजार सजला. व्याजोक्ति वक्रोक्ति वगैरे निंदा निषेधाचे जितके सूक्ष्म व नाजूक प्रकार तितके लेखात व भाषणात नटू लागले. कल्पनात्मक बुद्धीच्या लोकाना नवी कथानके व कपोलकल्पित गोष्टी सुचू लागल्या. पढिक विद्वानानी डोके खाजवून व पुस्तके चाळून सद्यःस्थितीला अनुकूल अनुरूप असे जुने दाखले हुडकून काढले. लेखकांच्या कलमाप्रमाणे चितार्‍यांची कलमेहि झरझर चालू लागली. रसायन-शक्तीने परिमाणू जोडले जावे त्याप्रमाणे व्यक्ति एकत्र येऊन संघशक्ति बनू लागली. मिजासी चैनी लोकांचा निषेध स्वतः त्यांचे मनच करू लागले. तिजोर्‍यातून व बँकातून डांबून ठेवलेल्या धनिकांच्या गूढ संपत्तीला परोपकारी पाय फुटले. भित्रे लोक धीट बनले. संगतीने संशयात्म्यांचा संशय फिटला. मोठेपणा व कर्तृत्व ही वयावर अवलंबून नसून अंतःकरणाच्या तेजावर अवलंबून आहेत अशी भावना प्रगट झाली. मिसरूड न फुटलेली मुले दाढीमिशा पिकलेल्या म्हातार्‍याशी कर्तेपणात स्पर्धा करू लागली. घातक व मारक साधनांचे कौतुक उत्पन्न झाले. आणि रिकामे हात प्रतिकारार्थ चाळे करू लागले. सनदशीर व कायदेशीर हे शब्द लोपून जाऊन केवळ अधिक पराक्रम कोण करतो अधिक दुःख कोण सोसतो अशाविषयी तरुणांच्या मनात अहमहमिका सुरू झाली. ही सर्व क्रांति काही थोडया निश्चित अवधीत घडून आली व पुढे निश्चित अवधीपर्यंतच टिकली हे खरे. पण आंबा पाडाला लागून कुजण्यापूर्वी मधली जी इष्ट व स्पृहणीय स्थिति असते ती बंगाली राष्ट्राच्या मनाने काही काल या चळवळीत अनुभविली यात शंका नाही. चळवळीत सामील झालेले काही लोक पुढे कंटाळून भिऊन किंवा निराश होऊन मागे हटले. तसेच मुख्य चळवळ संपली असताहि किंबहुना तिचा प्रत्यक्ष हेतू साध्य झालां असताहि दक्षिण मार्ग सोडून काही लोक वाममार्गाकडे झुकले. स्पष्टोक्ति अतिशयोक्तीच्या थराला गेली. सुकृताची विकृति झाली. स्वार्थ निरपेक्ष रजो-गुण स्वार्थी तामस गुणात शिरला. आणि कोणीहि सुज्ञ मनुष्य होऊ नयेत म्हणेल अशा गोष्टी पुढे पुढे काही घडून आल्या यात शंका नाही. पण फाळणीच्या चळवळीच्या मध्यभागी बंगाली लोकानी दाखविलेली संघशक्ति व देश-भक्ति ही अगदी वाखाणण्यासारखी होती यात शंका नाही.

या चळवळीला सरकारने पदोपदी अडथळा केला पण काही कालपर्यंत तो अडथळा त्या चळवळीच्या प्रगतीलाच कारणीभूत झाला. दोन्ही शक्तींचे सामने सुरू होते. यात काही कालपर्यंत जनताच यशस्वी झाली यात शंका नाही. प्रति-बंधाला प्रथम सरकारने आपल्या हाती असलेल्या लोकापासून प्रारंभ केला. चळव-ळीत पडण्याची हिंदी अधिकार्‍यांची छाती नव्हतीच. पण त्यांच्यावर करडा अमल चालविण्याच्या हुकमामुळेच कित्येक लोकानी नोकर्‍यांची परवा न करिता चळवळीला आतून मदत केली. राजे महाराजे जमीनदार हे चळवळीच्या तीव्र स्वरूपात सामील झाले नाहीत पण त्यानी आपली अप्रीति व आपला रुसवा सरकाराला अनेक प्रकारानी दर्शविला. विद्यार्थी हे शाळाखाते व युनिव्हर्सिटीच्या ताब्यात. आणि ते खाते

व युनिव्हर्सिटी सरकारच्या ताब्यात. म्हणून स्वदेशी चळवळीत विद्यार्थ्यांनी पडू नये अशी सर्क्युलरे निघाली. पण त्याना मान्यतेपेक्षा अमान्यताच अधिक लाभली. रोज नवे सर्क्यूलर निघावे व ते पायाखाली कसे तुडविले गेले हे लोकांच्या प्रत्ययाला यावे असे घडू लागले. शेवटी 'स्टेटस्मन' पत्रानेहि म्हटले की 'लेफ्ट-नंट गव्हर्नर हे विद्याखात्यातील कोणत्या वेड्या पिराच्या नादी लागले आहेत हे कळेल तर बरे होईल! मुलाना पोरकट म्हटले तर ती शिवी होऊ शकत नाही. पण सरकार पोरकट झाले म्हणजे सर्वच संपले!'

'वंदे मातरम्' पद्याने तोच गोंधळ केला. बंकीमचंद्राच्या 'आनंद-मठ' नामक एका कादंबरीत एका प्रसंगात गोवलें गेलेले हे पद्य सहज पुढे आले पण दैवयोगाने त्याने सगळे जग जिंकण्याचा पराक्रम केला. या पद्यासारखी किंवा त्याच्याहून अधिक चांगली पद्ये बंगालीत किंवा इतर भाषेतहि आढळतील. पण सरकारच्या द्वेषाने व लोकांच्या हट्टाने या पद्यातील प्रतिभेला राज्यपद मिळवून दिले. 'वंदे मातरम्' हे पद गाणे हा गुन्हा ठरला. त्याबरोबर तो गुन्हा हौसेने करणारे लोक निघाले तेव्हा विचराची ही गुन्हेगारीची नांगी दगडावर घासल्याप्रमाणे फुकट गेली. अनुयोगी प्रतियोगी संबंधाने जे एकाला देशभक्तीचे पद तीच दुसऱ्याला शिवीशी वाटू लागली. हें पद कोणी गायले म्हणजे अधिकारी लोक त्याच्या मंजुळ सुस्वरानी आल्हादित होण्याऐवजी कोणी शिसे तापवून आपल्या कानात ओतले की काय असे त्याना वाटे. 'वंदे मातरम्' ही अक्षरे कोठे लिहिलेली दिसली व उमगली की सैतानाने किंवा तांत्रिकाने रक्ताने रंगवलेल्या मंत्रचक्राप्रमाणे ती भयप्रद वाटून अधिकारी लोक बुजत घाबरत भीत व बेफाम होत. शब्दाच्या आवाजाने कित्येक वेळा अनुरूप अर्थ सहज सुचविला जातो. पण केवळ तो ऐकणाराच्या भावनेनेच. 'सुरेंद्रनाथ' हे शब्द उच्चारले म्हणजे त्यातून 'Surrender not' असा धीर वृत्तीचा उपदेश निघतो हे जसे त्यांच्या अंधभक्ताने मानावे त्याप्रमाणे हिंदी भाषा अर्धवट कळणाऱ्या इंग्रजाला 'वंदेमातरम्' या शब्दातून 'बांधो मारो' अशा अर्थाचा ध्वनि निघालासा वाटल्यास काय नवल! आपल्या प्रतिभेच्या अपत्याचे हे विलक्षण भाग्य पहाण्याला बंकीमचंद्र जिवंत नव्हता. पण कित्येक वेळा एखादे पोरके अर्भक उचलून सिंहासनावर बसविण्याची लीला दैवाला आवडते त्याप्रमाणे आनंदमठातील ओसाड अरण्यातून हिंडणाऱ्या चोरट्यानी गाण्याकरिता लिहिलेले हे पद राष्ट्रगीत होऊन बसले. आणि तो मान त्याला बंगाल्यात मिळाला एवढेच नव्हे तर इतर प्रांतातील लोकानीहि तो त्याला दिला. विश्वबंधुत्व पुढे केव्हा अवतरेल ते अवतरो पण या चळवळी पुरते तरी निरनिराळ्या प्रांतातील हिंदी समाजात बंधुत्व अवतरले होते यात शंका नाही!

फाळणीचा हुकूम प्रसिद्ध झाला पण त्याचा प्रत्यक्ष अंमल होण्याचा दिवस १६ आक्टोबर १९०५ हा ठरला होता. अर्थात् त्या दिवशी बंगाली लोकानी आपल्या प्रतिकाराचे लोकोत्तर प्रदर्शन करावे असे ठरविले. सार्वजनिक स्वरूपाचे

कार्यक्रम दोन व्हावयाचे होते. पहिला रक्षाबंधन व दुसरा नदीस्नान व उपोषण. दोन्ही कार्यक्रम मोठ्या समारंभाने पार पडले. पण बंगाली राष्ट्र अभंग राहू इच्छिते याचे दर्शक म्हणून एक मोठी इमारत बांधण्याचेहि ठरले. तिच्या पायाचा दगड याच दिवशी बसविण्यात आला. रक्षाबंधन किंवा राखीबंधन हा आपल्या इकडचाच एक जुना संस्कार आहे. बहिणीने भावाच्या हातात भावाने भावाच्या हातात मित्राने मित्राच्या हातात एक रंगीत रेशमी सूत्र बांधावयाचे व बाहेरच्या या बंधनाने मने व अंतःकरणे बांधली गेली असे समजावयाचे व त्याप्रमाणे वागावयाचे असा या संस्काराचा गुप्त अर्थ होता. राखीचा रंग तांबडा आणि या राखी बंधनाने इंग्रज चिडून गेले. तेव्हा 'Red rag to a bull' (Johu Bull) ही म्हण यथार्थ ठरली. कोणाच्या हातावर किती राखी बांधल्या गेल्या त्यावरून त्याचे महत्त्व त्या दिवशी दिसून आले. आणि कित्येक पुढाऱ्याना बांधलेल्या रक्षासूत्रानी त्यांचे दंड बेंदुराच्या मिरवणुकीतील बैलाच्या शिंगासारखे दिसू लागले. दंगे होऊ नयेत या सबबीवर पोलीस व अधिकारी ठिकठिकाणी उभे राहिले पण दंगे होण्याचा संभवच नव्हता. म्हणून त्यांचे नेहमीचे जबाबदारीचे व जोखमीचे काम टळले व कंबरेवर हात टेवून एखाद्या जत्रेतील देखावे पाहिल्याचे श्रेय त्याना लाभले. पण येवढ्याने काय होणार! बंगाल हां फाळला तरी अभंग राहणार या भावनेचे द्योतक म्हणून कलकत्त्यात एक मोठी इमारत बांधावी असे ठरले होते व तोहि समारंभ याच दिवशी करण्यात आला. पाया घातला त्या इमारतीचे नाव Federation Hall असे ठेवावयाचे होते. त्याचे भाषांतर 'अभेदानंद मठ' असेहि करिता येईल. कारण या इमारतीच्या कल्पनेत व्यावहारिक उपयोगापेक्षा वैराग्य भावनेची छटाच अधिक प्रतीत व्हावी असा उद्देश होता व सुदैवाने पायाचा दगड घालण्यालाहि मनुष्य भाविक श्रद्धाळू व वैराग्य वृत्तीचा असाच मिळाला. आनंद मोहन बोस यांची गणना बंगाल्यातील अत्यंत प्रेमळ व निःस्वार्थी पुढाऱ्यात करिता येईल. त्यांचे वक्तृत्व फार मोहक. पण त्याहिपेक्षा त्यांचा स्वभाव अधिक मोहक असे. या चळवळीच्या सुमाराला ते मृत्युशय्येवर पडले होते पण या राष्ट्रीय कार्याकरिता मुद्दाम त्याना निमंत्रण केले व त्यानी ते आनंदाने स्वीकारले. पायाचा दगड घालताना अभंग बंगालचा जाहीरनामा वाचून दाखविण्यात आला व हा समारंभ समाप्त झाल्यावर परिचारकानी आनंद मोहन बोस याना हातात धरून घरी पोचविले. ही मोठी सभा संपल्यावर रायपशुपती बोस यांच्या घराकडे प्रमुख मंडळी गेली व त्यानी या चळवळीकरिता एक मोठा द्रव्यनिधी जमविण्याचे ठरविले. येथून पुढे डंके नौबती थांबून प्रत्यक्ष युद्धाला सुरवात झाली.

बंगाल्यात वंगभंगाची चळवळ सुरू होण्याला आणि लार्ड कर्झन यांचा एका सरकारी कारवाईच्या युद्धात पराभव होऊन त्याना राजीनामा द्यावा लागण्याला एकच गाठ पडली. या दोहोंचा प्रत्यक्ष संबंध काहीच नव्हता. तो केवळ काकतालीय न्याय. पण त्या राजीनाम्याचा उपयोग चळवळीला झाल्यावाचून

राहिला नाही. बंगालचे गुन्हेगार लॉर्ड कर्झन याना ईश्वराने शासन केले. शहा-ण्याला शब्दाचा मार. मनस्वी मनुष्याला अपमान हीच मोठी शिक्षा. लॉर्ड कर्झन याना बडतर्फ केले नव्हते हे खरे. पण शेराला जगात सव्वा शेर म्हणून एक आहे असे कबूल करावे लागले हीच त्याला शिक्षा. कारण सव्वाशेर भेटेपर्यंत शेर हा दिमाख मिरवीत असतो की मीच काय तो सर्व श्रेष्ठ. माझ्या मापाने सर्व जग मोजले जावे. गर्वाचे घर शेवटी केव्हा तरी खाली होणारच. लॉर्ड कर्झन हे बादशहाचे प्रतिनिधि आणि हे प्रतिनिधित्व गाजविताना त्यांच्या मनात त्यांच्या अंगात बादशाहीचे भूत संचारले असे वाटण्यासारखे थेर त्यानी हिंदु-स्थानात केले. हिंदी लोकावर आपली सत्ता मिरविण्याची काही बाकी त्यानी ठेवली नव्हती. त्यांचा थाट त्यांचा दिमाख त्याचे वक्तृत्व फार काय पण अहंभावाने ताठ झालेली त्यांची मान ही नुसती ज्यानी पाहिली असेल त्यानाहि हा कोणी जुन्या रावणाचा किंवा हिरण्यकश्यपूचा अवतार या भरतखंडात विसाव्या शतकात अवतरला असे वाटले असते. रावण हा राक्षस असला तरी त्याने पूर्व-काळी पुण्यसंचय केलेला होता. आपले नित्यकर्म नीट करणारा होता आणि किर-कोळ गोष्टीत त्याच्या अंगी नाजूक भावना प्रगट होऊ शकत. तथापि सीता-हरणाचा गुन्हा केल्याबद्दल त्याला देहान्त प्रायश्चित्त भोगावे लागलेच. शिवाय हा नैतिक गुन्हा सोडून दिला तरी देवाना पालख्ये घालण्याचा त्याचा अपराध या शिक्षेला पुरेसा होताच. हिरण्यकश्यपूहि इतर रीतीने फार चांगला होता म्हणतात. पण मुलाशी वाद करिताना एकदा ईश्वर म्हणून कोणी नाही अशी जी बाजू त्याने घेतली ती त्याच्या नावाने त्याच्या प्रतीकाला लाथ मारीपर्यंत नेऊन भिडविली. तेव्हा ईश्वरानेहि त्याची आतडी बाहेर काढून जगाला दाखविली. लॉर्ड कर्झन यानी लोकमताला कस्पटाप्रमाणे लेखले पण त्याना प्रत्यक्ष कोण कशी शिक्षा करणार? तथापि आपला हेका चालविण्याचे जे धोरण हिंदुस्थानातील जनता व गोरे अधिकारी यांच्याशी ठेविले तेंच विलायतेतील आपल्या वरिष्ठाशी ठेवण्याचा हट्ट त्यानी केला तेव्हा त्यांच्या सामर्थ्याची खरी कसोटी लागली. स्टेट सेक्रेटरी मिस्टर ब्रॉडरिक हे कर्झनसाहेबांच्या मानाने क्षुद्र. पण वरिष्ठ अधिकार तो वरिष्ठ अधिकार. आणि खऱ्या वरिष्ठ अधिकाराची जातच अशी असते की त्याला कोणी पायाचा स्पर्श केल्यावर तो भाजल्याशिवाय राहात नाही. ब्रॉडरिक हे स्वतः जरी कमकुवत होते तरी त्यानी ज्याचा पक्ष उचलून धरला ते लॉर्ड किचनर सारखे बलाढ्य सेनापति होते. आणि हा लष्करी मोहरा गमवावा किंवा कर्झनशहास गमवावे असा प्रश्न विलायतच्या प्रधानमंडळापुढे येताच साम्रा-ज्यात खरा मान तरवारीला की लेखणीला याचा निर्णय झाला. लॉर्ड कर्झन यांची मामुली पाच वर्षांची कारकीर्द संपली होती. आणि ते व्हाइसरायाची जागा सोडून गेले म्हणून उपाशी मरणार नव्हते. पण माझे चालत नाही म्हणून मी राजीनामा देतो ही गोष्ट त्याला आपल्या तोंडाने कबूल करावी लागणे याहून

त्यांचा अधिक अपमान किंवा त्याना अधिक शिक्षा कोणती असणार? दरबारच्या वेळी स्वतः बादशहांचे प्रतिनिधि म्हणून प्रत्यक्ष बादशहाच्या चुलत्याला व व्हिक्टोरिया महाराणीच्या मुलाला खालची खुर्ची देऊन व वरची आपण घेऊन अखिल हिंदुस्थानातील राजेरजवाड्यांची सलामी नजराणा ज्यानी आपल्या पायावर वाहून घेतला त्याना 'माझे वर कोणी ऐकत नाही' अशी कबुली राजीनाम्याने द्यावी लागली तेच खरे देहान्त शासन. अति तेथे माती व्हावयाचीच. आणि बंगाल्यातच काय पण हिंदुस्थानातहि परत जाताना त्यांची आरती ओवाळण्याला एकहि उमराव मिळाला नाही. हीच दैवाची लीला! पण ज्याचा अपमान प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष लॉर्ड कर्झन यानी आपल्या दर्पाने केला नाही असा एकहि मोठा मनुष्य त्यानी शिल्लक ठेवला नव्हता!

लॉर्ड कर्झन यांचा पाडाव झाल्यावर त्याना जर कोणी नावे न ठेवील तर तो पापी अशी स्थिति झाली होती. पण ते हिंदुस्थानात प्रथम आले तेव्हा विलायतेतल्या त्यांच्या कीर्तीने दिपून गेलेले हिंदुस्थानातील मुत्सद्दी यानी प्रथम त्यांची स्तुतीच केली. व हे स्वराज्य न देवोत पण सुराज्य तरी सोळा आणे स्थापतील आणि राज्यकारभारातल्या सुधारणा तरी बऱ्याच करतील असे त्याना वाटत होते. आणि त्याना तसे का न वाटावे? कारण विलायतेहून निघण्यापूर्वी आपल्या भावी कर्तृत्वाचा चित्रपट त्यानी रंगवून प्रसिद्ध केला होता. पण इतर कित्येकाप्रमाणे टिळकानी कर्झनसाहेबांची पत्रिका प्रथमच वर्तविली होती. सन १८९८ व १८९९ या दोन सालात केसरीने वेळोवेळी त्यांचे भविष्य वर्तविले होते. "इंग्रजांची साम्राज्यसत्ता हिंदी द्रव्याने व रक्ताने वाढविण्याकरिताच हे येत आहेत. त्यांच्या हृदयात दमदमणाऱ्या महत्त्वाकांक्षेच्या नगाऱ्यापुढे हिंदी प्रजेच्या गाऱ्हाण्याची टिमकी कोणाला ऐकू जाणार नाही. त्यांची कारकीर्द सुखशांतीची किंवा अभिवृद्धिची होणार नाही. हे बोलाचाच भात शिजवितील आणि बोलाचीच कढी बनवितील. कोणत्याहि गोष्टीत बरेवाईटपणाची जबाबदारी जणू काय सर्व आपल्याच डोक्यावर आहे अशा रीतीने आपलाच हट्ट अखेरपर्यंत खरा करण्याची मात्र धडाडी दाखवितील. ते करते लाट न झाले तरी बोलके लाट खास होतील आणि त्यानी प्रगट केलेल्या सदिच्छा निष्फळ होतील." असे भविष्य केसरीने वेळोवेळी वर्तविले होते. लॉर्ड कर्झन यानीहि काही गोष्टी चांगल्या अशा केल्या. आर्थिक बाबतीत त्यानी चेंबरलेनसाहेबांच्या साम्राज्यपक्षपाती जकातीच्या धोरणाला विरोध केला. हिंदुस्थानची गंगाजळी विलायतेत न ठेवता ती हिंदुस्थानातच रहावी असे मत दिले. सामान्य न्यायदानाच्या कामात वर्णभेद लक्षात आणू नये या तत्त्वाचा पुरस्कार केला. आणि इकडच्या गोऱ्या अधिकाऱ्याना आम्ही करू ते होईल असा गर्व झाला होता तो मोडून काढला. विशेषतः भरतखंडातील जुन्या पुराण्या इमारतींचे संरक्षण व्हावे त्याची अधिक पडझड होऊ नये असा कायदा केला. या सर्व गोष्टी आपापल्या परीने चांगल्याच होत. तथापि लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत सरकारी सत्ता

इतकी एकतंत्री झाली की जणूकाय अखिल हिंदुस्थानातील चावडया व कचेऱ्या यांची सूत्रे हिमालयावर सिमल्यास व्हाइसराय साहेबांच्या टेबलाच्या खुंटीला गाठिवली गेली! यामुळे दुःखे जागच्याजागी राहिली आणि त्यांची दाद मात्र दूरावली असे झाले. "हिमवति दिव्यौषधयः शीर्षे सर्पः समाविष्टः" हे वचन प्रत्ययाला येऊ लागले. यामुळे स्थूल दृष्टीने पाहण्याला लॉर्ड कर्झन हे जुन्या औरंगजेबासारखे वाटले. हिंदी जनतेला पाडाव व घायाळ करून नंतरच त्यानी जी काय सेवा केली ती तिच्या तोंडात चमच्याने कांजी घालण्यासारखी व जखमेवरील माशा कचित वारण्यासारखी शुश्रुषा केली. तात्पर्य अशा अरेरावाचा अशा रीतीने मोड झालेला पहावयास मिळाला हा वंग-भंगाची चळवळ करणाराला शुभशकूनच वाटला असल्यास नवल नाही.

ऑगस्ट महिन्याच्या प्रारंभापासून टिळकानी केसरीत तेजस्वी लेख लिहि-ण्याला सुरवात केली आणि अशा लेखांची परंपरा त्यानी कशी अखंड चालविली हे पाहिले म्हणजे ते कोणतीहि चळवळ कशी नमुनेदार करीत हे दिसून येते. कल-कत्त्याच्या पहिल्या मोठ्या सभेत बहिष्काराचा ठराव गर्जून मंजूर झाला तो केवळ शब्दापुरता पाहिला तर विलायती किंवा परदेशी वस्तूपुरता होता. पण त्याच्या मुळाशी जी प्रतिकारबुद्धि होती तिचे समाधान या एकेरी बहिष्काराच्या रूपाने विनटून होण्यासारखे नव्हते. बंगालचे लोक फारच पोषाखी बनले होते. नखशिखांत विलायती कापडाचे उंची पोषाक वापरणे ही गोष्ट अतिरेकाला गेली होती. आणि या बहिष्काराच्या ठरावाने बंगाली लोकानी विलायती कपडा तर टाकलाच पण त्या बरोबरच विलायती पद्धतीचा पेहरावहि टाकला. कापड स्वदेशी पण ते विलायती पद्धतीच्या पोषाखाला शोभेल असे व पुरेल इतके मिळणे कठीण आहे ही गोष्ट तर झालीच. पण विलायती पद्धतीच्या पेहरावात म्हणजे बूट पाटलोण नेकटाय या पेह-रावात आपण यापुढे वागू तर पदोपदी आपले अनुकरण म्हणजे परावलंबित्व क्षणो-क्षणी जाचूं लागेल. कापड देशी की विदेशी हे डोळ्याना चटकन उमगत नाही. पण पोषाखाचा विलायती थाट डोळ्याला सहजच उमगतो. आणि आपलेच मन आपल्याला बोचू लागते. यामुळे विदेशी पेहरावाची पद्धतच टाकली पाहिजे हे तत्व बंगाली लोकाना पटले. यामुळे त्यानी बूट पाटलोण नेकटाय कॉलर ही टाकून दिली. आणि एक पंचावजा धोतर एक सदरा व एक उपरणे किंवा शाल एवढ्या-वर ते पोषाखाचे काम भागवू लागले. शिरोभूषणाची अडचण नव्हतीच. कारण मद्रासप्रमाणे बंगाल्यातहि उघड्या डोक्याने वावरणे हे सभ्यपणाचे लक्षण पूर्वीपासून मानले गेले होते. आणि शोभाच पाहिजे तर डोक्यावरील केशकलापाची निसर्गसिद्ध असतेच! बंगाली लोकानी हा जो नवा पोषाख पेहराव त्या चळवळीत एकदा पत्करला तो आजवर कायम ठेवला आहे. कोणतीहि क्रांति अशी निमित्तानेच होत असते. महा-राष्ट्राने या चळवळीत आपल्या पोषाखाची पद्धत बदलली नाही. पण क्रांति करण्याचे महाराष्ट्राला फारसे कारणच नव्हते. साधा पोषाख व तोहि जाड्याभरड्या कापडाचा हीच महाराष्ट्राची पूर्वपरंपरा असल्यामुळे त्याला या बाजूची चळवळ मुळीच जड गेली नाही.

१९०६ या साली पंढरपूर येथे कार्तिकीच्या यात्रेच्या प्रसंगी एक मोठे स्वदेशी संमेलन व प्रदर्शन भरविण्यात आले. स्वदेशी चळवळ सुशिक्षित समाजात प्रसृत होतीच. पण अशिक्षित असा समाज पुष्कळ. शिवाय धार्मिक वृत्तीच्या लोकात कोणतीहि चळवळ एकदा शिरली म्हणजे ती दृढमूल होते या हेतूने टिळकानी पंढरपूर येथील पुढाऱ्यांच्या सहकारितेने धार्मिक यात्रेला या औद्योगिक यात्रेची जोड दिली होती. स्वदेशी हा विषय पक्षभेदरहित असावा या दृष्टीने नेमस्त व जहाल या दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्याना आमंत्रणे करण्यात आली होती. आणि ही दृष्टि यशस्वी ठरून टिळक नानासाहेब देशमुख चिंतामणराव वैद्य इत्यादि लोकांप्रमाणे नामदार गोखले रा. ब. अच्युत भास्कर देसाई इत्यादि मंडळी पंढरपुरास गेली होती. ही दुसरी मंडळी आणण्याचे श्रेय मुख्यतः डॉ. देशमुख यानाच होते. कारण राजकारणात अग्रमान ते टिळकाना देत तरी बाळासाहेब मिरजकर नामदार गोखले रा. ब. देसाई यांच्याशी त्यांचा अत्यंत स्नेह व आदरबुद्धि असे. मुंबईहून मनमोहनदास रामजी व कित्येक हायकोर्ट वकील तसेच प्रार्थनासमाजाचे सदाशिवराव केळकर साताऱ्चे दादासाहेब करंदीकर बडोद्याचे केशवराव देशपांडे अशा रीतीने शेपन्नास ठळक मंडळी या प्रसंगी पंढरपुरास आली होती. प्रदर्शनहि फार चांगले झाले. स्वागताध्यक्ष पंढरपूरचे वकील जोग हे असून प्रदर्शन उघडण्याचा मान श्रीमंत बाळासाहेब याना देण्यात आला होता. रात्री कोल्हापुरच्या मराठा मंडळीचे पोवाडे झाले. दुसरे दिवशी स्वदेशीसंबंधीची सभा होऊन त्यात निरनिराळ्या वक्त्यानी भाषणे केली. नामदार गोखले यानी प्रदर्शनाला भेट दिली. परंतु तेथील कोणत्याहि सभेत भाग घेतला नाही.

स्वदेशीची चळवळ बंगाल्यात सुरू झाली ती महाराष्ट्राने चांगलीच उचलून धरली. ती चळवळच सामान्यतः अशा स्वरूपाची होती की तिला सहसा कोणास नावे ठेवता येण्यासारखी नव्हती. नेमस्त लोक तिची मधून मधून थट्टा करीत. पण ती थट्टा या चळवळीच्या नावाखाली होणाऱ्या कित्येक आचरट प्रकारानाच लागू होण्यासारखी होती. चळवळीच्या आत्म्यावर तिचा काही परिणाम होण्यासारखा नव्हता. देशात स्वदेशी वस्तू कोणत्या किती होऊ शकतात याची माहिती नेमस्त व जहाल या सर्वांना सारखीच होती. परंतु दोघांच्या वर्तनात मुख्य फरक हा की आहे त्याच स्थितीत स्वदेशी मालाला उत्तेजन दिले तर मालाचे कारखाने अधिक निघू शकतील किंवा जे आधीच आहेत ते टिकून राहतील असे जहाल लोकाना वाटे. देशी कापड वापरल्याने राजकारणाला प्रत्यक्ष मदत काय होईल या विषयी दोघानाहि पुरे ज्ञान होते. कारण स्वदेशी कापड वापरण्यात ज्या प्रमाणाने आपल्या देशी गिरण्याना मदत मिळते त्याच प्रमाणाने विदेशी व्यापार हटतो. आणि असे होण्याने हे उलट सुलट दोन्ही प्रकारचे बळच राष्ट्राला मिळते ही गोष्ट उभयताना सारखीच मान्य होती. पण स्वदेशीची चळवळ म्हणजे त्यात बहिष्कार येतो. बहिष्कार म्हटला म्हणजे विलायतचे लोक रागावणार! व ते रागावले म्हणजे राजकारणात

आपणाला मदत करणार नाहीत अशा विचारपरंपरेने नेमस्त लोक स्वदेशीचे नाव काढीत नसत. उलट टिळकानी ह्या संधीचा फायदा घेऊन स्वदेशी चळवळीचा जितक्या निरनिराळ्या रीतीनी उपयोग करून घेता येण्यासारखा होता तितका करून घेतला. राष्ट्रीय वृत्ति उत्पन्न करणे हे मुख्य काम त्यानी केले. व ती निरनिराळ्या वर्गामध्ये निरनिराळ्या मार्गांनीच उत्पन्न होऊ शकते म्हणून विद्यार्थ्यांच्या परीने त्याना उत्साह येईल असे बोलावयाचे लिहावयाचे, धर्मदृष्टया स्वदेशी चळवळीचा उपयोग आहे हे परदेशी साखरेचे उदाहरण घेऊन दाखवावयाचे, व्यापाऱ्यांच्या धंद्याच्या दृष्टीने व्यापाऱ्याना व विणकर वगैरे कामगार लोकाना उपजीविकेचे साधन म्हणून स्वदेशी चळवळीचा उपयोग सांगावयाचा, आणि बहिष्काराची भीति दाखवून इंग्रज लोकांच्या मनावर परिणाम करावयाचा. अशा अनेक रीतीनी हा फायदा त्याना घेता आला. आणि या वेळचा केसरी चाळून पाहणारास असे दिसून येईल की टिळकांच्या या स्फूर्तिदायक धोरणामुळे निदान महाराष्ट्रात तरी असे गाव उरले नव्हते की जेथे एखादी स्वदेशीची सभा झाली नाही, जेथे एखादे लहानसे स्वदेशीचे नवे दुकान निघाले नाही, किंवा परदेशी कापड न वापरण्याची शपथ काही थोड्या लोकानी तरी घेतली नाही. स्वदेशीच्या माहितीसंबंधाने रकानेच्या रकाने भरले जात. कोठे कोणी एखादा उपयुक्त युक्तिवाद केला तर तो उधृत केला जाई. परदेशी कापडाची होळी एखादे ठिकाणी झाली तर तिचीहि हकीकत चित्ताकर्षक रीतीने दिली जाई. जुन्या धर्मविचाराचे किंवा श्रीमंतीमुळे अशा चळवळीत सहसा न पडणारे कोणी लोक चळवळीत पडल्याचे लिहून येताच त्यांच्या नावाना प्रमुखपणा देऊन निर्देश केला जाई.

अशा रीतीने ते सर्वांचा परामर्ष घेत. हरिदास पुराणिक यांच्या द्वाराने स्वदेशीचा उपदेश करण्याचे यशस्वी मार्ग अनुसरणारे अनेक लोक या वेळी निघाले. त्यांच्या कथापुराणांचा उल्लेख केसरीत येई. आपल्या जुन्या ग्रंथातून कलाकौशल्य भौतिक शास्त्र व इतर लोकोपयोगी विद्या यांचा जो उल्लेख आहे त्याचा शोध करून त्याची माहिती कोणी पाठविल्यास ती केसरीत प्रसिद्ध केली जाई. आणि या सर्वांचा उपयोग असा होई की विद्या व कला या गोष्टी आपल्या देशात अगदीच माहित नव्हत्या असे नाही फक्त त्या पुन्हा नव्या बुद्धीने जागृत करिता येतील असे असता आपले परावलंबन उगीच वाढते असे लोकाना वाटे. स्त्रियानी सभा केल्या तर त्यांचा उल्लेख गौरवयुक्त होई. टिळकांच्या घरी त्यांच्या सगळ्या आयुष्यात स्त्रियांची अशी सभा झाली असली तर ती स्वदेशीची. त्यांच्या कुटुंबाने स्त्रियांची सभा पाहिली किंवा एखाद्या सभेत त्यानी भाग घेतला असेल तर तो त्यांच्या घरी भरलेल्या या स्वदेशीच्या सभेत. पण टिळक नुसते लेख लिहून किंवा नुसता उपदेश करून थांबले नाहीत. त्यांच्या मनाने हे पक्के घेतले होते की उद्योगधंद्याच्या बाबतीत पुण्यासारख्या शहराने कितीहि करून काहीहि व्हावयाचे नाही. ही गोष्ट मुंबईच करू जाणे. म्हणून १९०६ सालच्या मे महिन्यात त्यानी मोठ्या प्रयत्नाने स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स नांवाची लिमिटेड कंपनी काढविली. स्वतः टिळक हे मुंबईच्या व्यापारी लोकाना

ऐकून माहित होतेच. त्यातून श्रीमंत बाळासाहेब नातू यांची मुंबईच्या काही गिरणी-वाल्यांची चांगली ओळख होती. यामुळे त्याना मदतीला घेऊन टिळकानी अनेक गिरणीवाल्यांकडे खेपा घातल्या आणि २॥ लाख रुपये भांडवलाची कंपनी स्थापिली. या कंपनीचे उद्देशपत्रक तारीख २२ मेच्या केसरीच्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. त्यात कंपनीच्या पहिल्या डायरेक्टरांची नावे खालीलप्रमाणे आढळतात. (१) रतन जमशेट टाटा (२) बाळासाहेब नातू (३) गोवर्धनदास खटाव मकनजी (४) द्वारकादास धरमसी (५) बाळ गंगाधर टिळक (६) मनमोहनदास रामजी व सेक्रेटरी लल्लुभाई खांडवाला हे होते. कंपनीची कचेरी ओरिएंटल बिल्डिंगमध्ये ठेवण्यात आली होती. ही कंपनी काढण्याचा मुख्य हेतू असा होता की "देशी वस्तु घेण्याची प्रवृत्ति लोकात वाढत आहे. स्वदेशी वस्तू अधिक तयार होऊ लागल्या आहेत. गिरण्यातून देशी मालाची पैदास होत आहे. परंतु असा माल कोठे किती खात्रीचा तयार होतो याची माहिती कोणास मिळत नाही. माल मिळतो तो विदेशी का स्वदेशी अशी खात्री नसते. नक्की किंमत कळत नाही. म्हणून ही कंपनी काढण्यात आली आहे. बाहेरगावी स्वदेशीची दुकाने किंवा कंपन्या निघाल्या तर त्याना मुंबईतून या कंपन्याकडून स्वदेशी माल पुरविण्यात येईल. आणि डायरेक्टर लोकात गिरणीवाले असल्यामुळे कापड वगैरे सवलतीने मिळेल आणि ते नियमित नफा घेऊन गिऱ्हाइकाला विकता येईल." कंपनीचा शेअर १०० रुपयांचा ठेवण्यात आला होता. तो मध्यम प्रतीच्या लोकाना सोईवार पडावा म्हणून ठेविला होता. ही कंपनी आज २१ वर्षे सतत चालू असून मुंबई बाहेर तिच्या शाखाहि निघाल्या आहेत. डायरेक्टर बोर्डापैकी शेट मन-मोहनदास रामजी यानीच काय ते या संस्थेविषयी खरे काम केले आणि अजूनहि त्यांची देखरेख त्याजवर असते. मुंबई व पुणे येथील दुकाने ही टिळ-कांच्या स्वदेशी चळवळीच्या विधायक कार्यक्रमाची फले होत. वास्तविक नेम-स्ताना मनातून स्वदेशी प्रिय होती तर या चळवळीत भाग घेण्याला हरकत नव्हती. पण या नव्या राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्याची स्फूर्तिच त्यांच्या मनात नव्हती त्याला ते काय करणार!

बंगाल्यात प्रतिक्रियेची स्फूर्ति इतर कारणानीहि साचत आली होती. सुरेंद्रनाथ बानर्जी आपल्या पुस्तकात लिहितात—"आपले वाडवडील पहिल्याने इंग्रजी शिकले त्याबरोबर इंग्रजाशिवाय दुसरे काही चांगले दिसेनासे झाले. पश्चिमेकडील सुधारणा व संस्कृति ही सर्वतोपरी चांगली असे त्यानी ठरविले. नाविन्य व चमत्कृति यानी त्याना भुरळ घातली. व्यक्तिस्वातंत्र्य त्यानी शिखरावर नेऊन बसविले. जुनी चाल सुटली व सदसद्विवेकबुद्धीच्या नावावर नव्या गोष्टी जोराने सुरू झाल्या. जुने लोक हे पाहून गांगरून गेले. नव्यानी जुन्याबद्दल कितीसा आदर ठेविला होता याबद्दल एकच गोष्ट सांगतो! कृष्ण मोहन बानर्जी हे ख्रिस्ती कळपात शिरले होते. ते विद्वान् होते. पण त्यानी रोज अभक्ष्यभक्षण करून आपले उच्छिष्ट मुद्दाम शेजारच्या ब्राह्मणा-

च्या घरात टाकावे! इंग्रजांचे सगळेच चांगले म्हणून त्यांचे मद्यपान हाहि एक गुणच ठरला. व जे इंग्रजांचे नव्हे त्याकडे सुशिक्षित लोक कावऱ्याबावऱ्या नजरेने पाहू लागले. अशा गोष्टीविरुद्ध प्रतिक्रिया झाल्याशिवाय राहणे शक्य नव्हते. प्रतिक्रिया आली ती डोंगरमाथ्यावरून सुटून आलेल्या दगडाप्रमाणे कोसळली. आणि आता क्षणभर असा प्रकार आहे की नवे तितके सगळे वाईट व जुने तितके सर्वच चांगले असे सुशिक्षित लोक बोलू लागले आहेत. ही प्रवृत्ती चिरकाल टिकणार नाही ही गोष्ट खरी. पण प्रतिक्रिया आज जोराची आहे ही गोष्टहि काही खोटी नाही. सरकारने आपल्या विश्वासघाताने या प्रवृत्तीला साह्यच केले आहे. लोकानी तरी एका मागून एक विश्वासभंग किती सहन करावे? मी तर म्हणतो की बारिसालची सभा उधळली त्या दिवशी जहाल पक्षाचा जन्म झाला." पण या म्हणण्यात फारसा अर्थ नाही. प्रत्येक मनुष्य आपल्या आवडीप्रमाणे कोणते युग कोणते दिवशी अवतरले याची एक कल्पना आपल्या मनाशी ठरवून ठेवीत असतो. पण त्याचा अर्थ इतकाच असतो की ते युग त्याच्या पुरते त्या दिवशी अवतरले. स्वदेशी चळवळीबद्दल सुरेंद्रबाबूनी एके ठिकाणी असे लिहिले आहे की स्वदेशी 'चळवळीत बंगाल्यात स्वदेशीच्या ज्या पहिल्या सभा झाल्या तोच काय तो देशातल्या खऱ्या चळवळीचा ठेवा.' पण स्वदेशी चळवळ बंगालच्या आधी महाराष्ट्रात जन्माला आली होती या गोष्टीची त्याना माहिती नव्हती. पण ही काही वादाची बाब नव्हे. कारण एवढा सूर्य प्रचंड व सर्व जगाला प्रकाश देणारा असतो तरी हिंदुस्थानातल्या एका टोकाला उगवल्यानंतर दुसऱ्या टोकाला उगवण्याला त्याला सुमारे तासभर लागतोच. हीच गोष्ट नव्या कल्पनेची व कल्पनेने बनलेल्या नव्या युगाचीहि होती.

बहिष्काराच्या भयंकर कल्पनेने विलायतेतील लोक भिऊन जाऊ नयेत म्हणून बंगाली लोकानी आपल्याकडून नेमस्त पुढारी बहिष्काराचे समर्थन करण्याला पुढे घातले. त्यात 'इंडियन मिरर' पत्राचे संपादक बाबू नरेंद्रनाथ सेन हे होते. पण त्यानी बहिष्काराचे समर्थन इतके संभाळून चालविले की विलायतेतील लोकाना न संभाळता त्यानी हिंदी लोकाना मात्र हातचे घालविले. व शेवटी इंडियन मिरर पत्राला राष्ट्रीय चळवळीच्या विरुद्ध लिहिण्याकरिता सरकारने पैशाची मदत देऊ केली ती सेन बाबूनी स्वीकारली. इंग्लिशमन पत्राने असा दुहेरी कोलदांडा घातला की बहिष्कार यशस्वी झाला तर चळवळीच्या वादात जातिद्वेष शिरेल व तो अयशस्वी झाला तर ती चळवळ सुरू करणारे लोक मूर्ख ठरतील. पण चळवळ एकदा सुरू केल्यावर या कोलदांड्याला कोणी भीक घातली नाही. नरेंद्रनाथ सेन यांच्यासारख्यांच्या हातून निघून ती अधिक तापट लोकांच्या हाती आली. सुरेंद्रनाथ बानर्जीसारखे लोक तिला चिकटून राहिले म्हणूनच बचावले. पण या चळवळीचे खरे यश जिच्या हाती ती चळवळ गेली त्या तरुण पुढारी मंडळीसच द्यावे लागेल.

विद्यार्थ्यांनी घरातल्या वस्तूपासून जाहीर सभापर्यंत परदेशी वस्तूवरील बहिष्काराची करडी नजर एकसारखी ठेवली होती. घरी एकमेकांच्या अंगावरचे विदेशी कपडे

ओढून घेऊन ते फाडीत व जाळीत. शाळेत एक्झरसाईज बुके परदेशी कागदाची आली की ती त्यानी भिरकावलीच. शाळेत एकमेकांच्या पोषाखाकडे प्रत्येकाची बारीक नजर असे. जाहीर सभामध्ये चुकून परदेशी कापडाचे निशाण आले ह्मणजे तेहि त्यानी काढून फेकून दिलेच. परदेशी कपडे अगर परदेशी पद्धतीचे कपडे घालून फिरण्याची सामान्य माणसाची छाती नव्हती. आणि बंगाली लोकांचे जुने काळे डगले व पाटलोनी याना जी रजा मिळाली ती कायमचीच ठरली. सर्व हिंदुस्थानात सुशिक्षित पुढारी म्हणून बंगाली लोक मिरवीत होते पण त्याजबरोबर ते पोषाख व चालीरीती यानी अतिशय विदेशी बनले होते. या अंतर्बाह्य विदेशी ठेवणीमुळे त्याना सरकारने तर साहेब मानलेच नाही पण लोकानी मात्र त्याना गावठी साहेब ठरविले व हे आपले नव्हत अशी त्यांच्याशी वागणूक सहजच ठरली. पण या स्वदेशी चळवळीने सर्व गाडे उलटे पालटे झाले. मागणीइतका स्वदेशी मालाचा पुरवठा एकदम होऊ शकला नाही व कापडाच्या बाबतीत तर मुंबईच्या गिरणीवाल्यानी बंगालच्या लोकाना चांगलाच धक्का दिला. तो असा की ते तो अजून स्मरतात! पण स्वदेशीविषयी जी भावना त्यांच्यामध्ये उत्पन्न झाली ती अजूनहि टिकून राहिली आहे असे मानण्यास हरकत नाही. सुरेंद्रनाथ बानर्जी लिहितात की 'माझ्या पाच वर्षाच्या नातीला कोणी परदेशी चामड्याचा बूट दिला तो तिने फेकून दिला.' त्यानी एका मोठ्या डाक्टराची आठवण अशी लिहिली आहे की एका सहा वर्षाच्या मुलीने तिला दिलेले विदेशी औषध अर्धवट शुद्धीत असता स्वदेशी नाही म्हणून फेकून दिले. या दोन गोष्टीवरून दिसून येणारी स्थिति अगदी अक्षरशः खालपासून वरपर्यंत अशीच होती असे कोणी अर्थातच समजत नाही. पण एकंदरीने स्वदेशीची भावना किती जागृत झाली होती एवढी गोष्ट यावरून निर्विवाद सिद्ध होते. कलकत्ता कॉंग्रेसच्या वेळी १८९६ साली बॅरिस्टर चौधरी यानी स्वदेशीचे एक प्रदर्शन कलकत्त्यास भरविले होते व १९०६ साली फिरून कॉंग्रेसच्या जोडीने कलकत्त्यास स्वदेशीचे प्रदर्शन भरले ते पूर्वीहून फार मोठे होते. बंगाल्यात काही नव्या गिरण्या हातमागाचे कारखाने काड्यांचे कारखाने बँका विमाकंपन्या या सुमारास स्थापन झाल्या व विध्वंसक बहिष्काराबरोबर विधायक स्वदेशी कार्यहि सुरू झाले. वंग लक्ष्मी मिल नावाची गिरणी निघाली. तिचे १८ लक्षाचे भांडवल हा हा म्हणता जमले. बंगाल नॅशनल बॅंकेची स्थापना झाली. हिंदुस्थान कोआपरेटिव्ह विमा कंपनी याच वेळी निघाली.

## (१५) टिळक व स्वदेशी चळवळ

स्वदेशीच्या चळवळीत अनेक वाद उपवाद उत्पन्न झाले होते. पैकी डॉ. भालचंद्र यांच्याशी झालेला वाद विशेष मनोरंजक होता. प्लेगची लस टोचण्याच्या बाबतीत टिळक व डॉ. भालचंद्र यांचा वाद जसा कसून झाला तसाच हाहि झाला. परदेशी साखरेवर बहिष्कार घालणे हे स्वदेशी चळवळीचे एक अंग होते. आणि

स्वदेशी साखरेची स्तुति व परदेशी साखरेची निंदा करताना परदेशी साखरेत तिकडील कारखानदार काय मालमसाला घालतात तो धर्मदृष्ट्या किती वाईट असतो हे ठळकपणे दाखविणे ओघानेच आले. ते दाखविण्याकरिता म्हणून ता. १७ जुलैच्या केसरीच्या अंकात ' गुळ का साखर ' या विषयावर लिहित असता टिळकानी असे विधान केले की " परदेशी साखर तयार करण्याचे कामी हाडाचा कोळसा व बैलाचे रक्त ह्यांचा उपयोग करतात हे जरी आम्हाला माहित आहे तरी परदेशी साखर आम्ही आनंदाने वापरीत असतो. हिंदुस्थानात इतके ऊस पिकत असता दूरच्या मारिशस बेटाने आम्हाला साखर पुरवावी हे आम्हास दूषणास्पद आहे. म्हणून मारिशसकडे आपले काही तरुण पाठवून तेथील साखर तयार करण्याची क्रिया शिकवून आणण्यास आपल्या उसाचा उपयोग होईल. " वास्तविक परदेशी साखरेचे हे बिंग टिळकानी बाहेर काढले तर भालचंद्राना वाईट वाटण्याचे काय कारण ? एकतर हे सर्व वर्णन खरे असेच होते. निदान परदेशी साखरेच्या कित्येक प्रकारासंबंधी तरी हे खरे होते. शिवाय धर्मदृष्टीने पाहिले तर टिळकापेक्षाहि भालचंद्र हे अधिक स्नानसंध्याशील. असे असता साखरेच्या निंदेला राजकीय दृष्ट्या बहिष्काराचा वास येतो ह्याकरिता डॉ. भालचंद्र यानी टिळकांच्या विधानाना हरकत घेतली याचे आश्चर्य वाटते. खरे प्लेग लशीच्या बाबतीत असे तरी म्हणता येत होते की टिळकांपेक्षा डॉ. भालचंद्र याना ते डॉक्टर असल्यामुळे अधिक कळते. पण साखरेच्या धंद्याबाबत डॉ. भालचंद्र याना टिळकांच्या पेक्षा अधिक कळत होते असेहि नाही. डॉक्टर साहेबानी हा केवळ अव्यापारेषु व्यापार केला व नसती कुरापत काढली. तेव्हा टिळकानी त्याना कसे टाकून लिहिले असेल याची कल्पना सहज कोणालाहि करता येईल !

अँग्लोइंडियन वर्तमानपत्रकर्ते बहिष्काराच्या चळवळीला नावे ठेवीत असत तिला राजद्रोही म्हणत असत आणि ती खाली बसणार असेहि तेजोभंगकारक भविष्य करीत असत. त्यांची कृति त्यांच्या शीलाला योग्य अशीच होती. टिळकाना वाईट वाटे ते नेमस्त पक्षाच्या विरोधाचे. त्यानी फार तर असे म्हणावे की स्वदेशी माल अवश्य वापरा शपथ घ्या पण परकी माल घेण्याची वेळ आली तर इंग्लंडचाच घेणे अधिक श्रेयस्कर. कारण त्यांचा आपला संबंध तसाच आहे त्याला काय करणार ? पण ते असेहि बोलत नसत. स्वदेशी व्रत घ्यावे स्वदेशी वस्तूना उत्तेजन द्यावे हे वाक्य त्यांचे तोंडातून आस्थेवाइकपणाने निघावे तितके निघत नसे. पण टिळक म्हणत की स्वदेशी आणि बहिष्कार हे वेगवेगळाले खरे. तरी स्वकीयाना उत्तेजन देणे आणि नावडत्या परकीयाना बहिष्कार घालणे या गोष्टी स्वरूपतःच इतक्या सरमिसळ आहेत की त्या वेगळ्या करणे शक्य नाही.

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थ प्रतिपत्तये ॥
जगतः पितरौ वंदे पार्वतीपरमेश्वरौ ॥

वाणी आणि अर्थ ही जशी एकमेकापासून वेगळी करिता येत नाहीत तोच प्रकार स्वदेशी आणि बहिष्कार यांचा. नटेश्वराच्या अंगात पुरुषदेह कोठे संपतो

आणि स्त्रीदेह कोठे सुरू होतो हे कसे कोणी सांगावे ? स्वदेशी आणि बहिष्कार हे वेगवेगळे मांडले किंवा केले तर एका देहाची दोन शकले केल्यासारखे होते. पण स्वदेशी आणि बहिष्कार यांची भेसळ झाल्याची अडचण फक्त काही नेमस्त पुढाऱ्यानाच होती. सामान्य लोक तितके खोलात शिरत नसत. विद्यार्थी तर अविचारी आणि उच्छृंखल म्हणून सोडून दिले. पण व्यापारी लोक या भेसळीकडे लक्ष्य न देता स्वदेशीच्या नावाने जी चळवळ करीत ती टिळकांच्या उपयोगी पडे.

बहिष्काराची कल्पना निघाल्यावर ती केवळ पोषाखापुरती राहणे शक्य नव्हते. म्हणून टिळकानी तिला राष्ट्रीय बहिष्कार हे नांव दिले. त्यांचा युक्तिवाद असा की "उत्तम रामबाण औषध मिळत नाही म्हणून सामान्य औषधहि घेऊ नये असे होत नाही. तसेच आपल्याला स्वराज्याचे अधिकार मिळण्याला योग्य असे दुसरे साधन मिळत नाही म्हणून बहिष्कारासारखे दुसरे अल्पसे साधन वापरू नये असे-हि होत नाही. आपले येथे कोणी ऐकत नाही. विलायतेतहि कोणी ऐकत नाही. तेव्हा राज्यकर्त्यांचे इकडे व तिकडे डोळे कसे उघडतील आणि आमचेकडे ते पाहू लागतील असा काही तरी उपयुक्त उपाय योजिला पाहिजे. राष्ट्रीय बहिष्कार हा एक जुना उपाय आहे. ऑस्ट्रियाविरुद्ध इटलीने आणि इंग्लंडाविरुद्ध आयर्लंडने ह्याचाच उपयोग केला होता. बहिष्काराचे नाव निघताना वेडरबर्न सारखे लोकाहि त्याचा निषेध करू लागले. पण त्यांच्या सदनशीर चळवळीचा काही उपयोग होत नाही आणि आम्हाला मात्र दुसरी चळवळ करू नका म्हणतात ! बहिष्कार हा काही बेकायदेशीर नाही. माझ्या खुषीप्रमाणे मी वाटेल त्याचा माल घेईन. मला वाटेल त्याचा घेणार नाही. बंगाली लोकाना बहिष्काराची स्फूर्ति झाली तेव्हा इतर प्रांतानी त्याना या वेळी चळवळीत सामील होऊन मदत केली पाहिजे. ह्या महाराष्ट्राला तर ही गोष्ट फारच सोपी. कारण त्याची परंपराच स्वदेशीची आहे."

पुण्यात सार्वजनिक सभेच्या नव्या दिवाणखान्यात स्वदेशी बहिष्काराच्या सभाना सुरवात झाली. कोणत्याना कोणत्या निमित्ताने झाला तरी स्वदेशीचा हा विषय निघतच राहिला. कोणत्याहि रीतीने बंगालच्या पाठीमागे राहावयाचे नाही त्याचा भरपूर पाठपुरावा करावयाचा असा टिळकांचा निश्चय झाला होता. तारीख २२ ऑगस्ट १९०६ रोजी सार्वजनिक सभेत विद्यार्थ्यांची मोठी सभा झाली. टिळक अध्यक्ष होते. सभेत देशी कापड वापरण्याची शपथ घ्यावी असे ठरले व कलकत्याप्र-माणे पुण्यासहि परदेशी कापडाची होळी करण्यात आली. या सभेत बॅरिस्टर सावरकर यांची पुण्यातील लोकाना प्रथम ओळख झाली. आणि त्यांच्या तेजस्वी भाषणावरून हे पुढे काही नाव काढतील असे लोकाना वाटले. प्रत्यक्ष होळी करण्याच्या बाबतीत टिळकांपेक्षा शिवराम महादेव परांजपे यांच्यावरच विद्यार्थ्यांची अधिक भिस्त होती. कारण प्रत्यक्ष होळी केलीच पाहिजे असे टिळकांचे मत नव्हते. टिळक व यांचे अनुयायी आणि परांजपे व त्यांचे अनुयायी या दोघांतील मतांचा व धोरणाचा फरक पूर्वी जो गूढ होता तो या चळवळीत किंबहुना या होळीपासून प्रगट होऊ लागला.

बहिष्कार परिणामकारक व्हावयाचा तर तो नुसता कपड्यापुरता राहून चालणार नाही हे मत पटण्यासारखे होते. तसेच बहिष्काराला धार्मिक किंवा तत्त्वज्ञानविषयक असे काही स्वरूप दिल्याशिवाय तो लोकांच्या मनात बिंबावा तसा बिंबणार नाही म्हणून त्याहि दृष्टीने सहजच प्रयत्न सुरू झाले. बहिष्कार तोच पण त्याला नुसते बहिष्कार हे लौकिक किंवा राजकीय नाव न ठेवता बहिष्कारयोग असे दिले तर एकदम त्याचे रूप पालटते व त्याची शक्यता वाढते. म्हणून यापुढे बंगाल्यातील बहिष्काराला नुसते कपड्याच्या बहिष्काराचे स्वरूप न राहता बंगाल्यात काय किंवा इतरत्र काय सार्वत्रिक राजकीय असे बहिष्काराचे स्वरूप प्राप्त झाले. संस्कृताचे ज्ञान व राजकारणाची तळमळ असणाऱ्या काही लोकानी नवे मंत्र हुडकून काढण्याकडे आपली बुद्धि खर्चली. एकाला खालील श्रुतिवचनाची आठवण झाली.

' यन्मनसा ध्यायति तद्वाचा वदति । यद्वाचा वदति तत्कर्मणा करोति ।
यत्कर्मणा करोति तदभिसंपद्यते ॥ युवास्यात् साधु युवाध्यापकः ।
आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठ : । तस्येयं पृथ्वी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात् ॥

याच गृहस्थाने ही नवीन चळवळीची सूत्रे पुढचीहि बनविली:—

१ राष्ट्रोन्नति साधनं त्रिधा २ मनोमयं वाङ्मयं कर्ममयं चेति ३ उत्तरोत्तरं श्रेयः ४ कर्ममयादेव फलं ५ तच्च राष्ट्रहितकारकं देशकालानुरूपं च ६ अनुष्ठाने पराकाष्ठा

टिळकानीहि बहिष्काराचे धार्मिक स्वरूप चांगले सजविले. ते म्हणतात:—

"नेहाभिक्रमनाशोस्ति प्रत्यवायो न विद्यते स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' हा गीतेतील श्लोक बाहिष्कारयोगाला चांगला लागू पडणारा आहे. १८८१ साली म्हणजे केसरीच्या अगदी पहिले वर्षी आयर्लंडातील लँड लीगच्या चळवळीवर लिहिण्याचा प्रसंग होता तेव्हा केसरीने त्याविषयी खालीलप्रमाणे लिहिले आहे. " एकदा बहिष्काराला व्यावहारिक शिक्षेचे स्वरूप मिळाल्यास त्यापासून आपणास पुष्कळ उपयोग करून घेता येईल. ज्या हजारो गोष्टी आपल्या नुकसानास कारण होतात त्यांचा चांगला बंदोबस्त करता येईल. अमेरिकन चिनी लोकाना वाईट वागवीत म्हणून चिनी लोकानी अमेरिकन माल न वापरण्याचा निश्चय केला. आणि 'अमेरिकन लोकानी इंग्रजावरहि तोच प्रयोग केला होता. हिंदुस्थानाने तीच गोष्ट इंग्लडविरुद्ध का करू नये ? पण तरुण लोक किंवा अशिक्षित लोक जितकी आस्था दाखवितात तितकी प्रौढ लोक व पुढारी लोक दाखवित नाहीत एवढेच वाईट. नेमस्त लोक म्हणतात आधी माल होऊ द्या मग तो वापरण्याचा निश्चय करा. त्यावर उत्तर तेच की आधी मागणी होते मग पुरवठा होतो. स्वदेशीची शपथ घेणे म्हणजे आज माल न मिळाला तर उघडे राहणे असा अर्थ नव्हे तर आज लोकानी निश्चय केल्यास उद्या माल अधिक मिळू लागेल असा आहे. पुढे घडणाऱ्या गोष्टीचा उपक्रम आधी आपणच करावा लागतो. बहिष्कारयोग याचा अर्थ होईल तितकी गोष्ट क्रमाक्रमाने करू लागणे. आज

सगळा देश विलायती कापड वापरतो. एका रात्रीत देशी कापड निर्माण होणार आणि उद्या सकाळी सगळे लोक देशी कापड वापरू लागणार असा प्रकार कधी होत नसतो. इंग्रजांच्या खिशाला चट्टा लावण्याच्या बाबतीत स्वदेशी वापरल्याने श्रेय येईल! आशिया खंड हे आपले खंड आहे. त्यातील वस्तूना आपण का आश्रय देऊ नये ? मौज हीच असते की जेवढे करावे तेवढे पदरात पडते. थोडे म्हटले तरी देता घेता येते व केल्याचा नाश होत नाही."

मुंबईच्या नेमस्तानी व्यावहारिक म्हणून असा प्रश्न उपस्थित केला की देशाला पुरे इतके स्वदेशी कापड उत्पन्न होतच नाही. म्हणून स्वदेशीची शपथ घेणे योग्य होणार नाही. पण त्याला उत्तर असे होते की ज्या अर्थी इंग्लडच्या खिशाला चिमटा घेणे हा ह्या चवळळीचा एक उद्देश होता त्याअर्थी मिळाले तितके स्वदेशी आणि त्याच्या भरतीला जरूर तितके इंग्लडशिवाय इतर देशाचे कापड खुशाल घ्यावे. शिवाय जे कापड आज बाहेर जाते ते इकडे उपयोगात येऊ लगेल व गिरण्याना देशातल्या देशात गिऱ्हाईक मिळेल. शिवाय देशी गिरण्याचे पुष्कळसे सूत बाहेर जाते त्या सुताचे कापड येथे करावयाचे प्रयत्न झाल्यास तेहि साध्य होईल.

ही चळवळ सुरू झाल्याबरोबर तुम्ही केसरीला विलायती कागद का वापरता असा प्रश्न एका गृहस्थाने टिळकाना केला. त्याला त्यानी केसरीत उत्तर देऊन कळविले की "आम्ही गवताचा कागद वापरतो त्यालाहि प्रत्येक वर्गणीदारामागे आठ आणे खर्च येतो. आणि तो विंध्याच्या पांढरा कागद वापरू लागल्यास दर वर्गणीदारामागे एक रुपया खर्च येईल. ह्याचा अर्थ दर वर्गणीदारामागे आणखी आठ आणे बोजा बसेल. गवताचा कागद पुण्याच्या गिरणीत होत नाही. मराठा पत्राला कागद थोडा लागतो तो पुण्याचा गिरणीतून आम्ही आणतो. पण केसरीला पुण्याच्या गिरणीतील कागद वापरणे शक्य नाही. शिवाय गवताचा कागद केसरीला घेतला जातो तो विलायतचा नसून जर्मनी ऑस्ट्रिया नार्वे स्वीडन इकडील असतो. आठ आणे वर्गणी वाढण्याचा प्रश्न निघाला त्याला कोणी उत्तर दिले नाही. आणि आस्ट्रिया नार्वे जर्मनी स्वीडन वगैरे देशांतील कागद वापरला जातो ही गोष्ट स्वदेशी शपथेच्या व बहिष्काराच्या तत्त्वाच्या विरुद्ध नव्हती. यामुळे पृच्छकाचे समाधान झाले. देशी माल हवा तितका तयार होणार नाही हे खरे पण बहिष्कार विलायती मालावर घालावयाचा होता. अर्थात् युरोपातील इतर देशांचा माल जरूर घ्यावा. अशानेहि इंग्लंडला जाणवेल. नेमस्त म्हणत स्वदेशी तर नाही मग विलायती का घेऊ नये? त्याला टिळकानी महाभारतातील उत्तर दिले. भारतीय युद्धापूर्वी कृष्ण शिष्टाईला गेला तेव्हा दुर्योधनाने स्वागतसत्काराचे ढोंग करून कृष्णाला मेजवानीला बोलाविले पण कृष्ण त्या मेजवानीला गेले नाहीत. त्यानी उत्तर दिले ते असे—

संप्रीतिभोज्यान्यन्नानि आपद्भोज्यानि वा पुनः ।
न च संप्रीयसे राजन्नैव वापद्गता वयम् ॥

भोजनाचे प्रकार दोन. एक प्रेम म्हणून मेजवानीला जावे किंवा नाइलाज म्हणून पोट भरण्याकरिता दुसऱ्याचे अन्न खावे. पण तुझे आमचे रहस्य नाही किंवा तुझ्या घरी न जेवलो म्हणजे आम्हाला अन्न मिळणार नाही असेहि नाही. इंग्लंड-च्या वस्तू घ्याव्या असे इंग्लंडने आमचे काय प्रेम संपादिले आहे ? आणि इंग्लंड-च्या न घेतल्या तर आम्हाला अवांतर देशाच्या मिळतील. कमी काय आहे ? अर्थात् आम्ही स्वदेशी मिळतील त्या वापरू न मिळतील त्या इतर देशांच्या वापरू पण इंग्लंडच्या वापरणार नाही. त्यांच्या वापराव्या व त्यांचे नुकसान करू नये असा इंग्लंडने आमच्यावर काय उपकार केला ?

## ( १६ ) क्रांतिकारक चळवळीचा जन्म

पूर्वबंगालचे ले. गव्हर्नर सर बॅमफील्ड फुल्लर यानी आपली नखे बाहेर काढली. पूर्वबंगालचे त्याना मोठे प्रेम आले. ते इतके की पूर्वबंगाल हा मुसलमानांचा प्रांत व हिंदु मुसलमान यापैकी मुसलमान ही माझी आवडती राणी अशी अप्रयो-जक उपमा देऊन त्यानी आपले पक्षपाती मन व त्याबरोबरच फाळणीचा दुष्ट राजकीय हेतू जगाला प्रगट केला. अधिकारी पोलिसाच्या साह्याने जनतेत फूट पाडून काय करू शकतात याचा मासला जगाला दाखविण्याची जणू काय फुल्लर साहेबानी प्रतिज्ञा केली होती.

शेवटी बारिसाल येथील परिषदेचे वेळी या अनिष्ट धोरणाचा कळस झाला. रस्त्यातून कोणी 'वंदे मातरम्' हे पद म्हणू नये असा हुकूम यापूर्वीच सुरू झाला होता. परिषद पार पडावी म्हणून बारिसालचे पुढाऱ्यानी रस्त्यात आम्ही 'वंदे मातरम्' हे पद म्हणणार नाही असा अधिकाऱ्याशी करार केला होता. पण परिषदेचे प्रतिनिधी म्हणाले की 'स्वागताच्या वेळी तुम्ही ते पद म्हणू नका.. पण आम्ही जाताना रस्त्यातून ते पद म्हणत जाऊ व त्याचे परिणाम काय होतील ते पाहू.' तारीख १४ रोजी परिषद भरली. आधी खाजगी सभेत 'हुकूम तोडावयाचा' व 'वंदे मातरम्' हे पद म्हणावयाचे असे ठरले होते. पण दंगा मात्र करावयाचा नाही व पोलिसाना काय करावयाचे ते करू द्यावयाचे असेहि ठरले होते. राजाच्या हवेलीपासून मिरवणूक निघाली. सगळे पुढारी रस्त्याने चालत होते. निम्मी मिरव-णूक पार पडली. पण पोलिसाच्या अंगात संचार होऊन त्यानी हल्ला केला. स्वयं-सेवकांच्या अंगावरचे 'वंदे मातरम्' चे बिल्ले फाडून घेतले. लोकावर काठ्या लाठ्या चालविल्या व एका गृहस्थाला तळ्यात फेकून दिले. पण हल्ला झाल्यावर 'वंदे मातरम्'चा घोष अधिकच मोठ्याने सुरू झाला. मिरवणूक परत फिरली. पोलिस अधिकारी मि. केम्प यानी सुरेंद्रनाथ बानर्जी याना अटक केली व त्याना मॅजिस्ट्रेट इमर्सन यांच्यापुढे आणले. तेथे दोघांचा खटका उडाला. जागच्याजागी हुकूम तोडल्याबद्दल चौकशी होऊन सुरेंद्रबाबूंना २०० रुपये दंड झाला. तेव्हा तो भरून ते परिषदेत परत आले. पोलिसांच्या काठ्यानी जखमा झालेले लोक परिषदेला

एकामागून एक येत होते. तेथून पुढे सर्व दिवसभर बारिसाल शहरात 'वंदे मातरम्' याशिवाय शब्द ऐकू येत नव्हता! दुसरे दिवशी मॅजिस्ट्रेटचा सभाबंदीचा हुकूम घेऊन पोलिस अधिकारी परिषदेत आले. आणि तो वाचून दाखविल्यावर परिषद बंद होऊन सर्व प्रतिनिधी घरोघर गेले. एकटे कृष्णकुमार मित्र यानी जागा सोडण्याचे नाकारले.

अजून हिंदु व मुसलमान समाजामध्ये एकी होती. परिषदेचे अध्यक्ष बॅरिस्टर रसूल व चळवळीचे एक पुढारी लियाकत हुसेन हे मुसलमान होते. परिषद मोडल्याची हकीकत बाहेर जाताच सर्व बंगालभर निषेधाच्या आरोळ्या उठल्या. आणि अधिक जोराच्या प्रतिकाराचे व निषेधाचे शब्द येऊ लागले. गुरखे शिपायानी घरात शिरून मारहाण केली व स्त्रियांची अब्रू घेतली याचीहि भर यातच पडली. काही दिवसानी मिदनापूर परिषदेचीहि अशीच गत झाली. अधिकाऱ्यानी स्वतः कायदा न मानण्याचे उदाहरण घालून दिले. मग लोकानीहि ते उचलले. शांतता कोठे राहू शकेना. या संधिकाळात क्रांतिकारक चळवळीचा जन्म झाला. बारिसाल परिषदेनंतर थोड्या दिवसानी बराकपूर येथे एके रात्री दोन तरुण मुले सुरेंद्रनाथ बाबूंना भेटावयाला गेली. आणि त्यानी सुरेंद्रबाबूंना असा सरळ सवाल टाकला की "आम्हाला तुमचा सल्ला पाहिजे तो द्या. सर बॅमफील्ड फुल्लर यांचा खून करण्याचे आम्ही ठरविले आहे व त्या कामगिरीवर आज आम्ही निघणार!" सुरेंद्रबाबू आपल्या पुस्तकात लिहितात "हा सवाल ऐकून मी तर अगदी चकीत झालो. मी म्हणालो फुल्लर साहेबांचा खून तुम्ही काय म्हणून करणार?" त्यानी मला उत्तर दिले "त्यांच्या गुरख्यानी बंगाली स्त्रियांची अब्रू घेतली म्हणून." सुरेंद्रबाबू म्हणाले "पण तुम्ही पकडले जाल फाशी जाल." ती मुले म्हणाली "आयाबहिणींची अब्रू वाचवण्याकरिता फाशी गेलो तर त्यात काय बिघडले?" इतक्यात सुरेंद्रबाबूंना एक कल्पना सुचली. ते म्हणाले "फुल्लर साहेबानी राजीनामाच दिल्याची बोलवा आहे. मग मेल्याला मारण्यात काय अर्थ? तुम्ही खुनाचा यत्न केला व तो फसला तर उलट आज त्यांचा राजीनामा पटला जात आहे तो ते परत घेतील व देशावर उपकारापेक्षा अपकार मात्र होईल." हा सल्ला मात्र त्याना पटला. तेव्हा त्याना मी वाटखर्चांचे पैसे देऊन व त्यांजकडून आपल्या पायावर शपथ घेऊन रातोरात परत घराकडे लावून दिले." नंतर लवकरच सर अँड्र्यू फ्रेझर यांच्या प्रवासात आगगाडी उलथून पाडण्याचा प्रयत्न झाला. हळूहळू सभा भाषणे ही नावडती ठरू लागली व क्रांतिकारक चळवळीतील लोक दंगेधोपे करून सभाहि मोडू लागले. तारीख १ एप्रील १९०८ रोजी मुजफरपूर येथील अत्याचार घडले व येथून जो एक प्रकारचा इतिहास सुरू झाला तो आज तारखेपर्यंतहि संपला आहे असे म्हणता येत नाही.

राष्ट्रीय सभेचे जुने पुढारी हळूहळू कालवश होऊ लागले होते. १९०६ साली उमेशचंद्र बानर्जी आनंद मोहन बोस बदुदीन तय्यबजी वगैरे जुने पुढारी मृत्यु पावले. जुन्या लोकाबरोबर अर्थात् जुन्या कल्पना मागे पडून नव्या कल्पना उदयाला येऊ लागल्या. आणि राष्ट्रीय सभेला काही तरी नवीन वळण लावावे ही

ह्या नव्या कल्पनापैकी प्रमुख होती. विलायतेत लिबरल पक्ष अधिकारारूढ असल्याकारणाने तिकडे काय होते याकडे हिंदी लोकांचे लक्ष नेहमीपेक्षा विशेष लागू लागले. आणि मोर्लेसाहेब जे काही बोलतील त्याच्यावर टीकेची कला कुसर निघू लागली. वंगभंगासंबंधाने त्यानी पूर्वीच सांगून टाकले होते की " झाला तो वज्रलेपच आहे. अशा गोष्टी झाल्या म्हणजे त्या पुसून काढता येत नाहीत. " पण वंगभंग एक वेळ पुरवला पण ही फुल्लरशाही नको असे म्हणण्याची पाळी बंगाल्यातील लोकाना आली होती. हा जुलूम कमी करण्याला तरी मोर्लेसाहेब काय करणार असे लोक विचारू लागले होते. लोकामध्ये असंतोष पसरला आहे हे मला माहीत आहे व तो कमी करण्याचा काही प्रयत्न मी करीन असे मोर्लेसाहेब म्हणत. पण कृति काहीच दिसून येईना.

जुलै महिन्यात दादासाहेब खापर्डे यानी एक जाहीर विनंतिपत्र काढले. त्यात राष्ट्रीय सभेचे धोरण बदलले पाहिजे, हा विषय सोपपत्तिक मांडलेला होता. मद्रासच्या प्रांतिक सभेचे अध्यक्ष व मद्रासचे प्रसिद्ध पुढारी कृष्णस्वामी अय्यर यानीहि हाच उपदेश आपल्या प्रांतातील कॉंग्रेसवाल्याना केला होता. खापर्डे यांचे हे पत्र वाचून टाइम्सकाराने त्यांच्यावर टीका केली. आणि लोकाना असा इषारा दिला की खापर्डे हे तुम्हाला खड्डयात नेऊन घालू पाहतात तरी जुने नेमस्त पुढारी गोखले मेथा कॉटन याना तुह्मी सोडू नका. अँग्लो इंडियन पत्रकारांची रीतच अशी की राजकारणात जे पुढे जाणारे असतील त्यांची निंदा करून त्यातल्या त्यात जे मागे राहणारे असतील त्यांची स्तुति करावयाची. कॉटन खरे सिव्हिलीअन असता त्यानी राजकारणात भाग घ्यावा हे टाइम्सला कधी मान्य होते ? त्यांच्यावरहि तो मनातून जळतच होता. आणि बनारसच्या सभेत गोखल्यांचे भाषण जरा किंचित् गरम होताच त्यांच्यावर टीका करण्याला टाइम्सने कमी केले नाही. पण आता खापर्डे व अय्यर ही मंडळी पुढे चालली असे लोक म्हणू लागताच टाइम्स गोखले व कॉटन यांचीच पाठ थोपटू लागला.

अमेरिकन प्रेसिडेन्सीचे उमेदवार ब्रायन हे यापूर्वी काही दिवस हिंदुस्थानात येऊन फिरून गेले होते ते अमेरिकेस परत गेल्यावर सरकारच्या दुर्दैवाने त्यानी हिंदुस्थानातील इंग्रजांच्या राज्यावर याच वेळी सडकून टीका केली. त्यांची भाषा जहाल हिंदी लोकांच्या भाषेपेक्षाहि अधिक कडक होती. ह्याचा फायदा हिंदी मुत्सद्यानी व वर्तमानपत्रकारानी सहजच घेतला. गोखले हे मोर्ले साहेबाना संभाळून घेत होते तरी बंगाल्यातील हकीकत दर आठवड्याच्या टपालाने विलायतेत त्याना वाचावयास मिळत असल्यामुळे त्याना ती इंग्रज लोकापुढे मांडणे अवश्यच होते. यांच्या व्याख्यानानंतर एकदोन ठिकाणी खडाजंगी वादहि झाला. गोखले हे सामान्यतः आशावादी लोकापैकी होते. पण ' ईस्ट इंडिया अॅसोसिएशन ' च्या पुढे जुलै महिन्यात त्यानी एक निबंध वाचला त्यात त्यानी निराशेचे उद्गार काढले. इंग्लंडात गेल्यावर श्रोत्याना आवडेल तेच बोलावे आणि अशा रीतीने त्यांचे

मन वळवावे या पायरीवरून वरच्या पायरीवर गोखले ह्या दुसऱ्या सफरीत गेले होते. राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष ह्या नात्याचा त्याना उपयोग होऊ लागला होता. आणि "मी सांगतो हे तुम्हाला आवडणार नाही पण तुमच्यापुढे अप्रिय गोष्टी बोलल्याशिवाय मुळीच गत्यंतर नाही. मी बोललो ते शांतपणाने ऐकून घेतलेत हे उपकार आहेत" असे बोलण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. इतर रीतीनेहि त्याना जरा जोर आला होता. कारण मोर्ले यांच्या हुकुमावरून नसेना का पण आपल्याच आततायीपणाने फुल्लर साहेबानी याच सुमारास राजीनामा दिला. एका शाळेतील मुलानी स्वदेशीचा अंगिकार केल्यामुळे त्याना परिक्षेला बसू देऊ नये अशी फुल्लर साहेबानी युनिव्हर्सिटीला शिफारस केली. पण ती नामंजूर झाल्याने त्यानी राजीनामा दिला आणि तो टपून बसल्याप्रमाणे हिंदुस्थान सरकारने ताबडतोब मंजूर केला अशी बातमी आली. पण याहून आणखी काही वेगळे अंतरंगात शिजत असावे असा संशय येण्यासहि जागा होती. मोर्ले यांच्या सांगण्यावरून हिंदुस्थान सरकाराने खळगा खणून ठेविला असावा आणि त्यानी त्याच्या तोंडावरच्या गवतावर पाय टाकण्याची वाट सरकार पहात बसले असावे असे वाटते. कारण फुल्लर साहेब पुढे विलायतेत गेल्यावर त्यानी मोर्ले साहेबांची गाठ घेण्याचा प्रयत्न केला. पण 'तुमची गाठ घेऊ इच्छित नाही' असे त्यानी त्याना स्पष्ट कळविले इतका फुल्लर साहेबांचा दुर्लौकिक विलायतेत होऊन राहिला होता. मोर्ले हे आपणाकडून पुष्कळच जपून बोलत असत. आपल्याला प्रत्यक्ष काही मोठेसे करता येत नाही असे जरी त्यानी एकदा दर्शवून टाकले होते तरी कॉन्झर्व्हेटीव्हचे काळीज वेगळे व लिबरलाचे वेगळे ही गोष्ट त्यांच्या भाषणावरून स्पष्ट होत होती.

१९०६ च्या सप्टेंबरमध्ये गोखले विलायतेहून परत यावयाला निघाले. कायदे कौन्सिलात काही सुधारणा करण्याचा विचार मोर्लेसाहेबांचा दिसतो हा संदेश घेऊन ते इकडे येत होते. आशाजनक संदेश सांगून इकडील उतावीळ लोकांचे समाधान करावे असे त्यांच्या मनात असल्याची चिन्हे दिसू लागली होती. आणि त्याप्रमाणे राष्ट्रीय सभा जहालांच्या हाती देऊ नये अशाविषयी त्याना खटपट करावयाची होती. टाइम्स वगैरे पत्रानी जहालाना राज्यद्रोही ठरविले होते तर नेमस्तानाहि व्यवहारचातुर्य नाही असा शेरा मारला होता. आणि सरकारलाहि कोणाला काही द्यावयाचे नसून जमेल तर हे नेमस्त व हे जहाल यांचे मध्ये शक्य तर फूट पाडून कलागत लावावयाची होती. पण आजपर्यंत ज्याना जहाल म्हटले गेले त्यांचीच पाठ थोपटली जावी आणि तुम्ही एक वेळ पुरवला पण हे दुसरे नको असे म्हणण्याची पाळी यावी असे हळूहळू घडून येत होते. सप्टेंबर महिन्यात इंग्लिशमन पत्राने 'सोनेर बांगला' नावाच्या एका गुप्त संस्थेचा व मंडळाचा शोध लावला. त्याच्या शपथपत्रिकेचे भाषांतर प्रसिद्ध केले. आणि बंगाल्यात बंड होणार अशी हूल उठविली. या पत्रकात सर्व बंगाली लोकाना आणि हिंदुमुसलमानाना असे आव्हान केले होते की "बंगमातेची अब्रू रक्षण करण्याकरिता कंबर बांधा.

मन वळवावे या पायरीवरून वरच्या पायरीवर गोखले ह्या दुसऱ्या सफरीत गेले होते. राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष ह्या नात्याचा त्याना उपयोग होऊ लागला होता. आणि "मी सांगतो हे तुम्हाला आवडणार नाही पण तुमच्यापुढे अप्रिय गोष्टी बोलल्याशिवाय मुळीच गत्यंतर नाही. मी बोलतो ते शांतपणाने ऐकून घेतलेत हे उपकार आहेत" असे बोलण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. इतर रीतीनेहि त्याना जरा जोर आला होता. कारण मोर्ले यांच्या हुकुमावरून नसेना का पण आपल्याच आततायीपणाने फुल्लर साहेबानी याच सुमारास राजीनामा दिला. एका शाळेतील मुलानी स्वदेशीचा अंगिकार केल्यामुळे त्याना परिक्षेला बसू देऊ नये अशी फुल्लर साहेबानी युनिव्हर्सिटीला शिफारस केली. पण ती नामंजूर झाल्याने त्यानी राजीनामा दिला आणि तो टपून बसल्याप्रमाणे हिंदुस्थान सरकारने तावडतोब मंजूर केला अशी बातमी आली. पण याहून आणखी काही वेगळे अंतरंगात शिजत असावे असा संशय येण्यासहि जागा होती. मोर्ले यांच्या सांगण्यावरून हिंदुस्थान सरकाराने खळगा खणून ठेविला असावा आणि त्यानी त्याच्या तोंडावरच्या गवतावर पाय टाकण्याची वाट सरकार पहात बसले असावे असे वाटते. कारण फुल्लर साहेब पुढे विलायतेत गेल्यावर त्यानी मोर्ले साहेबांची गाठ घेण्याचा प्रयत्न केला. पण 'तुमची गाठ घेऊ इच्छित नाही' असे त्यानी त्याना स्पष्ट कळविले इतका फुल्लर साहेबांचा दुर्लौकिक विलायतेत होऊन राहिला होता. मोर्ले हे आपणाकडून पुष्कळच जपून बोलत असत. आपल्याला प्रत्यक्ष काही मोठेसे करता येत नाही असे जरी त्यानी एकदा दर्शवून टाकले होते तरी कॉन्झर्व्हेटीव्हचे काळीज वेगळे व लिबरलाचे वेगळे ही गोष्ट त्यांच्या भाषणावरून स्पष्ट होत होती.

१९०६ च्या सप्टेंबरमध्ये गोखले विलायतेहून परत यावयाला निघाले. कायदे कौन्सिलात काही सुधारणा करण्याचा विचार मोर्लेसाहेबांचा दिसतो हा संदेश घेऊन ते इकडे येत होते. आशाजनक संदेश सांगून इकडील उतावीळ लोकांचे समाधान करावे असे त्यांच्या मनात असल्याची चिन्हे दिसू लागली होती. आणि त्याप्रमाणे राष्ट्रीय सभा जहालांच्या हाती देऊ नये अशाविषयी त्याना खटपट करावयाची होती. टाइम्स वगैरे पत्रानी जहालाना राज्यद्रोही ठरविले होते तर नेमस्तानाहि व्यवहारचातुर्य नाही असा शेरा मारला होता. आणि सरकारलाहि कोणाला काही द्यावयाचे नसून जमेल तर हे नेमस्त व हे जहाल यांचे मध्ये शक्य तर फूट पाडून कलागत लावावयाची होती. पण आजपर्यंत ज्याना जहाल म्हटले गेले त्यांचीच पाठ थोपटली जावी आणि तुम्ही एक वेळ पुरवला पण हे दुसरे नको असे म्हणण्याची पाळी यावी असे हळूहळू घडून येत होते. सप्टेंबर महिन्यात इंग्लिशमन पत्राने 'सोनेर बांगला' नावाच्या एका गुप्त संस्थेचा व मंडळाचा शोध लावला. त्याच्या शपथपत्रिकेचे भाषांतर प्रसिद्ध केले. आणि बंगाल्यात बंड होणार अशी हूल उठविली. या पत्रकात सर्व बंगाली लोकाना आणि हिंदुमुसलमानाना असे आव्हान केले होते की "बंगमातेची अब्रू रक्षण करण्याकरिता कंबर बांधा.

फिरंग्याच्या शस्त्राना भिऊ नका. प्राण देण्याला तयार व्हा. भिकारी वैष्णव फकीर बनून जयघोष करीत भेटेल त्या साहेबाला झुगारून द्या." ह्याला अँग्लोइंडियन पत्रानी उत्तर दिले की "असे कराल तर आम्हीहि पण १८५७ सालापेक्षा अधिक क्रूर होऊ हे लक्षात ठेवा." कित्येकांच्या मते मोर्लेसारख्या साळसूद स्टेट सेक्रेटरीला भिवविण्याकरिता कोणीतरी ही सोनेरी बंगाल्याची कल्पना आपल्या सुपीक मेंदूतून काढली असावी.

शुक्रवार तारीख २२ सप्टेंबर रोजी गोखले विलायतेहून मुंबईस आले. बंदरावर त्यांचे स्वागत योग्य प्रकारे झाले. मेथा यानी प्रेसिडेन्सी अॅसोसिएशनच्या विद्यमाने गोखले यांच्या स्वागताची तयारी केली होती. मेथा व गोखले यांचे तासभर खाजगी संभाषण झाले. ह्या खेपेस केसरी किंवा इतर वर्तमानपत्रे यांच्या प्रतिनिधीना मुलाखत देण्याचे त्यानी नाकारले. "इकडे काय झाले गेले ह्याची सर्व माहिती मला मिळविली पाहिजे आणि ती मिळविल्यावर मी काही बोलू शकेन" असे त्यांनी सांगून बातमीदाराना लावून दिले.

## (१७) टिळकांची बेळगावची व्याख्याने

टिळकांची स्वराज्यविषयक मते लोकाना इतकी पटू लागली होती की चहूकडून त्याना व्याख्याने देण्याविषयी बोलावणी येऊ लागली. सप्टेंबर महिन्यात टिळक बेळगाव येथे गेले तेथे त्यांची तीन व्याख्याने झाली.

बेळगाव येथील तीन व्याख्यानात त्यानी साम्राज्य स्वदेशी व प्रचलित राजकारण हे विषय घेतले होते. "रोमन लोकांनी जित राष्ट्राना नागरिकांचे हक्क दिले म्हणून त्यांचे साम्राज्य बुडले असे लॉर्ड कर्झन यानी एके ठिकाणी बोलून दाखविले. याचा उघड अर्थ असा की इंग्रज साम्राज्याने तसली चूक करू नये. पण हे चालणार नाही. आम्ही इंग्रजाना हाकून देऊन काळ्यांचे साम्राज्य स्थापावे असे म्हणत नाही. आम्हाला काळ्या गोऱ्यांचेच साम्राज्य पाहिजे. आमचे म्हणणे इतकेच की साम्राज्यातील इतर भागाना जे हक्क तेच आम्हालाहि असावेत. आमचा कारभार आमच्या हाती यावा आणि ते तो न देतील तर आपण अडवणूक करून त्यांच्या हातून जोराने घ्यावा. स्वदेशी बहिष्कार हा या अडवणुकीचाच एक प्रकार आहे. एखादा कौन्सिलर अधिक नेमल्याने खरा अधिकार आम्हाला मिळणार नाही. आमची गवती घरे जाऊन तेथे कौलारू घरे झाली ही गोष्ट मोर्लेसाहेबाना फार महत्वाची वाटते. पण असल्या भूतदयेच्या गोष्टी आम्हाला नकोत. कौलारातून स्वराज्य उतरत नसते. आम्हाला खरोखर काय पाहिजे हे मोर्ले याना कळते. पण गादीवर येताच तत्ववेत्याचीहि बुद्धी पालटते. गादीचा गुणच तसा आहे. विक्रमराजा सिंहासनावर बसला म्हणजे त्याची बुद्धि पालटत असे अशी दंतकथा आहे. जुने स्टेट सेक्रेटरी नुसते कडू बोलत होते. हे नवे एक शब्द कडू एक गोड बोलतात. पण असल्या गोधडीने आमच्या दुःस्थितीचे निवारण होणार नाही. मोर्ले यांची

अडचण आम्हालाहि समजते. शेपन्नास वर्षे चालत असलेल्या गाड्याला ते जुंपले आहेत. पण आमचेहि पाहणे हेच की स्वदेशीसारख्या चळवळीचा एखादा दगड चाकाला लागून अडला तर गाडीवान थोडा जागा होईल. अधिकाऱ्यानी सत्ता लुबाडावी आणि व्यापाऱ्यानी आमचा पैसा लुबाडावा. असे किती दिवस चालू देणार ? मोर्ले यांच्या जागी मी असतो तर मीहि त्यांचे धोरण स्वीकारले असते. अधिकारी मनुष्याचा तो धर्मच आहे. पण चळवळ करणे हा आमचाहि धर्म आहे. मनात येईल ते स्पष्ट बोलावे. आमच्या मनातली भाषा इंग्रजाना कळत नाही असे नाही मग दांभिकपणाचा व्यर्थ दोष त्यानी पदरी का घ्यावा" ?

बेळगांवच्या या सफरीत एक साहजिक प्रकार घडला. एका व्याख्यानाचे वेळी पाऊस येत होता. म्हणून लोकानी छत्र्या उघडिल्या. एका गृहस्थाने टिळकांच्या डोक्यावरीहि छत्री धरली. गंगाधरराव देशपांडे यांनी लोकाना छत्र्या मिटविण्यास सांगितले तेव्हा टिळकानी आपल्यावरची छत्री मिटण्याबद्दल स्वयंसेवकास सांगितले. पण त्याने ती अगदी न मिटता मागे ओढून धरली. त्यामुळे एकट्या टिळकांच्यावर छत्री धरल्याचा टीकाकारांचा दोष शिल्लक उरून शिवाय छत्रीवरून पडणारे पाणी मात्र टिळकांच्या डोक्यावर पडून तोंडावर वाहू लागले. बेळगावचे विरोधी वर्तमानपत्र 'चिकित्सक' यामध्ये टिळकावर टीका आली. वास्तविक यात टिळकाकडे काय अपराध ? पण टीकाकाराला तरी दुसरे काय लिहिता येणार ? वास्तविक या छत्रीच्या गोष्टीला एऱ्हवी इतके महत्त्व आले नसते. पण स्वदेशी चळवळीच्या निमित्ताने काही पुढारी स्वतः राजचिन्हे धारण करू लागले आहेत अशी कुचेष्टा नेमस्त पत्रे करू लागली होती. या छत्रीप्रकरणाच्या आधी एक दोन आठवडे बंगाल्यात अशी गोष्ट घडली होती की सुरेंद्रनाथ बानर्जी हे एके ठिकाणी व्याख्यानास गेले असता कोणी त्यांच्या डोक्यावर एक पुष्पहार ठेवला आणि कोणी शास्त्र्यानी जुन्या पद्धतीप्रमाणे त्यांच्यावर शांत्यभिषेक केला. लगेच असा पुकारा झाला की सुरेंद्रबाबूनी जनतेचा राजा म्हणून राजमुकुट घालून राज्याभिषेक करून घेतला. झाले. एका कल्पनेवरून, दुसरी सहजच सुचली. ' पहा हा नव्या बंगालचा पहिला राजा पहिला सुरेंद्र. 'हे आता वंगराजाधिराज झाले' असे दुसऱ्याने म्हटले. तिसरा म्हणाला 'सैन्याशिवाय राजा कसला ? म्हणूनच सोनेर बांगला या समितीच्या नांवाने सैन्याची पहिली टोळी बनविण्यांत आली.' चौथा म्हणाला 'हेंच सैन्य हळुहळु पन्नास हजारापर्यंत वाढणार आहे.' गोष्ट खरी समजून अँग्लो इंडियन पत्रानी बंडखोर राजद्रोही तोतया लुच्चा वगैरे विशेषणे लावून सुरेंद्रबाबूंची निंदा चालविली. आणि वाज नावाचा एक युरोपियन मॅजिस्ट्रेट तर इतका खवळून गेला की तो ह्मणाला " ठीक आहे माझ्या राज्यांत हा बंगालचा राजा येऊ दे की त्याच्या गळ्यात खेटरांचीच माळ घालून गावातून धिंड काढल्याशिवाय राहणार नाही.' शेवटी एक टीकाकार म्हणाला " सुरेंद्रबाबू आता कैदेत गेले म्हणजे मग कसे ? नव्या बंगालचा नवा राजा पहिला सुरेंद्र झाला पण तोच शेवटचा ठरला असे इतिहासकार लिहील. ' वास्तविक या

राज्यारोहणाच्या नवलकथेच्या मुळाशी इतकेच तथ्य होते की पंचगौड पंडित पोथी-पुराणाचा सप्ताह करतात त्याच्या शेवटी त्याला विशेष प्रकारची पुष्पभूषणे अर्पण करण्याची चाल आहे तसलाच प्रकार याहि प्रसंगी झाला. आणि बाबू रमेशचंद्र दत्त यानी अशा अर्थाचे एक पत्र विलायती वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले तेव्हा इंग्रज लोकांची समजूत सहज पटली. पण बोलून चालून वेड पांघरलेल्या स्वदेशी निंदकांची समजूत कशी पटणार ? लोकाना एखाद्याच्या नावामागे राजश्री हे उपपद लाविले तरी तेहि राजचिन्हच वाटणार. सुरेंद्रबाबूंच्या राज्याभिषेकात मुकुट व अभिषेक हे सापडले. पण राजछत्राची तेवढी वाण होती. ती निंदकानी बेळगाव येथे टिळकांवर धरलेल्या छत्रीने भरून काढली. अशा रीतीने टिळक सुरेंद्रबाबू मिळून तरी राज्यारोहण सांगोपांग सिद्ध झालेच की नाही ? स्वदेशी चळवळीच्या विरोधी लोकावर टिळक कडक टीका करीत त्याला परत आहेर ह्मणून देण्याला काही हवाच होता तो हा असा पुरविला गेला. एकदा वादसागराचे मंथन सुरू झाले ह्मणजे त्यातून कशी रत्ने बाहेर पडतात त्याचा हा एक उत्कृष्ट मासला त्या वेळी दिसून आला.

## ( १८ ) कलकत्त्याची राष्ट्रीय सभा

सप्टेंबरच्या सुमारास कलकत्त्यास राष्ट्रीय सभेचे अध्यक्षपद कोणाला द्यावे याची चर्चा सुरू झाली. खापर्डे यानी हे पद लाला लजपतराय याना द्यावे अशा अर्थाची सूचना वर्तमानपत्रातून लोकापुढे मांडली. उलट बिपिनचंद्र पाल वगैरे बंगाली लोकानी टिळकांची निवडणूक व्हावी अशी घोषणा व प्रयत्न सुरू केला. हे पाहून नेमस्त कॉंग्रेसवाले व ॲंग्लोइंडियन पत्रे याना मोठी भीति उत्पन्न झाली. त्यांच्या दृष्टीने टिळक व लजपतराय ह्यांच्यात हा बरा हा वाईट असे म्हणताच येत नाही. दोघेहि जहालच ! उलट पक्षी टिळक व त्यांचे अनुयायी ह्यानी असे जाहीर केले की टिळक लजपतराय कोणीहि राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष न झाले तरी चालतील पण तसे झाल्याने स्वतः तुम्ही जे मागता ते देण्याला आज कोण तयार आहे याची तरी आधी जामीनकी काय ? ॲंग्लो इंडियन अधिकारी नाराज होतील एवढ्याच करिता लजपतराय अध्यक्ष नकोत हे म्हणणे शोभत नाही. चार दोन आठवडे त्या गोष्टीचा खल होऊन शेवटी अशी तोड निघाली की दादाभाई नौरोजी याना तार करून विलायतेतून बोलवावे आणि आजोबा दुकानाच्या गादीवर येऊन बसण्याला पुढे आला म्हणजे नातू सहजच मागे सरतील. टिळक व लजपतराय यांच्या अस्त्रावर दादाभाई नौरोजी हे ब्रह्मास्त्र वाटणे योग्यच होते. कारण त्यांच्या नावापुढे तरी कोणतेहि नाव बाजूला झालेच पाहिजे. पण ही गोष्ट जहालाना भूषणास्पदच होती. कारण ब्रह्मास्त्राच्या उपयोगाशिवाय अध्यक्षपद जहालपक्ष सोडीत नाही अशी ही एक प्रकारची कबूलीच होती. बरे ज्यानी सोशिॲलिस्ट पक्षाला मिळून हाइन्डमन साहेबांचे समर्थन केले ते हिंदुस्थानात आल्यावर नेमस्ताची भाषा वापरतील की काय ! कधीहि नाही. आणि

टिळक व लजपतराय यानी अध्यक्षपदावरून अशी भाषा वापरण्यापेक्षा दादाभाईनी ती वापरली तर तो फारच मोठा विजय होय! कोणाहि व्यक्तीच्या मोठेपणचा हा प्रश्न नव्हता तर राष्ट्रीय सभेच्या इभ्रतीचाच होता.

टिळकांची ही अटकळ सर्व बाजूनी अगदी बरोबर ठरली. कलकत्त्याची राष्ट्रीय सभा अगदी सोळा आणे टिळकांच्या अपेक्षेप्रमाणे झाली. दादाभाई यानी विलायतेमध्ये केलेल्या भाषणावरून 'दादाभाई काय काय सांगणार' याचे टिळकानी केसरीत भाकीत केले होते ते अगदी तंतोतंत खरे झाले. ता. १ जानेवारी १९०७ च्या केसरीत लिहिल्याप्रमाणे "कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेवर केसरीच्या मतांचा पूर्ण छाप बसला व राष्ट्रीय सभा केसरीच्या मताकडे पूर्णपणे झुकली." इतकेच नव्हे तर इंग्लिशमन पत्रानेहि असे म्हटले की "यंदाची राष्ट्रीय सभा सर्वतोपरी जहालपक्षाचे हातात गेली. स्वराज्याचा प्रश्न लोकापुढे प्राधान्याने मांडून दादाभाईनी राष्ट्रीय सभेस जहाल करून सोडले."

वंगभंगाच्या चळवळीमुळे हक्कवादी व याचनावादी या दोन पक्षात गेली दोन वर्षे बराच मतभेद झाला होता. व स्वदेशी आणि बहिष्कार यांचा राजकीय 'अडवणुकीचे शस्त्र' या नात्याने राजकारणात उपयोग करावयास राष्ट्रीय सभेने परवानगी द्यावी की न द्यावी हाच वादाचा मुद्दा असल्याकारणाने सर्व प्रांताचे पुढारी यंदा आळस न करिता राष्ट्रीय सभेस आले होते. खुद्द बंगाली लोकात एक विशेष प्रकारचा उत्साह दिसत असून आपण काही तरी एका नव्या गोष्टीस प्रारंभ करीत आहोत या भावनेने प्रत्येक जण राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा करण्यात निमग्न होता. व दादाभाई कलकत्त्यात येऊन हजर होतात तो दोन्ही पक्षांची प्रमुख मंडळी आपापल्या मतांचा खल करून वादाकरिता सज्ज झाली होती. त्यामुळे यंदा कॉंग्रेस बुडणार असे भाकित कॉंग्रेसच्या हितशत्रूनी केले पण दुर्दैवाने ते खोटे ठरले.

कलकत्यास दादाभाईचे अभूतपूर्व स्वागत झाले. मानपत्रांचा फुलांचा व जयजयकारांचा तर दादाभाईवर इतका वर्षाव झाला की खऱ्याखुऱ्या राजाना व राजपुत्रानाहि त्या सन्मानाचा हेवा वाटला असेल. राष्ट्रीय सभेस दीड दोन हजार प्रतिनिधी आले असून दररोज आठदहा हजाराहून अधिक प्रेक्षक येत. मंडपाच्या पताकावर कमानीवर जिकडे तिकडे 'स्वदेशी बहिष्कार व स्वराज्य ही त्रयी विसरू नका' अशी वचने सुवर्ण अक्षरानी लिहिली असून लोकांची इच्छा काय ते ठळक रीतीने दाखविण्यात आले होते.

पहिल्या दिवशी दादाभाई यांचे भाषण झाले. ते या पूर्वीच्या अध्यक्षांच्या भाषणाहून अगदी वेगळ्या स्वरूपाचे झाले. अलंकारिक मृदु संदिग्ध अशी दरबारी भाषा वापरण्याची पूर्वपरंपरा सोडून देऊन स्पष्ट व सडेतोड भाषा दादाभाईनी या आपल्या भाषणात वापरली आहे. स्वराज्याच्या ध्येयाचा त्यानी जाहीर स्पष्टोच्चार केला. इतकेच नव्हे तर राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी व बहिष्कार हे स्वावलंबनाचेच मार्ग राष्ट्राने यापुढे अंगिकारावे असे सांगितले. तसेच पार्लमेंट सभेस

जे आपण अर्ज करतो ते भिक्षा मागण्याकरिता नव्हे तर आपले हक्क मागण्याकरिता. होमरूल किंवा सेल्फ गव्हर्मेंट या इंग्रजी शब्दापुढेहि जाऊन 'स्वराज्य' या संस्कृत शब्दाचाच उपयोग करून दादाभाईंनी हिंदुस्थानची मागणी राष्ट्रीय सभेच्या वेशीवर टांगली. कॉंग्रेस या वळणावर जाईल अशी नेमस्तांस प्रथम कल्पनाहि झाली नसेल. पण सोनारानेच येऊन कान टोचावा अशी त्यांची अवस्था झाली! राष्ट्रीय सभेस २१ वे वर्ष संपून २२ वे वर्ष लागले. अर्थात् ती वयात आली. तेव्हा तिला नवे वळण मिळणे अपरिहार्यच होते. व राष्ट्रीय सभेचा व स्वराज्याच्या हक्काचा विवाहसंबंध घडवून आणून दादाभाईंनी राष्ट्रीय सभेस नुसता शुभाशीर्वाद दिला इतकेच नव्हे तर बाविसाव्या राष्ट्रीय सभेची मोठी कामगिरी म्हणून हीच गोष्ट पुनः निक्षून सांगितली. अखेरच्या भाषणांत त्यानी तरुण पिढीस उपदेश केला व ह्मणाले की "हा उद्देश डोळ्यापुढे सतत ठेवून तुम्ही तरुण पिढीचे लोक काम कराल तर जुन्या पिढीने पन्नास वर्षे केलेल्या कामाचे सार्थक होईल व जन्मभर केलेल्या श्रमांचे बक्षीस मिळाले असे मी समजेन!"

## (१९) महर्षि दादाभाई नौरोजी

दादाभाईंचे चरित्र हिंदुस्थानातील आबालवृद्धाना मशहूर असल्यामुळे त्यांच्याविषयी एवढेच सांगितले असता पुरे होईल की त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्ट त्यांच्या स्वार्थत्यागाची व स्वदेशभक्तीची खूण पटविणारी अशीच होऊन गेली. सन १८२५ साली दादाभाईंचा जन्म झाला. ती वेळ मुंबई इलाख्यात नुकत्याच होऊन गेलेल्या राज्यक्रांतीच्या संधिप्रकाशाची असल्यामुळे जुने मात्र सर्वस्वी गेले व नवे हाती लागावयाचे ते अद्यापि दूरच होते. यामुळे सामान्य मनुष्याची दिशाभूल होण्याचा तो समय होता. केवळ बुद्धिमत्तेच्या व उद्योगाच्या जोरावर त्यानी उत्तम शिक्षण मिळवून त्या शिक्षणाचा उपयोगहि ताबडतोब समाजसेवेकडे करण्यास सुरवात केली. जवळ जवळ ऐशी वर्षांपूर्वी ह्मणजे इंग्रजी अंमलाच्या अव्वलीस सरकारी नोकरीला किती तेज व मान्यता होती हे लक्षात घेतले ह्मणजे त्यानी हाती प्रत्यक्ष आलेली शिक्षणखात्यातील मोठी नोकरी कशी सोडली याचे सामान्य मनुष्यास आश्चर्यच वाटेल. सरकारी नोकरीच्या त्यागासंबंधाने त्यानी असे लिहून ठेविले आहे की 'सरकारी नोकरी सुटणे यासारखा दैवाचा दुसरा मोठा लाभ मला जन्मात दुसरा कोणताच घडला नाही.' व त्यांच्या पुढील चरित्रक्रमावरून पाहता त्यांचे हे उद्गार सर्वस्वी खरेच आहेत असे म्हणावे लागते.

स्वतंत्र देशसेवा हेच दादाभाईंचे ध्येय होते व शिक्षणक्रम संपविल्यानंतर दहाबारा वर्षांतच त्यानी समाजसुधारणा समाजशिक्षण राजकीय शिक्षण स्थानिक स्वराज्य वगैरे बाबतीत आपली बुद्धिमत्ता कल्पकता उद्योगशीलता, स्वार्थत्यागबुद्धि व नीतिधैर्य इतक्या तऱ्हेने लोकांनिदर्शनास आणली की मुंबई सारख्या शहरी त्यांची पुढारी लोकात गणना होऊ लागली. वयाच्या तिसाव्या वर्षा-

पासूनच लंडन येथे राहून 'लंडन इंडियन सोसायटी' 'ईस्ट इंडिया ॲसोसिएशन' वगैरे संस्थांचे काम त्यानी नावारूपास आणले. हिंदी लोकाना वरिष्ठ सरकारी नोकऱ्या मिळण्याविषयी त्यानी अतिशय खटपट केली व हिंदुस्थानातून शिक्षणाकरिता विलायतेस जाणाऱ्या तरुण हिंदी विद्यार्थ्यांची सोय लावून दिली. अशा रितीने वयाच्या चवेचाळीसाव्या वर्षाच्या आत दादाभाईनी हिंदुस्थानात व विलायतेतहि महत्त्वाची कामगिरी करून राष्ट्राची कृतज्ञता संपादिली. १८६९ साली मुंबई शहरच्या लोकानी त्याना कृतज्ञतापूर्वक मानपत्र अर्पण केले. यानंतर दादाभाईच्या उच्च प्रतीच्या राष्ट्रीय कामास सुरवात झाली. लोकशिक्षण समाजसुधारणा वगैरे विषय त्यांच्या आवडीचे असताहि ते सर्व बाजूस, ठेवून राष्ट्राच्या दुर्दशेची खरी मीमांसा काय व ती घालविण्यास खरा उपाय कोणता याची त्यानी आपल्या मनाशी कसून चौकशी केली. या चौकशीत त्याना असे दिसून आले की हिंदुस्थान देश हा निर्धन व इतर अनेक बाबतीत विपन्न होण्याचे खरे कारण त्यावरील परकीय अंमल व विशेषतः त्यातील एकतंत्री राज्यपद्धति होय. ही गोष्ट बोलून दाखविणे त्या काळच्या स्थितीत अत्यंत धैर्याचे किंबहुना धाडसाचेच काम होते. कारण राज्यकर्तृत्वाच्या अभिमानाने स्वतः अधिकाऱ्यांची दृष्टि तर अंध झाली होतीच. पण ब्रिटिश आमदानीतील पहिल्या तकलादू भरभराटीची जिल्हई लोकांच्याहि डोळ्याना अद्यापि दिपवून टाकीत होती. तथापि मनाला पटणारी गोष्ट स्पष्ट शब्दानी बोलून दाखवावयाचीच मग त्यात कोणाची मर्जी जावो किंवा कोणी आपला कितीहि उपहास करो असा त्यांचा बाणा असल्यामुळे, देशस्थितीचा सूक्ष्म व परिश्रमपूर्वक विचार करून काढलेले सिद्धांत अधिकाऱ्याच्या तोंडावर बोलण्यास दादाभाईनी केव्हाहि कमी केले नाही.

सामान्य लोकानी 'विक्षिप्त' म्हणून त्यांची टवाळी केली पण अखेर सत्याचाच विजय होत असल्यामुळे फक्त ब्यूरॉक्रसीशिवाय इतर सर्व लोकाची आपल्या सिद्धांताबद्दल खात्री करून दिली. दादाभाईच्या समकालीन असलेल्या सुशिक्षित किंबहुना राजकारणातहि पडणाऱ्या हिंदी गृहस्थात स्वतः दादाभाईइतक्या फार काय त्यांच्याहून कांकणभर अधिक बुद्धिमान अशा व्यक्ती काही थोड्या थोडक्या नव्हत्या. पण दादाभाईचे सूक्ष्म निरीक्षण परिस्थितीचा भेद करून जाणारी त्यांची बुद्धिमत्ता व सर्व जग एका बाजूस असले तरी आपला सत्सिद्धांत त्याच्यापुढे प्रतिपादन करण्यास लागणारे मनोधैर्य हे गुण एकट्या दादाभाईच्याच अंगी होते. यामुळे हिंदी राजकारणातील एका श्रेष्ठ तात्त्विक सिद्धांताचे संस्थापक व प्रवर्तक अशा तऱ्हेची म्हणजे आचार्यांची पदवी सर्व जगाला त्याना द्यावी लागली. या त्यांच्या सिद्धांतावर प्रचलित सर्व राष्ट्रीय राजकारणाचा पाया रचलेला आहे व या पायाच्या भक्कमपणावरच स्वराज्याच्या मागणीची इमारत रचली गेली आहे व टिकेलहि. आपल्या वयाची पुष्कळ मोल्यवान वर्षे निव्वळ आंकडे मोडीत घालवून प्रस्थापित केलेले सिद्धांत अधिकाऱ्यांपुढे ब्रिटिशजनतेपुढे व पार्लमेंटपुढे मांडून अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन कमिट्या व कमिशने बसवून तक्रारी मिनिटेहि लिहून—तात्पर्य ज्याला सनदशीर चळ-

वळ असे प्रौढ व उदात्त नांव देण्यात येते तिचा असा एकहि प्रकार राहिला नाही की जो दादाभाईनी केवळ गमतीखातर नव्हे तर अनेक वर्षे रात्रंदिवस परिश्रम करून आंतड्याला पीळ पाडून रक्त आटवून व स्वार्थत्याग पराकाष्ठेला पोचवून करून पाहिला नाही. एका शब्दात सांगावयाचे तर त्याना सनदशीर चळवळीच्या सत्त्वाचे पन्नास वर्षेपर्यंत परीक्षण करून व शेवटी नाइलाजाने 'सनदशीर चळवळीचे सत्त्व हरण झाले' असेच त्याना मोठ्या दुःखाने जगजाहीर करावे लागले. कलकत्यास तर त्यानी असे उद्गार काढले की 'मी निराशेचे इतके प्रसंग सोसले की त्यामुळे कोणाचेहि काळीज फाटून गेले असते व निराशेच्या वेडाने तो बंड करण्यास प्रवृत्त झाला असता'. ते म्हणाले 'मी फार झगडलो व अनेक वेळ झगडा करून यशाचा पेला ओठास नेऊन लावला. पण केवळ या ब्युरॉक्रसीने हा पेला उडवून दिला'.

दादाभाईना हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होण्याचा मान तीन वेळा मिळाला व तीन वेळी अध्यक्ष या नात्याने त्यानी केलेली भाषणे जो लक्षपूर्वक ताडून वाचील त्याला दादाभाईचे खरे चरित्र कळल्यावाचून राहणार नाही. १८९३ साली आत्मनिष्ठा व स्वावलंबन याकडे थोडीशी वळलेली त्यांची दृष्टि १९०६ साली कलकत्ता येथील भाषणात त्या दिशेला संपूर्ण वळली व स्वराज्य हेच ध्येय व स्वावलंबन हेच त्याचे साधन वगैरे सुप्रसिद्ध चतुःसूत्रीचा त्यानी उच्चार केला. आणि या सत्य सिद्धांताचा पुनरुच्चार करता करता 'जनपदाहितकर्ता' या नात्याची आपली कारकीर्द दादाभाईनी संपविली.

असो. दादाभाईच्या भाषणानंतर सबजेक्ट्स् कमिटी निवडण्यात आली. राष्ट्रीय सभेच्या रचनेचे काहीच नियम अस्तित्वात नसल्यामुळे विषयनियामक कमिटीच्या निवडणुकीत थोडी घाई व गोंधळ झाला. एकट्या मुंबईकरांचेच १५० ते १६० लोक निवडले गेले. राष्ट्रीय सभेचे खरे काम तिसऱ्या दिवशी झाले. स्वदेशी व बहिष्कार या दोन प्रश्नांचा राष्ट्रीय सभेस विटाळहि होऊ द्यावयाचा नाही अशा उद्देशाने चंग मारून काही मंडळी सभेस आली होती. पण राष्ट्रीय सभेत प्रत्यक्ष बलाबलाची परस्परास ओळख पटल्यामुळे सबजेक्ट्स् कमिटीत झालेल्या कडाक्याच्या वादाची पुनरावृत्ति राष्ट्रीय सभेच्या मंडपात निघून अनुकूल प्रतिकूल मते घेण्यापर्यंत पाळी आली नाही. समेटानेच सर्व सभा पार पडली व याचे श्रेय टिळकानी दादाभाई नौरोजी यानाच दिले.

या सभेत जे महत्त्वाचे ठराव पास झाले त्याबद्दलहि दोन शब्द सांगितले पाहिजेत. राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावासंबंधाने मतभेद नसल्याकारणाने तो सहज पास झाला. पण स्वदेशी व बहिष्कार यांची गोष्ट तशी नव्हती. थोडीशी गैरसोय सोसून किंवा जास्त किंमत देऊन म्हणजे झीज सोसून स्वदेशी मालास उत्तेजन द्यावे की नाही याबद्दल सभेत पुष्कळ वाद झाला. ना. मेथा यांस 'झीज सोसूनहि स्वदेशी स्वीकारणे' ही कल्पनाच पसंत नव्हती. परंतु त्यांचे हे मत काँग्रेसला पसंत पडले नाही. व शेवटी "झीज सोसून (at some sacrifice) स्वदेशी मालास

उत्तेजन द्यावे " असाच ठराव काँग्रेसमध्ये सर्वानुमते मंजूर झाला.

परंतु याहिपेक्षा खरा कडाक्याचा वाद बहिष्कारयोगाच्या ठरावावर झाला. हा ठराव असा " ज्याअर्थी हिंदुस्थानच्या हल्लीच्या राजकीय कारभारांत लोकांचे म्हणणे ऐकले जात नाही व लोकानी केलेल्या अर्जाचा योग्य विचार होत नाही त्याअर्थी बंगाल्यामध्ये प्रथमतः वंगभंगानिमित्त सुरू झालेला बहिष्कारयोग कायदेशीर होता व आहे असे काँग्रेसचे मत आहे. " हा ठराव केवळ बंगाल्यापुरता आहे किंवा बहिष्कारयोगाचा सामान्य रीत्या कायदेशीरपणा प्रतिपादन करणारा आहे याबद्दल सदर ठराव मंजूर होताना थोडीशी चर्चा झाली. आणि "बाबू बिपिनचंद्र पाल यानी त्याचा सामान्य सिद्धांत म्हणून जो अर्थ केला तो बरोबर नाही. ज्याना ही चळवळ मान्य असेल त्यानी निदान ती काँग्रेसच्या नावाखाली करू नये." असे प्रतिपादन करण्याकरिता मदनमोहन मालवीय व गोखले पुढे आले होते. पण त्यांच्या भाषणाचा सभेवर परिणाम झाला नाही. बहिष्काराचा ठराव जर सामान्य नव्हता तर त्याचे सामान्य स्वरूप काढून टाकण्यासारखे शब्द तो ठराव पास होण्यापूर्वीच त्यात घातले गेले असते. टिळक म्हणत " जर हा ठराव ' सर्वानुमते ' मंजूर झालेला आहे तर त्याचा अर्थ अमुकच पक्षाच्या मताप्रमाणे आहे असे सांगण्याचा खुद्द काँग्रेसच्या सेक्रेटरीस किंवा अध्यक्षासहि अधिकार आता राहिलेला नाही. इंग्रजी भाषा जर सर्वांस सारखीच अवगत आहे तर या ठरावाचा हा अमुकच अर्थ आहे असा शास्त्रार्थ कोणी का सांगावा ? व इतरानीहि तो का मानावा ? बहिष्कारयोगाचा इतर प्रांतातील लोकानी स्वीकार केलाच पाहिजे अशी काँग्रेसची कोणावर सक्ति नाही हे खरे. पण ज्या प्रकारच्या परिस्थितीत बहिष्कारयोग कायदेशीर आहे असे काँग्रेसने आपले मत दिले ती परिस्थिति बंगाल्यासच नव्हे तर सगळया हिंदुस्थानास एकसारखी लागू आहे. अर्थात् बहिष्कारयोग कोणत्याहि प्रांतात स्वीकारला गेला तरी काँग्रेसच्या मताप्रमाणे तो कायदेशीरच होय एवढे काँग्रेसमध्ये सर्वानुमते निर्विवाद ठरले आहे. "

बहिष्कारयोगाचा ठराव पास केल्याने एक प्रकारे सरकारच्या अडवणुकीच्या मार्गासच काँग्रेसने आपली संमति दिली. व बाबू बिपिनचंद्र पाल यानी तर आपल्या भाषणात असे सांगितले की बहिष्कार म्हणजे परदेशी मालावरच बहिष्कार घालावयाचा असे नाही तर " परवश लोकांच्या सर्व उद्योगाशी व व्यवस्थेशी कायदेशीर रीतीने फटकून राहून सरकारशी एक प्रकारे अडवणूक करावयाची. " चळवळ किंवा movement या शब्दावर कोटी करून त्यानी असे सांगितले की जी एका मुद्यावरून चळून व वळून दुसऱ्या मुद्यावर जाते ती खरी बहिष्काराची चळवळ ! बहिष्काराचे हे सर्वस्पर्शी स्वरूप त्या वेळच्या नेमस्ताना अर्थात् मान्य नव्हते म्हणूनच नेमस्तानी याविरुद्ध इतकी हाकाटी केली. हा ठराव व पालबाबूंचे त्यावरील भाषण हे त्या वेळच्या नव्या पक्षाच्या वृत्तींचे एक द्योतक होय. अशा परस्परविरोधी स्वभावाच्या दोन पक्षांचे एकमेकाशी पटणे कठीणच होते. दादा-

वळ असे प्रौढ व उदात्त नांव देण्यात येते तिचा असा एकहि प्रकार राहिला नाही की जो दादाभाईंनी केवळ गमतीखातर नव्हे तर अनेक वर्षे रात्रंदिवस परिश्रम करून आंतड्याला पीळ पाडून रक्त आंटवून व स्वार्थत्याग पराकाष्ठेला पोचवून करून पाहिला नाही. एका शब्दात सांगावयाचे तर त्याना सनदशीर चळवळीच्या सत्त्वाचे पन्नास वर्षेपर्यंत परीक्षण करून व शेवटी नाइलाजाने 'सनदशीर चळवळीचे सत्त्व हरण झाले' असेच त्याना मोठ्या दुःखाने जगजाहीर करावे लागले. कलकत्त्यास तर त्यानी असे उद्गार काढले की 'मी निराशेचे इतके प्रसंग सोसले की त्यामुळे कोणाचेहि काळीज फाटून गेले असते व निराशेच्या वेडाने तो बंड करण्यास प्रवृत्त झाला असता'. ते म्हणाले 'मी फार झगडलो व अनेक वेळ झगडा करून यशाचा पेला ओठास नेऊन लावला. पण केवळ या ब्युरॉक्रसीने हा पेला उडवून दिला'.

दादाभाईंना हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होण्याचा मान तीन वेळा मिळाला व तीन वेळी अध्यक्ष या नात्याने त्यानी केलेली भाषणे जो लक्षपूर्वक ताडून वाचील त्याला दादाभाईंचे खरे चरित्र कळल्यावाचून राहणार नाही. १८९३ साली आत्म-निष्ठा व स्वावलंबन याकडे थोडीशी वळलेली त्यांची दृष्टि १९०६ साली कलकत्ता येथील भाषणात त्या दिशेला संपूर्ण वळली व स्वराज्य हेच ध्येय व स्वावलंबन हेच त्याचे साधन वगैरे सुप्रसिद्ध चतुःसूत्रीचा त्यानी उच्चार केला. आणि या सत्य सिद्धांताचा पुनरुच्चार करता करता 'जनपदहितकर्ता' या नात्याची आपली कार-कीर्द दादाभाईंनी संपविली.

असो. दादाभाईंच्या भाषणानंतर सबजेक्ट्स् कमिटी निवडण्यात आली. राष्ट्रीय सभेच्या रचनेचे काहीच नियम अस्तित्वात नसल्यामुळे विषयनियामक कमि-टीच्या निवडणुकीत थोडी घाई व गोंधळ झाला. एकट्या मुंबईकरांचेच १५० ते १६० लोक निवडले गेले. राष्ट्रीय सभेचे खरे काम तिसऱ्या दिवशी झाले. स्वदेशी व बहिष्कार या दोन प्रश्नांचा राष्ट्रीय सभेस विटाळहि होऊ द्यावयाचा नाही अशा उद्देशाने चंग मारून काही मंडळी सभेस आली होती. पण राष्ट्रीय सभेत प्रत्यक्ष बलाबलाची परस्परास ओळख पटल्यामुळे सबजेक्ट्स् कमिटीत झालेल्या कडा-क्याच्या वादाची पुनरावृत्ति राष्ट्रीय सभेच्या मंडपात निघून अनुकूल प्रतिकूल मते घेण्यापर्यंत पाळी आली नाही. समेटानेच सर्व सभा पार पडली व याचे श्रेय टिळकानी दादाभाई नौरोजी यानाच दिले.

या सभेत जे महत्त्वाचे ठराव पास झाले त्याबद्दलहि दोन शब्द सांगितले पाहिजेत. राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावासंबंधाने मतभेद नसल्याकारणाने तो सहज पास झाला. पण स्वदेशी व बहिष्कार यांची गोष्ट तशी नव्हती. थोडीशी गैरसोय सोसून किंवा जास्त किंमत देऊन म्हणजे झीज सोसून स्वदेशी मालास उत्तेजन द्यावे की नाही याबद्दल सभेत पुष्कळ वाद झाला. ना. मेथा यांस 'झीज सोसूनहि स्वदेशी स्वीकारणे' ही कल्पनाच पसंत नव्हती. परंतु त्यांचे हे मत काँग्रेसला पसंत पडले नाही. व शेवटी "झीज सोसून ( at some sacrifice ) स्वदेशी मालास

उत्तेजन द्यावे " असाच ठराव काँग्रेसमध्ये सर्वानुमते मंजूर झाला.

परंतु याहिपेक्षा खरा कडाक्याचा वाद बहिष्कारयोगाच्या ठरावावर झाला. हा ठराव असा " ज्याअर्थी हिंदुस्थानच्या हल्लीच्या राजकीय कारभारांत लोकांचे म्हणणे ऐकले जात नाही व लोकानी केलेल्या अर्जाचा योग्य विचार होत नाही त्याअर्थी बंगाल्यामध्ये प्रथमतः वंगभंगानिमित्त सुरू झालेला बहिष्कारयोग कायदेशीर होता व आहे असे काँग्रेसचे मत आहे. " हा ठराव केवळ बंगाल्यापुरता आहे किंवा बहिष्कारयोगाचा सामान्य रीत्या कायदेशीरपणा प्रतिपादन करणारा आहे याबद्दल सदर ठराव मंजूर होताना थोडीशी चर्चा झाली. आणि "बाबू बिपिनचंद्र पाल यानी त्याचा सामान्य सिद्धांत म्हणून जो अर्थ केला तो बरोबर नाही. ज्याना ही चळवळ मान्य असेल त्यानी निदान ती काँग्रेसच्या नावाखाली करू नये." असे प्रतिपादन करण्याकरिता मदनमोहन मालवीय व गोखले पुढे आले होते. पण त्यांच्या भाषणाचा सभेवर परिणाम झाला नाही. बहिष्काराचा ठराव जर सामान्य नव्हता तर त्याचे सामान्य स्वरूप काढून टाकण्यासारखे शब्द तो ठराव पास होण्यापूर्वीच त्यात घातले गेले असते. टिळक म्हणत " जर हा ठराव ' सर्वानुमते ' मंजूर झालेला आहे तर त्याचा अर्थ अमुकच पक्षाच्या मताप्रमाणे आहे असे सांगण्याचा खुद्द काँग्रेसच्या सेक्रेटरीस किंवा अध्यक्षासहि अधिकार आता राहिलेला नाही. इंग्रजी भाषा जर सर्वास सारखीच अवगत आहे तर या ठरावाचा हा अमुकच अर्थ आहे असा शास्त्रार्थ कोणी का सांगावा ? व इतरानीहि तो का मानावा ? बहिष्कारयोगाचा इतर प्रांतातील लोकानी स्वीकार केलाच पाहिजे अशी काँग्रेसची कोणावर सक्ति नाही हे खरे. पण ज्या प्रकारच्या परिस्थितीत बहिष्कारयोग कायदेशीर आहे असे काँग्रेसने आपले मत दिले ती परिस्थिति बंगाल्यासच नव्हे तर सगळया हिंदुस्थानास एकसारखी लागू आहे. अर्थात् बहिष्कारयोग कोणत्याहि प्रांतात स्वीकारला गेला तरी काँग्रेसच्या मताप्रमाणे तो कायदेशीरच होय एवढे काँग्रेसमध्ये सर्वानुमते निर्विवाद ठरले आहे. "

बहिष्कारयोगाचा ठराव पास केल्याने एक प्रकारे सरकारच्या अडवणुकीच्या मार्गासच काँग्रेसने आपली संमति दिली. व बाबू बिपिनचंद्र पाल यानी तर आपल्या भाषणात असे सांगितले की बहिष्कार म्हणजे परदेशी मालावरच बहिष्कार घालावयाचा असे नाही तर " परवश लोकांच्या सर्व उद्योगाशी व व्यवस्थेशी कायदेशीर रीतीने फटकून राहून सरकारशी एक प्रकारे अडवणूक करावयाची. " चळवळ किंवा movement या शब्दावर कोटी करून त्यानी असे सांगितले की जी एका मुद्यावरून चळून व वळून दुसऱ्या मुद्यावर जाते ती खरी बहिष्काराची चळवळ ! बहिष्काराचे हे सर्वस्पर्शी स्वरूप त्या वेळच्या नेमस्ताना अर्थात् मान्य नव्हते म्हणूनच नेमस्तानी याविरुद्ध इतकी हाकाटी केली. हा ठराव व पालबाबूचे त्यावरील भाषण हे त्या वेळच्या नव्या पक्षाच्या वृत्तींचे एक द्योतक होय. अशा परस्परविरोधी स्वभावाच्या दोन पक्षांचे एकमेकाशी पटणे कठीणच होते. दादा-

भाई अध्यक्ष नसते तर सुरतेस जी फूट पडली ती या वर्षी कलकत्त्यासच पडली असती व राष्ट्रीय सभेशी पितृत्वाचे नाते जोडणाऱ्या कित्येक जुन्या पुढाऱ्यानी राष्ट्रीय सभेशी आपला संबंधहि तोडला असता ! ता. ८ जानेवारीच्या केसरीत टिळक लिहितात " राष्ट्रीय सभा आणि स्वराज्याचा हक्क यांचा ' सभा वयात आल्यानंतर ' वृद्ध महर्षि दादाभाई यांच्याकडून जो सशास्त्र विवाहसंबंध लावण्यात आला आहे तो राष्ट्रीय सभेशी पितृत्वाचे नाते जोडणाऱ्या कित्येक गृहस्थांस जरी पूर्ण पसंत नसला तरी तो तोडणे किंवा त्यात यत्किंचितहि व्यत्यय आणणे आता अशक्य आहे. नव्या तरुण पक्षाची मते देशास दिवसेंदिवस अधिकाधिक पटणे हे राजकीय प्रगतीचे लक्षण असून ही स्थिती आता क्रमप्राप्तच आहे. " आणि हे शब्द खरे ठरल्याचे लवकरच दिसून आले.

## (२०) सभा व परिषदा

कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेनंतर औद्योगिक परिषदेची बैठक झाली. अध्यक्ष विठ्ठलदास ठाकरसी हे असून प्रास्ताविक भाषण श्री सयाजीराव महाराज गायकवाड यानी केले. सयाजीराव हे राष्ट्रीयसभेसहि हजर राहिले होते. महाराजानी आपल्या भाषणांत बर्लीन पॅरिस व्हिएन्ना नेपल्स बोस्टन येथे तेथील सरकारने औद्योगिक शिक्षणासाठी केवढी प्रचंड विद्यालये स्थापन केली आहेत त्याची प्रत्यक्ष माहिती सांगितली. ठाकरसी यानी आपल्या भाषणांत स्वदेशी चळवळीचे श्रेय सर्वस्वी बंगाल प्रांताला दिले व रमेश चंद्र दत्त हे म्हणाले ' स्वदेशी चळवळीने एवढी मोठी औद्योगिक क्रांति केली आहे त्यापुढे राजकीय क्रांतीचेहि तेज मुळीच पडणार नाही.'

या सुमारास नेहमीप्रमाणे सामाजिक परिषदेची बैठक झाली. अध्यक्ष न्या. चंद्रमाधव घोस होते. पण त्यानी आपले असे मत दिले की सुधारणा म्हणजे हिंदुसमाजाच्या पूर्ण कल्पनेचे निर्मूलन करणे नसून नवीन परिस्थितीस योग्य असे तिला स्वरूप देणे ही होय. विशेष हे की जुन्या पक्षाची मते व मनोवृत्ति यास अनुसरून ठरावाची भाषा असावी असा खाजगी रीतीने अध्यक्षानी आग्रह धरला होता त्यामुळे ठराव पूर्वीच्या परिषदांच्या मानाने बरेच नरम झाले होते.

सामाजिक परिषदेचीच धाकटी बहिण महिला परिषद. ही २९ डिसेंबर रोजी बेथून कॉलेजात झाली. स्त्रीसमुदाय सुमारे १००० असून कुचविहाराच्या महाराणी अध्यक्ष होत्या. त्यांच्या व बडोद्याच्या महाराणीसाहेबांच्या भाषणात स्वदेशी तत्वांचे वारे बरेच संचार करीत होते. बडोद्याच्या महाराणी साहेबानी बंगाली स्त्रियानी स्वदेशी चळवळ चांगल्या रीतीने चालविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

राष्ट्रीय सभेनंतर पहिले राष्ट्रीय स्वदेशी संमेलन सभेचे मंडपातच भरले. हैदर टिपूचे वंशज नवाब सय्यद महमूद बहादूर हे अध्यक्ष असून गोखले भूपेंद्रनाथ बोस सुरेंद्रनाथ बानर्जी पाल लजपतराय अंबालाल टिळक केळकर वगैरे

मंडळी संमेलनास हजर होती. अध्यक्षाची सूचना करिताना केळकर यानी सांगितले की स्वदेशीस मुसलमान प्रतिकूल आहेत हे म्हणणे साफ खोटे आहे. स्वदेशीच्या कार्यास व्यवस्थित स्वरूप देण्याकरिता लजपतराय वगैरे अनेक पुढाऱ्यांची भाषणे झाली व ज्या प्रांतात स्वदेशी प्रांतिक कमिट्या स्थापन झाल्या नसतील तेथे त्या स्थापन करून स्वदेशी चळवळ वाढवावी असा ठराव टिळकानी मांडला व त्यांचे भाषण होऊन तो पसार झाला.

कलकत्याची राष्ट्रीय सभा झाल्यावर कलकत्ता कालेज स्केअर मध्ये पाल याचे अध्यक्षतेखाली टिळकांचे 'नवा पक्ष व त्याचे मार्ग' या विषयावर व्याख्यान झाले. प्रारंभीच टिळकानी सांगितले की जहाल मवाळ हे नवीन शब्द निघाले आहेत ते सापेक्ष समजा. कारण प्रगतीचा नियमच असा आहे की आजचा तुमचा हा जहाल उद्याचा मवाळ ठरणार. केवळ काही विशिष्ट हेतूने विशिष्ट भेद दर्शविण्याकरता हे शब्द योजावयाचे असतात. जुन्या पिढीचा अनुभव नव्या पिढीने घेऊन पुढे जावयाचे आहे. डिग्बी दादाभाई यानी जन्मभर अभ्यास करून जे शोध लावले ते जमेस धरून पुढे पाऊल टाकले पाहिजे. म्हणूनच यापुढे अर्ज व विनंत्या हा जुन्या पक्षाचा कार्यक्रम टाकाऊ ठरतो. मोर्ले वगैरे उदार मुत्सद्यांवर अवलंबून बसण्यात अर्थ नाही. हिंदुस्थानची निकृष्ट दशा झाली आहे हे आम्हाला कळते तसेच ब्रिटिश मुत्सद्यानां कळत नाही असे थोडेच आहे. अर्ज व विनंत्यानी ती गोष्ट त्याना पटवून थोडीच द्यावयाची आहे! ती त्याना सहज दिसतेच आहे. पण स्वार्थाकरिता ते तिकडे दुर्लक्ष करावयास तयार झाले आहेत. म्हणून स्वराज्य मिळेपर्यंत आपण सरकारची अडवणूक उर्फ सत्याग्रह चालू ठेवला पाहिजे. बंगालची फाळणी हे एक दुःख आहे. पण स्वराज्याचा अभाव हे खरे रोगनिदान आहे व त्याला अडवणूक हेच एक शस्त्र आहे.

### (४) जपानी कॉन्सलचे टिळकांना पत्र

मुंबई १ जून १९०४

आमच्या दुःखनिवारण फंडाला तुम्ही पुण्यास एक हजार रुपये जमवून पाठविले याबद्दल आह्मी तुमचे फार आभारी आहो. आम्ही याबद्दल किती ऋणी आहो हे किती लिहावे ?

### (५) दादाभाई नौरोजी यांचे टिळकांना पत्र

लंडन २ नोव्हेंबर १९०४

मी जे लिहिणार आहे ते केवळ स्नेहभावाचे असे समजा. पूर्वी न्यू इंग्लिश स्कूल काढण्याचे वेळी तुमचे माझे भाषण झाले ते मला चांगले स्मरते. तेथपासून पुढे तुमचे कामहि फार चांगले झाले आहे. तुम्ही छळहि पुष्कळ सोसला. मी आज पत्र लिहितो याचे कारण असे. पुढील राजकारणाच्या क्षेत्रात युद्ध करण्याचे राष्ट्रीय सभा हे एक आपले शस्त्र झाले आहे. आज ती सर्व गुणपूर्ण नाही. पण हळुहळु तिला आम्ही अधिक बळकट करू इच्छितो. केसरीतून तुम्ही तिला खाली ओढीत आहा असे कळते. आणि अशा रीतीने जर ती एकदा निर्बल झाली व तिला इजा पोचली तर याचीच दुरुस्ती करण्याला आम्हाला पुष्कळ काळ लागेल. सरकाराशी भांडताना आम्ही सर्व एक दिलाचे असले पाहिजे. टीका करावयाची तर ती स्नेहभावाची व उत्तेजनकारक असावी. कॉंग्रेस आज मोडली तर ते हिंदुस्थानाला मोठे संकट व अँग्लो इंडियन लोकांचा तो एक मोठा जय होईल. तुम्ही मुंबईस हजर राहून विषयमंडळात सूचना मांडा व बहुमताने निकाल होईल तो सर्वांनी मान्य करावा. राष्ट्रीय कार्याकरिता तुम्हाला फार कष्ट सोसावे लागले म्हणून तुमच्या प्रयत्नाला सहजच वजन येईल. या करिता तुमच्या नेहमीच्या उत्साहाने राष्ट्रीय सभेला बळकटी आणण्याचा तुम्ही प्रयत्न करा. आम्हाला ऐक्यबुद्धि संपादून काम वाढेल व कामाला माणसे अधिक मिळतील असेच करावयाचे आहे. तुमची दोन वर्तमानपत्रे व स्वतः तुम्ही यांच्याकडून देशहिताचे असे किती तरी काम होईल. मी लिहितो ते स्नेहभावाचे समजा.

### (६) स्विनी यांचे टिळकांना पत्र

लंडन ९ नोव्हेंबर १९०४

डिग्बी साहेब मारल्यामुळे बराच घोटाळा झाला. तुम्हाला खटल्याच्या कामी खर्च आला तो भरून देण्याचे सरकाराने काय केले ? हल्लीचे प्रधानमंडळ टिकणार नाही. पण लिबरल प्रधानमंडळ आले तरी काय होईल ही शंकाच आहे. फौलर हे ब्रॉडरिकइतकेच वाईट आहेत व ते स्टेट सेक्रेटरी होऊ नयेत अशी येथे आमची

खटपट आहे. लिबरल कॉन्झरव्हेटिव्ह यात फरक इतकाच की लिबरल लोक आमचे काही ऐकून तरी घेतात. कॉन्झरव्हेटिव्ह हे हिंदुस्थानाकडे मुळी लक्षच देत नाहीत. पुण्याचे काही पुढारी येंदा मुंबईच्या काँग्रेसला जाणार नाहीत असे म्हणतात. माझा एक मित्र म्हणतो की या फुटीचे परिणाम वाईट होतील. आयर्लंडात काय व कोणीकडे काय शत्रू सन्मुख असता लोकपक्षाने निदान वरकरणी तरी एकी ठेविली पाहिजे. आम्ही आयरिश लोक मोठे भांडखोर आहो आणि त्यामुळे आमचे फार मोठे नुकसान झाले आहे. हिंदुस्थानाचा निरुत्साह होण्याला पुष्कळ कारणे झाली आहेत. पण ही प्रतिक्रिया संपून पुनः पूर्वीचा क्रम सुरू होईल अशी चिन्हे आहेत. प्रो. गोखले याना त्यांच्या उद्योगप्रियतेमुळे राष्ट्रीय सभेत वाजवीहून अधिक वजनदारी देण्याचा आम्हा मंडळींचा विचार असल्याच्या बातम्या तुमच्या कानावर येत असतील. पण तशी आमची इच्छा नाही. गोखले यांचा उत्साह व त्यांचे वक्तृत्व यांचा उपयोग करून घ्यावा असे आम्हाला सहजच वाटते. पण त्यामुळे धैर्य व कोणालाहि न हार जाणारा करारीपणा हे गुण ज्या इतर पुढाऱ्यात आहेत त्यांची किंमत आम्ही कमी मानितो असे नाही. राष्ट्राच्या मोठ्या कामाला अनेक लोक व अनेक स्वभावाचे लोक लागतात. या गोष्टी मी स्पष्टपणे लिहिल्या याबद्दल मला क्षमा करावी. वेडरबर्न हे हिंदुस्थानचे मोठ्या कळकळीचे हितकर्ते आहेत. स्वभावाने ते मोठे सामोपचारवादी असले तरी हिंदुस्थानाकरिता झगडत आहेत. ते व त्यांचे मित्र यांच्यामध्ये कलह उत्पन्न झाल्यास ते बरे नव्हे. सर हेनरी कॉटन यांचा कोणत्याच बाजूला पक्षपात नाही म्हणून सर्वांनी त्याना मदत केली पाहिजे. सरदार नातू व केळकर याना आमचे नमस्कार सांगा.

[ मुंबईच्या राष्ट्रीय सभेसंबंधाने टिळकांच्या धोरणाविषयी प्रतिकूल व विपरीत अशा अनेक गोष्टी विलायतेस पत्रे लिहून कोणी तरी कळविल्या असल्या पाहिजेत. सभेत कोणत्याहि तऱ्हेने फूट किंवा बखेडा करण्याचा टिळकांचा विचार नव्हता. काँग्रेसचेच काम पण त्याची इकडे व विलायतेत अधिक जोराने खटपट व्हावी इतकेच त्यांचे म्हणणे होते. सर विलियम वेडरबर्न हे सामोपचारवादी असल्याचे टिळकाना माहीत होते म्हणून ते इकडे येणार असे कळताच त्यांच्या स्वागतार्थ टिळकांच्या सूचनेवरून त्याना सार्वजनिक सभेने खालील आशयाची तार पाठविली "आपण हिंदुस्थानचे अत्यंत विश्वासु मित्र आहा व या नात्याने सर्व महाराष्ट्रातर्फे सभा आपले स्वागत करीत आहे. हिंदुस्थानातील सनदशीर चळवळीचे प्रथमपासून आपण पुरस्कर्ते आहाच. व हल्ली या चळवळीत झालेली सर्व फाटाफूट नाहीशी करून सदर चळवळीचे प्रातव्य आणि तिचा प्रयत्न यांच्या संबंधी पूर्वीप्रमाणेच ऐकमत्य स्थापित करण्याच्या आपल्या उदार मनाच्या प्रयत्नास यश येवो अशी सभेची मनापासून इच्छा आहे." तसेच पुण्यातील शेपाचास गृहस्थांच्या सह्यानिशी त्याना खालील पत्रीहि मुद्दाम पाठविण्यात आले. "वि. वि. हिंदुस्थानच्या जुन्या स्नेह्यापैकी व अत्यंत विश्वसनीय हितचिंतकापैकी आपण एक आहा, व या नात्याने आम्ही

आपले स्वागत करितो. हिंदुस्थानास येण्याचे आपले जे अनेक हेतु आहेत त्यापैकी जुन्या राष्ट्रीय सभेतील अनेक पक्षामध्ये शक्य असल्यास सलोखा करणे हाहि एक आहे असे आपण जाहीर केलेले ऐकून आम्हास फार समाधान वाटले. व या हेतूच्या सिध्यर्थ संयुक्त राष्ट्रीय सभा भरविण्याचे कामी आम्हास जी मदत देणे शक्य असेल ती आम्ही आपणास खुषीने देऊ. तरी आपण योजलेले काम कोणत्या मार्गाने करण्याचा आपला विचार आहे हे कळविण्यात आले असता आम्ही आपले आभारी होऊ. क. हे. वि. " ]

### ( ७ ) वेडरबर्न यांचे टिळकाना पत्र

मेरिडिथ १७ नोव्हेंबर १९०४

मी कॉंग्रेसला येत आहे हे तुम्ही ऐकलेच असेल. पार्लमेंटच्या पुढील निवडणुकीच्या वेळी हिंदुस्थानच्या कारभाराची चर्चा करण्याला मोठी संधि मिळणार आहे. तरी आपण सर्व मिळून प्रयत्न करू. इंडिया पत्रात याविषयी मी सूचना केल्याच आहेत. त्या तुम्हाला बहुधा पसंत पडतील. कसेहि असले तरी तुम्ही आम्ही सर्वच मिळून बसून विचार ठरवू.

### ( ८ ) श्री. कृ. कोल्हटकर यांचे केळकराना पत्र

तेल्हारा १२ जानेवारी १९०५

पंचांगशोधनासंबंधाचा निर्णय मला मान्य होण्यासारखा नसल्यामुळे त्याविषयी लेख लिहिण्यापुरता उत्साहहि अंगी नाही. रा. केतकरांचा करणग्रंथ पंचांगे तयार करण्याच्या कामी आधारभूत धरण्याच्या योग्यतेचा असता नवीन करणग्रंथ करण्याचा ठराव झाला हे चांगले झाले नाही. तरी पण टिळकांच्या मध्यस्थीने नवीन बीजसंस्कार घेण्यासंबंधाने हिंदुस्थानातील प्रमुख ज्योतिषांचे ऐकमत्य झाले ही गोष्ट त्याना व एकंदर महाराष्ट्राला भूषणप्रद आहे. मात्र युरोपियन ज्योतिषानी ५०।१०० वर्षे वेध घेऊन ठरविलेल्या ग्रहगतीत आपले हिंदु ज्योतिषी सदोष यंत्राच्या जोरावर थोडे दिवस वेध घेऊन काय काय सुधारणा करणार आहेत न कळे. मात्र या उपद्यापीपणामुळे आपणात थोडेसे कार्यकर्तृत्व येईल असे वाटते.

### ( ९ ) मोनोटाइप कंपनीचे टिळकाना पत्र

कलकत्ता एप्रिल १९०५

आपले २१ तारखेचे पत्र पोचले. संपूर्ण यंत्राची किंमत ६३० पौंड आहे. प्रत्येक वेगळ्या की–बोर्डला शंभर पौन्ड पडतात. मुंबईस यंत्र पोचण्याला वीस पौंड खर्च येईल. या यंत्राचा उपयोग देवनागरी ठशाना करणे ही जराशी अवघड

गोष्ट आहे. निदान त्या टायपांच्या मेट्रिसा येथे तयार होणार नाहीत. आणि करता आल्या तरी किती पाहिजेत हे कळविल्याशिवाय त्या कापून घेण्याविषयी काही सांगता येणार नाही. तरी लंडन येथील मुख्य कचेरीशी पत्रव्यवहार करणे बरे. तुमच्या टायपांचा सबंध एक गट तिकडे पाठवा व वर्णमाला जोडाक्षरे यांचा एक तक्ता मजकडे पाठवा. कदाचित् थोडया खर्चात ही गोष्ट होऊ शकेल आणि तिचा फार उपयोग होईल. दोन यंत्राकरिता मिळून एकापेक्षा अधिक जादा की-बोर्ड घेण्याचे कारण नाही.

### (१०) लॉर्ड हिल यांचे केळकराना पत्र

मुंबई २७ एप्रिल १९०५

तुम्ही मला लिहिले त्याप्रमाणे तुमची प्रामाणिक मते आहेत हे मला पूर्णपणे माहीत आहे. म्हणून तुमचे समाधान व्हावे याकरिता मी तुम्हाला हे पत्र लिहीत आहे. रानडे यांचा पुतळा उघडण्याच्या वेळी 'सवंग लोकप्रियतेला हपापलेले काही लोक' असे मी बोललो ही गोष्ट खरी. पण ते बोलताना माझ्या मनात टिळक नव्हते हे मी तुह्माला निक्षून सांगतो. त्यांच्याहून फार हलक्या प्रतीचे आणि कमी प्रामाणिक असे वक्ते जी भाषणे करितात त्यानाच उद्देशून माझे बोलणे होते. टिळकांच्या संबंधाने तुमचे व माझे बोलणे अगदी मोकळ्या मनाने झाले असे असता हे शब्द मी टिळकांना उद्देशून बोललो असे टिळकांच्या मनात तरी कसे आले!

### (११) तालचेरकर यांचे केळकराना पत्र

मुंबई ६ सप्टेंबर १९०५

या पत्रासोबत पाठविलेले उतारे १८८८ च्या 'कल्चर' नामक मासिकातील आहेत. त्या वेळी ब्राह्मोसमाजाचे ते मुखपत्र होते. ते हल्ली बंद आहे. स. १८८८ च्या २१ आक्टोबरच्या सुबोधपत्रिकेतहि 'हिंदुस्थानची नैतिक उन्नति' या विषयावर डॉ. भांडारकर यांची मते तुम्हाला पाहावयास मिळतील. डॉ. भांडारकर यानी एका फ्रेंच गृहस्थाजवळ आपल्या समाजाची निंदा केली. यावर तुह्मी टीका केली म्हणून विरुद्ध पक्षाने मोठा गहजब चालविला आहे. परंतु हे उतारे व हा अंक पाहिल्यास सदर फ्रेंच गृहस्थाजवळ अशा गोष्टी बोलणारे हे मोठे गृहस्थ डॉ. भांडारकरच असले पाहिजे या तुमच्या अनुमानाचे समर्थन होईल.

### (१२) श्री. वाघोलकर यांचे टिळकाना पत्र

कोल्हापूर २८ जून १९०५

शिष्यस्वामींचा ठराव झाल्यानंतर काय करावे या विचारात ब्राह्मण मंडळी होती. पुढे त्यांचे कारभारी आले. त्यानी ब्रम्हवृंदास जमवून शरण आल्यासारखे

करून आमचेवरचे संकट काढा असे म्हणाले. व उभयतांचा एक विचार झाल्यावर कारभारी ब्राह्मण मंडळीस घेऊन महाराज सरकाराकडे गेले. शिष्यस्वामींचा ठराव मान्य असल्यास उत्पन्न सोडतो असे म्हणून सोडल्याचा आविर्भाव केला आहे. ब्राह्मण मंडळीनेहि ठराव कबूल आहे अशा सह्या देण्याचे काम सुरू केले आहे. शिष्यस्वामींचे कारभारी आले होते त्या वेळी प्रायश्चित्त मौंजीबंधन होऊन श्री स्वामी सांगतील तितके वेदोक्त करणेचे होते असे समजते. हल्ली महाराजांचे म्हणणे स्वामींचा ठराव मान्य केला म्हणजे झाले. तुम्ही तिकडे कसे का करानात! पण दुसरीकडून हकीगत समजते त्यात वेदोक्त केलेखेरीज उत्पन्न सोडीत नाहीत असे म्हणतात.

### ( १३ ) हयाशी यांचे टिळकाना पत्र

मुंबई ६ जुलै १९०५

" जपान सरकाराकडून पत्र आले त्यावरून फेब्रुवारी महिन्यात युद्ध-दुःख-निवारण फंडाला १७५३० येन इतकी वर्गणी मिळाली असे तुमच्या मौल्यवान पत्रद्वारे जाहीर कराल काय ? या संबंधाच्या रीतसर पावत्या जपान सरकाराकडून लौकरच पाठविण्यात येतील.

### ( १४ ) करंदीकर यांचे केळकराना पत्र

सातारा २२ सप्टेंबर १९०५

विलायतेस डेप्युटेशन पाठविण्याची बोलवा आहे. लोकहि उत्सुक आहेत. पुष्कळाना या कामी पैशाचा प्रश्न येतो. मी स्वतः आपल्या खर्चाने जाण्यास तयार आहे. पण या गोष्टीचा तुम्ही उगाच गवगवा केला. विलायतेस जाऊन येण्याचा खर्च फार यामुळे कोणाचेहि मन मागे घेते. शिवाय डेप्युटेशन केव्हा निघणार हेहि निश्चित कळत नाही. बनारसची कॉंग्रेस होणार व मग डेप्युटेशन जाणार असे म्हणणे म्हणजे मनोराज्य करण्यासारखेच आहे.

### ( १५ ) डॉ० जठार यांचे केळकराना पत्र

मँचेस्टर ५ आक्टोबर १९०५

हल्लीच्या बहिष्काराच्या चळवळीसंबंधाने येथे प्रतिकाराची चळवळ सुरू आहे. येथील इंग्रज लोक म्हणतात या चळवळीत खुनशीपणा व सूड घेण्याची इच्छा दिसते. प्रतिकाराकरिता चळवळ करा म्हणून ते हिंदुस्थान सरकारला लिहिणार आहेत. आणि हिंदुस्थानातील गिरण्यात मजूर लोकाना १५ तास काम करावे लागते या गोष्टीला कायद्याने प्रतिबंध घालावा अशी मागणी ते करणार आहेत. ना. गोखले व सर वुइलियम वेडरबर्न हे उद्या येथे एका सभेपुढे व्याख्यान देण्यास येणार आहेत तेव्हा काय होईल ते कळवीन.

(१६) सरलादेवी यांचे केळकराना पत्र

लाहोर ८ नोव्हेंबर १९०५

माझा विवाह झाल्याचे तुम्ही ऐकलेच असेल. तुम्ही लिहिले की 'या वेळी तुम्ही बंगाल्यात किंवा महाराष्ट्रात हव्या होता'! पण आता तशी नाही खरी. येथे येऊन माझी निराशा झाली. इकडील पुढाऱ्यांचा मोठेपणा आणि टिळक गोखले यांचा मोठेपणा यात मला पुष्कळच अंतर दिसते. इकडील पत्राचे संपादक बंगाली होते व पंजाबपेक्षा बंगालचेच अधिक लिहित. पंजाबी हे नवे पत्र इकडे सुरू झाले पण ते जवळ जवळ एक खांबी व एकाच पुढाऱ्याचे मत प्रगट करणार. लजपतराय व हरकिसनलाल यांचे बरे नाही. या दृष्टीने मला बंगालचे पुढारी अधिक बरे वाटतात. टिळक व गोखले यानी आधी मोठमोठी कामे केली यामुळेच ते मोठे झाले.

(१७) राजेंद्रनाथ घोस यांचे टिळकाना पत्र

कलकत्ता २३ जान्युआरी १९०६

मी हली शंकराचार्यासंबंधाने एक ग्रंथ लिहित आहे. भारतीय व युरोपियन पंडितानी आचार्यासंबंधाने केलेली चर्चा सर्व एक ठिकाणी करून देण्याचा विचार आहे. शृंगेरीस गेलो. मलबार प्रांतात हिंडलो. दंतकथा मिळविल्या. हस्तलिखिते जमविली. तरी आपणहि काही मार्ग दाखवावा अशी विनंति आहे. इंडियन अँटिक्वेरीचे अंक याकरिता पाहिले. आपल्या भाषेत या विषयावर काही ग्रंथ असल्यास कळवा. अनेक विषयावर आपल्या प्रांतियानी केलेली चर्चा फार चांगली असते असे दिसून आले आहे. द्वारकेहून जाऊन आल्यावर आपणास समक्ष भेटणार आहे.

(१८) गोखले यांचे केळकराना पत्र

कलकत्ता ७ फेब्रुवारी १९०६

गेल्या रविवारचा मराठा वाचला. हिंदुस्थान आणि मजूरपक्ष या वरील तुमचा अग्रलेख वाचून आनंद झाला. खरी गोष्ट अशी आहे की लाला लजपतराय यांचेपेक्षा मजूर कामकरी लोकांच्या दुप्पट सभापुढे मी स्वतः व्याख्याने दिली आहेत. अर्थात् इतर काही लोक मजूरपक्षाला धरून राहतात आणि आम्ही मात्र त्यांच्या पासून फटकून वागतो हे म्हणणे असंबद्ध आहे. मला वाटते ही कल्पना कोणातरी माणसाच्या सुपीक डोक्यातून निघाली आहे. आणि त्याला कारण कदाचित् इतकेच असेल की लाला लजपतराय यांच्या भाषणाची सरणी व माझ्या भाषणाची सरणी यात काही काही फरक अगदी उघड पडतात. मी ता. १ मार्च रोजी पुण्याला परत येणार आहे.

### (१९) बापूराव गोखले यांचे केळकरांना पत्र

टोकियो ( जपान ) १२ मे १९०६

उद्या आम्ही एका बौद्धमंदिरात शिवाजीमहाराजांचा वार्षिक उत्सव करणार आहोत. गतवर्षी बॅरन कांडा हे अध्यक्ष झाले होते. त्यानीच यंदा फिरून अध्यक्ष होण्याचे कबूल केले होते. पण आयते वेळी त्याना काही काम आल्यामुळे येता येणार नाही असे कळते. गतवर्षी 'प्राच्य विद्यार्थी संघ' म्हणून एक मंडळ आम्ही काढले. त्यात हिंदी जपानी फिलीपिनो चिनी कोरियन सियामीज असे अनेक देशचे विद्यार्थी आहेत. यंदा या मंडळाच्या सभासदानी उत्सवात सामील होण्याचे कबूल केले आहे. याला काही बंगाली विद्यार्थ्यांनी हरकत घेतली व उत्सवात सामील न होण्याविषयी इतर काही विद्यार्थ्यांचे मन वळविण्याचा प्रयत्नहि केला. पण त्यांचे कोणी ऐकले नाही. आणि यंदाचा उत्सव खूप थाटाचा होईल अशी आम्हाला आशा आहे."

### (२०) सरलादेवी यांचे केळकरांना पत्र

लाहोर ४ जुलै १९०६

मराठ्यातील लेख वाचला. तुमच्या लोकांचा मार्मिकपणा इकडे नाही. राष्ट्रीय कार्यात पंजाबातील लोक अजून लहान मुलासारखे आहेत. इकडे लजपतराय यांच्या विरुद्ध थोडी चळवळ सुरू आहे. पण मी त्याना म्हणत असते की त्याना आपले काम करू द्या व इतर पुष्कळ जागा रिकाम्या आहेत त्यात नव्या लोकांची भरती करा. येथील विद्यार्थ्यांच्या चळवळीत पुढारीपण कोणी घ्यावे या विषयी वाद सुरू आहे. संपांत विद्यार्थ्यांनी हार खाल्ली ही गोष्ट खरी नाही. न्या. चतर्जी यांच्या मार्फत एक खाजगी पत्र पाठवून विद्यार्थ्यांच्या सर्व तक्रारी आम्ही दूर करू असे आश्वासन दिले म्हणूनच मुले परत गेली. टिळकाना 'कर्म' या विषयावर काही प्रश्न लिहून पाठविले व त्यांची उत्तरे मागितली होती ती त्यानी अजून पाठविली नाहीत. तरी पाठविण्याविषयी आठवण कराल काय? आम्ही दोघे जुलै अखेर काबूलला जाणार आहोत. परवाने मागितले आहेत. बंगाल्यात सर्व पक्ष मिळून काम करीत आहेत हे पाहून आनंद वाटतो.

### ( २१ ) गणेश व्यंकटेश जोशी यांचे केळकरांना पत्र

सातारा १६ ऑगस्ट १९०६

बंगाल्यात किती चळवळ सुरु आहे. इकडे नाही याबद्दल वाईट वाटते. फाळणीने तिकडे चळवळ जोरावली हे खरे पण इकडेहि सरकारविरुद्ध तक्रारी काही कमी नाहीत. म्हणून लोकजागृतीची इकडेहि आवश्यकता आहे. मुंबई शहरात

अनेक प्रकारची वस्ती यामुळे अशा चळवळीत पुढारीपण घेण्याला मुंबई योग्य नाही. पुणे अहमदाबाद अशा शहरानी पुढारीपण घेतले पाहिजे. ७ आगस्टला बंगाल्यात स्वदेशी बहिष्काराची चळवळ होते त्याप्रमाणे आपल्या गणपति उत्सवात अशी चळवळ व्हावी असे वाटते. मात्र देवळे किंवा प्रार्थनेच्या जागा वर्ज मानाव्या, कारण सर्व जातीचे व धर्माचे लोक आपणाला हवे. ही सूचना टिळकांपुढे ठेवण्या-करिता तुमच्याकडे पाठवीत आहे. तरी तिचा विचार करून आपला अभिप्राय कळवावा.

# भाग ५

## [ सन १९०७ ]

### ( १ ) हिंदुमुसलमानांचे ऐक्य

राष्ट्रीय सभेनंतर हिंदुमुसलमानांच्या मनातहि ऐक्याची थोडी प्रवृत्ति दिसू लागली. मुसलमानानी कॉंग्रेसशी फटकून वागण्याला अवकाश होता. कारण मोर्ले मिंटो सुधारणा अद्याप दिसू लागल्या नव्हत्या! राष्ट्रीय सभेचा द्वेष करण्याकरिता डाकाच्या नबाबसाहेबानी अँग्लो इंडियनांच्या चिथावणीवरून प्रतिस्पर्धी मुस्लीम लीग स्थापन केली तरी पुष्कळ मुसलमानाना ही चळवळ पसंत नव्हती. कारण बंगालच्या फाळणीचा निषेध करण्याचा ठराव डाकाच्या नबाबसाहेबांचे बंधू यानीच राष्ट्रीय सभेपुढे मांडला होता. इतकेच नव्हे तर मुसलमानांचे ५०–६० प्रतिनिधीहि कलकत्त्यास हजर होते. स्वदेशीच्या ठरावाला टिळकानी उपसूचना मांडली. त्यास अनुमोदन देण्यात रसूल, अलीगडचे फाजल हुसेन व काझी सयफ उद्दीन या प्रमुख गृहस्थांची नावे होती. यानंतर कलकत्त्यास जमलेल्या पुढारी मुसलमानानी दोन महत्वाच्या सभा भरविल्या. पहिल्या सभेत बंगालच्या मुसलमान संघातर्फे बडोद्याच्या हायकोर्टचे जज्ज शामसुद्दीन तयबज्जी यांचे व्याख्यान झाले. त्यात त्यानी हिंदु मुसलमानांच्या ऐक्याचे विवेचन करून मुसलमानानीहि राष्ट्रीयत्वाची बंधने पाळली पाहिजेत असे सांगितले. डाकाच्या नबाबसाहेबानी आरंभलेल्या भेदनीतीचा या सभेत निषेध करण्यात आला. तसेच या सभेत 'हिंदी मुसलमान संघ' या नावाच्या संस्थेची स्थापना करण्यात येऊन नबाब सयद महंमद बहादूर याना अध्यक्ष निवडले. दिल्लीचे हैदर रेझा हे या संस्थेचे सेक्रेटरी होते.

याच सुमारास अफगाणिस्थानचे अमीर हबीब उल्लाखान हे हिंदुस्थानात आले होते. अमीर साहेब हे स्वतंत्र बाण्याचे मुसलमान होते. इंग्रजी यंत्रकला व सामर्थ्य यांची ते तारीफ करीत व हे शास्त्रीय ज्ञान आपण संपादन केले पाहिजे असे म्हणत. "इंग्रजी शस्त्रास्त्राबरोबर इंग्रजी लष्करी अंमलदार आपले राज्यात नको. खडणीच्या इंग्रजी पैशाबरोबर इंग्रजी पांढरा वकील आपले राज्यात नको. इंग्रजांची यंत्रकला व कौशल्य आम्हाला हवे. पण इंग्रजी इंजिनीअर आपले राज्यात नको." असे पूर्वीचे अमीर अबदुल रहमान यानी रावळपिंडीचे दरबारात लॉर्ड डफरीन याना निक्षून सांगितले होते. व सध्याच्या अमीराची थोडी फार हीच वृत्ति होती. या अमीराचे स्वागत करण्याकरिता व्हॉइसराय साहेबापासून तो प्रांतिक गव्हर्नरापर्यंत सर्वांची मोठी धांदल उडून गेली होती. व हिंदुस्थान सरकारतर्फे पाहुणा या नात्याने त्यांचा मोठा बडेजाव व सत्कार करण्यात आला. परंतु या बडेजावातून खाली उतरून हिंदी प्रजेलाहि समाधान वाटेल अशा एक दोन गोष्टी

अमीरानी केल्या. आग्र्यास ते गेले असता ईदच्या सणात कोणीहि मुसलमानानी गोवध करून हिंदूची मने दुखवू नयेत अशी इच्छा त्यानी दर्शविली. ही त्यांची इच्छा मुसलमानानी आदराने पाळली इतकेच नव्हे तर दिल्ली अयोध्या बनारस वगैरे ठिकाणच्या हिंदुसभानी याबद्दल अमीराचे अभिनंदन केले. अमीर साहेबाना ठिकठिकाणी मानपत्रेहि देण्यात आली. पुण्याच्या सार्वजनिक सभेतर्फे अमीराचे अभिनंदन करण्यात आले व बकरीदच्या सणाचे दिवशी गोवध होऊ दिला नाही याबद्दल ठराव पास होऊन तो त्यांच्याकडे पाठविण्यात आला.

कलकत्याहून परत येताना गावकऱ्यांचे विनंतीवरून टिळक हे नांदगाव येथे उतरले. स्टेशनापासून गावापर्यंत मिरवणूक निघून सर्वत्र गजर व जयघोष होत होता. सायंकाळी जाहीर सभा झाली. त्याला सुमारे तीन हजार लोक होते. तेथे टिळकानी सुमारे दोन तास स्वदेशीवर भाषण केले. गावातील चांभार ज्ञातीने गेल्या दीड वर्षात मद्यपानाचा त्याग व इतर बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या याबद्दल टिळक यांच्या हस्ते त्यांस पागोटी देण्यात आली. रात्री गावात पुष्कळ ठिकाणी दीपोत्सव व रोषनाई व पानसुपाऱ्या होऊन टिळक परत फिरले.

## ( २ ) स्वदेशी चळवळ व पैसाफंड

पैसाफंडाचा उगम कसा झाला याची हकीगत पूर्वी दिलीच आहे. ही संस्था १९०५ साली रजिष्टर झाली. त्या वेळी संस्थेची शिल्लक एकंदर २१५९ रुपये होती. १९०६ अखेर ती ७५२२ रु. झाली. व ता. १९ मार्च १९०७ अखेर ती जवळ जवळ १० हजारापर्यंत गेली. दोन वर्षांचा अदमास पाहता दरमहा सुमारे ४५० रु. गोळा झाले. दर माणसी पैसा हा तोंडी हिशोब व प्रत्यक्ष वसूल यात बरेच अंतर पडले. याचा अर्थ अंकगणिती तोंडी हिशोबापेक्षा अधिक जोमाची अधिक शिस्तीची अधिक कळकळीची व स्वार्थत्यागाची जरूरी आहे असे टिळकानी केसरीत म्हटले. पगारी प्रचारक ठेवणे हे संस्थेस अद्यापि शक्य नव्हते. टिळकानी लिहिले ' पैसाफंड ही कामधेनू आहे खरी. पण वसिष्ठांच्या कामधेनू प्रमाणे तिने उदरनिर्वाहास लागणारा चारा रानांत हिंडून फुकट पैदा करून दूध मात्र वसिष्ठास दिले पाहिजे. मिशनरी लोकांचे विलायतेत पैसाफंडासारखे जे फंड आहेत त्यांचीहि अशीच स्थिति आहे. दर आदितवारी देवळात टोपी फिरवून जी वर्गणी जमते ती ते बिनखर्ची मिशनरी फंडाकडे पाठवून देतात. थेंबाथेंबाने तळे सांचते खरे, पण तो थेंब त्या तळ्यात येऊन पडेल तेव्हा! सरकारी नोकर सोडून दिले तरी पाटील कुळकर्णी शाळामास्तर विद्यार्थी सावकार व्यापारी रामदासी-उपदेशक याना सहज फावल्या वेळात हा उद्योग करता येण्यासारखा आहे. वर्तमानपत्राच्या वर्गणीदारानीहि आपल्या वर्गणीबरोबर गावात जमलेली पैसाफंडाची वर्गणी पाठविल्यास तीहि बिनखर्ची पैसाफंडास मिळेल. ' आगकाड्या पेन्सली साबण कुलुपे ब्रश तेले बटणे मेणबत्त्या तंबाखुचे पदार्थ वगैरे लहान सहान

धंदे क्रमाक्रमाने शिकविण्याची पैसाफंडाची योजना असून त्याबद्दल गज्जर यांच्या रसायनशाळेस जोडून काही व्यवस्था करण्याचाहि चालकांचा विचार होता. पैसाफंडास जी मदत पाहिजे ती स्वरूप खरी पण ती सतत निश्चयाने व चिकाटीने करावयाची असते म्हणून टिळकानी लिहिले " राष्ट्रीय काम कळकळीने करणाराना हा एक लहानसा धडाच आहे. हा जर विशेषतः आमच्या तरुण पिढीच्या हातून नीट वठला नाही तर यापेक्षा अवघड कामे करण्यास आम्ही नालायक आहो असे कोणी म्हटल्यास त्यास काही जबाब देता यावयाचा नाही ! "

तारीख १० फेब्रुवारी १९०७ रोजी मुंबईस पैसाफंडाबद्दल जाहीर सभा भरली होती. अध्यक्ष दाजीसाहेब खरे हे होते. बापट यानी रिपोर्ट वाचला त्यात औद्योगिक नीधि ऊर्फ पैसाफंड रजिस्टर झाल्याचे सांगून खर्च वजा जाता पैसाफंडाची रक्कम सुमारे ८००० रुपये शिल्लक असल्याचे सांगितले. यानंतर टिळक यानी भाषण केले " १९०५ साली फंड २ हजार होता तो आज सुमारे ८००० रुपये झाला आहे व तो दहा हजार होईल तेव्हा त्याचा उपयोग पुढे कसा करावयाचा हे ठरवावयाचे आहे. ह्या फंडाचा पैसा पैसा जरी गोळा होतो तरी त्या पैशाची नियमित रक्कम झाल्याबरोबर ती पेढीवर जमा होते. डॉ. खेर व आपण पैसाफंडाचे खजीनदार असून अध्यक्षाचीहि फंडावर देखरेख असते. सारांश, जितक्या काळजीने लोक पैसा देतात तितक्याच काळजीने तो सुरक्षित ठेवला जातो. पैसा पैसा जमवून पुढे काय करणार ? हा आक्षेप पैसा न देणारांचा आहे. पैसाफंडाचा उपयोग देशातील उद्योगधंदे वाढविण्याकडे करावयाचा असून ते काम रक्कम जमेल त्यावर अवलंबून आहे. रोज परोपकार करावयाचा ही सवय मागे आमच्या राष्ट्रास होती ती आज गेली आहे व ती पुन्हा आणली पाहिजे. ही सवय आम्ही विसरलो म्हणून पैसाफंडाची जरूरी आहे. "

तारीख १५ आक्टोबर १९०७ रोजी मुंबईस शांतारामाचे चाळीत पैसाफंडावर टिळकांचे व्याख्यान झाले. त्यात त्यानी सांगितले "उद्या दसऱ्याचे सुमुहूर्तावर तरुण मंडळी चाळीतून फिरून पैसाफंड जमा करणार आहेत त्याना मदत करा. गेल्या दोन वर्षात सुमारे २१ हजार रुपये जमले व सुमारे १३ लाख लोकानी पैसे दिले. आम्हाला एखादा गिरणीचा मालक एकदम २०००० रुपये देऊ शकेल. पण पैसा पैसा देण्याची प्रत्येकास बुद्धि होऊन हा फंड जमावा अशी आमची इच्छा आहे. तरुण मंडळीनी आपला एक दिवस खर्ची घातल्याने एकट्या पुणे शहरात एका दिवसात १२०० रुपये गोळा झाले. त्याचप्रमाणे प्रयोग मुंबईत करून पहावयाचा आहे. पैसाफंडाचा प्रचार महाराष्ट्रात चांगला झाला आहे पण गुजराथी लोकात तो झालेला नाही. रुपाया मागे एक आणा वार्षिक नफयातून निराळा काढण्याची गुजराथी लोकाना सवय आहेच. त्याचप्रमाणे पैसाफंडाकरिता पैसा काढण्याची व्यवस्था करणे त्यांस सुलभ आहे. मिशनरी लोक पैसा पैसा गोळा करूनच इकडे आले व सगळ्या हिंदुस्थानाला ख्रिस्ती करण्याची त्यांची उमेद आहे !

पैसाफंड याहून अधिक महत्त्वाचा अधिक शक्य व कमी उपहासास्पद आहे. पैसे काही आकाशातून पडत नाहीत. होनांची वृष्टि पूर्वकाळी आकाशातून झाल्याचे लिहिले आहे. पण आता कलियुगांत तशी वृष्टि होण्याचा संभव नाही. यत्न केल्यास मात्र पैशाची धार खास लागेल. किती तरी व्यसनात आपले पैसे खर्च होत असतात. गरीब झालो तरी एक पैसा देता येईलच. व तोहि जेव्हा देता येणार नाही तेव्हा आपण जिवंत तरी राहू की नाही याची शंका आहे. संन्यासी बैरागी यानी देऊळ अन्नछत्र वगैरे घातल्याची व्यक्तिशः उदाहरणे आपणाकडे आहेत. पण सर्वांनी एक दिवस–सर्व आयुष्य नव्हे–या कामाकडे खर्च केल्यास लक्षपट अधिक सार्वजनिक काम राष्ट्राकडून होणार आहे. हे काम करण्यात राष्ट्रीयत्वाचे शिक्षण मिळणार आहे ते दवडू नका."

प्रत्येक संस्थेबद्दल व फंडाबद्दल प्रथमतः लोकांच्या शंकाकुशंका असतात व त्यामधूनच ती संस्था आपला मार्ग काढीत असते. रायगडच्या शिवाजीफंडाबद्दल असेच आक्षेप होते. पण पुढे ते दूर झाले. सहानुभूति नसणारांचे व पैसे न देणारांचेच हे आक्षेप असतात. पैसाफंडाबद्दल प्रथम हीच स्थिती होती. केवळ टिळकांचे नाव संलग्न म्हणून अनेक नेमस्त लोकाना तो अप्रिय होता. पण भांडारकरांची मात्र एकदा टिळकानी खात्री पटविली. याबद्दलची आठवण स्वतः भांडारकर यांचेच शब्दात देऊ. "एकदा पैसाफंडाचे स्वयंसेवक पैसाफंड मागण्याकरिता आमचेकडे आले होते. हे स्वयंसेवक लहान असल्यामुळे त्यांस दिलेल्या पैशाचा कसा काय विनियोग होतो याची आम्हांस शंका आली. म्हणून आम्हास त्यांस नकार देणे युक्त वाटले. सदर मुले पुढे टिळकांकडे गेली. पुढे एक दिवस टिळक आमचेकडे आले व त्यानी एकदम पैसाफंडासंबंधाने आमचे मत विचारले. हे पाहून पैसाफंड मागण्याकरिता हे आलेले दिसतात असे वाटताच मी उठलो व आतून पाच रुपये आणून त्यांस दिले. टिळकानीहि आपल्या अंगरख्याच्या खिशातून पावतीपुस्तक काढून व्हॉलंटियर म्हणून आपली सही करून आम्हास पावती दिली. व पैसाफंडाच्या चोख कामाबद्दल त्यानी आमची खात्री पटविली."

ता. १५ जानेवारीच्या केसरीत अशी सूचना केली होती की "लग्नासारख्या मंगल कार्यात तरी विदेशी वस्तू वापरू नयेत. लग्नासारख्या शुभप्रसंगी राष्ट्राच्या स्वदेशी व्रताचा भंग करणे म्हणजे एक प्रकारे नवीन मंगलसूत्रास अपशकून करण्यासारखे आहे. परदेशी कपडा परदेशी साखर व परदेशी फाजील चैनीचे पदार्थ याना लग्नातून प्रथम फाटा मिळाला पाहिजे. सदर व्रताचे सांगताप्रीत्यर्थ भोजनदक्षणा पैसाफंडाकडे व चैनीच्या खर्चात झालेल्या काटकसरीचा अंश महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळाकडे द्यावा." ता. २९ जानेवारीच्या केसरीत बहिष्काराला पोषक असे आयर्लंडातील सिनफेन चळवळीचे उदाहरण दिले होते. आयर्लंडचा देशभक्त ग्रिफिथ हाहि इंग्रजी राज्यकर्त्याविरुद्ध दारू तंबाखू चहा व साखर याचेवर बहिष्कार घाला असाच उप-

देश करीत होता. तो म्हणत असे "बोअर लोकांनी युद्ध करून जेवढे इंग्लंडचे नुकसान केले तितके आयरिश लोकांना केवळ या बहिष्काराने करिता येईल." तसेच अमेरिकेत जे चिनी व जपानी एशियाटिक लोक होते त्यांनीहि हाच प्रयोग तेथील सरकारविरुद्ध चालविला होता व तो यशस्वी होत होता. स्काटलंड आयर्लंड या देशातील लोक जर हेच अडवणुकीचे मार्ग योजतात व ते यशस्वी होतात तर तो मार्ग हिंदुस्थानासहि योग्य होय किंबहुना हक्क मिळविण्याचा अडवणूक हाच मार्ग आहे असे केसरीचे म्हणणे होते.

तारीख १६ नोव्हेंबर १९०७ रोजी पंढरपूर येथे चंद्रभागेच्या वाळवंटावर सुमारे १५ हजार लोकांसमोर टिळकांचे 'स्वदेशी'वर भाषण झाले. टिळक म्हणाले "उत्तरोत्तर देशाची स्थिति फारच कठीण होत चालली आहे. दडपशाहीचे कायदे पास होत आहेत. आज मी येथे तुमच्यासमोर व्याख्यान देत आहे. पण पुढल्या वर्षी देणे शक्य राहील की नाही हे सांगता येत नाही. तुम्ही येथे हजारो माणसे जमता. पण पांडुरंगाचे नाव घेतल्याने तुमच्या मनात खळबळ झाली तरी तुम्ही कायद्यात येता असे होण्याचा संभव आहे. माझे तुम्हास एवढेच सांगणे की येथे तुम्ही ज्या श्रद्धेने येता त्या श्रद्धेने निष्ठेने व कळकळीने तुम्ही देशाविषयी विचार करा. तुम्ही उद्योग कराल तर हे दिवस जातील-खात्रीने जातील- नाही तर कठीण अवस्थेत रहाल. सध्याच्या स्थितिसंबंधाने खेड्यापाड्यातून चर्चा झाली पाहिजे. हा "तोंड धरून बुक्याचा मार आम्ही सहन करणार नाही" असे ज्या दिवशी स्पष्ट सांगाल त्या दिवशी तरणोपाय आहे. कोणी विचारतील "मग आम्ही बंड करावयाचे की काय?" बंडहि करावयाला नको व स्वस्थहि बसावयाला नको. हे माझे यास उत्तर आहे. मुनसफ कोण असतात? मामलेदार कोण असतात? सगळे तुमचेच लोक! सगळे राज्य तुमच्याच हातात आहे. पण तुम्ही ओळखीत नाही. तुमच्या पोटातून जर खरी कळ येत असेल तर तुमचे तोंड त्यासंबंधाने बोलेल. भिऊ नका! शेतकऱ्यांनी कारागिरांनी धंदेवाल्यांनी पाटीलकुळकर्ण्यांनी-सर्वांनी "या राज्यात आमची स्थिति चांगली नाही" असे स्पष्ट सांगितले पाहिजे. आपल्याजवळ शस्त्रे नाहीत. पण स्वदेशी व्रताचे अवलंबन हा एकच उपाय आपणाजवळ आहे. तुमच्या पैशावर, तुम्ही बातम्या देता त्यावर, तुमच्या कर्तबगारीवर जे राज्य चालते ते कोठे तरी अडलेच पाहिजे. स्वदेशी व्रताबद्दल शपथ घेण्याबद्दल मी तुम्हास सांगितले होते ते विसरला असाल तर पुन्हा एकदा शपथ घ्या. चहाडी पुरे करा. सरकारावर रुसून बसा. ज्याच्याने चहाडी केल्याशिवाय राहवत नाही त्याला पांडुरंगाने एकच जागा केली आहे. ती जागा नरक होय. रुसणे हे बेकायदेशीर नाही असे मी तुम्हाला स्पष्ट सांगतो. पुढल्या साली आपण येथे जमू किंवा नाही याची शंका यावी असाच काळ आला आहे. तुम्ही भ्याल तर तुमचा तरणोपाय नाही असे स्पष्ट पांडुरंगासमोर या चंद्रभागेच्या तटावर मी सांगत आहे. त्याचा विचार करून कार्याला लागा." पुढच्या वर्षी संकट येण्यासंबंधाने भविष्यपर

प्रकार कोल्हापूर व सांगली या संस्थानात झाला. इतर ठिकाणाप्रमाणे कोल्हापूर कॉलेज व हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीहि स्वदेशीची चळवळ आरंभिली. या वेळचे कॉलेजचे प्रिन्सिपॉल एक पार्शी गृहस्थ होते. त्यानी विद्यार्थ्यांच्या या चळवळीला विरोध केला. प्रकरण परीक्षेच्या वेळी चिडीला गेले. मुलांचे म्हणणे आम्हाला प्रश्नोत्तराचे कागद स्वदेशी द्या नाही तर आम्ही परीक्षेलाच बसत नाही. विष्णु गोविंद विजापूरकर हे त्या वेळी कॉलेजात प्रोफेसर होते. त्यानी विद्यार्थ्यांच्या या मागणीचा तात्त्विक पुरस्कार केला. तेव्हा दरबाराकडे त्यांच्या विरुद्ध कागाळी गेली. आणि "तुम्ही विद्यार्थ्यांना योग्य वळण लावण्याच्या कामी आपले वजन खर्च करीत नाही" असा त्यांचेवर आरोप ठेवून त्याना एकदम नोकरीवरून काढण्याचा हुकूम झाला. विजापूरकरांची नोकरी पंधरा वर्षे झाली होती. आणि ते विद्यार्थ्यांतच काय पण सर्व कोल्हापूर शहरात फार लोकप्रिय होते. पण संस्थानाला लोकप्रिय व्यक्तीची गरज नव्हती. विजापूरकरांच्या पूर्वी प्रो. साठे याना चोवीस तासाच्या नोटिशीने संस्थानातून काढून लावण्यात आले होते. वास्तविक देशी कागद विद्यार्थ्यांना पुरविला असता तर काही हरकत नव्हती. शिवाय महाराजहि स्वदेशी कागदच वापरीत असे म्हणतात. महाराज हे पुण्याच्या स्वदेशी कागदाच्या गिरणीचे एक मोठे आश्रयदाते होते. पण शिस्तीच्या नावाखाली तरुण विद्यार्थ्यांच्या गुणाची पायमल्ली सहज करता येते. सुमारे पासष्ट विद्यार्थ्यांना मॅट्रिकच्या परीक्षेला जाण्याची मनाई करण्यात आली. शिवाय छड्या दिल्याच. झाला हा सर्व प्रकार खुद्द छत्रपतींना कितपत मान्य होता याविषयी काही लोकाना शंका होती. त्यांचे म्हणणे पोलिटिकल एजंट यांच्याकडून लिहून आल्यावर महाराज तरी काय करणार? पण स्वतः महाराजांच्या मनाची परिणती यापूर्वीच कसकशी होत चालली होती हे बाहेर लोकाना काय माहीत? सन १९०१ साली टिळक ताई-महाराज प्रकरणी कोल्हापूरास गेले त्या वेळी त्यांच्याशी महाराजांचे जे वर्तन झाले त्यावरून जाणत्या लोकाना अदमास आलाच होता. आणि पुढे दोनतीन वर्षांनी महाराजांचे मन कसे काय होते याची प्रचीती उघडपणे येऊ लागली. आणि १९२१ साली केसरीने प्रसिद्ध केलेल्या महाराजांच्या गुप्त पत्रव्यवहारावरून सर्वच प्रकार उघडकीस आला!

सांगली संस्थानातहि हाच प्रकार झाला. या वेळी नवे यजमान अल्पवयी आणि बर्कसाहेब हे ॲडमिनिस्ट्रेटर व सर्वाधिकारी होते. त्यानी हेडमास्तरांना हुकूम दिला की हायस्कुलातील विद्यार्थ्यांनी कोणतेहि उत्सव किंवा चळवळ यासारख्या राजकीय बाबतीत पडू नये. पडल्यास शाळेतून काढून टाकू व परीक्षेला बसण्याची मनाई करू! पण सुदैवाने विद्यार्थ्यांची सभा आधीच होऊन गेली होती. आणि बैल गेल्यावर हा झोपा करण्यात आला होता. वऱ्हाडात उमरावती येथेहि असाच प्रकार घडला. पण एकंदरीने पाहता महाराष्ट्रात काय किंवा इतर कोठे काय विद्यार्थ्यांची सभा झाली नाही असा एकहि गाव उरला नसेल.

काही ठिकाणी अधिकाऱ्यानी मनातल्या मनात या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. काही ठिकाणी मनातून नापसंती असता फक्त काणा डोळा केला. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना सौम्य शिक्षा देण्यात आल्या. काहीं ठिकाणी कडक शिक्षा दिल्या आणि काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्याकरिता मास्तरानाहि शासन करण्यात आले! तात्पर्य शाळाखात्यातील अधिकाऱ्यांच्या मनोरचनेप्रमाणे या चळवळीची संभावना झाली.

## ( ३ ) राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ

बनारस येथील राष्ट्रीय सभेच्या प्रसंगी हिंदु विद्यापीठाची कल्पना जोराला लागल्याचे मागील भागात सांगितलेच आहे. महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाची खटपट सुरू झाली होती. तारीख १५ आगस्ट १९०६ पासून कलकत्ता येथील राष्ट्रीय कॉलेज व शाळा सुरू करण्यात येऊन राष्ट्रीय शिक्षणमंडळातर्फे परीक्षा घेतल्या जाऊन पदव्या वगैरे देण्यात येतील असे जाहीर झाले. श्रीमंत बंगाली लोकाकडून भराभर देणग्या मिळू लागल्या. सुबोधचंद्र मलीक यानी १ लक्ष रुपये व गौरीपूरचे राजे यानी ७ लक्ष रुपये दिले. दुसऱ्या कोणी ५०००० रुपये दिले. अशा रीतीने राष्ट्रीय शिक्षणाला पैशाच्या दृष्टीने काही कमी पडणार नाही एवढे त्यावेळी सिद्ध झाले.

बंगालच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीत डॉक्टर राश बिहारी घोष गुरुदास बानर्जी आशुतोष चौधरी वगैरे प्रमुख पुढारी सामील होते. आणि प्राथमिक शिक्षणापासून पदवी देण्यापर्यंतचे सर्व शिक्षण शील व देशाभिमान या दोन्ही गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवून देण्यात यावे अशी नवी योजना आखण्यात आली. त्याच महिन्यात पुण्यास महाराष्ट्र विद्याप्रसारक नावाची संस्था स्थापन होऊन डॉक्टर नानासाहेब देशमुख चिंतामण विनायक वैद्य टिळक दाजीसाहेब खरे व विजापूरकर यांच्या सह्यानी समर्थ विद्यालयाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. सरकार दरबारी तसेच लोकांच्या वतीने राष्ट्रसेवा करणारे लोक शुद्धशील सामर्थ्यवान व प्रगतिप्रिय असेच असले पाहिजेत. पुढील पिढीस असेच वळण लावण्यासाठी तरुण लोक निपजावे यासाठी जोराने प्रयत्न व्हावे म्हणून करवीर येथे स्थापन झालेल्या समर्थ विद्यालयाचा फायदा घेऊन आम्ही अशा प्रकारच्या शाळा सर्व महाराष्ट्रभर स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहो असे या पत्रकात लिहिले होते.

टिळकांचा ओढा तरुण पिढीकडे विशेषतः विद्यार्थी वर्गाकडे किती असे हे सुप्रसिद्ध आहे. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेजमध्ये असताना विद्यार्थीवर्ग तर त्यांच्याच बाजूला असे, असे अनेक आठवणी लिहिणारानी सांगीतले आहे. पण फर्ग्युसन कॉलेजातून बाहेर पडून केसरी मराठा पत्रे हाती घेतल्यावर महाराष्ट्रातील सर्व तरुण पिढीला त्यानी आपलेसे केले. यामुळे सरकारी बिनसरकारी कोठल्याहि शाळा कॉलेजात विद्यार्थी शिकत असला तरी, टिचकी मारून त्याच्या राजकीय मतांचा आवाज पाहिला तर तो खणखणीत राष्ट्रीय वृत्तीचाच निघत असे. टिळ-

कांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडली तरी, आकाशात दूरवर उडणाऱ्या पक्षाचे जसे आपल्या घरट्याकडे लक्ष असते, तसे शाळा कॉलेजातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे त्यांची सदैव नजर असे. परभृत न्यायानेच ते तरुण पिढीकडे पहात. कोकिळा ही आपली अंडी स्वतः उबवीत नाही, कावळ्याकडून उबविते. पण ते अंडे कावळ्याने उबविले, तथापि अंडे फुटल्यावर बाहेर येते ती कोकिळाच असणार; कावळा असत नाही! त्याप्रमाणे मुलांच्या मनात राष्ट्रीय वृत्ति सदैव जागृत असली म्हणजे झाले एरवी ती सरकारी बिनसरकारी कोठल्याहि शाळा कॉलेजातून शिकली तरी हरकत नाही असेच टिळक मानीत. "माझ्या व्याख्यानाला मुलाना येण्याला बंदी नसली म्हणजे एरवी ती सरकारी शाळात जाऊन शिकली तरी चालतील" असे टिळक म्हणत त्यातील मर्म हेच आहे.

पण विद्यार्थ्यांचे मतस्वातंत्र्य नष्ट करून त्यांना राजकीय चळवळीपासून अलिप्त राखण्याचा जसजसा प्रयत्न सरकारकडून होऊ लागला तसतशी टिळकानीहि राष्ट्रीय शिक्षणाच्या उपदेशावर भर देण्यास सुरवात केली. "राष्ट्रीय मनोवृत्ती ज्याने निर्माण होईल ते राष्ट्रीय शिक्षण" अशी राष्ट्रीय शिक्षणाची टिळकांची व्यापक व्याख्या होती. मग ते कोणी कोठेहि कशाहि रीतीने देवो. व या अर्थाने त्यांनी प्रत्यक्ष कोणत्या शाळा कॉलेजातून शिकविले नाही अगर मंडालेहून आल्यानंतर पूर्वीच्या अर्थाने राष्ट्रीय शिक्षणाची चळवळच जाग्यावर राहिली नव्हती तरी त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाचेच काम चालू ठेविले होते असे म्हणता येईल. मांजरी ज्याप्रमाणे आपल्या पिलाना कोणी धक्का लावू पहाताच रागाने टवकारून नखे बाहेर काढते त्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या मतस्वातंत्र्यावर किंवा योग्य आकांक्षावर कोणी जुलूम जबरदस्ती करू लागला म्हणजे त्यांचे टीकेचे हत्यार सदैव पाजळलेले असे. व त्याचा उपयोग करून ते राष्ट्रीय शिक्षणाचा कैवार घेऊन भांडत. पण यापेक्षा म्हणजे राष्ट्रीय शिक्षणाशी प्रत्यक्ष शाळा काढून स्वतः मुलाना शिकविण्याची त्यांची कल्पना नव्हती व सर्व सरकारी शिक्षण संस्थावर बहिष्कार पुकारून तो अमलात आणावा त्या ओस पाडाव्या ही कल्पना तर त्यांचे मनास शिवलीहि नाही. कारण सर्व राष्ट्राचे शिक्षण आपल्याच ताब्यात असावे हे तत्त्व मान्य असले तरी पैशाचे अभावी कोणासहि हे शक्य नाही हे ते जाणून होते व असे त्यानी आपल्या लेखातून व व्याख्यानातून स्पष्ट म्हटलेहि आहे. महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाचे एक नमुनेदार कॉलेज असावे असे ते म्हणत. कारण अशा चळवळीचा अप्रत्यक्ष रीतीने इतर संस्थावरहि चांगला परिणाम होत असतो. सरकारी निमसरकारी शिक्षण संस्थापेक्षा खाजगी संस्था अधिक चांगल्या व शक्य तितक्या त्या अधिक काढाव्या असे टिळकांचे मत होते. म्हणूनच त्यानी आपल्या सार्वजनिक आयुष्यातील पहिले कार्य खाजगी शिक्षण संस्था सुरू करून केले. कोल्हापूर प्रकरणातून टिळक सुटून आल्यावर डेक्कन कॉलेजमध्ये लोकानी त्याना कोजागिरीला बोलविले. तेव्हा टिळकानी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना असा उपदेश केला की "आपल्या राष्ट्राचा

विचार करा व कामास लागा. नुसत्या आहारविहारासाठी मानवजन्म नाही." पण त्याचेहि पूर्वी कैदेतून आल्यावर चिपळूणकरांचे घरी त्याना पानसुपारी झाली. तेव्हाहि त्यानी हेच बोलून दाखविले की लोकशिक्षण लोकांच्या हातात असल्या शिवाय आपली खरी सुधारणा व्हावयाची नाही असे प्रो. भानु यानी आपल्या आठवणीत लिहिले आहे. टिळक हे राष्ट्रीय शिक्षणाचे प्रत्यक्ष कार्यकर्ते अगर संस्थेचे संस्थापक नव्हते. राष्ट्रीय शिक्षणाच्या एकंदर चळवळीला त्यानी लोकमत जागृत करून भरती आणली व पैशाकरिता दौरे वगैरे काढून मदत केली हे खरे पण समर्थ विद्यालयाचे प्रत्यक्ष बारीकसारीक काम त्यानी कधी अंगावर घेतले नाहीत व ते त्याना शक्यहि नव्हते. समर्थ विद्यालयात तर ते एकादे वेळच गेले असतील. कोणीकडून तरी नोकरशाही विरुद्ध वादळाचे ढग जमवून एकत्र आणून राजकीय अशांततेची वावटळ फिरती ठेवावयाची येवढेच ते जाणत. राष्ट्रीय शिक्षणाच्या बाबतीत वाटणी अशी होती की कार्यकारी माणसानी आपले कार्य करावे व आजूबाजूने लागेल ती मदत त्याना टिळकानी करावी. व समर्थ विद्यालयाकरिता विजापूरकरानी तगादा लावला किंबहुना ते त्याना असेहि म्हणाले की "आमची मुले झोपड्यातून राहतात थंडीने कुडकुडत असतात. आपली लोकप्रियता घेऊन काय करावयाची ? रुपये आणे पै यात तिची काही किंमत करून दाखवाल तर खरे" तेव्हा टिळकानी समर्थ विद्यालयाकरिता दौरा काढला व १५।२० हजार रुपये जमा केले असे विजापूरकर यानीच आपल्या आठवणीत सांगितले आहे.

असो. विद्यार्थ्यांच्या मतस्वातंत्र्याला धक्का लागू नये हे टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीतले मर्म होते असे वर सांगितले. पण कर्झनशाहीत विद्यार्थ्यांच्या या निसर्गसिद्ध हक्कावरच गदा आल्याकारणाने बंगाल्यात व महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ सुरू झाली. १८५४ साली विलायत सरकारच्या खलित्याने हिंदुस्थानातील विद्याखात्यास नियमित स्वरूप दिले. त्याच्या पूर्वीपासूनहि खाजगी शिक्षणाचे महत्त्व व उपयोग प्रस्थापित झाला होता. त्या वेळी हिंदुस्थानातील बुद्धिमान लोकांस न्याय व्याकरण वेदांताच्या खटपटीतच ठेऊन इंग्रजानी राज्य चालवावे किंवा पाश्चात्य विद्या व नवीन कला शिकवून त्यांस हुषार करावे हा त्या वेळच्या मुत्सद्यापुढे एक मोठा प्रश्न होता. पण कित्येकानी आक्षेप घेतले की इंग्रजी विद्या हे वाघिणीचे दूध होय. त्याची चटक हिंदुस्थानातील लोकास लागली म्हणजे केव्हाना केव्हा तरी ते तयार होऊन स्वराज्याचे हक्क मागू लागतील. पण या भीतीला न जुमानता त्या वेळच्या मेकॉले वगैरे इंग्रज मुत्सद्यानी या प्रश्नाचे असे उत्तर दिले की, इंग्रजी शिक्षणाने हिंदी लोक स्वातंत्र्याकरिता खटपट करणारे झाले तरी बेहत्तर. पण त्याना अज्ञानात ठेऊन राज्य करणे बरोबर नाही. निदान त्यांच्या स्वातंत्र्यप्रियतेने हिंदुस्थानातून इंग्रजी राज्य समग्र नष्ट झाले तरी मागासलेल्या एका मोठ्या देशास स्वतंत्र देशाच्या योग्यतेस आणल्याचे श्रेय तरी इंग्लंड देशास व इंग्रजी राज्यास मिळेल! ही भावना खरोखरच उदात्त व श्रेष्ठ होती. व रिपन

साहेबांच्या कारकिर्दीपर्यंत सरकारचे शिक्षणखात्याविषयी हेच उदार धोरण होते. रिपन यांच्या कारकिर्दीत एज्युकेशन कमिशन बसून खाजगी शाळांस जेव्हा उत्तेजन मिळाले तेव्हा सरकारची अशी समजूत होती की हिंदुस्थानात जितका शिक्षणाचा प्रसार करण्याचे सरकारने योजिले आहे तितका प्रसार खाजगी शाळांच्या मदतीखेरीज व्हावयाचा नाही. खाजगी शाळेच्या शिक्षणक्रमात सरकारी शाळेच्या शिक्षणक्रमापेक्षा अधिक स्वातंत्र्य असते ही गोष्ट त्या वेळी सरकारला पूर्णपणे माहित होती. असे असूनहि जाणून बुजून खाजगी शाळांस उत्तेजन देण्याचा क्रम सरकारने सुरू ठेवला. खाजगी शाळाना स्वातंत्र्य अधिक असले पाहिजे ही गोष्ट सरकारने प्रांजलपणे कबूल केली होती. याचा परिणाम असा झाला की मद्रास, मुंबई, बंगाल, पंजाब वगैरे इलाख्यातून नव्या नव्या खाजगी शाळा व कॉलेजे निघून ती भरभराटीला आली. फर्ग्युसन कॉलेज, मद्रासचे पच्छापा कॉलेज, पंजाबचे दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज वगैरे पुष्कळ कॉलेजे याच सुमारास निघाली. सरकारी शाळापेक्षा वेगळ्या वळणानेच या शिक्षणसंस्था चालवाव्या अशा कटाक्षानेच या खाजगी संस्था निघाल्या होत्या. सरकारलाहि त्या वेळी असे वाटत होते की कोणत्या राजकीय चळवळी बऱ्या, कोणता धर्म चांगला कोणता वाईट, कोणत्या चळवळीत विद्यार्थ्यांनी पडावे कोणत्यात पडू नये, हे ठरविण्याचा अधिकार सरकारनेच केवळ आपल्या हाती घेऊ नये. किंबहुना राष्ट्रातील लोकास जर खरे राष्ट्रीय शिक्षण द्यावयाचे असेल तर ते स्वतंत्र लोकानी स्वतंत्र खाजगी शाळेतच दिले पाहिजे व देणे शक्य आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर व त्यांचे सहकारी यानी न्यू इंग्लिश स्कूल काढले त्यावेळी ' शिक्षण राष्ट्रीय होण्यास ते राष्ट्रातील लोकांच्याच हातात असले पाहिजे हे तत्त्व खाजगी शाळांच्या तर्फे गव्हर्नर साहेबांसारख्या मोठया अधिकाऱ्यापुढे सार्वजनिक समारंभाचे वेळीहि प्रतिपादन करण्यात येत असे. व त्यास मान्यता देऊन लॉर्ड रे किंवा जेम्स फर्ग्युसन या सारखे बडे अधिकारीहि या तत्त्वाचा लोकासमक्ष मोठा गौरव करीत. व ही प्रामाणिक वृत्ति त्या वेळेस सरकारच्या मनात होती म्हणूनच डेकन कॉलेज हे सर्वस्वी येथील डेकन एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यात देण्यास चॅटफील्ड व लार्ड रे हे तयारहि झाले होते. पण काही कारणामुळे त्या वेळी ती गोष्ट राहून गेली इतकेच. खाजगी शाळाना सरकारी ग्रँट अगर मदत घेण्याची त्या वेळी भीति किंवा शंका वाटली नाही याचे तरी कारण हेच होय.

पण १८९७-९८ साली राजद्रोहाची जी भयंकर वावटळ उठली त्यामुळे सरकारचे या बाबतीत धोरण व रंग पालटत जाऊन सरकारने पिछेहाटीचे धोरण स्वीकारले. हिंदुस्थानातील सुशिक्षित तरुण पिढी स्वातंत्र्यप्रिय होणे इष्ट नाही व ज्या कारणानी हा दोष त्यांच्या अंगी येतो ते पाश्चिमात्य शिक्षण देण्याचा क्रम हल्लीपेक्षा अधिक मर्यादित केल्याशिवाय दूर होणार नाही असे कर्झन यानी मनाशी ठरवून टाकले. पाश्चिमात्य शिक्षण अजीबात बंद करणे शक्य असते तर ती गोष्ट

त्यानी प्रथम केली असती. पण तसे करण्याचे दिवस आता निघून गेल्यामुळे कर्झन साहेबानी अशी युक्ति काढली की शिक्षणाच्या शाळा बंद करू नयेत. पण सर्व शिक्षणखाते एका मुठीत आणि तेहि सरकारच्या मुठीत आणून विद्यार्थ्यांच्या राजकीय विचारावर करडी देखरेख ठेवता यावी. याच करिता त्यानी सत्तेच्या जोरावर युनिव्हर्सिटीचा नवा कायदा पास करून घेतला व सिमल्याहून ' रिसले ' सरक्युलरासारखी फर्माने काढली. टिळक म्हणतात " नुसता चोर पुरवतो पण घरचा चोर पुरवत नाही. कर्झनशहांच्या या धोरणाचा परिणाम असा झाला आहे की खासगी शाळांचे सार्वजनिक किंवा राजकीय बाबतीतील स्वातंत्र्य बिलकूल नाहिसे झाले. कर्झनशहाने सरस्वती देवीला राजसत्तेची दासी बनवली." हे कायदे करण्यात सरकारची कदाचित् अशी समजूत असावी की शिक्षणाने वाटेल त्या प्रकारची माणसे तयार करिता येतात. परकीयांच्या तंत्राने चालणारी माणसे जर आपणास पाहिजेत तर ते होण्यास कोणते शिक्षण पाहिजे हे काळजीपूर्वक ठरवून त्याप्रमाणे व्यवस्था केली म्हणजे झाले! व रिसले साहेबानी तर सहजगत्या असे लिहून कळविलेले प्रसिद्ध झाले की " युनिव्हर्सिटीच्या नवीन कायद्याप्रमाणे जे नियम करावयाचे ते विद्यार्थ्यांनी राजकीय चळवळीत पडू नये अशा हेतूनी त्याजवर शाळेत आणि बाहेर नजर ठेवण्याकरिता करावयाचे आहेत. आणि ते केले म्हणजे खासगी शाळासंबंधाने दुसऱ्या तजविजी करण्याची जरूरी नाही." या गौप्यस्फोटनाने सरकारच्या खऱ्या धोरणाविषयी कोणासच शंका उरली नाही. व पंडित मदनमोहन वाच्छा बाबू सुरेंद्रनाथ मेथा यांच्यासारख्या नेमस्तानीहि सरकारचा निषेध करावयास सुरवात केली.

पण इतकी बंधने घालून घ्यावयाची कशा करिता? तर सरकारी मददीच्या चतकोर तुकड्याकरिता! म्हणून ज्याना त्या भाकरीच्या तुकड्याचा मोह सुटत नाही त्यांच्यावर व विद्यार्थ्यांवर बंधन घालणाऱ्या सरकारावर टिळकानी कडक टीका करण्यास सुरुवात केली. टिळक म्हणतात " सरकारने जी ही दांडगाई व जुलूम मांडला आहे हा आम्ही मुकाट्याने का सहन करावा? मुलावर खरी सत्ता म्हटली म्हणजे आईबापांची किंवा पालकांची होय. आपली मुले फी भरून चार पाच तास शिकण्याकरिता सरकारी शाळेत पाठविली म्हणजे त्यानी काही गुन्हा केला काय? आम्ही आपली मुले शिकण्याकरिता सरकारी शाळात पाठविली म्हणजे ती काही सरकारास विकली नाहीत. किंवा शाळेबाहेर मुलांच्या वर्तनावर देखरेख करण्याचा हक्क सरकाराकडे सोपवला नाही हे सरकारने लक्षात ठेवले पाहिजे. आईबापानी आपल्या मुलीस देवास वाहून मुरळी केली तरी तिजवरील आईबापांचे पालकत्वाचे हक्क कमी होत नाहीत, तर मुले सरकारी शाळात शिकतात म्हणून शाळाबाहेरहि विद्यार्थ्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवण्याचा आईबापास हक्क नाही म्हणून सरकार ठरवते हे आश्चर्य नाही काय? शिस्त कोणास नको आहेसे नाही व पालकासहि त्यांच्या मुलाना शिस्त हवी आहे. पण शाळाबाहेरील शिस्तीचा

प्रश्न आईबापांचा आहे सरकारचा नाही. उत्सवास व्याख्यानास किंवा कीर्तनास आम्ही आपली मुले पाठवावयाची नाहीत म्हणजे काय ? आणि ती पाठवू नयेत म्हणून म्हणणारे सरकार कोण ? आणि त्यात चोंबडे पोलीस हवे कशाला ? सरकारला अलीकडील राजकीय चळवळ अत्यंत अप्रिय झाली आहे. परंतु ही सर्व चळवळ बेकायदेशीर ठरवून बंद करण्याचे त्याना धैर्य नाही म्हणून जी गोष्ट प्रत्यक्ष करिता येत नाही ती परोक्ष किंवा चोरट्या रीतीने करण्याचा सरकारने डाव मांडला आहे!"

फर्ग्युसन कॉलेज सारखी संस्था रिसले सर्क्युलराला प्रथमच बळी पडली. सरकारचा जुलूम त्याना पसंत होता असे नव्हे. पण व्यक्तिशः टिळकांशी व राष्ट्रीय पक्षाशी त्यांचा विरोध होताच. यामुळे एका कारणाकरिता नव्हे तरी दुसऱ्या कारणाकरिता का होईना विद्यार्थ्यांच्या मतस्वातंत्र्यावर शिस्तीच्या नावाखाली गंडांतर येतच होते. यामुळे नेटिव्ह संस्थानाप्रमाणे विद्यार्थ्यांवर दुहेरी जुलूम होत होता. त्या वेळी विद्यार्थीदशेत असलेले सावरकर यानी स्वदेशी चळवळीसंबंधाने भरलेल्या सभेत भाग घेतला म्हणून फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिन्सिपालानी त्यांस १० रुपये दंड करून कॉलेजच्या बोर्डिंगातून काढून टाकले. टिळक लिहितात "फर्ग्युसन कॉलेजची ही सरकारी कॉलेजावरील ताण पाहून कपाळास हात लावल्याखेरीज रहावत नाही! प्रो. गोखले हे एकीकडे मँचेस्टरमध्ये जाऊन बहिष्काराचे समर्थन करितात आणि इकडे त्यांच्याच कॉलेजातील एका विद्यार्थ्यास स्वदेशी चळवळीत पडल्याबद्दल दंड होत आहे. शिस्तीच्या नावाखाली हा जुलूम चालला आहे. गुरुशिष्यामधील धर्म फार नाजूक आहे हे आम्ही जाणून आहो. व त्यात कोणत्याहि रीतीने बिघाड करण्याची आमची इच्छा नाही. पण विद्यार्थ्यांस आज्ञा मोडण्यास जर कोणी शिकवीत असेल तर तो अशा शिक्षकांचा आचरटपणा होय."

विद्यार्थीवर्गाची मते एका बाजूला तर कॉलेजामधील शिक्षणाधिकाऱ्यांची त्यांच्या विरुद्ध बाजूला, हा अनुभव आज महाराष्ट्राला गेली चाळीस वर्षे आलाच आहे. मग ते फर्ग्युसन कॉलेज असो, डेक्कन कॉलेज असो, की आणखी तिसरे एखादे असो. कॉलेजातील प्रोफेसरानी मुलाना नुसती बुके पढवावी. पण राष्ट्रीय चारित्र्याचे शिक्षण त्यानी केसरीसारख्या वर्तमानपत्राकडून अगर टिळकांसारख्या लोकोत्तर व्यक्तीकडे पाहूनच घ्यावे. विद्यार्थ्यांनी कित्ता घेण्यासारखे किंवा मुलाना वश करण्यासारखे स्वतःचे अंगी गुण नाहीत व बाहेरील राष्ट्रीय चळवळ पहावत नाही अशा स्थितीत पोराना उनाड ठरवून त्यांचे पुढारी हेच त्याना शिस्त मोडण्याचे शिक्षण देतात असा आरोप शाळाधिकाऱ्यानी करू नये तर दुसरे काय करावे ? पण तरुण विद्यार्थ्यांची मने विनाकारण दुसरीकडे वळत नाहीत. आपल्या आकांक्षाना योग्य वळण देणारा खरा गुरु कोण हे त्याना दिसत असते. म्हणूनच सरकारी शाळाकॉलेजांतून शिक्षण घेतल्यानंतरहि त्यांच्या मनावरील राष्ट्रीय मनोवृत्तीचा छाप पुसून जात नाही. किंबहुना सेल्वीसाहेब अगर रँगलर परांजपे यांच्या सारखे

प्रिन्सिपाल टिळकांविरुद्ध व राष्ट्रीय पक्षाविरुद्ध कसून चळवळ करीत असताहि त्यांच्या विद्यार्थ्यांची सहानुभूती सर्वस्वी टिळकपक्षालाच होती हे मशहूर आहे व याकरिताच वर विद्यार्थीवर्गाला आम्ही कोकिळेची उपमा दिली आहे.

तरुण विद्यार्थ्यांना टिळक वगैरे पुढारी कुमार्गदर्शक होतात, त्यांचे ऐकून विद्यार्थी चळवळीत पडतात, शाळांची शिस्त मोडतात आणि आपल्या गुरूंची आज्ञा पाळीत नाहीत असा एक टिळकांच्यावर ठराविक आक्षेप होता. या वर्षा-च्या ऑक्टोबरच्या सुमारास शाळाधिकारी व हे पुढारी यांच्यातील विरोध बराच विकोपाला गेला. हे अधिकारी व हे पुढारी एकत्र बसून काही विचारविनिमय करते तर यातून कदाचित् काही मार्ग निघाला असता. पण शाळाधिकारी परावलंबी आणि वरिष्ठ अधिकारी म्हणजे डायरेक्टरच नव्हे तर प्रांतिक सरकार आणि त्यांच्याहीवर हिंदुस्थानसरकार जे धोरण ठरवून पाठवितील ते धोरण अमलात आणणे हे कनिष्ठ शाळाधिकाऱ्यांचे कर्तव्य ठरून गेले होते. सरकाराने राजकीय पुढाऱ्यांशी सहविचार करून मुलानी काय करावे काय करू नये याविषयी मर्यादा ठरविणे दुरापास्तच. दोघांची-हि वृत्ति विशेषतः सरकारची फटकून वागण्याची व अधिकाराच्या जोरावर वाटेल ते घडवून आणू अशा गुर्मीची. पण शाळा व कॉलेजचे अधिकारी यानाच कोणतीहि शिस्त झाली तरी ती अमलांत आणण्याच्या मर्यादा अनुभवाने खऱ्या कळतात. पण वरिष्ठ अधि-काऱ्यानी कनिष्ठ अधिकाऱ्याना काही मत म्हणून आहे किंवा व्यावहारिक शहाण-पण आहे ही गोष्ट कधी मनातच आणली नाही. त्यांच्या मते शिक्षक म्हणजे शिस्त गाजविणारे शिपाई. आम्ही वरून पाठवू तो हुकूम यानी अमलात आणला पाहिजे. पण हे वरिष्ठ अधिकारी राहणार हिमालयावर, रिसले सर्क्युलरासारखी सर्क्युलरे सुटणार तेथून, आणि शाळामास्तरांचा नित्य संबंध पडला त्यांच्याच गावात राह-णाऱ्या विद्यार्थ्यांशी व पुढाऱ्यांशी, त्यामुळे सतत अप्रियता सोसून शिक्षकाचे काम करणे त्याना जड जाऊ लागले. विद्यार्थी तर कांय बोलूनचालून तरुणच. त्याना आपल्या वर्तणुकीचे परिणाम काय होतील हे समजणे कठीण. आणि एकीकडे शिक्षक आणि दुसरीकडे स्वतःची अल्लड वृत्ति. या दोन दाबात त्यांचीहि कुचंबणा फार होई व त्यांच्या हातून अभ्यासहि व्हावा तितका होत नसे. शाळेत मास्तरांचा उपदेश ऐकावा व घरीदारी सभातून वर्तमानपत्रातून पुढाऱ्यांचा उपदेश ऐकावा अशा रीतीने दोन कानातून दोन्हीकडून घुसलेल्या उपदेशामुळे त्यांच्याहि डोक्यात गोंधळ होत असल्यास नवल नाही. अशा रीतीने अडचण सर्वांचीच. पण कोणीहि दुसऱ्या-करिता काहीहि सवलत देण्यास तयार नव्हता. याचे कारण एकत्र बसून सहविचार होणे शक्य नव्हते. आपापल्या राज्यात जो तो राजा. सरकारच्या हातात काय हत्यार होते हे वर दिसून आलेच आहे. पण पुढाऱ्यांच्या हातात हत्यार नव्हते असे नाही व ते वापरण्यास त्यानी कमी केले असे नाही. डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल सेल्बी हे जवळ जवळ वरिष्ठ शाळाधिकारी. पण उलट त्यांच्या हाताखालील विद्यार्थी हे प्रौढ. यामुळे लहान विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकाविरुद्ध काही सांगणे हे जितके अवघड

लितके प्रिन्सिपॉल सेल्वीसारख्यां शिक्षकाविरुद्ध प्रौढ विद्यार्थ्यांना उपदेश करणे हे अवघड नव्हते. प्रस्तुतच्या चळवळीत सेल्वीसाहेबानी राजकीय चळवळीवर व पुढाऱ्यावर तोंडसुख घेतले तेव्हा टिळकांनीहि निर्वाणीचे हत्यार उपसून सेल्वी साहेबासारखे लोक हे आमचे गुरूच नव्हेत असे केसरीतून उघडपणे प्रतिपादण्यास सुरुवात केली. टिळक केसरीत लिहितात " शिष्याचे राष्ट्रहित पाहात नाही तो त्याचा गुरु नव्हे असे आम्ही साफ साफ विधान करतो. सेल्वीसाहेब म्हणतात की, स्वदेशी चळवळ देशास हितकारक आहे, पण विद्यार्थ्यांनी चळवळीत पडू नये. ठीक आहे चळवळीत पडू नये तर नये. पण सेल्वीसाहेबानी स्वतः देशी कपडे वापरून अगर विद्यार्थ्यांस वापरण्यास सांगून या चळवळीबद्दल कधी आपली सहानुभूति व्यक्त केली आहे काय ? काय म्हणे कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी या चळवळीत पडू नये ! चेंबर्लेनच्या चळवळीत आक्सफर्ड केंब्रिजमधील विद्यार्थी पडले नाहीत काय ? आमचे विद्याखाते जर स्वतंत्र असते तर व निसर्गतःच या देशाचे हितचिंतक असे विद्वान प्रोफेसर त्यात असते तर ते सुरेंद्रनाथ बानर्जीप्रमाणे स्वदेशी चळवळीवर व्याख्याने देण्यास गावोगाव फिरले असते. पण परकीय राजसत्तेखाली आमच्या कॉलेजातील प्रोफेसरांचीच इतकी दुर्दशा झाली आहे असे नव्हे तर विद्यार्थ्यांचीहि दुर्दशा करण्यास ते प्रवृत्त झाले आहेत. आणि त्यातल्यात्यात शरमेची गोष्ट ही की ज्यानी उदात्त राष्ट्रीय शिक्षण लोकास स्वस्त देण्याकरिता स्वार्थाचा त्याग करून खासगी कॉलेजे काढली तेहि अंधपरंपरेने सरकारचे अनुकरण करू लागले आहेत ! याना गुरु ह्मणावे की पोटभरू म्हणावे ? हे आमचे गुरुच नव्हत ! ए. बी. सी. शिकविण्याकरिता, इंग्रजी भाषा व ऑफिसात खर्डेघाशी शिकविण्याकरिता हे सरकारने नेमलेले नोकर होत. याना जुन्या धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे गुरुप्रमाणे मान देणे म्हणजे नवसास पावणाऱ्या ह्मसोबास ब्रम्हपदास नेण्यासारखे आहे ! प्राचीन काळचे गुरु अगदी वेगळ्या प्रकारचे असत. ते जितेंद्रिय, व्यावहारिक लोकापासून अलिप्त, सत्वशील व निस्पृह असत. ते गुरु वेगळे व हल्लीचे गुरु वेगळे. तरुण पिढीस खऱ्या राष्ट्रीय विचाराचे जर वळण लावावयाचे तर ते वळण सरकारी कॉलेजातून कधीहि मिळावयाचे नाही हे आम्ही नेहेमी लक्षात ठेवले पाहिजे. सेल्वी घ्या बेन घ्या की त्याचा भाऊ स्टोन घ्या त्यांची विद्वत्ता आम्हास मान्य आहे. पण हिंदुस्थानचे हित करण्यास ते येथे आलेले नाहीत. आम्ही आपले राष्ट्र सुधारावे अशी जर या गुरुंची इच्छा नाही तर यांचा भ्रामक कोटीक्रम आम्ही काय म्हणून ऐकावा ? व अशा प्रकारचा भ्रामक उपदेश करण्याचा त्याना अधिकार तो कोणता ? राजकीय उन्नतीचे प्रयत्न करण्याचे बाबतीत यांचे मत घेणे म्हणजे उंदरानी बोक्याचे मत घेण्यासारखे आहे ! जिंकलेल्या लोकाना जेते लोक राष्ट्रधर्माची खरी तत्वे सांगतील ही गोष्ट मनुष्य स्वभावाच्या विरुद्ध आहे. जपानच्या लोकानी विद्या शिकण्याकरिता परदेशातील गुरु आणले पण विद्या शिकून झाल्यावर त्याना परदेशास रवाना केले हे लक्षात ठेवले पाहिजे. शुक्राचार्य हे जसे कचास विशिष्ट विद्या शिकविण्याकरिता उपयोगी

पडले तद्वतच बेकन शेक्सपीयर वगैरे शिकविण्यापुरतेच सेल्बीसारखे लोक आमचे गुरु होत. स्वजातीयांची पर्वा न करिता जपानास निस्पृहपणाने खरी सल्ला देणारा एकटा हर्बर्ट स्पेन्सरच निघाला. कोठे स्पेन्सर व कोठे सेल्बीसाहेब ! हिरण्यकश्यपूने आपला मुलगा प्रल्हाद यास आपल्या मताप्रमाणे शिक्षण देण्याकरिता अनेक गुरु नेमले होते. पण त्याची भक्ति एकट्या विष्णूवर असल्याकारणाने त्याने

वळी ( ओळी ) पोथ्यांच्या या तुम्हि असुररीती शिकविता
परी व्यर्थ काव्ये अलवण हरीवीण कविता ॥

असा आपल्या गुरूस साफ जबाब दिला. आणि—

हे तो गुरु पापतरू म्हणावे । अंधाहुनी अंध गणावे ॥
दे कृष्णी प्रीती गुरु तोच साच । श्रुत्यर्थ इत्यर्थ असे असाच ॥

असे म्हणू लागला असे वामन पंडितानी वर्णन केले आहे. प्रल्हादास कृष्णभक्ति शिकविण्याच्या कामी हिरण्यकश्यपूने नेमलेले गुरु जसे निरुपयोगी ठरले तितकेच आमच्या नवीन पिढीस राष्ट्रभक्ति शिकविण्याच्या कामी सरकारी कॉलेजांत सरकारने नेमलेले गुरु अयोग्य होत. अशा गुरुंचा उपदेश आम्ही क्षणभर बाजूला ठेवला पाहिजे. नाहीपेक्षा हिंदु लोकानी दास्यत्वात जन्मावे आणि दास्यत्वातच मरावे अशी स्थिति येणार आहे. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी म्हणून राजकीय चळवळीत पडू नये. मोठ्यानी राजाचे नोकर म्हणून पडू नये. म्हाताऱ्यांनी पेन्शनर म्हणून पडू नये. एतावता काय की जन्मापासून मरेपर्यंत ' न हिंदुः प्रभुरात्मनः ' अशी आमची स्थिति व्हावी अशीच सरकारची योजना आहे." व ही गोष्ट आपल्यातील पुढारी लोकानी व शाळाधिकाऱ्यानी ओळखली नाही व त्याना पटत नव्हती म्हणूनच टिळक असे अट्टाहासाने प्रतिपादन करीत होते की " हे आमचे गुरुच नव्हत !"

शिस्तीच्या नांवाखाली विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीवर जुलूम करून सरकारी धोरणास हातभार लावणाऱ्या खासगी शाळांच्या शिक्षणाधिकाऱ्यावरहि टिळकानी अशीच कडक टीका केली. व ' इंद्राय तक्षकाय स्वाहा ' या न्यायाने सेल्बीसाहेबांबरोबर या कॉलेजातील अध्यापकासहि गुरुत्वाच्या मानास अपात्र ठरविले व

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः
उत्पथप्रतिपन्नस्य परित्यागो विधीयते ॥

असा महाभारतातल्या प्रमाणे बेलाशक उपदेश केला. टिळक म्हणत, " आम्ही जी मुले शाळा व कॉलेजे यात पाठवितो ती त्यास राजकीय चळवळीचा बिलकुल गंध लागू नये म्हणून पाठवीत नाही. विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेत मुख्यतः अभ्यासाकडेच लक्ष ठेवावे हे मत आम्हास पूर्णपणे ग्राह्य आहे. किंबहुना आम्हीहि विद्यार्थ्यांस तसेच सांगत आलो आहो. पण सार्वजनिक हिताच्या ज्या चळवळी राष्ट्रात चालू आहेत त्यांच्या शक्याशक्यतेचा अगर फायद्या गैरफायद्याचा विचार विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशा संपण्यापूर्वीच करून ठेवला पाहिजे. कै. रानडे व तेलंग

यांची नावे प्रमाण म्हणून सेल्बी पुढे करतात पण आम्ही म्हणतो याप्रमाणेच रानडे यांचे उघड मत होते. व म्हणूनच मुंबई पुणे येथे राष्ट्रीय सभा भरली होती तेव्हा सदर सभेत विद्यार्थ्यांनी पडणे इष्ट आहे असे त्यानी सांगितले होते हे सर्वांना माहीत आहे."

पण विद्यार्थ्यांचे हे स्वातंत्र्य कायम ठेवावयाचे तर सरकारशी फटकून वागण्यास तयार झाले पाहिजे. मग सरकारकडून जी ग्रँट मिळते ती कशी मिळणार? यावर टिळक म्हणतात " चतकोर भाकरीची अपेक्षा न धरता आपल्या व पालकांच्या हक्काकरिता धैर्याने व नेटाने भांडणे हेच खासगी शाळांचे कर्तव्य होय. गुलामगिरीच करावयाची तर चतकोर भाकरी घेऊन तरी का? सगळी तरी घ्या!–रँग्लर परांजपे यांच्यासारखे विद्वान गृहस्थ आज आमच्या खासगी शाळातून आहेत त्यांनी सरकारपाशी आग्रह धरला की ग्रँटच्या चतकोर भाकरीकरिता तुम्ही सांगाल तसे अगर तुम्हाला वाटेल तसे आम्ही नाचावयास तयार नाही तर त्याचे सरकारात काहीच वजन पडणार नाही असे नाही. पण सरकारी शाळा ज्या धर्तीवर चालतात त्याच धर्तीवर जर या खासगी शाळा चालावयाच्या असतील तर या खासगी शाळा आम्हास नको आहेत व त्यास लोकानी मदत करण्याची जरूरी नाही असे आम्ही स्पष्ट म्हणतो. हा लोकाश्रय जर सरकारचे गुप्त हेतु पर्यायाने सिद्धीस नेण्यास उपयोगी पडला तर आत्मत्यागाचे ऐवजी आत्महत्येचे नाव त्यास द्यावे लागेल!"

## (४) राष्ट्रीय शिक्षणावरील व्याख्याने

तारीख १४ सप्टेंबर १९०७ रोजी गायकवाडवाड्यातील गणपतीपुढे टिळकांचे राष्ट्रीय शिक्षणावर व्याख्यान झाले. ते म्हणाले "ज्यांच्यावर लोकशिक्षणाची जबाबदारी आहे त्यानी या विषयाची थट्टा करणे बरोबर नाही. आम्हाला पाहिजे तसे शिक्षण परकी राज्यकर्ते आम्हाला देऊ शकत नाहीत. तसा त्यांचा हेतू नाही. इच्छा नाही. कलकत्त्याच्या राष्ट्रीय शाळेत दादाभाईची व दत्तांची पुस्तके शिकवतात. प्रि. परांजपे जर ही पुस्तके आपल्या शाळेत शिकविण्यास घेतील तर मी त्यांचे म्हणणे ऐकेन. सर फेरोजशहा मेथा म्हणतात " आम्ही सरकारी शाळातूनच निघालो. तसे आणखीहि लोक निघतील. रानडे गोखले व न्यू इंग्लिश स्कूलचे संपादक त्याच शिक्षणातून निघाले. " पण फार झाले तर रानडे गोखले हे एकेकच निघाले. आम्हाला अधिक निघावयास हवेत. बुद्धि कमीजास्ती असली तरी सर्वांवर राष्ट्रीय विचाराचा ठसा उमटला पाहिजे आणि ते राष्ट्रीय शिक्षणावाचून व्हावयाचे नाही. आम्ही जरी सरकारी शाळातून निघालो तरी माझी अशी समजूत झाली आहे की सरकारी शिक्षणाने विद्यार्थ्यांची मने भ्रष्ट होतात. सरकारी धोरणाने आम्ही दरिद्री झालो याचे शिक्षण आम्ही राष्ट्रीय शाळेत देणार आहो. ते का देऊ नये? ते देण्याचा आमचा आम्हाला पूर्ण अधिकार हवा."

गुर्ले होसूर येथे श्री. चिदंबरमस्वामींचा उत्सव होत असतो. या उत्सवास टिळक गेले होते. येताना ते बेळगावास उतरले. तेथे दसऱ्याचे प्रसंगी खोत यांचे अध्यक्षते-खाली 'सरकारी शिक्षण व राष्ट्रीय शिक्षण' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. प्रथमतः मर्दानी खेळात प्राविण्य दाखविण्याबद्दल तेथील सामनेवाल्यांस बक्षीसे दिल्यानंतर टिळक आपल्या भाषणात म्हणाले "तरुण पिढीची अवनत स्थिति आणखी किती दिवस ठेवावयाची ? म्हणून सर्व प्रांतातील पुढारी लोकां-पुढे राष्ट्रीय शिक्षणाचा महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न झाला आहे. सरकार विद्वान् निर्माण करीत आहे व करीलहि. परंतु त्यास लंगडे विद्वान् बनवण्याकडे सरकारचे बुद्धिसर्वस्व खर्च होत आहे. सरकारचे हे धोरण आम्हाला नाकबूल आहे. या धोरणाने पुढील पिढी तेजोहीन होईल. ह्मणून याकरिता मुलांचे शिक्षण आह्मी आमच्या हाती घेऊन वेळीच प्रयत्न केले पाहिजेत. महर्षि दादा-भाईनी गेल्या वर्षी स्वराज्याचे प्रातव्य हिंदी लोकापुढे ठेविल्यापासून एक वर्षात देशामध्ये विचारक्रांति झाली आहे. ती वीस वर्षांनीहि झाली नसती एवढी मोठी आहे. हा विचारक्रांतीचा ओघ आम्ही पुढे चालवावा किंवा कुंठित करावा ? पन्नास वर्षे मेहनत करून दादाभाईनी आणि दहा पंधरा वर्षे श्रम करून दत्तानी जे सिद्धान्त प्रस्थापित केले आहेत ते आमच्या मुलांच्या मनावर लहानपणीच बिंबवले गेले पाहिजेत. या प्रमेयांचे विद्यार्थ्यांस लहानपणापासून बाळकडू देणे हेच राष्ट्रीय शिक्षणाचे बीज होय. राष्ट्रीय शिक्षण घेणारास सरकारी नोकऱ्या न मिळतील. पण मारवाडी लिंगायत बनिया हे व्यापारी वर्ग याना सरकारी पुस्तकी शिक्षणाची कधी आवश्यकता भासत नाही व पोट कसे भरेल याची चिंताहि याना करावी लागत नाही. शिस्तीच्या नावाखाली रिसले सर्क्युलर काढले आहे व त्या नियमाचे उल्लंघन करणाराला परीक्षेस बसू द्यावयाची नाही असेहि सरकारने ठरविले आहे ! आम्हासहि शिस्त नको असे नाही. पण राष्ट्रीय शाळेत आम्ही तरी विद्यार्थ्यांना चोऱ्या करा ह्मणून शिकवणार आहोत की काय ? विद्यार्थ्यांनी सभेला जाऊ नये अशी सरकारने करडी कदर ठेविली आहे. पण विद्यार्थ्यांनी सभाना जाणे अवश्य आहे असे मला वाटते. विद्यार्थ्यांना सभातून जे शिक्षण मिळते ते सरकारी शाळातून मिळत नाही ह्मणूनच विद्यार्थ्यांनी सभास यावे असे मी म्हणतो. या गोष्टीना शाळातून मज्जाव नसेल तर विद्यार्थ्यांनी सभेस येण्याची काही जरूर नाही. किंबहुना मग त्यानी सभेला येऊ नये असे मी म्हणेन. आपण शक्य तितक्या राष्ट्रीय शाळा व एक तरी राष्ट्रीय कॉलेज स्थापन करण्याची हल्ली वेळ आली आहे. सरकारी संस्था अगर ज्या निमसर-कारी संस्थाजवळ महत्प्रयासाने थोडाबहुत पैसा जमला आहे त्या राष्ट्रीय होण्यास प्रथम कबूल होणार नाहीत हे खरे. तरी पण हळूहळू आपण हा उद्योग चालू ठेवला म्हणजे त्या संस्थाहि आपल्या संस्थेस येऊन मिळतील."

तारीख २७ फेब्रुवारी १९०८ रोजी सोलापुरास मुंबईचे डॉ. देशमूख यांच्या अध्यक्षतेखाली टिळकांचे व्याख्यान झाले. त्यात त्यानी सांगितले "देश

ओळखण्यास शिकणे याला राष्ट्रीय शिक्षण ह्मणावयाचे. नुसते लिहिण्यावाचण्यास येण्याने ते राष्ट्रीय शिक्षण होत नाही. प्रथम प्रथम इलीच्या शिक्षणाबद्दल आह्मास फार अभिमान वाटत असे. माझी व माझ्या वडिलांचीहि अशी समजूत होती. पण पुढे पुढे आमच्या मनात आम्ही बुद्धीने इतर देशांच्या बरोबरीने असून आमचा देश उदयास का येत नाही असा विचार उभा राहिला. १२ वर्षांच्या शिक्षणानेहि २५ रुपये मिळविण्याची योग्यता आमच्यात का येत नाही ? असे लोक स्वतःस प्रश्न करू लागले. या ओघाबरोबर मीहि पुढे जात चाललो आहे. कोणी असे म्हणतात की ' तुम्हाला कोठे राष्ट्रीय शिक्षण मिळाले होते ? उगीच हा खटाटोप व आक्रोश कां ?' यास आमचे उत्तर असे की आम्हास ३५व्या वर्षी मिळालेले ज्ञान आमच्या तरूण पिढीस १५व्या वर्षी मिळावे म्हणून तर ही सर्व खटपट आहे. अशा शिक्षणाने कदाचित् पुढील पिढी असंतुष्ट होईल. पण हा राजद्रोह नव्हे. इंग्रजी भाषा फार द्वाड आहे. ती लवकर येत नाही. ती सोपी नाही. केवळ राजकर्त्यांची भाषा म्हणून ती आम्हास शिकावी लागते. आमच्यावर ते निवळ ओझे आहे. मला मिळालेले ज्ञान मराठी भाषेत मिळाले असते तर हे सर्व ५२ वर्षांचे ज्ञान मला २५ व्या अगर ३० व्या वर्षीच मिळाले असते. या इंग्रजी भाषेमुळे वर्षे फुकट जातात ! राष्ट्रास परकी भाषेचे शिक्षण देणे म्हणजे त्यास खच्ची करण्यासारखे आहे. राष्ट्रीय शाळा पाहिजे आहेत. त्या काढावयाच्या कशा हा मोठा प्रश्न आहे. सरकार या शाळा काढू शकत नाही. सरकारजवळचे पैसे आमचेच आहेत. पण ते त्यांच्या ताब्यात गेले म्हणून आह्मास राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सोडवता येत नाही. हेच सरकार आमचे असते तर मी आज या विषयाची कहाणी सांगण्यास येथे उभाहि राहिलो नसतो. यामुळेच मंद गतीने का होईना पण आपल्या हातून होतील ते प्रयत्न केले पाहिजेत. "

शेवटी समर्थ विद्यालयासंबंधाने त्यानी सांगितले की " या योजनेला बराच खर्च येईल. पण दरसाल तुह्मी चार रुपये सरकारला देता. आह्माला फक्त एक रुपया द्या. हे सगळ्यांच्या फायद्याचे व धार्मिक काम आहे असे समजा. महाराष्ट्रात शिक्षणाचे हे एक देऊळ बांधावयाचे आहे. ते तुमच्या साह्याने बांधले जाईल अशी मला खात्री आहे. एका पिढीत रामदासाप्रमाणे शेकडो उपदेशक महाराष्ट्रात पसरावे व उद्योगधंद्यास अधिक योग्य करावेत एवढ्याकरिता ही शाळा आहे. आमचा हा प्रयत्न सरकारास कदाचित् रुचणार नाही. व हा उपक्रम कदाचित् सरकार बंदहि करील. पण आमच्या कार्याला बंदी केल्यास त्या वेळी देव बुद्धि देईल तसे करू !"

तारीख ३ मार्च १९०८ रोजी टिळकानी बार्शीस व्याख्यान दिले. त्यात त्यानी सांगितले की " आम्हाला ज्या गोष्टी २५ वर्षे झाल्यावर समजू लागल्या त्या पुढील पिढीस तरुणपणीच समजावयास पाहिजेत. अमेरिकेत चवथ्या पाचव्या इयत्तेतच स्वतंत्रतेचा जाहीरनामा शिकविला जातो. त्याचप्रमाणे विद्यार्थीदशेतच आम्ही देशाची स्थिति मुलास लहानपणी शिकवावयास पाहिजे. प्रो. विजापूरकरां-

गुर्ले होसूर येथे श्री. चिदंबरमूस्वामींचा उत्सव होत असतो. या उत्सवास टिळक गेले होते. येताना ते बेळगावास उतरले. तेथे दसऱ्याचे प्रसंगी खोत यांचे अध्यक्षतेखाली 'सरकारी शिक्षण व राष्ट्रीय शिक्षण' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. प्रथमतः मर्दानी खेळात प्राविण्य दाखविण्याबद्दल तेथील सामनेवाल्यांस बक्षीसे दिल्यानंतर टिळक आपल्या भाषणात म्हणाले "तरुण पिढीची अवनत स्थिति आणखी किती दिवस ठेवावयाची? म्हणून सर्व प्रांतातील पुढारी लोकांपुढे राष्ट्रीय शिक्षणाचा महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न झाला आहे. सरकार विद्वान् निर्माण करीत आहे व करीलहि. परंतु त्यास लंगडे विद्वान् बनवण्याकडे सरकारचे बुद्धिसर्वस्व खर्च होत आहे. सरकारचे हे धोरण आम्हाला नाकबूल आहे. या धोरणाने पुढील पिढी तेजोहीन होईल. ह्मणून याकरिता मुलांचे शिक्षण आह्मी आमच्या हाती घेऊन वेळीच प्रयत्न केले पाहिजेत. महर्षि दादाभाईनी गेल्या वर्षी स्वराज्याचे प्रास्तव्य हिंदी लोकापुढे ठेविल्यापासून एक वर्षात देशामध्ये विचारक्रांति झाली आहे. ती वीस वर्षांनीहि झाली नसती एवढी मोठी आहे. ह्या विचारक्रांतीचा ओघ आम्ही पुढे चालवावा किंवा कुंठित करावा? पन्नास वर्षे मेहनत करून दादाभाईनी आणि दहा पंधरा वर्षे श्रम करून दत्तानी जे सिद्धान्त प्रस्थापित केले आहेत ते आमच्या मुलांच्या मनावर लहानपणीच बिंबवले गेले पाहिजेत. या प्रमेयांचे विद्यार्थ्यांस लहानपणापासून बाळकडू देणे हेच राष्ट्रीय शिक्षणाचे बीज होय. राष्ट्रीय शिक्षण घेणारास सरकारी नोकऱ्या न मिळतील. पण मारवाडी लिंगायत बनिया हे व्यापारी वर्ग याना सरकारी पुस्तकी शिक्षणाची कधी आवश्यकता भासत नाही व पोट कसे भरेल याची चिंताहि याना करावी लागत नाही. शिस्तीच्या नावाखाली रिसले सर्क्युलर काढले आहे व त्या नियमाचे उल्लंघन करणाराला परीक्षेस बसू द्यावयाची नाही असेहि सरकारने ठरविले आहे! आम्हासहि शिस्त नको असे नाही. पण राष्ट्रीय शाळेत आम्ही तरी विद्यार्थ्यांना चोऱ्या करा ह्मणून शिकवणार आहोत की काय? विद्यार्थ्यांनी सभेला जाऊ नये अशी सरकारने करडी कदर ठेविली आहे. पण विद्यार्थ्यांनी सभाना जाणे अवश्य आहे असे मला वाटते. विद्यार्थ्यांना सभातून जे शिक्षण मिळते ते सरकारी शाळातून मिळत नाही ह्मणूनच विद्यार्थ्यांनी सभास यावे असे मी म्हणतो. या गोष्टीना शाळातून मज्जाव नसेल तर विद्यार्थ्यांनी सभेस येण्याची काही जरूर नाही. किंबहुना मग त्यानी सभेला येऊ नये असे मी म्हणेन. आपण शक्य तितक्या राष्ट्रीय शाळा व एक तरी राष्ट्रीय कॉलेज स्थापन करण्याची हल्ली वेळ आली आहे. सरकारी संस्था अगर ज्या निमसरकारी संस्थाजवळ महत्प्रयासाने थोडाबहुत पैसा जमला आहे त्या राष्ट्रीय होण्यास प्रथम कबूल होणार नाहीत हे खरे. तरी पण हळूहळू आपण हा उद्योग चालू ठेवला म्हणजे त्या संस्थाहि आपल्या संस्थेस येऊन मिळतील."

तारीख २७ फेब्रुवारी १९०८ रोजी सोलापुरास मुंबईचे डॉ. देशमूख यांच्या अध्यक्षतेखाली टिळकांचे व्याख्यान झाले. त्यात त्यानी सांगितले "देश

ओळखण्यास शिकणे याला राष्ट्रीय शिक्षण ह्मणावयाचे. नुसते लिहिण्यावाचण्यास येण्याने ते राष्ट्रीय शिक्षण होत नाही. प्रथम प्रथम हल्लीच्या शिक्षणाबद्दल आह्मास फार अभिमान वाटत असे. माझी व माझ्या वडिलांचीहि अशी समजूत होती. पण पुढे पुढे आमच्या मनात आम्ही बुद्धीने इतर देशांच्या बरोबरीने असून आमचा देश उदयास का येत नाही असा विचार उभा राहिला. १२ वर्षांच्या शिक्षणानेहि २५ रुपये मिळविण्याची योग्यता आमच्यात का येत नाही ? असे लोक स्वतःस प्रश्न करू लागले. या ओघाबरोबर मीहि पुढे जात चाललो आहे. कोणी असे म्हणतात की ' तुम्हाला कोठे राष्ट्रीय शिक्षण मिळाले होते ? उगीच हा खटाटोप व आक्रोश कां ?' यास आमचे उत्तर असे की आम्हास ३५व्या वर्षी मिळालेले ज्ञान आमच्या तरूण पिढीस १५व्या वर्षी मिळावे म्हणून तर ही सर्व खटपट आहे. अशा शिक्षणाने कदाचित् पुढील पिढी असंतुष्ट होईल. पण हा राजद्रोह नव्हे. इंग्रजी भाषा फार द्वाड आहे. ती लवकर येत नाही. ती सोपी नाही. केवळ राजकर्त्यांची भाषा म्हणून ती आम्हास शिकावी लागते. आमच्यावर ते निवळ ओझे आहे. मला मिळालेले ज्ञान मराठी भाषेत मिळाले असते तर हे सर्व ५२ वर्षांचे ज्ञान मला २५ व्या अगर ३० व्या वर्षीच मिळाले असते. या इंग्रजी भाषेमुळे वर्षे फुकट जातात ! राष्ट्रास परकी भाषेचे शिक्षण देणे म्हणजे त्यास खच्ची करण्यासारखे आहे. राष्ट्रीय शाळा पाहिजे आहेत. त्या काढावयाच्या कशा हा मोठा प्रश्न आहे. सरकार या शाळा काढू शकत नाही. सरकारजवळचे पैसे आमचेच आहेत. पण ते त्यांच्या ताब्यात गेले म्हणून आह्मास राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सोडवता येत नाही. हेच सरकार आमचे असते तर मी आज या विषयाची कहाणी सांगण्यास येथे उभाहि राहिलो नसतो. यामुळेच मंद गतीने का होईना पण आपल्या हातून होतील ते प्रयत्न केले पाहिजेत. ''

शेवटी समर्थ विद्यालयासंबंधाने त्यानी सांगितले की " या योजनेला बराच खर्च येईल. पण दरसाल तुह्मी चार रुपये सरकारला देता. आह्माला फक्त एक रुपया द्या. हे सगळ्यांच्या फायद्याचे व धार्मिक काम आहे असे समजा. महाराष्ट्रात शिक्षणाचे हे एक देऊळ बांधावयाचे आहे. ते तुमच्या साह्याने बांधले जाईल अशी मला खात्री आहे. एका पिढीत रामदासाप्रमाणे शेकडो उपदेशक महाराष्ट्रात पसरावे व उद्योगधंद्यास अधिक योग्य करावेत एवढयाकरिता ही शाळा आहे. आमचा हा प्रयत्न सरकारास कदाचित् रुचणार नाही. व हा उपक्रम कदाचित् सरकार बंदहि करील. पण आमच्या कार्याला बंदी केल्यास त्या वेळी देव बुद्धि देईल तसे करू !"

तारीख ३ मार्च १९०८ रोजी टिळकानी बार्शीस व्याख्यान दिले. त्यात त्यानी सांगितले की " आम्हाला ज्या गोष्टी २५ वर्षे झाल्यावर समजू लागल्या त्या पुढील पिढीस तरुणपणीच समजावयास पाहिजेत. अमेरिकेत चवथ्या पाचव्या इयत्तेतच स्वतंत्रतेचा जाहीरनामा शिकविला जातो. त्याचप्रमाणे विद्यार्थीदशेतच आम्ही देशाची स्थिति मुलास लहानपणी शिकवावयास पाहिजे. प्रो. विजापूरकरां-

सारखी विद्वान् मंडळी या कामाला सर्वस्वी वाहून घेण्यास तयार झाली आहेत. त्याना धनवान् लोकानी आपल्या धनाची जोड करून दिली पाहिजे. सरकार रुसो किंवा रागावो. आपण आपले कर्तव्य केले पाहिजे. वाटेल त्या बाबतीत सरकारचा हट्ट आह्मी तरी कसा ऐकावा ? सरकारने उद्या लग्ने करू नका ह्मणून सांगितले तर आपण थोडेच तसे करणार आहो ? शिक्षणाचीहि गोष्ट अशीच आहे. ”

तारीख २१ मार्च १९०८ रोजी रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा सभा भरली होती. या सभेत “ हल्लींच्या शिक्षणपद्धतीतील दोष नाहिसे करून चालू शिक्षणसंस्था सुधारणे व नवीन शिक्षणसंस्था काढणे अवश्य आहे ” असा ठराव पास झाला. यासंबंधी रिपोर्ट सादर करण्याकरिता रा. ब. जोशी नानासाहेब देशमूख टिळक विजापूरकर ल. ब. भोपटकर देसाई प्रो. हरीभाऊ लिमये प्रो. कानिटकर नटेशराव द्रविड प्रो. वासुदेवराव पटवर्धन वगैरे गृहस्थांची कमिटी नेमली होती. राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव टिळकानी मांडला. त्यात राष्ट्रीय शिक्षणासंबंधाने इतर हकीकत सांगून टिळकानी सांगितले “ शिक्षण कमिशनपुढे माझी साक्ष झाली. त्यात मला विचारले होते की ग्रँठ देऊन जर सरकार पैसे खर्च करणार तर त्यावर सरकारची देखरेख का नको ? मी सांगितले “ पैसे द्याल तर द्या. पण देखरेखीचे व्याज त्याबरोबर आम्हाला नको. देखरेखीचा विटाळ देखील नको ”. राष्ट्रीय बाण्याचे शिक्षण स्वतंत्रपणानेच अधिक देता येईल. राष्ट्रात विद्वान् लोक निपजतील तितके पाहिजे आहेत. राष्ट्रीय शाळातून आम्हाला शिक्षणाचा दर्जा कमी करावयाचा आहे असे मुळीच नाही. सरकारला बुडवता येणार नाही अशी विद्वत्तेची परंपरा आपली आहे व तीच आम्हालाहि कायम राखावयाची आहे. राष्ट्रीय शाळामुळे इतर शिक्षण संस्थांचे नुकसान न होता हितच होणार आहे.”

राष्ट्रीय शिक्षणाचा प्रचार एकीकडे चालला असताना नेमस्त व इतर इटवादी लोक यांच्याशी टिळकांचा वाद चालूच होता. या वादाची पुनरावृत्ति पुढे १९१९ सालीहि थोडी झाली. तिचाहि येथेच उल्लेख करू. टिळक भांडखोर आहेत व विघातक कामगिरीशिवाय त्यांचे हातून काहीच होत नाही यामुळेच त्याना अखेर डेकन एजुकेशन सोसायटीचा राजीनामा द्यावा लागला, असा आक्षेप टिळक विलायतेहून आल्यानंतर त्याना देण्यात येणाऱ्या मानपत्राच्या वादात फर्ग्युसन कॉलेजच्या अधिकाऱ्यानी काढला होता. त्यावर टिळकानी तारीख २३ डिसेंबर १९१९ च्या केसरीत खुलासा केला की “डेक्कन एजुकेशन सोसायटी ही संस्था स्थापन करण्याचे वेळी मूळ संस्थापकाचे जे उद्देश होते ते पुढे सुटत चालले हे राजीनामा देण्याच्या अनेक कारणापैकी एक होते. ” शिक्षकांचे राजकीयच काय पण शिक्षणविषयकहि स्वातंत्र्य कायम राहिले पाहिजे असे टिळक यांचे म्हणणे होते. व १८८२ साली न्यू इंग्लिश स्कूलतर्फे शिक्षणकमिटीचे अध्यक्ष डॉ. हंटर यांस आपटे आगरकर टिळक नामजोशी यानी जे मानपत्र दिले त्यात हेच विचार नमूद आहेत. ‘नॅशनल एजुकेशन’

हे शब्द टिळकांच्या राजिनाम्यात आले आहेत इतकेच नव्हे तर त्यासंबंधी आपण काय योजना करणार याचा खुलासा आपटे यानी शिक्षण कमिशनपुढे जी साक्ष दिली त्यातहि केला होता.

सरकारी ग्रँट घेणे हे एक सोसायटीचे राजकीय व शिक्षणविषयक बाबतीतील स्वातंत्र्य नष्ट होण्याचे कारण होय. अशा प्रकारची सरकारी ग्रँट शाळेस घ्यावी न घ्यावी याबद्दल पहिल्यानेच सोसायटीत पुष्कळ भवति न भवति झाली होती. सरकार पैसा आपल्या घरचा आणीत नाही लोकाकडूनच वसूल करते. म्हणून सरकारची मदत घेणे काय किंवा लोकांची मदत घेणे काय एकच असे त्या वेळी सर्वानुमते ठरले. पण त्याबरोबरच हेहि लक्षात ठेविले पाहिजे की दुसराहि एक असा महत्त्वाचा ठराव झाला होता की सरकारी ग्रँट घेतल्याने सरकारचा ताबा स्वीकारावा लागून आपले राजकीय किंवा इतर स्वातंत्र्य जर नष्ट होईल तर ग्रँट न घेता सोसायटीने आपले स्वातंत्र्यच कायम ठेवावे. आणि त्याप्रमाणे एक दोन वर्षे सोसायटीने वर्तनहि केले. पुढे हा नियम सुटत गेल्यामुळे अखेर शाळेचे स्वातंत्र्य क्रमाक्रमाने नष्ट होणार हे १८९० सालापूर्वीच टिळकांच्या लक्षात आले होते. व याचा त्यानी आपल्या राजीनाम्यात उल्लेख केला आहे. त्या वेळी ग्रँट घ्यावी की न घ्यावी हे एकच राजीनाम्याचे मुख्य कारण झाले होते असे नसले तरी मूळ उत्पादकाचे धोरण मेंबर लोकाकडून सुटत चालले आहे अशी तक्रार त्यानी राजीनाम्यात केलीच होती. "सरकारी ग्रँट व स्वातंत्र्य यांचा विरोध येईल तर स्वातंत्र्य राखा ग्रँट घेऊ नका आणि विरोध न येता सरकारची ग्रँट मिळत असेल तर ती घेतल्याखेरीज सोडू नका. कारण सरकारी पैसा झाला तरी तो आपलाच आहे" असे टिळकांचेच नव्हे तर शाळेच्या इतर चालकांचेहि ठाम मत होते. म्हणून ग्रँट घेण्यास टिळक सर्वस्वी ह्मणजे विनशर्त कबूल होते हे ह्मणणे व्यर्थ होय. व ग्रँटपेक्षाहि शिक्षणसंस्थाचे स्वातंत्र्य कायम राहते की नाही हाच सरकारी शिक्षण विरुद्ध राष्ट्रीय शिक्षण यातील मुख्य मुद्दा होय असे टिळकांचे ह्मणणे होते. प्रो. के. के. जोशी यानी तारीख १४ डिसेंबर १९१९ रोजी केसरीत पत्र लिहून "राजकीय बाबतीत स्वातंत्र्य नष्ट झाले ह्मणून वाईट वाटून व इतर काही कारणामुळे टिळकानी सोसायटीचा राजीनामा दिला" या विधानास तुमचेपाशी काय आधार आहे? असा जाहीर खुलासा विचारला. त्याला टिळकानी केसरीत असे उत्तर दिले की "डॉ. जोशी हे सोसायटीच्या तिसऱ्या पिढीतले सेक्रेटरी असल्या कारणाने कदाचित् जुन्या गोष्टी त्यांस माहीत नसतील. पण १८९८–९९ साली सोसायटीच्या लाइफमेंबराचे राजकीयच काय पण शिक्षणविषयक स्वातंत्र्यहि कसे नष्ट झाले व त्यानी सरकारच्या सांगण्यावरून आपल्यातील्च एका लाईफ मेंबरास वर्ष दोन वर्षे सस्पेंड करून राजकीय स्वातंत्र्यास विघातक अशा सरकारने घातलेल्या शर्ती सोसायटीच्या लाईफमेंबरानी मुठीत नाक धरून कशा कबूल केल्या हे सोसायटीचे कागदपत्र पाहिल्यास डॉ. जोशी यांस कळून येईल. या वेळी डे. ए. सोसायटीचे राजकीय स्वातंत्र्य पुरे पुरे नष्ट

होऊन इतर बाबतीतहि सोसायटीला सरकारने चांगलीच नमविली होती. तात्पर्य जी संस्था महाराष्ट्रात स्वतंत्र स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर खासगी शाळा स्थापण्यासाठी निर्माण झाली ती पुढे ग्रँट्स् इन-एडच्या लोभाने १८९८–९९ साली पूर्णपणे सरकारच्या कह्यात गेली. याबद्दलचे सरकारी ठराव लाईफमेंबर्सनी कबूल केलेल्या अटी आणि तत्संबंधी टीका ही सर्व त्या सालच्या केसरी व मराठा पत्रामधून प्रसिद्ध झाली आहेत व त्या वेळी त्या लेखाबद्दल सोसायटीच्या कोणत्याहि लाईफ मेंबराने तक्रार केली नव्हती." १८९९ साली सरकारच्या शिक्षणविषयक धोरणावर टिळकानी टीका केली तेव्हा नेहमीच्या राष्ट्रीय वृत्तीस अनुसरून त्यानी डेक्कन एज्युकेशन सोसायटीने शर्ती कबूल करून आपले स्वातंत्र्य गमावले या मुद्यावर विशेष टीकेचा भर न देता सरकारच्या दडपशाहिवर टीका केली होती. यामुळे टिळक सोसायटीच्या वतीने सरकारशी भांडल्याचाहि भास झाला. पण आमचे राजकीय अगर शिक्षणविषयक स्वातंत्र्य नष्ट झाले असे तुम्ही कशावरून म्हणता? असा स्वतःच उलटी उडी मारून १९११ साली डे. ए. सोसायटीच्या सेक्रेटरीनी आव आणला, तेव्हा पूर्वीचे दाखले दाखवून टिळकाना माप पदरात घालावे लागले! १८९९ साली सरकारने डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणविषयक स्वातंत्र्य नष्ट केले असा आरोप सरकारावर करून टिळक सरकारशी भांडत होते व सोसायटी या टीकेबद्दल एक ब्रहि काढत नव्हती. याचा अर्थ टिळकांची टीका खरीच होती असा उघड ठरतो. सोसायटीची बाजू घेऊन सरकारशी टिळक भांडले असले तथापि टिळक व डे. ए. सोसायटी यांचे या वेळचे संबंध कसे झाले होते हे लक्षात घेता टिळकांच्या समर्थनाने भलत्याच गोष्टीच्या कबुलीचे त्रांगडे गळयात येत असते तर त्याचे उघड रीतीने निराकरण केल्याशिवाय सोसायटीचे लोक त्या वेळी राहिले नसते यात मुळीच शंका नाही.

## (५) केरहार्डी यांचे पुण्यास आगमन

आक्टोबर महिन्यात इंग्लंडातील मजुरपक्षाचे पुढारी केरहार्डी हे पुण्यातील पुढाऱ्यांच्या खास निमंत्रणावरून पुण्यास आले होते. जहाल व नेमस्तपक्षाच्या सुमारे १६ प्रमुख पुढाऱ्यानी त्यास पुण्यास भेट देण्यास विनंति केली असून स्टेशनावर शहरातील सुमारे ४० प्रमुख लोक त्याना सामोरे गेले होते. केरहार्डी हे जातीने स्कॉच असून त्यांचा जन्म खेडेगावातील एका गरीब कुळात झाला. आठव्या वर्षापासून ते एका कोळशाच्या खाणीत मजूर होते व रस्त्यावरील व दुकानांच्या जाहीराती वाचूनच ते वाचावयास शिकले. पण केवळ स्वकष्टाने जगात पुढे येऊन ते पार्लमेंट सभेचे सभासद म्हणून निवडून आले. 'स्वतंत्र मजूरपक्ष' या संस्थेचे ते अध्यक्ष असून 'लेबर लीडर' या नावाचे वर्तमानपत्रहि त्यानी चालविले होते. केरहार्डी हिंदुस्थानात आले होते ते फक्त हिंदुस्थानातील वस्तुस्थिति पाहून तिचा अभ्यास करण्याकरिता. गरीबीत दिवस काढलेल्यालाच गरीब लोकांची सहानुभूति

वाटते, या न्यायाने त्यांची हिंदी प्रजेच्या आकांक्षाबद्दल सहानुभूति होती. व साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळणे हा हिंदुस्थानचा हक्क आहे असे त्यानी जाहीर रीतीने बोलूनहि दाखविले होते. अर्थात् अशा पाहुण्यास कोण मुद्दाम बोलावून त्याचा सन्मान करणार नाही ? व म्हणूनच नेमस्त व राष्ट्रीय पक्षाच्या लोकानी या वेळी एकत्र मिळून व विनंतिपत्र पाठवून त्याना पुण्यास मुद्दाम बोलाविले होते.

केरहार्डी यानी पुण्याच्या बहुतेक सर्व संस्थाना भेट देऊन पानसुपारी घेतली. नाना वाडा आनंदाश्रम केसरी ऑफीस वगैरे संस्था पाहिल्यावर सार्वजनिक सभेमध्ये त्याना सभेमार्फत मानपत्र देण्यात आहे. अध्यक्ष अण्णासाहेब पटवर्धन असून चिटणीस केळकर यानी मानपत्र वाचून दाखविले. त्यांत इंग्लंडातील लिबरल अगर कोणत्याहि पक्षावर मुख्यतः अवलंबून न बसतां स्वार्थत्याग व स्वावलंबन यानीच राष्ट्रीय भवितव्याचा प्रश्न सुटेल असे हिंदी प्रजेस सध्या वाटू लागले आहे असे म्हटले असून, हिंदी प्रजेच्या न्याय्य आकांक्षाबद्दल आपण इंग्लंडातील मतदारांची खात्री करावी अशी विनंती केली होती. केरहार्डी यानी मानपत्रास उत्तर दिले त्यात त्यानी सांगितले " हिंदुस्थानाबद्दल माझ्या मनात सहानुभूति होतीच पण आता ती शतपट अधिक वाढली आहे." "इंग्लंडातील हजारातील ९९९ माणसे हिंदुस्थानाबद्दल अज्ञानात असतात. माझ्या पक्षाची पारिषद बोलावून तुमची हकीगत मी त्यास जरूर सांगेन" असे त्यानी आश्वासन दिले.

यानंतर हिराबागेतील टाऊनहालात उपहार झाला. तेथे हिंदुस्थानातील कारागिरीबद्दल कौशल्याबद्दल संभाषण व चर्चा झाली. सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी फर्ग्युसन कॉलेज वगैरे संस्थानाहि त्यानी भेट दिली. रविवारी टिळक व केळकर यांचेबरोबर केरहार्डी पुण्याहून शिवापुरास गेले व आसपासची खेडीपाडी व लोकस्थिति प्रत्यक्ष पाहून त्यानी गरीब लोकांच्या स्थितिविषयी बारीक सारीक रीतीने व आस्थापूर्वक चौकशी केली.

केरहार्डी पुण्यास दोन दिवस होते. त्या दोन दिवसात ज्यांचा त्यांच्याशी यत्किंचितहि परिचय झाला त्याना त्यांची साधी राहणी सालस वागणूक चौकस बुद्धि व निगर्वी व खेळीमेळीचा स्वभाव यांची प्रचीति झाल्याखेरीज राहिली नाही. सर्व लोकांस त्यांच्याबद्दल फार कौतुक वाटले. पण याहिपेक्षा तारीफ करण्याची गोष्ट म्हणजे पुण्याच्या पोलिसांची ! त्यानी आपली टेहेळनजर व कृष्ण छाया यानी या पार्लमेंटच्या सभासदाचाहि पिच्छा पुरविला ! याचा इतरास संताप आला इतकेच नव्हे तर स्वतः केरहार्डी यानाहि त्याची चीड आली व त्यानी अधिकाऱ्याना सांगितले की " मी स्वतंत्र देशातील मनुष्य आहे. माझ्या मागेहि तुम्ही हा ससेमिरा ठेवाल तर मी गव्हर्नरला ही गोष्ट कळवीन व पार्लमेंटातहि याचा निषेध करावयास चुकणार नाही ! " केरहार्डी यांच्या भेटीने पुणेकराप्रमाणेच स्वतः केरहार्डी यानाहि समाधान वाटल्यावाचून राहिले नसेल. मजूर पक्षाशी हा टिळकांचा पहिला प्रत्यक्ष परिचय.

## (६) वीरनवाली

युरोपियन सोजिरानी अत्याचार करावे आणि गोऱ्या युरोपियन ज्यूरीने त्याना दोषमुक्त करून सोडून द्यावे हा प्रकार ब्रिटिश राज्याच्या रियासतीत हजारो वेळा घडला असेल. स्वतः केसरी मराठ्याने याच या विषयावर टीका केल्याची शेंकडो उदाहरणे काढून दाखविता येतील. पण चावून चिवट व्हावे त्याप्रमाणे वर्तमानपत्रानी टीका केल्यामुळे हा उघड उघड पक्षपाताचा अन्याय आजवर तर दूर झाला नाहीच पण कोर्टावर पक्षपातीपणाचा आरोप करून तुह्मी न्यायासनाची बदनामी केली असे म्हणून वर्तमानपत्रकारावर खटले मात्र करण्यात आले! इतर साहश्यांबरोबर नामसाहश्यानेहि इतिहासाची पुनरावृत्ति झाल्याचे एक गमतीदार उदाहरण येथे सांगण्यासारखे आहे. १९२४ साली बॉकर या सोल्जराच्या गोळीने पुण्याजवळ लोहोगावानजीक अर्जुना या नावाचा इसम ठार झाला. या बाबतीत केसरीने कडक टीका केली ह्मणून हायकोर्टाने केसरीवर बदनामी केल्याबद्दल खटला केला. पण १८९९ साली बरोबर अशीच गोष्ट घडली होती. पार्कर नावाच्या गोऱ्या सोल्जराला अशाच गुन्ह्याबद्दल ज्यूरीने निर्दोषी ह्मणून सोडून दिल्याबदल मराठ्याने कडक टीका केली. याबद्दल त्या वेळचे पुण्याचे कलेक्टर लँबसाहेब यानी केळकर यास बोलावून घेऊन जाब विचारला. त्या वेळी केळकर याजवर खटला झाला नाही इतकेच. पण पार्कर याच्या गोळीने जो मनुष्य मेला त्याचेहि नाव योगायोगाने 'अर्जुना' असेच होते! यानंतर पुढल्याच मराठ्याने त्याच सालात घडलेल्या सुमारे २५–३० ठळक खटल्यांची नावनिशी मांडून कलेक्टर लँब यास उत्तर दिले आणि विचारले की ब्रिटिश राज्यात हिंदी प्रजाजनांच्या प्राणाची किंमत किती असते हे यावरून दिसतेच आहे. न्यायाचा राजरोस व ढळढळीत रीतीने खून होण्याला आणखी शिंगे ती काय उरली? गोऱ्या सोल्जरानी धडधडीत गुन्हे करावे आणि युरोपियन ज्यूरीने त्याना निर्दोषी ठरवून बेलाशक सोडून द्यावे या गोष्टीची पुनरावृत्ति इतकी वारंवार व शेंकडो वेळा झाली आहे की त्याला आता कोणी अन्याय न ह्मणता अत्याचारच ह्मणेल!

अशाच एका अत्याचाराचे एक हृदयस्पर्शी उदाहरण १९०७ साली घडून आले व त्याने त्या वेळी इतका चटका लावून ठेवला होता की ते अद्यापिहि लोकांच्या स्मरणातून गेले नसेल. ते असे. वीरनवाली या नावाची एक १७–१८ वर्षांची तरुण मुलगी रावळपिंडीस आपल्या भावाकडे जाण्याच्या उद्देशाने आगगाडीतून रात्री एकटीच प्रवास करीत होती. गाडी मध्यरात्री स्टेशनावर आल्यामुळे ती रात्रीच्या रात्र राहण्याचे इराद्याने बायकांचे वेटिंगरूममध्ये बसली. इतक्यात ती एकटी आहे असे पाहून मूर या गोऱ्या स्टेशनमास्तरची तिच्यावर दृष्टी गेली व त्याने तिला धमक्या घालून आपले खोलीत नेले व तिजवर बलात्कार केला. त्या लांडग्याचे तडाक्यातून सुटून बाहेर पडताच फाजलउद्दीन या नावाच्या मूर याच्या नोकरानेहि येऊन तिचे

अंगावर हात टाकला. नंतर रीतीप्रमाणे पोलीसकडे वर्दी जाऊन मूर व फाजल-उद्दीन यांचेवर खटला झाला. सरकारी वकील व पोलीस यानी पराकाष्ठा करून गुन्ह्याचा खंबीर पुरावा दिला. आरंभी हे दोघे आरोपी मुलीशी आपला संबंधच झाला नाही असे म्हणत होते. पण डॉक्टराने केलेली तपासणी विरुद्ध जाताच त्यानी आपले धोरण बदलले. व ही मुलगी वाईट चालीचीच होती व तिची या कृत्यास पूर्ण संमती होती असा कांगावा करण्यास सुरवात केली. तिचा बाप व सासरा यानीहि येऊन वीरनवालीच्या सद्वर्तनाबद्दल कोर्टाची खात्री केली. पण आश्चर्य हे की ज्यूरीतील ९ गोऱ्या लोकानी आरोपीच्याच कांगाव्यावर विश्वास ठेऊन आरोपी निर्दोषी आहेत असे मत दिले! व कोर्टानेहि त्यावर विश्वास ठेऊन मूर यास सोडून दिले! केसरीने लिहिले की "अमेरिकेसारख्या देशात असला प्रकार झाला असता तर लोकानी चौकशीची वाट न पाहता गुन्हेगाराचे हालहाल करून त्यास जिवंत जाळले असते. सरकारी ॲडव्होकेट जनरल यानी आपल्या भाषणात तर संतापाने असे म्हटले की, सदरहू नऊ गोरे ज्यूरर अगर न्यायमूर्ति यांच्या गोऱ्या आया-बहिणीवर किंवा लेकीसुनावर असा गहजब झाला असता तर अशा नराधमाच्या पशुवासनेस बळी पडलेल्या अबलेवर असा बदफैलीपणाचा उलट आरोप करण्याची त्यांची छाती झाली असती काय? एका मडमेची अब्रू घेण्याचा प्रयत्न केल्याबद्दल एका हिंदी माणसास २० वर्षे सक्तमजुरीची सजा होते आणि वीरनवालीच्या जन्माचा सत्यनाश करणारे गुन्हेगार अजिबात दोषमुक्त होतात हा न्यायदेवतेचा उपमर्द नव्हे प्रत्यक्ष खून आहे."

पुढल्याच आठवड्यात मलीन झालेल्या जिण्याला कंटाळून सती वीरनवालीने आत्महत्या केली! केसरीने लिहिले "नेटिव्ह पुरुषाच्या अंगी अँग्लो इंडिअनापासून आपल्या बायकांची अब्रू राखण्याचे सामर्थ्य नाही असे आढळून आल्यावर वीरन-वाली आपल्या खटल्याचे अपील परमेश्वराच्या न्यायासनापुढे सादर करण्यास गेली आहे! शेकडो राजद्रोही भाषणानी किंवा हजारो लेखानीहि होणार नाही इतका संताप व त्वेष असला एक खटला सर्व हिंदी लोकांच्या अंतःकरणात उत्पन्न करीत असतो हे गोऱ्या लोकानी लक्षात ठेवावे. वीरनवालीच्या आत्मयज्ञात गलितधैर्य पुरुषाना साहसी व निश्चयी करण्याचे किती सामर्थ्य आहे हे हिंदुस्थानसरकारने नीट समजून घ्यावे. अशा प्रसंगाने खवळलेली मने शांत होणे शक्य नाही."

वीरनवालीच्या अन्यायाची हकीकत टिळकास समजली त्या वेळी ते प्रवासात होते व ती ऐकून राग दुःख व त्वेष यानी त्याना रात्रभर अंथरुणावर झोप लागली नाही. त्यांची सारखी तळमळ होत होती असे गंगाधरराव देशपांडे यानी आपल्या आठवणीत सांगितले आहे. सरकारच्या अन्यायाची भरती चढत चालली असता अनेक कारणानी लोकांच्या चळवळीचा पाराहि चढत असतो. व त्या वेळी लोकांच्या प्रक्षुब्ध भूमिकेवर इतर अन्यायाप्रमाणेच या हृदयद्रावक हकीकतीचीहि एक छटा उमटलेली होती म्हणूनच ही वीरनवालीची कहाणी येथे सांगितली आहे.

## (७) लाला लजपतरायांची हद्दपारी

तारीख १० मे १९०७ रोजी सरकारने १८१८ च्या तिसऱ्या कानूप्रमाणे लजपतराय यास पकडून हद्दपार केले. लॉर्ड मिंटो यांच्या सहीचे वारंट त्यांच्यावर बजावण्यात आले व तुम्ही मोकळे राहिल्यास सार्वजनिक शांततेचा भंग होऊन दंगेधोपे होतील असे कारण सांगण्यात आले. १८९७ साली नातू बंधूना जशी सरकारच्या संशयाची तळमळ बाधली तशाच प्रसंग आता लजपतरायावर आला. पण त्यांच्यावर उघड आरोप ठेऊन त्याची चौकशी करण्याला मात्र सरकार तयार नव्हते. या अस्मानी सुलतानीने टिळक सरकारविरुद्ध अगदी विथरून गेले. त्यानी लिहिले की " इंग्रजी राजसत्तेचे जर कोणी खरे शत्रू असतील तर ते सनदशीर चळवळीस अडथळा आणणारे हे गोरे अधिकारीच होत. मुसलमानी बादशाहांची कारकीर्द यांच्यापेक्षा शतपट चांगली. कारण औरंगजेब झाला तरी तो विनचौकशीनें एखाद्यास तुरुंगात डांबून वर 'सनदशीर चळवळ आपणास मान्य आहे' असा डौल तरी मारीत नसे. सनदशीर हक्कासाठी चळवळ आणि बंड ही या राज्यात इतउत्तर एकाच शिक्याच्या मापाने मापली जाणार. राजकर्त्यांनी जर रशिअन पद्धत उचलली तर हिंदुस्थानातील प्रजेलाहि रशियातील प्रजेचेच अनुकरण करणे भाग पडेल !" सरकारची मळमळ अखेर इंग्लिशमन पत्राच्या तोंडून बाहेर पडली. सरकारचा संशय असा होता की अफगाणिस्थानचे अमीर येथे आले असता लजपतराय यानी राजक्रांति करण्याचा त्यांच्याशी काही कट केला ! त्यावर केसरीने लिहिले की, " हा सूर्य आणि हा जयद्रथ असे दाखवून पुरावा पुढे मांडण्यास सरकारने सिद्ध व्हावे. नाही तर आपला आरोप परत घ्यावा. लजपतराय यांची उघड चौकशी होऊन व आरोप सिद्ध होऊन बंडखोरीबद्दल लजपतराय यांस सरकारने फाशी दिले तर त्याबद्दल कोणासच काही म्हणता यावयाचे नाही. पण लालाजी सनदशीर हक्काकरिता भांडतात व चळवळ करितात एवढ्यामुळेच जर ते सरकारास अप्रिय ठरत असतील तर मात्र ही चळवळ कधीहि बंद पडावयाची नाही असे आम्ही बजावून सांगतो."

लजपतराय याना सरकारने हद्दपार केल्याची बातमी समजल्याबरोबर सर्व हिंदुस्थानभर हाहाःकार उडाला. कलकत्ता मद्रास महाराष्ट्र या ठिकाणी विलक्षण खळबळ सुरू झाली. व फिरोजपूर सियालकोट पेशावर रावळपिंडी वगैरे ठिकाणी दंगे झाले. हिंदुस्थानात शेकडो सभा भरवून सरकारचा निषेध करण्यात आला. पुण्यात दुकाने बंद होऊन शहरचे मुख्य रस्त्यातून शिपायांचे पहारे व हडेलहप्पी सुरू झाली. दंगा होईल की काय अशा भीतीने रात्री गस्तीतहि नेहेमीपेक्षा जास्त बंदोबस्त ठेवण्यांत आला होता. याच सुमारास सरकारने सभाबंदीचा वट हुकूम काढला. व वीस लोकांपेक्षा अधिक लोक एकत्र जमून जर राजकीय चळवळ अगर व्याख्यान करतील तर ते बेकायदेशीर ठरून मॅजिस्ट्रेट यास ती सभा मोडता येईल

असे फर्मावण्यात आले. या नवीन वट हुकूमाबद्दल सार्वजनिक सभेत सभा भरून सभाबंदीच्या कायद्याचा तीव्र निषेध करण्यात आला व टिळकानी लोकास सांगितले की "आज वाणींने तर उद्या कृतीने हा हुकूम तुम्हास तोडावा लागेल."

इकडे सरकारने दडपशाहीस सुरवात करण्याबरोबर संस्थानानी त्याचेवरहि ताण करण्यास सुरवात केली. कोल्हापूर दरबारने तर इंग्रज सरकारपेक्षा काकण-भर अधिक कडक असा जाहीरनामा काढून अजिबात सभाच भरवू नयेत असे ठरविले! केसरीने लिहिले "मोर नाचतो त्याला आपल्या सुंदर पिसाऱ्याची सबब असते. पण मोराचे अनुकरण लांडोरीने केले म्हणजे ती आपली लज्जा मात्र जगास दाखविते." मोर्ले साहेबानी व हिंदुस्थान सरकारने सुशिक्षित वर्गास शत्रु म्हणून लेखल्याबरोबर कोल्हापूर सरकारने त्याचेपेक्षा मोठ्या आवाजाने ते जाहीर केले. केसरीने लिहिले की "या जाहीरनाम्याने कोल्हापूर सरकार आपल्या दरबारातील अनन्वित कृत्यावर पांघरूण घालण्यास तयार झाले आहे. व सुशिक्षित पुढाऱ्यास देशाचे शत्रु म्हणून जाहीर करू लागले आहे. पण महाराज आमचे शत्रु की आम्ही महाराजाचे शत्रु याचा निकाल कधीतरी लागल्याखेरीज राहणार नाही!"

याच संस्थानी दडपशाहीचा दुसरा मासला धार येथे शिवाजी उत्सवात झाला. तेथे वंदेमातरम् हे शब्द म्हटल्याबद्दल व स्वदेशी वापरा असे सांगितल्या-बद्दल शारंगपाणी यास तावडतोड संस्थान सोडून जाण्याची शिक्षा झाली व राय-कर या विद्यार्थ्यास शाळेतून काढून टाकण्यात आले. ज्या मंदिरात उत्सव झाला त्याचे इनाम बंद झाले. नोकराना नोकरीवरून दूर केले. पेन्शनदार सभेला गेले होते त्यांची पेन्शने खालसा झाली व केसरी काळ बंगाली ही पत्रे राजद्रोही ठर-विण्यात येऊन सार्वजनिक लायब्ररीत घेण्यास मनाई करण्यात आली! केसरीने लिहिले "शिवाजी महाराजानी स्वातंत्र्याचा झेंडा उभारण्यापूर्वी कित्येक शतके म्हणजे भोजराजाच्या वेळी धारा नगर हे हिंदुस्थानातील स्वराज्याचे मुख्य पीठ होते. अशा पवित्र ठिकाणी मराठी संस्थानिकांच्या अमलात शिवाजी-महाराजांचा उत्सव करणारांचा छळ व्हावा ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. फक्त शिवाजीउत्सव करणे अगर स्वतंत्र उद्योगधंदे करा असे म्हणणे हा जर राज-द्रोह समजला जाईल तर संस्थानिकानाहि त्यांच्या गादीवरून दूर करावे लागेल! स्वतःच्या कुळाशी अगर स्वधर्माशी बेइमान होऊन पोलिटिकल एजंटास खूष कर-ण्याकरिता या गोष्टी होऊ लागतात तेव्हा खेद व आश्चर्य वाटल्यावाचून राहवत नाही. उद्या पोलिटिकल एजंट रागावले तर हे संस्थानिक बापाचे श्राद्ध करण्याचे किंवा त्याचे नाव आपल्या नावापुढे लावण्याचे सोडून देतील काय?"

याच दडपशाहीच्या वातावरणात पुण्याचा शिवाजी उत्सव साजरा झाला. दंगा धोपा होण्याची भीति नव्हती. तथापि सरकारचेच लोक उत्सवात येऊन दंग्या-धोप्याला निमित्त करून देतील अशी भीति वाटत होती. शहरात अनेक प्रकारच्या चमत्कारीक भुमका उठत असल्यामुळे यंदाच्या उत्सवास प्रारंभ तरी होतो की

## ( ७ ) लाला लजपतरायांची हद्दपारी

तारीख १० मे १९०७ रोजी सरकारने १८१८ च्या तिसऱ्या कानूप्रमाणे लजपतराय यास पकडून हद्दपार केले. लॉर्ड मिंटो यांच्या सहीचे वारंट त्यांच्यावर बजावण्यात आले व तुम्ही मोकळे राहिल्यास सार्वजनिक शांततेचा भंग होऊन दंगेधोपे होतील असे कारण सांगण्यात आले. १८९७ साली नातू बंधूंना जशी सरकारच्या संशयाची तळमळ बाधली तसाच प्रसंग आता लजपतरायावर आला. पण त्यांच्यावर उघड आरोप ठेऊन त्याची चौकशी करण्याला मात्र सरकार तयार नव्हते. या अस्मानी सुलतानीने टिळक सरकारविरुद्ध अगदी बिथरून गेले. त्यानी लिहिले की " इंग्रजी राजसत्तेचे जर कोणी खरे शत्रू असतील तर ते सनदशीर चळवळीस अडथळा आणणारे हे गोरे अधिकारीच होत. मुसलमानी बादशाहांची कारकीर्द यांच्यापेक्षा शतपट चांगली. कारण औरंगजेब झाला तरी तो बिनचौकशीनें एखाद्यास तुरुंगात डांबून वर 'सनदशीर चळवळ आपणास मान्य आहे' असा डौल तरी मारीत नसे. सनदशीर हक्कासाठी चळवळ आणि बंड ही या राज्यात इतउत्तर एकाच शिक्क्याच्या मापाने मापली जाणार. राजकर्त्यांनी जर रशिअन पद्धत उचलली तर हिंदुस्थानातील प्रजेलाहि रशियातील प्रजेचेच अनुकरण करणे भाग पडेल !" सरकारची मळमळ अखेर इंग्लिशमन पत्राच्या तोंडून बाहेर पडली. सरकारचा संशय असा होता की अफगाणिस्थानचे अमीर येथे आले असता लजपतराय यानी राजक्रांति करण्याचा त्यांच्याशी काही कट केला ! त्यावर केसरीने लिहिले की, " हा सूर्य आणि हा जयद्रथ असे दाखवून पुरावा पुढे मांडण्यास सरकारने सिद्ध व्हावे. नाही तर आपला आरोप परत घ्यावा. लजपतराय यांची उघड चौकशी होऊन व आरोप सिद्ध होऊन बंडखोरीबद्दल लजपतराय यांस सरकारने फाशी दिले तर त्याबद्दल कोणासच काही म्हणतां यावयाचे नाही. पण लालाजी सनदशीर हक्ककरिता भांडतात व चळवळ करितात एवढयामुळेच जर ते सरकारास अप्रिय ठरत असतील तर मात्र ही चळवळ कधीहि बंद पडावयाची नाही असे आम्ही बजावून सांगतो."

लजपतराय याना सरकारने हद्दपार केल्याची बातमी समजल्याबरोबर सर्व हिंदुस्थानभर हाहाःकार उडाला. कलकत्ता मद्रास महाराष्ट्र या ठिकाणी विलक्षण खळबळ सुरू झाली. व फिरोजपूर सियालकोट पेशावर रावळपिंडी वगैरे ठिकाणी दंगे झाले. हिंदुस्थानात शेकडो सभा भरवून सरकारचा निषेध करण्यात आला. पुण्यात दुकाने बंद होऊन शहरचे मुख्य रस्त्यातून शिपायांचे पहारे व हडेलहप्पी सुरू झाली. दंगा होईल की काय अशा भीतीने रात्री गस्तीतहि नेहेमीपेक्षा जास्त बंदोबस्त ठेवण्यांत आला होता. याच सुमारास सरकारने सभाबंदीचा वट हुकूम काढला. व वीस लोकापेक्षा अधिक लोक एकत्र जमून जर राजकीय चळवळ अगर व्याख्यान करतील तर ते बेकायदेशीर ठरून मॅजिस्ट्रेट यास ती सभा मोडता येईल

असे फर्मावण्यात आले. या नवीन वट हुकूमाबद्दल सार्वजनिक सभेत सभा भरून सभाबंदीच्या कायद्याचा तीव्र निषेध करण्यात आला व टिळकानी लोकास सांगितले की "आज वाणीने तर उद्या कृतीने हा हुकूम तुम्हास तोडावा लागेल."

इकडे सरकारने दडपशाहीस सुरवात करण्याबरोबर संस्थानानी त्याचेवरहि ताण करण्यास सुरवात केली. कोल्हापूर दरबारने तर इंग्रज सरकारपेक्षा काकण-भर अधिक कडक असा जाहीरनामा काढून अजिबात सभाच भरवू नयेत असे ठरविले! केसरीने लिहिले "मोर नाचतो त्याला आपल्या सुंदर पिसाऱ्याची खबर असते. पण मोराचे अनुकरण लांडोरीने केले म्हणजे ती आपली लज्जा मात्र जगास दाखविते." मोर्ले साहेबानी व हिंदुस्थान सरकारने सुशिक्षित वर्गास शत्रु म्हणून लेखल्याबरोबर कोल्हापूर सरकारने त्याचेपेक्षा मोठ्या आवाजाने ते जाहीर केले. केसरीने लिहिले की "या जाहीरनाम्याने कोल्हापूर सरकार आपल्या दरबारातील अनन्वित कृत्यावर पांघरूण घालण्यास तयार झाले आहे. व सुशिक्षित पुढाऱ्यास देशाचे शत्रु म्हणून जाहीर करू लागले आहे. पण महाराज आमचे शत्रु की आम्ही महाराजाचे शत्रु याचा निकाल कधीतरी लागल्याखेरीज राहणार नाही!"

याच संस्थानी दडपशाहीचा दुसरा मासला धार येथे शिवाजी उत्सवात झाला. तेथे वंदेमातरम् हे शब्द म्हटल्याबद्दल व स्वदेशी वापरा असे सांगितल्या-बद्दल शारंगपाणी यास ताबडतोड संस्थान सोडून जाण्याची शिक्षा झाली व राय-कर या विद्यार्थ्यास शाळेतून काढून टाकण्यात आले. ज्या मंदिरात उत्सव झाला त्याचे इनाम बंद झाले. नोकराना नोकरीवरून दूर केले. पेन्शनदार सभेला गेले होते त्यांची पेन्शने खालसा झाली व केसरी काळ बंगाली ही पत्रे राजद्रोही ठर-विण्यात येऊन सार्वजनिक लायब्रऱ्यात घेण्यास मनाई करण्यात आली! केसरीने लिहिले "शिवाजी महाराजानी स्वातंत्र्याचा झेंडा उभारण्यापूर्वी कित्येक शतके म्हणजे भोजराजाच्या वेळी धारा नगर हे हिंदुस्थानातील स्वराज्याचे मुख्य पीठ होते. अशा पवित्र ठिकाणी मराठी संस्थानिकांच्या अमलात शिवाजी-महाराजांचा उत्सव करणारांचा छळ व्हावा ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. फक्त शिवाजीउत्सव करणे अगर स्वतंत्र उद्योगधंदे करा असे म्हणणे हा जर राज-द्रोह समजला जाईल तर संस्थानिकानाहि त्यांच्या गादीवरून दूर करावे लागेल! स्वतःच्या कुळाशी अगर स्वधर्माशी बेइमान होऊन पोलिटिकल एजंटास खूष कर-ण्याकरिता या गोष्टी होऊ लागतात तेव्हा खेद व आश्चर्य वाटल्यावाचून राहवत नाही. उद्या पोलिटिकल एजंट रागावले तर हे संस्थानिक बापाचे श्राद्ध करण्याचे किंवा त्याचे नाव आपल्या नावापुढे लावण्याचे सोडून देतील काय?"

याच दडपशाहीच्या वातावरणात पुण्याचा शिवाजी उत्सव साजरा झाला. दंगा धोपा होण्याची भीति नव्हती. तथापि सरकारचेच लोक उत्सवात येऊन दंग्या-धोप्याला निमित्त करून देतील अशी भीति वाटत होती. शहरात अनेक प्रकारच्या चमत्कारीक भुमका उठत असल्यामुळे यंदाच्या उत्सवास प्रारंभ तरी होतो की

नाही अशी पुष्कळास शंका वाटत होती. पण खाडिलकर भोपटकर प्रधान दाजीसाहेब खरे या सर्वांची चारहि दिवस व्याख्याने होऊन सर्व कार्यक्रम नीटपणाने पार पडला. शेवटल्या दिवशी समारोपाचे टिळकांचे भाषण फारच आवेशपूर्ण झाले. त्यात त्यानी ठणठणीतपणाने सांगितले की "एक लाला हद्दपार झाले तर त्याचे जागी पन्नास लाला लजपतराय निर्माण होतील. व असल्या दडपशाहीने स्वराज्याच्या हक्काची चळवळ यत्किंचित्हि थांबणार नाही." टिळकांची या सुमाराची व्याख्याने किती तेजस्वी व आवेश उत्पन्न करणारी असत याचा या व्याख्यानात नमुना पहावयास सापडतो. सदर व्याख्यान समग्र रीतीने शेवटी परिशिष्टात दिले आहे.

यानंतर पुण्याच्या गणपत्युत्सवात टिळकानी व्याख्याने दिली त्याप्रसंगीहि त्यांच्या डोक्यात राजकीय सद्यःस्थितीचेच विचार घोळत होते. गायकवाडवाड्यातील गणपतीपुढे त्यांचे व्याख्यान झाले त्या वेळी ते म्हणाले "आमची स्थिति आम्ही न सुधारल्यास सुधारलेली राष्ट्रे आम्हास दारासमोर देखील उभे राहू देणार नाहीत. कॉंग्रेसमध्ये जाऊन फक्त बंगाल्यापुरता स्वदेशीचा किंवा बहिष्काराचा ठराव करणे किंवा पंजाबात जुलूम होत असता दार लावून खोलीत बसून आपली कातडी बचावणे माणूसपणाचे होणार आहे काय? सध्याची स्थिति जर तुम्हास असह्य झाली नसेल तर हे राष्ट्र जितक्या लवकर मरेल तितके बरे. कृतघ्न लोकानी या भूमीला भार होण्यापेक्षा दुसरे कोणी येऊन ती सनाथ करतील. भ्याडपणा टाकून दिला पाहिजे. मी नेमस्त तू जहाल हा वाद काय? नेमस्तपणाने कार्य होत असल्यास ते नको आहे असे नाही. पण ते होत नाही हे उघड दिसत आहे. इच्छेचे ज्ञानतंतू हाताच्या बोटात उतरत नाहीत. हे होण्याकरिता घस सोसली पाहिजे. त्याला तुरुंगात जावे लागेल. हद्दपार व्हावे लागेल. त्याला तुम्ही तयार असले पाहिजे. सोन्याचा कस आगीतच लागत असतो. तो काही कोणी भोजनाच्या ताटावर लावीत नाही!"

रेमार्केटात त्यांचे 'सद्यःस्थिती' बद्दल व्याख्यान झाले त्यात ते म्हणाले "आमच्यात शरीरसामर्थ्य आहे पण मन घट्ट पाहिजे आहे. ते तसे नाही तोपर्यंत तुम्हाला जगात कोणी विचारणार नाही. पूर्ण स्वराज्य मागावयाचे की अर्धे मागावयाचे हा व्यर्थ वाद घरात बसून करण्याची सवय वाईट आहे. अर्धे स्वराज्य म्हणजे काय? व सगळे स्वराज्य म्हणजे काय? दोन्हीहि सरकारला कळते आहे. सरकार दोन्ही पक्षाच्या बारशाला जेवले आहे. देणारा काहीच देण्यास तयार नसता बाहेर दोन भिक्षुकानी १० लाख रुपये मागावे का दोन कोट मागावे ह्याचा वाद करणे व्यर्थ आहे. तुम्ही जिवंत राहावयाला योग्य आहात की नाही हे निश्चयाने दाखविण्याची वेळ आली आहे. तुम्ही मागे घेणार का प्रतिपक्षी मागे घेणार हा प्रश्न आहे. लढाईला तोंड लागले आहे. या वेळी मला तुम्हाला एकच उपदेश करावयाचा आहे व तो म्हटला म्हणजे अश्वत्थाम्याने केलेला उपदेश होय— "यदि समरमपास्य नास्ति मृत्योर्भयमिति युक्तमितोऽन्यतः प्रयातुं। अथमरणमवश्यमेव जंतोः किमिति वृथा मलिनं यशः कुरुध्व ॥" हा तो उपदेश होय. सरकारने

उग्र स्वरूप धारण केले आहे. त्याने आम्ही भिणार का प्रतिकार करणार ? वीस वर्षांनी मला सांगता आले नाही तरी तरुण पिढीपैकी कोणाला तरी गजानना-समोर यशस्वी झाल्याचे जाहीर करता आले पाहिजे असा तुम्ही यत्न करा. शेकडो लोक तुरुंगात गेले आहेत. याने जर तुमचे मन निग्रही होत नसेल तर तुमची गणना पशूत करावी लागेल ! "

शुक्रवारी गणपतिविसर्जनानिमित्त नदीकाठी टिळकांचे समारोपादाखल भाषण झाले. त्यात त्यानी सांगितले " आज हजारो वर्षे स्वराज्य भोगावयाची आपली सवय होती हे स्वराज्य नाहीसे झाल्याबलद्दल मनाला चटका लावून राहील अशी सवय आपल्या मनाला लावा. गणपतीच्या आराधनेत स्वाराज्य वैराज्य आधिराज्य हे स्वराज्यविषयक शब्द आलेले आहेत. बंगाल्यातील चळवळीनंतर निघालेल्या मंत्रातील हे शब्द नाहीत. गणपतीला स्वराज्य मागण्याची आमची पूर्वीपासूनची रीत आहे. गजाननाच्या विसर्जनानंतर स्वदेशी बहिष्काररूपी वाळू तुम्ही येथून न्या व घरीं पसरा व जाताना या गंभीर प्रसंगी पंचमहाभूताना साक्षी ठेऊन स्वराज्यार्प्रीत्यर्थ यत्न करण्याची शपथ घेऊन घरोघर जा. "

## ( ८ ) सुरतेची प्रांतिक परिषद

तारीख २९ मार्च रोजीं सुरतेस डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांचे अध्य-क्षतेखाली मुंबई प्रांतिक परिषद भरली होती. या सभेस सुमारे ६०० प्रतिनिधी असून १५०० प्रेक्षक आले होते. टिळकाना या सभेस हजर राहता आले नाही. ना. फेरोजशहा मेथा अंबालाल साखरलाल वगैरे गृहस्थानी या परिषदेत पुढाकार घेतला असून नेमस्त पक्षाचा पूर्ण छाप या परिषदेवर पडला होता. महाराष्ट्राचा कल साधा-रणपणे नव्या पक्षाकडे असल्यामुळे प्रांतिक सभा भरवण्याची नेमस्तांकडून टाळाटाळच चालली होती. सुमारे १०–१२ वर्षात प्रांतिक सभेची बैठकच झाली नाही. आजपर्यंत असल्या सभांच्या उपयुक्ततेबद्दल लोकातील औदासीन्य प्लेग व दुष्काळ वगैरे इतर बऱ्याच अडचणी होत्या. तथापि वाढत्या नव्या पक्षाच्या मताचा छाप परिषदेवर पडू नये असा अलीकडे मेथा आदिकरून पुढाऱ्यांचा आग्रह होता हेहि प्रांतिक सभा वक्तशीर न भरण्यास एक कारण झाले होते. पण वाढत्या जोरापुढे भीति व आळस दोनहि हटली.

अध्यक्षानी भाषण केले त्यात नेमस्तपणाचा उपदेश ओतप्रोत होता. किंबहुना ती नव्या पक्षावर प्रच्छन्न टीकाच होती. त्यानी सांगितले " सार्वजनिक काम करणारे लोक प्रामाणिक असावे. त्यानी भपका सोडून केवळ सत्यशोधनार्थ झटले पाहिजे. अर्ज करावयाचे ते अटपशीर व नेमस्तपणाचे अर्ज असले पाहिजेत. सरकारच्या चुक्या असतील. पण त्यांची न्यायबुद्धि व सहानुभुति जागृत करून हे दोष काढून टाकावे. हल्लीचे हिंदुस्थान सरकार उदार व मनमिळाऊ आहे. एवढेच नव्हे तर यांच्याहून जास्त उत्तम सरकार आपणास अजून पुष्कळ वर्षे मिळणे कठीण आहे.

आपण नेटाने प्रयत्न केला पाहिजे. पण उतावीळपणा किंवा जहालपणा करून मध्येच आपण घाण करिता कामा नये."

या सभेत मामुली ठराव पुष्कळच झाले. फक्त स्वदेशी व बहिष्काराचा विषय महत्वाचा होता. पण यावर अध्यक्षानी आपले असे मत दिले की "स्वदेशी चळ-चळ हा विषय खरोखर प्रांतिक सभेपेक्षा औद्योगिक परिषदेचाच आहे!" लोकानी झीज सोसून स्वदेशी माल वापरावा हे कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेतच ठरले असल्या-मुळे परिषदेस त्याचे पाठीमागे जाता आले नाही. व फक्त औद्योगिक बहिष्कारास सभेने संमति दिली. एकंदर सभेबद्दल केसरीने आपले असे मत दिले की "सुरतेची प्रांतिक सभा मेंगी झाली. डॉ. भालचंद्र यांचे भाषण वाचून असल्या पुढाऱ्यांच्या हातून देशकार्य तरी काय होणार! असा उद्गार सहजगत्या निघाल्यावाचून राहात नाही."

राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रश्नासंबंधाने परिषदेत बरीच घासाघीस झाली. राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव मेथा याना नको तेव्हा तो आणू नये असे प्रथम ठरले. पण विषयनियामक कमिटीत केळकर यानी असा ठराव मांडला की "कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेत पसार झालेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावाच्या अनुरोधाने त्या विषयाचा विचार करण्याकरिता एक कमिटी नेमावी." यावर फेरोजशहा मेथा यानी 'राष्ट्रीय शिक्षण' या शब्दाचा अर्थच आपणास कळत नाही. तेव्हा या विषयाचा विचारच करू नये असे निक्षून सांगितले. त्यावर विजापूरकर व चिंतामणराव वैद्य यानी कलकत्त्याच्या कॉंग्रेसचा ठराव वाचून दाखवून सांगितले "राष्ट्रीय सभेच्या ठरावाचे पाठीमागे जाणे इष्ट नाही. पुढे जाण्याची इच्छा नसेल तर वाटल्यास कलकत्याचाच ठराव मंजूर करा, पण पाठीमागे सरू नका. यानंतर वादविवाद होऊन केळकर यांचे ठरावावर मते घेतली. तों बहुमत केळकर यांचेच बाजूस दिसून आले. तेव्हा राष्ट्रीय पक्षाच्या मंडळीनी टाळ्यांचा गजर केला. त्याने सभास्थान दणाणले. अध्यक्षानी मते मोज-ण्याची फिकीर न करताच निकाल दिला की ठराव नापास झाला! यावर केळकर यानी प्रश्न विचारताच मेथा त्याना म्हणाले "तुम्ही अध्यक्षाचा निकाल मान्य करीत नाही काय?" केळकर म्हणाले "अध्यक्षानी निकाल दिला तो मान्य करू पण आम्ही पोल मागतो." अखेर मेथा यांचीच अरेरावी चालून अखेर मतेहि मोजली नाहीत. व पोलहि मागितला नाही.

विषयनियामक कमिटीत हा ठराव नापास झाला. तेव्हा जाहीर सभेत उप-सूचना आणावयाचे ठरले. पण जाहीर सभेत हटकून हा ठराव पास अगर नापास होईल याबद्दल दोनहि पक्षाना खात्री नव्हती. मेथा याना तो पास होईल ही भीति. विजापूरकर चिंतामणराव वैद्य याना सुरतेसारख्या ठिकाणी तो नापास होईल अशी भीति. शेवटी भालचंद्र यांचे मध्यस्तीने मेथा यानी "खासगी कमिटी नेमल्यास त्यावर आपण प्रत्यक्ष काम व विचारविनियम करू" असे वचन दिले. शेवटी असे ठरले की केवळ पुनरुच्चाराचा आग्रह न धरिता कमिटी नेमून घेण्यापासून राष्ट्रीय

शिक्षणाच्या प्रश्नाचा झाला तर फायदाच होईल. ह्मणून विजापूरकर चिंतामणराव वैद्य बोडस दादासाहेब करंदीकर अंबालाल व केळकर यांचे विचारे केळकर यानी जाहीर सभेत उपसूचना मांडू नये असे ठरले.

अशा रीतीने 'राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव सभेपुढे मांडूच नये' हे मेथा यानी मिळविले. उलट 'राष्ट्रीय शिक्षण' याचा अर्थच मला समजत नाही हे शब्द मागे घेऊन मेथा याना प्रत्यक्ष कमिटीवर काम करण्यास यावे लागले हे राष्ट्रीय पक्षाने मिळविले. शिवाय राष्ट्रीय शिक्षणास प्रत्यक्ष कलकत्याच्या राष्ट्रीय सभेने मान्यता दिली असल्याकारणाने तोच ठराव पुनः प्रांतिक परिषदेत पास करण्याचा विशेष आग्रह धरण्यातहि विशेष स्वारस्य नव्हते.

प्रांतिक सभेबरोबरच सुरतेस स्वदेशी परिषद भरली होती. अध्यक्ष अंबालाल साखरलाल होते. त्यांचे भाषण मार्मिक होऊन स्वदेशी चळवळीसंबंधाने तीन ठराव पास झाले. या प्रसंगी गुलाबदास वकील यानी औद्योगिक फंडास १००१ रुपये दिले.

मुंबईप्रांताप्रमाणे इतर प्रांतातूनहि प्रांतिक सभा भरून स्वदेशी बहिष्कार या विषयावर लोकमत व्यक्त होत होते. याच आठवड्यात रायपुरास नागपूर वऱ्हाड प्रांताची प्रांतिक परिषद भरली. सभेचे अध्यक्ष रा. ब. मुधोळकर होते. वंदे मातरम्‌चा जयघोष करू नये असा नेमस्तांचा हट्ट होता. पण अखेर मंडपात जयघोष झालाच. 'नेमस्तपणा हेच आमचे ब्रीद आहे' असे वाक्य मंडपाचे दारावर झळकत लावले होते. बहिष्कार व स्वदेशी याबद्दल कडाक्याचा वाद होऊन फक्त स्वदेशीचाच तेवढा ठराव पास झाला! यामुळे लोकांचा विरस झाल्यामुळे खापर्डे यानी स्वदेशी बहिष्कार स्वराज्य राष्ट्रीय शिक्षण या विषयावर व्याख्याने दिली व ती ऐकण्यास हजारो लोक जमत असत.

अलाहाबादेस प्रांतिक सभा भरली तेथेहि नेमस्त पक्षाचे पं. मालवीय व नवा राष्ट्रीय पक्ष यांच्यात तंटा होता. अखेर नव्या पक्षाच्या सुमारे २०० प्रतिनिधींना सभेस येण्याचा मज्जाव करण्यात आल्याकारणाने परगावचे व स्थानिक अशा सुमारे ५-५० लोकांचीच ही परिषद होऊन सभेचे काम उरकण्यात आले. याच सुमारास लाला लजपतराय तेथे गेले असता आठ दहा हजार लोकांपुढे त्यांची व्याख्याने झाली व जयजयकार झाला. अर्थात् लोकमत प्रांतिक सभेकडे नव्हते असे स्पष्ट दिसून येत होते. याचप्रमाणे बंगाल व संयुक्तप्रांत येथेहि प्रांतिक सभा झाल्या. पैकी बंगालची प्रांतिक सभा नेमस्तानी आपल्या हातात ठेवली. तथापि संयुक्त प्रांतामध्ये अखेर बहिष्काराचा ठराव पास झालाच. यावरून बहुधा सर्व प्रांतातून नव्या पक्षाकडे लोकमताची भरती चढत चालली होती हे दिसून येते.

## (९) टिळक व मोर्लेसुधारणा

१९०६ च्या फेब्रुवारी महिन्यात पार्लमेंटच्या नव्या निवडणुकी होऊन लॉर्ड कर्झन यांच्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा पाडाव झाला व लिबरलपक्ष सत्ताधीश

झाला. हिंदुस्थानातील कित्येक लोकास असे वाटले की " झाले आता मात्र हिंदुस्थानच्या भाग्योदयाची सुरवात होणार ! कारण कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाची रात्र संपली आणि लिबरल पक्षाचा सूर्य लॉर्ड मोर्ले क्षितीजावर आला." मोर्ले साहेबांची तर लोकास मोठीच आशा होती. तो विद्वान आहे तो पंडित आहे हर्बट स्पेन्सरचा शिष्य आहे ग्लॅडस्टन व बर्क यांची चरित्रे त्याने लिहिलेली आहेत, तो एकदा सेक्रेटरी ऑफ स्टेट झाला की दाद लागलीच अशा भ्रमात नेमस्त लोक होते. पार्लेमेंटच्या पहिल्या भाषणात बंगालची फाळणी रद्द केल्याचा ते उल्लेख करतील अशी या लोकांस फार आशा होती. पण " बंगभंग झाला तो फिरवता येत नाही " असे मोर्लेसाहेबानी पहिल्याच भाषणात सांगून टाकल्याकारणाने या लोकांची मोठी निराशा झाली. ज्याला आशा असणार त्याचीच अपेक्षा फसणार व त्याला निराशेचे दुःख होणार. पण राष्ट्रीय पक्षास तशी आशाहि नव्हती किंवा त्याची अशी भ्रामक अपेक्षाहि नव्हती. टिळकानी लिहिले "बाव्या काय बोलणार याबद्दल लोकांस उत्कंठा होती. ती एकदा लवकर बोलून मोर्लेसाहेबानी पुरी केली. बरे झाले ! मोर्लेसाहेबांस मूर्ख म्हणण्यापेक्षा त्याच्यावर विसंबून बसणाऱ्या असल्या मंडळीसच पहिल्याने मूर्खांच्या कोटीत काढले पाहिजे. पांडित्य देशप्रीति उदार विचार विद्वत्ता तत्त्वज्ञान वगैरे सर्व काही गोड असते पण कोठपर्यंत ? तर परकी राष्ट्रावर चरत असलेल्या स्वदेशबंधूंचा निषेध व प्रतिकार करण्याचा प्रसंग आला नाही तोपर्यंत ! तसा प्रसंग आला म्हणजे विद्वान व अविद्वान लिबरल व कॉन्झर्व्हेटिव्ह दोन्हीहि सारखेच. मोर्लेसाहेब म्हणजे काही तुकाराम नव्हत किंवा ग्लॅडस्टन नव्हत ! आमची उन्नति विलायतवाल्यास फटकारा बसणाऱ्या उद्योगानीच आम्हाला केली पाहिजे. कमळात सापडलेला भुंगा आता रात्र संपेल आता सुप्रभात होईल व नंतर कमळाची पाने उघडतील आणि माझी सुटका होईल असे मनोराज्य करीत असतो. पण अशा भ्रमराप्रमाणे आपण आशेत गुंतून उपयोग नाही. अंगात शक्ति असेल तर आपणास बद्ध करणाऱ्या पाकळ्याना पोखरूनच बाहेर पडले पाहिजे."

याच विषयासंबंधाने तारीख १८ सप्टेंबर १९०६ रोजी तत्त्ववेत्ता व मुत्सद्दी असा सुंदर लेख टिळकानी लिहिला. त्यात त्यानी लिहिले " तत्त्ववेत्ते वेगळे व मुत्सद्दी वेगळे ! एखाद्या घरचा संसार करण्यास जर एखाद्या वेदान्त्याची योजना केली तर त्याचे हातून सदर घरातील भाऊबंदकीचे तंटे मिटण्याचा संभव जितका कमी आहे तितकाच तत्त्वज्ञाच्या हातून राज्यकारभाराच्या धोरणात फरक पडणे अशक्य आहे. विलायतेतील लोकांस मोर्ले हे तत्त्ववेत्ते आहेत ते मुत्सद्दी कसे होतात अशी मोठी काळजी पडली होती. पण " बंगालची फाळणी लोकमताविरुद्ध असली तरी ती कायम ठेवली पाहिजे " असे जेव्हा त्यानी निक्षून उद्गार काढले तेव्हा विलायतेतील व येथील इंग्रज लोकास कळून चुकले की, बेटा तत्त्ववेत्ता खराच पण मुत्सद्दीहि आहे ! नाना फडणीसास वेदान्त येत असला तरी ज्याप्रमाणे त्याचा राज्यकार-

स्थानात त्यानी कधी उपयोग केला नाही तद्वतच मोर्ले यांची स्थिति होय. हातात घेतलेल्या विषयाला मोहक स्वरूप कसे द्यावे आणि स्वार्थाला सजवून क्षणभर तरी परमार्थाचे रूप कसे आणावे या बाबतीत मात्र तत्त्वज्ञाच्या विद्वत्तेचा–तो खरा मुत्सद्दी असेल तर–चांगला उपयोग होतो. बाकी मुत्सद्दी म्हटला म्हणजे त्याला क्षणभर तात्त्विक विचार एका बाजूस ठेऊन व्यवहारदृष्टया साध्यासाध्यतेचा व शक्याशक्यतेचा विचार करावा लागतो. राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गात जर एखादी अडचण आली असेल तर अनेक दिशानी तिचे परीक्षण करून ती खरी असल्यास तिचे तितक्यापुरते निवारण करणे किंवा ती आपल्या राष्ट्राच्या एकंदर प्रगतीच्या आड येणार नाही अशी तजवीज करणे हे मुत्सद्याचे खरे काम होय. आणि एखादा तत्त्ववेत्ता जर हे काम करील तर त्याला ते मुत्सद्याच्या वृत्तीनेच चालविले पाहिजे. नाहीपेक्षा वेदान्ततत्त्वावर एखाद्याचा संसार चालवायास वेदांती प्रवृत्त झाला असता जशी त्याची फजीति होईल तशीच मुत्सद्दीपणाचे काम तात्त्विक विचाराच्या जोरावर करू इच्छिणाऱ्या तत्वज्ञाची होईल यात शंका नाही. इंग्लंड हिंदुस्थानावर राज्य करते ते परमार्थाकरिता नव्हे. व आम्हास क्वचित् दयाळूपणाने वागविले अगर सवलती दिल्या तरी त्या हिंदी लोक अगदीच असंतुष्ट होऊ नयेत म्हणून ! वासराला जसा दुधाचा एकादा सड ठेवावा लागतो अगर सोन्याची अंडी देणाऱ्या हंसीचे पोषण व्हावे म्हणून तिला जिवंत ठेवावी लागते तद्वतच स्वार्थालाहि मर्यादा आहे हे शहाणे मुत्सद्दी ओळखतात. पण हे सर्व स्वार्थबुद्धीनेच घडते औदार्याने नव्हे." सरतेशेवटी टिळकांनी लिहिले " भिकेची हुंडी कधीहि शिक्यावर चढत नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. हे राजकारस्थान आहे तत्त्वज्ञान नव्हे. राज्यकारभाराचे गाडे अडून पडले असे आपण राज्यकर्त्यांच्या अनुभवास आणून दिले पाहिजे तरच आपणास काहीतरी हक्क मिळतील."

जून महिन्यात मोर्ले साहेबानी पार्लमेंटमध्ये बजेटावर भाषण करिताना हिंदुस्थानात आपण नव्या सुधारणांचा उपक्रम करणार आहो असे सांगितले. सुधारणेची जरूरी का भासू लागली याबद्दल मोर्ले साहेब आपल्या आठवणीत म्हणतात " अलीकडे हिंदुस्थानात काही महत्त्वाच्या व क्षुल्लक राजकीय कारणावरून असंतोष पसरला होता. व ब्रिटिश अधिकाराविरुद्ध एक प्रकारे बंड करण्याची प्रवृत्ति होते की काय अशी धास्ती वाटू लागली होती. हे सुशिक्षितांचे बंड होते. 'नवे विचार' हे हत्यार त्यानी हाती धरले होते. जपानचा विजय चीन इराण तुर्कस्थान इत्यादि देशात होत असलेल्या अधिकारक्रांत्या यांचाहि हिंदी लोकांच्या मनावर परिणाम घडत होता. आणि मुख्य गोष्ट ही की इंग्लंडच्या उदारमतवादित्वाची पुंजी संपली अशी हिंदी लोकांची समजूत होऊ लागली होती. कर्झन साहेबांचे सत्तेचे केंद्रीकरण राणीच्या जाहीरनाम्याची बोळवण हिंदी लोकांच्या नीतितत्त्वाची थट्टा आणि लोकमताविरुद्ध बंगालची फाळणी या सर्व गोष्टीमुळे हिंदी लोकांची राजनिष्ठा गोठली आहे असे प्रमुख नेमस्त पुढारीहि अधिकाऱ्याना सांगू लागले. प्रत्यक्ष व्हाइसरॉयांच्या कार्य

कारी कौन्सिलरांतहि काय करावे व काय न करावे याविषयी वाद सुरू झाला. आणि हिंदुस्थानातील ब्रिटिश राजनीतीला नवे वळण लावले पाहिजे असे सर्वांसच स्पष्ट दिसू लागले. याच वेळी विलायतेत सुधारणावादी पक्ष बहुमताने अधिकारारूढ झाला. हिंदुस्थानातील जहालांचा ब्रिटिश रॅडिकल पक्षाशी विचारविनिमय होऊ लागला. आणि रॅडिकल पक्षालाहि हिंदी लोकांच्या मागण्या तत्त्वतः नापसंत नव्हत्या. या सर्व परीस्थितीचा असा परिणाम झाला की हिंदी कारभारात काहीतरी सुधारणा करणे प्राप्त आहे असे दिसून आले."

याननंतर व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो व भारतमंत्री लॉर्ड मोर्ले यांच्यामध्ये पत्रव्यवहार होऊन एकदाची चक्राला गति मिळाली आणि पार्लमेंटात बजेट मांडण्याचे वेळी सुधारणा करण्याचे धोरण मोर्ले यानी जाहीर केले. मिंटो यांचे म्हणणे कार्यकारी सभासदांच्या मंडळात नेटिव्ह हिंदी माणसाची नेमणूक करू नका. पण मोर्ले व त्यांचे कौन्सिल हे विरुद्ध असल्याने त्यांचे काही चालेना. ना. गोखले हेहि या वेळी विलायतेत होते. त्यांच्या व मोर्ले साहेबांच्या पुष्कळ वाटाघाटी होत. गोखले मोर्ले याना म्हणत "हिंदुस्थानात दंगाधोपा होऊ नये अशी इच्छा असेल तर लवकर सुधारणा करा." पण या सर्व चळवळीचा परिणाम म्हणून लोकाना सवलती मिळाल्या असे कोणासहि वाटू नये ही भीति मोर्ले यांच्या पोटात होतीच. इकडे गोखले हिंदुस्थानातील चळवळ्या लोकांस परोपरीने उपदेश करीत होते की "मोर्ले हे आपणास सुधारणा देण्याच्या उद्योगात गढले आहेत. करिता निदान या वेळी त्याना चिडवू नका. जरा दमाने घ्या." पण मोर्ले साहेबांचा कावा काही वेगळाच होता. सुधारणांची मूठ फारशी न उघडता रॅडिकल पक्षाविरुद्ध गोखल्यांचा उपयोग कसा करून घ्यावा या उद्योगात ते गुंतले होते.

तारीख ९ मे १९०६ रोजी गोखल्यांशी मोर्ले साहेबांचे जे संभाषण झाले त्याबद्दल मोर्ले आपल्या आठवणींत लिहितातः—"पार्लमेंटची बैठक खलास होईपर्यंत ना. गोखले येथे राहणार आहेत. आणि कॉमन्स सभेत लोकसत्तात्मक तत्त्वाचा जो पूर आला आहे त्याला नीट वळण लावण्याच्या कामात मला त्यांच्यापासून अडथळा न होता उलट त्यांचा उपयोग होईल अशी बरीच आशा आहे. ना. गोखल्यांचा योग्य उपयोग करून घेतला तर ते या पुरोगामी रॅडिकल लोकाना भलत्याच पंथाला नेण्याची इच्छा करणार नाहीत." तारीख २ आगस्टच्या पत्रात मोर्ले लिहितात "काल रोजी ना. गोखले यांच्याशी पांचवे व शेवटचे संभाषण झाले. आम्ही त्यांच्याशी स्नेह राखावा यात आमचा मोठा फायदा आहे. सरकारची जबाबदारी (म्हणजे अर्थात् अडचण) त्याना कशी तत्काळ पटते. हिंदुस्थान स्वायत्त वसाहतीच्या जोडीस जाऊन बसण्याचे अंतिम ध्येय त्यानी स्पष्टपणाने बोलून दाखविले. पण मीहि त्यांस खुल्या दिलाने सांगितले की "आपल्या सर्वांच्या आयुमर्यादेपलीकडे कित्येक दिवसपर्यंत हे ध्येय नुसते स्वप्नवत् राहणार." मुख्य मुद्याकडे वळून मी त्यांस म्हणालो की "सुधारणा होतील. पण एका गोष्टीने मात्र सर्व

-बस्तान बिघडून जाईल. ती कोणती तर तुमच्या मित्रांचा हट्ट व अविचार! त्यानी जर पूर्वबंगाल्यातली ही दंगल अशीच कायम ठेवली तर मग सरकारला एक पाऊल देखील पुढे टाकणे कठीणच नव्हे अशक्य होईल." यावर ना. गोखले म्हणाले "तुमचे सर्व मुद्दे मला पटले" आणि त्यानी असेहि सांगितले की "बजेटावरील भाषण होताक्षणीच मी हिंदुस्थानातील माझ्या स्नेह्यांस पत्रे लिहिली आहेत व त्यांचे धोरण भरपूर आशावादित्वाचे आहे."

तारीख १२ एप्रील १९०७ रोजी व्हाइसरॉयांचा खलिता येऊन मोर्ले साहेबानी तो मंत्रीमंडळापुढे मांडला. त्यांच्या कौन्सिलातील कट्टे अँग्लो-इंडिअन सुधारणाना सर्वस्वी प्रतिकूल होते व मंत्रिमंडळात लॉर्ड रिपन यानीहि हिंदी कार्यकारी सभासदांच्या नेमणुकीस लष्करी व परराष्ट्रीय गोष्टी बाहेर पडतील या सबबीवर हरकत घेतली. आधीच उल्हास त्यात हे विरजण पडले. इतक्यात पंजाबातील रावळपिंडीचे दंगे लाला लजपतराय यांची हद्दपारी वगैरे प्रकरण उद्भवले. त्यामुळे सगळाच मनोरा ढासळतो की काय असे वाटू लागले. परंतु इंडिया कौंसिलच्या सभासदानी असे मत दिले की सुधारणांची योजना विल्हेस टाकली असे न म्हणता नुसते खलिते लिहिण्याचे व त्याना उत्तर देण्याचे काम असेच चालू ठेवावे!! आणि याच सूचनेस अनुसरून मोर्ले साहेबानी आपले उत्तर रवाना केले. हिंदुस्थानातील बदललेल्या परिस्थितीमुळे सुधारणेच्या योजनेस इकडे व्हाइसरॉय संमति देईनात. म्हणून तारीख २६ ऑगस्ट १९०७ रोजी दोघा हिंदी गृहस्थांची इंडिया कौंसिलात नेमणूक करून बाकीच्या सुधारणांचा नाद मोर्ले यानी सोडून दिला आणि ते स्वस्थ बसले.

मोर्ले यानी बजेटाचे वेळी भाषण करिताना हिंदुस्थानसंबंधी जे भाषण केले ते अगदी कट्टया अँग्लो-इंडिअनाला शोभण्यासारखे होते. त्यानी सांगितले की "हिंदुस्थानातील गोऱ्या अधिकाऱ्यांची सत्ता यत्किंचित् कमी झाली तर बंडाळी माजेल म्हणून ती सत्ता व्यक्तिशः अधिकाधिक वाढवली पाहिजे. तसेच हिंदी सुशिक्षित वर्ग हा अधिकारास नालायक असून साम्राज्याचा शत्रु आहे. याकरिता प्रजेच्या भाषणस्वातंत्र्यास आणि सभा भरवण्याच्या हक्कास आळा घालणेच इष्ट आहे. बड्या लोकांचे एक सल्लागाराचे कौन्सिल नेमावे पण कौंसिलात अधिकाऱ्यांचे बहुमतच कायम ठेवावे."

ही मुक्ताफळे जेव्हा मोर्ले यानी काढली तेव्हा टिळकानी लिहिले "शेवटी भरंवशाच्या म्हशीस टोणगाच झाला. याच्या आचळातून दूध कसचे निघणार! सर्व सत्ता आपल्या हातात ठेवावयाची तर नोटेबल्स (Not-ables) म्हणजे बड्या नालायकांची कौन्सिले असली सोंगे किंवा फार्स हवेत कशाला? हे बड्या सल्लागाराचे मंडळ म्हणजे राष्ट्रीय सभेला सवत निर्माण करणे होय. कायदेकौन्सिलच्या बाबतीतहि पिछेहाटीचेच धोरण दिसते. हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलात आजपर्यंत २४ पैकी ५ तरी लोकांच्या वतीने निवडलेले हुशार प्रतिनिधी असत. आता ५४ पैकी अशा प्रकारचे फार झाले तर ७ गृहस्थ वरिष्ठ कायदेकौन्सिलात जाणार!

याला सुधारणा म्हणावयाची की कुधारणा ह्मणावयाची? सन १८९२ पासून १५ वर्षांनी सुधारणा होणार होती ती हीच ना? सुशिक्षित वर्गाच्या समाधानाकरिता ही गोष्ट करणार की शत्रु ह्मणून त्याची पायमल्ली होण्याकरिता करणार? याचा वाचकानी विचार करावा!" शेवटी टिळकानी लिहिले "आमच्यात दुही उत्पन्न करण्याचा हा सर्व कावा आहे! टोणग्याचे आचळ म्हणून तुह्मी या सुधारणांचा धिःकार केला तरी कोणाचे काही बिघडत नाही."

## (१०) गोखले टिळकांचा वाद

कलकत्याची काँग्रेस झाल्यानंतर बहिष्काराच्या ठरावाबद्दल सार्वजनिक चर्चेला सुरवात झाली. स्वराज्याचे ध्येय दादाभाईनी पुढे मांडले. पण या बाबतीत शब्दांची थोडी पसंती नापसंती असली तरी ते "ध्येय" आहे असे एकदा म्हणून टाकले म्हणजे वादाला फाटे फुटत नाहीत. कारण तत्त्व मान्य करून तपशिलाबद्दल वाद होऊ शकतो! बहिष्कारयोगाच्या ठरावासंबंधाने गोखले टिळक यांच्या पुढे होणाऱ्या वादाचे 'सूतोवाच' कलकत्यास विषयनियामक कमिटीमध्ये झालेच होते. पण काँग्रेस संपल्यानंतर गोखले व टिळक यानी जाहीर रीतीनेच आपली मते प्रतिपादन करावयास सुरवात केली. बहिष्काराची चळवळ केवळ परकी मालाच्या बहिष्कारावरच थांबू नये. बहिष्कार ही परकी सरकारच्या विरुद्ध असलेली एक मनोभावना आहे. व अडवणुकीचे शस्त्र या नात्यानेच तिचा उपयोग व्हावा. निदान प्रत्यक्ष ठराव परदेशी मालावरील बहिष्कारापुरताच झाला असला तरी पुढे मागे का होईना बहिष्कार सर्वांस अमलात यावा व सरकारची शक्य तेथे शक्य त्या उपायांनी कायदेशीर अडवणूक व्हावी, असेच त्या वेळी नव्या पक्षाचे व टिळकांचे म्हणणे होते. गोखले यांस स्वदेशी मान्य होती. व फार तर स्वदेशी पोषाखापुरताच औद्योगिक बहिष्कार मान्य होता. पण "बायकॉट" हा शब्द त्याना मान्य नव्हता. कारण त्यात राजकीय बाबतीतील प्रजेची उद्विग्नता व राज्यकर्त्यांचा निषेध दर्शविला जातो. व्यक्तिशः गोखले यांच्या दृष्टीनेहि या वादाची एक बाजू होती. गोखले यांची गणना राष्ट्रीय सभेच्या प्रमुख पुढाऱ्यात होत होती. इतकेच नव्हे तर राष्ट्रीय सभेच्या कामाची जुनी परंपरा राखण्यास जर कोणी लायक असेल तर ते गोखलेच होत अशी राष्ट्रीय सभेच्या जुन्या वतनदार मंडळीची समजूत होती. बनारस येथील राष्ट्रीय सभेचे काम त्यानी उत्तम रीतीने पार पाडले. वंगभंगाबद्दल तोंडाने सडकून टीका केली, पण राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष या नात्याने राष्ट्रीय सभेला नवीन वळण लावण्याचे काम त्यानी लांबणीवर टाकले. इतकेच नव्हे तर कलकत्याच्या राष्ट्रीय सभेतहि नव्या पक्षापुढे जुन्याची बाजू उचलून धरण्याचे काम त्यानीच स्वतःची मते बाजूला ठेवून केले होते. जुन्या पक्षाची मते त्यांस पूर्णपणे मान्य नव्हती. पण नव्या पक्षापेक्षा ती जुन्या पक्षास अधिक जवळ असल्याने जुन्या पक्षानेच ना. गोखले यांस पुढारीपणा दिला होता.

गोखले यांचे म्हणणे असे की राजकीय चळवळ करण्याची पूर्वीची म्हणजे कॉन्स्टिटयूशनल ऊर्फ सनदशीर पद्धत सोडून चालावयाचे नाही. टिळकांचे म्हणणे की ' सनदशीर ' या नावाने उगाच भ्रामक समजुती का उत्पन्न करिता ? चळवळ कायदेशीर असली व ती पीनल कोडाचा भंग करणारी नसली म्हणजे झाले. सनदशीर या भ्रामक नावाने देश फसला जाऊन राष्ट्राची २१ वर्षे आजपर्यंत फुकट गेली. कॉन्स्टिटयूशन हा इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेतील शब्द आहे. लोकमत जागृत करणे व मताधिक्य आपल्या बाजूचे करून घेणे याला इंग्लंडात कॉन्स्टिटयूशनल ऊर्फ सनदशीर चळवळ असे म्हणतात. इंग्लंडातील राजा व प्रजा यांच्यामध्ये सनदेने करारमदार झालेले आहेत. हिंदुस्थानात वरील तऱ्हेची सनद नाही. पण तशी निरर्थक चळवळ मात्र आहे ! नेमस्तांची चळवळ सनदेच्या बाहेर नाही किंवा सनदेची उलथापालथ करणारी नाही अशी नेमस्त पक्षाची प्रौढी आहे. पण या भमिष्टाना आमचा असा प्रश्न आहे की हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची जर एखादी सनद तुमच्या खिशात असेल तर बाहेर काढून दाखवाल काय ? हिंदुस्थानचा इतिहास आम्ही वारंवार इंग्रजी राजाच्या अव्वलीपासून चाळला पण इंग्लंडच्या इतिहासातील कॉन्स्टिटयूशनसारखी सनद आम्हास कोठेहि सापडली नाही. कायद्याचे उल्लंघन करू नका, एवढे सांगण्यापुरताच जर या शब्दाचा उपयोग करावयाचा असेल तर या उपदेशासंबंधाने नवीन पक्षाकडून काही हरकत येईल असे आम्हास वाटत नाही."

टिळक म्हणत " नामदार गोखले हे नवीन पक्षाची प्रधान तत्त्वे कबूल करितात. पण जुने सोडण्याचे धाडस नाही व नवीन विचारसरणी खोडून काढता येत नाही यामुळे त्यांच्या विचारसरणीत घोटाळा झाला आहे. औद्योगिक बहिष्कार त्याना संमत आहे. पण बायकॉट हा शब्द मात्र त्याना नको. औद्योगिक कारणा-करिता जर औद्योगिक बहिष्कार त्याना पाहिजे तर आणखी राजकारणाची त्यात भर पडून औद्योगिक बहिष्काराचा विशेष उठाव झाला तर त्यात वावगे कोणते ?" पण या बाबतीत गोखले यांचाच पूर्वीचा दप्तरी दाखला टिळकानी त्यांच्यापुढे हजर केला. 'अर्थशास्त्राची कोणाची कशीहि मते असोत. ती सर्व एका बाजूस ठेवून केवळ राजकीय कारणाकरिता मँचेस्टरचे कापड विकत घेऊ नका' असा उपदेश १८९४ साली गोखले यानी न्या. रानडे यांच्याच सल्ल्याने पुण्यातील लोकाना केला होता व त्यांच्या सहीचा हा लेख सार्वजनिक सभेच्या दप्तरी नमूद होता. ही पूर्वीची गोष्ट झाली. पण टिळक म्हणत " बनारसच्या कॉंग्रेसच्या वेळेला राजकीय कारणाकरिता बंगाली लोकानी सुरू केलेल्या औद्योगिक बहिष्काराचा चांगला उपयोग झाला असे गोखल्यानी कबूल केले होते. तर आज त्यापाठीमागे जाऊन राष्ट्राची पिछेहाट का करिता ? बहिष्कार किंवा बायकॉट हा शब्द द्वेषमूलक किंवा द्वेषसूचक आहे हे गोखले यांचे म्हणणे चुकीचे आहे. " ये यथा माम् प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् " असे जे भगवंतानी सांगितले आहे ते काही द्वेषबुद्धीने नव्हे

तर योग्य प्रतिकारार्थ होय. गोखले गोड बोलतात पण राज्यकर्त्यांच्या दृष्टीने त्यांच्या बोलण्यातून तरी वेगळे असे काय निघते? गोड बोलण्यावर गोखल्यांचा विश्वास आहे. नव्या पक्षाचा नाही. हाच काय तो भेद बाकी सर्व एकच. गोखले यानी तोंड उघडले म्हणून तरी अशा तऱ्हेचें विधान आम्हास करिता आले. केव्हा तरी हा भेद लोकापुढे स्पष्ट यावयास पाहिजे होता तो आता आला. 'राघू जितका अधिक बोलतो तितका तो अधिक पिंजऱ्यात पडतो'. गोखले जितके अधिक बोलतील तितकी विचारांची विसंगतताच त्यांच्या पदरी येणार. इंडियन स्पेक्टेटरसारख्या पत्रकाराचे असेच मत होते. जुन्या पक्षाचे मत पटत नाही व नव्या पक्षाचे प्रतिपादन करिता येत नाही अशी दोहो बाजूनी त्याना मोठी पंचाईत येऊन पडली आहे. या कोंडीतून ना. गोखले कोणाची थप्पड न खाता कसे सुटून जातात हेच पाहण्यास आम्ही उत्सुक झालो होतो. ना. गोखले यांच्या हल्लीच्या भाषणानी ही आमची उत्सुकता परिपूर्ण झाली. पण कोंडीच्या बाहेर गडी शाबूत पडला असा तिऱ्हाइत प्रेक्षकांचा किंवा पंचांचा निर्णय होईल असे आम्हास वाटत नाही!"

सरकारी नोकरीच्या बहिष्कारासंबंधानेहि टिळकानी लिहिले आहे की "सरकारी नोकरी सर्वांनी सोडणे हे शक्य नाही हे आम्हासहि कळते. पण तात्त्विक दृष्ट्या तसे प्रतिपादन करण्यास हरकत काय? सर्व लोक संसार सोडीत नाहीत म्हणून संसाराची असारता सांगण्यास वेदांत कधी मागे झाला आहे काय? चांगली माणसे सरकारी नोकरीत न गुंतता सर्वंट ऑफ इंडिया सोसायटीसारख्या संस्थेत शिरावी या बुद्धीनेच सदर सोसायटी त्यानी काढली आहे की नाही? नवा पक्ष तरी तात्त्विक दृष्ट्या हेच म्हणतो. सरकारी नोकरी हलक्या प्रतीची आहे तेव्हा अशी बुद्धि जागृत करून चांगली माणसे या कनिष्ठ धंद्यापासून नव्या पक्षास परावृत्त करावयाची आहेत. सरकारी शिक्षणपद्धतीत दोष आहेत ते निघावेत अशी गोखल्यांचीहि इच्छा आहे. त्याचप्रमाणे सरकारी शाळा हल्ली जितक्या आहेत तितक्या खाजगी होणे नाही ही गोष्ट आम्हासहि मान्य आहे. पण तितक्या शाळा काढता येत नाहीत म्हणून एकहि स्वतंत्र राष्ट्रीय शाळा काढू नये हे म्हणणे अविचाराचेच नाही काय? तात्पर्य, राष्ट्रीय शिक्षणाच्या मार्गाचा सरकारशी विरोध आहे असे आरंभी वाटेल पण अखेर तो विरोध टिकावयाचा नाही व राष्ट्रीय शिक्षणाचा क्रम सर्व सरकारी शाळातून अमलात येईल. दोन्ही पक्षाचे सामान्य विचार एक असले तरी एकाच्या क्रिया कचरत होत आहेत आणि दुसरा धैर्याने पुढे पाऊल टाकू इच्छित आहे. या धैर्यामुळे फायदा झाला तर जुन्या पक्षास नको आहे असे नाही. किंबहुना असा फायदा झाल्यास तो त्यास हवा आहे व त्याचा ते उपयोगहि करून घेतील! पण आज जरी कितीहि विसंगतता पदरी आली तरी नव्या पक्षाचे मार्ग कबूल करावयास नेमस्त पुढारी तयार नाहीत हे खरे!" एकच ध्येय असता प्रतिपादनशैलीत फरक कसा असतो याचे हे एक उदाहरण होय.

## (११) राष्ट्रीय सभा सुरतेस कशी गेली ?

राष्ट्रीय सभा सुरतेस मोडली हे खरे पण त्याचे बीजारोपण कलकत्यास झालेल्या राष्ट्रिय सभेतच झाले होते. कलकत्यास चतुःसूत्रीला मान्यता मिळाली हा जितका राष्ट्रीय पक्षाचा विजय होता तितकाच तो मेथापक्षाला आपला पराजय वाटला ! किंबहुना कलकत्याच्या सभेत बाहिष्काराचा ठराव पास होताच मेथा हे टिळकाना रागावून म्हणाले " कलकत्यात तुम्ही हा ठराव जिंकलात खरा पण मुंबईस ही गोष्ट झाली नसती ! " टिळकानी उत्तर दिले " मुंबईचे येवढे काय विषेश सांगता ? तेथेहि आह्मी तुह्माला पाहून घेतले असते ! "

कलकत्याच्या सभेनंतर सरकारने दडपशाहीच्या धोरणाला सरांस सुरवात केली. याचा फायदा घेऊन नेमस्तानीहि राष्ट्रीय पक्षाविरुद्ध हल्ल्याचे शिंग फुंकून राष्ट्रीय सभेस मागे खेचण्यास उघड आरंभ केला. कित्येकानी अशा सूचना केल्या की तंटे वाढविण्यापेक्षा नव्या जहालपक्षाने वाटल्यास आपली दुसरी कॉंग्रेस करावी. पण टिळक म्हणत की " पक्षापक्षांची भांडणे होतात ह्मणून वेगळी कॉंग्रेस भरवा हे ह्मणणे मूर्खपणाचे आहे. ज्याना राष्ट्रीय सभेसारख्या सार्वजन संस्थेत आपलीच वतनदारी कायम ठेवावयाची आहे त्यांचाच हा खरा कावा आहे. लोकमत आपल्या बाजूस वळवून कॉंग्रेसमध्ये बहुमत करून घेणे हाच सनदशीर व कायदेशीर राजकीय चळवळीचा मार्ग होय व हा मार्ग दोन्ही पक्षास खुला आहे. "

राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष प्रांतवार प्रांतिक कमिट्यांनी मते देऊन निवडावा व प्रातिनिधिक स्वरूपाच्या तत्वाच्या दृष्टीने पाहता हेच योग्य होय असेच टिळक यानी पूर्वी प्रतिपादले होते. पण अध्यक्ष रिसेप्शन कमीटीने निवडावा इतकेच नव्हे तर तो सभासदांच्या तीनचतुर्थांश इतक्या बहुमताने निवडला जावा असा विचित्र नियम कलकत्यास पास झाला होता ! नागपुरास ही अडचण दोन्ही पक्षाना झाली. सप्टेंबर महिन्याच्या प्रारंभाला स्वागत कमेटीच्या सभासदांची यादी पुरी झाली. सभासदत्वाची वर्गणी २५ रुपये होती. नेमस्तांचे लोक ८०० व त्यांची वर्गणी २०००० रुपये जमली. राष्ट्रीय पक्षाने ४५००० रुपये जमवून १८०० सभासद केले होते. पण राष्ट्रीय पक्षाचा अध्यक्ष निवडून यावयाचा तर ६०००० रुपये जमावयास पाहिजे होते. राष्ट्रीय पक्षाचे दोन तृतीयांश बहुमत होते पण अजून ते तीन चतुर्थांश इतके झाले नव्हते. अर्थात पैसे कसे जमतील ही राष्ट्रीय पक्षास विवंचना. व बहुमत राष्ट्रीय पक्षाकडे उघड उघड असल्याने अखेर राष्ट्रीय पक्षाचाच मनुष्य अध्यक्ष होणार असे संकट नेमस्तांचे पुढे उभे राहिले ! व हे महत्संकट टाळण्याचा त्यानी आपल्याकडून कसून प्रयत्न चालविला.

स्वागतसभेचे हे स्वरूप पाहून नेमस्तानी कार्यकारी मंडळाची पुनर्घटना करण्याचा घाट घातला. स्वागत कमेटीत उभय पक्षांच्या संमतीने दोन्ही पक्षाचे लोक प्रथम घेतले होते. पण प्रतिपक्षाचा संबंधहि जुन्या पक्षास दुःसह होऊन

कार्यकारी कमीटीची रचनाच शक्य तर बदलून घ्यावी अशाकरिता त्यांनी सभा बोलावली. पण सभेच्या रीतसर नोटिशासुद्धा त्यानी नव्या पक्षास दिल्या नाहीत.

ता. २२ सप्टेंबर रोजी टाऊन हॉलमध्ये प्रचंड सभा भरली. ही सभा ना. चिटणवीस यानी गैर अधिकाराने कार्यकारी मंडळाला न विचारताच बोलाविली होती. अर्थात् सभा कायदेशीर की बेकायदेशीर येथूनच रणे पडण्यास सुरवात झाली. टाऊन हॉलभोवताली पटांगणात व रस्त्यात लोकांची, सभेत न येऊ दिल्याकारणाने, अगदी गर्दी उडून गेली होती व लोक तीनचार तास उन्हामध्येच उभे होते. अखेर सभा मोडली व 'सभा बेकायदेशीर रीतीने बोलावली' असे ना. चिटणवीस याना कबूल करावे लागले. चिटणवीस यांनी त्यानंतर राजीनामाहि दिला.

राष्ट्रीय सभा प्रथम लाहोर येथे भरावयाची असे ठरले होते. पण तेथे ती राष्ट्रीय पक्षाच्या हातात जाणार इतकेच नव्हे तर लोक कदाचित् टिळकानाच अध्यक्ष निवडावयाचे हे पाहून लाहोरवाल्याना हुलकावणी देऊन नेमस्तानीच राष्ट्रीय सभा नागपुरास भरविण्याचे प्रथम ठरविले! पण तेथेहि लोकमत वरीलप्रमाणे टिळकांच्याच बाजूला पाहताच त्यांची निराशा झाली. पण या वादात टिळक स्वतःकरिता भांडत नव्हतेच. ता. ८ आक्टोबरच्या केसरीत टिळक लिहितात–"अध्यक्षाच्या निवडणुकीचा वाद आहे पण तो काही वादाचा मुख्य प्रश्न नव्हे. कलकत्यास दादाभाई यानी घालून दिलेले नवीन वळण राष्ट्रीय सभा केवळ बंगाल्यापुरतेच नव्हे तर सर्व देशाकरिता मंजूर करते की नाही हा वादाचा प्रश्न आहे. टिळक यानी अध्यक्ष होण्याचे नाकबूल केले किंवा उद्या ते मेले तरी दोन पक्षांचा झगडा मिटावयाचा नाही हे आम्ही सर्वांस निक्षून सांगतो. प्रश्न व्यक्तीचा नाही. मतांचा आहे. राष्ट्रीय सभा दोघानाहि पाहिजे आहे. मतभेदाचा निकाल सभा मोडल्याने व्हावयाचा नाही अगर दोन निरनिराळ्या सभा केल्यानेहि व्हावयाचा नाही. आज नाही उद्या नव्या पक्षाचे राष्ट्रीय सभेत हटकून बहुमत होणार असे आम्ही निश्चयाने सांगतो."

स्वागत मंडळात राष्ट्रीय पक्षाचे बहुमत होऊन नेमस्तांची अडवणूक झाली. उलट तीनचतुर्थांश बहुमत व साठ हजार रुपये जमण्याचे चिन्ह दिसत नसल्याने कॉंग्रेसच्या नियमामुळे राष्ट्रीय पक्षाचीहि अडवणूक झाली. आपला अध्यक्ष निवडून आणण्याची खटपट दोघांचीहि सुरू होती. पण ते दोघानाहि शक्य नसल्याने जमविलेले पैसे दोन्हीहि पक्षानी रिसेप्शन कमिटीत न भरता आपआपल्या हाती राखून ठेविले होते. नेमस्तांचे म्हणणे असे की राष्ट्रीय पक्षाने जमविलेल्या ४० हजार रुपयांपैकी निदान पंधरा हजार रुपये तरी रिसेप्शन कमिटीस द्यावे व नेमस्तांचा अध्यक्ष कबूल करावा म्हणजे समेट होईल. राष्ट्रीय पक्षाचे म्हणणे असे की आम्ही पैसे गोळा केले आहेत ते आमचा अध्यक्ष निवडला जाईल या शर्तीवर केले आहेत. नेमस्त पक्षाने वाटल्यास आपण होऊन कॉंग्रेस भरवावी. नवा पक्ष त्यास कबूल आहे. इतकेच नव्हे तर सध्या जमविलेला पैसा सोडून इतर बाबतीत तो

सहाय्यहि करील. नेमस्त पक्षात जो अतिशय लोकप्रिय गृहस्थ असेल–उदाहरणार्थ सुरेंद्रनाथ बानर्जी–त्यास अध्यक्ष केल्यास तो आपल्या तेजानेच लोकाकडून मान मिळवून कॉंग्रेसचे काम निर्विघ्नपणे पार पाडील. नेमस्तांस नको असल्यास त्यानी तसे कळविले म्हणजे नव्या पक्षातील माणसे पाहिजे तर राजीनामे देऊन घरी स्वस्थ बसण्यास तयार आहेत. इतक्याहि उपर नेमस्तांच्या अंगी कॉंग्रेस भरविण्याचा दमच नसेल तर नवा पक्ष आपल्या केवळ हिमतीवर कॉंग्रेस भरविण्यास तयार आहे. पण मग अध्यक्ष मात्र नेमस्त पक्षाचा होणार नाही! ज्याचे पैसे त्याचा अध्यक्ष हे गेल्या कॉंग्रेसमध्येच ठरलेले आहे. त्याबद्दल आता कुरकुर करण्यात अर्थ नाही. पैसा आणि अध्यक्ष या दोहोवरहि पाणी सोडण्यास कोणीहि तयार व्हावयाचा नाही. नेमस्त पक्षाने कोणती तरी एक तडजोड स्वीकारावी. हे शक्य नसेल तर नव्या पक्षाने आपण होऊन कॉंग्रेस करण्यास पुढे यावे. हेहि नसेल तर नागपुरच्या लोकानी स्वतंत्रपणे कॉंग्रेस भरविण्याची व्यवस्था करून त्याप्रमाणे ऑल इंडिया कॉंग्रेस कमेटीस कळवावे."

ता. २९ आक्टोबरच्या केसरीत टिळकानी लिहिले "नेमस्त पक्ष तडजोडीस कबूल नसेल तर नव्या पक्षाने हे वृत्त ऑल इं. कॉं. कमेटीस कळवून स्वागत कमिटीतून अंग काढून स्वस्थ बसण्यासहि आपण तयार आहो असे कळवावे. कॉंग्रेस नागपुरात भरविण्याचे न ठरले तर कॉंग्रेसचाच नव्हे तर नागपुर शहराचाहि बदलौकिक आहे. दोन्ही पक्षातील लोक तयार नसल्यास शहरचे लोक तयार आहेत असेहि ऑ. इं. कॉं. कमेटीस कळवावे. पाध्ये यांची नागपुरात टर उडाली म्हणून सुरेंद्रनाथ यांचीहि उडवितील अशी शंका घेणे पोरकटपणाचे किंबहुना मूर्खपणाचे आहे." स्वतः अध्यक्ष होण्याची टिळकांची यत्किंचितहि इच्छा नव्हती. पण नागपूर येथील राष्ट्रीय पक्षाच्या मनात त्याना अध्यक्ष करण्याचे फार होते. सुरेंद्रनाथ बानर्जी यांचे देखील नाव मवाळाना पसंत पडेना तेथे टिळकांचे नाव मेथा हे थोडेच कबूल करणार! नागपुरास वादामुळे कॉंग्रेस भरविता येत नाही असे दिसले तेव्हा तडजोडीकरिता म्हणून उभयपक्षाच्या पुढाऱ्यांची मुंबईस मेथा यांचे बंगल्यावर बैठक झाली. त्यात वामनराव कोल्हटकर गोकुळदास पारख पाध्ये वगैरे मंडळी हजर होती. मुंजे यानाहि मुद्दाम बोलावणे केले होते. या सभेत मुंजे व मेथा यांची थोडी चकमकच झडली. मुंजे यांनी सांगितले "टिळकाना अध्यक्ष करावे असेच नागपुरच्या लोकांच्या मनात आहे. तथापि टिळकाना गैरकायदा अध्यक्ष करावे असे आमचे म्हणणे नाही. बॅलटने मते घेऊन टिळक न आले तर आम्ही दुसरा अध्यक्ष मान्य करू!" फेरोजशहानी पैशाच्या वगैरे अडचणी बऱ्याच मध्ये आणल्या व विचारले "स्वागतमंडळाने जमलेला पैसा तुमच्या हवाली न केला तर तुम्ही काय कराल?" मुंजे यानी सांगीतले "टिळकांकरिता वाटल्यास आम्ही भीक मागू. पण पैसा उभारून कॉंग्रेस यशस्वी करून दाखवू." मुंजे यांचा निर्धार पाहून अखेर मेथा यानी विचारले "तुम्हास टिळकच का म्हणून अध्यक्ष हवेत?

डॉ. राशबिहारी का नकोत?" यावर मुंजे यानी खडखडीत उत्तर दिले "ही आमची पसंती होय।" पण असले सडेतोड उत्तर मेथा थोडेच ऐकून घेणार! कमेटीमध्ये रीतसर काय तो विचार करू असे म्हणून त्यानी सर्वच प्रकरण त्या वेळे-पुरते धुडकावून लावले.

अखेर नागपुरच्या नेमस्तानी राष्ट्रीय सभेचे काम यंदा आपल्या हातून होणार नाही असे म्हणून कानावर हात ठेवले तेव्हा ता. १० नोव्हेंबर रोजी मुंबईस मेथा यांचे बंगल्यावर ऑ. इं. कॉं. कमेटीची सभा भरली. बहुधा बऱ्याच प्रांताचे प्रतिनिधी गैरहजर होते. पण त्यानी कॉंग्रेस नागपुरासच भरवावी असे आपले लेखी मत दिले होते. मेथा गोखले वाच्छा जिना खरे पारख अंबालाल साकरलाल टिळक खापर्डे मुधोळकर विजयराघवाचार्य वगैरे १३ मंडळी सभेस हजर होती. खुद्द नागपुरच्या तंट्यासंबंधाचा वाद असल्याने वरचेवर खुलासा वगैरे करण्यास सोईचे पडावे म्हणून मुंजे अळेकर वगैरे मंडळी बाहेर व्हरांड्यात आली होती. पण चपराशाने येऊन त्याना बंगल्यातून बाहेर जाण्यास सांगितले! यानंतर सभेस सुरवात झाली. या सभेत तडजोडीचे शक्य तेवढे प्रयत्न झाले. विजयराघव झणाले 'वाटल्यास नागपुरच्या दोन्ही पक्षातले लोक व ऑल इं. कॉं. कमेटीचे त्याहून अधिक सभासद अशी नवी कमेटी करून नागपुरची सभा पार पाडावी.' नागपुरास वाद असल्याने ज्या योगाने काम सुरळीत चालेल बखेडा माजणार नाही अशी ऑ. इं. कॉं. कमेटीतील पाच नावे खापर्डे यानी सुचविली. त्यावरोबर तुम्ही नावे कोण सुचविणार? आम्ही सांगू तीच नावे तुम्ही कबूल केली पाहिजेत म्हणून इतर सभासदानी त्यांचेवर गहजब केला. शेवटी ऑल इंडिया कॉंग्रेस कमेटीने दोन्हीहि पक्षाना बाजूस ठेवावे व वेगळी स्वतंत्र कमेटी नेमावी म्हणून सूचना केली गेली. पण तीहि कोणास पटली नाहीं. पण पटावी तरी कशी? कारण मेथा व सेक्रेटरी ना. गोखले यानी गुप्तपणे वेगळी योजना आधीच मुक्रर केली होती! म्हणून रंगभूमीवर पात्र उपस्थित होते त्याप्रमाणे सुरतेचे डेप्युटेशन अवचित पुढे आले. त्यानी कॉंग्रेसला सुरतेस निमंत्रण केले. अखेर मते घेण्याचा फार्स उकरण्यात आला व कॉंग्रेस सुरतेस भरावयाची हे निश्चित झाले. टिळक व खापर्डे यांनी मत देण्याचे नाकारले.

हा निकाल मुंजे अळेकर यांस कळताच त्यानी नागपूरचे नाव जाऊ नये म्हणून अखेरचा प्रयत्न करून पाहण्याचे ठरविले व एक पत्र लिहून कॉंग्रेसचे सेक्रेटरी ना. गोखले व वाच्छा यांस पाठविले. त्यात नागपूर प्रांताचे नाव राखण्याबद्दल विनवणी इतकेच नव्हे तर प्रार्थना केली होती व पक्षात उल्लेखिलेल्या रकमेची हमी पटविण्यासाठी दहा हजार रुपयांच्या प्रॉमिसरी नोटाहि पत्रासोबत पाठविल्या होत्या. शिवाय असेहि कळविले होते की "ऑ. इं. कॉं. कमेटीस वाटेल त्या रीतीने काम करणाऱ्या कमेटीची रचना करण्यात यावी. कशीहि रचना करण्यात आली तरी राष्ट्रीय कामाकरिता व आमच्या प्रांताचा दुर्लौकिक होऊ नये म्हणून

मनोभावे मिळून मिसळून काम करण्यास आम्ही तयार आहो असे राष्ट्रीय पक्ष वचन देत आहे. तुम्ही काय पाहिजे ते करा पण काँग्रेस नागपुरास भरवा!" पण मेथाप्रभृतींना नागपुरकर लोकाना सलोख्याचे उत्तर पाठविण्याची गरज अगर पर्वाहि नव्हती. इतकेच नव्हे तर ना. गोखले यांचेखेरीज सर्व सभासद मुंबईस हजर असता या पत्राचा विचार देखील केला गेला नाही. व आता पत्राचा विचार करण्यास अवधि नाही असे सांगून वाच्छा यानी नोटा परत पाठविल्या!

नागपुरास भरणाऱ्या काँग्रेसचा हा निकाल लागलेला ऐकून स्वतः नागपूरच्या पुढाऱ्याना किती वाईट वाटले असेल याची कल्पनाच केली पाहिजे. ऑ. इं. काँ. कमेटीत असा निकाल होईल हे पूर्वीपासून वाटतच होते. व त्याप्रमाणेच अखेर झाले. टिळक केसरीत लिहितात " सर फेरोजशहा मेथा जिकडे काँग्रेस भरवितील तिकडे राष्ट्रीय पक्षाने सध्या गेले पाहिजे! कारण काँग्रेस न भरावी किंवा मोडावी हा राष्ट्रीय पक्षाचा बिलकूल हेतू नाही. पण हा तंटा एवढ्याने भागला असे मात्र सर फेरोजशहा यानी समजू नये. नव्या जुन्या पक्षाचा तंटा नव्या पक्षाचा विजय होईपर्यंत एकसारखा चालावयाचा आहे. यंदाच्या साली एक सुरत सापडली म्हणजे पुढच्या साली तशीच दुसरी एकादी सुरक्षित जागा सापडते असे कोणी समजू नये. किंबहुना सुरत तरी सुरक्षित आहे की नाही हा प्रश्नच आहे!"

यानंतर प्रश्न असा उपस्थित झाला की काँग्रेस सुरतेस गेली तर जावो पण काँग्रेस सुरतेची की सर्व मुंबई इलाख्याची? आणि मुंबई इलाख्याची असल्यास इलाख्यातील रिसेप्शन कमिटी नेमून अध्यक्ष निवडणार की नाही? पण सुरतेस काँग्रेस भरावयाची हे जसे मेथा यानी ठरविले त्याप्रमाणे अध्यक्ष कोण हे देखील त्यानी ठरवून टाकले होते. टिळक म्हणतात " नागपूरच्या लोकाना तुम्ही विचारले नाही. पण आता अध्यक्षाच्या बाबतीत सुरतेच्याहि लोकांचे मत न घेणारे एवढे दुड्डाचार्य तुम्ही कोण? राष्ट्रीय सभा तुम्हीच भरवावी असा काही नेमस्तांस कोणी ताम्रपट दिलेला नाही!"

मुंबईस ऑ. इं. काँ. कमेटी भरून सुरतेस काँग्रेस नेण्याचा ठराव १० नोव्हेंबर रोजी झाला. पण मेथाकंपूच्या दुर्दैवाने दुसऱ्याच दिवशी लाला लजपतराय यांची मुक्तता झाली. लालाजी सुटले ही बातमी समजताच जिकडे तिकडे आनंदोत्सव झाले व लजपतराय यानाच अध्यक्ष करा असे ठराव पास होऊन त्याबद्दलच्या तारा सुरतेच्या स्वागत कमेटीकडे येऊन धडकल्या. ही बातमी मुंबईस कळताच नेमस्त पक्षाचे धाबेच दणाणले. मेथा यानी बरोबर मुंबईकर नेमस्तांची एक मोठी टोळी देऊन ना. गोखले यांस सुरतेस रवाना केले. सुरतेसहि स्वागत मंडळात दोन पक्ष होतेच. पण नव्या पक्षाचे बळ खुद्द सुरतेत फार कमी असल्यामुळेच मेथा यांनी ही सोईस्कर जागा योजली होती. प्रथम तरुण मंडळीपुढे गोखले यानी गोडीगुलाबीने खूप साखर पेरण्याचा प्रयत्न केला. " लजपतराय यांच्या हद्दपारीविरुद्ध यंदा आपणास सणसणीत निषेधप्रदर्शक ठराव करावयाचा आहेना? मग लालाजींना अध्यक्ष करून

कसे चालेल? शिवाय अध्यक्षाला गेल्या वर्षांतील राज्यकारभारावर टीका करावी लागते. लजपतराय यांस स्वतःबद्दल कसे कडक बोलता येईल?" पण लजपतराय यांस नुसते अध्यक्ष करणे म्हणजेच शंभर निषेधप्रदर्शक ठराव पास करणे होय असे नव्या पक्षाने रोकडे उत्तर देताच गोखल्यांचे खरे मर्म बाहेर पडले. त्यानी सांगितले "अशा वेळी लालाजीना अध्यक्ष करणे म्हणजे सरकारास चिडविण्यासारखे आहे. आणि सरकार आपली चळवळ एका क्षणात नामशेष करील!" शेवटी बराच वेळ खासगी भवति न भवति झाली पण निकाल लागण्याचे चिन्ह दिसेना. तेव्हा अंबालाल साकरलाल यानी स्पष्ट सांगितले की "विनाकारण लजपतराय यांच्या सूचनेचा ठराव पुढे मांडून त्याना हास्यास्पद कां करिता? ऑ. इं. कॉं. कमेटी आमच्या ताब्यात आहे." तेव्हां बाहेरच्या तारा व आलेली पत्रे न वाचताच ठेऊन देण्यात आली. लाला लजपतराय यांच्याबद्दल सूचना पुढे आणू दिली नाही म्हणून नवा पक्ष सभेतून उठून बाहेर गेल्यावर डॉ. राशबिहारी घोष यांचे नाव सुचविण्यात आले व ते पास झाले!

यावर टिळकानी ३ डिसेंबरच्या केसरीत लिहिले "यंदाच्या राष्ट्रीय सभेस 'तेविसावी' हे उपपद न जोडता यंदाची राष्ट्रीय सभा 'मेथा आणि को' ची सुरतेस भरणारी मजलस आहे असे म्हणणे अधिक सयुक्तिक आहे! सुरतेच्या स्वागत कमेटीत काही प्रमुख महाराष्ट्रीय मंडळीची नावे घालावी असे प्रथम सुचविण्यात आले होते व त्यास तशी पत्रेहि धाडली होती. हे गृहस्थ खरोखरच स्वागत कमेटीस पाहिजे होते तर अध्यक्ष निवडण्याकरिता ता. २४ नोव्हेंबर रोजीच स्वागत कमेटीची सभा बोलावण्याची घाई करावयास नको होती. आदल्या दिवशीच पत्रे हातात पडल्याकारणाने या गृहस्थांस ता. २४ च्या सभेस सुरतेस हजर राहणे अशक्य होते. सर्वच गोष्टी अरेरावीने चालल्या आहेत. यामुळें महाराष्ट्रांतील तरी लोकमत खवळून जाईल यात शंका नाही. लोकमताची पर्वा न करिता ज्याना ना. मेथा यांच्या पाठीमागून एडीकँपप्रमाणे नाचावयाचे असे त्यानी खुशाल तसे करावे. पण महाराष्ट्रातील बहुजनसमाजास ही गोष्ट पसंत नाही हे आम्ही स्पष्ट सांगतो. गोऱ्या अधिकारी वर्गाप्रमाणेच राष्ट्रीय सभेत बेबंदशाही व अरेरावीपणा अनियंत्रित चालावा हे राष्ट्रीय सभेचे दुर्भाग्य होय. अशा अरेरावीचा परिणाम अखेर काय होतो याचा प्रत्यय मेथा यांस मुंबईच्या म्युनिसिपालिटीत आलाच आहे व आज नाही पण उद्या राष्ट्रीय सभेतहि हाच अनुभव त्यांच्या प्रत्ययास आल्याशिवाय राहणार नाही."

टिळकांच्या अपेक्षेप्रमाणे खरोखरच सर्व प्रांतातील लोकमत खवळून गेले होते. व लजपतराय यानाच अध्यक्ष करा अशा चोहोकडून तारा व पत्रे येऊन लोकांची सारखी मागणी सुरू होती. पण दुर्दैवाने खऱ्या लोकमताला त्या वेळच्या कॉंग्रेसच्या घटनेत वावच नव्हता. यामुळे ऑ. इं कॉं. कमेटी हा अधिकारीवर्ग व देशातील लोकमत यांच्यात लढत उत्पन्न झाली होती. हा तंटा अखेर मिटण्याला एकच उपाय होता. तो म्हणजे डॉ. राषबिहारी घोष यानीच उदारपणाने आपले नाव मागे घेऊन लजपतराय यास जागा मोकळी करून देणे हा होय. बाबू मोतीलाल घोष

यास लिहिलेल्या एका पत्रांत टिळक लिहितात "वाटल्यास तत्त्वाकरिता म्हणून घोष यांच्या पाया पडून मी त्यांना विनंती करावयास तयार आहे. काय वाटेल ते करा पण लजपतराय यांचेकरिता राशबिहारी यानी आपले नाव पाठीमागे घ्यावे असे त्याना सांगा." ता. १० डिसेंबरच्या केसरीत टिळकानी "लाला लजपतरायच अध्यक्ष पाहिजेत" असा अग्रलेख लिहिला. त्यात त्यानी लिहिले "स्वार्थत्याग व देशाकरिता झीज व कष्ट सोसणे या दृष्टीने डॉ. घोष यांच्यापेक्षा लजपतराय यांची योग्यता शंभरपटीने अधिक आहे! गोखले यानी लजपतराय यांच्या विरुद्ध जी सुरतेस खटपट केली ती व्यक्तिद्वेषामुळे केली असे आमचे म्हणणे नाही. पण त्यांची सध्याची कृति व उद्योग राष्ट्रीय सभेच्या पदरी खोट्या व अपायकारक समजुती बांधण्याच्या बुद्धीने झाला आहे. राष्ट्रीयसभा ही सर्व हिंदुस्थानच्या वतीने सरकारजवळ हक्क मागण्याकरिता भांडण्याकरिता निर्माण झाली आहे. सरकारास किंवा सरकारी अधिकाऱ्यांस रुचेल अगर ते चिडले जाणार नाहीत अशा रीतीने राष्ट्रीय सभेचे काम चालावयाचे असेल तर ही सभा हवी तरी कशाला? लालाजींचा सन्मान करावयाचा असल्यास त्यांस अध्यक्ष करा. नाहीपेक्षा निदान गप तरी बसा! लालाजींस निमंत्रण देणारे तुम्ही कोण? त्याना तुम्ही राष्ट्रीय सभेचे पाहुणे म्हणून बोलाविता की प्रतिनिधी म्हणून बोलाविता? प्रतिनिधी म्हणून बोलावीत असला तर तुमच्या बोलावण्याची त्याना अपेक्षा नाही. कारण प्रतिनिधी म्हणून येण्याचा त्यांचा हक्कच आहे." अखेर टिळकानी लिहिले की "या प्रसंगी काही तडजोड न निघाली–व ती काढणे हे सर्वस्वी डॉ. राशबिहारी यांच्या हातात आहे–तर यंदा सुरतेस अध्यक्षाच्या निवडणुकीच्या वेळीच अनेक पद्धतशीर प्रतिसूचना व उपसूचना येऊन निदान घोटाळा माजविल्याखेरीज लोक राहणार नाहीत अशी आमची मनोदेवता आम्हास साक्ष देत आहे!" प्रश्न निकराचा असल्याकारणाने टिळकानी लिहिले "ठरावाचे मसुदे मेथा करोत की गोखले करोत या प्रसंगी नव्या पक्षाने सुरतेस हजर राहून राष्ट्रीय सभेत शक्य तेवढी सुधारणा करण्यास झटावे. नव्या पक्षास जे काम करावयाचे आहे ते हल्लीच्या कॉंग्रेसमध्ये होत नाही ही गोष्ट खरी. पण तेवढ्यामुळे हल्ली आहे ती राष्ट्रीय सभा यंदाच मोडावी असे आमच्याने म्हणवत नाही. सर्वांनी सुरतेस जावे पण मवाळांच्या किंवा फेरोजशहांच्या आग्रहामुळे चिडून नव्या पक्षाने कोणतेहि गैरवर्तन करू नये" असा दूरदृष्टीचा इषाराहि टिळकानी दिला होता.

# परिशिष्ट १

## नेव्हिनसन यानी काढलेले टिळकांचे शब्दचित्र

या परिशिष्टांत एका मार्मिक इंग्रज गृहस्थाने रेखाटलेले टिळकांचे या वेळेचे शब्दचित्र आम्ही मुद्दाम दिले आहे. याचे कारण असे की अनेक दृष्टीनी पाहता सुरत कॉंग्रेस व त्यानंतरचा खटला होण्यापूर्वी, आणि बंगालच्या फाळणीमुळे निर्माण झालेली स्वदेशी चळवळ ऐन जोरात आली त्या वेळी, टिळकांची तेजस्विता उत्कट रीतीला पोहोचली होती. नव्या मताचा छाप जुन्यावर पूर्णपणे पडला होता. आणि लोकमताची दहशत सरकारला जर केव्हा सर्वांत अधिक वाटली असेल तर ती या वेळी. हिंदुस्थानातील नव्या पक्षाने विलायतेच्या लोकावरहि अतिशय छाप पाडली होती. आणि तिचे खरे स्वरूप काय हे समजावून घेण्याकरिता विलायतेतील निरानिराळी वर्तमानपत्रे आपले प्रतिनिधी या वेळी हिंदुस्थानात पाठवीत होते. हेनरी नेव्हिन्सन हे अशापैकीच एक प्रतिनिधी होत. ते त्या वेळच्या प्रगमनशील पक्षापैकी त्यातल्यात्यात अघाडीला पोचलेले असे एक गृहस्थ होते. जगातील सर्व राष्ट्रांमध्ये लोकसत्ता प्रस्थापित व्हावी या मताचे ते असून रशियात परिणत पावणारी राज्यक्रांति हा त्यानी आपल्या अभ्यासाचा खास विषय म्हणून आखून ठेवला होता. त्यांचे New spirit in India हे पुस्तक वाचणाराना त्यांची लेखनशैली त्यांची प्रतिभा व उदारमतवादित्व ही ढळढळीत दिसून येतील. त्यांच्या लेखनकलेत प्रसाद व ओजस्विता हे गुण मुख्य असून कोणत्याहि वस्तुस्थितीचे शब्दचित्र फार थोड्या शब्दात हुबेहुब रंगविण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. या देशात येण्यापूर्वी कलकत्ता व पुणे हीच राष्ट्रीय चळवळीची मुख्य केंद्रस्थाने हिंदुस्थानात आहेत अशी माहिती त्याना असल्यामुळे ते मुंबईस आल्यावर प्रथम एकदम पुण्यासच आले. त्यांची व टिळक गोखल्यांची पूर्वीची ओळख नव्हती अगर पत्रव्यवहारहि नव्हता. पण या दोघांचीहि कीर्ति त्यानी ऐकलेली असल्यामुळे त्या दोघाकडे ओळखीची पत्रे घेऊन ते आले होते. पुण्यास त्या वेळी प्लेग जोरात होता. तथापि येथे चार दिवस घालवून निरनिराळ्या संस्था पाहून अनेक प्रमुख लोकांच्या ओळखी त्यानी करून घेतल्या. ना. गोखले व रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी या वेळी पुण्यासच होते. पण टिळक हे सिंहगडावर असल्यामुळे केळकर व नटेशराव द्रवीड नेव्हिन्सन साहेबाना घेऊन सिंहगडावर गेले. तेथे एकदीड दिवस मुक्काम करून त्यानी टिळकांच्या दोनतीन मुलाखती घेतल्या. नंतर ते सुरतेच्या राष्ट्रीय सभेलाहि हजर राहिले होते. वर उल्लेखिलेल्या पुस्तकात त्यानी टिळक जोशी व गोखले या तिघांचीहि शब्दचित्रे रेखाटली आहेत व ती फारच मार्मिक आहेत. पैकी टिळकांचे शब्दचित्र या ठिकाणी मुद्दाम दिले आहे. हेतु हा की एका तिऱ्हाइत चौकस अनुभविक अशा इंग्रज वर्तमानपत्रकाराच्या मनावर टिळकांच्या संबंधाने काय

ग्रह झाला तो या ग्रंथाच्या वाचकाना कळावा. पुष्कळ वेळा तिऱ्हाइताची दृष्टि व्यक्तिनिरीक्षणासंबंधाने नित्यपरिचिताच्या दृष्टीपेक्षा अधिक मार्मिक ठरते. व नेव्हिन्सन यांची गोष्ट अशीच होती हे खालील वर्णनावरून दिसून येईलः—

"टिळक हे गोखल्यांपेक्षा दहा वर्षांनी वडीलसे दिसले. पण कोणी सांगावे ? डोक्याच्या केसावरून अनुमान करता येत नाही. पाठीपर्यंत हजामत केलेली. टिळकांचे डोळे भरीव व पिंगट रंगाचे असून त्यात एक प्रकारचे लोकोत्तर असे तेज दिसते. त्यांच्या नजेरत धारिष्ठ दिसते आणि म्हणून ती रेखलेली असते. किंचित् दुसऱ्यावर हल्ला करणारी असेहि वाटते. पण त्यांची सामान्य चालचालणूक मोठी शांत आणि ताब्यात ठेवलेली अशी असते. खासगी संभाषण काय किंवा जाहीर भाषण काय त्यांची वाक्ये छोटी ठासलेली असतात. वाहवणारे वक्तृत्व त्यात नसते. अतिशय खळबळ होण्यासारखा प्रसंग असला तरी त्यांची वृत्ति बाहेरून बिलकूल डळमळलेली दिसत नाही. आणि बोलण्यात साध्या गोष्टी फार तर हकिकतीच्या रूपाने सांगण्यापलीकडे त्यांची मजल जात नाही. ही त्यांची शांतवृत्ति व आपल्या मनावरील ताबा हा आपल्या भवितव्यतेविषयीच्या बेफिकिरीमुळे उत्पन्न झालेला असावा. खटले व मुकदमे बराच काळ लढावे लागले आणि त्यात वकिली ढंगाने भांडावे लागले याचाहि तो अंशतः परिणाम असेल. सकृद्दर्शनी कोणाला असे वाटेल की टिळकांचे मन कायद्याच्या कातीव छापातून दाबून काढलेले असल्यामुळे त्याना सूक्ष्म भेदभाव हुडकता येतात, म्हणजे विचाराच्या महत्त्वापेक्षा ते व्यक्त करण्याची सफाई त्यांची अधिक असावी किंवा पुढे श्रोतृसमाज पाहिल्याबरोबर त्याला झेपेल पटेल अशी उचित भाषासरणी योजणे हाच त्यांचा मुख्य गुण असावा. पण त्यांचे चरित्र व शक्तिमत्ता ही पाहिली असता असे खात्रीपूर्वक वाटते की धर्मविचार व सनातन विद्यासंपन्नता यांजकडेच त्यांचा कल कायद्यापेक्षा अधिक असावा. हिंदुस्थानातील पुढारलेल्या सुधारकात सर्वांत अधिक सनातनी असा हा एक हिंदु आहे. टिळकांचे म्हणणे हिंदुधर्म प्रगतिपर आहे. या प्रगतिवर त्यांचा विश्वास आहे. युगांतरी श्रीकृष्णाचे अवतार होतात ही गोष्टहि ते खरी मानतात. व्यवहारात त्यांचा हिंदुधर्म अनेक वेळा प्रतिगामी असतो आणि युरोपियन राष्ट्राकडून येणाऱ्या फाजील आधिभौतिक कल्पनाना विरोध करण्याला तो त्याना उपयोगी पडतो. विद्वानामध्ये त्यांना गणतात. अत्यंत सूक्ष्म दृष्टीचे व स्वतंत्र विचाराचे संस्कृत पंडित अशी त्यांची ख्याति आहे. आर्यांचे वसतिस्थान या ग्रंथात त्यानी पुराव्यावरून प्रतिपादले आहे की उत्तरध्रुवासारख्या हिममय प्रदेशात मूळ वैदिक ग्रंथ रचले गेले. या उपपत्तीत कितीसा अर्थ आहे हे मी सांगू शकत नाही. त्यात खूप विद्वता आहे तसाच कल्पनेचाहि नवीनपणा आहे. पण मला त्याचे महत्त्व या गृहस्थासंबंधाने मुख्यतः हेच वाटते की इकडे सरकाराकडून छळ चालला आहे, द्रव्य कीर्ति मान्यता ही सर्व सरकाराने बुडविण्याला काढली आहेत अशा वेळी हा ग्रंथ लिहिला गेला. असल्या संकट काळी पवित्र धर्मग्रंथ किंवा हिममय ध्रुवप्रदेश यांचे चिंतन करणाऱ्या

माणसाचे मनोधैर्य कितीशा लोकात आढळेल ? मला कोणी सांगितले की अन्यायामुळे टिळकांचे मन सरकारविरुद्ध जळत असते. एक प्रतिष्ठित व सज्जन इंग्रज अधिकारी मला म्हणाला "टिळकांची तारीफ आहे खरी. त्यांचे गुणच मी घेतो. त्याना समक्ष भेटावे अशीहि मनातून इच्छा. पण त्याना भेटीन बोलावीन तर थप्पड बसेल इतकी टिळकानी दुराग्रही म्हणून आपली कीर्ति करून घेतली आहे." पण पुढे कर्मधर्म-संयोगाने दोघांची भेट झाली पण थप्पड बसली नाही. उलट भेटीत ते त्याच्याशी अत्यंत शिष्टाचाराने दाक्षिण्याने वागले व या अधिकाऱ्याविषयी त्यानी सन्मानबुद्धि दर्शविली. टिळकासारखा उमदा मनुष्य बिथरून जाईल व मनातून जळू लागेल इतका छळ त्यांचा झाला होता. पायोनियरने एकदा लिहिले की 'विद्वान् झाला म्हणून तुरुंग काही सुटत नसतो हे टिळकानी लक्षात ठेवावे'. आणि टिळकाना जाहीर रीतीने हातकड्या घातल्या म्हणतात. मुंबई सरकार टिळकाशी खुनशीपणाने वागते वड्याचे तेल वांग्यावर काढते असा त्यांच्यावर उघड आरोप लोक करतात. आणि शेवटी टिळक निर्दोषी ठरले व तावूनसुलाखून निघाले तेव्हा झालेला छळ हा त्यांच्या देशकार्याला सहजच फार उपकारी झाला.

त्या दिवशी सायंकाळी सिंहगडच्या माथ्यावर मी त्याना भेटलो त्याच वेळी त्यांच्या विरुद्ध भवितव्यतेची एक घटना घडत होती. पण टिळकांच्या शांततेत त्यांमुळे रतिभरहि फरक पडला नाही. ते एका पडक्या बंगल्यात राहात होते. आसपास वस्ति अगदीच तुरळक होती. मला उतरण्याला दुसरा बंगला दिला होता. कारण गोखल्यांप्रमाणे ते युरोपियन लोकांबरोबर राहून जेवणखाण करून जात मोडावयाला तयार नाहीत. रात्रभर वारा पर्वतावर एकसारखा घोंघावत होता. सकाळी उन्हे पडताच टिळक मजकडे आले. त्यानी मला प्रचंड पडक्या तटबंदीभोवती हिंडविले. "इंग्रजांच्या तोफानी किल्ल्याच्या भिंति या पहा येथे ढासळल्या होत्या, हे पहा प्रत्यक्ष या तटाच्या भिंतीवर पोटाने सरपटत वर चढून आम्हा मराठ्यांच्या पूर्वजानी अडीचशे वर्षांपूर्वी किल्ला सर केला. या दुसऱ्या डोळे फिरविणाऱ्या बिकट ठिकाणी वर चढून आलेली शिपायांची तुकडी कापली गेली" असे वर्णन ते करीत होते. आणि हे सर्व सांगताना कोणाला वाटेल की जसे काही टिळक हे यांचे कोणीच नव्हत. अशा रीतीने केवळ एकाद्या वाटाड्याप्रमाणे निर्विकार मनाने ते मला माहिती सांगत होते.

जुन्या काळच्या सर्वच गोष्टीना मनुष्य आश्चर्यकारक स्वरूप देतो म्हणून त्या-वर विश्वास ठेवण्यात फारसे महत्त्व वाटत नाही. पण माझ्या शेजारी टिळकासारखा मनुष्य उभा आहे, आणि जुन्या अमुक अमुक गोष्टी तो साधार विश्वास पट-ण्यासारख्या रीतीने मला समजावून सांगत आहे, म्हणून यात काही विशेष अर्थ आहे असेच मला त्या वेळी वाटले. खाली दूर खोल दऱ्यातून लिकलिकणारी खेडी दिसत त्यांची माहिती टिळकानी मला सांगितली. या गरीब खेडवळ लोकाना आपली जनावरे किंवा आपले भाताचे पीक या पलीकडे जग म्हणून काही नाही.

त्यांची दुःखे किती विविध असतात! त्यांची आशा किती थोड्यावर असते! आणि त्यांच्या स्थितीत चढउतार ताबडतोब कसा होतो हेहि त्यानी मला समजावून दिले. आम्ही बोलत होतो त्याच वेळी दूर नागपूर शहरी अशा गोष्टी घडून येत होत्या की त्यात स्वतः टिळक व त्यांचा नवा पक्ष यांचा फार निकट संबंध येत होता. टिळक राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष व्हावे अशी तेथे चळवळ सुरू होती. पण नागपूरचे नेमस्त व जहाल या दोघांचे म्हणणे बाजूला राहून किंवा दोघांचेहि म्हणणे तडीला जाऊन भांडण मिटावे म्हणून स्वतः टिळकानीच लजपतराय यांचे नाव सुचविले. या निवडणुकीच्या वादाच्या मुळाशी गहन तत्त्वे होती. पण व्यक्तिविषयक कारणामुळे हा तंटा न मिटता नागपूरची सभा मोडून उधळली गेल्याच्या बातम्या नुकत्याच आल्या होत्या. तरी इकडे या पहाडाच्या माथ्यावर टिळकांचे बोलणे चालणे माझ्याशी सुरू असलेले पाहणाराला असे वाटले असते की हा गृहस्थ या पक्षभेदाना व भांडणाना काडीचीहि किंमत देत नसेल. व शेतकऱ्यांची दुर्दशा किंवा जुन्या काळच्या मराठे लोकांच्या पूर्वजानी केलेली धाडसाची कृत्ये यांच्यातच त्याचे खरे मन गढून गेले असेल.

दिवसभर या राजकीय परिस्थितीचा विचार टिळकानी मनात केला असावा. आणि संध्याकाळी फक्त ते एकटेच मजकडे आले आणि त्यांच्या त्या तुटक संक्षिप्त पण निश्चयार्थ अशा वाक्यानी त्या विषयाची चर्चा त्यानी माझ्याशी सुरू केली. टिळकाशी झालेल्या संभाषणाचा सारांश काळजीपूर्वक लिहून काढून नंतर लवकरच मी प्रसिद्ध केला. तेव्हा पुष्कळ मवाळाना व जहालाना असे वाटले की 'टिळकानी माझ्याशी खरे अंतरंग उघडे केले नसावे. व बाहेर जे काय प्रकट व्हावे अशी त्यांची इच्छा होती तेवढेच त्यानी मला सांगितले असावे. कदाचित् आपणहि विचाराने नेमस्त आहो असे त्यानी मला भाषणात भासविले असेल.' पण त्यानी गुप्त ठेवण्याचे म्हणून काहीच सांगितले नाही आणि जो सारांश मी वाचून दाखविला तो बरोबर आहे असे त्यानी मला सांगितले होते. अलीकडे त्यांची भाषणे त्यांचे लेख मी नीट वाचून पाहिले आहेत. व त्यावरून मला असे आढळले की त्यांच्या राजकीय धोरणाविषयी त्यानी मला जे तोंडी सांगितले तेच अगदी तंतोतंत त्यातहि आहे. म्हणून मनात एक व जनात एक असे वर्तन त्यानी माझ्याशी केले नाही असेच मला वाटते. ते मला म्हणाले:–"जहाल काय मवाळ काय! दोघांच्याहि हेतूत फरक नाही. भेद हा फक्त मार्गाचा आहे. आणि या भेदामुळेच आम्हाला जहाल म्हणतात. आजच इंग्रजांचे राज्य सर्वस्वी झुगारून द्यावे असे म्हणणारांचा पक्ष फारच लहान आहे. शिवाय अगदी दूर भविष्य काळी घडणाऱ्या या गोष्टी. त्यांच्याशी आम्हाला आज काय कर्तव्य? आमच्या हाती शस्त्र नाही. आमच्या आमच्यात ही अशी फूट. संघटना कसलीच नाही. आम्ही ते इंग्रजांचे अधिराज्य कसे डळमळविणार? देशाच्या राज्यकारभारात अखेरीस आम्हाला मोठा अधिकार मिळावा येवढाच आमचा उद्देश. झालीच तर होमरूल सारखी म्हणजे स्वतंत्र पण संयुक्त अशा प्रांतिक सरकारांची मिळून

एकादी संघटना होईल. पण यालाहि झाले तरी काही पिढ्या जाव्या लागतील. प्रत्यक्ष आजचा सवाल म्हटला तर सरकाराला काही दडपण काही खरा धाक वाटावा इतक्या-पुरता आहे. रशियातील नोकरशाही किती वाईट याचे वर्णन तुम्ही केले ते ठीक आहे. पण ती नोकरशाही देखील रशियन लोकांचीच आहे. रशिया हा आपला देश आहे त्याचा दर्जा मान्यता वाढावी व त्याची भरभराट व्हावी असेच तिला वाटते. उलट हिंदुस्थानातील नोकरशाही पहा. ती जुलमी तर आहेच. तिचा सगळा कारभार दूरच्या आपल्या देशाच्या फायद्याकरिता चालला आहे. या देशाचे सर्वस्व वेचावे आणि या देशाचे तोंडहि ज्यानी पाहिले नाही अशा लोकांची धन करावी असा तिचा हा सगळा कारभार आहे. या कारभारात आम्हाला कोठेच स्थान नाही. कनिष्ठ दर्जाच्या जागा तेवढ्याच आमच्या. म्हणून सरकारवर दडपण घालावे त्याना थोडे चेपून पाहावे असे आम्हाला वाटते. ते कसे घडून येते हा प्रश्न आहे. आणि मवाळ व जहाल यांच्यातील भेद या प्रश्नाचे उत्तर देतानाच काय तो पडतो. मवाळानाहि इंग्रज लोकावर येथे वजन पाडू व युक्तिवादाने मन वळवू अशी फारशी आशा नाही. पण त्यांची भिस्त ज्या इंग्लंडवर तेथे तरी आम्हाला कोण विचारतो? तेथे एकालाहि हिंदुस्थान कशाशी खातात हे माहीत नाही. हिंदुस्थानचा विषय काढून आपापसात भांडू नये असा त्यांचा कटच होऊन राहिलेला. म्हणून निराश होऊन आम्ही जहालानी निराळ्या मार्गाचा अवलंब करण्याचे ठरविले आहे. हा केवळ स्वभावाचा भेद आहे. तरुण लोक सर्व आमचे बाजूचे आहेत आणि स्वावलंबन हेच आमचे ब्रीदवाक्य राहणार. मग त्याकरिता काहीहि सोसावे लागो. हिंदी लोकांच्या हिताकरिता आम्ही निर्वाणपदावर उभे राहण्याची तयारी केलेली आहे. तीनचार हजार लोकाना तुरुंगात घालताना सरकारला विचार करावा लागेल. जड जाईल. आमच्या बहिष्कारात कोणा देशबांधवावर जुलूम नाही. सत्याग्रहातहि दडपशाहीच्या कायद्यापुरताच कटाक्ष आहे. इंग्रजांच्या व्यापाराला थोडा धक्का बसावा सरकारला थोडी अडचण वाटावी म्हणजे आमच्याकडे इंग्लंड थोडे डोळे उघडून पाहील. आमच्यात आज पूर्ण एकी न झाली तरी पुढे मागे आम्हाला दडपून ठेवणाऱ्या या परकी सत्तेमुळेच सर्व एक होऊ." हे टिळकानी नेमस्तपणाने ढोंग केले असे कित्येकाना वाटेल. पण ते जर किंचित् खरे असेल तर पूर्ण स्वराज्य केव्हा मिळावे या काळाविषयी टिळक बोलले तितक्या-पुरतेच ते कदाचित् असेल. पण पुण्यास शिवाजीउत्सवात किंवा कलकत्त्यास कॉलेज स्केअरमध्ये विद्यार्थ्यांना उद्देशून टिळक बोलले त्यातहि याहून काही वेगळे नव्हते.

टिळकांचा निरोप घेऊन मी सिंहगडावरून खाली येण्याला निघालो तेव्हा किल्ल्याच्या त्या काळ्या कभिन्न व जुनाट तटबंदीच्या अगदी सीमेपर्यंत ते मला पोचविण्यास आले होते. जहाल लोकांचे टिळकांवर व्यक्तिशः नेहमी इतके प्रेम का? ते त्यांच्यावर काय मोहनी टाकू शकतात? हे मला आता कळून आले. आणि ते मर्म दुसरे तिसरे काही नाही. तर हेच की त्यांच्या स्वभावात चलबिचल नाही. करू की न करू, करू की न करूं असे नाही. केले पण अर्धवट काही तरी केले असेहि

नाही. समरांगण हे त्याना आनंदभुवन वाटते. आणि स्वतःला केव्हा कशाने काही घात होईल इजा पोचेल असला भीतीचा विचार त्यांच्या मनात कधीहि येत नाही. त्याग किंवा दुःख या बाबतीत हा मनुष्य नुसता बेभान आहे. पण नुसत्या येवढ्या गुणाने का समाज कोणाला वश होत असतो? हे वर सांगितलेले गुण तर टिळकात आहेतच. पण त्यांच्या जोडीला टिळकांच्या अंगी दुसरेहि गुण आहेत. खेड्यातल्या अगदी दरिद्री हीनदीनापर्यंत सर्वांचा परिचय ते करतात व परामर्ष घेतात. धर्मश्रद्धा सामाजिक चालीरीति या बाबतीत जनतेला जे जे मनाने परमप्रिय त्या सर्वांचे ते सतत सुसंगत समर्थन करतात. इतके गुण अंगी असल्यावर लोकावर त्यांचे वजन पडावे त्याना लोकप्रियता लाभावी यात आश्चर्य ते कसले?

असो. अशा रीतीने आमची ही मुलाखत झाली. मी मागे वळून पाहिले तो टिळक अजून डोंगरावर उभेच आहेत. मराठे व मुसलमान या दोघानी आपापल्या परीने भोगलेल्या राज्यांची आठवण करून देणारे पण आता मोडकळीस आलेले तट बुरूज बालेकिल्ले यांचे त्यांच्याभोवती वेष्टण आहे. आणि दुसरीकडे पाहावे तो आमचे रंगेल खेळाडू गोरे शिपाई, ज्याना सगळ्याच हिंदी गोष्टींची थट्टा वाटते व जे त्याचा विनोद करतात, ते दिवसाचे आपले काम संपवून आपल्या दुर्बिणी आपली हत्यारे गवसणीत घालीत आहेत आणि रात्रीच्या विश्रांतीकरिता डोंगरातील निवांत स्थळांचा आश्रय करीत आहेत असे मला दिसले.

---

# परिशिष्ट २

## टिळकांचे शिवाजीउत्सवांतील व्याख्यान

ता० २५ जून १९०७ रोजी पुणे येथे श्रीविठ्ठलमंदिरात शिवराज्याभिषेकोत्सव झाला त्याच्या शेवटच्या दिवशी अध्यक्ष या नात्याने लो० टिळक यांनी समारोपादाखल भाषण केले ते असेः—

यंदाचा उत्सव १४ वा म्हणून सांगण्यात आला. पण खरा १४ वा उत्सव होण्यास अद्याप तीन वर्षे अवधि आहे. १८९६ साली हा उत्सव येथे प्रथम सुरू झाला व त्याच्या पुढच्याच वर्षी त्यावर संकटे आली. तथापि त्यातूनहि तो पार पडून टिकला आहे. त्याच्या पुढच्या साली त्यावर पुनः किटाळ येईलसे वाटत होते. परंतु त्यांतूनहि तो निर्विघ्नपणे पार पडला याबद्दल परमेश्वराचे आभार मानिले पाहिजेत. हल्लीचा काळ अस्वस्थतेचा आहे, तेव्हां येथेहि अस्वस्थता होते की काय व न झाल्यास करता येईल की काय अशी कित्येकांची तयारी होती. पण कोणत्याहि प्रकारची गडबड न होता हा उत्सव पार पडला ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. माझे असे म्हणणे नाही की दंगा धोपा मोडण्याची सरकारी अधिका-

त्यानी तयारी करू नये. उलट हे त्यांचे कर्तव्यच आहे. पण त्यांचे चुकते आहे ते हे की अशा प्रसंगी दंगेधोपे करण्याकरिताच आम्ही जमतो असे ते मानतात. तीन दिवसात येथे काय झाले ? तर प्रधान यानी सद्यःस्थितीसंबंधाचे काही विचार आपल्यापुढे मांडले. दुसऱ्या दिवशी माझे मित्र शिवरामपंत परांजपे यानी राजा व प्रजा यांच्या परस्परसंबंधाच्या पाश्चात्य कल्पना—विशेषतः यांच्यामधील मूळ कराराची कल्पना—प्लेटो पासून रुसोपर्यंत कशी वाढत गेली हे सांगितले. व भागवत यानी शिवाजीची सेनानी मुत्सद्दी लोकनायक या दृष्टीने काय योग्यता होती हे आपणाला कळविले. आज खाडिलकर यानी शिवाजीच्या वेळच्या मुत्सद्यांचे गुणवर्णन करून शिवाजीचा व त्यांचा अंतिम हेतून काय फरक होता हे सांगितले. यात लपवण्यासारखे ते काय ? व ही भाषणे लिहून घेण्याला पोलिसाचे येथे १५ रिपोर्टर तरी कशाला पाहिजेत ? ते आले म्हणून आम्ही काही भीत नाही. फार लांब कशाला कलेक्टर किंवा गव्हर्नर ऐकायला येतील तर मी चांगलेच म्हणेन. आमच्या देशात असल्या उत्सवाने जागृति करण्याचा आमचा हेतु आहे. आणि हा हेतु आम्ही काही लपवून ठेवू इच्छित नाही. आम्हाला जे काही बोलावयाचे ते आम्ही उघड उघड बोलतो. इंग्रजी साम्राज्यात इतर नागरिकांस जे हक्क आहेत ते आम्हास प्राप्त व्हावे एवढ्याकरिता आमची ही चळवळ आहे. ते हक्क आम्ही मिळवू तेव्हाच स्वस्थ बसू. आम्हास जे काही पाहिजे आहे आणि आम्ही जे काही मागतो ते हेच. यात चोरी कसची ? आमच्या देशात काही आम्ही चोर नाही. जे काही आम्ही बोलतो ते सरकारला कळण्याकरिता मुद्दामच आम्ही बोलतो. आणि त्याना ऐकावयाचेच असेल तर घरी दारी दुसऱ्या कोठेहि ते सांगण्याला आम्ही तयार आहो. मी स्पष्ट सांगतो की—देवासमोर सांगतो मग साहेबासमोर तर सांगेनच—दंगाधोपा करण्याचा आमचा बिलकुल हेतू नाही. मग हा एवढा रिपोर्टरचा खटाटोप कशाला ?' व असल्या बातम्या मिळविण्याकरिता २ लाख रुपये खर्चून जादा पोलिस ठेवण्यात तरी काय हशील ? गरीब लोकांकडून कराच्या रूपाने घेतलेल्या पैशाचा माझ्या मते हा अपव्यय आहे. एवढ्या पैशात एखादी धंदेशिक्षणाची शाळा काढली तर त्याचा पुष्कळ चांगला उपयोग होईल. बंड करावयास अवश्य लागणारा दारूगोळा बंदुका पैसा वगैरे सामुग्री आमच्या जवळ नाही, आणि सरकारापाशी एका तासात हजार गोळ्या बाहेर पडणाऱ्या मशीनगनसारखी अनेक यंत्रे आहेत हे आम्हांला माहित नाही काय ? कॉलेजात शिकून जे बी. ए. एम्. ए. एल्एल् बी. झाले त्याना काय एवढे समजत नाही ? बरं, आम्ही जे बोलतो तेहि काही गुप्त बोलत नाही. घरी दारी वर्तमानपत्रात हेच सांगतो. मग हे डिटेक्टिव कशाला ? सरकारला आमचे ऐकायचचे असेल—आणि त्यानी ते ऐकावे म्हणून आम्ही बोलतो—तर मग सरकारी अधिकाऱ्यानी येथे येऊन खुशाल ऐकावे. पण याना ऐकायचे आहे कोठे ? वक्त्याला एखाद्या शब्दात पकडून कैदेत कसा घालता येईल—फासात कसा अडकविता येईल—याकरिता हे डिटेक्टिव आहेत. राजाप्रमाणे आम्हाला जरी चार

किंवा डिटेक्टिव ठेवता न आले तरी एवढे खूप समजा की परमेश्वर हा सर्वांत मोठा डिटेक्टिव आहे आणि तो सारे पहात आहे !

मोर्ले म्हणतात सुशिक्षित लोक आमचे शत्रू. का ? तर राजकीय बाबतीत ते आमच्या विरुद्ध चळवळ करतात म्हणून. आडाणी लोकांचे या सुशिक्षितास पाठबळ नाही. अशीहि मोर्ले साहेबानी कोटी केली आहे. जणू काय अडाणी लोकाना देखील या गोष्टीचे ज्ञान असलेच पाहिजे. बरे याना सरकार शिकवील म्हणावे तर तेहि नाही. मोर्लेच्या मते आम्हास मिळालेल्या शिक्षणामुळे आम्ही त्यांचे शत्रू बनलो आहो ! आम्हास ज्ञान मिळाले नसते तर आम्ही काही त्यांचे शत्रू झालो नसतो. आणि मग आमची गणना अडाणी वर्गाबरोबर मित्रातच झाली असती ! सारांश आम्ही शत्रू नव्हे तर आमच्यामधील ज्ञान हे सरकारचे शत्रू आहे. ॲडमला ज्ञान मिळाले--त्याने ज्ञानाचे फळ चाखले-म्हणून तो परमेश्वराचा शत्रू झाला. आम्हास ज्ञान प्राप्त झाले म्हणून आम्ही सरकारचे शत्रू. अर्थात सरकार हे ज्ञानाचे शत्रू झाले आणि ज्ञानाचे शत्रू कोण असतात हे आपल्याला माहीतच आहे ! मी आता सांगितलेच आहे की आम्हाला काही दंगाधोपा करावयाचा नाही. शिवाजी उत्सवापासून आम्हास जे काय शिकावयाचे ते निराळेच आहे. शिवाजीने ज्या उपायांचे अवलंबन केले तेच उपाय सद्यस्थितीत पुनः अमलात आणा असे कोणी म्हणत नाही. पण ज्या बुद्धीने ते उपाय तेव्हा शोधून काढले तशा प्रकारची बुद्धि तशा प्रकारचा उत्साह धैर्य आमच्या अंतःकरणात नेहमी उत्पन्न करण्याकरिता हे उत्सव आहेत. अशा प्रसंगी कोणीहि कुबुद्धीने येथे येऊन बोलत नाही. रिपोर्टरानी आमची भाषणे खुशाल उतरून घ्यावी. आम्ही काही त्यास भीत नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की सगळे उतरून घ्या. किंबहुना रिपोर्ट मजजवळ आणाल तर मीहि तो दुरुस्त करून देईन. आम्हाला तरी सरकारास आम्ही काय म्हणतो ते कळवावयाचेच आहे. कोणीहि असे म्हणत नाही की बेकायदेशीर मार्गाचे अवलंबन करावयाचे. दुर्दैवाने सरकाराच्या वर्तनामुळे बेकायदेशीर मार्ग स्वीकारण्याची वेळ आली तर पुढच्या पुढे पाहता येईल. सध्या काही ती वेळ नाही आणि तसा कोणाचा हेतूहि नाही. अशा वेळी कायदेशीर चळवळ बेकायदेशीर ठरवून लाला लजपतरायासारख्या पुरुषास ब्रह्मदेशात पाठविणे हे गैरशिस्त होय. आणि मोर्ले सारख्यानी त्यास संमति द्यावी यासारखे इंग्रजी राज्यास माझ्या मते दुसरे कोणतेहि अपायकारक नाही. मोर्ले हे पंडित आहेत नाही कसे म्हणावे ! त्यांचे ग्रंथच तशी साक्ष देतात. पण पंडित निराळे व मुत्सद्दी निराळे ! मुत्सद्दी हा पंडित असावा लागत नाही व प्रत्येक पंडित मुत्सद्दी असतोच असे नाही ! मोर्लेसाहेबांवरून काशीच्या पंडितांची मला आठवण होते. हे भले जाडे विद्वान्. कोणी नैय्यायिक तर कोणी वैय्याकरणी. पण प्रिन्स ऑफ वेल्स आले तेव्हा ह्यानीच सरस्वतीची मूर्ति त्यास अर्पण केली. लक्ष्मी गेलीच होती आणि सरस्वतीहि देऊन टाकली ! मोर्लेसाहेबांची गोष्ट अशातलीच आहे. त्याना भिकारी सुशिक्षितांची

काय पर्वा! ते म्हणतात की राजेरजवाड्यांचा वर्ग सरकारच्या बाजूचा आहे-बरोबर आहे. कारण नाही तर त्याचे राज्य जाईल. इंग्रजी जाहीरनाम्यापेक्षा राजकीय सभा बंद करण्याकरिता काकणभर जास्त कडक जाहीरनामा कोल्हापूर दरबारकडून निघाला त्यातील बीज तरी हेच. व्यापारी वर्ग सरकारच्याच बाजूचा. कारण त्याचा बहुतेक व्यापार विलायती मालाचा. अधिकारीवर्ग जाणून बुजून सरकारने नेमलेला. तेव्हा तो सरकारच्या बाजूला असावयाचाच. कुळंबी माळी! त्याना तर काही समजत नाही. पण ते आमचेच असले पाहिजेत. कारण आम्ही त्यांचे राजे! मोर्लेसाहेबांची ही कोटी परवा लॅगनसाहेबानी कायदेकौन्सिलात सांगून आपण म्हणजे अधिकारीवर्ग शेतकऱ्यांचे मित्र आणि पुढे बसलेले लोकनियुक्त सभासद केवळ सावकाराचे मित्र असे चापून विधान केले. कुळंब्याना किंवा शेतकऱ्याना काही कळतच नाही. तेव्हा त्यांच्या संबंधाने या अधिकाऱ्यानी वाटेल ते बोलावे. असो, अशा तऱ्हेने हिंदुस्थानातील लोकांचे वर्गीकरण करून त्यांच्या सुखाकरिता हल्लीची राज्यपद्धति आकल्पांत—त्यांची दृष्टि पोहोचते तोपर्यंत—चालावी असे मोर्लेसाहेबानी म्हटले आहे. राहता राहता सुशिक्षितांचा वर्ग राहिला. त्यास मोर्ले यानी शत्रू म्हणून खड्यासारखे निवडून काढले आहे. ते म्हणतात की शिक्षणाने हा वर्ग असंतुष्ट होऊन राज्यकारभारात आपल्याला घ्या अशी मागणी करील असे पूर्वीच भाकित झाले होते. पण हा वर्ग राज्यकारभारास लायक नसून केवळ पोटासाठी ह्याची धडपड चालू आहे. सुशिक्षित वर्ग गरीब आहे हे मलाहि मान्य आहे. लक्ष्मी आणि सरस्वती क्वचितच एकत्र वास करितात. परंतु आम्ही गरीब म्हणून आमची अशी उपेक्षा करणे मात्र बरोबर नाही. आमच्या जवळ ज्ञान आहे आणि ज्ञान केव्हाहि गरीब असते. वर मोर्ले यानी सांगितलेले लोक आज आम्हाला अनुकूल नसतील. पण पुढे मागे आम्ही त्याना आमच्यात ओढू. राजकीय चळवळ करणारापाशी संपत्तीच असली पाहिजे असे नाही. रशिया जर्मनी वगैरे देशात चळवळ करणारे लोक गरीबच आहेत. आणि आमच्या देशातील उदाहरण पाहिजे असल्यास चाणक्याचे आहे. त्याला श्राद्धाचे आमंत्रण होते व तेथे अग्रस्थान मिळाले नाही ह्मणून तो अपमान सहन न करता 'नंदाचा उच्छेद करीन तेव्हाच शेंडी बांधीन' अशी त्याने प्रतिज्ञा केली. आणि ती शेवटासहि नेली! सारांश भिकारी म्हणून आमचा तिरस्कार करणे योग्य नाही. मोर्लेहि एकदा गरीबच होते. मोर्ले सारखी शहाणी शहाणी माणसे जेव्हा अशा चुका करतात तेव्हा क्रांतीची वेळ जवळ आली म्हणून समजावे. मोर्ले देतील देतील असे कित्येकास वाटत होते; पण काही नाही. परक्याशी विरोध आला असता कौरव पांडव मिळून जसे १०५ तसे हिंदुस्थानचा प्रश्न निघाला असता कॉन्सर्व्हेटिव्ह आणि लिबरल १०५ आहेत. बाल्फोरने विचारावे आणि मोर्लेने उत्तर द्यावे. हा गुरुशिष्यसंवाद! यापासून काही एक निष्पन्न व्हावयाचे नाही. आम्हास जे हक्क मिळवावयाचे आहेत ते आम्ही स्वतःच्याच प्रयत्नाने मिळविले पाहिजेत. आणि या सर्व कार्याची जबाबदारी तरुण

पिढीवर आहे. त्यानी धैर्याने नेटाने कायदेशीर रीतीने व इतिहासाला धरून त्यानी प्रयत्न केला पाहिजे.

शिवरामपंत परांजपे यानी राजा व प्रजा यामधील संबंध करारावर रचल्याची कल्पना आपणाला सांगितली व दामले यानी १८५८ सालचा जाहीरनामा हा आमच्याकडे तशा प्रकारचा करारनामा आहे असे म्हटले. पण माझ्या मते हा करार नाही तर लोकाना तेवढ्यापुरते शांत करण्याकरिता काढलेला एक मुत्सद्दीपणाचा लेख आहे–ही एक प्रकारची फसवणूक आहे. बलिष्ठ व निर्बल यांच्यात करार होत नाही. त्याला दोन्ही समानबल पाहिजेत. अधिकारी आणि प्रजा यांच्यात करार कसला? प्रजा शिरजोर झाली म्हणजे कराराची सबब पुढे करून त्याच्या जोरावर राजाशी भांडावयाचे ही पाश्चिमात्त्यांची एक शकल किंवा कल्पना आहे. व राज्यव्यवस्थेचा पाया व्यावहारिक तत्वावर रचण्याचा तिकडील विद्वान् लोक प्रयत्न करीत असल्यामुळे ती निघाली आहे. पण आम्हाला तेवढ्यामुळे समाजरचनेची आमची जुनी धार्मिक कल्पना सोडून देण्यास नको. राजा देव आहे. हो आहे. नाही कोण म्हणतो? पण प्रजा कोण? देवच. अर्थात प्रजादेवाने राजादेवतेचा जुलूम सोसलाच पाहिजे असे अनुमान यापासून निघत नाही. ज्या मनूने "महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति" असे राजाचे गौरव सांगितले त्यानेच राजाच्या पाठीमागे राजधर्म लावून देऊन ते धर्म त्याने न पाळले तर तो नरकात जाईल असे स्पष्ट म्हटले आहे! हे धर्म किंवा कायदे बदलण्याचे हल्लीच्या प्रमाणे राजाच्या हातात नसे. ऋषि ते धर्म सांगत व राजास ते पाळावे लागत. मनु सांगतो की (लाला लजपतरायाप्रमाणे) शिक्षेस पात्र नसलेल्या गृहस्थास जर राजा शिक्षा करील किंवा शिक्षेस पात्र असणारास सोडून देईल तर तो 'अयशो महदाप्नोति नरकं चापि गच्छति' म्हणजे नरकास जाईल. राजा देव झाला म्हणून त्याने वाटेल तो अन्याय करावा असे आमच्या शास्त्रात कोठेहि सांगितले नाही. उलट तो जेव्हा अन्याय करू लागतो तेव्हा देवाचा दुसरा अवतार होतो. या दोन देवांचा झगडा होतो आणि पहिला देव जाऊन त्याच्या जागी दुसरा देव येतो. परशुराम व राम दोन्ही विष्णूचेच अवतार. पण काय झाले? परशुरामाला रामापुढे माघार घ्यावी लागली. आणि त्याच्या तोंडातून ज्योत निघून ती रामाच्या तोंडात गेली. मग परशुराम मनुष्यच राहिला. सारांश राजा देव आहे असे मानले तरी तेवढ्याने जुलुमाचे आणि अन्यायाचे समर्थन होत नाही. अन्याय करणारा देव असुर होता आणि दुसरा देव त्याच्या जागी येऊन त्याला काढून टाकले हे लक्षात ठेवले म्हणजे 'ना विष्णुः पृथिवीपतिः' या तत्वात कोठे न्यून रहात नाही.

शिवाजीला काही लॉक हूकर हॉब्स यांची नावे अगर कराराची कल्पना माहीत नव्हती. त्याची समजूत आमच्या धर्मात किंवा वेदांतात सांगितल्याप्रमाणेच होती. मात्र तो वेदांत कसा व कोठे लावायाचा हे त्याला चांगले कळत होते. माझ्यासमोर हे हरदास आहेत. ते सांगतात की एका गृहस्थाच्या घरी एक पाहुणा आला. त्याने

आपले गाठोडे घरधन्यापाशी ठेविले. आणि जाताना आपल्या बरोबर घरधन्याचेहि गाठोडे घेऊन चालला. का ? तर परब्रह्म परब्रह्माला घेऊन चालले. अशा गृहस्थाच्या पाठीत एक भले मोठे परब्रह्म—लाकूड घालणे हाच खरा वेदांत होय ! वेदांत ठीक आहे. तो लावावयास मात्र शिकले पाहिजे. राजा जर ब्रह्म आहे तर आम्ही तरी कोठे माया आहो? आम्हीहि ब्रह्मच. श्रीकृष्णाला हा वेदांत तर बरोबर माहीत होता व म्हणूनच त्याने अर्जुनास युद्ध करावयास सांगितले. सारांश राजा जर आपले धर्म सोडून कोणतेहि कृत्य करील तर आमच्या जुन्या धर्माप्रमाणेहि त्या चुकीचे त्यास प्रायश्चित भोगावे लागेल. मि. मोर्ले यानी जी मोठी चूक केली ती ही की त्यांनी लाला लजपतरायासारख्या पुरुषास विनाकारण हद्दपार करण्याला संमति दिली. पण याला भिऊन आता काय होणार ? देशकार्यासाठी अनेक संकटे सोसण्यास आम्ही तयार असले पाहिजे. रक्तपातशून्य क्रांति ( bloodless Revolution ) हे शब्द आहेत. रणांगणावर रक्तपात होण्याचा त्यात समावेश न झाला तरी तुरुंगाची किंवा हद्दपारीची शिक्षा त्यात येत नाही असे समजू नका. तुरुंगात टाकतील एक दोन वर्षे ठेवतील सोडून देतील. तितक्या अवधीत एखाद्याचे पौंड दोन पौंड वजनहि वाढेल. पण याची फिकिर करून आता उपयोग नाही. ही संकटे सोसण्यास आह्मी तयार असले पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाही व कार्यसिद्धीहि व्हावयाची नाही. लक्षात ठेवा की शिवाजी महाराजाना देखील कैदी व्हावे लागले उपाशी रहावे लागले आणि कष्ट सोसावे लागले. निव्वळ युक्तिवादाने या गोष्टी सिद्ध व्हावयाच्या नाहीत. स्वार्थ व युक्ति यांच्या तंट्यांत स्वार्थ युक्तीला मारतो. आम्हाला आमचा स्वार्थ साधावयाचा आहे. आणि सरकाराच्या अधिकारीवर्गाला त्यांचा स्वार्थ साधावयाचा आहे. सरकार म्हणजे येथील अधिकारीवर्ग इंग्लंडचे लोक नव्हत. कारण विलायतेतील एका मजुराला तुम्ही जाऊन विचारा तर तो साफ असे सांगेल की मला याच्याशी काय करावयाचे आहे ? हा स्वार्थाचा तंटा आहे. आणि यात निश्चयाने व धैर्याने संकटातून पार पडू अशा बुद्धीने जर वागाल तरच तुम्हास यश येईल. याकरिता स्वदेशी चळवळ बहिष्कार हे उपाय प्रधान यानी सांगितलेच आहेत. इंग्रजाच्या अंगावर हात टाकण्याची आम्हास मुळीच जरूर नाही. आमचा हात त्यांच्या खिशावर पडला म्हणजे बस्स आहे. हे राज्य आज आमच्या मदतीनेच चाललेले आहे. वरच्या गोऱ्या अधिकाऱ्यांचा जरी हुकूम झाला तरी आगगाडी तारायंत्र मुलकी दिवाणी वगैरे खात्याचे कच्चे काम सर्व आम्हीच चालवितो. १५ रुपयावर काही युरोपियन कारकून येत नाही. ते आम्हीच असणार व आमच्या मदतीखेरीज हे गाडे चालावयाचे नाही. या परिस्थितीचा विचार करून यातूनच आह्मास काही तरी मार्ग काढला पाहिजे. नाहीतर जगात तोंड दाखविण्यास जागा नाही. आजच इतर राष्ट्रे आह्माला हंसत आहेत. युक्तीचा पगडा स्वार्थावर बसण्यास दृढनिश्चयाचे आणि स्वार्थत्यागाचे पूर्ण बळ पाहिजे. आमच्या मागण्या आमचे हेतु गैरकायदेशीर नाहीत गैरसनदशीर

नाहीत. इतिहासाच्या विरुद्ध नाहीत. मानवी स्वभावाच्या विरुद्ध नाहीत आणि देवाच्या आज्ञेच्याहि विरुद्ध नाहीत. याला जे आडवे येतील त्यानी आमचा मार्ग काही वेळ अडवला तरी तो त्याना पुढे मोकळा करून द्यावा लागेल. एक लाला लजपतराय कैदेत गेले म्हणून काय झाले? त्यांच्या जागी दुसरे पन्नास लाला तयार झाले पाहिजेत. एक सिव्हिलियन गेला तर त्याच्यापेक्षा वरचढ दुसरा सिव्हिलियन त्याच्या जागी येतो. आह्मीहि हेच तत्त्व पाळले पाहिजे. लाला लजपतराय याना केव्हाच सोडणार नाहीत असे नाही. पण आज अर्ज करून काही ते सुटत नाही. पंजाबात जे खटले चालले आहेत ते कशाकरिता? तुम्ही भ्यावे ह्मणून. आणि तुम्ही भ्याला म्हणजे त्यांचे काम झाले. मग ते लाला लजपतराय यास सोडून देतील. पण हा काही त्यास सोडण्याचा खरा मार्ग नव्हे. त्यांच्यावर जुलूम झाला याबद्दल जर आम्हास खरोखर वाईट वाटत असेल तर म्युनिसिपालिट्यासारखी सरकारची फुकट कामे तरी करावयास आम्ही नाकबूल व्हावयास पाहिजे होते. ते न करता आम्ही राजनिष्ठ म्हणून जाहीरनामा काढून नगारा वाजविण्यात काय हशील? याचा खरा अर्थ न कळण्याइतके सरकार काही वेडे नाही. ते आमच्यापेक्षा शहाणे आहे शतपट शहाणे आहे आणि म्हणूनच आमच्यावर राज्य करीत आहे. त्याना चकविण्याइतके आम्ही जेव्हा शहाणे होऊ तेव्हा त्यांचे राज्य राहणार नाही. तात्पर्य आम्ही राजनिष्ठ आहो म्हणून टिमकी वाजविण्यात काही अर्थ नाही. आम्ही स्पष्ट सांगतो की अमुक अमुक हक्क आम्हाला पाहिजे आहेत. आमचे म्हणणे आम्ही उघड बोलतो व वर्तमानपत्रातून लिहितो. पोलीस रिपोर्टरानी ते खुशाल लिहून घ्यावे. मला त्यांचे विरुद्ध बोलावयाचे नाही. ते बिचारे आपल्या पोटाचे नोकर आहे. आम्हालाहि पोट आहे ह्मणून आह्मी हक्क मागतो. 'आमच्या पोटाला पाहिजे' असे न म्हणणारी प्रजा राजाला तरी कशी मिळणार आणि प्रजा नाही ह्मणजे तो राजा तरी कोणाचा होणार?

असो. शेवटी महाराष्ट्राच्या इतिहाससंबंधाने प्रसिद्ध झालेल्या दोन लेखाबद्दल मला दोन शब्द सांगावयाचे आहेत. पहिला लेख व्हिन्सेंट स्मिथ यांचा. या गृहस्थानी खिस्ती शकापूर्वी व पुढे ६०० मिळून १२०० वर्षांचा हिंदुस्थानचा इतिहास ताम्रपट वगैरे आधारावरून लिहिला आहे व तो वाचनीय झालेला आहे. पण मराठ्यांच्या इतिहासाचे ताम्रपट नसल्यामुळे म्हणा, किंवा त्यांचा इतिहास न वाचल्यामुळे म्हणा, मराठे मुत्सद्दी व योद्धे यांच्यासंबंधाने 'लुटाऱ्यांची टोळी' असे जे यानी "ईस्ट व वेस्ट" मध्ये प्रसिद्ध झालेल्या आपल्या निबंधात वर्णन दिले आहे ते निराधार व चुकीचे आहे. भागवत व खाडिलकर यांच्या भाषणावरून ही गोष्ट आपल्या लक्षात आलीच असेल. दुसरा लेख किंकेड साहेबांचा. यात त्यानी पेशवाईचे चांगले वर्णन केले आहे. पण पेशवाई बुडाल्याची जी कारणे सांगितली आहेत ती बरोबर नाहीत. पेशव्यानी शाहूचे राज्य बळकाविले म्हणून पुढे त्यांचा वचक न राहून त्यांचे राज्य गेले असे म्हणण्यात काही

अर्थ नाही. कोठेहि झाले तरी एकाच कुळात १०--१५ कर्तबगारीची माणसे एका पुढे एक निपजत नाहीत. करिता राज्य अविछिन्न चालण्यास राजसत्ता एका कुलाच्या ताब्यात न ठेवता प्रजेच्या पुढाऱ्यांच्या हातात असली पाहिजे. हे तत्त्व इकडे चालू नव्हते म्हणून इकडील बादशहा ४।२ पिढयातच डबघाईस येत असे माझे मत आहे. हल्ली तरी आम्ही राजकर्त्यांजवळ हेच मागत आहो.

---

# परिशिष्ट ३

## १९०७ मधील निवडक पत्रे

### ( १ ) किंकेड साहेबांचे टिळकाना पत्र

पुणे १८ मार्च १९०७

ता. १५ रोजी तुम्हाला भेटतो म्हणून पत्र लिहून ठरवूनहि मी भेटलो नाही याबद्दल तुमची माफी मागतो. पण मला थंडी बाधून खोकला झाला होता म्हणून मी भेटू शकलो नाही. पुढच्या खेपेस तुम्ही पुण्यास परत याल तेव्हा आपण भेटू व शांताका यांच्या विवाहासंबंधाने बोलू. तुम्ही या विवाहाच्या बाबतीत जी खटपत करीत आहात व श्रम घेत आहात त्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहे. हे लग्न म्हणजे माझ्या डोक्यावर एक मोठी जबाबदारीच आहे. म्हणून तुम्ही ते ठरवून मला काळजीतून मुक्त केलेत आणि माझा सर्व त्रास वाचविलात याबद्दल मी तुमचा निरंतर ऋणीच राहीन.

### ( २ ) टिळकांचे केळकराना पत्र

सिंहगड २३ एप्रिल १९०७

रंगारेड्डी यांच्या व्याख्यानाला मला येता येत नाही याबद्दल वाईट वाटते असे त्याना कळवा. सुरत येथील परिषदेसंबंधाने तुम्ही वादात विनाकारण पडला. एकटे विजापूरकरच होते ते बरे होते. तेथील ठरावासंबंधाने तुमचे मत मला पसंत नाही. फेरोजशहा मेथा यानी तुम्हा लोकापेक्षा अधिक चलाखी दाखविली खरी. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचा शिक्षणविषयक ठराव सुरतेस पुनः प्रस्थापित

होणे जरूर होते. त्याविषयी आग्रह धरला असता तर बखेडा होण्याचा प्रसंग आला असता असे वाटत नाही. माझी प्रकृति मे अखेर सुधारेल असे वाटते.

### ( ३ ) मुंबई गव्हर्नरचे प्रायव्हेट सेक्रेटरीचे टिळकाना पत्र

मुंबई १४ जुलै १९०७

तुमचे पत्र पावले. तुम्ही ह्मणता तेच बरोबर आहे. ओरिएंटल ट्रान्सलेटरकडून भाषांतर आले ते चुकीचे होते. गव्हर्नर साहेबांच्या भाषणाचा रिपोर्ट केसरीत आला आहे तोच बरोबर आहे. ही गोष्ट मी ओरिएंटल ट्रान्सलेटरच्या नजरेस आणतो.

( गव्हर्नर साहेबांचे हे भाषण शाळाना मदत करण्यासंबंधाचे होते. )

### ( ४ ) भाजेकर यांचे केळकराना पत्र

मुंबई १२ सप्टेंबर १९०७

शिशुसंरक्षण संस्थेविषयी टिळकांची समजूत बरोबर झाली आहे असे वाटत नाही. रमाबाईच्या सदनासारखी ही संस्था मिशनरी नाही. मध्यवर्ती कचेरी मुंबईस आहे व केवळ भूतदया हेच तिच्या कामाचे तत्त्व आहे. आह्मी पाच हजार रुपये जमविले आहेत. एकहि मुलगी मिशनऱ्यांच्या हाती दिली जाणार नाही. निरनिराळ्या जातीची अनाथगृहे असतील तिकडेच त्या त्या धर्मांची मुले पाठविली जातील. अनाथगृहात कोणत्याहि विशेष धर्माचे शिक्षण दिले जाणार नाही. विल्किन्सन शिंदे व मी या तिघांच्याच हाती सर्व पत्रव्यवहार आहे. आहेत याहून अधिकहि सेक्रेटरी नेमण्यास हरकत नाही. केवळ मुरळ्यांचा हा प्रश्न नाही. सर्व मुलांकरिता हे गृह आहे. बळवंतरावांची कोणी तरी भलतीच समजूत करून दिली असावी असे वाटते.

### ( ५ ) डॉ. भालचंद्र यांचे केळकराना पत्र

मुंबई १८ सप्टेंबर १९०७

स्वदेशी परदेशी साखरेसंबंधाने विद्याधिकारी यांच्याशी माझा पत्रव्यवहार झाला त्याची प्रत त्यांजकडून मी मागविली आहे. मजजवळ मूळचे काही कागद नाहीत. पण स्मरणाने सारांश लिहीत आहे. माझे म्हणणे असे की हाडे ही वस्तु इतकी अपवित्र मानली जाते की त्याचा चुकून स्पर्श झाला तरी विटाळ झालासा वाटतो. अर्थात् खाण्याच्या एखाद्या पदार्थाशी संलग्न अशा रीतीने त्यांचा उल्लेख झाल्यास धार्मिक भावना दुखविल्या जाणार. निदान वनस्पत्याहारी हिंदूंच्या तरी दुखविल्या जाणार. म्हणून लहान मुलांच्या हाती जाणाऱ्या पुस्तकात साखरेत

हाडांचा कोळसा घालतात असले विधान नसावे. शिवाय हे विधान सर्वस्वी खरे आहे असे नाही. औद्योगिक परिषद व कलकत्ता येथील प्रदर्शन यापुढे असे सांगण्यात आले होते की प्रत्यक्ष उसापासून जी साखर तयार करतात तिच्या कामी हाडांचा कोळसा उपयोगात आणावा लागतोच असे नाही. तात्पर्य माझा मुद्दा इतकाच की हाडाच्या कोळशाविषयीचे विधान सर्वस्वी खरे नाही व ते असले तरी लहान मुलांच्या वाचण्यात ते यावेच असे नाही. निदान मी केले ते चांगल्या हेतूनेच केले. स्वदेशीच्या कार्याला विरोध करावा म्हणून केले नाही. लोकांचा बुद्धिभेद करावा असा यात हेतू नाही. पण स्वदेशीच्या समर्थनात जो युक्तिवाद करण्यात येतो तो सर्व यथान्याय असावा इतकीच माझी इच्छा.

### ( ६ ) वेडरबर्न यांचे टिळकांना पत्र

लंडन ४ डिसेंबर १९०७

काँग्रेसचे आम्ही फार जुने स्नेही व हितचिंतक आहो. तिच्या कारभारात आणीबाणीची वेळ येत चालली आहे. यंदा सुरतेस काय घडते हे पाहण्याकडे तिचे मित्र व शत्रू दोघेहि डोळे लावून बसले आहेत. या कठिण प्रसंगी एकमताने व धीरोदात्त वृत्तीने सर्व गोष्टी निकालात निघाल्या तर हिंदुस्थानाला स्वराज्य मिळावे असें म्हणणारे जे लोक इकडे आहेत त्यांना बळ येईल. या हेतूने आम्ही तिकडे एक जाहीर विनंतिपत्र धाडले आहे. तरी तुम्हाला ही खाजगी विनंति की तुम्ही सुरतेला हजर राहून प्रामाणिक मतभेदातून काही तरी सयुक्तिक तडजोड काढावी.

# भाग ६

## [सन १९०७]

## सुरतेची राष्ट्रीय सभा

सन १९०७ च्या डिसेंबर महिन्यात सुरतेस राष्ट्रीय सभा भरली ती त्या सभेच्या इतिहासातच नव्हे तर अखिल हिंदुस्थानच्या इतिहासातहि चिरस्मरणीय होऊन राहिली यात शंका नाही. तिला इतके महत्त्व येण्याचे कारण हेच की ती नेहमीच्या भाषेप्रमाणे 'भरली' असे न ह्मणता 'मोडली' असेच म्हणावे लागते. या सभेने नेमस्त व जहाल यातील दुही विकोपाला गेली. त्याचप्रमाणे त्या दोघांची राजकीय तत्त्वे खरी काय आहेत व त्यात सूक्ष्म भेद कोणता हे जगाला स्पष्टपणे कळून आले. या सभेने राष्ट्रीय विचाराला नवे वळण लावले आणि टिळकांचा पक्ष दिवसेदिवस कसा बळावत होता हे लोकनिदर्शनाला आणले. सुरतेची राष्ट्रीय सभा हे टिळक-भारतातील एक महापर्व होय.

या सभेला निरनिराळ्या प्रांतातून लोक निघाले तेव्हा त्याना सुरतेस काही तरी विशेष प्रकार घडणार असे खास वाटत होते. शकुनावर विश्वास ठेवणाऱ्या लोकानी शकुनवंती चाळूनहि पाहिली असेल. किंवा प्रवासाला निघताच प्रथम समोर कोण आले ते पाहून त्याचा अर्थ बसविला असेल. राष्ट्रीय सभेला जाणे म्हणजे केवळ देशपर्यटनाला किंवा एका विशेष निमित्ताने तीर्थयात्रा करण्याला जावयाचे अशी जी समजूत तोवर सामान्यपणे असे तशी ती यंदा नव्हती हे निश्चित. प्रत्येक पक्षाच्या लोकाना आपण काही तरी विशेष कार्य करावयाला जात आहो असे वाटत होते. सुरतेस युद्ध होणार असे सर्वांनाच वाटे. पण ते युद्ध नुसते तोंडाचे होणार की त्यात हातहि सामील होणार याची कल्पना निरनिराळ्या लोकानी आपापल्या स्वभावाप्रमाणे केली असेल. नेहमी चांगलेच मनात आणणाऱ्या लोकाना वाटले असेल की वादाचा फड उत्कृष्ट रंगेल आणि आयत्या वेळी बोलणाऱ्या वादभरी लोकांची चटकदार भाषणे ऐकावयास सापडतील. उलट मनात नेहमी वाईट येणाऱ्या लोकाना वाटे की सभा मोडेलच असे जरी नाही तरी थोरा मोठ्यांचा अपमान होऊन मारामारीपर्यंत मजल येईल. व्यवहारात चांगले मनात आणणारे व वाईट मनात आणणारे याना भविष्यवादी ठरण्याचा मान बहुधा निमेनिम वाटून मिळत असतो. सुरतेच्या भविष्यासंबंधाने त्या साली दुसऱ्या वर्गाला तो सर्व मान मिळाला. नेव्हिनसन यानी आपल्या पुस्तकात या सभेवर लिहिलेल्या प्रकरणाच्या प्रारंभी असे वर्णन केले आहे की "आम्ही राष्ट्रीय सभेला निघालो तो वाटभर गुलाबाची फुलेच आमच्या अंगावर पडत होती." पण नंतर सुरतेस काही लोकांच्या अंगावर जखमातून वाहिलेल्या रक्ताची फुले उमटली.

कोणत्याहि युद्धाला पूर्वेतिहास हा असतोच. मैदानात वावटळ ही एकदम उठलेली दिसते खरी. पण हे वातचक्र रचले जाण्यापूर्वी चारी बाजूनी विरोधी वारे कसे सुटत असतात हे कोणासच कळत नाही. आणि शेवटी वावटळीने धूळ पाला पाचोळा हवेत उडून गिरक्या खाऊ लागला म्हणजे मन म्हणते " हा काय चमत्कार ? क्षणापूर्वी काहीच दिसत नव्हते आणि हे वातचक्र एकदम कोठून उद्भवले ? " इतिहास घडत असतो तेव्हा त्याचे पर्यवसान काय होणार हे फार थोड्याना कळते. पुष्कळ असे असतात की त्याना समोर घडणाऱ्या गोष्टी देखील घडताहेत असे वाटत नाही !

असो. सुरतेस वावटळ उठविणाऱ्या विरोधी वाऱ्याच्या झुळका कोणीकडून कशा वाहात होत्या हे आता थोडक्यात पाहू. १९०६ साली कलकत्ता येथे राष्ट्रीय सभा झाली ती एका अर्थाने सुरतेइतकीच चिरस्मरणीय होय. या सभेचे अध्यक्ष महर्षि दादाभाई नौरोजी असून तेथे राष्ट्रीय राजकारणातील चतुःसूत्री प्रथम उच्चारण्यात आली. हे वाचकानी पूर्वीच्या एका प्रकरणात वाचलेच आहे. त्या पुढचे साल नेमस्त पक्षाने कलकत्त्यास झालेले ठराव उलथून पाडण्याच्या प्रयत्नात खर्चे केले असे म्हणण्यास हरकत नाही. त्या वेळच्या लोकमताचा आढावा घेतला तर सामान्यतः असे दिसून येते की एक सर फेरोजशहा मेथा व बरेचसे गोपाळराव गोखले यांच्याच मनात हे ठराव बदलून घेण्याचे होते. इतर कित्येकानाहि ते बदलून घ्यावेसे मनात वाटत असेल. पण काहीनी भलेपणाने मूकवृत्ति धरली. काहीना उघड बोलण्याला धैर्य नव्हते तर काहीनी राजकारणाचा नैसर्गिक प्रवाह लक्षात घेता झाली गोष्ट ही क्रमप्राप्तच होती असे म्हणून भवितव्याशी आपल्या मनाचा मेळ घातला होता. लाला हरकिसनलाल लाला लजपतराय हे कलकत्त्याचे ठराव होते तसेच सुरतेस मंजूर करावे या मताचे होते. आणि या वेळी पंजाबात हेच काय ते दोन खरे पुढारी असल्यामुळे पंजाब प्रांताचे मत काय होते हे दिसून येते.

गंगा यमुना प्रांतात पंडित नेहरू हे राजकारणात विशेष भाग घेत नव्हते. पंडित मदन मोहन मालवीय हेच काय ते त्या प्रांताचे खरे पुढारी असून त्याना चतुःसूत्रीपैकी स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षण हे विषय मान्य होते पण बहिष्काराचा ठराव फारसा मान्य नव्हता. तथापि तंटाबखेडा होण्यापेक्षा तोहि ठराव आहे तसाच राहिल्यास हरकत नाही असेच ते म्हणत. नागपूर प्रांतातले जुने पुढारी सुरतेस कोणी हजरच नव्हते. व जे होते ते चतुःसूत्रीला सर्वस्वी अनुकूल असल्याचेच जगजाहीर होते. किंबहुना या चतुःसूत्रीच्या जोरावरच नागपुरास नव्या राष्ट्रीय पक्षाची प्रतिष्ठापना झाली. मद्रासच्या पुढाऱ्यांपैकी नवी पिढी ठरावाना अनुकूल पण नव्यातले जुने कृष्णस्वामी अय्यर हे बहिष्कार वगैरेना प्रतिकूल होते. खुद्द बंगालची स्थिति अशी होती की अरविंद घोष अश्विनीकुमार दत्त मोतीलाल घोष हे तर ठरावाना अनुकूल होतेच पण भूपेंद्रनाथ बोससारखे नेमस्त पक्षपाती लोकहि ठरावाला विरोध करीत नव्हते. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी व चौधरी मंडळी यांचा

कल टिळकांपेक्षा मेथा गोखले यांजकडे अधिक. तथापि चतुःसूत्री बंगालच्या फाळणीच्या चळवळीतून उद्भवली होती आणि या चळवळीत बंगाल्यातील नेमस्त लोकहि जहालांकडे आधीच झुकलेले होते. अर्थात् चतुःसूत्री कायम राहणे हे बंगालच्या चळवळीला भूषणास्पद आणि चळवळ बंगाली लोकांच्या स्वाभिमानाला भूषणास्पद अशी सांखळी जोडली गेली असल्यामुळे चतुःसूत्री प्रत्यक्ष उलथून पाडण्याला मेथा याना बंगाली पुढाऱ्यानी फारसे सहाय्य केले असते असे वाटत नाही.

बंगालच्या राजकारणी क्षेत्रात प्रथमच अवतरलेले नवीन पुढारी म्हणजे डॉ. घोष. पण त्यांचाहि अवतार राष्ट्रीयत्वाच्या स्फूर्तीने झालेला असल्यामुळे, ते चतुःसूत्रीला विरुद्ध जातील असे नव्हते. आणि ते तर राष्ट्रीय सभेचे नियोजित अध्यक्ष. डॉ. घोष याना चतुःसूत्रीपैकी राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व इतके पटले होते की त्यानी त्या कार्याला लाखो रुपयांची देणगी दिली होती आणि अखिल हिंदुस्थानात राष्ट्रीय शिक्षणाचे जे महामंडळ बनले होते त्याचे ते उपाध्यक्ष होते.

राहाता राहिला मुंबईइलाखा. त्यात टिळकांचा पक्ष काय म्हणत होता हे प्रसिद्धच होते. नेमस्त पक्षातहि मऊ टणक असा फरक असल्याचे मेथा व गोखले यांच्या तुलनेने दर्शविलेच आहे. अर्थात् मेथा हे टणक व गोखले त्या मानाने मऊ. याचे कारण असे की तत्त्वतः स्वदेशीच्या बाबतीत गोखले हे मेथांच्या पुढे चार पावले केव्हाहि होते. " झीज सोसूनहि स्वदेशी व्रत आचरावे " हे शब्द गोखले याना स्वतःला फारसे अमान्य नव्हते तथापि मुंबईकर पुढाऱ्यांच्या भिडेमुळे त्याना ' झीज सोसूनहि ' या शब्दाना हरकत घ्यावीशी वाटे. स्वराज्याच्या ठरावासंबंधाने गोखले हे मेथा यांच्यापुढे जाण्याचे कारण गोखले हे व्यवहारवादी असताहि हिंदी राजकारणाला काही ध्येय असावे असे मानीत असत. पण फेरोजशहा मेथा असे मत प्रतिपादन करीत की वर्षातून एक वेळ जमून झाल्या गेल्या गोष्टीबद्दल काही पसंत म्हणून काही नापसंत म्हणून चार ठराव करावे याहून राष्ट्रीय सभेने अधिक भानगडीत पडू नये. बहिष्काराच्या बाबतीत गोखले हे वृत्तीने मेथा यांच्या इतकेच प्रतिकूल. परंतु सुदैवाने गोखले यांचा मुक्काम वरिष्ठ कौन्सिलच्या बैठकीकरिता प्रतिवर्षी कलकत्त्यास चार महिने पडे. आणि सुरेंद्रनाथ बानर्जी प्रभृतींनीहि चळवळीच्या जोरात बहिष्काराचा उघड अंगिकार व पुरस्कार केल्यामुळे काही भीड म्हणून काही संगतीचा गुण म्हणून गोखले याना बहिष्काराला कसून विरोध करता येणे शक्य नव्हते. पण बंगाल्याने हे बहिष्कारव्रत आपल्यापुरते ठेवावे आपल्याबरोबर इतर प्रांताना त्यात सामील होण्याला आव्हान करू नये एवढी खबरदारी ते घेत असत. असे केल्याने तुमचे साधले व आमचेहि साधले असा मेळ घालता येण्यासारखा होता. तात्पर्य, कलकत्त्याची चतुःसूत्री हाणून पाडण्याचा खरा आग्रह फेरोजशहा मेथा यांचा होता. फेरोजशहा याना स्वराज्य हे निश्चित ध्येय असे म्हणून मांडावयाला नको होते. 'राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय याची मला कल्पनाहि होत नाही असे म्हणणे मेथा याना स्वाभाविकच होते. कारण मुंबई युनिव्हर्सिटीत मेथा

हेच मुख्य पुढारी आणि तिला आज आलेली स्थिति आणून देण्याला पुष्कळसे हेच कारणीभूत. यामुळे तिच्यावर दोषारोपाचा शिंतोडा उडविणारे राष्ट्रीय शिक्षण त्याना कसे समजेल ? स्वदेशी त्यानी जन्मात कधीच अंगिकारली नाही. देशी उद्योग धंदे वाढावे हे त्याना मान्य. पण या मान्यतेमुळे देशी वस्तू वापरण्याची जबाबदारी पुढाऱ्यांवर येऊ शकते हे त्याना मान्य नाही ! परदेशी माल अधिक चांगला म्हणून तो सरसकट वापरण्याला पुढारी लोकाना मोकळीक असावी आणि आपले उद्योगधंदे नवे म्हणून त्यात निघालेला माल ओबड धोबड रांकट हलका आणि सामान्य जनता ही त्याच तोलाची अशा परस्पर मेळ असल्याने राष्ट्रीय सभेने स्वदेशीचा ठराव वाटेल तर करावा परंतु झीज सोसूनहि स्वदेशी व्रत अंगिकारावे या शब्दात ' झीज ' म्हणजे जशी पैशाची झीज तशीच अभिरूचीची आवडीची व वस्तुप्रेमाचीहि झीज येऊ शकते. म्हणून पुढाऱ्याना जाचक असे हे शब्द घालू नये असे त्यांचे म्हणणे होते. मग असे होते तर कलकत्त्यासच हे ठराव पूर्वी मंजूर कसे झाले ? मेथा हे कलकत्त्यास जातीने हजर होते आणि बंगाल्यातील पुढारीहि मेथा यानाच पुढारी मानीत. पण याचे उत्तर हेच की राष्ट्रीय पक्षाच्या स्फूर्तीने बंगाल्यातील पुढारी वर्ग अधिक सहृदय बनला होता. फाळणीच्या चळवळीच्या मुख्य क्षेत्रात राष्ट्रीय सभा भरली होती. आणि एखाद्या सर्वाधिकाऱ्याप्रमाणे अध्यक्षाचे काम मेथा हेच दादाभाई नौरोजी यांच्या करिता करीत असले तरी स्वतः दादाभाईनीच आपल्या भाषणात मी तरुण असतो तर बंड केले असते असे संतप्त निराशेचे उद्गार काढले होते. बंगाल्यातील राष्ट्रीय पक्षाचे कलकत्त्यास वजन आणि त्या पक्षाचे व टिळकांचे गोत्र एक यामुळे कलकत्त्याची सभा एकंदरीने राष्ट्रीय अशा भावनेनेच मारून गेली होती. यामुळे मेथा यांचे तेथे काही चालले नाही. तेथेहि त्यानी कसा विरोध केला हें पूर्वी सांगितलेच आहे. पण त्यामुळे मनात पेटलेला राग तसाच दाबून ठेवून ते मुंबईस परत आले आणि कलकत्त्याचा वचपा सुरतेस काढू अशी त्यानी मनाशी गाठ मारून ठेविली होती.

सुरतेस मुंबई प्रांतिक परिषद भरली तीत त्यानी मुळी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या गोष्टीचे ठराव पुढे आणूच दिले नाहीत. आणि पुढे त्या सालच्या राष्ट्रीय सभेची जागा नागपुराहून बदलून सुरतेस ठरविण्यात आली तेव्हा प्रांतिक परिषदेला मिळालेला जय राष्ट्रीय सभेत कायम ठेवू अशी मेथा याना सहजच खात्री वाटली. किंबहुना नागपूरची जागा रहित करण्याचे कारण मनातून हेच होते. प्रांतिक परिषदेला टिळक हजर नव्हते. पण ते हजर असते तरी कदाचित् मेथानी आपले म्हणणे अमलात आणले असते. पण टिळक हजर नसल्याचा फायदा घेऊन मेथा यानी प्रतिगामी धोरणाचे निशाण रोवले. तसाच या गोष्टीचा टिळकाना फार विषाद वाटला आणि तेव्हापासून पुढील राष्ट्रीय सभेतील वादाचे बीजारोपण झाले. प्रांतिक परिषदेतील प्रकार आणि नागपुराहून राष्ट्रीय सभेची उचलबांगडी यांच्या भरतीला आणखी एक भर पडली. ती अशी की हद्दपारीहून नुकतेच परत आलेले

लाला लजपतराय याना राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष करावे अशी चळवळ टिळकानी केली ती लाला लजपतराय यांच्याच भिडस्त स्वभावाने किंवा पक्षपाताने फसून डॉ. रासबिहारी घोष यांचीच अध्यक्षाचे जागेवर निवड झाली. सुरतेची स्वागतसभा मेथा यांच्या अनुयायानी काठोकाठ भरलेली. त्यामुळे मेथा यांचे सहजच साधले.

वर एके ठिकाणी दर्शविल्याप्रमाणे डॉ. घोष हे चतु:सूत्रीला सर्वस्वी प्रतिकूल नव्हते. तथापि लाला लजपतराय नुकतेच तुरुंगातून आल्यामुळे मनातून जळणारे आणि प्रसंग पडला म्हणजे स्वत:च्या खऱ्या मतापेक्षाहि तेजस्वी वृत्तीने जहाल जाणारे असल्यामुळे त्यांचे अध्यक्षपद टिळकाना अधिक लाभदायक झाले असते यात शंका नाही. डॉ. घोष याना 'तुम्ही माघार घ्या' अशी विनंति करणाऱ्या शेकडो तारा गेल्या पण त्यानी माघार घेतली नाही. उलट तुम्ही माघार घेऊ नका अशा तारा लजपतराय याना गेल्या असता मेथा व गोखले यांच्या भिडेखातर त्यानी मात्र माघार घेतली. लजपतराय यांच्या निवडणुकीने त्याना हद्दपार करणाऱ्या सरकाराचा आपोआपच निषेध झाला असता. पण गोखले यानी याहि रीतीने असे सांगितले की सरकारचा असा धिक्कार करून कसे चालणार? ते आपल्या चळवळीच्या गळयाला नख लावून ती एका क्षणात नामशेष करून टाकतील.

सुरतेची सभा होण्याच्या आधी एक महिनाभर सभेपुढे येणाऱ्या ठरावांचा मसुदा करण्याचे काम स्वागतसभेने गोखले यांजकडे दिले होते. पण कोणत्याहि प्रकारचा मसुदा ता. २६ डिसेंबर रोजी दुपारी अडीच वाजेपर्यंत म्हणजे सभेचे काम प्रत्यक्ष सुरू होईपर्यंत प्रसिद्ध करण्यात आला नाही. पूर्वी दहा दिवस सभेपुढे येणाऱ्या विषयांची म्हणून एक यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. पण त्यात स्वराज्य बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे विषय अजीबात गाळले होते!

लाला लजपतराय हे हद्दपारी भोगून परत आलेले. त्यांच्यावर कोणताच गुन्हा शाबीत झाला नव्हता. अशा मनुष्याचा सत्कार करण्याने त्याचा सन्मान होण्यापेक्षा सरकारचा निषेध अधिक व्यक्त केला जातो. पण लजपतराय हे सुरत राष्ट्रीय सभेच्या आधी दोन आठवडे मुंबईस आले तेव्हा मुंबईच्या पुढाऱ्यानी किंवा प्रेसिडेन्सी असोसिएशनने त्यांचा सत्कार केला नाही. एवढेच नव्हे तर ते आले त्या वेळी स्टेशनवर या पक्षातील एकहि मनुष्य हजर नव्हता. उलट मुंबईच्या नॅशनल यूनियन सभेने त्यांचा सर्व प्रकारे सत्कार केला. आणि ते मुंबईस असेतोपर्यंत त्यांचा पाहुणचारहि त्यानी आपणाकडेच घेतला होता. लालाजींच्या सत्काराकरिता टिळक स्वतः स्टेशनवर हजर होते. सर फेरोजशहा मेथा हे लालाजीपेक्षा वयाने मोठे म्हणून स्टेशनवर न आले तरी त्याना आपला एकादा खास मनुष्य पाठविण्यास हरकत नव्हती. पण ज्या लालाजीना भीड घालून राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष तुम्ही होऊ नका म्हणून मुंबईच्या नेमस्तानी खटपट केली व विनवण्या केल्या, त्यांच्या हद्दपारीनंतरच्या मुंबईच्या पहिल्या भेटीत त्यांचा सत्कार करण्याला नेमस्त पुढारी अजिबात विसरले हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. स्वागत सभेने अध्यक्ष निवडण्याची वेळ नोव्हेंबर अखेर

आली तेव्हा न जाणो लालाजी हे नुकतेच सुटून आलेले म्हणून त्यानाच अध्यक्ष निवडले जाईल तरी ही गोष्ट घडून येऊ देऊ नये याकरिता गोखले हे स्वतः सुरतेस निघून गेले. व मेथा यांचे निरोप सांगून व स्वतःचे वजन खर्च करून त्यानी रास-बिहारी घोष यांची निवडणूक करविली. आणि राष्ट्रीय सभेपुढे ठराव कोणते ठेवावयाचे कोणते ठेवावयाचे नाहीत याचा निर्णय करण्याचा अधिकार स्वागतसभेकडून काढून त्याचे मुखत्यारपत्र आपले हाती घेतले. वास्तविक कोणतीहि नियोजित स्वागतसभा ठरावांचा मसुदा तयार करीत असते. परंतु येथे हा विशेष प्रकार घडून आल्यामुळे एकदम चहूकडे चर्चा सुरू झाली. कलकत्याचे ठराव सुरतेस बदलून घेणार किंवा निदान पुढे तरी येऊ देणार नाही असा मुंबईकर नेमस्तांचा बेत असल्याची जी वदंता पूर्वी होती तिला रंग चढला. सुरत हे ठिकाण टिळकांच्या हल्लयाला कठीण असे समजूनच राष्ट्रीय सभेकरिता नक्की करण्यात आले होते. त्यामुळे टिळकानाहि आपल्या बलाची परीक्षा पाहण्याकरिता विशेष प्रकाराने झटावे लागले. नेमस्तपक्षाने दिवाण बहादूर अंबालाल साकरलाल देसाई व अली महमद भिमजी या दोघाना आपल्या तर्फे व्याख्याने देण्याकरिता सुरतेस आधी पाठविले होते. हे दोन गृहस्थ पसंत करण्याचे कारण असे की यापूर्वी ते राष्ट्रीय वृत्तीचे म्हणून प्रसिद्ध होते. अंबालाल देसाई हे गुजराथेतील एक वजनदार पुढारी व अली महमद भिमजी हे प्रसिद्ध मुसलमान वक्ते ! राष्ट्रीय सभा झाली आणि तीत अली महमद भिमजी यांचे भाषण झाले नाही असे सहसा व्हावयाचे नाही. हे कोकणी मुसलमान असून मराठी चांगले बोलत व इंग्रजीहि बरे बोलत. पण धीटपणा व एक प्रकारचे वक्तृत्व त्यांचे अंगी असल्यामुळे ते सभापीठावर बोलण्याला उभे राहिले म्हणजे सगळया पीठभर हिंडून धिंगाणा घालीत. राष्ट्रीय वृत्तीचा पुढारी राष्ट्रीय पक्षाला विरोध करण्याला तोंडी दिला म्हणजे गोळीने गोळी टिपून निघाली असे मेथापक्षाने मानले.

## (१) युद्धाची पूर्वतयारी

इकडे टिळकांची तयारीहि काही कमी नव्हती. त्यानी सुरत येथे राष्ट्रीय पक्षाचा तळ आधी एक आठवडाभर देण्याचे ठरवून या तळावर दादासाहेब खापर्डे यांची योजना केली. याचे कारण असे की खापर्डे हे विद्यार्थी दशेत मुंबईस पुष्कळ वर्षे असल्याकारणाने गुजराथी फार चांगले बोलत. अर्थात् सुरत येथील गुजराथी समाजाचे मन वळवावयाचे तर गुजराथी वक्ता बरा या विचाराने दादा-साहेब खापर्डे याना नेमण्यात आले होते. त्यांच्या ठिकाणी सभाधीटपणाचे वक्तृत्व विनोद प्रसादयुक्त वाणी व हजरजबाबीपणा या गोष्टी अली महमद भिमजी यांच्यापेक्षाहि अधिक होत्या. आणि अंबालाल साकरलाल हे त्या बाबतीत त्यांच्या पासंगालाहि पुरण्यासारखे नव्हते. नेहमीच्या व्यवस्थेप्रमाणे दक्षिणी पुढारी कॅम्पातच राहावयाचे. परंतु यंदा राष्ट्रीय पक्षाचा असा वेगळा तळ दिल्याकारणाने तेथे दक्षि-

णीच काय पण बंगाल वगैरे इतर प्रांतातील या पक्षाचे प्रतिनिधि येऊन उतरण्याला सोय झाली होती. आणि परप्रांतातील प्रतिनिधींनी याचा फायदा घेतलाहि. रोज संध्याकाळी शहरातील एका मोठ्या मैदानात बालाजीचे टेकडीवर जाहीर सभा भरे आणि तेथे खापर्डे हे आपल्या वक्तृत्वाने व विनोदाने गुजराथी श्रोतृवृन्दाला भारून टाकीत असत.

स्वतः टिळक हे तारिख २३ रोजी सुरतेस जाऊन पोहोचले. प्रत्येक मोठ्या पुढाऱ्याचे स्वागत करणे हे स्वागतसभेचे एक काम असता टिळकांच्या स्वागताची तयारी स्वागतसभेने कोणत्याहि प्रकारे केली नव्हती. ते कलमच त्यांच्या कार्यक्रमात नव्हते. पण सुरतेस जो राष्ट्रीय पक्षाचा लहानसा गट होता त्याने ही सगळी उणीव भरून काढली होती. टिळक सकाळी स्टेशनवर उतरताच तेथे हजारो लोकांची गर्दी जमलेली असून शहरातील मुख्य रस्ते शृंगारले गेले होते. खाजगी घोडेस्वारांचे एक पथक पुढे वाट काढीत आहे अशा थाटाने टिळकांची मिरवणूक निघाली. त्याच दिवशी संध्याकाळी त्यांचे व्याख्यान झाले. श्रोतृसमाज चार पाच हजार होता. टिळकानी आपल्या भाषणात मुख्य मुद्दा हा सांगितला की 'मला राष्ट्रीय सभेत फूट पाडावयाची नाही तंटा करावयाचा नाही. फूट होण्याचे काय कारण ? किंवा ही सभा सोडून देऊन दुसरी सभा स्थापण्याने तरी कोणाला काय लाभ ? पण कलकत्त्यास झालेल्या ठरावाची पिछेहाट आपण शक्य तोवर करू देणार नाही हा आपला निश्चय आहे. नवीन पक्षाचा झेंडा उभारला असला तरी तो राष्ट्रीय सभेला विघात करण्याकरता नाही तर सरकारविरुद्ध होणाऱ्या चळवळीस खंबीरपणा आणण्याकरताच. ज्यांच्या हाती राष्ट्रीय सभेची सूत्रे त्यानी कलकत्त्याचे ठराव बुडविण्याचा आपला मनोदय व्यक्त केला होता. तरी ही अनिष्ट गोष्ट घडू नये याकरिता सुरतेच्या लोकानी मला मदत द्यावी.'

दुसऱ्या दिवशीच्या व्याख्यानाला पहिल्याहून अधिक गर्दी जमली. या दिवशी कोणी एकाने निनावी हस्तपत्रक काढून शहरात वाटले त्यात टिळकानी केसरीमध्ये गुजराथी समाजाची बदनामी केली असे लिहिले होते. त्याला उद्देशून टिळकानी असे आव्हान केले की 'हा गुन्हा माझ्या पदरात तरी घालावा किंवा लिहिणारानी माझी माफी तरी मागावी.' तारीख २४ रोजी नव्या म्हणजे राष्ट्रीय पक्षाची परिषद भरली. सुमारे ४०० प्रतिनिधी जमले होते. अध्यक्षस्थानी बाबू अरविंद घोष यांची योजना झाल्यावर टिळकानी नव्या पक्षाची मते समजून सांगितली. अरविंद बाबूनी नवा पक्ष कशाकरिता उत्पन्न झाला व त्याचे पुढील कार्य कोणते याविषयी खुलासा केला. ही एका विशिष्ट पक्षाची परिषद नसून त्याच पक्षात अखेर सर्व पक्षाचे लोक सामील व्हावयाचे आहेत असेच त्यानी सांगितले. परिषदेने पुढील कामाकरिता अधिकारी नेमले. राष्ट्रीय सभेत मते घेण्याची वेळ आली असता कोणी काय करावे कसे वागावे अध्यक्षाच्या निवडणुकीच्या वेळी काय व्यवस्था ठेवावी हे सर्व करण्याचे काम या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले. दुसरे दिवशी हे प्रतिनिधी व अधिकारी

यांची एक खाजगी सभा झाली. मनुष्य पाहून पाहून आत सोडले. कारण भर सभेत काय सूचना करावयाच्या कोणी करावयाच्या याचा निर्णय व्हावयाचा होता तो जाहीर रीतीने करता येत नव्हता. जमलेल्या प्रत्येक प्रांतातील पुढाऱ्यानी आप-आपले विचार सांगावे असे निमंत्रण देण्यात आले. वादाच्या मुद्यावर आगाऊ समेट झाला तर बराच. आणि कलकत्याचे ठराव निदान आहेत तसे राहू देतो ते पुढे आणून बदलीत नाही असे प्रतिपक्षाने मान्य केल्यास समेट करावा असेच ठरले. आणि हा समेट घडवून आणण्याकरिता दर प्रांताचा एक प्रतिनिधी निवडून लहानसे मंडळ निवडण्यात आले.

२४ तारखेला सकाळीच लाला लजपतराय हे सुरतेस पोचले. त्यांचे अध्यक्ष-पद एका रीतीने सुरतकरानी काढून घेतले होते. पण त्याचा वचपा भरून निघेल इतक्या थाटाचे त्यांचे स्वागत सुरतकरानी केले. स्वागताच्या बाबतीत सुरतकरानी एक नवीच परंपरा पाडल्यासारखे घडले. कारण सर्वात कमी स्वागत राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांचे झाले. त्याहून फेरोजशहा मेहता यांच्या स्वागताचा थाट अधिक दिसला. आणि त्याहून टिळक व लजपतराय यांच्या स्वागताचा. लाला लजपतराय यांच्या गाडीचे घोडे सोडून स्वयंसेवकानी ती रस्त्यातून ओढीत नेली. सर्व वाटभर लाला लजपतराय हे अंगावर हाराचे ओझे घेऊन हात जोडून गाडीत उभे राहून चालले होते. अन्यायाच्या कैदेबद्दल लजपतरायांचा सत्कार आणि सरकारचा निषेध करावा ही जी राष्ट्रीय पक्षाची मागणी ती सुरतकरानी तडीस नेली.

राष्ट्रीय सभेच्या पूर्वी दोन दिवस कधी नाही इतकी हालचाल कॅम्पातून दृष्टीस पडली आणि खुद्द फेरोजशहा मेहता देखील हालू लागले होते असे म्हटले म्हणजे यातच सर्व काही आले. नेमस्तांच्या सभा कोठेतरी खाजगी घरात होत. पण राष्ट्रीय पक्षाचा मतप्रसार मोठमोठ्या अड्डयावर तळावर होत असे. प्रतिनिधि रहाण्याकरिता कॅम्प केलेले होते तेथे एक प्रकारे पाठशिवीचा खेळ सुरू होता. एका पक्षाच्या मनुष्याने युक्तिवाद करून जावे. हे कळताच दुसऱ्याने मागाहून जाऊन तो युक्तिवाद खोडून काढावा की लगेच तिसऱ्याने जाऊन प्रतिक्रिया करावी असे सुरू होते. बहुधा प्रत्येक राष्ट्रीय सभेत स्मरण ठेवण्यासारखा एखाद्या मद्रासी किंवा आंध्र प्रतिनिधीचा तऱ्हेवाईकपणा डोकावीत असतोच. या साली रामस्वामी नावाचा एक गृहस्थ परिषदेस आला होता. त्याचे भाषण म्हणजे शुद्ध वाऱ्याची वावटळ. कोणत्याहि लघुलेखकाने त्याचे पुढे हात टेकले असते. अर्धनग्न हिंडण्याचे दिवस अद्यापि आले नव्हते. तथापि रामस्वामी याचे अंगात निम्या गुंड्या सोडलेला असा एक कोट असून पंचेवजा धोतर नेसूचे होते. आणि डोक्यावर आच्छादन नसल्या-मुळे टक्कल पडलेल्या डोक्याचा फार मोठा तुळतुळीत भाग प्रेक्षकांच्या कुतूहलाचा विषय होऊन राहिला होता. हे टकले शिलेदार रात्रंदिवस कॅम्पातून हस्तपत्रके वाटीत हिंडत असत आणि झोपलेल्यानाहि जागे करीत. गुरुवारी राष्ट्रीय सभेस सुरवात व्हावयाची होती. आणि तावुताना अखेरपर्यंत कागद चिटकवितात त्या-

प्रमाणे समेटाची कंटाळवाणी बोलणी बोलण्याची आम्हा लोकाना बेसुमार सवय असल्यामुळे, सभा मंडपात भरू लागली तरी समेटाची बोलणी सुरू आहेत अशा बातम्या वरचेवर येत. यामुळे लोकांची उत्सुकता फारच वाढली. एका क्षणी समेट होतो अशी बातमी यावी. तो फिसकटला अशी बातमी पुढच्या क्षणाला यावी. आणि फिरून एकादा महत्त्वाचा मनुष्य इकडून तिकडे व तिकडून इकडे गेलेला दिसला म्हणजे फिरून समेट होणार अशी आशा वाटू लागावी.

## ( २ ) मंडपातील हकीकत

एक गोष्ट मात्र निश्चित होती. अध्यक्षाच्या निवडणुकीची सूचना पुढे येईपर्यंत जर समेट झाल्याचे कोणी अधिकारी पुरुषाने जाहीर केले नाही तर अध्यक्षाच्या निवडणुकीची उपसूचना मांडावयाची. सभेला सुरवात बारा वाजता व्हावयाची होती, पण एक सिंधी प्रतिनिधी अकस्मात् वारल्यामुळे सभा अडीच वाजेपर्यंत पुढे ढकलण्यात आली. कोणी म्हणाले शकून अशुभ झाला. कोणी म्हणाले अशुभ तोच शुभ. कारण समेटाला तास दोन तास अधिक मिळाले. आदले दिवशी मुंबईच्या एका प्रसिद्ध मोत्याच्या व्यापाऱ्याने आत्महत्या केल्याची बातमी सकाळी सुरतेस आली होती. त्यामुळेहि सुरतेच्या लोकांच्या उदासीनतेत भर पडली होती. अडीच वाजता सभागृहातील प्रत्येक कानाकोपरा देखील भरून गेला होता. फक्त सिंधी वगैरे काही प्रतिनिधींना नेमून दिलेल्या जागेत थोडी पातळाई होती. सभागृहातील वातावरण अगदी धुंद झाले होते. ठरलेल्या क्रमाने बडे लोक व अधिकारी येऊ लागताच कोणाला टाळ्या कोणाला हशहुश कोणाला वंदेमातरम् कोणाला हशा अशा रीतीने ज्याचा त्याचा सत्कार झाला. कोणी कोणाची बाकी ठेविली नाही. टाळ्या अधिक की धिक्काराचे उद्गार अधिक हे काही कोणी मोजीत नव्हता. पण कोणते अधिक कोणते कमी हे संशयात राहिले नाही.

स्वागताध्यक्ष मालवी यांचे भाषण लांबलचक झाले. पण ते सर्वांनी शांतपणाने ऐकून घेतले. पसंतीचा नापसंतीचा एकादा उद्गार ऐकू येई. पण पुढे डॉ. घोष यानी अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी सूचना आणण्याकरिता दिवाण बहादूर अंबालाल देसाई हे उभे राहिले त्या क्षणी सभेची सगळी शांतता ढासळली व वादळाला प्रारंभ झाला. अंबालाल यांचे भाषण कसे तरी पार पडले. पण त्यामागून बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी बोलावयाला उठले तेव्हा ओरडा ओरड सुरू झाली. पण ती घोष यांच्या गुणदोषापेक्षा स्वतः सुरेंद्रनाथ यांच्या गुणदोषासंबंधाचीच होती. एका रीतीने सुरेंद्रनाथ बाबूसारख्या पुढाऱ्याला इतके हशहुश व्हावे आणि त्याना बोलू न देण्यापर्यंत पाळी यावी याचे सकृद्दर्शनी आश्चर्य वाटण्यासारखे आहे. पण थोडया दिवसापूर्वी त्यानी मिदनापूर प्रकरणात लोकाना अप्रिय होण्यासारखे जे अविचाराचे वर्तन केले त्याकरिता त्याना हा तडाका बसला. कारण ह्या निषेधपर उद्गारात बंगालच्या प्रतिनिधींनीच पुढारी-

पण घेतले होते. पण ही गोष्ट सर्वसंमत नसल्याने पुढाऱ्यानी हा प्रकार थांबविण्याचा प्रयत्न केला. सुरेंद्रनाथ बाबू टेबलावर उभे राहून बोलत होते. त्यानी आपला मोठ्यात मोठा आवाज काढला होता. आणि कधी नव्हे ते हातवारे चालविले होते. लोकानी गप्प बसावे म्हणून स्वागताध्यक्ष मालवी हे हातात घंटा घेऊन एक सारखी वाजवीत होते. ती इतकी सतत की एखादा परकी मनुष्य ही सभा पाहण्याला प्रथम आला असता तर त्याला असे वाटले असते की वक्त्याच्या भाषणाबरोबर एक घंटाहि वाजत असावी असा हिंदुस्थानात प्रघात आहे! रस्त्यातील कोणीहि फेरीवाला मालवी यांच्याहून कमी जोराने घंटा वाजवित असेल. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. मालवी ओरडून म्हणाले सुरेंद्रबाबूंचे भाषण ऐकून घेतलेच पाहिजे. लोक जणू काय म्हणाले " ठीक आहे. सुरेंद्रनाथ बानर्जी यांचे भाषण एरवी न ऐकेल असा कोण पापी! त्यांचे भाषण ऐकायला मिळावे म्हणून लोक मजला मारून जात असतात. पण आजचा प्रसंगच वेगळा. " हे इतके शब्द अर्थात् कोणी बोलून दाखविले नाहीत. पण मालवी यांच्या सूचनेची अवज्ञाच तेथे दिसून आली. शिवाय ओरडणाराला ओरडू नको म्हणून सांगणे हे देखील ओरडूनच सांगावे लागते. अर्थात् क्रिया व प्रतिक्रिया दोन्हीहि ओरडण्याच्या स्वरूपाच्या असल्यामुळे नुसत्या गोंगाटाशिवाय काही निष्पन्न झाले नाही. बंगाल्यातील नेमस्त लोक देखील ओरडू लागले म्हणजे जहालाहून काही कमी ओरडत नाहीत.

एक ओरडला असे पाहून दुसरा ओरडला असेच झाले असेल. पण ओरडले त्यात पुष्कळांची मनातली कारणे निरनिराळी होती. दहा मिनिटे हा घोटाळा झाल्यावर स्वागताध्यक्ष मालवी यानी जवळच्या चार लोकांचा सल्ला घेऊन आजची सभा तहकूब करावी असे ठरविले आणि तसे जाहीर करण्यात आले. कोणी म्हणाले सभा लांबणीवर टाकण्याचे कारण नाही. आम्ही येथेच बसून राहणार! आणि हे बैठक मारून बसलेले लोक काँग्रेसची सभा पुढे चालू झाल्याचा बहाणा करतील तर त्याना विरोध करावा म्हणून दुसरे काही लोक जागा सोडून हलेनात. आणि या दोघांची गम्मत व्हावी म्हणून तिसरे काही काही जाता जाता मंडपात उभेच राहिले. मंडप मोकळा झाल्यावर ज्याला त्याला वाटू लागले की विनाकारण आपला दिवस फुकट गेला.

सुरेंद्रबाबूना लोकानी बोलू दिले नाही ही गोष्ट पुष्कळांच्या मनाला लागून राहिलीशी दिसली. पण त्याना असेच वाटले की कदाचित् सभा कायमची मोडण्याला ही रात्र आडवी झाली असे तरी का म्हणू नये? परस्पर विरोधी पक्षांचे दहा पाच पुढारी एके ठिकाणी जमून त्या रात्री विचार करते तर त्या रात्रीचा हा मानीव उपयोग खराहि ठरता. त्यातल्या ' त्यात राष्ट्रीय पक्षाने निरनिराळ्या कॅम्पावर नव्या पक्षाच्या अधिकाऱ्यांच्या सह्यानी चिठ्या पाठवून कळविले की झाला प्रकार हा फार अनुचित झाला. तथापि तसेच पुन्हा न व्हावे सुरेंद्र बाबूना बोलू द्यावे आणि दुसरा कोणी ओरडला तरी

आपण ओरडू नये अशी सूचना देण्यात आली. नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यानी आपल्या लोकानी गप्प राहावे म्हणून त्यानाहि अशाच सूचना पाठविल्या. ओरडण्याची आरोळी दोन्ही पक्षाकडून झाली हे ह्यावरून सिद्ध झाले. तसेच चुकीची दुरुस्ती व्हावी अशी कळकळ दोन्ही पक्षाना वाटत होती. पण मुख्य समेटासंबंधाने मिळालेली फुरसत उपयोगी न पडता तिचा थोडा दुरुपयोगच झाला. कारण नेमस्त पक्षाने मनाशी असे ठरविले की एवीतेवी राष्ट्रीय सभेत दुफळी होणार आणि सभा मोडणार मग दुफळी पुरी तरी होऊ द्यावी. म्हणजे असल्या त्रासदायक लोकापासून कायमचे फुटून निघण्याला सबळ कारण मिळेल. इकडे राष्ट्रीय पक्षानेहि ठरविले की वाघ म्हटले तरी खातो वाघोबा म्हटले तरी खातो. अध्यक्षाच्या निवडणुकीला अडथळा केला तरी हे समेट करीत नाहीत आणि दंडेलीने कलकत्त्याच्या ठरावाची पिछेहाट करू पाहतात मग विरोधाला तरी प्रारंभ मूळपासूनच का करू नये?

समेटासंबंधाने एक गोष्ट लक्षात ठेवण्याची की टिळक पक्षाचे लोक समेट होण्याकरिता स्वतः इतर लोक मध्यस्तीला घालून मदत करीत होते. लाला लजपतराय यांसारख्या पाहुणे लोकानी खटपट करून पाहिली. तसेच प्रोफेसर गजर डॉ. चुनीलाल सरय्या वगैरे स्थानिक परिचयाच्या व फेरोजशहा मेथा यांच्या स्नेहातील मंडळीनी खटपट करून पाहिली. परंतु समेटाच्या सूचनाना नेमस्त पक्ष मुळीच थारा देईना. इतकेच नव्हे तर कोणी या विशिष्ट कार्याकरिता आपणाकडे आला आहे असे कळले तर त्याशी समेटाचे अप्रिय संभाषण टाळावे म्हणून त्याची गाठ घेणे टाळीत. एखादा त्यातील बोलला तर इतकेच मोघम बोले की कलकत्त्याच्या ठरावातील काही ठराव पुन्हा मंजूर करून घेऊ पण त्यात थोडथोडा फरक करू. पण कोणते शब्द फिरविले जाणार याची नक्की बातमी त्यानी कोणाला दिली नाही. स्वतः टिळकानी गुरुवारचे दिवसा २॥ वाजेपर्यंत खटपट करून पाहिली आणि स्वागताध्यक्ष मालवी यांची गांठ घेण्याचा प्रयत्न केला. पण आपण संध्येत गुंतलो आहो असा त्यानी टिळकाना निरोप पाठविला! स्वागत सभेने मुक्रर केलेल्या ठरावाची एक छापिल प्रत चुकून मिळाली. पण पहावे तो तीत समेटाचे धोरण काहीच नव्हते. स्वतः टिळकानी डॉ. घोष यांच्या निवडणुकीच्या सूचनेला विरोध करण्याचे ठरविले. मात्र प्रत्यक्ष विरोध न करता तहकुबीची सूचना आणावयाची आणि या सूचनेत समेटाची तोड काढण्याकरिता कमिटी नेमण्याविषयी सूचना करावयाची ही योजना टिळकानी मालवींना लिहून कळविली. शिवाय पुन्हा उत्तराकरिता मनुष्य पाठविला. तरी जबाब मिळाला नाही.

त्या एका रात्रीच्या अवधीत टिळकाविरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध करण्याकरिता सुरतेच्या पुढाऱ्यानी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. जातिद्वेषाचा आरोप हा फार सोपा आरोप असतो. तो कोणी कोणावर केल्यास चट्दिशी विश्वास बसतो. 'टिळकानी गुजराथी लोकाना नावे ठेविली' या एका मुद्याच्या आधारावर टिळकांच्या द्वेषाचे पीक एका रात्रीत पिकून उभे राहिले. एक निनावी हस्तपत्रक गुजराथीत लिहून

वाटले गेले. त्याचा आशय असा होता—" सुरतचे गुजराथी नागरिक हो! उठा जागे व्हा कर्तव्य बजावण्याची वेळ आली आहे. तुमच्या तोंडाला टिळकानी काळे फासले ते धुवून काढा. त्यानी आपल्या वर्तमानपत्रातून तुम्हाला जी शेलकी निंदाव्यंजक विशेषणे लावली ती ' धी गुजराथी ' या वर्तमानपत्राने हुडकून काढून चव्हाट्यावर आणली आहेत. त्याला टिळकाना उत्तर देता आले नाही. आणि बालाजीच्या मैदानात मारे भाषण करून ' मी गुजराथी लोकांची निंदा केली नाही ' असे टिळकानी प्रतिपादिले. आणि मला मदत करा असा उलटा केविलपणाचा आव आणून तुमची प्रार्थना केली! ही केवळ तुमची फसवणूक होय. त्यानी भाषणात असेहि सांगितले की मी राष्ट्रीय सभा मोडायला काही सुरतेस आलो नाही. पण टिळकांच्या पक्षाने कालच्या सभेत कसे तुफान केले हे तुम्ही पाहिलेच. आज पुन्हा सभा आहे तेव्हा तुम्ही काय करणार? टिळक पक्षाचे तुफान न होईल अशीच व्यवस्था करणार की टिळकानी आपल्या पत्रात सुरती लोकाना नेभळट नपुंसक म्हटले तेच खरे असे जगाला दाखविणार? पूर्वी शिवाजी दोन वेळा येऊन सुरत लुटून गेला तेव्हा तो म्हणूनच गेला की आणखी एकदा येऊन सुरत लुटून जाईन. त्याप्रमाणे काही शिवाजी पुन्हा स्वतः येऊ शकला नाही. पण आज टिळक येऊन तुमचे नाक कान कापून घेऊन जात आहे तरी उठा जागे व्हा."

शुक्रवार सकाळपासून स्वागत सभेने हिंदु खलाशी व मुसलमानी गुंड जमवून मंडपात ठिकठिकाणी बसवून दिले होते. स्वयंसेवकापैकी फक्त काहीना सभेच्या आवारात घेतले व काही टिळक पक्षपाती अशा संशयावरून त्याना मना केले. गुजराथी लोक सभेला आले त्यानी हातात काठ्या आणल्या होत्या आणि पोलिसाना कळवून ठेवण्याचीहि व्यवस्था झाली होती.

दोनप्रहरी एक वाजेपर्यंत मंडप सगळा भरला. आदल्या दिवसाच्या पुढे कामाला सुरवात झाली. सुरेंद्रबाबूनी आपले भाषण पुरे केले. झाल्या गोष्टी सर्वांनी विसरून जाव्या अशी त्यानी विनंति केली. त्यांच्या भाषणास एका शब्दानेहि कोणी अडथळा केला नाही. यानंतर अध्यक्षांच्या सूचनेला अनुमोदन मिळून ती सभेपुढे मंजुरीला ठेवण्याची वेळ आली म्हणून आगाऊ कळवून ठेवलेली उपसूचना सभेपुढे मांडण्याकरिता टिळक सभापीठावर चढू लागले. स्वयंसेवकानी त्याना वर जाण्याला हरकत केली. तरी त्याना निवारून टिळक पायऱ्या चढून वर गेले व सभेकडे तोंड करून त्यानी बोलण्यास प्रारंभ केला. इतक्यात जणू काही टिळक वर आलेच नाहीत किंवा बोलत नाहीत अशा बहाण्याने ठराव मंजूर झाला असे गृहीत धरून डॉ. घोष हे उठले व म्हणाले ' माझ्या निवडणुकीचा ठराव मंजूर झाला आहे! मी अध्यक्ष आहे ' असे म्हणून खिशातील छापील भाषण काढून ते वाचण्यास सुरवात करणार तो टिळक म्हणाले " तुमची निवडणुक झालेली नाही. त्या सुचनेला उपसूचना आणण्याकरिताच मी वर आलो होतो. " झाले! ' होय होय ' ' नाही नाही ' ' बरोबर आहे ' ' चूक आहे ' ' बसा '

'चालू द्या' 'बसा ह्मणणार तुह्मी कोण' 'बेशरम' अशा आवाजानी मंडप दुमदुमून गेला. सभामंडपाच्या डाव्या अंगाला स्वागत मंडळाचे सभासद बसले होते. त्यातून टिळकांचे नाव घेऊन गुजराथीतून शिव्या दिलेल्या ऐकू येऊ लागल्या. कोणी म्हणाले 'टिळक तुम्ही सभापीठावरून खाली उतरा.' टिळक ह्मणाले 'मला उतरा म्हणून सांगणारे तुम्ही कोण? या कामी मी अध्यक्षांचेहि ऐकणार नाही. छाती असेल तर मला उचलून खाली ठेवा!' वैकुंठ देसाई ( अंबालाल साकरलाल यांचे चिरंजीव ) यानी टिळकावर फेकण्याकरिता एक खुर्ची उचलली व दुसरे कित्येक टिळकांचे अंगावर हात टाकण्यास पुढे झाले. अशा रीतीने टिळक हे संकटात सापडल्याचे पाहून त्यांची मित्रमंडळी खाली बसली होती ती उठून त्यांच्या संरक्षणाकरिता सभापीठावर चढून जाऊ लागली. इतक्यात कोणी तरी एक जोडा वर फेकला. मेथा सुरेंद्रबाबू व टिळक हे जवळ जवळच होते. त्यापैकी मेथा व सुरेंद्रबाबू याना तो ओझरता लागून टेबलावर पडला. सभापीठाच्या पायऱ्याजवळ व नंतर मंडपाच्या पूर्वेकडील भागात मारामारी सुरू झाली. खुर्च्या उचलून फेकण्यात येऊ लागल्या व काठीहि चालू झाली. थोडया वेळात नेमस्त पक्षाची सर्व मंडळी मागल्या दाराने निघून गेली व टिळक आणि त्यांची मंडळी याशिवाय सभापीठावर दुसरे कोणी उरले नाही. इतक्यात मागील बाजूचा कठडा मोडला. गुंड व खलाशी जाग्यावरून उठून पुढे घुसले. पोलीसहि आत आले व त्यानी दक्षिणी लोक सभापीठाकडे चालून जात होते त्याना थांबवून काहीना हाताने धरले व बाकीच्याना मंडपाबाहेर घालविले. हायकोर्ट वकील कट्टी विजापूरचे कौजलगी नागपूरचे वकील गोखले कोल्हापूरचे देशपांडे पुण्याचे घारपुरे वगैरे मंडळीना काही वेळ अटक होऊन सोडून देण्यात आले. कौजलगी व पुण्याचे एक गृहस्थ देशपांडे याना लहानशा जखमा होऊन त्यातून रक्त येत होते. पण फार मोठी मारामारी होण्यापूर्वीच पोलीस मध्ये पडून त्यानी मंडप ताबडतोब मोकळा केला यामुळे याहून विशेष घडले नाही. पोलिस अधिकारी डेप्युटी सुपरिंटेंडंट शिरगावकर यानी कोणाचाच पक्षपात न धरता व सभ्यपणाने वागून फक्त मंडप मोकळा होईल अशी व्यवस्था केली. बाहेर मैदानात गटागटाने मंडळी उभी राहून चर्चा सुरू झाली. त्यातहि आवेशाचे भांडणाचे शब्द मधून मधून ऐकू येत पण कोणी कोणावर हात उगारला नाही आणि लवकरच हीहि गर्दी मोडली. रस्तोरस्ती परत जाणारे लोक झाल्या गोष्टीबद्दल बोलत होते. कोठे कोठे सभा मोडल्याबद्दल टिळकाना व कोणी मेथाना नावे ठेवलेली ऐकू येत. 'झाले ते एकंदरीने वाईट झाले मग दोष कोणाचाहि असो.' हे मात्र जो तो म्हणत होता.

## ( ३ ) पक्षकारांच्या कैफियती

झाल्या प्रकाराबद्दल स्वागतमंडळातर्फे 'खरी हकीगत' म्हणून प्रसिद्ध झाली. तीत अर्थात् टिळकपक्षालाच सर्व दोष दिला होता. तीत खालील मजकूर होता.

" टिळकपक्षाने दंगा करण्याचे पूर्वीपासूनच योजिले होते. डॉ. घोष यांची अध्यक्ष म्हणून योजना आधीच झाली होती. म्हणून टिळकाना उपसूचना आणताच येत नव्हती. अध्यक्ष व त्यांच्या बरोबरचे लोक मंडपात शिरताना एका स्वयंसेवकाने पेन्सिलीने लिहिलेली टिळकांच्या सहीची एक चिठी मालवी यांच्या हाती दिली. तीत राष्ट्रीय सभेचे कामच काही वेळ तहकूब करावे अशी उपसूचना होती. पण तसे करणे अध्यक्षाना योग्य वाटले नाही. सुरेंद्रबाबूनंतर पंडित नेहरू यानी ठरावाला संमति दिल्यावर ठराव मताला घातला. पुष्कळसे लोक होय होय म्हणाले. काही थोडे लोक नाही नाही म्हणाले म्हणून मालवीनी अध्यक्षाचा ठराव मंजूर झाला असे जाहीर केले. नंतर डॉ. घोष बोलू लागले तेव्हा टिळक वर येऊन उपसूचना मांडू लागले. आणि परवानगी देत नाही असे डॉ. घोष म्हणाल्यावर अध्यक्षाविरुद्ध मी सर्व सभासदाकडे अपील करतो मी बोलणारच असे टिळक म्हणाले. पण या पूर्वीच आरडाओरडीला सुरवात झाली होती. तुमची तक्रार मी कागदोपत्री नमूद करतो तेवढ्याने तुमचे समाधान व्हावे असे अध्यक्ष टिळकाना म्हणाले. पण मी बोलणारच असे म्हणून टिळकानी अध्यक्षांचा हुकूम मोडल्यावरच त्यांच्याविरुद्ध प्रतिक्रिया सुरू झाली. काही लोक अध्यक्षाना बोलू देईनात. काही टिळकाना बोलू देईनात. टिळकांचे अनुयायी आधीच वर चढून येत होते व हातातील काठ्या परजीत होते व इतर त्याना प्रतिबंध करीत होते. टिळकांचा हटवादीपणा पाहून त्याना उचलून खाली ठेवण्याची परवानगी द्या असे काही स्वयंसेवक म्हणाले पण असे करू नका असे त्याना सांगण्यात आले. शेवटी गोंधळ मोडणे शक्य नाही असे पाहून सभा बरखास्त केल्याचे अध्यक्षानी ओरडून सांगितले. व काही पुढारी लोक आणि मंडपातील स्त्रिया याना संभाळून बाहेर काढून दिल्यावर पोलीस आत येऊन त्यानी मंडपाचा ताबा घेतला."

हे एका पक्षाचे म्हणणे झाले. त्याला ताबडतोब दुसऱ्या पक्षाने उत्तर प्रसिद्ध केले. त्यात बराच पूर्ववृत्तांत दिलेला असून मंडपातील हकीगतीसंबंधाने असे लिहिले होते की " कलकत्त्याच्या ठरावाची पीछेहाट करीत नाही असे आश्वासन द्याल तर टिळक आपली उपसूचना मांडणार नाहीत असे उलट आश्वासन देण्यात आले होते. या कामी लजपतराय यानी मध्यस्थी केली. स्वतः टिळक खापर्डे अरविंद घोष मोतीलाल घोष वगैरे मंडळी सुरेंद्रबाबूना जाऊन समक्ष भेटली. मध्यस्थाचे म्हणणे त्याना बरेचसे पटून त्यानी मालवीना बोलाविण्याकरिता मनुष्य धाडला पण मालवी यानी तेव्हा व त्यानंतरहि कोणाचीच गांठ पडू दिली नाही. समेटाचे प्रयत्न अशा रीतीने निष्फळ झाल्यामुळे टिळकाना उपसूचना मांडावी लागली. सभेत तेराशेहून अधिक प्रतिनिधी होते. त्यातील सहाशे नव्या पक्षाचे होते. नेमस्तांचे बहुमत असलेच तर फारच थोडे होते. डॉ. रूदरफोर्ड यानीहि मध्यस्थीची खटपट केली ती फुकट गेली. नंतरच टिळकानी उपसूचनेची नोटिसवजा चिठी पाठविली. चिठीला काहीतरी उत्तर द्या म्हणून फिरून केळकरानी चिठ्या पाठविल्या. परंतु उत्तरच

येईना. मालवीना उपसूचना गैरशिस्त आहे असे वाटले असते तर त्यानी उठून तसे जाहीर करावयास पाहिजे होते. पण तसे काही न करता घोष व मालवी म्हणाले की टिळकांचा हात धरून त्याना खाली बसवा. स्वागत मंडळाचे एक चिटणीस (गुलाबचंद गांधी) यानी टिळकांच्या अंगाला हातहि लावला. गोखले यानी तुम्ही टिळकांच्या अंगाला हात लावूं नका असे सांगितले पण इतर कित्येक लोक धावून येण्याच्या बेतात होते असे दिसले. जोडा आला तो टिळकानाहि लागण्याचा संभव होता इतके ते व मेथा वगैरे जवळ जवळ होते. मंडपातून टिळकानाच संभाळून बाहेर न्यावे लागले कारण टिळकांविरूद्ध लोकाना चेतविणारी हस्तपत्रके मंडपाबाहेर वाटली जात होती."

अशा रीतीने राष्ट्रीय सभा मोडली. ती पुन्हा जोडली जावी असे राष्ट्रीय पक्षाला वाटत होते. पण झाल्या फुटीचा फायदा घेऊन नेमस्तांचा सवता सुभा स्थापावा म्हणजे पाठीची ही राष्ट्रीय पक्षाची ब्याद कायमची टळेल असे मेथा प्रभृति लोकांचे ठरले होते. सभा मोडली तरी दोन्ही पक्षाचे पुढारी सुरतेतच राहिले होते. कारण दोघानाहि आपला असा काही कार्यक्रम पुढे करावयाचा होता. मोतिलाल घोष मैत्र चतर्जी हराकिसनलाल हे ता. २७ च्या रात्री टिळकांच्या भेटीला गेले. व पुन्हा आपण कॉंग्रेस भरवू या असे म्हणू लागले. त्याना टिळकानी रात्री आपल्या स्नेही मंडळीना विचारून दुसरे दिवशी असे लेखी उत्तर पाठविले की " आमची मंडळी तयार आहे. आम्ही डॉ. घोष याना अध्यक्ष म्हणून मान्य करितो. व झाल्या गेल्या गोष्टी विसरून जाऊ. पण आमची अट अशी आहे की कलकत्याची चतुःसूत्री ठरावाच्या रूपाने पुनः प्रस्थापित व्हावी. आणि दुसरी अट अशी की नव्या पक्षाची निंदा करणारे असे डॉ. घोष यांच्या भाषणातील शब्द काढून टाकण्यात यावे." या अटीचे कारण असे की ता. २६ च्या कलकत्याच्या वर्तमानपत्रात डॉ घोष यांचे भाषण झाले म्हणून छापले होते. पुढे घडणाऱ्या गोष्टी घडणारच असे समजून त्या प्रत्यक्ष घडल्याची बातमी आम्हाला कळली अशा बहाण्याने वर्तमानपत्राना अनेक वेळा महत्वाचा मजकूर आगाऊ छापून ठेवावा लागतो. पण आपली ठेव अशा रीतीने चोरू पाहणाऱ्या संपादक महाशयाची फजिती भवितव्यता ही कित्येक वेळा अशी मासलेवाईक उडविते की बघतच रहावे. तोच प्रकार डॉ. घोष यांच्या भाषणाचा झाला. ते छापील भाषण सुरतेस मंडळी असताच त्याना वाचावयाला सापडले म्हणून टिळकांच्या पत्रात ही दुसरी अट घालण्यात आली.

राष्ट्रीय पक्षाने राष्ट्रीय सभेचे पुनरुज्जीवन करण्याविषयी केलेले सर्व प्रयत्न धुडकावून नेमस्त पुढाऱ्यानी कन्व्हेन्शन या नावाने एक स्वतंत्र सभा भरविण्याचे ठरविले. टिळकपक्ष वगळावयाचा तर राष्ट्रीय सभा हे नांव घेता येत नव्हते. पण राष्ट्रीय सभेचे नाव कायमचे सोडावे असेहि त्याना वाटत नव्हते. अर्थात् कन्व्हेन्शन म्हणजे आज सांकेतिक निमंत्रित लोकांची सभा आणि उद्या टिळकपक्ष त्यातून निघून गेला म्हणजे मग तीच कदाचित राष्ट्रीय सभा असा बेत होता.

सुरतेच्या राष्ट्रीय सभेला काही युरोपिअन लोक हजर होते. त्यापैकी रूदरफोर्ड हे पार्लमेंटचे सभासद असून नेव्हिनसन हे वर्तमानपत्राचे एक सुप्रसिद्ध बातमीदार होते. या दोघा गृहस्थानी सुरतेच्या सभेची वर्णने मागाहून प्रसिद्ध केली. त्यात सामान्यतः तिऱ्हाईताच्या दृष्टीने काय दिसले हे आढळते.

## ( ४ ) नेव्हिनसन यांची साक्ष

सुरतेस नेव्हिनसन आले ते कलकत्त्याहून डॉ. रासबिहारी घोष वगैरे मंडळी बरोबर आले. त्यांची उतरण्याची व्यवस्था सुरतेस स्वतंत्र केली होती. तथापि नेमस्त पक्षातील लोकांची व त्यांची वरचेवर गाठ पडे तशी टिळक पक्षातील लोकांची पडत नसे. म्हणून त्यानी दिलेल्या सुरत काँग्रेसच्या वर्णनात टिळकांची बाजू त्याना विशेष कळत नव्हती असे दिसते. कळली तर गोखल्यांचीच बाजू त्याना विशेष कळे. तथापि त्यातल्यात्यात निःपक्षपात बुद्धि ठेऊन त्यानी आपल्या पुस्तकात या सभेचे वर्णन केले आहे. त्यातील काही थोडा भाग खाली देत आहो.

" आम्ही ख्रिस्तमसच्या दिवशी सुरतेला पोहोंचलो. गर्दी इतकी होती की, आगगाडीतून खाली उतरायलाच बराच वेळ लागला. कानावर ' वंदे मातरम् ' हे शब्द व अंगावर गुलाबपाणी यांचा नुसता वर्षाव सुरू होता. 'जय जय' अशा शब्दांचा आवाजहि दुमदुमे. पण त्याच्या पलिकडे मृत्यूचा खोल गंभीर आवाजहि अंतरंगातून ऐकू येई. कारण त्या पहाटेस डाकाचे कलेक्टर मिस्टर ॲलन यांच्यावर कोणी गोळी घातली आणि ते जखमी होऊन आसन्नमरण होऊन पडले होते अशी बातमी आम्ही ऐकली. या बातमीने नेमस्त लोकांच्या मनावर फार परिणाम झाला. फिलिप्स पार्कमध्ये खुनाची बातमी ऐकून पार्नेल वगैरे आयरिश होमरूलर लोकांच्या मनाला जसा धक्का बसला तसाच ही बातमी ऐकून हिंदी. नेमस्तांच्या मनाला बसला. हिंदुस्थानचे गोरे राज्यकर्ते तर हजारो मैलावर! त्यांचे मन वळवून काही राजकीय सुधारणा मिळावयाच्या आणि असे खून होऊ लागले तर हे सगळेच काम बिघडेल ! या विचाराने आगगाडीतील सर्व नेमस्त मंडळी उदास होऊन बसली होती. त्यांच्या तोंडातून एक शब्दहि निघत नव्हता. टिळक पक्षाची मंडळी वेगळा तळ देऊन उतरली होती. जिकडे तिकडे कलकत्त्याचे ठराव हाणून पाडण्याच्या गोष्टी लोक बोलत होते. कित्येक म्हणत की ठराव इतके बदलले आहेत की त्यांची तोंडओळख देखील राहिली नाही. आणि हे सर्व गोखल्यानी केले. नेमस्तांचा हा डाव आम्ही चालू देणार नाही असे राष्ट्रीय पक्षाचे लोक म्हणू लागले.

" सगळे वातावरण शंका कुशंका अविश्वास यानी भरून गेले होते. नागपुराहून सुरतेस काँग्रेस आणली कारण सुरत हा मेथा यांचा बाले किल्ला. येथूनच संशयाला प्रारंभ झाला. काही लोक म्हणत फेरोजशाहा मेथा झाले म्हणून काय झाले ? म्हणावे तुमचे काय वक्तृत्व असेल ते मुंबईस दाखवा. जुना काळ आता संपला. आता सरकारशी झगडण्याची साधने व शस्त्रे वेगळी काढली पाहिजेत.

लॉर्ड रिपन चांगले होते कबूल. पण आता त्याचे काय?" अशा लोकांची सहानुभूति भाकण्याची वेळ आता राहिली नाही. तिच्यापासून उपयोगच नाही. बंगालची फाळणी होईपर्यंत ही मायावी भाषा खरी वाटली. पण अलिकडे सर्व गोष्टी व्यर्थ झाल्या. नेमस्त लोक चांगले असतील पण त्याचे दिवस आता संपले. तिसरे प्रहरी लजपतराय यानी मध्यस्थीची खटपट केली. पाच इकडचे पाच तिकडचे पुढारी घेऊन वाटाघाट करावी असे त्यानी सुचविले. पण गोखले अध्यक्षाच्या सत्काराच्या गर्दीत म्हणाले "१६०० प्रतिनिधींच्या तर्फे बोलणारी पाच माणसे मी कोण देणार? नेहमीप्रमाणे विषयनियामक मंडळ भरू द्या. त्यात या गोष्टी काढू किंवा निघतीलच. नेहमीची रीत सोडण्यात काय अर्थ?" रास बिहारी घोष यांची मिरवणूक थाटाची निघाली. पण निशाणे पताका मेळे जयघोष यांच्या गर्दीतून अविश्वास डोकावत होता आणि मृत्यूहि दुरून भय दाखवित होता.

"त्या रात्री फारच थोड्या लोकाना निद्रा मिळाली. एकमेकाविषयी भीति आणि काय होणार याची अनिश्चितता यामुळे या घरातून त्या घरात या तंबुतून त्या तंबूत पुढारी जात येत चर्चा करीत कुजबुजत वाद घालीत. उजाडले तरी या स्थितीत फरक पडला नाही. टिळक अरविंद घोष दादासाहेब खापर्डे हे बाबू सुरेंद्रनाथ याना जाऊन भेटले. मोतीलाल घोष हेहि त्यांच्याबरोबर होते. ते तह घडवून आणण्याकरिता म्हणून गेले होते. पण मला वाटते की साळूच्या अंगावर जितकी पिसे असतात तितक्या मोतीलाल घोष यांच्या मनात आढ्या व बोलण्यात खोचा असतात! मी मनात म्हणालो हे गृहस्थ तह कसा घडवून आणणार? कलकत्याचे ठराव कायम ठेवावे व लाला लजपतराय याना अध्यक्ष न निवडल्याबद्दल गुप्त खेदप्रदर्शक असे भलेपणाचे दोन शब्द बोलावेत म्हणजे आम्ही अध्यक्षाच्या निवडणुकीला हरकत घेणार नाही अशी टिळकांची सूचना होती. सुरेंद्रनाथ मोठे वक्ते! पण डॉ. घोष यानी अध्यक्षस्थान स्वीकारावे असे सुचवित असता लजपतराय निवडले गेले नाहीत हे वाईट झाले असे ध्वनित करावे आणि तेहि इतक्या खुबीने की कोणालाहि लागू नये इतके कौशल्य सुरेंद्र बाबूंच्या तरी अंगात कोठले! त्यानी स्वतःपुरती ही सूचना मान्य केली. पण गोखले व मालवी यानाहि जाऊन भेटा असे सुचविले. हे लोक गोखल्याना जाऊन भेटले नाहीत आणि मालवीनी त्यांची भेट घेतली नाही.

"दोनप्रहरी सभा भरली. मंडपात दहा हजार लोक असतील. १६०० प्रतिनिधीपैकी ५०० जहाल पक्षाचे होते. मंडपावर ऊन तापत होते आणि थोडे आतहि येत होते. पण हे इतके लोक तासान तास बसून वाद घालीत भांडत तंडत हे पाहून त्यांच्या सहनशीलतेचे कौतुक वाटले. गोरा मनुष्य कोणी येताना दिसला की कोणी 'वंदे मातरम्' म्हणावे कोणी 'शेम' म्हणावे असे सुरू होते. ब्रिटिश राज्याची लूण मग ती कसलीहि असो लोकाना पाहवत नव्हती. अध्यक्ष आणि त्यांची प्रभावळ आत आली. मालवी यांचे भाषण झाले. त्यात मोगल मराठे फ्रेंचाच्या बखारी शिवाजी राष्ट्रीय सभा तिचा जय अपजय सगळ्या गोष्टी होत्या

पण त्या जुन्या होत्या. लोक मनात म्हणाले 'असतील ! जुने झाले गेले मेले संपले. जे काय आहे ते भविष्याच्या पोटात ! कृपा करा आणि त्याबद्दल काही बोलाना.' भाषणात नेमस्तपणा हा चुकून शब्द येताच चहूकडे खोल आवाजाने खळबळ सुरू झाली. दिवाण बहादूर अंबालाल यांच्या मागून सुरेंद्र बाबू बोलावयाला उठले. पण दहा शब्द बोलले नसतील इतक्यात वीज चमकून गेल्याबरोबर मेघांचा कडकडाट सुरू होतो तसा कल्होळ सुरू झाला. आणि एक शब्दहि ऐकू येईना. हातातल्या काठ्या छत्र्या व त्या नसल्या तर नुसते हात फिरवीत उजव्या बाजूचे लोक उभे राहिले व ओरडू लागले. हे लोक नागपूरचे प्रतिनिधी होते. कोणी म्हणे नागपूरची आठवण करा कोणी ह्मणे मिदनापूरची आठवण करा. कारण मिदनापुरास पोलिस सुपरिंटेंडंटला साहाय्य करून सुरेंद्र बाबूंनी दंगा थांबविण्याचा प्रयत्न केला होता. मद्रासचे पांढरे रुमाल यातच सामील झाले. एवढा सुरेंद्र बाबूंचा आवाज पण तोहि लोपून गेला. पुढारी मोठमोठ्यानी उद्गारू लागले. डॉ. घोष रागावले अस्वस्थ झाले व कर्कश आवाजाने बोलू लागले. गोखले चिंतामग्न व उद्विग्न होते. समेटाची व्यर्थ खटपट व रात्रीचे जाग्रण यामुळे ते ग्रासले होते. कोणी ह्मणे राष्ट्रीय सभेचा अपमान झाला. कोणी ह्मणे बंगालचा अपमान झाला. मालवी यानी सुस्कारा टाकीत सभा बरखास्त केली. २२ वर्षे भरणारी राष्ट्रीय सभा तासाच्या आत भंगली. जो तो आपापल्या ठिकाणी आश्चर्यभरित होऊन पाहू लागला. खोडकर मुलाने अपघात करावा आणि आईबाप चिंताग्रस्त किंबहुना अश्रू ढाळीत बसलेली पाहून मग आश्चर्य वाटून भिऊन तोंड मिटून गप बसावे तसे जाहले. लोक गप बसले. बोलण्याच्या अत्याचाराची काही बाकी उरली नाही. सुदैवाने मारामारी झाली नाही. अजून समेट व्हावा, होईल, असे शांत वृत्तीच्या सभ्य लोकाना वाटत होते.

"टिळकांचे दुय्यम केळकर याच्याशी मी बोललो. ते ह्मणाले "गडबड झाली ही अगदी अभावित कोणालाहि तिची कल्पना नव्हती. घोष यांच्या निवडणुकीला हरकत घ्यावयाचे आम्ही ठरविले होते हे खरे. पण असा गोंधळ करून नव्हे आणि त्यातून समेटाच्या चळवळीला नेमस्त लोकांचे उत्तर वेळेवर येते तर इतकाहि गोंधळ झाला नसता." तेथून मी टिळकाच्या छावणीत गेलो. अंगावरील कपडे उतरून ते बसले होते. त्यांचा एक प्रकारे विजय झाला होता. पण तो विजय ह्मणावा की नाही याची शंका होती. केळकराप्रमाणे टिळकानीहि मला सांगितले "नेमस्तानी आपले उत्तर फार उशीरा दिले त्याचा हा परिणाम !" ते मला म्हणाले "गोखल्याकडून मला आताच ठराव मिळाले ! ! आणि किरकोळ दुरुस्त्या केल्या त्या काढून मूळचे कलकत्याचे ठराव तसेच ठेवले असते ह्मणजे माझे समाधान होते. पण उशीर झाल्यामुळे लोकांची खातरजमा करता आली नाही किंवा असे करा तसे करू नका असे सांगून त्याना वेळेवर गपहि बसविता आले नाही." ठरावांची ही अडचण कितपत अपरिहार्य होती हे सांगणे कठीण आहे. किंवा कोणी जीव तोडून शांततेविषयी आपला हेतू व्यक्त केला असता तरी एकदा मागलेली ही

अडचण कशी निघून गेली असती हेच सांगणे कठीण. केवळ छापखानेवाल्याच्या चुकानी टिळकाना ठरावाचा मसुदा वेळेवर मिळाला नाही असे गोखले मला म्हणाले, पण आणखी असेहि म्हणाले की ठरावात काही शाब्दिक फरक केले होते. हे खरे. पण ते केवळ अर्थ स्पष्ट करण्याकरिता. पुढे विषयनियामक मंडळ त्याचा विचार करणारच होते. पण या मंडळापर्यंत मजल आलीच नाही. किंबहुना ते फार थोड्यांच्या विचारात आले असेल. काही फरक वास्तविक न म्हणण्यासारखेच होते. काहीबद्दल गोखल्यांचा खुलासा तयार होता. राष्ट्रीय सभेत फूट पडावी इतक्या महत्त्वाचे त्यात काहीच नव्हते. पण बहिष्काराच्या ठरावात केलेला फेरबदल महत्त्वाचा होता यात शंका नाही. त्या लहानशा फरकातच नेमस्त व जहाल यांच्या फरकातील सगळे फरक आले होते. बहिष्काराचा अर्थ परदेशी मालाचा बहिष्कार असा न करता 'बहिष्कार योग' असा केला म्हणजे राष्ट्रीय सभेचे आजपर्यंतचे आद्य तत्त्व नष्ट झाले जहालांच्या हाती सभा गेली असे होणार होते. इंग्रज लोक व इंग्रजी सरकार यांची क्षिती न बाळगता कॉंग्रेस चालवावयाची तर बुडालेली काय वाईट ? ती बुडाल्याने एकादी नवीन संस्था तरी निर्माण होईल.

"मतभेदाला इतकी जागा असल्यावर समेट कसा होणार ? ठरावातील ह्या फरकाने एकीच्या काळजालाच हात घातला होता. संध्याकाळी व रात्री समेटची वाटाघाट पुन्हा चालली. निरनिराळ्या कँपातून परस्परांचे वकिल तहाची बोलणी करण्याला जाऊ येऊ लागले. टिळक गोखले एके ठिकाणी भेटते सुरेंद्र बाबूसारखा त्यांच्याशी बसून मध्यस्ती करता तर काय बहार झाली असती ! पण व्यर्थ. फिरून त्या रात्रीहि कोणाला झोप लागली नाही. चकमकीने तुसडेपणात व चिरडखोरपणात भर पडली. राष्ट्रीय सभा मोडली तर आपली बेअब्रू होईल असे सर्वांनाच वाटले. फिरून सभा भरली. डॉ. घोष यानी छापील भाषण बरोबर आणले. पण त्यांत जहाल लोकांवरील हल्ले न काढता तसेच शिल्लक होते. टिळकाना प्लॅटफार्मवरील जागा राखून ठेवली होती. पण ते खाली पुढच्या रांकेतच बसले. अध्यक्षाची मिरवणूक आत येत असता टिळकानी एका मुलाबरोबर मालवी याना चिठी पाठविली त्यांत तहकुबीची सूचना होती. तिचा अर्थ विधायक सूचना करण्याचा होता असे टिळकानी मला सांगितले. पण राष्ट्रीय सभा तहकूब करावी असा तिचा अर्थ मी समजलो असे मालवी यांनी मला सांगितले. अर्थाबद्दल वाद पुष्कळ झाला. सुरेंद्रनाथ बोलले ते दुर्दैवाच्या भोवऱ्यात सापडलेल्या एकाद्या महानुभाव धूर्त गृहस्थाप्रमाणे. बसता उठता त्याना कोणीहि टाळी वाजविली नाही. मागून मोतीलाल नेहरू बोलले. हे अलाहाबादचे श्रीमंत बॅरिस्टर, सन्मान्य, मोठे सावध. उदारपणाशिवाय बाकी सर्व सद्‌गुणात मोठे नेमस्त. दहा पांचच वाक्ये बोलून ते खाली बसले. राखेच्या ढिगावर चालल्याप्रमाणे जो तो आपल्याकडून कसा अगदी जपून वागत होता.

"मालवी यानी अध्यक्षाचे नाव सुचविले ते सर्वांना स्पष्ट ऐकू आले. पण सूचना मंजूर झाल्याचे ते बोलले त्या वेळी निरनिराळ्या प्रकारे आरडा ओरडा होत

होता. डॉ. घोष हे खुर्चीवरून उठून दुसऱ्या खुर्चीवर बसले आणि आभार प्रदर्शनाचें वाक्य त्यानी उच्चारले. पण त्यांच्या भाषणाचे ते शेवटचे वाक्य.

आभाळात काळे ढग येऊन वीज कडाडावी आणि वादळ व्हावें त्याप्रमाणे टिळक थेट समोरून येऊन अध्यक्षाच्या खुर्चीपुढे उभे राहिले. ते तक्रार करीत होते निषेध करीत होते हरकत सांगत होते. पण हे सर्व काम त्यांच्या शांत व निश्चयी स्वभावाप्रमाणे सुरू होते. त्यांचा तो आवाज ऐकून वाटे की हा मनुष्य भवितव्यतेलाहि तुच्छ मानीत आहे. मालवी म्हणाले 'तुम्हाला तहकुबीची सूचना आणता येत नाही." टिळक म्हणाले 'तुम्ही कोण ! तुम्ही काही अध्यक्ष नाही.' यावर डॉ. घोष म्हणाले 'मीहि तुम्हाला तेच सांगतो.' त्यावर टिळक म्हणाले 'तुमची निवडणूकच मुळी झालेली नाही. मी प्रतिनिधीना उद्देशून बोलत आहे.' या पुढचे भाषण आरडाओरडीत कोणाला ऐकूच आले नाही. टिळक छातीवर हात आडवे घेऊन उभे होते. दोन्ही बाजूला नेमस्तपक्षातील तरुण लोक पायावर खडे उभे राहिले. आणि थांबा आता ह्याचा सूड काढूं असे म्हटल्याप्रमाणे ते हातवारे करीत होते ! त्यांच्या मुठी वळलेल्या होत्या. आणि वर तोंडे करून ते किंकाळत होते. सभापीठाच्या खाली टिळकाना ढकलून द्या असेहि कोणी ओरडत होते. टिळकांच्या पाठीमागे डॉ० घोष टेबलावर चढले. कर्कश व गलबलल्याच्या आवाजाने ते निषेधपर शब्द बोलत होते. पण वादळात ऐकू कोणाला जाणार ! ते घंटा वाजवीत पण ती वाजविलेली दिसे मात्र ! गोखल्यांचा स्वभाव शांत. ते शांत व्हा शांत व्हा म्हणून नेमस्तांचा राग आवरीत होते. आणि दोन्ही हात पसरून टिळकांचा बचाव करण्याकरिता त्यांच्याजवळ जाऊन उभे राहिले. पण टिळकाना कोणाच्या संरक्षणाची गरज किंवा परवा नव्हती. त्यांचे ते छातीवर दुमडलेले हात आणि बिनदिक्कत मुद्रा पाहून वाटे की हा मनुष्य अत्याचाराला व रक्तपात याला आव्हान करून म्हणतो 'ये तुला माझे डोके बिके मारायचे ते मार पाहू. येरव्ही काय कोणी वाटेल ते केले वाटेल ते दिले कोणी स्वर्ग कोणी नरक आणून पुढे केला तरी मी पाऊलहि हलवणार नाही.'

पांढरा सफेद पोषाख केलेला समोरचा श्रोतृवृंद एकाद्या भरतीच्या समुद्राप्रमाणे गर्जत होता. इतक्यात हवेत एक जोडा उडाला व तो सुरेंद्रबाबूंच्या गालाला चाटून पडला. त्याचे कातडे तांबूस. टोक अणकुचीदार. आणि तळाला नाल मारलेले होते. तो पाहताच इशारा मिळाल्याप्रमाणे पांढऱ्या फेट्याचे लोक लाटेप्रमाणे एकामागून एक प्लॅटफॉर्मवर चढले. ते लांब काठ्या परजीत होते. तोंडानी रागाचे फूत्कार टाकीत होते. आणि दिसेल त्या नेमस्तावर काठ्या उगारीत होते. झाले. राष्ट्रीय सभा एका क्षणात समाप्त झाली. हिरवे कापड लावलेल्या टेबलावर उभे राहिलेल्या एका माणसाच्या पायांच्या फटीतून राष्ट्रीय सभा नाशाच्या कर्दमात हळू हळू रुतून बुडलेली मी पाहिली. बातमीच्या लढाईत कवि गटे हजर होता. ती संपताच तो म्हणाला

" आज खरोखर एका नव्या मनूचा उदय झाला आणि माझे सुदैव हे की मी तो आपल्या डोळ्यानी पाहिला." हिंदुस्थानासंबंधाने मला देखील हेच शब्द म्हणता येण्यासारखे होते. मोठी गर्दी माजली. शत्रु मित्र ओळखता येईना. नेमस्त कोणचा जहाल कोणचा हे कोणी कसे ओळखावे ? मुखचर्येवरून काय कळले ते खरे. मी खुर्चीवर उभा राहून देखावा पाहात होतो. पंजाबच्या एका जवानाने दुसऱ्याचा फेटा काठीने पाडला. ते पाहताच काठी मारणारा धर्मयुद्धवृत्तीने थांबला आणि फेटा बांधून झाल्यावर पुन्हा त्यांचे भांडण जुंपले. युद्धात मल्लपणा व दिलदारी दिसून आली. इतक्यात ३० पोलीस जवान आत आले. एवढ्या समाजाला देखील ते पुरे होते. एका तासात मंडप मोकळा झाला. आणि मेजवानी होऊन गेल्यावर देखावा दिसावा त्याप्रमाणे मोडक्या खुर्च्या चिंध्या जिकडे तिकडे दिसू लागल्या.

" पण तहाचे प्रयत्न करणाराची शाबासकी खरी. फिरून त्या रात्री तसे प्रयत्न सुरू झाले ! पण मनात अविश्वास इतका खोल रुतला होता की सर्व व्यर्थ झाले. जुन्या संशयाच्या ठिकाणी एक नवाच संशय उभा राहिला. दुसरे दिवशी दोनशे पोलीस येऊन त्यानी मंडप ताब्यात घेतला. कारण मंडपात सभा भरण्याने भांडण पुन्हा न जुंपेल कशावरून ! या मंडपात पुढे ९०० नेमस्तांची सभा भरली. पोलिसांच्या गराड्यात आपण सुरक्षित आहो या विचारानेच त्याना खेद होत होता आणि काळजी वाटत होती. प्रतिज्ञालेख तयार केला होता त्यावर आत येणारांच्या सह्या घेतल्या. डॉ. घोष अध्यक्ष होते. गोखल्यानी दुरुस्त केलेले ठराव मंजूर झाले आणि पुढील कार्या-करिता एक मंडळ नेमण्यात आले. पण सर्वात ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट ही की लाला लजपतराय हे सभापीठावर विराजमान झाले असून मी जुन्या राष्ट्रीय सभे-च्या निशाणाखाली उभा राहणार असे त्यानी सांगितले. हा एक मनुष्य त्या वेळी एक हजार मनुष्यांच्या किंमतीचा वाटला. संध्याकाळी जहालानी आपली सभा भरविली. आणि पुढच्या कार्याकरिता म्हणून त्यानीहि पण आपले एक मंडळ नेमले.

" सभा खासगी वाड्यात भरली होती. जमलेले लोक तटस्थ होते. अरविंद घोष अध्यक्ष होते. त्यांच्या मनाने् यत्किंचित्‌हि तळमळ केली नाही. ते सभेकडे न पाहता दूर कोठे तरी भविष्यकाळाच्या द्वारातून कशाचे तरी संशोधन करीत आहेत असे दिसले. टिळक बोलले ते स्पष्ट सुटसुटीत वाक्यानी बोलले. त्यात वक्तृत्व नव्हते. आवेशहि नव्हता. ते बोलत असता रात्र पडली म्हणून कोणी एक कंदील पेट-वून त्यांचे बाजूला उभा राहिला. टिळक म्हणत होते की "राष्ट्रीय सभेच्या इभ्रतीचा उपयोग होतो हे मला कळते. ती मी का मोडीन ! पण हिंदी राजकारणात काही नवीन तेज निर्माण झाले आहे. आणि या तेजाने आपले मुख उज्वल करणे हे राष्ट्रीय सभेला आवडत नसेल तर ती मरून गेलेली काय वाईट ? आमच्या समे-टाच्या उपायाना नेमस्तानी फेटाळून लावले. का तर त्याना सरकारची कृपा संपादा-वयाची होती !" नवीन तेज याचा टिळकांचा अर्थ आत्मविश्वास व आत्मनिष्ठा. जुनी अर्जदारी न्यायाची मागणी किंवा भिक्षांदेहीचे इतर जुने प्रकार नव्हत. भिक्षां-

देहीला सरकार भूलथापा देऊन वाटेला लावते. आणि अँग्लो इंडियन तर तिची हेटाळणीच करतात. असो. पुढे एकदोन दिवस काही लोक सुरतेस मागे राहिले. आणि त्यानी इतर सभा परिषदा मरविल्या. पण राष्ट्रीय सभेचा नकाशा गुंडाळला गेला तो गेलाच. आता नेमस्त काय किंवा जहाल काय दोघेहि सरकारचे विरुद्धच. फिरून ते केव्हा तरी एकत्र व्हावयाचेच. समानशत्रुत्व हा एक प्रकारचा स्नेह-संबंध ठरतो. आता राष्ट्रीय सभा कायमची फुटो किंवा पुन्हा जुडो. पण जुनी ती जुनी नवी ती नवी. एक जोडा हवेत उडाला त्याने एवढे कार्य केले. पुढारी लोकाबरोबर मीहि परत प्रवासाला निघालो. पहातो तो काय ! गुलाबाची फुले अंगावर सारखी उधळली जात होती. परत जाताना दर स्टेशनवर कानोसा घेतला तो ' धिःकार रासबिहारीला ! धिःकार गोखल्याना ! मरो तो सुरेंद्रबाबू ' ! असे उद्गार कानी येत. ' जय ' ' जय ' शब्द एकाच्याहि नावाचा ऐकू आला नाही. गेल्याच बुधवारी फुलांच्या हाराना या देशात अंत नाही असे वाटले आणि पुढच्याच रविवारी हा दुसरा प्रकार !"

सुरतेहून लोक आपापल्या गावी गेल्यावर ज्यानी त्यानी आपापल्या आठवणीप्रमाणे वर्तमानपत्रातून सुरतेच्या हकीकती देण्यास सुरवात केली. त्या कशा असतील हे सांगितल्याशिवाय कोणाच्याहि लक्षात येईल. उघड पक्षपात करणाऱ्यानी कसून वकिली केली आणि त्यांच्या पाहण्या ऐकण्यात आलेल्या बारीक सारीक गोष्टी सुद्धा चव्हाट्यावर आणून त्यातून प्रतिपक्षाचा डाव कसा होता हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. काहीनी संभाषणात्मक हकीकती प्रसिद्ध केल्या. काहीनी मुलाखती घेऊन त्या प्रसिद्ध केल्या. काहीनी प्रतिपक्षाच्या वर्तमानपत्रातून उतारे घेऊन त्याचे खंडण चालविले. एक गृहस्थ मात्र असे भेटले की ते टिळकांचे भक्त नसताहि त्यानी टिळकांच्या समर्थनपर असेच लिहिले. आकलूजचे वकील अनंतराव कवलगीकर यानी गावी परत जाताच केसरीला पत्र लिहून सुरत येथे घडलेल्या खऱ्या प्रकाराची माहिती दिली. त्यात पक्ष एकाचा पण समर्थन दुसऱ्याचे असा म्हणजे निःपक्षपातीपणाचा प्रकार दृष्टीस पडला.

ते लिहितात "मी टिळकांचा भक्त नाही. उलट सामाजिक सुधारणेच्या प्रत्येक बाबतीत टिळक आडवे येतात अशी समजूत असल्याने त्यांच्याविषयी माझ्या मनात पूज्यबुद्धि नव्हती. हे सांगण्याचे कारण एवढेच की टिळकांच्या भक्तीमुळे आंधळेपणाचा माझ्या दृष्टीत व कानात विकार झालेला नव्हता. मी नॅशनॅलिस्ट कँपामध्ये राहात होतो. तेथे जमलेली सहाशे डेलिगेट-मंडळी विद्वान आणि विचारी होती असे मला दिसले. या सर्वांना ज्ञानप्रकाशकार तेली तांबोळी साळीमाळी यांच्या वर्गात कसे ओढतात? नॅशनॅलिस्ट पक्षाने सभा भरवून जे ठराव केले त्यात काही गैरवाजवी होते असे मला वाटत नाही. एवढेच नव्हे तर काहीहि करून राष्ट्रीय पक्षास वेगळे करावयाचे असा नेमस्तानी निश्चय केला असावा अशी माझी समजूत एकंदरीने झाली. सुरतेच्या पेठेत राष्ट्रीय पक्षाच्या लोकानी काठ्या महाग केल्या व

दंगे करण्याचा त्यांचा कृतनिश्चय होता हे विधान खोटे आहे असे मला वाटते. मी स्वतः कधी काठी विकत घेतली नव्हती किंवा कोणी विकत घेतल्याचे मला समजले नाही. सुरेंद्रबाबूना बोलण्याला हरकत केली ह्या गोष्टीचे वाईट वाटून मला जेवण-खाण सुचले नाही. आणि त्या दिवशी भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या कॉन्फरन्सलाहि मी गेलो नाही. ता. २६ रोजी हा अपराध राष्ट्रीय पक्षाने केला खरा पण ता. २७ रोजीचा दोष नेमस्तपक्षाकडे होता असे मला वाटते. व्हालंटियर लोकानी नॅशनॅलिस्ट पक्षावर, पोलिस त्याना धरून नेत असता, काठ्यांचा प्रयोग केला हे आम्ही समक्ष पाहिले. दंग्याला सुरवात प्रथम स्वागतमंडळाकडून झाली आणि टिळकांवर फेकलेली खुर्ची मी पाहिली. असे असता राष्ट्रीय पक्षाने दंगा केला हे म्हणणे गैर-वाजवी होय. जोडा फेकला तो मेथा व सुरेंद्रबाबू यांच्या प्रमाणे टिळकांच्यावरहि फेकला असू शकेल. ठराव गाळले ठराव गाळले अशी हूल टिळकानी उठाविली म्हणून दंगे माजले हे म्हणणे खोटे. टिळकानी गोष्टी केल्या त्या आपल्या पक्षातील लोकाना समजून सांगून त्यांच्या अनुमतीने केल्या. टिळकांशी तडजोडीचे बोलणे करण्याचे नेमस्तानी टाळले हा टिळकांचा उपमर्द होय. ”

## (५) नेमस्तपक्षाची कैफियत

झालेल्या एकंदर प्रकारासंबंधी नेमस्त पक्षाचे म्हणणे काय होते हे पुढे गोखले यानी जे उत्तर दिले त्यात समर्पक आले होते. म्हणून त्याचा सारांश सांगितला असता एकंदरीने नेमस्त पक्षाचे म्हणणे काय हे कळून येईल. या पत्रकात गोखले म्हणतातः—“ डॉ. घोष यांची निवडणूक एकट्या स्वागतमंडळाने केली नव्हती. वऱ्हाड खेरीज इतर सर्व प्रांतानी त्यांची निवडणूक केली होती. स्वागत मंडळापैकी फार मोठे बहुमत घोष याना अनुकूल होते. मी इकडून आधी सुरतेला गेलो याचे कारण इतकेच की स्वागतमंडळाच्या सभेत नागपुरास गोंधळ झाला तसा येथे होण्याचा संभव दिसत होता. या सभेत गोंधळ नव्हता तरी पुढे एकमेकांच्या वादात राष्ट्रीय सभा भरविणे अशक्य झाले असते. मी कॉंग्रेसचा जनरल सेक्रेटरी म्हणून सुरतेस गेलो यात वावगे ते काय? मी जाऊन अल्पमतवाल्यांची समजूत घातली. पण टिळकांच्या दूतानी येऊन ती घडी विस्कटली. लजपतराय यांच्या निवडणुकीला मी विरोध केला त्याचा खरा प्रकार पुढे आलेला नाही. लजपतरायाना निवडावे म्हणणारे सुमारे दोनशे पैकी पाच सहा असामी होते. अर्थात् त्यांची निवडणुक तर होणारच नव्हती. पण त्यांचे नाव सुचवून त्याना निवडले नाही असे प्रसिद्ध झाल्यास ते वाईट हे दुसरे कारण. शिवाय लजपतराय याना चौकशीविना कैदेत ठेवले याविषयीचा वाद लोकाना सरकारशी घालवयाचाच होता. याकरिता देशात एकी राहणे अवश्य होते. केवळ सरकारचा निषेध करणे एवढेच आपले काम असे म्हणणे असते तर त्यांच्या निवडणुकीने ती गोष्ट करिता आली असती. पण एवढ्याने काही आज भागले नाही. सरकारची मदत घेतल्याशिवाय

आपण करू अशी किती कामे आहेत! विलायतेतून नुकतेच इकडे आलेले एक तरुण जवान बोलताना म्हणाले ' एकदम स्वातंत्र्य पुकारा दुसरी गोष्ट नाही.' त्यालाच उद्देशून मी म्हटले की ' असे तुम्ही करा म्हणजे सरकारची शक्ति किती आहे हे तुम्हाला कळून येईल. हे तुमचे शब्द पाच मिनिटात तुमच्या गळयाला हात घालून दडपून टाकतील.' या बोलण्याचा लजपतरायांच्या निवडणुकीशी काही संबंध नव्हता. चार ठिकाणची चार वाक्ये घेऊन त्यांची गोधडी बनविली.

" ठरावाचा मसुदा करण्याचे काम मजकडे मी हजर असलेल्या स्वागतमंडळाच्या सभेत दिलेले नव्हते. चिटणीस मनूभाई नानूभाई आणि गांधी याना ते काम होईना. म्हणून त्यानी मजकडे कागदपत्र पाठविले आणि मसुदा तयार करा असे लिहिले. पण ही गोष्ट तारीख १५ डिसेंबरच्या सुमाराची. मी प्रथम ठरावांचे फक्त विषय ठरविले. पण ते काम लवकर होण्यासारखे नव्हते. मी ते कागद घेऊन पुण्यास १९ तारखेला गेलो आणि तेथून सुरतेला गेलो. २४ तारखेपर्यंत स्वराज्याच्या ठरावाचा मसुदा मी तयार केला नव्हता. तरी मसुदा चिटणीसाकडे देऊन जावे असे सांगितले म्हणून छापलेल्या मसुद्यात स्वराज्याच्या ठरावाची जागा मोकळी सोडिली होती. उशीर झाला असला तरी विषयनियामक मंडळ बसण्यापूर्वी मसुद्याच्या छापील प्रति वाटण्याला तयार होत्या. आधी अमुक दिवस हा मसुदा छापलेला होता असे कोठेच म्हटले नाही. १८९६ साली कलकत्याच्या लोकाना आमच्याहून अधिक वेळ होता. पण त्यांच्या ठरावांचा छापील मसुदा शेवटच्या मिनिटापर्यंत आमच्या हाती आलेला नव्हता. बरे मसुद्याना इतके तरी महत्त्व कसले ! स्वागतमंडळ हे काही तरी आपले काम म्हणून मसुदे तयार करते. पण ते कोणालाहि बंधनकारक नसतात. हे मसुदे वाटेल तसे उलटसुलट बदलता येतात. तसेच वाटले तर सुरतेस करावयास हरकत कोणती ? मसुदा आधी प्रसिद्ध करा हा आग्रह गैरशिस्त होता. स्वागतमंडळाने पूर्वीच्या राष्ट्रीय सभेचे ठराव आहेत तसे छापून आपले म्हणून मांडावेत असे कधीच घडून येत नव्हते. जे ते मंडळ आपल्याला योग्य वाटेल तसा मसुदा तयार करते. १९०६ सालच्या स्वागतमंडळाने १९०५ सालच्या सभेचे ठराव छापून वाटले नव्हते. प्रतिनिधींच्या आधी एकाद्या वर्तमानपत्राला चुकून प्रत मिळाली असेल पण वर्तमानपत्राचे लोक युक्तीने प्रत मिळवितातच ! म्हणजे त्या सर्वांनाच मिळाल्या पाहिजेत असा काही अर्थ नाही.

" आधीपासूनच टिळकानी सुरतेच्या राष्ट्रीय सभेचे नाव बद्दू करण्याचे प्रयत्न चालविले होते. नागपुराहून सुरतेला सभा का व कशी आणिली हे स्वतः टिळकाना समक्ष माहिती असता त्याकरिता सुरतेच्या लोकाना त्यानी नावे ठेविली. काही साधेना म्हणून मग घोष यांच्या जागी लजपतराय यांचे नाव त्यानीच प्रसिद्ध केले. त्यालाहि थारा मिळेना असे पाहून मुंबईकडून कलकत्ता व मद्रासकडील वर्तमानपत्राना तारा केल्या. ता. २२ डिसेंबर रोजी यानी मला याबद्दल विचारिले.

आणि मी त्याना सांगितले की ठराव कलकत्त्याचे मूळ घेतले आहेत. किंचित् इकडे तिकडे फरक केला आहे. त्यानंतर अखेरचा निर्णय स्वागतमंडळाकडे होता. तो त्यानी हवा तसा करावा. लजपतराय यानी मला विचारून घेऊन खरी हकीकत राष्ट्रीय पक्षातील लोकाना समक्ष सांगितली. आम्ही मद्रास कँपात जाऊन ठराव व त्यातील दुरुस्त्या त्याना वाचून दाखविल्या. रात्री सव्वादोन वाजता अश्विनीकुमार दत्त भेटले त्याना सर्व सांगितले. त्यांचे समाधान झालेले दिसले. आणि २४ तारखेचे दिवशी मंडपात छापील प्रत हातात येताच एक मी टिळकाना दिली. आणि ती वाचून काही दुरुस्त्या केल्या होत्या त्यात आणखी थोड्या दुरुस्त्या करा असे टिळक म्हणाले होते असे त्यानी मला सांगितले.

" मुख्य वादाचा ठराव स्वराज्यसंबंधीचा. तो पूर्वीचा कलकत्त्याचाच घेतलेला होता पण मी त्यात थोडा बदल केला. त्याला टिळकानी नावे ठेवावी याचे मला आश्चर्य वाटले. काय म्हणे क्राऊन कॉलनीज म्हणजे सरकारी वसाहतींची घटना आम्ही हिंदुस्थानाला मागतो ! या क्राऊन कॉलनीज म्हणजे खरे स्वराज्य नव्हे हे मला माहीत आहे आणि टिळकाना पण माहीत आहे. अर्थात् ती घटना मी कशी घेईन ? तरी टिळकानी हरकत घेताच ती दूर होण्यासारखी आणखी काही त्यात सुधारणा केली.

"सर्व्हन्ट ऑफ इंडिया सोसायटीच्या उद्देशपत्रकात वसाहतीचे स्वराज्य हे आमचे ध्येय असल्याचे लिहिले आहे. १९०५ साली राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष म्हणून भाषण करिताना तेच ध्येय मी सांगितले. १९०६ साली विलायतेत ईस्ट इंडिया असोसिएशनच्या पुढे तेच ध्येय मी मांडले. असे असता मी क्राऊन कॉलनीजची घटना मागतो असे टिळक लोकाना भासवित व लोक ते ऐकत याला काय म्हणावे ! उलट टिळकानी मात्र आपले ध्येय आजवर कोणत्याच शब्दानी निश्चित केलेले नव्हते. एकदा ते म्हणतात वसाहतींचे स्वराज्य हेच ध्येय. शामजी कृष्णवर्मा यानी स्वातंत्र्याचा झेंडा फडकविला की लोकहि स्वातंत्र्यवादी बनतात आणि वसाहतीच्या स्वराज्याला नावे ठेवतात. काळ्या गोऱ्यांचे स्वराज्य पाहिजे असे टिळकानीच केसरीत लिहिले. आणि आता बंगाली जहालांची गाठ पडताच त्यांचे ध्येय तेच आपले असे म्हणू लागले आहेत.

"स्वदेशीच्या ठरावातील 'झीज सोसूनहि' हे शब्द गाळण्याचा उद्देश नव्हता. तो निवळ हस्तदोष घडला. त्याचे कारण कलकत्त्याचा छापील रिपोर्ट मजकडे आला नव्हता. आणि इंडिया पत्राची फाइल घेऊन त्यावरून मी तो ठराव उतरण्याला माझ्या कारकुनास सांगितले. पण इंडिया पत्रात दिलेल्या ठरावामध्ये 'झीज सोसूनहि' हे शब्द गळले होते ही गोष्ट खरी. हे खरे की खोटे हे कोणीहि काढून पाहावे. पण ही चूक लक्षात येताच ती पुढे दुरुस्त करण्यात आली. सभा भरती तर ती चूक अर्थात् तेथेच दुरुस्त झाली असती. बहिष्काराच्या ठरावात मात्र बहिष्काराची चळवळ या शब्दाकरता परदेशी कापडावरील बहिष्कार असे शब्द मी बदलून घेतले. पण त्याचे कारण कलकत्त्यास घडले. कारण मूळ

ठरावात बंगाल्यातील बहिष्काराची चळवळ असे होते तरी त्याचा अर्थ परदेशी कापडावरील बहिष्कार असाच होता. कारण बंगालच्या चळवळीत तोच बहिष्कार पतकरण्यात आला होता. पण कलकत्यास मर सभेत बाबू बिपिनचंद्र पाल यानी बहिष्काराची चळवळ या शब्दाचा अर्थ फारच व्यापक केला आणि टिळकानीहि पुढे वर्षभर बहिष्कारयोगाचेच प्रतिपादन करून, जणू काय कलकत्यास सरकारशी असलेला सर्व संबंध तोडून टाकल्याचा ठराव झाल्याचा बहाणा केला. तात्पर्य टिळकांची ही सर्व कारवाई सुरतेच्या स्वागतसभेत बंड करण्याकरता होती.

"निरनिराळ्या लोकानी टिळकांतर्फे समेटाचे प्रयत्न केले असे टिळक म्हणतात. पण डॉ. चुनीलाल सरय्या हे मला कधीहि भेटले नाहीत. लजपतराय यांच्याशी भाषण झाले. पण ते फारच थोडे. २५ तारखेला संध्याकाळी स्टेशनवर लजपतराय यानी टिळकांची अशी अशी कल्पना आहे असे सांगितले. तेव्हा मी म्हणालो टिळक आपली परिषद भरवीतच आहेत आणि त्यात ते पाच माणसे आपली निवडणार हे ठीकच आहे. पण विषयमंडळाचा अधिकार काढून घेणारे असे हे पाच काय अगर दुसरे पाच काय हे कोण! ते माझे म्हणणे लजपतराय यानाहि पटले. टिळक एकदा म्हणतात की फेरबदल न करता कलकत्याचे ठराव मसुद्याच्या रूपाने मांडावे इतके आश्वासन आम्हाला पुरे. पण लगेच वेगळे आश्वासन मागतात की विषयनियामक मंडळात ते ठराव मंजूर होतील अशी खातरजमा करा. पण ही त्यांची अशी खातरजमा कोण व कशी करणार! पाच किंवा दहा लोकानी सर्व अधिकार हाती घेऊन अशी जामिनकी देणे हे स्वतः टिळक ज्या अरेरावीला नावे ठेवतात तीच अरेरावी नव्हे काय! टिळकानी मला भेटण्याचा प्रयत्न केला पण मी भेटलो नाही हे म्हणणे निखालस खोटे आहे. टिळक मालवी डॉ. घोष यांचे परस्परात काय चालले होते ते समक्ष मी ऐकिले. म्हणून त्या भाषणाचा वृत्तांत म्हणून जो प्रसिद्ध झालेला आहे तो बरोबर नाही असे मी सांगतो. त्याच्यावर सह्या करणाऱ्या पाच लोकापैकी खुद्द टिळकच सभापीठावर. तेव्हा टिळक जे बोलतात तेच खरे का! आणि आम्ही म्हणजे मी मालवी घोष वगैरे म्हणतो ते खोटे का!

"तात्पर्य पूर्वीचा आधार नाही अशी कोणतीहि गोष्ट स्वागतसभेने केली नाही. टिळकानी मात्र नवीन दाखला निर्माण करण्याचा प्रघात चालू केला. आजवर सर्व प्रतिनिधि एकत्र उतरत. या वेळी टिळकानी आपला कँप वेगळा केला. मसुदा कोणाच्याहि दृष्टीस पडला नसता आम्हा लोकांच्या मनात अमुकच आहे तमुकच आहे असे टिळकानी रोज भाषणे करून आपल्या लोकांच्या मनात भरवून दिले. आपल्या पक्षातील मंडळीचा एक गट करून हुकूम येईल तसे वागण्याची त्याना शिस्त घालून देण्यात आली. तात्पर्य अडवणुकीचा विचार टिळकांनी पहिल्यापासूनच ठरविला होता. अध्यक्ष बदलणे हे अशक्य असल्याचे टिळकाना माहीत होते."

## (६) राष्ट्रीय पक्षाची कैफियत

गोखले यानी केलेला हा खुलासा जसा एकंदर नेमस्त पक्षाचा म्हणून म्हणता येईल तसाच टिळकानी केसरीतून केलेला खुलासा सर्व राष्ट्रीय पक्षाचा म्हणून म्हणता येईल. याकरिता टिळकांचे म्हणणे काय होते ते थोडक्यात पाहू. त्यांचे म्हणणे मुख्यतः असे होतेः—"केव्हाहि एका हाताने टाळी वाजत नाही. किंवा दोन्हीकडे ओढल्याशिवाय दोर ताणला जात नाही. दोन्ही बाजूला आग्रही लोक होते हे उघड आहे. पण कोणाचा आग्रह सत्पक्षाचा व कोणाचा असत्पक्षाचा इतकाच काय तो प्रश्न. पांडवहि आग्रही होते. कारण त्यानी कमीत कमी पाच गावे मागितली आणि कौरवहि आग्रही होते कारण सुईच्या अग्रा एवढी देखील मृत्तिका देणार नाही असे त्यांचे उत्तर होते. पण भारतीय युद्धावर 'दोन्ही आग्रही म्हणून न्याय कोणाच्याच बाजूचा नाही' असा शेरा मारून कोणी हातातून भारत बाजूला ठेवीत नाही. म्हणून आम्हीहि आग्रही असलो तरी त्यातल्या त्यात कोणाचा सत्पक्ष हे ज्याने त्याने ठरविले पाहिजे. कलकत्त्यास दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली मंजूर झालेले प्रगतीपर ठराव मांडणे पसंत नाही हे फेरोजशाहा मेथा यानी प्रगट केले होते. किरकोळ हक्कापुरते भांडण म्हणून ते पुरे असे ते समजतात. आणि वसाहतीतील स्वराज्य देखील अंतिमातले अंतिम असे ते मानतात. अर्थात् मुंबईचा हा औरंगझेब हवा का कलकत्त्याचा महर्षि हवा? स्वराज्याला मोर्ले यानी चांदोबा म्हटले म्हणून तुम्हीहि तसेच म्हणणार की काय? गोडी गुलाबीने स्वराज्य न दिले तर स्वावलंबनाचा अवलंब करणार की नाही? किंवा गोखल्यांच्या म्हणण्याप्रमाणे ५० पिढ्यांची मुदत पत्करून सरकार चिडते म्हणून गप्प बसणार? या पन्नास पिढ्या देखील अँग्लो इंडियन पत्राना कबूल नाहीत. इतक्या पिढ्यानंतर का होईना पण स्वराज्य हवे असे म्हटले तर टाइम्स विचारतो की तुमच्यात व जहालात फरक तो काय? ठराव उतरावयाचा असला किंवा किंचित् फेरबदल करून मसुदा तयार करावयाचा असला तर गोखल्यासारख्या मनुष्याला एक महिना का लागावा? याचाच अर्थ अखेरपर्यंत त्याना मसुद्याची दाद लागू द्यावयाची नव्हती. गोखले स्वतः मेथा इतके हट्टी नसतील. पण मेथांची भीड त्याना मोर्ले यांच्या भिडेसारखी आवरत नव्हती. म्हणून प्रथम नुसत्या विषयाची यादी प्रसिद्ध केली. पण ठरावाची भाषा कळू दिली नाही. कलकत्त्याहून सुरतेस सभा आली म्हणून लगेच कलकत्त्याच्या ठरावाची पिछेहाट केली तर प्रगति कशी होणार? पुढे जावयाचे नसेल तर जाऊ नका. पण मागे तरी जाऊ नका.

"राष्ट्रीय सभा मोडण्याचा फायदा घेऊन वेगळे निघण्याला जे तयार झाले त्यानीच सभा मोडली असे का म्हणू नये? कलकत्त्याच्या सभेत डॉ. घोष यानी मोठे कडक भाषण केले. तेच सुरतेच्या सभेत नव्या पक्षाला फितुरी राजद्रोही म्हणू लागले. मेथा वगैरेंचा डाव असा की राष्ट्रीय सभेचे पांघरूण टिळकपक्षावरून काढून

घेतले म्हणजे ते आपोआप उघडे पडतील. आणि सरकार त्यांची काय वाटेल तशी वाट लावील. अध्यक्षाची निवडणूक झाली म्हणून काय झाले ? ती जर ठराव मांडून व मते घेऊन करावी लागते तर ठरावाला उपसूचना आणण्याचा अधिकार कायदेशीर आणि न्याय्य ठरतो. भानगड नसते तेव्हा औपचारिक विधि किंवा मंत्रतंत्र बिनबोभाट पार पडतात. पण भानगड निघाली म्हणजे सशास्त्र की अशास्त्र हे पहावे लागते. जुने ठराव कायम ठेवण्याचे आश्वासन मागणे या विषयी कोणी काहीहि म्हणोत किंवा उपसूचना आणावी किंवा नाही यासंबंधी मतभेद काही असो. पण टिळकानी उपसूचना आणण्याचा निश्चय केला तर ती बेकायदेशीर कशी ठरते हाच प्रश्न. शिवाय टिळकानी आधी चिटी पाठविली असता आणि ते उठून वर जाऊ लागले असता गडबडगुंडा करून अध्यक्ष निवडले गेले असे आधी म्हणावयाचे आणि अध्यक्षाचे ऐकायला पाहिजे असे नंतर म्हणावयाचे यात काय अर्थ ?

"सामोपचाराच्या आणि औदार्याच्या गोष्टी सर्वांनाच सुचतात समजतात. पण तंटा उपस्थित झाला म्हणजे मग अशा गोष्टीवर भर देणे रास्त नाही. अध्यक्षांची चूक झाली असली तरी ती चालू देण्याचे कारण नाही.

अध्यक्षस्यावलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथप्रतिपन्नस्य न्याय्यं भवति शासनम् ।।

टिळकानी केली अशी उपसूचना करता येते असे वाटेल तितक्या विलायती आधारावरून दाखविता येईल. मालवी यांचे मूळ वर्तनच गैरशिस्त म्हटले म्हणजे मग त्यामुळे उत्पन्न झालेल्या बखेड्याबद्दल टिळकाना जबाबदार धरण्यात काय अर्थ ? बाप्टिस्टा हे कायदेपंडित असून सभेच्या कामासंबंधीचे नियम त्यानी पुष्कळसे पाहिले आणि त्यानीच असा निकाल दिला की मालवींची वर्तणूक बरोबर नव्हती आणि टिळकाना उपसूचना आणण्याचा अधिकार होता. चूक कोणाची गैरवर्तन कोणाचे दंगा कोणी केला वगैरे प्रश्नांचा निर्णय एकमताने होणे कठीण असते. आणि कोणी निःपक्षपाती तिऱ्हाइत जर असा निर्णय द्यावयास बसेल तर तो दोन्ही पक्षाला थोडाथोडा दोष देणारच."

## ( ७ ) नेमस्तांची कनव्हेन्शन

सुरतेच्या सभेनंतरच्या दुसऱ्याच केसरीच्या अंकात या विषयाच्या चर्चेला प्रारंभ करताना स्वतः टिळकानी आपल्या हिशाचा निम्माधिम्मा दोष आपल्याकडे घेऊन न्यायाधीश म्हणणार तेच स्वतः म्हणून टाकिले होते. झाले ते अर्थात् होऊन गेले पण पुढे तरी समेट होणार की नाही ? आणि जुन्या राष्ट्रीय पक्षाची परंपरा चालू होणार की नाही ? हाच मुख्य प्रश्न होता. त्या बाबतीत टिळकांचे म्हणणे काय होते आणि नेमस्तांचे म्हणणे काय होते हे पूर्वी दर्शविलेच आहे. आणि सभा मोडली त्या किंवा दुसऱ्या दिवसापासूनच यापैकी प्रत्येकाचा उद्योग आपापल्या मताप्रमाणे सुरू झाला.

सुरतेची सभा मोडली त्याच्या दुसरेच दिवशी नेमस्त पक्षाने आपली एक सभा भरविली. आणि एका ठराविक प्रतिज्ञापत्रावर जो सही करून देईल त्यालाच तेवढे आत घ्यावयाचे असे ठरविले. असे करण्यात अनेक प्रकारच्या सोयी होत्या. पहिली अशी की प्रतिज्ञापत्रावर सही करण्याला राष्ट्रीय पक्षाचे लोक तयार होणार नाहीत यामुळे आयतेच ते वगळले जातील. सभेचे नावच 'कनव्हेन्शन'. 'राष्ट्रीय सभा' नव्हे. आणि राष्ट्रीय सभा पूर्वीसारखी पूर्वीच्या नावाने पुढे चालविण्याचे तर नव्या पक्षाने ठरविले होते. अर्थात् ती सभा ही नव्हे. नेमस्तानी एखादे प्रतिज्ञापत्र तयार करावे व त्यावर आम्ही निमूटपणे सह्या कराव्या यात आमच्या स्वाभिमानाला धक्का पोचतो असे राष्ट्रीय पक्षाच्या लोकाना वाटणार. "शहाणपणाचा असा काय गड्डा त्यांच्याजवळ लागून गेला आहे की देशाच्या हिताचे काय हे मोजक्या शब्दानी तेच ठरवू जाणत ? बरे प्रतिज्ञापत्र तयार केले त्यात सर्वांचा समावेश होईल असे शब्द नव्हते. कलकत्त्याचे ठराव बदलून जे नवे ठराव गोखल्याना करावयाचे होते ते आयतेच्या आयते या प्रतिज्ञापत्रकात घालून ठेवले आहेत. त्यावर सही देणे म्हणजे ते मान्य करणे असे होते. आणि ते एकदा मान्य केल्यावर ते बदलण्याची खटपट करणे शोभत नाही. विसंगत दिसते."

"बरे झाले. नेमस्ताना सवता सुभा करावासा वाटतो तर करीनात का ? औषधाविना खोकला गेला. त्यांच्यात रहा मिसळा आणि त्यांचे मन वळविण्याकरिता दरवेळा शेरभर रक्त खर्च करा ही एवढी पंचाईत हवी कोणाला ! आज देशात लोकमत काय आहे हे प्रसिद्ध आहे. नेमस्तांच्या नादाला लागून या लोकमताला मुरड घालावी किंवा त्यांच्या आग्रहाने ते सगळेच्या सगळेच बाजूला ठेवावे यात आम्ही काय मिळविले ! आपणहि सवता सुभा स्थापावा आणि मनाला येईल तसे ठराव मंजूर करून लोकमत प्रांजलपणे प्रगट करावे हेच श्रेयस्कर होय." अशा प्रकारची विचारसरणी नव्या पक्षातील पुढारलेल्या लोकांची असणार हे जाणूनच प्रतिज्ञापत्रकाचा हा खोडा तयार करण्यात आला होता. युद्धात जसे एखादे सैन्य खंदक खणून त्याच्या आड तळ देऊन बसते त्याप्रमाणे ही कनव्हेन्शन भरवून बसण्यात नेमस्तांचा विचार होता. नेमस्तांच्या संगतीविषयी राष्ट्रीयांची अप्रीति हा पहिला खंदक आणि प्रतिज्ञापत्रक हा दुसरा खंदक. हे खंदक ओलांडून राष्ट्रीय पक्षातील लोक सहसा येणार नाहीत. आणि त्यातूनहि आलेच तर ते कोणत्या हेतूने आले हे तेव्हाच प्रगट होईल. आणि मग त्याना मोडून काढणे किंवा घालवून देणे हे आपल्या संख्याबलामुळे सोपे होईल असे नेमस्ताना वाटत होते. आणि हा त्यांचा कयास बरोबर होता.

पण याहिपेक्षा पुढे जाऊन सभेच्या दारावर त्यानी प्रत्यक्ष नाकेबंदी केली होती. आणि पुण्यामुंबईच्या बाजूचे एकदोन आणि वऱ्हाडनागपूरकडचे एकदोन गृहस्थ दरवाजावर बसविले होते. हेतु हा की अनिष्ट असा एखादा मनुष्य प्रतिज्ञापत्रकावर सही करून तो कागद हाती घेऊन आला तरी तू आमच्यात नकोस असे म्हणून त्याला बेलाशक मज्जाव करावा. या सभेला जाऊ नये असे नव्या पक्षाच्या पुढाऱ्यानी

ठरविले होते. ते ठरविण्यापूर्वी बरीचशी चर्चा झाली आणि तीत सभेला जावे असे म्हणणारे काही लोक निघाले. प्रथम टिळकहि जावे या मताचे होते. कारण नेमस्त पक्षाला आपल्या भोवती खंदक खणून तळ देऊन बसण्याचे स्वास्थ्य देखील पचू द्यावे असे त्याना वाटत नव्हते. राष्ट्राने कोणतीहि मागणी करावयाची ती एकमुखी करावी. मत प्रगट करावयाचे तर एकमुखी प्रगट करावे. आणि राष्ट्रीय पक्ष हाच नवा मोठा व वाढता पक्ष असल्यामुळे त्याचे वर्चस्व होऊन नेमस्त पक्षानेच त्याच्या आहारी पडून पचून जावे असे टिळकांचे मत नेहमी असे. आणि हे साधावयाचे तर स्वतः जशी विश्रांति घेता नये तशी प्रतिपक्षालाहि लाभू देऊ नये असे त्याना वाटे. या दृष्टीने त्यांचा जठराग्नि नेहमी प्रदीप्त राही. आणि त्यांची विचारसरणी अशी असे की " भूक लागल्यावर भक्ष्याने खादकाकडे आपल्या पायानी येण्याची वाट न पाहता खादकानेच भक्ष्याकडे गेले पाहिजे. अर्थात् नेमस्त पक्ष बाजूला राहू म्हणेल तरी त्याला वेगळा राहू देता कामा नये. हे काही कोणाच्या घरचे कार्य नव्हे. ते न आले तर आपण गेले पाहिजे. ते येऊन न मिळतील तर आपण जाऊन त्याना मिळाले पाहिजे. "

टिळकांची विचारसरणी ही अशी होती. पण बाबू अरविंद घोष वगैरे लोकाना ही विचारसरणी पटली नाही. नेमस्ताना ग्रासून पचनी पाडणे ही टिळकांची वृत्ति, तर त्यांचा ग्रास न करिता त्याना आपल्या तेजाने दुरून जागच्याजागीच नामशेष करून टाकावे अशी अरविंद बाबूंची विचारसरणी होती. व तीच अखेर पुष्कळ लोकाना पटली म्हणून नव्या पक्षापैकी प्रतिज्ञापत्रावर सही करून कोणीहि कनव्हेन्शनच्या खाजगी सभेला जाऊ नये असा ठराव झाला. त्यातूनहि काही गेले. पण ते वेगवेगळ्या कारणानी. काही उभयान्वयी होते त्याना नेमस्तापासून असे वगळून राहणे बरे वाटेना. " मी यात तर आहेच पण त्यातहि असेन. नाही काय म्हणून ? " काहींचे म्हणणे " कोणत्याहि प्रतिज्ञापत्रकावर सही केल्याने बाट्ट इतके महत्त्वच आम्हाला नाही. भांडणात अर्थ तो कोय? नेमस्त झाले राष्ट्रीय झाले दोघेहि देशाकरिताच झटतात. म्हणून कोणत्याहि शब्दाने लिहिलेले ठराव स्थूलपणे सारखेच ग्राह्य होत. शब्दांचा कीस काढणे हे पढतमूर्ख करीत बसतात. किंवा विद्वत्तेची घमेंड किंवा अहंकार यानी ग्रासलेले लोक करतात. म्हणून प्रतिज्ञापत्रकावर सही करून गेल्याने काही बिघडत नाही. जेथे पाट मांडलेला दिसेल तेथे जाऊन वेदाची जी काही दोन अक्षरे येत असतील ती म्हणावी हाच पुण्य मार्ग होय. " इतर काही हुल्लड करण्याकरिता म्हणून गेले. " राष्ट्राचे काम म्हणून करता आणि सवता सुभा कसला स्थापन करता ? सर्वांना येऊ द्या. सर्वांचे विचारे ठरेल तेच श्रेयस्कर " असा युक्तिवाद भर दरवाजावर करून थोडेसे भांडणहि माजवून तक्रार वेशीवर मांडण्याचे श्रेय घ्यावे असे कित्येकाना वाटले. आणि काही तर केवळ दूताचे किंवा गुप्त हेराचे काम करण्याच्या हेतूने गेले. प्रतिज्ञापत्रावर सही करून गेल्याशिवाय प्रतिपक्षाकडील विश्वसनीय अशी बातमी आपल्या पक्षाच्या

लोकाना कशी देता येणार ? किंवा त्यांची गंमत पहावयाला कशी सांपडणार ? या विचाराने काही निघाले. या नाजुक कामावर सामान्यतः अनोळखी अशा माणसांचीच योजना झाली होती. व जे गेले त्यानीहि कार्यसिद्धीला जरूर तसा पोषाख जरूर तसा नम्रभाव जरूर तसा पडका चेहरा किंवा राष्ट्रीय पक्षद्वेषाचा खोटा आविर्भाव आणला होता. पण यापैकी पुष्कळांची निराशा झाली. कारण नेमस्त पक्षाने दारावर उभे केलेले लोक खंबीर असेच पाहून ठेवले होते. एखादा इष्ट असून चुकून कमी आत आला तरी चालेल. पण एखादा अनिष्ट असता चुकून अधिक आत आलेला नको. असले सावधगिरीचे धोरण संभाळणारीच माणसे दारावर होती. यामुळे हवी तीच माणसे आत घेतली गेली.

पण कनव्हेन्शन सभेत जाऊ न दिले तरी बाहेरून त्यांच्याशी भिडण्याकरिता राष्ट्रीय पक्षाने आपले एक मंडळ नेमून ठेवले होते व त्याचे काम पुढे बरेच दिवस चालू राहिले. तारीख २९ रोजी भरलेल्या नव्या पक्षाच्या परिषदेत या पक्षाची संघटणा आपल्यापुरती कशी करावी हे तर ठरलेच पण नेमस्ताशी एकीबद्दल बोलणे चालणे करण्याकरिताहि एक मंडळ नेमण्यांत आले. स्वतःच्या पक्षाचे संवर्धन करण्याकरिता असे ठरले की, या पक्षाच्या तत्त्वाप्रमाणे निरनिराळ्या प्रांतातून जे काम आज चालले आहे त्यात एकसूत्रीपणा यावा म्हणून एक मध्यवर्ती मंडळ नेमावे आणि प्रत्येक प्रांतात त्याची शाखा असावी. या पक्षाची वर्तमानपत्रे पक्षसंघटणेचे कार्य करीत राहतीलच. पण हरएक ठिकाणी या पक्षाची म्हणविणारी मंडळे उपमंडळे बनवावी वर्गण्या जमवाव्या आणि लोकमत जय्यत तयार करून ठेवावे. हेतु हा की प्रसंग पडल्यास निरनिराळ्या प्रांतातील लोकमताची शक्ति विवक्षित काळी किंवा स्थळी एकदम एकवटता यावी. या संघटणेचे कार्य काय झाले हे पुढे दिसून येईलच. पण या स्वतंत्र संघटणेबरोबर जमल्यास पुढे मागे एकीकरणाचे धोरणहि टिळकानी ठेवले होते हाच येथे सांगण्याचा मुख्य मुद्दा आहे. एका दृष्टीने वरकरणी दोन्ही पक्ष एकी हवी म्हणत होते. पण दोघांच्या विचारसरणीत काय फरक होता आणि एकीला साधक बाधक अशा गोष्टी कोणत्या होत्या हे कळून येण्याकरिता २७ डिसेंबर तारखेला एकाच दिवशी नव्या उपक्रमाचे जाहीरनामे दोन्ही पक्षाने काढले ते पुढे दिले आहेत.

## ( ८ ) नेमस्त पक्षाचा जाहीरनामा

" मोठ्या दुःखद परिस्थितीत तेविसाव्या राष्ट्रीय सभेचे काम तहकूब करून पुढे ढकलावे लागले. पण पुढे काम होईल त्यात लोकांची वर्तणूक शिस्तीला धरून रहावी किंबहुना सर्व देशभर एकच शिस्त राहवी म्हणून आम्ही या राष्ट्रीय सभेला आलेल्या प्रतिनिधींचीच एक 'संकेत सभा' बोलावीत आहो. मात्र खाली दिलेली तत्त्वे ज्याना मान्य असतील त्यानीच या सभेला यावे. इतरानी येऊ नये. ती तत्त्वे पुढे दिल्याप्रमाणे:—

(१) हिंदुस्थानाला स्वराज्य पाहिजे ते स्वराज्य भोगणाऱ्या साम्राज्यातील इतर वसाहती जे भोगतात तशा प्रकारचे असावे. आणि साम्राज्याचे हक्क व जबाबदाऱ्या यांचा आपला भाग इतर भागीदारांच्या बरोबरीने हिंदुस्थानाला उचलता यावा.

(२) वरील ध्येय साधण्याचे मार्ग म्हणजे केवळ सनदशीर चळवळी विद्यमान राज्यपद्धतीची हळुहळु पण निश्चयात्मक सुधारणा, राष्ट्रीय ऐक्याची प्रस्थापना, सार्वजनिक कार्यांची आवड, आणि सामान्य जनतेच्या स्थितीची सुधारणा.

(३) वरील हेतु सफल करण्याकरिता होणाऱ्या सभेत सर्वांनी शिस्तीला धरून वागले पाहिजे आणि सभेच्या अधिकाऱ्यांची आज्ञा मानली पाहिजे.

वरील तीन्ही गोष्टी मान्य असतील त्यानी शनवार ता. २८ डिसेंबर रोजी दोनप्रहरी एक वाजता स्वागतमंडळाने या सभेला देऊ केलेल्या मंडपात जमावे अशी विनंति आहे. "

सह्या—रासबिहारी घोष. फेरोजशहा मेथा. सुरेंद्रनाथ बानर्जी. गोपाळ कृष्ण गोखले. दिनशा वाछा. नरेंद्रनाथ सेन. अंबालाल देसाई. कृष्णस्वामी अय्यर. त्रिभुवनदास मालवीय. मदन मोहन मालवीय. दाजी आबाजी खरे व इतर.

### (९) नव्या पक्षाचा जाहीरनामा

"तेविसाव्या राष्ट्रीय सभेचे काम दुर्दैवाने अर्धवट राहिले किंबहुना त्याला धड प्रारंभहि झाला नाही. म्हणून ते काम पुन्हा हाती घेऊन पुढे चालू करणे इष्ट आहे. कामाची दिशा व सभेचे धोरण पूर्वीचेच रहावे. म्हणजे कलकत्ता येथे दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रीय सभेत अखेर निश्चित झाले तेच रहावे. या राष्ट्रीय सभेतील तत्त्वे व तिचे मार्ग सदर सभेतील ठरावामध्ये ग्रथित झाले आहेत. विशेषतः स्वराज्य स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चार विषयावरील ठरावात जे ग्रथित झाले ते ज्याना बिनशर्त मान्य असतील आणि ज्याना प्रामाणिकपणे त्याच मार्गांनी काम करण्याची इच्छा असेल त्यानी शनवार ता. २८ रोजी तिसरे प्रहरी ४ वाजता घीकाटा वाडी हरीपुरा सुरत येथे जमावे अशी विनंती आहे. वर दर्शविलेले कार्य पुढे कसे चालवावे याची व्यवस्था सदर सभेत करण्यात येणार आहे."

सह्या—अरविंद घोष. बाळ गंगाधर टिळक. मोरेश्वर गोपाळ देशमुख. गणेश कृष्ण खापर्डे. कसनजी देसाई व इतर अनेक.

नेमस्तांची सभा एक वाजता भरणार व त्यानंतर नव्या पक्षाची भरणार असे टिळकानी ठरविले त्यातील मर्म उघड आहे. राष्ट्रीय पक्ष यापुढे काय करणार याबद्दल

नेमस्तपक्षाची दृष्टी मुळीच नव्हती. त्याना असेच वाटत होते की "या नव्या पक्षाचे जहाज सुकाणू तुटून वादळात सापडून वहावत चालले आहे. ते लवकरच कोठे तरी आपटून फुटणार. आपण वेळीच वेगळे फुटून निघालो ही फार चांगली गोष्ट झाली. आपण आपल्या होड्या तरी नीट दुरुस्त ठेऊ या. आणि त्याकरिता त्याना तेलपाणी रंगरोगण लावू या व आत पाणी येण्याची भोके टिपून बुजवू या. आपण वादळाच्या मार्गातून बाजूला झालोच आहो. आपले सुकाणू खंबीर आहे. आणि होड्यातील खलाशी व प्रवासी हे आज्ञाधारक व समंजस आहेत. आपल्या होड्या वादळात सापडू नयेत हे खरे पण त्यांच्या शिडात भरण्यापुरता तरी वारा हवाच. तो न मिळेल तेव्हा हलुहलु कष्टाने वल्ही मारीत मार्ग आक्रमू. शिवाय वादळाच्या कडेकडेने वाहणारा वारा हाहि कुशलतेने शिडे उभारून व फिरवून आत घेता येईलच. त्याचाहि उपयोग होईल व तोहि करून घेऊच. पण पुन्हा म्हणून वादळात सापडावयाचे नाही हाच निश्चय." याच्या उलट नवा पक्ष नेमस्त पक्षाच्या हालचालीवर पूर्णपणे दृष्टि देऊनच चालत होता. त्याला मनातून वाटे की "फूट होणे ही गोष्ट विघातक आहे. कारण दर्यावरचे जहाज त्यांतल्या कोणाच्या नशिबाने वाचत असते हे काय सांगावे! म्हणून जहाजातून आधी सहसा कोणाला बाहेर पडून वेगळ्या होड्यात बसून जाऊ देऊ नये. आकाशातून पडणाऱ्या विजेसंबंधाने अशी एक प्रचलित समजूत असते की भवितव्यतेच्या हुकमाप्रमाणे ती ज्याचे आयुष्य भरले त्याच्यावर कोसळावयाची हे ठरलेलेच असते. पण कोसळताना विजेला नक्की आपला तेवढा बळी नेमका वेचून घेतां येत नाही. आणि ज्यांचे आयुष्य भरले नाही अशा माणसांच्या मेळ्यात तो बसला असेल तर तो वाचला तर एक वेळ चालेल. इतर कोणाला दगावण्याचा आपला अधिकार नाही अशा समजुतीने वीज कोसळली तरी दाराशी येऊन पाहून परत जात असते"! नेमस्तांची संगत ही राष्ट्रीय पक्षाला वरील-प्रमाणे होय असे कित्येकाना मनातून वाटे. राष्ट्रीय सभा हे एक मोठे आवरण आहे. त्यात गुरफटलेल्या स्थितींतच सर्वांना आपला निर्वाह करून घेतला पाहिजे. कोणाचे उसे पायथे कोणाला लागले तरी ते सोसले पाहिजे. आणि त्या आवरणात एकत्र देशकार्य करीत करीतच सर्वांनी मिळून डोके वर कादले पाहिजे. अशीहि एक उपपत्ति नव्या पक्षातील काही लोकांची होती. जहाजातून फुटून जाऊ पाहणारे लोक दूर जाऊच द्यावयाचे नाहीत. वादळातहि शक्य त्या प्रयत्नाने त्यांच्याशी गाठ घालावयाची. व त्याना जहाजात या असे म्हणावयाचे. नाही तर तुमच्या होड्यात उड्या टाकू अशी त्याना भीतिहि दाखवावयाची. साधल्यास उड्या टाका-वयाच्याहि. पण त्याबरोबर हेहि खरे की जहाजाला खूप गति मिळून मुक्काम लवकर गाठता यावा म्हणून जाणून बुजून जहाज वादळाच्या कक्षेत आपण नेऊन घातले तसे करा म्हणून सांगायला कोणी आला नव्हता. झाला तो व होईल तो सर्व मामला स्वतंत्र इच्छेचा. तेव्हा घडतील ते परिणाम आपण सोसलेच पाहिजेत. स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या नशिबाने जगून वाचून साध्यहि साधले तर ते हवेच आहे! सुखासुखी

जीवावर उदार कोणी व्हावे ! पण साध्य साधण्याच्या प्रयत्नात इतर कोणाच्या उद्योगाचे किंवा नशिबाचे पाठबळ मिळाले नाही, आणि जहाज खडकावर आपटून फुटावयाचे असेच विधिलिखित असले, तर त्यालाहि आपली तयारी आहे. कोणी बुडतील. कोणी तरतील. आणि तरतील त्यातले कोणी तरी अखेर पल्ला गाठतीलच. परीणामाला भ्यावयाचे नाही. " अशा प्रकारची विचारसरणी नेमस्त पक्षाशी वागताना टिळकांची नेहमीची असे तीच सुरतेस राष्ट्रीय सभा दुभंगल्यावरहि त्यानी कायम ठेविली होती. म्हणूनच सवता सुभा स्थापणारा नेमस्त पक्ष काय करतो सवरतो आणि आपणाला प्रवेश करण्याला कोठे द्वार ठेवतो की नाही हे पाहण्याच्या हेतूने त्याच्या हालचालीवर नव्या पक्षाने दृष्टि ठेविली होती.

# भाग ७

## १९०८ सालातील हकीकत

### (१) पुण्यात अरविंद घोस

सुरतेची सभा आणि पुढे झालेला खटला यांच्या मध्यंतरीचे टिळकांचे दिवस बरेचसे कामकाजाच्या गर्दीत गेले. सुरतेच्या वादासंबंधाने केसरीत कित्येक आठवडे पर्यंत त्यानी लेख सुरू केले होते. सुरतेच्या बखेड्याबद्दलचा दोष कोणाच्या माथी अधिक मारला पाहिजे आणि एखाद्या सभेच्या अध्यक्षाचे अधिकार काय याविषयी चर्चा करण्यात पहिले पहिले लेख खर्च पडले असले तरी, फेब्रुवारी महिन्यात राजकीय पक्षोपन्यासावर जे अग्रलेख त्यानी लिहिले ते पुष्कळसे निर्विकार तात्त्विक स्वरूपाचे आणि टिळकांच्या उत्कृष्ट युक्तिवादाने व भाषासरणीने भरलेले आहेत. जुन्या स्वरूपात राष्ट्रीय सभा पुढे चालू राहो वा न राहो समेट करण्याकरिता नेमलेल्या शिष्टमंडळाच्या कामाला यश येवो वा न येवो, नव्या पक्षाच्या मताचा प्रसार करणे हे काम अवश्य होते व स्वतंत्रपणे करता येण्यासारखे होते. म्हणून राजकीय पक्षोपन्यासाची शुद्ध सशास्त्र मांडणी करून समेट कसा होईल हेहि एका अग्रलेखात स्पष्ट सांगितल्यावर टिळकानी मतप्रसाराची इतर साधने हाती घेतली.

या दृष्टीने त्यानी पहिले काम हे केले की बंगाल्यातील नव्या पक्षाचे पुढारी बाबू अरविंद घोस याना सुरतेहून मुंबई पुण्याकडे येण्याविषयी आमंत्रण दिले. अरविंद घोस यांची कीर्ति त्यांच्यापूर्वीच इकडे आलेली होती आणि त्यांचा सत्कार मुंबई पुणे दोन्ही ठिकाणी फार चांगला करण्यात आला. बंगाल्यात फाळणीची चळवळ कशी परिणत स्वरूपाला आली हे वर्तमानपत्रावरून इकडील लोकाना विदितच होते. तथापि वाचणे वेगळे आणि प्रत्यक्ष कानाने वक्त्याच्या तोंडून ऐकणे वेगळे. पुण्यास गायकवाड वाड्यात अरविंद बाबूंचे व्याख्यान झाले त्यात त्यानी आपल्या प्रांतात स्वदेशी बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण इत्यादि चळवळी कशा सुरू झाल्या प्रत्येक चळवळीचे वेळी जुने पुढारी खरे पुढारीपण न स्वीकारता लोकांच्या उत्साहावर विरजण कसे घालीत होते, पण अखेर तरुण पिढी व सामान्य जनसमूह यांच्या ओघाबरोबर वाहवत जाणे त्याना कसे प्राप्त झाले याचे अनुभविक वर्णन त्यानी केले. त्यानी विशेष गोष्ट ही सांगितली की राष्ट्रातील खरे खोटे दुर्गुण व दोष यानाच सदैव उगाळीत न बसता राष्ट्रात स्वाभिमान सामर्थ्य व श्रेष्ठतेचा विश्वास उत्पन्न करून लोकाना राष्ट्रकार्याला प्रवृत्त करणे हेच स्वामी रामकृष्ण स्वामी विवेकानंद यांचे तत्त्व बंगाल्यातील जागृतीच्या मुळाशी आहे. पुण्यास जहाल पक्षातील सर्व शाखा व उपशाखा यातील लोकांचा प्रत्यक्ष परिचय अरविंद बाबूंशी झाल्यामुळे बंगल्यातील व महाराष्ट्रातील राष्ट्रीय स्वरूपाच्या उद्योगाचा सांधा

जोडला गेला. मुंबई पुण्याप्रमाणे नाशीक धुळे वगैरे ठिकाणीहि अरविंद बाबूंची व्याख्याने झाली. नंतर पावना येथे भरणाऱ्या बंगाल प्रांतिक परिषदेकरिता ते परत कलकत्त्याला निघून गेले.

## (२) राष्ट्रमत कांचशाळा समर्थ विद्यालय

फेब्रुवारी महिन्यात मुंबईस ' नॅशनल पब्लिशिंग कंपनी ' नावाची संस्था काढण्यात आली. सुरतेच्या सभेनंतर मुंबई शहरात राष्ट्रीय पक्षाच्या मतप्रसाराकरिता एखादे दैनिक पत्र असावे अशी आवश्यकता विशेष भासू लागली. मुंबईत इंग्रजी गुजराथी भाषेत सकाळ संध्याकाळ प्रसिद्ध होणारी अनेक पत्रे होती. मराठीत निघणारेहि एक दैनिक होते. परंतु ते नेमस्त पक्षाचे. म्हणून लिमिटेड कंपनीचे पद्धतीने सुमारे पन्नास हजार रुपये भांडवल जमवून नवे मराठी दैनिक वर्तमानपत्र काढण्याचे ठरले. प्रत्येक शेअर पंचवीस रुपयांचा म्हणजे सामान्य लोकाना घेता येईल असा ठरविण्यात आला.

मार्चच्या शेवटच्या आठवड्यात नॅशनल पब्लिशिंग कंपनीचे उद्देशपत्रक प्रसिद्ध झाले. संकल्पित भांडवल एक लाखाचे असून टिळक चिंतामणराव वैद्य माधवराव बोडस नगीनदास संघवी बळवंतराव देशपांडे बाबासाहेब खरे आणि डॉ. साठे हे पहिले डायरेक्टर्स व सितारामपंत दामले हे पहिले सेक्रेटरी अशा नेमणुकी झाल्या. त्याचबरोबर या पब्लिशिंग कंपनीचे ' राष्ट्रमत ' नावाचे दैनिक मराठीत निघणार असेहि जाहीर करण्यात आले. स्वदेश स्वराज्य स्वधर्म व स्वावलंबन हे या पत्राच्या धोरणाचे चार आधारस्तंभ व्हावयाचे होते व सर्वसंमत अशा राष्ट्रीय पक्षाच्या सिद्धान्तांचा प्रसार या पत्राच्या द्वारे करावयाचा होता. पत्राची वार्षिक वर्गणी मुंबईस व पुण्यास ५ रुपये व बाहेर गांवी टपालहशीलासह रुपये ९ आणि त्याच्या साप्ताहिक आवृत्तीची मुंबई पुण्यास सव्वा रुपया व बाहेरचे ठिकाणी टपालहशीलाशिवाय रुपये दोन म्हणजे एकंदरीने फारच थोडी ठेवण्यात आली होती.

त्याचबरोबर दुसरीहि एक योजना झाली ती राष्ट्रीय शिक्षणाविषयी. सन १९०६ साली महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळ स्थापण्यात आले होते. व त्याची शाळा म्हणजे समर्थ विद्यालय कोल्हापुरास चालू होते. परंतु यापुढे कोल्हापुरास ते चालणे अवघड. शिवाय पुण्याजवळ तळेगाव दाभाडे येथे ६०।६५ एकर जागा स्वतंत्र मालकीची विकत मिळाली. म्हणून चालकानी विद्यालय तळेगावास आणण्याचे ठरविले. समर्थ विद्यालयाच्या प्रगतीला अशा रीतीने अनुकूल साधने मिळाल्यामुळे केवळ एक शाळा न ठेवता राष्ट्रीय शिक्षणाचे व्यापक विद्यापीठ महाराष्ट्रात निर्माण करावे असे टिळक विजापूरकर यानी योजले. अखिल महाराष्ट्राकरिता हे विद्यापीठ स्थापावे आणि त्यात वाङ्मयाबरोबर व्यापार उद्योगधंदे इत्यादि विषय शिकविण्याचीहि व्यवस्था करावी असा विचार ठरला. विद्यापीठाची पारंगत पदवी मिळविलेले प्रौढ आणि राष्ट्रीय भावनेने भरलेले तरतरीत लोक परदेशी गेले व तेथे

त्यानी सर्व प्रकारचे शिक्षण मिळविले तर देशातील उद्योगधंद्यांची वाढ होईल आणि स्वतंत्र बुद्धीचे विद्वान लोक तयार होतील अशी कल्पना होती. आणि तळेगाव येथील मध्यवर्ती संस्था सुस्थित झाली म्हणजे मग इतर ठिकाणी त्याच्या शाखा काढण्याचा बेत होता.

उद्योगधंद्याची वृद्धि करण्याच्या दृष्टीने पैसाफंडाची स्थापना यापूर्वीच झालेली असून त्याची वर्गणी जमण्याला या वेळी जोराने सुरवात झाली होती. आणि पैसाफंडातून कारखाना निघण्याइतके भांडवल जमताच काचकारखाना तळेगावालाच काढल्याने राष्ट्रीय शिक्षणाला धंदेशिक्षणाची जोड विद्यार्थ्यांना एकाच आवारात करून देता येण्यासारखी होती. पैकी पैसाफंडाकरिता वर्गणी मागण्याला टिळक वगैरे प्रमुख लोकाना बाहेरगावी हिंडण्याचे कारण नव्हते. फंडाचे उत्पादक अंताजी दामोदर काळे हे बाहेर हिंडत होतेच. शिवाय या फंडाची वर्गणी लहान-सान रकमानीच जमविण्याचा उद्देश असून गावोगाव ते काम लोक स्वयंस्फूर्तीने करीत असत. पण राष्ट्रीय शिक्षण म्हटले म्हणजे फार पैशाचे काम. शक्य तितके मोठे आकडे घेणे अवश्य. म्हणून महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यात पुढाऱ्यांचे एक शिष्टमंडळ हिंडवावे असे ठरले. त्याप्रमाणे टिळक नानासाहेब देशमुख चिंतामणराव वैद्य प्रो. विजापूरकर वासुदेवराव जोशी वगैरे मंडळी यानी प्रथम एक फेरी करून येण्याचे ठरविले. पहिले निमंत्रण सोलापूरचे होते. तेथे आदले दिवशी ' रामदास ' या विषयावर आणि दुसरे दिवशी ' राष्ट्रीय शिक्षण ' या विषयावर टिळकांची व्याख्याने झाली. सोलापूरचे प्रसिद्ध व्यापारी व पुढारी आप्पासाहेब वारद व त्याचप्रमाणे डॉ. रानडे लेले व सामंत वकील हरिभाई देवकरण शेठ माणिकचंद इत्यादि नागरिकानी टिळकानी योजलेल्या या कार्याला बरीच मदत केली. सोलापुराहून टिळक बार्शीला गेले. तेथेहि समर्थ विद्यालयाला बरीच मदत मिळाली. ही एक फेरी करून टिळक पुण्यास परत आले.

## ( ३ ) जिल्हा सभा व म्युनिसिपल निवडणूक

नवीन पक्षाच्या मतप्रसाराकरिता तालुका सभा व जिल्हा सभा या भरविण्यास पुन्हा सुरवात करण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे फेब्रुवारी महिन्यात मावळ तालुक्याची सभा भरली होती. तसेच मार्च महिन्याच्या अखेरीस पुणे जिल्ह्याची सभा भरवावी असेहि ठरले. ता. ९ मार्च रोजी सार्वजनिक सभेचे चिटणीस केळकर यांच्या सहीने जाहीरपत्रक निघाले. त्यात सभेपुढे येणाऱ्या ठरावांचा कचा मसुदा प्रसिद्ध करून सूचना मागितल्या होत्या. सार्वजनीक सभेने निरनिराळ्या कारणाकरिता कमिट्या नेमल्या होत्या. त्यांच्या कामाचे रिपोर्टहि जिल्हा सभेपुढे दाखल करण्याचे ठरले. ता. ९ मार्च रोजी धुळयास भरणाऱ्या प्रांतिक परिषदेच्या स्वागत मंडळाची बैठक झाली. परिषदेत सर्व पक्षाचे लोक सामील होणार होते व समेट कसा करावा हे या प्रांतिक परिषदेत प्रत्यक्ष दाखविण्याचा महाराष्ट्रातील लोकांचा विचार होता.

मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पुणे शहरातील म्युनिसिपालिटीची त्रैवार्षिक निवडणूक झाली. हा एक नवाच प्रसंग पुण्यातील नेमस्त व राष्ट्रीय पक्षाचे बलाबल पाहण्याचा उपस्थित झाला होता. या निवडणुकीतून टिळक हे स्वतः बाहेरच पडलेले होते. त्यांच्या पक्षाची मंडळी म्हणजे आण्णासाहेब पटवर्धन व केळकर हे निवडणुकीला नेहमी उभे रहात व विशेष खटपटीशिवाय निवडूनहि येत. यामुळे टिळकाना या कामात फारसे लक्ष घालावे लागत नसे. पण या साली दोन कारणानी टिळकाना ते लक्ष घालावे लागले. सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर राष्ट्रीय पक्षाचे पुण्यातील वर्चस्व प्रगट होणे अवश्य होते. शिवाय टिळकांचे स्नेही बाबासाहेब पेंडसे आणि राष्ट्रीय पक्षास नवीनच येऊन मिळालेले विद्वान् गृहस्थ गणेश व्यंकटेश जोशी याना जनरल मतदारसंघातर्फे उभे करण्याचे टिळकानी योजिले. आणि चारहि जागाकरिता आपल्या पक्षाचे उमेदवार उभे करून निवडून आणावे अशी महत्त्वाकांक्षा टिळक पक्षाने धरली. पैकी आण्णासाहेब पटवर्धन हे जुनेच उमेदवार होते. केळकर हे या पूर्वी नऊ वर्षे सतत निवडून आले होते म्हणून यंदा उभे राहण्याची त्यांची इच्छा नव्हती. याकरिता पेंडसे व जोशी यांच्याबरोबर यंदा एक नवे उमेदवार म्हणून शिवराम महादेव परांजपे याना उभे करण्यात आले. नेमस्त पक्षाने आपला एकच उमेदवार उभा करून सर्व शक्ति त्यावर एकवटण्याचे ठरविले. ते हरि नारायण आपटे हे होत. तथापि आपटे निवडून न येता परांजप्यासुद्धा चारहि उमेदवार टिळक पक्षाचेच निवडून आले. शहर म्युनिसिपालिटीला आपला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार १३।१४ वर्षे मिळाला असता आजवर तो एकाच घराण्यात डांबून राहिला. सरदार दोराबजी पदमजी यानी अध्यक्षपदाचा मान बारा वर्षे भोगला. व त्यांच्या मृत्यूनंतर फिरून त्यांचे बंधु शेठ नौरोजी पदमजी यांचीच खटपट सुरू झाली. म्हणून शक्य तर या परंपरेत थोडाबहुत फरक करावा, आणि गोपाळराव गोखले हे जसे पूर्वी अध्यक्ष झाले त्याप्रमाणे इतर जातीतील विद्वान् लोकाना यथाप्रमाण हा मान मिळावा, असे टिळकांचे म्हणणे असून बाबासाहेब पेंडसे व जोशी याना याच दृष्टीने म्युनिसिपल निवडणुकीस उभे राहण्याच्या भरीला त्यानी घातले होते. पण टिळकांचा तो बेत साधला नाही. कारण एक तर अध्यक्षाच्या निवडणुकीत सरकारनियुक्त सभासदांचे प्रस्थ बरेच माजते. आणि जोशी किंवा पेंडसे हे टिळकांच्या भिडेखातर निवडणुकीला उभे राहिले तरी अध्यक्षाचे काम करण्याची हौस दोघानाहि मनातून नव्हती.

तारीख २० मार्च रोजी पुणे जिल्हासभेची पहिली बैठक झाली. स्वागताध्यक्ष आण्णासाहेब पटवर्धन यानी सभासदांचे स्वागत केले. अध्यक्षस्थानी गणेश व्यंकटेश जोशी यांची निवडणूक झाली. त्यानी आपल्या भाषणात स्वराज्याच्या मागणीचा पुरस्कार केला, आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे आकड्यानिशी अनेक प्रकारची माहिती देऊन खातेवारीने प्रचलित राज्यपद्धतीतील दोष दाखविले, आणि कलकत्त्याच्या चतुःसूत्रीचा उपदेश केला. निरनिराळ्या ठरावावर बोलणारामध्ये

सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद वामनराव पटवर्धन फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर केशवराव कानिटकर तसेच गोपाळ कृष्ण देवधर नटेश आप्पाजी द्रविड हरि नारायण आपटे तारकुंडे वगैरे इतर पक्षाची मंडळी होती. पुण्यास जिल्हा-सभा भरणार हे पुण्यातील नेमस्त पक्षाला एक प्रकारचे कोडेच पडले होते. ते असे की तीत सामील व्हावे तरी कठीण सामील न व्हावे तरी कठीण. जिल्हासभा सार्वजनिक सभेसारख्या संस्थेने भरविली आणि प्रतिनिधी होण्याला कोणत्याहि प्रकारची अट किंवा प्रत्यवाय नव्हता. म्हणून आपण हजर न राहिलो तर जिल्ह्यात टिळकांचे मत तेवढेच काय ते प्रचलित आहे असे दिसून येईल आणि सामील व्हावे तर आपण पडलो थोडे लोक. तथापि सामील न होण्यापेक्षा सामील झालेले अधिक बरे असा विचार करून नेमस्त पक्षाचे लोक प्रतिनिधि झाले होते. सामील झाल्याने आपल्या पक्षाचे म्हणणे काय हे पुण्यासहि जनतेपुढे स्पष्ट शब्दांनी मांडता येईल हा एक त्याना फायदा होताच. पण मद्यपान निषेध वगैरे विषयावर होणाऱ्या पुष्कळशा ठरावात उभय पक्षात मतभेद नाही म्हणून पक्षभेदरहित शुद्ध सार्व-जनिक अशा दृष्टीने काम करण्याची संधि मिळते ती दवडू नये असाहि सुविचार या सामील होण्याच्या कल्पनेच्या मुळाशी होता. त्याप्रमाणे हजर राहून स्वदेशीच्या ठरावात त्यानी आपल्या पक्षातर्फे काही उपसूचना पुढे आणल्या पण त्यांचा काही उपयोग झाला नाही.

सभेत राष्ट्रीय शिक्षण व मद्यपाननिषेध या विषयावर एकंदरीने विशेष जोर देण्यात आला होता. शिक्षणाविषयी टिळकानी सांगितले की ' सरकार व लोक यांच्या हितविरोधामुळे या शिक्षणाचा प्रश्न उद्भवतो. हिरण्यकश्यपूने प्रल्हादाच्या शाळेत नारायणावर बहिष्कार घातला होता तसाच सरकारी शाळातून राष्ट्रीय भाव-नेवर बहिष्कार पडलेला आहे. सरकारी देखरेखीशिवाय व बंधनाशिवाय केवळ संस्था शिक्षणाचे काम चांगले करते म्हणून सरकार पैशाची मदत देईल तर ती अवश्य घ्यावी मागावी. कारण सरकारचा पैसा हा आपलाच पैसा होय. शिक्ष-णाचा दर्जा कमी करणे हा राष्ट्रीय शिक्षणाचा हेतु नाही.' मद्यपानासंबंधाने टिळकांचे भाषण कडक असे झाले. "परकी सरकार इकडे आले त्याने वाटेल तर शिस्त शांतता ठेवावी. पण आम्हाला नीति शिकविण्याच्या भानगडीत पडू नये. मद्यपाननिषेध हे हिंदु लोकांचे एक विशेष नीतितत्त्व आहे आणि ते अमलात आणण्याच्या कामी लाभहानीच्या दृष्टीने सरकाराकडून येणारा अडथळा आपण मोडून काढला पाहिजे. मद्यपानाची चीड ही तुरुंगवासाच्या दुःखापेक्षा अधिक दुःसह वाटली पाहिजे. एक दारूचे दुकान मी बंद केले तर मला स्वर्ग मिळेल असे हिंदी तरुणाला वाटून त्याने या चळवळीत जरूर तर मरण्यालाहि तयार झाले पाहिजे. आणि जर दारू-बंदी करण्यासारखी साधी गोष्ट आपणाला करता आली नाही तर स्वराज्याला आपण नालायक आहो असेच मी समजेन" असे टिळकानी सांगितले ! आणि याच त्यांच्या भाषणातून पुढील महिन्यात झालेली पिकेटिंगची चळवळ निर्माण झाली.

एकंदरीने ही जिल्हा सभा यशस्वी झाली असे म्हणण्याचे कारण पुण्यातील निरनिराळ्या राजकीय पक्षांतील पुढारी पेन्शनर संपादक वगैरे सर्व मंडळी सभेत सामील झाली होती व काम झाले ते सर्व गोडीगुलाबीने व आनंदाने पार पडले. त्यातहि विशेष हा की पुढच्या राष्ट्रीय सभेपर्यंत सर्व पक्षाच्या पुढाऱ्यानी समेट कसा घडवून आणता येईल याचा विचार करावा व हरप्रयत्नाने पुढची राष्ट्रीय सभा पूर्वीप्रमाणे एकजुटीने भरवावी हा ठराव सर्वानुमते पास झाला!

राष्ट्रीय सभा मोडल्याने कित्येकांच्या दृष्टीने टिळकांचा दुर्लौकिक झाला. तथापि नव्या पक्षाचे तेज त्याचे ध्येय विद्वत्ता टिळकांच्या अनुयायांच्या अंगचा रगेलपणा जरूर पडली तर हातात काठी घेण्याची त्यांची तयारी आणि विशेषतः नेमस्तात घडून न येणारी गोष्ट म्हणजे एका पुढाऱ्याकरता शेकडो अनुयायी एका अर्थाने जीव देण्याला तयार हे चमत्कारिक लक्षण यापूर्वी लोकानी पाहिले नव्हते. सुटा तुटका एखादा तारा स्वस्थानी चांगला दिसतो. पण लहान मोठा ताऱ्यांचा गुच्छ किंवा पुंज एका ठिकाणी पहावयाला सांपडल्याने त्याचे कौतुक अधिक वाटते. हा नवीन देखावा पाहून "गोखले मेथा याना शेराला सवाशेर आज भेटले. यापुढे त्याना घोड्यावर बसून झोप घेता येणार नाही तर हातचा चाबुक बाजूला ठेवून घोडे संभाळावे लागणार" असे लोक म्हणू लागले. आणि हे टिळकांच्या पक्षपाती लोकांनीच म्हटले असे नाही तर त्रयस्थ गोऱ्या मिशनऱ्यानीहि अशीच साक्ष परस्पर आपल्या लेखातून दिली. पुण्याचे रे. मॅकनिकल टाइम्सला लिहितातः—

"बिपिन बाबू तुरुंगात पडले. बंगाली लोकामधील गडबडहि काहीशी शांत झाली. यावरून पुष्कळाना असे वाटले की मोर्लेसाहेबानी वंगभंगावर घातलेला लेप वज्रलेपच झाला. आणि लोक तो भंग आता मुकाट्याने सहन करितात. लाला लजपतराय याना सोडले या आनंदात काही लोक त्यांची हद्दपारी विसरलेसे दिसले. आणि आता सुरतेस राष्ट्रीय सभाच मोडली तेव्हा पुढचा काळ खात्रीने शांततेचा जाणार असे विलायतेत पुष्कळाना वाटू लागले. सुरतेस टिळकानी केलेले वर्तन या लोकांच्या मते मूर्खपणाचे झाल्यामुळे आता हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीत टिळक हे एक रद्दी कागद बनणार व त्यांच्या पक्षाचा सर्व जोम संपून तो आता दुर्बल होणार असेहि त्यास वाटत होते. पण या लोकांच्या आशा व इच्छा फारशा सफल झाल्या नाहीत. हिंदु लोकांच्या आकांक्षा अद्यापि दमलेल्या नाहीत त्याना अद्यापि समाधान लाभलेले नव्हते ही गोष्ट इंग्लंड लक्ष्यात घेईल तर बरे. पुणे म्युनिसिपल निवडणुकीवरून असे सिद्ध झाले की पुण्यातील टिळकांचे वजन बिलकूल कमी झालेले नाही. पुन्हा जिल्हा सभेत टिळकांचे वजन आणि सामर्थ्य वाढत चालले आणि त्यांचे प्रतिस्पर्धी गोखले यांचे वजन दुर्लक्ष करण्याइतके हलके असल्याचे दिसून आले. अलाहाबाद येथेहि अशीच गोष्ट घडली. विद्यार्थी व राजकीय चळवळ या विषयावर लाला लजपतराय व मदनमोहन मालवीय यांची भाषणे झाली. लजपतराय हे नुकतेच हद्दपारीतून परत आल्यामुळे

त्यांचे घरसोडीचे भाषण विद्यार्थ्यांनी ऐकून घेतले. पण पंडितजी बोलू लागताच श्रोत्यानी गडबड करून त्यांचे भाषण ताबडतोब बंद करून टाकिले. जहाल पक्ष आपल्याला राष्ट्रीय अगर लोकप्रिय म्हणवितो आणि लोकमताचा ओघ त्यांचे बाजूसच वळलेला होता ही गोष्ट निर्विवाद होय."

## (४) अधिकार विभागणी कमिशन

मार्च महिन्यामध्ये डीसेंट्रलायझेशन म्हणजे अधिकार विभागणी कमिशन इकडे आले. या कमिशनवर हॉबहौस एम. पी. हे अध्यक्ष असून बाबू रमेशचंद्र दत्त हे सभासद होते. मुंबईच्या बैठकीत तारीख ७ मार्च रोजी कमिशनपुढे गोखले यांची आणि तारीख ९ रोजी टिळक यांची साक्ष झाली. दोघानीहि असा अभिप्राय दिला की कलेक्टर आणि कमिशनर ह्या अधिकाऱ्याना हल्लीहून अधिक अधिकार देणे योग्य नाही. अधिकाराची विभागणी करावयाची ती सरकार व लोक यांचे दरम्यान व्हावयाला पाहिजे. गव्हर्नरचे अधिकार कमिशनरला व कमिशनरचे अधिकार कलेक्टरला दिल्याने लोकाना काही लाभ होत नाही. हलक्या दर्जाचे अधिकारी मात्र चढेल व प्रबळ बनतात. टिळकांची साक्ष सुमोर एक तास चालली होती. गोखले यानी कमिशनपुढे साक्ष देणे ही गोष्ट काही नवीन नव्हती. पण टिळकानी कमिशनपुढे साक्ष देणे ही गोष्ट लोकाना कौतुक उत्पन्न करण्यासारखी वाटली. म्हणून त्यांची साक्ष ऐकण्याला कौन्सिल हॉलमध्ये बरीच गर्दी जमलेली होती. त्यात अधिकारी होते व काही अँग्लो इंडियनहि होते. अधिकार विभागणी संबंधाने टिळकानी आपले मत १७ मार्चच्या केसरीत लिहिले आहे. प्रथम 'जिल्हा कलेक्टराना भरपूर अधिकार कसे आहेत, ते पूर्वीच्या राजाप्रमाणे जिल्ह्यावर अंमल कसा चालवीत पण पुढे चोरावर मोर या न्यायाने वरिष्ठ अंमलदारानी जिल्हाधिकाऱ्यावर कुरघोडी कशी केली, जिल्ह्यातून प्रांतात व प्रांतातून राजधानीत आणि प्रांतिक राजधानीतून हिंदुस्थानच्या राजधानीत या क्रमाने राज्याधिकार कसकसे चढत गेले आणि लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत अधिकाराची सर्व सूत्रे दिल्ली आणि सिमला येथल्या खुंट्याला गाठली गेली" हे सांगून त्यानंतर टिळकानी असे लिहिले की 'हल्लीची शिस्त थोडीशी ढिली करून प्रांतिक सरकार व जिल्हाधिकारी याना अधिक सत्ता दिली तर इंग्रजी कारभार अधिक लोकप्रिय होईल अशी जी मोर्लेसाहेबांची समजूत दिसते ती मात्र खरी नाही. सगळा निर्णयाधिकार जिल्हाधिकाऱ्यांच्या हाती राहिला काय आणि सिमल्यास राहिला काय जोपर्यंत लोकाना हिस्सा मिळाला नाही तोपर्यंत दोन्ही स्थिति लोकाना सारख्याच. डिस्ट्रिक्ट जजाने एकाद्याला फाशी दिले म्हणजे तो स्वर्गाला जातो आणि हायकोर्टाने दिले म्हणजे तो नरकात जातो असे थोडेच आहे! उलट डिस्ट्रिक्ट जजावर हायकोर्टाकडे अपील करण्याचा अधिकार असला तर जिल्ह्याचा जज्ज काही तरी वचकेल. वरिष्ठ अंमलदाराकडील अपील

काढून टाकले व त्याचबरोबर हाती काही सत्ता दिली नाही तर अनर्थ होईल. अधिकार विभागणी करून जिल्हानिहाय पुन्हा एक नवा आग्या वेताळ बनविणे योग्य नाही. खरी अधिकारविभागणी म्हणजे सरकारच्या हातून लोकांच्या हाती सत्ता जाणे. राज्यव्यवस्था अधिक लोकप्रिय करण्याची सबब सांगून वरिष्ठ व कनिष्ठ अधिकारी आपल्या हातात अधिकार आणतात. आणि अधिकाऱ्यांच्या हाती सत्ता राहावयाची तर घरच्या भुतापेक्षा बाहेरचा वेताळ बरा. अधिकार विभागणी म्हणजे या बोटावरची थुंकी त्या बोटावर करावयाची असे नव्हे. तर लोकाना स्वराज्याचे अधिकार किती व कसे द्यावे हीच खरी अधिकार विभागणी. अव्वल इंग्रेजीत चिटणीस शिरस्तेदार इत्यादि लोक जरी अधिकारी होते तरी ते जनतेतलेच असून त्याना एक प्रकारची मान्यता होती ती आज उरली नाही. नव्या मनूत हे चिटणीस आणि शिरस्तेदार यानाच अधिकार द्यावे असे कोणी म्हणत नाही तर जनतेला ते दिले पाहिजेत. लोकाना मान्यता मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. आणि हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत गोऱ्या भिक्षुकानी अधिकाराचे लाडू घेण्याबद्दल आग्रह केल्यापासून आणि त्यातल्याच कोणाच्या तरी पानात ते वाढल्यापासून जनतेला काही फायदा नाही."

## (५) मद्यपाननिषेधाची चळवळ

पुण्याच्या जिल्हा सभेत मद्यपाननिषेधावर टिळकानी जे भाषण केले त्यातूनच पुण्यातील मद्यपान निषेधाची चळवळ निघाली हे पूर्वी सांगितलेच आहे. महाराष्ट्रात ती चळवळ मुळीच नवी नव्हती. फक्त चळवळीचे स्वरूप निरनिराळ्या वेळी निरनिराळे होते इतकेच काय ते. अवल इंग्रजीत म्हणजे गोपाळराव हरी देशमुख 'लोकहितवादी' या सहीने वर्तमानपत्रातून लिहित तेव्हा देखील सरकारच्या धोरणाचा निषेध लोक मोठ्या कडक शब्दानी करीत. पण पूर्वी काय किंवा हल्ली काय सरकारने निवळ टीकेला कधीच दाद दिली नाही. 'लोकहितवादी' यांच्या लेखात मद्यपाननिषेधावर आणि त्याच्या अनुषंगानें सरकारवर पुष्कळ वाक्प्रहार केलेले होते. सन १८४९ तील एका लेखात ते लिहितात–"पूर्वीच्या राज्यांत दारू कोणी पीत नव्हते आणि उत्पन्न करीत नव्हते. ब्राह्मण व मराठे राज्यकर्ते दोघेहि कलालाना नीच मानीत आणि आपल्या घरची झाडे दारू काढण्याला कोणी दिल्यास त्यावर बहिष्कार घालीत. कोकणात हातात दारू घेऊन कोणी अंगावरून गेल्यास लोक स्नान करीत. दारू पिणारा ब्राह्मण आढळत नसे. इतर क्षुद्र लोकाकरिता एकादा दारूचा गुत्ता असला तर तो अगदी एकीकडे लपवून चोरून घालीत. आणि तो रस्ता सामान्य लोक जाण्यायेण्याला वर्ज्य मानीत. पण हल्लीच्या सरकारची वर्तणूक फार विपरीत आहे."

महाराष्ट्रातील लोक हीच गोष्ट वेगवेगळ्या शब्दानी बोलत आले आहेत. आणि टिळकानी जेव्हा जिल्हासभेत खरमरीत भाषण केले तेव्हा हजर असलेल्या

काही तरुण मंडळींनी दारू बंदीची चळवळ करण्याचा निश्चय केला. अशा लोकांची मदत टिळकाना हवीच होती. कारण चळवळ म्हटली म्हणजे ते लहानसे काम असले तरी एकट्याचे नव्हे. पुण्यात व पुण्याबाहेर मद्यपाननिषेधाची चळवळ पूर्वीपासून नरम गरम अशी सुरू होतीच. १९०५सालापासून महाराष्ट्रात ही चळवळ पुन्हा चालू झाली. शंकरराव लवाटे यानी ठिकठिकाणी व्याख्याने दिली. लोक शपथा घेऊ लागले. जातीच्या पंचाइतीनी जातीतल्या दारू पिणाऱ्याना दंड व बहिष्कार या शिक्षा केल्या. आणि सर्व जातीचे लोक चळवळीत सामील झाल्यामुळे यश येईल असे वाटू लागले. पुण्यातील मराठे व माळी वगैरे लोकांच्या समाजात दारू-बंदीचा प्रयत्न सनातन धर्मवादी अशा श्री गोपाळ कृष्णात बाबुराव फुले यानी व गुंजाळ लडकत वगैरे लोकानी पुढे केला त्याची पूर्व तयारी याच वेळी सुरू झाली होती. बेळगाव व ठाणे या जिल्ह्यात चळवळीला रूप चांगले आले. बेळगावात गंगाधरराव देशपांडे व त्यांची मित्रमंडळी यांच्या चळवळीने दुकाने उघडी पण पिपे बंद अशी स्थिति झाली! आणि ठाण्याच्या काही भागात तर कोळी कातकरी वगैरे लोकानीहि कट करून दारूचे गुत्ते ओस पाडले. हळुहळू बेळगाव व ठाणे ह्या जिल्ह्याचे उदाहरण पाहून इतर जिल्हे चळवळ करू लागले. इकडे अबकारी अधिकाऱ्यानीहि या चळवळीला विरोध करण्याला कंबर बांधली. त्यांचे हत्यार म्हणजे लोकावर खोटे खटले भरणे आणि जबर शिक्षा करणे. स्वयंसेवकावर किंवा पुढाऱ्यावर कुभांड रचावे आणि यापुढे ही चळवळ मी करणार नाही अशी कबुली घेऊन त्याना सोडून द्यावे असा क्रम सुरू झाला. चळवळ मोडण्याकरिता विरुद्ध हितसंबंधाचा फायदा जितका घेता येईल तितका सरकारने घेतला. बेळगाव व ठाणे यानंतर नगर जिल्ह्याने उचल केली. आणि तेथे सुशिक्षितच काय पण तेली तांबोळी मुसलमान ख्रिस्ती असे लोकहि या चळवळीत सामील झाले. व्यापारी वर्ग तर आधी-पासून अनुकूल होताच. शिवाय बाळासाहेब देशपांडे वकील याना अकल्पित स्फूर्ति होऊन ते जुन्या पक्षातून येऊन नव्या पक्षाला मिळाले होते.

नगर नंतर पुन्हा पुण्याची पाळी आली. पण पुण्याने टिळकांच्या पुढारीपणा-मुळे इतर कोणत्याहि जिल्ह्यापेक्षा अधिक तीव्र चळवळ केली. १९०७ साली पुण्यास मद्यपाननिषेधक सभा स्थापन झाली होती. सभेमार्फत दुय्यम चिटणीस शंकरराव लवाटे हे खेडोपाडी फिरून लोकाना व्याख्याने देऊ लागले आणि मॅजिक लॅन्टर्नचे खेळ दाखवू लागले. सुदैवाने पुण्यास मद्यपाननिषेधक सभेत गोखले यांसारखे नेमस्त पक्षाचे पुढारी लक्ष्मणराव गोखले वकीलासारखे त्यांचे अनुयायी राष्ट्रीय पक्षातील टिळक केळकर वगैरे लोक मिशनरी रे० मिस्टर मॅकनिकल आणि शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपाल डॉ. मॅन अशी सर्व पक्षांची मंडळी जमली होती. सभेमार्फत झालेल्या सौम्य प्रयत्नांचाहि बराच परिणाम झाला. आणि गिऱ्हाईक नाही म्हणून खेडचा गुत्ता बंद करावा लागला. पण चळवळीचे पाऊल यापुढे पडेना. तेव्हा जिल्हा-सभेनंतर या कामास अवश्य अशा भावनेने एक स्वयंसेवकमंडळ तयार झाले. आणि

नाकेबंदीच्या कारणाने आठच दिवसात गुत्त्यावर पुष्कळच परिणाम झाला. खरोखर हे स्वयंसेवकमंडळ स्वयंभू होते ! कारण टिळकानाहि आधी केव्हा विचारून सवरून किंवा त्यांचा उपदेश किंवा हुकूम घेऊन ते कामावर निघाले नाहीत. "हा स्वयंभू स्वयंसूचक संघ शनवार पेठेतील गुत्यासमोर काही स्फूर्तीने देवाच्या उदरातून एका एकी प्रगट झाला" असे त्याचे वर्णन एक ठिकाणी करण्यात आले आहे. वशिष्ठाच्या गरीब गाईच्या अंगातून जसे वीर बाहेर पडले तसेच पुण्याच्या गरीब जनतेच्या अंगातून हे स्वयंसेवक निघाले असेहि त्यांचे वर्णन करण्यात आले आहे. प्रारंभी स्वयंसेवकाना स्वतःच्या भावनेशिवाय व संघशक्तीशिवाय दुसरे कोणतेहि पाठबळ नव्हते. चार पाच स्वयंसेवक एकत्र जुळत आणि इतर चार पाचांचे सहाय्य घेत. १०–१२ जणांची टोळी करून गुत्त्यापुढे उभे राहात. स्वतंत्र स्फूर्तीचे प्रत्यंतर हे की एकाच गुत्त्यापुढे एकाच हेतूने प्रेरित झालेल्या दोन दोन टोळ्याहि अवचित भेटत. नाकेबंदी केली तरी दारू पिणारांच्या हातापाया पडण्यापेक्षा किंवा फिरून विनंति करण्यापेक्षा दुसरा काही उपाय ते योजित नसत. त्याना अवमानून किंवा लाथाडून दारू पिणारानी खुशाल गुत्त्यात जावे व दारू पिऊन बाहेर यावे आणि नंतर स्वयंसेवकाना त्यानी शिव्या द्याव्या त्यांच्या आयामाया उद्धराव्या व चेष्टेने अपमान करावा असेहि घडे. पण स्वयंसेवक सहनशीलता ठेवीत. ही सहनशीलता मुंबई टेंपरन्स असोसिएशनचे चिटणीस भाजेकर रेव्हरन्ड मॅकनिकल व डॉ. मॅन वगैरे लोकानी समक्ष पाहून शाबासकी दिली.

या कार्याला अधिक संघटित स्वरूप येण्याकरिता पुण्याच्या मद्यपाननिषेधक सभेने स्वयंसेवकाना काही नियम घालून दिले. पेठापेठातून व्याख्याने जादा सभा आणि देवळातून व मशिदीतून उपदेश सुरू झाले. गुत्त्याच्या घरवाल्यानी घरातून दुकाने काढून नेण्याविषयी गुत्तेवाल्यास नोटिसा देण्यास आरंभ केला. कारण नव्या सालचे लिलाव लवकरच व्हावयाचे होते. हे पाहून अबकारी अधिकारी चडफडू लागले. पोलीसांच्या तुकडया गुत्त्यासमोर येऊन उभ्या राहू लागल्या. काही नावे टिपून घेण्यात आली. आणि रस्ते अडविल्याबद्दल पहिला खटला एका प्रेक्षकावर होऊन त्याला सिटी मॅजिस्ट्रेट कारव्हालो यानी दहा रुपये दंड केला. गणेश पेठेतील गुत्तेवाल्यानी असिस्टंट कलेक्टर मि. अँडरसन यांजकडे धाव घेतली. वास्तविक शहराशी त्यांचा काही संबंध नव्हता. पण उपद्यापीपणाबद्दल त्यांची प्रसिद्धी असल्यामुळे बाकिच्याना सोडून त्यांच्याकडेच हे गुत्तेवाले धावले. आणि त्यानीहि मनगटावर कायदा बांधून गुत्याजवळ येऊन स्वयंसेवकाना धक्काबुकी केली. या गर्दीत वासुदेव कृष्ण भावे आणि वामन गंगाधर देशपांडे हे गृहस्थ सापडले. त्यानी अँडरसन साहेबाना उलट गुरकावले एवढाच त्यांचा गुन्हा. पण त्याना अटक करून काही वेळ कैदेत ठेवून रात्री दहा वाजता जामीन घेऊन सोडले. दुसऱ्या एका गुत्त्यावर अँडरसन साहेबाना एका स्वयंसेवकाने विचारले की 'मद्यपानाविरुद्ध उपदेश करणे हा गुन्हा आहे काय'? यावर साहेबाने उत्तर केले की 'मूर्तिपूजा करू नका म्हणून देवळा-

समोर उभे राहून ख्रिस्ती मिशनऱ्यानी उपदेश चालविला तर तुम्हाला तो मान-वेल काय ?' अँडरसन साहेबानी उपमा दिली पण ती फारशी उचित नव्हती हे कोणीहि कबूल करील. असो. स्वयंसेवकावर खटले भरले तसेच स्वयंसेवकानी दहा पाच कलमे लावून अँडरसन साहेब यांजवर देखील उलट खटले भरले. पण ते कसचे टिकणार ? पुणे मद्यपाननिषेधक सभेने अजूनहि आपला आधार स्वयंसे-वकाना कायम ठेवला होता. पण या सभेशी विशेष वाटाघाट न करिता चळवळीच्या गडयालाच हात घालावा या हेतूने कलेक्टर मि. कारमायकेल यानी टिळका-नाच भेटीला बोलाविले. दुसऱ्या दिवशी सभेतर्फे गोखले टिळक केळकर मॅकनिकल लक्ष्मणराव गोखले वगैरे मंडळी शिष्टमंडळ म्हणून त्यांच्या भेटीला गेली. फिरून दुसऱ्या दिवशी टिळक आणि केळकर हे दोघेहि जाऊन कलेक्टरसाहेबाना भेटले. प्रथम कारमायकेल साहेबानी सामोपचाराचे धोरण ठेविले होते आणि स्वयंसेवकाना नियम घालून दिले होते असे कळल्यावर त्याप्रमाणे ते वागतात की नाही हे पाह-ण्याकरिता ते काही ठिकाणी हिंडून आले. पण पोलीस लोक अबकारी अधिकाऱ्यांच्या स्फूर्तीने स्वतंत्रपणे वागत असत. एका आठवडयात आणखी सात असामीवर खटले भरले. पण तिघाना तसेच सोडून दिले व चौघाना एक एक रुपया दंड केला. परंतु भावे आणि देशपांडे यांजवरील खटले लांबले. अखेर त्या दोघाना शंभर शंभर रुपये दंड करण्यात आला. याचे कारण अँडरसन साहेबासारखे शिष्ट फिर्यादी होते आणि आरोप बेकायदा मंडळ जमाविण्याचा होता. इतर पाच पंचवीस खटल्यात कमी अधिक प्रमाणाने दंड झाले. पण चळवळ थांबली नाही. क्रीडाभुवनात तर मराठे लोकांची सभा होऊन ते या चळवळीत सामील झाले यामुळे ब्राह्मण हेच या कामी चळवळ करितात हा आक्षेप निघून गेला.

पुण्याचे हे उदाहरण पाहून बाहेरगावीहि पुन्हा चळवळ सुरू झाली. चोहोकडे एकच प्रकार. स्वयंसेवकानी कोठेहि दंगा केला नाही. तथापि पिकेटिंगच्या साध्या कृत्यातून जितके निरनिराळे आरोप ठेवता येतील तितके ठेवून कमिजास्ती आकसा-प्रमाणे कमिजास्ती शिक्षा देण्यात येत. जुन्नर तालुक्यात पुणे शहरातल्या अँडरसन साहेबानीच दहा दहा दिवस कैदेच्या शिक्षा देवविल्या. कोणाकडून जामीन घेतले. कोणाला नजरकैदेत ठेवले. पुराव्याशिवाय केवळ मनाने बसल्या जागी खटले भरल्याचीहि काही उदाहरणे घडली. आरोपी समोर आला म्हणजे " अरे तुम्ही का ? तुम्ही ते नव्हे. आमचा इसम दुसराच आहे " असेहि क्वचित् एखाद्या खटल्यात फिर्यादीला म्हणावे लागे. खटले ऐकण्याला शेकडो मनुष्य कोर्टात जमे. पण दंगा असा कोठेहि झाला नाही. पण अँडरसन साहेबाना आपल्या दडपशाहीचीच मनात भीति वाटून स्वतःच्या बंगल्याभोवती ते पोलिस पहारा ठेवीत. तिनवल्ली कोकोनाडा वगैरे ठिकाणी पिकेटिंगच्या चळवळीत अत्याचार घडले तसे महाराष्ट्रात किंवा कर्नाटकात घडले नाहीत. तथापि खटले करून चळवळ हाणून पाडण्याचे धोरण सरकारने चोहोकडे एकच ठेवले.

अशा रीतीने एका बाजूस गरीब स्वयंसेवक व दुसऱ्या बाजूस संपन्न सरकार हा सामना फार दिवस चालणे शक्य नव्हते. 'तुला दंड केला' असे मॅजिस्ट्रेटला एका ओळीत लिहिता येते. आणि स्वतः तो आपला पगार घेऊन मोकळा होतो. बिचाऱ्या स्वयंसेवकाने दंड कोठून भरावा? त्याला ऐपत असली तरी तो दंड लागोपाठ किती वेळ भरणार? दुसऱ्याने त्याच्याकरिता भरावा म्हटला तरी असे केवळ परोपकारी लोक किती मिळणार? बरे उघड फंड करावा तर तिकडूनहि खोड मोडण्याकरिता म्हणून दंडाची रक्कम हवी तेवढी वाढविलीच जाणार. तात्पर्य हे अधर्मयुद्ध लवकरच संपावे लागते व तसे ते एप्रिलच्या अखेर संपलेहि. शेवटी तीक्ष्ण चळवळीवरून सभा शिष्टमंडळें विनंत्या या सौम्य प्रकारावर पुन्हा चळवळ आली. चळवळीला मर्यादा असल्यामुळे तिचे आद्यंत कोठेहि असेच पहावयास सापडतात. कारण कायद्याच्या नावाखाली सरकारला राजरोस रीतीने अन्याय करता येतो पण चळवळीला कितीहि जोर आला तरी विरोध करील त्याला हाणा मारा असा चालकाना उपदेश करता येत नाही. तर उलट "बाबानो डोके तापवून मागणार नाही डोके शांत ठेवाल तरच चळवळ काही दिवस टिकेल" असे त्याना सांगावे लागते. अँडरसन साहेब येऊन आम्हाला धुडकावून लावतात आणि त्यांच्या उत्तेजनाने पोलिस शिव्या देतात व हात उचलतात अशा कागाळ्या टिळकांकडे आल्या. तेव्हा तुमचे हात काय केळी खायला गेले आहेत असें उद्गार प्रथम त्यांच्या तोंडून निघाले. पण तरुण मुले आणि पोलिस यांची मारामारी जुंपली किंवा एखाद्या गोऱ्या अधिकाऱ्याच्या अंगावर कोणा स्वयंसेवकाने रागाच्या भरात हात टाकला तर चळवळीला वेगळे स्वरूप येईल असे जाणून वरील उद्गार काढल्याबरोबर टिळक स्वतः गाडीत बसून पाठोपाठ गुत्त्यावर गेले. हेतु हा की कोठे मारामारी झालीच तर ती वाढू न देता थांबवावी. म्हणून 'सरकार हे दारूबाजाचे कैवारी आहे' असे म्हणून त्याना कितीहि शिव्या दिल्या तरी "पिकेटिंग हा काही राजकीय चळवळीचा उद्योग नव्हे किंवा हक्काकरिता झुंजण्याचा प्रसंग नव्हे तर ही सद्वर्तनाची बाब आहे. ही नैतिक उत्कर्षाची वेळ आहे म्हणून चळवळ करणारानी शांत राहिले पाहिजे. आणि गव्हर्नरसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यानी यात लक्ष घालून पोलिस व मॅजिस्ट्रेट याना आवरले पाहिजे. सरकारने उत्पन्नाप्रमाणे इभ्रतीकडेहि पाहिले पाहिजे. प्रजेत राजाची बेअब्रु होते याकडे लक्ष दिले पाहिजे" असे सौम्यपणाने व उघड लिहावे लागले आणि सामोपचाराने ही चळवळ थोडी तरी चालू द्या अशी गव्हर्नर साहेबाना विनंति करावी लागली.

पण गव्हर्नर साहेबांकडे अबकारी कमिशनरकडून आधीच असे भयप्रद रिपोर्ट गेले होते की "पुण्यात इंग्रज सरकारचे राज्य संपून टिळकांचे राज्य सुरू झाले असे म्हणण्याचीच पाळी आली आहे. आणि ही चळवळ न थांबली तर आज दारूची दुकाने बंद झाली उद्या सरकारी कचेऱ्या बंद होतील त्याचे काय कराल?" कलेक्टर कार्मायकेल यानी टिळकाना भेटीला बोलावले तेव्हा दोघांची खूपच

खडाजंगी उडाली. दोघेहि रागाने लाल होऊन बोलू लागले. या मुलाखतीचे वर्णन गव्हर्नर साहेबांकडे लिहून गेले त्याने टिळकांच्या खातेवहीतील पुऱ्या शंभर अपराधांची जागा भरून गेली. आणि टिळकाना पायबंद घातल्याशिवाय सर्व व्यर्थ आहे असे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यानी ठरविले. इकडे शिक्षा व दंड यांच्यामुळे स्वयंसेवकांची संख्या आपोआपच कमी होऊ लागली व चळवळीला शीण आला. जाहीर मनाई हुकूम सुटल्यावर तर पिकेटिंग करणे म्हणजे कैदेच्या जबर शिक्षेला आमंत्रण देणे असे झाल्याने, चळवळ बंद तर न पाडता तिला थोडेसे निराळे वळण लावणे प्राप्त झाले.

ता. २३ एप्रिल रोजी रेमार्केटच्या मैदानात जाहीर सभा भरविण्यात आली. खरोखर ही सभा अनेक दृष्टींनी अपूर्व झाली. कारण श्रोतृसमुदाय तर अफाट होताच. पण शहरातील सर्व पक्षाच्या व वर्गाच्या लोकानी तीत भाग घेतला होता. सभेचे अध्यक्षस्थान डॉ. भांडारकर यानी स्वीकारले होते. टिळक हे त्या सभेत मुख्य वक्ते होते आणि विषय सरकारच्या निषेधाचा होता. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे सभेच्या अपूर्वत्वाविषयी वेगळे सांगावयास नको. गोपाळराव गोखले हेहि या सभेला यावयाचे. पण विलायतेस जाण्याकरिता ते दुसरेच दिवशी मुंबईकडे निघणार असल्यामुळे त्यानी अध्यक्षाना पत्र पाठवून असे कळविले होते की "सभेच्या हेतुसंबंधाने व तीत होणाऱ्या ठरावासंबंधाने माझी पूर्ण सहानुभूति असून सरकारच्या सध्याच्या वर्तनाने उपयुक्त व परोपकारी अशी ही मद्यपान निषेधाची चळवळ विनाकारण कुंठित होईल असे मला वाटते. ग्रेटब्रिटन व अमेरिका यामध्ये शांतपणे लोकांचे मन दारूपासून परावृत्त करणे म्हणजे पिकेटिंग करणे हे काम कायदेशीर समजले जाते आणि या मार्गाने चळवळ चालू ठेवण्यास व आपल्या या हक्काकरिता झगडण्यास आपण तयार झाले पाहिजे." अध्यक्ष भांडारकर यानी विस्तृत भाषण केले. ते म्हणाले "सामाजिक दोष काढून टाकणे हे सुशिक्षितांचे कर्तव्यच आहे. मद्यपानाचा दोष पूर्वी आपल्यात फार मोठा मानीत होते. ऋग्वेदात "सप्त मर्यादाः कवयः ततक्षुः' असे सूक्त आहे. या सप्त मर्यादामध्ये सुरापान येते असे यास्काने म्हटले आहे. अर्थात् सुरापान ज्ञात असले तरी ते वेदकाळीहि निषिद्ध होते. इतर जातीत पूर्वी मद्यपान होते. पण तेहि फार कमी होते. दारूविक्रीचे उत्पन्न बेसुमार वाढत असल्याची तक्रार मी कायदे-कौन्सिलात केली आहे. लोकानी मद्यपी होऊ नये ही गोष्ट सरकाराला मान्य. पण तसा उपदेश करणे हे मात्र अमान्य हे कसे ? या चळवळीने सरकारास विघ्न करण्याचा आमचा हेतु नाही. हा प्रयत्न निरपेक्ष व परोपकारी आहे म्हणून सरकारने आपला ग्रह विपरित झाला असल्यास तो काढून टाकावा. दंगा मोडावा किंवा बंद करावा. परंतु उपदेशाचे कामच बंद करावे हे ठीक नव्हे."

पहिला ठराव टिळकानी मांडला त्यात ही चळवळ हाणून पाडण्याकरिता केलेल्या सरकारी हुकुमाचा व धामधुमीचा निषेध केलेला असून हे हुकूम रद्द व्हावे

अशी विनंति केली होती. ठरावावर भाषण करताना टिळक म्हणाले " आजपर्यंत सरकाराने पाचशे रुपये दंड वसूल केला. ही सरकारी धामधूम राणीसरकारच्या जाहीरनाम्याला बट्टा आणणारी आहे. सरकार म्हणते आम्ही नुसती दुकाने उघडी ठेवतो. कोणाला दारू पिण्याचा जुलूम करीत नाही. पण चळवळ करणारेहि असेच म्हणतात की दारू पिऊ नका असा आम्ही फक्त उपदेशच करतो. न पिण्याबद्दल जुलूम करीत नाही. मग यात काय चुकले ? या पुणे शहरात म्युनिसिपालिटीचे उत्पन्न अवघे चार लक्ष. पण दारूविक्रीचे उत्पन्न सात लक्ष होते. यावरून समाजस्थिति कशी आहे हे उघडच दिसते. वास्तविक उपदेशकाच्या मार्गात कोणी विघ्न आणील तर ते सरकाराने काढून टाकले पाहिजे. असे असता उलट सरकारच ते विघ्न आणते याला काय म्हणावे ? " ठरावाला अनुमोदन देताना रेव्हरंड मॅकनिकल म्हणाले " मी इतर कामात सरकारपक्षाचा मनुष्य आहे. पण या चळवळीला विरोध करण्याने सरकारची बेअब्रू होते असे सांगण्याकरिताच मी सभेला आलो आहे. " या खिस्ती मिशनऱ्यानंतर सनातन हिंदुधर्मी आवटे मुसलमान मौलवी नझरअल्ली व हरिभक्तिपरायण घमंडेबुवा यानी अशाच अर्थाची भाषणे केली व मद्यपान हे सर्व धर्मात निषिद्ध मानले आहे असे सांगितले. नंतर गणेश व्यंकटेश जोशी हरि नारायण आपटे अस्पृश्य वर्गाचे कांबळे शेख उस्मान दाऊद लवाटे बाळासाहेब नातू काशिनाथपंत गोडबोले इत्यादिकांची भाषणे झाली. आणि ही चळवळ करणाऱ्या स्वयंसेवकमंडळाचे अभिनंदन करून गव्हर्नरसाहेबांकडे शिष्टमंडळ पाठविण्याचे ठरले.

या हकिगतीवरून कितीतरी अनुमाने उघड निघतात. चळवळीचे काम शांतपणानेच करण्यात आले. तिचा हेतु राजकारणाचा नव्हता. नैसर्गिक उपदेशाचा हक्कच बजावण्याचा आग्रह होता. आणि चळवळ कोणत्याहि एका पक्षाच्या किंवा जातीच्या अमलाखाली न चालता सर्व जनता मनाने तीत सामील होती. पण सरकारचे म्हणणे एकच. " हे ब्राह्मणांचे बंड आहे. दारूबंदीचा उपदेश हे बाहेरचे सोंग आहे. स्वयंसेवकाना नवीन शिस्त शिकविण्याची ही शाळा आहे. बेगुमान व धीट लोक तयार करण्याचा हा आखाडा आहे. नवी संघशक्ति निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. अधिकाऱ्यांचा पाणउतारा करण्याची ही शिकवण आहे. भितऱ्या लोकावर नजरबंदीची ही बळजबरी आहे. जनतास्वातंत्र्यावर हा घाला आहे. सरकारावर हळुहळू वचक बसविण्याचा हा खेळ आहे. तात्पर्य ही लोकहिताची परोपकारी चळवळ नसून प्रच्छन्न राजकारणाची आहे. किंबहुना बंडखोरीचा हा प्रस्ताव आहे. स्वयंसेवकमंडळ रस्त्यात राजरोस उभे राहून रगेलपणाने राज्य करू लागले म्हणजे सरकारची इभ्रत बुडाली असेच समजावे. आज दारूबंदीचे साळसूद नांव हे लोक घेतात. पण ही पिंपळाची मुळी असून तिचा उद्या वृक्ष वाढला म्हणजे सरकारचा चिरेबंदी वाडा खिळखिळा होऊन जाईल. शिवाय लाखो रुपयांचे उत्पन्न बुडणार ते कोण भरून देईल ? " अँग्लो इंडियन वर्तमानपत्रे भांडार-

करांवर कधी तुटून पडावयाची नाहीत. पण तीहि या वेळी पडली. तात्पर्य प्रत्येक खात्याचा प्रश्न निघाला म्हणजे त्यातील मुख्य अधिकाऱ्याला असे वाटते की माझी इभ्रत तीच साम्राज्याची इभ्रत. तिला धक्का बसला तर तो साम्राज्यालाच बसला. त्याप्रमाणे अबकारी कमिशनर यानी या क्षणापुरता मीच इलाख्याचा गव्हर्नर अशा अभिनिवेशाने ही चळवळ हाणून पाडण्याचा आग्रह धरला आणि तो खरे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यानी चालू दिला. तुम्ही ही चळवळ बंद कराल तर लोक त्याचा अर्थ विपरीत करतील असे गोखले यानी आपल्या पत्रात लिहिले होते. पण अर्थ विपरीत झाला तरी त्याची पर्वा सरकाराला थोडीच होती! असो. अशा रीतीने ही चळवळ संपली. संपली म्हणावयाचे कारण असे की पुढे शिष्टमंडळ गव्हर्नर साहेबाकडे गेले वगैरे गोष्टी झाल्या पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. मागे सांगितल्याप्रमाणे सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतरहि पुण्यात जिल्हा सभा भरविता आली आणि तीहि सर्व पक्षांची मिळून अपूर्व जाहीर सभा भरविता आली. यावरून भांडणे असली तरी खरे काम निघाले म्हणजे त्यात भांडणे बुडून जाऊ शकतात असा अनुभव पुण्यातील पुढाऱ्याना आला. पण या समजूतदारपणाचा फायदा घेता येण्यासारखी स्थिति मात्र फार दिवस टिकली नाही.

## ( ६ ) धुळ्याची प्रांतिक परिषद

पुण्याच्या जिल्हा सभेनंतर धुळे येथे मुंबई इलाख्याची पंधरावी प्रांतिक परिषद भरण्याचे निश्चित झाल्याचे मागे लिहिलेच आहे. ही प्रांतिक परिषदेची सभा देखील विशेष महत्त्वाची झाली. अध्यक्षस्थानी गणेश व्यंकटेश जोशी हे असले तरी मुख्य भाग टिळकानीच अंगावर घेतला होता. नेमस्त पक्षातील लोकाखेरीज बाकी सर्व लोक या वेळी राष्ट्रीय पक्षात एकजीव झाले होते. खुद्द नेमस्त पक्षातलेहि काही प्रमुख लोक म्हणजे गणेश व्यंकटेश जोशी व नगरचे बाळासाहेब देशपांडे यांसारखे लोक राष्ट्रीय पक्षाला उघडपणे येऊन मिळाले होते. राष्ट्रीय पक्षातलाच एक पुढारलेला अंकुर या वेळी बाजूला फुटण्याच्या बेतात होता. परंतु त्यानेहि राष्ट्रीय पक्षाचा मुख्य आधार सोडला नव्हता. बंगालच्या फाळणीची चळवळ कलकत्त्याची राष्ट्रीय सभा सुरतेचा प्रकार पिकेटिंगची चळवळ राष्ट्रीय शिक्षणाचा प्रारंभ इत्यादि निरनिराळ्या वनस्पतींचा अर्क लोकांच्या मनात उतरून त्यांच्या तोंडावर एक प्रकारची टवटवी व तेज दिसू लागले होते. आणि सावरकरा-सारख्यांची भाषणे बाळासाहेब देशपांडे यांच्या सारख्यांच्या हुलडी आणि बाबा-साहेब खरे यांच्या सारख्यांच्या सभेतील आरोळ्या व घेडगुजरी गीतांची गायने इत्यादिकातून जो एक प्रकारचा बेभानपणा प्रगट होई त्यावरून राजकीय चळवळीची खरी कसोटी लागली. शिकलेला विद्वान देखील जनतेशी समरस झाला व उच्चनीच भाव विसरला आणि परिमाणाविषयी बेफिकीर होण्याइतका निःस्वार्थी बनत चालला हे उघड दिसून येऊ लागले.

पुणे जिल्हासभेत संयुक्त राष्ट्रीय सभेला अनुकूल असे ठराव झाले होते. नंतर मुंबई प्रांतिक परिषदेची पाळी आली. परिषद भरण्याचे ठरले होते तेथेहि म्हणजे धुळ्यास टिळकांच्या योजनेला जय मिळेल अशी आशा होती. आणि धुळ्याच्या सर्व पक्षांच्या पुढाऱ्यानी ती सफळ केली. धुळ्यास नेमस्त पक्ष नव्हता असे नाही. पण गावच्या बेअब्रूला सभा बोलावणारे भितात आणि तटस्थ तरी राहतात किंवा अलेपणाचे असेल तेच स्वीकारतात असा अनुभव आला होता. पण याहिपेक्षा पुढे जाऊन एक विशेष मोठा जय मिळविण्याचे टिळकानी योजिले होते. तो म्हणजे दाजीसाहेब खरे याना परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति त्यानी केली व ती विनंति प्रथम त्यानी मान्यहि केली. आणि अशा गृहस्थाच्या अध्यक्षतेखाली संयुक्त राष्ट्रीय सभेचे ठराव मंजूर झाले असते म्हणजे फेरोजशहा मेथा यांचे एक खंदे अनुयायी टिळकानी हस्तगत करून कोंडी बिनचूक फोडली असे ओघानेच सिद्ध होणार होते. पण हे घडून न येण्याबद्दल दुसऱ्या बाजूने पुष्कळच प्रयत्न झाले. शेवटी खरे यानी अशी तडजोड सुचविली की चतुःसूत्रीचा ठराव कलकत्त्यास झाला तसाच धुळ्याच्या प्रांतिक परिषदेत मंजूर करण्यास माझी हरकत नाही. पण संयुक्त राष्ट्रीय सभेचे ठराव परिषदेपुढे येऊन मंजूर व्हावयाचे असतील तर मी अध्यक्षपद स्वीकारीत नाही. दरम्यान महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यानी संयुक्त सभेला अनुकूल असे ठराव जिल्हासभा भरवून केले. शिवाय धुळे या कामात खंबीर आहे असे दिसून आल्यामुळे खरे यांची ही तडजोड अमान्य करण्यात आली आणि त्यांच्या जागी रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांची योजना झाली.

दरम्यान तारीख १९ एप्रिल रोजी अलाहाबाद येथे कनव्हेन्शन कमिटी भरली. त्यात काहींच्या मते सुरतेस तहकूब झालेली राष्ट्रीय सभाच पुन्हा सुरतेस भरवून चालू करावी असे दिसले. पण दुसऱ्या काहींच्या मते तहकूब झालेली सभा पुन्हा न भरवता स्वतंत्र राष्ट्रीय सभा भरवावी. पहिल्यांच्या मताप्रमाणे सभा भरली असता जेथे मोडली तेथेच सांधली या न्यायाने राष्ट्रीयसभा संयुक्त होऊन टिळकांची कारवाई यशस्वी होण्याचा संभव होता. बंगालचे सर्व प्रतिनिधी लाला लजपतराय हरकिसनलाल वगैरेनी तसे मत दिलेहि. पण अखेर दुसऱ्या पक्षाचे बहुमत बनून वेगळी राष्ट्रीय सभा भरली जावी हा ठराव मंजूर झाला. आणि सुरतेचे प्रतिज्ञापत्रक कायम झाले, यामुळे संयुक्त सभा होत नाही हे निश्चित ठरले ! आणि टिळकांच्या धोरणाला यापुरता धक्का मिळाला. अलाहाबादेस नेमस्ततर्फे दाजीसाहेब खरे यानीच पुढाकार घेतला असल्यामुळे अखेर धुळ्याच्या लोकानी खरे यांचा नाद सोडला.

ठरल्याप्रमाणे प्रांतिक परिषद ता. २७ एप्रिल रोजी भरून सभेच्या कामाला सुरवात झाली. त्या वेळी खानदेश हा संयुक्त जिल्हा असल्यामुळे जळगावचे पुढारी आबासाहेब म्हाळस हे स्वागताध्यक्ष होते. एकंदर परिषद तीन दिवस चालली. सुमारे ३०० प्रतिनिधी व २०० प्रेक्षक हजर होते. आणि संयुक्त नियामक मंडळाने योजलेले सर्व ठराव बिनबोभाट पास झाले. पण पुण्याच्या जिल्हा सभेत महा-

राष्ट्रातील नेमस्तानी जे समेटाचे धोरण स्वीकारले होते ते त्यानी अलाहाबादच्या सभेपुढे या वेळेस बदलले. खरे यानी जसे मुंबईच्या पुढाऱ्याना परावृत्त केले तसेच गोखल्यानीहि पुण्याचे नेमस्त लोकाना संयुक्त राष्ट्रीय सभेपासून परावृत्त केले. यामुळे पुण्याचे बहुतेक नेमस्त सभेला गेले नाहीत. आणि नगरचे चितळे हे गेले त्यानी मधून मधून विरोध केला. धुळ्याचे गरूड यानी अशी सूचना आणली की स्वतंत्र स्वराज्य मागणारे राष्ट्रीय सभेत नसावे म्हणून सर्व पक्षांची संयुक्त सभा भरवू नये. धुळ्याचे आपटे व कोतवाल यानी या सूचनेला संमती दिली. शेवटी फक्त चार दोन मते अनुकूल पडल्याने आणि बाकी सर्व प्रतिकूल पडल्याने ती नापास झाली. तसेच दादाभाई नवरोजी यांच्या मध्यस्थीने हा तंटा तोडावा अशी एक सूचना आली तीहि नामंजूर झाली. धुळ्याच्या नेमस्त पुढाऱ्यांचे आसन अशा रीतीने पुष्कळसे डळमळित होते हे खरे. तथापि त्यानीहि फक्त औपचारिक इतकाच विरोध केला. संयुक्त राष्ट्रीय सभेचे ठराव टिळकानी मांडून त्यावर फारच विस्तृत भाषण केले. आणि शेवटी समेटाची खटपट मुंबई प्रांतापुरती करण्याकरिता एक कमिटी बनवून चिंतामणराव वैद्य केळकर वगैरे गृहस्थाना तिचे चिटणीस नेमण्यात आले. अशा रीतीने नेमस्त पक्ष पावलोपावली लांब जाऊ पहात होता आणि टिळक पावलोपावली समेट पुढे सारून त्याची पाठशिवण करण्याचा प्रयत्न करीत होते.

## ( ७ ) दडपशाहीचा प्रारंभ

धुळ्याची सभा संपल्यानंतर अकोला येथील शिवाजी उत्सव मंडळाच्या निमंत्रणावरून टिळक हे अकोल्यास गेले. बरोबर दादासाहेब खापर्डे चिंतामणराव वैद्य बाळासाहेब देशपांडे ठेंगडी वगैरे मंडळी होती. टिळकांचे पुढे पुढे जे दौरे झाले त्यांचा हा दौरा म्हणजे प्रारंभच होता म्हणण्यास हरकत नाही. स्टेशनवर सत्कार करण्यास सुमारे १०००० लोक जमले असावेत! फडके वकील यांच्या मैदानात मंडप घालून तयारी ठेवली होती. तेथे व्याख्यानाचे सत्र सुरू झाले. टिळकांच्या व्याख्यानाचे दिवशी सुमारे १५ हजार लोक जमले होते म्हणतात. त्यांच्या व्याख्यानाचे वेळी शेगावचे प्रसिद्ध साधु श्रीगजानन महाराज हे मुद्दाम हजर राहिले. आणि त्यावरून टिळकांवर ईश्वराचा मोठा अनुग्रह झाला अशी लोकांची भावना झाली. व्याख्यानात टिळकानी असे सांगितले की ' कित्येक यात्रेकरूना स्वराज्यगंगेचा ओघ डोळ्याना दिसतो म्हणून ते लांबची सफर करू पाहतात. कित्येकाना ती दिसत नाही किंवा लांबची यात्रा झेपत नाही त्यानी गोदावरीचे काठी आपले पारणे फेडण्यास हरकत नाही. " काशीस जाऊन पोचल्यावर तेथेच पारणे फेडण्याचा आमचा संकल्प आहे. मग वाट चुकल्यामुळे किंवा वाटेतील जंगलामुळे अथवा वाटमार झाल्यामुळे किंवा पाय दुखल्यामुळे अर्ध्यामुर्ध्या वाटेताहि जरी आम्ही गतप्राण झालो तरी आमच्या मरणकाळच्या भावनेच्या जोरावर आमचे राष्ट्र स्वराज्याची यात्रा पुरी करून गंगाकिनारीच राष्ट्रीय पारणे सोडल्या-

वाचून राहणार नाही. " अकोल्याहून टिळक खामगाव येथे गेले. तेथेहि सत्कार आणि व्याख्यान समारंभ फार उत्तम झाला. नंतर मलकापुरास एक दिवस घालवून हा छोटा दौरा संपवून टिळक पुण्यास परत आले.

याच सुमारास मुझफरपूर येथील बांबगोळ्यांचे अत्याचार होऊन त्याविषयी केसरींत लेखमाला म्हणजे अग्रलेख आणि स्फुटें ही सुरू झाली होती. आणि या दारूच्या कोठारात सरकारच्या क्रोधाग्नीची जळजळीत ठिणगी पडून लवकरच भडका होणार अशी स्वप्ने टिळकाना आगाऊच पडू लागली होती. मेअखेर हिंदस्वराज्य विहारी आणि अरुणोदय या तीन पत्रांवर राजद्रोहाचे खटले सुरू करण्यात आले. हिंदस्वराज्याचे संपादक पहिल्या खटल्याची शिक्षा भोगून नुकतेच सुटून आले होते. अशा स्थितीत दुसरा खटला भरण्यात आला. विहारी पत्राचे पहिले संपादक फडके हे तुरुंगातच होते. असे असता त्यांचे मागून झालेले संपादक रामभाऊ मंडलीक यांचेवर खटला भरण्यात आला. वास्तविक केसरी किंवा इतर पत्रे यात येणारे बॉंबच्या अत्याचारावरील अभिप्राय विलायतेतील काही उदारमतवादी इंग्रजानी दिलेल्या अभिप्रायाहून शब्दशः फारसे वेगळे नव्हते. पण खटले अभिप्रायाच्या शब्दावर होत नसून अभिप्रायाच्या अभिप्रायावर होत असत असे दिसून आले! उदाहरणार्थ सर वुइल्यम वेडरबर्न यानी डेलीन्यूजमध्ये असे लिहिले आहे की "जसे रशियात तसे हिंदुस्थानातहि जुलमापासून गुप्त कट उद्भवतात आणि राजकीय खून होतात. ही गोष्ट राजकर्त्यांना कधी समजणार? तीव्र निराशेने अंतःकरण अत्यंत उद्विग्न झाले होते तरी अद्यापि कॉंग्रेस सनदशीर आणि कायदेशीर उपायांचे समर्थन करीत होती. दडपशाही हीच राजकीय खुनांची जननी होय. " सर हेनरी कॉटन यानीहि अभिप्राय दिला की " हिंदुस्थानातील दडपशाहीचा हा स्वाभाविक परिणाम होय. निराशेने व्यास झालेले लोक कोणते कृत्य करू शकतात याचा हा एक मासला आहे. म्हणून त्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सरकारने असंतोषाची कारणे नाहीशी करणेच अवश्य आहे. केरहार्डी म्हणाले की " राजकीय खून हा सरकारच्या सांप्रतच्या धोरणाचा ओघानेच घडणारा परिणाम आहे. " कॅप्टन आर्थर सेन्ट जॉन म्हणाले " या अत्याचाराची जबाबदारी ब्रिटिश लोक आणि त्यांचे हिंदुस्थानातील प्रतिनिधी यांचेवरच आहे. " अशा रीतीने खुद्द विलायतेतले लोक अभिप्राय प्रगट करीत होते. सरकार त्यांचे काय करणार? पण त्याचे सगळे उट्टे त्यानी हिंदी लोकावर काढून घेतले! दडपशाहीला वर सांगितल्याप्रमाणे प्रारंभ झालाच होता. तथापि सर जॉर्ज क्लार्क यानी सर्व जगाचे लक्ष वेधेल असा प्रकार करण्याकरिता टिळकांवर खटला करण्याचे योजिले व त्याप्रमाणे या मोठ्या बलिदानाचा समारंभ पुढे लवकरच घडून आला. पण या खटल्याची हकीकत एका स्वतंत्र भागातच देणे अवश्य असल्यामुळे ती जरी या म्हणजे १९०८ सालातच घडली तरी या ठिकाणी क्रमाने न देता " त्यानंतर कॉंग्रेससंबंधाचा जो वाद वर्षभर सुरू होता त्याची हकीकत आधी देऊन या भागापुरता १९०८ सालाचा वृत्तांत पुरा करण्याचे योजिले आहे.

## ( १० ) एकी बेकीची मीमांसा

राजकारणाच्या भांडणात हिंदी लोक आणि परके लोक यांचा संबंध दर्शविताना शंभर कौरव अधिक पाच पांडव मिळून एकशेपाच होऊन लढावे ही नीति अनेक लोकानी उच्चारली असेल. काही अंशी ती प्रथमदर्शनी समर्पक दिसते. कारण जहालमवाळांचे वैर कौरव-पांडवांच्या वैरासारखे भाऊबंदकीसारखे आहे. पण थोडा विचार केला असता राजकारणात पडलेल्या पुरुषांच्या समुदायाला मिळून पांडवांची उपमा अधिक शोभेल असे वाटते. टिळक महाभारताच्या उपमा पुष्कळ वेळा देत. व संयुक्त राष्ट्रीय सभेला पांडवबंधूंची आणि सरकारला कौरवाची उपमा त्यानी केव्हा लेखात व भाषणात दिली आहे की काय माहीत नाही. पण पांचांची उपमा एकशेपांचांपेक्षा अधिक लागू पडेल असे वाटते. कौरव व पांडव याना मिळून किंवा फुटून कोणा तिसऱ्यापासून राज्य घ्यावयाचे नव्हते तर एकच राज्य दोघाना वाटून घ्यावयाचे होते. यथान्याय दोघेहि त्या राज्याचे वाटेकरी. तथापि कौरवानी पांडवाना छळले शिष्टाई मानली नाही आणि 'सुईच्या अग्राइतकीहि मृत्तिका देणार नाही' असे मानी व मनस्वी दुर्योधनाने सिंहासनावरूनच काय पण रणभूमीच्या धुळीत लोळतानाहि म्हटले. एका बाजूला हिंदी लोक आणि दुसऱ्या बाजूला परकीय सरकार असा यांचा संबंध आहे. कौरवानी कपटद्यूतात पांडवाना जिंकिले त्याप्रमाणे इंग्रजानी कपटाने हिंदुस्थान मिळविले असे म्हणणारा एक पक्ष आहे. आज शंभर वर्षांत झालेले निरनिराळ्या वेळचे अत्याचार पाहिले तर त्याला लाक्षागृहातील अत्याचाराची वनवासातील उपद्रवाची आणि अज्ञातवासातील छळाची उपमा साजेल. शिष्टाई केली तरी मानीत नाहीत. आणि सुईच्या अग्रावर मावतील इतके सूक्ष्म अधिकार देण्यालाहि इंग्रज रण पाडतात याहि दृष्टीने ती उपमा लागू पडते. The Englishman will fight in the last ditch for power ही कित्येक इंग्रजांची उक्ती दुर्योधनाच्या वर सांगितलेल्या उक्तीशी तंतोतंत मिळणारी आहे. आणि एका बाजूला हिंदी राष्ट्र आणि दुसऱ्या बाजूला इंग्रज राज्यकर्ते असे पाहिले असता या युद्धाला भारतीय युद्धाची उपमा शोभेल.

पण मवाळ जहाल याना कौरव पांडवांची उपमा शोभत नाही याचे कारण त्यापैकी कोणाहि एकाजवळ राज्य आहे आणि दुसरा ते देत नाही अशी खरोखर स्थिति नाही. नेमस्त लोकाना सरकारशी सहकारिता केल्याने मानसन्मान अधिकाराच्या जागा व द्रव्यलाभाच्याहि जागा केव्हा केव्हा मिळतात. पण त्याना राज्य मानण्याइतकी हीनवृत्ति जहालांची नाही, किंबहुना स्वतः नेमस्त या गोष्टीचे सुख अनुभवित असता त्यांची देखील बुद्धि हेच स्वराज्य असे मानण्याची नाही. दोघानाहि सरकारापासूनच स्वराज्य मिळवावयाचे आहे. आहे या स्थितीत दोघेहि असंतुष्ट आहेत. उद्योग व स्वार्थत्याग केल्याशिवाय ते मिळणार नाही अशीच

दोघानाहि जाणीव आहे. सामान्य प्रश्नावर त्या दोघांचे ऐकमत्य असते. फक्त त्या दोघात फरक व्यवहारदृष्टीचा आणि त्याहून खरा फरक म्हटला म्हणजे स्वभावाचा मनोवृत्तीचा. साम्य व विरोध यांचे हे मुद्दे लक्षात घेतले असता मवाळ व जहाल याना मिळून पांडवबंधूंची उपमा साजेल. कारण त्या बंधूत झाले तरी खरा भेद मनोवृत्तीचाच होता. ध्येय किंवा उद्दिष्ट यांचा नव्हता. सामान्य नीतीचा नव्हता तर विशिष्ट नीतीचा होता. पण ही उपमा चान्ही मुंड्यावर लोळवून कोणी पाहू नये इतका आधीच इशारा दिल्यावर आम्हास असे म्हणता येईल की, संकीर्ण नेमस्तपक्षाला धर्माची उपमा आणि संकीर्ण राष्ट्रीय पक्षाला भीमार्जुनादि इतर बंधूंची उपमा शोभेल. कारण विशेष प्रसंगी मनोवृत्ति न जुळल्याने ते कडाक्याने भांडतील व एकमेकाना अपशब्दहि बोलतील. पण तो प्रसंग जाताच ते भावा-भावासारखे एकदिलाने वागतील. धर्मावर इतर बंधूंचा आक्षेप हा की तो फाजील शांतवृत्ति धारण करितो, त्याला कौरवांचे कपट कळत नाही, प्रसंगविशेषी कौरवानी कपटाने पाचारण केले असता द्यूत खेळण्याला बसतो, हरला जातो, तोंडच्या कबूलीने कुटुंबाच्या अनहिताला कारणीभूत होतो, आणि आणीबाणीचा प्रसंग आला तरी देखील आपल्या इतर बंधूना तेज प्रकट करण्याला प्रतिबंध करतो. व्यास किंवा प्राकृत भाषेतील भारतकार या सर्वांनी आणीबाणीच्या प्रसंगाच्या वेळी धर्म व इतर बंधू यांच्या कडाक्याच्या वादाचे जे काल्पनिक वर्णन दिले आहे ते मवाळजहालांच्या प्रत्यक्ष वादात अनेक वेळा शब्दशः उतरलेले आढळेल. लहान भावानी मोठ्या भावाला षंढ म्हणावे येथपर्यंत पाळी दोहो ठिकाणी गेली.

रे सहदेवा जाउनी पुष्कळसा अग्नि आण जाच कसा ।
जाळू याचे हे कर आम्हा हा सोसवेल जाच कसा ॥

हे कोणाहि धाकट्या भावाने केव्हाहि वडिल भावाबद्दल म्हणावे काय ? पण दोन्ही उदाहरणात ते म्हटल्याचे दाखले आढळतील. फार तर उपमेत उणे इतकेच पडेल की नेमस्त हे जसे जहालाना अत्याचारी म्हणतात आणि वेगळे घर बांधू म्हणतात तसे धर्म आपल्या भावाना कधी म्हणाला नाही. पण येवढे सोडून दिले असता वादाचा प्रसंग गेल्यावर पांडवबंधु प्रेमाने वागले तसे जहाल मवाळहि विशेष प्रसंग सोडून दिले असता बंधुप्रेमाने वागतात; नाही असे नाही. इतकेच नव्हे तर कीचकवधाच्या वेळी अखेर धर्माची जी वृत्ति झाली तीच पदोपदी स्वलज्जहालांचा निषेधपूर्वक तेजोभंग करणाऱ्या मवाळांचीहि झालेली आहे हे उभय पक्षी नाकबूल करता येणार नाही. आणि धर्म हा योद्धा म्हणून प्रसिद्ध नसला आणि युद्ध हे त्याचे नित्यकर्म नसले तरी शेवटी भारतीय युद्ध जुंपले तेव्हा तोहि युद्धात सामील झाला व त्यानेहि एखाद दुसरा पराक्रम केला. त्या-प्रमाणे ज्याना आज आपण मवाळ किंवा नेमस्त म्हणतो त्यांच्या पिढीतलेच लोक उद्या राजकारणाच्या युद्धात तशाच रीतीने पराक्रम करणार नाहीत हे कशावरून ? अमेरिकेचे उदाहरण घेतले तर बेंजामिन फ्रँकलीन याने विला-

यतेत शिष्टाई करताना नम्रभाव धरून ब्रिटिश मुत्सद्यांच्या व अधिकाऱ्यांच्या घरी खेटे घालघालून बूट फाडले. आणि जॉर्ज वॉशिंगटन हा प्रथम इतका राजनिष्ठ असे की इंग्लंडच्या राजाला कोणी नावे ठेवलेली त्याला खपत नसत. पण शिष्टाईचे सर्व प्रयत्न फुकट गेल्यावर या दोघानीहि युद्धकंकण हाती बांधले आणि क्षात्रदीक्षा घेतली ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे हिंदुस्थानात काळ पुढे ढकलता ढकलता सरकार जर आजचीच वृत्ति कायम ठेवील तर उद्या जहाल हे क्रांतिकारक बनतील आणि जहालांची आजची जागा उद्याचे नेमस्त घेतील अशी कल्पना करणे कठिण आहे काय? सर्व राजकीय उपपक्ष मिळून हिंदुस्थानात एकच मुख्य पक्ष असावा, स्वभावभेद व पंथ वेगळे असले तरी सर्वांनी एकाच घरी नांदून आपापल्या विशिष्ट गुणांचा फायदा सामुदायिक राष्ट्रकार्याला द्यावा, तरुणानी वडिलाचा उपमर्द केला तर तो त्यानी मोठे मन करून सोसावा, आणि मोठ्यानी विवेकबुद्धि जागृत ठेवून धाकट्यांची उडी मागे थोडीशी हटविली तर धाकट्यानीहि आपला तेजोभंग मानू नये अशी टिळकांची एकंदर कल्पना होती. आणि याचकरिता त्याना मवाळ जहालाना कौरवपांडवांची उपमा न देता केवळ भिन्न स्वभावाच्या पांडवबधूंचीच उपमा द्यावीशी वाटली असती असे आम्हाला तरी वाटते.

टिळकांच्या या धोरणाचे स्पष्टीकरण त्यानी केसरीत १९०८च्या फेब्रुवारी महिन्यात लिहिलेल्या लेखातून दिसून आले. 'समेट कसा होईल' ह्या अत्यंत विवेचक अग्रलेखात टिळक लिहितातः—"पार्लमेंट सभेत राष्ट्राचे हित कसे साधतात याचे प्रत्यक्ष उदाहरण आपल्या डोळ्यापुढे आहे. मग राष्ट्रीय सभेत अमूक पक्षाचे लोक पाहिजेत बाकीच्यांनी तेथे येण्याचे प्रयोजन नाही असा आग्रह धरणे अनुदारपणाचे लक्षण नव्हे काय? मतभेदामध्ये मतैक्य बेकीमध्ये एकी उत्पन्न करून राष्ट्रकार्य कसे साधावयाचे या प्रश्नाचा पाश्चिमात्य लोकानी निकाल लाविलेला आहे. आमच्यामध्ये अशा प्रकारचे शिक्षण कमी असल्यामुळे या गोष्टी अशक्य वाटतात. पण वास्तविक त्या तशा नाहीत. धार्मिक बाबतीत हाच न्याय लागू आहे. शैव वैष्णव गाणपत्य जैन वगैरे अनेक मताचे लोक असले तरी ती एका प्रमुख धर्माची अंगे असे समजून त्यांची एकवाक्यता कशी करता येईल याचा ज्या प्रमाणे विचार करावा लागतो, तद्वतच राजकीय बाबतीतील मतभेदांचीहि राष्ट्रातील मुत्सद्याना व्यवस्था लावावी लागते. गुणग्राहक दोषदर्शक स्वराज्यवादी स्वातंत्र्यवादी असे राजकीय बाबतीत आमच्या पुढाऱ्यामध्ये अनेक भेद आहेत. हे सर्व गृहस्थ राष्ट्राचे अभ्युदय इच्छिणारे आहेत हे परस्परानी प्रांजलपणे कबूल केले पाहिजे. आणि एवढी गोष्ट कबूल झाली की सर्वांचा एकोपा होण्यास अडचण पडणार नाही. स्वराज्य काय किंवा स्वातंत्र्य काय दोन्हीहि आमच्यापासून इतकी दूर आहेत की त्या दोहोमधील अंतर सध्या विचारात घेण्यासारखे नाही. दोन तारे एकमेकापासून लक्षावधी योजनाच्या अंतरावर असताहि पृथ्वीवरील

मनुष्यास आकाशात सारख्याच अंतरावर आहेत असे वाटते. तद्वत स्वराज्य व स्वातंत्र्य ह्या दोन्ही अंतिम हेतूंच्या बाबतीत आमच्या लोकांची स्थिति आहे.

"पुष्पवादी आणि फळवादी यानी उगाच तंटा करण्यात काय हशील ? बीज ज़मिनीत पेरा किंवा रोवा. त्यास पाणी घाला. दोघेहि तेच रोप जतन करून वाढवा. मग पुढे दोघांचीहि कार्यसिद्धि आहे. धार्मिक बाबतीत मीमांसा आणि औपनिषद दर्शन यात अशाच प्रकारचे मतभेद आहेत. यज्ञयागादि कर्मे करून स्वर्ग प्राप्ती करून घ्यावी किंवा त्यामुळे चित्तशुद्धि करून घेऊन पुढे ज्ञानाने मोक्ष मिळवावा हे दोन्ही दर्शनातील मतभेदांचे मुख्य प्रश्न आहेत. तथापि दोन्ही दर्शने हिंदु धर्मशास्त्रात प्रमुख मानली असून वैदिक धर्मांचे ते मुख्य आधारस्तंभ आहेत. स्वर्गप्राप्ति व मोक्ष मोहोर व फळ स्वराज्य व स्वातंत्र्य या तीन जोड्या अशा दृष्टीने विचार केला असता सारख्याच आहेत असे म्हटले तरी चालेल. यामधील पहिली दुक्कल वेदांतातील दुसरी व्यवहारातील व तिसरी राजकीय बाबतीतील आहे. या तिन्ही प्रसंगी अंतिम साध्यात कोणाचा कसाहि भेद असला तरी, बीज लावणे यज्ञदानतपादि क्रिया करणे आणि राष्ट्रीय सभेने काम चालू ठेवणे यामध्ये सर्वांचा एकोपाच असला पाहिजे. राष्ट्रीय सभेचे सभासद अमुक एक विशिष्ट मत स्वीकारणारेच असले पाहिजेत दुसऱ्याने येथे येण्याचे कारण नाही हा आग्रह तंट्याचे खरे कारण होय."

यापुढील लेखात 'सभेटाला खरी अडचण कोठे आहे' ह्या प्रश्नाचा विचार टिळकानी केला आहे. ते लिहितात-"२५-३० वर्षे काम केलेल्या फेरोजशहा मेथासारखे पुढारी सरकारास उघड रीतीने अडविण्याचा उपदेश लोकाना करण्यास कधीच तयार नव्हते व नाहीत. त्यांचा मार्ग अडवणुकीचा नाही. स्वतंत्र पण गोडीगुलाबीचा आहे. गेली दोन तीन वर्षे राष्ट्रीय पक्ष जेव्हा जोमाने पुढे आला तेव्हा या पुढाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. सरकारी अधिकारी त्याना विचारू लागले की "कॉंग्रेसला जर सरकारला अडवावयाचे नाही तर मग ह्या नव्या पक्षाचे ढोंग काय आहे ? आणि तुम्ही आजपर्यंत दिलाने जर खरे आहात तर मग ह्या नव्या पक्षाचा निषेध का करीत नाही ?" गोखले यानी कौन्सिलात ह्या प्रश्नाला उत्तर दिले. पण ते अधिकाऱ्याना समाधानकारक वाटले नाही. "जुन्या पक्षाची नव्या पक्षाला एवढी तरी फूस का असावी ? निदान जुना पक्ष आपल्या सहवासाचा व इभ्रतीचा फायदा तरी नव्या पक्षास देत आहे खास !" असे सरकारास वाटत होते. ही सरकारची मनातली शंका कशी काढून टाकावी हा जुन्या पुढाऱ्यापुढे पहिला मोठा प्रश्न होता. धरले तर चावते सोडले तर अंगावर येते अशी त्यांची स्थिति झाली होती. सरकारच्या बाजूने हा पेच झाला. लोकांच्या बाजूने पाहिले तर तीच अडचण होती. नव्या पक्षाची जोमदार मते उत्तरोत्तर अधिका अधिक प्रसृत होत चालली होती. आणि जुने पुढारी लोकास जर आपले पूर्वीचे मुत्सद्दीपणाचे मार्ग सांगू लागले तर त्यांचे कोणी ऐकत

नव्हता. इतकेच नव्हे तर या जुन्या पुढाऱ्यांचा देशाभिमान तितका तीव्र अगर जाज्वल्य नाही असेच त्यांच्यावर आरोप होऊ लागले होते. तिकडे पहावे तर सरकार खूष नाही इकडे पहावे तर लोक राजी नाहीत असे त्यांच्यावर दुहेरी संकट येऊन पडले होते. मोर्ले साहेबानी स्वराज्याला चांदोबा म्हणून निषेध केला म्हणून चांदोबा सोडावा तर ध्येय नाहीसे होते. बरे राष्ट्रीय पक्षाला जाऊन मिळावे तर जुन्या धोरणावर पाणी पडून सरकारचा संबंध अगदी तुटतो. या अडचणीमुळे सुरतेच्या प्रसंगाचा फायदा घेऊन नेमस्तानी सवता सुभा स्थापला. राष्ट्रीय सभा बुडावी असे कोणासच वाटत नव्हते. मात्र हा डाव दुसऱ्या पक्षाकडे जाऊ नये अशी जुन्या पक्षाची इच्छा होती. बंगाल्यातील ह्या दोन पक्षामधील विरोध मुंबईइतका तीव्र नव्हता. म्हणूनच बंगाल्यात हा तंटा उत्पन्न न होता मुंबईस प्रथम उत्पन्न झाला."

टिळकांनी केलेली ही मीमांसा काही खोटी नाही. नेमस्ताना हरप्रकारे नव्या पक्षाचा संबंध तोडावयाचा होता. पण नव्या पक्षाला जुन्या पक्षाच्या इभ्रतीचा फायदा स्वतःच्या तेजाच्या फायद्याबरोबर मिळाला असता तर अर्थात् हवा होता. म्हणून टिळकानी कॉंग्रेस कंन्टिन्युएशन कमिटीची स्थापना केली. आणि या कमिटीत सर्व प्रांताचे लोक असल्यामुळे सर्व प्रांतात ह्या समेटाला संमती मिळवून तो मुंबईच्या पुढाऱ्यांवर बाहेरच्या बलाने लादावा असा टिळकांच्या मनातील डाव होता. अरविंद घोष सारख्या लोकाना ह्या योजनेबद्दल मनातून फारसा उत्साह वाटत नव्हता. पण टिळकानी त्यांच्यावर फार भिस्त ठेवली नव्हती. याचे कारण या दोघातील स्वभावाचे अंतर. आणि ह्या स्वभावातील अंतरामुळेच भविष्यकाळी अरविंद घोष हे पांदेचरीस जाऊन निर्माल्यवत होऊन पडले आणि टिळकानी अखेर संयुक्त राष्ट्रीय सभा भरविली तिच्यात ते शिरले त्यानी ती काबीज केली. शेवटी १९१८–१९ साली जुना डाव नेमस्तावर परतवून त्यानाच वाटल्यास राष्ट्रीय सभा सोडून जाण्यास भाग पाडले.

सुरतेनंतर दोन महिन्याचे आत पबना येथे बंगाल प्रांतिक परिषद भरली. तेव्हा एका बाजूला सुरेंद्रनाथ दुसऱ्या बाजूला अरविंद घोष हे कोणते धोरण स्वीकारतात हे लोक मोठ्या उत्सुकतेने पाहात होते. परिषदेचे अध्यक्षस्थान रवींद्रनाथ टागोर यांच्याकडे देण्यात आले होते. ते कोणत्याहि पक्षात सामील नसल्याने समेट करण्याला सर्वस्वी योग्य होते. त्यानी जुन्या व नव्या पक्षाची मीमांसा करून सुरतेच्या भांडणात काही विशेष महत्त्व नाही असे सांगितले. व बंगाल्यात तरी जुन्या व नव्या पक्षाचा मिलाफ सुरतेनंतर झाला असून एका संयुक्त नॅशनॅलिस्ट पक्षाशिवाय दुसरा कोणताहि पक्ष बंगाल्यात नाही असे त्यानी जाहीर केले. पबना परिषदेचे धोरण १९०६ च्या दादाभाईच्या धोरणावर राहावे असा सर्वांनी मिळून प्रयत्न केला होता आणि त्याला यश आले. बहिष्कार हा परदेशी कापडापुरता न राहता 'बहिष्काराची चळवळ' हेच जुने

शब्द कायम राहिले. तसेच स्वदेशीच्या ठरावातील 'झीज सोसूनहि' हे शब्द गाळण्यात आले नव्हते. राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावात 'राष्ट्राच्या ताब्यातील शिक्षण' हे शब्द हि कायम राहिले. स्वराज्याच्या ठरावासंबंधी थोडा वाद झाला. वसाहतीच्या स्वराज्याचे ध्येय सर्वांनाच साधारण असे म्हणून ठरावात घालावे असे एक पक्षाचे म्हणणे होते. पण निर्भेळ स्वराज्यवादी परिषदेत आहेत हे एक व त्यानाहि परिषदेत स्थान आहे मज्जाव नाही हे दुसरे. म्हणून असे ठरले की या गोष्टी स्पष्टपणे जनतेच्या निदर्शनाला आणण्याकरिता स्वातंत्र्यवादी पक्षाने आपली फक्त उपसूचना मांडावी पण प्रत्यक्ष मते घेण्यास लावू नये. आणि वसाहतीच्या स्वराज्याच्या ध्येयाचा मूळ ठराव पुढे मांडला जाईल तेव्हा फार तर स्वतः मत देऊ नये.

पबना परिषदेचे दुसरे दिवशी मोतिलाल घोष हे अध्यक्ष असताना सुरेंद्रनाथ बाबूंनी व्याख्यान दिले. दोघानीहि सुरतेच्या बखेड्याचा आपापल्या परीने खुलासा केला आणि चतुःसूत्रीच्या पायावर सर्व पक्ष एक आहेत असे जाहीर केले. ह्या परिषदेमध्ये टिळकांच्या धोरणाचा पहिला विजय झाला. पबना परिषदेने मुंबईच्या पुढाऱ्यांचा अप्रत्यक्ष रीतीने निषेध केला. आणि कन्व्हेशनमध्ये भाग घेणारे सुरेंद्र बाबू पबना परिषदेत विरुद्ध पक्षाशी सहकार्य करतात याचा अर्थ पुढे मागे संयुक्त राष्ट्रीय सभा व्हावी असे बंगाली पुढाऱ्यांचे मत होते असा उघड झाला. आणि बंगाल्यात घडले ते मुंबईस का घडू नये ? मुंबईच्या पुढाऱ्याना एकीची किंमत कळत नव्हती. ते चढेल होते ते अरेराव होते त्यांची देशभक्ती अभिमान व अहंकार यांच्यापुढे मजल मारू शकत नव्हती असेच इतर कोणासहि त्यावेळी वाटू लागले असते.

पबनानंतर अलाहाबाद प्रांताच्या परिषदेची वेळ आली, म्हणून तेथे आपल्या मताला जागा किती मिळते हे पाहण्याकरिता टिळकानी केळकराना पाठविले. १९०७ साली या प्रांताने आपली पहिली प्रांतिक परिषद भरविली ती फारच रोडकी होती. प्रतिपक्षाला वगळून सभा भरविल्यामुळे प्रतिनिधींची संख्या ४० हून अधिक नव्हती. उलट राष्ट्रीयपक्षामार्फत जाहीर सभेत १५० प्रतिनिधी निवडले गेले. पं. मदन मोहन मालवीय यानी जहाल पक्षाचा विजय होईल किंवा दंगाधोपा होईल ह्या भीतीने पोलिसांची मदत घेतली. सुरतेच्या बखेड्यानंतर पंडितजींनी नेमस्त पक्षाच्या बालेकिल्ल्याची तटबंदी अधिक बळकट करण्याचे ठरविले. यामुळे खुद्द पंडितजींचे सहकारी व आप्तेष्टहि उघड टीका करू लागले. १९०८ सालची परिषद लखनौस भरली. तेव्हा पं. मदन मोहन यानी असे ठरविले की सुरतेस बनविलेला प्रतिज्ञालेख आपल्या परिषदेत अमलात आणावा. यामुळे राष्ट्रीय पक्षाच्या लोकानी, जरी हे लोक त्यावेळी थोडे होते तरी, या सभेवर बहिष्कार घालण्याचा निश्चय केला. व परिषदेस निवडलेल्या काही प्रतिनिधींनी चिटणीसाना असे लिहून कळविले की आम्ही ह्या

सभेला येऊ इच्छित नाही. मि. सीमिअन बाबू सत्यचरण मुकर्जी सुरेंद्र नाथ सेन पं. श्रीकृष्ण जोशी पं. बाळकृष्ण बाबू हरी मोहन रॉय बस्तिराम पार्वती चरण चतर्जी वगैरे थोडे लोक ह्या निषेधामध्ये होते. पण केळकरांच्या अनुभवाला असे आले की हे सह्या करणारे थोडे लोक पं. मदन मोहन यांच्याप्रमाणे सतत राजकीय चळवळ करणारे नसल्यामुळे त्यांचे वजन पडावे तसे पडत नव्हते. सुरतेच्या प्रकरणात पंडितजींचा खुद्द पुतण्या कृष्णकांत मालवीय हे पंडितजींच्या विरुद्ध होते. पण चुलत्यापुढे पुतण्याचे काय चालणार! पंडित मदन मोहन हे नेमस्ताहून नेमस्त बनलेले आणि शिवाय कार्यकर्ते यामुळे प्रांतात विरोधी पक्ष असूनहि त्याचे चीज झाले नाही. केळकर यांच्या प्रयत्नाने इतके मात्र झाले की या एकपक्षीय सभेतहि कन्व्हेंशन व प्रतिज्ञालेख यांच्यासंबंधाने ठराव आणला गेला नाही. यापुढे दोन महिन्यानी अलाहाबाद येथे कन्व्हेंशनची सभा भरणार होती आणि मुंबईच्या पुढाऱ्यानी ती यशस्वी करण्याचा सर्व भार पं. मदन मोहन याजवर टाकला होता. शिवाय रमेश चंद्र दत्त हेहि त्या सुमाराला लखनौस जाऊन त्यानी कनव्हेनशनला अनुकूल असे मत प्रगट केले होते. तथापि कनव्हेंशनच पुढे चालवावी व संयुक्त राष्ट्रीय सभा टाकून द्यावी असला ठराव परिषदेत येऊ शकला नाही.

## ( ११ ) संयुक्त काँग्रेसची चळवळ

सुरतेस काँग्रेस मोडल्यावर ती फिरून जोडण्याची खटपट निदान टिळकांच्या बाजूने सुरतेसच सुरू झाली. राष्ट्रीय सभेत हवे तितके भांडू असे टिळक म्हणत असल्याचे प्रसिद्ध आहे. पण राष्ट्रीय सभा मोडू असे त्यानी म्हटल्याचे कोठें प्रसिद्ध नाही. राष्ट्रीय सभेसंबंधाने त्यांची वृत्ति खरी सांगावयाची तर ती या शब्दात सांगता येईल. "आम्ही भांडू पण मोडणार नाही आणि तुम्ही मोडली तरी आम्ही पुनः जोडू." उलट नेमस्तांची खरी वृत्ति पाहिली तर वेणी संहारातील भीमाच्या शब्दानीच ती वर्णन करावी लागेल. "भीमो विघटयति यूयं घटयथ" म्हणजे आम्ही तर सभा फोडणारच तुम्ही कशी जोडणार ती जोडा पाहूं! टिळकांच्या वरील वृत्तीला पुष्कळानी पुष्कळ प्रकारे नावे ठेवली आहेत. त्यांचे काही अनुयायी व काही प्रतिपक्षी म्हणत "टिळक लोचट आहेत. नेमस्तानी झाडून टाकण्याचा प्रयत्न केला तरी पुनः ते त्यानाच चिकटू पाहातात." इतर काही अनुयायी म्हणत "आपण स्वतंत्र राहू आणि आपल्या कार्यक्रमात नेमस्तापेक्षा अधिक तेज आहे असे जगाला व सरकारालाहि दाखवू. नेमस्ताच्या घोटाळ्यात पडून पदोपदी खुल्या दिलाने मनपसंत बोलण्याच्या कामी उगीच अडथळा व जिकीर किती सोसावी! नेमस्त वेगळे राहून लवकरच आपल्या खऱ्या गुणानी लोकाना दिसून पडतील. आमचे आच्छादन त्यांच्यावर घालून त्याना उगाच देशभक्तीचे खोटे वाटेकरी का करा!"

उलट कट्टर नेमस्त म्हणत की "टिळकाना आपले अनुयायी घेऊन सवता सुभा स्थापन करण्याचे धैर्य आहे कोठे? त्यानी आपले राज्य वेगळे स्थापले तर चार विद्वान डोकी किंवा चार पदवीधर आमच्याप्रमाणे त्यांच्या राज्यात दिसणार नाहीत. पुष्कळसे तेली तांबोळी अज्ञानी अडाणी आडमुठे खेडवळ लोक आणि शिंगे मोडून वासरात शिरणारे स्वतः टिळकासारखे चार बुद्धिवान सुशिक्षित लोक. पण अज्ञानी काय राज्य स्थापले जाते? ते तेव्हाच मोडावयाचे. टिळकांचे राज्य स्वतंत्र स्थापले गेल्याबरोबर काय होईल तर ते जसे आज आम्हाला छळतात तसे त्यांचे अनुयायी त्याना छळू लागतील. ते जसे आज आम्हाला मवाळ म्हणतात असे त्यांच्यांतले ज्वलज्जहाल लोक आज जहालीची फुशारकी मिरविणाऱ्या टिळकाना उद्या छळू लागतील. आमचे नाव सांगून टिळकाना आज सामोपचाराचा बहाणा करता येतो. उद्या ते त्यांच्यांतच असले तर सामोपचाराची भाषा सरकाराशी बोलणे हा त्या राज्यातला गुन्हा ठरेल. टिळकांच्या अंगी ज्वलज्जहालांचे धैर्य नाही आणि आम्हा नेमस्तांच्या अंगातला मुत्सद्दीपणा नाही. टिळकाना कायद्याचे मर्म चांगले कळते म्हणून ते बेकायदेशीर अशी गोष्ट सहसा करवू देणार नाहीत पण अनुयायांच्या दृष्टीने हीच गोष्ट त्यांच्याविरुद्ध जाईल. आणि कायदेशीर विधायक स्वरूपाची एखादी चळवळ टिळक करण्याला काढतील तर त्यांच्या राज्यातील लोकांचे अज्ञान दिसून पडेल. टिळकांचे अनुयायी सगळे हुच्चे हुल्लड करण्यात पटाईत पण एकाने तरी कोणत्याहि विषयाचा सांगोपांग अभ्यास केला आहे काय? सरकार दरबारला अनुलक्षून काही लिहिणे बोलणे युक्तिवाद करणे सजवून मांडणे आधार देणे अशी वेळ आली म्हणजे त्यांच्यात या कामाला योग्य अशी चारदोन माणसेहि मिळावयाची नाहीत. येऊन जाऊन टिळक हे एकटे असे आहेत की हुल्लड करण्याचा प्रसंग आला तर हुल्लड करतील आणि एखाद्या विषयावर लिहिण्याबोलण्याची वेळ आली तर पूर्वीचा नसला तरी आयत्या वेळी अभ्यास करून आमच्या बरोबरीने एखाद्या प्रश्नाची सजावट करतील. पण एका झाडाने काही बगीचा होत नाही. आपल्या पक्षाचे हे दुतर्फी व्यंग झाकण्याकरिता टिळकाना नेहमी नेमस्तपक्षाला बिलगून राहावयाला पाहिजे. पण टिळक म्हणजे अस्तनीतील विंचू किंवा जोड्यातला खडा. लवकर बाहेर पडावयाचा नाही आणि आत राहील तोपर्यंत जाच केल्याशिवाय राहावयाचा नाही. तेव्हा आता टिळकानी आपल्याच गुणानी ही बरी संधि आम्हाला प्राप्त करून दिली आहे. कॉंग्रेस मोडली तर ती टिळकानीच मोडली असे लोक म्हणणार. आणि ती मोडल्याचा फायदा घेऊन आपण जर भोवती क्रीडचा खंदक खणून आणि घटना व नियम यांच्या भिंती बुरुज उभारून आत राहून कारभार करू तर आपले राज्य संघटित होईल आणि जहाल पक्षाच्या हल्ल्यापासूनहि त्याचा बचाव होईल. उलट टिळकांच्या बाजूला असले बचावाचे साधन काहीच नाही. आपसात फूट माजेल, अनुयायी मैदानभर सैरावैरा करू

लागतील. मग उलट त्यांच्यावर हल्ला करण्याला अनेकाना अनेक वाटा मोकळ्या राहतील. आणि ह्या मैदानी शिलेदारांचा तळ हल्ला करून मोडून काढण्याला सरकारला कितीसा अवकाश" ?

अशा रीतीने आपले व परके काय बोलतात किंवा बोलत असतील याची कल्पना टिळकाना नव्हती असे नाही. पण राष्ट्रीय सभा ही हिंदुस्थानात एकटी एकच असली पाहिजे मग त्यात पक्ष कितीहि असोत हे टिळकांचे मत प्रथमपासून अखेरपर्यंत कायम होते. त्याकरिता त्याना या दोन्ही बाजूशी भांडावे लागत होते व दोघाहि कडून निंदा करून घ्यावी लागत होती. राष्ट्रीय सभा एक असावी आणि तीत प्रमुखपणा मानानेच नसला तरी कृतीने तरी मध्यम जहाल पक्षाकडे असावा अशी त्यांची कल्पना होती. एकत्र राहिल्याने नेमस्त हे कायद्यापासून कोणाचा बचाव तो काय करणार ? कारण येऊन जाऊन सरकार खटले करील एवढीच भीति. आणि त्याला भिऊन तुम्ही आमच्यात मिसळता किंवा आम्हाला मिसळून घेऊ पहाता असे म्हणणे एवढीच नेमस्तानी जहालाना खिजविण्याची जागा. पण यात फारसे स्वारस्य नव्हते. कारण एकजात निवळ जहालांची राष्ट्रीय सभा झाली तरी ती सर्व सभाच्या सभा बेकायदेशीर ठरविणारा समितीच्या कायद्यासारखा कायदा अद्यून झाला नव्हता. आणि नेमस्त समाविष्ठ असलेल्या राष्ट्रीय सभेत कोणी असला म्हणून व्यक्तिशः त्याचे लिहिणे बोलणे हे जमेस धरून सरकार त्यावर खटला करणार नाही असे थोडेच होते ?

आज कायदे कौन्सिलात कोणी काही बोलला आणि ते काय वाटेल ते असले तरी त्याच्यावर खटला होऊ शकत नाही असे काही संरक्षण नेमस्तांच्या साहचर्यामुळे सरकारने किंवा कायद्याने राष्ट्रीय सभेला किंवा कोणत्याहि परिषदेला दिले नव्हते. अर्थात नेमस्त पक्षाचा राजकारणाच्या युद्धात ढालीसारखा उपयोग करण्याचा टिळकांचा हेतू होता या म्हणण्यात अर्थ नाही. पाप पुण्य किंवा कर्मभोग याचा धनी जसा शेवटी व्यक्तिमात्रच होय त्याप्रमाणे कोणावर खटला व्हावयाचा तर तो प्रत्यक्ष त्याच्याच शब्दाकरिता लेखाकरिता किंवा कृत्याकरिताच होणार. तसले शब्द लेख किंवा कृत्य कोणा व्यक्तीच्या अंगाशी आणून भिडविण्याइतका सरकारजवळ पुरावा नसेल तर तो मनुष्य सरकारला कितीहि अनिष्ट वाटला तरी सरकारला त्याच्यावर खटला करता येत नाही. उलट तसा तो आणून भिडविता आला तर नेमस्त पक्ष किंवा एखादी नेमस्त ठळक व्यक्ती यांचा स्नेह ऋणानुबंध किंवा कृपा असली म्हणून खटला झाल्याशिवाय राहिला नसता.

१९०७ ते १९१० या सालात समाजामध्ये नेमस्तापासून अत्याचारी लोकापर्यंत पुरी गल्लत झाली होती. यामुळे तर फोडून निरनिराळे पक्षच काय पण निरनिराळ्या व्यक्ती एकमेकापासून होतील तितक्या अलग कराव्या असा सरकारचा प्रयत्न आतून बाहेरून एकसारखा सुरू होता. पण माणुसकीच्या भले-

पणाने रक्तसंबंधाने ऋणानुबंधाने व्यक्तिप्रेमाने गुणलोभाने समान अभिरुचीने व्यापक सार्वजनिक हितबुद्धीने देशाभिमानाने व सरकाराविषयीच्या समान अप्रीतीने—या सर्वांनी मिळून उभे आडवे तिडवे असे धागे इतके पसरले होते की दुरून पाहणाराला ते सगळे अखंड एकच वस्त्र दिसे. दहा रंग तरी चित्र एक! दहा भाषा तरी भावना एक! हे काय गौडबंगाल आहे हे सरकारालाहि उमगेना. 'पायोनियर'ने तेव्हा म्हटलेहि की सरकारी नोकरीतील हिंदी मनुष्यापासून तो अत्याचारी जहालापर्यंत दुव्यानी जोडलेली सगळी एकच साखळी दिसते!'

पण या म्हणण्यात फारसा अर्थ नाही. कोणत्याहि देशातील समाज असाच असतो. आज इंग्लंडात पाहिले तरी काय आहे? सामाजिक व्यवहाराच्या दृष्टीने कट्टा कॉन्झरव्हेटिव्ह आणि बहकलेला बोल्शेविक ही दोन टोके जोडून त्यांची साखळी बनविणारे असे मध्यंतरी चारदोनच दुवे आहेत. पैसे टाकून जेथे जेवता खाता येते अशा उपहारगृहात किंवा मोठ्या हॉटेलात या निरनिराळ्या दुव्यातील लोक म्हणजे निरनिराळ्या पक्षातील लोक एकत्र बसलेले दिसतील. एवढेच नव्हे तर खाजगी किंवा अर्ध सार्वजनिक अशा सभात समारंभात किंवा इतर प्रसंगातहि ते एकमेकाचा फारसा विटाळ न मानता एकत्र बसतात असेच आढळून येईल. प्रत्येक घराला कुलूप लावण्याची व्यवस्था असली तरी भिंतीला भिंत लागलेल्या घरांचाच मिळून गाव होतो. त्याप्रमाणे सरकारचे स्तुतिपाठक, तोंडाचे राजनिष्ठ, मनाचे राजनिष्ठ, जाणून बुजून नेमस्त, बुद्धिनिष्ठ नेमस्त, भावनानिष्ठ नेमस्त, नरम उबट ऊन गरम तप्त धुरट व ज्वलत अशा राजकीय मतांच्या लोकांचा मिळूनच समाज बनतो. म्हणून फोडून झोडण्याची सरकारची नीति खटले करण्याच्या दृष्टीने फारशी सिद्धीला गेली नाही.

सरकार आपल्याकडून नेमस्त किंवा मवाळ लोकाना म्हणे की 'तुम्ही जहालाशी संबंध का ठेविता? आणि त्यांच्या ठिणग्या आपल्यावर पाडून आपले घर जाळून का घेता'? इतकेच नव्हे तर भावाने भावाला भाऊ म्हणू नये, किंवा माझी बायको जहाल आहे पण मी मवाळ व राजनिष्ठ आहे असे नवऱ्याने व्यक्त करावे येथपर्यंत सरकारच्या प्रयत्नाची मजल गेली होती. पण तो प्रयत्न निष्फळ ठरला. साधण्याच्या इतर रीतीने तो थोडासा साधला नाही असे नाही. कारण राजकीय पक्षभेदाप्रमाणे राजकीय पक्षघटनाहि पुष्कळशा वेगवेगळ्याच राहिल्या आहते. आणि स्वतःशी हिशेब करणे किंवा तिऱ्हाइताला हिशेब दाखविणे यापुरती वेगवेगळी गणना त्याना यांची करता येते. पण ऐनजिनशी फूट व्हावी म्हणजे आपल्याला खरी जामिनकी मिळेल ही जी सरकारची अपेक्षा ती मात्र व्यर्थ ठरली. व याचे कारण हेच की खटले होण्याच्या दृष्टीने खाजगी संबंध जसे लोकाना तसे सरकारालाहि नडले नाहीत. बारीक सुताचा ताणा गुंतला असता कुशल विणकर जसा आंकडेदार सुईने हवा तो नेमका धागा उचलून वर काढतो त्याप्रमाणे सरकारहि ज्याच्यावर खटला होण्यासारखा असेल तो मनुष्य नेमका अलग करून

त्याच्यावर खटला भरीत असे. साहचर्याने कायद्याची बाधा झाली अशी फारच थोड्याना. झाली असेल ती ज्याच्या त्याच्या जबाबदार कृत्यानेच. उलट साहचर्याने कोणाचे संरक्षणहि झाले नाही. विजापुरकर गोखल्यांचे स्नेही म्हणून त्यांच्यावर खटला होण्याचा राहिला नाही आणि नानासाहेब देशमूख टिळकांचे स्नेही म्हणून त्यांच्यावर खटला झाला नाही.

हे खुलासेवार विवेचन करण्याचा हेतु हाच की नेमस्तपक्षाच्या साहचर्याने व्यक्तिशः कोणा जहालाचे किंवा जहालपक्षाचे संरक्षण व्हावे अशी टिळकांची इच्छा नव्हती किंवा होईल ही अपेक्षाहि नव्हती. नेमस्तानी वाटले तर म्हणावे की यमाचे पाश आपणावर पडू नयेत म्हणून मार्केडेयाने ज्याप्रमाणे शिवाच्या पिंडीला कवटाळून धरून आत्मरक्षण केले त्याप्रमाणे राष्ट्रीय सभेत नेमस्तांच्या गळी पडून किंवा त्याना गळी पडवून घेऊन टिळकाना जहाल व अत्याचारी लोकांचे संरक्षण मिळवावयाचे होते. पण हा हेतू टिळकांच्या स्वाभिमानाला अपमानास्पद किंवा त्यांच्या व्यावहारिक कुशाग्र बुद्धीलाहि दूषणास्पद असाच ठरतो. आणि वास्तविकपणे तो टिळकांच्या मनात नव्हताहि. त्याना राष्ट्रीय सभा एकच एक असावयास हवी होती ती याचकरिता की शक्य तर राष्ट्राने एकमुखाने बोलावे आणि ते बोलता यावे याकरिता जरूर तितका सामोपचार राष्ट्रीय पक्षातील अनेक पक्षात राहावा.

आता यात एक दोष येतो की अशा संयुक्त सभेत नेहमी टीकास्पद असे गौण स्थान नेमस्ताकडे आणि टीकाकारांचे उज्ज्वल स्थान जहालांकडे येते हे टिळकाना माहीत असलेच पाहिजे. पण ही गोष्ट टिळकाना माहीत होती इतकेच नव्हे तर तशी स्थिति राहावी अशीहि त्यांची इच्छा होती. आणि हे दिसण्यात दिसणारे दूषण पण खरे असणारे भूषण नेमस्त पुढाऱ्यानी अंगिकारावे, आपली विवेचकबुद्धी व जहालांची भावना यांचे योग्य संमिश्रण करून त्याच्या रंगाने राष्ट्रीयत्वाचे भरीव चित्र बनवून ते जगाला दाखवावे, आणि वेळी प्रसंगी सरकारच्या डोक्यावर ते हाणावे अशी संयुक्त राष्ट्रीय सभेविषयी टिळकांची कल्पना होती. या मोबदल्यात प्रत्यक्ष बहुमानाची स्थाने नेमस्ताना देण्याची त्यांची तयारी होती. माझ्या हातून राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष म्हणून जे कार्य होईल त्यापेक्षा मी विरोधी पक्षात राहिल्याने अधिक कार्य होईल असे ते नेहमी म्हणत. आणि वास्तविक त्यांची मनोरचनाहि विरोधाला जितकी अनुकूल तितकी मिळून काम करण्याला अनुकूल नव्हती.

पण ही नुसती बोलण्याची भाषा नव्हती हे सहज सिद्ध करता येईल. एके प्रसंगी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष म्हणून आपले नाव मागे घेऊन त्यानी लजपतराय यांचे नाव पुढे केले. १९१८ साली त्याना राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडले असता तो मान टाकून ते चिरोल केस भांडण्याकरिता विलायतेत गेले. आणि १९१९ साली विलायतेत असता ते अध्यक्ष कोण होणार याची चौकशी

करीत होते ते आत्मनिरपेक्ष ही गोष्ट त्यांच्या पत्रावरून पुढे एके ठिकाणी दिसून येईलच. १९२० साली ते आजारी पडण्यापूर्वी स्पेशल कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांचे नाव सुचविण्यात येऊ लागले होते. पण त्यावेळीहि त्यानी नकार घातला त्याचे कारणहि आपल्याला विरोधी पक्षात राहूनच योग्य ते काम करता येईल असे त्यांचे मत होते हेच होय. नेमस्तानी प्रगतिपर किंबहुना जहाल अशा मताना आपल्या वजनाचा फायदा द्यावा व आपण त्याना मानाच्या जागा द्याव्या या टिळकांच्या योजनेला कोणी क्रयविक्रय म्हणतील पण यात वावगे ते काय आहे? विलायतेत प्रधानमंडळे बनतात तेव्हाहि काही बहुमानाच्या इच्छेने असले तर काही कार्यावर नजर देऊनहि आपल्या मताना मुरड घालण्याला मुत्सद्दी तयार होतात. आणि काही झाले तरी काही म्हटले तरी नेमस्तापेक्षा मध्यम जहाल मत हेंच हिंदुस्थानात दिवसेदिवस अधिकाधिक प्रगतिपर होत जाणार हे ओळखून नेमस्तानीहि आपल्या मताना अशीच किंचित् मुरड घालून संयुक्त राष्ट्रीय सभा चालवावी असे टिळकांचे मत होते ही गोष्ट खोटी नाही व नाकबूल करण्यात अर्थ नाही.

असो. सुरतेसच संयुक्त कॉंग्रेस भरविण्याची खटपट करण्याकरिता कमिटी नेमण्यात आली. पण कमिटीत मात्र दुतर्फी लोक नव्हते. याचे कारण राष्ट्रीय सभा संयुक्त व्हावी ही इच्छाच मुळी दुतर्फी नव्हती. नेमस्तानी वेगळी कन्व्हेन्शन भरविली. प्रथम एका प्रतिज्ञापत्रकावर सही करून आले तेवढेच लोक आत घेतले आणि राष्ट्रीय सभेची कायमची घटना करण्याकरिता त्यानीहि एक कमिटी नेमली. चार महिन्यानी त्यानी आपली घटना कायम करून दरवर्षी राष्ट्रीय सभेचे नाव घेऊन नाताळात सभा भरविण्याचे काम पूर्वीप्रमाणे सुरू केले. स्वतंत्र राहण्याची त्यानाच खरी इच्छा होती. याची हीच खूण की त्यानी इकडे तिकडे वळून पाहिले नाही आणि जहाल पक्षाचे लोक आपल्यात येऊन कसे मिसळतील याचा त्यानी विचार किंवा काळजी केली नाही. उभयान्वयी असे लोक प्रत्येक पक्षात असतात. या शब्दाला वाईट व चांगले असे दोन्ही अर्थ आहेत. वाईट अर्थाने उभयान्वयी म्हणजे दुतोंडे, मवाळात मवाळासारखे बोलणारे जहालात जहालासारखे बोलणारे मवाळात बसून जहालांची निंदा करणारे व जहालात बसून मवाळांची निंदा करणारे हे होत. चांगल्या अर्थाने उभयान्वयी लोक म्हटले म्हणजे ते यांच्या अगदी उलट. ते मवाळात बसून जहालासारखे बोलणारे जहालात बसून मवाळासारखे बोलणारे. मवाळात बसून जहालांचे गुण घेणारे व जहालात बसून मवाळांचे गुण घेणारे. या दोन्ही प्रकारच्या उभयान्वयी लोकाना हे दोन सवते सुभे नको होते. त्याना ही संयुक्त राष्ट्रीय सभाच हवी होती. त्यांतल्या त्यात चांगल्या अर्थाच्या उभयान्वयी लोकांच्याबद्दल काहीतरी आदर असतो म्हणून सलोखा सामोपचार समेट यांचा उद्योग व प्रयत्न झाला तर अशा वर्गाकडूनच होतो. पण या वर्गाचे लोक थोडे होते व त्या

थोड्यांची दोन्ही पक्षाकडे वाटणी झाली होती. या लोकांचा जय शेवटी होतो पण त्याला वेळ लागतो. नेमस्तपक्षात अशा प्रकारचे काही लोक होते. पण मुंबईचे मेथा वाच्छा गोखले खरे यांच्यापुढे त्यांचे काही चालत नव्हते. म्हणून त्यांचे काम एकतंत्री आणि फुटीचेच पण सुसंगत असे चालले.

फेब्रुवारी महिन्यात कन्व्हेंशन कमिटीने तयार केलेली घटना एप्रिलात अलाहाबाद येथे पक्की करण्यात आल्यावर संयुक्त राष्ट्रीय सभा होण्याची आशा बरीच कमी झाली. बंद पडलेली राष्ट्रीय सभा तशीच तेथेच पुन्हा करावी अशी सूचना टिळकानी बंगाल्यातून करविली होती. आणि ती मान्य झाली असती तर रासबिहारी हेच अध्यक्ष असे म्हणून टिळकांचे अनुयायी राष्ट्रीय सभेला मिळून राहिले असते. आणि कलकत्त्याचे ठराव न बदलले जावे अशाविषयी त्यानी प्रयत्न करावयाचे ते केले असते. सुरतेस सभा मोडली नसती तर जी गोष्ट करणे त्याना प्राप्त होते आणि जी केली असता सभा मोडली नसती तीच पुढे चार महिन्यानी करावयास ते मनाने तयार झाले. पण जितके टिळकांचे एक पाऊल पुढे तितके नेमस्तांचे मागे. आणि आता तर अलाहाबादची घटना आडवी पडली. मवाळानी प्रतिज्ञापत्रकावर सह्या पूर्वीच केल्या होत्या त्यांना घटनेचे संकट काहीच वाटले नाही. पण प्रतिज्ञापत्रकावर सह्या कराव्या लागतात त्या लागू नयेत असे म्हणून जे सुरतेसहि बाहेर राहिले त्याना तीच गोष्ट करणे अवघड झाले. दुसरे पक्षी पबना व धुळे येथे संयुक्त राष्ट्रीय सभेची जितकी कारवाई करता आली तितकीच कायती. तिच्या पलीकडे इतर प्रांतात फारशी मजल गेली नाही. संयुक्त सभेची खटपट सर्व हिंदुस्थानात करण्याकरिता नेमिलेल्या चिट-णिसानी टिळकांवर खटला होऊन ते तुरुंगात जाईपर्यंत फारशी खटपट केली नाही व पुढे केली तिला फार यश आले नाही. पबना येथे सुरेंद्रनाथ हे इतर मंडळीशी मिळून चालले पण अलाहाबादेस त्यानी पबनापरिषदेचे ठराव कन्व्हेंशनपुढे मांडिले नाहीत. अलाहाबाद येथील सभेपूर्वी एक आठवडा रवींद्रनाथ टागोर यांच्या घरी उभय-पक्षांची एक सभा झाली. त्यात असे ठरले की कन्व्हेन्शनवाल्यानी पबना येथील ठराव मान्य न केले तर सुरतेची सभा पुढे चालविण्याची सूचना करावी. हे काम आशुतोष चौधरी यांजकडे दिले होते पण त्यानी ते केले नाही. अलाहाबादेहून ते परत गेल्यावर याबद्दल बंगाली वर्तमानपत्रातून वाद झाला. येऊन जाऊन आशा डॉ. घोष यांची उरली. सुरतेचे अध्यक्ष म्हणून त्यानीच सभा बोलाविली तर त्यात काही तरी तथ्य निघेल मग मेथा वगैरे मंडळी सभेला येवोत अगर न येवोत. डॉ. घोष यानी ही गोष्ट अंगाबाहेर टाकिली तर राष्ट्रीय पक्षाने आपली म्हणून राष्ट्रीय सभा बोलावण्याशिवाय गत्यंतर नाही असे मोतीलाल घोष यांचे म्हणणे पडले. जुनी राष्ट्रीय सभा पुढे चालली किंवा न चालली तरी बंगाल्याला काही धक्का नाही. कारण बंगाल्यात उभयपक्षांची एकी इतर प्रांतापेक्षा अधिक होती. पण इतर प्रांतात कन्व्हेन्शनवाले व त्यांचे साथीदार सरकारच्या गळ्यात

जाऊन पडतील आणि राष्ट्रीय पक्ष फुटून निघाल्यामुळे त्याला मात्र छळ सोसावा लागेल असेच मोतीलाल घोष यांचे म्हणणे होते. टिळकांच्या तडजोड कमिटीच्या चिटणीसानी वाच्छा आणि गोखले याना पत्रे लिहून देव कौल कसा देतो हे अजमाविण्याचा प्रयत्न केला. पण देवानी कौल देण्याचे नाकारिले. तुमच्याशिवाय आमचे चालते. आमच्याशिवाय तुमचे चालत नसेल तर आम्ही म्हणतो तसे करा ! हाच अर्थ वाच्छा गोखले यानी केवळ आपल्या मौनाने स्वराज्य पक्षाला कळविला. धुळ्याच्या परिषदेत चिंतामणराव वैद्य केळकर व डी. के. देसाई याना मुंबई इलाख्यात संयुक्त सभेची खटपट करण्याकरिता चिटणीस नेमिले होते. त्यानी आपल्या कमिटीची सभा जून महिन्यात भरविली. आणि मुंबई इलाख्यातील लोकमत अजमावण्याचे काम आपल्याकडे ठेवून सर्व हिंदुस्थानातील मत अजमाविण्याकरिता विनंतिपत्रक काढण्याविषयी सुरतेस नेमिलेले चिटणीस माधवराव बोडस याना लिहिले. या बोडसांच्या कॉ. कं. कमिटीला अधिकार सर्व हिंदुस्थानभर ठेवलेला होता. शिवाय प्रांतानिहायहि खटपट करण्याला काही गृहस्थ नेमलेच होते. वर सांगितलेल्या-कारणामुळे अनुयोगित्व म्हणजे कार्याचा प्रारंभ नेमस्तांच्या कन्व्हेन्शनकडे आलं होता आणि प्रतियोगित्व टिळक पक्षाकडे आले होते. म्हणजे नेमस्तानी प्रथम काही करावे आणि ते पाहून त्या धोरणाने आपण आपले काम करावे अशी टिळकपक्षाची बाजू होती. म्हणून १९०८ च्या एप्रिलपर्यंत म्हणजे अलाहाबादेस कन्व्हेन्शनवाल्यानी कॉंग्रेसची आपली घटना तयार करीपर्यंत बोडसांच्या कमिटीने सहजच काही हालचाल केली नाही. दरम्यान कन्व्हेन्शनवाल्यातच काही फूट पडते का ? एखाद्याला पश्चात्ताप होतो का ? एखाद्याला समेटाची हौस उत्पन्न होते का ? घटना करण्याच्या कामातच एकमेकाची भांडणे लागतात का ? किंवा सर्वांनी मिळून घटना मान्य केली तीत समेटाचे बोट शिरकविण्यासारखी फट किंवा घोडे दामटण्यासारखे खिंडार पडते का ? हे पाहण्याकरिता टिळक टपून बसले होते. व याहिपेक्षा त्यांचा महत्त्वाचा प्रयत्न म्हटला म्हणजे प्रत्येक प्रांतात खटपट करून लोकमत कन्व्हेन्शनवाल्याविरुद्ध तयार करावयाचे व नव्या घटनेला होतील तितके कमी लोक मिळू द्यावयाचे.

लखनौ अलाहाबादेकडे हा प्रयत्न फारसा सिद्धीस गेला नाही. मद्रासकडे तो सिद्धीस जाण्याची आशाच नव्हती. पण बंगाल्यात तो प्रयत्न बराच सिद्धीस गेला. किंबहुना पबना येथील प्रांतिक परिषदेत उभय पक्षांचे लोक जमून त्यानी सलोख्याने सभा पार पाडली यामुळे मेथा गोखले पक्षाला एक प्रकारे भीतीच उत्पन्न झाली. व हेच काम पुढे असेच नेटाला लागले असते. पण टिळकावर १९०८ च्या जून महिन्यांत खटला झाला व तेथपासून टिळक या कामाला सहा वर्षे निकामी झाले. जुलैअखेर टिळकाना शिक्षा झाली. त्यानंतर त्यांच्याशिवायच काय करता येईल ते करणे बोडसांच्या कमिटीला प्राप्त झाले. ता. १५ ऑगस्ट रोजी बोडस यानी एक सर्क्युलर काढून ते सर्व हिंदुस्थानभर पाठविले. त्यात

प्रथम आजवर हे काम करता आले नाही असे मोघम लिहून नंतर पुढील अर्थाचा मजकूर घातला होताः—

"मुंबई व बंगाल्यातील अनेक कॉंग्रेस भक्ताना लोकमत स्थिर होईपर्यंत काही दिवस काहीच करू नये असे वाटत होते. समेटाचे प्रयत्न आजवर अनेक झाले पण ते फुकट गेले. धुळ्याच्या प्रांतिक परिषदेतेहि एक कन्सीलिएशन कमिटी नेमली गेली. पण चोहोकडे दडपशाही सुरू आणि नेमस्तांच्या हटवादी-पणामुळे काहीच करता आले नाही. तरी आता आपण खटपटीला लागले पाहिजे. कन्व्हेन्शनवाल्यानी आपला एक मार्ग अनुसरला तसा आपला आपणहि अनु-सरला पाहिजे. म्हणून खालील प्रश्न मी आपणाकडे पाठवीत आहे. कॉंग्रेस कमिट्या राजकीय संस्था म्हणजे प्रायः कॉंग्रेसचे मतदार संघ या सर्वांकडे मी हे प्रश्न पाठवीत आहे. त्यांची उत्तरे आली म्हणजे त्यांचा सारांश काढून आमच्या कमिटीपुढे ठेवू मग कमिटी योग्य तो निर्णय करील. ते पांच प्रश्न असेः—

(१) सर्व राजकीय पक्षांची मिळून एक राष्ट्रीय सभा असावी की प्रत्येक पक्षाची वेगळी असावी?

(२) एखादी क्रीड किंवा प्रतिज्ञा लेख तयार करून त्यावर सही केल्या-शिवाय कोणाला कॉंग्रेस डेलिगेट होताच येऊ नये असा निर्बंध घालावा की काय?

(३) सुरतेस जे काम झाले तेथे तेविसावी राष्ट्रीय सभा मोडली व अधिवेशन संपले असे मानावे? किंवा काम असे काही झालेच नाही म्हणून ती सभा पुढे चालू करावी? अर्थात् पुढे भरणाऱ्या राष्ट्रीय सभेला २३ वी म्हणावे की २४ वी म्हणावे?

(४) १९०६ साली कलकत्ता येथे जी ऑ. इं. कॉं. कमिटी नेमली गेली तिचा अधिकार संपला असे समजावे की पुढील कॉंग्रेसपर्यंत तिचा अधि-कार चालूच आहे असे समजावे?

(५) कोणत्याहि रीतीने ही ऑ. इं. कॉं. कमिटी उपयोगी पडत नाही असे ठरले तर पुढील राष्ट्रीय सभा बोलावण्याची खटपट कोणी व कोणाच्या नावाने करावी?

उत्तरे कृपाकरून ११ ऑगस्ट पर्यंत पाठवावीत."

ही सवालपत्रे सुमारे २–३ शे पाठविण्यात आली असावीत. व अनेक लोकानी त्याची उत्तरेहि पाठविली. त्यावरून असे दिसून आले की होताहोईतो खालील तीन विचार बऱ्याच लोकाना पटत होते.

(१) राष्ट्रीय सभा शक्य तोवर संयुक्तच असावी.

(२) हा संयोग साधण्याकरिता राष्ट्रीय पक्षाने थोडीबहुत पड खावी.

(३) पण अलाहाबाद येथे मंजूर झालेला प्रतिज्ञालेख लोकांच्या बोकांडी बसवूं नये.

या तीन गोष्टींनंतर किरकोळ बाबतीत पुष्कळच मतवैचित्र्य होते. कोणी म्हणे पुढच्या राष्ट्रीय सभेला २३ वी म्हणावी. कोणी म्हणे २४ वी म्हणावी. त्याला अनुसरून कोणी म्हणे राष्ट्रीय सभा तहकूब राहिली म्हणून ती पुन्हा तेथे सुरतेसच भरावी आणि अध्यक्ष स्वागताध्यक्षहि तेच असावेत. कोणी म्हणे कोणतीहि गोष्ट एकेकदाच होत असते म्हणून ते स्वागताध्यक्ष नकोत ते अध्यक्ष नकोत व ती सुरतेची आठवणहि नको, समेट व्हावयाचा तर त्याला सर्व गोष्टी कशा कोऱ्या कागदासारख्या स्वच्छ असाव्या लागतात. कोणी म्हणे प्रतिज्ञालेखापेक्षां देखील डेलिगेट कोणी निवडावे हाच प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे म्हणून त्यावर समेट झाला तर बाकीच्या सर्व गोष्टी. उलट कोणी म्हणे डेलिगेट कोण आले गेले किंवा कोणी निवडले याला फारसे खरे महत्त्व नाही. प्रतिज्ञापत्रक हाच काय तो काँग्रेसचा आत्मा. आणि त्या प्रतिज्ञापत्रकातच जर भलत्याच काही गोष्टी लिहिल्या गेल्या तर ती सभा राहिली काय मोडली काय सारखीच. कोणी म्हणे सर्वांचा समावेश होईल असा प्रतिज्ञालेख व्यापक असावा. राजनिष्ठापासून पूर्ण स्वातंत्र्यवादी लोकापर्यंत देश हा जसा सर्वांचा तशीच राष्ट्रीय सभाहि सर्वांची असली पाहिजे मग ठराव बहुमताने काहीहि होवोत. कोणी म्हणे प्रतिज्ञापत्रकात काय माती आहे ? तो एक कोर्टातल्या शपथेसारखा मंत्र आहे. पत्राच्या शेवटी आपण ' युवर ओबिडियन्ट सर्व्हन्ट ' असे लिहितो म्हणून आपण कोणी त्यांचे खरोखर ' बंदे नोकर ' थोडेच असतो ? औपचारिक गोष्टींना फाजील महत्त्व काय देता ? कोणी म्हणे आम्ही सुद्धा या गोष्टीला औपचारिकच मानतो पण काँग्रेसमधील एका वर्गाला सर्वांच्या संमतीशिवाय प्रतिज्ञालेख तयार करून त्यावर सही करा आत या असे म्हणण्याचा काय अधिकार ? तेव्हा पूर्वीसारखे सगळे एकत्र बसू आणि हा प्रतिज्ञालेख मंजूर झाला किंवा दुसरा जो होईल त्यावर सही करावे असे ठरलेच तर एक वेळ सोडून दहा वेळ सही करू. कोणी म्हणे चला होऊ द्या तुमचाच प्रतिज्ञालेख मंजूर. पण पहिल्या खेपेला तरी पूर्वीसारखे एकत्र जमू आणि तोच लेख शब्दशः मंजूर करू अशी हवी तर हमी देतो. मग तर भीति नाही ना ? कोणी म्हणे येऊन जाऊन सहीचीच अडचण ना ? आम्ही सही देतो. पण ती टेंन्टेटिव्ह म्हणजे तात्पुरती माना. अशी सही केल्याशिवाय ते व आम्ही एकत्र बसणेच शक्य नाही तर सही देऊ, पण त्यामुळे आम्ही कायमचे बांधले गेलो असे कोणी म्हणू नये व उद्या ती आम्ही अमान्य केली तर पूर्वी ती आम्ही सही देऊन मान्य केली होती असा कोलदांडा कोणी आम्हास घालू नये. आणि हे सर्वच मुद्दे टाळून कोणी असे म्हणे की अहो ज्याला भूक लागली तो दारावर हुजत घालीत बसत नाही. आत शिरून पाने धरून बसावे. कोण उठा म्हणतो किंवा कोण अगांतुक म्हणून अपमान करतो किंवा कोण वाढीतच नाही ते मग पाहून घेऊ. प्रतिज्ञालेखावर सही केली, आज आत शिरले, उद्या बहुमत केले परवा राष्ट्रीय सभा आपलीशी केली, या क्रमाने आपण सर्व काही मिळवू. वडिलार्जित घर

ताब्यात ठेवणे हा मुख्य मुद्दा आहे. सही करण्याच्या भलत्या मुद्यावर भांडत बसलो तर ते मात्र राष्ट्रीय सभेचे नाव घेतील चालवितील आम्ही मात्र काँग्रेसमधून बाहेर पडल्यासारखे होऊ असे का? सुरतेला संख्येने आपले डेलिगेट त्यांच्या संख्येजवळ जवळ आले होते आणि लोकमत जर आमच्या बाजूचे वाढते आहे तर उद्या आपण त्यांच्यापेक्षा अधिक का नाही होणार? विरुद्ध बहुमत झालेले पाहिले म्हणजे उद्या तेच काँग्रेसमधून आपोआप बाहेर पडतील. अशा रीतीने जमला तर समेट न जमला तर किंचित् मानहानीचाहि स्वीकार. काही कपट काही पुढची आशा या सर्व कारणाकरिता संयुक्त राष्ट्रीय सभा भरविण्याचाच होईल तितका प्रयत्न करावा असे बहुतेकांचे म्हणणे होते. नॅशनॅलिस्टांची अशी वेगळी राष्ट्रीय सभा काढावी असे कोणाचे फारसे मत असल्याचे दिसून आले नाही.

खोडसाना आलेल्या उत्तरात पुष्कळ लोकानी मोठ्या प्रांजलपणाने लिहिले होते. त्यावरून पाहता सुरतेस झालेल्या प्रकाराबद्दल काहीना बरे वाटत होते तर काही लोकाना ते वाईट वाटत होते असेहि दिसून आले. असो. या मुद्यासंबंधाने काही निवडक पत्रातील उतारे देऊन पुढील विषयाकडे वळू.

## ( १२ ) स्वतंत्र राष्ट्रीय सभेसंबंधी पत्रे

### ( १ ) डॉ. मुंजे यांचे खोडसाना पत्र

नागपूर १८ ऑगस्ट १९०८

टिळकांच्या गैरहजेरीत काँग्रेसला तिच्या संमतिविरुद्ध क्रीड वगैरेंचा विटाळ न लागू देण्याची जबाबदारी सर्वस्वी महाराष्ट्रावरच येऊन पडली आहे. मुंबईस ता. ३ किंवा ४ आक्टोबर रोजी सभा भरविल्यास सर्वांस सोयीचे होईल.

### ( २ ) श्रीनिवासराव कौजलगी यांचे खोडसाना पत्र

विजापूर १९ ऑगस्ट १९०८

संयुक्त काँग्रेस हरप्रयत्नाने भरवावी पण प्रतिज्ञापत्रकावर सही केल्याशिवाय. ते अशक्य ठरले तर कोणत्याहि पक्षातील राष्ट्रीय पक्षाचे वजनदार पुढारी पुढची राष्ट्रीय सभा बोलावू शकतील. आमचे सेनापती गेले तरी सैनिक जागेवर शिल्लक आहेत असे प्रतिपक्षाला दिसले पाहिजे. पुढची काँग्रेस भरवावयाला बंगाल बरा दिसतो.

### ( ३ ) विनायकराव जोग यांचे खोडसाना पत्र

पंढरपूर १९ ऑगस्ट १९०८

राष्ट्रीय पक्षात अजून फार वरच्या दर्जाची माणसे आलेली नाहीत. सरकारला थोडेसे दबून वागावे अशीच ती अजून आहेत. लहान गावातून सरकारचा राग

अधिक जाणवतो ह्मणून काही दिवस दबा धरून बसावे. बाहेरगावी लोक पाठवावे. हळूहळू संघटना करावी. पुष्कळसे काम खाजगी रीतीने करावे. नेमस्त हेहि काही आपले शत्रू नव्हेत. चळवळीला मर्यादा कोणती व किती घालावी इतकाच त्यांचा व आमचा भेद. व तेहि एक प्रकारची चळवळच करीत आहेत असे समजावे. किंबहुना त्यांच्यात प्रथम मिसळून आपली शक्ति वाढवावी. मी ह्मणतो हे पुष्कळाना आवडणार नाही पण करून पाहण्यासारखे आहे. ह्मणून तूर्त प्रतिज्ञा-लेख मान्य करावा. आत शिरल्यावर बहुमत मिळविण्याचा प्रयत्न करावा.

(४) रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांचे बोडसाना पत्र

पुणे २० ऑगस्ट १९०८

तुमच्याप्रमाणे तुमच्या आधीच खापर्डे यानीहि एक पत्र अनेकाना लिहिले आहे. दोहोना उत्तरे येतील त्याचा एकत्र विचार करूनच काय ते करावे. केळकरानी या गोष्टीबद्दल बराच विचार केलेला आहे असे दिसते आणि त्यांचा सल्ला आम्हा सर्वांना उपयोगी होईल. कन्व्हेंशनवाल्यांची दुसरी बैठक होईल तेव्हा हा प्रश्न काही सुटला तर सुटेल. माझ्या मते प्रतिज्ञालेखावर सही करण्याविषयी आपण फारसा घोळ घालू नये. मात्र ही सही एक वेळ आत येऊन घटनेची समग्र चर्चा करण्यापुरतीच आहे असे त्याना स्पष्ट बजावावे.

(५) बॅ. भगत यांचे बोडस याना पत्र

लाहोर ता. २० ऑगस्ट १९०८

सुरतेस मला या गोष्टी होणार असे दिसतच होते. आमच्यातील फुटीमुळेच सरकाराला दडपशाही करण्याला उत्तेजन येते. नेमस्त पुढाऱ्यानी दडपशाहीला एक प्रकारचा नैतिक पाठिंबा दिला ही गोष्ट खरी. पण काही काही लेखकहि वाटेल ते लिहून या दडपशाहीला कारणीभूत झाले. माझ्या बोलण्याचा गैरसमज करू नका. मी त्याना दोष देत नाही. ते सोन्याप्रमाणे निर्मळ आहेत. पण दुसरे आहेतना अनेक लोक! असे काही मूर्खपणाचे बोलतात व लिहितात की स्वतः ते संकटात येतात व त्यांच्याबरोबर काम करणारालाहि उपद्रव होतो. पण जाऊ दे की. त्याना तरी दोष देणारा मी कोण?............तुमच्या प्रश्नांची उत्तरे मी पाठविली आहेत. पण संयुक्त कॉंग्रेस लवकर भरेल अशी मला खरोखर आशा नाही. आह्माला जशी आपली तत्त्वे सोडता येत नाहीत तशी नेमस्तानाहि. त्यानी ज्यांचा निषेध केला ती त्यानाहि स्वीकारता येत नाहीत. पण दोघांचेहि भविष्य आज मी सांगतो. सरकार हातात लोहदंड घेऊन राष्ट्रीय पक्षाला सडकून काढील पण त्यामुळे तो मरणार मात्र नाही. उलट नेमस्त पक्ष निष्क्रिय आहे म्हणून आपोआप झिजून मरेल!

(सुरतेच्या गर्दीत ज्यानी पुढे होऊन टिळकांचा प्रथम बचाव केला त्यात बॅ. भगत हे प्रमुख होते.)

### ( ६ ) का. ब. ऊर्फ बाबासाहेब पेंडसे यांचे बोडसांना पत्र

पुणे ३० ऑगष्ट १९०८

प्रतिज्ञालेखावर काही झाले तरी आपण सही करू नये. याशिवाय संयुक्त काँग्रेस होईल तर अवश्य करावी. ते न घडेल तर राष्ट्रीय पक्षाची अशी वेगळी काँग्रेस मात्र करू नये. नुसत्या काँग्रेसच्या नावाला महत्त्व देण्यापेक्षा राष्ट्रीय पक्षाला देशहिताचे दुसरे अनेक मार्ग आहेत.

### ( ७ ) नगिनदास संघवी यांचे बोडसांना पत्र

अहमदाबाद ३० ऑगष्ट १९०८

समेटाचा प्रयत्न व संयुक्त काँग्रेस व्हावी. पण ती अशा ठिकाणी व्हावी की जेथे स्वार्थत्यागी पुढाऱ्यांना आतून चावा घेणारे साप नसतील! १९०६ ची ऑ. इं. काँ. कमिटी कामाला चालेल. पण त्यातून आधी हे लोक काढून टाका की जे उलट सुलट सभा भरवून एकमेकांची निंदा करीत आहेत. विशेषतः राष्ट्रीय पुढाऱ्याची निंदा करून राजनिष्ठा मिरवीत आहेत!

### ( ८ ) शंकरराव देव यांचे बोडसांना पत्र

धुळे ७ सप्टेंबर १९०८

धुळ्यातील नेमस्त व राष्ट्रीय अशा दोन्ही बाजूच्या लोकांचे अभिप्राय मी घेतले. काय वाटेल ते करावे पण संयुक्त राष्ट्रीय सभाच करावी असे त्यांचे म्हणणे आहे. अर्थात् उभयपक्षी मानास्पद असाच समेट असावा. नेमस्त लोक कोणत्याहि बाबतीत हट्ट सोडीतच नाहीत असे अजून ठरले नाही. तसे ठरले म्हणजे मग पुढचा प्रश्न.

### ( ९ ) डॉ. मुंजे यांचे बोडसांना पत्र

नागपूर ९ सप्टेंबर १९०८

डॉ. परांजपे हे जाहिरात देऊन फक्त आपल्या पक्षाच्या लोकांची माहिती मिळविण्याचे काम करीत आहेत. त्याविषयी गैरसमज करून घेऊ नका. तुमचे आमचे काम एकच आहे. परांजपे हे राष्ट्रीय पक्षाची डायरी तयार करीत आहेत. तुमच्या कामात तुह्माला असावे तितके सहाय्य नाही अशी तुह्मी पूर्वी मजजवळ तक्रार केली. सुदैवाने आमच्याजवळ राष्ट्रीय मंडळ आहे व थोडे द्रव्यसाधनहि आहे. ह्मणून तुमचेच काम आह्मीहि थोडेसे करीत आहोत इतकेच काय ते. तुह्मी जाहीर विनंतिपत्र काढले ते तुमच्या कमिटीला विचारल्याशिवाय काढलेत. यामुळे खापर्डे यांच्या पत्राप्रमाणे तुमच्या पत्रालाहि व्यक्तीच्या प्रयत्नाचे स्वरूप येते. ह्मणून कमिटीची सभा बोलवा असे मी सुचवितो.

(१०) कसनजी देसाई यांचे बोडसाना पत्र

सुरत १४ सप्टेंबर १९०८

तुम्ही मागता ती नावाची यादी मिळत नाही. पुष्कळ लोकांची इच्छा आपली नावे प्रगट करू नयेत अशी होती व तशा अपेक्षेनेच त्यानी सह्या दिल्या ही गोष्ट तुम्हालाहि माहीत आहे. शिवाय अलीकडे बंगाल्यात अत्याचार व दडपशाही सुरू झाल्यामुळे आपले स्नेही × × यानी आपल्याजवळचे सर्व कागद जाळून टाकले.

(११) डॉ. मुंजे यांचे बोडसाना पत्र

नागपूर २१ सप्टेंबर १९०८

तुमच्या कमिटीची सभा बोलाविली हे चांगले झाले. किंबहुना ती थोडी आधीच बोलवावयास पाहिजे होती. तीत कन्व्हेन्शनवाल्याना अखेरचे काय ते लिहू. आह्मी येथे राष्ट्रीय सभा भरवावयाची तर नोव्हेंबरच्या पूर्वी काहीच उपक्रम करू शकत नाही. पुढेहि अवघा दीडच महिना राहतो. पण पाहू. कमिटीची सभा तुह्मास नागपुरास भरविणे असल्यास भरवा. व्यवस्था करतो.

(१२) डॉ. मुंजे यांचे बोडसाना पत्र

नागपूर २३ सप्टेंबर १९०८

तुमच्या पत्राचा रोख पाहून आश्चर्य वाटले. मी तुमचेच थोडेसे काम केल्याबद्दल तुह्मी माझे आभार मानावयाचे ते सोडून मी घाईच केली अविचारच केला कोणाला विचारलेच नाही असे आरोप करता पण ते खरे नाहीत. मी पुढारी नसलो तरी इमानदार अनुयायी आहे. खापर्ड्यांनी सांगितल्याबाहेर मी काही एक केले नाही व जे केले त्याने तुह्मालाच मदत झाली असेल. तुह्मी सभा भरविली ह्मणजे मजकडे आलेल्या सर्व पत्रांचा निष्कर्ष तिच्यापुढे ठेवीन. बहुतेकानी खापर्डे यांच्याच मताला पुष्टी दिली आहे. खापर्डे याना आह्मी टिळकाखालोखाल मानतो हे तुह्माला माहीत असेलच. इंदुप्रकाशात खापर्ड्यांवर हल्ला कोणी केला व का केला असेल याचे कारण आता मात्र मला थोडथोडे उमगते. परप्रांतांचे लोक आपल्या कमिटीला फारसे येणार नाहीत. पण वेगळी कॉंग्रेस भरण्याचे ठरले तर ते येतील असे वाटते. नागपुरास राष्ट्रीय सभा भरविल्यास येथील राष्ट्रीय मंडळ स्वागत मंडळाचे काम करण्यास तयार आहे.

(१३) डॉ. मुंजे यांचे बोडसाना पत्र

नागपूर २७ सप्टेंबर १९०८

मोतीबाबू व अश्विनी बाबू हे दोघेहि वेगळी कॉंग्रेस भरविण्याच्या विरुद्ध आहेत. टिळकानी खापर्ड्यांना सांगितले होते ह्मणतात की नेमस्त काहीचं जुळवून

न घेतील तर जुन्या पद्धतीने आपण राष्ट्रीय पक्षामार्फत काँग्रेस भरवावी. पण बंगाल अनुकूल नसेल तर हे योग्य असूनहि होणार कसे ?

(१४) विजयराघव यांचे बोडसाना पत्र

सालेम ५ आक्टोबर १९०८

निरनिराळे प्रांत काय विचार करितात यावर सर्व अवलंबून आहे. माझे मत असे की यंदा तरी कोठेच वेगळी काँग्रेस भरवू नये. अर्थात् तुमच्या कमिटीची सभा बोलावण्याचे कारण नाही. उत्तम मार्ग म्हटला म्हणजे मोर्ले यांच्या सुधारणा अमलात येऊन राजद्रोहाकरिता शिक्षा झालेले आपले लोक सुटून बाहेर येईपर्यंत गप्प बसावे.

## (१३) नागपूर काँग्रेसला बंदी

असो. अशा प्रकारचे अभिप्राय अनेक लोकाकडून येत होते. पण निर्णयार्थ पुढे असे ठरले की सुरतेस नेमलेल्या कमिटीची सभा कलकत्ता येथे ता. १८ आक्टोबरच्या सुमारास भरवावी व त्याप्रमाणे चिंतामणराव वैद्य व डॉ. मुंजे यांच्या सहीने ता. ४ आक्टोबर रोजी विनंतिपत्र निघाले. पण कलकत्याच्या सभेपूर्वी मुंबई वऱ्हाड मध्यप्रांत यातील प्रतिनिधीना एक विचाराने निश्चित मत देता यावे म्हणून आधी ता. १० आक्टोबर रोजी मुंबईतहि एक सभा भरविण्याचे ठरले. पण ती प्रत्यक्ष भरू शकली नाही. निराळी राष्ट्रीय सभा भरविण्याचे ठरल्यास कोठे भरवावी तिच्यासाठी पैसा कसा जमवावा इत्यादि विषय सभेपुढे निघावयाचे होते. कलकत्याची सभाहि १८ आक्टोबरला भरू शकली नाही. कारण दुर्गा पूजा वगैरे अनेक कारणानी पुढारी लोक बाहेर गावी गेले होते. पण ती सभा ता. ७ नोव्हेंबर रोजी बाबू मोतीलाल घोष यांचे घरी भरली.

कलकत्याच्या या सभेत बंगालच्या पुढाऱ्यानी आश्वासन दिले होते की समेट होणे शक्य आहे म्हणून वेगळी राष्ट्रीय सभा तूर्त भरवू नये पण तसे न घडल्यास मद्रासच्या काँग्रेसलाहि आपल्यापैकी कोणी जाऊ नये. दरम्यान बंगाल्यातील नेमस्तांची सभा १५ नोव्हेंबर रोजी भरावयाची होती ती भरली. पण तीत समेटाला फारशी आशा उरण्यासारखे ठराव झाले नाहीत. अर्थात् वेगळी राष्ट्रीय सभा भरविणे हे आवश्यक आहे असे त्या विचाराचे लोक म्हणू लागले.

नागपूरच्या लोकानी राष्ट्रीय सभेचे आमंत्रण पूर्वीपासून दिलेलेच होते. म्हणून त्याचा विचार करण्याकरिता ' काँग्रेस कंटिन्यूएशन ' कमिटीची सभा मुंबईस ता. २८ नोव्हेंबर रोजी ' राष्ट्रमत ' कचेरीत भरण्याचे ठरून चिंतामणराव वैद्य यांचे सहीने निमंत्रणपत्रे गेली. या विनंतिपत्रावर सेक्रेटरी या नात्याने चिंतामणराव वैद्य यांची एकट्याचीच सही होती. त्याप्रमाणे सभा भरली. या सभेत एक

किंवा दोन मते विरुद्ध पडून नागपुरास वेगळी काँग्रेस डिसेंबरात भरविण्याचा ठराव झाला. या दोन भिन्नमतवाल्यांपैकी केळकर हे एक होते. केळकरानी भिन्न मत देण्याचे कारण असे सांगितले " एकट्या महाराष्ट्राने वेगळी राष्ट्रीय सभा भरविण्याची जबाबदारी घेऊ नये. सुरू केली व मग मोडली असे न व्हावे. परप्रांतातले काही लोक अशा सभेला येतील की नाही हे अजून पूर्ण अजमावले गेले नाही. जे गेले आहे त्यावरून थोडीशी डळमळच दिसते. विशेषतः बंगाल्यात उभयपक्षात वैमनस्य कमी हे पबना येथील सभेवरून दिसून आले आहे. व कन्व्हेन्शनवाल्या नेमस्तांच्या सभेत ता. १५ रोजी जरी हवे तसे अनुकूल ठराव झाले नाहीत तरी त्याना एकदम सोडून स्वतंत्र राष्ट्रीय सभेला बंगालचे राष्ट्रीय पक्षाचे पुढारी येणार नाहीत. त्यांच्यापेक्षा आमच्यावर मोतीबाबूंचे प्रेम अधिक आहे हे खरे. तरीपण ते वेगळे आणि स्वतंत्र राष्ट्रीय सभेला येऊन मिळणे वेगळे. ते नेहमीच्या राष्ट्रीय सभेलाहि फारसे जात नाहीत. मग आमच्या सभेला या स्थितीत कसे येतील ? अर्थात परप्रांतीय लोक यथाप्रमाण येत असल्याशिवाय नुसत्या महाराष्ट्रीयानी स्वतंत्र 'काँग्रेस' भरविणे योग्य नाही. नागपुरासेरीज इतर कोणत्याहि प्रांताने अशी सभा आपल्या प्रांतात भरवू असे आजवर म्हटले नाही. तसेच समितीच्या कायद्याने सरकार नागपूरची सभा बंद करण्याचा संभव आहे. आणि ती बंद केली तर विनाकारण आपण थप्पड खाऊन बसलो असे होईल. म्हणून वेगळी राष्ट्रीय सभा न भरविता महाराष्ट्रापुरते एक राष्ट्रीय पक्षाचे कॉन्फरन्स भरवावे. "

तथापि नागपुरास स्वतंत्र राष्ट्रीय सभा भरविण्याचा विचार कायम ठरला. व त्याप्रमाणे नागपुरास राष्ट्रीय मंडळाने आपले स्वागत मंडळ बनवून सर्व तयारी केली. अशा प्रकारची सभा भरणार असे ठरल्यामुळे प्रत्येक प्रांतात नव्या पक्षाचे असे जे थोडेबहुत लोक होते त्यानी सहजच डोके वर काढले. त्याना ह्या चळवळीने उत्तेजन आले. आणि चारदोनच का होईनात पण आपल्या पक्षाचे प्रतिनिधि नागपुरास जावे अशा इच्छेने त्यानी निवडणूकी करण्यास प्रारंभ केला. स्वयंसेवक मंडळाची योजना झाली. उतरण्याची व जेवण्याची जागा मंडप या सर्व व्यवस्थेला नागपूरची मंडळी उत्साहाने लागली. येऊन जाऊन अध्यक्षच काय तो ठरावयाचा होता. इतक्यात लोकानी अदमास केला होता त्याप्रमाणे घडले. अस्मानी–सुलतानी प्रकार झाला. तारीख ११ डिसेंबर रोजी नागपूर येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने क्रिमिनल प्रोसिजर कोड १४४ प्रमाणे नोटीस काढली व असे फर्माविले की नागपूर येथे होऊ घातलेली २४ वी राष्ट्रीय सभा सरकारकडून बंद करण्यात आली आहे. " ११ जानेवारीपर्यंत स्वागत मंडळाने या राष्ट्रीय सभेसंबंधाने कोणतीहि जाहीर सभा भरवू नये. कोणत्याहि इमारती उभारू नयेत. चालू काम असेल ते बंद करावे. मंडप वगैरे घालू नयेत. " असाहि हुकूम करण्यात आला. अर्थात् या हुकुमाने राष्ट्रीय पक्षाच्या राष्ट्रीय सभेचे सगळेच गाठोडे नोकरशाहीच्या खुंटीला लागले. या हुकुमाविरुद्ध स्वागत मंडळाने बरीच तक्रार केली. परंतु सर्व तक्रारी

ऐकून घेऊन मॅजिस्ट्रेटने फिरून १६ डिसेंबर रोजी पूर्वी केलेला हुकूम कायम केल्याचा पक्का हुकूम केला. त्यामुळे स्वागत मंडळाचे चिटणीस डॉ. मुंजे व नारायणराव अळेकर यानी राष्ट्रीय सभा भरत नाही असे जाहीर केले आणि झालेली हकीगत काँग्रेस कंटीन्युएशन कमिटीच्या अधिकाऱ्यांकडे कळविली.

पण अशा रीतीने नागपूरची सभा बंद झाली तरी बंदीचा हुकूम नागपूर-पुरताच असणार यामुळे ती सभा दुसरीकडे का भरू नये अशी पृच्छा कित्येकांकडून होऊ लागली. व कित्येक वर्तमानपत्रातून अशा अर्धवट बातम्याहि प्रसिद्ध झाल्या की नागपूरची सभा रहित झाली पण ती मुंबईस भरणार आहे. वास्तविक नागपुरास बंदीचा हुकूम काढण्याची सरकारची जी कारणे तीच मुंबईसहि लागू होती. म्हणून मुंबईस सभा भरवावी या सूचनेत अर्थ नव्हता. आणि ती भरविली जाणार या वदंतेवर कोणी विश्वास ठेवण्याचे कारण नव्हते. पण तशा बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्यामुळे माधवराव बोडस यानी वर्तमानपत्रातून स्पष्टपणे जाहीर केले की "मुंबईस सभा भरणार ही गोष्ट खोटी. तसा विचारच नाही. आणि कोणीहि ही वदंता खरी मानू नये." बोडस हे व्यक्तिशः वेगळी राष्ट्रीय सभा भरविण्याच्या विरुद्ध होते. एवढेच नव्हे तर नागपूरची सभा बंद झाली हे ऐकून त्याना मनातून आनंद झाला. आणि त्यानी तो तावडतोब मराठा पत्राच्या द्वारे व्यक्तहि केला. ते लिहितात " मुंबईस सभा भरणार ही गोष्ट काँग्रेस कंटीन्युएशन कमिटीला मान्य नाही व माहितीहि नाही. राष्ट्रीय सभा वेगळी भरवावी या गोष्टीला मी पहिल्या-पासून विरुद्ध आहे. मी संयुक्त राष्ट्रीय सभेच्या कल्पनेचेच सतत समर्थन केले आहे. एकतर्फी राष्ट्रीय सभा भरविणे हे इष्ट नाही. तिला लोकांच्या दृष्टीने काही किंमत असणार नाही. उद्या नेमस्त लोकाना अधिक शहाणपणा सुचून त्यांचा पक्षाभि-मान हटेल व संयुक्त राष्ट्रीय सभा भरेल अशी मला आशा आहे. नेमस्त पुढाऱ्या-बद्दल व्यक्तिशः मला अत्यंत आदर वाटतो व लॉर्ड मोर्ले यांच्या सुधारणांच्या योजनेतून दरम्यान काही भरीव असा फायदा हाती लागेल अशी आपणा सर्वांनी आशा करावी हे योग्य आहे. नागपूरच्या अधिकाऱ्यानी सभाबंदीचा हुकूम काढला हे दिसण्यात संकट असले तरी वस्तुतः ती ईश्वराची कृपाच होय. कारण आमचे नागपूरचे उत्साही मित्र जी मोठी चूक करणार होते ती अशा रीतीने परस्पर बचावली गेली. "

नागपूरची सभा थांबल्यानंतर राष्ट्रीय पक्षाची वेगळी कांग्रेस भरण्याची कल्पना पुढे केव्हा निघालीच नाही. १९०८।१४ या वर्षात नेमस्ताकडून राष्ट्रीय सभा या नावाने भरणारी सभा रोडावत जाऊन लोकात अप्रिय झाली होती. आणि संयुक्त राष्ट्रीय सभा भरवू इच्छिणारा पक्ष हळुहळू बळावत होता. शेवटी टिळक मंडालेहून सुटून परत आल्यावर वेगळ्या राष्ट्रीय सभेच्या कल्पनेला कायमची मूठमाती मिळून नेमस्तानी बोलावलेल्या राष्ट्रीय सभेत राष्ट्रीय पक्षाने प्रवेश करून घ्यावा हीच कल्पना पुढे आली बळावली व अखेर यशस्वी झाली.

## [ १९०८ सालातील निवडक पत्रे]

### (१) डॉ. मॅन यांचे केळकराना पत्र

पुणे ८ एप्रिल १९०८

हल्ली चाललेल्या पिकेटिंगच्या चळवळीसंबंधाने मी कारमायकेल साहेबाना आज भेटलो. चळवळीचा एक नियम असा आहे की पोलीस अडविण्यास आले तर त्यांच्याशी बोलून त्यांची समजूत घालावी. पण हा नियम बदलून जर असा नियम केला की पोलिसांचे हुकूम प्रथम मानावे. त्यांच्याशी काही बोलणे चालणे करू नये आणि मागाहून ज्या कायदेशीर गोष्टी करता येतील त्या कराव्या–असा नियम स्वयंसेवकाना घालून दिला तर ते या चळवळीला फारशी हरकत घेणार नाहीत असे त्यांच्या बोलण्यावरून दिसून आले. तरी तुम्ही हा नियम बदलून घेऊ शकाल काय? पोलिसाशी बोलणारे लोक मुख्य व्हॉलंटियर असले तरी बोला-चालीत काही कमजास्त होतेच. म्हणून मलाहि वाटते की हा नियम बदलून घ्यावा.

### (२) कारमायकेल यांचे केळकराना पत्र

पुणे १८ एप्रिल १९०८

तुमचे पत्र पोचले. काल पोलिसानी सांगताच स्वयंसेवक बाजूला झाले असे समजते. ही गोष्ट बरी झाली. मद्यपाननिषेध चळवळीच्या सेक्रेटरीना मी वेगळे पत्र पाठविले आहे. स्वयंसेवक लोकानी उभे राहून दारूच्या दुकानाशी काम करणे याला बेकायदेशीर जमावाचे स्वरूप आहे असा स्पष्ट सरकारी हुकूम निघाल्यास स्वयंसेवक आपले काम थांबवितील असे कळल्याने तसा स्पष्ट हुकूम काढलेला आहे. तरी आता चळवळीचे चालक स्वयंसेवक मागे घेतील अशी मला आशा आहे.

### (३) मायरन फेल्पस् यांचे टिळकाना पत्र

न्यूयॉर्क ३० जून १९०८

आमच्या सोसायटीने (Society for the advancement of India) पुष्कळशा शिष्यवृत्त्या मिळविल्या आहेत. याचा अर्थ त्या धारण करणाऱ्या विद्या-र्थ्यांना इकडील संस्थातून फुकट शिक्षण देण्यात येईल. त्यांची माहिती आम्ही निरनिराळ्या वर्तमानपत्रांकडे पाठवीत आहो. हेतू हा की शिष्यवृत्त्यांचा फायदा घेण्याला निरनिराळ्या ठिकाणची हुशार मुले पुढे यावी. वर्तमानपत्रानीहि आपल्या वाचकाना विनंति करून काही फंड जमवावा. अशाकरिता की जे मुलगे या शिष्य-वृत्त्या घेऊन इकडे येतील त्याना वरखर्चाला मदत व्हावी. या सोसायटीच्या मंडळावर एक सभासद म्हणून तुमचे नाव मी घालीत आहे.

(४) प्रो० साने यांचे केळकराना पत्र

चार्लटन-बर्ग १७ जुलै १९०८

सहज २६ जूनचा एका इंग्लिश वर्तमानपत्राचा अंक विकत घेतला. त्यात असे आढळले की बळवंतरावाना पकडण्यात आले. तुम्ही लिहिल्याप्रमाणे या दिवसात सरकार काय करील काय न करील याचा नियम नाही हे तर खरेच. पण ज्या पत्रात ही बातमी होती त्यातच टिळकांच्या लेखाचा जो सारांश म्हणून दिला होता त्यावरून मला वाटते की ते लेख १८९७ साली शिक्षा झालेल्या लेखाहून कमी कडक आहेत. बळवंतराव आपला खटला स्वतः चालविणार या गोष्टीने त्यांच्या पक्षाच्या दृष्टीने फायदा होइल हे खरे. पण स्वतः त्यांचे मात्र नुकसान होईल असे मला वाटते. पण मी खुळा मनुष्य पत्रात हे जे लिहितो ते काय ? तुमच्या हाती पत्र पोचण्यापूर्वीच कदाचित् खटल्याचा बरा वाईट निकालहि लागून गेला असेल. बळवंतरावाना या प्रसंगी एखाद्या लेखापेक्षा स्वतःचे समर्थन अधिक करावयाचे आहे. म्हणून स्वतःचा डिफेन्स देताना त्यांच्या मनातले विचार पुढे येऊन त्यांचाहि दोष त्यांच्या युक्तिवादाला बाधावयाचा !

(५) नटेसन् यांचे केळकराना पत्र

मद्रास ३ ऑगस्ट १९०८

टिळकांच्या खटल्याचा निकाल ऐकून फार वाईट वाटले. त्यांची आमची मते जुळत नसतील. पण त्यांची बुद्धिमत्ता त्यांचे कर्तृत्व त्यांचे मनःस्वातंत्र्य व त्यांची देशभक्ति याविषयी कोणाचाहि मतभेद नाही. व त्या बाबतीत त्याचे कौतुक करावे व मान द्यावा तेवढा थोडाच आहे. स्नेही या नात्याने मी तुम्हाला लिहितो की या दिवसात तुम्ही फार जपून लिहा. हे वाचून तुम्ही म्हणाल तुम्ही भित्रे आहा. तसे वाटेल तर म्हणा पण उगीच दगडाला टक्कर देण्यात तरी काय अर्थ असे मीहि तुम्हाला विचारतो.

(६) लजपतराय यांचे केळकराना पत्र

लाहोर ५ ऑगस्ट १९०८

माझे खटले केव्हा निघतील याची कल्पना नाही. डिसेंबरापूर्वी ते निघत नाहीत. या खटल्यामुळे इंग्लंडला जाण्याचा तूर्त थांबलो. विलायतेस गेलो तरी माझ्या हद्दपारीसंबंधाने कोणतीहि खटपट करण्याचा माझा विचार नाही. मात्र भाषणातून त्यावर टीका करीन. तेथे एक वर्षभर राहून राजकीय चळवळीचे व ग्रंथलेखनाचे काम करण्याचा माझा विचार आहे. ब्रिटिश न्यायदेवतेवर माझा विश्वास नाही. टिळकांच्या खटल्यात अपील करून काही फायदा होईल असे मला वाटत नाही. मात्र त्या खटपटीकरिता तुम्ही किंवा इतर कोणी जाणार असेल तर टिळकांच्या संबंधाने इतर खटपट करण्याला मीहि जाईन. तुम्ही व दाजीसाहेब खरे जाल तर चांगले होईल. मी तुमच्या बरोबर येईन. मात्र त्याकरिता शक्य तितके लवकर गेले पाहिजे.

(७) बाबूराव पराडकर यांचे केळकराना पत्र

कलकत्ता ८ ऑगस्ट १९०८

टिळकांच्या खटल्याची समग्र हकीगत पुस्तकाच्या रूपाने तुह्मी काढीत आहा असे पत्रात वाचले. सखाराम गणेश देऊस्कर यांची इच्छा बंगालीत या खटल्याची हकीगत प्रसिद्ध करण्याची आहे. केसरी मराठ्यांतील हकीगत त्रोटक असणार. ह्मणून देऊस्कर यांची तुह्माला अशी विनंति आहे की या पुस्तकाचा प्रत्येक फॉर्म छापून झाल्याबरोबर त्याची एक प्रत त्यांच्याकडे पाठवावी. ह्मणजे तावडतोब ते भाषांतर करून घेतील.

(८) खापर्डे यांचे केळकराना पत्र

लंडन १५ सप्टेंबर १९०८

हाइंडमन यांची गाठ पडल्याचे मागील पत्री लिहिलेच आहे. आज नेव्हिनसन रॅडक्लिफ व कॉटन याना नॅशनल लिबरल क्लबात भेटलो. गोखले यांचा हात दुखावला ह्मणून ते परत आले आहेत. जर्मनीत त्यांचा हात दुखावला. उद्या ऑक्सफर्ड येथे विश्वधर्म परिषद भरणार आहे तिला मी जातो. नेव्हिनसन ह्मणाले 'तुह्मी ही संधि वाया दवडू नका'. तेथे प्रतिष्ठित लोक येतात. जो तो ह्मणतो की रुफस आयझॅक्स यानाच वकीलपत्र द्या. ते फौजदारी कामकाजात अतिशय उच्च दर्जा मिळविलेले बॅरिस्टर असून शिवाय पार्लमेंटचे सभासद आहेत. आमचे वकिलपत्र घेण्याला सवड सापडेल की नाही याविषयी शंकाच वाटते. पण मागेल ती फी देऊ. नाहीतर काय करणार.

(९) खापर्डे यांचे केळकराना पत्र

लंडन ता. २२ सप्टेंबर १९०८

तुह्मी माझ्या साहेबी टोपीला ह्मणून सलाम पाठविलेत. पण मी माझा नेहमीचा रुमालच अजून ठेवला आहे. परकीय लोकांचा असा पोषाख पाहण्याची लंडनच्या लोकाना अलिकडे थोडीबहुत संवय झाली आहे. ह्मणून पूर्वीप्रमाणे फारसा त्रास होत नाही. तरीपण एक टोपी घेऊन ठेवलीच आहे. ती एखाद वेळ डोक्यावर ठेवून आरशात पाहून मी खूप हसतो. व मी टोपी घातलेला पाहून तेह्मानाहि हसू येईल. टिळकांच्या अपिलाच्या कामी डालग्येडो नांवाचे एक सॉलिसिटर आह्मी केले आहेत. पारीख या नांवाचे एक बॅरिस्टर इकडे दहा वर्षे धंदा करीत आहेत त्याना दुय्यम ह्मणून नेमू. सर हेनरी कॉटन यांचे चिरंजीव यानीहि काम करण्याचे कबूल केले आहे. आता मुख्य बॅरिस्टर कोण मिळतो पाहावे. रुफस आयझॅक्स की सर एडवर्ड क्लार्क ? आज दोघेहि सर्वांत श्रेष्ठ बॅरिस्टर आहेत. आणि दोघेहि सारखेच हुषार आहेत. टिळकांच्या खटल्याला अर्धवट राजकारणाचे स्वरूप आहे ह्मणून हुषार बॅरिस्टर असून शिवाय व्यावहारिक मुत्सद्दी असा असेल तर अधिक बरे. खुद्द

पार्लमेंटमध्ये चळवळ होण्याचा संभव हल्ली फारच कमी दिसतो. कारण सरकारी कामाकरिताच प्रधानमंडळाने सर्व दिवस आखून घेतले आहेत. तेव्हा खासगी संभाषणातून काय लाभ होईल तेवढा खरा.

### (१०) खापर्डे यांचे केळकरांना पत्र

लंडन ३० सप्टेंबर १९०८

तुह्मी मंडळी सहजच निराश झालेली दिसता. पण प्रयत्नाखेरीज आपण कोणीहि काय करणार? मेरिडिथ येथे सर विलियम वेडरबर्न यांची गाठ घेतली. केवढा त्यांचा वाडा व केवढी त्यांची उद्यानभूमि! स्वागतपूर्वक ते माझ्याशी पुष्कळ बोलले. सर एडवर्ड क्लार्क यांच्यापेक्षा ते रुफस आयझॅक्सच अधिक पसंत करतात. राष्ट्रीय सभा फिरून संयुक्त पक्षाची व्हावी असा प्रयत्न एक दोन वर्षे तरी आणखी करावा असे त्यांचे ह्मणणे. नेव्हिनसन यानी फराळास बोलाविले होते. लजपतराय पार्लमेंटचा एक सभासद व तीन वर्तमानपत्राच्या धंद्यातील लोक तेथे होते. या लोकांची माझी ओळख व्हावी ह्मणूनच नेव्हिनसन यांनी इतका खर्च केला. लजपतराय हे आपण इकडे का आलो हे नीट सांगत नाहीत. मुलाला इकडील एका शाळेत ठेवण्याचा त्यांचा हेतू असावा. बिपिन पालहि येथे आहेत. लेखकाचा धंदा करून इकडे राहण्याचा त्यांचा विचार दिसतो. बॅप्टिस्टा यानी हायकोर्टाकडे अर्ज देताना फारच चांगले भाषण केले. दादासाहेब करंदीकर यांच्याबरोबर कागदपत्र येताच अपिल अर्ज दाखल करू. टिळकांच्या खटल्याचे पुस्तक तुह्मी काढले त्याची प्रत आताच पोचली. त्याची प्रस्तावना तुह्मी फारच हुषारीने व कुशलतेने लिहिली आहे. ह्मणून या पुस्तकाच्या पाठविता येतील तितक्या प्रती इकडे पाठवा. ह्मणजे त्या हळूहळू इकडच्या मंडळींत पेरण्याचा माझा विचार आहे.

### (११) पीटर पिले यांचे केळकरांना पत्र

मदुरा ३० सप्टेंबर १९०८

टिळकांच्या खटल्याची हकीगत लक्षपूर्वक वाचीत आहे. त्यांच्या पहिल्या खटल्याचे अपील ने. ना. ॲस्क्विथ यानी प्रिव्हि कौन्सिलपुढे चालविले तेव्हा मी कोर्टात हजर होतो. हल्लीहि अपील करण्यासंबंधाने काही तरी जोराची चळवळ का होऊ नये? हैन्डमन वगैरे लोक तिकडेहि चळवळ करतील. आमचा हिंदी ख्रिश्चन समाज या बाबतीत चळवळ करण्याला तयार आहे. चिदंबरम् पिले यांचे अपीलहि पुढच्या पाच तारखेला निघणार आहे. अपीलात कदाचित् त्यांची शिक्षा कमी होईल. त्यांचा खटला मी चालविला. त्यांच्याकरिता एक फंड जमविण्याचा माझा विचार आहे व त्यातील २–३ हजार रुपये बिचाऱ्या त्यांच्या कुटुंबालाहि द्यावे असे वाटते. तुमची काही पत्रे मला उशीरा पोचली त्यांचे लिफाफे मी तपासून पाहिले नाहीत. तरी पण पत्रे उघडून पाहण्याचा त्रास इकडे कमी आहे.

### (१२) प्रो. साने यांचे केळकराना पत्र

चार्लेटनबर्ग ६ नोव्हेंबर १९०८

बादशहांचा जाहीरनामा वाचला. राजकीय गुन्हेगाराना माफी देण्याचे त्यात लिहिले आहे तेहि पाहिले. या माफीचा फायदा बळवंतरावाना मिळेल काय? मला वाटते काही झाले तरी त्याना जानेवारीपूर्वी सोडणार नाहीत. या आठवड्यात येथे मोठी खळबळ उडाली आहे. डेली टेलिग्राफ पत्रातील मुलाखत वाचून जर्मन वर्तमानपत्रे उसळली आहेत. व कायसरने अधिकाराचा अत्याचार केला असे ह्मणत आहेत. चॅन्सेलर फॉन ब्यूलो यानी सर्व जबाबदारी आपणावर घेऊन राजीनामा देऊ केला. पण तोहि बादशहाने घेतला नाही. मोरोक्कोमधील फ्रान्स व जर्मनी यांची चुरस फार वाढली असून युद्धाच्या गोष्टी लोक बोलू लागले आहेत.

### (१३) मोतिलाल घोस यांचे केळकराना पत्र

देवघर १० डिसेंबर १९०८

आज टिळक असते तर त्यांचे मन मी वळवू शकलो असतो. पण त्यांच्या अनुयायांचा तेवढा मजवर विश्वास दिसत नाही. डॉ. मुंजे याना मी पत्र लिहिले आहे त्याचा सारांश असाः—

“ तुह्मी आपलेच मत घेऊन बसला आहा. तरी मला जे वाटते ते तुह्माला लिहितो. व ते माझे मत कायम आहे. आह्मी आज वर्षभर संयुक्त कॉंग्रेस झाली तरच कॉंग्रेस नाही तर कॉंग्रेस नाही अशी चळवळ इकडे करीत आहो. आणि माझ्या मते तुह्मीहि याच धोरणाने तिकडे चळवल केली असती तर मद्रासच्या कॉंग्रेसला तुह्माला बराच गौणपणा आणता आला असता व एक दोन वर्षांत तुह्माला राष्ट्रीय सभा काबीज करता आली असती. आह्मी इकडे कॉंग्रेसला जाऊन मिळालो नाही. आणि एक प्रकारची तटस्थ वृत्ति धरून बसलो आहो. पण तुह्मी जर वेगळी कॉंग्रेस काढली तर आधीच जे दोन पक्ष आहेत त्याचे तीन होतील व तुह्मी आह्मी एकमेकातच झगडल्यासारखे होईल. तुमच्याप्रमाणेच आमचेहि ह्मणणे असे की प्रतिज्ञापत्रक नसावे. या दृष्टीने तुमचे आमचे अधिक जुळते ही गोष्ट खरी. राष्ट्रीय पक्षावर स्टेटसमन वगैरे पत्रातून हल्ले होतात त्याना पत्रिका उत्तर देत असते पण वेगळ्या कॉंग्रेसचे समर्थन करवत नाही. पबना येथील आमच्या ठरावाप्रमाणे कोणत्याच कॉंग्रेसला जावयाचे नाही असे आह्मी ठरविले आहे. तरी पण वेगळी कॉंग्रेस निघाली ह्मणजे एकाद दुसरा इकडे जाईल एकाद दुसरा तिकडे जाईल. तुह्मी आह्मी सर्व एक विचाराने आवळून बसलो तर मेथा वगैरे लोकाना कठीण जाईल. वेगळी सभा काढून बंगालची सहानुभूती या वेळी घालवू नका.”

# भाग ८

## [सन १९०८]

## राजद्रोहाचा दुसरा खटला

### (१) खटल्याचे निर्णायक कारण

प्रत्येक परिणामाला निर्णायक म्हणून एक अखेरचे कारण असते. कारणांची पूर्वपरंपरा कोणत्याहि कार्याच्या मागे बरीच लांब गेलेली असते व आजुबाजूला फैलावलेली असते परंतु निर्णायक असे एकादेच कारण ठरते. व त्यापासूनच कार्य निष्पन्न होते किंवा त्याला प्रकट स्वरूप येते. या दृष्टीने टिळकांवरील १९०८ म्हणजे दुसरा राजद्रोहाचा खटला होण्याचे निर्णायक कारण कोणते याचा विचार करणे मनोरंजक आहे. टिळकांच्या बाबतीत कारणपरंपरा पूर्वी दहा वर्षांची होती. १८९७ साली त्यांच्यावर खटला झाला तेव्हापासून सरकारचे लक्ष त्यांचेवर नेहमीच होते. आणि प्रसंग पडला म्हणजे कोणावर जर पहिला खटला व्हावयाचा तर तो टिळकांवर अशी अधिकाऱ्यांप्रमाणे लोकांचीहि समजूत होती. प्रसंग येण्याचाच काय तो अवकाश होता. काळ पत्रातील लेख केसरीहून कमी कडक किंवा सरकारी दृष्टीने कमी राजद्रोहात्मक होते असे नाही. परंतु त्यातल्यात्यात परांजपे यांचेपेक्षा सरकारचा राग टिळकांवर अधिक. याचे कारण असे की टिळक अधिक उद्योगी. त्यांचा आवेश लिहिण्यात खर्चून जात नसे. त्या आवेशी वृत्तीचा संचार राजकारणाच्या प्रत्येक खात्यात ते करीत. म्हणून एकंदरीने परांजप्यांच्या लेखांपेक्षा टिळकांचे लेख कमी कडक किंवा कमी छद्मी असले तरी एकंदरीने जनतेवर टिळकांच्या आचारविचारांचाच परिणाम अधिक होई. परांजपे यांचे लेख केवळ भावनाप्रधान असून त्यात सरळ युक्तिवाद असावयाचा नाही. प्रत्यक्ष विधायक सूचना असावयाच्या नाहीत. मुद्देसूद टीका असावयाची नाही. यामुळे ते फक्त एका विशिष्ट वर्गाच्या मनातच रिघत. किंबहुना सर्वसामान्य वाचकांच्या डोक्यावरून ते निघूनहि जात. उलट टिळकांचे लेख व भाषणे यातील प्रत्येक शब्द सरळ स्पष्ट युक्तिवादात्मक व्यावहारिक सामान्य मनुष्याला समजणारा व उमजणारा असा असल्यामुळे त्याचे मर्म समजले नाही असा वाचक किंवा श्रोता आढळलाच नाही. म्हणून काळपत्रापेक्षा केसरी पत्र हे ज्या कारणाकरिता लोकाना अधिक प्रिय त्याच कारणाकरिता केसरीवर काळपत्रापेक्षा सरकारचा अधिक राग. १९०८ साली खटला होण्यापूर्वी काळपत्रकर्त्यांना तीन चार वेळा नोटीस किंवा इषारा देण्यात आला होता. टिळकाना असा इषारा सरकारने सहसा दिला नाही. याचे कारण त्याना सरकारचा कायमचाच इषारा होता. तो असा की तुमच्यावर आम्ही केव्हा खटला करू याचा नियम नाही. प्रसंगाची वाट सरकार पहात असे. आणि १९०८ साली बंगाल्यातील खुनामुळे तो प्रसंग उद्भवला.

पण या कारणाशिवाय इतरहि काही कारणे होती असे समजण्यात येई. प्रत्यक्ष खटला भरला मुंबईसरकारने पण कित्येकांची समजूत अशी होती की या खटल्याचे निर्णायक कारण कोल्हापूरचे छत्रपती महाराज. कित्येकांच्या मते नेमस्त मुत्सद्यानी सरकारला चिथावले. इतर कित्येकांच्या मते मुख्य निर्णायक कारण विलायतेला होते. ते स्टेट सेक्रेटरी यांचे कौन्सिल होय. आणि लॉर्ड मोर्ले हे टिळकांवर खटला करण्याला परवानगी न देते तर सर जॉर्ज क्लार्क याना खटला करता आला नसता. अशा स्थितीत वास्तविक खरे निर्णायक कारण हुडकून काढणे कठीण आहे. दोषाच्या जबाबदारीची गोष्ट असली म्हणजे प्रत्येकजण ती आपणापासून दूर लोटतो व श्रेय किंवा कीर्ती मिळवावयाची असली तर प्रत्येकजण म्हणतो की ती गोष्ट मीच होतो म्हणून झाली. सगळी निर्णायक कारणे महत्त्वाचीच. पण एकंदर पुढाऱ्यापैकी लोकांचा सर्वात अधिक कटाक्ष गोपाळराव गोखले यांच्यावर! कारण खटला होण्याचे सुमारास ते विलायतेत होते व लॉर्ड मोर्ले यांच्या त्यांच्या नेहमी गाठी पडत बोलणेचालणे होई अशा बातम्या हिंदुस्थानात वरचेवर येत. सुरतेच्या राष्ट्रीय सभेत नेमस्त व टिळकपक्ष याचे भांडण विकोपाला गेले व नेमस्त पक्षाचे त्या वेळचे कार्यकर्ते पुढारी गोखले हेच निःशंसय होते. सुरतेच्या सभेच्या आधी कित्येक महिने पर्यंत केसरी व टिळक पक्षाची वर्तमानपत्रे एका बाजूला व ज्ञानप्रकाश सुधारक इंदुप्रकाश व इतर नेमस्त पक्षाची पत्रे दुसऱ्या बाजूला असा फड रंगून कडाक्याचा सामना सुरू होता. व कोणी कोणाबद्दल बोलण्याची काही बाकी झणून ठेवली नव्हती. टिळक पक्षाच्या 'हिंदुपंचा'त बीभत्स टीकेची कमाल झाली होती. उलट गोखले यांच्या नेमस्त पक्षाच्या पत्रात शब्द बीभत्स नसले तरी सर्व तऱ्हेचे अधम हेतूचे आरोप टिळकांवर केले जात होते. गोखल्यानी टिळकांवर खटला करविला ही समजूत कित्येक लोकांच्या मनात इतकी दृढमूल झाली होती की या गुन्ह्याबद्दल गोखल्याना प्रायश्चित द्यावयाचे तर ते देहान्त दिले पाहिजे अशी समजूत त्यानी करून घेतली. आणि त्याप्रमाणे गोखल्यांचा खून करण्याचे बेत १९०९-१० सालात झाले होते ही गोष्ट आता पुष्कळाना माहित आहे. तथापि गोखले हे लॉर्ड मोर्ले याना व्यक्तिशः टिळकांवर खटला करण्याबद्दल प्रत्यक्ष चिथावणी देतील ही गोष्ट कोणाहि समंजस माणसाला पटण्यासारखी नव्हती. कारण टिळक गोखले यासारखे लोक राजकारणातील मतभेदामुळे परस्परांचा कितीहि द्वेष करीत असले तरी प्रत्यक्ष कोणी कोणाचा खून करण्यास चिथावणी देईपर्यंत पाळी आणू दिली नसती.

आणि जी गोष्ट खुनाला लागू तीच गोष्ट राजद्रोहाच्या खटल्यासंबंधाच्या चिथावणीलाहि लागू आहे असे आम्हाला तरी वाटते. उच्च प्रतीचे शिक्षण मनःसंस्कृति व सार्वजनिक चारित्र्याने बनलेले शील या गोष्टीनी मनुष्याच्या तामसी वृत्तीला सहजच मर्यादा पडते. व कोण कोणती गोष्ट करील किंवा करणार नाही याविषयी निःपक्षपाती तिऱ्हाइताचा काही एक अंदाज असतो व तोच अखेर खरा ठरतो. टिळकानी गोखल्यांविषयी केसरीत पुष्कल वेळा टाकून लिहिले व

स्वतःच्या वाड्यात तरुण मुलांच्या तोंडून झालेली गोखले यांची कुपद्यमय निंदा स्वतः बसून ऐकली हा टिळकांवर एक आक्षेप होता. तरीपण गोखले हे देशद्रोही असे ठरवून त्याना देहान्त प्रायश्चित्त देण्याची गोष्ट जर त्यांच्या परिवारापैकी चुकूनहि कोणी टिळकांच्याजवळ बोलता तर त्याला उत्तेजन देणे तर राहोच पण त्याचा त्यानी कान धरून निषेधच केला असता. फिनिक्स पार्कमध्ये खून झाले त्याना उद्देशून पार्नेलने पार्लमेंटमध्ये असे सांगितले की "आयर्लंडातील नोकरशाहीशी माझा कसाहि उभा दावा असो. तथापि या खुनाच्या जागी मी हजर असतो तर खुनी लोकांच्या सुऱ्या व बर्क कॅव्हेन्डिश यांचे देह यांचेमध्ये ढालीप्रमाणे मी आपली छाती पुढे केली असती!" आणि हे विधान कोणीहि मायावी मानले नाही. प्रत्यक्ष परस्पराचा खून डोळ्यासमोर होत असता तर गोखल्यानी टिळकांना पाठीशी घातले असते व टिळकांनी गोखल्याना पाठीशी घातले असते यात आम्हाला शंकाच वाटत नाही.

आता खटल्याची चिथावणी ही कित्येकास इतकी अधमपणाची वाटत नव्हती. कित्येकाना तर ती कर्तव्यप्राप्त अशी वाटली! पण याहि बाबतीत एक सूक्ष्म विचार करावयास पाहिजे तो असा की "मी तुमच्याजवळ तिसऱ्या मनुष्याची निंदा बेसुमार करू लागलो व त्या तिसऱ्या विषयी तुमचे मनच जरी वाईट असले तरी मी परोक्ष निंदा करणारा म्हणून माझ्याविषयी तुमचे मत सहजच वाईट होणार. परोक्ष निंदा ही काही एखाद्या मनुष्याविषयी भलेपणाची कल्पना होणारी गोष्ट नव्हे. या दृष्टीने पाहता लॉर्ड मोर्ले यांच्याशी बोलत असता गोखले यानी व्यक्तिशः टिळकांची निंदा केली असेल असे आम्हाला वाटत नाही. कारण तशी निंदा केल्याने लॉर्ड मोर्ले स्वतःला काय म्हणतील ही गोष्ट तरी गोखल्यांच्या मनात जागृत असलीच पाहिजे. उलटपक्षी लॉर्ड मोर्ले यांची सुसंस्कृति व त्यांच्या मनाचे उच्च शिक्षण लक्षात घेतले असता टिळकासंबंधाचे व्यक्तिशः मत त्यानी खुद्द गोखले याना विचारले असेल असेहि आम्हाला वाटत नाही. जहाल व नेमस्त असे दोन पक्ष हिंदुस्थानात आहेत. प्रत्येकाचे ध्येय व प्रत्येकाचे मार्ग वेगवेगळे आहेत. सहकारितेने व क्रमाक्रमाने स्वराज्य मिळाले तरी चालेल असे मानणारे लोक हे नेमस्त असल्या कारणाने ते केव्हाहि सरकारला अधिक जवळ व राष्ट्रीय पक्ष दूर. तसेच अशांततेचा कोणताहि मार्ग किंवा कोणतीहि चळवळ नेमस्ताना पसंत नाही. उलट अशा चळवळीचे राष्ट्रीय पक्षाला वावडे नाही. या व असल्या तुलनेच्या गोष्टी मोर्ले याना माहीत नसतील तर ते गोखल्याना विचारणार! आणि पक्षभेदाविषयी व हिंदुस्थानच्या राजकारणाविषयी उभयतात बोलणे झाले असले तरी फार तर या तुलनेपर्यंत त्यांची मजल गेली असेल. याहून पलीकडे गेली असल्याचा संभव नाही. मुंबई सरकार टिळकांवर खटला करण्याचा विचार करीत आहे ही गोष्ट लॉर्ड मोर्ले याना माहित असली तरी ती सरकारी कारभारातील एक गुप्त गोष्ट म्हणून तिचा उच्चार मोर्ले यानी गोखल्यांजवळ केला असेल असे आम्हास वाटत नाही.

टिळकांवर खटला होण्याचे कारण गोखलेच या गोष्टीवर कोणाचाहि भरंवसा बसण्याचा संभव नाही असे आमचे मत आहे. राहता राहिले मोर्ले व सर जॉर्ज क्लार्क. अर्थात् स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थानातील गव्हर्नर यांच्या दरम्यान दडपशाही सुरू करण्याचे बाबतीत कोण कोणाच्या मागे खरोखर लागतो याविषयी निश्चित अनुमान करिता येत नाही. कारण उलट सुलट स्वरूपाच्या पुष्कळ गोष्टी यापूर्वी घडल्या आहेत. केव्हा इकडील गव्हर्नर नाखूष असता त्यांच्या हातून विलायत सरकारने दडपशाही करविली असे घडले आहे. उलट विलायत सरकार नाखुष असता इकडील गव्हर्नरने दडपशाहीला संमति मिळविली असेहि घडले आहे. पण प्रस्तुत प्रसंगी लॉर्ड मोर्ले हे स्टेट सेक्रेटरी असल्यामुळे व सर जॉर्ज क्लार्क यांच्या सारखे खुनशी व प्रतिगामी गव्हर्नर मुंबईस असल्यामुळे मोर्ले यानी मुंबई सरकारला चिथावण्यापेक्षा सर जॉर्ज क्लार्क यानीच मोर्ले साहेबांकडे आग्रह धरून त्यांची संमति मिळविली असा पुष्कळ लोकांचा समज आहे.

नुसत्या मनुष्यस्वभावावरूनहि पाहता ही अनुमाने बरोबर ठरतात. शिवाय ती खरी ठरण्यासारखा काही थोडा पुरावा हल्ली जगापुढे आला आहे. पूर्वीचे सर जॉर्ज क्लार्क व हल्लीचे लॉर्ड सिडनहॅम यानी 'आयुष्यातील माझी कामगिरी' या विषयावर नुकतेच एक पुस्तक प्रसिद्ध केले आहे. त्यात लॉर्ड मोर्ले व स्वतः ते यांचे दरम्यान झालेला पत्रव्यवहार व इतर काही माहिती लॉर्ड सिडनहॅम यानी दिलेली आहे. त्यावरून असे दिसते की लॉर्ड मोर्ले हे टिळकांवर खटला करू नये अशा मताचे असता लॉर्ड सिडनहॅम यानींच आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर तो खटला केला व त्याच्या सुपरिणामाचे यश त्यानी एकट्या आपणाकडेच घेतले! ते लिहितात "टिळकांचे वर्चस्व कसे वाढत आहे ही गोष्ट मी काळजीपूर्वक पाहिली आहे. परंतु टिळकांची क्रांतिकारक चळवळ थांबविणे जरूर आहे असे मला वाटले तेव्हा मी पुढे सरसावलो. अशा खटल्यात मुख्य गोष्ट लक्षात घ्यावी लागते ती ही की खरोखर गुन्हा शाबित न झाला व आरोपीला शिक्षा न झाली तर त्याचे लोकात वजन वाढते व लोक ते एक मोठ गाऱ्हाणे करून बसतात. अर्थात् या गोष्टीत धोका आहे. पण मी व माझे बरोबरीचे कौन्सिलर यानी हा धोकाहि पत्करण्याचे ठरविले. टिळकांवर खटला झाल्याने लोकात मोठी गडबड किंवा रागाची चळवळ झालेली दिसली नाही. खटल्यानंतर मी पुण्यात गाडीतून बसून गेलो तेव्हा मला लोकानी स्नेहभाव दाखविला. नेमस्तानी माझे उघडपणे समर्थन केले नाही. पण त्यापैकी काही लोकानी झाली ही गोष्ट ठीक झाली असे मात्र मला सांगितले."

पण याच पुस्तकात लॉर्ड मोर्ले यांचीहि बाजू पत्रव्यवहाराच्या रूपाने थोडी आली आहे. तारीख ३ जुलै रोजी लॉर्ड मोर्ले यानी सर जॉर्ज क्लार्क यांना खालीलप्रमाणे पत्र लिहिले "टिळकांवर खटला करीत आहा ही गोष्ट मला मनातून चांगलीशी वाटत नाही. अर्थात् नाइलाज म्हणूनच तुम्ही ती गोष्ट केली असेल. तरी पण लिओनर्ड कोर्टने यांच्याजवळ गोखले असे म्हणाले की "हा खटला होणे हे नेमस्त पक्षाला निरुत्सा-

ह्याचे एक कारण होईल. का की त्यामुळे त्यांच्याबद्दल लोकांचे मत वाईट होईल! ही गोष्ट खरी. पण टिळक व त्यांचे लोक याना कायद्याची पायमल्लीहि करू देणे योग्य होणार नाही." पण याच पत्रात ताजा कलम घालून मोर्ले लिहितात "एक तासापूर्वी वरील पत्र लिहिले. त्यानंतर ज्या लेखाकरिता टिळकांवर खटला होत आहे ते माझ्या नजरेला आले. ते वाचून सकृद्दर्शनी मला असे वाटते की त्याची तुम्ही उपेक्षा केली असती तरी ठीक होते. तथापि अशा लेखांचेहि परिणाम काय होतात याविषयी माझ्यापेक्षा तुम्हालाच अधिक माहिती असणार आणि राजद्रोहाच्या खटल्यात हीच गोष्ट पहावयाची." फिरून ता. ३१ जुलैचे पत्रात लॉर्ड मोर्ले लिहितात "मला या टिळकप्रकरणाविषयी पुन्हा चर्चा करण्याची इच्छा नाही. तथापि मी असे म्हणतो की मी अगर तुमचे कायदेपंडित याना योग्य मान देऊन त्यांचा व माझा सल्ला घेतला असतात तर तो अशाच अर्थाचा मिळाला असता की टिळकाना तुम्ही हात लावू नये. टिळकाना झालेल्या शिक्षेच्या योगाने जे अनिष्ट परिणाम होतील त्या मानाने स्वतः टिळकानी केलेल्या अनिष्ट गोष्टीचे परिणाम कमी घातक ठरले असते. पण दूध तर लवंडले. आता हळहळून काय उपयोग!" ता. ७ ऑगस्ट रोजी पुन्हा लॉर्ड मोर्ले लिहितात "टिळकांवरील खटल्याचे तुम्ही मोठेच समर्थन केले. तरी त्यामुळे माझे मत बदलू शकत नाही. कायदा व नीति यांच्या दृष्टीने तुमचे करणे बरोबर असेल. त्यापासून तात्पुरता फायदाहि होईल. परंतु अंतिम परिणाम ताजव्यात घालून जोखले तर कोणते पारडे खाली व कोणते वर जाईल हाच राजकारणाच्या दृष्टीने मुख्य मुद्दा आहे. सर्व गोष्टी कालाने कळून येतीलच." सर्व पत्रव्यवहारावर सर जॉर्ज क्लार्क यानी अखेर असा शेरा मारला आहे की "मोर्ले याना आपल्या बुद्धिमत्तेची फार घमेंड म्हणून टिळकांवरील खटल्याचे मर्म माझ्यापेक्षा आपल्याला अधिक समजते असे त्यांच्या मनाने घेतलें है स्वाभाविकच आहे. पण जाग्यावर मी उभा. मलाच त्यांच्यापेक्षा खरे मर्म माहित असणार. ते मी कागदावर परोपरीने यथार्थ कसे कळवू शकणार! मोर्ले यानी पुढे आपले मत किंचित् बदलले असे दिसते. पण याचे कारण माझ्या मते असे की मी दूर पडलो आणि इतर सल्लागार त्याना हाताशी होते. खून होण्याचे सरकारने थांबविले तर' नेमस्त लोकाना ते निरुत्साहाचे कारण होते' हे शब्द निदान तेव्हा तरी मला नवे अपरिचितच होते. पण हा नवलसिद्धांत तेव्हापासून आतापर्यंत टिकून राहिला आहे ही गोष्ट मात्र खरी. आणि त्याचे दुष्परिणाम आता दिसून येतच आहेत!"

## (२) फिर्याद धरपकड झडत्या

कसेहि असो. ता. २३ जून १९०८ रोजी मुंबई सरकाराने टिळकांवर खटला भरण्यास मंजुरी दिली. मुंबई शहरचे डेप्युटी पोलिस सुपरिंटेंडेंट यानी दुसरेच दिवशी मुख्य प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि० ॲस्टन यांजपुढे फिर्याद दाखल

केली. फिर्यादीत असा मजकूर होता की "ता. १२ मेच्या अंकात टिळकानी 'देशाचे दुर्दैव' या मथळ्याखाली अग्रलेख लिहिला आणि त्यायोगे सरकाराबद्दल द्वेष व अवमानबुद्धि लोकात उत्पन्न झाली. निदान ती उत्पन्न करण्याचा त्यानी प्रयत्न केला. अर्थात् हा राजद्रोहाचा गुन्हा होय. तरी १२४ अ व १५३ अ या कलमाखाली टिळकांचा इनसाफ होऊन योग्य ती शिक्षा व्हावी." लगेच मॅजिस्ट्रेटसाहेबानी टिळकाना पकडण्याविषयी वॉरंट काढले. त्यावरून त्याच दिवशी सायंकाळी टिळकाना सरदारगृहात पकडण्यात आले. तसेच दुसरे एक वॉरंट देऊन मॅजिस्ट्रेट यानी केसरी पत्राच्या फाइली वर्गणीदारांची रजिस्टरे हस्तलेख मसुदे छपाईची प्रुफे पत्रव्यवहार हिशेबाच्या वह्या आणि या खटल्यास उपयुक्त असे केसरीसंबंधाचे सापडतील ते हरएक कागदपत्र असा मुद्देमाल घराची कचेरीची वगैरे झडती घेऊन कोर्टापुढे हजर करण्याविषयी हुकूम दिला. याच झडती-वॉरंटावर पुण्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट कारमायकेल यानी मखलाशी करून हुकूम दिला की 'टिळक हे मधून मधून सिंहगडासहि रहात असल्यामुळे तेथील झडती घेतल्याशिवाय या वॉरंटाचे काम पुरे होणार नाही म्हणून तेथील बंगल्याचीहि झडती घ्यावी.'

केसरीवर खटला होणार अशा बातम्या आधीपासून उठल्याच होत्या. तेव्हा आपण होऊन आधीच मुंबईस जाऊन रहावे असे टिळकानी मनाशी ठरविले. शिवरामपंत परांजपे यांच्यावरील खटला आधी भरलेला चालू होता. अर्थात् त्याना सल्लामसलत देण्याकरिता व इतर रीतीने सहाय्य करण्याकरिता जाणेच होते. म्हणून स्वतःवरील खटला होण्याचे आधी एक आठवडाभर टिळक मुंबईस जाऊन राहिले होते. परांजपे यांचे खटल्याचे वेळी टिळक मुंबईला निघाले त्या बरोबर बापूसाहेब गांधी वकील (हे हल्ली मयत आहेत) हे होते. घोड्याच्या गाडीतून उतरून स्टेशनमध्ये पाय ठेवणार तो गुप्त पोलिस खात्याचे एक अधिकारी गांधी याना ओळखून त्यांचे जवळ जाऊन हळूच त्यांच्या कानात म्हणाले "टिळकावरहि खटला करण्याचा सरकारचा विचार आता कायम झाला आहे. त्यांची मुंबईची ही खेप बहुधा शेवटचीच होईल. वॉरंटवर मॅजिस्ट्रेटची आता फक्त सहीच व्हावयाची राहिली आहे." टिळक गाडीत जाऊन बसल्यावर गांधी यानी त्याना एका बाजूला घेऊन वरील हकीकत सांगितली व ते म्हणाले "आपण आज न जाता उद्याचे गाडीने जावे. म्हणजे घरी जाऊन सर्व व्यवस्था करण्यास ठीक पडेल." पण टिळक किंचित् हसून बेपर्वाईने त्याना म्हणाले "घरी जाऊन काय फौजफाटा तयार करावयाचा आहे का सैन्य जमवावयाचे आहे का हत्तीघोडे शृंगारावयाचे आहेत? की किल्ल्यावर शत्रूचा हल्ला होणार म्हणून चर खणावयाचे आहेत? सरकारने सर्व देश हा एक असा तुरुंगच बनविल्याने आपण सर्व आधीच तुरुंगात आहोत. त्यातून प्रत्यक्ष तुरुंगात जाणे म्हणजे एका मोठ्या दालनातून एका लहान दालनात ते मला कोंडणार एवढेच की नाही? यात तयारी ती काय

करावयाची ?" टिळकाना पकडण्याच्या थोडा वेळ आधी असाच प्रकार घडला. आणि असेच उद्गार त्यांच्या तोंडून निघाले. मुंबईस ते गेल्यावर वारंटावर मॅ. ची सही झाल्याची बातमी सरदारगृहात यशवंतराव कुळकर्णी यास कोणी येऊन सांगितली. त्या वेळी टिळक बाहेर गेले होते. परत येताच यशवंतरावानी ती बातमी खरी आहे असे वाटून टिळकाना सांगितली. कारण गुप्त पोलिसापैकी एका विश्वासू माणसाने तेथे येऊन ती त्याना सांगितली होती. तेव्हा टिळक यशवंतराव कुलकर्णी याना म्हणाले "ज्या राष्ट्राला प्रतिकार करण्याचे सामर्थ्य नाही त्या दुर्बल राष्ट्राच्या पुढाऱ्याला असली बातमी कळून तरी काय उपयोग?" पुढे २–२॥ तास वॉरंट आले नाही. दरम्यान टिळकानी झोप घेतली व उठल्यावर ते यशवंतरावाना थट्टेने म्हणाले "का हो इतका वेळ झाला तरी तुमचे ते वॉरंट अजून कोठे येत नाही ते?" नंतर थोड्या वेळात वॉरंट आले. पोलीसाकडे पाहून टिळक म्हणाले "वॉरंटावर मॅजिस्ट्रेटची सही होऊन चार तास होऊन गेले व तेथून सरदारगृह हा पंधरा मिनिटाचाहि रस्ता नाही असे असता तुम्हाला वॉरंट बजावण्याला चार तास कसे लागतात! लवकर आला असता तर आज जामिनकीचा अर्ज तरी करण्याला फुरसत मिळाली असती!" टिळकांचा हा अधिक्षेप जसा मार्मिक होता तसाच तो साधारहि होता. कारण पोलिसांच्या मनात असते तर त्याना बराच वेळ आधी वॉरंट बजावता आले असते. पण ते त्यानी आधी न बजावण्याचे खरे कारण हेच की जामिनकीचा अर्ज करण्याला कोर्ट उठण्यापूर्वी वेळ सापडू नये व टिळकांची रवानगी तावडतोब पोलिसाच्या तुरुंगात व्हावी. असो.

पकडवारंटासंबंधाने आणखी एक गोष्ट सांगावयाची ती अशी की सरकारी कामकाज कितीहि गुप्त चालत असले तरी कित्येक लोकाना आतली गुप्त बातमी मिळण्याची साधने असतात. कोणी माहितगार स्नेहबुद्धीने कोणी द्रव्य लोभाने कोणी सहानुभूतीने तर कोणी महत्वाची बातमी दुसऱ्याला सांगता आल्यामुळे मिळणारी प्रौढी मिरविण्याच्या बुद्धीने जे काय कळेल ते अर्धे कच्चे किंवा पक्के दुसऱ्याच्या कानात कुजबुजत असतात. शिवाय काही सरकारी नोकराना देखील एक प्रकारची राष्ट्रीय भावना असते. म्हणून स्वतःची नोकरी संभाळून का होईना पण सहजासहजी लोकांचे काही भले झाले तर करावे अशी त्याना मनातून इच्छा असते. वरील सर्व कारणामुळे आपणासंबंधाने सरकारदरबारी चाललेल्या कारवाईचा कानोसा टिळकांना घरबसल्याहि नेहमीच थोडा बहुत घ्यावयास मिळे. आणि हलीचा प्रसंग तर विशेषच महत्त्वाचा. कचेरीत काम करणारे व आसपास वावरणारे लोक अधिकाऱ्यांच्या चर्येवरून हालचालीवरून अचूक अनुमाने केव्हा केव्हा काढू शकतात. आणि केव्हा केव्हा मुद्दाम केलेल्या कुजबुजीचा प्रतिध्वनि नौबद वाजविल्यासारखा मोठ्याने उमटतो. तात्पर्य अशा रीतीने टिळकाना थोडीबहुत गुप्त बातमी कळे व तशी ती याहि वेळी आगाऊ कळली. पण ती टिळकाना मुंबईस

कळली इतकेच नव्हे तर फिर्याद दाखल होऊन धरपकडींची व झडतीची वॉरंटे निघाल्याची बातमी त्याच दिवशी सायंकाळी पुण्यास सांकेतिक शब्दाच्या तारेने धोंडोपंत विद्वांस यानाहि कळली. पुण्यास आलेल्या बातमीत केसरी व मराठा या दोन्ही पत्रावर खटले भरले गेले असे होते. त्यामुळे दुसरे दिवशी सकाळी झडतीच्या वेळी आपणावरहि मराठ्याच्या खटल्यातले वॉरंट बजावले जाणार अशा समजुतीने केळकर उजाडताच पोलीस अधिकारी येण्यापूर्वीच गायकवाड वाड्यात दाखल झाले. परंतु पुण्यास आलेल्या वॉरंटात केळकर विद्वांस किंवा इतर कोणास पुण्यास पकडण्याचा हुकूम नसून फक्त वाड्याच्या व सिंहगडावरील बंगल्याच्या झडतीचीच वॉरंटे होती.

वाड्याच्या झडतीला सकाळी प्रारंभ झाला. ती चार तास चालू होती. वर्तमानपत्राच्या फाइली हिशेबाच्या वह्या वर्गणीदारांची रजिस्टरे वगैरे तयारच होती. पण झडती घेणाऱ्या पोलिसांची भिस्त पत्रव्यवहारावर होती आणि त्याकरिता राहत्या घरातील व संपादकाच्या कचेरीतील चिटोरान् चिटोरा गोळा करून तपासण्यात आला. झडतीला मुंबईचे पोलिस इन्स्पेक्टर सुलिव्हन व पुण्याचे पोलिस सुपरिंटेंडंट वगैरे बरेच अधिकारी हजर होते. कागदपत्र काढावे इंग्रजीत असतील ते गोऱ्या अधिकाऱ्यानी वाचून पहावे मराठीत असतील ते देशी पोलिसांकडून वाचवून घ्यावे असा क्रम सुरू होता. सुमारे अडीच तास झडती झाल्यावर टिळकांच्या टेबलाच्या उघड्या खणात इतर कागदात एक कार्ड सापडले. त्यावर स्फोटक द्रव्याची माहिती असलेल्या दोन पुस्तकांची नावे लिहिलेली होती. खटल्याची उत्पत्ति बॉंब गोळ्याच्या अत्याचारातून व वातावरणहि अशा अत्याचाराच्या कल्पनानी भरलेले अशी सरकारची समजूत. यामुळे इन्स्पेक्टर सुलिव्हन यांच्या हातात हा कागद पडताच ते आनंदाने जवळ जवळ उड्या मारू लागले. सोडतीत बक्षिसाचे तिकीट आपल्या नावाने निघाल्याचा आनंद या गृहस्थास पूर्वी केव्हा लाभला होता की नाही माहीत नाही. पण टिळकांच्या हातचा हा लेख या वेळी तरी त्याना सोडतीतल्या बक्षिसाच्या तिकिटासारखा वाटला यात शंका नाही. हा लेख हस्तगत झाल्यावर मुख्य शिकार साधली असे समजून पोलिसानी झडतीचे काम आवरते घेतले. आणि पंचनामा करून ते निघून गेले. त्याच दिवशी दोन प्रहरी सिंहगडच्या बंगल्याची झडती झाली. त्याकरिता पोलिसानी केसरीचे मॅनेजर याना किंवा केळकर याना कळवायास पाहिजे होते. परंतु त्यानी तसे केले नाही व गडावर हजर असलेल्या माणसासमोर पंचनामा उरकून घेतला. पण त्यांची सिंहगडची ही खेप अगदीच फुकट गेली. सिंहगडच्या बंगल्यावर विशेष महत्त्वाचे कागदपत्र मिळण्याची पोलिसना आशा नव्हती. पण एखादे हत्यारपात्यार किंवा बॉंब गोळे तयार करण्याला लागणाऱ्या साधनापैकी काही जिन्नसपान्नस हटकून मिळतील अशी त्याना खात्री होती. पण त्यातहि त्यांची निराशा झाली. एकटादुकटा पोलिस अधिकारी जाता तर असला एखाददुसरा वहिमी जिन्नस तेथे अवचित सापडण्याची तो कदाचित्

व्यवस्था करताहि ! परंतु वरच्या दर्जाचे दोघेतिघे अधिकारी एकत्र गेल्याने असला खोडसाळ प्रकार किंवा एखादा खोटा पंचनामा होण्याचे टळले. वाड्याच्या झडतीत सापडलेल्या टिळकांच्या हातच्या या लेखाचा उपयोग सरकारला अनेक रीतींनी झाला. झडतीच्या दुसऱ्याच दिवशी मुंबईसरकारने टिळकांवर आणखी एक खटला भरला. तारीख ९ जूनच्या केसरीत " हे उपाय टिकाऊ नाहीत " या मथळ्याखाली जो अग्रलेख आला होता तो या खटल्यास आधार म्हणून घेतला होता. त्या अग्रलेखात बॉंबगोळ्याचे मोठे प्रशंसापर वर्णन करण्यात आले असून त्याला मंत्र जादू तोडगा असे म्हटले होते. शिवाय तो करण्यास विशेष सामुग्री लागत नाही असेहि लिहिले होते. अर्थात् या लेखातील बॉंबगोळ्याचे विवेचन आणि स्फोटक द्रव्यासंबंधी पुस्तकांचा टिळकांच्या हस्तलेखात उल्लेख यांचा अर्थाअर्थी संबंध सहजच लावता येण्यासारखा होता. तारीख २५ रोजच्या झडतीत सांपडलेल्या शिकारीची बातमी त्याच दिवशी तारेने सरकारास कळली आणि म्हणूनच दुसरे दिवशी या नवीन खटल्याची उभारणी झाली असे उघड अनुमान करता येते. पुराव्याच्या कायद्याप्रमाणे या कार्डास खटल्यात उघड रीतीने विशेष महत्त्व दिले गेले नाही ही गोष्ट वेगळी. तथापि त्या वेळच्या तशा वातावरणात या हस्तलेखापासून निघणारे दुष्ट बुद्धीचे अनुमान व निदान त्याचे गुप्त अनुरणन हे ज्यूरीतील लोक व संशयी स्वभावाची इतर जनता यांच्या मनात झाल्याशिवाय राहिले नसेल. या लेखाविषयी योग्य तो खुलासा टिळकानी आपल्या भाषणात कोर्टासमोर केला. परंतु या हस्तलेखाने संशयाचे घर जेथे जेथे केले तेथे तेथे टिळकांचा खुलासा जाऊन पोचू शकला नसेल किंवा पोचला तरी त्या वेळी त्याचे कार्य होऊ शकले नसेल यात शंका नाही.

तारीख २५ रोजी निघालेल्या वारंटावरून टिळक तुरुंगात होतेच. तेथेच त्यांच्यावर ता. २७ रोजी भरलेल्या या नव्या खटल्याचे वॉरंट ता. २९ रोजी बजावण्यात आले. हा विधि अर्थात् औपचारिक होता. कारण कैदेत असलेल्याला फिरून अटक ती काय करावयाची ! ता. २९ रोजी मॅजिस्ट्रेटपुढे असिस्टंट ओरिएंटल ट्रान्स्लेटर भास्कर विष्णु जोशी यानी केसरीतील काही लेखांची भाषांतरे दाखल केली. केसरीचे मुंबईतील एजंट नारायणराव दातार यांची जबानी होऊन त्यानी मुंबईत केसरी वाटला जातो त्याविषयी माहिती सांगितली. लगेच टिळकांची जबानी घेतली. त्यात त्यानी इतकेच सांगितले की मला काय सांगावयाचे ते सेशन कोर्टात सांगेन. तेव्हा मॅजिस्ट्रेट ॲस्टन यानी ता. १२ मे व ता. ९ जून या दोन केसरीच्या अंकातील लेखाबद्दल कलम १२४ अ व कलम १५३ अ या अन्वये आरोप ठेवून खटला सेशनकमिट केला. ता. २५ जून रोजी बॅरिस्टर दावर ( धाकटे ) व हायकोर्ट वकील बोडस यानी मॅजिस्ट्रेटपुढे टिळकाना जामिनावर सोडण्याचा अर्ज केला. पण तो नामंजूर करण्यात आला. मात्र टिळकांच्या काही स्नेही मंडळीना तुरुंगात जाऊन टिळकाना भेटण्याची परवानगी देण्यात आली. खटला सेशनकमिट झाल्यावर फिरून ता. २ जुलई रोजी न्यायमूर्ती दावर (मोठे)

यांजपुढे टिळकाना जामिनावर सोडण्याबद्दल अर्ज करण्यात आला. परंतु तोहि नाकारण्यात आला. या अर्जाची सुनावणी बॅरिस्टर जिना यानी केली. पूर्वी १८९७च्या खटल्यात टिळकाना जामिनावर सोडण्यात आले होते. तसेच 'काळ' पत्राचे संपादक शिवरामपंत परांजपे यांसहि जामिनावर सोडले होते. येऊन जाऊन टिळक चौकशीच्या वेळी हजर राहतील की नाही इतकाच काय तो प्रश्न. पण त्याविषयी शंका कोण घेणार? परंतु न्यायमूर्तींना ती कारणे पटली नाहीत. सन १८९७ साली न्यायमूर्ति तय्यबजी यानी टिळकाना जामिनावर सोडले तेव्हाचा अर्ज आज न्यायमूर्ति होऊन बसलेल्या गृहस्थानीच वकिली पेशात केला होता. पण बॅ. दावर यानी जो युक्तिवाद करून पूर्वी यश मिळविले तो ते स्वतः न्यायासनारूढ झाल्यावर त्याना पटला नाही. प्रतिकूल निकाल देताना ही जुनी आठवण त्यांच्या मनात डाचत होती.परंतु शहाणपणाच्या नावाखाली सर्व काही झाकून जाते.म्हणून न्यायमूर्ति दावर यानी निकालात इतकेच लिहिले की "टिळकाना जामिनावर खुले करणे हे शहाणपणाचे होणार नाही. इतकेच नव्हे तर मी असे का करतो याची कारणे न सांगणे हेहि शहाणपणाचे होईल." जिना यांच्या युक्तिवादाला उत्तर देण्याकरिता ॲडव्होकेट जनरल हे उभे राहिले तेव्हा त्याना न्यायमूर्तींनी पहिल्या शब्दालाच अडवून म्हटले की तुम्ही बोलण्याचे व्यर्थ श्रम का घेता? मी याचा आधीच विचार करून ठेवला आहे!

## ( ३ ) सेशन कोर्टातील चौकशीचा प्रारंभ

तारीख ३ जुलई रोजी सरकारतर्फे असा अर्ज करण्यात आला की टिळकांच्या इनसाफाकरिता स्पेशल ज्यूरी नेमण्यात यावी. त्याला टिळकांतर्फे बॅ. बाप्टिस्टा यानी हरकत घेतली. सरकारी वकिलाचे म्हणणे असे की खटला फार महत्त्वाचा. आणि स्पेशल ज्यूरीच्या यादीत महत्त्वाचेच गृहस्थ असतात. म्हणून त्या यादीतूनच ज्यूरीचे लोक निवडावे. बॅ. बाप्टिस्टा यांचे म्हणणे असे की खटला महत्त्वाचा याचा अर्थ खटल्याला राजकीय स्वरूप आहे. म्हणूनच स्पेशल ज्यूरी नको. कायद्यात किंवा कानूत जी काही सवलत मिळण्यासारखी आहे ती सर्व आरोपीलाच मिळावी असे शास्त्र आहे. स्पेशल ज्यूरी मागण्याचा हक्क किंवा अधिकार आरोपीलाच असावा. पण टिळकाना स्पेशल ज्यूरी नको. ते ती मागत नाहीत. उलट तिला त्यांची हरकत आहे. वाटेल तर स्पेशल ज्यूरीहि द्या. पण होता होईतो तीत यूरोपियन न यावेत. याचा अर्थ मूळ मराठी भाषा न समजणारे न यावेत. प्रतिष्ठित माणसांची म्हणूनच स्पेशल ज्यूरी हवी असेल तर नेमा. पण प्रतिष्ठित असे मराठी जाणणारे नेमा. देशी लोकातहि प्रतिष्ठित लोक असतात. केसरी हा पुण्यास निघतो. म्हणून खटला पुण्यासच चालावयास पाहिजे होता. म्हणून पुण्यास ज्या प्रकारची ज्यूरी टिळकाना मिळाली असती तशीच येथे मुंबईसहि त्याना मिळावी. ज्यूरीचा अर्थच असा की आरोपी

ज्या समाजातील त्याच समाजातले ज्यूरर लोक असावे. उलट स्पेशल ज्यूरीचा अर्थ असा होईल की तीत युरोपियन लोकच अधिक येतील. ज्यूरीच्या मूळ यादीत तेच प्रमाण आहे. इंग्रज लोक या कामी ज्यूरर होण्याला विशेष हरकत ही की खटल्यात बॉबगोळे वगैरेचा संबंध. अशा गोळ्यानी गोऱ्या लोकांवर नुकतेच अत्याचार घडले आहेत आणि जातीजातीत वैमनस्य व द्वेष पसरविण्याचा असाहि एक आरोप टिळकांवर आहे म्हणून गोरे लोक ज्यूरीत नसलेले बरे. पण न्यायमूर्तीनी ही तक्रार मानली नाही. व अखेर स्पेशल ज्यूरीच नेमण्यात आली. निकालाची कारणे देताना न्यायमूर्तीनी असे म्हटले की मुंबई शहरातील वरिष्ठ प्रतीच्या लोकाकडून न्याय करून घेण्याची संधि मिळाली तर त्यांच्या दृष्टीने तो एक फायदाच आहे. स्पेशल ज्यूरी नेमली म्हणजे तीत युरोपियन ज्यूरर लोकांची संख्या अधिक राहतेच असे नाही. परंतु अखेर हे म्हणणे खरे ठरले नाही. टिळकांच्या हिताकरिता स्पेशल ज्यूरी जशी न्यायमूर्तीनी नेमली तसेच 'त्यांच्या हिताकरिताच' त्याना जामिनावर सोडण्याचे नाकारले. फार काय अखेर शिक्षा देतानाहि त्यानी नुसत्या टिळकाचेच नव्हे तर एकंदरीने या 'देशाचे हित' साधण्याकरिताच टिळकाना काळे पाण्याची शिक्षा दिली !! तात्पर्य या एकंदर खटल्यात न्यायमूर्तीनी टिळकांचे हितावरच दृष्टि ठेविली होती !!!

सोमवार तारीख १३ जुलई रोजी हायकोर्ट क्रिमिनल सेशन्समध्ये खटला सुरू झाला. सरकारतर्फे ॲडव्होकेट जनरल ब्रॅनसन हे असून इन्व्हेरॅरिटी व बिनिंग हे त्यांस मदत करीत होते. डिफेन्सतर्फे स्वतः टिळक हेच काम चालवीत होते. ज्यूरीची निवडणूक झाली तिला उलट सुलट हरकती घेता घेता खालील गृहस्थ निवडून आले:—

१ वुड २ ग्रेग ३ हिलियार्ड ४ पालनजी ५ दावर ६ हाडसन ७ शापुरजी सोराबजी ८ हेम्पसन ९ ॲंडरसन मार्टिन. ७ युरोपियन व २ पार्शी अशी ही ज्यूरीची रचना होती. ॲंडरसन यांस फोरमन निवडण्यात आले.

प्रथम किती आरोप एकत्र करून खटला चालवावा याविषयी उभयपक्षी थोडा वाद झाला. प्रत्येक आरोपाबद्दल वेगळी चौकशी व्हावी असे टिळकांचे म्हणणे होते. "तारीख १२ मे व ता. ९ जून या दोन लेखांतील विषय वेगवेगळे आहेत व ते एकत्र केल्याने आपला तर घोटाळा होईलच पण माझा त्याहून अधिक होइल. प्रत्येक लेखाला दोन दोन कलमे लावलेली दिसतात. यामुळे एकंदर चार गुन्हे किंवा आरोप होतात. आणि कायद्याप्रमाणे देखील इतक्या आरोपांची चौकशी एकत्र करता येत नाही." यावर सरकारी वकील म्हणाले की "आम्ही चारीपैकी एखादा वाटेल तो आरोप मागे ठेवू आणि कायद्याच्या शब्दात बसता यावे म्हणून तीनच उरवू." यावर न्यायमूर्ति म्हणाले की "चौथा आरोप तुम्हाला नुसता मागे ठेवता येणार नाही तर तो काढूनच घ्यावा लागेल. आणि तसे झाले म्हणजे तो नुसता काढून घेतला असे नव्हे तर त्या आरोपातून आरोपी दोषमुक्त झाला असेच

मला लिहून ठेवावे लागेल." तेव्हा चौथ्या आरोपासंबंधाने तो काढून घेतल्याचा अर्ज मी या खटल्याच्या शेवटी करीन असे सरकारी वकिलानी कबूल केल्यावर खटल्यास सुरवात झाली. चौथा आरोप काढून घ्यावयाचा तो ता. १२ मे च्या अंकासंबंधाने. पण हा लेख जे वाचून पाहतील त्याना तेव्हाच दिसून येईल की १५३ अ कलमाखाली येण्यासारखे त्यांत एक अक्षरहि नाही. अर्थात् तो आरोप काढून घेणे ही सरकारी वकिलानी फारशी मेहेरबानगी केली असे नाही.

प्रत्येक आरोपासंबंधाने टिळकाना जबाब विचारण्यात आला तेव्हा 'मी दोषी नाही' असे त्यानी सांगितल्यावर खटल्याचे काम पुढे चालू झाले. सरकारतर्फे प्रारंभीचे भाषण इन्व्हेरॅरिटी यानी केले. त्यानी १२४ अ व १५३ अ या कलमाचा सर्वसाधारण खुलासा केला. नंतर विलायतेतील सरकारच्या अब्रुनुकसानीचा व राजद्रोहाचा कायदा कशा प्रकारचा आहे याचे थोडेसे विवरण केले. नंतर टिळकांचे लेख घेऊन त्यांची भाषांतरे समग्र वाचली व जाताजाता त्यातील शब्दावर टीका केली. ता. १२ मे व ता. ९ जूनच्या अंकातील दोन्ही अग्रलेख सबंधच्यासबंध आक्षिप्त म्हणून दाखल करण्यात आले होते तेव्हा त्या लेखातील जवळ जवळ सगळ्या मुख्य वाक्यांचा परामर्ष घेतला गेला असे त्याना दाखविणे प्राप्त होते. त्यातल्यात्यात ता. ९ जूनच्या लेखावर त्यानी विशेष टीका केली. ता. १२ मेच्या अंकासंबंधाने त्यांना फारसे बोलता आले नाही. सर्व भर १२४ अ कलमावर होता. १५३ अ कलमाखाली या दोन्ही लेखात येण्यासारखे काय आहे हे सांगताना इन्व्हेरॅरिटी याना बरीच अडचण पडली. आणि जातीजातीत वैमनस्य माजविण्याचाहि टिळकांचा हेतु आहे हे सांगण्याकरिता सरकारला उसन्या जमा धराव्या लागल्या. कारण टिळकानी लेखात टीका केली असेल तर ती सरकारच्या कृत्यावर. ती अमुक एका जातीच्या लोकावर म्हणजे इंग्रज किंवा युरोपियन लोकावर नव्हती. म्हणून सरकार म्हणजेच गोरे लोक असा युक्तिवाद करून जे सरकाराविषयी टिळक बोलले ते गोऱ्या लोकाविषयीच बोलले अशा रीतीने लक्षणापद्धतीने अर्थ एका पदार्थावरून दुसऱ्या पदार्थावर नेला. केसरीतील इतर लेखांचा उल्लेख करण्याच्या बेतात सरकारी वकील आले तेव्हा इतर लेख शाबीत किंवा कबूल झाल्याशिवाय त्यांचा उल्लेख तुम्हाला करता येणार नाही अशी टिळकानी हरकत घेतली. तेव्हा सरकारी वकिलानी तो विषय सोडून दिला. सरकारतर्फे प्रास्ताविक भाषण अगदी त्रोटक असावे असा सामान्य संकेत आहे. ते नुसते दिग्दर्शनपर असावयाचे. शिवाय इन्व्हेरॅरिटी हे जात्याच थोडे बोलणारे पाल्हाळ न करणारे असल्यामुळे त्यांनी आपले भाषण थोडक्यात आवरले.

## ( ४ ) साक्षीपुरावा व जबाब

नंतर सरकारतर्फे साक्षी घेण्यास सुरवात झाली. प्रथम असिस्टंट ओरिएंटल ट्रॅन्सलेटर भास्कर विष्णु जोशी यांची साक्ष झाली. त्यानी केसरीतील निरनिराळ्या

व पुराव्यास दाखल करण्याच्या लेखांचे भाषांतर आपण केले असे सांगून ते लेख पुराव्यात घेण्याकरिता दाखल केले. लेखाचे मोजमाप शेंडाबुडखा आद्यंत तारीखवार तात्पर्य एकंदर चतुःसीमा काय आहेत हे सांगण्यापलिकडे जोशी यांची साक्ष गेली नाही व ती नेण्याचे सरकाराला कारणहि नव्हते. त्यांची खरी साक्ष घेण्याचा बोजा टिळकांवरच होता. कारण भाषांतरे बरोबर झाली नाहीत किंवा समर्पक होऊ शकत नाहीत असे टिळकाना उलट तपासणीत दाखविता आले तरच, काही उपयोग किंवा मूळ मराठी लेख न समजणाऱ्या ज्यूरीकडे आपला न्याय करण्याचे काम आले आहे या त्यांच्या तक्रारीत काही स्वारस्य. त्याप्रमाणे टिळकानी जोशी यांची उलट तपासणी सुरू केली. तिला सोमवारचा ठरलेला कामाचा सर्व वेळ लागलाच पण मंगळवारचाहि बराच वेळ या उलट तपासणीने खाल्ला. नंतर केसरीचे एजंट नारायणराव दातार यांची साक्ष झाली. त्यानी केसरीच्या मुंबईच्या बटवड्यासंबंधाने माहिती सांगितली. त्यात काही विशेष नसल्याने टिळकाना उलट तपासणी करावी लागली नाही. नंतर पोलिस इन्स्पेक्टर सुलिवन यांची साक्ष झाली. त्यात त्यानी टिळकांच्या वाड्याची झडती घेतल्याची हकीगत सांगितली. त्यात मुख्य भर टिळकांच्या टेबलात सांपडलेल्या कार्डासंबंधाचा होता. हे कार्ड पुराव्यात घ्यावे की नाही ह्यासंबंधाने काही वाद झाला. प्रथम कार्ड न्यायमूर्तींना व ज्यूरीला दाखविण्यात आले. ते पुराव्याला अग्राह्य अशी टिळकानी हरकत घेतली. परंतु ती अमान्य करून कार्ड निशाणी लावून दाखल करण्यात आले. पण उलटतपासणीत टिळकानी खालील प्रमाणे माहिती साक्षीदाराकडून काढून घेतली. "कार्ड लायब्ररीच्या खोलीत सापडले. एकाच खणात या कार्डाशिवाय इतर पुष्कळ कागद होते. खणाला कुलूप नव्हते. कार्ड इतर कागदात सरमिसळ असे होते. अगदी माथ्यावर नव्हते किंवा अगदी तळीच दडून राहिलेले नव्हते. या एका खणात शेकडो कागद होते त्यात चालचलाऊ कागदहि होते. अमेरिकन वर्तमानपत्रातून कातरून घेतलेले तुकडे होते. वॉरंटात सिंहगडचे नाव लिहिलेले नसता वाड्याच्या झडती वॉरंटाच्या आधारावरच सिंहगडच्या बंगल्याचीहि झडती घेतली. जाताना केसरीकडील कोणी मनुष्य सिंहगडास बरोबर नेला नाही. बंगल्यावर नोकर होता पण त्याला विचारल्याशिवाय पोलीसानी कुलपे तोडून झडती घेतली." नंतर मॅजिस्ट्रेटकडून पंचनाम्याबरोबरचे सर्व कागद आल्यामुळे ते उभयपक्षी तपासून घेतले गेले आणि सर्व कागदाना एकच निशाणी लावून ठेवून द्यावे असे टिळकानी सुचविले. कारण त्यातलेच काही त्याना स्वतःला पुराव्यात दाखल करावयाचे होते.

मंगळवारी ३ वाजता सरकारी पुराव्याचे काम संपले. तुम्हाला काही जबाब द्यावयाचा आहे काय असे न्यायमूर्तींनी टिळकाना विचारले तेव्हा आगाऊ लिहून आणलेली जबानी टिळकानी कोर्टाला वाचून दाखवून ती दाखल केली. त्यात खालील आशयाचा मजकूर होता. "फिर्यादीतील लेखांची जबाबदारी सर्वस्वी संपादक व प्रकाशक या नात्याने मजवर आहे. राजकीय प्रश्नांची चर्चा मराठी भाषेत

नव्यानेच सुरू असल्यामुळे काही काही इंग्रजी शब्दांचे अर्थ व्यक्त करताना निरनिराळे मराठी शब्द अनिश्चितपणे योजले जातात. प्रस्तुत लेखात तसेच काही शब्द मी उपयोगात आणले आहेत. अधिकारी वर्गासंबंधाने बोलताना मी गोरा सरकारी इंग्रजी राज्यकर्ता हे शब्द निरानिराळ्या ठिकाणी पण एकाच अर्थाने वापरले आहेत. जुलमी माथेफिरू तेज आवेश त्वेष चीड एकमुखी अनियंत्रित अडवणुकीचा मार्ग भूत मतभ्रष्ट बुद्धिभ्रंश आततायी कडवी पौरुष पृथकवाटणी इत्यादि शब्दांची भाषांतरे सरकारी भाषांतरकरानी केली ती मला मान्य नाहीत ( या ठिकाणी टिळकानी वरील शब्दाना स्वतःस मान्य असलेले इंग्रजी प्रतिशब्द दिले. ) लेखात अधिकाराची पृथक् वाटणी असे शब्द आहेत. येथे या वाटणीचा माझा अर्थ काय आहे हे डीसेंट्रलाइझेशन कमिशनपुढे गेल्या मार्चमध्ये मी जी लेखी कैफियत दिली तिच्यात स्पष्ट केलेले आहे. ( येथे टिळकानी कमिशनपुढील आपल्या साक्षीतील एक उतारा दिला. ) आक्षिप्त लेखासंबंधाने माझे म्हणणे असे की वाद चालू होता त्यातच वरील मुद्याला धरून माझे म्हणणे काय ते या लेखात दिले आहे. स्फोटक द्रव्याच्या पुस्तकाची नावे मी आपल्या हाताने लिहिलेले कार्ड पुराव्यात दाखल केले आहे त्यासंबंधी माझे म्हणणे असे की स्फोटक द्रव्याचा कायदा सरकाराने नुकताच पास केला त्यावर मला केसरीत टीका करावयाची होती. विशेषतः स्फोटक द्रव्य या शब्दाच्या व्याख्येवर माझा मुख्य कटाक्ष होता. म्हणून मी पुस्तकाच्या छापील यादीतून ती नांवे टिपून घेतली. आणि पुढे मुंबईस ती कोठे मिळाली तर मी वाचून पाहणार होतो. ता. ९ जूनच्या अंकातील लेखासंबंधाने मला असे म्हणावयाचे की नुसती दडपशाही हा एकच उपाय असंतोष नाहीसा करण्याला पुरेसा नाही हेच मत व्यक्त केलेले अनेक कागदपत्र मी पुराव्यात दाखल करतो. आणि मी सर्वस्वी निर्दोषी आहे असेच या न्यायपीठाला माझे म्हणणे आहे. "

दाखल केलेल्या कागदपत्राशिवाय टिळकाना वेगळा काही पुरावा द्यावयाचा नव्हता. हे कागदपत्र तरी पुराव्यास कसे घेता येतात याविषयी सरकारी वकिलानी शंका प्रदर्शित केली. ते म्हणाले शेकडो कागदपत्र दाखल करून खटल्याचे काम विनाकारण लांबवावे असा टिळकांचा उद्देश दिसतो. त्यावर "टिळक या कागदपत्राचा कसाकाय उपयोग करतात हे कळून येईल तसतसा मी आपला निकाल देईन" असे न्यायमूर्तीनी सांगितले आणि टिळकानी कागदपत्री पुरावा दाखल केल्यामुळे शेवटी उत्तर देण्याचा अधिकार सरकारी वकिलालाच मिळतो असे ठरवून "बचावाचे म्हणून जें काही तुम्हास ज्यूरीला उद्देशून बोलावयाचे असेल ते आताच समग्र बोला" असे न्यायमूर्तीनी सांगितल्यावरून टिळकानी आपल्या भाषणास सुरवात केली.

## ( ५ ) टिळकांचे न्यायासनापुढील भाषण

" या खटल्यातील सरकारची बाजू ॲडव्होकेट जनरल यानी आपल्यापुढे मांडलीच आहे. मी आता आपली मांडणार. पण माझे म्हणणे अगदी हवे तसे

माझे मीच मांडणार इतकाच मला फायदा. माझे सबंध लेखच्या लेख गुन्हेगारीचे म्हणून पुढे मांडण्यात आले आहेत. तेव्हा आता मला त्यातील शब्दान् शब्दाचा कीस पाडीत बसावे लागणार. म्हणून हा दोष माझा असे तरी आपण म्हणणार नाही. एरवी मला पुष्कळ बोलण्याचे कारणच नाही. मी सराईत वकील नाही. माझा खटला मीच होईल तसा चालवीत आहे. म्हणून आपण मला योग्य ती सवलत द्यालच. लेख मी प्रसिद्ध केले हे मी पूर्वीच कबूल केले आहे. त्यातून गुन्हा कितपत शाबीत होतो इतकाच प्रश्न. त्याचा विचार करिताना प्रथम आपण हे लक्षात ठेवा की प्रत्येक भाषेत शब्दाचे सूक्ष्म ध्वनी व श्लेष वेगवेगळे निघतात. हे सांगण्याचे कारण इतकेच की किती बरोबर असली तरी आपणापुढे 'भाषांतरे' आहेत. मूळ लेख नाहीत. या लेखाव्यतिरिक्त माझ्या हातचा असा एका कार्डा- इतकाहि, माझ्या हेतूचा प्रत्यक्ष पुरावा, असा आपणापुढे सरकारला मांडता आला नाही. आणि नुसत्या लेखावरून माझा हेतू राजद्रोहकारक आहे असे म्हणाल तर ते बरोबर होणार नाही. मूळ लेख मराठीतून मराठी वाचकांकरिता लिहिले. येथे आपणापुढे भाषांतरे आहेत. आपणहि फक्त इंग्रजी जाणणारे म्हणजे मराठी न सम- जणारे आहा. मूळ लेखातील ध्वनी अर्थात् मराठी वाचकानाच कळतील. असो. लेखाखेरीज हेतूंचा इतर पुरावा न घेता राजद्रोहाचा गुन्हा शाबीत धरणे हे विला- यतेत सन १७९२ सालापूर्वी होत असे. पण फॉक्सच्या लायबेल ॲक्टाने ते सर्व आता बदलले आहे. दिसण्यात इकडील राजद्रोहाचा कायदा व विलायतेतील कायदा एकाच स्वरूपाचे आहेत. पण राजद्रोहाचे खटल्यात विलायतेतील ज्यूरी इकडच्या- पेक्षा अधिक व्यापक दृष्टीने विचार करिते. तसेच इकडेहि व्हावयास पाहिजे.

"केवळ कायद्याच्या शब्दाप्रमाणे या लेखातून गुन्हा शाबीत होतो असे न्याया- धीशाना वाटत असले तरी ज्यूरीला जर तसे न वाटेल तर ज्यूरीच्याच म्हणण्याचा अंमल होईल. कारण अमुक शब्दानी राजद्रोह घडण्यासारखा आहे की नाही असा प्रश्न नसून राजद्रोह प्रत्यक्ष घडला काय असाच प्रत्यक्ष प्रश्न असतो. माझ्या लेखानी लोकक्षोभ घडला असा पुरावाच पुढे आलेला नाही. अर्थात् लोकक्षोभकारक राज- द्रोह करण्याचा 'प्रयत्न' मी केला एवढाच दोषारोप उरणार. पण प्रयत्न म्हटला म्हणजे त्यात हेतू व पूर्वसंकेत हे आलेच. मी लोकक्षोभाचा प्रयत्न केला आणि तो फक्त इतर कारणानी फसला, एरवी लोकक्षोभ हटकून झाला असता, असे दाखवा- वयास पाहिजे होते. पण येथे ज्यूरीपुढे फक्त दोन लेख पुरावा म्हणून टाकले आहेत. याशिवाय काही नाही. माझे लेख हा केवळ त्या लेखांच्या प्रसिद्धीचा पुरावा होय. राजद्रोहाच्या 'प्रयत्नाचा' नव्हे. लेख छापताना अमुक एक दुष्ट हेतू होता असे दाखविले पाहिजे. नुसत्या भाषेने राजद्रोह होत नाही. लेख हा फक्त एक आणा किंमतीचा पुरावा ठरेल. पंधरा आणे इतर पुरावा हवा. एखाद्या मनुष्या- जवळ दोन तोळे अफू सांपडली तर तो बेकायदा अफू बाळगल्याचा गुन्हा होईल. पण त्या अफूने खून किंवा आत्महत्या करण्याचा गुन्हा शाबीत होणार नाही. कारण

नुसती अफू बाळगल्याने वाटेल त्या गुन्ह्याचा हेतू कसा सिद्ध होणार? या कामी पुराव्याचा बोजा सरकारवरच आहे. म्हणून "तुमचा गुन्हा करण्याचा हेतू नव्हता हे तुम्हीच शाबीत करा" असे मला म्हणणे चुकीचे होईल.

"परिस्थिति पाहिली असता असे दिसेल की हे लेख म्हणजे वादातील एका बाजूचा कोटीक्रम किंवा उत्तर प्रत्युत्तर अशा स्वरूपाचे आहेत. त्यात मी योग्य मर्यादा सोडल्या आहेत काय एवढेच ज्यूरीने पहावे. तत्त्ववेत्ता लॉक याने आपल्या ग्रंथात एके ठिकाणी असे म्हटले आहे की "अतिक्रमणाच्या दृष्टीने राजा व यःकश्चित् शिपाईप्यादा सारखाच." पण या तुलनेने राजापमान किंवा राजद्रोह होत नाही. कारण प्रसंग कोटिक्रमाचा व विवेचनाचा आहे. "लोकात असंतोष आहे तो अमुक कारणामुळे" असे सांगणे हे असंतोषाचे फक्त विवेचन होय. असे म्हणण्यात सरकारचा द्वेष घडत नाही. आहे ते सांगणे हा गुन्हा नव्हे. तसेच जे वाईट आहे ते सुधारा असे म्हणणे हाहि गुन्हा नव्हे. गोष्ट तीच म्हटली पण निखालस गुन्हेगारीच्या हेतूने म्हटली हे सरकारानेच सिद्ध केले पाहिजे. सर्व राजकीय सुधारणा या आजवर प्रजेच्या चळवळीमुळेच झालेल्या आहेत. सरकारावर टीका करण्याचा हक्क मान्य केल्यावर खरी टीका कोठे संपते हे ठरविणे कठीण आहे. पण ही मर्यादा ठरविणे असल्यास हा ज्यूरीचाच अधिकार आहे.

"कलम '१२४ अ' मध्ये 'सरकार' या शब्दात 'संकीर्ण राजसत्ता' हाच अर्थ अभिप्रेत आहे. एकादा विशिष्ट अधिकारी किंवा अधिकाऱ्यांचा वर्ग किंवा संघ विवक्षित नाही. कायद्याने स्थापिलेले सरकार म्हणजे काही विशिष्ट अधिकारी नव्हत. मी राज्यकारभारात अमुक एक दोष म्हणून दाखविले तर तुम्ही आपल्या समजुतीप्रमाणे म्हणाल की "नाही हे काही खरे दोष नव्हेत." पण अशा मुद्यावर माझे व तुमचे मत जुळले नाही म्हणून मी गुन्हेगार कसा ठरणार? मतभेदाशिवाय सुधारणाच नाही. आणि मतभेद झाला म्हणजे दोहोतले कोणते तरी एक मत चूक असणारच. मोर्ले यानी 'कॉम्प्रोमाइज' नामक आपल्या पुस्तकात असे म्हटले आहे "एकाद्या इंग्रजाने राजसंस्था हे एक सोंग आहे असे म्हटले, व अशा सोंगामुळे देशाला हीनता येते सामाजिक ध्येये उच्च राहत नाहीत लोकातील स्वाभिमान नष्ट होतो असे प्रतिपादिले तर तो काही राजद्रोह नव्हे. कारण कोणी हे मत प्रतिपादिले म्हणजे काही त्याने लगेच राजमुकुट हातात घेतला आणि तो रद्द असे म्हणून अजबखान्यात नेऊन ठेविला असे होत नाही." बोलणे आणि कृति यातील अंतर फार महत्त्वाचे आहे. माझ्या मनात लक्षाधीश व्हावयाचे आहे असे मी तोंडाने बोललो म्हणजे मी चोरी करण्याच्या प्रयत्नास लागलो असे का समजावयाचे? कारण मी आज गरीब असलो तरी पुढे कदाचित् इतर मार्गांनी पैसे मिळवूहि शकेन. तसेच मी नोकरशाही काढून टाकावी असे म्हटले म्हणून मी बंडखोर झालो आणि राजद्रोहाला सरसावलो असे का समजावयाचे? दुसरे एक उदाहरण घ्या. गोरक्षणाच्या चर्चेत काही विधाने अशी असू शकतील की

आज ती विशिष्ट परिस्थितीमुळे मुसलमानाना आवडणार नाहीत तर उद्या परिस्थिति बदलल्याने ती हिंदूना आवडणार नाहीत. ज्याला उद्देशून कोणी काही लिहिले बोलले त्या समाजाची त्या वेळची स्थिति लक्षात घेतली पाहिजे. लेख हा नित्य पण त्याचे अर्थध्वनि व परिणाम हे अनित्य म्हणजे बदलणारे होत. महाराष्ट्राच्या मनःस्थितीचा असा कोणता पुरावा पुढे मांडला आहे की त्यावरून माझे लेख गुन्ह्याचे ठरतील ? आपण ज्यूरीचे लोक. आपणाला व्यवहार उत्कृष्ट कळतो. आपणाला समाजाची माहिती आहे त्यावरून माझा हा राजद्रोहाचा प्रयत्न ठरतो काय ? माझा असा दुष्ट हेतु तरी काय शाबीत केला गेला आहे ? मी कोणी 'टिळक' आहे ही गोष्ट मनात ठेऊ नका. एकाद्या सामान्य माणसाचा न्याय आपण करीत आहो असे समजा. राजकारणात तुमचा व टिळकांचा मतभेद असेल. माझी राजकीय मते तुम्हास मान्य नसतील, पण देशाच्या हिताकरिता ती बोलून दाखविण्याचा अधिकार मला आहे की नाही ? तो माझा अधिकार तुम्ही मानाल तर तुमचा माझा मतभेद असताहि मला निर्दोषी ठरविणेच तुम्हाला प्राप्त आहे. सरकार झाले म्हणून ते नेहमी न्यायाने व कायदेशीरपणाने वागते असे नाही. मग तसे म्हणण्याची चोरी का ? माझ्या स्थितीत तुम्ही असता तर तुम्ही असेच लिहिले बोलले असतेत. नुसते पीनलकोडाचे कलम घेतले तर त्याने मुद्रणस्वातंत्र्याचा बचाव होणे नाही. कोणताहि लेख दोषी ठरविता येईल. पण स्वतंत्र देशात मुद्रणस्वातंत्र्याचे रक्षण करणे हा अधिकार ज्यूरीकडेच आहे."

दुसरे दिवशी फिरून टिळकानी आपल्या भाषणास सुरवात केली. ते म्हणाले:—
"फौजदारी काम चालविण्याच्या कायद्याप्रमाणे मी आधी भाषण करावे व सरकारी बॅरिस्टरानी परत उत्तर द्यावे असे आहे. यामुळे मला थोडी अडचण झाली आहे. पण असो. मी सर्वच तक्रार सांगून टाकतो म्हणजे सरकारी वकीलाच्या मनात असेल नसेल त्यालाहि उत्तर मिळेल.

"राजद्रोहाचा 'प्रयत्न' करणे याविषयी मी काल बोलत होतो. पंजाब लॉ रिपोर्टर्स नं. ३० मध्ये एक असा खटला दिलेला आहे. एक मनुष्य रागावून हातात कुऱ्हाड घेऊन दुसऱ्याच्या मागे धावत जात होता हे शाबीत झाले. पण दोघामध्ये थोडे अंतर होते येवढ्यावरून न्यायाधीशाने निकाल दिला की खुनाचा प्रयत्न शाबीत होत नाही. कारण न जाणो त्या चार पावलाच्या अंतरात त्याचे मन कदाचित् फिरलेहि असते. पिनलकोड कलम ५११ या खाली कदाचित् 'प्रारंभीच्या कृत्या'ला 'प्रयत्न' म्हणता येईल. पण कलम १२४ अ चा प्रश्न असता त्यातील प्रयत्न या शब्दाचा अर्थ इतका संकुचित करून चालणार नाही. एखाद्या माणसाने धर्मबुद्धीने म्हणजे धर्मादाय करण्याकरिता लोकांचे पैसे त्याना न विचारता उचलून घेतले तर तो एक प्रकारचा गुन्हा होईल. पण हेतूच्या दृष्टीने चोरीचा गुन्हा होणार नाही. हे उदाहरण स्टीफन्स याने 'फौजदारी कायद्याचा इतिहास' या पुस्तकातच दिले आहे. खालच्या दर्जाचा राजद्रोहाचा प्रयत्न मजकडून घडला

असल्यास कलम ५११ प्रमाणे खटला भरावयाला पाहिजे होता. १२४ खाली नव्हे. माल्यावरील खटल्यात हेतु व उद्देश यातील फरक न्यायमूर्तींनी स्पष्ट करून सांगितला आहे. आणि नवीन कायदा होईपर्यंत तोच अर्थ राहणार. मी तो अर्थ मनचा लावलेला नाही तर वरिष्ठ न्यायकोर्टाचाच आहे. इंग्लंडमध्ये पूर्वी राजद्रोहाचा कायदा फार व्यापक होता. पण क्रमाक्रमाने तो संकुचित झाला. म्हणजे आरोपीना अनुकूल असा झाला. या कामी जनतेने ज्यूरीच्या द्वारे झगडून आपला हक्क प्रस्थापित केला. " अर्थ ठरविण्याचे धनी ज्यूरी आणि उद्देश व हेतु ठरविण्याचे धनी आम्ही आहोत " असे जुने ब्रिटिश न्यायाधीश म्हणत. पण ज्यूरी म्हणे—" ते काही नाही. आरोपीचा हेतु काय होता हेहि आम्हीच ठरविणार. " हा तंटा १७९२ च्या कायद्याने मिटला. आजची हिंदुस्थानातील स्थिति १७९२ मधील विलायतेतील स्थितीसारखीच आहे. विलायतेतील तंटा जसा लोकसत्तेचा होता तसाच तो आज इकडेहि आहे. लॉर्ड अर्स्किनसारख्या कायदेपंडितानी तेव्हा लोकांचीच बाजू घेतली होती. डीन ऑफ सेंट असॅफ यांच्यावरील खटल्याची हकीगत या दृष्टीने वाचण्यासारखी आहे. त्यातून हेच निष्पन्न झाले की " अमूक एक लेख आरोपीने लिहिले की नाही किंवा अमुक एक भाषण आरोपीने केले की नाही एवढ्यापुरताच निकाल द्या " असे ज्यूरीला सांगणे यात वास्तविक ज्यूरीला काहीच अधिकार दिला नाही असेच होते. म्हणून त्या लेखाने किंवा भाषणाने राजद्रोह करण्याचा हेतु होता की नाही हेहि ठरविण्याचा अधिकार ज्यूरीला असला पाहिजे. तो अधिकार विलायतेतील ज्यूरीने अखेर मिळविलाहि. पार्लमेंटमध्ये लोकांचे प्रतिनिधि असावे तितके नाहीत हे भांडण जसे विलायतेतील लोक तेव्हा भांडत होते त्याचप्रमाणे राज्यकारभारात लोकाना सत्ता नाही हे भांडण आम्ही हिंदी प्रजाजन भांडत आहोत. म्हणून जनतेचे प्रतिनिधित्व ज्या ज्यूरीकडे येते तिने आमचे रक्षण केले पाहिजे. या दृष्टीने माझा खटला मॅजिस्ट्रेटपुढे न चालता ज्यूरीपुढे चालत आहे हे मी सुदैवच समजतो."

(यानंतर पाचपंचवीस उतारे दाखवून विलायतेतील त्या वेळच्या या भांडणाचे व ज्यूरीने झगडून मिळविलेल्या अधिकाराचे वर्णन टिळकानी केले.)

उपहारानंतर टिळकानी पुन्हा बोलण्यास सुरवात केली. ते म्हणाले:—

"ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो जे माझे लेख तुम्हापुढे आहेत ते लिहिण्यात माझा कोणता हेतु होता हे उघड आहे. भाषांतरात मोठमोठ्या चुका आहेत तरी देखील माझा हेतु अँग्लोइंडियन वर्तमानपत्राना उत्तर देण्याचा होता हे त्या भाषांतरावरूनहि स्पष्ट होत आहे. तुम्ही म्हणाल या तक्रारी तुम्ही अधिकाऱ्यांकडे जाऊन समक्ष का सांगितल्या नाहीत ? पण माझ्यासारख्या संपादकाचे काम फक्त लेख लिहिण्याचे आहे. संपादक हा एक प्रकारे स्वतंत्र मनुष्य आहे. लोकावर जुलूम होऊन बॉंब उडू लागले खून होऊ लागले सशस्त्र प्रतिकार होऊ लागला खुदीराम बोसच्या खटल्यासारखे खटले होऊ लागले अशा वेळी माझ्या सारख्याने मी लेखात केला

असाच उपदेश सरकारास करणे योग्य आहे. तो उपदेश कडू लागेल. त्याकरिता कोणी आभारी होणार नाही. पण संपादकाला आपले कर्तव्य केलेच पाहिजे. वर्तमानपत्रे काढतात ती केवळ पैसे मिळविण्याकरताच नव्हे तर सरकारास सदुपदेश करण्याकरताच. आज गोष्ट घडली उद्या आम्हाला त्यावर लिहावेच लागते. या घाईत राग येण्यासारख्या प्रतिपक्षाच्या टिकेची भर पडते तेव्हा उत्तरहि जोराचेच येते. आपण माझ्या जागी आहा अशी क्षणभर कल्पना करा म्हणजे माझ्या हेतूची खरी कल्पना आपणाला होईल. बॉंब उडू लागले असे पाहून पायोनियर सारखी पत्रे म्हणू लागली " हा अत्याचाराचा संप्रदाय सुरू झाला. " त्याला मी उत्तर दिले की " परिणामापुरते तुम्ही बोलता. पण कारणाची मीमांसाहि करा. लोक बॉंब उडवू लागले खरे पण त्याचे कारण शोधाल की नाही ? " पायोनियर व केसरी दोघानी आपापली मते सांगितली इतकाच त्याचा अर्थ. अत्याचार होतात याचे सर्वांनाच वाईट वाटते. असे असताहि दोन संपादक दोन तऱ्हेचे लिहितात. मी झाले तरी माझ्या मनचे लिहित नाही. लोकाना काय वाटते ते लिहितो. लोकांचे खरे मत प्रगट करावयाचे नाही तर मग वर्तमानपत्रे कशाला ? अँग्लो इंडियन पत्राना जितकी स्वतंत्रता मिळते तितकी आम्हालाहि का मिळू नये ? असंतोषाच्या कारणाप्रमाणेच तो थांबविण्याचे उपायहि मी सांगितले आहेत. कोणी ते बरोबर म्हणतो कोणी ते चूक म्हणतो असा वाद सुरूच आहे. आज एकाने लिहिले. उद्या त्याला दुसऱ्याने उत्तर दिले. परवा चवथ्याने त्याला प्रत्युत्तर दिले. कोणी बातमीदार म्हणून लिहिले. कोणी संपादकाला पत्र म्हणून पाठविले. असा हा वाद प्रवाद सुरूच असतो. अशा वादाची वेळ आली असता कोण खरा संपादक वादाला भिऊन बगल देईल ? देशात वाद चालला ' बॉंब का उडतात ' म्हणून. अशा वेळी पुराणवस्तुवर्णन किंवा आधुनिक शोध अशावर मी लेख लिहू की काय ? कोणीहि जबाबदार संपादक प्रचलित विषयावरच लिहिणार. वाद चालू होता ही गोष्ट सरकाराने लपवून ठेवली आहे. आणि असल्या गोष्टी वाटेल तर मी शाबीत कराव्या असा बोजा सरकार मजवर टाकू पहाते हा अन्याय होय ! दोरीला साप म्हणणे हा मराठी भाषेतील अगदी सामान्य दृष्टांत. पण साप हा शब्द मी सरकारला उद्देशून घातला असे सरकारी वकिलांनी तुम्हाला भासविले आहे ! राजा याचे भाषांतर king खरे पण ते छापताना K जाडा टाईप घालून तो शब्द राजेबादशहा यांचा दर्शक असल्याचे त्यानी ध्वनित केले आहे. ' राष्ट्रवध ' याचा अर्थ अगदी सरळ आहे. पण येथेहि वधाचे भाषांतर Assassination असे केले. जणू काय राष्ट्र हा कोणी देहधारी पुरुष आहे ! असले प्रकार पाहिले म्हणजे परवा मुंबईच्या प्रदर्शनात हसू येण्याकरिता जागजागी ठेवलेल्या—चेहरा विद्रूप करून दाखविणाऱ्या आरशाची आठवण होते. सरकारी भाषांतरकाराचे भाषांतर असेच हास्यास्पद झाले आहे. अशा विकृत भाषांतरावर कोण कुणाला शिक्षा देईल ? मी आपल्याकडून भाषांतरातील चुका शुद्ध करण्याचा प्रयत्न केला. पण मला या ठिकाणी बिनपगारी

शाळामास्तर म्हणून खचित बोलाविले नाही. लेख लिहिले १९०८ साली आणि त्याचे भाषांतर केले पन्नास वर्षांपूर्वीचा शब्दकोश घेऊन! बरे अशा भाषांतरापैकी तरी कोणत्या नक्की शब्दाचा तुम्ही आधार घेता म्हणून सरकारी वकीलाला मी विचारले तर म्हणतात "सगळयाच्या सगळ्या लेखांचा." जणू काय त्यातला प्रत्येक शब्द राजद्रोही आहे! तुम्ही म्हणाल की भाषांतरे चुकतील कशी? तर त्याचे कारण इतकेच की मराठी भाषा वाढत आहे व जुने शब्दकोश तसेच्या तसेच राहिले आहेत. 'मॉनर्की' या शब्दाला प्रतिशब्द सापडतो कारण राजसत्तेची कल्पना जुनी आहे. पण 'डिमॉक्रसी' याला प्रतिशब्द सांपडत नाही कारण ती नवी कल्पना आहे. मी मराठीत राजकारण अर्थशास्त्र वगैरे विषयावर लिहिणार. पण कल्पना इंग्रजींतून डोक्यात येतात. आणि त्या व्यक्त करण्याला समर्पक मराठी शब्द अजून बनले नाहीत. हल्लीची मराठी ही मराठी नसून आंग्लसंस्कृत भाषा आहे. भाषांतरकार तरी काय करणार? त्याचा हेतू वाईट नाही. तो बिचारा शब्दशरण आहे. पण त्याकरिता मला शिक्षा का? माझा म्हणण्याचा हेतू इतकाच की भाषांतरे वाचून आपला जो ग्रह होईल तो काही मूळ लेख वाचून मराठी वाचकांचा होणार नाही. केसरीच्या वाचकापैकी काही साक्षीदार येथे आणले असते तर मी म्हणतो हे कळले असते."

खटल्याच्या पाचव्या दिवशी तारीख १७ जुलै रोजी टिळकांनी आपले भाषण पुढे चालू केले. ते म्हणाले:—

काल मी मराठी वाचकाविषयी बोललो त्यातला मुद्दा हा की लेखांच्या परिणामावरून लेखकाच्या हेतूचे अनुमान करावे म्हणून तुम्हाला सांगण्यात येणार. पण इंग्रजी भाषांतर वाचून तुम्ही कदाचित त्याचे परिणाम बंगाली लोकावर काय होतील याहि दृष्टीने पाहणार. पण बंगाल्यात कोणी केसरी वाचीत नाही ही महत्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

दुसरे असे की वाद आहे तो काळ्या गोऱ्या लोकामधील नाही तर एक सरकारपक्ष व दुसरा लोकपक्ष यांच्या दरम्यानचा आहे. लोकपक्ष म्हणजे कॉंग्रेसपक्ष. "दुहेरी इशारा" दिला तो याच दोन पक्षानां. स्वतः सरकार वादात पडत नाही पण त्याची बाजू म्हणून अँग्लोइंडियन पत्रकार मांडतात. त्याना उत्तर देण्याच्या द्वाराने मी सरकारास इशारा दिला आहे. अर्थात् माझा हेतु मी सांगतो हाच आहे. तरी तुम्हाला वाटेल तर लिहिण्याच्या भरात एखादा वेडा वाकडा शब्द गेला तर तो तुम्ही लक्षात घेणार नाही. परवा सरकारी भाषांतरकाराना आपल्या समक्ष मी एक समर्पक प्रतिशब्द विचारला तेव्हा ते म्हणाले उद्या सांगेन. हे आपण पाहिलेच आहे. आम्हा वर्तमानपत्रकारानाहि तीच अडचण असते. पण आम्हाला थांबता येत नाही. असो. तारीख १२ मेच्या केसरीतील स्फुटसूचनात या वादाचा मुद्दा दिला आहे. आणि या वादाच्या अर्थानेच कोणतेहि शब्द घेतले पाहिजेत. संपादकामधील तो एक रस्सीखेचीचा खेळ आहे. या खेळातील माझ्या बाजूचे

दोरीचे टोक सरकारी वकिलाने आपणापुढे मांडले आहे. दुसरे टोक मात्र मांडलेले नाही. पण गणितशास्त्रात असा नियम आहे की दोरीवर जोर पडतो तो केव्हाहि दोन्ही टोकाना ताण बसेल तेव्हाच. म्हणून माझ्या शब्दांचा परिणाम अजमावण्याकरिता या वादरूपी दोरीच्या दोन्ही टोकांचे शब्द लक्षात घेतले पाहिजेत. असले वाद म्हणजे लोकसत्ताविषयक वाद विलायतेतहि चालतात. अशा वादातील मत सरकारला पटले नाही किंवा चुकीचे वाटले म्हणून ते व्यक्त करणाराला कोणीहि तुरुंगात पाठवीत नाही. मुझफरपूर येथील अत्याचार तारीख २९-३० एप्रिलला झाले. त्यावर पाच मेच्या अंकात मी लगेच सुचले ते सामान्य विचार लिहिले. नंतर निरनिराळी वर्तमानपत्रें वाचनात आली. त्यानंतर विलायती वर्तमानपत्रेहि हाती आली. अशा रीतीने विचाराने विचार सुचत गेला. मुद्याने मुद्दा सुचला व वाद वाढत चालला. त्यात दोन बाजू स्पष्ट झाल्या. आमच्या बाजूला एकट्या केसरीनेच अशी मते प्रकट केली असे नव्हे. तर सरकारी भाषांतरकाराने सांगितल्याप्रमाणे मराठी भाषेतील बहुतेक वर्तमानपत्रकारानी म्हणजे सर्व राजकीय पक्षांच्या पत्रानी एकच विचारसरणी अनुसरली आहे. मग माझाच तेवढा हेतू वाईट असे आपण कसे मानाल ! हे दाखविण्याकरिताच मी अनेक पत्रांचे उतारे पुराव्यात दाखल केले आहेत. पायोनियर काय लिहितो ते पहा. कायदेकौन्सिलचे सभासद व बंगालचे अत्याचारी यांचा संबंध तो जोडतो. कारण मी दिले असेच इषारे कौन्सिलातील सभासदानी सरकारला दिले आहेत. जणू काय आम्हा सर्वांना असले अत्याचार होणार हे माहीतच होते ! पायोनिअर हा रासबिहारी घोष गोखले सुरेंद्रनाथ बानर्जी यानाहि दोष देण्यास सोडीत नाही. मग स्टेटस्मन सारख्यानी जहाल गणले जाणाऱ्या आम्हावर तोंफेरा झाडावा यात काय आश्चर्य ! टाइम्स ऑफ इंडियाचे लिहिणेहि तसेच. ॲडव्होकेट ऑफ इंडिया म्हणतो " सरकारने अत्यंत कडक असे दडपशाहीचे उपाय योजले पाहिजेत. या व अशा लेखाना केसरीतील अग्रलेखाने उत्तर दिले आहे. आक्षेपकानी वाटेल तसे कडक लिहावे आणि उत्तर देणाऱ्याने मात्र शब्द अजमावावयाला हातात ताजवा घेऊन बसावे काय ! एकेक टीकाकार घेऊन लेखक त्याला उत्तर देत चालला आहे हे सरळ लेख वाचीत जाणाराला कळूनच येईल. मी जी निरनिराळी हिंदी वर्तमानपत्रे दाखल केली आहेत त्यानी अशीच उत्तरे दिली आहेत. पण आम्ही हिंदी लोकचसे काय पण नेव्हिनसन सर वुलियम वेडर्बर्न वगैरे गोरे लोक तरी काय म्हणतात ! व हे दाखविण्यापुरतीच मी विलायतेतील काही पत्रे दाखल केली आहेत. लॉर्ड मोर्ले देखील सर्व सामान्य चर्चा करिताना हेच म्हणतात. देशात शांतता राखली पाहिजे पण त्याबरोबर राजकीय प्रगतीहि केली पाहिजे. तिकडे जसा कर्झन मोर्ले यांच्यातील वाद व उत्तर प्रत्युत्तरे तशीच इकडे ॲंग्लो इंडियन पत्रे व देशी पत्रे यांच्यात सुरू होती. मी या दोन लेखात जे लिहिले त्यातील प्रत्येक वाक्यागणीक कॉंग्रेस किंवा इतर लोकपक्षीय पत्रे किंवा हिंदी मुत्सद्दी यांचे उद्गार मी काढून

दाखवीन. मी लिहिले हेच मीहि जवळजवळ अठ्ठावीस वर्षे लिहीत आलो आहे. मी तरी नवीन काय लिहिणार ?"

खटल्याच्या सहाव्या दिवशी फिरून टिळकानी भाषणास सुरवात केली. ते ह्मणाले:—वादातील एका पक्षाला दडपशाहीचे कायदे लष्करी कायद्याचा अम्मल अशा अत्याचाराशिवाय दुसरे तिसरे काही सुचत नाही. कोठे काही चळवळीच्या स्वरूपाचे किंचित् दिसले की यानी आपला ठराविक सल्ला दिलाच. उलट आम्ही ह्मणतो की गुन्हेगाराना शिक्षा द्या शांतता प्रस्थापित करा अत्याचार मोडून काढा पण राजकीय हक्क लोकाना दिल्याशिवाय अत्याचारी लोक कधीहि गप्प बसणार नाहीत. त्याला आम्ही तरी काय करावे ? रशियन अत्याचारासंबंधी लिहिताना खुद्द पायोनियरच म्हणतो की "झारशाहीच्या जुलुमी धोरणाचेच ते प्रत्यक्ष फळ होय." पण असे म्हणणाऱ्या पायोनियरचा हेतु रशियात आणखी अत्याचार व्हावे असा असल्याचे कोण म्हणेल ? मग हिंदुस्थानातील अस्वस्थता सरकारी जुलुमामुळेच उत्पन्न झाली असे कोणी म्हटले तर त्याला तेवढी का हरकत ? 'कोंडले तर मांजरहि अंगावर येते. मग बंगाली लोक बिथरले तर काय नवल ?' असे म्हटले तर कोठे बिघडले ? गरीब लोकहि जुलुमामुळे दंडेलीला उठतात असे म्हणणे हे मनुष्यस्वभावाविषयीचे एक सामान्य विधान होय. ती चिथावणी नव्हे. मेकॉलेने बंगाली लोकाना मेषपात्र म्हटले तोच आधार घेऊन डॉ. रासबिहारी घोष यानीहि कौन्सिलात म्हटले की असले मेषपात्र लोकसुद्धा जेव्हा खवळले तेव्हा खरोखरीच काही तरी बिघडले असले पाहिजे. सरकाराविषयी सन्मानबुद्धि किंवा प्रेमादर बाळगणे याला अर्थातच काही मर्यादा असणार ! मनुष्य हा स्वभावाने गरीब झाला तरी त्यालाहि काही स्वाभिमान असतोच. इतकेच दर्शविण्याचा माझ्या लेखाचा हेतु आहे. तसेच 'इंग्रज इकडे राज्य करावयाला आले ते काही केवळ परोपकारकरिता नव्हे' या म्हणण्यात तरी चूक काय ? पंजाबचे कमिशनर मि. थॉर्बर्न यानीहि हेच म्हटले आहे. तोहि असेच लिहितो की "इंग्रज सरकारची दृष्टी मुळात स्वार्थी आहे व असणार." सर्व शहाणपणाचा मक्ता आपणाला आहे असे समजून सर्व अधिकाराचा मक्ताहि आपल्या हाती घेणे याला मी अधिकारविभागणी कमिशनपुढे साक्ष देताना दोष दिला आहे. तसाच या लेखातहि. मग त्या साक्षीने जर लोक बिथरत नाहीत तर या लेखानेच बिथरतात असे का म्हणावे ? दादाभाईनी पाचशे पानाच्या ग्रंथात हेच विचार लिहिले आहेत. मेजर इव्हॅन्स बेल् तेच म्हणतो. मग हे सर्व लेख सरकार जप्त करणार काय ? निदान असे बोलणारे तरी कोणी हवेना ! पार्लमेंटची देखरेख नावाची असली तरी ती आहे म्हणून बरे. नाही तर ही नोकरशाहि अधिकच प्रबळ होती ! या सर्वांनाच इशारा देण्याकरता मी लेखात विचारले की या अत्याचारापासून तुम्ही काही बोध घेणार की नाही ? गुन्हेगार गुन्ह्याला प्रवृत्त झाल्याखेरीज राहणार नाही असे कोणी लिहिले किंवा म्हटले तर स्वतः त्याने अत्याचार प्रवृत्त केला असेच समजावयाचे

की काय ? असे इशारे गोखले रासबिहारी सर फेरोजशहा मेथा वगैरे अनेकानी दिले आहेत. त्यांचा संशय सरकारला येत नाही मग माझाच का यावा ? आम्ही लिहितो बोलतो हें विषादकारक असेल. ते कानाला झोंबेल. मनाला कडू लागेल. म्हणून ते काही राजद्रोही या सदराखाली कोणी ओढणार नाही. तळ्याचा बांध फुटण्याची उपमा मी दिली आहे. त्याला मूळ कारण म्हटले म्हणजे पाऊस होय. व हा पाऊस म्हणजेच सरकार ! आणि उपमेतील पूर म्हणजेच लोकक्षोभ होय. पावसाशिवाय जसा पूर नाही तसाच सरकारी जुलुमाशिवाय लोकक्षोभ नाही. पाऊस म्हणेल "मी हवा तितका पडेन. ती माझ्या इच्छेची गोष्ट आहे. पण पुराने मात्र येता कामा नये" तर ते कसे चालेल ? सरकाराने वाईटाबरोबर चांगलेहि केले आहे यात वाद नाही. पण आता पुढे पाऊल टाका असे म्हटले की वादाला सुरवात होते. जनता ही स्वरूपतः मवाळ नाही व जहालहि नाही. पण सरकारी जुलूम झाला म्हणजे तिला क्षोभाचा पूर येतो. आपण पृथ्वीबरोबर तिच्या कण्या-भोवती फिरतो. पण आपणाला वाटते की आपण स्थिर आहो. भोवतालचे जगच फिरते ! अशाच रीतीने सरकार स्वतः चुका करिते आणि त्या दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करिते. सरकार बेजबाबदार ही गोष्ट मी आणि आताच म्हटली की काय ? पन्नास वर्षे लोक तेच म्हणत आले आहेत. तीस वर्षांपूर्वी शिक्षण नव्हते म्हणून लोकाना ते खपत होते. आता ते खपत नाही. म्हणून ते रागावून बोलू लागले. पण मूळ सरकार आहे तसेच राहिले आहे. चळवळ याचा अर्थ 'बेजबाबदारीचा दोष खुंटी ठोकून पक्का करणे.' याच युक्तिवादाचे विवेचन केसरीत केले आहे. अनेक कारणे पद्धतशीर मांडून दाखविली आहेत. त्यात अपशब्द नाहीत. कोणाला शिवी नाही. उद्देश सरकाराला अनुलक्षून बोलण्याचा आहे. लोकाना अनुलक्षून नाही. सरकारला आपल्या हातून आपली सत्ता संक्रमित करण्याची नसेल तर नसो. पण तसे न केले तर काय होते याचा इशारा लेखात दिला आहे. एक अधिकारी मेला म्हणून दुसरा त्याचे जागी येण्याचे थांबत नाही. अर्थात् खून करण्यापासून फायदा नाही हेहि सांगितलेच आहे. अशा तुमच्या कृत्यानी सरकार बधेल असे समजणे चूक आहे असेच मी लोकाना सांगितले आहे. पण लिहिणाराच्या मनात नसता व लिहिणारा ते करू नको म्हणत असता काय घडते हे दर्शविले आहे. अत्याचाराच्या वृक्षाला मी विषवृक्षच म्हटले आहे हे लक्षात घ्या. उपमेचा हेतु हाच की विषाने जसे कोणा-चेच कल्याण नाही, म्हणजे मरणाराचे तर नाहीच पण विष घालणाराचेहि नाही, तीच गोष्ट अत्याचाराची आहे. अत्याचार हे कोणा एकादोघांचे दुर्दैव नव्हे तर सर्व देशाचे आहे असेच म्हटले आहे. अत्याचारात दुष्टपणा क्रूरपणा आहे म्हणून ते आम्हाला नकोत. पण त्याविषयी खेद प्रगट करणे याहून आमच्या हाती काय आहे ?

तुम्ही ज्यूरीतील लोक वर्तमानपत्रे वाचीत असाल म्हणून असल्या गोष्टी मीच आज प्रथम बोलतो असे तुम्हाला वाटेल. पण निदान सरकाराला तरी त्या नव्या नसाव्या. कारण त्यांच्या कानावर देशी वर्तमानपत्रांची भाषांतरे रोज जातात. सर-

कारच्या तर्फेहि बोलणारा एखादा वर्तमानपत्रकार असेल, नाही असे नाही. पण बहुतेक लोकपक्षाचीच असतात. तुम्ही म्हणाल "अँग्लो इंडियन पत्रे तुम्हाला शिव्या देतात तर त्यावर फिर्यादच का करीत नाही?" पण १५३ अ कलमाखाली फिर्याद करावयाची तर आधी सरकारी मंजुरी लागते. ओग्रेडीसाहेबानी पार्लमेंटात सरकारला विचारलेहि आहे की "तुम्हीच पायोनियरवर फिर्याद का करीत नाही?" पण तुमची अशी निंदा झाली असती म्हणजे कळले असते. कॅप्टन हिअरसेची निंदा पायोनिअरने केली तेव्हा तो कोर्टात गेला नाही. तो संपादकाच्या ऑफिसमध्ये गेला व हातातील चाबकाने त्याने संपादकाला झोडपून काढले. पण मी काय करणार? माझ्या हातात लेखणी होती. मी लेखणीने लिहिले. खरे झटले तर या देशात अँग्लो इंडियन पत्रापेक्षा देशी वर्तमानपत्रानाच अधिक स्वातंत्र्य पाहिजे. आपल्या मिळकतीचे रक्षण करिताना कायदा आपल्या हाती काही मर्यादेपर्यंत घेण्याचा अधिकार पीनल कोडाने दिला आहे. मग आम्हा राजकारणी लोकांची अब्रू हीच आमची मिळकत नव्हे काय? ही रक्षण करिताना कायदा तर राहोच पण हातची लेखणीहि हाती धरू नये? राजकीय चळवळ्या लोकाना झाडूच्या हाती फटके देऊन मारवावे असे अँग्लो इंडियन पत्रानी म्हटले आहे. त्या मानाने पाहता त्याला उत्तर म्हणून लिहिलेले माझे लेख एवढेसे तरी कडक आहेत काय? आणि इतकेहि स्वातंत्र्य ठेवावयाचे नसेल तर देशी वर्तमानपत्रे अजीबात बंदच का कराना? अँग्लो इंडियन पत्रांपलीकडे जाऊन नोकरशाहीला उद्देशून काही लिहिले असले तरी तो सरकारी नोकरांचाच वर्ग. सरकार नव्हे. या वर्गाच्या हातून सत्ता आपल्या हाती यावी हीच तर स्वराज्याची मागणी. इंडियन लॉ रिपोर्ट ३४ कलकत्ता यामध्ये ही मागणी कायदेशीर ठरवली गेली आहे. चालू राज्ययंत्रात दोष आहेत हेच तर स्वराज्य मागण्याचे मुख्य कारण. आणि ते दोष दाखविण्याने जर फटकन् राजद्रोह घडतो तर स्वराज्य मागावयाचे तरी कसे व कोणत्या भाषेत? तर चार्लस डिल्क सर वुइलफ्रेड ब्लंट मिल अमेरिकन मुत्सद्दी ब्रायन खुद्द सिव्हिल सर्व्हिसमधील एक वेळचे अधिकारी कॉटन व वेडरबर्न यानी व इतरानी या सरकाराला बेजबाबदार 'डेस्पॉट' म्हटले आहे. रशियातला झार देखील अखेर हुकूम लिहिताना कोणाचा तरी सल्ला म्हणून घेतच असे. म्हणून तो काय बेजबाबदार डेस्पॉट नव्हे वाटते?

माझ्या दोन्ही तिन्ही लेखांचा हेतू एकच आहे. दर लेख लिहून झाल्यावर आणखी टीकाकार भेटले म्हणून त्याना पुढील लेखात आणखी उत्तर दिले. ता० ९ जून व १९ जूनच्या केसरीत हाच विषय मी पुढे चालविला होता. पुढे कौन्सिलात नवीन कायद्याचे बिल आले ते याच विषयाला धरून व त्यावर टीका केली तेहि चालू विषयाचेच अनुसंधान होय. आणि अजून तरी वाद संपला आहे कोठे? दुहेरी इषाऱ्याची गरज अजूनहि चालूच आहे. कित्येक सभातून राजकीय चळवळीचा निषेध करणारे ठराव अजून होत आहेत. म्हणून अजून त्याना उत्तर देणे जरूर आहे. ज्या अंकात 'बॉबगोळ्याचे रहस्य' हा लेख लिहिला गेला त्यातच

अत्याचारासंबंधाने विलायतेतले पत्रकार काय म्हणतात याचे मासले दिले आहेत. त्यावरून दोहो देशात दुमत आहे दोहो देशात वाद चालूच आहे असे दिसून येईल. बॉंबचे अत्याचार ही एक प्रतिक्रिया आहे. स्वतः ती अनुयोगी क्रिया नव्हे. व्हाइसरॉय साहेब म्हणतात की हिंदुस्थानात एक नवीन प्रकारची भावना उत्पन्न झाली तिला योग्य वळण दिले पाहिजे. ती तुडवून बुडवून टाकू म्हणून भागणार नाही. पण ती तुडवून बुडविण्याच्या प्रयत्नानेच अत्याचार होतात! कित्येकांचे मते 'अत्याचार जर वाईट ह्मणता तर दडपशाहीला मदत करणे हे तुमचे कर्तव्यच ठरते.' पण दडपशाहीत दोन प्रकार असतात. अत्याचार घडू नयेत म्हणून योग्य ते संरक्षक उपाय आगाऊ योजणे आणि गुन्हेगाराला शिक्षा करणे हा एक प्रकार. आणि या पहिल्या प्रकारच्या दडपशाहीला आम्ही प्रतिकूल नाही. त्या बाबतीत आम्ही सरकारच्या बाजूचेच आहो. कारण यापुरते कायदेशीर उपाय योजलेच पाहिजेत.

यापलीकडे जाणारा दडपशाहीचा दुसरा एक प्रकार त्याला मात्र आम्ही विरुद्ध आहो. आमचे शिक्षण आमची मते आमच्या राजकारणाची पूर्वपरंपरा आमची देशहितबुद्धि या सर्वच दृष्टीनी आह्मी या दुसऱ्या प्रकारच्या दडपशाहीला विरोध करणार. म्हणून आम्ही दडपशाहीचा निषेध करितो तसाच अत्याचाराचाहि करितो. त्यात विसंगतता नाही. किंबहुना अशी विसंगतता आमच्या माथी मारणाराला उत्तर म्हणूनच हे लेख लिहिले आहेत. १८९३ साली विलायतेत एका मनुष्याच्या घरात डायनामाईट् व स्फोटक द्रव्ये सापडली. लगेच पार्लमेंटने एक दडपशाहीचा कायदा केला. त्याचा निषेध करिताना कॉंटेम्पोररी रिव्हयु नावाच्या मासिक पुस्तकात 'डायनामाईट्चे रहस्य' या मथळयाखाली एक लेख आला होता. पण त्याच्यावर कोणी खटला केला नाही. मग डायनामाईटचे रहस्य व बॉंबगोळ्याचे रहस्य यात फरक काय? रस्त्यात चालताना ठेच लागली म्हणजे आपण थांबून आजूबाजूला पाहून मनाला विचारतो की 'अरे ठेच कशाने लागली'? सरकाराला देखील बॉंबगोळ्याची ही ठेचच लागली ह्मणावयाची. ह्मणून त्यानीहि जरा थांबावे आसपास पहावे आणि मनाला विचारावे की 'अरे बॉंबगोळे उडून अत्याचार का झाले'? आणि तंतोतंत हेच मी लेखात लिहिले आहे. बॉंब उडविणारा हा मनुष्य दुष्ट खरा पण सरकाराला तो लाल बावटा व्हावा! अत्याचारांचा निषेध करावा आणि सरकारच्या धोरणाचे तर समर्थन करू नये अशा चमत्कारिक स्थितीत आम्ही हिंदुस्थानचे लोक सापडलो आहो. निवळ अराजक मनुष्य वेगळा आणि राजकीय हेतूने अत्याचार करणारा मनुष्य वेगळा. बॉंबगोळ्यानी राज्य उलथून पडत नसते. पण त्यामुळे असंतोषाच्या कारणाकडे सरकारचे लक्ष जाते. वाइटातून चांगले इतकेच घ्यावयाचे!

सातव्या दिवशी टिळकानी भाषणास पुन्हा सुरवात केली. ते म्हणाले:—
"आता मी दुसऱ्या लेखाकडे वळतो. ते लेख ता० ९ जून व १६ जून रोजी लिहिले आहेत. ता. ८ जून रोजी स्फोटक द्रव्याचा कायदा व वर्तमानपत्रांचा कायदा

असे दोन कायदे वरिष्ठ कायदेकौन्सिलात बेसुमार घाईने पास करण्यात आले. ता. ९ जूनच्या अंकात तारेतील मजकुरावरून या कायद्यावर थोडीशी टीका मी केली व ता. १६ जूनच्या अंकात ती विस्तृत केली. कारण यापूर्वी मला कौन्सिलातील भाषणे वगैरे समग्र वाचावयास मिळाली. या कायद्याविरुद्ध मते देऊन ती मोजण्यापर्यंतची पाळी लोकपक्षीय सभासदानी आणिली नाही. पण त्यानी नव्या कायद्यातील अनेक दोष दाखवून त्याचा निषेध केला. त्याना कौन्सिलात बहुमतच नाही. मग ते तरी आधिक काय करणार ? 'स्फोटक द्रव्ये' या शब्दाची व्याख्या फारच विस्तृत आहे. हा कायदा विलायतेत पास झालेल्या १८८३ च्या कायद्याच्या धोरणाने केला आहे. पण विलायतेतील लोकानीहि त्याला हरकत घेतली होती. तसेच पोलिसाना अधिकार किती द्यावयाचे याविषयीहि तक्रार आहेच. वर दाद घेण्याला विलायतेत लोकांचे पार्लमेंट तरी आहे. हिंदुस्थानात तेहि नाही. याहि पुढची तक्रार अशी की असले जबरदस्त कायदे केले तरी त्यांच्या योगाने अत्याचार काही थांबणार नाहीत. राजकीय असंतोष कमी होईल तेव्हाच ते थांबतील. नवाब सयद महंमद सारख्या नेमस्त सभासदानेच हा आक्षेप कौन्सिलात घेतला हा वाद लक्षात ठेवून माझे हे लेख वाचले पाहिजेत. नवीन कायदे करण्यासारखे उपाय हे उपायच नाहीत असे मी म्हटले नाही. ते टिकाऊ नाहीत इतकेच मी म्हटले आहे. लिबरल पक्ष विलायतेत अधिकारारूढ असताहि दडपशाही कायद्यांची ही भुतावळ जमा झाली याबद्दल मी लार्ड मोर्ले याना दोष दिला आहे. त्याच उपमेच्या अनुरोधाने मी लॉर्ड मोर्ले यांना मांत्रिक म्हणजे या भुतावळीचे धनी म्हटले आहे. ' या मांत्रिकाने ही भुतावळ ताब्यात ठेवावयास पाहिजे होती ' असा मी लॉर्ड मोर्ले याना दोष दिला आहे खरा. जिच्या योगाने राष्ट्राचे तेज व कर्तृत्व वाढते अशा राष्ट्रीयत्वाच्या बुद्धीला लगाम घालणे हीच प्रतिगती किंवा दडपशाही. ॲमॉस याने आपल्या राजनीतिशास्त्रावरील ग्रंथात हेच म्हटले आहे. सर जॉन मालकमसाहेबाने हिंदुस्थानातील राज्यकारभाराविषयी एक चांगला ग्रंथ लिहिला आहे. त्यातहि असाच अभिप्राय प्रगट केला आहे. एल्फिन्स्टन यांचाहि अभिप्राय तोच आहे. नॉर्टनसारख्या अलीकडच्या साहेबलोकानीहि अगदी हेच म्हटले आहे. कार्ल जोबर्ट याने झारशाहीच्या अधःपाताची मीमांसा करिताना शुद्ध अराजक लोक आणि स्वातंत्र्यप्रिय असे राष्ट्रीय बुद्धीचे लोक यातील सूक्ष्म फरक दाखविला आहे. तोच हिंदुस्थानालाहि लागू आहे. पायोनियर देखील बंडखोर लोकाविषयी हेच म्हणतो. लंडन टाइम्सचेहि म्हणणे तेच. मग हिंदुस्थानातील बंगाली लोक हे अराजक किंवा खुनी नव्हत असे केसरीने म्हटले तर काय चुकले ? इंग्रजी भाषांतरावरून कोणाला असे वाटेल की सरकार आमच्या लोकांचे हातपाय तोडते असे मी म्हणतो. पण मुळात तसे नाही. तर आमच्या उद्योगधंद्यांचे हातपाय तोडले मर्दपणाचे हातपाय तोडले पौरुष आणि तेज यांचे हातपाय तोडले असे लक्षणेने मी म्हटले आहे.

थॉरबर्न मनरो ओकानेल वगैरे उदार इंग्रज लोकानीहि हेच म्हटले आहे. मी पदरचे म्हटले नाही. याचा अर्थ लिहिताना अगदी तीच पुस्तके हातात घेऊन मी लिहिले असा नाही. पुस्तके हातातच घ्यावयास कशाला पाहिजेत? ती व तसली इतर पुस्तके मी वाचलेली आहेत व वाचीतहि असतो व मनात त्याचे केव्हाहि अनुसंधान राहतेच. असले विचार लिहिल्यामुळे जर मी गुन्हेगार होतो तर इतरहि का होत नाहीत? आम्ही लोकाना बॉंब करावयाला शिकवितो असे म्हणण्यात येते. का? तर आम्ही खटल्यातील मुद्देमालाची व जबान्याची तपशीलवार हकीकत देतो म्हणून. पण ॲंग्लो इंडियन वर्तमानपत्रानीहि अशीच तपशीलवार माहिती दिली आहे. असा कोणी विचार करीत नाही की बॉंब फेकतात त्या फक्त काही व्यक्ति फेकतात. समाज काही फेकित नाही. आणि आधुनिक वर्तमानपत्रकार मत व्यक्त करितो तेहि व्यक्तीचे नाही तर ते समाजाचे. स्फोटक द्रव्याचा कायदा करू नये असे जर मी लिहिले तर ते बॉंब फेकणाराला सवलत मिळावी म्हणून नव्हे. तर त्यामुळे निरपराधी समाजाचे इतर रीतीने नुकसान होते म्हणून. मुद्दा हा आहे की अत्याचारप्रतिबंधक कायदा हवा तर करा पण तो वेगळ्या शब्दानी काही वेगळ्या रीतीने अधिक काळजी घेऊन करिता येईल की नाही? केवळ गुन्ह्याचे वृत्तांत वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाले म्हणून ते वाचून कोणी गुन्हेगार बनत नाहीत. त्याची कारणे वेगळीच असतात. गुन्हे करण्याची प्रवृत्ति ही एक वैयक्तिक मनाची विकृति आहे. गुन्ह्याच्या हकीगतीने मन तिकडे वळण्यापेक्षा परावृत्तच होईल. गुन्हे खटले-न्याय मुनसफी यांच्या हकीगती वर्तमानपत्रानी देऊ नयेत असे ठरविले तर धंदाच संपला. सुबोधपत्रिका सुधारक ज्ञानप्रकाश इंदुप्रकाश गुजराथी ही पत्रे काही माझ्या पक्षातली नाहीत ना? पण त्यानी या कायद्याविषयी माझ्या केसरीप्रमाणे निषेधच केला आहे. परवा लॉर्ड कर्झन हे अफगाणच्या अमीरासंबंधाने काही बोलले ते लॉर्ड मोर्ले याना. त्याकरिता अमीराला चिडविण्याचा प्रयत्न करण्याचा आरोप कर्झनसाहेबावर कोणी करणार नाही. आणि कोणत्याहि शब्दातून वाईट हेतूच काढावयाचे अशा निश्चयानेच कोणी बसला तर प्रत्यक्ष बायबलातूनहि त्याला चिथावणीचे आक्षेप घेण्यासारखे शब्द सापडतील!

आता मी पुराव्यात दाखल केलेल्या माझ्या हातच्या कार्डासंबंधी थोडे सांगतो. सरकारला ते कार्ड म्हणजे माझ्या विरुद्ध काहीएक विनमोल पुरावा किंवा घबाड सांपडले असे वाटते. कदाचित ते कार्ड सरकार लॉर्ड मोर्ले यांच्याकडे पाहण्यालाहि पाठवील! आणि या कार्डावरून अनुमान काय काढणार? तर मी बॉंबगोळे तयार करण्याच्या उद्योगात होतो. व ते का? तर त्या कार्डावर स्फोटक द्रव्यासंबंधी काही पुस्तकांची नावे लिहिली आहेत! पण हा ज्ञानाचा ठेवा इतका अमूल्य असा मला वाटता तर तो मी गुप्त ठेवला नसता काय? पण आधी हे कार्ड सांपडले कोठे? तर माझ्या लिहिण्याच्या टेबलात. एका मोकळ्या खणात. इतर सटरफटर कागदामध्ये. उघड्या खणात पडलेले हे कागद काय किमतीचे आहेत हे दाखविण्याकरिता मी त्यातले काही कागद पुराव्यात दाखल केले आहेत. अर्थात त्या

कागदाची जी किंमत तीच कार्डाला. कोणाला ते कार्ड सापडू नये अशा ठिकाणी ते ठेवलेले नव्हते. माझ्या पश्चात घराची झडती घेतली तेव्हा हे कार्ड कसे कोठे पडलेले होते याची माहिती पोलिस अधिकाऱ्यानी आपल्या जबानीत सांगितलीच आहे. स्फोटक द्रव्यांच्या कायद्यावर टीका करावयाला कोणी बसला तर स्फोटक द्रव्य म्हणजे काय त्याचे स्वरूप कसे ती तयार कशी करितात वगैरे गोष्टींचे ज्ञान निदान त्या कामापुरते तरी त्याला मिळविलेच पाहिजे. या विषयाची थोडीशी माहिती 'ब्रिटिश ज्ञानकोशात' मिळाली. पण ती अपुरी होती. म्हणून सहजच वाटले की या विषयावरची स्वतंत्र पुस्तकेच पहावीत. अर्थात् कॅटलॉग उघडून पाहिला. तोच हा येथे माझ्या हातात आहे. हा कॅटलॉग सर्वत्र मिळतो. दरवर्षी प्रसिद्धहि होतो. त्यातून काही पुस्तकांची नावे या कार्डावर लिहिली. पैकी 'आधुनिक स्फोटक द्रव्ये' या सदराखाली ईस्लर याचे एक पुस्तक दिसले आणि सर्वसाधारण सूचीमध्ये दुसऱ्या एका पुस्तकाचे नाव आढळले. ती दोन्ही व कॅटलॉगाचे नाव अशी दोन्ही या कार्डावर टिपली. कॅटलॉगाच्या ३४ व्या पानावर तांबड्या पेन्सिलीची खूण केलेली आहे. हे कार्ड दुमडलेले असले तरी नेहमीचे कार्डासारखेच कार्ड आहे. दुमडले या शब्दाचा अर्थ असा करण्यात आला आहे की मला हे कार्ड कोणाला तरी पाठवावयाचे होते. पण तसा माझा हेतूच नव्हता. पोलिस इन्स्पेक्टर सुलिव्हन याना मी उलट तपासणीत विचारले की जेथे तुम्हाला हे कार्ड सापडले त्याच्या मागच्याच खोलीत कॅटलागहि होता तो नाही का तुम्ही जप्त केला ? ते म्हणाले नाही. उघडच आहे. कार्डाची शिकार त्याना सापडली. त्याना वाटले तेवढ्याने आपले काम झाले. या कार्डावरून आता वाटेल ते तर्क वितर्क कुतर्क करण्यात येतील. पण ते सर्व निराधार होत. कॅटलागात ज्या क्रमाने पुस्तके आढळली त्याच क्रमाने कार्डावर ती टिपून घेतली आहेत. व त्यापुढे ग्रंथकर्त्यांची नावे किंमती वगैरे उतरल्या आहेत. ज्या इतर कागदाबरोबर हे कार्ड सांपडले ते अगदी सामान्य चालचलाऊ कामाचे टोपलीत टाकण्याच्या योग्यतेचेच आहे. त्यात काही पत्रे आहेत. एका पत्रात कोणी मला लिहितो की नवी शाळा काढावयाची आहे कशी काढू ? दुसऱ्या एका कागदावर माझ्या एका वैदिक ग्रंथावरील अभिप्रायातील एक उतारा आहे. तिसऱ्या कागदावर माझ्या सुरत येथे मी केलेल्या भाषणाच्या हस्तलिखिताचे दोन रिपोर्ट आहेत. कोणी म्हणेल कार्डाचा संशय कोणाला येऊ नये म्हणून ते असल्या रद्दी कागदात मिसळून ठेविले. आणि ते कागदहि मुद्दाम दिसतील असे एका उघड्या खणात ठेविले. पण मी म्हणतो असल्या कुतर्कांना अंतच नाही. ता. १६ जूनच्या केसरीत लेख लिहिला त्यात नव्या कायद्याची कलमे देऊन त्यावर टीका केली आहे. स्फोटक द्रव्ये या शब्दाच्या नव्या व्याख्येचा निषेध करिताना दोन कॉलम खर्ची घातले आहेत. आणि एका कॉलमात कायद्यावरील टीका केली आहे. तात्पर्य या कार्डाचा व या लेखाचा असलाच तर संबंध हा असा आहे.

माझ्या एका लेखावर निरनिराळ्या दोन कलमाप्रमाणे आरोप ठेवण्यात आला आहे. पण मी प्रयत्न केल्याचा गुन्हा म्हटला तरी १२४ अ व १५३ अ दोन्ही मिळून एकच आरोप ठेवावयास पाहिजे. दोन ठेवले ही चूक आहे. बरे प्रयत्न म्हटला म्हणजे त्याचे उद्दिष्ट दाखविले पाहिजे. पण तसे उद्दिष्ट काहीच दाखविण्यात आलेले नाही. १५३ अ कलमाखाली आतापर्यंत एकच खटला झाला आहे. त्याची हकीगत पंजाब वुइकली रिपोर्टर नं. १४, १९०७ यात दिलेली आहे. त्यात न्यायाधिशानी विवक्षित हेतू अवश्य मानला आहे. न तोहि प्रजाजनातील निरनिराळ्या वर्गामध्ये द्वेष उत्पन्न करण्याचा. हे दोन वर्ग म्हणजे प्रायः दोन धर्मांचे किंवा दोन जातींचे लोक. दोन राजकीय पक्ष असा त्याचा अर्थ नाही. त्याना 'पक्ष' म्हणतात. 'वर्ग' म्हणत नाहीत. उदाहरणार्थ हिंदु मुसलमान आर्मीनियन कॅथॉलिक प्रॉटेस्टंट ज्यू इत्यादि. पण कॉन्झर्वेटिव्ह लिबरल किंवा मवाळ जहाल याना वर्ग म्हणत नाहीत तर पक्ष म्हणतात. अर्थात् माझ्या लेखातील वाद वर्गावर्गासंबंधाने नसून पक्षापक्षातील आहे. तसेच नोकरशाही हाहि एक पक्षच आहे. वर्ग नव्हे. माझ्यावरील आरोपातहि मी कोणत्या वर्गात द्वेष उत्पन्न केला हे सांगितले नाही. म्हणून मजवरील दोषारोप हाच मुळात सदोष ठरतो. ताट एकच वाढून दोन पाहुण्याना देता येत नाही. एकाला वाढून दिले. आणि तो जेवल्यावर मोकळे झालेले ताट दुसऱ्यापुढे ठेवणार. आणि तुम्ही म्हणणार की त्यालाहि ताट दिले! फेकून मारलेल्या एका दगडात गणितशास्त्राप्रमाणे इतकी शक्ती असू शकेल की प्रथम त्याने एक पक्षी मरून पडल्यावरहि तो दुसऱ्या पक्षापर्यंत जाऊन लागून तो दुसरा पक्षीहि मरावा. पण प्रत्यक्ष व्यवहारात असे घडत नाही. हाच दाखला माझ्या लेखानाहि लागू आहे. त्या सर्वांत मिळून तुम्ही एक कलम लावले तर मग दुसरे कलम लावावयाला जागेवर काय उरते?

आता ज्यूरीच्या अधिकाराविषयी दोन शब्द सांगतो. हे अधिकार चार प्रकारचे आहेत. (१) पुराव्यात आलेल्या गोष्टीपैकी खऱ्या कोणत्या व खोट्या कोणत्या याचा निर्णय करणे. (२) विशिष्ट किंवा शास्त्रीय किंवा लाक्षणिक किंवा सहेतुक म्हणून विशेष अर्थाने योजलेले शब्द एकाच भाषणात असतील तर त्यांचे त्या प्रसंगी नक्की अर्थ कोणते हे ठरविणे. (३) कायद्याने ज्यूरीकरिता म्हणून राखून ठेवलेल्या मुद्यावर निकाल देणे. (४) सामान्यपणे संदिग्ध शब्दप्रयोग विशेष अर्थाने वापरले आहेत की काय हे ठरविणे. ज्यूरीच्या या विविध अधिकारात न्यायाधीशाला हात घालता येत नाही. फक्त कायद्याचे प्रश्न असतील त्यातच त्याचा अधिकार चालतो. आरोपित कृत्यासंबंधाने परिस्थिति लक्षात घेणे हे ज्यूरीचेच काम आहे. येथे परिस्थिति वादाचीच होती व लेख लिहिताना मी जनतेच्या हक्काचा बचाव करण्याकरिताच लिहीत होतो. आपल्या अब्रूचे रक्षण कोर्टात गेल्याशिवायहि करण्याचा अधिकार समाजाला व त्याच्या मुखपत्राना आहे. मुद्रणस्वातंत्र्याचे रक्षण करावयाचे तर ज्यूरींचे अधिकार वाढले पाहिजेत. याचा अर्थ आरोपीचा अमुक एक हेतू होता

असा अभिप्राय न्यायाधीशाने व्यक्त केला पण ज्यूरीला तो अभिप्राय मान्य झाला नाही तर तिने आरोपीवर गुन्हा नाशाबीत आहे असा बेलाशक निकाल द्यावा. इंग्लंडातील कायदा असाच आहे. माझे लेख लोकानी वाचून झाल्याला दिवस किती गेले? त्या अवधीत तत्परिणामदर्शक असे काही कृत्य वाचकानी केले काय? असा पुरावा आणावयाला पाहिजे होता. नोकरशाहीच्या दोषांबरोबर मी तिचे गुणहि का सांगितले नाहीत असाहि एक आक्षेप आहे. पण ही जबाबदारी आरोपीवर टाकता येत नाही. १७९३ साली आर्सकिन याने लँबर्ट अँड पेरी यांजवरील खटल्यात हे सप्रमाण दाखविले आहे. इकडील राजद्रोहाचा कायदा विलायतेतील कायद्यालाच नेऊन भिडविला आहे असे कायदेपंडित स्टीफन यानेच म्हटले आहे. म्हणूनच मी विलायतेच्या कायद्याचे उल्लेख केले. वाद चालू होता असे मी वरचेवर म्हणतो याचा अर्थ असा नाही की मजकडून गुन्हा घडला खरा पण लेखांची विशेष परिस्थिति लक्षात घेऊन शिक्षा थोडी द्या. तसे नव्हे. वादाचा उल्लेख करण्याचे कारण हेच की त्यामुळे माझा हेतू निर्दोष होता, म्हणजे राजद्रोह करण्याचा नसून फक्त वादविवाद करण्याचा होता, हे दिसून येईल. शिवाय हा वादहि मुळात मी उत्पन्न केलेला नाही. १८८४ साली राणीसरकारविरुद्ध बिन्स या खटल्यात असा पुरावा आला की मिस्टर चेंबर्लेन यानी एकदा बोलताना असे म्हटले की अमुक गोष्ट सरकार करील तर एक लाख मनुष्य लंडनवर चालून जाईल. अशाहि बोलण्याकरिता चेंबर्लेनवर खटला कोणी केला नाही. असल्या शब्दाकरिता खटला केला तर त्याला कोणी नावे ठेवणार नाही. पण माझ्या लेखात असले काही तरी आहे काय? सरकारी वकील म्हणतात की चार्ज ठेवला आहे तो लेखांच्या इंग्रजी भाषांतरावरून. पण मी काही हे भाषांतर केलेले नाही आणि भाषांतर झालेले आहे ते सदोष आहे. चार्जामध्ये माझ्या लेखातील मराठी शब्दच का दिले नाहीत? सरकाराने खटल्याची मंजुरी दिली तीहि या सदोष भाषांतरामुळे दिली असावी. माझा मुद्दा हाच की ज्यूरीचे ज्ञान व मूळ मराठी लेख यांची खरी गाठच पडलेली नाही आणि मराठी वाचकांवर काय परिणाम झाले किंवा न झाले हे तर त्यांच्यापुढे मुळीच आलेले नाही.

आठव्या दिवशी म्हणजे ता. २२ जुलै रोजी टिळकानी सुमारे तासभर बोलून आपले भाषण संपविले. ते म्हणालेः—

ज्यूरीतील सभ्य गृहस्थहो! माझ्या डिफेन्सचे बहुतेक मुद्दे संपले. इतके दिवस शांतपणाने आपण माझे भाषण ऐकून घेतले याबद्दल मी तुमचा फार आभारी आहे. सरकारी वकिलानी चार्जात नक्की शब्द दिले नाहीत यामुळे प्रत्येक लेखातील पुष्कळशा शब्दांसंबंधाने मला हा विस्तृत खुलासा करावा लागला. तसेच माझे भाषण झाल्यावर सरकारी वकील आपले भाषण करणार व मला उत्तर देणार. मी थोडासा पुरावा दाखल केल्यामुळे कायद्याप्रमाणे त्यांचे भाषण हेच अखेरचे भाषण. मला प्रत्युत्तराचा अधिकार नाही. अर्थात् माझे सर्व लेख

घेऊन आणि सरकारी वकील काय काय कोटिक्रम करतील याची कल्पना करून त्या सर्व मुद्याना आगाऊ उत्तर मला द्यावे लागले. यामुळे इतका वेळ लागला. मी भाषणात अनेक चुका केल्या असतील. कारण मी सराईत वकील नाही. पण सरकारी वकिलाने मला केव्हाहि न अडविता बोलू दिले व माझ्याशी वागताना एक प्रकारचे दाक्षिण्य दाखविले याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहे. मी माझा खटला चालविल्यामुळे मला तो एखाद्या वकिलाप्रमाणे मांडता आला नसेल. पण मला समाधान इतकेच की माझ्या मनात जे जे काही आले ते ते सर्व मला आपल्या पद्धतीने मांडता आले. विलायतेत वर्तमानपत्राना जी सवलत मिळते तितकीच मी मागितली आहे. व ती मला मिळाली पाहिजे. ज्यूरीपैकी जे इंग्रज लोक आहेत त्यांच्या देशात मतस्वातंत्र्याचा हा अधिकार पूर्वीच मिळाला असून त्याची अखंड परंपरा आजवर चालू आहे. हे स्वातंत्र्य इंग्रज लोकानी झगडून मिळविलेले आहे. म्हणून त्याचा त्यानी अभिमानच बाळगला पाहिजे. तो अभिमान बाळगावयाला मिळावा अशीच आमचीहि हिंदुस्थानात इच्छा आहे. ती पूर्ण होण्याला इंग्रज लोकानी आम्हाला मदत केली पाहिजे. उदार विचारांची सवलत मी मागतो ती स्वतः माझ्याकरिता नव्हे तर माझ्या देशाकरिता. हा देश आता सध्या मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगात सापडला आहे. आणि भावी पिढ्या या दृष्टीनेच तुमच्या आजच्या निकालाकडे पाहतील. व्यक्तिशः माझे वय लक्षात घेतले तर मी आणखी किती दिवस जगणार ! पण माझ्या देशाचे आयुष्य काही संपत आलेले नाही. माझे विचार बरोबर आहेत असे म्हणणारा निदान एक गृहस्थ या ज्यूरीत मला मिळाला तरी मला समाधान वाटेल. आपले सर्वांचे एकमत होऊ न शकले तरी आपणापैकी प्रत्येकाला जे वाटेल ते त्याने स्वतंत्रपणे सांगावे. त्याचाहि मला उपयोग आहे. माझ्याविषयी पुष्कळ लोकांची मने आधीच दूषित झालेली आहेत आणि मुंबईतील वर्तमानपत्रे माझ्या नावाचा कसा परामर्ष घेतात हे आपण पाहतच असाल. पण ते या ठिकाणी विसरून जा. मी बोललो ते स्पष्ट बोललो. माझी भाषा ढोबळ व सडेतोड होती. एखाद्या सराईत वकिलाच्या भाषेप्रमाणे ती सफाईदार नव्हती. तथापि माझ्या भाषेला महत्त्व न देता त्यातील मुद्दे लक्षात घेऊन योग्य तो निकाल द्याल अशी मला आशा आहे. एखादी गोष्ट मनाला पटली तरी ती बोलून दाखविण्याला एक प्रकारचे धैर्य लागते. आणि हे धैर्य ईश्वराने तुम्हाला द्यावे अशी माझी प्रार्थना आहे.

## ( ६ ) ॲडव्होकेट जनरलचे भाषण

यानंतर सरकारी वकिलांनी आपल्या भाषणास सुरवात केली. ते म्हणाले " मला आपले मुद्दे थोडक्यात मांडावयाचे आहेत. सरकारी वकिलाने दोषारोप करताना आवेश दाखवू नये तर केवळ न्याय निवाडा करण्यात न्यायपीठाला सहाय्य करावे हे तत्व मला मान्य आहे. पण टिळक एकसारखे पाच दिवस

बोलल्याने मलाहि काही थोडा वेळ बोललेच पाहिजे. मात्र टिळकांप्रमाणे मी त्याच त्याच मुद्द्यांची पुनरुक्ती करणार नाही. चालू राजकारण काय आहे हे सर्व आपण या वेळी विसरून जा. प्रत्यक्ष पुरावा असा या खटल्यात जो दाखल झाला आहे तेवढाच लक्षात घ्या. बाहेर जगात सरकारचे मित्र व प्रतिपक्षी यांचे युद्ध सुरू असेल ते असो. हल्लीहून अधिक राजकीय सुधारणा व्हाव्या हेहि खरे असेल. त्याची आवश्यकता प्रतिपादणे हाहि टिळकांचा या लेखातील एक हेतु असेल. पण ते येथे गैरलागूच ठरणार. मुख्य मुद्दा हा की लोकपक्षाचे म्हणणे कितीहि खरे असले तरी टिळकांचे लेख राजद्रोहाच्या व्याख्येत येतात की नाही ? टिळकानी कायद्याचा अभ्यास केला आहे खरा. पण तो जागृत नसल्याने गैरलागू गोष्टींचे चर्वितचर्वण करण्यात त्यानी तुमचे चार दिवस नासले. स्वतः टिळकांच्या पूर्वीच्या खटल्यात न्यायमूर्ति स्ट्रॅची यानी राजद्रोहाचा जो अर्थ केला व प्रिव्हि कौन्सिलने जो कायम केला तोच या ठिकाणी घेतला पाहिजे. देशात अस्वस्थता होती हे सर्वांनाच मान्य आहे. तसेच राजद्रोह करणाऱ्या लेखात सांगितलेली हकीकत खरी असली तरी तेवढ्याने या आरोपाचा परिहार होत नाही. हेतु व उद्देश यांच्या संबंधाने मलाहि तुम्हाला टिळकांप्रमाणे काही सांगता येईल व ते मी सांगणारहि आहे. पण राजकारणाला उद्देशून टिळकानी ज्या हकिगती सांगितल्या त्यात मी शिरू शकत नाही. जी जबाबदारी कायद्यानेच टिळकांवर येते ती त्यानी आपल्यावर घेतली यात मोठा पुरुषार्थ नाही. हे प्रस्तुत लेख त्यानी स्वतःच लिहिले असतील असे मी म्हणत नाही. आणि असे म्हणण्याचे मला कारण तरी काय? पण त्या लेखातून आता जो अर्थ टिळक काढू पहातात तो अर्थ ते लिहिताना लिहिणाराच्या मनात नव्हता एवढेच,मला दाखवावयाचे आहे. राजद्रोहाचे लेख लिहिले आणि आता त्याला सोज्वळपणाचे साळसूदपणाचे स्वरूप देऊन कसे चालणार ?

टिळकानी जो अर्थ हल्ली लेखातून काढला त्याला त्यानी समर्थनकारक असा पुरावा काहीच दिला नाही. १२४ अ कलमातील पोटकलम २ व ३ यात ज्या सवलती दिल्या त्यांचा फायदा येथे टिळकाना मिळणार नाही. विलायतेत राजद्रोहाच्या कायद्याची परिणती कशी झाली हे आता सर्वांना माहित आहे. या मुद्द्यावर टिळकानी सांगण्याला जे दोन दिवस घेतले ते दुसऱ्या कोणी दहा मिनिटात सांगितले असते. उगीच ग्रंथांचे भारूड रचून टिळकानी तुमच्या मनात गोंधळ केला व वेळ खाल्ला. कारण येथे गुन्हा होतो की नाही हे पीनल कोडाप्रमाणे ठरवावयाचे आहे. इंग्लंडातील कायद्याप्रमाणे नाही. टिळक तुम्हाला म्हणाले की ' संभाळा तुम्ही मुद्रणस्वातंत्र्याचे संरक्षक व रखवालदार अहा. ' पण मी तुम्हाला उलट सांगतो की हे सब झूट आहे. तुम्ही खरे पीनलकोडाचे संरक्षक अहा. पण खुनाना अत्याचाराना उत्तेजन देण्यासारखे वाटेल ते बहकले आणि मग लिहिल्या हकीगती बरोबर आहेत आणि माझा हेतु शुद्ध आहे असे लेखकाने

म्हटले तर ते तुम्ही तरी चालू द्याल काय ? देशात नुसती अस्वस्थता आहे. पण ती बंडापर्यंत गेली नाही या म्हणण्यात अर्थ नाही. प्रयत्न या शब्दाची टिळकानी केलेली व्याख्या बरोबर नाही. आग पुढे पेटली नाही म्हणून मूळ आग लावणारा निर्दोषी कसा ठरतो ? न्यायाधीश व ज्यूरी हे जणू काही परस्पर प्रतिपक्षी असल्या-सारखे टिळकानी तुम्हाला भासविले. पण ते खरे नाही. प्रत्येकाचे अधिकार वेग-वेगळे आहेत. इतकेच काय तं. या बाबतीत टिळकाना तुम्हाला केवळ फसवावयाचे आहे असा मला संशय येतो.

लेख राजद्रोही ठरविण्याला लेखाशिवाय दुसरा पुरावा नाही असे टिळक म्हणाले. पण स्वतः लेख हाच लेखांचा उत्कृष्ट पुरावा असतो हे ते कसे विसरले ? त्यांचे म्हणणे लेखांचा अर्थ कोणास कसा वाटला हे सिद्ध करण्याला सरकाराने साक्षीदार आणावयास पाहिजे होते. उलट मी म्हणतो टिळकांच्या मागेपुढे आजुबाजुला त्यांच्या मित्रांचा कायदेपंडितांचा एवढा वेढा पडला आहे त्यातला त्यानीहि का नाही एखादा साक्षीदार दिला ? सरकारी भाषांतरातून निघणाऱ्या अर्थापेक्षा काही वेगळा अर्थ निघू शकतो हे सिद्ध करण्याला त्यानी वाटेल तर साक्षीदार द्यावयाचे होते. नुसते टिळकानी भाषांतरे चूक म्हटल्याने ती चूक ठरत नाहीत. ज्यूरीतल्या कोणाला मराठी कळत असेल तर त्याने वाटेल तर आपल्या इतर बंधूना त्याचा योग्य अर्थ समजवावा. माझी त्याला हरकत नाही. जोशी यांची भाषांतरे चूक असे सिद्ध झाले नाही. भाषांतरातून निघणारा गोळा बेरीज अर्थ एकच असणार आणि तो न घ्यावयाचा तर दुसरा कोणता ? म्हणून न्याय-मूर्ती स्ट्रॅची यानी सन १८९७ च्या खटल्यात ज्यूरींना सुनावणी करताना अर्थ-मीमांसेचे जे नियम दर्शविले तेच आजहि ग्राह्य होतात. लिहिणाराला स्वतंत्रता नाही असे म्हणतो कोण ? सरकारावर टीका करण्याचा अधिकार नाही असे कोणी कधी म्हटले ?

प्रश्न इतकाच की ही टीका करताना १२४ अ खाली पडण्याइतके अति-क्रमण झाले की नाही ? स्वतंत्रता हवी पण तिचा दुरुपयोग नको. या दुरुप-योगाने अनवस्था प्राप्त होईल. आज टिळकांचे म्हणणे ग्राह्य धरले तर उद्या अनर्थच. ज्या अत्याचारांची घोषणा ते घडण्यापूर्वीच मोर्ले साहेबाना ऐकू आली तेच मूर्तिमंत उद्या घडू लागतील. ज्या लोकाना उद्देशून लेख लिहिले गेले त्या लोकांच्या मनावर त्या परिस्थितीत काय परिणाम होण्यासारखा होता इतकेच पहा-वयाचे असते. परिणाम प्रत्यक्ष कोणता घडला किंवा नाही हे पहावयाचे नाही. परिस्थिति लक्षात घेतली पाहिजे हे टिळकांप्रमाणे मीहि म्हणतो पण वेगळ्या अर्थाने. बांब गोळ्याचे अत्याचार मला नापसंत आहेत हे जे टिळक म्हणतात ते निवळ ढोंग आहे. ते नापसंत वाटणाऱ्याच्या हातून अत्याचारांची अशी गर्भित स्तुति लिहिलीच गेली नसती. टिळकानी लेखांची भाषांतरे घाईने वाचून टाकली ती तुम्ही सावकाश वाचा म्हणजे तेवढ्यानेच काम होईल. लेखात कोठे संदिग्धता

असेल व अर्थाचा खरोखरच संशय उत्पन्न होईल तर त्याचा फायदा टिळकाना जरूर द्या. एखाद्या शब्दाचा सौम्य अर्थ समजून काय निघते तेहि लक्षात घ्या. पण विनंति इतकीच की ता. १२ मे ते ता. ९ जून पर्यंत केसरीतून एकामागून एक आलेले लेख पुराव्यात दाखल केले आहेत ते सर्व एकत्र वाचा. म्हणजे खरा अर्थ आपल्या लक्षात येईल. तसे केल्यास एखादा तुटक शब्द उगाच फाजील उग्र किंवा फाजील सौम्य असा वाचताना वाटला तरी तो संकीर्ण अर्थप्रकाशात लोपून जाईल.

नोकरशाही ही सरकारला नोकर म्हणून सरकार वेगळे व नोकरशाही वेगळी हे टिळकांचे म्हणणे बरोबर नाही. खरा बचावाचा असा मुद्दा टिळकानी काहीच मांडला नाही. उगाच भाराभर बुके आणली व वाचली आणि भलती अनुमाने काढली. बुडता मनुष्य काडीचाहि आधार धरू पाहतो हे खरे पण ती त्याला तारू शकत नाही. भाषांतरे चूक म्हणून किंवा शब्दार्थ बदलून दाखवून टिळकानी काहीच मिळविले नाही. स्वतः त्यांच्या मनाला न पटणारा असाहि काही युक्तिवाद त्यानी केला असे कोणीहि म्हणेल. ज्या शब्दार्थाबद्दल टिळकानी आक्षेप घेतला ते सर्व शब्द वाटेल तर मी त्याना बहाल करतो. त्यांचेच अर्थ घेतले तरी तेवढ्याने त्यांचा काहीच बचाव होऊ शकत नाही. शब्दाना काही ठराविक अनिर्बाह्य अर्थ असतातच. ते इकडे किंवा तिकडे ओढल्याने किती ओढले जाणार ? कायद्याचे प्रश्नहि ज्यूरीकडेच निर्णयाला जातात असे टिळकानी तुम्हाला भासविले पण हे त्याना शोभत नाही. मी म्हणतो हे खरे असेल तर टिळकांचे सगळे बोलणे वाळूत ओतल्याप्रमाणे निष्फळ आहे असे तुम्ही समजावे.

वादातील उत्तर प्रत्युत्तरे चालू होती या टिळकांच्या तक्रारीतहि काही अर्थ नाही. वादविवाद आणि उत्तर प्रत्युत्तरे झाली तरी ती कायद्याने घालून दिलेल्या मर्यादेतच असली पाहिजेत. काय म्हणे रोज नव्या नव्या उद्वेगजनक बातम्या येत होत्या लोकपक्षावर रोज नवेनवे हल्ले होत होते ते वाचून डोके भणभणून गेले. आणि आठवडाभर डोक्यात हा गोंधळ माजल्याने एखाद्याने त्या भरात आवेशाने लिहिले त्यात मर्यादा कसली अमर्यादा कसली ! पण हा भोळा युक्तिवाद कोण चालू देतो ! अँग्लो इंडियन वर्तमानपत्रानी लिहिले ते चांगले असे मी तरी कोठे म्हणतो ! पण त्यानी लिहिले ते टिळकाना उद्देशून लिहिले नव्हते. मग त्याचा कटाक्ष आपणावरच आहे असे समजून टिळकानी का लिहावे ! होय त्यानी खोडा तयार केला पण टिळकानी त्यात पाय का घातला ! आपल्या बचावाकरिता राष्ट्रीय सभेतील मवाळांचे लेख टिळकाना आता सुचतात. पण त्याच मवाळांची सुरतेस टिळकानी काय वाट लावली हे जग जाणतेच. पुराव्याचा बोजा आपणावर टाकण्यात आला अशी तक्रार टिळकानी केली. पण आम्ही तरी ज्यूरीपुढे लेख ठेवल्यावाचून दुसरे काय करू शकणार ! लेखातून राजद्रोह निघतो की न निघतो हे ज्यूरी ठरविणार. तो निघण्याचा संभव समजून टिळकाना पुरावा द्यावासा वाटला

त्यानी दिला. द्या असे त्याना सांगावयाला आम्ही कोठे गेलो होतो ? पुराव्या-शिवाय आहे तसेच प्रकरण सोडले तरी ज्यूरीने योग्य तोच निकाल दिला असता. मग टिळकाना एवढी त्याची भीति का वाटली ? पण भीति वाटण्याचे कारण असे की " राजकीय सुधारणा करा हक्क द्या नाहीतर बांबगोळे टाकू " अशी दहशत घातल्याचा अर्थ टिळकांच्या लेखातून निघतो म्हणून !

लेखांची मर्यादा वादविवादातील आत्मरक्षणापलीकडे गेली आहे. वादात प्रत्युत्तराकरिता हे लेख मी लिहिले असे टिळक म्हणाले तेव्हा कोर्टात हशा पिकला नाही हे त्यानी भाग्य समजावे. 'देशाभिमानी राजद्रोह असा काही असेल तर तो मी केला खरा. हक्क द्या नाही तर बांब घ्या असे मी म्हणणार लिहिणार ! कारण मी संपादक महाशय आहे ! आणि मी संपादक आहे म्हणून माझे हेतु शुद्ध आहेत !' असा बहाणा टिळकानी चालविला आहे. पण तो कोण चालू देणार ? आपले हेतु शुद्ध अशी मनाची समजूत करून घेऊन मी वाटेल ते लिहिण्याबोलण्याला मोकळा आहे अशी फसगत टिळक स्वतःची करून घेतील तर यापुढे ते अधिकाधिक खोल खड्यात पडतील. हेतु खरोखरच शुद्ध असेल तर त्याने असली गुन्हेगारी टळत नाही. फार तर शिक्षा कमी होते. पण टिळकांचे हेतु शुद्ध आहेत असे मी केव्हाहि कबूल केलेले नाही. उगीच क्षणभर युक्तिवादाकरिता तसे घेऊन चाललो.

हेतुसंबंधाने जुन्या समजुती हल्ली उडून गेल्या असे टिळक म्हणाले. मला वाटते त्याना बांबगोळ्यानीच बहुधा उडवून दिले असावे. पण मी त्याना सांगतो की काहीहि उडून गेलेले नाही. सगळे जागच्याजागी स्थिर आहे. सर्वांना सारासार विचारशक्ति असते तीहि जणुकाय बाजूला ठेवा असे टिळक तुम्हाला सांगतात. पण ते तुम्ही ऐकाल काय ? टिळकांचा सगळा युक्तिवाद चक्राकार आहे. त्यातून आपण पांच दिवस गिरक्या खाल्ल्या तरी आहो तेथेच आहो. त्यांच्या हातच्या कार्डासंबंधी मी जरूरीपेक्षा अधिक काही बोलत नाही. टिळकाना कार्ड नाकबूल नाही. कोणी लिहिले कोठे सांपडले हे नाकबूल नाही. अर्थात् या लेखातील विधानावरून व त्या कार्डातील विषयावरूनच टिळकांच्या हेतूची कोणीहि परीक्षा करील. टिळकाना बॉंब तयार करावयाचे नसतील पण त्यांचे वर्णन करून सरकाराला त्याना दहशत घालावयाची होती. दहशत घालण्याच्या हेतूशिवाय कोण कोणाला इशारत घ्या म्हणतो ? सावध व्हा म्हणतो ? संभाळा म्हणतो ? ता. ९ जूनच्या लेखात झाकलेलीच नव्हे तर अगदी उघड उघड दहशत दाखविलेली आहे. ज्याला बॉंब गोळे पसंत नाहींत तो त्याचे वर्णन 'ती एक जादू आहे तो एक मंतरलेला ताईत आहे ' असे कसे करील ? लेखकाला आज लिहिताना देखील दहा वर्षांपूर्वीच्या रँडसाहेबांच्या खुनाची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. पुण्याच्या या लेखकाना रँडसाहेबांचा खून ही एक हौशीपणाच्या सहली करण्याची एक रम्य भूमीच वाटते. खुनाची स्तुति किंवा समर्थन करणारा मनुष्य खुनी माणसाच्या

करामतीप्रमाणे किंवा धाडसाप्रमाणे त्याना स्तुतीचे कमी अधिक बक्षीस देणारा मनुष्य दयेमायेचे आगर आहे असे कोण ह्मणेल ? या लेखावरून टिळकांच्या मनात काय विचार घोळत असावे हे सहज कळते. तुम्ही हे सगळे लिहावे स्फोटक द्रव्याची माहिती गोळा करावी आणि उडालेल्या बॉंब गोळ्याबद्दल आवेशयुक्त सहानुभूति दाखवावी हे मात्र बरोबर आणि तुम्ही अत्याचाराना उत्तेजन देता असा आम्हाला संशय आला तर ते मात्र गैर ठरते काय ?

बॉंब गोळे थोडक्यात व स्वस्तात तयार करिता येतात या गोष्टीच्या आनंदाने भरून गेल्याप्रमाणे लेखकाने लिहिले आहे. खुनी लोक हे टिळकाना देशाचे उपकारकर्ते असे वाटत असतील तर असोत. पण ते आरोपाला उत्तर नाही. आपण व पंडित मोर्ले हे एकाच मताचे आहो असे टिळकानी भासविले आहे. खरेच हे दोघेहि सारखेच महानुभाव ! मग यांचे विचार का न जुळतील ! पण दडपशाहीचे समर्थन लॉर्ड मोर्ले यानी केले आहे त्याची वाट काय ! टिळकांचे म्हणणे दंगेधोपे होवोत लोक बॉंब फेकोत पण कोणावर खटले करू नयेत. पण सरकारने देशात शांतता कशी राखावी ? देशांत शांतता राखणे ही काही दडपशाही नव्हे. टिळक व त्यांचे अनुयायी यांच्या कृत्याना थारा मिळू शकला तर अराजकतेचे बंद खुले होऊन ती सैरावैरा नाचू लागेल. टिळकानी प्रातिनिधिक राज्यसत्तेसंबंधाने अॅमॉस वगैरे कितीतरी जाड्या ग्रन्थकारांची नावे सांगितली. पण येथे त्यांचा काय उपयोग ?

आता १५३ अ कलमाखालच्या आरोपाकडे मी वळतो. या कलमासंबंधाने काही विशेष असा न्यायकोर्टाचा ठराव झालेला नाही. तथापि कलमाची भाषा अगदी सरळ उघड आहे. नोकरशाही व तिचे प्रतिपक्षी हे दोन या कलमात सांगितलेले वर्ग होत. १२४ अ कलमाखाली आरोप शाबीत झाला असला तर १५३ अ कलमाखाली धरता येत नाही या म्हणण्यात अर्थ नाही. त्यातल्यात्यात १५३ अ संबंधाने आरोपावर माझी भिस्त नाही. माझी भिस्त १२४ अ कलमावरच आहे. टिळकानी रशियाचा इतिहास तेथे जन्मलेल्या बांबची कारणे वगैरे विषयी पुष्कळसे असे सांगितले आहे की ते ऐकून कोणालाहि उद्वेगच वाटेल. सुदैवाने टिळकानी रशियाचे भांडण घेऊन भांडावे अशी गरज नाही. किंबहुना टिळकानी सांगितले त्याच्या विरुद्धच वस्तुस्थिति आहे. रशियन लोकाना ' ड्युमा ' सभा मिळाली ती काही बॉंबमुळे नव्हे. उलट अत्याचार होऊ लागल्यामुळे ड्युमा सभेसंबंधाने लोकांच्या हक्काची पिछेहाटच झाली. टिळकांचा हेतु इतकाच की रशियाचे उदाहरण द्यावे आणि म्हणावे की येथेहि तुम्ही बॉंब गोळे फेका म्हणजे तुम्हालाहि सुधारणा मिळतील. टिळक सावधगिरीचा इशारा इतकाच देतात की ' ज्यांच्यावर बॉंब खरोखर टाकावयाला पाहिजेत त्यांच्यावरच टाका. भलत्यावर टाकू नका ! ' भलत्यावर टिळक दया करतात ही मेहरबानीच समजावयाची ! किंग्सफर्ड मेले नाहीत एवढेच काय ते वाईट ! तुम्ही बॉंब टाकले आणि ते बरोबर टाकले

म्हणजे टिळक तुमच्या पाठिशी खास आहेत असाच ह्या सगळ्या लेखांचा अर्थ आहे. मग काय हा राजद्रोह नव्हे ? रशियापेक्षा म्हणे हिंदुस्थानातली स्थिति अधिक वाईट ! येथे सरकार परकी आहे ते लवकरच काढून टाका ! बंगालच्या फाळणीचे मोठे स्तोम माजविण्यात येते. पण फाळणी म्हणजे दोन भाग करून सरहद्द ठिकठाक करणे इतकाच त्याचा अर्थ. एक सरकार होते तेथे दोन प्रांत करून दोन सरकारे निर्माण केली यात काय मोठेसे बिघडले ? मांजर कोंडले म्हणजे ते छातीवर उडी मारते असा दाखला टिळकानी दिला. पण हा ह्या फाळणीच्या कृत्याला लागू पडतो की काय ते तुम्हीच सांगा.

पावलोपावली परकी हा शब्द सरकारला लावला आहे. राज्याच्या चालत्या गाड्याला खीळ घाला म्हणजे तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील असे टिळक या लेखात सुचवितात. सरकारावर दर दहा पाच वर्षांनी अशाच तऱ्हेचे अत्याचारमय हल्ले होत असतात. आणि त्याचा सरकार प्रतिकार करते म्हणून ते जुलमी राक्षसी व निंद्य ! यात टिळक असा फरक करतात की बंगाली बॉंब हा देशभक्तीने भरलेला म्हणून तो स्वर्गीय होय. युरोपातील बॉंब मात्र नरकात पाठविण्यास योग्य. या गोष्टी लिहिण्यात टिळकाना विनोद सुचतो. आणि टिळकाना वाटते की आपण मोठे विनोदी लेखक आहो. पण या वर्णनातच टिळकांच्या मनाची तुम्ही परीक्षा करा. पूर्वी मुसलमानांच्या सैन्याना ज्याप्रमाणे पिटाळून लावण्यात आले त्याप्रमाणे आज हिंदु लोकानो उठा आणि गोऱ्या सैन्याला पळवून लावा अशा भावनेची सूचना टिळकानी केली आहे. मुसलमान राज्यकर्त्यानी हिंदुस्थानातील लोकांच्या हातातील हत्यारे तरी काढून घेतली नव्हती असे सांगण्यात टिळकांचा काही विशेष हेतु नाही काय ?

हेनरी कॉटन वेडरबर्न वगैरे लोकांचे उतारे टिळकानी वाचून दाखविले. पण ते योग्य रीतीने शाबीत केले नाहीत. प्रारंभी माझा असा विचार होता की टिळकाना लागण्यासारखा एकहि शब्द बोलू नये. कारण टिळकांचे भाषणच असे होते की त्याचा नुसता हवाला देण्यानेहि आमचे कार्य भागेल. कारण कोणाहि सरळ मनुष्याच्या मनाला ते भाषण पटण्यासारखे नव्हते. पण पुढे माझ्याने मनाची ही शांतता राखता आली नाही. आणि त्याबद्दल न्यायकोर्टाला किंवा ज्यूरीला मला दोष द्यावासा वाटेल तर तो त्यानी मला खुशाल द्यावा. मी कदाचित् कठोरपणाचे शब्द वापरले असतील पण ज्या लेखावर आणि भाषणावर टीका करण्याच्या भरात मी ते वापरले ती मुळात अशी होती की कोणाहि मनुष्याला त्यावर कठोर टीका केल्याशिवाय गत्यंतर नाही असेच वाटेल. टिळक आणि मी या दोघामध्ये एका मुद्यावर एकवाक्यता खास आहे. ती ही की कोर्टात प्रत्यक्ष ज्या गोष्टी तुमच्या कानावर आल्या तेवढ्या मनात ठेवा. बाहेर ऐकलेल्या गोष्टी मनातून काढून टाका. अशा निर्विकार स्थितीमध्ये तुम्हाला जो निर्णय द्यावयाचा तो द्या.

## (७) न्या. दावर यांचा समारोप

यानंतर चारदोन मिनिटानी न्यायमूर्ति दावर यानी ज्यूरीला खटला समजावून सांगण्यास सुरवात केली. हे करिताना ते म्हणाले:—" खटला सुरू होऊन आठ दिवस झाले. तुम्ही कंटाळला असाल म्हणून मी फार वेळ घेत नाही. दोन्ही पक्षानी आपापले म्हणणे तुमच्यापुढे मांडले आहे. तुम्हाला टिळक पूर्वी माहिती नव्हते किंवा या खटल्याची हकिकत पूर्वी कानावर आली नव्हती असे म्हणणे ढोंगीपणाचे होईल. तथापि तुम्ही न्याय करिताना आपली मने निर्विकार ठेवाल ह्याविषयी मात्र मला खात्री आहे. टिळकांचा विश्वास तुमच्यावर असल्याचे त्यानी प्रगट केले ही त्यातल्या त्यात बरी गोष्ट झाली. टिळक हे तुमच्यापैकीच एक प्रजाजन इतकीच बुद्धि त्यांच्याविषयी तुम्ही मनात ठेवावी. त्यांच्याविषयी तुम्हाला सहानुभूति वाटली तर ते अयोग्य नाही. तथापि निर्णय सांगताना तुम्ही मनात भिऊ नये आणि कोणाचीहि भीड धरू नये. सरकारने टिळकांविरुद्ध खटला भरला म्हणून तुम्ही असे समजू नका की टिळकाना दोषी ठरविलेच पाहिजे. कोणत्याहि सेशनच्या कज्जात सरकारच फिर्यादी असते. पण फिर्याद भरून पाठविणे एवढेच सरकारचे काम. न्याय देणे हे न्यायाधीश व ज्यूरी यांचे काम. राजद्रोहाचा खटला सरकारच्या विशेष परवानगीशिवाय केला जाऊ नये अशी कायद्याने सोय करून ठेविली आहे. आणि म्हणूनच सरकारला या कामी मंजुरी द्यावी लागते. पण ही मंजुरी म्हणजे काही शिक्षा ठोठावण्याचा हुकूम नव्हे. सरकारचा हुकूम तुमच्यावर व माझ्यावर चालू शकत नाही. तुम्हा आम्हाला तुमचे आमचे मन करील तोच हुकूम. मी टिळकाना आरोपी या नात्याने शक्य तितक्या सवलती दिल्या. गैरलागू गोष्टी पुराव्यात नसलेल्या गोष्टी अशाविषयी ते बरेचसे बोलले. त्यालाहि मी हरकत घेतली नाही. का ? तर त्यांच्यावर खटला झाला आहे. ते संकटात आहेत म्हणून त्यांच्या मनाला जे सुचेल ते अगदी मोकळेपणाने सांगण्याला त्याना सवड राहावी. पुरावा ग्राह्य कोणचा अग्राह्य कोणचा कायद्याचा प्रश्न कोणचा वगैरे गोष्टी ठरविण्याचा न्यायाधीश म्हणून मला पूर्ण अधिकार आहे. तसेच पुढे आलेल्या पुराव्यावर माझे मत तुम्हाला सांगण्याचाहि अधिकार मला आहे. मग ते तुम्ही मानावे अगर न मानावे. न्यायाधीश आणि ज्यूरी यांच्या अधिकारातील सीमा कोठे पडते ती ठरविण्याचा अधिकारहि मलाच आहे. ज्यूरीला न्यायाचा मुक्काम गाठण्याचा मार्ग दाखविणे हे माझे कामच आहे. त्याप्रमाणे मीहि तुमच्यावर विश्वास टाकू शकतो.

या खटल्यात कायद्यासंबंधाने काही अडचणीचे प्रश्न असे मुळीच नाहीत. पूर्वी न्यायमूर्ती स्ट्रॅची यानी राजद्रोहाच्या कायद्याचे जे विवरण केले ते बहुतांशी ह्या हायकोर्टाच्या फुल बेंचने मान्य केले आहे. प्रिव्ही कौन्सिलात तर ते मान्य झालेच आहे. आणि त्या निकालाचा आधार इतर प्रांतात अनेक खटल्यात घेण्यात

आला आहे. कायद्याची कलमे तुम्हाला वाचून दाखवून समजून सांगण्यात आलीच आहेत. द्वेष अवमानबुद्धि ह्या शब्दांच्या व्याख्याच कोणी कशाला करावलाया पाहिजेत? ते विचार प्रत्येक मनुष्याच्या अनुभवाचेच आहेत. अप्रीति हा शब्द थोडासा अपरिचित असा आहे. पण तो विशेष अर्थाने राज्यकर्ते आणि प्रजाजन यांच्यातील द्वेषबुद्धीला लावतात. कायद्याने सरकारावर टीका करण्याला मोकळीक दिली आहे. जोराची भाषाहि टीकाकारानी बेलाशक वापरावी. पण सरकार अनीतिमान अप्रामाणिक असे म्हटले आणि त्यांच्या हेतूबद्दल शंका घेतली तर ते मात्र मर्यादेचे उल्लंघन झाले. तुम्ही आम्ही सर्वच मुद्रणस्वातंत्र्याचे भोक्ते आहोत. पण त्या स्वातंत्र्याला मर्यादा आहे. कोणाचा छळ करावा म्हणून राजद्रोहाचा खटला होऊ नये. आणि तसा छळ झाला तर आरोपीने तो ज्यूरीला दाखवून द्यावा. पूर्वी बंगाल्यात सर कोमर पेथराम यानी अप्रीति या शब्दाचा अर्थ स्ट्रॅची साहेबांप्रमाणेच केला होता. अलाहाबाद हायकोर्टातहि सर जॉन एज यानी असाच अर्थ काढिला होता. इकडे सर लॉरेन्स जेनकिन्स यानीहि त्याच अर्थाला मान्यता दिली आहे.

'प्रयत्न' या शब्दाचा अर्थ 'प्रारंभ.' तो केला म्हणजे पुढे त्याचा हटकून परिणाम झालाच पाहिजे असे नाही. ह्या गोष्टी लक्षात घेऊन टिळकांच्या लेखातून काय अर्थ निघतो ते ठरवा. देशाची परिस्थिति टिळकांची परिस्थिति त्यानी केलेला खुलासा या सर्व गोष्टी तुम्ही जरूर लक्षात घ्याव्या. एका माणसामागे दुसरा माणूस हातात कुऱ्हाड घेऊन धावला परंतु त्याला खुनाच्या प्रयत्नाची शिक्षा दिली नव्हती हे पंजाब लॉरिपोर्टीमधील उदाहरण टिळकानी सांगितले ते बरोबर आहे. पण त्याबरोबर हे लक्षात ठेवा की कुऱ्हाड घेऊन धावणाऱ्या मनुष्याला 'दुखापत करण्याचा प्रयत्न' करणाऱ्या मनुष्याइतकी तरी शिक्षा झालीच. त्याने कदाचित् प्राण जाण्याइतका मोठा वार केला नसता. पण कुऱ्हाड घेऊन धावणारा मनुष्य दुखापत तरी खचित करता म्हणून त्याला त्या मोठ्या गुन्ह्याऐवजी धाकटा गुन्हा करण्याच्या प्रयत्नाबद्दल शिक्षा झाली इतकेच. सन १७०० आणि १८०० ह्या १०० वर्षांत विलायतेत झालेल्या राजद्रोहाच्या खटल्यांची हकीकत टिळकानी तुम्हाला सांगितली ती सर्व लक्षात ठेवा. काही हरकत नाही. विलायतेतील वर्तमानपत्रांपेक्षा इकडील वर्तमानपत्राना संरक्षणाची गरज अधिक आहे असे तुम्ही घेऊन चाला. पण इंग्लंडातील खटल्यावरून तरी काय दिसून येते? त्या खटल्यातील तत्व या लेखाला लावून पहा. आणि तसे करण्याने टिळकावर गुन्हा शाबीत होत आहे असे वाटत असेल तर बेलाशक तसा निर्णय द्या. टिळकाप्रमाणे मीहि तुम्हाला सांगतो की एकादा शब्द इकडे तिकडे पडला तरी त्याची फारशी मातबरी नाही. मराठी भाषा व इंग्रजी भाषा यातील अंतर टिळकानी दर्शविले व भाषांतरावरून मूळ लेखाची कल्पना करिताना सावधगिरी ठेवण्यास सांगितले तेहि योग्य आहे. पण हे सर्व केल्यावरहि टिळकानी सरकाराविषयी या लेखानी कोणती भावना प्रगट केली ह्याचा निर्णय करणे उरतेच.

आणि लेखांचा वरील अर्थ घेऊन तुम्ही निर्णय द्या. भाषांतरकारांची उलट तपासणी टिळकानी करून केली. त्यांचा टिळकांवर काही आकस असण्याचे कारण नाही. सरकारी भाषांतरकाराचे भाषांतर म्हटले म्हणजे प्रायः ते बरोबर आहे असेच घेऊन चालण्याची हायकोर्टाची वहिवाट आहे. आणि त्यातून भाषांतरकार जोशी हे तर मराठीचे पंडित! तथापि मनुष्य आहे तेथे चूकहि आहे म्हणून टिळकानी सुचविलेले प्रतिशब्द स्वीकारावे. मीहि ते टिपून घेतले आहेत. त्याचाहि काय फायदा असेल तोहि टिळकाना द्या. पण हेहि लक्षात ठेवा की आपण एकादा ग्रंथ वाचतो तेव्हा ग्रंथातील एकाद्या शब्दापेक्षा त्यातील भावनांचाच परिणाम आपल्या मनावर घडतो. हजारो लोक केसरी वाचवात. त्यात काही पंडित काही विद्वान असले तरी काही सहसा न शिकलेले सहसा विचार न करणारे असेच पुष्कळ असणार! पुष्कळ वाचकाना राजकारणातल्या पक्षांची संपूर्ण माहिती असत नाही अशा लोकांच्या मनावर काय परिणाम झाला असेल? आपले लेख तुम्हाला समजाऊन सांगण्याला टिळकाना २१ तास १० मिनिटे मिळाली. पण हा लाभ सामान्य वाचकाना कोठून मिळणार? त्यांच्या मनावर जो ठोकळ परिणाम होईल तोच खरा. साक्षीपुराव्याने लेखांचा अर्थ व त्यांचे परिणाम ठरवीत बसण्यात अर्थ नाही. तेच लेख वाचून शंभर माणसे म्हणतील की टिळकानी राजद्रोह केला. उलट शंभर म्हणतील की टिळकांच्या मनात सरकाराविषयी प्रेमच वसत होते. पण येथे ते शंभर फुकट हे शंभर फुकट. तुम्ही जे काय ठरवाल तेच खरे! असली भाषा इंग्रजानी लिहिली तर हिंदूना काय वाटेल हिंदूनी लिहिली तर इंग्रजाना काय वाटेल असला विचार करीत बसू नका. तुमचे तुम्हाला काय वाटेल तेच पहा. अत्याचार होतात घडतात ते केव्हाहि द्वेषबुद्धिशिवाय घडत नाहीत हे निश्चित आहे. जे लोक खरोखर सरकारचा द्वेष करीत नाहीत ते अधिकाऱ्यावर बाँब फेकीत नाहीत. टिळक म्हणतात आहे तो कायदा फाजील कडक आहे. पण त्याला तुमचा किंवा आमचा उपाय नाही. आहे त्या कायद्याचा अंमल करावयाला आपण येथे जमलो आहो. आणि कायदा तर असे म्हणतो की हेतू चांगला असला उद्देश प्रामाणिक असला तरी कायद्याचे उल्लंघन ते उल्लंघनच.

लेखात सत्य किती असत्य किती याचा आपणाला फारसा विचार करावयाचा नाही. सत्य लिहून देखील द्वेष उत्पन्न करिता येतो तसे येथे झाले आहे की काय हेच तुम्हास पहावयाचे. इकडील देशात शब्दसंपत्तीचा उपयोग अधिक करितात ही गोष्ट तुम्ही लक्षात घ्यावी. त्याला हरकत नाही. टिळक म्हणतात तो अर्थ लेखातून निघत असेल तर तो घ्यावा. त्यालाहि विशेष हरकत नाही. सरकारला उपदेश करावयाचा म्हणून त्या उपदेशाला जोर आणण्याकरिता अत्याचारासंबंधाचे उल्लेख टिळकानी केले नसतील कशावरून? पण खाजगी मनुष्याला जसे संरक्षण हवे तसे सरकारला नको काय? मुद्रणस्वातंत्र्य हवे पण ते दुतर्फी हवे. प्रजेने आपल्यावर प्रीति करावी असे म्हणण्याचा हक्क सरकारास नाही. मनाला वाटेल त्याने सरकाराविरुद्ध वाटेल

तितकी द्वेषबुद्धि बाळगावी. पण लोकांवर परिणाम होईल अशा रीतीने ती व्यक्त करिता कामा नये. हीच मर्यादा. टिळक वर्तमानपत्रकार आहेत तरी पण लेख अगदी तात्कालिक स्फूर्तीने लिहिले आहेत की काय हेहि तुम्ही पाहिले पाहिजे. कारण बॉंबचे अत्याचार झाले एप्रिलअखेर व टिळकांचे लेख त्यानंतर काही दिवसानी लिहिलेले आहेत. तुमच्या तोंडात कोणी मारली किंवा तुमचे नाक धरून ओढले तर तुह्मी तात्कालिक केलेला प्रतिकार वाजवीपेक्षाहि कडक असू शकेल. पण पायोनिअरने मला शिवी दिली ह्मणून मी सरकारवर तोंडसुख घेईन असे टिळकाना ह्मणता कसे येईल ? पायोनिअर हे काही सरकारी गॅझेट नव्हे !

टिळक ह्मणतात 'माझा आवेश हा सत्यस्फूर्तीचा होता' पण तो तसा कितपत होता हे तुह्मीच ठरवा. बरे विषय काय तर बॉंबचे ' अत्याचार '. एरवी खून एकट्या दुकट्याचा तरी होतो. पण बॉंबने दहा पाच माणसे एकदम मरू शकतात. बॉंब हे कायदेशीर चळवळीचे हत्यारच मानले तर गोष्ट वेगळी ! देशात इतर राजकीय पक्षाप्रमाणे बॉंबवाला पक्ष म्हणून निर्माण झाला आहे. अशा वेळी टिळक ज्याला स्पष्टोक्ति म्हणतात ती खरोखर निरुपद्रवी आहे किंवा घातुक आहे हे तुम्हींच ठरवा. लेखात सदभिरुची नाही हा एक आक्षेप असेल. पण मी त्याला फारसे महत्त्व देत नाही. कायद्याच्या मर्यादेत लेख राहिला तर त्याची अभिरुची कितीहि दूषित असेना ! पण राजकीय हक्क न दिले तर माथेफिरू निर्माण होऊन बॉंब टाकतील या लिहिण्यात सदभिरुचीचा प्रश्न नसून निखालस कायद्याचा प्रश्न आहे. राज्याच्या चालत्या गाड्याला बॉंबची खीळ कोणी घालू पाहील तर काय परिणाम होतील ? दोन निरपराधी स्त्रियांचे खून झाले. आणि या कृत्याचे स्वरूप काय ? तर ह्मणे सरकारचे लक्ष प्रजेच्या मागण्याकडे वेधण्यास ते उपयोगी पडतील ! ता० ९ जूनच्या लेखात लेखकाने निरानिराळ्या उपमा दिल्या पण त्यात बॉंबचेच सुरस वर्णन केले.

आता टिळकांच्या हातच्या कार्डासंबंधाने मी असे सांगतो की त्याला तुम्ही फारसे महत्व देऊ नका. पुस्तकांच्या यादी कोर्टांत हजर केल्या त्यात काही स्वारस्य नाही. पुस्तकेच आमच्या पुढे नाहीत म्हणून टिळकांचेच म्हणणे मी खरे घेऊन चालतो की त्याना स्फोटक द्रव्याचा अभ्यास करून लेख लिहावयाचे होते. तरी मनातून हे कार्ड बाजूला ठेवून तुम्ही या लेखांचा विचार करा. असो. मी तुह्माला सांगावयाचे ते सांगितले. त्यापैकी तुह्माला वाटेल ते घ्या वाटेल ते टाका. संशयाचा फायदा द्यावासा वाटला तर तो ओरोपाला अवश्य द्या. पण इतकेहि सर्व करून टिळकांच्या हातून कायद्याचे उल्लंघन झाले असे तुह्माला प्रामाणिकपणे वाटेल तर तसेहि निर्भिडपणाने सांगा.

## ( ८ ) निकाल व शिक्षा

न्या. दावर यांची सुनावणी आठ वाजता संपली. आठ वाजून ३ मिनिटानी ज्यूरीचे लोक एकत्र विचार करण्याकरता आपल्या खोलीत गेले ते ९ वाजून

२० मिनिटानी परत आले. ते येताच न्यायमूर्तीनी पहिला प्रश्न केला की " तुम्ही निकाल देणार तो एकमताने की भिन्न मताने " ? याचे उत्तर 'भिन्न मताने' असे आल्यावर त्यानी फिरून विचारले ' वाटणी कसकशी ?' त्यावर फोरमन यानी सांगितले की " तिन्ही आरोपावर आमच्यापैकी सातांचे मत असे की टिळक गुन्हेगार आहेत आणि तीन्ही आरोपासंबंधाने दोघांचे मत असे की टिळक निर्दोषी आहेत." यावर न्यायमूर्तीनी विचारले की " फिरून एकत्र विचार करण्याकरता तुम्ही गेला तर एकमत होण्याचा संभव अजून नाही काय ?" त्यावर फोरमन यानी ' मुळीच नाही ' असे उत्तर दिल्यावर न्यायमूर्ती म्हणाले "तर मग मला आपलाहि निर्णय कायद्याप्रमाणे सांगितलाच पाहिजे. तो असा आहे की ज्यूरीचा निकाल मी मान्य करतो." तेव्हा सरकारी वकील म्हणाले "ठीक आहे. पण शिक्षा सांगण्यापूर्वी टिळकांवरील शिलकी चार्ज म्हणजे शिलकी शिक्षा भोगण्याच्या कबूलीचा चार्ज त्यांच्यावर याच वेळी मला ठेवावयाचा आहे." टिळक म्हणाले " पण हे होण्यापूर्वी कायद्याप्रमाणे मला काही मुद्दे कोर्टापुढे मांडावयाचे आहेत. त्याचा निकाल झाल्यावर मग इतर गोष्टी व्हावयाच्या त्या होतील." असे म्हणून त्यानी लिहून आणलेले चौदा मुद्दे वाचले. त्यातील मुख्य असे होतेः—" निरनिराळ्या आरोपांची एकत्र चवकशी झाली. लेखातील आक्षिप्त वाक्ये स्पष्ट करून सांगितली नाहीत. कोणकोणत्या वर्गामध्ये कलम १५३ अ प्रमाणे द्वेष पसरविण्याचा गुन्हा घडला ते वर्ग स्पष्टपणे सांगितले नाहीत. ज्या अधिकाऱ्यानी फिर्यादी दाखल केल्या त्यांची रीतसर जबानी झाली नाही. कित्येक कागद अग्राह्य असता पुराव्यात दाखल झाले. आरोपीला उत्तर देण्याचा हक्क असता दिला नाही. चुकीची भाषांतरे दाखल करून घेतली व मूळ भाषांतरकारांला उलट तपासणीला हजर केला नाही."

यावर न्यायमूर्तीनी सांगितले की " तुमचे सर्व मुद्दे मी ऐकले. चौकशीचे काम चालू असता त्यातला प्रत्येक मुद्दा आपापल्या वेळी पुढे आलाच होता. पण तुमच्या एकाहि मुद्यात तथ्य नाही असे वेळोवेळी माझे मत झाले तेच अजूनहि कायम आहे. म्हणून त्यांच्या विचाराकरता मी थांबत नाही. सरकारी वकिलालाहि त्यावर उत्तर देण्याचे कारण नाही. आणि या मुद्यावर फुलबेंचला अपील करण्याचा तुमचा अधिकारहि मी राखून ठेवू इच्छित नाही."

या मुद्यांचा अशा रीतीने निकाल लागल्यावर पूर्वी १८९८ साली अठरा महिन्याच्या मुदती आधी ६ महिने टिळकाना सोडले तेव्हा " पुन्हा अशा गुन्ह्याबद्दल दोषी ठरल्यास उरलेली शिक्षा मी भोगीन असे टिळकानी लिहून दिले होते तो करार पुढे काढून त्या वेळच्या आरोपाची आठवण देऊन सरकारी वकिलानी टिळकाना विचारले " तुम्ही ती गोष्ट कबूल करता की त्याकरता तुमची फिरून चौकशी आम्ही करावी ? " या विधीला क्रि. प्रो. कोडचे कोणते कलम लागते याविषयी टिळक व न्यायमूर्ती यांच्यामध्ये थोडा वाद झाल्यावर टिळकानी हा नवा चार्ज मला अर्थात् कबूल आहे असे उत्तर दिले. तेव्हा ' तुम्हाला काय

सांगावयाचे असेल ते सांगण्याची आता हीच वेळ आहे' असे न्यायमूर्तीनी सांगितल्यावरून टिळक म्हणाले " मला सांगावयाचे असे फारच थोडे आहे. ज्यूरीने मला दोषी ठरविले तर खुशाल ठरवो. पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टीचे नियंत्रण करणारी अशीहि एक शक्ति न्यायपीठाहूनहि वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल की मला शिक्षा व्हावी आणि मी शिक्षा भोगल्याच्या कारणानेच मी अंगिकारिलेल्या कार्याला उर्जित दशा यावी ! "

शेवटी न्यायाधीश टिळकाना उद्देशून ह्मणाले " तुम्हाला शिक्षा सांगणे हे आता माझे कर्तव्य आहे. ते करताना मला फार दुःख होते. किती ते सांगता येत नाही. तुह्मी अत्यंत बुद्धिमान आहा. सामर्थ्यवान आहा. लोकावर तुमचे फार वजन आहे. या साधनांचा उपयोग तुम्ही देशहिताकडे केला असता तर ज्या लोकाकरिता तुम्ही झटतो असे तोंडाने ह्मणता त्याना फार सुख लागले असते. दहा वर्षांपूर्वी न्यायकोर्टाने तुह्माला दोषी ठरविले पण शिक्षा थोडी देऊन तुमच्यावर दया केली. त्यावर फिरून सरकारानेहि विशेष दया दाखवून तुमची सहा महिन्याची शिक्षा कमी केली. आज तुम्ही लिहिल्या प्रकारचे घातक लेख हे राजकीय चळवळीतील न्यायाने उपयोगात आणण्यासारखे एक शस्त्र आहे असे तुम्ही ह्मणता तेव्हा तुमचे मन व अंतरंग रोगट झाले आहे यात शंका कसली ? तुमच्या लेखात राजद्रोह भरून उतू येत आहे. त्यात अत्याचाराचा उपदेश आहे. भित्र्या लोकानी केलेल्या अघोर कृत्याना तुम्ही संमत्ति दर्शविता. इतकेच नव्हे तर बॉंब गोळे हे हिंदुस्थानात लोककल्याणाकरिताच जणू काही अवतरले आहेत अशा भावनेने तुम्ही त्यांचे स्वागत करिता. यापरते एकादे कुजकट मन अधिक ते काय बोलेल ? किंवा लिहील ? सरकाराविषयीचा तुमचा द्वेष गेल्या दहा वर्षात नाहीसा झाला नाही. दर आठवड्याला तुम्ही अत्याचाराला उत्तेजन येईल असे लेख लिहीत आला आहा. तुमच्यासारखे वर्तमानपत्रकर्ते हा ईश्वराने या भूमीला दिलेला शापच होय ! तुम्हाला शिक्षा काय द्यावी याचा पूर्ण विचार मी केला आहे. ती इतकी थोडी आहे की लोक ती ऐकून म्हणतील न्यायमूर्तीनी काय ही भलत्या ठिकाणी भलती दया दाखविली ! कायदा व न्यायदेवता या दोहोंचे कार्य सफल करावयाचे तर तुम्हाला मी देतो इतकी शिक्षा तरी दिलीच पाहिजे. १२४ अ कलमाखालच्या आरोपाबद्दल तुह्माला जन्मभर काळ्यापाण्याची शिक्षा मला देता येईल. तरी पण तुमचे वय व इतर गोष्टी लक्षात घेऊन दोन गुन्ह्याबद्दल मिळून सहा वर्षांची काळे पाण्याची शिक्षा मी तुम्हाला देतो. आणि ही इतकी शिक्षा पुरे आहे ह्मणून तिसऱ्या आरोपाबद्दल तुम्हाला फक्त १००० रुपये दंड करतो."

हे झाल्यावर सरकारी वकिलानी पूर्वीच दर्शविल्याप्रमाणे चौथा आरोप काढून घेतला असे सांगितले. आणि आरोप काढून घेतला म्हणून त्यातून दोषमुक्तता झाली असे न्यायमूर्तीनी सांगितले. शेवटी " या एकाच खटल्यात ज्यूरीला

सांगावयाचे असेल ते सांगण्याची आता हीच वेळ आहे' असे न्यायमूर्तीनी सांगितल्यावरून टिळक म्हणाले "मला सांगावयाचे असे फारच थोडे आहे. ज्यूरीने मला दोषी ठरविले तर खुशाल ठरवो. पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टीचे नियंत्रण करणारी अशीहि एक शक्ति न्यायपीठाहूनहि वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल की मला शिक्षा व्हावी आणि मी शिक्षा भोगल्याच्या कारणानेच मी अंगिकारिलेल्या कार्याला र्जित दशा यावी!"

शेवटी न्यायाधीश टिळकाना उद्देशून ह्मणाले "तुम्हाला शिक्षा सांगणे हे आता माझे कर्तव्य आहे. ते करताना मला फार दुःख होते. किती ते सांगता येत नाही. तुह्मी अत्यंत बुद्धिमान आहा. सामर्थ्यवान आहा. लोकावर तुमचे फार वजन आहे. या साधनांचा उपयोग तुम्ही देशहिताकडे केला असता तर ज्या लोकाकरिता तुम्ही झटतो असे तोंडाने ह्मणता त्याना फार सुख लागले असते. दहा वर्षांपूर्वी न्यायकोर्टाने तुह्माला दोषी ठरविले पण शिक्षा थोडी देऊन तुमच्यावर दया केली. त्यावर फिरून सरकारानेहि विशेष दया दाखवून तुमची सहा महिन्याची शिक्षा कमी केली. आज तुम्ही लिहिल्या प्रकारचे घातक लेख हे राजकीय चळवळीतील न्यायाने उपयोगात आणण्यासारखे एक शस्त्र आहे असे तुम्ही ह्मणता तेव्हा तुमचे मन व अंतरंग रोगट झाले आहे यात शंका कसली? तुमच्या लेखात राजद्रोह भरून उतू येत आहे. त्यात अत्याचाराचा उपदेश आहे. भित्र्या लोकानी केलेल्या अघोर कृत्याना तुम्ही संमत्ति दर्शविता. इतकेच नव्हे तर बॉंब गोळे हे हिंदुस्थानात लोक-कल्याणाकरिताच जणू काही अवतरले आहेत अशा भावनेने तुम्ही त्यांचे स्वागत करिता. यापरते एकादे कुजकट मन अधिक ते काय बोलेल? किंवा लिहील? सरकाराविषयीचा तुमचा द्वेष गेल्या दहा वर्षात नाहीसा झाला नाही. दर आठ-वड्याला तुम्ही अत्याचाराला उत्तेजन येईल असे लेख लिहीत आला आहा. तुमच्या-सारखे वर्तमानपत्रकर्ते हा ईश्वराने या भूमीला दिलेला शापच होय! तुम्हाला शिक्षा काय द्यावी याचा पूर्ण विचार मी केला आहे. ती इतकी थोडी आहे की लोक ती ऐकून म्हणतील न्यायमूर्तीनी काय ही भलत्या ठिकाणी भलती दया दाखविली! कायदा व न्यायदेवता या दोहोंचे कार्य सफल करावयाचे तर तुम्हाला मी देतो इतकी शिक्षा तरी दिलीच पाहिजे. १२४ अ कलमाखालच्या आरोपाबद्दल तुह्माला जन्मभर काळ्यापाण्याची शिक्षा मला देता येईल. तरी पण तुमचे वय व इतर गोष्टी लक्षात घेऊन दोन गुन्ह्याबद्दल मिळून सहा वर्षांची काळेपाण्याची शिक्षा मी तुम्हाला देतो. आणि ही इतकी शिक्षा पुरे आहे ह्मणून तिसऱ्या आरोपाबद्दल तुम्हाला फक्त १००० रुपये दंड करतो."

हे झाल्यावर सरकारी वकिलानी पूर्वीच दर्शविल्याप्रमाणे चौथा आरोप काढून घेतला असे सांगितले. आणि आरोप काढून घेतला म्हणून त्यातून दोष-मुक्तता झाली असे न्यायमूर्तीनी सांगितले. शेवटी "या एकाच खटल्यात ज्यूरीला

२० मिनिटानी परत आले. ते येताच न्यायमूर्तीनी पहिला प्रश्न केला की " तुम्ही निकाल देणार तो एकमताने की भिन्न मताने " ? याचे उत्तर 'भिन्न मताने' असे आल्यावर त्यानी फिरून विचारले ' वाटणी कसकशी ?' त्यावर फोरमन यानी सांगितले की " तिन्ही आरोपावर आमच्यापैकी सातांचे मत असे की टिळक गुन्हेगार आहेत आणि तीन्ही आरोपासंबंधाने दोघांचे मत असे की टिळक निर्दोषी आहेत." यावर न्यायमूर्तीनी विचारले की " फिरून एकत्र विचार करण्याकरता तुम्ही गेला तर एकमत होण्याचा संभव अजून नाही काय ?" त्यावर फोरमन यानी ' मुळीच नाही ' असे उत्तर दिल्यावर न्यायमूर्ती म्हणाले " तर मग मला आपलाहि निर्णय कायद्याप्रमाणे सांगितलाच पाहिजे. तो असा आहे की ज्यूरीचा निकाल मी मान्य करतो." तेव्हा सरकारी वकील म्हणाले "ठीक आहे. पण शिक्षा सांगण्यापूर्वी टिळकांवरील शिलकी चार्ज म्हणजे शिलकी शिक्षा भोगण्याच्या कबूलीचा चार्ज त्यांच्यावर याच वेळी मला ठेवावयाचा आहे." टिळक म्हणाले " पण हे होण्यापूर्वी कायद्याप्रमाणे मला काही मुद्दे कोर्टापुढे मांडावयाचे आहेत. त्याचा निकाल झाल्यावर मग इतर गोष्टी व्हावयाच्या त्या होतील." असे म्हणून त्यानी लिहून आणलेले चौदा मुद्दे वाचले. त्यातील मुख्य असे होतेः—" निरनिराळ्या आरोपांची एकत्र चवकशी झाली. लेखातील आक्षिप्त वाक्ये स्पष्ट करून सांगितली नाहीत. कोणकोणत्या वर्गामध्ये कलम १५३ अ प्रमाणे द्वेष पसरविण्याचा गुन्हा घडला ते वर्ग स्पष्टपणे सांगितले नाहीत. ज्या अधिकाऱ्यानी फिर्यादी दाखल केल्या त्यांची रीतसर जबानी झाली नाही. कित्येक कागद अग्राह्य असता पुराव्यात दाखल झाले. आरोपीला उत्तर देण्याचा हक्क असता दिला नाही. चुकीची भाषांतरे दाखल करून घेतली व मूळ भाषांतरकारांला उलट तपासणीला हजर केला नाही."

यावर न्यायमूर्तीनी सांगितले की " तुमचे सर्व मुद्दे मी ऐकले. चौकशीचे काम चालू असता त्यातला प्रत्येक मुद्दा आपापल्या वेळी पुढे आलाच होता. पण तुमच्या एकाहि मुद्यात तथ्य नाही असे वेळोवेळी माझे मत झाले तेच अजूनहि कायम आहे. म्हणून त्यांच्या विचाराकरता मी थांबत नाही. सरकारी वकिलालाहि त्यावर उत्तर देण्याचे कारण नाही. आणि या मुद्यावर फुलबेंचला अपील करण्याचा तुमचा अधिकारहि मी राखून ठेवू इच्छित नाही."

या मुद्यांचा अशा रीतीने निकाल लागल्यावर पूर्वी १८९८ साली अठरा महिन्याच्या मुदती आधी ६ महिने टिळकाना सोडले तेव्हा " पुन्हा अशा गुन्ह्याबद्दल दोषी ठरल्यास उरलेली शिक्षा मी भोगीन असे टिळकानी लिहून दिले होते तो करार पुढे काढून त्या वेळच्या आरोपाची आठवण देऊन सरकारी वकिलानी टिळकाना विचारले " तुम्ही ती गोष्ट कबूल करता की त्याकरता तुमची फिरून चौकशी आम्ही करावी ? " या विषीला क्रि. प्रो. कोडचे कोणते कलम लागते याविषयी टिळक व न्यायमूर्ती यांच्यामध्ये थोडा वाद झाल्यावर टिळकानी हा नवा चार्ज मला अर्थात् कबूल आहे असे उत्तर दिले. तेव्हा ' तुम्हाला काय

फार काम पडले म्हणून पुढे तीन वर्षेपर्यंत त्याना ज्यूरीच्या कामाला बोलावू नये" असे न्यायमूर्तींनी लिहून ठेवल्यावर कोर्ट उठले. आणि टिळकाना पोलिसानी घेऊन जाताच कोर्टातील गर्दी बरीचशी आपोआप मोडली व उरलेली पोलिसानी धक्के देऊन मोडली.

## (९) लोकांची उत्सुकता व काळजी

टिळकांचा हा खटला किती दिवस चालणार याचा अंदाज प्रथम कोणासच नव्हता. निदान तो ज्या दिवशी संपेल असे वाटले होते त्या दिवशी तो संपला नाही व ज्या दिवशी तो संपणार नाही असे वाटले होते त्या दिवशी अचानक संपविण्यात आला. शेवटल्या दिवशी संध्याकाळचे ७ वाजण्याचे सुमारास ॲडव्होकेट जनरल यानी न्यायमूर्तींना विचारले की " हा खटला आपण आजच्या आज संपविणार काय ?" यावर न्यायमूर्तींनी सांगितले की " होय. ज्यूरीच्या फराळाची व्यवस्था खाली करून ठेवण्यात आली आहे. कितीहि उशीर झाला तरी खटला मी आज संपविणार." हे ऐकताच कोर्टात जमलेल्या लोकाना फार आश्चर्य वाटले. आणि दुसरे दिवशी खटला चालणार या समजुतीने जे लोक घरोघर ५ वाजता गेले आणि परत आले नाहीत त्यांची फसगतच झाली ! ज्या कौतुकबुद्धीने खटला चालला असता लोक हजर रहात ती बुद्धि खटला संपविण्याच्या वेळी सहजच अधिक तीक्ष्ण झाली होती. आणि ज्यूरीचा निकाल ऐकणे याविषयी केव्हाहि शर्यतीच्या मैदानावर कोणता घोडा पुढे येतो हे पाहण्याइतकी किंवा सोडतीची पेटी उघडली असता कोणाच्या नावची चिठी पहिल्या नंबरच्या बक्षिसाकरिता निघते हे समजण्याइतकीच आतुरता असते. म्हणून ज्याना न्यायमूर्तींच्या ह्या हुलकावणीमुळे खटल्याच्या निकालाचे वेळी हजर राहता आले नव्हते त्या प्रेक्षकांची फारच मोठी शिकार न्यायमूर्तींनी पळविली असे झाले. त्याना नुसते हौशी तमासगीर असे मानले तरी, इतके दिवस खटला ऐकण्याला आपण हजर राहू शकलो ह्याचे समाधान न वाटता खटल्याची अखेर हातातून गेली या निराशेने आपण फुकटच इतके दिवस घालविले असे त्याना वाटले असावे. पण लोक हा खटला ऐकण्याला कोर्टात जात ते केवळ हौसेखातर जात नव्हते तर टिळकांच्या भक्तीमुळेच जात. तेव्हा निकालाच्या वेळीच तेवढे आपण गैरहजर राहिलो असे आढळून आल्यावर त्याना किती हळहळ वाटली असेल हे सांगावयासच नको ! त्या दिवशी सायंकाळी ७ वाजण्याचे सुमारास न्यायमूर्तींनी खटला आज संपविणार असे सांगण्याच्या पूर्वीच कोर्टात मात्र चहूकडे एक प्रकारची गडबड दिसू लागली होती. कारण बॅ. ब्रान्सन यानी न्यायमूर्तींना प्रश्न विचारून त्यानी उत्तर देण्यापूर्वीच पोलिसाना ही वर्दी आगाऊ लागली होती. त्यामुळे त्यांच्या येरझारा सुरू झाल्या. पोलिस अधिकारी कोर्टातून बाहेर आणि बाहेरून कोर्टात जलदीने जाऊ येऊ लागले. कारण खटला त्या दिवशी संपविणार की नाही इतकीच काय ती गोष्ट कळावयाची होती, बाकी खटला संपावयाचा म्हणजे काय व्हावयाचे

फार काम पडले म्हणून पुढे तीन वर्षेपर्यंत त्याना ज्यूरीच्या कामाला बोलावू नये" असे न्यायमूर्तीनी लिहून ठेवल्यावर कोर्ट उठले. आणि टिळकाना पोलिसानी घेऊन जाताच कोर्टातील गर्दी बरीचशी आपोआप मोडली व उरलेली पोलिसानी धक्के देऊन मोडली.

## (९) लोकांची उत्सुकता व काळजी

टिळकांचा हा खटला किती दिवस चालणार याचा अंदाज प्रथम कोणासच नव्हता. निदान तो ज्या दिवशी संपेल असे वाटले होते त्या दिवशी तो संपला नाही व ज्या दिवशी तो संपणार नाही असे वाटले होते त्या दिवशी अचानक संपविण्यात आला. शेवटल्या दिवशी संध्याकाळचे ७ वाजण्याचे सुमारास ॲडव्होकेट जनरल यांनी न्यायमूर्तींना विचारले की "हा खटला आपण आजच्या आज संपविणार काय?" यावर न्यायमूर्तीनी सांगितले की" होय. ज्यूरीच्या फराळाची व्यवस्था खाली करून ठेवण्यात आली आहे. कितीहि उशीर झाला तरी खटला मी आज संपविणार." हे ऐकताच कोर्टात जमलेल्या लोकाना फार आश्चर्य वाटले. आणि दुसरे दिवशी खटला चालणार या समजुतीने जे लोक घरोघर ५ वाजता गेले आणि परत आले नाहीत त्यांची फसगतच झाली! ज्या कौतुकबुद्धीने खटला चालला असता लोक हजर रहात ती बुद्धि खटला संपविण्याच्या वेळी सहजच अधिक तीक्ष्ण झाली होती. आणि ज्यूरीचा निकाल ऐकणे याविषयी केव्हाहि शर्यतीच्या मैदानावर कोणता घोडा पुढे येतो हे पाहण्याइतकी किंवा सोडतीची पेटी उघडली असता कोणाच्या नावची चिठी पहिल्या नंबरच्या बक्षिसाकरिता निघते हे समजण्याइतकीच आतुरता असते. म्हणून ज्याना न्यायमूर्तींच्या ह्या हुलकावणीमुळे खटल्याच्या निकालाचे वेळी हजर राहता आले नव्हते त्या प्रेक्षकांची फारच मोठी शिकार न्यायमूर्तींनी पळविली असे झाले. त्याना नुसते हौशी तमासगीर असे मानले तरी, इतके दिवस खटला ऐकण्याला आपण हजर राहू शकलो ह्याचे समाधान न वाटता खटल्याची अखेर हातातून गेली या निराशेने आपण फुकटच इतके दिवस घालविले असे त्याना वाटले असावे. पण लोक हा खटला ऐकण्याला कोर्टात जात ते केवळ हौसेखातर जात नव्हते तर टिळकांच्या भक्तीमुळेच जात. तेव्हा निकालाच्या वेळीच तेवढे आपण गैरहजर राहिलो असे आढळून आल्यावर त्याना किती हळहळ वाटली असेल हे सांगावयासच नको! त्या दिवशी सायंकाळी ७ वाजण्याचे सुमारास न्यायमूर्तींनी खटला आज संपविणार असे सांगण्याच्या पूर्वीच कोर्टात मात्र चहूकडे एक प्रकारची गडबड दिसू लागली होती. कारण बॅ. ब्रान्सन यानी न्यायमूर्तींना प्रश्न विचारून त्यानी उत्तर देण्यापूर्वीच पोलिसाना ही वर्दी आगाऊ लागली होती. त्यामुळे त्यांच्या येरझारा सुरू झाल्या. पोलिस अधिकारी कोर्टातून बाहेर आणि बाहेरून कोर्टात जलदीने जाऊ येऊ लागले. कारण खटला त्या दिवशी संपविणार की नाही इतकीच काय ती गोष्ट कळावयाची होती, बाकी खटला संपावयाचा म्हणजे काय व्हावयाचे

ह्याची अटकळ सर्वांनाच होती. शिवाय शिक्षा झाल्यावर टिळकाना कोठे ठेवा-वयाचे हा प्रश्न होताच. मुंबईतील वातावरण ठीक नाही म्हणून टिळकाना शिक्षा होताच मुंबईतून हलवावयाचे असा सरकारचा बेत ठरल्यामुळे स्पेशल आगगाडीची नोटीस द्यावयाची होती. तात्पर्य पाच वाजल्याचे पुढे इतर लोकांचे लक्ष जसे खटल्याकडे अधिक अधिक वेधले तसे अधिकाऱ्यांचे लक्ष कमी होऊन दुसऱ्या काही उद्योगानी त्यांचे मन अधिक व्यग्र होऊन गेले.

परस्पर विचार घेण्याकरिता ज्यूरी आपल्या खाजगी जागेत गेली ती तेथे दीड तास होती. या अवधीत प्रेक्षकांची स्थिति काय झाली असेल याची सहजच कल्पना करता येते. गंभीर भावनेचा त्या दोन तासात कळसच झाला होता. आणि गंभीरपणात अनिश्चिततेची भर पडल्यामुळे लोकांच्या मनावर उदासीनता व खिन्नता आली होती. एवढ्या मोठ्या न्यायसभेच्या जागेत एकादी टाचणी पडली असती तरी ती सर्वांना ऐकू गेली असती. मुंबईतील सेशन कोर्टाचा दिवाणखाना आधीच अंधारा आणि भयाण असा दिसतो. तेथे दिवसा दिवे लावून बसण्याचाहि प्रसंग केव्हा केव्हा येतो. पण दिवसा दिवे लावलेले वेगळे व रात्री दिवे लावलेले वेगळे! कारण रात्री नुसत्या दिव्यांचीच मदत असल्यामुळे अंधार आपले भयाण रूप कोनाकोपऱ्यातून दाखवीत होता. आणि होते दिवे तेहि मोठेसे चकचकीत नव्हते.

लोकाना ह्या खटल्याबद्दल काय वाटत होते हे मॅजिस्ट्रेटपुढील कामाच्या पहिल्या दिवशीच प्रत्ययाला आले. कारण कचेरीजवळची गर्दी पोलिसाना मोडता मोडवेना यामुळे हल्ले व प्रतिहल्ले सुरू झाले. दंगा करण्याचा असा जरी उद्देश नव्हता तरी अखेर दगडफेकीपर्यंत मजल येऊन, कित्येक पोलिसाना आणि एका गोऱ्या सार्जंटाला बराच मार बसून दगडाच्या तडाख्याने त्याचे हाडहि बाहेर पडले आणि त्याला इस्पितळात न्यावे लागले असे म्हणतात. आठवडाभर खटला चालला तरी एवढ्या मुंबईत घरोदारी लोकाना बोलण्याला दुसरा विषय नव्हता. मुंबईस मराठे हमाल मोलकरी गिरणीकामगार ही संख्या पुष्कळ. त्याना टिळकां-विषयी फारच सहानुभुति वाटत असे, आणि निकालानंतर हा खटला करण्यात अन्याय झालासा त्याना वाटला तर ती अधिक होईल अशी सरकारची पक्की समजूत होऊन राहिली होती. म्हणून बेसावधपणे अवचित खटला संपवावा व लोक काही हालचाल किंवा आपल्या सहानुभूतीचे प्रदर्शन करणार त्याच्या आत टिळकाना मुंबईतून हलवावे म्हणजे मग पंचाईत पडणार नाही असे त्यानी मनाशी ठरविले होते. आणि त्याप्रमाणे घडून आलेहि. तथापि तारीख २२ रोजी ५ वाजून गेले तरी कोर्ट उठले नाही आणि आजच्या रात्री खटला संपविणार असे न्याय-मूर्ती बोलले ही बातमी गावभर पसरण्याला उशीर लागला नाही.

रात्र अंधारी आणि हवा पावसाळी होती. संध्याकाळपासूनच ढग येऊ लागले होते. सात वाजण्याचे सुमारास पाऊस पडण्यालाहि सुरवात झाली होती. आणि सुमारे एक तासभर जोराची वृष्टि झाल्यावर रस्ते भरून जाऊन डबकी

साचली होती. तथापि खटल्याचा निकाल रात्री लागणार ही बातमी ऐकताच लोकांच्या झुंडीच्या झुंडी हायकोर्टाकडे येऊ लागल्या. पण या गर्दीच्या आधीच कडेकोट पोलिस बंदोबस्त होऊन राहिल्यामुळे हायकोर्टाच्या आवारात फारच थोड्या लोकाना प्रवेश मिळाला. बाकीची गर्दी पोलिसानी थोपवून धरली ती हायकोर्टाच्या बाहेर चौफेर पसरली होती. रस्त्यातील दिव्यांच्या कंदिलांच्या काचा पावसाने भिजून गेल्यामुळे त्यांचा प्रकाश फारच मंद पडत होता. ज्यूरी कोर्टांत ९॥ च्या सुमाराला परत आली आणि त्यानंतरहि काही काम चालले यामुळे टिळकाना शिक्षा फर्मोविण्याला व त्याची वर्दी बाहेर येण्याला सहजच १०-१०। झाले. टिळकांचा सन्मान करण्याची इच्छा लोकाना असली तरी अशा वेळी आणि अंधाऱ्या रात्री ते काय करणार ? शिवाय शिक्षा सांगितल्यावर कोणास टिळकांचे नखहि दृष्टीस पडू नये अशी तजवीज पोलिसानी आगाऊच करून ठेविली होती. ती अशी की न्यायमूर्ति जाग्यावरून हालताच मागे पुढे गोऱ्या लोकांचा पहारा देऊन टिळकाना पिंजऱ्यातून बाहेर काढले. मोठ्या दारातून बाहेर पडताच थोरल्या जिन्याने खाली न नेता एका बारक्या खाजगी जिन्यानेच त्याना खाली आणले आणि हायकोर्टाच्या पश्चिमेस समुद्राच्या बाजूला मोटार तयार ठेविली होती तीत बसवून बाहेरच्या रस्त्याने एकदम परस्पर तुरुंगांत नेले. पण ही बातमी देखील काही सांगोवांगीने आणि कांही तर्काने मागाहून लोकाना कळली. नक्की माहिती कोणालाच मिळेना. पण त्याना इतके पक्के कळून चुकले की टिळक काही पुन्हा दृष्टीस पडत नाहीत ! कोणी इकडे डोकावले कोणी तिकडे डोकावले. परंतु टिळकांचा कोणासच पत्ता लागेना. शेवटी निराश होऊन जो तो आपआपल्या घरी गेला !

## (१०) सहानुभूतिदर्शक दंगे

दुसरा दिवस उजाडताच टिळकांच्या शिक्षेबद्दल मुंबई शहरात दुःखप्रदर्शनाचे प्रकार सुरू झाले. प्रत्येक वर्गाने आपापल्यापरी टिळकांविषयी सहानुभूति दाखविली. पांढरपेशांची सहानुभूति केव्हाच विशेष प्रगटपणाने दृष्टीस पडत नाही. कारण त्यांचे पुष्कळसे दुःख मनातल्या मनात असते. फार तर ते एकमेकात बोलतात. परंतु ते रस्त्यावर किंवा चवाठ्यावर फारसे येत नाही. उलटपक्षी त्यातल्या कित्येकानी दुःखव्रत घेऊन ज्या गोष्टी स्वीकारल्या त्या पुढे बरेच वर्षे, किंबहुना कित्येकानी टिळक तुरुंगातून सुटून येईपर्यंत, चालू ठेविल्या होत्या. पण गिरणीतील मजूर वगैरे लोकांच्या या दुःखप्रदर्शनाला वेगळेच स्वरूप आले. आधी बाजार बंद झालाच होता. कोणी कोणास न सांगताच हरताळाला सुरवात झाली. आणि कित्येकानी रोजच्याप्रमाणे जरी आपली दुकाने उघडली तरी इतरांची दुकाने बंद पाहून त्यांची त्यानाच लाज वाटली यामुळे आणि त्यानी आपण होऊनच दुकाने बंद केली. गिरणीतील मजुरांचा हरताळ म्हणजे कामावर न जाणे हा. ती गोष्ट सकाळपासून घडून येऊ लागली. काही लोक मुळी घरीच बसले आणि काही कामावर गेले ते गिरणीचे

दर्शन घेऊन त्याच पावली परत आले. त्यांचा हा हरताळ सरकारने मध्ये न पडता तसाच चालू दिला असता तर सहजच तो एक दोन दिवसानी आपोआप मोडला असता. टिळकांविषयी सहानुभूति वाटली म्हणून तरी गिरणीचे मजूर किती दिवस काम सोडणार आणि उपासमार करणार? त्यांचे नेहमीचे संप होतात ते काही एका कारणाकरिता होतात. त्यांचे उद्दिष्ट पुरे होईपर्यंत किंवा काही अंशी साधेपर्यंत ते कामावर जात नाहीत. यामुळे त्यांचा असला मर्यादित संप काही दिवस जगतो. पण टिळक सहा वर्षे काळे पाण्यावर गेले त्याना ते आपल्या हरताळाने थोडेच सोडून आणविते! गिरणीचे मजूर अशिक्षित असले तरी त्याना ही साधी गोष्ट कळत होती. जीवाची तळमळ म्हणून एक दोन दिवस काम थांबवून जड पावले टाकीत का होईना फिरून ते कामावर गेलेच असते. पण गिरणीमजुरांचा संप झाला हेच सरकारला फार विषादकारक वाटले. एकतर गिरण्या बंद पडल्याचा सहजच मोठा बोभाटा होतो. शिवाय आजचा संप म्हणजे घडघडीत सरकारचा निषेध. तेव्हा तो तावडतोब मोडला जावा अशाविषयी सरकारने जारीची खटपट सुरू केली. झाली गोष्ट ही काही लपवून छपवून झाली नव्हती. गिरणीचे मजूरहि ही गोष्ट स्वतः तोंडाने सांगत. आणि कित्येकांच्या तोंडून संपाची मुदत जास्तीत जास्त सांगितली गेली ती सहा दिवसच! 'टिळक एक वर्षभर काळेपाण्यावर गेले तर त्यांच्याकरिता आपण एक दिवस तरी काम थांबविणे आपले कर्तव्य आहे' अशा हिशेबाने पाहिले तर त्यांचा हा संप फार तर सहा दिवस चालता. गिरण्यांच्या मालकाविरुद्ध झालेले संप याहून कितीतरी अधिक काळ टिकतात. आणि तुम्ही मध्ये पडा संप मिटवा अशा विनंत्या अर्ज व शिष्टमंडळे सरकारकडे गेली तरी सरकार लक्ष घालीत नाही. पण आजचे हे भांडण गिरणीतील टिळकभक्त मजूर व सरकार यांच्यामधीलच होते. ह्या भांडणाचा हेतू पगाराची एक दिडकीहि वाढविण्याचा नव्हता. किंवा आमच्याकरिता अमुक एक करा असेहि त्यानी म्हटले नव्हते. गिरणीमजुरानी संप केला म्हणजे ते टिळकाना जसे मुंबईस परत आणीत नव्हते तसेच त्यांच्या शिक्षेची वर्षेहि ह्यांच्या मागणीमुळे कमी होत नव्हती. हा सगळा उघडा हिशोब होता. आणि मजुरांच्या दृष्टीने सरकारने जास्तीत जास्ती मेहेरबानी करावयाची ती इतकीच होती की काम सोडून जितके दिवस घरी बसण्याचा त्यांचा निश्चय तितक्या दिवस घरी बसू द्यावयाचे! ही मुदत फार तर दोन तीन दिवस टिकली असती हे दिसतच होते. पण सरकार व अँग्लो इंडियन पत्रे यानी असा बाहाणा केला की टिळक झाले म्हणून असे कोण मोठे? शिवाय त्याना न्यायकोर्टाने उघड चवकशी करून शिक्षा दिली त्याचा निषेध म्हणजे सरकारचा अपमान व न्यायकोर्टाचा उपमर्द!

पण हा संप मोडणार कसा? सरकार किती तरी मोठे आणि गिरणीचे मजूर किती तरी क्षुद्र! सरकार हे त्यांजकडे जाऊन त्यांच्याशी प्रत्यक्ष थोडेच बोलणार! म्हणून त्यानी आपल्या हस्तकांकडून गिरणीवाल्याशी बोलणे सुरू केले.

बरे गिरणीवाले तरी काय करणार ? त्याना मजुरांवर कामाला येण्याचा जुलूम थोडाच करिता येतो ! शिवाय काही गिरणीवाल्यानाहि मजुरांप्रमाणे मनातून वाईट वाटले होते. आणि ते ह्मणाले " संप फार काळ टिकणार नाही. पण त्यानी ज्या कारणा-करिता संप केला ते कारण निंद्य आहे किंवा वाईट आहे असा तरी आम्ही गिरणीच्या दारावर जाहीरनामा कसा लावावा व मजुराना परत कसे बोलवावे ? मजूर उपासमार करतो तो काही सुखासुखी करीत नाही. त्याची उपासमार होईल तोपर्यंत आमचेहि नुकसान होईल. पण प्रसंगच असा आहे की ते दोघानी मिळून सोसले पाहिजे." तात्पर्य कोणीहि गिरणीवाला संपाचा उघड निषेध करण्यास तयार होईना. तेव्हा गिरणीतील मध्यम प्रतीचे कामगार ह्मणजे जॉबर मुकादम वगैरे लोकाना फोड-ण्याचे पोलीस लोकानी प्रयत्न चालविले. पण त्यातहि फारसे यश आले नाही. शेवटी सरकारने आपली नेहमीची युक्ति केली. त्यानी एखादा ज्यू युरोपिअन एकादा पारशी गिरणीवाला हाताशी धरून संप मोडण्याच्या हेतूने मुद्दाम काही गिरण्या उघडविल्या. आणि काही मजूर जबरीने धरून गिरणी चालू असल्याचा देखावा केला. लाचलुचपत जबरदस्ती यांचा स्वाभाविक परिणाम असा झाला की गिरणीतील आतले व बाहेरचे मजूर यांची चुरस लागली. दगड फेकाफेकी व मारामारी सुरू झाली. आणि मारामारीचे निमित्त मिळताच सरकारला मध्ये पड-ण्याचा उघडच हक्क मिळाला. लगेच शहराची नाकेबंदी करण्यात आली. पोलिस व लष्करी शिपायी रस्तोरस्ती उभे करण्यात आले. धरपकड आणि खटले याना सुरवात झाली.

गिरण्या बंद झाल्याने खालच्या दर्जाचे लोक बेकार होतात आणि मोकाट सुटतात असे म्हणण्यात काही तरी तथ्यांश असेल. पण बाजार बंद झाला याचा आणि दंग्याचा काय संबंध ? पण लागलेली दुकाने उघडण्याविषयी पोलिसानी प्रयत्न केले. या कामी पोलिसला काही खाजगी लोकांचे सहाय्य झाले. हे लोक कोणत्या वर्गापैकी होते हे सांगण्याचे कारण नाही. आणि पुढे काही दिवसानी कोणास पदवी कोणास बढती कोणास सन्मान अशा रीतीने न सांगताच ते कोण होते ते लोकास दिसून आले. दंग्यात मारामारी झाली आणि गर्दी आवरेना म्हणून पोलिसानी गोळीबार केला. पण ज्या ठिकाणी मारामारी झाली नाही अशा कित्येक ठिकाणीहि केवळ गर्दीचे निमित्य म्हणून गोळीबार करण्यात आला. याचा परिणाम असा झाला की त्या पाच चार दिवसात सुमारे ७५ लोक मेले किंवा जबर जखमी झाले.

दंगे थांबून एक दोन आठवडे झाल्यावर टीकेचा गैरसमज होण्याची भीति उरली नाही असे पाहून काही काही वर्तमानपत्रानी सरकारावर टीका सुरू केली. सरकारची सर्वात मोठी चूक झाली ती गोळीबार करण्यासंबंधाने. टीकाकारांचे म्हणणे असे की गिरणी मजुरानी जास्तीत जास्त काय केले ? तर दगड मारून गिरण्याची तावदाने फोडली. पण तावदाने फोडण्याकरिता फार तर पकडून खटले

करितात. विलायतेत किंवा कोठेहि अशा अपराध्यांवर गोळ्या घालीत नाहीत. तीन वर्षापूर्वी मुंबईसच काही निमित्ताने असाच लहानसा संप झाला होता. तेव्हा रस्त्यातून गर्दी जमू लागली म्हणून पाण्याचे नळ उघडून कापडी सोट्यानी लोकांवर पाण्याचा झोत उडवून पोलिसानी गर्दी मोडली तेव्हा ती कोणास इजा न होता मोडली गेली. मग याहि वेळी तोच प्रकार का नाही केला? पण दंगेखोराना पाण्याने भिजवून काढून दंगे मोडणे याला स्वतः अधिकाऱ्याचे डोके थंड असावे लागते आणि मनात विनोदाची लकेरहि थोडीशी असावी लागते. पण नवे आलेले गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क हे तापट डोक्याचे असून विनोद हा पदार्थ त्याना माहीत नव्हता. आणि कनिष्ठ अधिकारी हे गव्हर्नर साहेबाची मनोवृत्ति नेहमी विस्तारून दाखविणारेच असतात, यामुळे गव्हर्नरसाहेबांच्या तोंडून शब्द पडण्याच्या आधीच पोलीस अधिकाऱ्यानी बंदुकीच्या फैरी झाडल्या. सरकारची दुसरी चूक दंगेखोराना शिक्षा देण्याची. एक वर्षाहून अधिक सक्त मजुरीची शिक्षा अनेक लोकांच्या वाट्याला आली! कर्मधर्मसंयोगाने म्हणजे तारीख ३१ ऑगस्ट १९०८ रोजी पॅरीसमध्येहि असाच दंगा झाला. तोहि कारखान्यातील मजुरानीच केला होता. आणि दंगा इतका भडकला होता की अधिकारी व शिपायी मिळून ६९ लोक मेले किंवा जखमी झाले! पण दंगेखोराना शिक्षा झाल्या त्या एक आठवड्यापासून चार आठवड्यापर्यंत! मुंबईस शिक्षा झाल्या त्या अँग्लो इंडियन पत्राना मात्र फार पसंत पडल्या. त्यानी त्याना smart म्ह. चुरचुरीत हे विशेषण लावले यावरून त्या वाजवीहून अधिक कडक होत्या हे सांगावयासच नको. आणि सर्वात मौज ही की संप का झाला दंगे का झाले याचे आम्हाला काही कारणच कळत नाही असा बाहाणा करण्यालाहि पोलिस किंवा अधिकारी चुकले नाहीत. सरकारचा आक्षेप हा की स्वतः मजुराना काही एवढे राजकारणाचे ज्ञान किंवा देशभक्तीची जाणीव असत नाही की एखाद्या मनुष्याला राजद्रोहाची शिक्षा झाली म्हणून त्यानी संप व दंगे करण्याला प्रवृत्त व्हावे. अर्थात् मागे राहून असले प्रकार चालविणाऱ्या काही उपद्व्यापी लोकांचेच हे काम असले पाहिजे अशी सरकारची गुप्त सूचना होती.

## (११) तुरुंगात रवानगी

असो. आता इकडे टिळकांचे काय झाले हे पाहू. शिक्षा सांगितल्याबरोबर त्याना हायकोर्टातून उतरवून मोटारीत चढविले ते थेट बी. बी. सी. आय. रेल्वेच्या कुलाबा स्टेशनात एका आडबाजूच्या सायडिंगवर स्पेशल ट्रेन उभी होती त्यात नेऊन बसविले. सर्व खिडक्या झाकून घेण्यात आल्या. आणि आगगाडी जी सुटली ती तशीच अवेळी स्टेशने घेत घेत अहमदाबादेस पोहोचली. ही बातमी कळताच टिळकांचे जावई व टिळकांचे भाचे धोंडोपंत विध्वंस हे तावडतोब अहमदाबादेस गेले. आणि तारीख २९ जुलै रोजी त्यानी अधिकाऱ्यांच्या परवानगीने टिळकांची

गाठ घेतली. अजून अपिलाला जागा होती. आणि अखेरच्या अपिलाचा निकाल लागेपर्यंत कामकाजाच्या निमित्ताने कैद्याना भेटण्याची मोकळीक असते तिचा फायदा या दोघानाहि मिळाला. खटल्याचा निकाल अभावितपणे झाल्यामुळे टिळकाना स्वतःविषयीच काय पण घरगुती व्यवस्थेसंबंधाने व वर्तमानपत्राच्या व्यवस्थेसंबंधाने आपल्या स्नेह्याना आणि आप्तइष्टमित्राना काही सांगून ठेवता आले नाही. आणि शिक्षा काळे पाण्याची असल्यामुळे टिळकाना हिंदुस्थानात ठेवतात की ताबडतोब अंदमानाला किंवा इतर कोठे नेतात याविषयी काहीच माहिती मिळण्यासारखी नव्हती. पण धोंडोपंत विध्वंस यानी टिळकांची भेट घेतली तेव्हा असे दिसून आले की अजून सरकारने त्याना खासगी पोषाखातच राहू दिले होते. जेवणाखाणाच्या बाबतीतहि सवलत त्याना मिळाली नाही. पण 'मी तुरुंगातील अन्न खाणार नाही' असा टिळकानी जेव्हा आग्रह धरला तेव्हा इस्पितळातील कैद्याना जे अन्न देतात ते त्याना देण्यात येऊ लागले. विध्वंस यांची भेट झाली तीहि तुरुंगाच्या आतील भागात नसून १० दिवस क्वारंटाईनमध्ये कैदी ठेवतात त्या भागात झाली.

पुढे तारीख २३ सप्टेंबर रोजी रात्री टिळकाना अहमदाबाद येथील तुरुंगातून हलविण्यात आले अशी बातमी पसरली. 'एका स्पेशल ट्रेनमधून त्याना मुंबईला सोमवारी पहाटे पांच वाजता आणले. लगेच बंदरात हार्डिंज नावाची आगबोट उभी होती तीत बसविण्यात आले. आणि आगबोट तावडतोब चालू झाली. बोटीच्या कप्तानाला हुकूम दिला तो मोहोरबंद पाकिटात होता यामुळे त्यालाहि आगबोट कोठे जावयाची याची नक्की बातमी नांगर उचलताना नव्हती.' बंदरातून बोट बाहेर पडताच त्याने पाकीट उघडल्यावर त्याला ती कळलीच. पण सांगण्याचे तात्पर्य इतकेच की बोटीच्या कप्तानापासूनहि ही गोष्ट गुप्त राखून ठेवण्यात आली होती. तरी पण सरकारी लखोट्याच्या लाखलोट्यातूनहि गुप्त बातमी अगदीच झिरपल्याशिवाय राहात नाही. मात्र ती खचित नसल्यामुळे तर्क सुरू होतात. टिळक स्पेशल ट्रेनने आले आणि त्याना घेऊन आगबोट मुंबई बंदर सोडून गेली इतके लोकाना कळल्यावर टिळकांच्या काळेपाण्याचे ठिकाण कोणी रंगून ठरविले कोणी अंदमान ठरविले तर कोणी मंडाले ठरविले. पण काही लोक असेहि होते की त्याना टिळकाना हिंदुस्थानाबाहेर नेले ही गोष्ट खरीच वाटेना! वकिलाला कोठेच मज्जाव नसतो म्हणून सालिसिटर राघवय्या भिमजी यानी लगेच सरकारला लिहिले की 'अपीलाच्या कामासाठी आम्हाला टिळकाना भेटावयाचे आहे. तरी ते कोठे आहेत ते आम्हाला कळवा व भेटण्याची परवानगी द्या.' पण त्याला सरकारने इतकेच उत्तर दिले की 'टिळकांचा ठावठिकाणा तूर्त प्रसिद्ध करता येत नाही. ते जे कोठे जाऊन राहावयाचे तेथे गेल्यावर तुम्हाला कळविण्यात येईल.' तथापि वकिलाचा बाण अगदीच काही फुकट गेला नाही. लवकरच मुंबई सरकारने असे प्रसिद्ध केले की "हायकोर्ट फुलबेंचच्या शिफारशीप्रमाणे तिसऱ्या गुन्ह्या-

करिता टिळकाना १००० रुपये दंड करण्यात आला होता तो माफ केला आहे. शिवाय टिळकांची शिक्षा काळेपाण्याची होती ती तितक्याच मुदतीची पण साध्या कैदेची केली आहे." हिंदुस्थानाबाहेर नेले तरी काळेपाणी नाही याचा अर्थ कैद अंदमान बेटात नाही इतकाच करावयाचा. परंतु साधी कैद केली ही मात्र मेहरबानगी खरी! कारण काळेपाण्याच्या कैद्याला प्रथम बरेच दिवस सक्तमजुरीच्या कैद्याप्रमाणे वागविण्यात येते. पण अहमदाबादच्या तुरुंगातहि टिळकाना सक्त मजुरी करावी लागली नाही. आणि या हुकमाने तर ती पुढे सर्व मुदतीपर्यंत वाचली.

टिळकाना साबरमतीहून तारीख २३ सप्टेंबरला हलविले असे वर सांगितले आहे. पण खरोखर ही बातमी दहाबारा दिवस उशीराची होती. कारण तारीख १० रोजीच त्याना अहमदाबादेहून हलविले आणि तारीख २२ रोजी त्याना रंगून येथे स्पेशल ट्रेनमध्ये बसविण्यात आले. त्या वेळी त्यांचा पोषाख नेहमीचा म्हणजे अंगरखा पागोटेच होते. टिळक येणार ही बातमी आगाऊ तेथे समजली असावी. कारण ते गाडीत बसण्याच्या सुमारास दोनएक हजार लोक स्टेशनपाशी जमले आणि त्यानी टिळकाना ओळखून त्यांचा जयजयकार केला! ही बातमी मुंबई गॅझेटच्या बातमीदारानेच प्रसिद्ध केली. "टिळक रंगून सोडून निघाले तेव्हा शांत व समाधानवृत्तीत दिसले" असे ह्या बातमीदाराने लिहिले आहे.

## (१२) मुंबईतले अपील

शिक्षा सांगण्याचे वेळी टिळकानी अर्ज दिला असता फुलबेंचपुढे मांडण्याचे मुद्दे आम्ही राखून ठेवीत नाही असे न्यायमूर्तीनी सांगितले असल्याचे पूर्वी आलेच आहे. तथापि या वरिष्ठ न्यायासनाकडे अपील करण्याचा स्वतंत्र हक्कहि असल्यामुळे टिळकांच्या सहीचा अपील अर्ज ता. ७ ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आला. या ४० कलमी अर्जात ज्या तक्रारी मांडण्यात आल्या त्यातल्या पुष्कळशा खटला चालू असताच उपस्थित करण्यात आलेल्या होत्या. परंतु ज्यूरीला खटला समजावून देताना टिळकांच्या मते न्यायमूर्तीनी ज्या चुका केल्या त्याचीहि एक याद अर्जात समाविष्ट केली होती. या अर्जाची सुनावणी ता. १८ ऑगस्ट रोजी फुलबेंचपुढे झाली. तेव्हा न्यायमूर्ती स्कॉट व न्यायमूर्ती बॅचलर असे चौकशीला बसले होते. टिळकांतर्फे बॅरिस्टर बॅप्टिस्टा दादासाहेब करंदीकर व सॉलिसिटर राघवय्या हे काम चालवीत होते. प्रथम टिळकांचा अर्ज चौकशीला घ्यावाच की नाही याचा विचार झाला. त्याचा निकाल अस्तिपक्षी लावून न्यायमूर्तीनी विरुद्ध पक्षाला नोटीस काढली. या नोटिशीप्रमाणे फिरून ता. २५ ऑगस्ट रोजी बॅ. बॅप्टिस्टा यांची तक्रार ऐकून घेऊन दुसरे दिवशी मुख्य न्यायमूर्तीनी नोटीस कायम केली. नंतर ता. २ सप्टेंबर रोजी नोटिशीला उत्तर देण्याकरिता सरकारी बॅरिस्टर रॉबर्टसन हे हजर झाले. बॅ. बॅप्टिस्टा यानी आपली तक्रार सर्व लिहून

आणली होती तीच तोंडाने सांगितली. त्यावर रॉबर्टसन यानी द्यावयाचे ते उत्तर दिले. एक दोन मुद्यावर न्यायमूर्तीनी रॉबर्टसन याना अडविल्यासारखे दिसले. बॅ. बॅप्टिस्टा यानी थोडक्यात उत्तर दिल्यावर त्या दिवशीचे काम संपले. फिरून तारीख ८ सप्टेंबर रोजी कोर्ट भरल्यावर न्यायमूर्तीनी असा निकाल दिला की फक्त एकाच मुद्याचे उत्तर देण्यापुरती आम्ही सरकारला नोटीस काढली होती. पण त्या मुद्द्याची उभयपक्षी सुनावणी झालेली ऐकून आम्ही असा निकाल देतो की ती नोटिसहि आम्ही रद्द करतो. तथापि आम्हाला असे दिसून आले आहे की तीन आरोपापैकी पहिला आरोप निश्चित पण दुसरा व तिसरा यापैकी कोणता तरी एकच पक्का घेतला जाईल व दुसरा घेतला जाणार नाही असे सरकारतर्फे चौकशीचे वेळी स्पष्ट सांगण्यात आले होते. पण अखेर तीनहि आरोप पक्के व शाबीत धरून तीनहि करिता निरनिराळ्या शिक्षा देण्यात आल्या आहेत. म्हणून ही गोष्ट बेकायदा नसली तरी मूळ संकेताविरुद्ध घडली. या करिता आम्ही असे सुचवितो की सरकाराने आपल्या अधिकारात तिसऱ्या गुन्ह्याची शिक्षा माफ करून दंड परत द्यावा. या शिफारशीचा पुढे सरकाराने विचार केला व तो मान्य करून टिळकाना दंड परत दिला.

अशा रीतीने या खटल्यातील मुंबईत होणारें काम संपले. पण पुढे कोणी तरी विलायतेत जाऊन पुढील तजवीज केली पाहिजे असे टिळकांच्या मित्रमंडळीनी आपसात ठरविले. आणि दादासाहेब खापर्डे यानी या कामाकरिता विलायतेत जावे असे योजून तारीख १५ ऑगष्ट १९०८ रोजीच्या विलायतच्या मेल बोटीने त्यांची रवानगी करण्यात आली. ते विलायतेत जाऊन पोहचण्यापूर्वीच सर हेन्री कॉटन यानी पार्लमेंटात या प्रकरणावर प्रश्न विचारण्यास सुरवात केली होती. डॉक्टर रुदरफोर्ड हे तर सुरतेच्या राष्ट्रीय सभेत स्वतः हजर होते. त्यानीहि काही प्रश्न विचारले. प्रश्न विचारणारांची गर्भित सूचना अशी होती की गुन्हा केवळ राजकीय स्वरूपाचा म्हणून टिळकाना माफी करून सोडून देण्यात यावे. त्यावर सरकारतर्फे बुकॅनन यानी नकार दिला. दरम्यान खटल्याचे सर्व कागद, विशेषतः न्यायमूर्ति दावर यांचे खटल्याच्या अखेरचे उद्गार, विलायतसरकारच्या हाती पडल्यामुळे कोणी काही प्रश्न विचारले तर टिळक हे एक भयंकर राजद्रोही गृहस्थ आहेत हे दाखविण्याला दावर यांच्या उद्गारातील उतारेच वाचून दाखविण्यात येत. कसेहि असो. खटल्यातील महत्त्वाचे कागद छापून पार्लमेंटच्या सभासदाना मिळावे अशी पुष्कळानी इच्छा व्यक्त केली. पण सरकारने ती गोष्ट मान्य केली नाही. नंतर प्रिव्हि कौन्सिलपुढे अपील दाखल होऊन नामंजूर झाले. त्यानंतर पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहामध्ये टिळकांच्या सुटकेची खटपट करण्यात आली. अखेर राजेबादशाहा यानाहि अर्ज झाले. पण हे सर्व प्रयत्न व्यर्थ कसे झाले याची माहिती पुढील भागात दिलेल्या निवडक पत्रांवरून दिसून येणारी असल्यामुळे ती आम्ही येथे वेगळी देत नाही.

## ( १३ ) १८९७ व १९०८-साम्य व विरोध

सन १९०८ साली झालेला टिळकांवरील खटला हा राजद्रोहाच्या आरोपावरचा दुसरा खटला. दोन्ही खटले केसरीतील लेखावरच झाले. पण दोन्ही खटल्यातील आक्षिप्त सर्वच लेख काही टिळकानी लिहिलेले नव्हते. १८९७ साली केसरीइतका खप दुसऱ्या कोणत्याहि मराठी पत्राचा नव्हता. १९०८ सालीहि तीच स्थिति कायम होती. दोन्ही खटल्याच्या पाठीमागे चित्रातील भूमिकेप्रमाणे दडपशाही अत्याचार व असंतोष यांचा कृष्णवर्ण एकजात सारविलेला होता. पहिल्या खटल्याच्या वेळेस प्लेगच्या अधिकाऱ्यांचा जुलूम आणि दुष्काळपीडेने गांजलेल्या लोकांची दुःखे यानी वातावरण भरून गेले होते तर दुसऱ्या खटल्याच्या वेळी कर्झनशाहीचे दुष्परिणाम लोकांच्या मनात डाचत असून बंगालच्या फाळणीने असंतोषाची शीग भरून गेली होती. सर्व देशात लोकांच्या बाजूने जागृति आणि ती शमविण्याकरिता सरकारच्या बाजूने दडपशाही असे संकीर्ण युद्ध झाले होते. प्लेगच्या अधिकाऱ्यांचा जुलूम ही बाब पुष्कळशी स्थानिक स्वरूपाची होती. पण १९०८ सालचा असंतोष सर्व देशभर सारखाच पसरला होता. आणि क्रिया प्रतिक्रिया ही सर्व देशभर सुरू होती. पण या दोन्ही खटल्यांच्या परिस्थितीत मुख्य निर्णायक गोष्ट खून हे होत. रँड साहेबांचा खून न होता तर १८९७ सालचा टिळकांवरील खटला झाला नसता. तसेच बंगाल्यात बॉंबगोळ्यांचे अत्याचार न घडते तर १९०८ सालचा खटला झाला नसता. शाब्दिक राजद्रोहाकरिता सरकाराने इतक्या तातडीने खटले भरले नसते. पण दारूच्या कोठारात ठिणगी पडावी त्याप्रमाणे मनुष्याच्या रक्तबिंदूने भडका उडविला. दोन्ही खटल्यात टिळकाना दोषी ठरविणाऱ्या ज्यूरीत ७:२ या प्रमाणानेच मतभेद झाला. दोन्ही खटल्यात ज्यूरीतले सात गोरे व उरलेले दोन काळे लोक अशीच वर्गवारी पडली. दोन्ही खटल्यात लोकमताने टिळकाना निर्दोष ठरविले व खटले केल्याबद्दल सरकारास दोष दिला. दुसऱ्या खटल्यात सहा वर्षांची शिक्षा लोकाना अर्थातच जबर वाटली. पण १८९७ च्या खटल्यातील दीड वर्षांची शिक्षाहि तेव्हाच्या परिस्थितीप्रमाणे जबरच होती यात शंका नाही.

या दोन खटल्यातील साम्यतेच्या गोष्टी वर दिल्या आहेत. पण विषमतेच्या अशाहि काही गोष्टी आहेत. पहिल्या खटल्यात टिळकाना जामिनावर सोडण्यात आले. पण दुसऱ्यात जामिनावर सोडण्यात आले नाही. पहिल्या खटल्यात सुरुवातीला टिळकांशी वागण्याचे सरकारचे धोरण किंचित् सौम्य होते. दुसऱ्यात प्रथम पासूनच ते उग्र असल्याचे दिसून आले. पहिल्या खटल्यात प्रसिद्धपणे टिळकांच्या बचावाकरिता वर्गणी देशभर गोळा करण्यात आली. १९०८ साली मुंबई इलाख्यातहि जाहीर रीतीने फंड उभारण्यात आला नाही. याचे कारण असे की टिळकांविषयी मनातून लोकांची सहानुभूति

सामान्यपणे पूर्वीसारखीच असली तरी काही काही बाबतीत विशेष फरक पडला होता. पहिल्या खटल्याच्यां वेळीं नेमस्त पक्षाच्या काही थोड्या लोकानीहि डिफेन्स फंडाला वर्गणी दिली होती. पण दुसऱ्या खटल्याच्या वेळी त्यानी गुप्तरूपानेहि वर्गणी दिली नाही. याचे मुख्य कारण या खटल्यापूर्वी दोनचार वर्षे नेमस्त व जहाल पक्षातील वाद भांडणे व शिव्यागाळी विकोपाला जाऊन अखेर सुरतेची राष्ट्रीय सभा मोडल्याने दोन्ही पक्ष कट्टे वैरी बनले होते. बंगाल्यात अत्याचार सुरू झाल्यामुळे नेमस्त पक्षानेहि सरकाराप्रमाणेच जहाल पक्ष व अत्याचारी पक्ष यांची साखळी मनातून जोडली होती आणि टिळकांवरील खटला हा अप्रत्यक्षपणे अत्याचारी लोकांवरीलच खटला असे मानून वर्गणी देण्याच्या रूपानेहि या खट-ल्याशी संबंध ठेवणे म्हणजे अत्याचाराना सहानुभूति दाखविण्यासारखेच आहे असे त्यानी मानले. अशा रीतीने टिळकांविषयीची सहानुभूति मुळातच नष्ट झाल्यामुळे नेमस्तानी सरकाराला भिऊन या खेपेस वर्गणी दिली नाही असे म्हणण्यापर्यंत पाळीच आली नाही. कारण ही पाळी काही अंशी जहाल किंवा राष्ट्रीय पक्षा-तल्या काही थोड्या लोकांवरहि आली होती. नेमस्तांप्रमाणे टिळकांवर रुष्ट नस-णाऱ्या किंबहुना त्यांच्याशी सहानुभूति बाळगणाऱ्या लोकांमध्येहि काही लोक असे होते की प्रासिद्धपणे वर्गणी जमाविली असती तर त्यानी पूर्वीप्रमाणे प्रसिद्धपणेच काय पण सरकाराला कळेल या भीतीने वर्गणी दिली नसती. यामुळे दुसऱ्या खट-ल्यातील खर्च टिळकाना खासगत करावा लागला. कर्ज काढून भर करावी लागली. व मदत झाली ती अगदी जवळच्या स्नेहीमंडळीकडूनच झाली.

पहिल्या खटल्यात टिळकांच्या बचावाकरिता बॅरिस्टर देण्यात आले होते. दुसऱ्या खटल्यात टिळकानी आपला डिफेन्स आपणच दिला. १८९७ साली टिळकांचा खटला आपणाला चालवावयाला मिळाला तर हवा असे अनेक तरुण देशी बॅरिस्टराना व वकिलाना वाटत होते. व काही अंशी त्याकरिता स्पर्धाहि सुरू होती. १८९७ साली देखील मुंबईच्या कोणत्याहि युरोपिअन बॅरिस्टराने टिळकांचा खटला चालविला नसता असे वाटते; पण १९०८ साली याविषयी संशय उर-ण्यास जागाच नव्हती. व याचे प्रत्यंतर हेच की १९०८ चा खटला चालविण्याला नामांकित असा हिंदी वकील बॅरिस्टरहि पुढे आला नाही. तरुण पिढीपैकी काही माणसे पुढे आली आणि बॅ० बॅप्टिस्टा सॉलिसिटर राघवय्या वगैरे गृह-स्थानी टिळकांच्या खटल्याचे काम पतकरून पुष्कळच धैर्य दाखविले यात शंका नाही. परंतु एकंदर देशी बॅरिस्टर व वकीलवर्ग भीतीने गांगरून दडपून गेला होता यात शंका नाही. दरोड्याच्या खुनाच्या खटल्यात कोणी वकीलपत्र घेतले तर आरोपीच्या दुर्गुणांचा वास त्याला आगाऊ लागलेला आहे किंवा पुढे लावून घेण्याची त्याची इच्छा आहे असे अधिकारी वर्ग समजत नाही. पण राज-द्रोहाच्या खटल्यात आरोपीच्या बचावाला जो वकील पुढे येतो तो द्रव्यलाभापेक्षा काही अंशी कीर्तिलाभाकरिता व काही अंशी सहानुभूतिने पुढे येतो असेच अभि-

कारी मानतात. व या पुरोगामी वकिलावर सरकारचीच काय पण न्यायाधीशाचीहि इतराजी होते असा अनुभव आहे. हे वर्म माहीत असल्यामुळे आणि १८९७ च्या राजद्रोहात अत्याचारांच्या भूमिकेची भर पडल्यामुळे या वेळी कोणीहि देशी वकील बॅरिस्टर पुढे आला नाही. आणि बॅप्टिस्टा वगैरे जे पुढे आले त्याना बरेच दिवसपर्यंत धंद्यात नुकसान सोसावे लागले. बॅरिस्टर बॅप्टिस्टा व टिळक यांचा पूर्वीचा परिचय फारसा नव्हता. तथापि संकटकाळी ते टिळकांवरील भक्तीमुळे पुढे आले. मुंबई हायकोर्टातील कामकाजात त्यानी पुष्कळच मेहनत केली. इतकेच नव्हे तर त्यांचे उतराई होण्याकरिता टिळक तुरुंगात असता केसरी कचेरीने त्याना जी रक्कम पाठविली तीहि टिळकांच्या कुटुंबाच्या नावाने त्यानी पुढे परत केली. बॅप्टिस्टा यांचे हे धैर्य व औदार्य पाहून टिळकाना त्यांच्याविषयी प्रेमादर व टिळकांच्या पक्षाला त्यांच्याविषयी कृतज्ञताबुद्धि वाटू लागली. पुढे टिळक सुटून आल्यानंतर त्यानी केलेल्या होमरूल लीगच्या चळवळीत बॅप्टिस्टा यानी प्रथम प्रथम प्रमुख भाग घेतल्याने टिळकांचा व त्यांचा स्नेह वृद्धिंगत झाला आणि विलायतेस चळवळ करण्याकरिता टिळकानी बॅप्टिस्टा यांसच प्रथम पाठविले.

वर्गणी देणे व वकिली मदत करणे एवढ्याच गोष्टीत या दोन खटल्यांच्या प्रसंगात फरक पडला असे नाही. तर टिळकांशी इतर रीतीने वागण्यातहि काही लोकांच्या मनोवृत्तीत फरक दिसून आला. सुरतेच्या राष्ट्रीय सभेनंतर टिळक मुंबईस गेले असता त्यांचे परमस्नेही दाजीसाहेब खरे यांच्या घरी पूर्वीप्रमाणे उतरेनासे झाले व तसे उतरण्याविषयी खरे यानीहि त्याना आग्रह केला नाही! टिळकानी तेथपासून सरदारगृहात उतरण्याची सुरवात केली. एका अर्थाने हे योग्यच होते. कारण टिळकानी खासगी घरी उतरावे तर त्यांच्याकडे गुप्त पोलिसापासून अत्याचारी माथेफिरू लोकांपर्यंत हरएक पेशाचे ढंगाचे मताचे व स्वभावाचे लोक भेटीला येणार. तसेच स्वतःच्या काय पण इतरावरील राजद्रोहाच्या खटल्यात मदत करण्याला टिळक मुंबईस जाणार. अर्थात् असल्या लोकांचा व असल्या कामाचा उपसर्ग खरे हे परम मित्र झाले म्हणून त्याना किंवा इतर कोणा मित्रालाहि का लावावा असा विचार टिळकानी केला. सरदारगृहात उतरण्याला दोन गोष्टी अनुकूल. आधी एक तर ती जागा सार्वजनिक स्वरूपाची. तेथे कोण उतरला आला गेला याला कोणताच विशेष अर्थ किंवा महत्त्व नाही. पोलिसानी सरदारगृहात आल्या गेल्याची नोंद ठेवली व न ठेवली दोन्हीला किंमत सारखीच. इतका तो विधि नित्यक्रमातला. शिवाय सरदारगृहाचे मालक विसुभाऊ साळवेकर हे मनाचे खंबीर असून सरदारगृहात टिळकानी उतरण्यासंबंधी त्यानी केव्हाहि यत्किंचितहि अनास्था किंवा नापसंती दर्शविली नाही. इतकेच नव्हे तर सरदारगृह हे तुमचे व तुमच्या राष्ट्रीय पक्षाचे घरच आहे असे समजा आणि इतकीहि शंका किंवा भीड न धरता येथे सरास उतरत चला असे त्यानी टिळकाना आस्थापूर्वक कायमचेच सांगून टाकले होते. पहिल्या खटल्यानंतर टिळक राजद्रोही म्हणून सरकारच्या

इतराजीतले या त्यांच्या लौकिकामुळे त्यांच्या घरी मुलगी देणे किंवा त्यांच्या घरची मुलगी करणे या गोष्टीला नाक मुरडणारा किंवा मागे घेणारा एखादा सोवळा गृहस्थ आढळण्याइतकी मजल गेलेली होतीच. तथापि १९०८ च्या खटल्याच्या सुमारास अशा लोकांची संख्या फारच वाढली होती.

दुसऱ्या खटल्यात टिळकानी डिफेन्सचे काम स्वतः चालविले. याचे कारण एकतर मुंबईतील कोणी चांगला बॅरिस्टर काम चालविण्यास कबूल नव्हता. दुसरे असे की बाहेरून कोणी मोठा बॅरिस्टर आणण्याइतके पैसे टिळकांजवळ या वेळी नव्हते. १८९७ सालापेक्षा या वेळी त्यांची सांपत्तिक स्थिति बरी होती. परंतु १९०१ पासून ताईमहाराज खटला सुरू झाला. त्यातच फौजदारी खटलाहि झाला. यामुळे केसरीच्या शिलकी पडणाऱ्या थोड्याशा पैशापैकी बराच भाग या कामी खर्च झाला होता. आणि सर्वांत मुख्य कारण हे की ज्या खटल्यात सुटण्याची आशा नाही त्या खटल्यात कर्ज काढून हजारो रुपये घालून, बॅरिस्टर द्यावा आणि त्याने कसा तरी डिफेन्स द्यावा यात टिळकाना काहीच स्वारस्य वाटले नाही. मध्यंतरी भाला पत्रावर खटला झाला त्यात न्या. दावर हे बॅरिस्टर दिले होते. त्यानी काम काही फुकट चालविले नाही. परंतु अशीलाची सुटका होण्याकरिता म्हणून 'भालाकार हे मूर्ख आहेत त्यानी लेख लिहिलेले उघडच इतके बेअकली आहेत की त्यांचा परामर्ष न्याय-कोर्टाने कडक रीतीने घेण्याचे कारण नाही असा डिफेन्स दिला. आपल्याच बॅरिस्टरा-कडून सर्वांदेखत मूर्खअर्धमूर्ख म्हणून घेण्यापेक्षा आपले काम स्वतःच चालवावे मनाला योग्य वाटेल ते स्पष्ट सांगावे आणि मग जे काय व्हावयाचे ठरले आहे ते होतच आहे असा विचार टिळकानी केला असल्यास त्यात वावगे ते काय ? आपला खटला आपण चालविण्यात तोटा असतो तसा काही फायदाहि असतो. वकिलाच्या अंगी कायदेबाजपणा किंवा मनामिळाऊपणा अधिक असला तरी त्याच्या शहाण-पणापुढे आपल्या शहाणपणाला हार खावी लागते. आणि आपल्या युक्तिवादाची युक्तता त्याला पटवून देण्याला जे श्रम लागतात ते स्वतः खटला चालविण्यातच खर्ची घातले तर अधिक फलप्रद न झाले तरी निदान अधिक श्रेयस्कर ठरतात. राजकीय स्वरूपाच्या खटल्यात, विशेषतः एकंदर लोकपक्षीय वर्तमान-पत्रांच्या स्वातंत्र्याकरिता लढण्याचा प्रसंग असतां, राजकारणी पुरुषाने स्वतःचा खटला चालविला तर स्वतःच्या बचावाबरोबर त्यातल्या त्यात ती एक राजकीय चळवळ केल्याचेच श्रेय मिळते. राजकारणाच्या खटल्यात वकिलाने आरोपीचा बचाव करावयाचा म्हणजे एका हाताने ढाल व एका हाताने तरवार न धरिता यजमानाने तरवार व नोकराने ढाल धरून लढावे असा प्रकार होतो. राजकारणा-तली तरवार आपण चालवावी तर न्यायकोर्टातली ढालहि आपणच धरावी हेच अधिक योग्य.

या खटल्याची दहशत लोकाना इतकी बसून गेली होती की खटला चालू असता टिळकांचे कागदपत्र छापून देण्याला कोणीहि मदत करीना. १८९७

खाली खटला चालू असता केसरी मराठ्याच्या दुय्यम संपादक मंडळीनी व मुंबई-च्या मित्रमंडळीनी मिळून एक दैनिक वर्तमानपत्र 'जादा केसरी' या नावाने काढले होते. खटल्याची हकीकत लोकाना रोजच्यारोज समजण्याला मुंबईत आणि विशेषतः बाहेरगावी या पत्राचा फार उपयोग झाला. असे एक दैनिक पत्र या खटल्याचे वेळीहि काढण्याची टिळकाना आणि मित्रमंडळीना इच्छा होती. पण या खटल्याचे स्वरूप वेगळे असल्याने ती गोष्ट घडून आली नाही. टिळकांची इच्छा अशी होती की सर्व खटल्याची हकीकत नसली तरी त्यांचे रोज कोर्टात जे भाषण होई तेवढ्याची छापील हकिकत रोज लोकाना वाचावयास मिळावी. आणि याकरिता एक यूरोपिअन शॉर्टहँड रायटर या कामी मुद्दाम खर्च करून नेमण्यात आला होता. तो आपणाकडून तत्परतेने भाषण उतरून घेऊन त्याप्रमाणे लिहून देई. पण रोजच्यारोज छापून मिळणे मुष्किलीचे झाले. कोणी छापखानदार सवड नाही म्हणून सांगे, तर कोणी इतर कामाची सबब सांगे. आणि कोणी पैशात मोडले असे भासविता यावे म्हणून फारच जबर आकार सांगत. नाही म्हणावयास गिरगावातील जुन्या पोस्टाला लागूनच असलेल्या एका गुजराथी छापखानेवाल्याने हौसेने मदत करण्याचे कबूल केले. पण ते काम त्याच्या अवाक्याबाहेरचे ठरले. आणि एका दिवसाच्या प्रयत्नानंतर ती कल्पना सोडून द्यावी लागली. दुसरीहि एक अडचण स्वतंत्र होतीच. ती अशी की टिळकांचे भाषण नेमक्या मोजक्या शब्दानी होत नसे. लघुलेखकाने सर्व जसेच्या तसे उतरून दिल्यास त्यात बरेच ठिकाणी काट मारून पुनरुक्ति कमी करून सांधे जोडावे लागत. शिवाय टिळक उतारे वाचून दाखवीत ते तपासून घेण्याला त्यांच्या जवळची पुस्तके मिळत नसत. कारण अखेर दिवसपर्यंत त्याना त्यांचा केव्हा उपयोग लागेल याचा नेम नव्हता.

## (१४) टिळक केसचे पुस्तक

टिळकांचा खटला चालू असता छापखानेवाल्यांकडून जी मदत मिळाली नाही किंवा मिळूनहि कदाचित् इतर कारणामुळे फुकट गेली असती, ती खटल्या-नंतर खटल्याचे पुस्तक काढण्याचे बाबतीत इंदुप्रकाश छापखान्याचे मालक श्री. दामोदर सावळाराम यंदे यांजकडून मिळाली. पूर्वी १८९७ च्या खटल्याचे पुस्तक बॅ. केशवराव देशपांडे व ॲडव्होकेट सेटलूर यानी प्रसिद्ध केले तशा तऱ्हेचे पुस्तक या खटल्याचेहि प्रसिद्ध करावे असे केळकर यानी योजिले. आणि यंदे यानी त्याना हे पुस्तक सर्वस्वी छापखान्याच्या जबाबदारीवर खर्च करून छापवून देण्याचे कबूल केले. यंदे यांचे हे दोन प्रकारचे धाडस होते. पुस्तक राजद्रोहाच्या खटल्याचे असल्यामुळे सरकारची इतराजी होण्याचा संभव. आणि पुस्तक अदमासाप्रमाणे न खपले किंवा एकदम सरकारजमाच झाले तर पैशाचे नुकसान ठेवलेलेच. तरी टिळक-केळकरांचा स्नेह स्मरून त्यानी हे दोन्ही प्रकारचे धाडस आनंदाने केले. खटल्याची हकिकत घेण्याकरिता यूरोपिअन शॉर्टहँड रायटर केसरी कचेरीने नेमला

होता ती हकिकत आणि कोर्टाकडून घेतलेल्या 'सहीशिक्याच्या नकला अशी पुस्तकाची सर्व तयारी सिद्ध होती. शॉर्टहँड रिपोर्टराकडून येवढा प्रचंड भारा आला की तो जवळ जवळ निम्मा अधिक छाटावा लागला व सांधेजोड करणे हे मोठे बिकट काम होऊन बसले. तसेच वर्तमानपत्रांच्या अभिप्रायांचा मजकूर इतका पुष्कळ व इतका चांगला होता की तो छाटण्याचा मोहहि आवरेना. यामुळे या खटल्याचा ग्रंथ मोठ्या आकाराच्या साडे चारशे पानांचा झाला. तथापि थंदे यांच्या साहाय्यामुळे तो खटल्याच्या निकालापासून अवघ्या सात आठवड्यात म्हणजे ता. १५ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला! या अल्पावधीत येवढा ग्रंथ प्रसिद्ध करणे हे काम संपादक व छापखानेवाले या उभयतानाहि फार दगदगीचे झाले. पण खटल्याची हकीकत साधार व समग्र वाचण्याची लोकाना उत्कंठा फार यामुळे श्रमाकडे कोणीच पाहिले नाही. पण योगायोग असा की पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे म्हणजे एकंदर ग्रंथाच्या अखेरचे प्रूफ पाहून केळकर हे छापखान्याची पाहिरी उतरतात तोंच हायकोर्टाच्या बेलिफाने त्यांच्यावर एक नोटीस आणून बजाविली. ही नोटीस पुढे झालेल्या बेअदबीच्या खटल्याची होती.

## (१५) खटल्यातून निर्माण झालेला खटला

ता. २२ जुलै रोजी टिळकांच्या खटल्याचा निकाल लागला. त्याच्या पुढच्या मराठ्याच्या म्हणजे २६ जुलैच्या अंकात केळकरानी एकंदर खटल्याचे समालोचन करून पाच कॉलमचा एक अग्रलेख लिहिला. या लेखाकडे हायकोर्टाचे लक्ष जाऊन त्यानी हायकोर्टाचा अपमान केल्याचा खटला करण्याचे ठरविले. पण केळकरांच्या या प्रसंगात दुसरा एक वाटेकरी होता. ते ज्ञानप्रकाशाचे मुद्रक गोखले व संपादक नटेश आप्पाजी द्रवीड हे होत.

मराठ्यातील अग्रलेख लिहिताना केळकरांची मनःस्थिति काय असेल याची कल्पना सहजच होईल. पण ज्ञानप्रकाशातील लेखकाचीहि मनःस्थिति जवळ जवळ तशीच झालेली होती हे दोन्ही पत्रातील अग्रलेख वाचणारास दिसून येईल. टिळकांवर खटला होण्यापूर्वी सहाच महिने सुरतेची राष्ट्रीय सभा उधळली गेली होती. आणि पुढील चार महिन्यात त्याआधीच्या चार वर्षाप्रमाणे ज्ञानप्रकाशाने टिळकांवर टीकेचा व अपशब्दांचा भडिमार चालविला होता. तथापि टिळकांवर खटला झाला ही गोष्ट ज्ञानप्रकाशकारांसहि पसंत नव्हती. शिवाय न्या. मू. दावर यानी टिळकाना उद्देशून केलेले अखेरचे भाषण आणि दिलेली जबर शिक्षा ही पाहून टिळकांच्या शत्रूंचेहि मन कळवळले असल्यास नवल नाही. " पूर्वी रानडे वारले त्या वेळी महाराष्ट्रातील लोकाना जसे दुःख झाले तसेच हा देशाभिमानी पुरुष काळेपाण्यावर गेल्याने झाले. किंबहुना अधिकच झाले. केसरीवर खटला झाला यात कोणासच आश्चर्य वाटले नाही. खटल्याचा निकाल लागण्यापूर्वी तीन दिवस टिळकाना काळेपाण्यावर नेण्याकरिता एक गलबत बंदरांत नांगरून ठेव-

त्याची बातमी आम्ही ऐकली होती. अपरात्री खटला संपवून खटल्याचे सात अंकी नाटक न्यायमूर्तींनी खलास केले व सरकारची सोय पाहिली. टिळकानी कोर्टापुढील आपल्या भाषणात मुद्रणस्वातंत्र्याची कड घेऊन मोठीच देशसेवा केली. न्यायमूर्तींचे भाषण सरकारी वकिलाच्या भाषणाच्या तोडीचे झाले " अशा आशयाचा ज्ञानप्रकाशातील लेख होता व तोहि खटल्याचा निकाल झाल्याच्या तिसऱ्याच दिवशी लिहिला असल्याने लेखकाची ताजी तीक्ष्ण भावना त्यात बरोबर उतरली असल्यास तीत नवल नाही.

शुक्रवारचा हा ज्ञानप्रकाश निघाल्यावर पुढे दोन दिवसानी निघणाऱ्या मराठ्यात काय लेख येतो याकडे सर्वांचेच लक्ष वेधले. ज्ञानप्रकाशाचा लेख वाचून द्रविड यांच्या काही स्नेह्यानी तो फार कडक लिहिला गेला अशी टीका त्यावर केली. आणि मराठ्यामध्ये अर्थात् असाच कडक लेख येणार अशी सर्वांची अपेक्षा होती. तथापि ज्ञानप्रकाशचा लेख प्रसिद्ध होऊन गेला तरी केळकरांचे हातून एकादा भलता शब्द लिहिला न जावा व कोर्टाच्या बेअदबीच्या खटल्याचे नसते संकट तरी आणखी केळकरांवर येऊ नये अशी प्रतिपक्षाना देखील इच्छा उत्पन्न झाली. सांगण्यासारखीच या बाबतीत एक आठवण आहे ती अशी. शनवार ता. २५ रोजी संध्याकाळी मराठा पत्राची शेवटची प्रुफे वाचून केळकर गायकवाड वाड्यातून बाहेर पडून थोडे लांब जातात तोच समोरून नटेशराव द्रवीड व त्यांच्या बरोबर श्रीनिवासशास्त्री केळकराना येऊन भेटले. ते म्हणाले " आम्ही तुमच्या कडेच चाललो आहो. कारण की उद्या मराठा निघणार. त्यात खटल्यावर लेख येणार. त्यात डोके तापून लिहिलेला मजकूर असणार. पण विनाकारण वावगे शब्द घालून संकट ओढवून घेण्यात काय अर्थ ? तरी आमचा तुम्हाला स्नेहभावपूर्वक असा आग्रह आहे की याच पावली परत चला. मराठ्यातील लेखाची प्रुफे आम्ही पाहणार व शब्द फाजील कडक वाटतील ते काढून टाका असे तुम्हाला सांगणार." अर्थात् हा सद्बुद्धिप्रेरित आग्रह अमान्य करणे किंवा त्याचा भलताच अर्थ करणे अशक्य होते. तेव्हा केळकर शास्त्री व द्रविड हे गायकवाडवाड्याच्या अंगणात जाऊन बसले व तेथे सर्वांनी मिळून दुसऱ्या दिवशी मराठ्यात येणारा लेख समग्र दोनदोनदा वाचला. आणि " आता कोणचे शब्द काढावयाला मला सांगता ते सांगा " असे केळकर यानी शास्त्री याना विचारले. तेव्हा क्षणभर तटस्थ होऊन ते म्हणाले ' It would be a sacrilege to alter one word of this '– " या तुमच्या लेखातील एक शब्दहि बदलणे अपवित्रपणाचे किंवा औचित्याला उपमर्दकारक होईल. " असे म्हणून समाधानाच्या चार गोष्टी बोलून शास्त्री व द्रविड परत गेले. पुढे दोन महिन्यानी मराठा व ज्ञानप्रकाश दोघांवरहि बेअदबीचा खटला सुरू झाला.

नव्या खटल्याच्या नोटिशीची बातमी ऐकून केसरी मराठ्याच्या प्रतिपक्षीयानाहि वाईट वाटले. हायकोर्ट वकील नारायणराव गोखले हे त्यातलेच एक

प्रतिपक्षी. तथापि हायकोर्टात त्यांची व केळकरांची गाठ पडली तेव्हा ते केळकराना म्हणाले "हे एक नवेच संकट आले. तरी चला आपण फेरोजशहा मेथा यांजकडे जाऊ व पुढे काय करावयाचे याची वाटाघाट करूं." मुलाखतीत मेथा यानी केळकराना सांगितले की "तुम्हाला दोनच मार्ग मोकळे आहेत. एक सपशेल व बिनशर्त माफी मागण्याचा. व दुसरा म्हणजे मी लिहिले आहे ते माझ्या भावनेप्रमाणे योग्य असेच लिहिले आहे असे ठणठणीत समर्थन करून कोर्ट देईल ती शिक्षा भोगावयाची हा. पण लक्षात ठेवा की प्रारंभी तुम्ही माफी न मागितली तरी पुढे ती मागावीच लागेल. कारण असल्या खटल्यात हायकोर्ट अभिमानाला बळी पडून तुमच्याकडून माफी येईपर्यंत तुम्हाला कैदेतून सोडणार नाही!"

अर्थात् नोटिशीला उत्तर काय द्यावयाचे हा एक मोठा बिकट प्रश्नच होऊन राहिला. माफी मागितल्याशिवाय सुटका नाही हे एका बाजूने ठरलेले. तथापि माफी मागून तरी सुटका होईलच याची तरी खातरजमा कोण करणार! खुद्द केळकर व द्रवीड यानी एकत्र बसून पुष्कळ वाटाघाट केली आणि 'प्रारंभी तरी माफी मागू नये मग काय व्हावयाचे ते होईल' असा विचार दोघानीहि ठरविला. तथापि प्रत्येकाचे सल्लागार व कायदेपंडित वेगवेगळे यामुळे अखेर ज्याच्या सल्लागारानी जसे सांगितले व ज्याच्या कायदेपंडितानी जसा आग्रह धरला तसेच त्याने केले.

पुढे लवकरच हायकोर्टात न्या. मू. स्कॉट व न्या. मू. बॅचलर यांच्यापुढे द्रविड व केळकर या दोघांचे खटले सुनावणीला निघाले. प्रथम ज्ञानप्रकाशचा खटला घेण्यात आला. त्याच्यातर्फे रॉबर्टसन हे बॅरिस्टर असून त्यानी द्रवीड यांचा जबाब वाचून दाखविला व सांगितले की "द्रविड याना आपला लेख रागाच्या आवेशात लिहिल्याचे कबूल असून त्याकरिता ते प्रांजलपणे माफी मागण्यास तयार आहेत. कारण न्या. मू. दावर यांची बेअदबी करण्याचा त्यांचा हेतू नव्हता." मुद्रक हरी नारायण गोखले यानी अर्थातच माफी मागितली. कारण त्यांचा लेखाशी काही एक संबंधच नव्हता. "लेखाचे कोणत्याहि प्रकारे समर्थन करण्याची द्रविड यांची इच्छा नाही. तथापि टीकेचा कटाक्ष टिळकाना जामिनावर खुले देखील केले नाही यावर होता. आणि चार दोन दिवस टिळकाना मोकळे सोडले असता मोठा अनर्थ होईल असे जे सरकारी वकिलाने ध्वनित केले व जे न्यायमूर्तीनी मान्य केले ते योग्य नव्हते इतकेच द्रविड यांचे म्हणणे होते" असा रॉबर्टसन यानी जाता जाता खुलासा केला. पण तो काही फारसा पचला नाही. "सरकारच्या मताप्रमाणे न्या. मू. वागले या विधानाचे समर्थन रॉबर्टसन याना करता येणार नाही. बंदरात जहाज नांगरून ठेवले यातहि ध्वनि तोच आहे. आणि न्यायदानाच्या शुद्धतेविषयी संशय येण्यास जागा झाली हेहि विधान तसलेच." अशी टीका ॲडव्होकेट जनरल यानी केली. रॉबर्टसन यानी असेहि सांगितले की "ज्ञानप्रकाशातील हा लेख टिळकांच्या एकाद्या अनुयायाने भरमसाट लिहिलेला नाही, तर प्रतिपक्षी संकटात सापडला त्याची बाजू उचलून धरावी या उदार भावनेने व सनदशीर

चळवळीच्या एका पुरस्कर्त्यानेच लिहिलेला आहे." माफी दिल्यानंतरहि हे जे खुलासे रॉबर्टसन यानी केले त्याचे कारण असे की द्रविडानी माफी मागितली पण कोर्ट ती मान्य करतेच हे कोणी सांगावे? पण कोर्टाने माफीच मान्य केली खुलासा मान्य केला नाही आणि द्रविड याना सोडून दिले.

नंतर लगेच केळकर यांचा खटला निघाला. त्यांचे वकील बॅ. बॅप्टिस्टा हे होते. त्यानीहि प्रथम केळकरांचा लेखी जबाब वाचून दाखविला. त्याचा आशय असा होता की "टिळकांचा व्यक्तिशः स्नेही या नात्याने एकंदर खटल्याचे काम चालत असता मी आतुरतेने व चिंतायुक्त अंतःकरणाने सर्व प्रकार पहात बसलो होतो. आणि शिक्षा झाल्यावर दुसरे तिसरेच दिवशी मी मराठ्यातील लेख लिहिला. त्यामुळे त्यात विशेष आवेश किंवा भावना प्रकट व्हावी हे स्वाभाविक होय. तथापि न्यायमूर्ती दावर किंवा हायकोर्ट यांची बेअदबी करण्याचा माझा हेतू नव्हता. खटल्याचे एकंदर काम संपल्यावर लेख लिहिला. तेव्हा न्यायकोर्टाच्या कामात मी अडथळा केला असे होत नाही. खटल्यातील काही काही प्रकार टीकास्पद झाले. कित्येक उद्गाराना आक्षेप घेण्यासारखाच होता. टिळकांचे हेतू व चारित्र्य यांच्या संबंधी केवळ न्यायदानाच्या कक्षेत न पडण्यासारखे काही एक प्रकारचे मत-प्रतिपादन मी न्यायमूर्तीकडून ऐकले त्याचा मला निषेध करावासा वाटला. तात्पर्य वर्तमानपत्रकार या नात्याने मनाला स्मरून व प्रामाणिकपणाने माझे कर्तव्य म्हणून जे मला वाटले तेच मी केले. लोकमत माझ्या रीतीने मी प्रकट करणे हे माझे मी कर्तव्यच समजतो. टिळकांचा खटला हा सार्वजनिक चर्चेचा विषय आहे आणि त्यावर योग्य व रास्त अशीच टीका करण्याचा माझा हेतु होता. याहून वेगळा हेतू नव्हता. माझा खुलासा लक्षात घेऊन कोर्टाला योग्य वाटेल ते त्याने करावे. कोर्टापुढे मी सादरच आहे."

या खुलाशाच्या आधाराने बॅ. बॅप्टिस्टा यानी तोंडी बरीच तक्रार सांगितली. त्यातहि त्यानी न्या. दावर यांच्या वर्तनावर मधून मधून टीकाच केली. लेखाचे सर्वस्वी समर्थन करण्याचाच त्यांचा एकंदरीत झोक होता. "न्यायमूर्तींनी टिळकाना प्रतिकूल असा जो जो निकाल दिला तो तो सर्व टिळकांच्या हिताकरताच आहे असे म्हटले हा मानभावीपणा होय. आणि शेवटी स्वदेशावर प्रीति करण्याचा तुम्ही बहाणा करिता असे न्यायमूर्तींनी म्हटले त्याने तर कहरच झाला. टिळकाना कोणी हट्टी तामसी भलत्या मार्गाने जाणारे व नेणारे काय वाटेल ते कोणी म्हणावे पण वरील प्रकारचे शब्द उच्चारणे हे लज्जास्पद होय. ज्या मनुष्याने जन्मभर पैसा मिळविण्याखेरीज दुसरे काही केले नाही त्याने उठावे आणि ज्याने स्वतः हायकोर्ट जज्ज होण्याची पात्रता अंगी असता जन्मभर स्वार्थत्याग केला त्याला स्वदेशावर प्रीति करण्याचा बहाणा करतोस किंवा उगाच दिमाखाने बडबडतोस असे म्हणावे याहून अधिक अन्याय तो कोणता? केळकरानी टिळकाना सूर्य आणि दावर याना खद्योत असे म्हटले ते योग्यच होते." अशा प्रकारचे ठणठणीत भाषण

बॅरिस्टर बॅप्टिस्टा यानी केले. पण आपण अगदीच नमते घेतले नाही असे न दिसावे म्हणून केळकरांच्या काही काही विधानांचे समर्थन करण्याची माझी इच्छा नाही असेहि त्यानी सांगितले. हे पाहून न्यायमूर्ति म्हणाले “ आपली विधाने परत घेण्याला केळकराना संधि मिळाली होती पण लेखी जबाबात ती त्यानी परत घेतली नाहीत. आजहि त्याना फिरून तीच संधि मी दिली पण पश्चात्तापाचा किंवा खेदप्रदर्शक असा एक शब्दहि त्यानी उच्चारला नाही याचा अर्थ काय? ” बॅप्टिस्टा म्हणाले त्याचा अर्थ हाच की प्रथम कोर्टाने काय योग्य वाटेल तो निकाल द्यावा आणि त्यानंतर माफी मागणेच अवश्य म्हणून केळकरानी ती मागितली तर त्यांच्या त्या माफीबद्दल कोणाचा गैरसमज होणार नाही. कोर्टाचा अधिकार न जुमानण्याचा केळकरांचा उद्देश नाही पण लेखांचे परिणाम चुकविण्याकरिता त्यानी माफी मागितली असा लोकांचा समज होणे हे त्याना कमीपणा आणणारे होईल. बॅप्टिस्टा यानी अशा तऱ्हेचे समर्थन केल्यामुळे ॲडव्होकेट जनरलला बोलण्याला जागा नव्हती व बोलण्याचे कारणहि नव्हते आणि न्यायमूर्तींनीहि खटल्याचा निकाल पुढे सांगू असे म्हणून खटला तितकाच संपविला.

झाल्या प्रकारावरून न्यायमूर्ति निकाल काय देणार हे कोणासहि कळून चुकले होते. ता. २९ सप्टंबर रोजी न्यायमूर्तीनी निकाल सांगितला तो असा की “ केळकर यानी एक हजार रुपये दंड म्हणून द्यावा. दोनशे रुपये कोर्टखर्च म्हणून द्यावा. शिवाय चौदा दिवस तुरुंगाची शिक्षा भोगावी. आणि त्यानंतरहि ते हायकोर्टाला माफी लिहून देईपर्यंत कैदेची मुदत आपोआप वाढत जावी. ” निकालात न्यायमूर्तीनी कारणे देताना असे म्हटले की “ केळकरानी आपल्या लेखात न्यायमूर्ति दावर याजवर अप्रामाणिकपणाचा आरोप केला असताहि उलट माझी टीका रास्त होती असे प्रतिपादन केले. आणि काम चालले असता एक प्रकारे कोर्टाच्या अधिकाराविषयी तुच्छताबुद्धि दर्शविली. माफी मागण्याची संधि दिली असता ती नाकारली. आणि कोर्टाने गुन्हेगार ठरविले तर मग जरूर तर माफी मागावयाची असा विचार त्यानी दर्शविला. पण अशा तऱ्हेची बेअदबी किंवा बेपर्वाई चालू देता येणार नाही. म्हणून त्याना व इतराना आठवण राहील अशीच शिक्षा दिली पाहिजे. वर्तमानपत्रकाराना झाले तरी इतर लोकाहून अधिक स्वातंत्र्य काय म्हणून असावे? कोणताहि खटला संपल्यानंतर न्यायाधीश हा लोकमताच्या स्वाधीन झाल्यासारखा असतो असे बॅप्टिस्टा म्हणाले. परंतु खटला संपल्यानंतरहि त्याच्याबद्दल काय लिहावे याला सीमा आहेच. बॅप्टिस्टा याना विचारता त्यानी सांगितले की तुम्ही भाषणात मजकरिता खेद प्रदर्शित करू नये किंवा माफी मागू नये असे मला केळकरांचे सांगणे आहे. आधी निकाल व मग जरूर तर माफी याचा अर्थ सुटून जाण्याचे सर्व उपाय संपल्यावर मग माफी. ह्यात एक प्रकारचा धोरणीपणा आहे. पण प्रामाणिकपणा किंवा मर्दपणा नाही. म्हणून स्पष्टपणे योग्य प्रकारची माफी लिहून देईपर्यंत केळकराना कैदेत राहिलेच पाहिजे. ”

ज्या लेखांबद्दल खटला करण्यात आला होता ते लेख केळकरानी खटल्याची हकीकत देताना 'मराठा' पत्रात पुन्हां छापले म्हणून तो एक वेगळा गुन्हाच मानावा असे अॅडव्होकेट जनरल यानी सुचविले. परंतु कोर्टाने या दोन्ही गोष्टी अमान्य केल्या. केळकर हे चरितार्थाकरिता आपल्या सनदेचा उपयोग करतात असे कोर्टाच्या नजरेला आले असते तर कदाचित सनदेबद्दल त्यानी निराळ्या प्रकारचा हुकूम दिला असता. पण चौदा दिवसांची शिक्षा सांगितली ती दिवाणी तुरुंगात की फौजदारी तुरुंगात असे बॅप्टिस्टा यानी विचारले. तेव्हा कोर्टाने फौजदारी तुरुंगात असा निकाल दिला. नंतर हायकोर्टच्या बेलिफाने केळकर याना खाली शेरीफच्या कचेरीत नेऊन बसविले व चार वाजण्याचे सुमारास डोंगरीच्या तुरुंगात नेऊन पोचविले. तेथे त्यांचे सर्व प्रवेशविधी झाले. परंतु त्यांच्या अंगावरचे कपडे जेल सुपरिंटेंडंट यानी तसेच राहू दिले. अन्न मात्र तुरुंगातीलच देण्यात येई. पुस्तके वाचण्याची परवानगी होती. व उन्हाळ्यांमुळे खोलीत न निजता व्हरांडयात निजावे अशीहि सवलत देण्यात आली. चौदा दिवस भरण्यापूर्वी केळकर यांचे सॉलिसिटर यानी तुरुंगात त्यांची भेट घेतली व रीतसर माफीचा मसूदा लिहून नेला होता त्यावर त्यांची सही घेतली. व तारीख १२ ऑक्टोबर रोजी त्याना फिरून कोर्टापुढे आणून त्यांची माफीवर सही करून घेतल्यानंतर त्याना सोडून देण्यात आले.

मध्यंतरी केळकरानी स्वीकारलेल्या धोरणाबद्दल पुण्या मुंबईच्या पत्रात काही चर्चा झाल्यावरून बॅप्टिस्टानी टाईम्समध्ये जाहीरपत्र लिहून असे कळविले की "केळकरांच्या धोरणात माफी मागण्याचा जसा विचार नव्हता तसाच कोर्टाचा अखेरचा अधिकार न मानण्याचाहि उद्देश नव्हता. माफी मागेपर्यंत कैदेतून सुटकाच नाही असा कोर्टाने स्पष्ट निकाल दिल्यावर माफी मागणे प्रासच. तथापि निकाल होईपर्यंत कोणत्याहि प्रकारची दिलगिरी प्रदर्शित करावयाची नाही अशी वकील या नात्याने केळकरांची मला स्पष्ट सूचना होती. निकालानंतरहि माफी न मागणे याचा अर्थ जन्मभर तुरुंगात राहणे किंवा अनियमित मुदतीपर्यंत तुरुंगात राहून मग माफी मागणे या दोहोतहि अर्थ नाही. छत्तीस वर्षे वयाच्या मनुष्याने न्यायकोर्टाची माफी मागत नाही असा आग्रह धरून सर्व जन्म तुरुंगात घालवावयाचा की काय "? बरे एकदम माफी न मागता काही दिवस तुरुंगात घालवून माफी मागावयाची याचा अर्थ आपल्या सोशिकपणाची मर्यादा संपली असे जाहीर करून शिवाय शिक्षा भोगावयाचीच आणि माफीहि मागावयाचीच यात तरी काय मिळविले ? असा उलटसुलट युक्तिवाद केळकर यांच्या मित्रानी व काही वर्तमानपत्रानी केला.

## (१६) इतस्ततः

टिळकांवरचा खटला हा जरी प्रत्यक्ष त्यांच्या लेखावर झालेला असला तरी त्याला राजकारणाची भूमिका होती हे निर्विवाद आहे. शिवाय या भूमिकेत सरकार-

ऱ्या रोषाप्रमाणे टिळकांचा त्या वेळचा प्रतिपक्षी जो नेमस्तपक्ष त्याच्या कोपाचेहि चिन्ह अस्पष्टपणे का होईना पण दिसून येत होते. यामुळे नेमस्तानी टिळकांवर खटला करविला असा अपवाद काही लोकाकडून आणला जात असे. पण नेमस्त-पक्षाची व्याप्ति व विस्तार फार मोठा असल्यामुळे अमक्याने अमुक गोष्ट केली असे म्हणणे अर्थात् कठीण होते. म्हणून नेमस्त पक्षातील काही ठराविक पुढाऱ्याना सर्व पक्षाचे प्रतिनिधी म्हणून अपवादाचा मारा सोसावा लागे. हा मारा इतर सर्वा-पेक्षा गोपाळ कृष्ण गोखले यांजवर अधिक पडला. व त्याला कारणेहि होती. टिळक व गोखले पुण्यातच रहाणारे आणि त्यानी सर्व जन्म परस्पराशी स्पर्धा व विपक्षता करण्यात घालविला. टिळकांच्या हाती दोन वर्तमानपत्रे असल्याकारणाने त्यांचे गोखल्यावरील हल्ले वारंवार होत व जगजाहीर होत त्या मानाने गोखले यांचे हल्ले थोडे दिसत. केवळ मतप्रसारार्थ अशी ते फार थोडी भाषा करीत व इतर पत्राना लेखहि क्वचित लिहीत. पुढारी मंडळीपैकी एखाद्याला प्रसंगवशात लिहिलेले त्यांचे एखादे पत्र विशेष उद्देशाने प्रसिद्ध केले जाई व त्यात टिळकांवर व त्यांच्या पक्षावर टीका असे. तथापि खासगी संभाषणात गोखले टिळकांवर टीका करीत नसतील असे कोणीच मानीत नसे. किंबहुना टिळकांपेक्षा गोखल्यांची भाषा अधिक घासलीपुसली किंवा सफाईदार असली तरी टिळकांची गोखल्याविषयी जी भावना तीच टिळकांविषयी गोखल्यांचीहि होती हे नाकारण्यात अर्थ नाही. १९०८ चा खटला होण्यापूर्वी गोखले विलायतेस काही दिवस गेले होते आणि लॉर्ड मोर्ले यांच्याशी त्यांच्या मुलाखती होत असून हिंदुस्थाना-तील राजकीय परिस्थितीची चर्चाहि होत असे हे लोकाना तेव्हाहि कळले होते. अर्थात् टिळकांवरील खटल्याची कारणे शोधणाराना टिळक गोखले यांचे वैमनस्य हे कारण सहज सुचवण्यासारखे होते. नेमस्त पक्षाकडून करण्यांत येत असलेला टिळकांचा निषेध इतका प्रखर असे की गोखले यांचे टिळकाविषयी काय मत असेल हे लॉर्ड मोर्ले याना कळण्याची इच्छा असल्यास त्याकरिता त्याना प्रत्यक्ष गोखले याना विचारण्याचे काही कारण नव्हते. तथापि काही लोकांची समजूत अशी की गोखले यानीच टिळकावर खटला करण्यास मोर्ले याना खाजगी संभाषणातून प्रत्यक्ष चिथावणी दिली असावी. टिळक हे आपल्या पक्षातील ज्वलज्जहाल अशा माथेफिरू अनुयायाना बॉंबगोळे व बॉंबगोळ्यांचे अत्याचार करण्याला सांगतात व आपण तटस्थ राहतात असा कित्येक नेमस्ताकडून आरोप करण्यात येत असे हे प्रसिद्ध आहे. तेव्हा गोखले हे नेमस्त पक्षाचे जे धर्मगुरु मोर्ले याना दडपशाही करण्यास खटले भरण्यास उत्तेजन देतात असा उलट आहेर लोकानी करावा हे स्वाभाविकच होय. दोन्ही पक्षातील समंजस लोक अशा गोष्टी मानीत नसत. पण कोणताहि पक्ष म्हटला म्हणजे गुरुभक्तीने किंवा पुढाऱ्यांच्या प्रेमाने विकारवश होऊन कोणत्याहि गोष्टीकडे व त्यातल्या त्यात प्रतिपक्षाकडे पाहणारा असा असतो. गोखले यांच्यामुळे टिळकावर खटला झाला अशा

आरोपाचे खाजगी व जाहीर रीतीने समर्थन होऊ लागले. आणि टिळकाना शिक्षा झाल्यावर काही लोकानी अशा बातम्या उठविल्या की "विलायतेच्या तारायंत्रातून येणाऱ्या जाणाऱ्या सांकेतिक शब्दांच्या निरोपातून मोर्ले-गोखले-व्हाइसरॉय या त्रिकूटांची खलबते आम्ही हेरून काढली व त्यात टिळकाना शिक्षा झाल्यामुळे कृतकृत्यता वाटण्याचा धागा गोखले यांच्यापर्यंत पोचलेला आम्ही पकडला."

विलायतेत गोखले यांच्याबरोबर रमेशचंद्र दत्त हेहि या वेळी असून राजकीय मताचा प्रसार करीत होते. त्यांच्याहि भाषणात असेच येत असे की "हिंदुस्थानातील काही वर्गांमध्ये अत्यंत असंतोष पसरला आहे त्याचेच हे फल होय. केव्हाहि केवढाहि अंश राज्याधिकारात आम्हाला मिळेल अशाविषयी या लोकांची निराशा झालेली व ती सतत आठ दहा वर्षे सरकारने टिकू दिली त्याचा हा परिणाम! अत्याचार हे काही एका जातीचे कृत्य नाही. नेमस्तांचा विश्वास अर्थात् सनदशीर चळवळीवर आहे तसाच आहे. परंतु तो विश्वास सकारण असे त्यानी लोकाना कोणत्या तोंडाने सांगावे आणि लोकानी तरी तो कोणत्या पुराव्यावर मानावा? आमचे वजन देशात कमी झाले याचे कारण अशा रीतीने तुम्हीच आहा. आमच्या नेमस्तपणाच्या धोरणाने आम्ही काही सुधारणा मिळवू शकलो असे जेव्हा आम्हाला लोकप्रत्ययाला आणता येईल तेव्हा आम्ही काहीसे स्थिरपद होऊ. ते न घडेल तर जहाल मताचा बोलबाला होणार व जहाल पक्षाचे पाऊल पुढे पुढे पडणार. सरकारानी लोकाना काही अधिकार दिले तर अत्याचार थांबू शकतील." या दोघानी केलेली अत्याचाराची ही मीमांसा आणि टिळकानी ता. १२ मेच्या केसरीत केलेली मीमांसा यामध्ये वास्तविक काय फरक? असला तर हेतूचा किंवा उद्देशाचा नाही फक्त शब्दाचा व आवेशाचाच आहे. पण त्यांच्यावर सरकार खटला करीत नाही, इतकेच नव्हे तर गोखल्यांसारख्यानी टिळकांवर खटला करण्यास उत्तेजन दिले असे आरोप गोखले यांजवर येऊ शकले याचे कारण काय हे सांगण्याचे प्रयोजन नाही.

दुसऱ्या खटल्याचे वेळी ॲडव्होकेट जनरल मि. ब्रॅन्सन हे होते. ताईमहाराजाच्या खटल्यात काही दिवस त्यानी टिळकांच्यातर्फे काम चालविल्याचे मागे सांगितलेच आहे. अशा रीतीने पूर्वी टिळकांची वकिली केल्यापैकी एक सरकारी वकील व दुसरे खुद्द न्यायाधीशच होते. दोघानीहि आपल्या अशीलाची ओळख फार चांगल्यापैकी ठेवली होती! बॅरिस्टर ब्रॅन्सन हे काम चालविताना तोंडे वेडी वाकडी करण्यात व प्रतिपक्षावर तोंड टाकून बोलण्यात मोठे पटाईत होते. आणि पूर्वी टिळक ब्रॅन्सन यांच्या मागे बसून जे चरित्र व ज्या लीला पहात त्या आज समोर बसून पहाणे व त्यांचा मारा सोसणे टिळकाना प्राप्त झाले!

सरकारी भाषांतरकार भास्करराव जोशी हे न्यूइंग्लिशस्कूलच्या अगदी पहिल्या विद्यार्थ्यांतले असून न्यूस्कुलातूनच मॅट्रिक पास होऊन त्यानी शंकरशेट स्कॉलरशिप मिळविली होती. या पहिल्या विद्यार्थ्यांचा व टिळकांचा निकट परिचय असे. म्हणून

टिळकांविरुद्ध सरकारी भाषांतरकार म्हणून साक्षीला येणे हे जोशी याना फारच अवघड वाटले. गुरुजीना शिष्याची परीक्षा घेण्याची पुनः एक संधी लाभली. आणि चुक्या झाल्या असता छड्या खाणे किंवा परीक्षा उतरली असता गुरुजीकडून शाबासकी मिळणे या दोन्ही गोष्टी जरी हायकोर्टाच्या या शाळेत शक्य नव्हत्या तरी विद्यार्थी अतिशय गांगरून गेलेला असे. एकतर टिळकांच्या कुशाग्र बुद्धीमुळे आपण पुष्कळ वेळा अडू अशी भीति त्याना वाटत होतीच. पण टिळकांविरुद्ध साक्ष देणे या कामी जो दुस्तर लोकापवाद सोसावा लागणार किंबहुना अजाणत्या सामान्य जनतेकडून देशद्रोही देखील म्हणवून घेण्याची पाळी येणार यानेच जोशी यांचा जीव अधिक खचला होता.

मुंबईस टिळकांचा खटला चालू असता त्यांच्या मदतीकरिता वर्गणी जमविण्यात आली होती हे मागे सांगितलेच आहे. परंतु विलायतेतील खर्च केसरी कचेरीच्या हातून निभावण्यासारखा नव्हता. अर्थात् फंड जमविण्याची गरज होती. म्हणून तारीख १८ सप्टेंबर रोजी केळकर व खाडिलकर यांच्या सहीने वर्गणीकरिता जाहीर विनंतिपत्र काढण्यात आले. या विनंतिपत्राला उत्तर लोकाकडून फारच समाधानकारक आले. पण वर्गणीदारांची संख्या १८९७ सालापेक्षा फारच कमी होती. मात्र संख्येचा हा कमीपणा वर्गणीच्या आकड्यानी भरून निघाला. निरनिराळ्या प्रांतात मिळून पूर्वी सुमारे पाऊण लाख रुपये वर्गणी टिळकांच्या बचावाकरिता जमली होती. तितकी या वेळी जमली नाही. आणि तितक्या रकमेचे कारणहि नव्हते. ह्या वेळी वर्गणी जमविण्यात आली ती मुख्यतः मुंबई शहरात व महाराष्ट्रात. पण ह्या खेपेस वर्गणीचे आकडे किंवा नावे प्रसिद्ध करण्याची सोय नव्हती. किंबहुना बहुतेक वर्गणीदारानी आमची नावे प्रसिद्ध करू नका असाच उलट आग्रह धरल्याने वर्तमानपत्रातून पोच वगैरे प्रसिद्ध करण्यात आली नाही. पैसा विश्वासाने दिला विश्वासाने घेतला व योग्य कारणाला खर्च झाला. इतकाच या रुपयांचा हिशोब या स्थितीत प्रसिद्ध करिता आला असता आणि तो न छापताच लोकाना समजलाहि. कारण प्रथम खापर्डे नंतर दादासाहेब करंदीकर हे विलायतेला गेले. आणि विलायतचा दोघांचा खर्च व अपिलाचा खर्च या फंडातूनच झाला. शिवाय फंड अपुरा पडल्यामुळे केसरीला स्वतःची बरीच रक्कम घालावी लागली.

# भाग ९

## मंडाले येथील तुरुंगवास

टिळकाना मंडाले येथे नेऊन ठेवल्यापासून तेथून त्यांची सुटका होईपर्यंत सुमारे साडे पांच वर्षे गेली. या अवधीतील त्यांची हकीकत ती अशी काय असणार ? बंदिवानाचा नित्यक्रम तोच त्यांचा नित्यक्रम. ईश्वरी इच्छेच्या आवरणात बांधलेल्या जीवाला किंवा कर्मविपाकाच्या फेऱ्यात सापडलेल्या आत्म्याला जितके स्वातंत्र्य तितकेच कैदेत पडलेल्या बंदीवानाला असावयाचे. त्या स्वातंत्र्याच्या मानाने टिळकांचा उद्योग आताहि चालू होता. पण बाहेर असता त्याना जसा अनेकविध इतिहास घडविता येत होता तसा आत कसा घडविता येणार ? त्यांचे वास्तुजग म्हणजे त्याना नेमून दिलेली तीन खणाची दुमजली खोली. त्यांचा सहचर किंवा सोबती म्हणजे त्यांच्या दिमतीला दिलेला आचारी. त्यांच्या भेटीला येणारे लोक म्हणजे तुरुंगाचे अधिकारी किंवा डॉक्टर. इतरे जनाः म्हणजे तुरुंगात किंवा आसपास वावरणारे व डोळ्याना दुरून दिसणारे कैदी. त्यांचे संभाषण म्हणजे पुष्कळसे आत्मगत अस्फुट भाषण व आचाऱ्याशी रिकामपणचे चार शब्द. त्यांचा दौरा ह्मणजे माडीवरून खाली स्वयंपाकघरात व स्वयंपाकघरातून वर माडीत. त्यांची चळवळ ह्मणजे खटल्याचे अपील चालू असता त्याविषयी टिपणे लिहिणे व ते काम संपले तेव्हा 'गीतारहस्या'चे लिखाण करणे. राजकारण हे त्याना सर्वस्वी अंतरलेच होते. कारण वर्तमानपत्रच वाचावयास मिळत नसे. अर्थात् कल्पनेने बोलारे उभारावे व मोडावे एवढेच त्यांचे राजकारण ! या रिकाम्या वेळात टिळकांच्या मनात काय काय कल्पना येऊन गेल्या असतील याचे जर निरनिराळ्या शास्त्रीय पद्धतीनी कोणाला चित्र किंवा नकाशा काढता आला असता तर फार मौज झाली असती. असो. वरील कारणामुळे मंडाले येथील तुरुंगवासातील हकीकती आम्ही काय देणार ? टिळकांचे भाचे हे त्याना वर्षातून एखाददुसऱ्या वेळी जाऊन भेटून येत. पण त्यांची गाठहि तुरुंगाच्या कचेरीत पडे. टिळकांच्या राहण्याची जागा देखील त्याना पाहावयास मिळाली नाही. अशा स्थितीत निवान्त व एकान्त बोलणे करावयास कोठून मिळणार ? तथापि टिळकाना घरी दर महिन्याला एक पत्र लिहिण्याची परवानगी असे. त्याप्रमाणे वेळोवेळी त्यांची जी पत्रे आली ती बहुतेक सर्व उपलब्ध असून याखाली ती सारांश रूपाने दिली आहेत. त्यावरून टिळकांची दिनचर्या म्हणण्यापेक्षा मासचर्या व वर्षचर्या कशी काय चालू होती हे वाचकाना कळून येईल. पुराव्याच्या दृष्टीने याहून अधिक विश्वसनीय माहिती मिळणे शक्य नाही पण तीच संगतवार वाचणाराना टिळकांच्या तुरुंगवासातील इतिवृत्ताची कल्पना ढळढळीतपणे येईल.

## मंडाले येथून आलेली टिळकांची

# निवडक पत्रे

## ( १ )

९ जानेवारी १९०९

आज नवे इंग्रजी वर्ष सुरू होते. तेव्हा या वर्षाचे शुभाशिर्वाद तुम्हाला देऊनच हे पहिले पत्र लिहितो. माझी प्रकृति बरी आहे. प्रारंभी अहमदाबादच्या तुरुंगात माझे वजन तुटले. ते हळूहळू भरून येत आहे. कपडे व पुस्तके पाठविलीत ती पोचली. रामचंद्र गोविंद यानी पुस्तके मुंबईहून पाठविली तीहि मिळाली. तेव्हा आता वाचण्याला भरपूर झाले. येथे देवनागरी लिपी कोणालाच येत नाही. म्हणून त्या लिपीमधील पुस्तकातील मुखपृष्ठावर पुस्तकाचे नाव इंग्रजीत लिहावे. नाहीतर पुस्तकाच्या नावाचे भाषांतर होऊन येणार आणि मग येथील अधिकारी ते वाचून पुस्तक मला देणार! अशाने पुस्तक हाती येण्याला विलंब लागतो. गीता ब्रह्मसूत्रे उपनिषदे हे ग्रंथ हाती येण्याला याच कारणाने फार उशीर लागला. म्हणून पुस्तकाच्या मुखपृष्ठावर तरी इंग्रजी नांव काळजीपूर्वक लिहित जा.

सौभाग्यवतीच्या प्रकृतीची काळजी वाटते तरी ती कशी आहे ते लिही. तिला मधुमेहावरील वै. पदे यांचे औषध देऊन पहा. रामभाऊ व बापू यांचे शिक्षणाची हयगय होऊ नये. माझ्या दुर्दैवामुळे त्यांची शिक्षणाची हानी का व्हावी! त्याजकडे लक्ष द्यावे. शने याना बर्लिन येथे मधून मधून पत्र पाठवून माझी हकीकत कळवावी. मला त्याना परस्पर लिहिता येत नाही.

सॉलिसिटर राघवय्या यानी तयार केलेला बक्षिसपत्राचा मसुदा काही फेरफार करून परत पाठविला आहे. दाजीसाहेब खरे याना दाखवून तो स्टँप कागदावर लिहून घ्यावा. त्याची नोंदणी येथे होत नाही. पुण्यास किंवा मुंबईस करावी लागेल. स्टँप वाचविण्याकरिता मिळकतीची किंमत कमी लावणे योग्य नाही. म्हणून भरपूर दोनशे रुपयांचा स्टँप घ्यावा. वाड्याची किंमत मी वीस हजार रु. धरली आहे. या दस्तऐवजाबरोबर एक मुखत्यारपत्रहि तयार करून दोन्ही कागद सहीकरिता एकदमच पाठवावे. कदाचित् तुम्ही पुढच्या खेपेस मला भेटण्यास याल तेव्हा ते बरोबर आणले तरी चालेल. या कामी खरे यांचा सल्ला घ्यावा.

आपली टाईप फौंडरी वाड्याबाहेर कोठे तरी दुसऱ्या एखाद्या घरी ठेवावी. तिचे हिशेबहि स्वतंत्र ठेवावे. प्रेस आक्टामुळे असे करणे अगदी अवश्य आहे. आपल्या ग्रंथसंग्रहातील पुस्तके सुव्यवस्थित ठेवावी. कोणास फारशी देऊ नयेत.

खटला होण्यापूर्वी ऑगस्टस कॉंट याचे काही ग्रंथ रामचंद्र गोविंद याना लॉंगमन कंपनीकडून आणण्यास सांगितले होते. ते आले असल्यास पाठवावे. आनंदाश्रमातून ब्रह्मसूत्रे व गीता यांच्या प्रती आणीव. म्हैसूरचे महादेव शास्त्री यांजकडून मूळ उपनिषद व भाषांतर आणविण्याकरिता त्याना पत्र लिहावयास केळकराना सांग.

बाबामहाराज यांचा कारकून रामभाऊ याने स्मॉल कॉज कोर्टात फिर्याद केली त्याचे समन्स आले. ते सही करून परत पाठविले आहे. तुला माझे मुखत्यारपत्र दिलेच आहे. तथापि कोर्ट कचेरीच्या कामी माझ्या नावचा होता होईल तो व्यवहार करीत जावा. महाराजांच्या इस्टेटीची व्यवस्था आता कोर्ट ऑफ वॉर्डने आपल्या ताब्यात घेतल्याचे समजते. अर्थात् इस्टेटीच्या सावकाराना सरसकट नोटीस निघेल. तरी भावे भट शिरोडकर इत्यादि जे जे सावकार आपल्या माहितीचे आहेत त्या सर्वांकडून कर्जवसुलीबद्दल कोर्ट ऑफ वॉर्डसला याद्या लिहवाव्या. ट्रस्टीनी इस्टेटीकरिता काही खर्च वेळोवेळी केला आहे. तसेच त्यांच्या विरुद्ध काही दावे कोर्टाने देवविले आहेत. त्या सर्वांची याद करून तीहि दाखल करावी. यशवंतराव कुळकर्णी याना हा मजकूर सांग म्हणजे ते काळजीपूर्वक सर्व व्यवस्था करतील. कोल्हापूरसंबंधी अर्ज व हायकोर्टातील अपील ही दाखल झाली आहेत. तरी मी पुण्यास असतो तर या कामी जसा करून प्रयत्न केला असता तसाच मी नाही तरी करावा. खापर्डे विलायतेहून आल्यावर इतर बाबतीत लक्ष घालतील. विलायतेतील माझे अपील अद्यापि प्रीव्हि कौन्सिलकडे दाखल झालेले दिसत नाही. तरी ते दाखल झाल्याची तार येताच मला लिही. विसरू नको.

खर्चापुरते पैसे हल्ली तुजजवळ असतीलच. केळकर खाडिलकर वासुदेवराव आणि इतर स्नेही मंडळी याना नमस्कार सांगावे. माझ्या गैरहजेरीत आपली वर्तमानपत्रे चालविताना किती काळजी व सावधगिरी घेणे अवश्य आहे हे तुम्हा सर्वांना आता कळतच आहे. मी अधिक लिहावे असे नाही.

माझ्या पत्रांची उत्तरे पाठविताना एक गोष्ट नीट सांभाळा. सार्वजनिक किंवा राजकीय अशा कोणत्याहि गोष्टीचा त्यात उल्लेखहि करू नका. नाही तर तुमची पत्रे मला दिली जाणार नाहीत.

सौभाग्यवती व मुले याना म्हणावे की मला माझी काळजी वाटत नाही. त्यांचीच अधिक वाटते. माझी प्रकृति खरोखरच बरी आहे. त्याना बरे वाटावे म्हणून उगाच काही तरी लिहितो असे नाही. प्रीव्हि कौन्सिलकडील माझा अर्ज नामंजूर झाला तरी मला येथे सहा वर्षे पुरी काढावी लागणार नाहीत हे निश्चित समजा असे त्याना सांगावे. मी लवकरच येऊन भेटेन असे त्याना सांगा. दुःखात आशा हीच जगण्याची जागा. म्हणून ती त्यांची आशा कायम राहील अशाविषयी काळजी घे.

टि. ११

(२)

५ फेब्रुवारी १९०९

तुमच्याकडील खुशालीची पत्रे पोचली. माझी प्रकृति बरी आहे. पुण्यापेक्षा येथे अधिक थंडी नाही. उबदार कपडेहि भरपूर आहेत. हिवाळ्याचा त्रास झाला नाही. या महिना अखेर हवा बदलेल. आणि मग पुढे आठ नऊ महिने एकसारखा उन्हाळा. पाऊस मधूनमधून क्वचित् पडतो एवढेच काय ते कठीण. गेल्या महिन्यात वजन होते तितकेच राहिले. पण लघवी तपासली त्यावरून तूर्त तरी मधुमेहाचा विकार मुळीच नाही.

मुली कोण कोठे आहेत ते लिही. मुलांची प्रकृति कशी आहे ? अभ्यास कसे काय आहेत ? व्यायाम घेतात की नाही ते लिही. तात्यासाहेब नातू याना विचारून त्यांच्या वर्गात मुलाना पाठीव व घोड्यावर बसण्याला शिकीव.

गेल्या महिन्यात खापर्डे यांचे पत्र आले नाही. प्रीव्हि कौन्सिल व पार्लमेंट याना सुटी असावी म्हणून अर्ज दाखल झाला नसावा हेच कारण. तार येताच लिही. दादासाहेब करंदीकर बहुधा परत आले असतील. संकटात स्नेही उपयोगी पडतो तोच खरा. माझ्याकरिता दादासाहेबानी श्रम घेतले त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे असे त्याना कळीव.

तीन महिन्यातून आप्त व स्नेही यांची भेट मला एकदाच घेण्याची परवानगी आहे. म्हणून वासुदेवराव जोशी आले तर त्यानंतर तुला येऊन भेटता येणार नाही. म्हणून जे काय सांगावयाचे सवरावयाचे अगर द्यावयाचे ते वासुदेवरावाजवळच दे. स्टँपावर लिहिलेले बक्षिसपत्र त्यावर रजिस्ट्रारने नोंद करण्याच्या फीचे पैसे वगैरे सर्व काही त्यांजबरोबर पाठवावे.

तुम्ही व रामचंद्र गोविंद यानी पाठविलेली सर्व पुस्तके मिळाली. तूर्त अधिक पुस्तके नकोत.

ताईमहाराजप्रकरणातील फौजदारी खटल्यात आम्ही खर्च केला तो कोर्ट ऑफ वॉर्ड्स्कडून कितपत मिळेल याची शंकाच आहे. तरी पण मागणे हे आपले काम. म्हणून गोपाळराव पटवर्धन वकील याना रीतसर अर्ज करण्यास सांगावे. वर्तमानपत्रे वाचण्याची परवानगी मागितली. ती ब्रह्मदेशाच्या सरकारने नाकारली. आता मुंबई सरकारकडे अर्ज करावा लागेल. प्रीव्हि कौन्सिलचा निकाल झाल्यावर तो करीन. तूर्त बाहेर जगात काय चालले आहे याची मला गंधवार्ताहि नाही इतके खरे.

एक जानवी जोड चर्मी जोडा रात्री घालण्याची कानटोपी १९०९ सालची रोजनिशी इतक्या वस्तू पाठीव. रोजनिशी लहान असावी. पण तीत इंग्रजी तारखाबरोबरच हिंदू पंचांगाचा तपशील म्हणजे तिथी महिने सण वगैरे दिलेले असावे.

केळकर खाडिलकर लिमये याना नमस्कार सांगावे. रामभाऊ बापू याना नीट अभ्यास करून आनंदात रहावे असे सांग. तुझ्या घराकडची हकीगतहि लिही.

---

( ३ )

५ मार्च १९०९

माझे पूर्वीचे पत्र तुला इतक्या उशीराने का मिळाले कळत नाही. येथे विलायतची डाक आल्यावर शुक्रवारी मी पत्र लिहीत असतो. ते पुढच्या शुक्रवारी तुला मिळावे. असो.

प्रकृति ठीक आहे. माझे नेहमीचे वजन १३० पौंड असते. खटला मुंबईस संपून मला अहमदाबादेस आणले तेव्हा ते १२६ पौंड होते. येथे येईपर्यंत ८ पौंड कमी झाले. व आतां ते १२४ पौंड आहे. म्हणजे दर महिन्यास एक पौंड याप्रमाणे माझे वजन भरून निघाले. पण आता पुढे उन्हाळा येणार यामुळे ही वाढ खुंटेल अशी माति वाटते.

सौभाग्यवतीला आपला जुना सप्तरंगीचा काढा करून देत जा. टिंक्चर तितके उपयोगी पडत नाही असा अनुभव आला आहे. याविषयी डॉ. गर्दे याना विचारावे. सप्तरंगीची चांगली पूड करावी; तोळा अर्ध तोळा ऊन पाण्यात टाकावी आणि काढा वस्त्रगाळ न करता तसाच घ्यावा. त्याचा उपयोग अधिक होईल.

साने यांचे पत्र पोहोचले. त्याचे उत्तर यासोबत पाठवीत आहे. ते त्यांजकडे धाडावे. त्यांचे पत्र मला परस्पर न येता तुमच्याकडे येऊन मग तुमच्या पत्राबरोबर मजकडे यावे. मला किती पत्रे येऊ द्यावी याची संख्या ठरलेली दिसते. पण सुदैवाने एका पत्रात किती पत्रे असावी याची संख्या अद्याप ठरलेली नाही. अमरावतीहून मुधोळकर याजकडून औद्योगिक परिषदेचे सर्व रिपोर्ट आतापर्यंतचे भागवून ते साने याना पाठवावे.

तुम्ही पाठविलेले पार्सल मिळाले. उपनिषदांचे बुकावर इंग्रजी नाव नाही. म्हणून मला मिळाले नाही. आनंदाश्रमाच्या आवृत्तीत मुख्य बारा उपनिषदे नाहीत म्हणून महादेवशास्त्री यांची आवृत्ति हवी. मला त्यांचे भाषांतर नको आहे. मूळ उपनिषदे हवीत. त्यांजकडे प्रती शिल्लक नसल्यास मद्रासेस नटेसन यांना लिहा व तेथेहि ती न मिळाली तर जिनसीवाले यांच्या ग्रंथसंग्रहात पहा. त्यातहि न मिळाली तर आनंदाश्रमाचा दुसरा ग्रंथ वर ग्रंथाचे इंग्रजी नाव लिहून पाठवा.

वासुदेवराव जोशी अद्याप आले नाहीत. पण राघवय्या हे सिलोन व ब्रम्हदेश इकडे हिंडावयास निघाले होते ते मला १५ दिवसांपूर्वी भेटले. तेव्हा त्याना विलायतेतील अपीलाविषयी सर्व माहिती तपशीलवार सांगितली. खापर्डे यांची

पत्रे आली. शेवटच्या पत्रात मि. ईडन बँक्स या नांवाचे बॅरिष्टर दिले आहेत व ते मिळण्यालाहि श्रम पडले असे लिहिले आहे ! खापर्डे हे शक्य तो उपाय करीत आहेतच. त्याना परत येण्याची घाई दिसत नाही तेव्हा सर्व व्यवस्था ते करतीलच.

रामभाऊ व बापू पुन्हा शाळेला जाऊ लागल्याचे समजले. तरी मथूचा अभ्यास बुडू नये म्हणून तिला व रामभाऊला मिळून घरी इंग्रजी शिकवीत जावे असे कवडे यांस सांगावे.

अपील दाखल झाल्यावर सरकार मुदत मागणार. मग मुंबईहून कागद विलायतेस जाणार. पण कसेहि असले तरी अपिलाचा निकाल एप्रिल अखेरच्या पूर्वी लागेल असे वाटते. अपील दाखल झाल्याविषयी तुझ्याप्रमाणे खापर्डे यांजकडूनहि तार आली.

उन्हाळा सुरू झाला यामुळे वाचन थोडे मंदावले आहे. ' हिस्टोरियन्स हिस्टरी ऑफ दि वर्ल्ड' याचे पहिले पांच खंड वाचले. ग्लॅडस्टनसाहेबानी संपादिलेली बटलर साहेबांच्या ग्रंथाची प्रत पाठवावी. नीतिशास्त्रावरील लेस्ली स्टीफन् यांचा ग्रंथ पाठवावा.

ता. क. हे पत्र लिहून होते तोच खापर्डे यांची दुसरी तार मिळाली. प्रीव्हि कौन्सिलने अपील घेण्याचे नाकारले असे तीत लिहिले आहे. न्यायाधिकाराचा मार्ग हा असा संपला. आता पार्लमेंटकडे अर्ज करून काय होते पहावे. खापर्डे यानी लिहिले की माझ्या अपीलाची सुनावणी करून घेण्यास स्वतः लॉर्ड चॅन्सेलर बसणार आणि सर रुफस ऐझॅक्स यानी आमचे वकीलपत्र घेण्याचें नाकारले. या दोन गोष्टीवरूनच अपीलाचा निकाल काय होणार हे मला कळून चुकले होते.

---

(४)

२ एप्रिल १९०९

तुमचे १४ मार्चचे पत्र पावले. पुण्यास मे महिन्यात उन्हाळा असतो तितका येथे आताच आहे. पुढे तर तो अधिकच वाढणार. मग वजन वाढण्याची आशा कसली ? येथली हवा मला मुळी अंगवळणी पडते की नाही हेच अजून ठरावयाचे आहे व ते ठरण्यालाहि बराच वेळ लागेल. कसेहि असो. तूर्त आहे तितके ठीक आहे. सौभाग्यवतीच्या मधुमेहाच्या विकाराविषयी कची हकीगत कळीव. तिचीच काळजी मला अधिक वाटते.

आपले बॅरिस्टर मि. बँक्स यानी प्रिव्हि कौन्सिलपुढे तक्रार मांडली त्या संबंधी लघुलेखकाने घेतलेली टिपणे मिळाली. त्यावरून बॅरिस्टरसाहेबानी बरेच कौशल्य व जोरहि चालविला असे दिसते. पण लॉर्ड चॅन्सेलर व लॉर्ड हॉल्सबरी

वगैरेनी थोडक्यातच तोंडी निकाल सांगितला. लेखी निकालहि दिला नाही. उरलेला शक्य तो प्रयत्न आणखी केल्याशिवाय मी विलायतेहून परत येत नाही असे खापर्डे लिहितात. पण त्याना तिकडे फार दिवस राहाण्यात आता अर्थ नाही. पुढील कामाची फक्त प्रस्तावना करून निघून यावे असे मी त्याना लिहिले आहे. तुह्मी मला विचारता की माझ्या सुटकेविषयी मला काय वाटते? पण हे पहावे तसे आहे. माझ्या स्नेही मंडळीना सहजच असे वाटणार की हल्लीचे राजकीय वातावरण किंचित् थंड झाले म्हणजे माझी सुटका होईल. त्याना असे वाटणे स्वाभाविकच आहे. निदान माझ्या कुटुंबाची ही आशा अशीच टिकून रहावी हे मला इष्टच वाटते. पण तुझ्यासारख्याजवळ खरे बोलावयाचे ह्मणजे भर मुदतीपर्यंत माझी सुटका होत नाही असाच माझा ग्रह आता झाला आहे.

वासुदेवराव जोशी अद्यापि आले नाहीत. खापर्डे विलायतेहून आले ह्मणजे तुम्ही व ते असे मिळूनच मला भेटावयास या. बाबामहाराजांची इस्टेट व स्वतः माझी घरगुती मिळकत यांच्या व्यवस्थेविषयी त्यांचा सल्ला घेऊन मला काही गोष्टी ठरवावयाच्या आहेत. मात्र येथील तुरुंगाच्या अधिकाऱ्याना आधी लिहून परवानगी काढून मगच निघा. नाहीतर तुमचे श्रम व पैसा फुकट जाऊन निराशेचे दुःख होईल.

आमच्या संपादक मंडळात अलीकडे काय बदलाबदली झाल्या त्या माझ्या नीट लक्षात आल्या. परंतु त्याविषयी येथून आजच मत कसे बनविणार? मला त्याविषयी आणखी थोडी माहिती पाहिजे. कसेहि असो. केळकराना ह्मणावे तुम्ही मराठा पत्राचे संपादकत्व त्यावर नाव घालून आपल्या हाती लवकरच घ्या. दोन पत्रावर दोन निरनिराळी नावे असणे अधिक सुरक्षित. परंतु दुसरा याहून मोठा जो प्रश्न आहे त्याचा निकाल आपण समक्ष भेटीत करू.

महादेवशास्त्री किंवा नटेसन याजकडून पुस्तके आली नाहीत. जिनसीवाले यांचे पुस्तकसंग्रहात पाहून एकदम पाठवा. हेगेलचे पुस्तकाची मला फार गरज आहे. ते विलायतेहून आणून पाठविण्यास रामचंद्र गोविंद याना सांगावे.

कर्जफेडीची व्यवस्था काय केली आहेस? श्रीनिवासराव (परांजपे) यंदाहि काही रकम देऊ शकेल अशी आशा आहे. तसे झाल्यास गतवर्षीप्रमाणे वासुदेवराव यांच्या देण्यापैकी काही देऊन टाक. तुह्मी भेटावयास याल तोपर्यंत तुमच्या पत्रातील सर्व प्रश्नांची उत्तरे मी ठरवून ठेवतो. किंबहुना तुमच्या हाती माझ्या मृत्युपत्राच्या रूपाने सर्व गोष्टी लिहून देईन असे समजा.

काल थोडा पाऊस पडला. त्यामुळे आज थोडे गार वाटते. पण त्यामुळेच उद्या उष्णता अधिक भासेल त्याची वाट काय? केळकर खाडिलकर लिमये याना नमस्कार. रावसाहेब बापट दाजीसाहेब खरे रा. ब. पेंडसे रा. बोडस वगैरे मंडळी खुशाल आहेत ना? ते भेटतील तेव्हा माझे नमस्कार कळवा. सदाशिवराव भावे याना ह्मणावे की वाटेल तो आपल्या लायब्ररीतून पुस्तके बाहेर नेतो तरी यादीप्रमाणे सर्व मस्त मागवावी. •

ता. क. माझ्या सुटकेसंबंधाने आणखी प्रयत्न कोणते करावयाचे याचा विचार समक्ष भेटीत करू.

---

(५)

१ मे १९०९

तुमचे व खापर्डे यांचे अशी पत्रे पोचली. सोबत उत्तर लिहिले आहे ते वाचून खापर्डे याजकडे पाठीव. वासुदेवराव जोशी येऊन भेटले. बक्षिसपत्र आणि मुखत्यारपत्र यांजवर ता० ७ एप्रिल रोजी माझ्या रीतसर सह्या झाल्या. नोंदणीची मुदत चारच महिने असते तरी राघवय्या यांच्या विचारे कागद लवकर नोंदवून घ्या.

अंदमान बेटांतील हवा कशी काय असते त्याची माहिती रंगून येथे कदाचित् मिळेल. ती काढण्याला वासुदेवराव याना सांगितले आहे. ती मला पुढील पत्रात लिहावी. केळकराना म्हणावे की अंदमान बेटाच्या कारभाराचे रिपोर्ट आपल्या कचेरीकडे येतात ते पाहून तेथे दरसाल किती पाऊस पडतो उष्णता कोठपर्यंत वाढते ही माहिती कळवावी. जर तेथील हवा अधीक गार असली तर मला तेथे ठेवण्याविषयी सरकारास लिहिण्याचा माझा विचार आहे. तेथे कैद्याना काही अटीवर मोकळेहि सोडतात असे म्हणतात. तसे घडल्यास तेथील थंड हवेचा फायदा माझ्या प्रकृतीला होईल. येथे एप्रिल वाटला इतका त्रासदायक झाला नाही. मधून मधून पाऊस पडला म्हणून प्रकृति आहे अशीच राहिली. बिघडली नाही.

मला पूर्वीपासून हिरडया सुजण्याचा विकार आहे व त्याकरिता अलीकडे मी टूथ पावडर वापरीत असतो हे तुम्हास माहितच आहे. हल्ली तर उजव्या हातच्या वरच्या हिरडया सुजून पुवाळल्याहि आहेत. किंचित घाण मारते. कॅलव्हर्टच्या कॅरबॉलिक टूथ पावडरचा उपयोग करतो. डॉक्टर गर्दांना याविषयी विचारून काही होमिओपाथिक औषध त्यानी सांगितले तर त्याचे नाव कळीव. येथे सुपरिंटेंडेंटकडून मागवीन. मात्र हे नाही तर ते अशी दोनतीन औषधे सुचवा असे डॉ. गर्दे याना सांग.

वासुदेवराव गांधी प्लेगने वारल्याचे कळले. मनुष्य तरुण होतकरू होता. भिंगारकर व गांधी याशिवाय आपल्या मंडळीपैकी प्लेगला कोणी बळी पडले नाही ना ?

चि. जगन्नाथ यांच्या शिकण्याची व्यवस्था केल्याचे तुम्ही लिहिलेत. ती व्यवस्था ठीक आहे. त्यांच्या मुकदम्यातील दिवाणी अपिलाचा निकाल लागल्यावर आणखी चांगली व्यवस्था काय करिता येईल पाहू. अपील जुलै आगस्टात निघेल. याविषयी दाजीसाहेब खरे याना कायद्याचे काही मुद्दे लिहिणार आहे. जून पासून

ते निवडणुकीच्या धांदलीतून बहुधा मोकळे होतील. दादासाहेब करंदीकर मध्य-भागाकरिता निवडणुकीस उभे राहणार नसतील तर केळकर याना म्हणावे की तुम्हीच आतापासून तयारीला लागा. आपण निवडून येणार नाही असे केळकर याना वाटत असल्यास रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी याना उभे करावे. मात्र त्यांच्या निवडणुकीचे सर्व काम आपल्या मंडळींना करावे लागणार हे लक्षात ठेवा. कसेहि असो पण ही जागा आपल्या मंडळीबाहेर जाऊ देऊ नका.

चि. गंगाधर महाजन शेतकी कॉलेजची शेवटची परीक्षा पास झाला. चांगले झाले. त्याला म्हणावे तुझी इच्छा असल्यास सरकारी नोकरी धर. तिकडे अजून जागा व बढती मिळण्यासारखी आहे. साने यांचा बर्लिन येथील पत्ता आणि मायरॅम फेल्प्स यांचा न्यूयार्क येथील पत्ता खापर्डे याना कळवा. या दोघाना भेटण्याविषयी मी खापर्डे याना लिहीत आहे.

मी मृत्युपत्र लिहून ठेवण्याचे योजनेत आहे. तरी आपण कोणाचे किती कर्ज देणे याची यादी तावडतोब करावी. तुम्ही स्वतः लातूरला जा. श्रीनिवास यास भेटून नमस्कार सांगा. त्याला म्हणावे की सालमजकूरचा गिरणीच्या फायद्यातील हिस्सा होईल तितका आम्हाला रोख देऊन टाक. फार गरज आहे.

केसरी व मराठा या पत्रांची नोंद तारहपीसात करण्याकरिता तुम्ही फर्मे भरून पाठविले. ते सह्या करून परत पाठविले आहेत. मात्र माझी इच्छा अशी की या कामाकरिता माझे नाव होता होईल तो उपयोगात आणू नये. येथे टेलिग्राफ गाईड काढून पाहिले. पण तारेने बातमी आणविण्याकरिता सवलतीचे दर मिळावे म्हणून अर्ज करावा लागतो तो वर्तमानपत्राच्या मालकानेच केला पाहिजे की काय हे त्यावरून कळेना.

घरी कुटुंबाला व मुलाना माझी पत्रे वाचून समजावून सांगत जा. त्याना म्हणावे धीर धरा आनंदात रहा. आपल्याला काळ तूर्त प्रतिकूल आहे. पण त्याला विनतक्रार मान लववून पुढे दिवस चांगले येतील अशी आशा करीत राहणे हाच खरा मार्ग. खरे याना रा. सा. बापट यानी काही काम सांगितले आहे ते काम खरे करतील अशी आशा आहे. सर्व इतर मंडळींना नमस्कार. वासुदेवराव जोशी भेटून गेल्यामुळे मला भेटण्याला यापुढे येत्या जुलैपर्यंत कोणास परवानगी मिळणार नाही.

---

## ( ६ )

५ जून १९०९

तुझे पत्र व औषधे पोचली. काही दिवस ती घेतो मग गुण कळवितो. हिरडीच्या दुखण्याखेरीज प्रकृति बरी आहे. १० मे पासून इकडे तुफानी हवा सुरू

झाली. यामुळे उष्णता ११९ पर्यंत वाढली होती ती आता कमी झाली. २५ मे पासून बडी बरसात सुरू झाली. कोणी म्हणतात ब्रह्मदेशात हे नवल घडले. कसेहि असो. तेव्हापासून दरदिवसाआड पाऊस पडत आहे. ८ मे रोजी संध्याकाळी साडेपाच वाजता भूकंपाचा लहानसा धक्का बसला. तळमजल्यावर जेवण करून जिन्याच्या खालच्या पायरीवर आचाऱ्याशी बोलत बसलो होतो. इतक्यात जिना हादरला व हाललाहि. आचारी भांबावून गेला. पण मी तेव्हाच खरा प्रकार ओळखून त्याला समजावून दिले.

अंदमान बेटे व पोर्ट ब्लेअर येथील हवेची माहिती लिहिली ती कळली. तेथील हवा मुंबईच्या हवेसारखी असावीसे दिसते. कसेहि म्हटले तरी मंडालेच्या हवेपेक्षा पुष्कळच चांगली असणार. पण यंदाचा उन्हाळा आता पार पडलाच. तेव्हा मला अंदमानला पाठवा म्हणून अर्ज करणार आहे तो जरा सावकाश करू.

वासुदेवरावाना विचार की त्यांच्या माहितीप्रमाणे अंदमान येथे मी सांगितलेल्या वस्तू मिळतात का? व किंमत काय पडते?

खापर्डे लिहितात की 'आणखी तनिचार महिने परत येत नाही.' तेव्हा आता काय करावे?

रायगड येथील समाधीविषयी दाजीसाहेब खरे याना सांगावे की हे बांधकाम उगाच भारी खर्चाचे करावे असे मला वाटत नाही. आपल्या हाती फंड २५०००. सरकारची देणगी धरून ३०००० होतील. पैकी दहा हजार तरी गंगाजळीसारखे बाजूला काढून ठेवलेच पाहिजेत. एरवी सालोसाल पूजाअर्चा वगैरेचा खर्च कसा करणार? समाधीची दुरुस्ती आणि छत्री या दोहोवर मिळून वीस हजारांहून अधिक खर्च होऊ नये. म्हणजे सुरवातीचा अंदाज सोळा हजारांचाच धरावा. तेव्हा वर हातचे चार हजार घालून काम पुरे होईल. अंदाजात वाढावा होतच असतो. वीस हजारात एखादी मोठी किंवा कलाकुसरीची इमारत उठविणे शक्य नाही. छत्री मजबूत टिकाऊ व्हावी देखणी नसली तरी चालेल. आणि तशी ती आहे त्या रकमेत बांधता येईल. पंधरा हजारात छत्रीचे काम उरकले तरी बरे. कारण गडावरील महादेवाच्या देवळाची दुरुस्ती करण्याला पांच हजार रुपये मिळाले तर हवेच आहेत. सिंहगडावर राजारामाची समाधि आहे. तोच नमुना का होईना? आहे ओबडधोबडच पण दोनअडीचशे वर्षे टिकली आहे. कोल्हापुरासहि तेथील महाराजानी बांधलेल्या काही छत्र्या आहेत ते नमुनेहि वाटेल तर पहावे आणि मग पक्का नकाशा व अंदाजपत्रक करावे. पुन्हा एकवेळ सार्वजनिक विनंति करून छत्रीच्या कामाकरिता आणखी पैसे जमविता येतील असे दाजीसाहेब खरे याना वाटत असेल तर तेहि अवश्य करून पहावे. पण प्रत्यक्ष पैसा हाती आल्याशिवाय वाढत्या रकमेचे अंदाजपत्रक करू नये. रायगड हा एका बाजूस असल्याने भारी किमतीची छत्री नसली तरी चालेल. शेदोनशे वर्षे टिकेल अशी मात्र असावी.

मुलानी सहा महिन्यात अभ्यास काय कसा केला ते कळवावे. त्याना म्हणावे पहिल्या दहात नंबर राहिला पाहिजे!

सोबत वेगळ्या कागदावर हायकोर्टातील ताईमहाराज मुकदम्यातील अपीलाविषयी काही कायदेशीर मुद्दे टिपून पाठविले आहेत ते खरे याना द्यावे. व काम निघेल तेव्हा करंदीकर याना हजर राहून मदत करण्यास विनंति करावी. यशवंतराव कुळकर्णी समक्ष हजर राहून सर्व व्यवस्था करतीलच. त्याना वेगळे लिहिण्याचे कारण नाही. तरी पण माझा निरोप म्हणून मुद्दाम सांगा.

कोर्ट ऑफ वॉर्डसने कोणती कर्जे मान्य केली कोणती अमान्य केली ते पुढच्या पत्रात लिहा.

कठ व काठक एवढी दोनच उपनिषदे अजून मला मिळावयाची आहेत ती पाठवावी. कमजास्त असेल ते लिहावे. सर्वांस नमस्कार.

---

## ( ६ अ )

मेक्टिला ३० जून १९०९

दादासाहेब खापर्डे यास—

सा. न. वि. वि. मी हल्ली मेक्टिला येथे आलो आहे. मेक्टिला हा मिथिला या शब्दाचा ब्रह्मी भाषेतील अपभ्रंश होय असे मानतात. तेव्हा मी आता जनकाच्या नगरीला आलो. पण मला आपली सीता म्हणजे माझी स्वतंत्रता मिळते किंवा नाही तेवढेच पहावयाचे आहे!

हाऊस ऑफ लॉर्डस् हे एक प्रयत्नाचे द्वार खरे. पण प्रीव्हि कौन्सिलचा अध्यक्ष तोच तिकडील! मग कसे होणार? हाऊस ऑफ लॉर्डस् पुढे कोणी तोंडी तक्रार मांडली तर एक नवीन मुद्दा मांडता येईल तो असा. प्रीव्हि कौन्सिलपुढे काम चालले तेव्हा आमच्या बॅरिस्टराने तक्रार मांडली की शिक्षा झालेले दोन लेख आरोपाकरता वेगवेगळे घेतले पाहिजेत. यावर लॉर्ड हॅल्सबरी हे म्हणाले की एक लेख आरोपाचा मानला तर दुसरा तो गुन्हा सिद्ध करणारा पुरावा म्हणून दाखल करता येतो. पण त्यावरहि कोटि शिल्लक उरते ती अशी की दुसरा लेख पुराव्याकरिता म्हणून घेतला तर त्याचा उपयोग फक्त पहिल्या लेखावर शिक्षा देण्यापुरताच करता येईल. त्या दुसऱ्या लेखावरहि शिक्षा देता येणार नाही. पण मला दोन्ही लेखाकरिता म्हणून दुप्पट शिक्षा दिली गेली आहे. कीरहार्डी व मायरॅम् फेल्प्स् याना माझे नमस्कार सांगा.

---

## ( ७ )

मेक्टिला ३० जुलै १९०९

आमच्या तुरुंगात पटकीचा आजार एकदम सुरू झाला म्हणून मला येथील तुरुंगात ता. १९ रोजी आणून ठेविले. ही बातमी तुम्हाला तारेने कळविलीच

होती. जागा एकदम बदलली आणि तीहि बहुधा थोड्या दिवसाकरिताच असावी अशा समजुतीने जरूर त्याशिवाय पुस्तके व कपडेहि मंडालेसच ठेवून आलो. तिकडे लवकर परत न गेलो तर सर्व येथे मागवीन. मंडालेचा तुरुंग सगळा खाली करण्यात आला. बाहेर बागेत झोपड्या घालून त्यात कैदी ठेवले आहेत. याच-करिता आणखी काही दिवस थांबा अशी तार सुपरिंटेंडेंट याने तुम्हाला पाठविली. ते सगळेच या नव्या कामात गुंतले होते. तरी पण तुम्हाला हे पत्र पावताच निघता येईल तर निघून येथे भेटीस यावे. मी नक्की कोठे आहे अशाविषयी तुम्हाला रंगून येथेच कळेल. रंगून ते मंडाले या रस्त्यापासून पूर्वेकडे एक रेल्वेचा फाटा फुटतो त्यावरचे मेक्टिला हे एक स्टेशन आहे. मंडालेपासून ताझी चार तास आणि ताझी ते मेक्टिला एक तास इतका आगगाडीचा प्रवास आहे.

माझी नवी जागा मंडालेहून पुष्कळच थंड आहे. शहराला लागून एक मोठा तलाव सात आठ मैल परिघाचा आहे.

गेल्या महिन्यात पाऊस नव्हता तो आता पडतो.

माझ्या खाण्यापिण्याराहण्याची व्यवस्था मंडालेसारखीच आहे. मला दिलेला आचारी मजबरोबरच येथे आला आहे. त्याचे नाव वासुदेव रामराव कुळकर्णी. तो सातारा जिल्ह्यांतील कलेढोण गावचा राहणारा आहे.

तुम्ही याल ते कलकत्त्याकडून या. मद्रासेकडून येऊ नका. कारण या दिव-सांत बंगालचा उपसागर स्थिर नसतो. कलकत्त्यास मोती बाबू यांजकडे उतरा-वयाचे असेल तर त्याना आधी लिहा.

सौभाग्यवतीची प्रकृती मे जूनमध्ये बिघडल्याचे ऐकून वाईट वाटले. मधु-मेहाचा विकार मोठा दुष्ट आहे. पण तिने धीर धरून कसे तरी दिवस काढले पाहिजेत. इलाज नाही. प्रसंग परीक्षा पहाणाराच आहे. परंतु त्यातहि आनंदानेच राहिले पाहिजे.

तुम्ही व वासुदेवराव जोशी मिळून मुंबईस जा आणि देशमुख बोडस खरे याना भेटून साने यांची स्कॉलर्शिप आणखी दोन वर्षे वाढेल अशी खटपट करा. ही दोन वर्षे पूर्वीच्या अंदाजात नव्हती असे नाही म्हणून हे काम सहज होईल. साने जर्मनीला जाण्यापूर्वीच ही गोष्ट जवळ जवळ ठरल्यासारखी झाली होती. स्कॉलर्शिपची मुदत वाढली नाही तर कसेहि करून शेवटची पदवी घेईपर्यंत साने याना आपणाला निदान आपल्या पदरचे पैसे देऊन त्यांची गरज भागविली पाहिजे. तसेच साने यांच्या बंधूना लिहून कळवा की साने परत येण्याची त्यानी उगीच घाई लावू नये.

मुंबईहून विश्वनाथ बाबाजी मराठे यानी माझ्या जन्मतिथीच्या दिवशी तार पाठविली याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे असे त्याना कळवा. खाली लिहिलेली पुस्तके पाठवा.

१. स्टोरी ऑफ नेशन्स सीरीजपैकी जर्मनी टर्की स्वित्सर्लंड बायझंटाईन साम्राज्य ऑस्ट्रिया अर्वाचीन इटली व सॅरासन हे सात खंड. हे आपण आणलेल्या नव्या पुस्तकात आहेत.

२. शिक्षकाच्या मदतीशिवाय जर्मन भाषा शिकता येईल अशी पुस्तके (तारापूर बुकसेलर याला विचारून पाठविणे).

३. तालचेरकर यांचे फ्रेंच प्रायमर–ज्यात मराठीतून उच्चार लिहिले आहेत ते (रामचंद्र गोविंदकडे मिळेल.)

ता. क.–ही पुस्तके भांडारकरांच्या संस्कृत पुस्तकांशारखी आहेत. हवे तर बोडसाना सांगा. ते आणवून देतील. याल तेव्हा बरोबर आठवतील त्या सर्व मुद्यांचे टिपण करून आणा. गर्दीत आयत्या वेळी विसरावयाला होते. निघण्यापूर्वी तार करा.

---

(८)

३ ऑगस्ट १९०९

तुमचे पत्र मुलांच्या अभ्यासाविषयी कवडे यांचा रिपोर्ट कोर्ट ऑफ वॉर्डस याना केलेला अर्ज हे सर्व कागद पोचले. ट्रस्टींनी केलेला खर्च हे कर्ज मानावे व कोल्हापूरच्या इस्टेटचाहि चार्ज घ्यावा अशी मागणी कोर्ट ऑफ वॉर्ड्स-पुढे मांडण्यात आली हे चांगले झाले. रु. ३११८८३–३–५ एवढी आमच्या कर्जाची रकम काढली ती बरोबर आहे. इस्टेटीवर ज्यानी परस्पर हुकूमनामे मिळविले त्यांचे आम्ही काही लागत नाही हे खरे. तरी पण कर्जफेडीचा मार्ग त्याना दाखविणे हे ट्रस्टींचे नैतिक कर्तव्य आहे.

कवडे हे मुलांच्या शिक्षणाकरिता रात्रंदिवस मेहेनत घेतात कसूर करीत नाहीत हे वाचून बरे वाटले. थोडा अधिक वेळ लागला तरी चालेल पण अभ्यास झाला तो पक्का व्हावा. कवडेशास्त्री हे जे श्रम घेतील त्यांचे मी चीजच करीन. मथूला सातव्या इयत्तेपर्यंतचे इंग्रजी शिकवावे.

खापर्डे येत्या डिसेंबर किंवा जानेवारीपर्यंत परत येतो म्हणतात.

बजाबा बाळाजी नेने यांचा एक हस्तलिखित ग्रंथ वैद्यक व वनस्पतिशास्त्र यावर लिहिलेला आमचेकडे होता. श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यानी तो वाचून परत केला आहे. तो त्या पार्सलच्या पेटीतच आहे. सोलापूरचे भिषग्विलासकर्ते डॉ. रानडे हा ग्रंथ आपल्या मासिकात हप्त्याने छापू म्हणतात. त्याना मी परस्पर लिहून परवानगी दिली आहे. अट इतकीच घातली आहे की वनस्पतींची चित्रे बजाबानी तयार केली तशीच छापली पाहिजेत. आणि छापण्याकरिता मूळ ग्रंथाची प्रत त्यानी आमचे कचेरीतच मनुष्य बसवून करून नेतली पाहिजे. कारण कधी काळी छापले जाणारे असले मौल्यवान हस्तलिखित कोण कुणाच्या स्वाधीन करील?

बजावा हे स्वतः रानात जात आणि वनस्पति आणून त्यांची चित्रे काळजीपूर्वक काढीत. डॉ. रानडे तुम्हाला किंवा केळकराना येऊन भेटतील. तरी वरीलप्रमाणे करावे.

वासुदेवराव समजतात की मी कॅलक्युलसवर ग्रंथ लिहीत आहे. पण ते खरे नाही. त्यांचे मित्र रा. पवार यानी त्या विषयावर खुशाल ग्रंथ लिहावा. मी स्वतःची ह्मणून एक उपपत्ति या विषयाच्या मूळ तत्वासंबंधी मनात बसवित आहे. पण ती पक्की बसली तर त्यावर इंग्रजीत एक निबंध लिहिणार आहे. मराठीत नाही. पवार मास्तर यांजपाशी ही गोष्ट दोन वर्षांपूर्वी सिंहगडास बोललो होतो. त्यावरूनच वासुदेवराव विचारीत असावे.

ता. २२ ऑगष्ट रोजी मला शिक्षा होऊन एक वर्ष भरते म्हणून माझ्या प्रकृतीविषयी काही माहिती तपशीलवार देतो. वृषणवृद्धी अपचन बद्धकोष्ट हिरड्यांची सूज व मधुमेह इतके विकार मला हळूहळू जडले होते. ही गोष्ट मी अहमदाबाद येथील जेल डॉक्टरला सांगितली. पण त्यानी मजवर काय म्हणून विश्वास टाकावा ! त्याने प्रयोगाकरिता ह्मणून तुरुंगातील ठराविक अन्नावर एक महिनाभर ठेवले. त्यामुळे वजन १० पौंड कमी झाले आणि हिरड्यांचे दुखणे बळावले. मग खात्री पटून त्याने मला दूध तूप व भात देण्यास सुरवात केली. तीच सवलत आजवर चालू राहिली आहे. यामुळे माझे वजन वाढले व प्रकृति सुधारली. आज वजन १२५ पौंड आहे. शिक्षा झाल्या दिवशी १२६ च होते. पहिला विकार आहे तसाच आहे. त्यावर काहीच इलाज केलेला नाही. दुसरा विकार काही पाचक गोळ्या व काही मिश्रण घेऊन थोडासा ताब्यात ठेविता आला आहे. टुथ पावडर वापरल्याने हिरड्याचा रोग बळावत नाही. गर्दे यांच्या औषधाने गुण आला नाही. पण पुन्हा घेऊन पाहतो. एक दाढ गतवर्षी पडली. यंदा वरचा पुढचा दात हलू लागला तोहि कदाचित् पडेल. उतारवय व अपचन यांचा हा परिणाम. त्याला कोण काय करणार ? मधुमेह बळावलेला नाही. अपचन थांबविले असता तो कह्यात राहतो. तात्पर्य, एक वर्षाच्या बंदीवासानंतरहि माझी प्रकृति विशेष बिघडलेली नाही. याबद्दल सरकारचे आभार मानलेच पाहिजेत. पण येथील सुपरिंटेंडेंट साहेबांचेच विशेष. कारण सात्त्विक अन्नाची सवलत त्यानी दिली म्हणूनच मिळाली आणि ते अन्नहि आपल्या देशी पद्धतीनेच शिजविण्याला ते परवानगी देतात. लिंबाचा रसहि थोडाथोडा रोज घेतो. आता या खेरीज बंदीवासाची इतर दुःखे आहेत. पण त्याविषयी बोलून काय उपयोग ! बोलून चालून शिक्षा म्हणूनच बंदीवास दिला. अर्थात् शिक्षा म्हणूनच तो सोसला पाहिजे. पण बंदीवासातहि प्रकृति कशी काय आहे हा अर्थातच एक महत्वाचा मुद्दा होय. आणि ती बरी आहे असे मी आनंदाने ह्मणतो.

हवा आता बरीच थंड झाली आहे तरी जूनपासून म्हणण्यासारखा पाऊस नाही. आकाश निरभ्र असते आणि मध्यरात्रीनंतर वारा थंडगार सुटतो. दोनप्रहरी

मात्र घामाने चिक चिक किती होते ते विचारू नको. तरी एप्रिल मे इतकी उष्णता नाहीच.

वरील सर्व हकिकत सौभाग्यवतीला अक्षरशः भाषांतर करून सांग. आणि उलट तिच्या प्रकृतीची अशीच तपशीलवार हकीगत मला कळीव. सुपरिंटेंडेंट याला विचारले तो म्हणाला तुमच्या भाच्याला मार्च अखेर येऊ दे. भेटू देईन. म्हणून परवानगी मागण्याकरिता वेगळे पत्र लिहू नको. पण पुण्याहून निघाल्याची तार कर. म्हणजे मी मृत्युपत्राचा मसुदा पक्का करून ठेवीन. केळकर यानाहि भेटण्याची मला इच्छा आहे. पण दोघानी पुणे सोडून एकदम येणे बरे नव्हे. म्हणून केळकर यानी खापर्डे यांचेबरोबर पुढे केव्हातरी यावे.

काठकोपनिषद् व आठवले यांचे श्रौतसंबंधी पुस्तक पोचले. त्यांच्या पुस्तकाने स्वतंत्रपणे वैदिक यज्ञकर्मासंबंधी म्हणजे कालमानासंबंधी माझीच काही काही अनुमाने अधिक दृढ झाली. आणि तीहि त्यांच्या स्वतंत्र विचारसरणीने म्हणून त्यांची किंमत. प्रो. आठवले याना मी फार आभारी आहे असे कळीव. आर्यांच्या वसतिस्थानाविषयींच्या माझ्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढीन तेव्हा त्यांचा हा निबंध परिशिष्ट म्हणून देण्यासारिखा आहे. ज्योतिर्गणिताच्या दृष्टीने त्यानी बरेच परिश्रम घेतलेले दिसतात. त्याना माझा निरोप सांगून म्हणावे आपल्या निबंधाच्या प्रती बनारस संस्कृत कॉलेजचे पंडित सुधाकर द्विवेदी आणि डॉ. भांडारकर वगैरे इतर विद्वानाकडे पाठवा. तसेच जर्मनी व अमेरिका या देशांतील संस्कृत पंडितानाहि पाठवा.

मुंबई सोडण्यापूर्वी जोशी बोडस खरे वगैरेना भेटून ये. म्हणजे कोणास काही सांगावयाचे असल्यास कळेल. तुझ्या नांवाचे एक मुखत्यारपत्र मी खाजगी कामाकरिता, ट्रस्टी म्हणून नव्हे, करून देणार आहे. राघवय्याकडून इंग्रजीत तयार करवून आण. म्हणजे सही करून तुजजवळ परत देतो. ही गोष्ट आता मला केलीच पाहिजे. कारण माझी सुटका होण्याचा संभव मला फारच दूर दिसतो.

ता.क. घरी वापरतो तसली एक लोखंडाची पळी घेऊन ये. बरोबर आणण्याच्या पुस्तकांची व जिनसांची यादी खाली दिली आहे. त्यातली मिळतील ती घेऊन ये. उरलेली विलायतेहून आणवून पाठवा असे रामचंद्र गोविंद याना सांग.

१. धोतरे सवा दोन हातीं. २. पक्का जानवी जोड. ३. बायबलची एक प्रत. ४. आपटे यांची संस्कृत-इंग्लिश डिक्शनरी-मोठी मी उपयोगांत आणलेली. ५. चेंबरचा व्युत्पत्तिप्रणीत इंग्लिश शब्दकोश. माझा जर रामभाऊला पाहिजे असेल तर एक नवीन घेऊन पाठवा. ६. इंग्लंडमध्ये टूशनर यानी प्रसिद्ध केलेला मनु. ( जनरल लायब्ररीतून. ) ७. सोशीऑलॉजी बाय स्पेन्सर.—इंटर नॅशनल सायंटिफिक सेरीज—जनरल लायब्ररीतून. ८. जेव्हॉन्स प्रिन्सिपल्स ऑफ सायन्स —जिनसीवाले यांच्या लायब्ररीतून. ९. वर्क्स सिलेक्ट वर्क्स बाय ई. जे. पेन. (तीन भागांत). १०. मिल्टन्स एरोपेगॉटिका. ११. डॉ. कॉर्नेज एथिकल प्रॉब्लेम.

जिनसीवाले यांच्या लायब्ररीतून. १२. श्रीपतीज एसे ऑन् वेदांतिझम्. १३ मायकॅव्हेलीचा 'प्रिन्स.' १४. कॉर्नवॉल—ल्यूइस—गव्हर्नमेंट ऑफ डिपेंडन्सिज. १५. हॅरिसन—ऑर्डर अँड प्रोग्रेस (नवीन पुस्तकांतून). मुंबईत घ्यावयाची ती १६. हेकेलचे ग्रंथ. १७. बटलर्स वर्क्स; दोन भाग—ग्लॅडस्टन्. १८. लॉक ऑन् सिव्हिल गव्हर्नमेंट. १९. आयडियल कॉमन—वेल्थ. २०. डार्विनिझम अँड पॉलिटिक्स. २१. डार्विनिझम अँड रेस प्रोग्रेस २२. रूसोज सोशल कॉंट्रॅक्ट. २३. ह्यूम्स एसेज आर. पी. ए. सीरीज. २४. फंडमेंटल प्रिन्सिपल्स ऑफ पॉझिटिव्हिझम. २५, २६, २७. मोर्ले, व्हॉलटेअर, डिडरॉट, रूसो. २८. ए स्कूल अॅटलास ऑफ एन्घट अँड मॉडर्न जॉग्रफी वुइथ इंडेक्स. २९. तुकारामाची गाथा. ३०. दासबोध.

(९)

१४ सप्टेंबर १९०९

याच महिन्यात तुझी समक्ष गाठ पडली. म्हणून या महिन्याचे पत्र लिहिणार नव्हतो. पण आता लिहितो याचे कारण मला येथे ता. ९ रोजी परत आणले. अजून हवा फार उष्ण आहे. नव्हेंबरपर्यंत अशीच राहणार. माझी प्रकृती तुह्मी मेक्टिला येथे समक्ष पाहिली तशीच आहे.

खापर्डे ता. १२ ऑगस्टच्या पत्रात लिहितात की पार्लमेंटकडील अर्ज अद्यापि दाखल झाला नाही. म्हणून विलायतेहून तूर्त परत येता येत नाही. वर्ष अखेरपर्यंत ते तेथे राहतील असे समजून तुह्मी त्यांची व्यवस्था करावी. बटलरचे ग्रंथ पोचले. बाकीचे मागाहून लवकरच येतील. असे रामचंद्र गोविंदच्या पत्रात आहे. खापर्डे यानीहि ऑगस्टस कॉंट यांचे चार ग्रंथ पाठविल्याचे लिहिले आहे. लवकरच हाती येतील. म्हणून यापुढे काही महिनेपर्यंत नवी पुस्तके नकोत.

समक्ष भेटीत अनेक गोष्टी सांगितल्या त्यांचे काय काय झाले ते पुढील पत्रात कळीव. साने यांची स्कॉलरशिप आणि मथूचे इंग्रजी शिक्षण यांची व्यवस्था झाली असेलच. कोरी नोटबुके तुह्मी पाठविली ती मिळाली.

(१०)

२३ नव्हेंबर १९०९

गेल्या दोन महिन्यात पत्राच्या बाबतीतील माझी सवलत काढून घेतली होती. ती या महिन्यापासून फिरून परत देण्यात आली याबद्दल आनंद वाटतो. यापुढे दरमहा पत्र पाठवीत जाईन. आज कार्तिकी एकादशीचा उपवास आहे. प्रकृती ठीक आहे. मेक्टिला येथे दोन पौंड वजन कमी झाले होते ते येथे भरून निघाले. हिंवाळा सुरू झाला. तेव्हां आता पुढे तीन महिने हवा मोठी गोड राहील.

साने यांची स्कॉलरशिप वाढली. चांगले झाले. मथूला बोलावणे आले असल्यास अलाहाबादेस काही दिवस पाठवा. तिलाहि थोडा थोरपालट होईल. दुर्गाबाईचे मूल गेले हे वाचून वाईट वाटले. पण होणाराला इलाज काय ! तिला काही दिवस पुण्यास आणवावी. सौभाग्यवतीची प्रकृती सुधारत असल्याचे कळवावे. डॉ. गर्दे तिकडे लक्ष देतच आहेत पण मधुमेह हा रोग निस्तोष होण्यासारखा नाही. पण औषध घेत असावे. मुले चार विषयापैकी तीन विषयात चांगली पास न झाली तर त्याना वरच्या वर्गात घालू नये. मला घाई नको. फक्त अभ्यासाचा पक्केपणा पाहिजे. शरिराची उंची वाढावी बुद्धीला तरतरी यावी असे तर त्यांचे आज वय आहे. जगन्नाथमहाराज यांचीहि अशीच काळजी घ्यावी.

मेक्टिला येथे समक्ष सांगितलेल्याप्रमाणे झाले असेलच. केळकर व खाडिलकर या दोघानाहि सांगावे की मी तेथे नाही म्हणून पहिली गोष्ट संभाळण्याची ती ही की आपली केसरी मराठा संस्था अगदी पूर्वीसारखीच चालली पाहिजे. आजूबाजूच्या गोष्टींचा विचार नंतर करावा. त्यानी हे केले तर या संस्थेशी ज्यांचा ज्यांचा म्हणून संबंध त्यांची त्यांची अत्यंत मौल्यवान् अशी सेवा त्यांच्या हातून घडली असे मी समजेन. पुढील पत्रात याविषयी अवश्य लिही.

गेल्या महिन्यात मला तीन दिवस इन्फ्लुएन्झाचा ताप आला होता. पण १०२-५ वर चढला नाही. यामुळे वजन कमी झाले नाही. फक्त शरीरातील दूषित द्रव्ये तापामुळे आयतीच बाहेर पडली म्हणावयाची !

खापर्डे फेब्रुवारीपर्यंत परत न आले तर तुह्मी एकटेच भेटीला यावे. ते भेटावयाला येण्यापूर्वी त्याना माझे मृत्युपत्र वाचावयास दे. केळकर अगर इतर आपली मंडळी याना मृत्युपत्राचा मसुदा दाखवा व त्यांच्या काही सूचना असतील तर आणा. अंदमान बेटाकडे बदली करून घेण्याविषयी अर्ज करण्याचा विचार मी तूर्त तहकूब केला आहे.

प्रो. पाठक व रा. काळे याना ह्मणावे की मी 'गवामयनम्' हा निबंध वाचला. माझ्या मते त्यांची उपपत्ति बरोबर नाही. त्यानी लावलेले शब्दांचे अर्थ मला पटत नाहीत.

पुढील महिन्यात मी फ्रेंच भाषेचा पहिला अभ्यासक्रम संपवीन. मग जर्मन शिकण्यास सुरवात करीन. तरी इंग्रजीत लिहिलेले एखादे मोठे जर्मन व्याकरण पाठवा. व्याकरण संपूर्ण असावे. खापर्डे यास कळवावे की तुमच्या हातून होणे ती सर्व खटपट तुह्मी केलीच आहे. तरी आता विलंब न करिता इकडे परत यावे. माझा अर्ज राजेबादशहा किंवा मुख्य प्रधान यांजकडे पाठवावा. मला सोडावयाचे तर काही शर्ती घालतात की काय हे कळवावे. तुम्हास भेटण्याची फार उत्कंठा आहे.

( परिशिष्ट )

भाईमहाराज प्रकरणी दिवाणी अपीलातील मुद्दे.

१ आपण हायकोर्टात जाब देणारे ( respondent ) आहोत. वाकिलाला बोलण्याची संधि एकदाच मिळणार म्हणून आपली बाजू होईल तितकी संपूर्ण मांडावी.

२ कायद्याचा मुख्य मुद्दा म्हटला म्हणजे दत्तकहोमाचा. परंतु या प्रकरणी-दत्तक घेतलेला मुलगा सगोत्रच नव्हे तर सपिंडहि आहे म्हणून दत्तकहोम आवश्यक नव्हता. पुतण्या दत्तक घेतला असता दत्तकहोम लागत नाही. पण पुतण्या हे सगोत्र सपिंडाचे उपलक्षण समजावे.

३ या विषयींचे नियम स्टील्चे पुस्तक व धर्मसिंधु यात सापडतील. मंडलीक यांचाहि ग्रंथ पहावा. दत्तकचंद्रिका व दत्तकमीमांसा हे ग्रंथहि पहावे.

४ आमचा विशेष मुद्दा हा की स्त्रियाना होम करण्याचा अधिकार नाही. म्हणून विधवेने दत्तक घेतला असता दत्तकहोम नको. माझ्या समजुतीप्रमाणे हा अगदी नवा मुद्दा आहे. यावर कोणत्याहि हायकोर्टाने अद्याप निकाल दिलेला नाही असे वाटते. शूद्राने दत्तक घेतल्यास होम नको असा निर्णय मात्र स्पष्ट झाला आहे. आणि मयूख स्पष्ट म्हणतो की या कामी स्त्रिया ह्या शूद्राप्रमाणेच मानाव्या. मात्र स्त्रिया व शूद्र याना होम करणे अगत्याचे वाटेल तर त्यानी तो दुसऱ्याकडून करवावा. दत्तकमीमांसेत असे सांगितले आहे की स्त्रीकृतदत्तकपरिग्रह हाहि अमंत्रक होतो. सगोत्र दत्तकाला होम लागत नाही हे भास्कराचे मत मंडलीकांच्या ग्रंथात उधृत केलेले आहे. या सर्व गोष्टी मी अर्थातच स्मरणाने लिहीत आहे. हाताशी ग्रंथ नसल्याने अधिक आधार दाखविता येत नाहीत.

---

## (११)

२९ डिसेंबर १९०९

तुमचे सोळा डिसेंबरचे पत्र पावले. त्यात तीन महिन्याची बरीच हकीगत आहे. एकूण भाऊसाहेब भाटे वारले तर. बिचारा म्हणे की मी खूप दिवस जगणार. त्यांच्या मुलाभावांना माझा सांत्वनपर निरोप कळवा.

हिवाळ्यात मंडालेची हवा पुण्यासारखीच वाटते. म्हणून तूर्त हवेची तक्रार नाही. मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष ठेवावे. रामभाऊ पुढील साली मॅट्रिकला बसू शकेल. तुमच्याप्रमाणे केळकरानाहि मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यास सांगा. दाजीसाहेब खरे व खापर्डे यांची गाठ विलायतेत पडलीच असेल. खापर्डे हाऊस ऑफ लॉर्डसकडे अर्ज दाखल करणार तो नाताळानंतर व त्याचा निकाल लागणार मार्चात. अर्जावर सही करून तो मुंबईसरकारामार्फत मी पाठविला. पण काही निमित्त सांगून त्यांनी तो परत केला. म्हणून तो आता लंडन येथील आमच्या

सॉलिसिटरकडेच परस्पर पाठविला आहे. विलंब टाळण्याकरिता म्हणून मी प्रयत्न करितो पण माझ्या प्रकरणात सगळ्या गोष्टी विलंबाच्याच ठरतात.

वहिणाबाई यात्रेस खरोखरच जात असल्यास तिला ठरल्याप्रमाणे ५०० रुपये द्यावे. अण्णु घारपुरे याला खरीच गरज दिसते म्हणून त्याच्या कर्जरकमे-पैकी बरीचशी रक्कम त्याला द्यावी. त्याचा हुकुमनामा वेचन करून घ्यावयाचाच तर वासुदेवराव जोशी यांचे नावे करून घ्यावा.

रा. ब. जोशी निवडले गेले याबद्दल त्यांना माझा अभिनंदनपर संदेश कळीव.

येथे जर्मन इंग्रजी कोश मिळाला आहे, तरी फक्त चांगले जर्मन व्याकरण पाठवावे. गंगाधर महाजन यास बडोदे येथील जागा मिळाली की नाही ते कळवावे.

---

## (१२)

२ फेब्रुवारी १९१०

तुमचे १९ जानेवारीचे पत्र पोचले. पण त्यातील एक तुकडा जेलरसाहे-बानी कातरून घेतलेला आढळला. मग त्यांत तुम्ही काही राजकीय विषय लिहिला होता की काय न कळे. म्हणून यापुढे नीट खबरदारी घ्या. घरगुती हकीगत स्नेहीसोबत्यांची वार्ता इतक्याच गोष्टी मला कळविण्याची परवानगी आहे. इतर गोष्टी लिहिल्यास पत्र पोचण्याला विलंब होतो. शिवाय या स्थितीत मला राज-कारणाची वार्ता कळून तरी उपयोग काय ?

खापर्डे हे कदाचित् एप्रिलपर्यंत परत येणार नाहीत. तरी तुम्ही एकटेच भेटीस यावे. येताना बरोबर आणण्याच्या वस्तु १. चर्मी जोडा २. धोतरजोडा ३. सहा सदरे ४. दोन टुवाल ५. ३००।४०० पानांचे मजबूत बांधलेले कोरे नोटबुक ६. रामभाऊ व बापू यांची स्कूल प्रोग्रेस बुके.

जर्मन डिक्शनरी व १९१० ची रोजनिशी मिळाली. रामचंद्र गोविंद यांजकडून ३ जर्मन व्याकरणेहि आली.

वर्तमानपत्रांचा मजकूर लिहिण्याची व्यवस्था समक्ष सांगितली तशी करावी. मग पत्रावर नाव कोणाचेहि असो.

आतां माझे वजन बरोबर १२६ पौंड झाले आहे.

छापखान्यासंबंधी व्यवस्था सुचविल्या त्याविषयी केळकर खाडिलकर जोशी यांचे अभिप्राय जरूर कळवावे. बाबासाहेब खापर्डे हे एल्. एल्. बी. ची परिक्षा पास झाले की नाही ? ते हल्ली काय करीत असतात ?

---

टि. ३२

(१२ अ)

२ एप्रिल १९१०

दादासाहेब खापर्डे यांस—

सॉलिसिटर डालगॅडो यांचे पत्र पावले. व्हायकाऊंट मोर्ले यानी माझी सुटका करण्याचा सल्ला देण्याचे नाकारले. हे असे व्हावयाचेच होते. असले दोन ओळीचे तुटके उत्तर हाती येण्याला सहा महिने घालवावे लागले व इतकी वळणे घ्यावी लागली! 'दिले हे उत्तर एका प्रधानाचे आहे, खुद्द राजाचे नाही. म्हणून हा विषय संपलासे होत नाही' असे तुम्ही लिहिले. दुसरा मार्ग हाऊस ऑफ लॉर्डस्च्या द्वारे राजाकडे जाण्याचा. पण ते अर्ज हाती धरतील का? व तो दाखल करण्याला तरी एखादा लॉर्ड मिळेल काय?

तुम्हाला विलायतेला जाऊन दोन वर्षे झाली तरी अजून तेथेच राहणार की काय? माझी सुटका होईपर्यंत आपखुषीने स्वतःला हद्दपार करून घेण्याची शपथ तर तुम्ही वाहिलेली नाही ना? हाऊस ऑफ लॉर्डसचे काय होते हे पाहताच तुम्ही हिंदुस्थानास परत जावे. तिकडे सर्वांनाच तुमची गरज भासत आहे. काम यशस्वी न होता परत येणे तुम्हास सहजच वाईट वाटणार. पण तुमच्या प्रयत्नाला यश आले नाही हे माझ्या दुर्दैवामुळे असे समजावे.

---

(१३)

२ एप्रिल १९१०

तुमचे २३ मार्चचे पत्र पावले. मोतीबाबू व शामसुंदर बाबू यांची प्रकृति ठीक असल्याचे कळले. आपली नागपूर येथील मित्रमंडळी खुशाल असेलच.

लंडन सॉलिसिटरकडून ता. ४ मार्चचे पत्र आले. त्यात ते लिहितात की लॉर्ड मोर्ले यानी नकार दिल्यामुळे माझ्या सुटकेच्या बाबतीत आता काही आशा नाही. हाऊस ऑफ लॉर्डसचे एकच दार अजून मोकळे आहे. पण तेथेहि काय होणार हे दिसतच आहे. खापर्डे खटपट करतो म्हणतात. करू देत बिचारे!

जर्मन भाषेच्या अभ्यासाला सुरवात केली आहे. प्रकृति अजून ठीक आहे. पण उन्हाळा डोकावू लागला. हा दुसरा उन्हाळा कसा जातो याचीच भीति वाटते.

सौभाग्यवतीची प्रकृति उन्हाळ्यात बिघडण्याचा संभव आहे. तिला म्हणावे मुलाना घेऊन काही दिवस सिंहगडावर जा. तिला थंड हवेचे सौख्य नको असेल पण उन्हाळ्याने तिची प्रकृति बिघडते म्हणून म्हणावे की माझ्याकरिता म्हणून तरी सिंहगडावर जा. बरोबर तुम्ही जावे किंवा गंगाधर अथवा एखादा विश्वासु मनुष्य बरोबर घ्यावा. माझी ही आज्ञा असे म्हणून ती नाखुषीने वर गेली तरी मला ते हवे आहे. मधुमेहाच्या रोग्याना सिंहगडची हवा बरीच मानवते.

ईलियट साहेब वारल्याचे ऐकले. वाईट वाटले. बापटांचा मोठा आधार गेला. तरी पण बापट आपला मुलगा भय्या याला विलायतेस पाठविण्याची कल्पना सोडून देणार नाहीत अशी मला आशा आहे.

. मुलांच्या अभ्यासाची प्रोग्रेस बुके पाहिली. चांगलीशी नाहीत. त्याना एखादा लहानसा तालीमखाना मलखांब जोर काढण्याचे हत्ती करेल्याच्या जोड्या द्याव्या. हवा तर एक तालीलमास्तरहि ठेवावा.

केळकर व खाडिलकर यांचे काम एकोप्याने होत असेल अशी मला आशा आहे. त्यांचा उत्साह त्यांची सावधगिरी पण विशेषतः त्यांची एकी यावर माझी सर्व भिस्त आहे. लिमये भावे वगैरे मंडळींना नमस्कार सांगा. जावईबोवा वैद्य हे सहा महिन्यांची रजा घेणार होते ती घेतली की नाही? तुमच्या मागील पत्राचाहि एक तुकडा कापून घेण्यात आला होता. त्यात काय होते न कळे. वर्तमानपत्रासंबंधाने तुम्ही मला स्पष्ट शब्दानी अनेक प्रश्न सल्ला घेण्याकरिता म्हणून विचारले होते त्याची उत्तरे मीहि लिहून दिली. जेलरने ती सरकाराकडे पाठविली पण त्यानी ती अटकावून ठेवली. तुमच्याकडे पाठविण्याला परवानगी दिली नाही. अर्थात् या विषयावर मला तुम्हास काही कळविता येत नाही असेच समजून चालावे.

ता. क. उशीचे अभ्रे व लंगोटाचे कापड पोचले.

---

## ( १४ )

३ जून १९१०

तुमचे मे महिन्याचे पत्र मला पोचले नाही. माझ्यासंबंधी पत्रव्यवहाराचे नियम अधिक कडक करण्यात आले आहेत. तुम्ही आपल्याकडून दर महिन्यास एक याप्रमाणेच पत्र पाठविता. पण एक उशीरा वीस बावीस तारखेनंतर आणि दुसरे दुसऱ्या महिन्याच्या प्रारंभी पाठविले तर ती एकाच महिन्यात २ पत्रे असे मानले जाते. तरी याबद्दल काळजी घ्यावी.

ता. २० मे पर्यंत उकाडा फार झाला. ११० पर्यंत पारा गेल्यावर पाऊस सुरू झाला. अजून पडतच आहे. पण पुन्हा उन्हाळा सुरू होण्याची भीति वाटते.

किंग एडवर्ड बादशहा वारल्याची बातमी येथे आली आहे. याच वेळी धूमकेतूहि उगवला आहे. येथे तो आम्हाला स्पष्ट दिसतो. हा योगायोग पाहून पुराणमतवादी काय म्हणणार हे उघडच आहे.

खापर्डे मेच्या पूर्वीच निघणार होते. परंतु जून अखेरपर्यंत त्यांचा मुक्काम लांबला आहे. कोणा वजनदार गृहस्थाने त्याना काही सांगितले आहे असे म्हणतात. काय असेल ते खरे.

पत्र लिहिणे ते कागदाच्या एकाच बाजूवर लिहावे. म्हणजे तुकडा कापला तर त्याबरोबर दोही अंगचा मजकूर जातो तो जाणार नाही.

ता. क.—भारतीय नक्षत्रासंबंधाने वेबर साहेबांचे पुस्तक इकडे आलेले नाही हे खास. त्याचा शोध करावा.

---

१५

२ जुलै १९१०

तुमचे ता. १९ जूनचे पत्र पोचले. पत्र वेळेवर टाकण्याची अशीच योग्य खबरदारी घ्यावी.

तुरुंगवासाच्या दुसऱ्या वर्षाचा हा शेवटचा महिना. म्हणून प्रकृतीविषयी थोडी कच्ची हकीगत लिहितो. अंतर्गळाच्या विकारात फरक नाही. औषध वगैरे घेऊन अपचन वगैरे थोडेसे ताब्यात ठेविले आहे. हिरड्या मात्र अजून तशाच वाहतात. जेल डॉक्टराने एक नवे औषध दिले आहे. लघवी तपासली. स्पेसिफिक ग्रॅव्हिटी बेताची आहे. साखर अजून आढळते पण ती किंचित. उष्णतेमुळे तहान फार लागते. वजन १२२ पौंड आहे. तात्पर्य प्रकृती त्यातल्या त्यात बरी आहे पण त्याचे सर्व श्रेय जेल डॉक्टराकडे आहे. कारण त्यानी दूध तूप व भात याची सवलत दिली आहे.

गेल्या एप्रिलात मी मुंबई सरकारला अर्ज केला की कोठे तरी थंड हवेच्या तुरुंगात माझी बदली करा पण तो अर्ज नाकारण्यात आला. वेबरच्या नक्षत्राच्या दोन प्रती आपल्या संग्रही होत्या पण तुम्हाला एकहि प्रत सापडली नाही हे कसे? तरी मोठ्या दालनातील पूर्वेकडील भिंतीशी टेकून ठेवलेल्या तीनहि कपटात आणि मधोमध ठेवलेल्या दोन शिसवी कपाटात नीट शोधा. यंदे याना देण्याची नाट्य-कथार्णवातील अपुरी पुस्तके त्याच तीन कपाटात कागदात गुंडाळलेली सापडतील.

रामभाऊची तयारी चांगली झाली नसेल तर त्याला मॅट्रिकच्या परीक्षेस पाठवू नये. बापूची तयारी अधिक बरी दिसते.

जर्मनीतील ऑटो हॅरोसो व्हिटझ या कंपनीकडे आपले पुस्तक–विक्रीचे खाते आहे. त्याना जरूर पडल्यास लिहावे.

यंदे याना पुस्तके द्यावयाची त्याबद्दल अट इतकीच की जो नफा होईल त्यापैकी निम्मा शंकर मोरो रानडे यांच्या विधवा सुनेला दिला पाहिजे. केळकर याना जावई चांगला मिळाला याबद्दल त्यांचे अभिनंदन करितो. माझा अहेर केला असालच.

साने यांचा अभ्यास फार चांगला झाला आहे. त्यांच्या परीक्षेचा निकाल होताच कळवावे.

वासुदेवराव जोशी यांचे सर्व कर्ज देऊन टाकल्याचे लिहिले ते समजले. आर्यभूषण प्रेस व केसरी यांच्या हिशोबाची रुजवात झाली त्यात निबंधमालेकरिता

रु.८०० व रायगडफंडाचे रु.१६०० यांचा हवाला आम्ही घेतला आहे. तरी त्या रकमा आपल्या शिलकेतून वेगळ्या ठेवाव्या. हे कलम तुमचे हाती येथे टिपण दिले त्यात नाही पण तुम्हास तोंडी सांगितलेच आहे.

हायकोर्टातील अपील अद्याप निघाले की नाही ?

ता. क. तुमच्या पत्राबरोबर साने किंवा खापर्डे यांची पत्रे जोडू नये, कारण तीहि मला येऊ द्यावयाच्या पत्राच्या हिशोबातच धरली जातात, म्हणून अशा पत्रातील मुख्य मुद्यांचा सारांश तेवढा तुमच्या शब्दानी लिहीत जावा.

---

## ( १६ )

२ ऑगस्ट १९१०

जर्मन अभ्यासाची बुके मिळाली. वेबरच्या बुकासंबंधाने अजूनहि चूक होत आहे. तुम्ही दुसरा भाग पाठविला तरी पहिलाहि पाठवावा.

हवा साधारण गार आहे. तिचा प्रकृतीवर बरा परिणाम होतो. खापर्डे परत येत आहेत हे पाहून आनंद होतो. त्याना जाऊन दोन वर्षे झाली. एक तऱ्हेने त्यांची ही आपखुषीची हद्दपारीच झाली !

शंकर मोरो रानडे यांच्या कादंबऱ्या मूळ इंग्रजी ग्रंथाच्या आधारे लिहिलेल्या आहेत. मेरी क्वीन ऑफ स्कॉट्स व गाय फॉक्स या त्या मूळ कादंबऱ्या असाव्या. खाडिलकर याना त्या वाचून रानडे यानी कोणत्या धर्तीवर रूपांतर केले आहे ते पहावे लागेल. शिलादित्य या कादंबरीत कॅथॉलिक्स आणि प्रोटेस्टंट्स् यांच्या जागी जैन व हिंदू कल्पून त्यांचा धर्मविरोध दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् रानडे यांची ही कादंबरी पूर्ण करावयाची तर खाडिलकर याना जैन यतींच्या चालीरीतींचा अभ्यास ग्रंथावरून केला पाहिजे. त्याशिवाय जुळणार नाही.

अपील हायकोर्ट बोर्डावर आले बरे झाले. युरोपियन बॅरिस्टर न मिळाला तर दाजीसाहेबानीच खटला का चालवू नये ? ते तो उत्तम चालवितील. फक्त तुम्ही त्यांचे मागे लागून त्यांजकडून पुरावा नीट वाचवून ठेवावा. दादासाहेब करंदीकर व केळकर यानाहि काम चालण्याचे वेळी कोर्टात हजर राहण्यास सांगावे. तात्पर्य मी तेथे असतो तर अपील चालविण्याची कसोशी झाली असती तशीच आताहि व्हावी. एकटे दाजीसाहेबच बॅरिस्टर स्टँगमन याना भारी आहेत. तथापि करंदीकर व केळकर याना खटल्याची माहिती आहे म्हणून त्यानीहि मदतनीस म्हणून हजर असावे. त्यातल्या त्यात करंदीकर याना एखाद्या ट्रस्टीतर्फे स्वतंत्र वकीलपत्र दिले तर दाजीसाहेबानंतर उरले सुरले मुद्दे मांडण्याला करंदीकर याना संधि मिळेल.

बाळ खरे याचे लग्न झाल्याचे कळले. सितारामपंत पटवर्धन आता संसाराच्या काळजीतून मुक्त होतील. त्याना अलीकडे दुःखे फार सोसावी लागली !

सौभाग्यवतीची प्रकृती अलीकडे खालावत चालल्याचे तुम्ही येथे बोलला. तरी त्या विषयी लिहावे. जगन्नाथ महाराजांच्या अभ्यासाविषयीहि लिहावे. दादासाहेब करंदीकर याना नमस्कार सांगा व दाजीसाहेब यांजबरोबर वकीलपत्र दाखल करून अपीलाचे काम चालविण्याविषयी विनंति करा.

ता. क. घरच्या व ऑफिसच्या पुस्तकसंग्रहाची नीट काळजी घेत जा.

---

( १७ )

२ सप्टेंबर १९१०

तुमचे ता. २० ऑगस्टचे पत्र पावले. वेबरच्या ग्रंथाचा पहिला भाग आणि धोतरजोडा पाठविला तो पावला.

वेबरचा ग्रंथ वाचला. तो जर्मन भाषेत आहे. दर तासास पाच पाने याप्रमाणे मला तो लावून लावून वाचता आला. त्याचा किती आनंद झाला हे काय सांगू? मला वाटले की माझ्या बंदिवासापैकी काही भाग खराच सत्कारणी लागला!

हवा एकंदरीने गतवर्षापेक्षा बरी आहे.

खापर्डे हे फारच आशावादी आहेत. त्याना माझ्या सुटकेबद्दल नसत्या गोष्टीचीहि आशा वाटते. यश न आले म्हणून त्यांच्याकडे काय दोष? जितके दिवस ते तिकडे अधीक राहतील तितके दिवस त्याना कोणी काही सांगितल्याने उगीच अधिकाधिक आशा वाटू लागेल. तरी आता त्याना परत येण्याचा तगादा करावा. त्यांच्याहि दृष्टीने त्यानी परत आलेच पाहिजे. कारण बाबा खापर्डे अजून एल एल. बी. झालेले दिसत नाहीत. अर्थात् घरी दादासाहेब नसल्याने सहजच संसाराची ओढ होत असेल. अपीलाच्या कामी शक्य ती खटपट करण्याचे आश्वासन तुम्ही व केळकर दोघानी दिलेले पाहून आनंद झाला. सर्व काम संपेपर्यंत यशवंतराव याना मुंबईसच ठेवावे.

सौभाग्यवतीची प्रकृती अधिक बिघडली नाही इतके तरी समाधानच आहे. दोघी मुली जवळ असल्याने तिच्या मनाला थोडे करमेल. तिला म्हणावे दुर्दिन जात आहेत लवकरच संपतील.

साने यांची पीएच. डी. ची परीक्षा उतरली हे वाचून आनंद झाला. त्याना माझी शाबासकी कळवा. त्याना म्हणावे आणखी सहा महिने जर्मनीत रहा. आणि इकडे नवीन निघण्यासारखे रासायनिक धंदे दिसतील त्यांचे चांगले शिक्षण मिळवा. हे ज्ञान त्याना मुंबईत उपयोगी पडेल. हिंदु एज्युकेशन फंडाने त्याना स्कॉलरशिप न दिली तर तुम्ही त्याना सहा महिनेपर्यंत पैसे पाठवा. ते इकडे येण्यापूर्वी माझी सुटका न झाली तर त्यानी येथे येऊन मला भेटावे.

प्रोफेसर डाऊसेन यांचा उपनिषदावरील ग्रंथ आणवून पाठविण्याविषयी रामचंद्र गोविंद याना सांगा. मला आता जर्मन बरेच चांगले वाचता येऊ लागले आहे. तरी काही जर्मन पुस्तके पाठविण्याविषयी साने याना लिहा.

तुम्ही आपल्या घरच्या मंडळीविषयी अलीकडे काही लिहिले नाही. तरी तेहि लिहावे.

---

( १७ अ )

१३ ऑगस्ट १९०९

दादासाहेब खापर्डे यास—

फ्रेंच व जर्मन पुस्तके तुम्हाकडून मागविलीच आहेत. येथील जेल सुपरिंटेंडेंटनी ह्यूगोचे बालबोध फ्रेंच व्याकरण मला दिले आहे त्यावरून अभ्यास सुरू आहे. एखाद्या यूरोपियन प्रवाशाला बोलता येते इतके कामापुरते फ्रेंच माझे दोन महिन्यात तयार होईल. फ्रेंच लोक हे आपल्या रत्नागिरीच्या कोकण्याप्रमाणे वाटतात. कारण म व न हे अक्षर कोठेहि आले तरी त्याचा ते अगदी नाकातून खोल उच्चार करितात. पण एकंदरीने फ्रेंच भाषा अवघड नाही. तुम्हीहि तेथे बसल्या बसल्या सहज फ्रेंच शिकावे. तुमचे रोजचे काम संभाळून तुम्हाला रोज एक तास लंडन येथील ह्यूगोच्या भाषा शिकविण्याच्या शाळेत सहज घालविता येईल.

---

( १८ )

१ ऑक्टोबर १९१०

इकडे नुकतीच जोराची पर्जन्यवृष्टि झाली. मंडाले व रंगून या दरम्यान काही मैलपर्यंत रेल्वे लाईन वाहून गेली. टपाल जाण्यायेण्याला बराच विलंब लागतो.

खापर्डे हे विलायतेहून निघाले हे ऐकून बरे वाटले.

दिवाणी अपीलाच्या कामी खरे करंदीकर गोपाळराव पटवर्धन बखले घारपुरे यानी फार मेहनत घेतली व कसोशी केली याबद्दल त्याना माझे आभार कळवा.

अशा सहानुभूतीशिवाय व मदतीशिवाय कामे होत नसतात. माधवराव भट याना विशाळगडकर यानी वकील दिले होते काय ? कळवावे. अपील दोन आठवडे चालले. खरे करंदीकर पटवर्धन यांच्या सारख्या प्रमुख वकीलाना इतके दिवस बाजूला काढणे मुष्कीलीचेच झाले असावे. अपीलाच्या निकालाविषयी फार

काळजी लागली आहे. तरी निकाल कळताच तार पाठवावी. पण ती तार माझ्या नांवे न करता जेल सुपरिंटेंडंटच्या नावे करून अमुक अमुक हकीगत मला कळवावी अशी विनंति त्याना करावी.

एक महिन्याने थंडी पडू लागेल म्हणून तिकडे डोळे देऊन बसलो आहे.

---

## (१९)

२ नवंबर १९१०

निकालाची तार पोचली. निकाल ऐकून दुःख तर झालेच पण आश्चर्यहि वाटले. पण अशा चमत्काराचा आपणाला नेहमीचा अनुभव आहेच. म्हणून वाईटात वाईट घेऊन चालून पण धीर धरून शांत मनाने टिकून राहिले पाहिजे.

खापर्डे येऊन ता २१ ऑक्टोबरला भेटून गेले. दुसरे दिवशी बराच वेळ आम्ही बोललो. त्यांचे बरोबर वासुदेवराव विजापूरकरहि होते. खापर्ड्यांची ही भेट म्हणजे या कंटाळवाण्या एकांतवासात एखाद्या गोड स्वप्नाप्रमाणे वाटली. पण स्वप्नाइतकीच ती टिकली. दोन वर्षे राहून निराशेचे धक्क्यावर धक्के सोसल्यामुळे खापर्ड्यांचे करडे केस पांढरे झालेले दिसले. त्यांच्या भाषणातहि नेहमीचा उल्हास व विनोद थोडा कमीच दिसला. पण आमची भेट झाली ती स्थिति तरी कितपत आनंददायक होती ? शिवाय तुरुंगातील सरकारी पद्धतीची भेट ! त्यानी केली इतकी खटपट दुसऱ्याच्या हातून खचित झाली नसती. पण हे प्रकरण पडले टिळकाचे. तेव्हा त्यात त्याना यश कसे येणार ? असो. दिपवाळी एलिचपुरास करून ते पुण्यास जातील. हायकोर्टच्या निकालाविरुद्ध प्रीव्हि कौन्सिलकडे अपील केलेच पाहिजे मग खर्च काहीहि लागो असे आम्ही उभयतानीहि ठरविले आहे. हायकोर्टाच्या निकालावरील अपीलाचे सर्व मुद्दे मी त्यांच्याजवळ लेखी दिले आहेत. त्यावरून न्यायमूर्ती चंदावरकर यानी मृत्युपत्राचा भलताच अर्थ कसा केला आणि भलताच कायदा कसा लावला हे दिसून येईल. हे मुद्दे विलायतेत बॅरिस्टरला उपयोगी पडतील. आपल्या वकील मंडळीखेरीज इतराना ते दाखवू नका. हायकोर्टच्या निकालाच्या सहीशिक्क्याची प्रत हाती पडण्यापूर्वीच अंदाजाने व धोरणाने मी मुद्दे लिहिले आहेत. ती प्रत हाती आल्यावर आणखी सुचल्यास लिहीन. अपीलाशिवाय गत्यंतर नाही. अपीलाची परवानगी मागण्याचा अर्ज दाजीसाहेबांकडून हायकोर्टाकडे तावडतोब दाखल करा. खालच्या कोर्टाचा निकाल हायकोर्टाने फिरविला म्हणून अपिलाची परवानगी द्यावीच लागेल. पुढे विलायतेत बॅरिस्टर कोण द्यावयाचा वगैरे माहिती खापर्डे देतील. थोड्या खर्चात काम कसे करता येईल हे त्याना आता माहीत आहे. अपिलाच्या खर्चाची तजवीज स्वतः काही करण्याचे खापर्डे यानीहि कबूल केले आहे. वासुदेवराव जोशी यांजपासून

दोन हजार रुपये उसने घ्या. अपिलाचे काम चालू लागेल त्या मानाने आपल्या चालू शिलकेतून तुम्हाला हळू हळू पैसे पाठविता येतील. ही एक नवीन खर्चाची धोंड आली म्हणून आपला घरगुती व कचेरी खर्च होईल तितका आखडता घेतला पाहिजे. तुम्ही भेटावयाला आला तेव्हा काय वाटत होते ! आता काय झाले ! तुम्हाला सांगितलेल्या योजना सर्वच जागच्या जागी राहिल्या. असो पुढच्या भेटीत नवीन योजना करू. अपिलाच्या मुद्यात मुख्य असे की बाबामहाराजांच्या मृत्युपत्राचा अर्थ ट्रस्टींच्या अधिकाराच्या बाबतीत भलताच केला गेला. ताई-महाराजांचा अज्ञान मुलगा निवर्तल्याने ट्रस्टींचे अधिकार नष्ट होत नाहीत. न्या. चंदावरकर व हीटन यानी अशी भलतीच समजूत करून घेतलेली दिसते की ट्रस्टींनी केला तो कारभार नसून अनधिकाराची लुडबूड होती ! कायद्याच्या दृष्टीने त्यांचे हे म्हणणे चूक ठरले तर त्यांची अनुमाने व त्यांचे ग्रह हे सर्व जमीनदोस्त करता येतील.

---

## ( २० )

२ डिसेंबर १९१०

तुमचे ता० २० चे पत्र व हायकोर्टच्या निकालाची प्रतहि मिळाली.

हल्ली प्रकृती बरी आहे. हवाहि गोड आहे. गीतेच्या भाषांतराचा उपोद्घात पुढील महिना संपण्याच्या आंत लिहून तयार होईल.

बापू वरच्या वर्गात गेल्याचे कळले. रामभाऊवर विशेष मेहनत घेण्याला कवडे याना सांगावे. नुसती घोकंपट्टी नको. विषयाची समजूत पटणे हाच अभ्यास. मुलांच्या उंचीची व वजनाची मापे पाठवावी.

शिरोडकर यांच्या कर्जासंबंधाने कोर्ट ऑफ वॉर्डस हस्तेबंदी मागेल असे वाटते. इस्टेट तर विकली जाऊ नये व सावकाराचे कर्ज तर बुडू नये असे आपले धोरण असावे.

कँटचा ग्रंथ मॅक्स्‌मुल्लर यानी संपादिलेला जिनसीवाले यांच्या पुस्तकालयात आहे तो मला पाठवा. १९११ ची रोजनिशी जरूर पाहिजे. तशीच १० रतली फुलस्केपची चार कोरी नोटबुके साठ साठ पानांची टपालाने पाठवावी. हायकोर्टचा निकाल समग्र वाचल्यावर काही वेगळे मुद्दे मला सुचले ते दोन आठवड्यानी पुनः वेगळे लिहून पाठवीन. परंतु अपिलाच्या परवानगीकरिता अर्ज करावयाचा तो थांबण्याचे कारण नाही. खर्चाकरिता पैसे वासुदेवरावाकडून घे. एक दोन वर्षांत ते परत करू. इस्टेटीच्या कर्जाबद्दल काही हुकुमनामे व्यक्तिशः ट्रस्टींवर झाले आहेत पण कर्जाची रकम इस्टेटीकडेच खर्च झाली हे सिद्ध करणे सोपे आहे. म्हणून

कोर्ट ऑफ वार्ड्स आमची तक्रार मानील व आमचे कर्ज देववील. तसे न झाले तर कोर्ट ऑफ वार्डसवरच डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे फिर्याद लावता येते ती लावा. हायकोर्टाच्या निकालाने जुन्या घोटाळ्यात नव्याची भर अनेक रीतीने घातली आहे. पण धीर धरून हळू हळू मार्ग काढाल तर निभेल. बाळामहाराज आपले दत्तविधान शाबीत करण्याचा दावा मांडणार की काय ?

सौभाग्यवतीची प्रकृति बरी असल्याचे कळले. तिला म्हणावे आपण व दुर्दैव यांची टक्कर जुंपलेली आहे. त्यातून कोणी तरी एक हरणार व एक जिंकणार. अर्थात् आपण हार न जाण्याचा निश्चय केला तर आपणच जिंकू.

जगन्नाथमहाराज यांची पाचवी इयत्ता पुरी करण्याची तयारी घरीं करण्यास शिक्षकास सांगावे. बाबासाहेब पेंडसे वारल्याचे ऐकून फार वाईट वाटले. एक जाडा विद्वान व आमचा कट्टा हितचिंतक गेला. खापर्डे यांची आपली आई वारल्याचे त्यानी सांगितले. तुम्हाला कदाचित कळले नसावे म्हणून लिहिले. पुढील चार महिन्यात गीतेवरील टीका लिहिण्याचा विचार आहे. हवा थंड आहे. आणि स्वतः माझ्या खोलीत पाहिजे तितकी पुस्तके ठेवून घेण्यास परवानगी मिळाली आहे. पूर्वी पहिली चार संपली म्हणजे ती परत देऊन दुसरी चार आणावी असे होते. पण ग्रंथ लिहिताना चार पुस्तकानी भागत नाही. पुष्कळच पुस्तके हाताशी लागतात.

---

## ( २१ )

३ जानेवारी १९११

प्रकृती बरी आहे. गीतारहस्य—लेखनाचे काम सुरू आहे. हायकोर्ट निकालाचे सविस्तर खंडन लिहिण्याला वेळ झाला नाही. पण न थांबता अपीलअर्ज तयार करण्यास खरे याना सांगा. कँटचे बुक का सापडत नाही ? ते संस्कृत बुकात नाही तर जिनसीवाल्यांच्या ग्रंथसंग्रहात तत्वज्ञानावरील पुस्तकात आहे. याशिवाय तेलंग यांचे भगवद्गीतेचे भाषांतर रामानुजाची टीका श्रीधराची टीका ओरायनची आवृत्ति सुधारून काढण्याकरता थोरल्या दिवाणखान्यात कपाटात तांबड्या रुमालात बांधलेले कागद आणि मुलांची प्रोग्रेसबुके वगैरे पाठवावी. सांगलीच्या चांगल्या तुपाचा एक दहाशेरी डबा पाठवावा. मला तूप खाण्याची परवानगी आहे पण ते येथे चांगले मिळत नाही. तुम्ही येताना प्रीव्हि कौन्सिल अपिलाला लागणाऱ्या खर्चाची यादी आणा. व केसरीचे चालू व १९०७ चे ताळेबंद आणा. वासुदेवराव जोशी तुमचे बरोबर येतील तर बरे. त्यांची गांठ पडून एक वर्ष झाले.

( २२ )

२ फेब्रुवारी १९११

छऱ्यांची सर्कस इकडे येणार म्हणून तिच्याबरोबरच इकडे येऊ असे म्हणून वाट पहात बसाल तर ठीक नाही. तुमचे काम आवरताच इकडे या. मार्चपर्यंत येणे न झाले तर मुंबईस आंबे मिळतील ते घेऊन या. मात्र आंब्याकरता थांबू नका हो!

---

( २३ )

२ मार्च १९११

हरीपंत वारल्याचे ऐकून वाईट वाटले. साने याना धंदेशिक्षण घेण्याला कारखानदारानी मदत दिली नाही. पण यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. जो तो आपल्या देशाचे हित पाहणारच. जाड हातमोजांचा एक जोड ( माझ्या हातास बसण्यासारखा ) एक दातकोरणे कानकोरणे शिवणीच्या झाडाची शेरभर साल (टूथ पावडर करता) कॅर्बालिक ॲसिड सोपच्या वड्या इतके जिन्नस आणावे.

गीतेवरील ग्रंथ लिहून संपविला. त्याला गीतारहस्य हे नाव दिले आहे. त्यातील विचार स्वतंत्र आहेत. व काही दृष्टीने लोकापुढे प्रथमच येणार आहेत. नैतिक प्रश्न सोडविण्याला आमच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचा उपयोग कसा करता येतो, हे त्यात दाखविले आहे. ग्रीनने नीतिशास्त्रावरील पुस्तकात अनुसरलेल्या विचारसरणीसारखी काही अंशी माझी विचारसरणी आहे. बहुजनसमाजवाद किंवा मनुष्याची स्फूर्ति हा नीतीचा आधार होय असे मी मानीत नाही. गीतेतील तत्त्वज्ञान व पश्चिमेकडील देशातील तत्त्वज्ञान यांची तुलना करून आमचे तत्त्वज्ञान निदान त्यांच्या तत्त्वज्ञानाहून कमी प्रतीचे नाही हे मी दाखविले आहे. पुस्तकाचे भाग १५ झाले आहेत. शिवाय परिशिष्ट आहे. याचीच सुमारे साडेतीनशे पाने होतील. त्याला गीतेचे भाषांतर अजून जोडावयाचे असून तेच काम हल्ली चालू आहे. पण ते इतकेसे अवघड नाही. रहस्यग्रंथ हाच अवघड भाग पण तो पुरा झाला आहे. गीतेविषयी माझे विचार आज वीस वर्षे डोक्यात घोळत होते आणि अजून तसले विचार लोकापुढे मांडण्याचे कोणी धाडस केलेले नाही. मजजवळ नसलेल्या अशा अनेक ग्रंथांचे आधार आणखी द्यावयाचे आहेत. अर्थात् हे काम माझी सुटका झाल्यानंतरच होऊ शकेल. गीताभाषांतर पुढील दोन महिन्यात होईल. रहस्य व भाषांतर मिळून पांचशे पाने होतील.

कोर्ट ऑफ वार्डस आमची तक्रार मानील व आमचे कर्ज देववील. तसे न झाले तर कोर्ट ऑफ वार्डसवरच डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे फिर्याद लावता येते ती लावा. हायकोर्टाच्या निकालाने जुन्या घोटाळ्यात नव्याची भर अनेक रीतीने घातली आहे. पण धीर धरून हळू हळू मार्ग काढाल तर निभेल. बाळामहाराज आपले दत्तविधान शाबीत करण्याचा दावा मांडणार की काय ?

सौभाग्यवतीची प्रकृति बरी असल्याचे कळले. तिला म्हणावे आपण व दुर्दैव यांची टक्कर जुंपलेली आहे. त्यातून कोणी तरी एक हरणार व एक जिंकणार. अर्थात् आपण हार न जाण्याचा निश्चय केला तर आपणच जिंकू.

जगन्नाथमहाराज यांची पाचवी इयत्ता पुरी करण्याची तयारी घरीं करण्यास शिक्षकास सांगावे. बाबासाहेब पेंडसे वारल्याचे ऐकून फार वाईट वाटले. एक जाडा विद्वान व आमचा कट्टा हितचिंतक गेला. खापर्डे यांची आपली आई वारल्याचे त्यानी सांगितले. तुम्हाला कदाचित कळले नसावे म्हणून लिहिले. पुढील चार महिन्यात गीतेवरील टीका लिहिण्याचा विचार आहे. हवा थंड आहे. आणि स्वतः माझ्या खोलीत पाहिजे तितकी पुस्तके ठेवून घेण्यास परवानगी मिळाली आहे. पूर्वी पहिली चार संपली म्हणजे ती परत देऊन दुसरी चार आणावी असे होते. पण ग्रंथ लिहिताना चार पुस्तकानी भागत नाही. पुष्कळच पुस्तके हाताशी लागतात.

---

## (२१)

३ जानेवारी १९११

प्रकृती बरी आहे. गीतारहस्य-लेखनाचे काम सुरू आहे. हायकोर्ट निकालाचे सविस्तर खंडन लिहिण्याला वेळ झाला नाही. पण न थांबता अपीलअर्ज तयार करण्यास खरे याना सांगा. कँटचे बुक का सापडत नाही ? ते संस्कृत बुकात नाही तर जिनसीवाल्यांच्या ग्रंथसंग्रहात तत्वज्ञानावरील पुस्तकात आहे. याशिवाय तेलंग यांचे भगवद्गीतेचे भाषांतर रामानुजाची टीका श्रीधराची टीका ओरायनची आवृत्ति सुधारून काढण्याकरता थोरल्या दिवाणखान्यात कपाटात तांबड्या रुमालात बांधलेले कागद आणि मुलांची प्रोग्रेसबुके वगैरे पाठवावी. सांगलीच्या चांगल्या तुपाचा एक दहाशेरी डबा पाठवावा. मला तूप खाण्याची परवानगी आहे पण ते येथे चांगले मिळत नाही. तुम्ही येताना प्रीव्हि कौन्सिल अपिलाला लागणाऱ्या खर्चाची यादी आणा. व केसरीचे चालू व १९०७ चे ताळेबंद आणा. वासुदेवराव जोशी तुमचे बरोबर येतील तर बरे. त्यांची गांठ पडून एक वर्ष झाले.

## ( २२ )

२ फेब्रुवारी १९११

छत्र्यांची सर्कस इकडे येणार म्हणून तिच्याबरोबरच इकडे येऊ असे म्हणून वाट पहात बसाल तर ठीक नाही. तुमचे काम आवरताच इकडे या. मार्चपर्यंत येणे न झाले तर मुंबईस आंबे मिळतील ते घेऊन या. मात्र आंब्याकरता थांबू नका हो !

---

## ( २३ )

२ मार्च १९११

हरीपंत वारल्याचे ऐकून वाईट वाटले. साने याना धंदेशिक्षण घेण्याला कारखानदारानी मदत दिली नाही. पण यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. जो तो आपल्या देशाचे हित पाहणारच. जाड हातमोजांचा एक जोड ( माझ्या हातास बसण्यासारखा ) एक दातकोरणे कानकोरणे शिवणीच्या झाडाची शेरभर साल (टूथ पावडर करता) कॅर्बॉलिक ॲसिड सोपच्या वड्या इतके जिन्नस आणावे.

गीतेवरील ग्रंथ लिहून संपविला. त्याला गीतारहस्य हे नाव दिले आहे. त्यातील विचार स्वतंत्र आहेत. व काही दृष्टीने लोकापुढे प्रथमच येणार आहेत. नैतिक प्रश्न सोडविण्याला आमच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचा उपयोग कसा करता येतो हे त्यात दाखविले आहे. ग्रीनने नीतिशास्त्रावरील पुस्तकात अनुसरलेल्या विचारसरणीसारखी काही अंशी माझी विचारसरणी आहे. बहुजनसमाजवाद किंवा मनुष्याची स्फूर्ति हा नीतीचा आधार होय असे मी मानीत नाही. गीतेतील तत्त्वज्ञान व पश्चिमेकडील देशातील तत्त्वज्ञान यांची तुलना करून आमचे तत्त्वज्ञान निदान त्यांच्या तत्त्वज्ञानाहून कमी प्रतीचे नाही हे मी दाखविले आहे. पुस्तकाचे भाग १५ झाले आहेत. शिवाय परिशिष्ट आहे. याचीच सुमारे साडेतीनशे पाने होतील. त्याला गीतेचे भाषांतर अजून जोडावयाचे असून तेच काम हल्ली चालू आहे. पण ते इतकेसे अवघड नाही. रहस्यग्रंथ हाच अवघड भाग पण तो पुरा झाला आहे. गीतेविषयी माझे विचार आज वीस वर्षे डोक्यात घोळत होते आणि अजून तसले विचार लोकापुढे मांडण्याचे कोणी धाडस केलेले नाही. मजजवळ नसलेल्या अशा अनेक ग्रंथांचे आधार आणखी द्यावयाचे आहेत. अर्थात् हे काम माझी सुटका झाल्यानंतरच होऊ शकेल. गीताभाषांतर पुढील दोन महिन्यात होईल. रहस्य व भाषांतर मिळून पांचशे पाने होतील.

( २४ )

३ एप्रिल १९११

उन्हाळा सुरू झाला आहे. तथापि अजून सोसवतो.

बेळगावचे विष्णुपंत नातु वकील वारल्याचे ऐकून वाईट वाटले. ते माझ्याहून निदान पाच वर्षांनी लहान होते.

वासुदेवराव बरोबर येत असतील तर ठीकच आहे. नाही तर एकटेच भेटीस या. निदान या महिन्याच्या अखेर तुमची भेट झाली पाहिजे.

---

( २५ )

२ मे १९११

तुमचे पत्र पावले. वासुअण्णा आजारी असल्याचे ऐकून वाईट वाटले. ते लवकर बरे होतील आणि तुम्हाला भेटीला येण्याला मोकळीक होईल अशी आशा आहे. उन्हाळ्यात पुढे पुढे समुद्र फार खवळतो. तसे झाल्यास तुम्हाला इकडे येताना त्रास होईल याची काळजी वाटते. तीन चार पाऊस झाले पण उन्हाळा आहे तसाच आहे. गीतेचे भाषांतरहि गेल्या एक महिन्यापूर्वी संपविले. तेव्हा आता खरोखरच करण्याला काम नाही म्हणून काही सटरफटर वाचीत असतो. कोकणची चिखलगावची इस्टेट पंधराशे रुपयाला जात आहे असे लिहिले. पण मला ती द्यावयाची नाही. तुम्ही येताना दोन धोतर जोडया जगन्नाथ महाराज प्रकरणी फर्स्टक्लास सबजज्जाच्या निकालाची एक प्रत आणि कँटचे पुस्तक ( इंग्रजी भाषांतर ) घेऊन या.

माझी विम्याची पॉलिसी मुलांच्या नावे करून देणार आहे. तरी कावसजी शेटला भेटून तिच्यावर लिहावयाचा तो मजकूर लिहून घेऊन व स्टँप लाऊन पॉलिसी इकडे आणावी. पण या कामाकरिता म्हणून थांबू नका.

मुलांचे अभ्यास कसे काय चालले आहेत ? त्यांच्याविषयी मी नेहमी माहिती मागवितो ती सर्व आणावी. सौभाग्यवतीची प्रकृती बरी असल्याचे वाचून समाधान झाले.

शांताकाहि आमच्या बरोबर प्रीव्हि कौन्सिलकडे अपील करणार काय ? तसे झाल्यास बरेच. निदान कागदपत्रछपाईच्या खर्चात एक भागीदार मिळेल !

पांडुरंगशास्त्री पारखी वारल्याचे समजले. ते तितके वृद्धच झाले होते. पण आप्पासाहेब वारद वारल्याचे ऐकून दुःख झाले व आश्चर्यहि वाटले! जुने स्नेही सोबती एका मागून एक अशा रीतीने जात आहेत. मी सुटून परत येईपर्यंत किती राहतील देव जाणे.

( २६ )

२ जुलै १९११

तारीख २० जूनचे पत्र पावले. एकूण रा. ब. जोशी वारले अं ! त्यांच्यासारखा अनुभवी व विद्वान् पुढारी आज हवा होता. सुटका होऊन त्याना भेटेन अशी फार आशा होती.

विमा कंपनीचे काम हातावेगळे झाले बरे झाले. शिवाजी-स्मारकासंबंधाने थोडे दिवस थांबावे असे वाटते. खरे याना म्हणावे पुराणवस्तूंचा कायदा पहा व त्यामुळे स्मारकमंडळाला छत्रीचे काम रायगडावर करण्याला आणि पूजेअर्चेची व्यवस्था करण्याला काही अडचण येते की काय ते कळवावे.

कैदेचे तिसरे वर्ष संपत आले म्हणून प्रकृतीचा आढावा कळवितो. अंतर्गळाच्या विकाराने अधीक त्रास दिला नाही. औषध लागू पडल्याने हिरडयांचा विकार कमी आहे. लघवीमध्ये साखरेचे प्रमाण किंचित् वाढले. वजन १२४ पौंड आहे. नवीन विकार असा काही नाही. पण केव्हा केव्हा हाताची बोटे बधिर झाल्यासारखी किंचित् वाटतात. मसाला व औषधे पोचली. मसाला व पापड करण्याची कृती लिहून पाठवा. तो कागद सुटा असावा. आचारी वासुदेव कुळकर्णी याच्या नातलगाना त्याच्या विषयीची हकीगत लिहून कळविली का ? तरी ती लिहून काळजी दूर करा. धोतरे पाठविलीत ती फारच रुंद. तुरुंगात असली काय कामाची ? हातमोजेहि किंचित् तुस्त वाटतात. आंबे चांगले होते व पक्का पंधरवडा पुरले. तूप पाठविल्याबद्दल देशपांडे याना आभार कळवा.

यंदाचाहि उन्हाळा निभावला. पाऊस लवकर सुरू झाला. परीक्षा जवळ आली असल्यास रामभाऊला ह्मणावे व्यायामाची मेहनत थोडी कमी कर.

यंदा दिवाळीनंतर जगन्नाथमहाराजाना खापर्डे हे उमरावतीस आपणापाशी नेऊन ठेवू शकतील काय ? याविषयी माहिती काढून मला कळवा. शिरोडकर यांच्या मुकदम्यात त्यांजकडून घेतलेले कर्ज इस्टेटीकडे लागल्याचा सर्व पुरावा दाखल करून ठेव. तसे करणे जरूरीचे आहे. यशवंतराव याना सांगा. ते सर्व करतील.

ब्रुक या ग्रंथकाराची पुस्तके वाचली. गीतेसंबंधी माझा सिद्धांत त्याने ग्रंथरूपाने माझ्या आधी मांडला खरा. पण त्याचे लिहिण्यात थोडा फापटपसारा थोडा गूढपणा आहे. मला वाटते माझी चर्चा अधिक समर्पक अधिक सशास्त्र अधिक विवेचक व तात्त्विक स्वरूपाची झाली आहे. कर्मयोग या संस्कृत शब्दात आधुनिक ग्रंथकार ज्याला नीति म्हणतात ती येते. गीता हे वेदांतातील नीतिशास्त्र होय. वेदांतामध्ये नीतिशास्त्र कसे येणार असा कित्येकाना भ्रम पडतो. पण ही चूक आहे. मिल् स्पेन्सर मार्टिनो बटलर सिज्विक इत्यादि तत्त्ववेत्त्यांची नीतिशास्त्राची कल्पना आणि तीच गीतेतील कल्पना यांची मी तुलना करून दाखविली आहे. ती वाचली ह्मणजे या लोकाना आपली चूक तेव्हाच कळून येईल. ब्रुक याच्या ग्रंथाने मला

नवीन असे काही शिकविले नाही. तथापि माझ्या ग्रंथातील सिद्धांताचा स्वीकार करण्याचे कामी लोकांची वाट त्याने आधी थोडी मळवून ठेविली हा तरी त्या ग्रंथाचा उपयोगच.

---

( २७ )

४ आगष्ट १९११

रामभाऊचा व्यायाम कमी करण्याचे काय केले? बाबा खापर्डे परीक्षा पास झाले व दादासाहेब करंदीकर नामदार झाले म्हणून दोघांचेहि मजतर्फे अभिनंदन करा. करंदीकराना म्हणावे आपण फाजील विनय दाखविला नसता तर यापूर्वीच नामदार झाला असता.

फर्स्टक्लास सबजज्ज यांच्या ( कर्जासंबंधी ) निकालाने जगन्नाथमहाराजांचे नुकसान काहीच नाही. पण अपील करणे चांगले. शांताकानीहि करावे. तुपाच्या खुराकाने वजन थोडे वाढले खरे. २।२ पौंडच का होईना पण वाढले. जुलै महिना मजेचा थंडगार गेला.

मी येत्या नोव्हेंबरात सुटेन म्हणून लिहिता. तुम्ही मनात मांडे वाटेल तितके खा. पण खरे बोलावयाचे तर मला सुटकेची आशा वाटत नाही. मुदतीपूर्वी सुटका करणे हे एक दयेचेच कृत्य आहे व सरकाराने ते केले तर त्यानी मजवर दया केली असेच मी म्हणेन. निग्रहानुग्रहाच्या अधिकाराचे ते धनीच आहेत. पण माझ्या उरलेल्या आयुष्यात स्वतंत्रतेला बाध येईल अशा प्रकारच्या अटी ते घालू म्हणतील तर त्या मात्र मी स्वीकारणार नाही. याविषयी मी तुम्हाला व जोशाना समक्ष भेटीत सांगितलेच आहे. तूर्त स्वस्थ बसावे व काय होईल ते पहावे इतकेच. दादासाहेब खापर्डे यानी हिंदुस्थानात बसून माझ्या सुटकेचे प्रयत्न केले तर ते हवेच आहेत.

वैदिक कालगणना या नावाचे पुस्तक लिहिण्याचा हेतू आहे म्हणून तुम्हाजवळ म्हणालो. त्याचा अर्थ तुम्हाला बरोबर समजला नाही. हे पुस्तक म्हणजे जुने ओरायनच. पण सुधारलेले वाढिवलेले चुका काढून टाकलेले. तात्पर्य जुन्या ग्रंथाचे स्वरूप इतके पालटणार आहे की त्याला नवी आवृत्ति काढताना नवे नाव दिलेलेच बरे. गेल्या शेदोनशे वर्षात या विषयावर जे जे कोणी काही लिहिले आहे त्याचा योग्य तो उपयोग या ग्रंथात मी करणार आहे. या कामाकरिता ग्रंथ लागतील त्यांची यादी मी पाठवीन. हे नवे काम मात्र पुढील दिवाळ्यापर्यंत हाती घेता येणार नाही.

रायगड येथील समाधीचे बाबतीत दाजीसाहेब खरे यानी काय ठरविले ते कळवावे.

(२८)

२ सप्टेंबर १९११

साने यांचे बाबतीत ते लिहितात त्या गोष्टी लक्षात येतात. हिंदु एज्युकेशन फंडाकडे अधिक मदत मागता येणार नाही व मागूहि नये असे मी ठरविले आहे. फक्त परत येण्यापुरते भाड्याचे पैसे मागावे. ते रीतीला सोडून होणार नाही. अधिक पैसे लागतील ते तुम्ही साने याना देऊ शकाल हे वाचून आनंद झाला. दर तिमाहीला ठराविक रक्कम त्याना पाठवीत जावी.

गेल्या महिन्यात एकाएकी मला ताप आला. १०३ पर्यंत ताप वाढला होता. ताप पुरा उतरावयाला ५ दिवस लागले. यामुळे एकदम ७ पौंड वजन कमी झाले. पण त्यातले तीन तेथपासून आतापर्यंत मी मिळविले. आज प्रकृति चांगली आहे. वरचा एक दात पडला व आता पुढच्या कवळीत चांगलीच खिंड झाली.

तुम्ही कोर्टात ३९०० रुपये भरल्याचे कळले पण हायकोर्ट अपिलाच्या परवानगीचा अर्ज अजून का काढीत नाही? घारपुरे यांची रक्कम तुम्ही घ्या. पण ते बाबामहाराजांचे कर्ज आहे तसेच म्हणून तरते ठेवा.

दादासाहेब खापर्डे जगन्नाथमहाराजाना उमरावतीस नेतात की नाहीत अजून कळले नाही तरी कळवा. सौभाग्यवती घरकाम करू शकते हे वाचून बरे वाटले.

---

(२९)

२ आक्टोबर १९११

तुमचे वडिलांची प्रकृति अधिक सुधारत नाही ते का? माझी प्रकृति बरी आहे. वजन आणखी एक पौंड वाढले. राज्यारोहणाचा उत्सव जवळ आला म्हणता? खापर्डे याना म्हणावे तुम्हाला आता काय प्रयत्न करावयाचा तो करा. त्यांच्या लक्षात असेलच. पण उगीच सुचवायला काय हरकत? उलट सुलट अफिडेव्हिटे हायकोर्टाकडे दाखल होत आहेत ती संपताच हायकोर्ट निकाल देईल अशी आशा आहे. आज दसऱ्याच्या निमित्ताने तुम्हा सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. रामभाऊंच्या प्रिलिमिनरी परीक्षेचा निकाल कळवा.

---

(३०)

१० आक्टोबर १९११

दिवाणी मुकदम्याचे एक समन्स इकडे आले ते बजावल्याची सही करून परत पाठविले आहे. हा नवा दिवाणी दावा कसला? नीट पाहून कळवा. हवे तर नवे वकीलपत्र लिहून पाठवितो.

---

( ३१ )

२ नोव्हेंबर १९११

एकूण हायकोर्टाने प्रीव्हि कौन्सिलकडे अपील करण्याला परवानगी दिली म्हणता ! कागदपत्र छापून होण्याला सहा महिने लागतील. तोच वेळ तुमच्या इतर तयारीलाहि उपयोगी पडेल. सालिसिटर डाल्गॅडो यांजकडेच हा मुकदमा द्या. खरे व खापर्डे यानी आपआपली टिपणे सालिसिटरचे माहितीकरिता तयार करावी. मीहि माझे करितो. ते येथील तुरुंगातच छापून घ्यावे लागेल.

साने यांचे प्रोफेसर त्याना केवळ नावाचाच पगार देणार असतील तर त्यानी एक टर्मपेक्षा अधिक त्याजपाशी राहू नये.

रामभाऊची बुद्धि चारचौघा मुलाइतकी असता तो नापास कसा झाला ? कदाचित् अभ्यासावर एकचित्त व्हावे तसे होत नसेल.

प्लेग व दुष्काळ यांची स्वारी पुन्हा झाली म्हणता ! प्लेग वाढल्यास तुम्ही झोपडयात जाऊन राहालच.

ओरायनच्या नवीन आवृत्तीसंबंधी पुस्तके व कागदांचा रुमाल राज्यारोहणसमारंभ होऊन गेल्यानंतर पाठवावा. या सट्टयात सुटलो तर बरेच !

---

( ३२ )

२ डिसेंबर १९११

अपीलासंबंधीची टिपणे राज्यारोहणाच्या दरबारानंतर पाठवावी. कदाचित् जानेवारीअखेर तुह्मास भेटीस बोलावीन.

ओरायनच्या नव्या आवृत्तीसंबंधाने दोन महिने विचार करण्यात घालविले. गीतारहस्य माल प्रस्तावना अनुक्रमणिका इत्यादि किरकोळ गोष्टीसुद्धा पुरे हातावेगळे केले आहे.

( या पत्रासोबत राममाऊ बापू व कवडे शास्त्री याना अभ्यासाविषयीच्या सूचना लिहून पाठविल्या त्याचे भाषांतर मुद्दाम मुलानाच करावयाला सांगा. ते झाल्यावर शिक्षकाने ते तपासून शुद्ध करावे. व मुलानी मग ते आपल्या आईस वाचून दाखवावे. म्हणजे मला काय नक्की हवे हे तिलाहि कळेल. )

---

( ३३ )

३ जानेवारी १९१२

मुदतीपूर्वीच्या सुटकेची आशा संपली ! असो. उगाच खेद का ? अडीच वर्षे उरली ती घालविण्याची तयारी मी तुरुंगात व तुम्ही तुरुंगाबाहेर मिळून करू या.

खरे व खापर्डे याना भेटून त्यांची टिपणे घेऊन भेटीला या. येताना आपल्या ऑफिसचे ताळेबंद आणा. माझ्या सुटकेपर्यंत आपली सांपत्तिक स्थिति सुधारेल

अशी माझी अटकळ आहे. मथूताईच्या अभ्यासाबरोबर तिजकडून घरकामहि करवून घ्यावें. तेंहि शिक्षणच आहे. साने परत येताच स्वतंत्र संसार थाटावा लागेल.

सोबत पुस्तकांची याद दिली आहे. त्याखेरीज आणण्याचे जिन्नस—चर्मी जोडा पापड फळावळ १९१२ ची रोजनिशी. माझ्या खाती येथे आता फक्त ४० रुपये आहेत. तरी आणखी काही रुपये आणावे. साने याना म्हणावे की ग्रून ड्रिश या जर्मन ज्ञानकोशात डॉक्टर थिबो यांचा हिंदु भारतीय ज्योतिष शास्त्राविषयीं एक निबंध छापला आहे त्याची सुटी प्रत मिळते ती पाठवा. त्याना असे लिहावे की माझे " आर्यांचे वसतिस्थान " या ग्रंथाचे पहिले दोन भाग जमल्यास कोणा जर्मन भूशास्त्रवेत्याकडून वाचवून घ्यावे आणि त्याला संशोधनाच्या दृष्टीने त्यात काही चूक आढळल्यास कळवावी. ते माझे दोन भाग वस्तुतः भूस्तर शास्त्रावरील एकाद्या ग्रंथाप्रमाणे समर्पक नाहीत. त्यात माझ्या कामापुरते सिद्धांत लिहिले आहेत. माझा मूळ विषय वैदिक वाङ्‌मयाचे प्राचीनत्व. भूस्तरशास्त्र नव्हे. पण कसेहि असले तरी चूक राहू नव्हे इतकाच हेतू.

लघवीतील साखरेचे प्रमाण किंचित् वाढले आहे. तहानहि पुष्कळ लागते. म्हणून मधुमेह पुन्हा बळावतो की काय याची काळजी वाटते. हल्ली कणीक तांदूळ दुध हे खातो. साखर घेत नाही. सॅकरिन घेतो. गर्दे देशमुख याना विचारून सतरंगीचे औषध पाठवावे. पण त्याबरोबर त्याचे इंग्रजी वर्णन व प्रिस्क्रिप्शन पाठवावे.

पुस्तकांची यादी—१ बेंटलेचे भारतीय ज्योतिषशास्त्र ( आपल्या संग्रही २ प्रती आहेत. एक १८१० साली कलकत्त्यास छापलेली क्वार्टो साईज. दुसरी इंग्लंडात छापलेली डेमी ऑक्टेव्हो साईज. दिवाणखान्यात ईशान्येकडील कपाटात सापडेल. )

२ कोलब्रुकचे निबंध

३ ओरायनच्या नव्या आवृत्तीच्या कागदाचा रुमाल.

---

## ( ३४ )

१ मार्च १९१२

कणीक खाण्याचे सोडून देऊन सातूचे पीठ खाण्यास प्रारंभ केला आहे. एक पोते येथेच एका व्यापाऱ्याकडे मिळाले. तेव्हा आता कित्येक महिने पहावयास नको.

माझ्या सुटकेकरिता मी मुंबईसरकाराकडे ता० २४ फेब्रुवारी रोजी अर्ज पाठविला. त्याच बाबतीत खासगी प्रयत्न होईल की काय याबद्दल खरे याना विचारावे. माझी सक्त मजुरीची शिक्षा बदलून साधी केली त्यामुळे मला कैदेच्या दिवसात सूट मिळत नाही. तसेच ज्युबिली वगैरे प्रसंगानिमित्त मिळणारी सूटहि नाही.

कारण मला पूर्वी दोन वेळा शिक्षा झाल्या आहेत. तात्पर्य तक्रार कसली म्हणा, पण सोडा इतकेच म्हणावयाचे खरे. मार्च अखेर कदाचित् अर्जाचा निकाल लागेल.

माझ्या प्रमाणेच सौभाग्यवतीलाहि सातूच्या पिठाबरोबर दूध तूप घेण्यास सांगावे. डॉ. मुंजे यांच्या औषधाचा विचार एक महिन्यानंतर करू.

जगन्नाथमहाराज नाशीक नगर सोलापूर कोठेहि राहिले तरी चालेल. पण सूर्त पुण्यास नको.

'समालोचका'तील गीतेवरील लेख वाचला. त्यांत विशेष नवीन काही नाही. तो कोणी लिहिला ?

संकेश्वर येथील जगन्नाथमहाराजांच्या एका कुळाकडील वीस हजार रुपये इस्टेटीचे कर्ज येणे आहे. ते वसूल करण्याचा काय प्रयत्न झाला ?

---

( ३५ )

३ एप्रिल १९१२

रामभाऊ बापूच्या हातची पत्रे मिळाली. त्यानी अभ्यास चांगला करण्याचा निश्चय केला हे वाचून आनंद झाला. जगन्नाथमहाराजाना भाऊसाहेब धुळ्यास ठेवणार तर ठेवोत. ते शाळेत प्रथमच जाणार म्हणून पहिले ६ महिने घरचाच शिक्षक बरोबर घ्यावा. हळू हळू त्याना अभ्यासी स्नेहीसोबती मिळतील. धुळ्यास त्यानी सामान्य गृहस्थाच्या मुलाप्रमाणे रहावे. सरदारीचा डौल नको किंवा अनाथाचे दैन्य नको. धुळ्यास शंकरराव देव त्यांच्या अभ्यासावर लक्ष ठेवतीलच.

मद्रासचा रिव्ह्यू व त्याबरोबर प्रो. राधाकृष्ण यांच्या लेखावरील टीका पाठवीन ती मद्रासला पाठवावी.

सॉलिसिटर डालगॅडो याना बयाण्याचे पैसे पाठविले नसतील तर पाठवा. आणखी पुस्तके पाहिजेत ती—

१ व्हिटने यांचा नक्षत्रावरील लहानसा ग्रंथ ( त्या रुमालातच आढळेल. नक्षत्रांचा एक नकाशाहि आहे तो शोधावा व नीट डकवून पाठवावा. )

२ इंडियन ॲंटिक्वेरीचा अंक ज्यात वैदिक कालनिर्णयावर प्रो. जॅकोबी यांच्या निबंधाचे भाषांतर डॉ. ग्रियरसन यानी दिले आहे तो.

३ बर्जेस याने केलेले सूर्यसिद्धांताचे भाषांतर.

मुंबई सरकाराकडून माझ्या अर्जाला उत्तर नाही.

गणपतराव सोहोनी वारल्याचे ऐकून वाईट वाटले. गणपतराव व रावसाहेब दोघे बंधु मी इकडे आल्यावरच निवर्तले. त्यांचा वंश पुढे चालण्याची योजना काय केली आहे ? डॉ. लिमये वारले. हेहि परम स्नेही होते.

( ३६ )

२ मे १९१२

अर्जाला उत्तर नाही. कदाचित् तो वर पाठविण्यात आला असेल. सौभाग्यवतीला औषध म्हणून सोड्याची पूड आणि पथ्य म्हणून बदाम खाण्यास सांगावे.

उमाबाई ( नामजोशी ) वारल्या फार वाईट झाले. आता सर्व भार गणपतीवरच पडेल.

ह्यूम व लॉक यांच्या निबंधांचे ग्रंथ पाहून घेऊन पाठवावे.

---

( ३७ )

४ जून १९१२

आंबे व बुकाचे पार्सल पोचले.

हवा अजून कडक आहे. २३ मे ला ब्रह्मदेशात धरणीकंपाचा मोठा धक्का बसला. एक बौद्धमंदीर व एक खिस्ती देऊळ यांचे काही भाग कोसळले. तुरुंगाच्या किल्लेकोटाला सबंध चीर पडली. लाकडी घराना मात्र अपाय झाला नाही. पहिला धक्का बसताच मी खोलीतून उठून आंगणात जाऊन उभा राहिलो. असा धक्का बरेच वर्षांत बसला नाही म्हणतात.

अर्जाला अजून उत्तर नाही. विलंब याचा अर्थ विचार चालू असाच करायचा काय ? पण विचाराचा निकाल कोणत्या बाजूला झुकणार ? इस्टेटीच्या काही कर्जदारांचे पैसे आम्हालाच भरावे लागणार असे दिसते. पण त्यानी दरखास्ती दाखल केल्यावर भरावे. किंबहुना दरखास्ती द्या असे त्याना सुचवावेहि. कारण मग कोर्ट ऑफ वॉर्डस् कडील आपला मार्ग मोकळा होतो. कोर्ट ऑफ वॉर्डस्वर फिर्याद करावी लागली तर आपण शक्य ती सर्व तजवीज केली होती असे दाखविले तरच दाव्याचा खर्च आकारून मिळेल.

---

( ३८ )

८ जून १९१२

तुमची तार पोचली. मनाला फार मोठा जबर धक्का बसला. संकटे आली तर ती मी शांतपणाने सोशीत असतो हे खरे. पण खरेच सांगतो की या बातमीने मात्र मी अगदी हादरून गेलो. आपण हिंदु लोक. तेव्हा नवऱ्याच्या आधी बायको गेली हे व्हावे तसेच झाले असेच कोणीहि म्हणणार. पण तिच्या मरणकाळी मी जवळ नाही इतकेच नव्हे तर बंदिवासात असावे याचेच फार दुःख वाटते. पण ते होणारच होते. भवितव्यतेला कोण काय करणार ? हीच भीति मला राहून राहून वाटे आणि शेवटी तसेच घडलेहि. पण माझे दुःखकारक उदासपणाचे विचार

आणखी सांगून तुम्हाला अधिक कष्टी करू इच्छीत नाही. माझ्या जीविताचा एक भाग समाप्त झाला. दुसराहि आता लवकरच समाप्त होईल असे वाटते. तिची उत्तरक्रिया यथासांग करावी व तिच्या इच्छेप्रमाणे अस्थि प्रयाग किंवा काशी येथे गंगेत टाकाव्या. तिच्या तोंडून अखेरच्या म्हणून इच्छा प्रगट झाल्या असतील त्या शब्दशः अवश्य पाळाव्या. मुलांची प्रकृति व त्यांची विद्या यांच्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी आता सर्व तुमच्या एकट्यावर पडणार आहे. मी नसल्यामुळे मुलाना तिच्या मरणाचे दुःख अधीकच झाले असेल. माझा म्हणून त्याना निरोप सांगा की या दुःखामुळे विद्येची हानी होऊ देऊ नका. त्यांच्याहूनहि मी लहान होतो तेव्हा माझे वडील मातुःश्री दोघेहि निवर्तली. असल्या संकटामुळे मनुष्याने स्वावलंबनच अधिक शिकले पाहिजे. आपल्यावर आलेले मातृहानीचे संकट ईश्वरी अवकृपेमुळे आले असे मुलानी मानिले तर ईश्वर त्याना दूर नाही. दुःख करीत बसून कोणीहि कालाचा दुरुपयोग करू नये. होणाराला धिटाईने तोंड द्यावे.

तिची काय चीजवस्त असेल त्यांची यादी करा व त्या सर्व नीट कुलुपात ठेवून द्या. त्याचे काय करावयाचे हे मी सांगेन किंवा लिहीन. मुलानाहि आता अशा आणीबाणीचे वेळी तुमच्याशिवाय दुसरा आधार नाही. म्हणून ईश्वराने तुम्हाला बळ द्यावे याहून इतक्या दुरून मी तरी त्याला अधिक काय विनविणार?

---

## ( ३९ )

३ जुलै १९१२

तुमची ता ८ जून व २० जूनची पत्रे पावली. या दुसऱ्या पत्रातील सुमारे तीस ओळी काटल्या गेल्या होत्या. मग त्यात निषिद्ध असा मजकूर काय होता न कळे! त्यातील विषयाला मजकडून उत्तर का नाही अशा संशयात पडाल म्हणून मुद्दाम खरा प्रकार कळविला आहे. केळकर व रामभाऊ बापू यानी लिहिलेला मजकूर सगळा मिळाला.

मुंबई सरकाराने माझा अर्ज नामंजूर केला. आता बादशहाकडे अपील! तेथेहि काय होणार हे ठरलेलेच आहे. पण आपण अर्ज अपील करणार भले व ते नामंजूर करणार भले!

चवथ्या वर्षाचा प्रकृतीचा अहवाल असाः—

वजन १२३ पौंड. लघवी २४ तासात ६० औंस. शेकडा एक याहूनहि साखरेचा अंश कमी. मधुमेह अपचन दंतविकार हे सर्व ताब्यात आहेत. पण वयोमान आपला वसूल घेत चालले आहे. आतापर्यंत चार दातांचा नजराणा दिला व डोक्यावर श्वेत ध्वजा फडकू लागली!

धोतरजोडा आणि सुधाकर द्विवेदी यांचे वेदांग ज्योतिष, प्लूटार्कचे निबंध, मॅझिनीचे विश्वबंधुत्व, हेगेलची जीवितमीमांसा ही पुस्तके पाठवावी.

'आर्क्टिक होम' वरील जर्मन प्रोफेसराची टीका वाचली. त्याचे मत मला माहीत होते. पण त्याच्या उलट दुसरीहि मते आहेत. पण हा विषय तूर्त येथेच सोडून देणार आहे. जेथे भूस्तरशास्त्रावर परस्पर विरोधी अशी दोन मते तज्ञ प्रोफेसरच प्रतिपादितात तेथे माझ्यासारख्या शब्दार्थ जिज्ञासूने त्यापैकी आपणाला पटेल तो घेतल्यास दोष नाही.

मुलाना घेऊन येत्या डिसेंबरमध्ये भेटीला या. जमल्यास वासुदेवरावाना आणा. नवीन मृत्युपत्र करावयाचे आहे म्हणून पक्क्या हिशेबाचे कागद हवेत. दाजीसाहेब व उमाबाई खरे मुलाना काही दिवस मुंबईस घेऊन जातो म्हणतात ते ठीकच आहे. पण परीक्षा जवळ आल्यामुळे त्यानी न जावे हेच बरे. मुलांच्या विद्याभ्यासाशिवाय आता माझ्या डोळ्यापुढे दुसरे काही नाही. मिळेल तो चांगला शिक्षक ठेवावा मग पगार घेईल तो घेवो. काय व्यवस्था करणार हे केळकराना विचारून ठरवा. त्यानाहि आता या कामी अधीक लक्ष घालावयाला सांगा. त्यानी या कामाकडे दर आठवड्यास एक दोन तास दिले तर काम होईल.

---

## ( ४० )

३ ऑगस्ट १९१२

महाजनी मास्तर यांचा रिपोर्ट वाचून बरे वाटले. वाग्भट किंवा सुश्रुत यामध्ये मधुमेहाला सातूचे पथ्य सांगताना जी विधाने केली आहेत त्या सर्वांचे इंग्रजी भाषांतर डॉ. गर्दे यांजकडून करून घेऊन पाठवावे. येथे पावसाचे थोडथोडे शिपणे झाले. खरा पाऊस असा झाला नाही. म्हणून लोकाना दुष्काळाची भीति वाटते.

बादशहाना पाठविण्याचा अर्ज पुढील आठवड्यात रवाना करितो. तेव्हा आता खापर्डे याना म्हणावे तुम्हाला विलायतेत कोणास काय लिहावयाचे ते लिहा. आणखी पुस्तके पाहिजेत त्याची यादी खाली दिली आहे. १ आर्थर बेरी यांचा ज्योतिषशास्त्राचा इतिहास ( मरे आणि कंपनी ) २ राज्यकारभारावरील लॉक याचा निबंध ( मोर्ले यांची युनिव्हर्सिटी सीरीज ) ३ गटेचे फाऊस्ट इंग्रजी भाषांतरासह. ४ बुह्लरच्या हिंदुस्थानविषयक ग्रंथापैकी नंबर ४-५. बुद्ध धर्मावरील प्रो. केरू यांचा ग्रंथ ( जर्मन ज्ञानकोश ) ६ संस्कृत वाङ्मयावरील नवीन जर्मन ग्रंथ ( वेबर याचा नव्हे ), ग्रंथकाराचे नाव डब्ल्यू या अक्षराने सुरू होते.

( ४१ )

२ सप्टेंबर १९१२

पत्र व धोतरजोडा मिळाला. ऋग्वेदाचे ग्रिफिथ्सचे इंग्रजी भाषांतर तुम्ही पाठविले असल्यास ते मिळाले नाही. माझ्या कपाटात पुन्हा पहा व तेथे असल्यास पाठवा. वेदांग ज्योतिषाचे पुस्तक कपाटात सापडले नाही तर बनारसहून आणवा व पाठवा. सेल साहेबाने केलेले कुराणाचे इंग्रजी भाषांतरहि हवे आहे. नवीन पुस्तके मागवितो याचे कारण हाती घेतलेले लेखनाचे काम संपले. आता वेळ जावा कसा? मुलाना संस्कृत शिकण्याकरिता ओक शास्त्री यांस ठेवले बरे झाले. त्याना म्हणावे नंदर्गीकरासारखे घोटून घ्या. बापू खरे वारला वाईट झाले. पण इतके दिवस पक्षघात होऊन विचारा वाचला हे विशेष. सातूचे पिठाच्या पथ्यानेच औषधाशिवाय माझे बरेच काम झाले असे वाटते. दोन तीन पौंड वजन वाढले. सातूचे पीठ खाण्याचा मात्र कंटाळा येतो. वाटते की ते एकदा सोडून पुन्हा कणीक खाऊन पहावी. पण तुरुंगात असला प्रयोग करून पाहण्याचे धैर्य होत नाही. डॉक्टर गर्दे याना सहज विचार की सातूचे पिठावर नेहमीच राहू की मधून मधून खाल्ले तरी चालेल?

---

( ४२ )

४ आक्टोबर १९१२

पुस्तके पोचली. गर्दे यांच्या सल्ल्याप्रमाणे करून पाहतो. नाशीकचे केतकर आजारी म्हणून लिहिले ते कोण? आप्पा तर नुकतेच बरे होते. तेव्हा हे त्यांचे चुलते दाजीसाहेब केतकर असतील. यापुढे तूप पाठवाल ते पक्के कढविलेले पाठवा.

---

( ४३ )

५ नोव्हेंबर १९१२

साने सुखरूप परत आले फार आनंद झाला. त्याना आशीर्वाद सांगा. त्यांच्यापुढील आयुष्यक्रमाविषयी मागाहून समक्ष भेटीत ठरवू. रामभाऊ बापू साने वगैरे सर्वांनी माझे भेटीस यावे. येताना खरे व खापर्डे याना भेटून यावे.

थंडीकरिता दुलई पाहिजे रजई नको. टोपी पायमोजे व नेहमीप्रमाणे पुढील सालची रोजनिशी आणि आंब्याचे लोणचे वगैरे पाठवावे. आणि घरच्या जिनसांची याद तसेच ३० नोव्हेंबर १९१२पर्यंतचे केसरी मराठ्याचे हिशेब आणावे.

( ४४ )

डिसेंबर १९१२

नाताळ संपण्यापूर्वी तुम्हास भेटण्याची परवानगी मिळणार नाही. तरी नागपूर व कलकत्ता येथे एखाद दुसरा दिवस राहून त्या बेताने यावे. मुलांचे मॅट्रिक्युलेशन परीक्षेचे पेपर बरे गेले हे वाचून आनंद झाला.

---

( ४५ )

४ जानेवारी १९१३

मुलांना आताच तुमच्याबरोबर येण्याचे जमत नसेल तर सगळे मिळून एप्रिलातच या. जगन्नाथमहाराज यांच्या शिक्षणाची व्यवस्था धुळ्यास हवी तशी झाली असे दिसते. यशवंतराव कुलकर्णी यानी मधुनमधुन धुळ्यास जावे व काय आहे नाही पहावे.

साने याना लाहोर येथे प्रोफेसरीची जागा प्रारंभीच मिळाली हे चांगले झाले. नवीन स्वदेशी कारखाने निघण्याची लाहोर ही एक जागा आहे. तेव्हा त्यांच्या रासायनिक ज्ञानाचा उपयोग होईल. पण त्याना जर्मनीत पाठविले ते स्वतंत्र राहून धंदा करण्याचे उद्देशाने. त्यांच्या वडिलांचीहि इच्छा तशीच होती. माझ्या मते आज नाही उद्या मुंबईस प्रो. गजर यानी आपले बस्तान बसविले आहे तसेच साने यानीहि बसवावे. म्हणून या दृष्टीने जी जी संधि मिळेल तिचा फायदा घ्यावा.

रावसाहेब बापट हे भय्या याला विलायतेला कोणते शिक्षण घेण्याला पाठविणार? सिव्हिल सर्विस परीक्षेकरिता की इंजिनियर होण्याकरिता? त्याना म्हणावे त्यातल्यात्यात इंजिनियरची परीक्षा होण्याला खर्च कमी लागेल. त्याची थोडी खटपट केली तर खर्चाची रक्कम उभी राहील. खरे यांची सून म्हणजे सितारामपंत पटवर्धन यांची मुलगी मॅट्रिक परीक्षा पास झाली म्हणे. शाबास. रावबहादुर सितारामपंताना म्हणावे तुम्ही आता एक लाख रुपयांचा ट्रस्ट करून हिंदु एज्युकेशन फंडाप्रमाणे विद्यार्थ्यांना परदेशी पाठविण्याची काही योजना करा. हे तुमचे स्मारक इतर कोणत्याहि स्मारकापेक्षा अधिक उपयोगी होईल. कीर्ति होऊन नावहि होईल. त्याना ही कल्पना सुचलेली नसल्यास माझी म्हणून तरी सुचवावी व काय म्हणतात ते कळवावे.

बादशाहांच्या अर्जाला पाच महिने झाले. उत्तर नाही. बसल्याबसल्या आशा करीतच असतो.

विलायतच्या अपीलाचे काय झाले कळवावे. विलायतेला जाण्यापूर्वी किंबहुना सॉलिसिटरच्या हाती टिपणे देण्यापूर्वी खरे यांची एकदा गाठ पडली तर बरे होईल.

( ४६ )

३ फेब्रुवारी १९१३

तुह्मी काही पुस्तके दुसऱ्याची ह्मणून परत मागितली ती पाठवीत आहे. प्रो. राधाकृष्ण याना माझे नमस्कार लिहा. बौद्ध धर्मावरील आर्थर लिलीचे व ख्रिस्ती धर्मावरील रॉबर्टसनचे, आणि आपल्या पुस्तकसंग्रहात मिळाल्यास ओलडनबर्गचे बुद्धचरित्र, ही पुस्तके पाठवावी.

मुलांच्या कॉलेजातील अभ्यासाची व्यवस्था नीट करावी. फर्ग्युसन कॉलेज गावानजीकच आहे. गावातील मुलाना सहज पायाने जाता यावे अशी जवळच जागा कॉलेजकरिता मुद्दाम घेतली आहे. म्हणून मुले पायी कॉलेजात गेली आली तरी हरकत नाही.

यवतमाळ जिल्ह्यापैकी कळंब गावच्या एका धनगराने मजकडे एका मुकदम्यातील काही कागद पाठविले आहेत. त्याच्या भावाने त्याचे शेत घेतले म्हणून मूळ दावा व त्यावर अपील झाले त्याचे हे कागद आहेत. त्याला बहुधा माझा सल्ला हवा असेल. पण तो बोलून चालून धनगर! त्याला हे काय कळणार की मला हल्लीच्या स्थितीत असले सल्लामसलतीचे काम करिता येत नाही. तरी तिकडून कोणी पुण्यास लिहिले तर खरी स्थिति त्याला कळवा. हायकोर्टाकडील कागद लवकर छापविणे व भाषांतर बिनचूक होणे याविषयी दाजीदाहेबाना विचारून खटपट करावी. माझी प्रकृति बरी आहे. माझ्या अर्जाचे काय झाले याविषयी जेलसुपरिंटेंडेंटनेहि वर चौकशी चालविली आहे असे मित्रमंडळीना कळवा.

---

( ४७ )

८ मार्च १९१३

अखेरीस अर्जाचे उत्तर एकदाचे आले. सेक्रेटरी ऑफ स्टेट याने अर्ज दाबून ठेवला. पुढे पाठवलाच नाही. पूर्वी लॉर्ड मोर्ले यानी एक वेळ केले तसेच आताहि झाले.

साने लवकरच भेटीस येणार म्हणून पत्रात काही लिहित नाही. रामभाऊने कॉलेजात संस्कृत भाषा हाच विषय घ्यावा. पाली घेऊ नये. पाली म्हणजे विकृत संस्कृत. ज्याला संस्कृत येते त्याला कोणाचे सहाय्य न घेताहि काही थोडया महिन्यात पाली शिकता येते. शिवाय पुढील लेखनव्यवसायात संस्कृत उपयोगी पडते. पाली उपयोगी पडत नाही.

ऑटो हॅरो सोविट्झ ( लाइपझिक ) या कंपनीची पौर्वात्य ग्रंथांची यादी पाठवावी. ती पूर्वीप्रमाणे हल्लीहि आमचेकडे येत असेल. चर्मी जोडयावांचून अडले आहे. तरी टपालाने पाठवावा.

नामजोशी यांच्या घरासंबंधाने सितारामपंत पटवर्धन याना सांगून त्यातल्या त्यात जेवढी अधीक रक्कम मिळेल तेवढी घ्यावी. नामजोशांच्या कुटुंबाला हल्ली फार गरिबी आली आहे. म्हणूनच मी घराकरता अधीक पैसे मागतो असे सांगावे. पण अखेर काय देतील ते घेऊन प्रकरण निकालात काढावे.

---

(४८)

३ एप्रिल १९१३

तुमचे तारीख २० मार्चचे पत्र पावले. पण त्याचा एक कान कापला गेला. माझा अर्ज नामंजूर झाला म्हणून तुम्हाला माझ्यापेक्षाहि अधीक राग आला व वाईट वाटले असे दिसते. सहजच तुम्ही पत्रात सरकारवर थोडासा ताशेरा झाडला असावा. पण पत्र सरकारच्या हातूनच मला मिळणार. मग सरकार आपला अधिकार चालविल्याशिवाय कसे राहील ? तुम्ही सरकारावर टीका केली असेल तितकाच मजकूर कापला गेला असावा. तरी यापुढे हे लक्षात ठेवून लिहीत जा.

तुम्ही मे महिन्यात भेटीस येणार असा रंग दिसतो. साने याना म्हणावे अलाहाबाद येथे १९०७ साली छापलेली बार्हस्पत्य ज्योतिर्वेदागांची प्रत विकत घेऊन पाठवा. येताना दोडका कार्ले पडवळ तांबडा भोपळा वगैरे भाज्यांचे थोडे बी घेऊन या. त्याचा येथे काही उपयोग आहे.

सितारामपंतानी माझे म्हणणे मान्य करून नामजोशी यांच्या घराकरिता रक्कम दिली ती ठीक आहे. उपकार झाला तो नामजोशांच्या कुटुंबावरच झाला. परंतु त्याकरता मीहि पण त्यांचे आभार मानतो असे कळवावे. ही रक्कम हाती आली म्हणजे त्यानी ती पोस्टल बँकेत ठेवावी.

कळंबच्या धनगराचे पत्र आले आहे. ते मोडीत होते म्हणून मुंबईसरकारच्या ओरिएंटल ट्रान्सलेटरकडे जाऊन भाषांतर होऊन येण्याचा मान त्याला मिळाला ! तो पत्रात म्हणतो ' हायकोर्टाकडे अपील करावयाचे आहे तरी अपील यादी लिहून पाठवा. ' पण कची हकीगत कळल्याशिवाय मी अपील यादी काय लिहिणार ? व तिचा उपयोग कितपत होणार ? तोंडी हकीकतीचाच खरा उपयोग होतो. त्याला म्हणावे उमरावतीस दादासाहेब खापर्ड्यांकडे जा. पत्र लिहिणारा धनगर हा मूळ प्रतिवादी होता. आणि त्याने अव्वल कोर्टात द्यावा तितका पुरावा वेळीच दिला नाही असा प्रकार दिसतो. तरी अपील कोर्टाने आणखी पुरावा घेण्याकरता मुकदमा परत पाठविला तरच काही उपयोग होईल. एरव्ही होणार नाही असे त्याला कळवावे. बिचाऱ्याची अपीलाची मुदतहि संपली असावीसे दिसते. मी येथून कसा त्याला उपयोगी पडणार ? हे सर्व त्याची समजूत पटेल असेच लिहावे.

ता. क. येताना डॉ. गर्दे यांचे वाग्भटाचे मराठी भाषांतर व निघंटूचे माझे पुस्तक गर्द्यांना दिले आहे ते आणा. सुश्रुताचे गुजराथी अगर इंग्रजी भाषांतर मिळते का पहावे व आणावे वाग्भट (मूळ–ग्रंथ) पंचदशी व योगवासिष्ठ हे ग्रंथहि आणावे.

---

(४९)

७ जून १९१३

तुम्ही ब्रह्मदेशाहून परत पुण्यास पोंचल्याचे कळले. मथूताईची प्रकृती बिघडली होती ती आता बरी असल्याचे कळले. साने यांच्या इतर प्रयत्नाबरोबर युनिव्हर्सिटीच्या परीक्षकाचे काम मिळण्याचाहि प्रयत्न त्यांनी अवश्य करावा. वरिष्ठ पदवीधराकरता रसायनशास्त्राचे परीक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली म्हणजे केमिस्ट म्हणून सहजच त्यांची लोकाना माहिती होते. म्हणून हा प्रयत्न त्यानी मुद्दाम करावा.

शंकरराव पाटकर याना मध्येच माझी कशी आठवण झाली? त्याना नमस्कार कळवावा. रा. सा. उपासनी कौन्सिलात निवडून आले म्हणून मी त्यांचे अभिनंदन करितो. वासुदेवराव जोशी व केळकर यांच्यावर कौटुंबिक आपत्तीचा घाला पडल्याचे वाचून वाईट वाटले. त्यातल्यात्यात केळकरांवरील घाला तर जबर आहे. म्हणून विशेष वाईट वाटते.

धम्मपद या ग्रंथाची देवनागरीतील प्रत पाहिजे. कलकत्त्यास देऊसकरांकडे किंवा इतर कोणाकडे शोध करावा. डॉ. गर्दे यांच्यावर खटला झाला त्याचे काय झाले? तुम्ही समक्ष माहिती सांगितली त्यावरून हे प्रकरण अगदी शुष्कच दिसते.

'हेबियस कॉर्पस ॲक्टा'प्रमाणे माझ्या सुटकेचा प्रयत्न करावा असे कोणी सुचवितात असे तुम्ही लिहिता. त्यात यश येईल असे मला वाटत नाही. माझी मूळची हद्दपारीची शिक्षा क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम ४०२ प्रमाणे साधी केली गेली नसती तर मला चांगल्या वर्तणुकीबद्दल आठ किंवा बारा महिन्यांची सूट मिळाली असती. दिसण्यात मुद्दा चांगला दिसतो. पण कायदेशीरपणात किती टिकेल सांगवत नाही.

बाळामहाराज यांच्या स्वाधीन इस्टेट केली जाऊ नये म्हणून कोर्टात ताकिदीचा हुकूम मागवा. पूर्वीहि तो आपण मागितलाच होता. प्रीव्हि कौन्सिलकडे अपील करण्याला परवानगी मिळाली आहे म्हणून अखेर निकाल लागेतोपर्यंत तहकुबी मागणे रीतीचे आहे. आपणाविरुद्ध झालेल्या हुकुमनाम्यांची हळुहळु भरपाई करू लागावे. हुकुमनामे वासुदेवराव जोशी किंवा उरवणे किंवा दलपत मानचंद अशा कोणा स्नेह्याच्या नावे बेचन घेऊन इस्टेटीविरुद्ध तरते ठेवणे अवश्य आहे. भरपाई करणे तीहि कोर्टातच करावी. म्हणजे मागाहून शंका उरत नाही.

येथे थोडासा पाऊस पडून किंचित थंडाई आली आहे. प्रकृती ठीक आहे.

(५०)

५ जुलै १९१३

टॉमसन्‌ची भगवद्गीता हेगेलचे संस्कृत व्याकरण आणि सिद्धांतकौमुदी इतकीं पुस्तकें पावली. पैकी कौमुदी परत पाठविली आहे. ती शिळा छापाची आहे व तिला सूची नाही. निर्णयसागर छापखान्यात मराठी पायका टाइपात छापलेली प्रत पाहिजे. तो ग्रंथ सुमारे पाचशे पानांचा आहे. माझ्या बसण्याच्या खोलीत होता. पाहून पाठवा. गीतेच्या निरनिराळ्या प्रती मागविल्या त्या विकत घेऊन झाल्या का ? हवा थोडी थंड झाली ह्मणून काही लेखनव्यवसाय करीन म्हणतो.

सौभाग्यवतीचे वर्षश्राद्ध यथासांग पार पडल्याचे ऐकून आनंद वाटला.

माझ्या कैदेचे आता पाचवे वर्ष संपणार ! म्हणून लिहितो की प्रकृती आहे तशीच आहे. विशेष फरक नाही. आहे या स्थितीतच आणखी एक वर्षाने तुरुंगातून बाहेर पडेन अशी आशा वाटते.

---

(५१)

२ ऑगस्ट १९१३

शिरोडकर यांच्या दाव्यातील हुकुमनामा इस्टेटीवर न देता ट्रस्टी विरुद्ध जातीवर का दिला ? कोर्टाचे आश्चर्य वाटते. शिरोडकराना गहाणखत लिहून दिले ते मूळ डि. कोर्टाच्या परवानगीने असे असताहि ट्रस्टीवरच हुकूमनामा ! ठीक आहे. अपील दाखल करावे. आपल्यासारखे होईल.

कौमुदीचे पुस्तक सापडत नाही म्हणता ! मग ते काय सांडले ? अशीच आणखीहि बुके गहाळ झाली असतील अशी शंका वाटते. कोणीहि येतो व घरचे पुस्तक घेऊन जातो असे दिसते. केळकर व सदाशिवराव भावे याना म्हणावे लायब्ररीची पुस्तके तरी नीट संभाळा. बाहेर कोणास होता होईतो पुस्तक देऊ नये. मला व्याकरण पाहिजे ते पाली भाषेचे. हे सुमारे शंभर पानांचे पुस्तक कातडी पुठ्ठा घातलेले फ्रान्समध्ये छापलेले आहे. कदाचित् देशमुखांच्या पुस्तकसंग्रहात सांपडेल. पाणिनीच्या ग्रंथाप्रमाणे तेहि सूत्र रूपाने लिहिले आहे. भागवत यांच्या पुस्तकात मला हव्या त्या गीतेच्या सर्व आवृत्त्या आहेत काय ? हे भागवत कोण ? हरी रघुनाथ काय ? खापर्डे याना ह्मणावे की तुम्ही आम्ही प्रयत्नवादीच आहो. 'ठोठावल्याने दार उघडते' ही बायबलची शिकवण आपल्या परिचयाचीच आहे. मला मात्र लवकर सुटण्याची फारशी आशा वाटत नाही.

( ५२ )

१ सप्टेंबर १९१३

ता. २८ आगष्ट रोजी मला एकाएकी ताप आला. तो चार दिवस टिकला. १०३ च्यावर जाऊन पुन्हा उतरे. त्यामुळे सहा पौंड वजन एकदम कमी झाले. आता प्रकृति बरी आहे. तेव्हा ते एक महिन्यात भरून निघेल.

भागवतांचे बुक तयार झाले नसल्यास सुटे छापील फर्मे पाठवीत जावे. ओकशास्त्र्यांच्या अमरकोशाचे फर्मे असेच आले होते. पांचसाडेपांचशे पानांचे कोरे नोटबुक पाठवावे. पाठविण्यापूर्वी आफिसात त्यावर हाताने क्रमांक लिहावे. मद्रासेकडे टी. आर. कृष्णमाचारी हे श्रीमध्वाचार्यांचे सर्व ग्रंथ छापून काढीत आहेत. तरी त्याची वर्गणी भरून पहिला भाग इकडे पाठवावा. इतर भाग येतील तसतसे लायब्ररीत ठेवावे. ग्रंथ देवनागरी लिपीत असेल तरच हवा हे लक्षात ठेवावे.

---

( ५३ )

३ आक्टोबर १९१३

पुस्तके व इतर जिन्नस पोचले. धरणीकंपाच्या आणखी एका धक्क्याबद्दल तुह्मी लिहिता. पण तो येथे फारच हलका होता. ब्रह्मदेशात इतर ठिकाणी तो भारी बसला असेल ह्मणून त्याचा गवगवा वर्तमानपत्रात झाला असावा.

भागवतांचा गीतासंग्रह पाहिला. चांगला आहे. पण त्यात उत्तरगीता नाही. ही गीता व त्यावरील गौडपादांचे भाष्य ही श्रीरंगम् येथे बालसुब्रह्मण्यम् यानी १९१० साली छापल्याचे समजले. तरी त्याची एक प्रत व भगवद्गीतेवरील पैशाच भाष्याची एक प्रत पाठवावी.

माझी शिक्षा साधी केली. पण त्यामुळे मला सूट मिळावयाची ती मिळत नाही या मुद्यावर फिरून एकदा अर्ज करावा असा विचार आहे. तरी खापर्डे वगैरेना विचारून तसा अर्ज करावा की न करावा हे कळवा.

---

( ५४ )

३ नोव्हेंबर १९१३

इनॉक्युलेशन संबंधाने विचारता तर माझे पूर्वीचे मत होते तेच कायम आहे. फरक इतकाच की पूर्वीपेक्षा हल्ली लस अधिक काळजीपूर्वक तयार करितात व टोंचतात यात शंका नाही. आणि या दोन्ही बाबतीत जसजसी अधिक काळजी घेतली जाईल तसतसा लोक या उपायाचा अधिक अवलंब करतील. परंतु काही म्हटले तरी बाहेरची लस हे एक प्रकारचे विषच होय. म्हणून ज्याना

प्लेगमध्ये स्थानत्याग करिता येईल त्यानी लस टोंचून घेण्यापेक्षा या दुसऱ्या उपायाचा अवलंब करावा हेच श्रेयस्कर होय. युरोपियन लोक गावाबाहेर स्वच्छ हवेत राहतात म्हणून ते प्लेगची लस सहसा टोचून घेत नाहीत. युरोपियन लोकाना प्लेग होत नाही ही समजूत खरी नाही.आपल्यासारखाच युरोपात पूर्वी प्लेग होत असे. तेव्हा हजारो गोरे लोक मृत्युमुखी पडत. आता सर्वांनाच स्थानत्याग करिता येतो असे नाही. म्हणून ज्याना तो करिता येत नाही, विशेषतः. प्लेगपीडित लोकाजवळ ज्याना काम करावयाचे असते, त्याना लस टोचणे हा उत्तम उपाय होय. त्यानी तो अवश्य करावा. रामभाऊ बापू यांचा प्रकार काही असा नाही. त्याना गावाबाहेर शुद्ध हवेत वाटेल तितके दिवस राहता येण्यासारखे आहे. म्हणून त्यानी लस टोचूव घेण्याचे कारण नाही. त्यातल्या त्यात बापूची शरीरप्रकृति बरी नाही. पण त्याला नेहमी प्लेगची भीति वाटत असेल तर मग इलाज नाही. टोचून घ्यावे. कारण भीतीनेहि मनुष्य रोगप्रवण होतो. बापूची परीक्षा झाल्यावर मुलानी सिंहगडला जावे. बापूला म्हणावे वाड्यात जाऊन अभ्यास करीत बसू नको. इतक्याहि उपर बापूला टोचून घ्यावेसे वाटत असेल तर त्याने खुशाल घ्यावे. त्याला स्वतःला धीर निघत नसला तर मी येथून किती देणार ? पेंडसे यांच्या झोपडया तुम्ही घेतल्या त्या चांगल्या आहेत. मजजवळ आता गीतेची सर्व भाष्ये जमली आहेत. फक्त वल्लभाचार्यांचे तेवढे नाही. मुंबईत ज्येष्ठराम यांजकडे शोध कर. ते वल्लभाचार्यांच्या मुंबईतील महाराजांजवळ नक्की शोध करतील. मधुसूदन सरस्वती यांच्या प्रस्थानभेदाचीहि एक प्रत पाठवावी. जर्मन तत्त्ववेत्ता लीट्झ याची इंग्रजीत भाषांतर झालेली तत्वज्ञानावरील चारहि पुस्तके पाहिजेत. तसेच बौद्धधर्म व खिस्तीधर्म यावरील श्रेडर याचे जर्मन भाषेतील पुस्तक प्रो. घाटे याना सांगून ऑटो हॅरोजॉ विट्झ यांजकडून व लॉरिन्सर याची भगवद्गीता व सुत्तनिपात ( फॅन्सबॉल याच्या टीकेसह ) पाठवावी.

तुमच्या पत्रातील एक भाग पुनः कापण्यात आला होता. आपण होऊन सरकारला हालविल्याशिवाय माझ्या सुटकेच्या कामी स्वतः सरकार हालणार नाही. भौतिक गतिशास्त्रात असा एक नियम आहे की जड वस्तु गत्युन्मुख किंवा गतिप्रवण झाली असली तरी तिला पहिला धक्का हा दुसऱ्या कोणी तरी द्यावाच लागतो. सदाशिवराव भावे वारले फार वाईट झाले. त्याच्या झेपेइतका त्याचा आवाका नव्हता. पण एकंदरीने होतकरू होता. मी परत आल्यानंतर तो असता तर अधिक शिकला असता. केसरी ऑफिसने त्याच्या आयुष्याचा विमा उतरला होता किंवा नाही हे कळवा. त्याच्या नावावर ऑफिसची काही बाकी निघत असल्याचे तुम्ही बोलला होता तरी ती जमा धरून हिशेबातून काढून टाका. त्याच्या कुटुंबाला एखादी देणगी द्यावी असे मनात आहे. परंतु ते आताच घडणे कठीण. तो आईबापाशी भांडून निघाला होता व घरी कुटुंब व चार मुले एवढा प्रपंच होता. म्हणून त्याच्या स्थितीबद्दल वाईट वाटते.

वैदिक कालगणनेवरील पुस्तक इंग्रजीत लिहावयास घेतले आहे. दोन तीन महिन्यात लिहून होईल. हे पुस्तक म्हणजेच ओरायनची सुधारून वाढविलेली आवृत्ति हे पूर्वी तुम्हास लिहिलेच आहे.

---

( ५५ )

३ डिसेंबर १९१३

वासुअण्णा अजून आजारी आहेत. पण अर्धांगवायू नाही इतके तरी बरे आहे.

वल्लभभाष्याची प्रत पाठवा. मला छापील गुजराथी वाचता येते. जेल सुपरिंटेंडेंटलाहि ते वाचता येते. तेव्हा पुस्तक लवकर मिळण्याला अडचण पडणार नाही.

बाळामहाराज यानी दरखास्त दिली. तिची नोटीस मजवर बजावण्याकरिता येथे आली. तिच्या एका प्रतीवर सही करून तुमच्याकडे पाठविली आहे. त्याच्या पाठीवर माझे म्हणणेहि लिहिले आहे. ताईमहाराज याना देवविलेला कोर्टखर्च शांताका व बाळामहाराज दोघेहि इस्टेटीचे वारस म्हणून मागणार. पण इस्टेटीचा वारस कोण हाच तर प्रिव्हि कौन्सिलातील अपीलाचा मुख्य मुद्दा आहे. वारसदारीचा हक सांगणारे दोन तोतये उभे राहिल्याने आयते परस्पर काम होईल! तूर्त आम्हाला खर्चे पाडून अडचण करावी इतकाच त्यांचा उद्देश दिसतो. पण आम्ही खर्च द्यावयाचा तर त्याबद्दल त्या दोघांकडूनहि जामीन घ्यावा अशी मागणी आपणास करिता येईल. शांताका व बाळामहाराज हे दोघेहि संस्थानचे रहिवासी यामुळे तर आपल्या अर्जाला विशेष जोरच येईल.

अपिलाचे कागदपत्र अद्याप छापून होत नाहीत आश्चर्य आहे. हायकोर्टाचा छापखाना एकच असेल. पण लोकानी किती थांबावे ? या प्रकरणी न्यायाधीशाला राहो पण हायकोर्टाच्या छापखान्याला तरी दोष लावणे तो कोर्टाच्या बेअदबीचा गुन्हा केल्याशिवाय खचित लावता येईल! छपाईचा सगळा खर्च पक्षकारच सोसणार मग आपल्या छापखान्यात काम लौकर होत नसल्यास दुसऱ्या सरकारी छापखान्यात छापून घेण्याला हायकोर्टाचे काय दोन चव्वल खर्च होतात! या दिरंगाईचा निषेध करावा तितका थोडाच होईल. इतका विलंब लावणे हे हास्यास्पद नव्हे काय ?

हिंवाळ्यामुळे माझे वजन आता वाढले. १२८ पौन्ड आहे.

खापर्डे इकडे येऊ म्हणतात पण माझे आता सातच महिने उरले. तरी त्यानी आपला धंदा बुडवून येण्याचे कारण नाही. त्यांचे व्यर्थ नुकसान का ?

---

( ५६ )

१ जानेवारी १९१४

बापू प्रीव्हियस परीक्षा पास झाल्याची दातारांकडून तार आली. प्लेग अजून असेल तर गावात रहावयास जाऊ नका. बाहेरच रहा.

यंदा मात्र मी खास कैदेतून सुटणार. प्रयत्न व्हावयाचे ते सर्व झाले. आता शांत मनाने बसलो आहे. डोक्यावर फुटकुळ्या उठलेल्या तुम्ही येथे पाहिल्या त्या खरोखरच मधुमेहाच्या विकारातल्या होत्या. पण तेव्हा मी तुम्हाला स्पष्ट तसे सांगितले नाही इतकेच. पण ते आता निभावले. मनुष्याच्या प्रकृतीचे घड्याळाच्या यंत्रासारखे आहे. घड्याळ चालू राहते ते चक्रांच्या किंवा लंबकाच्या वजनामुळे नव्हे तर कमानीच्या लवचीकपणामुळे!

---

## (५७)

१ फेब्रुवारी १९१४

माझ्या प्रकृतीविषयी तुम्ही लिहिले ते वाचून हसू आले. माझी प्रकृति बरी आहे याचा अर्थ मी ती अतिशय काळजी घेऊन आणि आत्मसंयमन करून पथ्य वगैरे संभाळतो म्हणूनच ती अशी राहिली. एरवी अशा उतार वयात प्रकृति मला काय दाद देते! १९१० सालच्या हिवाळ्यात मी चार महिन्यात गीतेवरील ग्रंथ लिहून काढला. गतवर्षी हिवाळ्यात माझ्या हातून वैदिक कालनिर्णयाचे दोन भागहि पुरे लिहून झाले नाहीत. म्हटले तर दोन्ही वर्षी थंडी तितकीच होती. तीन वर्षात वयोमानामुळे प्रकृति आतूनच इतकी क्षीण झाली की जी थंडी पूर्वी मजेशीर वाटत होती तीच आता सोसवत नाही. आता माझ्या सुटकेला अवघे सहा महिने उरले. तरी माझ्या भेटीला इतक्या दुरून यावयाचे म्हणून येऊ नका. मुले इकडे पत्र लिहितात त्यात आपण सुटीत कोठे मुशाफऱ्या केल्या त्याची वर्णने लिहितात. पण त्याना म्हणावे तुमची प्रवासवर्णने वाचणे येवढेच आमच्या जेल सुपरिंटेंडेंटला काम नाही.

---

## (५८)

५ मार्च १९१४

तुरुंगाच्या नियमाप्रमाणे सुटकेपूर्वी दोन महिने सरकारने मला हिंदुस्थानात नेऊन ठेविले पाहिजे. पण माझ्या बाबतीत सरकारचा काय विचार आहे तो अद्याप कळत नाही. तो निश्चित कळताच तुम्ही सुचविल्याप्रमाणे वासुदेवराव विजापूरकर यांच्या मार्फत तिकडची सर्व पुस्तके आगाऊ पाठविण्याची व्यवस्था करितो.

नारदपंचरात्र हे संस्कृत पुस्तक पाहिजे आहे. पाहून पाठवावे. तसेच प्रोफेसर सेलंड यांचे बुद्ध आणि खिस्त हे पुस्तक आणि निकोलस नॉटोविच याचे खिस्त हे पुस्तक विलायतेहून मागून पाठवा. येथील बागेत लावण्याकरिता कृष्णा काठच्या वांग्याचे बी काही थोडे पाहिजे आहे ते टपालाने पाठवावे. सांगलीस फडके यांचेकडे मिळेल.

( ५९ )

१ एप्रिल १९१४

तुमचे ता. १८ चे पत्र येथे पाडव्याचे दिवशी पोचले. उन्हाळा जोरात सुरू झाला आहे. हे शेवटचे अग्निदिव्य मी करीत आहे. माझी सुटका किंवा हिंदुस्थानास बदली यापैकी एकाचीहि अजून वार्ता नाही. १८९८ साली लौकर सुटका झाल्यामुळे सहा महिन्याची शिक्षा भोगण्याची उरली होती तिचा ससेमिरा माझ्या मागे आहेच. पण या सहा वर्षाला ते सहा महिनेहि जोडण्याचा आग्रह सरकार आता धरील असे वाटत नाही. सहा महिने धरून घ्यावयाचे तर त्याना मला कोर्टापुढे पुन्हा उभे करावे लागेल. असो. काय होईल ते पाहू. तुरुंगाचे नियम काहीहि असोत पण मला ऐन सुटकेच्या वेळीच हिंदुस्थानास नेतील आधी नेणार नाहीत असे वाटते. पुस्तके आगाऊ विजापूरकरांचेकडे पाठविण्याची व्यवस्था करीत आहे. दुसरी तीन पुस्तके मात्र आताच बुकपोष्टाने परत पाठवीत आहे. त्यांची व्यवस्था लिहिल्याप्रमाणे करावी.

प्रीव्हि कौन्सिल अपीलाचे कागद एकदाचे छापून झाले ह्मणता ! विलायतेतील सॉलिसिटर यांचे नाव डाऊनर असे लिहिले गेले पण ते चुकून लिहिले की काय ! कारण डालॅंडो हेच आपले जुने सॉलिसिटर होत.

---

( ६० )

२ मे १९१४

प्रीव्हि कौंसिल अपीलाचे छापील-कागद विलायतेस रवाना झाल्याचे वाचून समाधान वाटले. दाजीसाहेबाना म्हणावे चालू सुटीत अपीलातील तक्रारीची टिपणे लिहून छापून काढा. बुके भरून दोन पेट्या बंदोबस्ताने आज संध्याकाळी रेलवे स्टेशनवर रवाना करीत आहे. त्या उतरून घेऊन पुढे रवाना करण्याविषयी विजापूरकर याना लिहिले आहे. त्यांचे भाडे भरून मुंबईस पेट्या उतरून घ्याव्या व पुण्यास रवाना कराव्या म्हणून दातार याना लिहा. पेट्या फुटल्या नसतील तर मी येईपर्यंत त्या उघडू नयेत. किंवा दमट जागेतहि त्या ठेवू नयेत. प्रत्येक पेटीत आतील बुकांची याद ठेवली आहे.

माझ्या खर्चाकरिता ५० रुपये पाहिजेत ते पाठवा. जुलैपूर्वी येथून मला हालवीत नाहीत, म्हणून मला येथून हालविण्याचे नक्की समजेपर्यंत दर महिन्यास पत्र पाठवीत जा.

## ( २ ) स्वतः टिळकांनी सांगितलेली हकीकत

वरील पत्राखेरीज इतर थोडी हकीकत देण्यासारखी आहे. टिळक मंडाले-हून पुण्यास आल्यावर केसरीकरिता मुलाखतीदाखल झालेल्या प्रश्नोत्तरानी जी हकीकत त्यांचेकडून मिळाली ती ता. २३ जून १९१४ च्या केसरीत प्रसिद्ध केली होती. ती स्वतः टिळकांनी सांगितली यामुळे तिला विशेष महत्त्व सहजच येते. म्हणून तीहि काही भाग कमी करून या खाली दिली आहे:—

"शिक्षा झाल्यानंतर हायकोर्टात मला कोणास भेटू न देता लागलीच पोलिसांनी खाली आणून तेथे पूर्वीच तयार ठेवलेल्या मोटारगाडीत बसविले. मोटारगाडीतून आम्ही बी. बी. सी. आयच्या स्टेशनानजीक बाजूला उभ्या असलेल्या स्पेशल ट्रेनमध्ये बसलो. पोलिसांचा व ड्रायव्हरचा जो संवाद झाला त्यावरून ही आमची स्पेशल ट्रेन येथे काही तासापूर्वी आणून ठेवलेली होती असे समजले. मला कोठे नेणार हे त्यावेळी कोणीहि सांगितले नाही. मीहि विशेष चौकशी केली नाही. दुसरे दिवशी सकाळी सात वाजता अमदाबादच्यापुढे साबरमती स्टेशनवर जेलच्या समोर गाडी उभी राहिली. अमदाबादचे कलेक्टर तेथे आले होते. त्यांनी व पोलिसांनी लागलीच गाडीतून मला उतरून घेऊन साबरमतीच्या तुरुंगात नेले.

"त्या ठिकाणी माझी खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था इतर सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या कैद्यांप्रमाणेच होती. अन्न व वस्त्र जेलचेच मिळत होते. पण त्यामुळे माझे वजन दहा दिवसात सुमारे दहा पौंड कमी झाले. तेव्हा जेलात मिळणारे अन्न मी खात नसून उपास करीत असल्यामुळे वजन तुटले अशी तेथील अधिकाऱ्यास शंका येऊन त्यांनी मी अन्न खातो किंवा नाही हे पहाण्यास दोन तीन दिवस पहारा ठेविला! तेव्हा त्यांची शंका खोटी आहे असे त्यांस आढळून आले. आणि डॉक्टरच्या सल्ल्याने अन्नात फरक होऊन तेव्हापासून रोज दोन पौंड दूध व दोन औंस तूप देण्यास सुरुवात झाली. व त्याचप्रमाणे एक वेळेला गव्हाची रोटी आणि एक वेळेला भात देऊ लागले. त्यामुळे पुढे एक महिन्यात वजनात थोडा फरक पडला व मग तेच अन्न पुढे चालू ठेविले. शिक्षा सक्तमजुरीची होती तरी वजन कमी भरल्यामुळे अमदाबादेस काही काम दिले नाही.

"माझी शिक्षा काळेपाण्याची असल्यामुळे मला अमदाबादेस फार दिवस ठेवणार नाहीत हे मी समजूनच होतो. एके दिवशी ( ता. १३ सप्टेंबर सन १९०८) रात्री आठ वाजता जेलर मी ज्या खोलीत निजत होतो तेथे आले व दाराचे कुलूप काढून ते मला ऑफिसात घेऊन गेले. तेथे माझी रवानगी करण्याची सर्व तयारी करून ठेविली होती व एक आगगाडी जेलच्या बाहेरच उभी होती. तथापि आम्हाला कोठे पाठविणार हे या वेळी कोणीहि सांगितले नाही. बरोबर स्वयंपाक करण्याकरिता एक गुजराथी ब्राह्मण होता. त्यासहि पुढे कोठे जावयाचे हे माहीत नव्हते. एक पोलिसांची पार्टी आमचे बरोबर होती. पैकी एक युरोपियन इन्स्पेक्टर

ठेवली होती व मी तेथे गेल्यावर योजून ठेवलेल्या कोठडीत जेलर मला घेऊन गेला. जेल मंडालेच्या किल्ल्यातच एका बाजूला नैऋत्य कोपऱ्यात बांधलेला आहे. मी तेथे असेपर्यंत मला या जेलाबाहेर केव्हाहि काढले नाही ! एकदा मंडाले जेलात जेव्हा कॉलरा बराच वाढला तेव्हा मात्र दोन अडीच महिने मंडाले जेलातून काढून मिकट्टिला येथील जेलात तेवढ्या पुरते मला नेऊन ठेविले होते.

" मला ज्या कोठडीत नेऊन ठेविले होते ती कोठडी दुसऱ्या मजल्यावर असून दोन खणाची ( २०× १२ ) फूट होती. एका आठ खणाच्या मोठ्या बराकीतून हे दोन खण मध्ये लाकडी भिंत घालून ( जेलातील सर्व इमारती लाकडीच आहेत ) निराळी काढलेली होती व त्याचप्रमाणे सभोवारचे कंपाउंड विटाच्या भिंती घालून मोठ्या बराकीच्या कंपाउंडापासून वेगळे करून टाकिलेले होते. ही व्यवस्था केवळ माझ्याकरिता नवीन केली होती असे नाही. गोऱ्या कैद्याकरिता हे आवार व कोठडी तुटक केलेली असून मी गेल्यावर तेथेच मला ठेवण्यात आले. खोलीत प्रथम काही दिवस साध्या शिक्षेचे दुसरे काही कैदी असत पण पुढे सरकारच्या हुकमाने म्हणा किंवा दुसऱ्या काही कारणाने म्हणा, मी व माझ्याबरोबर स्वयंपाकाकरिता असलेला दुसरा कैदी या दोघाखेरीज तिसरे कोणासहि तेथे ठेविले नाही. आमच्या खोलीभोवतालचे आवार सुमारे १३० फूट लांब व ५० फूट रुंद होते. तेवढ्यातच हिंडण्याफिरण्यास आम्हास मोकळीक होती. शेवटी शेवटी जवळच्या आवारात संध्याकाळी एक तासभर सोडू लागले होते. आमचे आवारात जेलर बरोबर असल्याखेरीज दुसऱ्या कोणास येण्यास परवानगी नव्हती. दिवस रात्र आवाराचे दरवाजास कुलपे लावीत. व रात्री खोलीसहि कुलूप असे. पुढे पुढे म्हणजे अखेर, रात्री आवाराचे दरवाजास कुलूप लावण्याचे सोडून दिले होते. आम्हास दिलेली खोली पिंजऱ्याप्रमाणे लाकडी गज लावलेली होती; व त्या तुरुंगात इतर सर्व बराकीहि तशाच होत्या. खोलीत सामान एक टेबल, एक खुर्ची, एक कापडी ईझीचेअर, एक लोखंडी कॉट आणि बुके ठेवण्याकरता दोन कपाटे इतके होते. सैपाकासाठी बरोबर दिलेला गुजराथी ब्राह्मण कैदी त्याची मुदत संपल्यामुळे एक महिन्याचे आतच परत पाठवावा लागला व त्याच्याऐवजी येरवडा जेलमधून सातारा जिल्ह्यातील एक कुळकर्णी आला. त्याची शिक्षा पाच वर्षांची होती. पण ज्युबिली वगैरे कारणासाठी त्यास एकंदर सुमारे १॥ वर्षे माफी मिळून त्याचीहि पुढे माझ्यापूर्वीच सुटका झाली. तेव्हा तिसरा एक ब्राह्मण पाठविण्यात आला. पण तोहि दोन वर्षांनी परत पाठवून दिला. ब्रह्मदेशच्या तुरुंगात त्या वेळी शिक्षा होऊन आलेला उत्तर हिंदुस्थानातील एक ब्राम्हण—कैदी अखेर मजबरोबर होता.

"अमदबादेस दूध व तूप सुरू केले होते ते मंडालेसहि कायम राहिले. एक वेळ गव्हाचा आटा व एक वेळ तांदूळ व त्या खेरीज डाळ मिळत असे. पुढे काही दिवसानंतर इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स याचे हुकुमाने दर आठवड्यास

होता आणि दुसरे आठ मुसलमान होते. यापैकी एक जमादार व सात कान्स्टेबल होते. त्यानाहि कोठे जावयाचे हे कळविले नव्हते. निघण्याच्या दिवशी संध्याकाळी त्याना बोलावून आणून प्रवासाची तयारी करण्यास सांगितले. नाशिकसिशिककडे जावयाचे आहे अशी त्यांची समजूत झालेली होती. कोणाला न्यावयाचे आहे हे सुद्धा त्यांस समजलेले नव्हते. मला बाहेर काढताना पोषाख जेलचा नसून माझा पूर्वीचा धोतर आंगरखा पगडी वगैरे दिला होता. यापूर्वी सक्त मजुरीची शिक्षा सरकाराने साधी केल्याचा ठराव जेल सुपरिंटेंडेंटकडे दोन तीन दिवस आला होता. पण मला त्या वेळी तो कळविला नाही. तो मंडालेस गेल्यावर मला समजला. या ठरावालगतच मंडालेस रवानगी करण्याचा हुकूम असावा अशी माझी समजूत आहे.

"एवढ्या बंदोबस्ताने व गुप्तपणाने साबरमतीहून जरी रवानगी झाली तरी बडोद्यापुढील मियागाव स्टेशनावर आल्याबरोबर बाहेरच्या काही लोकानी 'टिळक महाराजकी जय' अशी ओरड केल्याचे माझे कानी आलेच! लोक माझ्या दृष्टीस पडले नाहीत. कारण गाडीचे दरवाजे बंद होते. सकाळी सुमारे ६।–६॥ वाजता मुंबईच्या बंदरावर गाडी उभी राहिली. मुंबईचे पोलीस अधिकारी तेथे हजर होतेच. त्यानी आम्हास गाडीतून उतरून घेऊन तेथे तयार असलेल्या स्टीम–लॉंचमध्ये बसविले. आणि लागलीच 'हार्डिंग' नावाच्या सरकारी मिलिटरी ट्रॅन्सपोर्टच्या मोठ्या बोटीवर चढविले. बोट कोठे जाते हे बोटीवरील कप्तानाखेरीज दुसरे कोणास माहित नव्हते. बोट मोठी होती खरी. पण अपराध केलेल्या खलाशास कोंडून ठेवण्याच्या अशा ज्या लहान खोल्या तळमजल्यात असतात त्यापैकी एका खोलीत मला व दुसऱ्या खोलीत स्वयंपाक करण्याकरिता बरोबर आलेल्या दुसऱ्या कैद्यास कोंडून ठेविले होते. दिवसातून सकाळी किंवा संध्याकाळी एक तास गोरा इन्स्पेक्टर मला डेकवर फिरावयास नेई. बाकीचा काळ खोलीतच काढावा लागे! खोलीत बारा आणि बारा चोवीस तास एकसारखे उकडत असे.

'हार्डिंग' बोट मुंबईहून निघाली ती मध्ये कोठेहि न थांबता नवव्या दिवशी रंगूनच्या बंदरात उभी राहिली. मी रंगुनास येणार ही बातमी रंगूनच्या लोकास आधीच कळली होती. त्यामुळे मी आगबोटीतून बंदरावर उतरण्याच्या वेळी तेथे सुमारे एकदोन हजार लोक गोळा झाले होते! आगगाडी पूर्वी बंदरावरच आणून ठेविली होती. आणि हार्डिंग बोटीतून उतरल्याबरोबर जवळच असलेल्या या आगगाडीत मला, पोलिसच्या इतर लोकाना व बरोबर स्वयंपाकाकरिता आणिलेल्या कैद्याला बसविण्यात आले. त्या वेळी संध्याकाळचे तीन किंवा चार वाजले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता आम्ही मंडालेच्या स्टेशनवर येऊन पोचलो. तेथून बरोबर आलेल्या अमदावादच्या पोलिसाने मला तेथील सुपरिन्टेंडंटच्या ताब्यात दिले व ते परत गेले. मंडाले जेलसुपरिन्टेंडेंटला पूर्वी तार गेली असल्यामुळे त्याने मला कोठे ठेवावयाचे याची आगाऊच योजना करून

होता आणि दुसरे आठ मुसलमान होते. यापैकी एक जमादार व सात कान्स्टेबल होते. त्यानाहि कोठे जावयाचे हे कळविले नव्हते. निघण्याच्या दिवशी संध्याकाळी त्याना बोलावून आणून प्रवासाची तयारी करण्यास सांगितले. नाशिकबिशिककडे जावयाचे आहे अशी त्यांची समजूत झालेली होती. कोणाला न्यावयाचे आहे हे सुद्धा त्यांस समजलेले नव्हते. मला बाहेर काढताना पोषाख जेलचा नसून माझा पूर्वीचा धोतर आंगरखा पगडी वगैरे दिला होता. यापूर्वी सक्त मजुरीची शिक्षा सरकाराने साधी केल्याचा ठराव जेल सुपरिंटेंडेंटकडे दोन तीन दिवस आला होता. पण मला त्या वेळी तो कळविला नाही. तो मंडालेस गेल्यावर मला समजला. या ठरावालगतच मंडालेस रवानगी करण्याचा हुकूम असावा अशी माझी समजूत आहे.

"एवढ्या बंदोबस्ताने व गुप्तपणाने साबरमतीहून जरी रवानगी झाली तरी बडोद्यापुढील मियागाव स्टेशनावर आल्याबरोबर बाहेरच्या काही लोकानी 'टिळक महाराजकी जय' अशी ओरड केल्याचे माझे कानी आलेच! लोक माझ्या दृष्टीस पडले नाहीत. कारण गाडीचे दरवाजे बंद होते. सकाळी सुमारे ६।-६॥ वाजता मुंबईच्या बंदरावर गाडी उभी राहिली. मुंबईचे पोलीस अधिकारी तेथे हजर होतेच. त्यानी आम्हास गाडीतून उतरून घेऊन तेथे तयार असलेल्या स्टीम-लॉंचमध्ये बसविले. आणि लागलीच 'हार्डिंग' नावाच्या सरकारी मिलिटरी ट्रॅन्सपोर्टच्या मोठ्या बोटीवर चढविले. बोट कोठे जाते हे बोटीवरील कप्तानाखेरीज दुसरे कोणास माहित नव्हते. बोट मोठी होती खरी. पण अपराध केलेल्या खलाशास कोंडून ठेवण्याच्या अशा ज्या लहान खोल्या तळमजल्यात असतात त्यांपैकी एका खोलीत मला व दुसऱ्या खोलीत स्वयंपाक करण्याकरिता बरोबर आलेल्या दुसऱ्या कैद्यास कोंडून ठेविले होते. दिवसातून सकाळी किंवा संध्याकाळी एक तास गोरा इन्स्पेक्टर मला डेकवर फिरावयास नेई. बाकीचा काळ खोलीतच काढावा लागे! खोलीत बारा आणि बारा चोवीस तास एकसारखे उकडत असे.

'हार्डिंग' बोट मुंबईहून निघाली ती मध्ये कोठेहि न थांबता नवव्या दिवशी रंगूनच्या बंदरात उभी राहिली. मी रंगुनास येणार ही बातमी रंगूनच्या लोकास आधीच कळली होती. त्यामुळे मी आगबोटीतून बंदरावर उतरण्याच्या वेळी तेथे सुमारे एकदोन हजार लोक गोळा झाले होते! आगगाडी पूर्वी बंदरावरच आणून ठेविली होती. आणि हार्डिंग बोटीतून उतरल्याबरोबर जवळच असलेल्या या आगगाडीत मला, पोलिसच्या इतर लोकाना व बरोबर स्वयंपाकाकरिता आणिलेल्या कैद्याला बसविण्यात आले. त्या वेळी संध्याकाळचे तीन किंवा चार वाजले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता आम्ही मंडालेच्या स्टेशनवर येऊन पोचलो. तेथून बरोबर आलेल्या अमदाबादच्या पोलिसाने मला तेथील सुपरिन्टेंडंटच्या ताब्यात दिले व ते परत गेले. मंडाले जेलसुपरिन्टेंडेंटला पूर्वी तार गेली असल्यामुळे त्याने मला कोठे ठेवावयाचे याची आगाऊच योजना करून

ठेवली होती व मी तेथे गेल्यावर योजून ठेवलेल्या कोठडीत जेलर मला घेऊन गेला. जेल मंडालेच्या किल्ल्यातच एका बाजूला नैऋत्य कोपऱ्यात बांधलेला आहे. मी तेथे असेपर्यंत मला या जेलाबाहेर केव्हांहि काढले नाही ! एकदा मंडाले जेलात जेव्हा कॉलरा बराच वाढला तेव्हा मात्र दोन अडीच महिने मंडाले जेलातून काढून मिकट्टिला येथील जेलात तेवढ्या पुरते मला नेऊन ठेविले होते.

"मला ज्या कोठडीत नेऊन ठेविले होते ती कोठडी दुसऱ्या मजल्यावर असून दोन खणाची ( २०× १२ ) फूट होती. एका आठ खणाच्या मोठ्या बराकीतून हे दोन खण मध्ये लाकडी भिंत घालून ( जेलातील सर्व इमारती लाकडीच आहेत ) निराळी काढलेली होती व त्याचप्रमाणे सभोवारचे कंपाउंड विटाच्या भिंती घालून मोठ्या बराकीच्या कंपाउंडापासून वेगळे करून टाकिलेले होते. ही व्यवस्था केवळ माझ्याकरिता नवीन केली होती असे नाही. गोऱ्या कैद्याकरिता हे आवार व कोठडी तुटक केलेली असून मी गेल्यावर तेथेच मला ठेवण्यात आले. खोलीत प्रथम काही दिवस साध्या शिक्षेचे दुसरे काही कैदी असत पण पुढे सरकारच्या हुकमाने म्हणा किंवा दुसऱ्या काही कारणाने म्हणा, मी व माझ्याबरोबर स्वयंपाकाकरिता असलेला दुसरा कैदी या दोघाखेरीज तिसरे कोणासहि तेथे ठेविले नाही. आमच्या खोलीभोवतालचे आवार सुमारे १३० फूट लांब व ५० फूट रुंद होते. तेवढ्यातच हिंडण्याफिरण्यास आम्हास मोकळीक होती. शेवटी शेवटी जवळच्या आवारात संध्याकाळी एक तासभर सोडू लागले होते. आमचे आवारात जेलर बरोबर असल्याखेरीज दुसऱ्या कोणास येण्यास परवानगी नव्हती. दिवस रात्र आवाराचे दरवाजास कुलपे लावीत. व रात्री खोलीसहि कुलूप असे. पुढे पुढे म्हणजे अखेर, रात्री आवाराचे दरवाजास कुलूप लावण्याचे सोडून दिले होते. आम्हास दिलेली खोली पिंजऱ्याप्रमाणे लाकडी गज लावलेली होती; व त्या तुरुंगात इतर सर्व बराकीहि तशाच होत्या. खोलीत सामान एक टेबल, एक खुर्ची, एक कापडी ईझिचेअर, एक लोखंडी कॉट आणि बुके ठेवण्याकरता दोन कपाटे इतके होते. सैपाकासाठी बरोबर दिलेला गुजराथी ब्राह्मण कैदी त्याची मुदत संपल्यामुळे एक महिन्याचे आतच परत पाठवावा लागला व त्याच्याऐवजी येरवडा जेलमधून सातारा जिल्ह्यातील एक कुळकर्णी आला. त्याची शिक्षा पाच वर्षांची होती. पण ज्युबिली वगैरे कारणासाठी त्यास एकंदर सुमारे १॥ वर्ष माफी मिळून त्याचीहि पुढे माझ्यापूर्वीच सुटका झाली. तेव्हा तिसरा एक ब्राह्मण पाठविण्यात आला. पण तोहि दोन वर्षांनी परत पाठवून दिला. ब्रह्मदेशाच्या तुरुंगात त्या वेळी शिक्षा होऊन आलेला उत्तर हिंदुस्थानातील एक ब्राम्हण—कैदी अखेर मजबरोबर होता.

"अमदबादेस दूध व तूप सुरू केले होते ते मंडालेसहि कायम राहिले. एक वेळ गव्हाचा आटा व एक वेळ तांदूळ व त्या खेरीज डाळ मिळत असे. पुढे काही दिवसानंतर इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स याचे हुकुमाने दर आठवड्यास

थोडी फळे देऊं लागलें. पण विशेष फरक म्हटला म्हणजे डायबिटिस ( मधुमेह ) वाढल्यानंतरचा होय.

"ब्रह्मदेशातील जेलमॅन्युअलप्रमाणे साध्या शिक्षेच्या कैद्यास आपला घरचा पोषाख बाळगण्याची परवानगी आहे. शिवाय मला ' फर्स्ट क्लास मिसडिमीनंट ' प्रमाणे वागवावे असाहि हुकूम होता. त्यामुळे धोतरे सदरे वगैरे मी घरी वापरीत असे त्याप्रमाणेच तेथेहि वापरण्यास व अंथरूण पांघरूणहि घरचे नेण्यास मोकळीक होती. यास लागणारा खर्च व स्वयंपाकाकरिता भांडीकुंडी विकत घ्यावी लागली. त्याचा खर्च मला आपल्या पदरचा करावा लागे. तथापि कोणतीहि वस्तु जेल सुपरिंटेंडेंटने पास केल्याखेरीज मला मिळत नसे. या वस्तूंखेरीज पुढे पुढे चहा कॉफी किंवा सुपारीहि माझ्या खर्चाने मला देण्याबद्दल हुकूम झाला होता.

"मला ग्रंथ बाळगण्याची परवानगी मिळाली नसती तर हे दिवस जाणे अत्यंत दुर्घट होते; कारण मघा सांगितलेली खोली आणि आवार याचे बाहेरील जग आम्हास शून्य झाले होते असे म्हणण्यास हरकत नाही. ग्रंथासंबंधीहि तीनदा तीन हुकूम झाले. पहिल्याने मी जितकी बुके मागितली तेवढी त्यातील विषय काय आहे हे तपासून माझ्या ताब्यात दिली. वर्तमानकालीन ( current ) पॉलिटिक्स या विषयावरील कोणतेहि बुक ठेवण्याची परवानगी नव्हती व ते मिळतहि नसे. तसेच वर्तमानपत्रे व मासिक पुस्तके इंग्लंडातील असोत किंवा हिंदुस्थानातील असोत इंग्रजीत असोत वा देशी भाषेत असोत सर्व बंद केलेली होती. कदाचित एखादे कोणी पाठविले असल्यास ते मजकडे केव्हाहि आलेले नाही. ही पुस्तके सर्व माझ्याजवळ ठेवण्याचे काही दिवसानी बंद होऊन फक्त चार पुस्तकेच मजजवळ एका वेळी ठेवावी असा हुकूम झाला. त्यावर बर्मा सरकारकडे मी अर्ज केल्यानंतर ग्रंथलेखनासाठी म्हणून सर्व पुस्तके पुनः मजजवळ ठेवावी असा हुकूम झाला. तथापि प्रत्येक पुस्तकात पाने किती आहेत ती तपासून व त्यांची संख्या मुखपृष्ठावर लिहून त्याच्याखाली सुपरिंटेंडंटची सही होऊन ती पास व्हावी लागत. अशा रीतीने सर्व पुस्तके तपासून झाल्यावर ती माझे ताब्यात आली. पुस्तकांची संख्या मी तेथून निघालो तेव्हा सुमारे ३॥ शे पासून ४ शे पर्यंत झालेली होती. ग्रंथलेखनासाठी जे कागद देत तेहि सुटे न देता बांधलेली बुके—आतील पाने मोजून देत असत; व लिहिण्याकरिता शाई न देता फक्त सिसपेनसिलीच व त्याहि करून देत असत. कारण जेलचे नियमाप्रमाणे चाकू बाळगण्याची कैद्यास परवानगी नाही. फक्त घरी दरमहिन्यास जे पत्र मी लिहित असे तेवढ्यापुरता मात्र सुटा कागद शाई व पेन मिळत असे.

"भगवद्गीतेवर हल्ली जी भाष्ये व टीका उपलब्ध आहेत त्यात गीतेचे रहस्य सांगावे तसे सांगितलेले नाही अशी माझी शिक्षा होण्यापूर्वी पुष्कळ वर्षे समजूत झालेली होती. या समजुतीस व्यवस्थित रूप देऊन पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाच्या तुलनेसह गीतेवर माझ्या मताप्रमाणे मी एक ग्रंथ मराठी भाषेत लिहून

तयार केला आहे. हा ग्रंथ सुमारे चार सहा महिन्यात लिहून काढला. पण त्याचे पूर्वविचारात व पुढे सुधारणा करण्यात बराच काळ गेला.सध्या तो ग्रंथ सरकाराकडे पहाण्याकरिता गेला आहे. मजजवळ सुटकेचे वेळी दिला नाही.

"मंडाले शहरची हवा उष्ण असल्यामुळे हिवाळ्याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि ऋतूत ग्रंथलेखनाचे काम चांगले करता आले नाही. याशिवाय व्यवसाय म्हटला म्हणजे फ्रेंच जर्मन आणि पाली या तीन भाषांचे केवळ स्वतःचेच अभ्यासाने जे थोडेबहुत ज्ञान संपादन करता येणे शक्य आहे ते संपादन करणे हे होय. शिवाय गणित वेदांत ज्योतिष वगैरे विषयांच्या विचारातहि काही काल गेला असून दुसऱ्या काही किरकोळ विषयावर टिपणे केलेली आहेत. फ्रेंचपेक्षा जर्मन व पाली भाषांचे ज्ञान मी जास्त संपादन केले.

"पुण्याहून दर महिन्यास एक पत्र मला येत असे व मी त्यास एक उत्तर पाठवीत असे. तथापि या पत्रात घरच्या बातमीखेरीज पर्यायानेहि दुसरी काही बातमी आल्यास ती कापून काढीत असत व मलाहि तशा प्रकारचा मजकूर उत्तरात लिहिण्याची परवानगी नव्हती. सुपरिंटेंडेंटास शुष्क शंका येण्यासारखा एखाददुसरा शब्द उत्तरात गेल्यास मला ते फिरून लिहावे लागे. वरील दोन प्रकारच्या पत्राखेरीज दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचे माझे नावे आलेले पत्र मला दिले नाही व हा पत्रव्यवहार अद्याप माझे हाती न आल्यामुळे बाहेरच्या किती लोकानी पत्रे धाडली हेहि मला आता सांगता येत नाही. तीन महिन्यातून एकदा बाहेरच्या माणसांची भेट घेण्याची मोकळीक होती. पण ह्या सवलतीचा उपयोग घरच्या माणसाखेरीज मी दुसऱ्या कोणासाठीहि केलेला नाही. एकदा मात्र मुंबईचे सॉलिसिटर राघवय्या आणि पुढे विलायतेहून परत आल्यावर दादासाहेब खापर्डे व रंगूनचे वकील रा. विजापूरकर हे लीगल अॅडव्हाइसर या नात्याने भेट घेण्यास आले होते. या मुलाखतीतील सर्व संवाद किंवा भाषण इंग्रजीत सुपरिंटेंडेंटच्या हपीसात त्यांचे समोर करावे लागत असे.

"हिंदुस्थानातील अधिकारी तिकडे भेटावयास येणे शक्यच नव्हे व ते आलेहि नाहीत. मंडाले जेलासाठी ब्रह्मदेशच्या सरकाराने नेमलेल्या ऑफिशियल व्हिजिटरात ज्या सरकारी इंग्रजी अंमलदारांची नावे होती ते जेलच्या तपासणीकरिता आले म्हणजे माझ्या आवारात येऊन माझी चौकशी करीत. आणि याच नात्याने बर्माचे ले. गव्हर्नर एकदा माझ्या आवारात आले होते. पण असल्या भेटीत महत्त्वाचा काही संवाद झालेला नाही व एका प्रसंगाखेरीज त्यात काही खोचहि नव्हती. दुसरा कोणी म्हणजे ऑफिशियल व्हिजिटराखेरीज इंग्रजी अंमलदार अगर गृहस्थ जेल पाहण्यास आल्यास जेलचे सुपरिंटेंडेंट त्यास माझ्या खोलीत आणीत नसत.

"एकंदर प्रकृति बरी होती. वर्षातून एखाददुसरा वेळ साधा ज्वर येई. पण तो साधारणच असे. मोठे दुखणे असे कधी आले नाही. डायबिटीस मात्र वाढली.

मधुमेहाने व वयोमानाने माझे पाचसहा दात पडले आहेत. ऐकूहि कमी येऊ लागले आहे व दूरचे पदार्थ नीट दिसत नाहीत. 'कृतांतकटकामलध्वजजरा' अधिक फडकू लागली आहे आणि त्याप्रमाणाने काम करण्याची पूर्वीची उमेद व शक्ति थोडी मंदावलेली आहे आणि वजनहि थोडे कमी झालेले आहे. याखेरीज शरीरावर किंवा मनावर दुसरा काही परिणाम घडला आहे असे मला वाटत नाही. मग तुम्हाला काय दिसेल ते खरे.

"प्रिव्हि कौन्सिलचा निकाल झाल्यावर दोन तीन वर्षांनी मुंबई सरकाराकडे व विलायत सरकाराकडे मी एक अर्ज केला होता. मला मूळची झालेली शिक्षा सक्तमजुरीची होती व ती तशीच राहिली असती तर इतर सक्तमजुरीच्या कैद्यास जेलनियमाप्रमाणे मिळते तशी मलाहि माफी मिळाली असती. तेव्हा सरकाराने ज्या दृष्टीने शिक्षा साधी केली आहे तीच दृष्टि ठेवून तदभावी जी मला माफी मिळाली असती ती आताहि द्यावी असा त्या अर्जातील मतलब होता. पण मुंबई किंवा विलायत सरकाराने ही विनंति मान्य केली नाही.

"शिक्षेची मुदत संपत आली तेव्हा आता सुटका होईल हे दुसऱ्या कोणी मला सांगावयाची जरूर नव्हती; व म्हणूनच मजजवळ जी पुस्तके होती ती मी मे महिन्याचे आरंभीच इकडे रवाना केली होती. जेलच्या नियमाप्रमाणे काळ्या-पाण्यावर पाठविलेल्या कैद्यास शिक्षा संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर आपल्या मुलुखी पाठवावे लागते. त्याप्रमाणे माझीहि व्यवस्था होईल असा माझा अदमास होता. त्यामुळे सोमवार ता. ८ जून रोजी सकाळी ८ वाजता मंडाले-जेलचे सुपरिं-टेंडेंट यानी माझ्या खोलीत येऊन एकाएकी सामानाची बांधबांध करण्यास जेव्हा मला सांगितले तेव्हा पुढला प्रकार माझ्या लक्षात आला. त्याच दिवशी दुपारी १ वाजता रंगून व मंडाले पोलिस अधिकाऱ्यांच्या पाहऱ्यात देऊन जेलातून मोटार-मधून माझी स्टेशनवर रवानगी झाली. तेथून मेलट्रेन दोन वाजता निघते; व त्यात आमच्यासाठी एक डबा रिझर्व केला होता. स्टेशन आले की डब्याची दारे लावून घेत. डोक्यास घालण्यास तांबडी पगडी मजजवळ होती. पण त्या वेळी प्रथम टोपी व रंगूनच्या पुढे रुमाल घालण्याबद्दल हुकूम झालेले होते! अशा बंदोबस्ताने मंगळ-वारी सकाळी ६ वाजता रंगूनच्या अलीकडे एक लहान स्टेशन आहे तेथे आम्ही येऊन पोचलो. स्टेशनावर रंगूनचे सी.आय.डी.पोलिसचे डे.कमिशनर तयारच होते. त्यानी लागलीच गाडीतून उतरवून मला मोटारीत बसविले आणि बंदरावर घेऊन गेले. सकाळचीच वेळ असल्यामुळे तेथे कोणीहि मला ओळखले असेल असे वाटत नाही. शिवाय बातमी न फुटू देण्याबद्दलचा या वेळचा बंदोबस्तहि बरा होता. हा बंदोबस्त मुंबईच्या सी.आय.डी. चे डे.इ. जनरल यानी यापूर्वी तेथे जाऊन केला होता असे मला मागाहून समजले. याप्रमाणे बंदरावर आणल्यानंतर मंडालेहून मजबरोबर सै-पाकासाठी दिलेला एक कैदी व सामान मागाहून घोड्याच्या गाडीने बंदरावर आले. तेव्हा त्यालाहि मागाहून स्टीम-लॉंचमध्ये घेऊन, तेथे पूर्वीच तयार करून ठेवलेल्या

सरकारी लष्करी खात्यातील 'मेयो' नावाच्या बोटीत आह्मास चढविले. पण ही बोट आम्हास कलकत्त्यास नेणार का मद्रासेस उतरविणार किंवा एकदमच मुंबईचा प्रवास करावा लागतो याबद्दल मला काही माहिती कळविली नाही; आणि मीहि काही झाले तरी आता घरच्या रस्त्यास लागलो हे ओळखून त्याबद्दल जास्त विचारपूस केली नाही.

"आगबोटीवर चढल्यावर पुणेकर पोलिसांचे चेहरे पहिल्यानेच माझे दृष्टीस पडले; तेव्हा ही मंडळी मला नेण्यासाठी पूर्वीच तेथे आलेली असावी असे मी ताडले. मुंबईच्या या पार्टीत पो. इ. रिंग व सार्जंट जोन्स हे दोघे गोरे पोलिस असून, सी. आय. डी. मधले पो. इन्स्पेक्टर सदावर्ते, जमादार मारुतीराव, व कांस्टेबल दाते हे इसम होते. या पंचकाने मला आणि माझ्याबरोबर आलेल्या कैद्यास व सामानास आपले ताब्यात घेतले व रंगूनचे पोलिस आपल्यापैकी दोन कान्स्टेबल ठेवून परत गेले. पुढे चौकशी करता पुण्याच्या पोलिसांची ही पार्टी आदल्याच दिवशी रंगूनास पोचली होती व त्यास इकडे तिकडे कोठे संचार करू न देता त्याच दिवशी संध्याकाळी या आगबोटीवर चढवून ठेविले होते असे कळले.

"ही बोट सामान्यतः ४।५ दिवसात मद्रासेस जाते. व समुद्र शांत असल्यामुळे शुक्रवारी किंवा शनवारी आम्ही मद्रासेस पोचावयास पाहिजे होते. पण दोन दिवस समुद्रात बोट मुद्दाम अर्ध्या वेगाने चालविल्यामुळे सोमवारी संध्याकाळी ६ वाजता आम्ही मद्रासच्या बंदरात येऊन पोचलो. सरकाराने मद्रासेस बोट लावण्याची वेळ पूर्वीच ठरवून दिलेली असल्यामुळे ही दिरंगाई झालेली असावी असे वाटते. मजबरोबर स्वैपाकाकरिता जो मनुष्य दिला होता तो बोट लागून सारा वेळ पडून राहिलेला होता. व पोलिस पार्टीपैकीहि पो. इन्स्पेक्टर सदावर्ते यांचेखेरीज इतराना वरुण महाराजानी थोडाबहुत हात दाखविला होता. त्यामुळे बरोबर बरेच लोक असूनहि जेवणखाणाची थोडी गैरसोय झाली. मला बोट लागत नाही. आमच्या खेरीज बोटीवर दुसरे कोणीहि उतारू नव्हते.

"माझ्याबरोबर मंडलेहून पाठविलेल्या कैद्यास मद्रासेसच सोडण्यात आले. रात्री आठ वाजता बोटीतून व रंगूनाहून बरोबर आलेल्या दोन पोलिस शिपायांस आणि पुणे पोलिसासह मला, मचव्यात उतरून धक्क्यावर आणले. आणि तेथे मद्रास पोलिसानी तयार ठेवलेल्या मोटारीत बसवून लागलीच मद्रासच्या मोठ्या स्टेशनवर नेले. तेथे मेलगाडीला ब्रेकाचे मागे जोडलेला एक सेकंडक्लासचा डबा आमच्याकरता रिझर्व केला होता. त्यात आणून मला बसविल्यानंतर डब्याचे दरवाजे बंद झाले व दहा पाच मिनिटात गाडी सुरू झाली. स्टेशन आले असता गाडीचे दरवाजे बंद करण्याचा पूर्वप्रघात पुढेहि चालू होता. अद्यापहि मला कोणत्या स्टेशनवर उतरणार याची बातमी देण्यात आली नव्हती!

"गाडी पुण्यास बहुतेक राइट टाइमलाच आली असेल. पण मी मात्र पुण्यास उतरलो नाही. ही सर्व व्यवस्था पूर्वी करून गेलेले सी. आय. डी. चे डे. इ. जन-

रल दौंडापर्यंत आले होते व त्यांनी हडपसर स्टेशनावर गाडी मिनिटभर थांबावी वगैरे व्यवस्था पूर्वीच करून ठेविली होती. हडपसर स्टेशनावर आम्हास उतरावयाचे आहे हे आम्हास त्याचे मागच्या स्टेशनावर कळविण्यात आले व त्याप्रमाणे आम्ही तयारीहि ठेवली होती. हडपसर स्टेशनावर गाडी थांबते न थांबते इतक्यांत पुण्याचे डे. पो. सुपरिंटेंडंट हे तेथे आले व त्यांनी मला व पो. इ. सदावर्ते यांस खाली उतरविले. व लागलीच मि. गायडरहि तेथे आले. स्टेशनाबाहेर पूर्वीच दोन मोटारगाड्या तयार ठेवल्या होत्या. त्यात लागलीच आम्ही जाऊन बसलो. ही गाडी हडपसरावर का थांबली हे स्टेशनमास्तरासहि माहित नव्हते असे दिसले. कारण मी स्टेशनाबाहेर पडताना त्याने मजजवळ तिकीट मागितले! साहेबाकडे बोट दाखविणे येवढेच माझे त्यास उत्तर होते!

"शिक्षेची मुदत संपत आली होती. तेव्हा आता नाही तर महिन्याने तरी मी सुटणार येवढे मी निश्चित समजलो होतो. परंतु असेहि वाटे की येवढ्या बंदोबस्ताने व गुप्तपणाने पुण्यात आणून येरवड्याचे जेलात महिनाभर ठेवल्यास बोभाटा झाल्याखेरीज राहणार नाही. तेव्हा एकपक्षी आताचे आता सोडून देतील. पण निश्चित काहीच नव्हते. म्हणून 'तुका म्हणे उगी राहा जे जे होईल ते ते पाहा' या भगवद्भक्ताच्या वचनावर भरवसा ठेवून मी स्वस्थ बसलो होतो. पहिल्याने डे. पो. सुपरिन्टेंडेंटची पायलट ( विनीची ) मोटार आणि मागून आमची मोटार याप्रमाणे चालू होऊन येरवड्याकडची दिशा जेव्हा सुटली तेव्हा संशय दूर झाला. विनीची मोटार मध्येच अर्ध्या मार्गावरून परतली आणि मंगळवार ता. १६ रोजी मध्यरात्रीनंतर सुमारे एक घटकेने मागची मोटार गायकवाडांचे वाड्यासमोर येऊन उभी राहिली. मागची म्हणजे जीत मि. गायडर इ. सदावर्ते व मी होतो ती मोटार होय. आणि तेथे गायडरसाहेबानी शिल्लक राहिलेली ( सुमारे १ महिन्याची ) शिक्षेची मुदत सरकाराने मेहरबान होऊन बिनशर्तीने माफ केल्याची गोष्ट मला कळविली. व मीहि त्यास त्याबद्दल माझे आभार सरकारास कळविण्यास सांगितले. पोलिसाबरोबर मध्यरात्री घरी आलेल्या मालकासहि दरवाजा उघडून आत घ्यावे की नाही याची दरवानास शंका पडली! म्हणून त्याने धोंडोपंतास बोलावून आणले आणि मग सत्तेच्या घरात आमचा प्रवेश झाला!"

# परिशिष्ट

## (३) १९०८ ते १९१४ या सालातील इतर

## निवडक पत्रे

( लो॰ टिळकानी मंडाले येथून पाठविलेली काही पत्रे पूर्वी दिली आहेत. त्याच मुदतीतील इकडील इतर काही पत्रेहि इतर भागाप्रमाणे या भागात दिली आहेत. या सहा सालात हिंदुस्थानात घडलेला सर्व साधारण वृत्तांत सारांशरूपाने द्यावा असा विचार होता. परंतु टिळकांचा त्या वृत्तांताशी प्रत्यक्ष काही विशेष संबंध नव्हता. त्याना त्याचे ज्ञान ते तुरुंगातून सुटून आल्यावरच घडले. आणि त्याच्यावर त्यानी विशेष मतेहि प्रकट केली नाहीत. या सर्व कारणाकरिता, व विशेषतः ग्रंथ विस्ताराच्या भीतिस्तव, हा वृत्तांत आम्ही लिहून ठेवला होता तरी तो मागे घेतला आणि वर दर्शविल्याप्रमाणे या सालातील थोडीशी पत्रेच तेवढी दिली आहेत. )

### ( १ ) बोहस यांचे केळकराना पत्र

मुंबई १५ जान्युआरी १९०९

टिळकांचे ब्रीफ रूफस आयझॅक्स् यानी परत केले असे ऐकतो. माझे मत असे आहे की टिळकांच्या स्नेह्यानीच त्यांचा घात केला. त्याना बेफामपणे बोलता येते पण आपली टिमकी ऐकू जाईल अशी कशी वाजवावी हे त्याना कळत नाही. राष्ट्रीय पक्षात पुष्कळ बखेडे झाले आहेत. त्यातील अनेकांचे एकमेकाशी पटत नाही. तरी मोर्ले यांच्या सुधारणावर राष्ट्रीय पक्षाचे म्हणणे काय आहे हे ठरवून प्रसिद्ध करण्याकरिता एक परिषद भरवावी. बाबू मोतीलाल हे मला लिहितात की नवीन लेफ्टेनंट गव्हर्नर व व्हॉइसरॉयचे प्रायव्हेट सेक्रेटरी यांच्याशी त्यांची मुलाखत झाली. त्या दोघांचे म्हणणे असे की सुधारणावर राष्ट्रीय पक्षाचे काय म्हणणे आहे ते सविस्तर सांगा. टिळक आज असते तर ते हीच गोष्ट करते. बहिष्कार व त्याग हा टायमन ऑफ अथेन्सला शोभतो व विलायतेत त्याची बडबड करणे ठीक आहे. पण येथे ते निरुपयोगी आहे. रा. ब. जोशी यांचेहि मत असेच आहे. तरी त्यांचाहि विचार घेऊन काय ते लौकर ठरवा.

### ( २ ) डॉ. साठे यांचे केळकराना पत्र

मुंबई १८ फेब्रुवारी १९०९

नॅशनल पब्लिशिंग कंपनीची सभा झाली. त्यांच्या विनंतीप्रमाणे 'राष्ट्रमत' हे पत्र तुम्ही घेऊन आपल्या जबाबदारीवर चालवाल काय ? तसे केले तर आम्ही फार आभारी होऊ.

( ३ ) खापर्डे यांचे केळकराना पत्र

लंडन ७ एप्रिल १९०९

लॉर्ड मोर्ले यांच्या योजनेवर आपण परिषद भरवून ठराव केले त्यांच्या छापील प्रती आपण इकडे पाठविल्या. त्या पार्लमेंटच्या सभासदामध्ये वाटण्याची मी खटपट करीत आहे. मोर्ले हे लिबरल पक्षाचे असल्यामुळे त्या पक्षाचे लोक तुमचे ठराव उचलून धरणार नाहीत. कॉन्झरव्हेटिव्ह लोकाविषयी बोलावयासच नको. म्हणून मजूरपक्ष व आयरीश नॅशनॅलिस्ट पक्ष याच्यात पुष्कळशा प्रती वाटल्या. मी परत निघण्यासंबंधाने केरहार्डी म्हणतात की मे अखेरपर्यंत तुह्मी इथे राहा. ते पार्लमेंटच्या इंडिया कमिटीपुढे हे प्रकरण ठेवणार आहेत. ते झाल्यावर मी मे जूनच्या सुमारास निघतो व नंतर बार्लिनला जाऊन राने याना भेटून तिकडे परत येईन.

( ४ ) जसवंतराय यांचे केळकराना पत्र

लाहोर २४ जून १९०९

आम्ही येथे जी रक्कम जमविली ती स्पष्ट अशा शर्तीवर की टिळकांचा डिफेन्स करण्याकरिता किंवा त्यांच्या कुटुंबाला मदत देण्याकरिता तिचा उपयोग करावा. तरी या दोन कामांपैकी एखाद्याकडे या रकमेचा उपयोग तुम्ही करू शकाल काय ते कळावा.

( ५ ) धोंडोपंत यांचे केळकराना पत्र

मेकटिला (ब्रह्मदेश) २० ऑगस्ट १९०९

" आज ती० मामांची सकाळी भेट झाली. प्रकृति चांगली आहे. येथील हवापाणी चांगले आहे. वजन थोडे वाढले आहे. येथे किती दिवस ठेवणार ते काही कळत नाही. उद्या मामांची मुखत्यारपत्रावर सही होईल. मॅजिस्ट्रेट येणार आहेत. ते आले म्हणजे कामे सरली. मामानी पुढील सर्व व्यवस्था करून ठेवली आहे. मृत्युपत्रावर सही झाली. सर्व गोष्टींचा निकाल केला आहे.

( ६ ) नेव्हिनसन यांचे केळकराना पत्र

लंडन ९ सप्टेंबर १९०९

या पत्राने तुमची व रॅम्से मॅकडोनाल्ड यांची ओळख करून देत आहे. ते मजूरपक्षाचे पुढारी आहेत. तुमच्या पक्षाचे जे काही ह्मणणे आहे ते सर्व त्याना नीट समजावून सांगा व पूर्वी मला जशी सर्व प्रकारे मदत केलीत तशी त्यानाहि करा. टिळकाना पत्र पाठवाल तेव्हा स्मरणपूर्वक मी विचारले होते म्हणून लिहा. खापर्डे यांची वरचेवर गाठ पडते. पण त्यांच्या अपीलाचे नीट जुळेल असे मला वाटत नाही.

( ७ ) गंगेश व्यंकटेश जोशी यांचे केळकराना पत्र

पुणे १० सप्टेंबर १९०९

हुगळी येथील परिषदेने संयुक्त राष्ट्रीय सभा भरविण्याकरिता एक कमिटी नेमली आहे. त्यात सुरेंद्रनाथ व अरविंद घोषहि आहेत. पंजाबातील लोकमतहि याच बाजूचे आहे. मध्यप्रांताचेहि तसेच. इतर ठिकाणी जिल्हा-सभातून असेच ठराव होत आहेत. तरी सार्वजनिक सभेने आपलीहि एक कमिटी नेमावी व बंगाल व इतर प्रांतातील पुढाऱ्याशी सहकारिता करण्यास तिला सांगावे.

( ८ ) मिसेस रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचे केळकराना पत्र

दरभंगा १७ नोव्हेंबर १९०९

विलायतेहून तार आली तीत लिहिले आहे की विलायतच्या राजकारणात मोठी गडबड आहे. आम्हाला लौकर परत बोलाविले आहे. म्हणून दक्षिण हिंदुस्थानातील दौरा टाकून देऊन आम्ही परत जाणार. तथापि पुण्यास येऊन जाणार आहो. तरी मि. मॅकडोनाल्ड यानी तुम्हाला असे लिहिण्यास सांगितले आहे की, तुम्ही त्याना पुण्यास जरूर भेटावे. त्याना ताप आला म्हणून त्यांच्या सांगण्यावरून मी पत्र लिहीत आहे.

( ९ ) रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचे केळकराना पत्र

कलकत्ता २० नोव्हेंबर १९०९

आम्ही मुंबईला येत्या बुधवारी येतो व शनिवारी पुढे निघू. गव्हर्नमेंट हाऊसमध्ये उतरणार आहोत. तुम्हाला भेटण्याची इच्छा आहे.

( १० ) बाळासाहेब देशपांडे यांचे केळकराना पत्र

अहमदनगर २८ डिसेंबर १९०९

येथे पुष्कळ लोकाशी मी चर्चा केली. त्यांचे म्हणणे नेमस्त लोकाना परत आणून सर्वांची एकच कॉंग्रेस करावी. असे करताना व पुढेहि, कडक भाषा व व्यक्तिविषयक टीका परस्पर टाकून दिली पाहिजे. कलकत्ता येथील १९०६ च्या कॉंग्रेसचा ठराव हे सर्वांना समान अधिष्ठान आहे. इतर गोष्टी गौण मानाव्या. आपटे भानु लिमये यांच्याशी मी पुण्यास आल्यावर चर्चा करीन व नंतर काहीतरी समेटाचा मार्ग हुडकून काढू.

( ११ ) रेव्हरंड संडरलंड यांचे केळकराना पत्र

हार्टफर्ड अमेरिका ८ फेब्रुवारी १९१०

तुम्ही मराठ्याचे अंक पाठविले ते पोचले. त्याविषयी माझे फारच चांगले मत आहे. मराठ्याच्या लिहिण्यात विद्वत्ता व जोरकसपणा असून शिवाय प्रांजलपणाहि

(३) खापर्डे यांचे केळकराना पत्र

लंडन ७ एप्रिल १९०९

लॉर्ड मोर्ले यांच्या योजनेवर आपण परिषद भरवून ठराव केले त्यांच्या छापील प्रती आपण इकडे पाठविल्या. त्या पार्लमेंटच्या सभासदामध्ये वाटण्याची मी खटपट करीत आहे. मोर्ले हे लिबरल पक्षाचे असल्यामुळे त्या पक्षाचे लोक तुमचे ठराव उचलून धरणार नाहीत. कॉन्झरव्हेटिव्ह लोकाविषयी बोलावयासच नको. म्हणून मजूरपक्ष व आयरीश नॅशनॅलिस्ट पक्ष याच्यात पुष्कळशा प्रती वाटल्या. मी परत निघण्यासंबंधाने केरहार्डी म्हणतात की मे अखेरपर्यंत तुह्मी इथे राहा. ते पार्लमेंटच्या इंडिया कमिटीपुढे हे प्रकरण ठेवणार आहेत. ते झाल्यावर मी मे जूनच्या सुमारास निघतो व नंतर बर्लिनला जाऊन साने याना भेटून तिकडे परत येईन.

(४) जसवंतराय यांचे केळकराना पत्र

लाहोर २४ जून १९०९

आम्ही येथे जी रक्कम जमविली ती स्पष्ट अशा शर्तीवर की टिळकांचा डिफेन्स करण्याकरिता किंवा त्यांच्या कुटुंबाला मदत देण्याकरिता तिचा उपयोग करावा. तरी या दोन कामांपैकी एखाद्याकडे या रकमेचा उपयोग तुम्ही करू शकाल काय ते कळावा.

(५) धोंडोपंत यांचे केळकराना पत्र

मेकटिल्ला (ब्रह्मदेश) २० ऑगस्ट १९०९

"आज ती० मामांची सकाळी भेट झाली: प्रकृति चांगली आहे. येथील हवापाणी चांगले आहे. वजन थोडे वाढले आहे. येथे किती दिवस ठेवणार ते काही कळत नाही. उद्या मामांची मुखत्यारपत्रावर सही होईल. मॅजिस्ट्रेट येणार आहेत. ते आले म्हणजे कामे सरली. मामांनी पुढील सर्व व्यवस्था करून ठेवली आहे. मृत्युपत्रावर सही झाली. सर्व गोष्टींचा निकाल केला आहे.

(६) नेव्हिनसन यांचे केळकराना पत्र

लंडन ९ सप्टेंबर १९०९

या पत्राने तुमची व रॅम्से मॅकडोनाल्ड यांची ओळख करून देत आहे. ते मजूरपक्षाचे पुढारी आहेत. तुमच्या पक्षाचे जे काही ह्मणणे आहे ते सर्व त्याना नीट समजावून सांगा व पूर्वी मला जशी सर्व प्रकारे मदत केलीत तशी त्यानाहि करा. टिळकाना पत्र पाठवाल तेव्हा स्मरणपूर्वक मी विचारले होते म्हणून लिहा. खापर्डे यांची ब्रस्चेवर गाठ पडते. पण त्यांच्या अपीलाचे नीट जुळेल असे मला वाटत नाही.

(७) गंगेश व्यंकटेश जोशी यांचे केळकराना पत्र

पुणे १० सप्टेंबर १९०९

हुगळी येथील परिषदेने संयुक्त राष्ट्रीय सभा भरविण्याकारिता एक कमिटी नेमली आहे. त्यात सुरेंद्रनाथ व अरविंद घोषहि आहेत. पंजाबातील लोकमतहि याच बाजूचे आहे. मध्यप्रांताचेंहि तसेच. इतर ठिकाणी जिल्हा-समावून असेच ठराव होत आहेत. तरी सार्वजनिक सभेने आपलीहि एक कमिटी नेमावी व बंगाल व इतर प्रांतातील पुढाऱ्याशी सहकारिता करण्यास तिला सांगावे.

(८) मिसेस रॅम्से मॅकडोनाल्ड यांचे केळकराना पत्र

दरभंगा १७ नोव्हेंबर १९०९

विलायतेहून तार आली तीत लिहिले आहे की विलायतच्या राजकारणात मोठी गडबड आहे. आम्हाला लौकर परत बोलाविले आहे. म्हणून दक्षिण हिंदुस्थानातील दौरा टाकून देऊन आम्ही परत जाणार. तथापि पुण्यास येऊन जाणार आहो. तरी मि. मॅकडोनाल्ड यानी तुम्हाला असे लिहिण्यास सांगितले आहे की, तुम्ही त्याना पुण्यास जरूर भेटावे. त्याना ताप आला म्हणून त्यांच्या सांगण्यावरून मी पत्र लिहीत आहे.

(९) रॅम्से मॅकडोनाल्ड यांचे केळकराना पत्र

कलकत्ता २० नोव्हेंबर १९०९

आम्ही मुंबईला येत्या बुधवारी येतो व शनिवारी पुढे निघू. गव्हर्नमेंट हाऊसमध्ये उतरणार आहोत. तुम्हाला भेटण्याची इच्छा आहे.

(१०) बाळासाहेब देशपांडे यांचे केळकराना पत्र

अहमदनगर २८ डिसेंबर १९०९

येथे पुष्कळ लोकाशी मी चर्चा केली. त्यांचे म्हणणे नेमस्त लोकाना परत आणून सर्वांची एकच काँग्रेस करावी. असे करताना व पुढेहि, कडक भाषा व व्यक्तिविषयक टीका परस्पर टाकून दिली पाहिजे. कलकत्ता येथील १९०६ च्या काँग्रेसचा ठराव हे सर्वांना समान अधिष्ठान आहे. इतर गोष्टी गौण मानाव्या. आपटे भानु लिमये यांच्याशी मी पुण्यास आल्यावर चर्चा करीन व नंतर काहीतरी समेटाचा मार्ग हुडकून काढू.

(११) रेव्हरंड संडरलंड यांचे केळकराना पत्र

हार्टफर्ड अमेरिका ८ फेब्रुवारी १९१०

तुम्ही मराठ्याचे अंक पाठविले ते पोचले. त्याविषयी माझे फारच चांगले मत आहे. मराठ्याच्या लिहिण्यात विद्वत्ता व जोरकसपणा असून शिवाय प्रांजलपणाहि

तितकाच आहे. म्हणून या गुणमिश्रणाचे मला कौतुक वाटते. अमेरिकेतील निरनिराळ्या लोकाना हे पत्र वाचावयास मिळेल तर तुमच्या राष्ट्रीय पक्षाच्या लोकाना पुष्कळ हितचिंतक व स्नेही लाभतील. अमेरिका व युरोप या खंडांत हिंदी राष्ट्रीय चळवळीला भरपूर पाठबळ मिळेल. पण ती चळवळ इकडील लोकाना अजून कोणी समजाऊनच दिलेली नाही. तुम्हाला टिळकाना तुरुंगात पत्रे पाठवून हकिकत कळविता येते काय ? तसे असेल तर टिळकाना असे कळवा की माझ्या मनात त्यांच्याबद्दल अत्यंत आदरबुद्धि व कौतुक आहे. देशहिताला वाहिलेल्या अशा विभूति थोड्याच असतात. हल्ली जे राजकीय युद्ध सुरू आहे त्यात मदत देण्याला टिळक स्वदेशात नाहीत ही दुःखाची गोष्ट आहे. पण नुसत्या त्यांच्या छबीनेहि कार्य होणार आहे. तुमच्या हातून चाललेले कार्य पाहून मला फार आनंद होतो.

( १२ ) आर्थर कॉफर्ड यांचे केळकराना पत्र

नव्या पत्रासंबंधाने तुम्ही व चित्रशाळेचे मालक यानी मिळून अंदाजपत्रक तयार करावे. ते कळले म्हणजे टाईप खरेदीची व्यवस्था होईल. वेळेचे फार महत्त्व आहे. म्हणून लवकरच उत्तर धाडा. मी तुम्हाला पाठविलेले आर्टिकल तुम्ही नाकारले याबद्दल मला काही वाटत नाही. तुमची त्यावरील टीका प्रामाणिक व वजनदार होती म्हणून मी ते आर्टिकल फाडून टाकले. माझ्या पुस्तकावरील तुमचा अभिप्राय यथान्यायच लिहिलेला होता. पण तुम्ही म्हणता त्याप्रमाणे ते पुस्तक लिहिताना मी गैरशुद्धीत नव्हतो ! इकडे त्या पुस्तकाची फार चाहा झाली पण ते असो.

( १३ ) डॉ. केतकर यांचे केळकराना पत्र।

माझे नांव तुम्ही यापूर्वी कदाचित ऐकले असेल. तुम्ही मराठा पत्राचे संपादकत्व सोडून ते खाडिलकरांकडे दिले हे पाहून मला फार वाईट वाटले. त्याहिपेक्षा मला याचे वाईट वाटले की टिळकानी खाडिलकराना केसरीचे संपादक केले. कारण शिक्षण व पात्रता या दोन्ही दृष्टींनी ते या जागेला माझ्या मते नालायक आहेत. ते मराठी चांगले लिहितात हे खरे. पण महाराष्ट्रांतील या सर्वोत्तम पत्राच्या संपादकाला नुसता तेवढा गुण पुरा होत नाही. हल्लीची ही व्यवस्था चालेल तर केसरी बुडेल आणि वाचकवर्गाचीहि न भरून येण्यासारखी हानि होईल. पुण्यात वासुदेवराव जोशी याना व मुंबईसरकारामार्फत टिळकानाहि मी या बाबतीत लिहित आहे. तुम्हीहि टिळकांकडे ही गोष्ट कळवा.

( १४ ) मुंजे यांचे केळकराना पत्र

नागपूर ९ सप्टेंबर १९१०

सरकारने केसरीकडून जामीन मागितला तर कठिण प्रसंग. दहा हजार रुपये घालावयाचे व ते जावयाचेच म्हणून वाटते की जामिनकी देऊ नये. पण वर्तमान-

तितकाच आहे. म्हणून या गुणमिश्रणाचे मला कौतुक वाटते. अमेरिकेतील निरनिराळ्या लोकाना हे पत्र वाचावयास मिळेल तर तुमच्या राष्ट्रीय पक्षाच्या लोकाना पुष्कळ हितचिंतक व स्नेही लाभतील. अमेरिका व युरोप या खंडांत हिंदी राष्ट्रीय चळवळीला भरपूर पाठबळ मिळेल. पण ती चळवळ इकडील लोकाना अजून कोणी समजाऊनच दिलेली नाही. तुम्हाला टिळकाना तुरुंगात पत्रे पाठवून हकिकत कळविता येते काय? तसे असेल तर टिळकाना असे कळवा की माझ्या मनात त्यांच्याबद्दल अत्यंत आदरबुद्धि व कौतुक आहे. देशहिताला वाहिलेल्या अशा विभूति थोड्याच असतात. हल्ली जे राजकीय युद्ध सुरू आहे त्यात मदत देण्याला टिळक स्वदेशात नाहीत ही दुःखाची गोष्ट आहे. पण नुसत्या त्यांच्या छळानेहि कार्य होणार आहे. तुमच्या हातून चाललेले कार्य पाहून मला फार आनंद होतो.

### (१२) आर्थर क्रॉफर्ड यांचे केळकराना पत्र

नव्या पत्रासंबंधाने तुम्ही व चित्रशाळेचे मालक यानी मिळून अंदाजपत्रक तयार करावे. ते कळले म्हणजे टाईप खरेदीची व्यवस्था होईल. वेळेचे फार महत्त्व आहे. म्हणून लवकरच उत्तर धाडा. मी तुम्हाला पाठविलेले आर्टिकल तुम्ही नाकारले याबद्दल मला काही वाटत नाही. तुमची त्यावरील टीका प्रामाणिक व वजनदार होती म्हणून मी ते आर्टिकल फाडून टाकले. माझ्या पुस्तकावरील तुमचा अभिप्राय यथान्यायच लिहिलेला होता. पण तुम्ही म्हणता त्याप्रमाणे ते पुस्तक लिहिताना मी गैरशुद्धीत नव्हतो! इकडे त्या पुस्तकाची फार चाहा झाली पण ते असो.

### (१३) डॉ. केतकर यांचे केळकराला पत्र।

माझे नांव तुम्ही यापूर्वी कदाचित ऐकले असेल. तुम्ही मराठा पत्राचे संपादकत्व सोडून ते खाडिलकरांकडे दिले हे पाहून मला फार वाईट वाटले. त्याहिपेक्षा मला याचे वाईट वाटले की टिळकानी खाडिलकराना केसरीचे संपादक केले. कारण शिक्षण व पात्रता या दोन्ही दृष्टींनी ते या जागेला माझ्या मते नालायक आहेत. ते मराठी चांगले लिहितात हे खरे. पण महाराष्ट्रांतील या सर्वोत्तम पत्राच्या संपादकाला नुसता तेवढा गुण पुरा होत नाही. हल्लीची ही व्यवस्था चालेल तर केसरी बुडेल आणि वाचकवर्गाचीहि न भरून येण्यासारखी हानि होईल. पुण्यात वासुदेवराव जोशी याना व मुंबईसरकारामार्फत टिळकानाहि मी या बाबतीत लिहित आहे. तुम्हीहि टिळकांकडे ही गोष्ट कळवा.

### (१४) मुंजे यांचे केळकराना पत्र

नागपूर ९ सप्टेंबर १९१०

सरकारने केसरीकडून जामीन मागितला तर कठिण प्रसंग. दहा हजार रुपये घालावयाचे व ते जावयाचेच म्हणून वाटते की जामिनकी देऊ नये. पण वर्तमान-

पत्र थ॰॰बवून तरी काय करणार असेहि वाटते. टिळक येईपर्यंत त्यांच्या कुटुंबाकरिता तरी वर्त॰मानपत्र चालले पाहिजे. म्हणून वाचकाना कळवावे की टिळक येईपर्यंत आम्ही ॰ केसरीत नुसती बातमी घालीत जाऊ. संपादकीय मजकूरच लिहिणार नाही. टिळ॰क येईपर्यंत त्यांच्याकरिता लोक हेहि कबूल करतील. प्रसंग अवघड म्हणून सु॰ ॰ले ते लिहिले आहे.

### ( १९ ) मोतीलाल घोस यांचे केळकराना पत्र

पुरी जुलै १९११

मी हल्ली पुरी येथे आहे. आणखी दोन आठवडे राहाणार आहे. भूपेंद्रनाथ बसूंचे पत्र मला आले त्यात ते लिहितात की राजकीय कैद्यांच्या मुक्ततेसंबंधाने आम्ही लौकरच काही खटपट करणार आहो व ती साध्य होण्याची आशा आहे, असे काही वजनदार इंग्रज गृहस्थ माझ्या जवळ बोलले. त्यांचे ह्मणणे टिळकाना सोडल्यास त्यानी असे लिहून द्यावे की तीन वर्षेपर्यंत ते राजकारणात पडणार नाहीत किंवा राजद्रोही क्रांतिकारक चळवळ करणार नाहीत अथवा ती करणाऱ्याशी संबंध ठेवणार नाहीत. टिळक हल्ली गीतेचे भाषांतर करीत आहेत व इतर पुस्तके लिहीत आहेत तेव्हा त्याना सहजच असे म्हणता येईल की, मी तीन वर्षे गीता धर्मग्रंथ याचेच काम करीत बसेन. कित्येक लोक म्हणतील की अशी कबुली दिल्यापेक्षा टिळकानी तुरुंगातच राहावे. पण असे म्हणणारे लोक वेडे आहेत किंवा ते टिळकाचे खरे स्नेही नाहीत असेच मी म्हणेन. हल्ली चळवळहि विशेष नाही. म्हणून तुरुंगातून सुटले तरी काही दिवस राजकाणात न पडता ते राहिले तरी चालेल. निदान स्वतः त्यांच्याकरिता नसले तरी इतरांकरिता त्यानी ही अट कबूल करावी असे मी म्हणेन. भूपेंद्रबाबूचे शब्द असे आहेत "हिंदुस्थान सरकारने या विषयी स्थानिक सरकारना विचारले आहे. पैकी मुंबईसरकार टिळकाना सोडण्याच्या विरुद्ध आहे. त्याना असे वाटते की टिळक सुटून बाहेर पडल्यास ते आपल्या राजकीय चळवळी पुन्हा सुरू करतील आणि टिळकाना सोडल्याशिवाय इतर कैद्याना सोडणे व्यर्थ आहे. त्याचा काही परिणाम होणार नाही. ह्मणून एवढ्यावर हे प्रकरण थांबले." मला वाटते की मला टिळकाशी पत्रव्यवहार करता आला तर ही अट कबूल करण्याविषयी मी त्यांचे मन वळवू शकेन. तरी टिळकांच्या स्नेह्यांचा सल्ला घ्या. केवळ भावनाप्रधान अशा लोकाना विचारण्यात अर्थ नाही. आणि ते बरे म्हणाले तर तशी तार भूपेंद्रनाथ याना पाठवा. भूपेंद्रबाबूनी असेहि लिहिले आहे की टिळकाना ही अट मान्य असल्याचे केळकरानी आश्वासन दिल्यास "ठीक आहे" अशी तार करा. मी जुलैमध्ये इकडून निघणार, म्हणून पत्र पाठवले तर मला कदाचित् फार उशीरा पोचेल. तरी मला तार किंवा पत्र पाठवा ह्मणजे मी भूपेंद्रबाबूना तार करीन.

( १६ ) खापर्डे यांचे मोतीबाबूला पत्र

उमरावती ५ जुलै १९११

भूपेंद्रनाथ बसू हे बादशहांच्या राज्यारोहणप्रसंगी सर्व राजकीय कैद्याना सोडून देण्याविषयी विशेषतः टिळकांच्या सुटकेविषयी खटपट करीत आहेत असे लिहिले ते कळले. आम्ही इकडील लोक त्याबद्दल आभारी आहो असे त्याना कळवा. उरलेल्या तीन वर्षांच्या मुदतीत टिळकानी राजकीय कामात मुळीच पडू नये असे म्हटले तर त्याचा अर्थ समजतो. पण राजद्रोही किंवा क्रांतिकारक मतांचा प्रसार त्यानी करू नये किंवा तो करणाऱ्या लोकाशी संबंध ठेवू नये हे शब्द इतके मोहक पण इतके व्यापक आहेत की त्यात काय वाटेल ते येऊ शकेल. बरे टिळकानी अशा गोष्टी केल्या तर त्याला कायदा आहेच. मग ती शर्त म्हणून सुचविण्यात काय अर्थ? अट घालावयाची असेल तर ती निश्चित व फक्त तीन वर्षांपुरतीच असावी. जन्मभराची अट कोणतीहि घातल्यास टिळक मान्य करणार नाहीत. व ती व्यापक असल्यास सरकाराला टिळकाना वाटेल तेव्हा पुन्हा पकडता येईल. त्यात काय अर्थ? माझे लिहिणे शंकेखोरीचे वाटेल पण 'अतिस्नेहः पापशंकी' ही संस्कृत म्हणच आहे. अटीसंबंधाने ज्याने भूपेंद्रबसूना लिहिले आहे असे म्हणण्यात येते त्या इंग्रज गृहस्थाचे नाव कळेल तर जरा बरे होईल. कारण नावावरून त्यात तथ्य किती याचा अंदाज लागेल. नाही तर लंडनच्या हवेत अशा गप्पा वाटेल तितक्या उठत असतात. मी शंका काढतो त्याबद्दल रागाऊ नका. अशा कामी सावधगिरीच बरी.

( १७ ) डॉ. मुंजे यांचे केळकराना पत्र

नागपूर १७ डिसेंबर १९१२

सर चार्लस क्लीव्हलंड यांची गाठ पडली होती. ते म्हणाले 'सरकारने टिळकांविषयी काय करावे?' मी म्हणालो 'ते सरकारासच माहीत. तरी पण टिळकाना सरकाराने सोडावे असे मी सांगतो. टिळकाना स्वतः त्याचे काही वाटत नसेल पण त्यांची बुद्धिमत्ता फुकट जात आहे असे लोकाना वाटते. राजकारणात पडू नये पण त्यानी आपली इतर कामे करावी अशी काही व्यवस्था सरकारास करता आली असती.' सर चार्लस म्हणाले की 'टिळकाना शिक्षा झाली तेव्हा कित्येक लोकाना आनंद झाला. त्याच लोकांच्या चिथावणीवरून टिळकांवर मूळ खटला करण्यात आला व हल्ली त्यांच्या सुटकेच्या आड तेच लोक येत आहेत.'

( १८ ) लजपतराय यांचे केळकराना पत्र

लंडन १६ डिसेंबर १९१२

आज दोन प्रहरी लॉर्ड मोर्ले हे सुधारणावर बोलणार आहेत. पण मला काही आशा वाटत नाही. इकडच्या या देवतावर विश्वास ठेवण्यापेक्षा आपल्याच

देवावर ठेवलेला बरा. अलीकडे खापर्डे यांची गांठ पडली नाही. रूफस ऐझॅक्स याला काम फार. यामुळे तो आपणास लाभणार नाही असे दिसते. पण कोणीहि दिला तरी निकाल तोच व्हावयाचा. डेली एक्सप्रेसवर मी दावा लावला. त्याकरिता मी येथे गुंतून पडलो आहे. स्नेहीमंडळीनी मरीला घातले म्हणून दावा केला. पण आता ते काही मदत म्हणून करीत नाहीत. तरी आता एकदा होडी ढकलली खरी. नागपूर कॉंग्रेस सरकाराने बंद पाडली म्हणावयाची!

### (११) मुंजे यांचे केळकराना पत्र

नागपूर १४ एप्रिल १९१३

मी अलीकडे सिमल्यास गेलो होतो. सर चार्लस् क्लीव्हलंड यांची गाठ पडली. दिल्ली दरबाराच्या प्रसंगी टिळकाना सोडावे अशी क्लीव्हलंड यानी पुष्कळ खटपट केली. पण लॉर्ड सिडेनहॅम व इतर काही लोक यानी विरुद्ध अभिप्राय दिल्यामुळे त्याला यश आले नाही.